# सूरह ताहा

# २०. सूरह ताहा

**नावः** सूरहचा आरंभ या अक्षराने झाला आहे. तद्नूषंगे या सूरहचे नाव ताहा होय.

**अवतरण काळः** मक्की होय. आणि हजरत उमर यांच्या ईमान बाळगण्या पूर्वी (संभवत: प्रेषित्वाच्या ६ व्या वर्षी) अवतरली होती कारण हजरत उमर यांच्या ईमान आणण्याची जी घटना इब्ने इसहाक यांनी वर्णिली आहे. तिच्यात या गोष्टीचा उल्लेख आहे की त्यांच्या बहीणीने जी पोथी त्यांना दिली त्यात सूरह 'ताहा' लिहिली होती आणि जेव्हा हजरत उमर यांनी यातल्या सुरवातीच्या आयती वाचल्या तेव्हा अकस्मात उद्‌गारले, किती उत्कृष्ट व किती प्रतिष्ठीत वाणी आहे ही ! (सीरत इब्ने हिशाम खंड-१पृष्ठ - ३६७)

**मध्यवर्ति कल्पनाः** वही (ईश-संदेश) व प्रेषित्वाची गरज विशद करणे व त्याचा इन्कार करणाऱ्यांना सावध करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ८ मध्ये कुरआन आवतरणाचा उद्देश व त्याची ओळख ज्याचे फर्मान म्हणून हे अवतरीत झाले आहे.

आयत क्र. ९ ते ९८ मध्ये हजरत मूसा यांना प्रेषित्व पदाने सम्मानित केले जाण्याची घटना वर्णिली गेली आहे तसेच त्यांच्या आवाहनास प्रस्तुत करीत त्यांच्या विरोधकांच्या दुष्परिणतीस सादर केले गेले आहे.

आयत क्र. ९९ ते ११२ मध्ये हज़रत मूसा यांच्या वृत्तांता पासून जो बोध मिळतो, त्याकडे निर्देश करीत कियामतीचा अहवाल सादर केला गेला आहे, यासाठी की प्रेषित्वाचा इन्कार करणाऱ्यांनी सावध व्हावे.

आयत क्र. ११३ व ११४ मध्ये निवेदनाचा रोख पुन्हा कुरआन अवतरणाच्या उद्देश्याकडे वळला आहे.

आयत क्र.११५ ते १२३ मध्ये हज़रत आदम यांचा वृत्तांत वर्णिला गेला आहे; व याचा हा पैलू प्रकट केला गेला आहे की मानव जातींचा जेव्हा या जमीनीवर आरंभ झाला तेव्हा तिच्यावर ही वस्तुस्थिती स्पष्ट केली गेली होती की सर्वश्रेष्ठ अल्लाह मानवाच्या मार्गदर्शना साठी वही व प्रेषित्वाचा क्रम जारी राखील. तेव्हा जे लोक ईश-मार्गदर्शनाचे अनुसरण करतील तेच सैतानाच्या पथभ्रष्टते पासून व दुष्परिणती पासून सुरक्षित राहतील.

आयत क्र. १२४ ते १२९ मध्ये अल्लाहच्या आयतींशी बेपर्वा होण्याचा परिणाम सादर केला गेला आहे.

आयत क्र.१३० ते १३२ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमाने समस्त ईमान बाळगणाऱ्यांना संयम व धैर्य बाळगण्याची ताकीद केली गेली आहे व सांत्वन केले गेले आहे की चांगली परिणती अशाच लोकांकरीता आहे.

आयत क्र.१३३ते १३५ मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या आक्षेपांना उत्तर दिले गेले आहे

# २०. सूरह ताहा

سورة طه

अनुवाद
(आयती -१३५)

परम दयाळू व परम कृपाळू आल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. ता-हा.[१]

طه ①

२. आम्ही तुमच्यावर क़ुरआन अशासाठी अवतरीत केले नाही की तुम्ही संकटात पडावे.

ما أنزلنا عليك القرآن لتشقى ②

३. ही तर एक स्मरणिका आहे, अशा लोकांकरीता जे भय बाळगत असावेत.[२]

إلا تذكرة لمن يخشى ③

४. (हा ग्रंथ) त्याने अवतरीत केला आहे ज्याने जमीन व उच्च आकाशांना निर्माण केले.[३]

تنزيلا ممن خلق الأرض والسماوات العلى ④

५. तो रहमान अर्श वर उच्च (विराजमान) आहे.[४]

الرحمن على العرش استوى ⑤

६. त्याचेच आहे सर्व ते जे आकाशांमध्ये आहे जे जमीनीत आहे, जे या दोघांच्या दरम्यान आहे व जे माती खाली आहे.[५]

له ما في السماوات وما في الأرض وما بينهما وما تحت الثرى ⑥

७. जर तुम्ही उंच स्वरात बोलाल तर (त्याची शान अशी आहे की) तो हळू स्वरात सांगितलेली गोष्ट व अतिशय गुप्त अशा गोष्टीसहि जाणतो.[६]

وإن تجهر بالقول فإنه يعلم السر وأخفى ⑦

८. अल्लाह खेरीज कोणीहि ईश्वर नाही. त्याच्याच करीता आहेत सर्व उत्तम नावे.[७]

الله لا إله إلا هو له الأسماء الحسنى ⑧

९. आणि काय तुम्हाला मूसाच्या वृत्तांताची खबर पोहचली ?[८]

وهل أتاك حديث موسى ⑨

१.'ता' चा संकेत 'तुवा' कडे आहे. ज्याचा उल्लेख आयत क्र. १२ मध्ये केला गेला आहे. हे सीना पर्वताच्या त्या खिंडीचे नाव होय ज्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मूसा यांना प्रेषित्व पदाने सम्मानित केले. 'हा'चा संकेत 'हारून' कडे आहे ज्याचा उल्लेख या सूरह मध्ये अनेक ठिकाणी केला गेला आहे. या अक्षरांच्या अधिक स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह बकरा टीप क्र.१ आणि सूरह युनुस टीप क्र.१

२. ज्या परिस्थितीत या सूरहचे अवतरण झाले आहे ती ईमान बाळगाणाऱ्यां करीता अतिशय बिकट होती. क़ुरआन चा इन्कार करणाऱ्यांनी त्यांना जगणे मुश्कील केले होते. ज्यामुळे अगतिक होऊन एक समूह स्थलांतर करून हब्शा (ॲबिसिनीया) येथे गेला होता. अशा स्थितीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या सोबत असलेल्या अनुयायींना या आयतींद्वारे समाधान दिले गेले की त्यांनी विमनस्क होऊ नये. तुम्ही संकट ग्रस्त व्हावे या साठी क़ुरआनाचे अवतरण झाले नाही, किंबहुना अशासाठी झाले आहे की जो पाठ माणसाच्या स्वभाव लेखावर लिहिलेला आहे व गफलतीत राहिल्यामुळे त्याचे विस्मरण घडले आहे, त्याचे पुन्हा स्मरण व्हावे. अर्थात ही स्मरणिका माणसा करीता मांगल्य व सद्‌भाग्य कारक आहे कारण माणसाकरिता सद्‌भाग्य स्वभावधर्माशी सुसंगती साधण्यात आहे. स्वभाव धर्माशी विद्रोह करण्यात नव्हे. आता जर विकृत मनोवृत्तीचे लोक क़ुरआनावर ईमान राखणाऱ्यांच्या मार्गात काटे पसरवितात तर याबद्दल सहनशीलता बाळगली पाहिजे. कारण पवित्र क़ुरआनाने सद्‌भाग्याचा जो मार्ग तुम्हाकरिता खुला केला आहे त्याला हे लोक कोणत्याहि स्थितीत बंद करू शकत नाही आणि क़ुरआन माणसाला जो विस्मरण घडलेला पाठ आठवून देत आहे त्याद्वारे असा प्रत्येक मनुष्य लाभान्वित होऊ शकतो ज्याच्या अंगी थोडे तरी ईश-भय आहे.

३. या आयतींमध्ये क़ुरआनाला अवतरीत करणाऱ्याची खरी ओळख दिली गेली आहे. या साठी की लोकांना हे चांगल्या प्रकारे कळून यावे ही अतिशय महानतम वाणी आहे जी एका अतिशय महान अस्तित्वाद्वारे फर्मानाच्या स्वरूपात अवतरीत झाली आहे.

४. स्पष्टीकरणा करिता पहा सूरह अअराफ टीप क्र. ८३ या ठिकाणी अल्लाहचे हे गुण वैशिष्ट्य की तो दयाळू आहे .या गोष्टीस व्यक्त करीत आहे की तो सर्व सृष्टीवर अत्याधिक कृपेहस राज्य करीत आहे.

५. म्हणजे या सपूंर्ण सृष्टीचा स्वामी केवळ अल्लाह आहे. अशी कोणतीहि वस्तु नाही जिचा स्वामी त्याच्या शिवाय अन्य एखादा असावा तो स्वामी आहे व सर्व दास आहे तेव्हा त्याच्या खेरीज अन्य एखाद्याचा ईश्वर असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

६. अर्थात त्याच्या ज्ञानाची ही महीमा होय की तुम्ही एखादी गोष्ट जाहीरपणे बोला किंवा हळू स्वरात तो चांगल्या प्रकारे जाणतो, येथपावेतो की अतिशय गुप्त गोष्टी देखील ज्या मनातल्या मनात वावरतात.

७. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप-२७८.

८. हजरत मूसा याचा वृत्तांत नंतरच्या आयतींमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत: निवेदन केला आहे. येथे हा प्रश्न की काय मूसाच्या घटनेची खबर तुम्हाला पोहचली. ऐकण्याची उत्सुकता निर्माण करण्यासाठी आहे.

१०. जेव्हा त्याने आग पाहिली तेव्हा तो आपल्या कुटुंबियांना म्हणाला, थांबा, मला आग दिसली आहे (मी जातो) जेणे करून तुमच्यासाठी विस्तव घेऊन यावे किंवा संभवत: आगी जवळ एखादे मार्ग दर्शन लाभावे.[९]

إِذْ رَأَىٰ نَارًا فَقَالَ لِأَهْلِهِ امْكُثُوا إِنِّي آنَسْتُ نَارًا لَّعَلِّي
آتِيكُم مِّنْهَا بِقَبَسٍ أَوْ أَجِدُ عَلَى النَّارِ هُدًى ﴿١٠﴾

११. जेव्हा तो त्या (अग्नि) जवळ पोहचला तेव्हा साद (कानी) आली, हे मूसा !

فَلَمَّا أَتَاهَا نُودِيَ يَا مُوسَىٰ ﴿١١﴾

१२. मी आहे तुमचा पालन कर्ता ![१०] आपले जोडे (पायातून) काढा. तुम्ही 'तुवा'च्या पवित्र खिंडीत आहात.[११]

إِنِّي أَنَا رَبُّكَ فَاخْلَعْ نَعْلَيْكَ ۖ إِنَّكَ بِالْوَادِ الْمُقَدَّسِ
طُوًى ﴿١٢﴾

१३. आणि मी तुमची निवड केली आहे [१२] तेव्हा जी वही (ईश-संदेश) दिली जात आहे ती लक्ष पूर्वक ऐका.[१३]

وَأَنَا اخْتَرْتُكَ فَاسْتَمِعْ لِمَا يُوحَىٰ ﴿١٣﴾

१४. मीच अल्लाह आहे. माझ्या खेरीज कोणी ईश्वर नाही.[१४] तेव्हा माझीच इबादत (उपासना) करा [१५] आणि माझ्या स्मरणासाठी नमाज़ कायम करा.[१६]

إِنَّنِي أَنَا اللَّهُ لَا إِلَٰهَ إِلَّا أَنَا فَاعْبُدْنِي وَأَقِمِ
الصَّلَاةَ لِذِكْرِي ﴿١٤﴾

१५. नि:संशय कियामतीची घडी येणार आहे.[१७] मी तिला गुप्त राखावयास आहे,[१८] अशा साठी की प्रत्येक माणसाला आपल्या प्रयत्नानुसार मोबदला प्राप्त व्हावा.[१९]

إِنَّ السَّاعَةَ آتِيَةٌ أَكَادُ أُخْفِيهَا لِتُجْزَىٰ
كُلُّ نَفْسٍ بِمَا تَسْعَىٰ ﴿١٥﴾

१६. जे लोक यावर ईमान बाळगत नाही आणि आपल्या इच्छा-आकांक्षांच्या मागे लागले आहेत त्यांनी कदाचित या पासून तुम्हाला न रोखावे की जेणेकरून तुम्ही विनाशग्रस्त व्हावे.[२०]

فَلَا يَصُدَّنَّكَ عَنْهَا مَن لَّا يُؤْمِنُ بِهَا وَاتَّبَعَ هَوَاهُ فَتَرْدَىٰ ﴿١٦﴾

१७. आणि हे मूसा ! हे तुमच्या उजव्या हातात काय आहे ?

وَمَا تِلْكَ بِيَمِينِكَ يَا مُوسَىٰ ﴿١٧﴾

९. ही त्या वेळीची घटना होय. जेव्हा हजरत मूसा मदयन मध्ये अनेक वर्ष राहील्या नंतर आपल्या मुलाबाळांसह मिस्र (इजिप्त) देशी परतत होते.

स्पष्ट असावे की बनी इस्राईल हजरत यूसुफ यांच्या काळापासून मिस्र (इजिप्त) मध्येच वास्तव्य करीत होते. आणि हजरत मूसा देखील तेथेच जन्माला आले होते, परंतु तरूण झाल्यानंतर एका विशेष प्रसंगी मदयन येथे चालले गेले, जिथे काही काळ त्यांनी वास्तव्य केले.

मदयन हून परततांना ते सीना वाळवंटात तूर पर्वताजवळून जात होते. रात्र कडाक्याच्या थंडीची होती व मार्ग देखील कळून येत नव्हता. तेवढ्यात एका ठिकाणी त्यांना आग दिसून आली. ते आपल्या कुटुंबियांना म्हणाले, तुम्ही या ठिकाणी थांबा, मी जाऊन विस्तव आणतो. जेणेकरून तुम्हाला शेकायला होईल व संभवत: तिथे मार्ग कळून येईल.

१०. जेव्हा हजरत मूसा आगी जवळ पोहचले, तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना साद घातली. 'मी तुमचा पालन कर्ता आहे.' ईश (वही) अवतरीत करण्याचा एक प्रकार हा देखील आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या दासाशी प्रत्यक्षत: संभाषण करावे. आणि हजरत मूसा यांचे हे वैशिष्ट्य होय की त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत:शी संभाषण करण्याचा मान प्रदान केला व त्यांच्या प्रेषित्वाचा आरंभ फिरिश्ताच्या माध्यमा विना सर्वश्रेष्ठ अल्लाहशी झालेल्या प्रत्यक्षत: संभाषणा द्वारे झाला.

स्पष्ट असावे की सर्वश्रेष्ठ अल्लाह या गोष्टीपासून मुक्त आहे की त्याने एखाद्या निर्मित वस्तूत प्रवेश करावा. यास्तव जी आग हजरत मूसा यांना दिसली होती ती ना ईश्वर होती ना ईश्वराने तिच्यात प्रवेश केला होता. किंबहुना तो एक विशेष प्रकारचा प्रकाश होता, ज्याने हजरत मूसा यांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेतले. त्यांनी अल्लाहची साद व संभाषण निश्चित ऐकले परंतु अल्लाहला पाहीले नाही. पवित्र क़ुरआन या विषयी स्पष्टीकरण करते की नंतर जेव्हा तूर पर्वता वर हजरत मूसा यांना शरीअत प्रदान करण्याकरीता बोलाविले तेव्हा त्यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहला ही विनंती केली होती की अल्लाहने दर्शन द्यावे. त्यांच्या या विनवणी वर अल्लाहने फर्माविले, لَنْ تَرَانِی ''तुम्ही मला कदापि पाहू शकणार नाहीत.'' (सूरह अअराफ-१४३)

११.'तुवा' तूर पर्वताच्या एका खिंडीचे नाव आहे जी पवित्र झाली होती परंतु आता ती या नावाने परिचित राहीली नाही. असे दिसून येते की ही संपूर्ण खिंड या विशेष आगीच्या प्रकाशाने तेजोमय झाली होती. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह हजरत मूसा यांना आपल्याशी बोलण्याचा सन्मान प्रदान करीत होता म्हणून विशेष इतमामाने उपस्थितीचा शिष्टाचार पाळण्याचा आदेश दिला गेला. यास्तव फर्माविले गेले, आपले जोडे पायातून काढा व त्याचे कारणहि स्पष्ट केले गेले की तुम्ही या वेळी तुवाच्या पवित्र खिंडीत आहात. तिचे पवित्र असणे उघडपणे व अध्यारुत पणे दोन्हीहि बाबतीत होते. ज्याअर्थी या भूमीत सर्वश्रेष्ठ अल्लाहची ही महीमा उघड होत होती की हजरत मूसाशी संभाषण करावे म्हणून तिला सैतान व त्याच्या उपद्रवापासून पूर्णत: सूरक्षित केले गेले व तेथल्या वातावरणास समृद्धशाली बनविले गेले. या असामान्य पावित्राची ही निकड होती की शिष्टाचार व आदर सन्मानाचे स्तर उच्च रहावे व आतिथ्य देखील पूर्णपणे व्यक्त व्हावे. जोडे काढणे या मानसिक स्थितीची अभिव्यक्ति होती, म्हणून याचा विशेषत्वाने आदेश दिला गेला. राहिला हा प्रश्न की जोडे घालून जर ते स्वच्छ असल्यास किंवा मातीने घासलेले असल्यास-नमाज़ पढणे हदीस मध्ये कशा प्रकारे उचित ठरवले आहे? तर याचे उत्तर असे की ही सवलत इस्लामने सर्वसामान्य गरज लक्षात घेता दिली आहे. जेव्हा हजरत मूसा यांना जो आदेश दिला गेला होता तो शिष्टाचार व आदराच्या विशेष इतमामाचा होता कारण सर्व विश्वाचा पालन कर्ता स्वत: त्यांच्याशी बोलत होता; व हज़रत मूसा ऐकत होते अर्थात नमाज़ मध्ये ही स्थिती नसते, किंबहुना दासातर्फे विनवणी असते.

सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या, 'तुम्ही तुवाच्या पवित्र खोऱ्यात आहात' हे फर्माविण्याचा फायदा असाहि झाला की हजरत मूसा जो मार्ग शोधीत होते तो त्यांना कळाला की आता ते तुवाच्या स्थानावर आहेत. तात्पर्य पुढचा मार्ग शोधणे त्यांना सोयीस्कर झाले असेल.

१२. म्हणजे प्रेषित्व पदासाठी.

१३. हज़रत मूसा प्रवासात होतो की अकस्मात अल्लाहने त्यांना बोलविले व प्रेषित्व पदाने सम्मानित केले. यावरून स्पष्ट झाले की प्रेषित्व आणि पैगंबर पद एक अशी देणगी आहे जिच्या द्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या निवडक दासांना उपकृत करतो. या पदास कोणताहि मनुष्य प्रयत्नांद्वारे प्राप्त करू शकत नाही. हजरत मूसा यांना प्रेषित्व पद प्रदान करण्याचा व त्यांच्यावर वही (ईश-संदेश) अवतरणाचा वृतांत निवेदन करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'वही' व प्रेषित्व पदाने सम्मानित केले जाण्याची घटना आगळी नाही. किंबहुना या पूर्वीहि सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या निवडक दासांना या पदावर नियुक्त करीत राहिला आहे. ज्याचे स्पष्ट उदाहरण हजरत मूसा यांचा वृत्तांत होय.

१४. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हज़रत मूसा यांना संबोधून जी सर्वप्रथम शिकवण दिली ती एकेश्वरवादाची होती. हा तो आधारस्तंभ आहे की ज्यावर इस्लामची संपूर्ण इमारत उभी आहे आणि हे ते दीव्य तेज होय की ज्यापासून मार्गदर्शनाची समस्त किरणे पसरली.

१५. उपासनेची वास्तविकता अत्याधिक प्रेमाने अत्याधिक

आदर सन्मान करणे व आपली आज्ञाधारकता व्यक्त करणे होय. याला पात्र केवळ अल्लाहच होऊ शकतो आणि जेव्हा अल्लाह खेरीज अन्य ईश्वर नाही तर उपासनेस पात्र देखील त्याच्या खेरीज कोणी नाही. दासाचे एक दास या नात्याने हे कर्तव्य ठरते की त्याची उपासना करावी. अर्थात अल्लाहच्या शरीयतीची माणसाकडून ही सर्वप्रथम मागणी आहे.

१६. म्हणजे नमाज़ उपासनेचे उत्कृष्ट स्वरुप आहे. यास्तव तिचा पूरेपूर इतमाम राखा. अर्थात नमाज़चा हा इतमाम अल्लाहच्या स्मरणार्थ असावा. तात्पर्य नमाज़चा मूल उद्देश अल्लाहचे स्मरण करणे व त्याच्याशी संलग्न असणे हा होय. दास जेव्हा आपल्या पालनकर्त्याचे स्मरण करतो तेव्हा दास्यत्वाचा संबंध त्याच्याशी दृढ होतो. आणि माणसाचे सर्व यश व त्याच्या खऱ्याखुऱ्या उत्कर्षाचा पाया या गोष्टीवर आहे की त्याने आपल्या पालनकर्त्याशी योग्य संबंध कायम करावा; व त्यास दृढतम बनविण्यास प्रयत्नशील रहावे.

स्मरणाचा अर्थ मन:पूर्वक स्मरण करणे असाहि आहे, व वाचेने उचार करणे असा देखील.'नमाज़ला' माझ्या स्मरणार्थ कायम करा' चा अर्थ केवळ तोंडाने विशिष्ट वचनांचा उच्चार करणे असा नव्हे. तर मन: पूर्वक स्मरण करीत त्या वचनांचा अदा करणे हा होय. याची निकड अशी की दासाने नमाज़ पढतांना आपले लक्ष पालनकर्त्याकडे केंद्रीत करावे व मन:पूर्वक त्याची स्तुती प्रशंसा करावी.

१७. हज़रत मूसा यांना प्रेषित्व पदाने सम्मानित करतांना जी मूलभूत शिकवण दिली गेली होती तिच्यात कियामतीचे घडून येणे व कर्मफलाचा नियम देखील निवेदिला गेला होता.परंतु सध्याच्या तौरात मध्ये ज्या ठिकाणी हज़रत मूसा यांच्या प्रेषित्व पदाने सम्मानित केले जाण्याचा किस्सा आहे तिथे या शिकवणीचा कोणताहि उल्लेख नाही. (पहा निर्गम प्रकरण १३ व ४) एवढेच नव्हे तर संपूर्ण तौरात मध्ये आखिरतच्या शिक्षा व मोबदल्या विषयीचा उल्लेख क्वचितच कोठे आढळेल. यावरून हे दिसून येते की ग्रंथ धारक कर्म फलाच्या नियमास कशा प्रकारे विसरले होते व क़ुरआनाने त्यास कशा प्रकारे प्रकट केले.

१८. 'मी तिला गुप्त राखावयास आहे'चा अर्थ असा की कियामतीची वेळ गुप्त राखली गेली आहे म्हणून कोणीहि ना तिच्या आगमना पूर्वी तिला स्वनेत्राने पाहू शकतो आणि ना तिची मुक्रर तारीख जाणू शकतो असे असले तरी तिला एवढे गुपित राखले गेले नाही की तिची लक्षणे दिसून न यावीत व तिची प्रमाणे स्पष्ट न व्हावीत. कियामतीचा मामला अध्यारूत जरुर आहे, तरीहि तिच्या खाणा खुणा प्रकट होत राहतील.

१९. म्हणजे कियामत एवढ्या साठी घडून येईल की प्रत्येक माणसाने आपल्या आचरणा नुसार मोबदला प्राप्त करावा. तसेच तिला पडद्याआडहि अशा करिता ठेवले गेले आहे की माणसाला परिक्षेतून पार पाडावे व या परिक्षा मय जीवनात त्याचे प्रयत्न ज्या स्वरुपाचे असतील, त्या नुसार त्याला कियामतीच्या दिवशी शिक्षा वा मोबदला मिळावा.

२०. मनुष्य वातावरणाने फार लवकर प्रभावित होतो आणि इहलोकीय वातावरण आखिरतचा इन्कार व इच्छा भक्तिचे वातावरण आहे. प्रत्येक युगात भौतिक प्रगतीचे कारण हेच समजले गेले आहे की माणसाने ईश्वरा समोर उत्तर दायित्वाच्या काळजीतून मुक्त होऊन जीवन व्यतीत करावे. मग या संदर्भात वातावरणाचा प्रभाव मोठा प्रखर असतो. जर मनुष्य या खोट्या विचारांपासून सावध राहिला नाही तर वातावरणाचा महापूर त्याला वाहून नेतो. यासत्व हजरत मूसा यांना व त्यांच्या माध्यमान्वये त्यांच्या अनुयायींना ही आज्ञा दिली गेली की त्यांनी अशा लोकांपासून सावध रहावे जे आखिरतला मान्य करीत नाही व जे इच्छा आकांक्षाचे दास बनले आहेत.

# तुवा खिंड



बहुधा हीच ती तुवा खिंड होय, जिथे हजरत मूसा यांना आग दिसून आली व सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना पुकारले होते. सागरातल्या बेटासारख्या असलेल्या 'सीना' मध्ये फारानच्या नख्लिस्तान पासून हे सुमारे सत्तर किलो मीटर अंतरावर आहे. येथे कुस्तंतीन ने बनविलेला एक चर्च आहे, जो सेंट कॅथराईनच्या नावाने प्रसिद्ध आहे आणि एक मसजिद आहे जी सुलतान सलीम द्वारे उभारली गेली आहे.

१८. म्हटले, ही माझी काठी आहे. हिच्यावर मी टेका घेतो, आपल्या बकरी (शेळी) साठी पाने झाडतो व हिच्यात माझ्या साठी दुसरे लाभहि आहेत.[२१]

قَالَ هِيَ عَصَايَ أَتَوَكَّؤُا عَلَيْهَا وَأَهُشُّ بِهَا عَلَىٰ غَنَمِي وَلِيَ فِيهَا
مَآرِبُ أُخْرَىٰ ﴿١٨﴾

१९. फर्माविले, हे मूसा तिला खाली टाका !

قَالَ أَلْقِهَا يَا مُوسَىٰ ﴿١٩﴾

२०. त्याने तिला खाली टाकले तेव्हा अचानक तो एक सर्प बनला जो धावत होता.

فَأَلْقَاهَا فَإِذَا هِيَ حَيَّةٌ تَسْعَىٰ ﴿٢٠﴾

२१. फर्माविले, धरा त्याला व भिऊ नका. आम्ही पुनश्च तिला तिच्या पूर्व स्थितीवर आणू.[२२]

قَالَ خُذْهَا وَلَا تَخَفْ سَنُعِيدُهَا سِيرَتَهَا الْأُولَىٰ ﴿٢١﴾

२२. आणि आपला हाथ आपल्या काखेत दाबा. तेजस्वी होऊन निघेल. कसल्याहि व्यंगाशिवाय [२३] ही दुसरी निशाणी आहे.

وَاضْمُمْ يَدَكَ إِلَىٰ جَنَاحِكَ تَخْرُجْ بَيْضَاءَ مِنْ غَيْرِ سُوءٍ آيَةً
أُخْرَىٰ ﴿٢٢﴾

२३. यासाठी की आम्ही तुम्हाला आपल्या मोठ्या निशाण्या दाखवाव्यात.[२४]

لِنُرِيَكَ مِنْ آيَاتِنَا الْكُبْرَى ﴿٢٣﴾

२४. तुम्ही फिरऔन जवळ जा. तो मोठा बंडखोर झाला आहे.[२५]

اذْهَبْ إِلَىٰ فِرْعَوْنَ إِنَّهُ طَغَىٰ ﴿٢٤﴾

२५. विनविले, हे पालनकर्त्या माझे अंत:करण उघड.[२६]

قَالَ رَبِّ اشْرَحْ لِي صَدْرِي ﴿٢٥﴾

२६. आणि माझे काम माझ्या साठी सोपे बनव.[२७]

وَيَسِّرْ لِي أَمْرِي ﴿٢٦﴾

२७. आणि माझ्या वाचेची (जीभेची) गाठ उकल.[२८]

وَاحْلُلْ عُقْدَةً مِنْ لِسَانِي ﴿٢٧﴾

२८. अशासाठी की लोकांनी माझे म्हणणे समजू शकावे.

يَفْقَهُوا قَوْلِي ﴿٢٨﴾

२९. आणि माझ्या कुटुंबातून माझ्या करीता एक वजीर निर्धारीत कर.

وَاجْعَلْ لِي وَزِيرًا مِنْ أَهْلِي ﴿٢٩﴾

३०. हारूनला जो माझा भाऊ आहे.[३०]

هَارُونَ أَخِي ﴿٣٠﴾

२१. प्रश्न चौकशी करण्याचा नव्हता कारण की सर्वश्रेष्ठ अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे. त्याला माहित होते की हज़रत मूसा यांच्या हातात काय आहे. तरीहि त्याने हा प्रश्न अशासाठी केला की हजरत मूसा यांनी आपल्या काठीला ती साप बनण्यापूर्वी चांगल्या प्रकारे निरखून बघावे व ती साप बनल्या नंतर त्यांना चांगल्या विश्वास वाटावा की ही आपलीच लाठी होय. जी साप बनली आहे.

हा विचार करणे योग्य नव्हे की हजरत मूसा यांनी अल्लाहच्या प्रश्नास दीर्घ उत्तर दिले जे योग्य नव्हते. प्रश्न ज्या शैलीत विचारला गेला त्यावरून हजरत मूसा यांना उमजले की काठी विषयी या स्पष्टीकरणाची अपेक्षा आहे की ती कोणत्या हेतुस्तव बाळगली गेली आहे. हे स्पष्टीकरण हजरत मूसा यांच्या अंगी दृढ विश्वास निर्माण करण्यासाठी होते. ज्या काठी द्वारे कधीहि कोणती असामान्य घटना घडून आली नाही तीच काठी आज तुमच्या समोर साप बनवून धावत आहे. हा एक उघड ईश-चमत्कार होय.

२२. या ईश चमत्काराचा उल्लेख तौरात मध्येहि आहे:-

'तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, तुझ्या हाती ते काय आहे? तो म्हणाला काठी आहे त्याने म्हटले, ती जमीनीवर टाक. ती त्याने टाकताच तिचा साप झाला. त्यास पाहून मोशे पलाला. परमेश्वराने मोशेस सांगितले आपला हात पुढे करून त्याचे शेपूट धर. त्याने हात पुढे करून ते धरिले तो त्या सापाची त्याच्या हातात काठी झाली.'

(निगमि ४:२ ते ४ )

२३. हा दुसरा ईश चमत्कार होता जो हजरत मूसा यांना प्रदान केला गेला. आपला हात आपल्या काखेत दाबून ते बाहेर काढ तर तो अगदी पांढरा होत असे. हा पांढरा रंग कोढ वगैरे मुळे नव्हता आणि ना त्यात एखादे व्यंग आढळून येई. असे असते तर हात पुन्हा आपल्या पूर्व स्थितित आला नसता. हा ईश चमत्कार होण्या संबंधीचा स्पष्ट पुरावा होय.

बायबल मध्ये या ईश-चमत्काराचा उल्लेख जरूर आहे पण त्याला कोडाची उपमा दिली गेली आहे. (पहा निर्गम ४:६) यास्तव क़ुरआनाने हे स्पष्ट केले की कोणत्याहि व्यंग दोषी विना पांढरा होत असे. याद्वारे बायबलच्या उल्लिखित निवेदनाचे खंडन होते व क़ुरआनाच्या निवेदनाची सत्यता स्पष्ट होते. कारण ईश-चमत्कार लोकांवर प्रमाण प्रस्थापित करण्याकरीता असतो. यास्तव त्यात वैगुण्याला वाव असूच शकत नाही.

२४. म्हणजे ह्या दोनच निशाण्या नव्हे तर यापुढे इतर मोठ मोठ्या निशाण्याहि तुम्ही पहाल. म्हणून नंतर या काठीद्वारे अनेक निशाण्या उदयास आल्या आणि ही लाठी की जिच्या मारण्याने बनी इस्राईल करीता समुद्रात मार्ग निर्माण झाला.

२५. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह नाजीआत टीप क्र.१३

२६. हजरत मूसा यांना हे जाणवले की प्रेषित्वाची जबाबदारी एक महान जबाबदारी आहे, विशेषत: फिरऔन सारख्या अत्याचारी बादशहाला सत्याचे निमंत्रण देणे मोठ्या धैर्याची गोष्ट होय. म्हणून त्यांनी अल्लाहला प्रार्थना केली त्याने यांना या कामाकरीता धैर्य प्रदान करावे. छाती उघडयाशी अभिप्रेत धैर्य वृद्धिंगत होणे.

२७. म्हणजे जे कार्य तू मला सोपविले आहे, ते पार पाडणे मला सोयीचे व्हावे.

२८. जीभेची गाठ म्हणजे बोलण्यातल्या प्रवाहीपणाची कमतरता. अडखळत, चाचरत बोलणे नव्हे. हजरत मूसा अडखळत बोलत या गोष्टीस कोणतेहि प्रमाण नाही आणि हा जो किस्सा भाष्यांमध्ये निवेदिला गेला आहे की हजरत मूसा यांनी बालपणी फिरऔनच्या पालनकत्वा खाली असतांना तोंडात विस्तव टाकला होता ज्यामुळे त्यांच्या बोलण्यात तोतरेपणा आला होता तर हा किस्सा इस्राईली कथनांचा आहे व रद्द करण्यायोग्य आहे. वस्तुत: आवाहनास अधिक प्रभावीपणे सादर करण्यासाठी संबोधनाची गरज भासते. हजरत मूसांना आपल्या अंगी वाक् शक्तीची कमतरता जाणवत होती. म्हणून त्यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहशी प्रार्थना केली की त्याने जीभेच्या या अडथळ्यास म्हणजे प्रवाही पणे बोलता न येण्यास दूर करावे.

२९. वजीर म्हणजे असा सहाय्यक जो जबाबदाऱ्या पार पाडण्यात मदत करू शकेल; प्रतिनिधित्व करू शकेल.

३०. हजरत हारून हे हजरत मूसा यांचे जेष्ठ बंधू होते. ते सदाचारी होते तसेच संबोधन व्याख्यानात विशेष असल्यामुळे आवाहन कार्याची जबाबदारी पार पाडण्यास अधिक योग्य होते यास्वत हज़रत मूसा यांनी त्यांना पैगंबर बनविण्या संबंधी विनवणी केली.

३१. त्याच्या द्वारे माझी कंबर मजबूत कर.

اشْدُدْ بِهِ أَزْرِي ﴿٣١﴾

३२. आणि त्याला माझ्या कार्यात सहभागी कर.

وَأَشْرِكْهُ فِي أَمْرِي ﴿٣٢﴾

३३. या साठी की आम्ही अत्याधिक पणे तुझे पावित्र्य निवेदन करावे.

كَيْ نُسَبِّحَكَ كَثِيرًا ﴿٣٣﴾

३४. आणि तुझे खूप नाम:स्मरण करावे.[३१]

وَنَذْكُرَكَ كَثِيرًا ﴿٣٤﴾

३५. नि:संशय तू आमच्या स्थितीचा अवलोकन कर्ता आहे.

إِنَّكَ كُنتَ بِنَا بَصِيرًا ﴿٣٥﴾

३६. फरमाविले, तुमची विनंती मंजूर झाली. हे मूसा ![३२]

قَالَ قَدْ أُوتِيتَ سُؤْلَكَ يَا مُوسَىٰ ﴿٣٦﴾

३७. आणि आम्ही एक वेळ तुमच्यावर आणखी उपकार केलेला आहे.[३३]

وَلَقَدْ مَنَنَّا عَلَيْكَ مَرَّةً أُخْرَىٰ ﴿٣٧﴾

३८. जेव्हा आम्ही तुमच्या मातेकडे वही (ईश-संदेश) पाठविली,[३४] ती वही जी केली जात आहे.[३५]

إِذْ أَوْحَيْنَا إِلَىٰ أُمِّكَ مَا يُوحَىٰ ﴿٣٨﴾

३९. की याला पेटील ठेवा मग या (पेटी)ला नदीत सोडा-नदीने तिला किनाऱ्यावर टाकून द्यावे आणि तिला (पेटीला) अशा माणसाने उचलावे जो माझाहि वैरी आहे व या (मुला)चा देखील.[३६] आणि मी तुमच्या वर आपल्या तर्फे प्रेम टाकले होते.[३७] आणि हे अशा साठी केले होते की तुमचे पालन पोषण माझ्या देखरेखी खाली व्हावे.[३८]

أَنِ اقْذِفِيهِ فِي التَّابُوتِ فَاقْذِفِيهِ فِي الْيَمِّ فَلْيُلْقِهِ الْيَمُّ
بِالسَّاحِلِ يَأْخُذْهُ عَدُوٌّ لِّي وَعَدُوٌّ لَّهُ ۚ وَأَلْقَيْتُ عَلَيْكَ مَحَبَّةً
مِّنِّي وَلِتُصْنَعَ عَلَىٰ عَيْنِي ﴿٣٩﴾

४०. जेव्हा तुमची बहीण (पाठोपाठ) जात होती,[३९] म्हणू लागली मी तुम्हाला (अशी स्त्री) दाखवू जी याचे संगोपन [४०]करील, अशा प्रकारे आम्ही तुम्हाला तुमच्या आई कडे परतविले,जेणेकरून तिचे नेत्र शीतल व्हावेत व तिने दु:ख न करावे. [४१] आणि तुम्ही एका माणसाची हत्त्या केली तेव्हा आम्ही तुम्हाला दु:खा पासून मुक्ति दिली. [४२] व तुम्हाला वेगवेगळ्या प्रकारे आजमावले.[४३]आणि तुम्ही कित्येक वर्षे मदयनवाल्यांमध्ये राहिलात [४४] मग हे मूसा तुम्ही योग्य वेळेवर आलात ![४५]

إِذْ تَمْشِي أُخْتُكَ فَتَقُولُ هَلْ أَدُلُّكُمْ عَلَىٰ مَن يَكْفُلُهُ ۖ
فَرَجَعْنَاكَ إِلَىٰ أُمِّكَ كَيْ تَقَرَّ عَيْنُهَا وَلَا تَحْزَنَ ۚ وَقَتَلْتَ
نَفْسًا فَنَجَّيْنَاكَ مِنَ الْغَمِّ وَفَتَنَّاكَ فُتُونًا ۚ فَلَبِثْتَ سِنِينَ
فِي أَهْلِ مَدْيَنَ ثُمَّ جِئْتَ عَلَىٰ قَدَرٍ يَا مُوسَىٰ ﴿٤٠﴾

३१. हजरत मूसा यांना जेव्हा प्रेषित्व प्रदान केले गेले तेव्हा त्यांना सखोल सत्ये व आशयांचा उलगडा झाला. त्यांना हे कळून चुकले की प्रेषित-कार्यात जी गोष्ट मूलभूत महत्व बाळगते व जिला एका उच्च ध्येयाच्या नात्याने समस्त कार्यांमध्ये दृष्टी समोर ठेवले पाहिजे. ती म्हणजे अल्लाहचे पावित्र्य वर्णन करणे व त्याचे अत्याधिक स्मरण व उल्लेख करणे. मुद्दा चारित्र्य घडणाचा असो किंवा इस्लामच्या प्रसार व प्रसाराचा अथवा मार्गदर्शन वा नेतृत्वाचा समस्त कार्यात या इबादतीस तिला साजेल अशा पद्धतिनुसार पार पाडणे अगत्याचे आहे.

३२. हजरत मूसा यांना जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रेषितपदाने सम्मानित केले तेव्हा या जबाबदारीच्या जाणीवेने त्यांना भारदस्त वाटत होते. त्यांची प्रामाणिकता व त्यांच्या कर्तव्य परिचयाची अभिव्यक्ति त्यांच्या प्रत्येक शब्दातून होत होती. त्यांच्या अंतर्मना पासून निघालेली ही प्रार्थना अल्लाहच्या दरबारात स्वीकृत झाली व जे काही त्यांनी मागितले ते सर्व त्यांना मिळाले.

३३. प्रार्थना स्वीकृति नंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या त्या कृपेचा उल्लेख केला जो त्याने हज़रत मूसा यांच्यावर प्रेषित्वापूर्वी फर्माविला होता. जेणेकरून हे स्पष्ट व्हावे की हज़रत मूसा यांच्यावर त्यांच्या जन्मापासूनच अल्लाहची विशेष कृपा दृष्टी राहिली आहे व पावलो पावली तो त्यांची मदत करीत राहिला आहे. मग प्रेषित्वा नंतर तो त्यांची मदत कशी करणार नाही? आणि त्यांचे धैर्य वाढावे की जेव्हा त्यांच्या पालन पोषण करीता अल्लाह तर्फे ईश-चमत्कार प्रकट झाला होता. तेव्हा ज्या कठीण मोहीमेवर त्यांना पाठविले जात आहे. त्यासाठी त्यांच्या चमत्कारांची अभिव्यक्ति का होणार नाही?

३४. ही वही इल्का (मनात एखाद्या गोष्टीचा प्रादुर्भाव करणे) या अर्थाने असू शकत नाही. कारण सूरह कसस मध्ये निवेदन केले गेले आहे की हज़रत मूसा यांच्या मातेस होहि सांगितले गेले होते की या मूलास आम्ही तुमच्या जवळ परत पाठवू व याला आम्ही पैगंबर बनविणार आहोत. उघड आहे, ही गोष्ट या स्थितीत त्यांना माहित पडली असेल, जेव्हा शब्दांच्या स्वरुपात त्यांनी ऐकली असेल म्हणून त्यांच्या जवळ वही अपरोक्ष आवाजाच्या स्थितीत आली असेल-- अल्लाह आपल्या वाणीचे रहस्य चांगल्या प्रकारे जाणतो.

इथे ही वस्तुस्थिती ध्यानात असावी की वहीचे एखाद्या प्रेषित नसलेल्याकडे पाठविले जाणे अपवादात्मक होय. हजरत मूसा यांची माता व हजरत मरयम यांच्याशी वहीचा मामला प्रसंगानुरुप व मर्यादित होता व हा एक अपवादात्मक प्रकार होता. तसेच या 'वही'चा संबंध वस्तुत: हजरत मूसा व हजरत ईसा सारख्या पैगंबरांच्या जन्माशी होता. आणि नंतर या पैगंबराद्वारे या वहीचे समर्थनहि झाले. यास्तव वहीच्या या घटनांमध्ये प्रेषित पदाचा खोटा दावा करणाऱ्यांकरीता कसलेहि प्रमाण नाही.

३५. म्हणजे हे मूसा ! तुमच्या मातेकडे ज्या गोष्टी वही केल्या गेल्या होत्या त्या तुम्हाला 'वही' द्वारे सांगितल्या जात आहेत. पुढे याचा उल्लेख आहे.

३६. हा किस्सा सूरह कसस मध्ये विवरणासह निवेदिला गेला आहे. येथे आम्ही या घटनेची पार्श्वभूमी थोडक्यात वर्णन करतो. बनी इस्राईलने हजरत यूसुफ यांच्या काळात पॅलेस्टीन हून इजिप्त देशी स्थलांतर केले होते. काही शतकांमध्ये यांची लोकसंख्या तिथे खूप वाढली; आणि जेव्हा फिरऔन सत्ताधिकारावर आला तेव्हा त्याला यांच्या वाढत्या लोकसंख्येचा धोका जाणवला.

ज्याअर्थी बनी इस्राईल इस्लाम धर्माचे अनुयायी होते, व इजिप्तवासी अनेकेश्वरवादी धर्माचे, म्हणून फिरऔन व शासक वर्ग बनी इस्राईल बाबतीत मोठ्या पक्षपातात पडला होता; व त्यांच्याशी विशेष वर्तन करीत होता. येथपावेतो की फिरऔनने यांची संख्या घटविण्याकरिता त्यांच्या मुलांना म्हणजे पुत्रांना जन्मताच ठार करण्याचा आदेश दिला होता हजरत मूसा जेव्हा जन्माला आले तेव्हा त्यांच्या मातेने त्यांना लपविले, परंतु हा मामला कोठपावेतो पडद्याआड राहिला असता. फिरऔनच्या लोकांना माहिंत पडताच त्यांनी या मूलाला ठार केले असते म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या विशेष कृपेने त्यांचे रक्षण व पालन पोषणाची असाधारण व्यवस्था केली. हज़रत मूसा यांच्या मातेला 'वही' द्वारे ही आज्ञा दिली गेली की एका पेटीत मूलाला ठेवून ती पेटी नदीत सोडून द्यावी आणि नदीला हा आदेश दिला गेला की त्या पेटीस किनाऱ्यावर सोडावे. तेव्हा हज़रत मूसा यांच्या मातेने या आज्ञाचे पालन केले आणि ती पेटी अशा ठिकाणी किनाऱ्याला लागली जेथे फिरऔन आपल्या पत्नी सोबत हजर होता. त्याने आपल्या माणसांकरवी ती पेटी हस्तगत केली. अशा प्रकारे मूसा अशा माणसाजवळ पोहचले जो अल्लाहचाह शत्रू होता व त्यांचाहि. हा अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार होता. यानंतर जे अन्य चमत्कार उदयास आले. त्यांचा उल्लेख पुढे येत आहे.

३७. म्हणजे मूल मोठे प्रिय व आकर्षक चेहऱ्याचे बनविले होते की पाहता क्षणी कोणालाहि प्रेम वाटावे. अल्लाहची ही उपाय योजना अशी होती की फिरऔन स्वत:कठोर हृदयी असतांनाहि त्याला ठार करण्यास तयार झाला नाही. अर्थात ज्याला ईश्वर तारी त्याला कोण मारी. बायबल मध्येहि मूल सुंदर असल्याचा उल्लेख केला गेला आहे:-

''ती स्त्री गर्भवती होऊन तिला मुलगा झाला तो बालक सुंदर आहे हे पाहून तिने त्याला तीन महीने लपवून ठेविले. (निर्गम २:२)

३८. म्हणजे या नाजुक परिस्थितीत अल्लाहने हजरत मूसा

यांच्या पालन पोषणाची विशेष व्यवस्था केली होती.

३९. जेव्हा हजरत मूसाना पेटीत ठेवून नदीत सोडले गेले तेव्हा त्यांची बहीण निमूटपणे त्या पेटी मागोमाग जात होती. या साठी की या पेटीचे पुढे काय होते ते पहावे.

४०. त्या पेटीला फिरऔनच्या कुटुंबीयांपैकी एकाने उचलले व फिरऔन व त्याच्या पत्नी जवळ घेऊन गेला. फिरऔनचा राजमहाल बहुधा नील नदीच्या किनारी होता तेव्हा किनाऱ्याजवळ कुटुंबापैकी कोणीतरी हजर असावा. बायबलच्या निवेदनानुसार फिरऔनची कन्या तिथे हजर होती व तिने पेटी उचलली-(खुरुज ५:२)

मूल जेव्हा फिरऔनच्या घरी पोहचले तेव्हा फिरऔनची पत्नी त्याला पाहून आनंदीत झाली व मूलाचे संगोपन करण्यासाठी फिरऔनला प्रवृत्त केले. परन्तु मूल कोणत्याही स्त्रीचे दूध प्यायला तयार झाले नाही म्हणून तिला मोठी काळजी वाटली. हजरत मूसा यांची बहीण जी लांबून पाहात होती. जवळ आली आणि जेव्हा तिला असे काळाले की मूलाला दूध पाजणाऱ्या स्त्रीची प्रतिक्षा केली जात आहे तेव्हा तिने सांगितले की अमुक एका घरात या मूलाच्या संगोपनाची योग्य व्यवस्था होऊन शकते. वस्तुत: तिने दर्शविलेले घर स्वत:च्या आईचेच होते. परंतु रहस्यभेद न करता तिने हा सल्ला दिला.

४१. हज़रत मूसा यांच्या बहीणीचा सल्ला फिरऔनच्या कुटुंबियांनी मान्य केला व मूल त्या आयाकडे सोपविले गेले. जिच्या विषयी हज़रत मूसा यांच्या बहिणीने सल्ला दिला होता म्हणजे हज़रत मूसाच्या आईकडे अशाप्रकारे ते तान्हे मूल पुनश्च आपल्या आईच्या कुशीत पोहचले आणि आम्ही त्याला तुमच्या जवळ परतवू' हा अल्लाहचा वायदा चमत्कार स्थितीत पूर्ण झाला.

४२. हा किस्सा देखील सूरह कसस मध्ये वर्णिला गेला आहे. जेव्हा हज़रत मूसा तरुणावस्थेत पोहचले, तेव्हा एक घटना अशी घडली की दोन माणसांना आपसात लढतांना पाहून अत्याचार पिडीताच्या मदतीसाठी ते धावले. अत्याचार पिडीत इस्राईली होता, व अत्याचार करणारा किब्ती होता त्यांनी किब्तीला बुक्का मारता क्षणीच तो मरण पावला. अर्थात त्याला जिवानिशी ठार करण्याचा हज़रत मूसा यांचा इरादा नव्हता,परंतु ही चूक त्यांच्या हातून घडली, जिचे दु:ख त्यांना बोचत राहीले. फिरऔनला ही घटना कळताच त्याने हज़रत मूसाना ठार करण्याच्या उद्देशाने त्यांना बंदीस्त करण्याचे आदेश दिले. हज़रत मूसा यांना हे वृत्त कळताच त्यांनी मिस्र (इजिप्त) हून मदयन कडे स्थलांतर केले. अशा प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या मुक्तिची उपाय योजना केली.

४३. हज़रत मूसा यांचे संपूर्ण जीवन कसोटीमय जीवन होते. आणि जेव्हा सर्व कसोट्यां मध्ये ते यशस्वी ठरले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना अतिशय उच्च स्थान प्रदान केले . तात्पर्य कसोटीद्वारे माणसाला चांगले प्रशिक्षण घडते व यातून पार पडून तो महत्व पूर्ण सेवा पार पाडण्यास योग्य होतो.

४४. हजरत मूसा मिस्रहून निघून जवळचा देश मदयन येथे पोहचले होते. तिथे त्यांनी अनेक वर्षे वास्तव्य केले. या विषयीचे विवरण सूरह कसस मध्ये येत आहे.

४५. म्हणजे प्रेषित्व प्रदान करण्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहने जो समय निर्धारित केला होता, अगदी त्याच समयी ते पोहचले.

मी तुम्हाला आपल्या (विशेष कार्या) करिता निवडले आहे. तुम्ही व तुमचा भाऊ माझ्या निशाण्यांसह जा आणि माझ्या स्मरणात कमी करु नका. फिरऔन जवळ जा, तो बंडखोर झाला आहे.(अल-क़ुर्आन)

४१. मी तुम्हाला आपल्या (विशेष कार्या) करिता निवडले आहे.[४६]

وَاصْطَنَعْتُكَ لِنَفْسِي ﴿٤١﴾

४२. तुम्ही व तुमचा भाऊ माझ्या निशाण्यांसह जा आणि माझ्या स्मरणात कमी करु नका.[४७]

اذْهَبْ أَنتَ وَأَخُوكَ بِآيَاتِي وَلَا تَنِيَا فِي ذِكْرِي ﴿٤٢﴾

४३. फिरऔन जवळ जा, तो बंडखोर झाला आहे.

اذْهَبَا إِلَىٰ فِرْعَوْنَ إِنَّهُ طَغَىٰ ﴿٤٣﴾

४४. त्याच्याशी मृदुसंभाषण करा.[४८] संभवतः तो बोध ग्रहण करील किंवा भय बाळगेल.[४९]

فَقُولَا لَهُ قَوْلًا لَّيِّنًا لَّعَلَّهُ يَتَذَكَّرُ أَوْ يَخْشَىٰ ﴿٤٤﴾

४५. ते म्हणाले [५०] हे आमच्या पालन कर्त्या ! आम्हाला भय वाटते की तो आमच्यावर अत्याचार करील किंवा बंडखोरी करील.[५१]

قَالَا رَبَّنَا إِنَّنَا نَخَافُ أَن يَفْرُطَ عَلَيْنَا أَوْ أَن يَطْغَىٰ ﴿٤٥﴾

४६. फर्माविले, भिऊ नका. मी तुमच्या सोबत आहे. सर्व काही ऐकत आहे व पहात आहे.

قَالَ لَا تَخَافَا إِنَّنِي مَعَكُمَا أَسْمَعُ وَأَرَىٰ ﴿٤٦﴾

४७. त्याच्या जवळ जा, आणि सांगा की आम्ही दोघे तुझ्या पालन कर्त्याचे पैगंबर आहोत. बनी इस्राईल (इस्राईल-वंशा)ला आमच्या सोबत जाऊ दे.[५२] आणि त्यांना त्रास यातना देऊ नकोस.[५३] आम्ही तुझ्या पालन कर्त्या तर्फे निशाणी घेऊन आलो आहोत. आणि सलामती (शांती) आहे त्याच्या करीता जो मार्गदर्शनाचे अनुसरण करील.[५४]

فَأْتِيَاهُ فَقُولَا إِنَّا رَسُولَا رَبِّكَ فَأَرْسِلْ مَعَنَا بَنِي
إِسْرَائِيلَ وَلَا تُعَذِّبْهُمْ ۖ قَدْ جِئْنَاكَ بِآيَةٍ مِّن رَّبِّكَ ۖ وَالسَّلَامُ
عَلَىٰ مَنِ اتَّبَعَ الْهُدَىٰ ﴿٤٧﴾

४८. आणि आम्हा वर 'वही' (ईश-संदेश अवतरीत) केली गेली आहे की शिक्षा-यातना आहे त्याच्या करीता जो खोटे ठरवील व तोंडफिरवील.[५५]

إِنَّا قَدْ أُوحِيَ إِلَيْنَا أَنَّ الْعَذَابَ عَلَىٰ مَن كَذَّبَ وَتَوَلَّىٰ ﴿٤٨﴾

४९. तो म्हणाला, हे मूसा, तुम्हा दोघांचा पालन कर्ता कोण आहे ?[५६]

قَالَ فَمَن رَّبُّكُمَا يَا مُوسَىٰ ﴿٤٩﴾

५०. मूसा म्हणाला, आमचा पालनकर्ता तो होय ज्याने प्रत्येक वस्तूस अस्तित्व दिले मग तिच्याकरीता मार्ग खुला केला.[५७]

قَالَ رَبُّنَا الَّذِي أَعْطَىٰ كُلَّ شَيْءٍ خَلْقَهُ ثُمَّ هَدَىٰ ﴿٥٠﴾

४६. अभिप्रेत प्रेषित्व कार्य होय.

४७. म्हणजे मन:पूर्वक माझे स्मरण बाळगा,जीभेने अत्याधिक प्रमाणात माझे नाम:स्मरण करा व लोकां मध्ये खूप चर्चा करा. या कर्तव्य पूर्तित कसलीहि कसर राखू नका.

४८. फिरऔन मोठा बंडखोर व गर्विष्ठ होता, तरीहि त्याच्याशी मृदुतेने बोलण्याची आज्ञा दिली गेली, या साठी की आवाहन त्याच्या समोर वाक् शैलीत प्रस्तुत केले जावे व विचार चिंतन करण्यास तो तयार व्हावा. तात्पर्य आवाहकाने आपल्या बोलण्याच्या पद्धतीत श्रोत्याच्या मानसिकतेचा विचार राखला पाहिजे.

४९. सर्वश्रेष्ठ अल्लाह जाणून होता की फिरऔन हज़रत मूसा यांचे आवाहन मान्य करणार नाही. तरीहि हजरत मूसा ना ही आज्ञा दिली गेली की त्यांनी या बाबत आवाहन स्वीकृतिच्या संभावनेस दृष्टीआड करू नये. म्हणजे आवाहक या नात्याने तर त्यांनी आपली जबाबदारी अशा प्रकारे पार पाडली पाहिजे की, ज्याच्या समोर ते आवाहन प्रस्तुत करीत आहे. त्याने नवळ नव्हे की मान्य करावे. या गोष्टीचा विचार राखला न गेल्यास ना आवाहक आपल्या जबाबदाऱ्या यथासंभव पार पाडू शकतो व ना त्या लोकांवर प्रमाण प्रस्तापित होऊ शकते. ज्यांच्यापुढे आवाहन मांडले जात आहे.

हे हि स्पष्ट असावे की अल्लाहच्या महानतेच्या कल्पनेने त्यांचे भय निर्माण होणे सर्वप्रथम व मूलभूत गोष्ट होय. आणि जेव्हा ही गोष्ट निर्माण होते तेव्हा मन बोध ग्रहण करण्यास प्रवृत्त होते आणि मग प्रत्येक ती गोष्ट जी सत्य आहे त्याच्या मनात शिरु लागते. यास्तव सूरह 'अअला' मध्ये फर्माविले गेले आहे:-

سَيَذَّكَّرُ مَنْ يَّخْشٰى

'बोध प्राप्त करील तो जो (आपल्या पालनकर्त्याचे) भय बाळतो.'

यास्तव फिरऔन विषयी,'शंभवत:तो बोध प्राप्त करील वा भय बाळगेल' असे जे फर्माविले गेले आहे. तर ही या अर्थाने हज़रत मूसाना आज्ञा होती की ही अपेक्षा बाळगून त्याच्याशी नरमी ने बोला, जेणेकरून तो बोध ग्रहण करील. परंतु जर हे उद्दिष्ट अद्याप पूर्णत:साध्य होत नाही व त्याच्या अंगी थोडेसे ईश-भयच निर्माण होते तर मूलभूतपणे दृष्टीकोण बदलतो व त्यानंतर मन मस्तिष्काच्या परिवर्तनाचीहि अपेक्षा केली जाऊ शकते.

५०. इकडे हज़रत मूसाना फिरऔन जवळ जाण्याचा आदेश दिला गेला तिकडे हारुन कडे वही (ईश-संदेश) पाठवून त्यांनाहि हाच आदेश दिला गेला. या प्रसंगी दोघांनीहि फिरऔन विषयी आपली भिती प्रकट केली. यास्तव या ठिकाणी दोघांच्याहि कथनास एकत्रपणे प्रस्तुत केले आहे.

५१. म्हणजे बाह्य:परिस्थितीने तर या गोष्टीचे भय वाटते की तो एकेश्वरवादाविषयी ऐकताच अत्याचार व अतिरेक करायला सुरुवात करील किंवा आपली बंडखोरी व्यक्त करील.

५२. ही आयत या गोष्टीस स्पष्ट करते की हजरत मूसा यांना जेव्हा फिरऔन जवळ पाठविले गेले तेव्हा त्यांना आवाहना सोबत ही मागणीहि सादर करण्याची आज्ञा दिली गेली की बनी इस्त्राईलला त्यांच्या सोबत जाऊ द्यावे. ही मागणी अर्थात महत्वपूर्ण धार्मिक हेतुस्तव होती म्हणून सुरवातीलाच ती मांडण्याविषयी आज्ञा दिली गेली. या बाबतची विवरणात्मक चर्चा आम्ही सूरह अअराफ टीप क्र. १६१ मध्ये केली आहे. या प्रसंगी ती विचाराधीन असावी.

५३.स्पष्ट झाले की जर एखादे सैतानी शासन मुसलमानांवर अत्याचार करीत असेल तर त्याच्याकडे अत्याचार व अतिरेक न करण्या विषयीची मागणी, धर्माची निकड होय. तिला आवाहन उद्देश्याच्या विपरीत समजणे योग्य नव्हे. आवाहकाला अत्याचार पिडीताचे समर्थन कोणत्याहि पारिस्थितीत करावेच लागेल, मग त्या बाबत कोणी चांगली भावना बाळगो वा दुराग्रह.

५४. हे ईश-मार्गदर्शनाच्या अनुसरणाचे आवाहनहि होते व या गोष्टी विषयी सावधगिरीची सूचनाहि की परिणती त्याचीच चांगली आहे जो मार्गदर्शन मान्य करील व त्यानुसार आचरण करील.

५५. हीच गोष्ट या शब्दातहि सांगितली जाऊ शकत होती की हे फिरऔन जर तू खोटे ठरविले तर तूला ईश-शिक्षा भोगावी लागेल. परंतु हजरत मूसा यांना ही आज्ञा दिली की त्यांना सांगा, ''आम्हावर वही केली गेली आहे की, ईश-शिक्षा आहे त्याच्या करीता जो खोटे ठरविल व तोंड फिरवील.'' ही अत्यंत बुद्धि कौशल्य युक्त शैली होती सर्व सामान्य पणे प्रत्येक खोटे ठरविण्याऱ्याची दुष्परिणतीसचे निवेदन केले गेले होते यासाठी की फिरऔन ने स्वत:वर झालेला हल्ला समजू नये, किंबहुना एक तात्विक बाब लक्षात घेता विचार चिंतन करण्यास तयार व्हावे. त्याच बरोबर त्याला हे हि कळावे की शिक्षा-यातनेची ही ताकीद ईश-आदेशानुसार आहे.

५६. म्हणजे जेव्हा फिरऔन जवळ हजरत मूसा व हजरत हारुन पोहचले व त्याच्या समोर आवाहन मांडले तेव्हा त्याने हज़रत मूसाना हा प्रशन केला.

५७. फिरऔन या गोष्टीचा दावेदार होता की तो स्वत:च

सर्वश्रेष्ठ 'रब्ब' (स्वामी-ईश) आहे. परंतु हजरत मूसा यांनी स्पष्टपणे त्याला सांगितले ते तर आपला 'रब्ब' (स्वामी-ईश) सृष्टीच्या निर्मात्यास मानतात. त्यांच्या या उत्तरात हे प्रमाण अध्यारुत होते की जो निर्माता आहे तोच खऱ्या अर्थाने स्वामी होय. दुसरे असे की त्याने प्रत्येक गोष्ट अस्तित्वात आणल्यानंतर तिच्यासाठी तिच्या स्थितीनुरूप मार्ग खुले केले. म्हणजे जनावरे गवत खातात, दगड खात नाही. हे कोणाचे मार्गदर्शन आहे? मधमाशी अतिश्य लांब अंतरावरुन फुलांचा रस शोषून आणते व पोळ्यात जमा करते. हे कार्य ती कोणाच्या मार्गदर्शनान्वये पार पाडते? उघड आहे हे स्वाभाविक मार्गदर्शन होय जे त्यांच्या निर्मात्याने त्यांच्या अंगी ठेवले आहे. अशाच प्रकारे वनस्पती व निर्जीव जड पदार्थ देखील आपली कर्तव्ये एका विशेष प्रकारे पार पाडतात. झाड जमीनी पासून खाद्य प्राप्त करून फळे देऊ लागते आणि नदी उतारा कडे वाहते हे सर्व कोणाच्या इशाऱ्या वर होते? वस्तुस्थिती हीच की प्रत्येक वस्तु आपल्या निर्मात्याच्या इशाऱ्यानुसार कार्य करीत आहे. तेव्हा माणसाचा मार्गदर्शकहि तोच आहे व त्याचे मार्गदर्शन मनुष्य जीवनाकरीता खऱ्या अर्थाने मार्गदर्शन होय.

त्याने प्रश्न केला, मग पूर्वी होऊन गेलेल्या जनसमूहांची काय अवस्था आहे? मूसा ने उत्तर दिले, याचे ज्ञान माझ्या पालन कर्त्याजवळ एका लिखीत (ग्रंथात) आहे. माझा पालनकर्ता असा नव्हे की त्याच्या कडून चूक किंवा भूल व्हावी.

५१. त्याने प्रश्न केला, मग पूर्वी होऊन गेलेल्या जनसमूहांची काय अवस्था आहे.?

قَالَ فَمَا بَالُ الْقُرُوْنِ الْاُوْلٰی ﴿۵۱﴾

५२. मूसा ने उत्तर दिले, याचे ज्ञान माझ्या पालन कर्त्याजवळ एका लिखीत (ग्रंथात) आहे. माझा पालनकर्ता असा नव्हे की त्याच्या कडून चूक किंवा भूल व्हावी.[५८]

قَالَ عِلْمُهَا عِنْدَ رَبِّیْ فِیْ كِتٰبٍ ۚ لَا یَضِلُّ رَبِّیْ وَلَا یَنْسَی ﴿۵۲﴾

५३. तो,[५९] ज्याने तुमच्या साठी जमीनीला बिछाईत बनविले तिच्यात तुमच्या साठी मार्ग काढलेत आणि आकाशातून पाणी वर्षविले. मग त्या द्वारे निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती निर्माण केल्या.

الَّذِیْ جَعَلَ لَكُمُ الْاَرْضَ مَهْدًا وَّسَلَكَ لَكُمْ فِیْهَا سُبُلًا
وَّ اَنْزَلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً ؕ فَاَخْرَجْنَا بِهٖۤ
اَزْوَاجًا مِّنْ نَّبَاتٍ شَتّٰی ﴿۵۳﴾

५४. खा व चारा घाला आपल्या चतुष्पादांना. बुद्धि बाळगणाऱ्या करीता यात निशाण्या आहेत.

كُلُوْا وَارْعَوْا اَنْعَامَكُمْ ؕ اِنَّ فِیْ ذٰلِكَ لَاٰیٰتٍ لِّاُولِی النُّهٰی ﴿۵۴﴾

५५. याच जमीनीपासून आम्ही तुम्हाला निर्माण केले. हिच्यातच तुम्हाला परतवू आणि हिच्या पासूनच दुसऱ्यांदा तुम्हाला बाहेर काढू.[६०]

مِنْهَا خَلَقْنٰكُمْ وَفِیْهَا نُعِیْدُكُمْ وَمِنْهَا نُخْرِجُكُمْ تَارَةً اُخْرٰی ﴿۵۵﴾

५६. आम्ही त्याला आपल्या सर्व निशाण्या दाखविल्या.[६१] परंतु त्याने खोटे ठरविले व इन्कार केला.

وَلَقَدْ اَرَیْنٰهُ اٰیٰتِنَا كُلَّهَا فَكَذَّبَ وَاَبٰی ﴿۵۶﴾

५७. तो म्हणाला,हे मूसा काय तुम्ही एवढ्या साठी आमच्या जवळ आला आहात की आपल्या जादूच्या प्रभावाने आम्हाला आमच्या देशा बाहेर घालवावे ?[६२]

قَالَ اَجِئْتَنَا لِتُخْرِجَنَا مِنْ اَرْضِنَا بِسِحْرِكَ یٰمُوْسٰی ﴿۵۷﴾

५८. तर आम्हीहि तुमच्या विरोधात अशीच जादू आणू. तुम्ही आमच्या व आपल्या दरम्यान एक वेळ निश्चित करून घ्या.[६३] ना आम्ही तिचे उल्लंघन करावे आणि ना तुम्ही. एका सपाट मैदानात.[६४]

فَلَنَاْتِیَنَّكَ بِسِحْرٍ مِّثْلِهٖ فَاجْعَلْ بَیْنَنَا وَبَیْنَكَ
مَوْعِدًا لَّا نُخْلِفُهٗ نَحْنُ وَلَاۤ اَنْتَ مَكَانًا سُوًی ﴿۵۸﴾

५९. मूसा म्हणाले, तुमच्या करीता उत्सवाचा दिवस निश्चित आहे- आणि लोकांना दिवस चढल्यावर एकत्रित केले जावे.[६५]

قَالَ مَوْعِدُكُمْ یَوْمُ الزِّیْنَةِ وَاَنْ یُّحْشَرَ النَّاسُ ضُحًی ﴿۵۹﴾

५८. फिरऔनचा हा प्रश्न की मग पूर्वी होऊन गेलेल्या जन समूहा बाबत तुम्ही काय म्हणता? काय ते सर्व पथभ्रष्ट होते, केवळ गोंधळात टाकण्यासाठी होता परंतु हजरत मूसा यांनी एक तात्विक गोष्टीचे निवेदन करुन फिरऔनच्या बुद्धिस मूल आवाहन बिंदूवर म्हणजे एकेश्वर वादावर केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी फर्माविले की पूर्वीच्या जन-समूहांची जी काही अवस्था राहिली असेल, माझ्या पालन कर्त्यास त्याचे ज्ञान आहे व त्याने प्रत्येकाची कर्मे लिहून ठेवली आहेत. त्याच्याकडून कोणतीहि चूक घडत नाही की एखाद्याचे कर्म दुसऱ्याच्या नावी लिहीले जावे आणि ना तो विसरतो की एखाद्याच्या उडलेल्या कर्माचे त्यास स्मरण न रहावे.

५९. हजरत मूसा यांच्या निवेदनात सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे ही वाढ आहे जेणेकरून क़ुरआनच्या वाचकां समोर एकेश्वरवादाचा पैलू प्रखरपणे प्रगट व्हावा.

६०. मनुष्य-निर्मिती माती पासून झाली आहे. मेल्यावर तो मातीतच मिळतो आणि कियामतीच्या दिवशी त्याला या जमीनीतूनच उठवून उभे केले जाईल. मनुष्याला समुद्रात मृत्यु यावा किंवा आकाशात त्याचा हशर शेवटी जमीनीवरच होईल.

६१. म्हणजे त्या समस्त निशाण्या ज्या हजरत मूसा व हजरत हारून यांचे प्रेषित्व सिद्ध करण्यासाठी व सत्य स्पष्ट करण्यासाठी आवश्यक होत्या.

६२. हा एक खोटा आरोप होता, जो फिरऔन ने हज़रत मूसा यांच्यावर ठेवला होता. अन्यथा हज़रत मूसा यांनी फिरऔनच्या माणसांना मिस्र देशातून बाहेर घालविण्याचा कोणताहि मनसुबा रचला नव्हता. किंबहुना ते स्वत: बनी इस्राईलला घेऊन मिस्र देशातून जाऊ इच्छित होते! व या मोहीमेत अडथळा न आणण्याची त्यांनी फिरऔन कडे मागणी केली होती म्हणून फिरऔनचा हा आरोप की तुम्ही आम्हाला आमच्या देशातून बाहेर घालवू इच्छिता. त्याच स्वरुपाचा होता जसा जादू विषयीचा आरोप होता.

६३. हजरत मूसा यांनी आपल्या काठीचा साप होण्याचा ईश-चमत्कार फिरऔनला दाखविला. परंतु त्याने यास जादू ठरविले व आव्हान दिले की आम्ही सुद्धा अशी जादू बनवून आणू शकतो तेव्हा तुम्ही मुकाबल्या साठी तयार व्हा व दिवस ठरवून घ्या.

६४. म्हणजे मुकाबला खुल्या मैदानात व्हावा जेणेकरून सर्व लोकांनी पहावा.

६५. उत्सवाच्या दिवसाची निवड हज़रत मूसानी अशासाठी केली की लोकांनी अधिकाधिक संख्येने जमा व्हावे व ईश-चमत्कार पहावा हा दिवस बहुधा राष्ट्रीय सणाचा दिवस असावा.

दिवस चढल्यावरची वेळ हज़रत मूसा यांनी अशासाठी निश्चित केली की लोकांनी चांगल्या लख्ख प्रकाशात ईश-चमत्काराचे अवलोकन करावे व त्यांच्या काठीचे रुपांतर होण्यात कोणालाहि शंका वाटू नये.

६०. मग फिरऔन परतला, आपले समस्त डाव-पेच एकत्र केले आणि मुकाबल्या साठी आला.[६६]

فَتَوَلَّىٰ فِرْعَوْنُ فَجَمَعَ كَيْدَهُۥ ثُمَّ أَتَىٰ ﴿٦٠﴾

६१. मूसा ने म्हटले, तुमचे दुर्भाग्य ! अल्लाहशी असत्य जोडू नका की शिक्षा यातनेने तुमचा सर्वनाश करावा आणि ज्याने असत्य रचले तो असफल झाला.[६७]

قَالَ لَهُم مُّوسَىٰ وَيْلَكُمْ لَا تَفْتَرُوا عَلَى ٱللَّهِ كَذِبًا
فَيُسْحِتَكُم بِعَذَابٍ ۖ وَقَدْ خَابَ مَنِ ٱفْتَرَىٰ ﴿٦١﴾

६२. हे ऐकून त्यांच्या दरम्यान वादविवाद होऊ लागला आणि ते हळू स्वरात कानगोष्टी करू लागले.[६८]

فَتَنَٰزَعُوٓا أَمْرَهُم بَيْنَهُمْ وَأَسَرُّوا ٱلنَّجْوَىٰ ﴿٦٢﴾

६३. म्हणू लागले [६९] हे दोन्ही जादूगार आहेत. हे असे इच्छितात की आपल्या जादूच्या प्रभावाने तुम्हाला तुमच्या देशातून बाहेर घालवावे व तुमच्या उत्कृष्ट धर्माचा नायनाट करून टाकावा. [७०]

قَالُوٓا إِنْ هَٰذَٰنِ لَسَٰحِرَٰنِ يُرِيدَانِ أَن يُخْرِجَاكُم مِّنْ أَرْضِكُم
بِسِحْرِهِمَا وَيَذْهَبَا بِطَرِيقَتِكُمُ ٱلْمُثْلَىٰ ﴿٦٣﴾

६४. यास्तव आपले सर्व डाव एकत्रित करा व एका रांगेने या [७१] आज त्याचाच विजय होईल जो प्रभावी होईल.

فَأَجْمِعُوا كَيْدَكُمْ ثُمَّ ٱئْتُوا صَفًّا ۚ وَقَدْ
أَفْلَحَ ٱلْيَوْمَ مَنِ ٱسْتَعْلَىٰ ﴿٦٤﴾

६५. ते म्हणाले, हे मूसा, एक तर तुम्ही टाका किंवा आम्ही आधी टाकतो.

قَالُوا يَٰمُوسَىٰٓ إِمَّآ أَن تُلْقِيَ وَإِمَّآ أَن نَّكُونَ أَوَّلَ مَنْ أَلْقَىٰ ﴿٦٥﴾

६६. तो म्हणाला नाही, तुम्हीच आधी टाका.[७२] अकस्मात त्यांच्या दोऱ्या व काठ्या त्यांच्या जादूमुळे त्याला धावत असलेल्या जाणवू लागल्या.[७३]

قَالَ بَلْ أَلْقُوا ۖ فَإِذَا حِبَالُهُمْ وَعِصِيُّهُمْ يُخَيَّلُ إِلَيْهِ مِن سِحْرِهِمْ
أَنَّهَا تَسْعَىٰ ﴿٦٦﴾

६७. आणि मूसाला आपल्या मनात भिती जाणवली.[७४]

فَأَوْجَسَ فِي نَفْسِهِۦ خِيفَةً مُّوسَىٰ ﴿٦٧﴾

६८. आम्ही म्हटले, भिऊ नका, तुम्हीच प्रभावी व्हाल.

قُلْنَا لَا تَخَفْ إِنَّكَ أَنتَ ٱلْأَعْلَىٰ ﴿٦٨﴾

६९. तुमच्या उजव्या हातात जी (काठी)आहे ती टाका. यांनी जे काही बनविले आहे त्याला तो गिळंकृत करील.[७५] हे जे काही यांनी बनविले आहे जादूगाराची चलाखी आहे.[७६] अणि जादूगार सफल होऊ शकत नाही. मग तो कोणत्याहि मार्गाने येवो.[७७]

وَأَلْقِ مَا فِي يَمِينِكَ تَلْقَفْ مَا صَنَعُوٓا ۖ إِنَّمَا
صَنَعُوا كَيْدُ سَٰحِرٍ ۖ وَلَا يُفْلِحُ ٱلسَّاحِرُ حَيْثُ أَتَىٰ ﴿٦٩﴾

६६. म्हणजे ही सभा बरखास्त झाल्यानंतर फिरऔन कट-कारस्थानाच्या तयारीस लागला व ही योजना रचली की देशाच्या कोना कोपऱ्यातून निष्णात जादूगारांना बोलाविले जावे, या साठी की त्या सर्वांनी एकत्र होऊन आपले कर्तब दाखवावे आणि या देखाव्याने लोकांना हे स्पष्ट कळून यावे की हजरत मूसा यांच्या काठीचे साप बनणे हा ईश्वरी चमत्कार नव्हे तर ती केवळ मूसाची जादूगारी आहे. तेव्हा तो आपल्या क्लृप्त्यां सह निष्णात जादूगारांना घेऊन उत्सवाच्या दिवशी मुकाबल्या साठी मैदानात आला.

६७. हजरत मूसा यांचे हे संबोधन फिरऔनच्या माणसांना व जादूगारांना उद्देश्यून होते. ज्यात त्यांनी सावध केले की अल्लाहच्या चमत्कारास जादू व त्याच्या पैगंबरास जादूगार ठरविणे अल्लाहवर खोटे नाटे रचणे होय आणि जो कोणी अल्लाहवर असत्य रचतो अल्लाहच्या प्रकोपास निमंत्रण देतो. अशा लोकांच्या पदरी अपयशा खेरीज काहीच येत नाही.

६८. हजरत मूसा यांची ही प्रसंगानुरुप ताकीद ऐकून जादूगार संशय गोंधळात पडले आणि हळू स्वरात आपसात कानगोष्टी करू लागले की मुकाबला करावा किंवा नाही.

६९. कथनकर्ते फिरऔनचे दरबारी असावेत.

७०. त्याचप्रमाणे या दरबारी लोकांनी प्रक्षोभ व पक्षपात निर्माण करण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून जादूगारांनी उत्स्फूर्त पणे मुकाबल्या साठी पुढे यावे.

७१. म्हणजे तुमच्या दरम्यान एखादा मतभेद नसावा, किंबहुना मूसा व हारुनच्या विरोधात तुम्हा सर्व जादूगारांची एक संयुक्त आघाडी असावी.

७२. हजरत मूसा यांनी या गोष्टीस प्राधान्य दिले की प्रथम जादूगारांनीच आपले कर्तब दाखवावे. मग नंतर ते आपला चमत्कार दाखवतील. जेणेकरून असत्याच्या अंध:कारानंतर सत्याचा सूर्य प्रकट व्हावा.

७३. तात्पर्य, जादू कोणात्याहि गोष्टीच्या वास्तविक स्थितीस बदलू शकत नाही. किंबहुना नजरेचा धोका व समजण्याचा धोका असतो. जादूगारांच्या दोऱ्या व काठ्या खरोखर साप बनल्या नव्हत्या, किंबहुना असा भास होत होता की त्या सापासारख्या धावत आहेत. सूरह अअराफ मधील उल्लेख असा-

فَلَمَّآ اَلْقَوْا سَحَرُوْٓا اَعْيُنَ النَّاسِ۔ (اعراف۔١١٦)

''मग जेव्हा त्यांनी (आपल्या दोऱ्या व काठ्या) टाकल्या तेव्हा लोकांच्या नजरा जादूने मारल्या.''(अअराफ-११६)

आणि जेथपावेतो हजरत मूसा यांचा संबंध आहे क़ुरआन म्हणते, يُخَيَّلُ اِلَيْهِ त्यांना असे वाटले की जादूगारांच्या दोऱ्या व काठ्या धावत आहेत आणि ते हि या स्थितीत की ते आधीच जाणत होते की जे काही जादूगार प्रस्तुत करणार आहेत ती केवळ जादू आहे, आमूलाग्र बदल नव्हे.

मग ही गोष्ट देखील थोड्या वेळेपर्यंत होती, नंतर त्यांची जादू लोप पावली. अर्थात जादूची ही नजरबंदी थोड्याच अवधी करीता असते. नंतर मात्र ती नाहीशी होते. म्हणून हज़रत मूसा पैगंबर असतांनाहि त्यांच्यावर जादूचा प्रभाव झाला होता असे समजणे उचित नाही. जादूचा प्रभाव होणे ही एक वेगळी गोष्ट आहे व जादू पहाणे ही वेगळी. हजरत मूसा यांनी जादूचे अवलोकन मात्र केले. त्यांच्यावर जादूचा किंचित मात्र परिणाम झाला नाही. त्यांची बौद्धिक शक्ती यथायोग्य होती. त्यांनी दोऱ्या व काठ्यांना सापाच्या रूपात पाहिले, हे असेच की एखाद्याने मृगजळास पाहून पाणी समजावे. उघड आहे की नजरेचा हा धोका तात्पुरता असतो आणि यास कोणताहि मनुष्य बौद्धिक शक्तीच्या प्रभावित होण्याच्या अर्थाने घेत नाही.

७४. भय या गोष्टीचे की या जादूने लोकांना इतके प्रभावित न करावे की जादू व ईश्वरी चमत्काराचा फरक त्यांना उमजणे कठीण व्हावे.

७५. म्हणजे त्यांच्या जादूला गिळून टाकील. तेव्हा हजरत मूसा यांचा सर्प ज्या ज्या ठिकाणी गेला जादूच्या प्रभावास नष्ट करीत गेला.

७६. म्हणजे हे जादूगारांचे कर्तब व नजरेचा धोका होय अन्यथा त्यांच्या दोऱ्या व काठ्या खरोखरच साप बनलेल्या नाहीत.

७७. अर्थात जादूगार जे कर्तब सुद्धा दाखवतील व धोका देण्याचा जो कोणता मार्ग पत्करतील, त्यामुळे ना ईश-चमत्काराच्या विरोधात त्यांचा विजय होऊ शकतो आणि ना खरेखुरे यश त्यांना लाभू शकते. जादू व ईश-चमत्कार या मधील फरक जाणण्यासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.१६९.

फَأُلْقِيَ

७०. शेवटी जादूगर अनावर होऊन सजद्यात पडले ते उद्‌गारले,[७८]आम्ही ईमान बाळगले.मूसा व हारूनच्या पालनकर्त्या वर.[७९]

فَأُلْقِيَ السَّحَرَةُ سُجَّدًا قَالُوٓا ءَامَنَّا بِرَبِّ هَٰرُونَ وَمُوسَىٰ ٧٠

७१. (फिरऔन) म्हणाला, तुम्ही यावर ईमान बाळगले, या आधी की मी तुम्हाला परवानगी दिली असती?[८०] खचितच तो तुमचा गुरु आहे, ज्याने तुम्हाला जादू शिकविली आहे.[८१] तर मी तुमचे हात व पाय विरुध्द दिशांनी कापून टाकीन आणि तुम्हाला खजुरीच्या खोडांवर सूळी देईं. मग तुम्हाला कळून येईल की आमच्यापैकी कोणाचा अजाब (शिक्षा-यातना) अधिक सक्त व टिकाऊ आहे ?[८२]

قَالَ ءَامَنتُمْ لَهُۥ قَبْلَ أَنْ ءَاذَنَ لَكُمْ ۖ إِنَّهُۥ لَكَبِيرُكُمُ ٱلَّذِى عَلَّمَكُمُ
ٱلسِّحْرَ ۖ فَلَأُقَطِّعَنَّ أَيْدِيَكُمْ وَأَرْجُلَكُم مِّنْ خِلَٰفٍ وَلَأُصَلِّبَنَّكُمْ
فِى جُذُوعِ ٱلنَّخْلِ وَلَتَعْلَمُنَّ أَيُّنَآ أَشَدُّ عَذَابًا وَأَبْقَىٰ ٧١

७२. त्यांनी उत्तर दिले, आम्ही त्या दिव्य निशाण्यांवर, ज्या आमच्या समक्ष आल्यात व त्या (पालन कर्त्या) वर, ज्याने आम्हाला निर्माण केले आहे, तुला कदापि प्राधान्य देणार नाही.तू जे वाटेल करून टाक. तू जे काही करु शकतो ते फक्त या ऐहीक जीवनाच्या मर्यादेप्रतच करु शकतो.[८३]

قَالُوا۟ لَن نُّؤْثِرَكَ عَلَىٰ مَا جَآءَنَا مِنَ ٱلْبَيِّنَٰتِ وَٱلَّذِى فَطَرَنَا ۖ
فَٱقْضِ مَآ أَنتَ قَاضٍ ۖ إِنَّمَا تَقْضِى هَٰذِهِ ٱلْحَيَوٰةَ ٱلدُّنْيَآ ٧٢

७३. आम्ही तर आपल्या पालन कर्त्यावर ईमान बाळगले, यासाठी की त्याने आमच्या अपराधांना माफ करावे, तसेच जादू- टोण्याच्या या कर्मासहि जे करण्यासाठी तू आम्हाला विवश केले होते.[८४] केवळ अल्लाह उत्कृष्ट व बाकी राहणारा आहे.[८५]

إِنَّآ ءَامَنَّا بِرَبِّنَا لِيَغْفِرَ لَنَا خَطَٰيَٰنَا وَمَآ أَكْرَهْتَنَا عَلَيْهِ
مِنَ ٱلسِّحْرِ ۗ وَٱللَّهُ خَيْرٌ وَأَبْقَىٰٓ ٧٣

७४. नि:संशय,[८६] जो मनुष्य आपल्या पालन कर्त्या समोर अपराधी या नात्याने हजर होईल, त्याच्यासाठी जहन्नम आहे, ज्यात तो ना मरण पावेल ना जिवीत राहील.[८७]

إِنَّهُۥ مَن يَأْتِ رَبَّهُۥ مُجْرِمًا فَإِنَّ لَهُۥ جَهَنَّمَ لَا يَمُوتُ
فِيهَا وَلَا يَحْيَىٰ ٧٤

७५. आणि जो मनुष्य मोमीन (ईमान बाळगणारा) या नात्याने हजर होईल व सत्कर्मेंहि केलेली असतील, तर अशा लोकांकरीता अत्युच्च दर्जे असतील.[८८]

وَمَن يَأْتِهِۦ مُؤْمِنًا قَدْ عَمِلَ ٱلصَّٰلِحَٰتِ فَأُو۟لَٰٓئِكَ
لَهُمُ ٱلدَّرَجَٰتُ ٱلْعُلَىٰ ٧٥

७८. या मुकाबल्याचा निष्कर्ष असा निघाला की जादूगारांची सर्व जादू लोप पावली आणि हज़रत मूसा यांची काठी साप बनून ईश-चमत्कार दाखवीत राहीली. अशा रितीने हे स्पष्ट झाले की हजरत मूसा जे काही सादर करीत आहेत, ती जादू नव्हे, तर ईश-चमत्कार होय जे या गोष्टीचे प्रमाण होय की ते आल्लाहचे पैगंबर होत. अशा प्रकारे वास्तविकता अनावरीत होऊन जादूगारांसमोर आली तेव्हा आपोआप ते सजदा स्थितीत पडले. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.१७१

७९. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. १७३ मध्ये केले गेले आहे.

८०. हे या गोष्टीचे प्रमाण होय की फिरऔनचा ईश्वर असण्याचा दावा केवळ राजकीय सत्ताधिकाराचा नव्हता, किंबहुना स्वायत्त सत्ताधिकाराचा होता. यास्तव निव्वळ धार्मिक बाबी मध्येहि तो हस्तक्षेप करीत असे. त्याच्या राज्यात ना सत्य धर्माचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य होते ना एखाद्या धार्मिक नेतृत्वाकरीता प्रगती करण्याची एखादी संधी आणि ना त्याच्या जनसमूहातील एखादा मनुष्य आपल्या विवेक बुद्धीने अल्लाहच्या धर्मास कबूल करू शकत होता.

८१. फिरऔनचा जेव्हा पराभव झाला तेव्हा आपल्या पराभवावर पांघरूण घालण्या करिता त्याने हजरत मूसा यांच्यावर हा आरोप ठेवला की ते या जादूगारांचे गुरु होत व सर्वांनी मिळून हे कारस्थान रचले होते.

८२. म्हणजे ही दु:ख दायक शिक्षा भोगल्यावर तुम्हाला कळून येईल की ईश्वराची शिक्षा मोठी आहे कि माझी. यावरुन हे दिसून येते की फिरऔन कसा गर्वोन्मत्त, अत्याचारी व बंडखोर शासक होता.

८३. ही होती ईमान ची शक्ति जिच्यामुळे धुंद होऊन जादूगार फिरऔन पुढे खंबीर झाले की तू बाणाची कसोटी घे, आम्ही हृदयाची कसोटी घेतो. ईमान जेव्हा अंत:करणात प्रभावी होते तेव्हा मन-मस्तिष्क परिवर्तित होते, व फार मोठे धैर्य निर्माण होते. जादूगार पूर्वी काय होते व बघता बघता ते काय झाले!

८४. असे दिसते की जादूगार हज़रत मूसा यांच्या मुकाबल्या करीता येण्यास मनापासून तयार नव्हते, परंतु फिरऔनच्या दडपणाला बळी पडून ते मुकाबल्यासाठी आले.

८५. म्हणजे फिरऔन तर आज आहे व उद्या मेला. परंतु अल्लाहचे अस्तित्व तर सदैव बाकी राहणारे आहे, म्हणून तोच या गोष्टीस पात्र आहे की त्यावर भरवसा केला जावा व तोच या गोष्टीस पात्र आहे की त्याच्याशी अपेक्षा बाळगाव्यात.

८६. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहचे स्वत:चे निवेदन होय, जे जादूगारांच्या निवेदनात भर म्हणून आहे.

८७. म्हणजे ना त्याला मरण येईल की जेणेकरुन संकटाची समाप्ती व्हावी आणि न जगेल की ज्यामुळे जीवनाचा आनंद प्राप्त करील. दोघांच्या दरम्यान एक प्राणघातक संकटात अडकून राहील.

८८. ईमाना सोबत सदाचाराची शर्त या वस्तुस्थितीस स्पष्ट करते की जन्नतचा हा वायदा त्याच लोकांकरीता आहे जे ईमान बाळगून स्वत:ला सदाचाराने सुशोभित करतील. अतिशय खेदाची गोष्ट म्हणजे मुसलमानांनी क़ुरआनाच्या या स्पष्ट निवेदनास जे क़ुरआनाने वारंवार दिले आहे,दृष्टीआड करुन त्या हदीस वचनांचा आश्रय घेतला आहे ज्यात संक्षेपाने ईमान बाळगणाऱ्यांना जन्नतची खुशखबरी दिली गेली आहे. उदाहरणार्थ हदीस वचनात असे फर्माविले गेले आहे,

من قال لا اله الا الله دخل الجنة

''ज्याने म्हटले, अल्लाह शिवाय कोणीहि उपास्य नाही, तो जन्नत मध्ये दाखल झाला''

उघड आहे की याचा हा अर्थ नव्हे की माणसाने मुखाने लाइलाहा इल्लल्लाह म्हणावे व नंतर वाटेल ते करावे, जन्नत मध्ये त्याच्यासाठी जागा रिजर्व (Reserve) झालीच आहे.जर हदीस वचनाला क़ुरआनाच्या प्रकाशात समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला असता तर हा चुकीचा अर्थ कधीहि घेतला गेला नसता. परंतु हदीसला क़ुरआना पासून वेगळे करुन त्याच्या शब्दीक अर्थाचा आश्रय घेतला गेला,अशासाठी की ऐहीक लाभहि खूप घ्यावेत व जन्नतही हाती लागावी.

७६. सदैव कालीन बागा, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील, त्यात ते सदैव राहतील. हा मोबदला आहे त्याचा, ज्याने स्वच्छ-शुद्धता अंगिकारली.[८९]

جَنّٰتُ عَدْنٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ
فِيْهَا ۭ وَذٰلِكَ جَزٰۗؤُا مَنْ تَزَكّٰى ﴿٧٦﴾

७७. आणि आम्ही मूसाला 'वह्य' क़ेले की माझ्या दासांना रातोरात घेऊन प्रयाण करा [९०] आणि त्यांच्याकरीता समुद्रात खुश्कीचा मार्ग काढा. [९१] ना तुम्हाला पाठलाग करणाऱ्यांचे कसले भय राहील, ना (बुडून जाण्याची) भिती.[९२]

وَلَقَدْ اَوْحَيْنَآ اِلٰى مُوْسٰٓى ڏ اَنْ اَسْرِ بِعِبَادِيْ فَاضْرِبْ
لَهُمْ طَرِيْقًا فِي الْبَحْرِ يَبَسًا ۙ لَّا تَخٰفُ دَرَكًا وَّلَا تَخْشٰى ﴿٧٧﴾

७८. मग फिरऔन ने आपल्या सैन्यासह त्यांचा पाठलग केला, तेव्हा समुद्राने त्यांना झाकून टाकले जसे झाकून टाकले.[९३]

فَاَتْبَعَهُمْ فِرْعَوْنُ بِجُنُوْدِهٖ فَغَشِيَهُمْ مِّنَ الْيَمِّ مَا غَشِيَهُمْ ﴿٧٨﴾

७९. आणि फिरऔनने आपल्या जन-समूहास मार्ग भ्रष्ट केले. खरा मार्ग दाखविला नाही.[९४]

وَاَضَلَّ فِرْعَوْنُ قَوْمَهٗ وَمَا هَدٰى ﴿٧٩﴾

८०. हे बनी इस्राईल ! आम्ही तुम्हाला तुमच्या शत्रू पासून मुक्ति दिली आणि 'तूर'च्या मुखा कडील बाजूस तुमच्याशी वायदा केला [९५] व तुम्हावर 'मन्न' व 'सलवा' उतरविले.[९६]

يٰبَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ قَدْ اَنْجَيْنٰكُمْ مِّنْ عَدُوِّكُمْ وَوٰعَدْنٰكُمْ
جَانِبَ الطُّوْرِ الْاَيْمَنَ وَنَزَّلْنَا عَلَيْكُمُ الْمَنَّ وَالسَّلْوٰى ﴿٨٠﴾

८१. खा, आम्ही प्रदान केलेल्या स्वच्छ व शुध्द वस्तू आणि या बाबतीत विद्रोह करू नका, अन्यथा माझा प्रकोप तुम्हावर कोसळेल आणि ज्यावर माझा प्रकोप कोसळला तो विनाशग्रस्त झाला.

كُلُوْا مِنْ طَيِّبٰتِ مَا رَزَقْنٰكُمْ وَلَا تَطْغَوْا فِيْهِ فَيَحِلَّ
عَلَيْكُمْ غَضَبِيْ ۚ وَمَنْ يَّحْلِلْ عَلَيْهِ غَضَبِيْ
فَقَدْ هَوٰى ﴿٨١﴾

८२. आणि मी मोठा क्षमाशील आहे, त्याच्यासाठी जो तौबा (पश्चात्ताप युक्त क्षमा याचना) करील, ईमान बाळगेल, सत्कर्म करील व सन्मार्गावर चालत राहील.[९७]

وَاِنِّىْ لَغَفَّارٌ لِّمَنْ
تَابَ وَاٰمَنَ وَعَمِلَ صَالِحًا ثُمَّ اهْتَدٰى ﴿٨٢﴾

८३. आणि हे मूसा ! आपल्या जन-समुहास सोडून लवकर हजर होण्याकरिता तुम्हाला कोणत्या गोष्टीने प्रेरित केले ?[९८]

وَمَآ اَعْجَلَكَ عَنْ قَوْمِكَ يٰمُوْسٰى ﴿٨٣﴾

८९. स्वच्छ शुद्धतेशी अभिप्रेत शिर्क, कुफ्र व अपराधांपासून स्वच्छ शुद्धता, मूळ ग्रंथात 'तजक्का' हा शब्द प्रयोजिला गेला आहे, ज्याचा अर्थ केवळ स्वच्छ शुद्ध असणे असा नव्हे तर स्वत:ला चांगल्या प्रकारे घडविणे असाहि आहे. यास्तव याच्या आशयात चांगले प्रशिक्षण देणे व सत्कर्माद्वारे स्वत:ला सुशोभित करणे या गोष्टी सामील आहे.

९०. हजरत मूसा यांचा एकेश्वरवादाच्या प्रसाराचा दीर्घ प्रयत्न व वेगवेगळे ईश-चमत्कार दाखविण्याचा उल्लेख कुरआनात अन्य स्थानी केला गेला आहे. पहा-सूरह अअराफ आयत क्र. १३० ते १३५. या ठिकाणी अंतिम अवस्थेचा उल्लेख होत आहे. स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह युनूस टीप क्र १३७ व १३८.

९१. म्हणजे आपली लाठी समुद्रावर मारा तर तो विदीर्ण होईल व तुमच्या जाण्यासाठी अगदी कोरडा मार्ग त्यातून निघेल. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहचा चमत्कार होता, जो हजरत मूसांच्या लाठी द्वारे उदयास आला. जर समजा, संयोगाने समुद्राचे पाणी एका बाजूला झाले असते किंवा दोन भागात विभागले गेले असते तर जो मार्ग निघाला असता तो कोरडा असू शकत नव्हता. कोरड्या मार्गाचे समुद्रामधून अकस्मात निघून येणे ईश-चमत्कारानेच शक्य आहे म्हणून सरळपणे त्यास अल्लाहचा चमत्कार मानणे हेच श्रेयस्कर ठरेल, आयतीचे उलटसुलट स्पष्टीकरण करणे मुळीच योग्य नव्हे. सूरह शुअरा आयत ६३ मध्ये ही घटना अधिक स्पष्टीकरणासह निवेदिली गेली आहे.

९२. म्हणजे फिरऔन तुमचा पाठलाग तर करेल, परंतु तुम्हाला पकडू शकणार नाही म्हणून तुम्ही निर्भयपणे जा. समुद्रात बुडण्याचा हि तुम्हाला काही धोका नाही कारण समुद्रातूनच तुमच्यासाठी ईश-चमत्कारान्वये मार्ग काढला जाईल.

९३. फिरऔन बनी इस्राईलचा पाठलाग करीत जेव्हा समुद्राजवळ पोहचला तेव्हा मार्ग मोकळा पाहून तो देखील आपल्या सैन्यासह त्या मार्गावर चालू लागला. जेव्हा समुद्राच्या मध्यभागी पोहचला, तत्क्षणी दोन्ही बाजूंनी पाणी येऊन मिळाले. आता तो पूर्णत: समुद्राच्या जबरदस्त लाटांच्या तावडीत सापडला होता. अल्लाहची ही फार मोठी निशाणी प्रकट झाली. बनी इस्राईल ला तर समुद्राने सही सलामत जाऊ दिले परंतु फिरऔन व त्या सोबत असणाऱ्यांना वाईटरित्या तावडीत घेतले.

९४. म्हणजे फिरऔनचा हा दावा चुकीचा ठरला की तो लोकांना खरा मार्ग दाखवित आहे. त्याने जर खरा मार्ग दाखविला असता तर त्याची आपल्या समूहासमेत ही दुष्परिणति झाली नसती. या घटनेत त्या लोकांकरिता बोध आहे जे अल्लाहच्या मार्गदर्शनास, ज्यास तो आपल्या पैगंबराद्वारे पाठवितो, मान्य करीत नाही. बादशहा आणि नेता स्वत:मार्ग भ्रष्ट असतात व जनतेलाहि मार्ग भ्रष्ट करतात. परिणामी स्वत:हि जलसमाधी घेतात व जनतेलाहि आपल्या सोबत बुडवितात.

९५. म्हणजे तूर सीनाच्या मंगल प्रद मैदानात तुम्हाला शरीअतची देणगी प्रदान करण्याचा वायदा केला गेला. 'आयमन' (मुख) चे स्पष्टीकरण सूरह मरयम टीप क्र. ७२ मध्ये केले गेले आहे.

९६. मन्न व सलवाच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ७६.

९७. ही आयत हे स्पष्ट करते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने क्षमेचा वायदा त्या लोकांशी केला आहे जे शिर्क व कुफ्र आणि आपराध कृत्यापासून परावृत्त होतील. त्या गोष्टींवर ईमान बाळगतील ज्याचे आवाहन अल्लाहचा पैगंबर करीत आहे, सत्कर्मे करतील, व मार्गदर्शनाचा मार्ग अर्थात दीन (इस्लाम) व शरीअत वर मरेपावेतो कायम राहतील.

९८. हजरत मूसांच्या 'तूर' वर हजर होण्या करीता जी वेळ निश्चित केली गेली होती, तिच्या आधीच ते हजर झाले सर्वश्रेष्ठ अल्लाहने याचे कारण त्यांना विचारले. सर्वश्रेष्ठ अल्लाहला वस्तुस्थितीचे चांगले ज्ञान होते, परंतु प्रशन एवढ्यासाठी केला की हजरत मूसांना हे स्पष्ट उमजावे की एकीकडे त्यांची ही अभिरुची व आवड आहे,जी शरीअत प्राप्ती साठी त्यांना वेळेपूर्वीच तूर वर घेऊन आली आणि दुसरी कडे त्यांचा जनसमूह होय जो ईश आदेशांची पर्वा न करता शिर्क-मार्गावर चालू लाग़ली आहे. विवरण पुढे येत आहे.

हा प्रश्न बहुधा मुदतीच्या समाप्तीवर केला गेला होता जेव्हा हज़रत मूसा यांना शिलालेख प्रदान केले गेले की नंतरच्या आयतींवरुन स्पष्ट आहे, ज्यात हे निवेदन आहे की हजरत मूसा आपला जन समूह वासराच्या भक्तित व्यस्त असण्याचे वृत्त ऐकून रागाच्या भरात जनसमूहाकडे परतले होते.

८४. विनविले तो (जन समूह) माझ्या पाऊल खुणांवरच आहे आणि मी तुझ्या समोर येण्यात घाई केली, यासाठी की तू प्रसन्न व्हावे.[९९]

قَالَ هُمْ أُولَاءِ عَلَىٰ أَثَرِي وَعَجِلْتُ إِلَيْكَ
رَبِّ لِتَرْضَىٰ ﴿٨٤﴾

८५. फर्माविले, आम्ही तुमच्या पश्चात तुमच्या जन समूहास कसोटीत टाकले आणि सामिरीने त्यास मार्ग भ्रष्ट केले.[१००]

قَالَ فَإِنَّا قَدْ فَتَنَّا قَوْمَكَ مِنْ بَعْدِكَ
وَأَضَلَّهُمُ السَّامِرِيُّ ﴿٨٥﴾

८६. मूसा अतिशय रागात, खेद करीत आपल्या जनसमूहाकडे परतला.[१०१] तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहाच्या लोकांनो ! काय तुमच्या रब्ब (स्वामी) ने तुमच्याशी चांगला वायदा केला नव्हता?[१०२] काय तुम्हावर मोठा अवधि लोटला [१०३] किंवा तुम्ही हेच इच्छित होते की तुमच्या स्वामीचा प्रकोप तुमच्यावर कोसळावा, म्हणून तुम्ही माझ्याशी वचनभंग केला.[१०४]

فَرَجَعَ مُوسَىٰ إِلَىٰ قَوْمِهِ غَضْبَانَ أَسِفًا ۚ قَالَ يَا قَوْمِ
أَلَمْ يَعِدْكُمْ رَبُّكُمْ وَعْدًا حَسَنًا ۚ أَفَطَالَ عَلَيْكُمُ الْعَهْدُ أَمْ
أَرَدْتُمْ أَنْ يَحِلَّ عَلَيْكُمْ غَضَبٌ مِنْ رَبِّكُمْ فَأَخْلَفْتُمْ
مَوْعِدِي ﴿٨٦﴾

८७. त्यांनी उत्तर दिले,आम्ही आपल्या अधिकाराने तुमच्याशी केलेल्या वचना विरुद्ध केले नाही, किंबहुना जन-समूहाच्या दागिन्यांच्या ओझ्याने आम्ही भारदस्त झालो होतो. म्हणून आम्ही त्यांना फेकून दिले.[१०५] अशा प्रकारे सामिरी ने (त्यांना आगीत) टाकले.

قَالُوا مَا أَخْلَفْنَا مَوْعِدَكَ بِمَلْكِنَا وَلَٰكِنَّا حُمِّلْنَا أَوْزَارًا مِنْ زِينَةِ
الْقَوْمِ فَقَذَفْنَاهَا فَكَذَٰلِكَ أَلْقَى السَّامِرِيُّ ﴿٨٧﴾

८८. आणि त्यांच्याकरिता एक वासरु काढून आणले. एक प्रतिमा जिच्यातून गाईसारखा आवाज निघत होता.[१०६] ते पाहून लोक म्हणू लागले, हा आहे आमचा देव व मूसाचाहि देव परंतु तो विसरला.[१०७]

فَأَخْرَجَ لَهُمْ عِجْلًا جَسَدًا لَهُ خُوَارٌ فَقَالُوا هَٰذَا إِلَٰهُكُمْ وَإِلَٰهُ
مُوسَىٰ فَنَسِيَ ﴿٨٨﴾

८९. काय ह्या लोकांना दिसून येत नव्हते की ना तो यांच्या गोष्टीला उत्तर देऊ शकतो आणि ना नफा व नुकसान पोहचवू शकतो.[१०८]

أَفَلَا يَرَوْنَ أَلَّا يَرْجِعُ إِلَيْهِمْ قَوْلًا وَلَا يَمْلِكُ
لَهُمْ ضَرًّا وَلَا نَفْعًا ﴿٨٩﴾

९०. आणि हारुनने त्यांना आधीच सांगितले होते की, लोक हो,तुम्हाला याच्या द्वारे उपद्रवात टाकले गेले आहे. तुमचा 'रब्ब'(स्वामी) तर रहमान आहे. तेव्हा माझे अनुसरण करा व माझे म्हणणे माना.[१०९]

وَلَقَدْ قَالَ لَهُمْ هَارُونُ مِنْ قَبْلُ يَا قَوْمِ إِنَّمَا فُتِنْتُمْ بِهِ ۖ وَإِنَّ
رَبَّكُمُ الرَّحْمَٰنُ فَاتَّبِعُونِي وَأَطِيعُوا أَمْرِي ﴿٩٠﴾

९९. म्हणजे बनी इस्राईल माझ्या मार्गाचे अनुसरण करीत आहे आणि मी तुझ्या समोर ठरलेल्या वेळे आधीच हजर झालो यासाठी की तुझी प्रसन्नता प्राप्त व्हावी.

हजरत मूसा यांना हे समाधान होते की त्यांचा जन-समूह त्यांच्या मार्गाचे अनुसरण करील म्हणून त्यांनी अल्लाह समोर हजर होण्याकरिता वेळे आधीच 'तूर' वर जाण्यात संकोच वाटून घेतला नाही. परंतु नंतरच्या परिस्थितीने हे दर्शविले की त्यांची अनुपस्थिती त्यांच्या जनसमूहाकरिता महाग पडली. 'तूर'वर त्यांच्या हजर होण्या करिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने सुरवातीस एक महिन्याचा अवधि निश्चित केला होता. नंतर दहा दिवसांची वाढ करुन तो चाळीस दिवसाचा केला गेला. इकडे हजरत मूसा ठरलेल्या वेळेच्या काही दिवस आधीच तूर वर पोहचले होते म्हणून जेव्हा एक महिना लोटला व हज़रत मूसा परतले नाहीत तेव्हा दुराचारी लोकांना जन समूहात गैर समजूती निर्माण करण्याची व उपद्रव माजविण्याची संधी मिळाली.

१००. सामिरी लोकांना भडकविणारा एक मुनाफिक होता. जो बनी इस्राईल मध्ये शिरला होता ज्याने हजरत मूसाच्या अनुपस्थितीचा लाभ घेऊन बनी इस्राईलला बहकाविले व वासराच्या पूजेसाठी प्रवृत्त केले. राहीले याच्या नावाचे संशोधन तर या संदर्भात निश्चित काही सांगणे कठीण आहे व याचा काही लाभहि नाही. सामिरी एखादा खास कबीला किंवा गो-भक्त जन समूह असावा आणि हा मनुष्य त्यातला एक इसम असावा. या आधारे क़ुरआनने त्यास 'अस्सामिरी' (The Samiri) म्हटले असावे.

क़ुरआनाने त्याच्या नावाचे स्पष्टीकरण अशा साठी केले की हे स्पष्ट व्हावे की ज्याने वासराला उपास्य बनवून सादर केले तो मूळ अपराधी सामिरी होता आणि बायबल मध्ये हजरत हारुन यांना जे याबाबत जबाबदार ठरविले गेले ते अगदी चुकीचे व असत्य होय.

हे हि स्पष्ट असावे की क़ुरआनने ज्या सामिरीचा उल्लेख केला आहे त्याचा सामिरी या साम्राज्याशी कसलाहि संबंध नाही.कारण सामरीया साम्राज्य यहूदींचे साम्राज्य होते जे फार नंतर म्हणजे हजरत सुलेमान नंतर अस्तित्वात आले.

१०१. राग या गोष्टीबद्दल की जन समूह शिर्क (अनेकेश्वर भक्ति) त व्यस्त झाला व दु:ख या गोष्टीचे की एकेश्वरवादाची जी मौल्यवान सम्पत्ति त्याने प्राप्त केली होती व ज्याच्या संरक्षण व स्थापनेकरिता ते बलीदान देत मिस्रहून तूरच्या पायथ्याप्रत पोहचले तिला ते हरवून बसले.

१०२. चांगल्या वायद्याशी अभिप्रेत शरीअत प्रदान करण्याचा वायदा ज्यासाठी हजरत मूसा 'तूर' वर गेले होते.

१०३. म्हणजे माझी अनुपस्थिती एखाद्या दीर्घ मुदती करीता झाली नव्हती. एक महिन्याच्या निर्धारीत मुदतीत अधिक वाढ झाली असली तरी ही मुदत अशी नव्हती की तुम्हाला ती दीर्घ अनुपस्थिती वाटावी व एखाद्या उपद्रवास बळी पडावे.

१०४. म्हणजे माझ्या अनुसरणाचे जे वचन तुम्ही दिले होते त्याचा भंग केला.

१०५. हे बनी इस्राईलच्या त्या सरदारांचे निवेदन होय ज्यांना त्यानी आपले दागिने अमानतीच्या स्वरुपात सुपूर्द केले होते. हे दागिने बनी इस्राईल चेच होते, जे त्यांनी आपल्या सोबत मिस्र देशाहून आणले होते. परंतु वाळवंटातल्या जीवनात, त्यांच्या स्त्रीयांकरिता परिधान करण्याची ना संधी होती, ना त्यांचे संरक्षण सोपे होते. म्हणून त्यांनी आपले दागिने काही विश्वासनीय व्यक्तिंच्या हवाली केले होते. यासाठी की त्यांनी दागिन्यांना संरक्षणात ठेवावे. ही जबाबदारी अशी होती की ते त्याच्या ओझ्याने भारावले होते कारण त्यांच्या करीताहि वाळवंटात त्यांचे रक्षण करणे सोपे नव्हते. इकडे सामिरीने जन समूहाला गो वत्स पूजेत व्यस्त करण्याकरिता एक कट रचला. त्याने काही अशा शैलीत लोकांना बहकविणे सुरु केले की मूसाने तुम्हाला बाळवंटात आणून सोडले व स्वत:गायब झाले. आता जर तुम्हाला आपल्या खऱ्या धर्माचा शोध घ्यावयाचा असेल तर आपले दागिने वर्गणी (दान) म्हणून देऊन टाका मी तुम्हाला विचित्र करामत दाखवितो. लोक त्याच्या भुलावणीस बळी पडले आणि आपल्या त्या सरदारांजवळ, ज्यांना त्यांनी आपले दागिने अमानत म्हणून दिले होते, ही मागणी केली की त्यांनी ते दागिने सामिरीला वर्गणी म्हणून देऊन टाकावेत. सरदार आधीच त्या दागिन्यांच्या संरक्षणाच्या भाराने वाकले होते, म्हणून त्यांनी ते ओझे उतरवून फेकले. सामिरी ने त्या सर्व दागिन्यांना एकत्र करुन आगीत टाकले व वासरु घडवून बाहेर काढले.

स्पष्ट असावे की बायबलचे हे निवेदन योग्य नव्हे की बनी इस्राईल मिस्रहून जेव्हा निघाले तेव्हा त्यांनी मिस्र देशवासीयांकडून दागिने तात्पुरत्या वापरा करिता मागून घेतले होते व ते घेऊन रवाना झाले. अशा प्रकारे त्यांनी मिसरी लोकांना लूटले होते.(पहा-निर्गम १२: ३५-३६) बायबलच्या या निवेदनावर विश्वास ठेवून भाष्याकारांनी लिहिले आहे की हेच ते दागिने होत ज्यांना बनी इस्राईलने फेकून दिले होते व सामिरी ने ते घेऊन वासरु घडविले होते. परंतु क़ुरआनाद्वारे याचे समर्थन होत नाही. कारण सूरह अअराफ मध्ये दागिन्यांचा संबंध हज़रत मूसा यांच्या जन-समूहाकडे दर्शविला आहे.

وَاتَّخَذَ قَوْمُ مُوْسٰى مِنْ بَعْدِهٖ مِنْ حُلِيِّهِمْ عِجْلًا ـ (اعراف ـ ١٤٨)

'आणि मूसा ('तूर' वर) निघून गेल्या नंतर, त्याच्या जन समूहाने आपल्या दागिन्यांनी एक वासरु घडविले'. (अअराफ-१४८)

यावरुन अगदी स्पष्ट होते की हे हज़रत मूसांच्या जनसमूहाच्या स्वत:च्या मालकीचे दागिने होते आणि मिसरी लोकांना लूटण्याची गोष्ट तर नैतिक दृष्ट्याहि उचित वाटत नाही. शिवाय हज़रत मूसांनी कशा प्रकारे याची परवानागी दिली असेल, आणि मिसरी लोक एवढे भोळे भाबडे नव्हते की आपले दागिने बनी इस्राईल ला ज्यांना त्यांनी आपल्या अत्याचाराचे लक्ष्य बनविले होते, देऊन टाकले असते.

१०६. सामिरीने दागिन्यांना जे बहुधा सोन्यांचे असतील, वितळवून वासराच्या स्वरुपात घडविले आणि आपल्या कलाकुसरीचा असा पुरावा दिला की हवा आत शिरल्याने गायी सारखा आवाज निघू लागला. क़ुरआनाच्या निवेदनानुसार ते एक जसद् अर्थात शरीर मात्र होते. जीवन त्यात नावालाहि नव्हते, किंबहुना केवळ भॅं भॅं चा आवाज त्यातून निघत होता.

१०७. लोक या सोनेरी वासरावर एवढे रिझले होते की त्याला उपास्य बनवून बसले व हा दावा देखील केला की मूसांचा ईश्वरहि हाच आहे परंतु त्याला विसरुन ते अन्य एखाद्या उपास्याच्या शैधार्थ तूर पर्वतावर गेले.

१०८. म्हणजे बौद्धिक दृष्ट्या अंध असलेल्या या लोकांना हेहि दिसून आले नाही की हे वासरु एकाच प्रकारचा आवाज काढते तसेच ते त्यांच्या कोणत्याही गोष्टीला उत्तर देत नाही आणि ना याच्या अंगी हे सामर्थ्य आहे की एखाद्याला लाभ वा हानी पोहचवावी. मग यात ईश्वरीय गुणधर्म कोठून आला? वस्तुस्थिती ही आहे की गोवत्स पूजकांचा ईश्वर केवळ भॅं भॅं करतो परंतु तौहीद (एकेश्वर वादा) वर ईमान बाळगणाऱ्यांचा ईश्वर सर्व काही ऐकतो व पाहतो. दुवा (प्रार्थना) कबूल करतो व गरजपूर्ति करतो व त्यांना खरे मार्गदर्शनहि करतो.

१०९. हजरत हारुन पैगंबर होते. ते या उपद्रवाला पाहून कशाप्रकारे गप्प बसू शकत होते. त्यांनी जन समूहाला सावध केले की या वासराचे अस्तित्व परिपूर्ण उपद्रव आहे. आणि तुमची ही कसोटी घेतली जात आहे की आपल्या ईमानावर दृढपणे कायम राहता कि कुफ्र व विद्रोहाचा मार्ग अंगिकारता. तुमच्या साठी वासराच्या पूजेचा प्रश्नच कोठे उद्‌भावतो, जेव्हा तुमचा 'रब्ब' (स्वामी) सृष्टीचा तो महान 'स्वामी' आहे ज्याला तुम्ही 'रहमान' (कृपाळू ईश्वर) या नावाने जाणता. मी त्याचा पैगंबर आहे म्हणून माझे अनुसरण करा आणि जो आदेश मी देत आहे तो मान्य करा.

त्यांनी उत्तर दिले, आम्ही याच्या पूजेत अटळ राहू येथपावेतो की मूसा परतून येत नाही. मूसाने विचारले, हारुन ! तुम्ही जेव्हा पाहीले की हे मार्गभ्रष्ट होत आहेत, तेव्हा तुम्हाला कोणत्या गोष्टीने रोखले. (अल-क़ुर्आन)

९१. त्यांनी उत्तर दिले, आम्ही याच्या पूजेत अटळ राहू येथपावेतो की मूसा परतून येत नाही.[११०]

قَالُوْا لَنْ نَّبْرَحَ عَلَيْهِ عٰكِفِيْنَ حَتّٰى يَرْجِعَ اِلَيْنَا مُوْسٰى ﴿٩١﴾

९२. मूसाने विचारले, हारुन ! तुम्ही जेव्हा पाहीले की हे मार्गभ्रष्ट होत आहेत, तेव्हा तुम्हाला कोणत्या गोष्टीने रोखले.

قَالَ يٰهٰرُوْنُ مَا مَنَعَكَ اِذْ رَاَيْتَهُمْ ضَلُّوْٓا ﴿٩٢﴾

९३. की तुम्ही माझ्या आदेशाचे अनुसरण न करावे- काय तुम्ही माझ्या आज्ञेचा भंग केला ?[१११]

اَلَّا تَتَّبِعَنِ ؕ اَفَعَصَيْتَ اَمْرِيْ ﴿٩٣﴾

९४. तो म्हणाला, हे माझ्या मातेच्या मुला! माझी दाढी नका धरु, आणि ना माझे डोके. मला हे भय जाणवले की तुम्ही म्हणाल, तू बनी इस्त्राईल मध्ये फूट पाडली आणि माझ्या आदेशाची वाट बघितली नाहीस.[११२]

قَالَ يَبْنَؤُمَّ لَا تَاْخُذْ بِلِحْيَتِيْ وَلَا بِرَاْسِيْ ۚ اِنِّيْ خَشِيْتُ اَنْ
تَقُوْلَ فَرَّقْتَ بَيْنَ بَنِيْٓ اِسْرَآءِيْلَ وَلَمْ تَرْقُبْ قَوْلِيْ ﴿٩٤﴾

९५. मूसा ने विचारले सामिरी! तुझा काय मामला आहे ?[११३]

قَالَ فَمَا خَطْبُكَ يٰسَامِرِيُّ ﴿٩٥﴾

९६. त्याने उत्तर दिले, मला अशी गोष्ट सुचली जी इतरांना सुचली नाही. तेव्हा मी पैगंबराच्या पदचिन्हातून मूठभर घेतले मग ते टाकून दिले. माझ्या मनाने मला असेच सुचविले.[११४]

قَالَ بَصُرْتُ بِمَا لَمْ يَبْصُرُوْا بِهٖ فَقَبَضْتُ قَبْضَةً
مِّنْ اَثَرِ الرَّسُوْلِ فَنَبَذْتُهَا وَكَذٰلِكَ سَوَّلَتْ لِيْ نَفْسِيْ ﴿٩٦﴾

९७. मूसा म्हणाला चालता हो-आता आयुष्य भर तुला हेच म्हणत राहायचे आहे की मला शिवू नका [११५] आणि तुझ्यासाठी आणखी एक वेळ निश्चित आहे, जी तुझ्या वरुन कदापि टळणार नाही.[११६] आणि बघ आपल्या त्या देवाला, ज्याच्या पूजेत तू मग्न राहीला होता. आम्ही त्याला जाळून टाकू मग त्याचा कण न कण करुन नदीत वाहून देऊ.[११७]

قَالَ فَاذْهَبْ فَاِنَّ لَكَ فِي الْحَيٰوةِ اَنْ تَقُوْلَ لَا مِسَاسَ
وَاِنَّ لَكَ مَوْعِدًا لَّنْ تُخْلَفَهٗ ۚ وَانْظُرْ اِلٰٓى اِلٰهِكَ الَّذِيْ ظَلْتَ
عَلَيْهِ عَاكِفًا ؕ لَنُحَرِّقَنَّهٗ ثُمَّ لَنَنْسِفَنَّهٗ فِي الْيَمِّ نَسْفًا ﴿٩٧﴾

९८. तुमचा ईश केवळ अल्लाह आहे, ज्याच्या खेरीज कोणीहि ईश नाही-त्याचे ज्ञान प्रत्येक गोष्टीवर प्रभावी आहे.[११८]

اِنَّمَآ اِلٰهُكُمُ اللّٰهُ الَّذِيْ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ؕ وَسِعَ كُلَّ شَيْءٍ عِلْمًا ﴿٩٨﴾

११०. हे होते बनी इस्राईल चे धारीष्ट्य की पैगंबरांच्या ऐन वेळी केलेल्या तंबीसहि खात्रीत घेतले नाही. व त्यांना असे उत्तर दिले की त्यातला शब्द न शब्द बंडखोरी व्यक्त करतो.

१११. हजरत मूसानी हज़रत हारुन यांना सक्तिने विचारपूस केली की जेव्हा लोक मार्गभ्रष्ट होत होते, तेव्हा कोणत्या कारणास्तव या उपद्रराला मिटविण्यासाठी माझ्या आदेशाचे पालन केले नाही म्हणजे त्या लोकांविरुध्द पाऊल उचलले नाही? हज़रत मूसा जेव्हा तूर पर्वतावर जात होते तेव्हा त्यांनी हज़रत हारुनला ही आज्ञा दिली की وَاَصْلِحْ 'शुधारणेचे कार्य करणे' (अअराफ:१४२) ज्यात वाईट गोष्टीना दूर करणे हे हि सामील होते.

११२. हजरत हारुन यांनी मोठ्या सबूरीने काम घेतले व हज़रत मूसांवर वस्तुस्थिती विशद केली. त्यांनी जेव्हा हे पाहिले की बनी इस्राईलच्या फार मोठ्या संख्येवर सामिरीचा प्रभाव पडला आहे आणि वासराच्या प्रेमाची धुंद त्यांच्यावर एवढी चढली आहे की त्याच्या भक्ति पासून त्यांना खेचणे सामर्थ्याचा वापर केल्याविना शक्य नाही व सामर्थ्य वापरण्या करीता बनी इस्राईल चे जे लोक पुढे येतील त्यांच्यावर हे वासरु-भक्त तरवार उचलतील. अशा प्रकारे बनी इस्त्रईलच्या जमातीत फूट पडेल आणि ते पैगंबराचा (हज़रत हारुन यांचा) वध करण्यातहि मागे पुढे पाहणार नाही. आणि जर असे घडले तर बनी इस्राईलला एका जबरदस्त आपत्तिला तोंड द्यावे लागेल आणि जेव्हा हज़रत मूसा यांचे परतणे थोड्याच दिवसात अपेक्षित आहे तेव्हा योग्य हेच की त्यांच्या आगमनाची प्रतिक्षा केली जावी. ही हजरत हारुन यांची दूर दर्शिता होती ज्यामुळे त्यांनी मामला काही दिवसा करिता स्थगित केला. अर्थात यात मुदाहनत मऊपणेची कसलीहि बाब नव्हती आणि ना एकाद्या पैगंबरासंबंधी अशा प्रकारचा गैरसमज केला जाऊ शकतो. तरीहि हज़रत मूसा यांचे सक्तिपूर्वक विचारणा करणे प्रसंगानुरुप होते कारण त्यांचा क्रोधावेश ईमानाच्या स्वाभीमानामुळे होता. अशा प्रसंगी बाह्य शिष्टाचारांचा विचार करण्यात जी गफलत होते ती क्षम्य ठरते. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने ह. मूसा यांच्या ना या गोष्टीवर की शिलालेख ज्यावर तौरात लिखित होते का खाली टाकले. खरी घटना अशी की ह. मूसांच्या क्रोधावेगाने संपूर्ण जनसमूहाला भयभीत केले. उपद्रव-प्रिय लोकांनी जेव्हा पाहीले की ते एका पैगंबराशीहि सक्तीने वागत आहेत, तेव्हा सामिरीच्या समर्थनार्थ उठून उभे राहण्याचे साहस त्यांना झाले नाही अशा प्रकारे हजरत मूसांच्या क्रोधाने जन समूहाला आपल्या काबूत घेतले आणि वासराच्या पूजकांवर हा क्रोध वीज बनून कोसळला. यास्तव बायबलच्या निवेदनानुसार त्या दिवशी तीन हजर माणसांची हत्या केली गेली हे ते लोक होते ज्यांनी गोवत्स पूजा केली होती आणि ही शिक्षा त्यांनी धर्माकडे पाठ फिरविल्यामुळे दिली गेली. या प्रसंगी सूरह बकरा टीप क्र. ७३ व सूरह अअराफ टीप क्र. २२० ते २२६ विचाराधीन असाव्यात.

११३. जन समूहावर काबू केल्यानतर ह. मूसांनी उपद्रवाचा मूळ नायक सामिरीला बोलाविले व त्याला विचारले की तू हे काय केलेस?

११४. सामिरी ने जे कृत्य केले होते ते उचित (Justify)ठरविण्यास त्याच्याजवळ कसलेहि प्रमाण नव्हते आणि ज्याअर्थी तो मुनाफीक होता म्हणून उघडरित्या आपल्या अपराधास मान्य हि करु शकला नाही. तथापि सुप्त शब्दात त्याने आपली पराभूत विचारसरणी व्यक्त केली. त्याने तीन गोष्टी सांगितल्या एक हे की मला ती गोषट सुचली जी इतरांना सुचली नाही. म्हणजे दागिन्यांना एकत्र करुन सोनेरी वासरु घडविण्याची कल्पना माझ्या डोक्यात आली, अन्य कोणाला ती सुचली नाही. असे का घडले याचे स्पष्टीकरण मी देऊ शकत नाही. दुसरी गोष्ट त्याने अशी सांगितली, की ही कल्पना माझ्या डोक्यात फिरत होती म्हणून मी पैगंबरांच्या अनुसरणात फार थोडा हिस्सा घेतला आणि तिसरी गोष्ट तो म्हणाला की, अशा प्रकारे माझ्या मनाने, माझ्या नजरेत हे काम सुशोभित केले. तात्पर्य सामिरी ने सरळरित्या ना आपला गुन्हा कबूल केला आणि ना पश्चात्ताप करुन क्षमा याचना केली परंतु ह. मूसांच्या तावडीत आपण चांगलेच सापडलो हे पाहून त्याने गोल मोल शब्दात ही गोष्ट मान्य केली की ही माझ्या बुद्धीची उपज होती आणि काय करु माझ्या मनाने मला हेच सुचविले.

स्पष्ट असावे की भाष्यकारांच्या एका समूहाने या आयतीचा एक वेगळाच अर्थ सादर केला आहे. त्यांच्या मते

فَقَبَضْتُ قَبْضَةً مِّنْ اَثَرِ الرَّسُوْلِ فَنَبَذْتُهَا

चा अर्थ 'मी पैगंबराच्या पदचिन्हातून मूठभर माती उचलली व वासराच्या तोंडात टाकली' आणि याचा आशय ते असा वर्णन करतात की सामरी ने जीब्रीलच्या घोड्यास पाहिले होते व त्याच्या पायाखालून मूठभर माती उचलली होती. या मातीत जीवन प्रदान करण्याचे वैशिष्ट्य होते म्हणून जेव्हा त्याने वासरु घडवितांना ही माती त्यात टाकली तर त्या वासरात जिवंतपणा निर्माण झाला. परंतु आयतीचे हे भाष्य ना कुरआनाशी सुसंगत आहे आणि ना हदीस वचनाने हे सिध्द होते मग भाष्याकारांना हे कशा प्रकारे माहीत झाले की सामिरीने जीब्रीलला पाहिले होते व ते घोड्यावर बसले होते व त्याच्या टाचे खालची माती जीवन-दायक होती आणि त्या

मातीचाच चमत्कार होता की त्याने वासरात जीव ओतला. हा तंतोतंत एक मनोकल्पित किस्सा आहे जो भाष्यकरांनी चुकीने स्विकारला. आयतीचे हे स्पष्टीकारण वेगवेगळ्या कारणांनी चुकीचे आहे.

१) 'बसुरतु' चा संबंध डोळ्यांशी नव्हे तर बुद्धिशी आहे म्हणून आम्ही याचा अनुवाद 'मला सुचली' असा केला आहे. अरबी भाषेचा प्रसिद्ध व प्रमाणित शब्दकोश 'सिहाह जैहरी'

وَبَصُرتِ بِالشَّیءِ: عَلِمْتُہٗ "بَصُرت بِالشَّیئِ"

नुसार 'बसुरतु बिश्शय' चा मी त्याला जाणून घेतले' (ख. २ पृ. ५९१) जर जीब्रीलला पाहणे अभिप्रेत असते तर त्यासाठी رَأَیتُ،نَظَرتُ،اَبصَرتُ **'रअयतु नजरतु अब्सरतु'** सारखा एखादा शब्द वापरला गेला असता بَصُرتُ **'बसुरतु'** नव्हे.

ही होती शब्दार्थाच्या दष्टीने उचित अर्थाची निश्चिती. आता जरा या गोष्टीवरहि विचार करा की हजरत जीब्रील यांना पाहण्याचे सदभाग्य सामरी सारख्या मुनाफीक व दुराचारी इसमास का प्राप्त व्हावी? जीब्रीलचे घोड्यावर स्वार असण्यास पुरावा काय? आणि सामिरीला हे कसे ठाऊक की त्यांच्या घोड्याच्या पदाचिन्हाची माती एवढी बाबरकत(समृद्ध झाली) आहे की कोणत्याही वस्तूत टाकल्या वर तिच्यात जीव निर्माण होतो. जर तो तिला जीवन-दायक समजत होत तर एखाद्या मृत-इसमास तो त्याद्वारे जिवंतहि करु शकत होता किंवा स्वत: ती माती खाऊन चिरकाल जिवंत राहू शकत होता. मग त्याने असे का केले नाही? कुरआनात तर जीब्रीलच्या पायाखालच्या मातीचा हा प्रभाव कोठेच वर्णिलेला नाही आणि ना त्या वासराबद्दल हे सांगितलेगेले की त्यात जीव आला, किंबहुना कुरआन स्पष्ट: सांगते की ते केवळ जसद (शरीर) होते. वस्तुस्थिती ही की हा किस्सा अगदी निरर्थक आहे. इमाम राजी यांनी तफसीर कबीर मध्ये व मौलाना अब्दूल कलाम आजाद यांनी तर्जुमानुल कुरआन मध्ये ठोस प्रमाणांद्वारे याचे खंडन केले आहे. परंतु जे लोक बिदअती (धर्मात नवीन गोष्टी) च्या समर्थनार्थ बिन बुडाच्या गोष्टी बोलू लागतात त्यांना या किश्श्यांद्वारे एक चांगली संधी लाभली आहे ते म्हणतात:

'जेव्हा हजरत जीब्रीलच्या घोड्याची माती निर्जिव सोन्यात जीव निर्माण करु शकते तेव्हा बुजुर्गांच्या पायाखालची माती मृत हृदयांना अवश्य जिवंत करते.'

(तफसीर नुरुलइरफान क्र. ५०८)

२) आयतीत अर्रसूल हा शब्द वापरला गेला आहे व संभाषण-स्थळाच्या दृष्टीने याशी अभिप्रेत ह. मूसाच असू शकतात. कारण प्रश्न त्यांच्याच अनुसरणाचा होता. ह. जीब्रीलचा उल्लेख या संदर्भातल्या कोणत्याहि आयतीत नाही मग त्यांना कशा प्रकारे अभिप्रेत घेतले जाऊ शकते. राहिला हा प्रश्न की मग सामिरीने ह. मूसांना उत्तर देतांना 'आपले अनुसरण' ऐवजी 'पैगंबराची पैरवी' हा शब्द का वापरले तर याचे कारण खरे पाहता त्याचे गोल मोल निवेदन होते.

३) पैगंबराच पदचिन्हातून एक मुठ घेण्याचा अर्थ मूठभर माती घेणे नव्हे तर उक्ति प्रसंग प्रमाण आहे की याचा अर्थ पैगंबराच्या आज्ञा पालनात किंवा त्याच्या अनुसरणात थोडा हिस्सा घेणे असा आहे. तसेच نَبَذْتُھَا'नबजतुला' चा अर्थ हा नव्हे की मी त्या पायधुळीला वासरात टाकले कारण 'नबत'चा अर्थ अरबी भाषेत फेकून देणे अथवा अनादरपूर्वक एखाद्या गोष्टीस टाकणे असा आहे.

النَّبذُ الْقَاءُ الشَّیءِ وَطَرحُہٗ لِقِلَّةِ الاَعْتِدَادِبِہٖ وَ لِذٰلِکَ یُقَالُ نَبَذْتُہٗ نَبذَ النَّعلِ الخَلَقِ۔(المفردات۔راغب ص ۴۹۸)

'' نَبَذ नबज'चा अर्थ एखाद्या वस्तुस ती प्रतिष्ठाहीन असल्यामुळे टाकून देणे व फेकून देणे हा आहे. यासत्व म्हटले जाते की मी त्यास अशा प्रकारे फेकून दिले ज्या प्रकारे जुन्या जोड्यांना फेकले जाते.''

जर सामरी पैगंबराच्या पदचिन्हाच्या मातीला समुद्धशाली व जीवन दायक समजत होता तर वासराच्या आत टाकण्याकरीता त्याने एखादा असा शब्द का वापरला असता, ज्याने ती माती अनादरीत असल्याचे दिसते. त्याने यासाठी (टाकणे) हा शब्द वापरला असता म्हणजे तो म्हणाला असता 'फ अलकैतुहा, मी या मातीला टाकले. यास्तव शब्दार्थाच्या दुष्टीने 'नबज' हा शब्द पैगंबराच्या अनुसरणाचा त्याग करण्याच्या व त्याच्या आज्ञापालनास अनादरीत समजून सोडून देण्याच्या अर्थाने अधिक उचित ठरते. पवित्र कुरआनातहि हा शब्द याच अर्थाने प्रयोजिला गेला आहे.

نَبَذَ فَرِیْقٌ مِنَ الَّذِیْنَ اُوْتُوا الْکِتٰبَ کِتٰبَ اللّٰہِ وَرَاءَ ظُھُورِھِمْ کَاَنَّھُمْ لاَ یَعْلَمُوْنَ (بقرہ۔۱۰۱)

'ग्रंथ बाळगणाऱ्यांच्या एका समूहाने अल्लाहच्या ग्रंथास अशा प्रकारे पाठीमागे टाकले की जणू ते जाणतच नाही' (बकरा- १०१)

उघड आहे, जेथे 'नबज' (टाकून दिले) चा अर्थ अल्लाहच्या ग्रंथास अरुचिने पाठीमागे टाकले असा आहे.

११५. शब्दांवरुन स्पष्ट होते की हा अल्लाहचा अजाब होता. शिक्षा यातना होती. जो त्यांच्या नशीबी ठरला व

ज्याचे ऐलान ह. मूसांनी केले-त्याला समाजापासून वेगळे केले गेले व अशा स्थितीत त्याला एकटे सोडले गेले की कोणीहि त्याच्या जवळपास फिरकू नये. तो शिर्कच्या मलीनतेने मारवला होता यास्तव शिक्षा म्हणून त्यास सर्वांग परिपूर्ण मलीन ठरविले गेले की कोणी त्याला स्पर्श करु नये आणि अपमानाची मर्यादा ही की तो स्वत: आपल्या मुखाने आपण अस्पृश्य असल्याने ऐलान करीत राहील. बहुधा तो एखाद्या अपायकारक व गंभीर रोगाने ग्रस्त केला गेला असावा. ज्या लोकांनी वासराची पूजा केली होती त्यांचा वध केला गेला(सूरह बकरा आयत ५४ व टीप क्र. ७३)

परंतु सामरीला ईश-शिक्षा भोगण्याकरीता अधिक सूट दिली गेली यासाठी की तो बोध-चिन्ह बनून रहावा.

११६. अभिप्रेत ती शिक्षा होय जी कियामतीच्या दिवशी मिळेल.

११७. वासरु दागिन्यांनी बनविले गेले होते जे बहुधा सोन्याचांदीचे असावेत. ह. मूसांनी त्यास जाळून त्याचा कण न कण करुन टाकले. म्हणजे अगदी चूर्ण करुन टाकले व ते चूर्ण नदीत वाहविले अशा प्रकारे ह. मूसा यांनी मूर्तिभंजकतेची इब्राहीम सुन्नत (रीत)जिवंत केली आणि पाहणाऱ्यांनी पाहीले की वासरु खरोखर ईश्वर असते तर ते राखीचा ढिगारा बनले नसते व त्याच्या भक्त तिरस्कृत झाला नसता.

यावरुन ही गोष्टहि स्पष्ट झाली की वासरु एक निजीव होते. जर त्यात प्राण असता व ते हाडा मासाचे वासरु असते तर आधी त्याला जबह केले गेले असते नंतर आगीत टाकले गेले असते.

ओघा ओघाने हे हि कळाले की इन्कार करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी व त्याच्याशी अत्याधिक तिरस्कार निर्माण करण्यासाठी सोन्याचांदीच्या मौल्यवान वस्तुंनाहि वाया घालविले जाऊ शकते कारण ईमानाच्या अभिमानापुढे सम्पात्तिचा मोह एक निरर्थक गोष्ट आहे.

११८. एकेश्वरवादाचे हे आणखी एक प्रमाण होय. ईश्वर केवळ तोच असू शकतो ज्याचे ज्ञान प्रभावशाली व सर्वव्यापी असेल आणि हे वैशिष्ट्य केवळ अल्लाहचे आहे म्हणून तोच खरा ईश्वर. परंतु जे लोक शिर्क व मूर्ति पूजेत गुरफटून जातात त्यांच्या मते एक बैल देखील ईश्वर असू शकतो व एक बुध्दू देखील !

كَذٰلِكَ نَقُصُّ عَلَيْكَ مِنْ اَنْۢبَآءِ مَا قَدْ سَبَقَ ۚ وَقَدْ اٰتَيْنٰكَ مِنْ لَّدُنَّا ذِكْرًا ۖ ﴿٩٩﴾

९९. अशा प्रकारे आम्ही तुम्हाला भूतकालीन होऊन गेलेल्या घटना ऐकवितो आणि तुम्हाला खास आपल्या जवळून स्मरण (कुरआन) प्रदान केले आहे. [११९]

مَنْ اَعْرَضَ عَنْهُ فَاِنَّهٗ يَحْمِلُ يَوْمَ الْقِيٰمَةِ وِزْرًا ﴿١٠٠﴾

१००. जे लोक या पासून तोंड फिरवतील ते कियामतीच्या दिवशी भारदस्त ओझे उचलतील.[१२०]

خٰلِدِيْنَ فِيْهِ ۗ وَسَآءَ لَهُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ حِمْلًا ﴿١٠١﴾

१०१. ते त्याच अवस्थेत सदैव राहतील. [१२१] आणि हे मोठे वाईट ओझे असेल जे कियामतीच्या दिवशी त्यांनी आपल्या वर लादलेले असेल.

يَّوْمَ يُنْفَخُ فِي الصُّوْرِ وَنَحْشُرُ الْمُجْرِمِيْنَ يَوْمَئِذٍ زُرْقًا ﴿١٠٢﴾

१०२. तो दिवस की जेव्हा सूर फूंकला जाईल [१२२] आणि आम्ही अपराध्यांना त्या दिवशी अशा सिथतीत एकत्रित करू की त्यांचे डोळे नीळे पडले असतील.[१२३]

يَّتَخَافَتُوْنَ بَيْنَهُمْ اِنْ لَّبِثْتُمْ اِلَّا عَشْرًا ﴿١٠٣﴾

१०३. ते आपसात एकमेकांना हळू स्वरात म्हणत असतील की तुम्ही फक्त दहा दिवस राहीला असाल.

نَحْنُ اَعْلَمُ بِمَا يَقُوْلُوْنَ اِذْ يَقُوْلُ اَمْثَلُهُمْ طَرِيْقَةً اِنْ لَّبِثْتُمْ اِلَّا يَوْمًا ﴿١٠٤﴾

१०४. आम्ही चांगल्या जाणतो ते जे काही म्हणतील. त्या वेळी त्यांच्यात जो अधिक चांगला अंदाज लावणारा असेल, तो म्हणेल की तुम्ही फक्त एक दिवस राहीला असाल.[१२४]

وَيَسْـَٔلُوْنَكَ عَنِ الْجِبَالِ فَقُلْ يَنْسِفُهَا رَبِّيْ نَسْفًا ﴿١٠٥﴾

१०५. आणि हे लोक तुम्हाला पर्वतांविषयी विचारतात, सांगा माझा 'रब्ब' (स्वामी) त्यांना धूळ बनवून उडवून देईन.[१२५]

فَيَذَرُهَا قَاعًا صَفْصَفًا ﴿١٠٦﴾

१०६. आणि जमीनीला अशा स्थितीत सोडेल की ती एक साफ व सपाट मैदान असेल.

لَّا تَرٰى فِيْهَا عِوَجًا وَّلَآ اَمْتًا ﴿١٠٧﴾

१०७. त्यात ना तुम्हाला वक्रता आढळेल, ना उंची.[१२६]

११९. 'स्मरणा'शी अभिप्रेत कुरआन होय. कुरआनाला 'स्मरण'या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की तो ईश्वराचे स्मरण घडविणारा ग्रंथ आहे दास याला जेथूनहि वाचेल, ईश-स्मरणात तल्लीन होतो. हा ग्रंथ त्या गोष्टीचे हि स्मरण करवितो, ज्या विषयी मनुष्य स्वभाव आधी पासूनच परिचित आहे. तसेच या कारणास्तव हि की तो परिपूर्ण उपदेश आहे.

१२०. कुरआनाला केवळ एक धार्मिक ग्रंथ समजून दृष्टीआड करणे अशी मोठी चूक आहे जी जगातील राष्ट्रे करीत आहेत. वास्तविक कुरआन अल्लाहचे फर्मान आहे. एखाद्या जन-समूह, देश व काळाला वैशिष्ट्य न देता संपूर्ण मानवजाति करिता व प्रत्येक युगाकरिता अवतरीत झाले आहे. जे मनुष्य असलेल्या प्रत्येक जणाला संबोधन आहे. यास्तव ज्या ज्या माणसाप्रत कुरआन किंवा त्याचे आवाहन पोहचेल व तो त्या पासून तोंड फिरविल तर त्याने स्वत:ला अपराधाच्या मार्गाला लावले. कारण अल्लाहच्या फर्मानास रद्द करण्याचा अर्थ विद्रोही आचरण अंगिकारणे होय. आणि विद्रोही आचरण अंगिकारून मनुष्य फार मोठ्या अपराधाचे ओझे आपल्या शिरी घेतो. परंतु याची जाणीव त्याला कियामतीच्या दिवशी होईल की त्याने केवढे भयंकर ओझे आपल्या डोक्यावर लादले आहे.

१२१. म्हणजे सदैव गुन्ह्यांच्या ओझ्याखाली दबून राहतील व त्याची शिक्षा भोगतील कारण कुफ्र व शिर्क हा असा गुन्हा आहे जो एकदा चिकटला तर पुन्हा कधीहि निघत नाही.

१२२. हा कियामतीचा भोंगा(Siron) असेल ज्याचा आवाज जमीनीच्या काना-कोपऱ्यापर्यंत पोहचेल. जेव्हा पहिला भोंगा होईल तेव्हा जमीनीवरील सर्व प्राणी मात्र मरण पावेल आणि सृष्टी व्यवस्था अस्ताव्यास्त होईल आणि जेव्हा दुसरा भोंगा होईल तेव्हा सर्व मानव जे आदम पासून कियामती पावेतो निर्माण होत राहिले, शरीरासह दुसऱ्यांदा जिवंत होऊन जमीनीतून निघू लागतील.

१२३. म्हणजे दहशतीमुळे अपराध्यांच्या डोळ्यांचा रंग नीळा झाला असेल. दुसऱ्या शब्दात त्यांचे नेत्र निस्तेज होतील.

१२४. मेल्यानंतर माणसाचा आत्मा कियामती पर्यंत आलमे बर्जख (कबरी) मध्ये राहतो जे इहलोक व आखिरत यांच्या दरम्यानचे विश्व आहे. या विश्वात त्याने कितीहि दीर्घकाळ घालवला असेल कियामतीच्या दिवशी त्याला असे वाटेल की, हा अवधि केवळ काही दिवसांचाच होता आणि इन्कार करणाऱ्यांपैकी जो मनुष्य सर्वांत अधिक चांगला धंदाज लावणारा असेल तो म्हणेल, की नव्हे, हा अवधि फक्त एक दिवसाचा आहे.

वेळेची प्रदीर्घता न जाणवण्याचा अनुभव आम्हाला ऐहिक जीवनातहि होतो. अनेक तास झोपून उठल्यानंतर आम्हाला असे वाटते की आताच झोपलो व आताच उठलो. जेव्हा वेळेबाबत आमच्या अनुभूतिची ही दशा आहे तेव्हा कियामत लांब आहे असा विचार करून ऐहिक सुखविलासात गुंग राहणे नादानपणा व आत्म-भ्रम नव्हे तर आणखी काय आहे?

१२५. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह कहफ टीप. क्र.६६ व सूरह कारिया टीप क्र. ५

१२६. म्हणजे जमीनीचे स्वरूप अगदी बदलून जाईल ना कोठे वेडेवाकडापणा असेल आणि ना कोठे उंच सखलता. माणसाने बनविलेल्या इमारती तर आधीच भूईसपाट झालेल्या असतील आणि पर्वत पिंजलेल्या कापसाच्या तंतू प्रमाणे हवेत उडवले जातील.वृक्ष झाड झडपे व जंगलांचा सफाया केला गेला असेल भौगोलीक परिवर्तन एवढे जबरदस्त होईल की कोणत्याहि देशाचे चिन्ह बाकी राहणार नाही. अशा प्रकारे जमीन एक सपाट समतल मैदानाचे स्वरूप धारण करील यासाठी की असंख्य माणसे आपल्या स्वामी समोर हजर होण्याकरिता एकत्र व्हावीत.

१०८. त्या दिवशी लोक एका पुकारणाऱ्याच्या मागे चालतील. त्याच्या पासून किंचित मात्र अलग होऊ शकणार नाहीत.[१२७] आणि सर्वांचा आवाज 'रहमान' पुढे मंद होईल. एकाद्या चाहूली शिवाय तुम्हाला काहीच ऐकू येणार नाही.[१२८]

يَوْمَئِذٍ يَتَّبِعُونَ الدَّاعِيَ لَا عِوَجَ لَهُ ۖ وَخَشَعَتِ
الْأَصْوَاتُ لِلرَّحْمَٰنِ فَلَا تَسْمَعُ إِلَّا هَمْسًا ﴿١٠٨﴾

१०९. त्या दिवशी शिफारस कामी येणार नाही, परंतु त्याची ज्याला 'रहमान' परवानगी देईल व त्याचे म्हणणे पसंत करील.[१२९]

يَوْمَئِذٍ لَّا تَنفَعُ الشَّفَاعَةُ إِلَّا مَنْ أَذِنَ
لَهُ الرَّحْمَٰنُ وَرَضِيَ لَهُ قَوْلًا ﴿١٠٩﴾

११०. तो जाणतो जे काही त्यांच्या पुढ्यात आहे व जे काही त्यांच्या मागे आहे आणि त्यांचे ज्ञान यास वेढू शकत नाही. [१३०]

يَعْلَمُ مَا بَيْنَ أَيْدِيهِمْ وَمَا خَلْفَهُمْ
وَلَا يُحِيطُونَ بِهِ عِلْمًا ﴿١١٠﴾

१११. समस्त चेहरे त्या चिरसजीव व चिरस्थायीच्या पुढे झुकलेले असतील आणि विफल मनोरथ असेल तो, ज्याने अत्याचाराचे [१३१] ओझे उचलून धरले असेल.

وَعَنَتِ الْوُجُوهُ لِلْحَيِّ الْقَيُّومِ ۖ وَقَدْ
خَابَ مَنْ حَمَلَ ظُلْمًا ﴿١١١﴾

११२. आणि ज्याने सत्कर्मे केली असतील व तो 'मोमीन' (ईमान बाळगणारा) हि असेल तर त्याच्यासाठी ना कसल्या अत्याचाराचे भय राहील व ना हक्क मारला जाण्याचे.

وَمَن يَعْمَلْ مِنَ الصَّالِحَاتِ وَهُوَ مُؤْمِنٌ
فَلَا يَخَافُ ظُلْمًا وَلَا هَضْمًا ﴿١١٢﴾

११३. आणि अशा प्रकारे आम्ही यास अरबी कुरआनाच्या स्वरूपात अवतरीत केले. [१३२] आणि यात आम्ही वेगवेगळ्या पद्धतीने तंबी सादर केली, [१३३] या साठी की लोकांनी अल्लाहचे भय बाळगावे किंवा हे त्यांच्या करिता बोध-प्राप्तीस कारणीभूत ठरावे.[१३४]

وَكَذَٰلِكَ أَنزَلْنَاهُ قُرْآنًا عَرَبِيًّا وَصَرَّفْنَا فِيهِ مِنَ الْوَعِيدِ
لَعَلَّهُمْ يَتَّقُونَ أَوْ يُحْدِثُ لَهُمْ ذِكْرًا ﴿١١٣﴾

११४. तेव्हा श्रेष्ठतम आहे. अल्लाह, खराखुरा बादशहा [१३५] आणि कुरआन-पठणात घाई करू नका. या आधी की त्याची वही तुमच्यावर पूर्ण केली जावी. [१३६] आणि प्रार्थना करा की हे माझ्या पालन कर्त्या ! माझे ज्ञान आधिक वाढव.[१३७]

فَتَعَالَى اللَّهُ الْمَلِكُ الْحَقُّ ۗ وَلَا تَعْجَلْ بِالْقُرْآنِ مِن قَبْلِ أَن
يُقْضَىٰ إِلَيْكَ وَحْيُهُ ۖ وَقُل رَّبِّ زِدْنِي عِلْمًا ﴿١١٤﴾

१२७. पुकारणाऱ्याशी अभिप्रेत फरिश्ता होय. हशरच्या मैदानात ज्याच्या उभे राहण्याची जागा मुकर्रर असेल तिच्याकडे फरिश्ता नेईल व तो त्या फरिश्त्याच्या मागोमाग चालला जाईल. कोणाची हिम्मत नाही की त्याची अवज्ञा करून अन्य कोठे निघून जावे.

१२८. कियामतीचा हा मेळावा जणू माणसांचा उचंबळणारा महासागरच. परंतु ना कसला हंगामा होईल आणि ना कसली गडबड गोंधळ. कोणाची हिम्मत नाही की आवाज वाढवू शकेल. सर्वांचा आवाज रहमान (अल्लाह) पुढे दाबला गेला असेल. त्यावेळी फक्त पदचाप ऐकू येतील.

१२९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४१२ आणि सूरह मरीयम टीप क्र.१११

१३०. अर्थात कोण या गोष्टीस पात्र आहे की त्याच्या हक्कात आखिरतच्या शिक्षेपासून मुक्तिची शिफारस केली जावी व कोण यास पात्र नाही याचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे कारण तो वर्तमान, भूत व भविष्य, दृश्य-अदृश्य सर्व काही जाणणारा आहे आणि तो प्रत्येक व्यक्तिच्या इराद्याशी व त्याच्या अहवालाशी पूर्णपणे जाणकार आहे. म्हणून शिफारसीची सार्वजनिक परवानगी कोणालाहि दिली जाणार नाही की त्याने कोणासाठीहि शिफारस करावी किंबहुना ही परवानगी या अटीवर दिली जाईल की केवळ अशाच लोकांच्या हक्कात शिफारस केली जावी ज्यांच्या विषयी शिफारस ऐकणे अल्लाह पसंत करील.

१३१. येथे अत्याचाराशी अभिप्रेत नंतरच्या आयतीनुसार ते वर्तन होय जे ईमान व सदाचाराच्या विपरीत असावे. शिर्क,कुफ्र व अपराधी जीवन जगणे या गोष्टी यात सामील आहेत.

१३२. याचे स्पष्टीकरण सूरह युसूफ टीप क्र. ३ मध्ये केले गेले.

१३३. कुरआनात तंबी वेगवेगळ्या पद्धतीने दिली गेली आहे. कधी अल्लाहच्या प्रतापी वैशिष्ट्यांना सादर करून तर कधी भूतकालीन बंडखोर जनसमूहांच्या वृत्तांतांचे स्मरण घडवून कधी शिक्षेच्या त्या कोड्या द्वारे जो दुराचारी व्यक्ति व समूहांवर जगात बरसत राहतो तर कधी मरणाच्या बिकट अवस्थेचा उल्लेख करून, कधी कियामतीची भीषणता निवेदून तर कधी जहन्नमची शिक्षा ऐकवून.

१३४. म्हणजे कुरआन अवतरणाचे उद्दिष्ट हे की लोकांनी तकवा (ईश-भय व दुष्कर्मापासून अलिप्तता) चे जीवन व्यतीत करावे परंतु जर लोक याला मान्य करीत नाही तर कुरआनाने त्यांना त्यांचा विसरलेला धडा आठवून द्यावा जेणे करून अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित व्हावे.

१३५.अल्लाहचा खराखुरा बादशहा असण्याचा अर्थ असा की सृष्टीचा सर्व सत्ताधिकारी केवळ अल्लाहच आहे. राहीलेत इहलोकीय बादशहा तर त्यांचे अधिकार अल्लाहनेच प्रदान केलेले आहेत. म्हणून ते केवल लाक्षणिक अर्थाने बादशहा आहेत आणि ते सत्याच्या आधारे या गोष्टीस समर्थ नाहीत की अल्लाहच्या आदेशाच्या ऐवजी आपला आदेश चालवावा.

१३६. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ताकीद आहे की जेव्हा कुरआन अवतरीत होत असेल तर त्याच्या पठणात घाई करू नका. जोपर्यंत 'वह्य' पूर्ण न व्हावे. म्हणजे आधी 'वह्य' लक्षपूर्वक ऐका व ते पूर्ण झाल्यावर त्याचे पठण करा यावरून असे दिसते की पैगंबर किती आवडीने व तत्परतेने वह्य (ईश-संदेश) ग्रहण करीत.आणि यावरून ही गोष्टहि स्पष्ट झाली की कुरआन पूर्णत: अल्लाहचे 'वह्य' होय. व याच्या लेखनात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा तिळमात्र दखल नाही.

१३७. इथे ज्ञानाशी अभिप्रेत ते ज्ञान होय जे 'वह्य' द्वारे प्राप्त होते हे ज्ञान सृष्टीच्या रहस्य भेदांना व अपरोक्ष वस्तुस्थितीना जाणण्याचा आणि ईश्वरास पसंत-नापसंत असणाऱ्या गोष्टी जाणून घेण्याचे खरे माध्यम होय. म्हणून जगातल्या समस्त ज्ञानांवर याचे प्राधान्य जाहीर आहे. या ज्ञानाची अभिलाषा पर्यायाने सत्याभिलाषा होय व यात वृद्धि साठी प्रार्थना करणे हे त्याची कदर बाळगण्याचे लक्षण आहे.

हे ज्ञान कुरआनाच्या स्वरूपात आमच्या समोर आहे. व यावर विचार चिंतन केल्याने ज्ञान व मांगल्याचे दरवाजे उघडतात. परंतु या परिपक्व (ठोस) ज्ञानाने फार थोडेच लोक लाभन्वित होत आहेत विश्व या पासून अगदी अनभिज्ञ आहे.

**११५.** अम्ही या आधी आदमला ताकीद पूर्ण आदेश दिला होता [१३९] परंतु तो विसरला आणि आम्हाला त्याच्या अंगी दृढ संकल्प आढळला नाही. [१४०]

وَلَقَدْ عَهِدْنَآ إِلَىٰٓ ءَادَمَ مِن قَبْلُ فَنَسِىَ وَلَمْ نَجِدْ لَهُۥ عَزْمًا ﴿١١٥﴾

**११६.** आणि जेव्हा आम्ही फिरिशत्यांना म्हटले होते की आदम ला सजदा करा तेव्हा त्यांनी सजदा केला, परंतु इब्लीस (सैताना) ने केला नाही त्याने इन्कार केला.[१४१]

وَإِذْ قُلْنَا لِلْمَلَٰٓئِكَةِ ٱسْجُدُوا۟ لِءَادَمَ فَسَجَدُوٓا۟ إِلَّآ إِبْلِيسَ أَبَىٰ ﴿١١٦﴾

**११७.** त्यावर आम्ही म्हटले, हे आदम, हा तुमचा व तुमच्या पत्नीचा शत्रू आहे तेव्हा असे न व्हावे की याने तुम्हाला जन्नत बाहेर घालवावे व तुम्ही संकटात सापडावे.

فَقُلْنَا يَٰٓـَٔادَمُ إِنَّ هَٰذَا عَدُوٌّ لَّكَ وَلِزَوْجِكَ فَلَا يُخْرِجَنَّكُمَا
مِنَ ٱلْجَنَّةِ فَتَشْقَىٰٓ ﴿١١٧﴾

**११८.** येथे तुमच्या साठी ही (सवलत) आहे की ना भूकेले रहाल ना नग्न.

إِنَّ لَكَ أَلَّا تَجُوعَ فِيهَا وَلَا تَعْرَىٰ ﴿١١٨﴾

**११९.** ना तहान लागेल आणि ना उन. [१४२]

وَأَنَّكَ لَا تَظْمَؤُا۟ فِيهَا وَلَا تَضْحَىٰ ﴿١١٩﴾

**१२०.** परंतु सैतानाने त्याला बहकाविले.[१४३] म्हणाला, हे आदम! मी तुम्हाला दाखवू सदैव कालीन झाड व असे राज्य ज्याचे कधीहि पतन होणार नाही. [१४४]

فَوَسْوَسَ إِلَيْهِ ٱلشَّيْطَٰنُ قَالَ يَٰٓـَٔادَمُ هَلْ أَدُلُّكَ عَلَىٰ شَجَرَةِ
ٱلْخُلْدِ وَمُلْكٍ لَّا يَبْلَىٰ ﴿١٢٠﴾

**१२१.** यास्तव दोघांनी (आदम व हव्वा ने)त्या झाडाचे फळ खाल्ले. परिणामतः दोघांची गुह्यांगे त्यांना दिसू लागली व जन्नतच्या पानांनी ते स्वतःला झाकू लागले.[१४५]आदम ने आपल्या पालन कर्त्याची अवज्ञा केली [१४६] आणि तो मार्गापासून हटला.[१४७]

فَأَكَلَا مِنْهَا فَبَدَتْ لَهُمَا سَوْءَٰتُهُمَا وَطَفِقَا يَخْصِفَانِ عَلَيْهِمَا
مِن وَرَقِ ٱلْجَنَّةِ ۚ وَعَصَىٰٓ ءَادَمُ رَبَّهُۥ فَغَوَىٰ ﴿١٢١﴾

**१२२.** मग त्याच्या पालन कर्त्याने त्यास स्विकृतिने उपकृत केले, त्याची क्षमा याचना कबूल केली व त्यास मार्गदर्शन प्रदान केले. [१४८]

ثُمَّ ٱجْتَبَٰهُ رَبُّهُۥ فَتَابَ عَلَيْهِ وَهَدَىٰ ﴿١٢٢﴾

**१२३.** फर्माविले, तुम्ही सर्व येथून उतरा.तुम्ही एकमेकाचे शत्रू आहात [१४९] मग जर माझ्या कडून तुमच्या जवळ एखादे मार्गदर्शन आले [१५०] तर जो कोणी माझ्या मार्गदर्शनाचे अनुसरण करील तो ना मार्गभ्रष्ट होईल आणि ना संकटात सापडेल. [१५१]

قَالَ ٱهْبِطَا مِنْهَا جَمِيعًۢا ۖ بَعْضُكُمْ لِبَعْضٍ عَدُوٌّ ۖ فَإِمَّا يَأْتِيَنَّكُم
مِّنِّى هُدًى فَمَنِ ٱتَّبَعَ هُدَاىَ فَلَا يَضِلُّ وَلَا يَشْقَىٰ ﴿١٢٣﴾

१३८. आता हज़रत आदम यांच्या वृत्तांताचे काही पैलू सादर केले जात आहेत. हेतु हे स्पष्ट करणे की माणसाचे खरे वैगुण्य कोणते व तो कशा प्रकारे सैतानाच्या फसवेगिरीस बळी पडतो.

१३९. ताकीदपूर्ण आदेश या गोष्टीचा की अमूक एका झाडाजवळ जाऊ नका (सूरह बकरा- आयत - ३५)

१४०. म्हणजे हजरत आदम यांच्या अंगी दृढ संकल्पना नव्हती, म्हणून त्यांच्या हातून ही चूक घडली की ते सैतानाच्या भुलावणीस बळी पडले व अल्लाहच्या ताकीदपूर्ण आदेशाचे विस्मरण घडले म्हणून वर्ज्य केलेल्या त्या झाडाचे फळ त्यांनी खाल्ले. तात्पर्य, माणसाचे मूलभूत वैगुण्य विस्मरण व दृढ निश्चय न बाळगणे हे होय.

१४१. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४७, ४८ मध्ये केले गेले आहे.

१४२. हज़रत आदम यांना ज्या जन्नत मध्ये ठेवले गेले होते त्याची विशेषता ही होती की तिथे तहान भूकेचा कोणताहि त्रास जाणवत नव्हता. तरी हि खाण्यापिण्याच्या वसतू विपुल प्रमाणात उपलब्ध केल्या गेल्या होत्या. या साठी की त्यांनी निश्चिंतपणे खावे तसेच त्यांना असा पोषाख दिला गेला होता जो शरीरावर कायम राहणारा होता म्हणून त्यांना नग्नतेचीहि जाणीव झाली नाही. सूर्यांच्या उष्णतेपासून व उन्हापासूनहि त्यांना सुरक्षित ठेवले गेले होते.ही एक तात्पुरती जन्नत होती ज्यात ह्या इतमामाने ह. आदम व ह. हव्वा यांना ठेवले गेले होते. राहिला हा प्रश्न की ही जन्नत कोठे होती तर कुरआनाने याचा उल्लेख केला नाही. कारण हेतु लक्षात घेता हे तपाशील जरूरी नव्हते.

१४३. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. २५ मध्ये केले गेले आहे.

१४४. सैतानाने आदमला बहकाविण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. कधी असे म्हटले की, या झाडाचे फळ खाण्यापासून तुम्हाला अशासाठी रोखले आहे की कदाचित तुम्ही फरिश्ता न व्हावे (सूरह अअराफ आयत :२०) आणि कधी असे म्हटले की, जर तुम्ही हे फळ खाल्ले तर तुम्हाला सदैव कालीन जीवन व कधीहि अवनत न होणारी राज्य सत्ता लाभेल.

१४५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २६, २९ व ३०

१४६. ह. आदम यांनी अवज्ञा केली जरूर पण ही अवज्ञा निर्धारपूर्वक नव्हती आणि ना यात विद्रोह भावनेचा कसला दखल होता. किंबहुना हा केवळ भूल/चूक झाल्याचा परिणाम होता, ज्याचे स्पष्टीकरण स्वत: कुरआनाने केले आहे आणि या चुकीवर अंकूश अशासाठी ठेवला गेला आहे की त्यांनी अल्लाहच्या ताकीदपूर्ण आदेशास लक्षात ठेवण्याचा पूरेपूर प्रयत्न केला नाही की अमूक एक विशेष झाड त्यांच्याकरिता वर्ज्य आहे.

राहिली ही शंका की आदम पैगंबर होते व पैगंबर गुन्ह्यापासून सुरक्षित असतो, तर सर्वप्रथम ही गोष्ट त्यांना प्रेषित दिले जाण्यापूर्वीची आहे. दुसरे हे की ही घटना तात्पुरत्या जन्नतमध्ये घडली होती, जी एका विशेष परिक्षेसाठीच बनविली गेली होती. तिसरे हे की अपराधा-अपराधात फरक आहे हा गुन्हा एक चूक होती जी सैतानाच्या भुलावणीस बळी पडल्याने घडली.

१४७. मूळ ग्रंथात 'गवा' हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा अर्थ मार्गभ्रष्टता असाहि आहे व अज्ञान किंवा इच्छा आकांक्षांच्या प्रभावान्वये मार्गापासून हटणे असा देखील. यास्तव सूरह कसस आयत क्र. १८ मध्ये एका भांडखोर माणसाबाबत हज़रत मूसाचे हे निवेदन उल्लेखिले गेले आहे की,

إِنَّكَ لَغَوِيٌّ مُّبِينٌ

'तू अगदी 'गवी' नादान मनुष्य आहेस'

हज़रत आदम एखाद्या श्रद्धविषयक मार्गभ्रष्टतेत पडले नव्हते आणि ना त्यांनी शिरजोरीचा मार्ग अंगिकारला होता, परंतु सैतानाच्या भुलावणीस बळी पडल्यामुळे, त्याचे पाय चुकीच्या दिशेकडे वळले त्यांच्या या स्थितीस 'गवा' मार्गपासून हटणे, या अर्थाने घेतले गेले आहे.

१४८. जेव्हा ह. आदम यांच्या शरीरावरून जन्नतचा पोषाख उतरून गेला तेव्हा त्यांना जाणवले त्यानी ठोकर खाल्ली आहे व त्यावर पश्चात्ताप दग्ध झाले.त्याच्या पश्चात्तापास पाहून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना उचलले की तो पतितांना उन्नत करतो व असे उन्नत केले की ते अल्लाहच्या दरबारात मान्यवर ठरले. त्यांच्या गुन्ह्याचे डाग स्वच्छ करण्याकरिता त्यांना 'तौबा'(क्षमा-याचने) ची सुबुद्धि प्रदान केली, येथपावेतो की तौबाचे शब्द देखील सुचविले आणि 'मार्गदर्शनाने उपकृत केले.

या घटनेत माणसाकरिता हा धडा आहे की, त्याच्याकडून जर एखादा गुन्हा घडतो आणि तो पश्चात्तापाने आपल्या पालनकर्त्या समोर 'तौबा' करतो तर अल्लाह त्याला माफ करतो व त्याचा हात धरून त्याला उठवितो. या आयतीवरून ही गोष्ट स्पष्ट होते की हज़रत आदम पैगंबर होते. कारण त्यांची क्षमा याचना कबूल केल्यानंतर त्यांना मार्गदर्शन दिल्याचा उल्लेख केला गेला आहे. या मार्गदर्शनाशी अभिप्रेत ईमान (श्रद्धा) व आचरणाचा मार्ग होय ज्याचे अनुसरण करून

अल्लाहची प्रसन्नता व त्याच्या परिणामी सदैव कालीन सफलता प्राप्त केली जाऊ शकते. अशा प्रकारे सर्वात पहिला मानव जो जमीनीवर आला मार्गदर्शन प्राप्त केलेला मनुष्य होता आणि ज्या अर्थी हे मार्गदर्शन त्याला सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून प्रत्यक्षत लाभले होते म्हणून तो पैगंबर होता.

१४९. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ३३ मध्ये केले गेले आहे.

१५०. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह बकरा टीप क्र. ५६

१५१. येथे संकटात न सापडण्याशी अभिप्रेत आखिरतच्या शिक्षेत न सापडणे होय सूरह बकरा मध्ये ही गोष्ट अशा प्रकारे फर्माविली गेली आहे-

فَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُوْنَ۔

''त्यांच्यासाठी ना कसले भय राहील, आणि ना ते दु:खी राहतील''

**आणि जो कोणी माझ्या स्मरणापासून तोंड फिरविल, त्याच्या करिता तंगीचे जीवन असेल आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्याला आंधळा उठवू.**
**(अल-कुर्आन)**

१२४. आणि जो कोणी माझ्या स्मरणापासून तोंड फिरविल, त्याच्या करिता तंगीचे जीवन असेल [१५२] आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्याला आंधळा उठवू .[१५३]

وَمَنْ أَعْرَضَ عَن ذِكْرِي فَإِنَّ لَهُ مَعِيشَةً ضَنكًا
وَنَحْشُرُهُ يَوْمَ الْقِيَامَةِ أَعْمَىٰ ﴿١٢٤﴾

१२५. तो म्हणेल, हे माझ्या पालन कर्त्या !तू मला अंधावस्थेत का उठविलेस मी तर डोळस होतो?

قَالَ رَبِّ لِمَ حَشَرْتَنِي أَعْمَىٰ وَقَدْ كُنتُ بَصِيرًا ﴿١٢٥﴾

१२६. फर्माविले जाईल, अशा प्रकारे आमच्या आयती तुझ्याजवळ पोहचल्या होत्या तेव्हा तू त्यांना विसरला होता, तद्‌वतच आज तुलाहि विसरले जात आहे.[१५४]

قَالَ كَذَٰلِكَ أَتَتْكَ آيَاتُنَا فَنَسِيتَهَا ۖ وَكَذَٰلِكَ الْيَوْمَ تُنسَىٰ ﴿١٢٦﴾

१२७. अशा प्रकारे आम्ही प्रतिफळ देऊ त्याला ज्याने मर्यादेचे उल्लंघन केले होते. [१५५] आणि आपल्या पालन कर्त्याच्या आयतींवर ईमान बाळगले नव्हते. आणि आखिरतची शिक्षा फार जास्त सक्त आणि सदैव बाकी राहणारी आहे.

وَكَذَٰلِكَ نَجْزِي مَنْ أَسْرَفَ وَلَمْ يُؤْمِن بِآيَاتِ رَبِّهِ ۚ وَلَعَذَابُ
الْآخِرَةِ أَشَدُّ وَأَبْقَىٰ ﴿١٢٧﴾

१२८. काय या लोकांकरिता ही गोष्ट मार्गदर्शन कारक न झाली की यांच्यापूर्वी आम्ही किती तरी जन-समूह नष्ट करून टाकले आहेत. ज्यांच्या (ओसाड) वस्त्यांमध्ये हे चालत फिरत आहेत?[१५६] यात त्या लोकांकरिता निशाण्या [१५७] आहेत जे बुद्धिमान आहेत.

أَفَلَمْ يَهْدِ لَهُمْ كَمْ أَهْلَكْنَا قَبْلَهُم مِّنَ الْقُرُونِ يَمْشُونَ
فِي مَسَاكِنِهِمْ ۗ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ لِّأُولِي النُّهَىٰ ﴿١٢٨﴾

१२९. जर तुमच्या पालन कर्त्या तर्फे एक गोष्ट[१५८] आधीच निश्चित झालेली नसती व एक मुदत निर्धारीत केली गेली नसती,[१५९] तर ईश-शिक्षेने यांना तावडीत घेतले असते.

وَلَوْلَا كَلِمَةٌ سَبَقَتْ مِن رَّبِّكَ
لَكَانَ لِزَامًا وَأَجَلٌ مُّسَمًّى ﴿١٢٩﴾

१३०. तेव्हा त्यांच्या म्हणण्यावर संयम पाळा. [१६०] आणि आपल्या पालन कर्त्याची प्रशंसेसह पवित्रता वर्णन करा [१६१] सूर्योदया पूर्वी व सूर्यास्ता पूर्वी. आणि रात्रीच्या काही घटिकां मध्येहि जप-जाप्य करा व दिवसाच्या हिश्शयांत हि,[१६२] या साठी की तुम्ही आनंद विभोर व्हावे.[१६३]

فَاصْبِرْ عَلَىٰ مَا يَقُولُونَ وَسَبِّحْ بِحَمْدِ رَبِّكَ قَبْلَ طُلُوعِ الشَّمْسِ
وَقَبْلَ غُرُوبِهَا ۖ وَمِنْ آنَاءِ اللَّيْلِ فَسَبِّحْ وَأَطْرَافَ النَّهَارِ
لَعَلَّكَ تَرْضَىٰ ﴿١٣٠﴾

१५२. مَعِيْشَةً ضَنْكاً ''मअीशतन ज़न्का'' तंग जीवनाशी आभिप्रेत हृदय व आत्म्याची ती संकुचितता जीव कृढन्त होण्यास कारणीभूत ठरते. धन-सम्पत्ति व सुखविलासाच्या सामुग्रीची कितीही विपुलता का असेना, अल्लाहचे स्मरण व त्याच्या मार्गदर्शना पासून तोंड फिरविण्याच्या परिएणामी ना कधी मनाला समाधान प्राप्त होते आणि ना आत्म्याला शांती लाभते. असा मनुष्य नेहमी एका मानसिक रोगाने पछाडलेला असतो. आणि तो रोग म्हणजे विवंचना व बेचैनी चा रोग.

आज जेव्हा जगात ऐहीक भक्तांची संख्या मोठी व्यापक झाली आहे. बहुतेक लोकांची दशा अशीच आहे की अतिशय जास्त कमविल्यानंतरहि त्यांना मन:शांती लाभत नाही. बेचैनी, विमनस्कता त्यांच्या मुखावरून व्यक्त होते आणि कितीतरी लोक जीवनाला कंटाळून मृत्युला मिठी मारतात.

वस्तुस्थिती अशी की माणसाला हर्ष आंनदाचे व शांती-समाधानाचे जीवन अशाच स्थितीत लाभू शकते जेव्हा तो आपल्या पालन कर्त्याशी दास्यत्वाचे नाते जोडून त्याचे स्मरण करीत राहतो व त्याच्या 'स्मरणिके' (कुरआन) पासून लाभ घेत राहतो.

१५३. स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. १०२.

१५४. म्हणजे तुला अगदी दृष्टीआड केले जात आहे. तुझ्यावर. कृपा दृष्टी केली जाणार नाही.

१५५. म्हणजे ज्याने दास्यत्व मर्यादिचे उल्लंधन केले होते व जो स्वत:ला खुदमुखत्यार (स्वायत्त) समजून मनाला येईल तसे करीत राहीला.

१५६. अभिप्रेत समूद व मदयन वगैरेच्या नष्ट झालेल्या वस्त्या होत ज्या सार्वजनिक राजमार्गावर होत्या व ज्यावरून अरबांचे येणे जाणे होत असे. (अधिक स्पष्टीकरणासाठी) पहा- सूरह हिज्र टीप क्र. ७८)

१५७. निशाण्या या गोष्टीच्या की ही दुनिया अंधेर नगरी नव्हे, किंबहुना एक व्यवस्था कुशल अस्तित्व न्यायाला धरून यावर राज्य करीत आहे व त्याच्या जबरदस्त शक्तिपुढे सर्व अगतिक आहेत. तो माणसांच्या मार्गदर्शनासाठी पैगंबर पाठ वितो व त्यांचे आवाहन सत्य आहे. जो जन समूह पैगंबराचा विरोध करतो त्यावर या विश्वातहि ईश शिक्षेचा आसूड ओढवतो.

१५८. अभिप्रेत आचरणाची संधी होय.

१५९. म्हणजे सवलतीची मुदत.

१६०. म्हणजे त्यांच्या उलट सुलट आक्षेपांना खात्रीत घेऊ नका व त्यांच्या क्लेशदायक गोष्टींवर सहनशीलतेने काम घ्या.

१६१. मूळ शब्द بِحَمْدِرَبِّکَ 'तस्बीह' अर्थात ईश्वराची पवित्रा वर्णन करा आणि 'बिहम्दि रब्बिक' म्हणजे आपल्या पालन कर्त्याच्या प्रशंसेसह. अर्थात अल्लाहची पवित्रता त्याचे गुणगान करीत वर्णन करा. अशा ईमान पूर्ण कैफीयतीने की अल्लाह प्रत्येक प्रकारच्या दोष उणीवा पासून अलिप्त आहे व त्याच्या करिता वैशिष्ट्येच वैशिष्टये आहेत. गुणगान व प्रशंसेची वचने जीभे ने अदा करा कारण हे 'जिक्र' नाम-स्मरण) उपासना आहे.

तस्बीह (पवित्रते) च्या वचनांचे उदाहरण आहे **'सुबहानल्लाह'** سُبْحَانَ اللهِ (अल्लाहकरिता पवित्रता आहे) आणि **'ला इलाह इल्लल्लाह'** لَا اِلٰهَ اِلَّا اللهُ (अल्लाह शिवय कोणी ईश नाही) तसेच प्रशांसा वचनाचे उदाहरण, اَلْحَمْدُ لِلّٰهِ **'अलहम्दु लिल्लाह'** (प्रशांसा अल्लाह करिता आहे) व اللهُ اَكْبَرُ **'अल्लाहु अकबर'** (अल्लाह सर्वात महान आहे) आणि ज्या वचनामध्ये दोन्ही पैलूंचा समावेश आहे त्यांची उदाहरणे अशी, **'सुबहान रब्बियल अजीम'** سُبْحَانَ رَبِّیَ الْعَظِيْم पाक (दोष व्यंग-विरहित) आहे माझा 'रब्ब' जो श्रेष्ठत्व बाळगणारा आहे) **'सुबहाना रब्बियल आला'** سُبْحَانَ رَبِّیَ الْاَعْلٰی (पाक आहे माझा स्वामी, जो उच्च शान बाळगणारा आहे) आणि **'सुबहानल्लाहि वबिहम्दिही'** سُبْحَانَ اللهِ وَبِحَمْدِهٖ (मी अल्लाहची पाकी वर्णन करतो त्याच्या प्रशंसेसह)

'सहीह बुखारी' या हदीस ग्रंथात अंतिम हदीस जी इमाम बुखारी यांनी उल्लेखली आहे ती अशी-

**عَنْ ابی هریرة رضی الله عنه قال قال النَّبِیُّ ﷺ کَلِمتانِ حَبِيْبتان اِلَی الرَّحْمٰنِ خَفِيْفَتَانِ عَلَی اللِّسَانِ ثَقِيْلَتَانِ فِی الْمِيْزَانِ سُبْحَانَ اللهِ وَ بِحَمْدِهٖ۔ سُبْحَانَ اللهِ الْعَظِيْم۔** (بخاری کتاب التوحید)

''अबु हुरैरा (रजि.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, दोन वचने अशी आहेत जी 'रहमान'ला अतिशय प्रिय आहेत,जीभेवर हलकी पण तराजूत वजनी आहेत. ती आहेत سُبْحَانَ اللهِ وَبِحَمْدِهٖ **सुबहानल्लाहि वबिहम्दिहि** (अल्लाहची पाकी मी त्याच्या प्रशंसेसह वर्णितो) سُبْحَانَ رَبِّیَ الْعَظِيْم **'सुबहानल्लाहिल् अज़ीम'** (अल्लाह करीता पाकी आहे जो श्रेष्ठ आहे)'' (बुखारी- किताबुतौहीद)

यावरून चांगल्या प्रकारे हे स्पष्ट होते की एका एकनिष्ठ

मोमीनच्या मुखाने या वचनांचे सुज्ञपणे अदा होणे अल्लाहजवळ अतिशय आवडते कर्म आहे. दररोज यांची पुनरावृत्ती करणे अपेक्षित आहे.

येथे या गोष्टीकडे संकेत करणे अप्रासंगिक ठरणार नाही की अल्लाहच्या जिक्र (नाम-स्मरण) संदर्भात मुसलमानांच्या विविध समूहांची विचार शैली व आचरण नानाविध आहे एक समूह अल्लाहच्या बाबतीत योग्य धार्मिक सुज्ञता निर्माण करण्या खेरीज जप जाप्य करण्यावर जोर देतो. त्याच्या मते कैफीयत पेक्षा संख्येलाच महत्व आहे. दुसऱ्या समूहाने अल्लाहच्या नामस्मरणा करिता खास स्वरूप व पध्दतीचा इतमाम करण्याचा व जर्ब (शब्दांचा विशिष्ट उच्चार करण्याची प्रथा) अंगिकारली आहे आणि तिसरा समूह ज्याची विचार शैली आधुनिक आहे. मौखिक जाप करण्याच्या महत्वाबाबत संकुलित दृष्टिकोन बाळगणारा आहे म्हणून तो याचा जास्त काही इतमाम राखत नाही. या असमतोलपणाच्या तुलनेत तोच मार्ग खरा आहे जयास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अंगिकारला होता व कुरआनाचे उद्दिष्ट पैगंबरहून अधिक चांगले कोण समजू शकतो?

१६२.या 'तस्बीह' करित दोन वेळाचा विशेषत्वाने उल्लेख फर्माविला गेला आहे त्या दोन वेळा म्हणजे सूर्योदय व सूर्यास्ता पूर्वीच्या वेळा म्हणजे फर्ज व अस्र नमाजच्या वेळा कारण उपासनेसाठी हे सर्वाधिक महत्व बाळगतात मग रात्रीचा काही समय व दिवसाच्या भागातहि 'तस्बीह' करण्याची आज्ञा केली. दिवसाचा एक हिस्सा तर तो जेव्हा सूर्य थोडा वर आलेला असतो त्याला जुहा व इशराक म्हणतात दुसरा हिस्सा जुरहचा व तिस्रा अस्रचा.

'तस्बीहची ही ताकीद पाच वेळेची नमाज कर्तव्य ठरण्या आधीच दिली गेली होती पाच वेळच्या नमाज चा आदेश सूरह बनी इस्राईल (आयत-७८) मध्ये दिला गेला जी सूरह ताहा नंतर काही वर्षांनी अवतरीत झाली. तस्बीह चा हा आदेश त्याच प्रकारचा सर्वसाधारण आहे. ज्या प्रकारे ईश मार्गात खर्च करण्याचा (इन्फाकचा) सर्वसाधारण आदेश मक्का येथे दिला गेला होता आणि जेव्हा जकात 'कर्तव्य' ठरले तेव्हा दान खैरातीचा सर्वसाधारण आदेश रद्द झाला नाही. किंबहुना त्याचे दोन प्रकार झाले एक फर्ज म्हणजे बंधन कारक दान खैरात ज्याच्या करिता 'जकात' ही परिभाषा वापरली गेली व दुसरा नफ्ल ऐच्छीक-दान ज्याचे प्रोत्साहन कायम राहीले तद्वतच तस्बीहचा जो आदेश सुरवातीस दिला गेला होता त्याची अमल बजावणी दोन प्रकारे अपेक्षिली गेली. एक पाच वेळेच्या नमाजच्या स्वरूपात व दुसरी नफ्ल नमाज व नफ्ल जप-जाप्य च्या स्वरूपात. यास्तव हदीस वचनात हि नमाज नंतर जप-नाम-स्मरणास प्रोत्साहन दिले गेले आहे.

१६३. म्हणजे या इबादतीचा लाभ हा की तुम्ही आनंदित व्हाल. तात्पर्य ज्या माणसाचे मन अल्लाहची स्तुती- प्रशांसा करण्यात लागते त्याला मानसिक आनंद लाभतो आणि आखिरत मध्ये तर तो अतिशय आनंदित होईल.

**सांगा, प्रत्येक जण प्रतिक्षेत आहे तेव्हा तुम्ही देखील प्रतिक्षा करा-लवकरच तुम्हाला कळून येईल की कोण सरळ मार्गावर आहे व कोणी मार्गदर्शन प्राप्त केले आहे.(अल-कुर्आन)**

१३१. आणि जीवनाच्या त्या शोभेला नजर वर करूनहि पाहू नका,जी आम्ही यांच्या विविध गटांना देऊन ठेवली आहे. या साठी की आम्ही त्यांना कसोटीत टाकावे आणि तुमच्या पालन कर्त्याची उपजिविकाच अधिक चांगली व अधिक बाकी राहणारी आहे.[१६४]

وَلَا تَمُدَّنَّ عَيْنَيْكَ إِلَىٰ مَا مَتَّعْنَا بِهِۦٓ أَزْوَٰجًا مِّنْهُمْ زَهْرَةَ
ٱلْحَيَوٰةِ ٱلدُّنْيَا لِنَفْتِنَهُمْ فِيهِ ۚ وَرِزْقُ رَبِّكَ
خَيْرٌ وَأَبْقَىٰ ﴿١٣١﴾

१३२. आणि आपल्या कुटुंबियांना नमाजची आज्ञा द्या आणि त्यावर कायम रहा. [१६५] आम्ही तुमच्या जवळ उपजिविका मागत नाही. [१६६] उपजिविका तर आम्ही तुम्हाला देतो आणि चांगले प्रतिफळ तकवा (ईश-भया) करीता आहे.[१६७]

وَأْمُرْ أَهْلَكَ بِٱلصَّلَوٰةِ وَٱصْطَبِرْ عَلَيْهَا ۖ لَا نَسْـَٔلُكَ
رِزْقًا ۖ نَّحْنُ نَرْزُقُكَ ۗ وَٱلْعَٰقِبَةُ لِلتَّقْوَىٰ ﴿١٣٢﴾

१३३. हे लोक म्हणतात, हा आपल्या पालन कर्त्या तर्फे एखादी निशाणी आमच्या जवळ का आणत नाही? काय यांच्या जवळ आधीच्या ग्रंथांमध्ये जे काही (निवेदन केले गेले) आहे, त्याची साक्ष नाही पोहचली ?[१६८]

وَقَالُوا۟ لَوْلَا يَأْتِينَا بِـَٔايَةٍ مِّن رَّبِّهِۦٓ ۚ أَوَلَمْ تَأْتِهِم بَيِّنَةُ
مَا فِى ٱلصُّحُفِ ٱلْأُولَىٰ ﴿١٣٣﴾

१३४. आणि जर आधीच आम्ही यांना शिक्षेने नष्ट केले असते तर म्हणाले असते, हे आमच्या पालन कर्त्या ! तू आमच्याजवळ एखादा पैगंबर का पाठविला नाहीस की, आम्ही अंपमानित व निंध होण्या पूर्वी तुझ्या आदेश नुसार आचरण केले असते.

وَلَوْ أَنَّآ أَهْلَكْنَٰهُم بِعَذَابٍ مِّن قَبْلِهِۦ لَقَالُوا۟
رَبَّنَا لَوْلَآ أَرْسَلْتَ إِلَيْنَا رَسُولًا فَنَتَّبِعَ ءَايَٰتِكَ مِن قَبْلِ
أَن نَّذِلَّ وَنَخْزَىٰ ﴿١٣٤﴾

१३५. सांगा, प्रत्येक जण प्रतिक्षेत आहे [१७०] तेव्हा तुम्ही देखील प्रतिक्षा करा-लवकरच तुम्हाला कळून येईल की कोण सरळ मार्गावर आहे व कोणी मार्गदर्शन प्राप्त केले आहे.[१७१]

قُلْ كُلٌّ مُّتَرَبِّصٌ فَتَرَبَّصُوا۟ ۖ
فَسَتَعْلَمُونَ مَنْ أَصْحَٰبُ ٱلصِّرَٰطِ ٱلسَّوِىِّ وَمَنِ ٱهْتَدَىٰ ﴿١٣٥﴾

१६४. म्हणजे ऐहीक भक्तांची शान व वैभव आणि धन सम्पत्तिला लोभीत नजरेने पाहू नका, कारण ही त्यांची कसोटीची सामुग्री आहे याच्या तुलनेत ती उपजिविका किती तरी पटीनी चांगली आहे ज्याचा वायदा अल्लाहने तुमच्या शी केला आहे व तो म्हणजे जन्नतची उपजिविका.

१६५.प्रत्येक मुसलमानाचे हे कर्तव्य आहे की त्याने स्वत: हि नमाज नियमित पणे पढावी आपल्या कुटुंबियांनाहि याची ताकीद करावी. आणि उचित पद्धत हीच की आपल्या घरापासूनच सुधारणेचा आरंभ करावा. नमाज बाबत आपल्या मुला बाळांकडून गफलत कोणत्याहि कर्तव्य परिचित व्यक्तिचे काम असू शकत नाही. या आयतीवरून हे दिसून आले की नमाजचा आदेश पाच वेळेची नमाज अनिवार्य ठरण्या आधी दिला गेला होता.

१६६. हीच गोष्ट सूरह जारियात मध्ये अशा प्रकारे सांगितली गेली आहे.

مَا أُرِيدُ مِنْهُم مِّن رِّزْقٍ وَمَا أُرِيدُ أَن يُطْعِمُونِ ـ (ذاريات:٥٧)

‘मी ना त्यांच्याकडून उपजिविका मागतो आणि ना असे इच्छितो की त्यांनी मला खाऊ घालावे’.
(जारियात: ५७)

अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपली उपासना व नमाज चा जो आदेश दिला आहे तो अशासाठी नव्हे की याचा त्याला काही लाभ घडेल, किंबहुना ही मागणी एवढ्यासाठीच की दासांमध्ये ‘ईश-भया’ चा गुणधर्म निर्माण व्हावा.

१६७. म्हणजे ‘नमाज’ ने तकवा (ईश-भया) चा गुण निर्माण होतो. व आखिरतची सफलता त्यांच्याच साठी आहे जे आपल्या अंगी हे वैशिष्ट्य निर्माण करतील.

स्पष्ट असावे की ‘तकवा’चा आशय दुष्कर्मापासून अलिप्त राहणे एवढाच नाही,तर ईश-आदेशाचे पालनहि आहे. होकारात्मक व नकारात्मक हे दोन्ही पैलू यात समाविष्ट आहेत. यास्तव अल्लामा ईब्ने तौमिया लिहितात-

‘‘कोण म्हणतो की ‘तकवा’ केवळ दुष्कृत्यांचा त्याग करण्याचे नाव आहे- तकवा तर-जसे की पूर्वीचे व नंतरचे यावर भाष्य करीत आहोत- आदेशांचे पालनहि आहे आणि वर्ज्य गोष्टींचा त्याग करणेहि’ (मज्मू फतावा ईब्ने तैमिय्यह ख. २० पा. १३२)

१६८. मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांचे असे म्हणणे होते की हा मनुष्य जर खरोखर पैगंबर आहे तर एखादा अनुभूत चमत्कार का दाखवित नाही याला उत्तर म्हणून फर्माविले गेले की काय जे काही पूर्वीच्या धर्म ग्रंथात उल्लिखत आहे, त्याची साक्ष यांच्या पर्यंत पोहचली नाही. अर्थात तौरात व इंजील मध्ये जी भाकीते येणाऱ्या पैगंबर विषयी उल्लिखित आहेत अगदी त्यांच्या नुसार या पैगंबराला पाठविले गेले आहे आणि ही साक्ष तो पैगंबर असण्याचे स्पष्ट प्रमाण होय. या प्रमाणा नंतर अनुभूत चमत्काराची गरज उरत नाही.

स्पष्ट असावे की कुरआन अवतरणाच्या वेळी तौरात, इंजील च्या ज्या प्रती अस्तित्वात होत्या त्यांत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी स्पष्टत: अनेक भाकिते होती परंतु नंतर यहुदी व ख्रिश्चनांनी किती तरी परिच्छेद या ग्रंथामधून गायब केलेत, या साठी की कुरआना च्या प्रमाणाच्या विरोधात त्यांची भूमिका कमजोर न व्हावी आणि काही परिच्छेदांचा अनुवाद अशा प्रकारे केला गेला की कोणाला काही समजू नये. तरी हि तौरात व इंजिल च्या आजच्या अनुवादा मध्ये काही भाकीते अस्तित्वात आहेत ज्यांचा हवाला आम्ही यापूर्वी देत आलोत उदाहरणार्थ तौरात मध्ये हे भाकीत आहे:-

‘मी त्यांच्यासाठी त्यांच्या भाऊ बंदातून तुझ्या सारखा एक संदेष्टा उभा करीन, त्याच्या मुखात मी आपली वचने घालीन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईल त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील’ .(अनुवाद- १८: १८)

या भाकीतात एक गोष्ट तर ही सांगितली गेली आहे की बनी इस्राईलच्या भावांमध्ये पैगंबर निर्माण करीन बनी इस्राईलचे भाऊ बनी इस्माईल होत आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) बनी इस्माईल पैकी होते. आणि त्यांच्या खेरीज अन्य कोणी पैगंबर बनी इस्माईल मध्ये झाला नाही. दुसरी गोष्ट अशी सांगितली गेली आहे की तो पैगंबरीय शान बाबत ह. मूसा सारखा असेल आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्याच वैभवाचे पैगंबर होते. यास्तव कुरआन म्हणते:

‘आम्ही अशा प्रकारे पैगंबरास तुम्च्यासाठी साक्षी बनवून पाठविले आहे, ज्या प्रमाणे अम्ही फिरऔन कडे पैगंबर पाठविला होता. (मुज्जम्मिल-१५)

आणि तिसरी गोष्ट अशी की त्यांच्या मुखात मी आपली वचने घालीन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्याना निवेदन करील हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होते यास्तव अल्लाहचे शब्द त्यांच्या मुखाने अदा झाले व कुरआन त्यांचा ईश-चमत्कार ठरला. तात्पर्य हा. ईश-चमत्कार अगदी त्या भाकीताला अनुसरून आहे जे तौरात मध्ये वर्णिले गेले आहे आणि हा पुरावा आहे त्याच्या सत्य पैगंबर असण्या संबंधीचा.

स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहतर्फे पाठविले जाण्यापूर्वी ग्रंथधारक या भाकीतांमुळे

येणाऱ्या पैगंबराची वाट पहात होते आणि त्याची चर्चा करीत. (पहा सूरह बकरा-आयत क्र.८९) म्हणून अरब लोक त्या पासून अनभिज्ञ असू शकत नव्हते.

१६९. अपमानित आपल्या नजरेत व नीच्य लोकांच्या नजरेत.

१७०. म्हणजे प्रत्येक मनुष्य या गोष्टीची वाट पहात आहे की पैगंबरांच्या आवाहनाचा काय निष्कर्ष निघतो.

१७१.म्हणजे लवकरच तुम्हाला असे दिसून येईल की पैगंबराचे आवाहन मांगल्य यश कारक होते किंवा नाही आणि अल्लाहची मदत पैगंबरा सोबत राहिली वा तुमच्या सोबत? आणि कियामतीच्या दिवशी तर दोन अधिक दोन बरोबर चार प्रमाणे तुम्हाला ही गोष्ट स्पष्ट उमजेल की पैगंबर व त्यांचे अनुयायीच सन्मार्गावर होते आणि तेच यशाच्या शिखरावर पोहचतील.

# २१. अल् अंबिया

**नाव:** या सूरह मध्ये अनेक पैगंबरांचा उल्लेख केला गेला आहे तदनुषंगाने या सूरहचे नाव 'अल् अंबिया' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे. आणि मजकूरांवरून असे दिसून येते की मक्केच्या शेवटच्या काळात अवतरीत झाली असेल विशेषत: शेवटाच्या आयतींमध्ये ज्यात पैगंबरांनी फैसल्यासाठी दुआ केली आहे.

**मध्यवर्ति कल्पना:** मृत्युनंतर अल्लाह समोर आपल्या कृतकर्माचा जाब द्यावा लागेल ही भावना लोकांच्या मनात निर्माण करणे यासाठी की त्यांचे दृष्टिकोन व आचरण दिशा बदलून जावी. पैगंबर गफलतीत पडलेल्या जनसमूहांना या धड्याची सातत्याने आठवण करून देत राहिले. परंतु लोक आपला तोल सावरण्याऐवजी त्यांचा विरोधच करीत राहिले आणि ही देखील वस्तुस्थिती आहे की अल्लाहची मदत नेहमी पैगंबरांसोबत राहिली. व अल्लाहची विशेष कृपा व मेहरबानीने त्यांना उपकृत केले जात राहिले.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते १५ मध्ये लोकांची त्यांच्या गफलतीबद्दल कान उघाडणी केली गेली आहे. आणि पैगंबरांचा विरोध करणाऱ्यांची जी दुष्परिणति या पूर्वी झालेली आहे, त्याविषयी खबरदार केले गेले आहे.

आयत क्र. १६ ते १८ मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की या जगाला त्याच्या निर्मात्याने मनोरंजनाचे स्थान बनविले नाही, किंबहुना सत्य व असत्याचे समरांगण बनविले आहे.

आयत क्र. १९ ते ३३ मध्ये एकेश्वरवादाचे वर्णन आहे. आयत क्र. ३४ ते ४७ मध्ये प्रेषित्वा संबंधीच्या शंका कुशंकाना उत्तर दिले गेले आहे. व पैगंबराची थट्टा उघविणाऱ्यांना तंबी दिली गेली आहे.

आयत क्र. ४८ ते ९१ मध्ये पैगंबरांचे वृत्तांत सादर केले गेले आहेत, ज्या द्वारे एकीकडे त्यांच्या शिकवणीना प्रसतुत करण्याचा उद्देश्य आहे तर दुसरीकडे हे स्पष्ट करणे की त्यांच्या हक्कात अल्लाहच्या सामर्थ्य व कृपेचे कसकसे चमत्कार प्रकट झाले आहेत.

आयत क्र. ९५ ते ११२ सूरहचा अंतिम हिस्सा होय ज्यात इन्कार करणाऱ्यांना ईश-शिक्षेपासून सावध केले आहे तसेच ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबरी ऐकवली गेली आहे. त्याबरोबरच हेहि स्पष्ट केले गेले आहे की पैगंबराना अल्लाहतर्फे पाठविले जाणे.लोकांच्या हक्कात पूर्णत: कृपा होय. जर ते ह्या कृपेची कदर करणार नाहीत तर स्वत:चेच नुकसान करुन घेतील.

# २१. सूरह अल् अंबिया

سُورَةُ الأَنْبِيَاءِ

आयती-११२

परमदयाळू परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. जवळ येऊन ठेवली आहे लोकांसाठी त्यांच्या हिशेबाची वेळ आणि ते मात्र गफलतीत तोंड फिरवून जात आहेत.[१]

اِقْتَرَبَ لِلنَّاسِ حِسَابُهُمْ وَهُمْ فِيْ غَفْلَةٍ
مُّعْرِضُوْنَ ①

२. त्यांच्या पालन कर्त्या तर्फे जी ताजी स्मरणिका देखील आली आहे. तिला ते अशा प्रकारे ऐकतात की खेळण्यात मग्न राहतात.[२]

مَا يَأْتِيْهِمْ مِّنْ ذِكْرٍ مِّنْ رَّبِّهِمْ مُّحْدَثٍ اِلَّا اسْتَمَعُوْهُ
وَهُمْ يَلْعَبُوْنَ ②

३. त्यांची मने गाफील आहेत [३] आणि हे अत्याचारी हळ स्वरात कान गोष्टी करतात की हा तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे काय तुम्ही डोळ्यांनी पाहूनहि जादू जवळ जाल?[४]

لَاهِيَةً قُلُوْبُهُمْ وَاَسَرُّوا النَّجْوَى الَّذِيْنَ ظَلَمُوْا هَلْ
هٰذَا اِلَّا بَشَرٌ مِّثْلُكُمْ اَفَتَاْتُوْنَ السِّحْرَ وَاَنْتُمْ تُبْصِرُوْنَ ③

४. तो (पैगंबर) म्हणाला, माझा पालनकर्ता जाणतो, जी गोष्ट देखील आकाश व जमीनीवर केली जाते तो सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.[५]

قٰلَ رَبِّيْ يَعْلَمُ الْقَوْلَ فِي السَّمَآءِ وَالْاَرْضِ
وَهُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ④

५. त्यांनी येथपावेतो म्हटले की हे तर भयावह स्वप्न आहे, किंबहुना त्याने मनाने रचलेली (वाणी) आहे, किंबहुना हा कवी आहे. [६] अन्यथा ह्याने आमच्या जवळ एखादी अशी निशाणी आणावी, ज्याप्रमाणे पूर्वीच्या काळातील पैगंबर निशाण्यांसह पाठविले गेले होते.

بَلْ قَالُوْٓا اَضْغَاثُ اَحْلَامٍ بَلِ افْتَرٰىهُ بَلْ هُوَ شَاعِرٌ فَلْيَاْتِنَا
بِاٰيَةٍ كَمَآ اُرْسِلَ الْاَوَّلُوْنَ ⑤

६. यांच्या पूर्वी अशा एकहि वस्तीने जिला आम्ही नष्ट केले ईमान बाळगले नाही. [७] तर काय हे लोक ईमान बाळगतील? [८]

مَآ اٰمَنَتْ قَبْلَهُمْ مِّنْ قَرْيَةٍ اَهْلَكْنٰهَا اَفَهُمْ يُؤْمِنُوْنَ ⑥

१. हिशेबाच्या वेळेशी अभिप्रेत कियामतीची वेळ होय, जेव्हा प्रत्येक मनुष्याला ईश्वरासमोर आपल्या श्रद्धा व आचरणाबाबत जाब द्यावा लागेल.

उत्तरदायिकत्वाची हीच ती कल्पना होय जी माणसाच्या अंगी जबाबदारीची जाणीव निर्माण करते व त्याला अल्लाहच्या आदेशानुसार जीवन जगण्यास प्रवृत्त करते. परंतु प्रत्येक युगातील लोक या अतिमहत्वपूर्ण वस्तुस्थिती बाबत बेपर्वा राहीलेत. आणि आज देखील अब्जोगणती मनुष्य या गोष्टीविषयी अगदी अजाण आहेत की भावी काळात लवकरच त्यांना विचारपूसच्या अवस्थेत प्रवेश करावयाचा आहे. कुरआनाचे हे निवेदन बेभान मानवतेस शुद्धीवर आणारे आहे, त्यासाठी फक्त विचार चिंतनाची गरज आहे. परंतु लोकांची ही दशा आहे की ते कियामत व हिशोबाच्या गोष्टी ऐकूहि इच्छित नाही. ते फक्त आशाच गोष्टी ऐकू इच्छितात ज्यामुळे त्यांच्या धुंदीत वाढ होते.

हिशेबाची वेळ जवळ येऊन ठेपली याचा अर्थ असा की आता मानव जाति ने आपल्या युगाच्या अंतिम अवस्थेत प्रवेश केला आहे. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले.

بُعِثْتُ اَنَا وَالسَّاعَةُ كَهَاتَيْنِ۔ (مسلم كتاب الفتن)

'मी आणि कियामतीची वेळ या दोन बोटाप्रमाणे जोडीने पाठविले गेले आहेत.' (मुस्लिम किताबुल फितन)

तसेच हिशेबाची वेळ दृष्टीनेहि जवळ आहे की माणसाच्या व मृत्युच्या दरम्यान फार थोडे अंतर आहे आणि जेव्हा मृत्यु येतो तेव्हा तो हिशेबाच्याच अवस्थेत दाखल होतो आणि तेव्हा पासूनच शिक्षा व मोबदल्याचा आरंभ होतो.

२. म्हणजे कुरआनाची जी सूरह देखील अवतरीत होते, एका नव्या स्मृति वैभवानिशी अवतरीत होते परंतु हे लोक एवढे अविचारी झाले की या ग्रंथापासून बोध ग्रहण करणे तर राहिलेच उलट त्याची थट्टा उडवित राहिले.

ही स्थिती केवळ अडाणी अरब लोकांचीच नव्हे, तर आजच्या बुद्धिमंतांचीहि आहे. ईश्वर व धर्म संदर्भात ते इतके असभ्य आहेत की जन्नत व दोजखचा विषय निघाला की ते टोमणे मारतात.

३. हे मूळ कारण आहे त्यांच्या त्या असभ्य हरकतींचे की त्यांची मने ईश्वराबाबत गाफील व इहलोकाबाबत आकृष्ट आहेत.

४. अर्थात हा मनुष्य जी वाणी प्रस्तुत करीत आहे, त्याची वास्तविकता काहीच नाही केवळ शब्दांची जादू आहे, ज्यामुळे लोक प्रभावित होतात. मग काय तुम्ही जाणून बुजून जादूच्या जाळ्यात अडकाल?

५. हे पैगंबराचे कथन होय जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने निवेदिले आहे अर्थात हे अनेकेश्वरवाद्यांच्या कानगोष्टीना उत्तर आहे.

६. इन्कार करणारे, पैगंबर व कुरआनाबाबत वेगवेळे विचार व्यक्त करीत. कधी म्हणत ही जादू आहे,तर कधी म्हणत, हा विमनस्क स्वप्नांचा संग्रह आहे. कधी म्हणत या मनाने रचलेल्या गोष्टी आहेत, तर कधी म्हणत हा मनुष्य कवी आहे आणि कुरआन याच्या काव्य- रचनेची भरारी आहे. या वरून इन्कार करणारे किती विमनस्क विचारसरणी बाळगणारे होते याची कल्पना येते. कधी एखादी गोष्टी सांगत व ती लागू न पडल्यास दुसरी गोष्ट सांगत व जेव्हा ती देखील अनुरुप न ठरल्यास तिसरेच काही तरी बोलत. आणि तेहि लागू न पडल्यास चौथी गोष्ट सांगत. अशा प्रकारे कोणता न कोणता आरोप ठेवून वस्तुस्थितीवर पांघरुण घालण्याचा ते प्रयत्न करीत.

७. अर्थात अनुभूत ईश-चमत्कार पाहून कोणत्याहि वस्तीने ईमान बाळगले नव्हते.

८. म्हणजे जर या पैगंबराच्या हसते एखादा अनुभूत ईश-चमत्कार या लोकांना त्यांच्या मागणीनुसार दाखविला गेला तरीहि हे लोक ईमान बाळगणार नाहीत कारण हटधर्मी लोकांची हीच रीत आहे.

७. आणि तुमच्या पूर्वी आम्ही माणसांनाच पैगंबर बनवून पाठविले होते, ज्यांच्यावर आम्ही 'वह्‌य' (संदेश अवतरीत) करीत होतो. जर तुम्ही जाणत नसाल तर जिक्र वाल्यांना (आकाशस्थ ग्रंथ बाळगणाऱ्यांना ) विचारून बघा.[९]

وَمَآ أَرْسَلْنَا قَبْلَكَ إِلَّا رِجَالًا نُّوحِىٓ إِلَيْهِمْ
فَسْـَٔلُوٓا أَهْلَ ٱلذِّكْرِ إِن كُنتُمْ لَا تَعْلَمُونَ ﴿٧﴾

८. त्यांना आम्ही अशाी शरीराचे बनवले नव्हते की ते भोजन करीत नसावेत आणि ना ते सदैव राहणारे होते. [१०]

وَمَا جَعَلْنَٰهُمْ جَسَدًا لَّا يَأْكُلُونَ ٱلطَّعَامَ
وَمَا كَانُوا خَٰلِدِينَ ﴿٨﴾

९. मग आम्ही त्यांच्याशी वचन पूर्ण केले आणि त्यांना व ज्यांना आम्ही इच्छिले, वाचविले आणि मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना नष्ट केले.

ثُمَّ صَدَقْنَٰهُمُ ٱلْوَعْدَ فَأَنجَيْنَٰهُمْ وَمَن نَّشَآءُ
وَأَهْلَكْنَا ٱلْمُسْرِفِينَ ﴿٩﴾

१०. आम्ही तुमच्याकडे असा ग्रंथ पाठविला आहे, ज्यात तुमच्या करीता स्मरणिका आहे. काय तुम्ही हे समजत नाही?

لَقَدْ أَنزَلْنَآ إِلَيْكُمْ كِتَٰبًا فِيهِ ذِكْرُكُمْ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿١٠﴾

११. आणि अशा कितीतरी अत्याचारी वस्त्या आहेत, ज्यांना आम्ही नष्ट केले व त्यांच्यानंतर दुसऱ्या लोकांना उभे केले.

وَكَمْ قَصَمْنَا مِن قَرْيَةٍ كَانَتْ ظَالِمَةً وَأَنشَأْنَا بَعْدَهَا
قَوْمًا ءَاخَرِينَ ﴿١١﴾

१२. जेव्हा त्यांना आमची शिक्षा-यातना जाणवली [११] तेव्हा तेथून पळ काढू लागले.

فَلَمَّآ أَحَسُّوا بَأْسَنَآ إِذَا هُم مِّنْهَا يَرْكُضُونَ ﴿١٢﴾

१३. पळू नका. परत या आपल्या सुख विलासाच्या सामुग्रीकडे व आपल्या घरांकडे, यासाठी की तुम्हाला विचारणा केली जावी.[१२]

لَا تَرْكُضُوا وَٱرْجِعُوٓا إِلَىٰ مَآ أُتْرِفْتُمْ فِيهِ وَمَسَٰكِنِكُمْ
لَعَلَّكُمْ تُسْـَٔلُونَ ﴿١٣﴾

१४. ते उद्‌गारले, दु:ख आहे आमच्याकरिता आम्हीच अत्याचारी होतो.[१३]

قَالُوا يَٰوَيْلَنَآ إِنَّا كُنَّا ظَٰلِمِينَ ﴿١٤﴾

१५. हाच शोक-विलाप ते करीत राहिलेत- येथ पावेतो की आम्ही त्यांना कापणी झालेल्या शेतासारखे करून टाकले. [१४] ते अगदी विझून गेले.[१५]

فَمَا زَالَت تِّلْكَ دَعْوَىٰهُمْ حَتَّىٰ
جَعَلْنَٰهُمْ حَصِيدًا خَٰمِدِينَ ﴿١٥﴾

९. याचे स्पष्टीकरण सूरह नहल टीप क्र. ६४ व ६५ मध्ये केले गेले आहे.

१०. म्हणजे जे जे पैगंबर पाठविले गेले ते सर्व भोजन करणारे मनुष्य होते. अतिमानव (Super-Human) असा कोणीहि नव्हता आणि ना कोणी सदैव काळ जगात जिवंच राहिला. जी गोष्ट पैगंबराना अन्य माणसाहून अग्रणी करीत राहिली ती म्हणजे त्यावर अवतरीत होणारा ईश-संदेश होय. या आयतीने या विचाराचेहि खंडन होते की हजरत खिज्र जगात नेहमी करीता जिवंत आहेत.

११. म्हणजे जेव्हा अल्लाहच्या शिक्षेची लक्षणे पाहिली.

१२. ही उपरोध उक्ति होय. अर्थात आता पळ कशाला काढता, तुम्ही तर ईश शिक्षेची थट्टा उडवित राहिले म्हणून तुम्हाला शक्य असेल तर आपल्या सुख विलासाच्या सामुग्रीकडे व आपल्या आनंद भवनांकडे परता, या साठी की तुमच्या साथीदारांना तुमची दशा (शुभ वर्तमान कळावे की असे काय घडले, ज्यामुळे तुम्ही आपले घरदार सोडून चालले गेले?

१३. त्यावेळी त्यांनी आपण अपराधी असल्याचे मान्य केले व आपल्या कर्माबद्दल पशचात्ताप व्यक्त केला.

१४. म्हणजे त्यांची दशा त्या शेतासारखी झाली ज्याच्या पिकाची कापणी झाली असावी व जे रूक्ष व रखरखीत पडले असावे.

१५. म्हणजे जीवनातले चैतन्य लोप पावले असेल व आणि ते अगदी निष्प्रभ व निष्प्राण होऊन जातील.

१६. आम्ही आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यानच्या वस्तुंना खेळ म्हणून बनविले नाही.[१६]

وما خلقنا السماء والأرض وما بينهما لعبين ﴿١٦﴾

१७. जर आम्हाला खेळ बनवायची इच्छा असती तर खास आपल्याजवळून बनविले असते. जर आम्हाला असे करायचेच असते.[१७]

لو أردنا أن نتخذ لهوا لاتخذنه
من لدنا إن كنا فعلين ﴿١٧﴾

१८. परंतु आम्ही तर सत्याला असत्या वर फेकून मारतो तेव्हा ते त्याचे मस्तक ठेचून टाकते आणि ते (असत्य) नाहिसे होते. [१८] आणि तुमच्या करिता सर्वनाश आहे त्या गोष्टीमुळे ज्या तुम्ही निवेदन करता. [१९]

بل نقذف بالحق على البطل فيدمغه فإذا هو زاهق
ولكم الويل مما تصفون ﴿١٨﴾

१९. आकाश व जमीनीवर जो कोणी आहे सर्व त्याचेच आहेत [२०] व जे त्याच्याजवळ आहेत [२१] ते ना त्याच्या उपासनेपासून विद्रोह करतात आणि ना थकतात.

وله من في السموت والأرض ومن عنده لا يستكبرون
عن عبادته ولا يستحسرون ﴿١٩﴾

२०. रात्रदिवस त्याची तस्बीह (गुणगान) करीत राहतात. विसावा घेत नाही. [२२]

يسبحون اليل والنهار لا يفترون ﴿٢٠﴾

२१. काय यांनी जमीनीचे असे ईश्वर बनविले आहेत जे (मृतांना) जिवंत उभे करीत असावेत ?[२३]

أم اتخذوا ءالهة من الأرض هم ينشرون ﴿٢١﴾

२२. जर या (आकाश व जमीनी) त अल्लाह शिवाय आणखी हि ईश्वर असते तर हे अस्ताव्यस्त होऊन गेले असते.[२४] तेव्हा पवित्र आहे अल्लाह, अर्श (ईश-सिंहासना) चा स्वामी, त्या गोष्टीपासून ज्यांना हे लोक निवेदन करतात.

لو كان فيهما ءالهة إلا الله لفسدتا فسبحن الله رب
العرش عما يصفون ﴿٢٢﴾

२३. तो जे काही करतो (त्यासाठी एखाद्यापुढे) उत्तरदायी नाही [२५] आणि सर्व जाब देणारे आहेत.[२६]

لا يسئل عما يفعل وهم يسئلون ﴿٢٣﴾

१६. आखिरतचा इन्कार केल्यानंतर मनुष्य या सृष्टीच्या निर्मितीचे खरे स्पष्टीकरण करू शकत नाही. अशा लोकांच्या दृष्टीने सृष्टी-निर्मिती ईश्वराच्या गंभीर निर्णयाचा निष्कर्ष नव्हे तर केवळ मनोरंजनाचे साधन होय जे त्याने स्वत: साठी घडविले आहे. हिन्दू तत्ववेत्ते यास 'लीला' या अर्थाने घेतात.

' In the begining God was alone, and he desired to become many, As a consequence, he created the world out of mere pleasure, as a sport (lila)'

(Out lines of Hinduism by T.M.P Mahadevan P. 163)

अर्थात ''आरंभी ईश्वर एकटा होता. त्याने अनेकविध होऊ इच्छिले, परिणामी त्याने विश्वरचना मनोरंजनासाठी खेळ 'लीला' म्हणून केली'' वास्तुस्थिती अशी की ईश्वराला केवळ तेच लोक गांभीर्यहीन समजतात जे स्वत: उच्छृंखल असतात.

१७. म्हणजे खेळ बनविणे आमच्या शान विरुद्ध आहे. परंतु समजा आम्हाला खेळ करायचाच असता तर आम्ही आपल्या जवळळून याची सामुग्री केली असती यासाठी या महान सृष्टीला निर्माण करण्याची व माणसासारख्या सुज्ञ व सुसंस्कृत प्राण्यास निर्माण करण्याची गरजच नव्हती. अर्थात हा कारखाना (हे विश्व) एखाद्या खेळाडूचा खेळ नव्हे किंबहुना निर्मात्याचे एक उद्दिष्ट व धोरण आहे.

१८. म्हणजे हा विचार करणे उचित नव्हे की, हे जग केवळ प्रदर्शन स्थळ आहे आणि आम्ही फक्त प्रेक्षक आहोत, किंबहुना आम्ही या जगाला परिक्षा -स्थळ बनविले आहे आणि माणसाची येथे आम्ही परिक्षा घेत आहोत म्हणून हे जग सत्य व असत्याची संघर्ष भूमी बनली आहे. तात्पर्य निष्कर्ष आखिरत मध्ये उघडकीस येतील जिथे केवळ सत्यच असेल व असत्य अगदी नष्ट पावले असेल तरी देखील या जगातहि आम्ही सत्याद्वारे असल्यावर आघाड करण्याची उपाय योजना करीत राहतो यास्तव मानव-इतिहासात वारंवर असे घडले आहे की जेव्हा असत्याने डोके वर काढले तेव्हा आम्ही आपल्या पैगंबराद्वारे ते ठेचून टाकले सत्य प्रभावशाली झाले व असत्यास नष्ट व्हावे लागले या पैगंबराद्वारे सत्याला असत्यावर प्रभावी व्हावयाचे आहे आणि हे कुरआन तर अल्लाहचे ते प्रमाण होय ज्यामुळे असत्य तिळमात्र टिकू शकणार नाही. या नंतर तेच लोक या जगास प्रदर्शन स्थळ ठरवितात ज्यांनी वास्तवेकडे पाठ फिरवली आहे.

१९. म्हणजे ईश्वराशी खोट्या गोष्टींचा संबंध जोडून तुम्ही आपलाच सर्वनाश ओढवून घेत आहात.

२०. अर्थात तो सर्वांचा स्वामी आहे सर्व त्याचे दास व गुलाम आहेत.

२१. अभिप्रेत अल्लाहच्या सान्निध्यात असलेले फिरिश्ते होत.

२२. ज्याप्रमाणे मनुष्य श्वास घेण्यात थकत नाही, तद्वतच फिरिश्ते तस्बीह करण्यात थखत नाहीत. ते सदैव अल्लाहची स्तुती व गुणगान करण्यात लीन असतात.

या आयतींमध्ये 'मलए आअला'ची एक झळक दाखविली गेली आहे ज्यावरुन असे दिसते की सर्वश्रेष्ठ अल्लाहचा दरबार किती वैभवशाली असेल. यावरून अल्लाहच्या महानतेची खरी कल्पना देखील कायम होते व तस्बीह (जाप) व इबादत (उपासने ) शी अत्याधिक लगावदेखील.

२३. अनेकेश्वरवादी असे समजतात की जो आकाशाचा ईश्वर आहे तो जमीनीचा एकटा ईश्वर नाही, किंबहुना अनेक लाहन सहान ईश्वर (दैवते) आहेत, ज्यांनी जमीनीची संपूर्ण व्यवस्था सांभाळली आहे, आणि तेच माणसाला लाभ-हानी पोहचवित राहतात. या विचाराचे खंडन करण्यासाठी त्यांना हा प्रशन केला गेला की काय तुमच्या दृष्टीने जमीनीचे ईश अन्य आहेत? आणि काय हे ईश्वर तुम्हाला मेल्यानंतर जमीनीतून पुन्हा जिवित करून उठविणार आहेत की तुम्ही यांची पूचा -अर्चना करीत राहीलात याचा मोबदला म्हणून ते तुम्हाला इनाम देणग्या देतील? जर असे नाही - आणि तुम्ही स्वत:हा दावा करु शकत नाही की हे आम्हाला मेल्यानंतर उठवून उभे करणार आहेत तेव्हा यांची पूजा करण्यात काय हंशील? मेल्यानंतर जर तुम्हाला दुसऱ्यांदा उठावयचेच नाही तर तुमची ही दैवते शेवटी केव्हा तुमच्या कामी येणार आहेत?

२४. म्हणजे जर जमीन व अकाशात अनेक ईश्वर असते तर सृष्टी व्यवस्था चालू शकत नव्हती. प्रत्येक ईश्वराने आपल्या अधिकारांचा आपल्या मर्जीनुसार वापर केला असता या स्थितीत ती व्यवस्था बाकी राहू शकत नव्हती जी या सृष्टीत कायम आहे आणि न याचे वेगवेगळे भाग एकमेकांशी अनुकुलता निर्माण करू शकले असते आणि ना एखाद्या योजनेसह या सृषटीत एखादे काम पार पडले असते. उदाहरणार्थ पावसाकरीता जमीन, समुद्र सूर्य व हवा सर्वांची अनुकूलता आवश्यक आहे अन्यथा माणसाला जमीनीच्या कानाकोपऱ्यात पाणी पोहचविण्याची ही स्किम कार्यान्वित होऊ शकत नाही. जर ह्या वस्तू वेगवेगळ्या ईश्वरांच्या ताब्यात असत्या तर पावसाची ही व्यवस्था कशा

प्रकारे शक्य झाली असती?

हे एकेश्वर वादाचे जबरदस्त प्रमाण होय आणि याने शिर्क व नास्तिकता दोघांचे खंडन होते. जर ही सृष्टी ईश्वरहीन असती तर सृष्टीचा हा प्रचंड कारखाना एवढ्या नियमितपणे कसा चालू शकत होता.

२५. अल्लाह सर्वसत्ताधिकारी व सर्वोच्च सामर्थ्य बाळगणारा आहे. म्हणून त्याला एखाद्यापुढे जाब द्यावयाचा प्रश्नच निर्माण होत नाही आणि ना एखाद्यास हा हक्क पोहचतो की त्याच्या निर्णयानंतर व त्याच्या कार्यांवर आक्षेप घ्यावा.

२६. ज्याअर्थी सर्व अल्लाहची निर्मिती व त्याचे दास आहेत म्हणून प्रत्येक मनुष्याला त्याच्या पुढे जाब द्यावा लागेल. जो मनुष्य स्वत:स त्याच्या समोर जाब देणारा समजत नाही व आपले स्थान चुकीचे योजितो, ज्यामुळे त्याचे संपूर्ण जीवन चुकीचे होते.

**काय यांनी त्याला सोडून अन्य उपास्ये बनविली आहेत? त्यांना सांगा, प्रस्तुत करा आपले प्रमाण. ही शिकवण आहे माझ्या साथीदारांसाठी आणि हीच शिकवण माझ्या पूर्वीच्या लोकांसाठीहि होती. परंतु अधिकांश लोक वस्तुस्थिती विषयी अनभिज्ञ आहेत, म्हणून तोंड फिरवितात. (अल-कुर्आन)**

२४. काय यांनी त्याला सोडून अन्य उपास्ये बनविली आहेत? त्यांना सांगा, प्रस्तुत करा आपले प्रमाण. ही शिकवण आहे माझ्या साथीदारांसाठी आणि हीच शिकवण माझ्या पूर्वीच्या लोकांसाठीहि होती. [२७] परंतु अधिकांश लोक वस्तुस्थिती विषयी अनभिज्ञ आहेत, म्हणून तोंड फिरवितात.

أَمِ اتَّخَذُوا مِن دُونِهِ آلِهَةً قُلْ هَاتُوا
بُرْهَانَكُمْ هَٰذَا ذِكْرُ مَن مَّعِيَ وَذِكْرُ مَن قَبْلِي
بَلْ أَكْثَرُهُمْ لَا يَعْلَمُونَ الْحَقَّ فَهُم مُّعْرِضُونَ ﴿٢٤﴾

२५. आम्ही तुमच्या पूर्वी जो जो पैगंबर पाठविला त्यावर 'वह्य' केले की माझ्याशिवाय कोणी ईश्वर नाही तेव्हा माझीच इबादत (उपासना) करा. [२८]

وَمَا أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ مِن رَّسُولٍ إِلَّا نُوحِي إِلَيْهِ أَنَّهُ
لَا إِلَٰهَ إِلَّا أَنَا فَاعْبُدُونِ ﴿٢٥﴾

२६. हे म्हणतात रहमानने (स्वत:साठी) संतती बनविली आहे. पवित्र आहे तो- वस्तुस्थिती अशी की ते (याचे) सन्माननीय दास आहेत. [२९]

وَقَالُوا اتَّخَذَ الرَّحْمَٰنُ وَلَدًا
سُبْحَانَهُ بَلْ عِبَادٌ مُّكْرَمُونَ ﴿٢٦﴾

२७. त्याच्या पुढे जाऊन बोलत नाहीत [३०] आणि त्याच्या आदेशाचे पालन करतात.

لَا يَسْبِقُونَهُ بِالْقَوْلِ وَهُم بِأَمْرِهِ يَعْمَلُونَ ﴿٢٧﴾

२८. जे काही त्यांच्या पुढ्यात आहे व जे काही त्यांच्या पश्चात आहे ते सर्व तो जाणून आहे. ते शिफारस करणार नाहीत, परंतु त्याची, ज्याच्यासाठी अल्लाह पसंत करील [३१] आणि त्याच्या भितीने त्यांचा थरकाप होत असतो. [३२]

يَعْلَمُ مَا بَيْنَ أَيْدِيهِمْ وَمَا خَلْفَهُمْ وَلَا يَشْفَعُونَ
إِلَّا لِمَنِ ارْتَضَىٰ وَهُم مِّنْ خَشْيَتِهِ مُشْفِقُونَ ﴿٢٨﴾

२९. आणि यांच्यापैकी जर एखादा म्हणेल की त्याच्या (अल्लाहच्या) शिवाय मी ईश्वर आहे तर आम्ही त्याला जहन्नमची शिक्षा देऊ. अत्याचारीना आम्ही अशा प्रकारे शिक्षा देतो. [३३]

وَمَن يَقُلْ مِنْهُمْ إِنِّي إِلَٰهٌ مِّن دُونِهِ فَذَٰلِكَ نَجْزِيهِ جَهَنَّمَ
كَذَٰلِكَ نَجْزِي الظَّالِمِينَ ﴿٢٩﴾

३०. काय इन्कार करणाऱ्यांनी या गोष्टीवर विचार-चिंतन नाही केले की आकाश व जमीन एकमेकास मिळालेले होते नंतर आम्ही त्यांना अलग केले. [३४] आणि पाण्यापासून प्रत्येक सजीव निर्माण केला. [३५] तर काय ते या उपरान्तहि ईमान बाळगणार नाहीत? [३६]

أَوَلَمْ يَرَ الَّذِينَ كَفَرُوا أَنَّ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ
كَانَتَا رَتْقًا فَفَتَقْنَاهُمَا وَجَعَلْنَا مِنَ الْمَاءِ
كُلَّ شَيْءٍ حَيٍّ أَفَلَا يُؤْمِنُونَ ﴿٣٠﴾

२७. म्हणजे अल्लाह शिवाय अन्य एखाद्याच्या उपास्य असण्या संबंधीचा पुरावा ईश्वरीय शिकवणीत नाही. आज माझ्या (अर्थात पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या ) साथीदारांना जी शिकवण दिली गेली आहे ती पूर्णत: एकेश्वरवादाची शिकवण होय. आणि जी शिकवण या पूर्वीच्या प्रेषित अनुयायींना दिली गेली होती ती देखील एकेश्वर वादाचीच शिकवण होती.

स्पष्ट असावे की एकेश्वर वाद्यांच्या विविध धार्मिक-पुस्तका-मध्ये अनेक ईश-दैवताविषयी जी कल्पना आढळते तर हा या गोष्टीचा पुरवा मुळीच नव्हे की हे अल्लाहचे फर्माण आहे किंवा एखाद्या पैगंबराची शिकवण आहे. कारण ही पुस्तके अल्लाहने अवतरीत केली नाहीत. किंबहुना धर्म-संस्थापकांनी रचलेली आहेत.

२८. यास्तव विविध धर्मात एकेश्वर वादा विरूद्ध जी काही शिकवण आढळून येते ती कोणत्याहि पैगंबराची शिकवण नव्हे. अशा शिकवणीचा संबंध जर एखाद्या पैगंबराशी जोडला गेला आहे तर तो चुकीचा होय व त्या पैगंबरावर आळ आहे.

२९. अनेकेश्वर वादी फिरिश्त्यांना अल्लाहची संतती ठरवीत. याच विचाराचे हे खंडन होय. फर्माविले, फिरिशते अल्लाहची संतती नव्हे, किंबहुना त्याचे प्रतिष्ठित दास आहेत.

३०. अर्थात फिरिशत्यांची ही मजाल नव्हे की अल्लाह च्याहि पुढे बोलण्यात पुढाकार घ्यावा. परंतु तुम्ही या भ्रमात पडला आहात की ते अल्लाहचे लाडके आहेत, जे इच्छितील ते अल्लाहकडून करवतील.

३१. म्हणजे फिरिश्ते केवळ त्यांच्याच हक्कात शिफारस करतील. ज्यांच्यासाठी शिफारस करणे सर्वश्रेष्ठ अल्लाह मान्य करील. हेतु अनेकेश्वरवाद्यांच्या या विचाराचे खंडन करण्याचा आहे की जर कियामत घडून आली तर फिरिश्ते, ज्यांची आम्ही पूजा करीत राहिलो, अल्लाह समोर आमची शिफारस करून ईश-शिक्षेपासून वाचवतील. 'शिफारसी'च्या अधिक स्पष्टी- करणासाठी पहा सूरह बकरा टीप ४१२ आणि सूरह मरयम टीप १११

३२. फिरिशते अल्लाहची अवज्ञा करीत नाही, तरी देखील त्यांचा भयाने थरकाप होत राहतो. माणसालाहि हेच शोभून दिसेल की त्याने आपल्या अंगी हा फिरिश्त्यांचा गुण बाळगावा.

३३. म्हणजे फिरिश्त्यांना तुम्ही ईश्वर बनविले,वस्तुत: आपण ईश्वर असल्याचा दावा ते करीत नाही ते तर अल्लाहच्या दास्यत्वात लीन आहेत. परंतु समजा, यांच्या पैकी एखाद्याने ईश्वर असल्याचा दावा केला तर त्याला जहन्नम मध्ये फेकून दिले जाईल कारण या अपराधाची हीच शिक्षा होय.

३४. या ठिकाणी सृष्टीच्या प्रारंभिक परिस्थितीचे निवेदन करून विचार-चिंतनाचे आवाहन केले गेले आहे. सृष्टीबाबत हा विचार योग्य नव्हे की तिला ज्या स्वरुपात आम्ही पाहतो त्याच स्वरूपात ती नेहमी चालत आली आहे तिला ना कसला आरंभ ना शेवट. किंबहुना वस्तुस्थिती अशी की ही सृष्टी एक निर्मात्याच्या निर्माण केल्याने अस्तित्वात आली आहे. व तिचा आरंभ अशा प्रकारे झाला की त्याने प्रथम एक पदार्थ (दुखान) घडविला (सूरह हामीम अस्सज्दह आयत क्र. ११) जो दिग स्वरुपात होता. मग या पदार्था (दुखान) पासून जमीन व आकाश (सर्व ग्रह तारे) बनविले. तात्पर्य जमीन व आकाश सुरवातीला मिळाले त्या स्वरुपात होते. नंतर वेगवेगळे झाले.

विचार-चिंतन करणाऱ्या मनुष्यास कुरआनाच्या या निवेदनाची निकोपता स्पष्ट कळून येईल. कारण जर सृष्टीचा पदार्थ एक नसता तर त्याच्या विविध भागांमध्ये सुसंगती आढळून आली नसती. परंतु आम्ही हे पाहतो की सूर्य आपली किरणे पृथ्वीवर सोडतो आणि पृथ्वी त्याची उष्णता व प्रकाश आत्मसात करते आणि आता तर चंद्रावर जाऊन माणसाने हे पाहिले की तिथली जमीनहि आमच्या जमीनीप्रमाणे दगड मातीची बनलेली आहे. आणि जेव्हा वस्तुस्थिती ही आहे की ही सर्व एकाच कलेची कौशल्ये आहेत तेव्हा तिच्या निवडी पासून तोंड फिरविण्याचा अर्थ काय?

३५. म्हणजे पाणी जीवनाचे मूल आहे. ज्या ज्या वस्तूला जीवन लाभले आहे पाण्याद्वारेच लाभले आहे व त्याचे अस्तित्व पाण्यामुळेच टिकून आहे. सर्वसामान्य अवलोकन देखील हेच की पाण्याच्या एका थेंबात अनेक सूक्ष्म जंतू असतात. पाण्यानेच मनुष्य व अन्य प्राण्यांची निर्मिती झाली आहे. जीवशास्त्र (Biology) अनुसार एक जलपेशी अर्थात प्रोटोप्लाजम (Protoplasm)जीवनतच आहे. जे प्रत्येक सजीवात आढळून येते.

काय जीवनाची ही वस्तुस्थिती एकाच इश्वराची उत्पत्ति व त्याच्या महान सामर्थ्याचे द्योतक नव्हे?

३६. म्हणजे या वास्तव गोष्टींवर माणसाने सखोल विचार चिंतन केल्यास त्याच्या अंगी ईमान व विश्वासाची कैफीयत निर्माण होईल परंतु लोक या दृष्टीने विचारचिंतन करीतच नाही.

३१. आणि आम्ही जमीनीत पर्वतांचे लंगर रोवले की तिने लोकांसमवेत कोलमडून न जावे. [३७] आणि या (पर्वता) मध्ये खिंड बनविलेत जे मार्ग म्हणून उपयोगी पडतात. [३८] यासाठी की लोकांना मार्ग लाभावा.[३९]

وَجَعَلْنَا فِي الْأَرْضِ رَوَاسِيَ أَنْ تَمِيدَ بِهِمْ وَجَعَلْنَا فِيهَا
فِجَاجًا سُبُلًا لَعَلَّهُمْ يَهْتَدُونَ ﴿٣١﴾

३२. आणि आम्ही आकाशाला सुरक्षित छत बनविले [४०] परंतु या लोकांनी त्याच्या निशाण्यांपासून तोंड फिरवलेले आहे.[४१]

وَجَعَلْنَا السَّمَاءَ سَقْفًا مَحْفُوظًا ۖ وَهُمْ عَنْ
آيَاتِهَا مُعْرِضُونَ ﴿٣٢﴾

३३. आणि तोच होय ज्याने रात्र व दिवस आणि सूर्य-चंद्र बनविले. सर्व (आपापल्या कक्षेत तरंगत आहेत. [४२]

وَهُوَ الَّذِي خَلَقَ اللَّيْلَ وَالنَّهَارَ وَالشَّمْسَ وَالْقَمَرَ ۖ كُلٌّ
فِي فَلَكٍ يَسْبَحُونَ ﴿٣٣﴾

३४. आणि आम्ही तुमच्या पूर्वीहि कोणत्याहि माणसाला शाश्वतता प्रदान केली नाही.[४३] जर तुम्ही मरण पावलात तर काय हे लोक सदैव जिवित राहणार आहेत ?[४४]

وَمَا جَعَلْنَا لِبَشَرٍ مِنْ قَبْلِكَ الْخُلْدَ ۖ أَفَإِنْ مِتَّ
فَهُمُ الْخَالِدُونَ ﴿٣٤﴾

३५. प्रत्येक जीवास मरणाची गोडी चाखावयाची आहे. [४५] आणि आम्ही चांगल्या व वाईट स्थितीत ग्रस्त करून तुमची कसोटी घेतो [४६] आणि आमच्याच कडे तुम्हाला परतावयाचे आहे.[४७]

كُلُّ نَفْسٍ ذَائِقَةُ الْمَوْتِ ۗ وَنَبْلُوكُمْ
بِالشَّرِّ وَالْخَيْرِ فِتْنَةً ۖ وَإِلَيْنَا تُرْجَعُونَ ﴿٣٥﴾

३६. आणि (हे पैगंबर !) हे काफीर जेव्हा तुम्हाला - पहातात थट्टा-मस्करी उढवितात (व म्हणतात) हाच का तो मनुष्य, जो तुमच्या उपास्यांचा (वाईट रित्या) उल्लेख करतो? आणि त्यांची स्वत:ची ही दशा आहे की 'रहमान'च्या नाम-स्मरणाचा इन्कार करतात.[४८]

وَإِذَا رَآكَ الَّذِينَ كَفَرُوا إِنْ يَتَّخِذُونَكَ إِلَّا هُزُوًا أَهَٰذَا
الَّذِي يَذْكُرُ آلِهَتَكُمْ وَهُمْ بِذِكْرِ الرَّحْمَٰنِ هُمْ كَافِرُونَ ﴿٣٦﴾

३७. माणसाच्या स्वभावात उतावळेपणा आहे. [४९] मी लवकरच तुम्हाला आपल्या निशाण्या दाखवीन [५०] घाई करू नका. [५१]

خُلِقَ الْإِنْسَانُ مِنْ عَجَلٍ ۚ سَأُرِيكُمْ آيَاتِي
فَلَا تَسْتَعْجِلُونِ ﴿٣٧﴾

३७. याचे स्पष्टीकरण सूरह नहल टीप क्र. २५ मध्ये केले गेले आहे.

३८. पर्वतांमध्ये खिंड-दऱ्या बनविल्यात. हे नैसर्गिक मार्ग होत. ज्यांच्या द्वारे एका इलाक्यातून दुसऱ्या इलाक्यात प्रवेश करणे मानवाकरीता शकय झाले.

३९ मार्ग लाभण्याशी अभिप्रेत तो मार्ग देखील होय, ज्यास अनुसरून मनुष्य आपल्या मजली प्रत पोहचतो आणि तो मार्ग देखील ज्यास अनुसरून तो अल्लाहला प्राप्त करतो.

कुरआन माणसाच्या बुद्धिला बाह्यत्वाकडून आंतरिकतेकडे व अवास्तविकतेकडून वास्तविकतेकडे वळवते हे कुरआनाचे अतिशय सूक्ष्म व प्रभावी मार्गदर्शन होय.

४०. आकाश मजबूत छत असण्याचा अर्थ असा की त्याला अशा वैशिष्ट्यासह बनविले गेले आहे की त्यात कोठे कसलेहि वैगुण्य निर्माण होत नाही वर्षानुवर्षे लोटल्यानंतरहि ते आपल्या मूळ स्थितीत कायम आहे. त्यात जुनाट होण्याची लक्षणे कधीहि निर्माण झाली नाहीत की ज्यामुळे जमीनीवर राहणाऱ्यांकरीता ते कोसळण्याचा धोका निर्माण व्हावा.

४१. आजच्या काळातील खगोलशास्त्र वेत्त्यां (Astronomers)नी विश्वोत्पत्ति किरणांचा(Cosmic Rays) ही शोध लावता आहे परंतु सृष्टी-निर्मात्याचा शोध अजूनहि त्यांना लावला आला नाही. हे एवढ्यामुळेच की त्यांना ईश्वराला शोधायचे नाही. वस्तुत: ईश्वराला केवळ तेच लोक प्राप्त करतात ज्यांना त्याचा शोध घ्यावायाचा असतो.

४२. मूळ ग्रंथात 'फलक' فلك हा शब्द प्रयोग केला आहे. ज्याचा अर्थ अरबी भाषेत 'कक्ष' असा आहे लिसानुल अरब या अरबी शब्दकोशानुसार :- الفلك 'अल-फलक' म्हणजे ग्रह ताऱ्यांची कक्षा. (लिसानुल अरब ख १० पृ ४७८)

आकाश या अर्थाने हा शब्द ना कुरआनात वापरला गेला आहे आणि ना प्राचीन अरबी भाषेत या अर्थाने परिचित होता नंतरच्या काळात खगोल शास्त्राच्या परिभाषेनुसार हा शब्द आकाश या अर्थाने वापरला जाऊ लागला आणि फारसी व उर्दू भाषेत तर हा शब्द आकाश या अर्थानेच वापरला जातो नंतर आयतीत हा शब्द सामान्य नाम म्हणून वापरला गेला आहे ज्यावरून आपापल्या कक्षेत हा अर्थ निर्माण झाला आणि **'यस्बहून'** يَسْبَحُوْن (तरंगतात) हा शब्द अनेकवचनी आहे जो अरबी भाषेत दोन पेक्षा अधिक वस्तूंकरीता वापरला जातो, म्हणून या शब्दाचा संकेत या गोष्टीकडे आहे की सूर्य व चंद्रच नव्हे तर सर्व ग्रह तारे आपापल्या कक्षेत तरंगत आहेत.

ग्रह ताऱ्यांना जेव्हा मनुष्य उघड्या डोळ्यांनी पाहतो तेव्हा ते विस्तीर्ण वातावरणात तरंगत असलेले आढळून येतात. यास्तव कुरआनाने घटना स्थितीचे सहज सुलभ शैलीत निवेदन केले आणि हेतु हे स्पष्ट करण्याचा आहे की सूर्य चंद्रादि सर्व ग्रह तारे गतीशील आहेत व ते आपला प्रवास आपल्या कक्षेत राहूनच करीत आहेत निर्धारीत कक्षेबाहेर ते जात नाहीत या नियमबद्धतेसह त्यांचे हे कार्य या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की समस्त ग्रह ताऱ्यांचे सूत्र-संचालन एका परिपूर्ण सामर्थ्यशाली व अत्युच्च सत्ताधिकार बाळगणाऱ्या शक्तिच्या हातात आहे.

जेथपावेतो खगोल शास्त्राचा संबंध आहे चंद्र-ताऱ्यांचे आंपापल्या कक्षेत भ्रमण ही एक ज्ञात बांब होय. राहिले सूर्य व ताऱ्यांचे भ्रमण तर त्यांच्या आसावर (Axis) भ्रमणास तर त्याचा इन्कार नाही परंतु त्यांच्या कक्षीय परिक्रमा (Orbital Rotation) बाबत आजचे विज्ञान अद्याप अनुमाना पुढे जाऊ शकले नाही.यास्तव कुरआनाने निवेदिलेल्या वस्तुस्थितींना आजच्या विज्ञानाच्या संकुचित वर्तुळात समाविष्ट केले जाऊ शकत नाही. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रअद टीप क्र.८)

४३. ही आयत हे स्पष्ट करते की जगात चिरशास्वत जीवन कोणालाहि प्रदान केले गेले नाही. पैगंबर समूह देखील या गोष्टीस अपवाद नाही. या द्वारे लोकांच्या या विचाराचेहि खंडन होते की हजरत खिज्र यांना जगात चिरशाश्वत जीवन प्रदान केले गेले आहे. तसेच शिया संप्रदायाच्या या श्रद्धेचेहि खंडन होते जी ते आपल्या बाराव्या इमामच्या अदृश्य होण्यासंबंधी व ते जिवंत असण्याविषयी बाळगतात.

राहीला हजरत ईसा (येशू) यांच्या जीवनाचा प्रश्न, तर ते जगात चिरकालीन जीवन व्यतीत करून राहीले नाहीत, किंबहुना आकाशात उचलले गेले आहेत आणि कियामत जवळ आली असतांना जेव्हा त्यांचे अवतरण होईल तेव्हा त्यांचाहि नैसर्गिक मृत्यु घडून येईल.

४४. विरोधक इच्छित होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांचा मृत्यु व्हावा जेणेकरून त्यांना त्या ओढाताणी पासून मुक्ति मिळावी जी त्यांच्या व पैगंबरांच्या दरम्यान उद्भवली होती फर्माविले जर पैगंबरांचा मृत्यु होतो तेव्हा हे कोठे बाकी राहणार आहेत. एक ना एक दिवस यांना देखील मरावयाचे आहे. म्हणून मेल्यानंतर ज्या गोष्टीचा सामना होणार आहे तिची काळजी यांनी करायला हवी. या विषयी बेपर्वा होऊन पैगंबरांच्या मृत्युची वाट पहात बसणे हे एखाद्या बुद्धिमानाचे काम असू शकत नाही.

४५. याचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र. २१५ मध्ये केले गेले आहे.

४६. म्हणजे ऐहीक जीवन एक कसोटीमय जीवन आहे. यास्तव मृत्यु प्रत्येक माणसाकरीता निर्धारीत आहे. तद्वतच एखाद्याचे देखील माणूस या नात्याने या परिसिथितीतून जावे लागते.

४७. ईश्वराकडे परतण्याचा अर्थ असा की त्याने तुम्हाला जगात पाठविले आहे व त्याच्याकडे परतून जायचे आहे ही एक साधारण वस्तुस्थिती आहे जी आयतीत निवेदली गेली आहे. याच्या उलट भारतातल्या अनेकेश्वरवाद्यांचे अनेकेश्वरवादीय तत्वज्ञान हे की माणसाचा आत्मा तो मेल्यानंतर ईश्वरात सामावतो. अल्लाह उच्च आहे त्यांच्या शिर्कपासून जे ते करीत आहेत.

४८. या आयतीत जिक्र (स्मरण) हा शब्द दोन वेगळ्या अर्थांनी वापरला गेला आहे. ज्यास अलंकार युक्त भाषा शैलीत 'यमक' म्हणतात.'हाच का तो मनुष्य जो तुमच्या ईश्वरांचा उल्लेख करतो' चा अर्थ ईश्वरांचे वाईटरित्या स्मरण करणे आणि 'त्यांची स्वत:ची दशा अशी आहे की 'रहमान'च्या स्मरणाचा इन्कार करतात'चा अर्थ असा की ते 'रहमान'चे स्मरण चांगल्या प्रकारे करणे पसंत करीत नाही.

अनेकेश्वर वाद्यांच्या अयोग्यतेवर हा टोमणा आहे की ते आपल्या कल्पित ईश्वरांना एवढे प्रिय समजतात की त्यांच्या विरूद्ध काहीहि ऐकणे पसंत करीत नाही मग ती गोष्ट कितीहि सत्यावर आधारीत का असेना परंतु अगणित कृपेचा वर्षाव करणाऱ्या परम दयाळू ईश्वर 'रहमान' विषयी एवढी घृणा बाळगतात की त्याच्या कृपा व गुणवैशिष्ट्यांचे स्मरणहि त्यांच्या जवळ अप्रिय बनले आहे.

४९. उतावळेपणा माणसाच्या स्वभाव धर्मातच आहे, अशासाठी की त्यांच्यात आचरणाचा उत्साह निर्माण व्हावा, व त्याने मांगल्याकडे वेगाने पुढे जावे परंतु मनुष्य या प्रेरणे (Motive) चा चुकीचा वापर करुन शिर्ककडे धावतो माणसाचे चुकीचे निर्णय व त्याची गांभीर्य शुन्य कथने त्याच्या उतावळेपणाच्या परिणामी होतात. मनुष्याने इच्छिल्यास तो या प्रेरणादायी शक्तिवर नियंत्रण राखू शकतो व तिचा उचित वापर करू शकतो.

५०. अभिप्रेत ईश-शिक्षेच्या निशाण्या होत. कुरआनाचे हे भाकीत खरे ठरले. यास्तव काफीरांकरीता ईश-शिक्षेच्या निशाण्या त्या लढायांमध्ये उदयास आल्या ज्या त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) विरूद्ध केल्या.

५१. म्हणजे ईश-शिक्षेची घाई करू नका. अर्थात उतावळेपणा माणसाच्या स्वभावात असला तरी त्याच सोबत त्याला ही पात्रताहि प्रदान केली गेली आहे की त्याने यावर नियंत्रण राखून शिर्क करीता घाई करू नये.

ती (वेळ) तर अकस्मात येईल व यांना हतबुद्ध करून टाकील. मग ना तर तिला हटवू शकतील आणि ना त्यांना सवड लाभेल. तुमच्या पूर्वींहि पैगंबरांची थट्टा- मस्करी उडविली गेली होती. परंतु जे लोक त्यांची थट्टा उडवत राहिले त्यांना त्याच गोष्टीने आपल्या तावडीत घेतले जिची ते थट्टा उढवित होते.(अल-क़ुर्आन)

३८. म्हणतात, हा वायदा केव्हा पूर्ण होईल. जर तुम्ही सच्चे आहात.[५२]

وَيَقُولُونَ مَتَىٰ هَٰذَا الْوَعْدُ إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٣٨﴾

३९. या काफीरांनी त्या वेळेस जाणून घेतले असते तर बरे झाले असते ज्या वेळेस ते ह्या आगीला ना आपल्या तोंडापासून हटवू शकतील आणि ना आपल्या पाठीपासून आणि ना त्यांची कसली मदत केली जाईल.

لَوْ يَعْلَمُ الَّذِينَ كَفَرُوا حِينَ لَا يَكُفُّونَ عَن وُجُوهِهِمُ
النَّارَ وَلَا عَن ظُهُورِهِمْ وَلَا هُمْ يُنصَرُونَ ﴿٣٩﴾

४०. ती (वेळ) तर अकस्मात येईल व यांना हतबुद्ध करून टाकील. मग ना तर तिला हटवू शकतील आणि ना त्यांना सवड लाभेल. [५३]

بَلْ تَأْتِيهِم بَغْتَةً فَتَبْهَتُهُمْ فَلَا يَسْتَطِيعُونَ
رَدَّهَا وَلَا هُمْ يُنظَرُونَ ﴿٤٠﴾

४१. तुमच्या पूर्वीहि पैगंबरांची थट्टा- मस्करी उडविली गेली होती. परंतु जे लोक त्यांची थट्टा उडवत राहिले त्यांना त्याच गोष्टीने आपल्या तावडीत घेतले जिची ते थट्टा उढवित होते.[५४]

وَلَقَدِ اسْتُهْزِئَ بِرُسُلٍ مِّن قَبْلِكَ فَحَاقَ بِالَّذِينَ سَخِرُوا
مِنْهُم مَّا كَانُوا بِهِ يَسْتَهْزِئُونَ ﴿٤١﴾

४२. यांना विचारा,असा कोण आहे जो रात्री व दिवसा रहमान (च्या पकडी) पासून तुमचे संरक्षण करतो? [५५] परंतु हे आपल्या पालन कर्त्याच्या स्मरणापासून पराडगमुख झालले आहेत.[५६]

قُلْ مَن يَكْلَؤُكُم بِاللَّيْلِ وَالنَّهَارِ مِنَ الرَّحْمَٰنِ ۗ
بَلْ هُمْ عَن ذِكْرِ رَبِّهِم مُّعْرِضُونَ ﴿٤٢﴾

४३. काय आमच्या खेरीज यांची अशी उपास्ये आहेत, जी यांना वाचवू शकतात ? ते स्वत: आपली मदद करू शकत नाही आणि ना आमचे समर्थन त्यांना लाभलले आहे.[५७]

أَمْ لَهُمْ آلِهَةٌ تَمْنَعُهُم مِّن دُونِنَا ۚ لَا يَسْتَطِيعُونَ نَصْرَ
أَنفُسِهِمْ وَلَا هُم مِّنَّا يُصْحَبُونَ ﴿٤٣﴾

४४. खरी गोष्ट अशी की आम्ही यांना व यांच्या वाड-वडीलांना संपन्न केले. येथपावेतो की त्यांना एक दीर्घकाळ होऊन गेला. [५८] परंतु काय हे पाहत नाहीत की आम्ही या भूमीकडे तिच्या सीमांना घटवीत पुढे येत आहोत [५९] मग काय हे प्रभावशाली राहतील?

بَلْ مَتَّعْنَا هَٰؤُلَاءِ وَآبَاءَهُمْ حَتَّىٰ طَالَ عَلَيْهِمُ الْعُمُرُ ۗ
أَفَلَا يَرَوْنَ أَنَّا نَأْتِي الْأَرْضَ نَنقُصُهَا مِنْ أَطْرَافِهَا ۚ
أَفَهُمُ الْغَالِبُونَ ﴿٤٤﴾

५२. अभिप्रेत कियामतीचा वायदा होय. काफीरांचा हा प्रश्न की कियामतीचा वायदा केव्हा पूर्ण होईल त्यांच्या उतावळेपणाचे दुसरे उदाहरण होय.

५३. म्हणजे या वेळी तर हे काफीर कियामतीसाठी घाई माजवित आहेत परंतु जेव्हा ती येईल तेव्हा यांना ईश शिक्षेच्या तावडीत घेईल. त्यावेळी यांना तौबा (क्षमा-याचना ) करण्याची व आपली सुधारणा करण्याची कोणतीही संधी लाभणार नाही.

५४. म्हणजे अजाबची ताकीद ऐकविल्याबद्दल पैगंबराची थटटा उडवित होते परंतु शेवटी अजाब (ईश-शिक्षा) यांच्यावर कोसळलाच !

५५. म्हणजे दिवस असो किंवा रात्र मनुष्य-जीवन क्षणोक्षणी संकटे व आपत्तीनी वेढेलेले असते आणि तो परमदयाळू ईश्वर 'रहमान'च होय. जो माणसाचे सरंक्षण करतो. जर तो तुमचे सरंक्षण करण्याऐवजी तुम्हाला पकडीत घेऊ इच्छिल तर असा कोण आहे जो तुमच्यावर मेहरबान होईल व त्याच्या विरोधात तुमचे संरक्षण करील?

५६.म्हणजे या लोकांची ही दशा आहे की यांना ईश्वराच्या कृपेची काहीच जाणीव नाही व त्याच्या दया कृपेचे स्मरण केले जावे या गोष्टीसहि ते पसंत करीत नाही.

शिर्क (अनेकेश्वरवाद ) माणसाला आपल्या खऱ्या खुऱ्या पालनकर्त्या विषयी सत्यप्रियहीन बनविते!

५७. म्हणजे जर ईश्वराची शिक्षा आली तर काय यांची ही उपास्ये यांना वाचवू शकतात? ते वाचवतील कसे, ते तर स्वत:चे संरक्षण करण्यास समर्थ नाहीत वा ना त्यांना ईश्वरीय समर्थन प्राप्त आहे. येथे संकेत अनेकेश्वरवाद्यांच्या त्या उपास्यांकडे आहे ज्यांच्या विषयी त्यांची ही धारणा होती की ते त्यांना संकटांपासून वाचवू शकतात.

५८. कुरेश सुख संपन्न हि होते व त्यांना सरदारी (समाजप्रमुख पदा) चे महत्वपूर्ण स्थानहि लाभले होते. हे सर्व त्यांना अल्लाहच्या कृपेनेच लाभले होते. परंतु दीर्घ काळ पावेतो ते सुख संपन्न स्थितीत व सत्ताधिकार बाळगून राहील्यामुळे ते ईश्वराशी बेपर्वा झाले होते. धनसम्पत्ति व सत्तेची धुंद माणसाला ईश्वरापासून गाफील करते.

५९. अर्थात मक्केच्या जवळपास इस्लामचा प्रभाव वाढत चालला आहे व त्याच्या प्रभावाची लक्षणे प्रकट होत आहेत.

आयतीचा संकेत प्रामुख्याने मदीनाकडे आहे ज्या ठिकाणी लोक इस्लामचा स्विकार करीत जात होते. तात्पर्य मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांकरीता जमीन दिवसेदिवस संकुचित होत चालली होती. येथपावेतो की या सूरहच्या अवतरणानंतर काही वर्षांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मदीनेत सत्ताधिकार प्राप्त झाला आणि हा सत्ताधिकार मक्का विजयाचे पहिले पाऊल ठरले. जणू मक्का-विजय या आयतीचा यथायोग्य अर्थ होता.

४५. सांगा, मी तुम्हाला 'वही' (ईश-संदेशा) द्वारे खबरदार करीत आहे. परंतु बहीरे पुकार ऐकत नाही जेव्हा त्यांना खबरदार केले जावे.[६०]

قُلْ إِنَّمَآ أُنذِرُكُم بِٱلْوَحْىِ ۚ وَلَا يَسْمَعُ ٱلصُّمُّ ٱلدُّعَآءَ
إِذَا مَا يُنذَرُونَ ﴿٤٥﴾

४६. आणि जर तुमच्या पालनकर्त्याच्या शिक्षेची एक आच यांना लागल्यास ते उद्‌गारतील,अरेरे! आम्हीच गुन्हेगार होतो.[६१]

وَلَئِن مَّسَّتْهُمْ نَفْحَةٌ مِّنْ عَذَابِ رَبِّكَ لَيَقُولُنَّ يَٰوَيْلَنَآ
إِنَّا كُنَّا ظَٰلِمِينَ ﴿٤٦﴾

४७. आणि कियामतीच्या दिवशी आम्ही न्यायाचे तराजू प्रस्थापित करू. [६२] मग कोणत्याही माणसावर किंचित मात्र अन्याय होणार नाही. जर एखाद्याचे एखादे कर्म मोहरीच्या दाण्या एतकेहि असेल तर आम्ही ते आणून हजर करू. आणि आम्ही हिशेब घेण्यास पुरेसे आहोत.[६३]

وَنَضَعُ ٱلْمَوَٰزِينَ ٱلْقِسْطَ لِيَوْمِ ٱلْقِيَٰمَةِ فَلَا تُظْلَمُ نَفْسٌ
شَيْـًٔا ۖ وَإِن كَانَ مِثْقَالَ حَبَّةٍ مِّنْ خَرْدَلٍ أَتَيْنَا
بِهَا ۗ وَكَفَىٰ بِنَا حَٰسِبِينَ ﴿٤٧﴾

४८. आणि आम्ही [६४] मूसा व हारूनला फुर्कान [६५] व प्रकाश [६६] आणि स्मरणिका प्रदान केली होती. ईश भीरू लोकांकरीता.[६७]

وَلَقَدْ ءَاتَيْنَا مُوسَىٰ وَهَٰرُونَ ٱلْفُرْقَانَ وَضِيَآءً
وَذِكْرًا لِّلْمُتَّقِينَ ﴿٤٨﴾

४९. जे पाहिल्याविना आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात. [६८] आणि कियामतीच्या वेळेपासून भयकंपित राहतात.

ٱلَّذِينَ يَخْشَوْنَ رَبَّهُم بِٱلْغَيْبِ وَهُم مِّنَ ٱلسَّاعَةِ
مُشْفِقُونَ ﴿٤٩﴾

५०. आणि हे एक समृद्धशाली स्मरण आहे [६९] जे आम्ही अवतरीत केले आहे. तर काय तुम्ही याचा इन्कार करणारे व्हाल?

وَهَٰذَا ذِكْرٌ مُّبَارَكٌ أَنزَلْنَٰهُ ۚ أَفَأَنتُمْ لَهُۥ مُنكِرُونَ ﴿٥٠﴾

५१. आणि आम्ही इब्राहिमला आधीच त्याला साजेल असे मार्गदर्शन प्रदान केले होते आणि आम्ही त्याला चांगल्या प्रकारे जाणत होतो.[७०]

وَلَقَدْ ءَاتَيْنَآ إِبْرَٰهِيمَ رُشْدَهُۥ مِن قَبْلُ
وَكُنَّا بِهِۦ عَٰلِمِينَ ﴿٥١﴾

५२. जेव्हा त्याने आपला पिता व आपल्या जन समूहास म्हटले होते की ह्या कशा मूर्त्या आहेत की ज्यांच्या भक्ति आराधनेत तुम्ही रममाण आहात ![७१]

إِذْ قَالَ لِأَبِيهِ وَقَوْمِهِۦ مَا هَٰذِهِ ٱلتَّمَاثِيلُ
ٱلَّتِىٓ أَنتُمْ لَهَا عَٰكِفُونَ ﴿٥٢﴾

६०. स्पष्ट झाले की पैगंबर आणि वही (ईश-संदेश)चा ध्वनी तेच लोक ऐकतात जे आपले कान उघडे ठेवतात.

६१. म्हणजे आता तर ते ईश शिक्षेची मागणी करीत आहेत परंतु जर ईश शिक्षेच्या एका भागानेहि यांना स्पर्श केला तर त्यांना आपल्या कृतकर्माचा पशचाताप होईल व आपण दोषी असल्याचे मान्य करतील.

६२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कारीआ टीप क्र. ६

६३. म्हणजे कियामतीच्या दिवशी जेव्हा माणसाचा समुदाय उंचबळणाऱ्या सागरा समान असेल तेव्हा व्यक्तिश प्रत्येक माणसाच्या कर्मांचा हिशेब घेणे अल्लाह करीता काहीच कठीण नसेल आणि त्याचा हिशेब अगदी परिपूर्ण (Perfect)असेल.

६४. येथून काही प्रतिष्ठीत पैगंबरांचा उल्लेख सरू होतो पवित्र कुरआनात पैगंबरांचा वारंवार उल्लेख केला गेला आहे यासाठी की त्यांची शिकवण व त्यांच्या आचरणाचे विविध पैलू प्रकट व्हावेत पैगंबर इतिहासाची सोनेरी पाने निरंतर सुरक्षित व्हाव्यात व वाचकांनी यापासून बोध ग्रहण करावा, इन्कार करणाऱ्यांच्या शंका दूर व्हाव्यात आणि त्यांना ही अनुभूति व्हावी की पैगंबरांचे अस्तित्व एक ऐतिहासिक सत्य आहे आणि त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह विविध काळात व देशात माणसांच्या मार्गदर्शनाकरीता पाठवित राहीला आणि विशेष म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांनी याचा उल्लेख कुरआनात वाचून त्यांच्या साहचर्याचा लाभ प्राप्त करावा. तात्पर्य कुरआन ज्या काही ठिकाणी एखाद्या पैगंबराचा उल्लेख करते वाचकाला थोड्या वेळ पावेतो आदर्श व्यक्तिमत्वांच्या सहवासात नेते. यासाठी की त्यांचे साहचर्य वाचकांकरीता आत्मवर्धक ठरावे.

६५. 'फुर्कान' शी अएिभप्रेत त्या निशाण्या होत ज्या सत्याला असत्यापासून वेगळे करून त्यातला फरक जाहीर करीत. यासत्व सूरह मोमीनुनमध्ये फर्माविले गेले आहे.

ثُمَّ اَرْسَلْنَا مُوْسٰى وَ اَخَاهُ هٰرُوْنَ بِاٰيَاتِنَا
وَ سُلْطٰنٍ مُّبِيْنٍ۔ (المؤمنين ـ ٤٥)

'मग आम्ही मूसा व हारूनला आपल्या निशाण्या व उघड सनदी सह पाठविले. (अल् मोमीनून- ४५)

६६. 'प्रकाशा'शी अभिप्रेत मार्गदर्शनाचा प्रकाश.

६७. जिक्र (स्मरणिका) शी अभिप्रेत तौरात ग्रंथ होय जो हजरत मूसा यांच्यावर अवतरीत झाला होता. आणि हजरत हारुन ज्या अर्थी हजरत मूसा यांच्या विनंतीवरून पैगंबर व त्याचे वजीर (मदतनीस) बनविले गेले होते यास्तव या कृपेत त्यांनाहि सामील केले गेले.

हा स्मरणिका प्रत्याक्षात: ईश-भय बाळगणाऱ्याकरीताच लाभप्रद ठरली. जे लोक ईश-भय बाळगू इच्छित नव्हते ते या पासून कसलाच लाभ घेऊ शकले नाहीत.

६८. ईश्वराला पाहिल्या विना त्याचे भय बाळगणे हा ईश-भीरु लोकांचा फार मोठा गुण आहे. जे लोक ईश-भय बाळगण्याकरीता ही शर्त ठेवतात की तो आधी दिसून यावा. त्यांनी ना ईश्वराची महत्ता जाणली आणि ना आपल्या या पात्रतेस की ते कसोटी गृहात उभे केले गेले आहेत व कसोटी या गोष्टीची आहे की त्यांनी बुद्धि व सुज्ञतेचा वापर करून व अंतर्बाह्य निशाण्यांच्या सहाय्याने तसेच ईशसंदेशाचे मार्गदर्शन व विवेक बुद्धीच्या हाकेला होकार देत आपल्या पालनकर्त्यास ओळखतात किंवा नाही.

यावरून ही गोष्टहि स्पष्ट झाली की ईश्वराला तपस्येद्वारे पाहण्याचा प्रयत्न अगदीच व्यर्थ होय आणि त्या पद्धतिशी प्रतारणा होय जी त्या कसोटीमय जीवनात माणसाकरीता निर्धारीत केली गेली आहे.

६९. म्हणजे कुरआन.

७०. मूळ ग्रंथात 'रुष्द' हा शब्द प्रयोग केला गेला आहे याचा अर्थ सामंजस्य हि आहे व धार्मिक मार्गदर्शन असाहि. हजरत इब्राहीम यांना एक महान व्यक्तिमत्व या नात्याने उन्नत करावयाचे होते म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना त्यांच्या स्थानानुसार उच्च दर्जाचे गांभीर्य, सुज्ञता आणि आकलन शक्ति प्रदान केली होती आणि या पात्रतेमुळे त्यांनी पैगंबर होण्याच्या फार काळ आधी एकेश्वरवादाचा मार्ग अंगिकारला होता आणि ते एक सदाचारी मनुष्य होते. नंतर जेव्हा त्यांना पैगंबर पदाने सम्मानित केले गेले तेव्हा ते एकेश्ववादाचे ध्वज-रोहक व मार्गदर्शनाचा दिपस्तंभ बनले.

सर्वश्रेष्ठ अल्लाहची हजरत इब्राहीम यांच्यावर जी कृपा झाली ती ज्ञानामुळे झाली. त्याची निवड-दृष्टी अगदी योग्य होती आणि हजरत इब्राहीम या कृपेस पूर्णत: पात्र ठरले.

७१. पैगंबर पदाने विभूषित झाल्यानंतर हजरत इब्राहीम यांनी आपल्या पित्यास व आपल्या जनसमूहास मूर्तिपूजेच्या मार्गभ्रष्टतेतून बाहेर काढू इच्छिले, या उद्देशान्वये त्यांनी मूर्ति पूजेची उघड निंदा केली. आजच्या काळातील सेक्युलर विचार सरणी तर मूर्तिपूजेबाबत सहिष्णूता मानते आणि कसल्याहि टिकेस पसंत करीत नाही. परंतु पैगंबरांना अल्लाहतर्फे पाठविले जाण्याचे उद्दिष्टच लोकांना अज्ञानाच्या अंध:कारतून बाहेर काढणे व त्यांना जहन्नमच्या महाभयनकर शिक्षेपासून वाचविणे हे असते. आणि म्हणूनच ते अक्षम्य अशा 'शिर्क अपराधावर प्रहार करतात.

५३. त्यांनी उत्तर दिले आम्हाला आमचे वाडवडीत यांची पूजा करतांना आढळले आहेत.

قَالُوا وَجَدْنَا آبَاءَنَا لَهَا عَابِدِينَ ﴿٥٣﴾

५४. तो म्हणाला तुम्ही हि उघड मार्गभ्रष्टतेत पडला आहात आणि तुमचे वाडवडीलहि पडले होते. [७२]

قَالَ لَقَدْ كُنْتُمْ أَنْتُمْ وَآبَاؤُكُمْ فِي ضَلَالٍ مُبِينٍ ﴿٥٤﴾

५५. ते म्हणाले, तुम्ही खरोखर सत्य घेऊन आला आहात किंवा मस्करी करीत आहात?

قَالُوا أَجِئْتَنَا بِالْحَقِّ أَمْ أَنْتَ مِنَ اللَّاعِبِينَ ﴿٥٥﴾

५६. तो म्हणाला, नव्हे, किंबहुना खरोकर तुमचा 'रब्ब' (पालनकर्ता) तो आहे जो आकाशांचा व जमीनीचा पालनकर्ता आहे. ज्याने यांना निर्माण केले आहे. [७३] आणि याबद्दल मी तुमच्या समक्ष साक्षीदार आहे. [७४]

قَالَ بَلْ رَبُّكُمْ رَبُّ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ الَّذِي
فَطَرَهُنَّ وَأَنَا عَلَىٰ ذَٰلِكُمْ مِنَ الشَّاهِدِينَ ﴿٥٦﴾

५७. आणि अल्लाह शपथ मी निशिचत तुमच्या मूर्त्यांशी एक योजना करीन जेव्हा तुम्ही पाठ फिरवून निघून जाल. [७५]

وَتَاللَّهِ لَأَكِيدَنَّ أَصْنَامَكُمْ بَعْدَ أَنْ
تُوَلُّوا مُدْبِرِينَ ﴿٥٧﴾

५८. यास्तव त्याने त्यांचे तपकडे तुकडे करून टाकले. फक्त एका (मुर्ति) ला सोडून जी त्यांच्या दृष्टीने मोठी (महान) होती अशासाठी की त्यांनी या (मुर्ति) कडे रूजू करावे. [७६]

فَجَعَلَهُمْ جُذَاذًا إِلَّا كَبِيرًا لَهُمْ لَعَلَّهُمْ إِلَيْهِ يَرْجِعُونَ ﴿٥٨﴾

५९. म्हणू लागले, आमच्या उपस्यांशी हे कृत्य कोणी केले ? (ज्या कोणी हे कृत्य केले आहे) तो मोठा अत्याचारी आहे ! [७७]

قَالُوا مَنْ فَعَلَ هَٰذَا بِآلِهَتِنَا إِنَّهُ لَمِنَ الظَّالِمِينَ ﴿٥٩﴾

६०. काही लोकांनी म्हटले, आम्ही एका नवयुवकाला यांच्या विषयी काही म्हणतांना ऐकले होते, ज्याला इब्राहीम म्हणतात. [७८]

قَالُوا سَمِعْنَا فَتًى يَذْكُرُهُمْ يُقَالُ لَهُ إِبْرَاهِيمُ ﴿٦٠﴾

६१. ते म्हणाले त्याला लोकांसमोर घेऊन या, यासाठी की त्यांनी पहावे. [७९]

قَالُوا فَأْتُوا بِهِ عَلَىٰ أَعْيُنِ النَّاسِ لَعَلَّهُمْ يَشْهَدُونَ ﴿٦١﴾

७२. हे हि एक नि:पक्ष कथन होते जे हज़रत इब्राहीम यांनी केले. मूर्तिपूजा वाडवडीलांपासून होत आली आहे, तर हे या गोष्टीचे प्रमाण नव्हे की त्यांची कार्यपद्धति योग्य होती. वाडवडीलांनी अज्ञान पूर्ण आचरण केले म्हणून संततीनेहि तेच आचरण करावे, यात शहाणपण कसले?

परंतु आजच्या विज्ञान युगात हि असे कितीतरी जनसमूह याच अज्ञानात खितपत पडले आहेत ते ह्या अनेकेश्वरवादी संस्कृतीशी केवळ एवढ्यासाठी संबंद्ध आहेत की ती त्यांना जनसामूहिक वारसा म्हणून लाभली आहे.

७३. म्हणजे ह्या मूर्ति ईश्वर नव्हेत किंबहुना ईश्वर तो होय जो सृष्टीचा रचयिता व स्वामी आहे. यात हे प्रमाण अध्यारुत आहे की ह्या मूर्त्या व देवी देवता ज्याअर्थी सृष्टीचे ना स्वमी आहेत ना रचयिता तर ते ईश्वर कसे?

७४. येथे साक्ष घोषणेच्या अर्थाने आहे. म्हणजे मी आपल्या ऐकेश्वरवादी श्रद्धेस तुमच्या समक्ष व्यक्त व घोषित करतो आणि मी अल्लाहतर्फे याची साक्ष देण्यास नियुक्त आहे.

७५. हज़रत इब्राहीम मूर्त्याविरुद्ध जी योजना करू इच्छित होते तिच्यासंबंधी त्यांनी पूर्वसंकेत केला होता. यासाठी की लोकांनी सावध रहावे. अर्थात हे त्यांचे कमालीचे साहस होते.

७६. हजरत इब्राहीम यांनी एके दिवशी संधी साधून जेव्हा लोक एका सणा निमित बाहेर गेले होते, मंदीरात प्रवेश करून समस्त मूर्त्या तोडून टाकल्या फक्त सर्वात मोठी मूर्ति तशीच राहू दिली या साठी की लोकांनी या लाल भुजक्कड (मूर्ख) पुढाऱ्या) ला विचारावे की ही कारवायी कोणी केली आहे? आणि जेव्हा तो काहीही उत्तर देऊ शकला नाही तर लोकांना हे स्पष्ट कळून यावे की ही मूर्ति म्हणजे एक निर्जीव पाषण आहे जो ना लाभ देऊ शकतो ना हानी.

हा एक महान आवाहनात्मक हेतु होता, ज्याकरीता त्यांनी मूर्तिभंगाची ही कारवायी केली होती आणि ही कारवायी ही त्यांनी अशा वेळी केली जेव्हा एकेश्वरवादाच्या आवाहनास त्यांनी प्रमाणासह प्रस्तुत केले होते. या संबंधीचे स्पष्टीकरण सूरह अनआम आयत क्र. ७४ ते ८१ मध्ये केले गेले आहे. जर त्यांचा हेतु केवळ तोडफोड करण्यापुरता असता तर त्यांनी एकाहि मूर्तिला सोडले नसते किंबहुना सर्वात मोठ्या मूर्तिला सर्वात प्रथम तोडले असते.

संभवत: येथे हा प्रश्न उद्‌भवलेल की इतर मूर्त्या तोडण्याचा त्यांना काय अधिकार होता? तर हा प्रश्न एका पैगंबराच्या पात्रतेला न समजण्याच्या परिणामीच उदभवू शकतो. पैगंबर अल्लाहतर्फे पाठविण्यात आलेला असतो व त्यास 'वही' द्ववारे प्रत्यक्षत: ईश आदेश प्राप्त होत राहतात व त्यास प्रत्यक्षत: मार्गदर्शन लाभते म्हणून त्यास ईश आदेशाचे पालन करावयाचे असते. मग एखाद्या जनसमूहाच्या वा समाजाच्या रितीरिवाजाच्या किंवा कायद्या विरुद्ध का असेना तो ईश हक्काला मानवी हक्कांवर प्राधान्य देतो. आणि एका इन्कार करणाऱ्यास मिटविण्याकरीता जर पारंपारिक नियम तोडावा लागत असेल तर तो त्याची तमा बाळगत नाही आणि हजरत इब्राहीम यांनी जे काही केले तर ते 'शिर्क' सारख्या तिरस्कृत गोष्टीस मिटविण्या करीता केले होते म्हणून त्यांचे हे कार्य प्रशांसनीय आहे. आक्षेपार्ह मुळीच नव्हे यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या या पाऊल उचलण्यास सन्मार्ग व सुबुद्धिचा निष्कर्ष ठरविले.

७७. जेव्हा लोक यात्रेहून परतले तेव्हा मंदीरात आपल्या मूर्त्यांची दुर्दशा पाहून त्यांना मोठे आश्चर्य वाटले व ते अतिशय क्रोध व्यक्त करू लागले.

७८. तात्पर्यही घटना त्या काळची आहे जेव्हा ह. इब्राहीम तरुण होते व तारुण्यातच त्यांना पैगंबर पद प्रदान केले गेले होते.

हजरत इब्राहीम मूर्तिपूजे विरुद्ध बोलत होते म्हणून मूर्त्यांना तुटलेल्या स्थितीत पाहून लोक समजले की बहुधा हे इब्राहीमचेच काम असावे.

७९. अशा प्रकारे हजरत इब्राहीम यांना जन सामान्य व विशेष पुढे येण्याची व आपले आवाहन प्रस्तुत करण्याची संधी लाभली.

६२. (जेव्हा इब्राहीम आले तेव्हा ) त्यांनी विचारले इब्राहीम ! काय तुम्ही आमच्या उपास्यांशी ही हरकत केली आहे?

قَالُوٓا ءَاَنْتَ فَعَلْتَ هٰذَا بِاٰلِهَتِنَا يٰۤاِبْرٰهِيْمُ ﴿٦٢﴾

६३. त्याने उत्तर दिले नाही. किंबहुना यांच्या या मोठ्या (मुर्ति) ने केली आहे. यांना बोलता येत ...... ... ........ ........ [८०]

قَالَ بَلْ فَعَلَهٗ ۖ كَبِيْرُهُمْ هٰذَا فَسْـَٔلُوْهُمْ
اِنْ كَانُوْا يَنْطِقُوْنَ ﴿٦٣﴾

६४. हे ऐकून ते आपसात एकमेकाकडे लक्ष देऊ लागले व म्हणू लागले तुम्हीच दोषी आहात.[८१]

فَرَجَعُوْٓا اِلٰٓى اَنْفُسِهِمْ فَقَالُوْٓا اِنَّكُمْ اَنْتُمُ الظّٰلِمُوْنَ ۙ﴿٦٤﴾

६५. नंतर ते तोंडघशी पडले [८२] म्हणाले, तुम्हाला ठाऊक आहे की हे बोलत नाहीत.

ثُمَّ نُكِسُوْا عَلٰى رُءُوْسِهِمْ ۚ لَقَدْ عَلِمْتَ
مَا هٰٓؤُلَاۤءِ يَنْطِقُوْنَ ﴿٦٥﴾

६६. तो म्हणाला, मग काय तुम्ही अल्लाहला सोडून अशा वस्तूंची आराधना करता, जे ना तुम्हाला फायदा पोहचवू शकतात आणि ना नुकसान?[८३]

قَالَ اَفَتَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَا لَا يَنْفَعُكُمْ شَيْـًٔا
وَّلَا يَضُرُّكُمْ ۗ﴿٦٦﴾

६७. धि:कार असो तुमचा व त्यांचा ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून उपासना करता. [८४] काय तुम्ही बुद्धिचा वापर करीत नाही? [८५]

اُفٍّ لَّكُمْ وَلِمَا تَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ ۗ
اَفَلَا تَعْقِلُوْنَ ﴿٦٧﴾

६८. ते म्हणाले, याला जाळून टाका व आपल्या उपास्यांची मदत करा. जर तुम्हाला काही करायचे आहे. [८६]

قَالُوْا حَرِّقُوْهُ وَانْصُرُوْٓا اٰلِهَتَكُمْ اِنْ كُنْتُمْ فٰعِلِيْنَ ﴿٦٨﴾

६९. आमचा आदेश झाला.हे अग्नि, गार हो व इब्राहीम करीता शांती दायक हो. [८७]

قُلْنَا يٰنَارُ كُوْنِيْ بَرْدًا وَّسَلٰمًا عَلٰٓى اِبْرٰهِيْمَ ۙ﴿٦٩﴾

७०. इब्राहीमशी कट करण्याची त्यांनी मनिषा बाळगली परंतु आम्ही त्यांना अपयशी केले.[८८]

وَاَرَادُوْا بِهٖ كَيْدًا فَجَعَلْنٰهُمُ الْاَخْسَرِيْنَ ۚ﴿٧٠﴾

७१. आणि आम्ही त्याला व लूतला [८९] मुक्ति देऊन त्या भूमीकडे नेले जिथे आम्ही जगवासींयाकरीता समृद्धि राखली आहे.[९०]

وَنَجَّيْنٰهُ وَلُوْطًا اِلَى الْاَرْضِ الَّتِيْ بٰرَكْنَا
فِيْهَا لِلْعٰلَمِيْنَ ﴿٧١﴾

८०. म्हणजे या मूर्त्यापैकी जी सर्वात मोठी आहे तिनेच हे कृत्य केले आहे. जर मूर्त्यांना बोलता येते तर त्यांनाच का नाही विचारीत?

मूर्तिंच्या अगतिकतेवर हा उपरोधात्मक प्रहार होता. जेव्हा ते स्वत:चेच सरंक्षण करु शकले नाहीत तेव्हा आपल्या भक्तांचे सरक्षण कसले करणार? त्यांच्या अंगी जर बोलण्याची शक्ती असेल तर त्यांना विचारा की ही हरकत कोणी केली आहे आणि जर हे वाक्-सामर्थ्य त्याच्या अंगी नसेल तर हे सिद्ध झाले की ते निर्जीव दगड मात्र आहेत तेव्हा ते ईश्वर कसे?

मूर्तिची अवास्तवता जाणविण्याकरीताच हजरत इब्राहीम यांनी मूर्ति भंग करण्याचे साहस केले होते आणि हाच उद्देश लक्षात घेता त्यांनी या कृत्याचा संबंध मोठ्या मूर्ति कडे दर्शविला. ही भाषा शैली भाषा शास्त्राच्या परिभाषेत उपरोध म्हणून ओळखली जाते. जे एखाद्या मार्गभ्रष्टतेवर प्रहार करण्याचे व गाफील माणसाला सचेत करण्याचे अतिशय प्रभावी साधन आहे. परंतु ज्या लोकांच्या अंगी भाषेचे मर्म जाणण्याचे सामर्थ्य नसते ते शब्दांनाच गृहीत धरतात व आक्षेप करू लागतात. हजरत इब्राहीम यांच्या या निरुत्तर करणाऱ्या उत्तराचाहि 'खोटे' म्हणून अर्थ लावला गेला. तात्पर्य ह. इब्राहीमनी मूर्ती भंग केल्याचा इन्कार केला होता. त्यांना स्पष्ट इन्कारच करावयाचा असता तर त्यांनी स्पष्टपणे सांगितले असते की मी मूर्त्या तोडल्या नाहीत व माझ्यावरील आरोप चुकीचा आहे. परंतु त्यांनी असे काहीही म्हटले नाही आणि जे काही माहणाले त्यालाहि विरोधकांनी खोटे कल्पिले नाही किंबहुना त्यांनी जाणून घेतले की ह. इब्राहीम तर्कमय गोष्ट करीत आहेत यास्तव उत्तरा दाखल त्यांनी हे मान्य केले की मूर्त्या बोलत नाहीत आणि जेव्हा त्यांनी हे मान्य केले तेव्हा ह. इब्राहीम यांना मूर्त्यांची विवशता स्पष्ट करण्याची व मूर्तिपूजे विरुद्ध प्रमाण प्रस्थापित करण्याची संधी लाभली.राहीले ते हदीस वचन ज्यात हजरत इब्राहीमकडे तीन असत्य गोष्टींचा निर्देश करण्यात आला आहे त्यापैकी एक असत्य त्यांच्या या निवेदनास ठरविले आहे की बَلْ فَعَلَهٗ كَبِيْرُهُمْ هٰذَا

'किंबहुना यांच्यातल्या या मोठ्या मूर्तीने यांना तोडले आहे' हे हदीस वचन बुखारी मुस्लिम व तिर्मिजी वगैरे हदीस. ग्रंथात निवेदिले गेले आहे आणि विद्वानांनी याचे वेगवेगळे स्पष्टीकरणा हि केले परंतु इमाम राजी ने मोठ्या मोलाची गोष्ट सांगितली आहे:

'राहिली पहिली उल्लेखलेली हदीस तर असत्याचा संबंध पैगंबराशी जोडण्यापेक्षा कथन कर्त्यांशी जोडणे अधिक योग्य आहे.'

(अत्तफसीरुल कबीर खंड २२ पृ. १८५)

तसेच मोलाना अबुल कलाम आजाद यांनीहि अगदी योग्य लिहीले आहे-

'सर्वसामान्यात: भाष्यकारांनी ही गोष्ट मान्य केली आहे हजरत इब्राहीम यांनी तीन प्रसंगी अशी वक्तव्ये केलीत जी बाह्यत: खोटी वाटू शकतात त्यापैकी एक प्रसंग हा जेव्हा त्यांना विचारले गेले وَاَنْتَ فَعَلْتَ هٰذَا काय तुम्ही मूर्तिभंग केला आहे? तेव्हा ते म्हणाले, بَلْ فَعَلَهٗ كَبِيْرُهُمْ هٰذَا किंबहुना या मोठ्या मूर्तिने असे केले आहे. वस्तुत: खरे पाहता ते कृत्य त्यांचेच होते.

या संदर्भात युक्तिवाद, सिहाह (सहीह हदीस -ग्रंथ) च्या एका कथनाद्वारे केला जातो परंतु सर्वात आधी आम्हाला स्वत: या ठिकाणी विचार करावयास हवा की काय खरोखर अशी एखादी घटना या ठिकाणी निवेदिली गेली आहे जिच्यावरून हजरत इब्राहीम यांचे खोटे बोलणे सिद्ध होत असावे? मग ते असत्य कोणत्याहि दर्जाचे व कोणत्याहि स्वरुपाचे असो.

वस्तुस्थिती अशी की कुरआनावरील भाष्याच्या इतिहीसात याहून अधिक विचित्र व अर्थ निश्चित न करण्याजोगी कोणतीहि गोष्ट नाही.

कूरआनात कोणतीहि अशी गोष्ट नाही जिच्या वरून या सत्यावचनी व्यक्तिचे खोटे बोलणे दिसत असावे. परंतु हा संकोच की एक आयतीला ओढून ताणून असे बनविले जात आहे की कोणत्या न कोणत्या प्रकारे खोटे बोलण्याची बाब बनावी आणि खोट्या गोष्टीस सिद्ध करण्याचा हा खटाटोप कशासाठी केला जात आहे? केवळ एवढ्यासाठी की दावा करण्यासाठी त्यांना एक हदीस लाभली आहे. म्हणून असे न होवो की याच्या निरागस नसलेल्या कथन कर्त्यांचे कथन कमजोर मानावे लागेल जणू मूळ उद्देश या बाबीत निरागसहीन कथनकर्त्यांचे संरक्षण होय. निरागस प्रेषितांचे नव्हे. आणि जर कुरआन एखाद्या कथनात मतभेद पडल्यास कुरआनास कथनानुसार बनावे लागेल. कथनाकर्त्यांचे निवेदन आपल्या जागेवरुन कधीच हटू शकत नाही.''(तर्जुमानुल कुरआन खंड २. पृ. ४९५)

रिवायत परस्ती वर मौलाना अब्दुल कलाम आजाद यांचा हा टोमणा अगदी प्रसंगानुरुप आहे. पुढे ते लिहितात.

''नि:संशय रिवायत सहीहैन (बुखारी व मुस्लिम) ची आहे परंतु या तेराशे वर्षांच्या कालावधीत कोणत्याहि मुसलमानाने हदीस कथन कर्त्यांच्या निरागस असण्याचा दावा केला नाही आणि ना इमाम बुखारी व मुस्लिम यांना निरागस मानले तेव्हा सर्व पैगंबरांची सत्यता व निरागसता इस्लाम धर्मात विश्वसनीय व अनुकरणीय आहे.

रिवायत (कथन) च्या प्रकारांपैकी कितीहि उत्कृष्ट प्रकारचे कथन असो ते एक चूक न करणाऱ्या कथन कर्त्याच्या निवेदनापेक्षा आणखी काही नाही आणि निरागस नसलेल्या कथन कर्त्यांचे

निवेदन एका क्षण करिताहि इस्लामच्या निश्चित बाबीच्या तुलनेत. मान्य केले जाऊ शकत नाही. आम्हाला हे मानावेच लागेल की हे अल्लाहच्या पैगंबरांचे कथन असू शकत नाही. निश्चितच कथन कर्त्यांद्वारे या ठिकाणी चूक घडली आहे.' हवाला-वरील प्रमाणे पृ. ४९९) वस्तुस्थिती अशी की हजरत इब्राहीम यांचे उत्तर आरोपात्मक प्रमाणाचे होते तेव्हा ते खोटे ठरविणे कोणत्याहि प्रकारे योग्य नव्हे आणि जेव्हा एखादे हदीस वचन मग ते बुखारी व मुस्लिमचे का असेना कुरआनाच्या निवेदना विरूद्ध आहे व त्याने पैगंबर निरागसतेला गालबोटहि लागते तर ते पैगंबर वचन असूच शकत नाही. यास्तव हे कथन आपल्या मूल रचनेच्या दृष्टीने रद्द करण्याजोगे आहे. राहीलीत याची प्रमाणे तर यात हि संभाषणास वाव आहे. इमाम बुखारी यांनी या हदीस वचनाला अबु हुरैरा द्वारे उल्लेखिले आहे त्यांनी यास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याचे वचन म्हटले आहे (पहा बुखारी किताब अहादीसूल अंबिया) मग जे कथन पैगंबर-वचन म्हणून निवेदिले गेले आहे आणि याचा एक कथन कर्ता जरीर बिन हाजिम आहे. जरीर बिन हाजिमच्या सिका (विश्वसनीय) असण्यासंबंधी हदीस-विद्वानांमध्ये मतभेद आहे. अल्लामा इब्ने हजर यांनी 'तहजीबु त्तहजीब' या प्रसिद्ध ग्रंथात दोन्ही प्रकारची कथने उल्लेखिली आहेत. उदाहरणार्थ इब्ने सअद म्हणतात ते 'सिका'(विश्वसनीय) आहेत. परंतु आयुष्याच्या शेवटी त्यांची बुद्धि कमकुवत झाली होती. नसाई म्हणतात त्यांच्या तर्फे उल्लेखिण्यात काही हरकत नाही इमाम अहमद म्हणतात जरीर फार मोठ्या चुका करतात. मिस्त्र (इजिप्त मध्ये त्यांची स्मरणशक्ति ठीक नव्हती आणि भ्रमाधारे निवेदन करू लागले होते. (पहा. तहजीबुत्तहजीब खंड २ पृ. ६९ ने ७२) आणि इमाम जहबी यांनी इमाम बुखारीचे हे कथन उल्लेखले आहे की जरीर बिन हाजिम कधी चूक करतात (पहा-मिजानुल एतेदाल खंड १ पृष्ठ ३९३)

स्पष्ट झाले. या हदीसच्या प्रमाणात दोष आहे आणि याचा संबंध पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी जोडणे उचित नाही. परंतु जे लोक हे निकोप असण्याचा आग्रह करतात ते याच्या समर्थनार्थ बुखारीचेच शफाअत वाले हदीस वचन प्रस्तुत करतात. ज्यात असे निवेदिले गेले आहे की कियामतीच्या दिवशी जेव्हा त्रस्त होऊन हजरत इब्राहीम जवळ जातील व त्यांना शिफारस करण्याची विनवणी करतील तेव्हा ते आपली ही सबब मांडतील की माझ्याकडून तीन असत्ये सादर झाली आहेत.(बुखारी-किताबु त्तौहीद) आणि असत्याचे स्पष्टीकरण हे महाशय अशा प्रकारे करतात की हा टोमणा होता परंतु हा खुलास अशासाठी योग्य नव्हे की जर हा टोमणा होता तर हजरत इब्राहीम यांनी एक वैशिष्टपूर्ण गोष्ट केली त्यात त्यांचा काय दोष होता ज्याचा संदर्भ देवून ते कियामतीच्या दिवशी शिफारस करण्याविषयी सबब पुढ क़रतील एकांकडे हजरत इब्राहिम यांच्या कथनास अलंकारीक व अर्थपूर्ण ठरविणे व दुसरीकडे त्यांना दोषी ठरविणे या दोन्ही गोष्टी परम्पर विरोधी आहेत म्हणून ह. इब्राहीम यांच्याशी असत्याचा संबंध जोडणे योग्य नव्हे.

८१. म्हणजे थोडावेळ पावतो त्यांच्यात ही जाणीव निर्माण झाली की आम्ही चूक करीत आहोत आणि हे ते एकमेकांना हळू स्वरात सांगृ लागले.

८२. अर्थात ते पुनश्च मार्गभ्रष्ट झाले व त्यांची बुद्धि विपरीत झाली.

८३. हा होता मूर्तिपूजेविरूद्ध सर्वात मोठा पुरावा जो सादर करण्याची संधी ह. इब्राहीम यांना लाभली.

८४. हे कटू वचन ह. इब्राहीम यांना अशा वेळी सांगितले जेव्हा लोकांवर मूर्तिपूजेविरुद्ध प्रमाण प्रस्थापित झाले होते व हे त्यांच्या अवलोकनातहि आले होते की मूर्ति ना कोणाला फायदा पोहचवू शकतात ना काही नुकसान कारण जर त्यांच्या अंगी नुकसान पोहचविण्याचे सामर्थ्य असते तर मूर्तिभंग केल्याबद्दल त्यानी ह. इब्राहीम यांना नुकसान पोहचविले असते.

८५. स्पष्ट झाले की मूर्तिपूजा निव्वळ मूर्खता आहे. अकलेचा वापर करणारा कधीहि मूर्तिपूजक होऊ शकत नाही.

८६. म्हणारे धार्मिक नेते व मंदीराचे पुरोहीत असावेत.

८७. म्हणजे शेवटी या मूर्त्यांच्या या पूजकांनी आगीत टाकले परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने अग्निला आदेश दिला की तिने हजरत इब्राहीम करीता थंड व्हावे व सलामती कारक ठरावे. हा एक ईश-चमत्कार होता जो अल्लाहने आपल्या पैगंबराच्या हक्कात जाहीर केला यात कोणतीहि गोष्ट बुद्धिच्या विपरीत नाही. अग्निला जाळण्याची क्षमता तिच्या पालनकर्त्यांनेच निर्मिली आहे. जर त्याने ही क्षमता नाहीशी करू इच्छिले व अन्य एखादे वैशिष्ट्य निर्माण करू इच्छिले तर काय असे करण्यास तो समर्थ नाही? वस्तूंचे नैसर्गिक गुणधर्म हे त्याचे स्वत:चे गुणधर्म नाहीत किंबहुना ईश्वराने निर्मिलेले आहेत आणि जेव्हा त्याने निर्माण केले आहेत तर तो वाटेल त्या वस्तूचे गुणधर्म वाटेल तेव्हा बदलू शकतो. यात आश्चर्य अशाच लोकांना वाटते जे एकतर ईशवराला मानत नाहीत किंवा मानत असले तरी तो सर्वसमर्थ असण्याविषयी विश्वास बाळगत नाही.

तसे पाहता आजच्या काळात अग्निपासून बचाव करण्याच्या वस्तू अस्तित्वात आल्या आहेत तेव्हा जर मनुष्य हे करू शकतो तर अल्लाहने आपल्या एका विशेष दासाच्या साठी अग्निला निष्प्रभ केले यात आश्चर्य ते कसले? ही वस्तुत सर्वश्रेष्ठ अल्लाहची मदत होती. जी हजरत इब्राहीम यांच्या हक्कात जाहीर झाली. जेव्हा त्यांनी एकेश्वरवादाचे ध्वजरोहक बनून

काफीरांनी लावलेल्या आगीत निर्धास्तपणे उडी घेतली.

८८. म्हणजे हज़रत इब्राहीम यांचे काहीच बिघडले नाही. किंबहुना त्यांच्याविरूद्ध कारस्थान रचणारेच अपयशी ठरले.

८९. असे दिसते की हज़रत इब्राहीम यांच्यावर त्यांच्या जनसमूहांपैकी ईमान बाळगणारे लूत होते. म्हणून उलिलखित घटनेंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना हिजरत प्रस्थानाचा आदेश दिला यास्तव ते हिजरत करून पॅलेस्टीन पोहचले.

९०. आभिप्रेत पॅलेस्टीनची भूमी जी धार्मिक व ऐहीच दोन्ही समृद्धनी व्याप्त आहे धार्मिक समृद्धीनी अशा प्रकारे की हज़रत इब्राहीम पासून हजरत ईसा पर्यंत अनेक पैगंबराचे ते केंद्र ठरले आणि ऐहिक समृद्धीनी अशा प्रकारे की हा भूभाग मोठा सुपीक व हिरवागार होता.

७२. आणि आम्ही त्याला इसहाक प्रदान केला व अधिक याकूब, [९१] आणि प्रत्येकास आम्ही सदाचारी बनविले.[९२]

وَوَهَبْنَا لَهُۥٓ إِسْحَٰقَ وَيَعْقُوبَ نَافِلَةً ۖ
وَكُلًّا جَعَلْنَا صَٰلِحِينَ ﴿٧٢﴾

७३. आणि आम्ही त्यांना नेता बनविले, [९३] जे आमच्या आदेशान्वये मार्गदर्शन करीत आणि आम्ही त्यांना ' वह्य' द्वारे भलेपणाची कृत्ये करण्याची, नमाज कायम करण्याची व जकात देण्याची ताकीद केली होती.[९४]आणि ते आमचीच उपासना करणारे होते.

وَجَعَلْنَٰهُمْ أَئِمَّةً يَهْدُونَ بِأَمْرِنَا وَأَوْحَيْنَآ إِلَيْهِمْ فِعْلَ
ٱلْخَيْرَٰتِ وَإِقَامَ ٱلصَّلَوٰةِ
وَإِيتَآءَ ٱلزَّكَوٰةِ ۖ وَكَانُوا۟ لَنَا عَٰبِدِينَ ﴿٧٣﴾

७४. आणि लूतला आम्ही बुद्धिकौशल्य व ज्ञान प्रदान केले [९५] व त्या वस्तीपासून त्याला मुक्तता दिली जी घाणेरडे कर्म करीत होती.[९६] ते अतिशय वाईट व दुराचारी लोक होते.

وَلُوطًا ءَاتَيْنَٰهُ حُكْمًا وَعِلْمًا وَنَجَّيْنَٰهُ مِنَ ٱلْقَرْيَةِ ٱلَّتِى
كَانَت تَّعْمَلُ ٱلْخَبَٰٓئِثَ ۗ إِنَّهُمْ كَانُوا۟ قَوْمَ سَوْءٍ فَٰسِقِينَ ﴿٧٤﴾

७५. आणि त्याला आम्ही आपल्या कृपाछत्रात दाखल केले. [९७] नि:संशय तो सदाचारी लोकांपैकी होता.[९८]

وَأَدْخَلْنَٰهُ فِى رَحْمَتِنَآ ۖ إِنَّهُۥ مِنَ ٱلصَّٰلِحِينَ ﴿٧٥﴾

७६. आणि यापूर्वी नूहला देखील[९९] (आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते) जेव्हा त्याने आम्हाला पुकारले तेव्हा आम्ही त्याची प्रार्थना कबूल केली. [१००] आणि त्याला व त्याच्या साथीदारांना सक्त यातनेपासून मुक्त केले.[१०१]

وَنُوحًا إِذْ نَادَىٰ مِن قَبْلُ فَٱسْتَجَبْنَا لَهُۥ فَنَجَّيْنَٰهُ وَأَهْلَهُۥ
مِنَ ٱلْكَرْبِ ٱلْعَظِيمِ ﴿٧٦﴾

७७. आणि आम्ही अशा लोकांच्या विरोधात त्याची मदत केली, ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले होते.[१०२] ते फार वाईट लोक होते, म्हणून आम्ही त्या सर्वांना पाण्यात बुडविले.

وَنَصَرْنَٰهُ مِنَ ٱلْقَوْمِ ٱلَّذِينَ كَذَّبُوا۟ بِـَٔايَٰتِنَآ ۚ
إِنَّهُمْ كَانُوا۟ قَوْمَ سَوْءٍ فَأَغْرَقْنَٰهُمْ أَجْمَعِينَ ﴿٧٧﴾

७८. आणि दाऊद [१०३] व सुलेमानलाहि [१०४] (आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते), जेव्हा ते एका शेताच्या तंट्याबाबत फैसला करीत होते ज्यात एका गटाच्या शेळ्या रात्री घुसल्या होत्या आणि आम्ही त्यांच्या निर्णयास पाहत होतो.

وَدَاوُۥدَ وَسُلَيْمَٰنَ إِذْ يَحْكُمَانِ فِى ٱلْحَرْثِ إِذْ نَفَشَتْ
فِيهِ غَنَمُ ٱلْقَوْمِ وَكُنَّا لِحُكْمِهِمْ شَٰهِدِينَ ﴿٧٨﴾

९१. म्हणजे केवळ इसहाक सारखा पुत्रच प्रदान केला नाही. तर याक़ूब सारखा नातू देखील हे इब्राहीमी वंशाचे दैदिप्यमान तारे होते.

९२. म्हणजे ही व्यक्तित्वे आपल्या आचरणाच्या दृष्टीने अतिशय निर्मळ चारित्र्याचे होते यावरून बायबलच्या त्या गोष्टीचे खंडन होते ज्यात त्याच्या चारित्र्याला गालबोट लावले जाते.

९३. म्हणजे ते माणसांचे सच्चे नेते होते कारण ते त्यांना ईश्वराचा मार्ग दाखवीत व त्याच्या आदेशानुसार मार्गदर्शन करीत ज्या लोकांनी देखील त्यांचे अनुसरण केले, त्यांना सन्मार्ग लाभला.

त्यांच्या नेतृत्वाचा विशेष पैलू हा होता की ते स्वत: नेते बनले नव्हते व ना त्यांना नेतागिरीची हौस होती, किंबहुना सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना नेता व प्रमुख बनविले होते आणि त्यांच्या नेतृत्वाखाली मोठमोठे जन समूह उदयास आले.

९४. सत्कार्यांच्या सर्वकष आदेश देण्यासोबत नमाज कायम करणे व जकात (कर्तव्य-दान) देण्याचा आदेश या वस्तुस्थिती कडे संकेत करतो की हे दोन्ही उपासना -प्रकारे मांगल्याचे स्रोत आहेत. यांचा इतमाम बाळगल्याने भलेपणात वाढ होते.

या आयतीवरून हेहि स्पष्ट होते की नमाज व जकात पैगंबरांच्या शरीअतचे महत्वपूर्ण स्तंभ गणले जात राहिले.

९५. मूळ शब्द 'हिकमत'यास अभिप्रेत अक्कल हुशारी होय व ज्ञानशी अभिप्रेत ते ज्ञान होय जे वह्य (ईश-आदेशा) द्वारे प्राप्त होते.

९६. अभिप्रेत समलिंगी संभोगासारखे घाणेरडे कर्म होय. लूत जन-समूहाचा किस्सा सूरह अअराफ (आयत ८० ते ८४) व सूरह हूद (आयत ७७ ते ८३) आणि सूरह हिज्र (आयत ६१ ते ७७) मध्ये केले गेले आहे.

९७. हीच गोष्ट आहे जी विशेषत्वाने स्पष्ट करण्याचा उद्देश आहे. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरांचे कशा प्रकारे सहाय्य करतो.

९८. पैगंबरांचा सर्वप्रथम गुणविशेष सदाचरणी असणे हा होय. परंतु आजच्या तौरात व बायबलमध्ये अनुचित गोष्टींचा त्यांच्याशी संबंध दर्शविला आहे. ज्यामूळे त्याचे व्यक्तिमत्व कलंकीत दिसून येते. पवित्र कुरआन पैगंबरांच्या सदाचाराची स्पष्ट घोषणा करते ज्यामूळे या आक्षेपाचे आपोआप खंडन होते.

हजरत लूत यांच्यावर एक अत्यांत लज्जास्पद आरोप बायबलचे पुस्तकनिर्मिती (१९: ३२ ते ३८) मध्ये लावला गेला आहे आणि तो इतका वाह्यात आहे की त्याचा उल्लेख करणेहि योग्य वाटत नाही.

९९. हजरत नूह यांचा वृतांत सूरह अअराफ (आयत ५९ ते ६४) सूरह युनूस (आयत ७१ ते ७३), सूरह हूद (आयत २५ ते ४९) मध्ये निवेदिला गेला आहे.

१००. हजरत नूह यांची प्रार्थना (दुआ)सूरह कमर आयत क्र.१० आणि सूरह नूह -आयत २६ ते २८ मध्ये उल्लिख आहे.

१०१. सक्त यातनेशी अभिप्रेत नकारात्मक व विरोधात्मक वातावरणाची कोंडीहि आहे व तो अजाब(ईश-शिक्षा) देखील जो या जनमसमूहावर अवतरला.

१०२. या ठिकाणी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह कशा प्रकारे आपल्या दासांना सहाय्य करतो.

१०३. हजरत दाऊद, हजरत याकूब यांच्या वंशातले होते. त्यांचा काळ इ. स. पूर्वी दहाव्या शतकाचा होता. ते पैगंबरहि होते, व खलीफा देखील. त्यांच्यावर अवतरलेल्या ईश-ग्रंथाचे नाव जबूर आहे.

१०४. हजरत सुलेमान हे हजरत दाऊद यांचे पुत्र होते. पैगंबर पदा सोबतच त्यांना अत्यंत भव्य व अद्वितीय शासन प्रदान केले गेले होते. पहा सूरह बकरा टीप क्र.१२०.

७९. त्यावेळी आम्ही सुलेमानला या (तंट्या ) चे सामंजस्य प्रदान केले व त्यांच्या पैकी प्रत्येकास आम्ही बुद्धिकौशल्या व ज्ञान प्रदान केले होते. [१०५] आणि दाऊदच्या स्वरमेळी करीता आम्ही पर्वतांना त्याच्या अधीन केले तसेच पक्ष्यांनाहि. ते त्याच्यासोबत तस्बीह (अल्लाहचे गुण-गान ) करीत होते [१०६] याचे कर्ता-करविता आम्हीच होतो. [१०७]

فَفَهَّمْنٰهَا سُلَيْمٰنَ ۚ وَكُلًّا اٰتَيْنَا حُكْمًا وَّعِلْمًا ۫ وَّسَخَّرْنَا
مَعَ دَاوٗدَ الْجِبَالَ يُسَبِّحْنَ وَالطَّيْرَ ؕ وَكُنَّا فٰعِلِيْنَ ﴿٧٩﴾

८०. आणि आम्ही तुमच्यासाठी त्याला चिलखत बनविण्याची कला शिकविली. अशासाठी की तुमच्या साठी युद्ध प्रसंगी संरक्षणाची सामुग्री व्हावी. मग काय तुम्ही कृतज्ञ आहात ?[१०८]

وَعَلَّمْنٰهُ صَنْعَةَ لَبُوْسٍ لَّكُمْ لِتُحْصِنَكُمْ
مِّنْۢ بَاْسِكُمْ ۚ فَهَلْ اَنْتُمْ شٰكِرُوْنَ ﴿٨٠﴾

८१. आणि आम्ही सुलेमान करिता जोराच्या वाऱ्यास त्याच्या आधीन केले होते, जो त्याच्या आदेशाने त्या भूमीकडे वाहत होता. जिच्यात आम्ही मोठी समृद्धि राखली आहे.[१०९] आम्ही प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारे आहोत.

وَلِسُلَيْمٰنَ الرِّيْحَ عَاصِفَةً تَجْرِيْ بِاَمْرِهٖۤ
اِلَى الْاَرْضِ الَّتِيْ بٰرَكْنَا فِيْهَا ؕ وَكُنَّا بِكُلِّ شَيْءٍ عٰلِمِيْنَ ﴿٨١﴾

८२. आणि सैतानांपैकी काही असे जे त्याच्याकरिता (समुद्रात) बुड्या मारीत व याखेरीज इतर कामेहि करीत.[११०] त्यांच्यावर देखरेख ठेवणारे आम्हीच होतो.

وَمِنَ الشَّيٰطِيْنِ مَنْ يَّغُوْصُوْنَ لَهٗ وَيَعْمَلُوْنَ عَمَلًا
دُوْنَ ذٰلِكَ ۚ وَكُنَّا لَهُمْ حٰفِظِيْنَ ﴿٨٢﴾

८३. आणि अय्युब [१११] ला (देखील आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले) जेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास पुकारले की, मी रोग-ग्रस्त झालो आहे आणि तू सर्वाधिक दया करणारा आहे.[११२]

وَاَيُّوْبَ اِذْ نَادٰى رَبَّهٗۤ اَنِّيْ مَسَّنِيَ الضُّرُّ
وَاَنْتَ اَرْحَمُ الرّٰحِمِيْنَ ﴿٨٣﴾

८४. तेव्हा आम्ही त्याची दुआ (प्रार्थना) कबूल केली, व त्याची यातना दूर केली आणि त्याला त्याचे कुटुंबहि दिले, तसेच त्यासोबत त्यांच्या सारखे आणखीहि दिले [११३] आपल्या तर्फे कृपा म्हणून, अशासाठी की उपासना करणाऱ्यांसाठी स्मरणिका व्हावी. [११४]

فَاسْتَجَبْنَا لَهٗ فَكَشَفْنَا مَا بِهٖ مِنْ ضُرٍّ وَّاٰتَيْنٰهُ اَهْلَهٗ
وَمِثْلَهُمْ مَّعَهُمْ رَحْمَةً مِّنْ عِنْدِنَا
وَذِكْرٰى لِلْعٰبِدِيْنَ ﴿٨٤﴾

१०५. या तंट्याविषयी कोणतेहि विवरण कुरआनाने दिले नाही किंबहुना एका घटनेकडे संकेत केला जो हेतु लक्षात घेण्याकरिता पुरेसा होता.

आयतीवरून जी गोष्ट कळते ती अशी की हजरत दाऊद व त्यांचे पुत्र हजरत सुलेमान ज्ञान व बुद्धिकौशल्य आधारे फैसला करीत असत. एकदा त्यांच्या न्यायालयात, ते दोन्ही न्यायाधीश असतांना एक तंटा आला रात्रीच्या वेळी एका गटाच्या बकऱ्या दुसऱ्याच्या शेतात घूसून पीकाची नासधूस केली म्हणून दुसऱ्या गटाने पहिल्या गटा विरूद्ध नुकसान भरपाईचा दावा केला सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत सुलेमान यांना अत्याधिक दर्जाची समज व आकलन शक्ति प्रदान केली होती म्हणून त्यांनी उत्कृष्टपणे फैसला केला.

या संदर्भात कुरआनाने ना हे स्पष्टीकरण दिले की तो फैसला कोणता होता आणि ना हे सांगितले की ह. दाऊदचा निर्णय चुकीचा होता आणि ना सहीह हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या द्वारे या बाबतीत काही उल्लिखित आहे. मग अनुमानाच्या गोष्टीचा संबंध या पैगंबराशी का म्हणून जोडला जातो.

कुरआनाने या फैसल्याचा जो हवाला दिला तर याचा हेतु केवळ हे स्पष्ट करणे होय की या पैगंबरांवर अल्लाहचा हा अनुग्रह झाला की त्याने यांना सत्ताधिकार दिला व न्यायासनावर बसविले व न्यायदानाच्या कारवायीची देखरेख सर्वश्रेष्ठ अल्लाह करीत राहिला येथपावेतो की जेव्हा एका तंट्याबाबत दाऊद यांना शंका उद्‌भवली तेव्हा सुलेमानला त्यची समज प्रदान केली गेली. स्पष्ट झाले की मामला समजून घेणे हे अल्लाह प्रणित सुबुद्धिवरच अवलंबून आहे. दाऊद व सुलेमान दोन्ही पिता-पुत्र होते व दोघांनाहि सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्ञान व बुद्धिकौशल्याने उपकृत केले होते. परंतु पुत्र अल्लाह प्रणित सुबुद्धिने मामला समजण्यात एक पाऊल पुढेच होता व आपल्या पित्याचा मदतनीस बनला होता.

१०६.हजरत दाऊद यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने हा ईश-चमत्कार प्रदान केला होता की जेव्हा ते तस्बीह (अल्लाहचे गुणगान) करीत तेव्हा पर्वत व पक्षी देखील त्यांच्या स्वरात स्वर मिळवित व दृश्य मोठे आश्चर्यकारक होई. हजरत दाऊद यांना 'जबूर' या ईश-ग्रंथासोबत खास स्वरहि प्रदान केला गेला होता. पर्वत निर्जीव व जड पदार्थांपैकी आहे व त्यांचे तस्बीह करणे बाह्यत: विचित वाटते परंतु जो ईश्वर विचित्र गोष्टीचा निर्माता आहे. त्याने जर आपल्या पैगंबराकरवी हा चमत्कार प्रस्तुत केला असेल की त्याच्या पावित्र्यास पहाड उंच स्वरात गाऊ लागले व त्याच्या स्तुती-प्रशंसेचे गीत पक्षीहि गाऊ लागले तर यात आश्चर्य कसले? ही घटना तर ईश तमत्कारा आधारे अनुमृत स्वरूपात उद्‌भवली अन्यथा कुरआन वारंवार ही वस्तुस्थिती निवेदन करते की जमीन व आकाशातला कण न कण त्याचे स्तुति-गान करण्यात लीन आहे. परंतु माणसाला ते समजून येत नाही (सूरह बनी इस्राईल-४४) या समदर्भात एका उर्दू कवीने किती योग्य म्हटले आहे.

परंतु वस्तुस्थिती अशी की कणाचे हृदय चिरले तर त्यातहि तस्बीह (अल्लाहचे गुणगान) चीच स्वर बुलंद होईल. ही वस्तुस्थिती लक्षात घेता पर्वत व पक्षाचे ईश-स्तवन करण्यात हजरत दाऊदच्या स्वरात स्वर मिळविणे ईमान व विश्वास वृद्धिगत होण्यास कारक ठरते याचे व्यर्थ स्पष्टीकरणच केवळ तेच लोक करतात जे ईश-चमत्काराला, ईश-चमत्कार म्हणून मान्य करण्यास तयार होत नाही.

१०७. म्हणजे हा ईश-चमत्कार हजरत दाऊद यांच्या हस्ते प्रकट होणार होता परंतु वास्तविकरित्या तो घडवून आणणारा अल्लाहच होता त्याच्याच आदेशाने पर्वत व पक्षी तस्बीह (अल्लाहचे गुणगान) करू लागतात.

१०८. लोखंडी पोषाख म्हणजे चिलखत बनविण्याची कला, सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत दाऊद यांना शिकविली होती. तद्‌वतच हा ईश-चमत्कारहि प्रदान केला होता की लोखंड त्यांच्या हातात नरम होत असे (सूरह सबा आयत क्र. १०). त्या काळात चिलखताचे मोठे यौद्धिक महत्व होते आणि ही वस्तु जेहाद मध्ये त्यांच्या करिता मोठी उपयक्त ठरली. तात्पर्य सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे त्यांच्यासाठी ईश्वरीय मदत होती.

नंतरच्या काळात चिलखताची ही कला सर्वसामान्य झाली आणि युद्धप्रसंगी संरक्षणासाठी त्याचा वापर होऊ लागला. तात्पर्य हजरत दाऊदच्या माध्यामाने मानव-जातीवर सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा अनुग्रह होय. म्हणून या ठिकाणी हा प्रश्न प्रस्थापित केला गेला आहे की काय तुम्ही या बाबत अल्लाहशी कृतज्ञ आहात?

१०९. समृद्धीची भूमी म्हणजे पॅलेस्टीन व सिरियाचा इलाका होय. हजरत सुलेमान यांच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहची एक विशेष कृपा ही झाली की सोसाट्याच्या वाऱ्याला त्यांच्या सेवेस लावले गेले, यासाठी की त्यांचा प्रवास वेगाने पार पडावा. आता त्याचे नेमके स्वरूप कोणते ते आम्हाला नाही ठाऊक. कदाचित ते आपल्या सिंहासनासह हवेत संचार करीत असावेत. बहुतेक भाष्याकारांचा हा कयास आहे. काहीहि असो, पण ही एक असमान्य गोष्ट होती व अल्लाह प्रणित चमत्कार होता जो त्याने आपल्या पैगंबरांकरिता प्रकट केला. यात बुद्धिच्या विपरित असे काहीहि नाही. जर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना एका रात्रीत मक्का ते बैतुल मक्दिसाचा

प्रवास करविला गेला तर हजरत सुलेमान यांचे हवेच्या खांद्यावर स्वार होऊन उडणे बुद्धि-विपरित कसे आणि आजच्या काळातील मनुष्य विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बळावर विमानात बसून हजारो मैलांचा प्रवास काही तासात करू शकतो तर अल्लाहचा प्रेषित त्याच्या चमत्कारीय सामर्थ्यान्वये वातावरणात प्रवास का करू शकत नाही?

११०. सैतानाशी अभिप्रेत बंडखोर जिन्न होत. सर्वश्रेष्ठ अल्लाहने कित्येक बंडखोर जिन्नांना हजरत सुलेमानच्या अधीन केले होते. यासाठी की त्यांनी यांच्याकडून अशी कामे घ्यावीत जी अत्यंत कठीण परिश्रमाखेरीज पार पाडली जाऊ शकत नव्हती. उदाहरणार्थ समुद्रातून मोती काढणे क्रेनविना मोठमोठे दगड एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे व भव्य इमारत उभारणे इत्यादि.

स्पष्ट असावे या असमान्य साधनांचा हजरत सुलेमान यांनी बैतुल मक्दसची उभारणी युद्ध-विष्यक गरजांची पूर्तता व इस्लामी-राज्याच्या दृढतेसाठी वापर केला होता. हेहि स्पष्ट असावे की हजरत दाऊद, हजरत सुलेमान यांचा काळ बनी इस्राईलचा उत्कर्ष काळ होता. हजरत दाऊद यांच्या काळात अनेक विजय प्राप्त केले गेले आणि हजरत सुलेमान यांच्या काळात एक व्यापक व भव्य इस्लामी साम्राज्य प्रस्थापित झाले जे आपल्या काही वैशिष्ट्यांच्या दृष्टीने अगदी अद्वितीय होते.

अशा प्रकारे हा त्या कृपेचा इतमाम होता जी सर्वश्रेष्ठ अल्लाहने जगातील सर्व जनसमूहांवर बनी इस्राईलला प्राधान्य देऊन प्रदान केली होती, आणि दुसरीकडे सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानवजातिस हा सन्मान प्रदान केला की तिच्यातल्या एका व्यक्तिचे शासन जिन्नांवरहि प्रस्थापित झाले. अर्थात अल्लाहच्या बुद्धिकौशल्यास व उपाय योजनेस तोच अधिक चांगल्या प्रकारे जाणतो.

१११. हजरत अय्यूब हे एक पैगंबर होते व हजरत इब्राहीम यांचे वंशज होते. बायबलमध्ये त्यांच्याशी संबधित एक पोथी आहे. परंतु त्यात मूळ घटनेस किस्सा कहानीच्या स्वरुपात सादर केले गेले आहे. आणि अशा गोष्टीचा संबंध हजरत अय्यूब यांच्याशी जोडला गेला आहे ज्या पैगंबराच्या उच्च पदाला शोभण्याजोग्य नाहीत म्हणून विश्वास ठेवण्याजोग्या नाहीत. तसेच यात परस्पर विरुद्ध निवेदनहि आढळते. तथापि याच्या अध्ययनाने असे दिसून येते की हजरत अय्यूब यांचा काळ हजरत मूसा यांच्या पूर्वीचा असावा ते ऊज येथील रहिवाशी होते. ते पॅलेस्टीनच्या पश्चिमेस एडाम (Edom)उत्तर पश्चिम मध्ये स्थित होते (पहा अय्यूब १:१ आणि नूह २१:४)

११२. हजरत अय्यूब भयंकर रोगाने ग्रस्त होते. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे ही फार मोठी परिक्षा होती अत्याधिक त्रास-यातना पोहचल्यानंतरहि त्यांनी मुखाने तक्रार म्हणून एक शब्दहि काढला नाही. किंबहुना परिपूर्ण संयम बनले, आणि अल्लाहजवळ कृपा-याचना केली ती देखील अशा सुरेख शैलीत की तूच सर्वधिक कृपा करणारा आहेस, जी पूर्णत: प्रशांसा होती.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबरांना वेगवेगळ्या कसोटीत टाकले. एखाद्यास वैभव व ऐश्वर्य प्रदान करून ज्याप्रमाणे हजरत सुलेमान यांच्याबाबत झाले. आणि एखाद्याकडून साधन-सामुग्री हिरावून घेऊन व त्यास रोगग्रास्त करून जसे हजरत अय्यूब यांच्याबाबतीत घडले. हे अशासाठी की पैगंबरांच्या आदर्श जीवनाचे नमुने लोकांसमोर रहावेत आणि त्यांनी सुखसमृद्धीच्या वा कष्ट- यातनांच्या प्रत्येक स्थितीत त्यांच्या आदर्शाचे अनुसरण करावे. यावरून हेहि स्पष्ट झाले की पैगंबर अल्लाहचे सान्निध्य प्राप्त दास असेल तरी स्वत:ची दुख यातना दूर करण्यास ते समर्थ नसतात, किंबहुना यासाठी ते अल्लाहशीच दुखा (प्रार्थना) करतात आणि तोच त्यांची यातना दूर करतो. आणि जेव्हा एखादा पैगंबर आपल्या दु:ख-त्रासास स्वत: दूर करू शकत नाही तेव्हा तो इतरांची दु:खे कशी दूर करू शकतो. मग अल्लाहला सोडून एखाद्या पैगंबरास मदतीसाठी पुकारण्यात कोणते शहाणपण आहे?

११३. असे दिसून येते की एखादी अशी स्थिती उद्‌भवली की हजरत अय्यूब यांचे कुटुंबिय उद्विग्न झाले होते. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांची प्रार्थना कबूल केली व त्यांना स्वास्थ्य प्रदान केले तेव्हा अशी साधने केली की त्यांचे कुटुंबिय देखील त्यांच्याजवळ पोहचले आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहची अधिक कृपा अशी की त्यांच्या कुटुंबियात अधिक तेवढ्याच संख्येची वाढ झाली अर्थात अधिक बायका-मुले लाभली.

११४. म्हणजे जे लोक केवळ अल्लाहची उपासना करतात व त्याचे दास बनून राहतात त्यांनी हजरत अय्यूबच्या या घटनेद्वारे हा बोध घ्यावा की सदाचारी लोकांना प्रसंगी अशा कसोटीला तोंड द्यावे लागते की त्यांना आपल्या स्वास्थ्यालाही मुकावे लागते व आपल्या मुलाबाळांचा विरह सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत हजरत अय्यूब यांच्यासारखे धैर्य व संयम त्यांच्याकरिता आशेचा किरण बनू शकतो.

**आणि इस्माईल व इद्रीस व जुलकिफ्ल यांनाहि (आपल्या कृपेने उपकृत केले) हे सर्व सहनशील होते. त्यांना आम्ही आपल्या कृपेत दाखल केले निःसंशय ते सत्कर्म करणाऱ्यांपैकी होते.(अल-क़ुर्आन)**

८५. आणि इस्माईल व इद्रीस [११५] व जुलकिफ्ल [११६] यांनाहि (आपल्या कृपेने उपकृत केले) हे सर्व सहनशील होते.

وَإِسْمٰعِيلَ وَإِدْرِيسَ وَذَا الْكِفْلِ ۖ كُلٌّ مِّنَ الصّٰبِرِينَ ۝٨٥

८६. त्यांना आम्ही आपल्या कृपेत दाखल केले निःसंशय ते सत्कर्म करणाऱ्यापैकी होते.

وَأَدْخَلْنٰهُمْ فِي رَحْمَتِنَا ۖ إِنَّهُم مِّنَ الصّٰلِحِينَ ۝٨٦

८७. आणि जुन्नुन [११७] (मासे वाल्या) लाहि (आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते) जेव्हा तो क्रोधित होऊन निघून गेला व असे समजत होता की आम्ही त्याला पकडीत घेणार नाही [११८] (परंतु) नंतर त्याने अंधःकारातून पुकारले [११९] की तुझ्या खेरीज कोणी उपास्य नाही, तू पवित्र आहेत, निःसंशय मीच अपराधी आहे. [१२०]

وَذَا النُّونِ إِذ ذَّهَبَ مُغٰضِبًا فَظَنَّ أَن لَّن نَّقْدِرَ عَلَيْهِ
فَنَادٰى فِي الظُّلُمٰتِ أَن لَّآ إِلٰهَ إِلَّآ أَنتَ سُبْحٰنَكَ
إِنِّي كُنتُ مِنَ الظّٰلِمِينَ ۝٨٧

८८. त्या वेळी आम्ही त्याची दुआ (प्रार्थना) कबूल केली [१२१] आणि गुदमरण्या पासून त्याला मुक्ती दिली [१२२] अशा प्रकारे आम्ही ईमान बाळगणाऱ्यांना मुक्ति देतो. [१२३]

فَاسْتَجَبْنَا لَهُۥ وَنَجَّيْنٰهُ مِنَ الْغَمِّ ۚ وَكَذٰلِكَ
نُـۨجِي الْمُؤْمِنِينَ ۝٨٨

८९. आणि जकरीय्या (ला देखील आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले) जेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास पुकारले की, हे पालन कर्त्या!मला एकटा सोडू नकोस [१२४] आणि तूच सर्वाधिक चांगला वारस आहेस.[१२५]

وَزَكَرِيَّآ إِذْ نَادٰى رَبَّهُۥ رَبِّ لَا تَذَرْنِي فَرْدًا
وَأَنتَ خَيْرُ الْوٰرِثِينَ ۝٨٩

९०. तेव्हा आम्ही त्याची दुआ (प्रार्थना) कबूल केली व त्यास यहया प्रदान केला आणि त्याच्या पत्नीस त्याच्याकरीता अनुकूल बनविले.[१२६] हे लोक सत्कर्मात मग्न रहात [१२७] व आम्हास अभिरूचि व भयासह पुकारीत असत. [१२८]आणि आमच्यासमोर गयावाया करणारे होते. [१२९]

فَاسْتَجَبْنَا لَهُۥ وَوَهَبْنَا لَهُۥ يَحْيٰى وَأَصْلَحْنَا لَهُۥ زَوْجَهُۥٓ ۚ
إِنَّهُمْ كَانُوا۟ يُسٰرِعُونَ فِي الْخَيْرٰتِ وَيَدْعُونَنَا
رَغَبًا وَرَهَبًا ۖ وَكَانُوا۟ لَنَا خٰشِعِينَ ۝٩٠

९१. आणि ती जिने आपल्या शीलाचे रक्षण केले होते [१३०] आम्ही तिच्यात आपला आत्मा फुंकला [१३१] आणि तिला व तिच्या पुत्राला इहलोकवासीयांकरिता एक निशाणी बनविले. [१३२]

وَالَّتِيٓ أَحْصَنَتْ فَرْجَهَا فَنَفَخْنَا فِيهَا مِن رُّوحِنَا
وَجَعَلْنٰهَا وَابْنَهَآ ءَايَةً لِّلْعٰلَمِينَ ۝٩١

११५. पहा सूरह मरीयम टीप क्र. ७७

११६. जुलकिफ्लचा उल्लेख पवित्र कुरआनाने सहनशील पैगंबरांच्या सूचीत केला आहे. ज्यावरून असे दिसून येते की त्यांना अतिशय कठीण कसोटीतून जावे लागले. त्यांच्या बाबतीत कसलाहि तपशील ना कुरआनात निवेदिला गेला आहे व ना हदीस वचनांमध्ये. राहीले बायबल, तर यात या नावाच्या कोणत्याही पैगंबराचा उल्लेख नाही, तथापि हिजकील पैगंबराच्या नावाने एक पुस्तिका आहे. ज्यांना बुख्तनस्सरच्या काळात कसोटीतून जावे लागले म्हणून काही भाष्यकारांची अशी कल्पना आहे की जुलकिफ्ल ही हिज्कीलचीच उपधी आहे इराक मध्ये अलहिल्याच्या जवळ अलकीफल नामक एक स्थान आहे. या ठिकाणी हजरत हिज्कील यांची कबर असल्याचे बोलले जाते. परंतु या संदर्भात आम्हाला ज्ञान विषयक एकहि प्रमाण मिळाले नाही. यास्तव काही न बोललेलेच बरे.

११७. 'जन्नून' म्हणजे मासेवाला. ही उपाधि हजरत यूनुस यांची होती. आणि या विशेष उपधिद्वारे त्यांना अशासाठी उपकृत केले गेले की त्यांना माशाने गिळले होते आणि नंतर त्यांना जिवंत स्थितीत ओकून टाकले.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह यूनुस टीप १४७)

११८. हजरत यूनुस यांना 'नेनवा' जनसमूहाकडे पाठविले गेले होते. तिथे ते बऱ्याच काळापावेतो आवाहन करीत राहिले परंतु जेव्हा लोक ईमान बाळगण्यास तयार झाले नाहीत तेव्हा क्रोधित होऊन तेथून निघाले की अशा मूर्ख अडाणी जनसमूहास कोठपावेतो समजाविले जावे. त्यांना असे वाटले की जे पाऊल त्यांनी उचलले आहे त्याबाबत सर्वश्रेष्ठ अल्लाहने याबाबत पकड केली कारण एखाद्या पैगंबराला हे शोभण्यासारखे नव्हते की त्याने अल्लाहच्या हुकुमाखेरीज अशा वस्तीला सोडून निघून जावे ज्यास संदेश पोहचविण्यासाठी त्याला नियुक्त केले गेले आहे. हजरत युनूस यांच्या नजरेतून हा पैलू अध्यारूत राहीला व त्यांच्या हातून चूक घडली परंतु ज्याअर्थी ही चूक एका पैगंबराद्वारे आपल्या जबाबदारीच्या पूर्ततेबाबत घडली होती म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना अतिशय कठीण कसोटीत टाकले व तिचे स्वरुप जसे की जेव्हा ते नैनावाहून समुद्र किनारी पोहचले आणि 'याफा' ज़ाण्याकरिता नावेत बसले--- त्या काळी यरूशलेम करीता जवळचे बंदर याफा होते हे बंदर तुर्की समुद्राच्या किनारी होते अचानक नाव वादळात सापडली आणि हजरत युनूस यांना एका मोठ्या माशाने अल्लाहच्या हुकुमानुसार गिळंकृत केले.

(विवरणात्मक उल्लेख सूरह साफ्फात मध्ये केला गेला आहे)

११९. म्हणजे माशाच्या पोटातून पुकारले जेथे अंधारच अंधार होता. एक तर माशाच्या पोटातला अंधार, अधिक समुद्राच्या तळातला अंधार.

१२०. माशाच्या पोटात हजरत युनूस यांच्यावर काय प्रसंग ओढवला असेल त्याची कल्पना ही करणे अवघड आहे. तरी देखील त्यांच्या मुखातून तक्रारीचा एक शब्द देखील निघाला नाही. या प्रसंगी त्यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहशी जी फिर्याद केली ती पूर्णतः अल्लाहची स्तुति प्रशंसा व आपल्या चूकीच्या स्विकृतिवर आधारीत आहे. माशाच्या पोटातही त्यांनी तौहीदचा आवाज बुलंद केला आणि त्याची पवित्रता वर्णन करीत आपली चुक सक्त शब्दात मान्य केली त्यांचा हा प्रामाणिकपणा व त्यांचा हा पशचाताप त्यांच्या महानतेस प्रमाणित करतो.

१२१. ही दुआ (प्रार्थना) अगदी हृदयापासून निघाली होती आणि विनम्र भावाने ओतप्रोत होती म्हणून अंधः काराला छेदून अर्श पर्यंत पोहचली आणि सर्वश्रेष्ठ ईश्वराच्या दरबारात स्विकृत झाली.

१२२. यास्तव माशाने त्यांना समुद्रकिनारी जिवंतावस्थेत ओकले.

१२३. म्हणजे हे उदाहरण आहे अशा गोष्टीचे की सर्वश्रेष्ठ अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांना वेगवेगळ्या कसोटीत टाकता असला तरी ईमान बाळगणाऱ्यांना या कसोटीत पूरे उतरतात मग अल्लाह त्यांच्या मुक्तीची उपाय योजना करतो.

१२४. हजरत जकरीय्याची दुआ (प्रार्थना) संततीकरीता होती अर्थात अशी संतती जी पैगंबरी ज्ञानाची वारस असावी. (स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मरयम टीप क्र. ८)

१२५. अर्थात अखेर शेवटी प्रत्येक गोष्टीचा स्वामी तूच आहेस आणि तू सर्वोत्कृष्ट स्वामीं आहेस.

१२६. हजरत जकरीया यांची पत्नी वांझ होती, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने तिचा वांझपणा दूर करून यहया सारखा सुपुत्र प्रदान केला. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मरयम टीप क्र. ११ ते १४

१२७. म्हणजे ज्या पैगंबरांचा अहवाल वर वर्णिला गेला, ते सर्व सदाचाराबाबत एकमेकांहून पुढे जाणारे व सर्व शक्तिनिशी या मार्गात सरसावणारे होते. स्पष्ट झाले की सदाचाराच्या कामांमध्ये तन्मयता दाखविणे पैगंबरीय गुणवैशिष्ट्यांपैकी आहे.

१२८. दासाचा आपल्या पालनकर्त्याशी कसा संबंध असावा या संदर्भातले हे अपेक्षा -स्तर होय. अर्थात हे की हा संबंध केवळ रक्ताच्या आधारावर नसावा किंबहुना अंतःकरणापासून व अभिरूचीसह असावा. त्याने आपल्या पालन कर्त्यास प्रेम व भयाच्या संभिश्र भावनेने पुकारावे व याच भावनेने त्याची उपासना करावी.

१२९. म्हणजे ह्या व्यक्ति, ज्यांचा वर उल्लेख केला गेला आहे, अतिशय उच्च दर्जाच्या व्यक्ति होत्या. परंतु त्यांच्या अंगी गर्वाचा लवलेशही नव्हता. ते अल्लाहसमोर विनम्र भावात आकंठ बुडत व विनम्र भावाने जीवन व्यतीत करीत.

१३०. अभिप्रेत हजरत मरयम होय जी एक सत्शील स्त्री होती.

१३१. आत्म्याचा संबंध अल्लाहशी अशाच प्रकारचा आहे, ज्या प्रकारे काबागृहाचा संबंध अल्लाहशी आहे, अर्थात हा संबंध आत्म्याचा सन्मान स्पष्ट करतो. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा, टीप क्र. २७९.

१३२. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याची निशाणी अशी की मूल गोष्ट म्हणजे त्याचा आदेश होय. त्याने आदेश दिला म्हणूनच एकावांझोट्या स्त्री ला मूल झाले आणि त्याने आदेश दिला म्हणून पित्याविना अपत्य जन्माला आले.

**ही तुमची उम्मत (जन-समूह) एकच उम्मत होय आणि मीच तुमचा पालनकर्ता आहे, यास्तव माझीच उपासना करा. परंतु लोकांनी आपल्या धर्माचे तुकडे तुकडे केले. सर्वांना (शेवटी)आमच्याकडे परतावयाचे आहे.(अल-कुर्आन)**

९२. ही तुमची उम्मत (जन-समूह) एकच उम्मत होय [१३३] आणि मीच तुमचा पालनकर्ता आहे, यास्तव माझीच उपासना करा. [१३४]

إِنَّ هَٰذِهِۦٓ أُمَّتُكُمْ أُمَّةً وَٰحِدَةً
وَأَنَا۠ رَبُّكُمْ فَٱعْبُدُونِ ﴿٩٢﴾

९३. परंतु लोकांनी आपल्या धर्माचे तुकडे तुकडे केले.[१३५] सर्वाना (शेवटी)आमच्याकडे परतावयाचे आहे. [१३६]

وَتَقَطَّعُوٓا۟ أَمْرَهُم بَيْنَهُمْ ۖ كُلٌّ إِلَيْنَا رَٰجِعُونَ ﴿٩٣﴾

९४. तेव्हा जो सत्कर्म करील आणि तो मोमीन (ईमान बाळगणारा) हि असेल तर त्याच्या प्रयत्नाची उपेक्षा केली जाणार नाही [१३७] आणि हे आम्ही लिहीत आहोत.[१३८]

فَمَن يَعْمَلْ مِنَ ٱلصَّٰلِحَٰتِ وَهُوَ مُؤْمِنٌ فَلَا كُفْرَانَ
لِسَعْيِهِۦ وَإِنَّا لَهُۥ كَٰتِبُونَ ﴿٩٤﴾

९५. आणि ज्या वस्तीला आम्ही नष्ट केले तिच्याकरीता हराम आहे की तिच्यात वास्तव्य करणारे परत यावेत.[१३९]

وَحَرَٰمٌ عَلَىٰ قَرْيَةٍ أَهْلَكْنَٰهَآ أَنَّهُمْ لَا يَرْجِعُونَ ﴿٩٥﴾

९६. येथपावेतो की याजूज माजूज बंधनमुक्त केले जातील, आणि ते प्रत्येक उंची वरून येऊ लागतील. [१४०]

حَتَّىٰٓ إِذَا فُتِحَتْ يَأْجُوجُ وَمَأْجُوجُ وَهُم مِّن كُلِّ
حَدَبٍ يَنسِلُونَ ﴿٩٦﴾

९७. आणि सत्य वायदा जवळ येऊन ठेपेल, [१४१] तेव्हा अचानक त्या लोकांचे नेत्र विस्फारलेल्या स्थितीतच राहतील, ज्यांनी कुफ्र केले होते [१४२] ते उद्‌गारतील अररे ! आम्ही या बाबत गफलतीत राहीलो. किंबहुना आम्ही अपराधी होतो. [१४३]

وَٱقْتَرَبَ ٱلْوَعْدُ ٱلْحَقُّ فَإِذَا هِىَ شَٰخِصَةٌ أَبْصَٰرُ ٱلَّذِينَ
كَفَرُوا۟ يَٰوَيْلَنَا قَدْ كُنَّا فِى غَفْلَةٍ مِّنْ هَٰذَا بَلْ
كُنَّا ظَٰلِمِينَ ﴿٩٧﴾

९८. तुम्ही आणि त्या वस्तू ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून पूजा करता, जहन्नमचे इंधन आहे. [१४४] अपरिहार्यतः तुम्हाला त्या ठिकाणी पोहचायचे आहे.

إِنَّكُمْ وَمَا تَعْبُدُونَ مِن دُونِ ٱللَّهِ
حَصَبُ جَهَنَّمَ أَنتُمْ لَهَا وَٰرِدُونَ ﴿٩٨﴾

९९. खरोखर हे (देव) असते तर त्या ठिकाणी पोहचले नसते आणि सर्वांना सदैव त्यात रहावयाचे आहे.[१४५]

لَوْ كَانَ هَٰٓؤُلَآءِ ءَالِهَةً مَّا وَرَدُوهَا ۖ
وَكُلٌّ فِيهَا خَٰلِدُونَ ﴿٩٩﴾

१३३. हे समस्त पैगंबरानना उद्देशून आहे आणि जन-समूहाशी अभिप्रेत असे लोक होत ज्यांनी त्यांच्या मार्गाचे अनुसरण केले. अर्थात समस्त पैगंबरांचे अनुयायी मग ते वेगवेगळ्या समूहांत विभागलेले का असेनात, खरे पाहात एकेश्वरवादी जनसमूह होय, कारण त्या सर्वांचा धर्म एकच धर्म (इस्लाम) आहे.

१३४. म्हणजे समस्त पैगंबरांना व त्यांच्या माध्यमान्वये त्यांच्या अनुयायीना एकेश्वरवादाचीच, शिकवण दिली गेली होती.

१३५. म्हणजे लोकांना जो धर्म पैगंबरांद्वारे लाभला होता तो केवळ एकच धर्म अर्थात इस्लाम होता परंतु लोकांनी आपल्यातर्फे हलाल गोष्टींना हराम व हराम गोष्टींना हलाल मध्ये परिवर्तित केले अशा प्रकारे धार्मिक प्रथांचे जेव्हा वेगवेगळे संघ तयार झाले तेव्हा त्यांची नावे देखील वेगवेगळी ठेवलीत व याच आधारावर गटबाजी ही झाली.

या वस्तुस्थितीस डोळ्यासमोर ठेवून व अनेक धर्मांना पाहून या धोक्यास बळी पडू नये की प्रत्येक धर्म हा ईश्वर-प्रणित धर्म आहे. किंबहुना हे लोकांनी स्वत:घडविलेले धर्म आहेत.

१३६. म्हणजे धर्मात एवढे मतभेद असतांनाहि सर्वांना एक दिवस ईश्वरासमोर हजर व्हावयाचे आहे. त्या दिवशी कळेल की खऱ्या अर्थाने अल्लाहचा धर्म कोणता होता आणि लोक कशा प्रकारे सारवासरव करीत राहीले.

१३७. म्हणजे धर्मांच्या या ओढाताणीत अल्लाहजवळ जी गोष्ट माणसाच्या कर्माकरीता स्विकृतिचे जे स्तर ठरेल ते नेक आमाल (सत्कर्मे) असतील. जी त्याने ईमान बाळगून पार पाडले असतील इतर धर्मानुसारणाने नव्हे.

स्पष्ट असावे की सत्कर्मे अल्लाहच्या शरीयतीपासून मुक्त केली जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ तीच नमाज स्विकृत ठरेल जी शरीयतनुसार अदा केली गेली असेल या खेरीज ज्या स्थितीतहि अदा केली गेली असेल नमाज ठरणार नाही आणि ना तिची गणना सत्कर्मात होईल किंबहुना शरीयत विरूद्ध पद्धतिचा अंगिकार केल्याने असा मनुष्य अपराधी ठरेल. तसेच कर्म-स्विकृतिकरीता ही अट देखील आहे की मनुष्य मोमीन ( ईमान बाळगणारा) असावा अर्थात हे की तो त्या सर्व गोष्टीना अंत:करणापासून मानत असावा व कबूल करत असावा ज्यावर ईमान राखण्याचे आवाहन पवित्र कुरआन देत आहे.

१३८. म्हणजे त्याच्या कर्माचे रेकार्ड तयार करीत आहे.

१३९. म्हणजे एखाद्या उध्वस्त वस्तीचे लोक पुन्हा जगात येऊ शकत नाही की त्यांना पुनश्च सुधारणेची संधी मिळावी त्यांचे परतणे कियामती पावेतो शक्य नाही आणि जेव्हा ही वस्तुस्थिती आहे तर लोकांनी सावध झाले पाहिजे व या प्रसंगास भाग्य समजले पाहीजे जो त्यांना आपल्या सुधारणेसाठी मिळत आहे.

१४०. याजूज माजूज चे स्पष्टीकरण सूरह कहफ टीप क्र. ११८ मध्ये केले गेले आहे त्यात आम्ही हे स्पष्ट केले आहे की हे काकेशन(Caucasus) पर्वताच्या उत्तरेस वसलेले जंगली कबीले होते. जे दर्रयेदारयालला पार करून येत व रक्तपात करीत. त्यांचे हल्ले थोपविण्यासाठी जवळच राहणाऱ्या एका जन समूहाच्या विनंती वरून जुलकर्नेन यांनी लोखंडी भिंत उभारली होती ज्यामुळे याजूज माजूजचा मार्ग बंद झाला होता.

काळाच्या स्थित्यंतराच्या परिणाम स्वरुपी ही भिंत अडथळा राहीली नाही कारण दुसरे मार्ग मोकळे झाले आहेत आणि ना याजूज नावाने एखादा जन-समूह ओळखला जातो यास्तव कुरआनाचे हे भाकीत की याजूज माजूज बंधन-मुक्त केले जातील जेव्हा सत्य घडून येईल तेव्हा याचे स्पष्टीकरण (खरी हकीगत) स्पष्ट होईल केवळ अनुमाना आधारे काही सांगणे योग्य ठरणार नाही आणि ना त्या कथनांवर (रिवायतीवर) विश्वास करणे योग्य ठरेल. जी ना प्रमाणाच्या दृष्टीने निकोप स्तरावर खरे ठरतात आणि ना त्यातला मजकूर दोष विरहित आहे उदाहरणार्थ तिर्मिजीचे हे हदीस वचन की याजूज माजूज दररोज त्या भिंतीला खोदत असतात आणि जेव्हा त्यात छिद्र पाडण्याच्या बेतात असतात तेव्हा त्यांचा सरदार म्हणतो, परत चला, उद्या याला छिद्र पाडू परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यास दुरुस्त करतो. अशा प्रकारे ते रोज खोदत असतात. येथपावेतो की जेव्हा निर्धारीत वेळ येईल तेव्हा त्यांचा सरदार म्हणेल परत चला, अल्लाहने इच्छिल्यास उद्या याला छिद्र पाडू दुसऱ्या दिवशी त्यांना भिंत त्याच स्थितीत आढळेल ज्या अवस्थेत त्यांनी सोडली होती. म्हणून ते याला छिद्र पाडून बाहेर येतील.इमाम तिचर्मिजी यांनी या कथनास अबवाब तफसीर मध्ये सूरह कहफच्या संदर्भात उल्लेखिले आहे आणि असे लिहीले आहे की हे हदीस वचन 'हसन' 'गरीब' आहे आणि आम्ही अशाच प्रमाण पद्धतिनुसार अशा गोष्टी जाणत असतो वस्तुत: हे हदीस-वचन ना प्रमाण दृष्ट्या योग्य आहे, ना मजकूराच्या दृष्टीने यास्तव प्रसिद्ध भाष्यकार अल्लामा (विद्वान ) इब्न कसीर आपल्या भाष्यात लिहितात-

'या हदीस वचनातील मजकूरास पैगनबरांची उक्ति ठरविणे अयोग्य आहे कारण आयतीचा बाह्यार्थ या गोष्टीस

प्रमाणित करतो की ते ना या भिंतीवर तिच्या मजबूतीमुळे चढू शकतात आणि ना तिला खोदू शकतात. परंतु कआब अहबार पासून अशा प्रकारची कथने उलिलखित आहेत आणि असे दिसते की अबु हुरैरा यांनी त्यांच्यापासून हे (इस्त्रायली) कथन घेतले. कारण ते यांच्या सोबत अधिक बसत व (इस्रायली किस्से) वर्णन करीत असत तेव्हा अबु हुरैरा यांनी हा किस्सा सांगितला असेल, पण काही कथनकर्त्यांना हा भ्रम झाला असेल की हे कथन पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचीच उक्ति होय 'वल्लाहु आ अलम'तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. १०५ ) तिर्मिजींच्या या हदीस वचनाचे एक निवेदक अबू अवाना हे आहेत ज्यांच्या विषयी हदीस-विद्वानांनी हे स्पष्टीकरण दिले आहे की जेव्हा ते आपल्या स्मरणशक्तिने एखादे हदीस वचन निवेदन करतात तेव्हा प्रसंगी चूक करतात (तहजीबुत्तहजीब खंड ११ पृ ११६ ते १२०)

आश्चर्य वाटते की एका अशा कथनास जे कुरआनाच्या बाह्य अर्थाच्याविरुद्ध आहे व ज्याची अयोग्यता अगदी स्पष्ट आहे तिर्मिजीत स्थान लाभले! हदीस वचनाचे हे प्रमाण भूत ग्रंथ अशा निराधार कथनापासून मुक्त असते तर बरे झाले असते!

कुरआआनाच्या या आयतींवर त्यातल्या मजकूरावर तसेच सूरह कहफच्या त्या आयतींवर ज्यात याजूज माजूजचा उल्लेख केला गेला आहे. विचार चिंतन केल्यावर जी गोष्ट लक्षात येते ती अशी की जन-समूहांचा विनाश-क्रम त्याच्या कुफ्र व अत्याचारामुळे जगात चाल राहील, येथपावेतो की हे जग आपल्या विनाशाच्या अंतिम अवस्थेप्रत पोहचेल त्या वेळी जगात दोन महा उपद्रवी शक्ति उदयास येतील जे मूलभूत दृष्ट्या याजूज माजूज असतील (मग जग त्यांना) कोणत्याहि नावाने ओळखत असो) हे जमीनीच्या उच्च भागा (उत्तरे) कडून निघतील आणि केवळ मुसलमानामध्येच नव्हे तर संपूर्ण जगात उत्पात माजवतील असे दिसते की त्याचे हे आर्क्रमण विश्वयुद्धाचे स्वरुप धारण करील व त्याच्या सोबत जगाचा सर्वनाश करण्याची भरपूर साधन सामुग्री असेल (संभवत:अत्याधुनिक न्यूक्लीयर प्रक्षेपणास्त्र कारण काही हदीस वचनांमध्ये त्याच्याद्वारे आकाशात बाण सोडण्याचा उल्लेख आहे) म्हणून ते फार मोठ्या प्रमाणात मानव-वस्तींचा विनाश करीत आगेकूच करतील अशा प्रकारे त्यांच्या जनसमूहांचा अंतिम विनाश होईल व त्यानंतर याच कयामतच प्रस्थापित होईल.

१४१. अभिप्रेत कियामतीचा वायदा होय म्हणजे याजूज माजूजच्या उदयानंतर कियामत फार लवकर घडून येईल. तात्पर्य त्या वेळी मानव-जाति मरणाच्या दाराशी असेल.

१४२. म्हणजे जेव्हा कियामत कायम होईल व सर्वांना जिवंत करून उठविले जाईल तेव्हा काफिरांच्या दृष्टीने ही घटना अनपेक्षित असेल यास्तव त्यांचे डोळे आश्चर्य व भयातिरेकाने विस्फारलेल्या स्थितीतच राहतील.

१४३. म्हणजे कियामतीच्या दिवशी काफीर आपण गफलतीत पडून राहण्याचे तर मान्य करतीलच तसेच आपण गून्हेगार असल्याचेहि मान्य करतील. यावरून असे दिसून येते की अखिरत वर ईमान राखण्यात सर्वात मोठा अडसर म्हणजे माणसाची गफलत होय व ती देखील अशी की अपराधात्मक स्वरुपाची, म्हणजे अखिरतची प्रमाणे स्पष्ट झाल्यानंतर देखील मनुष्य तिला मान्य करण्यास अशासाठी तयार होत नाही की तिला मानण्याच्या स्थितीत तो ऐच्छीक जीवन जगू शकत नाही. अशा प्रकारे त्याच्या इच्छा-आकांक्षा त्याचे लक्ष अखिरत कडून वळवून त्याला ऐहीक जीवनात व्यस्त राखतात.

१४४. हे अनेकेश्वरवाग्यांना संबोधून आहे की तुम्ही व तुमची ही दैवते ज्यांची तुम्ही भक्ति-आराधना करता, जहन्नमचे इंधन बनतील. दैवतांना अशासाठी जहन्नममध्ये पोहचविले जाईल की त्यांच्या भक्तांना ही जाणीव व्हावी की ज्यांची ईश्वर समजून ते पूजा करीत राहीले. ते त्यांच्या काही कामी येण्याचे तर राहीले,किंबहुना त्यांच्या शिक्षेत वाढ होण्यास कारणीभूत ठरले. किती दु:खदायक असेल तो प्रसंग जेव्हा खोट्या ईश्वरांचे भक्त आपल्या देवतांसमेत आगीत जळत असतील. एका उर्दू कवीच्या म्हणण्यानुसार-

**'हम तो डूबे है सनम तुमको भी ले डूबेंगे'**

(आम्ही तर बुडालोच आहोत पण सोबत तुम्हालाही बुडवू)

मूर्तिपूजकांनी जहन्नमच्या या दृश्याची कल्पना जर केली तर अनेकेश्वर भक्ति पासून ते परावृत्त होतील.

या ठिकाणी हा प्रश्न निरर्थक होय की जर दैवतांना ही जहन्नमचे इंधन बनविले जाईल तर पैगंबरांना देखील लोकांनी दैवत बनविले होते. मग त्यांचे काय होईल? एकतर कुरआनाने 'ज्या वस्तूंची तुम्ही पूजा करता' हे शब्द वापरले आहेत. त्यातला 'मा' हा शब्द निर्जीव वस्तूंसाठी प्रयोजिला जातो आणि या ठिकाणी मूर्ति व जड पदार्था सारख्या वस्तूच अभिप्रेत आहेत. ज्यांची अनेकेश्वर वादी पूजा करीत राहीले. दुसरे असे की कूरआनाने पुढे आयत क्र. १०१ मध्ये हे स्पष्ट केले आहे की,

إِنَّ الَّذِينَ سَبَقَتْ لَهُم مِّنَّا الْحُسْنَىٰ أُولَٰئِكَ عَنْهَا مُبْعَدُونَ

''ज्या लोकां करीता आमच्या तर्फे चांगल्या परिणतिचा

वायदा केला गेला आहे त्यांना यापासून दूर ठेवण्यात येईल. तसेच कुरआनात अन्य ठिकाणीहि पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांविषयी त्यांना जहन्नमच्या आगी पासून सुरक्षित राखले जाण्याची व जन्नत मध्ये दाखल केले जाण्याची गोष्ट एवढ्या अधिकतेने निवेदिली गेली आहे की कसल्याहि प्रकारच्या गैरसमजूतास किंचित मात्र वाव रहात नाही.

१४५. म्हणजे मूर्ति हि व त्यांचे भक्त देखील नेहमी जहन्नम मध्येच राहतील. इथे हा पैलू चिंतनीय होय की कुरआन आखिरत मध्ये होणाऱ्या मूर्ति पूजकांची परिणति त्यांच्या समक्ष सरळ व स्पष्ट शब्दात निवेदन करते. यास्तव इस्लामच्या आवाहकानेहि शिर्क व मूर्तिपूजेविरुद्ध हीच स्पष्ट शैली अंगिकारली पाहिजे आणि निर्धास्तरित्या त्यांची आखिरतची परिणती निवेदन केली पाहिजे. मग अगणित मूर्ति पूजकांना ते कितीहि कटू वा अप्रिय लागो. डाक्टरचे काम योग्य रित्या इलाज करणे हे होय. मग यासाठी त्याला कडू औषध द्यावे लागो अथवा इंजेक्शन द्यायची वेळ येवो.

१००. त्या ठिकाणी ते ओरडत किंचाळत राहतील आणि काहीच ऐकणार नाहीत.

لَهُمْ فِيهَا زَفِيرٌ وَهُمْ فِيهَا لَا يَسْمَعُونَ ﴿١٠٠﴾

१०१. मात्र ज्या लोकांकारीता आमच्या तर्फे चांगल्या परिणतिचा वायदा आधीच केला गेला आहे [१४६] त्यांना या पासून दूर ठेवले जाईल.

إِنَّ الَّذِينَ سَبَقَتْ لَهُم مِّنَّا الْحُسْنَىٰ أُولَٰئِكَ
عَنْهَا مُبْعَدُونَ ﴿١٠١﴾

१०२. त्यांना याची चाहूल सुद्धा ऐकू येणार नाही व आपल्या ऐच्छिक सुखामध्ये सदैव राहतील.

لَا يَسْمَعُونَ حَسِيسَهَا وَهُمْ فِي مَا اشْتَهَتْ أَنفُسُهُمْ
خَالِدُونَ ﴿١٠٢﴾

१०३. त्यांना (या दिवसाची) मोठी उद्विग्नता त्रस्त करणार नाही आणि फिरिशते त्यांचे स्वागत करतील की हा आहे तुमचा तो दिवस ज्याचा तुमच्याशी वायदा केला जात होता.[१४७]

لَا يَحْزُنُهُمُ الْفَزَعُ الْأَكْبَرُ وَتَتَلَقَّاهُمُ الْمَلَائِكَةُ هَٰذَا يَوْمُكُمُ
الَّذِي كُنتُمْ تُوعَدُونَ ﴿١٠٣﴾

१०४. ज्या दिवशी आम्ही आकाशाला अशा प्रकारे लपेटू ज्या प्रमाणे पृष्ठांना गठ्ठ्यात लपेटले जाते. [१४८] ज्या प्रकारे आम्ही तिची पुनरावृत्ति करू. हा वायदा आहे. आमच्यावर बंधनकारक. आम्ही हे काम करणारच.

يَوْمَ نَطْوِي السَّمَاءَ كَطَيِّ السِّجِلِّ لِلْكُتُبِ ۚ كَمَا بَدَأْنَا أَوَّلَ
خَلْقٍ نُّعِيدُهُ ۚ وَعْدًا عَلَيْنَا ۚ إِنَّا كُنَّا فَاعِلِينَ ﴿١٠٤﴾

१०५. आणि जबूर मध्ये आम्ही उपदेशानंतर लिहिले होते की जमीनीचे वारस आमचे नेक (सदाचारी) दास असतील. [१४९]

وَلَقَدْ كَتَبْنَا فِي الزَّبُورِ مِن بَعْدِ الذِّكْرِ أَنَّ
الْأَرْضَ يَرِثُهَا عِبَادِيَ الصَّالِحُونَ ﴿١٠٥﴾

१०६. यात मोठी खुशखबरी आहे त्या लोकांकरिता, जे इबादत करणारे आहेत. [१५०]

إِنَّ فِي هَٰذَا لَبَلَاغًا لِّقَوْمٍ عَابِدِينَ ﴿١٠٦﴾

१०७. आणि (हे पैगंबर) आम्ही तुम्हास इहलोक वासीयांकरिता परिपूर्ण कृपा बनवून पाठविले आहे .[१५१]

وَمَا أَرْسَلْنَاكَ إِلَّا رَحْمَةً لِّلْعَالَمِينَ ﴿١٠٧﴾

१०८. सांगा, माझ्याकडे हीच 'वह्य'( ईश-आदेश) पाठविली जात आहे की तुमचा ईश्वर एकच ईश्वर आहे [१५२] तर काय तुम्ही मुस्लिम होता? (त्याचे आज्ञाधारक दास बनता?)

قُلْ إِنَّمَا يُوحَىٰ إِلَيَّ أَنَّمَا إِلَٰهُكُمْ إِلَٰهٌ وَاحِدٌ ۖ فَهَلْ أَنتُم
مُّسْلِمُونَ ﴿١٠٨﴾

१४६. म्हणजे प्रामाणिक ईमानधारक व अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांकरीता ज्यांचे संपूर्ण जीवन सदाचार-युक्त होते.

१४७. ह्या आयती ही गोष्ट स्पष्ट करतात की जे लोक अल्लाह तर्फे केल्या गेलेल्या जन्नतच्या वायद्यास पात्र ठरतील, त्यांना कियामतीच्या दिवशी कोणताहि त्रास उदभवणार नाही व त्यांना जहन्नम पासून एवढे लांब राखले जाईल की तिचा मंद स्वर देखील त्यांच्या कानावर येणार नाही. यावरुन या विचाराचे खंडन होते की प्रामाणिक मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) लाहि जहन्नम जवळून जावे लागेल. कुरआनात दुसऱ्या एका ठिकाणी फर्माविले गेले आहे-

فَأَمَّا مَنْ أُوتِيَ كِتَابَهُ بِيَمِينِهِ فَسَوْفَ يُحَاسَبُ حِسَابًا يَسِيرًا ـ (سورۃ الانشقاق ۷ـ۸)

'तर ज्याचा कर्म-लेख त्याच्या उजव्या हातात दिला जाईल, त्याच्याकडून सोपा हिशेब घेतला जाईल' (सूरह इन्शिकाक ७-८)

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मरयम टीप क्र. ९५.

१४८. म्हणजे कियामतीच्या दिवशी आकाशाचे अंथरुण गुंडाळले जाईल यासाठी की या जगाच्या ठिकाणी एक नवे विश्व, नव्या व्यवस्थेसह आस्तित्वात आणले जावे.

भौतिकवादी लोक सृष्टीला शास्वत समजतात, परंतु कुरआन तिचा आरंभहि दर्शविते व अंत देखील.

जर जगात एखाद्या गोष्टीच्या उभारणीचा आरंभ भग्नता व अस्ताव्यस्ततेने होतो तर नव-विश्वाच्या निर्मिती करीता वर्तमान कालीन भग्नता व अस्वाव्यस्तता मुळीच आश्चर्यजनक नाही आणि ना ही गोष्ट आश्चर्य करण्या जोगी आहे की एखाद्या प्रगत सृष्टीने या सृष्टीची जागा घ्यावी. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह इब्राहीम टीप क्र. ७१.

१४९. जमीनीशी अभिप्रेत जन्नतची जमीन होय. जसे सूरह जुमरच्या आयत क्र. ७४ वरुन स्पष्ट होते-

وَأَوْرَثَنَا الْأَرْضَ نَتَبَوَّأُ مِنَ الْجَنَّةِ حَيْثُ نَشَاءُ ـ

'आणि आम्हाला जमीनीचा वारस बनविले गेले की जन्नतमध्ये वाटेल त्या ठिकाणी रहावे'

आणि तिचा वारस असणाचा अर्थ असा की ही जमीन जी सदैवकाळ असेल व आपल्या उत्कृष्ट गुणवैशिष्ट्यांमुळे अगदी अनुपमेय असेल, अल्लाहच्या सदाचारी दासांच्या वाट्याला येईल. त्यांनाच तिच्यावर वसवले जाईल व त्यांनाच तिच्यावर अधिकार प्राप्त होईल.

आयतीत जबूरचा हवाला दिला गेला आहे. जो हजरत दाऊद यांच्यावर अवतरला होता. याद्वारे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जेथपावेतो आजच्या जमीनीच्या अधिकाराचा संबंध आहे ती एक कसोटीची गोष्ट होय व तिचा अधिकार ईश्वराशी गाफील असलेल्या लोकांनाहि प्राप्त होते व सदाचारी दासांनाहि. यास्तव पैगंबर दाऊद यांना खलीफा (प्रतिनिधी) बनविले गेले होते. राहीले सदैवकालीन यश तर जो ग्रंथ त्याना प्रदान केला गेला होता त्यात ईश्वर व आखिरत संबंधी उजळणी करीत सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्मान लिहिले होते की शेवटी जमीनीचे वारस माझे सदाचारी दास राहतील. आजच्या जबूर मध्ये जो बायबलच्या संग्रहात समाविष्ट आहे, या मजकूराची एक झळक मात्र दिसून येते. जेथपावेतो जिक्र म्हणजे स्मरणिकेचा संबंध आहे जबूरचे खालील उद्‌धृत उतारे पहा-

'परमेश्वरावर भाव ठेव व सदाचाराने वाग, देशात वस्ती करून राहा, इमानाने चाल, म्हणजे परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल तो तुझे मनोरथ पूर्ण करील.' (स्तोत्र संहिता ३७: ३-४)

'वाइटा पासून दूर राहा. बरे ते कर, म्हणजे तुझी वस्ती कायम राहील. कारण परमेश्वराला न्याय प्रिय आहे; तो आपल्या भक्तांस सोडीत नाही, त्यांचे रक्षण सर्वकाळ होते.'(स्तोत्रसंहिता ३७: २७, २८)

राहीले जमीनीच्या वारसाधिकाराचे फर्मान तर स्तोत्रसंहीतेचा उल्लेख असा-

'नीतिमान पृथ्वीचे वतन पावतील, तिच्यात ते सर्वदा वास करितील. (स्तोत्रसंहिता ३७: २९)

'परमेश्वराची प्रतिक्षा कर व त्याच्या मार्गाचे अवलंबन कर, म्हणजे तो तुझी उन्नति करून तुला पृथ्वीचे वतन देईल.'

(स्तोत्रसंहिता ३७:३४)

'नेहमी वसलेले राहतील' हे शब्द प्रमाणित करतात की जमीनीशी अभिप्रेत जन्नतचीच जमीन होय आणि भाष्यांतर्गत आयतीच्या आधी (आयत १०४ मध्ये) जो मजकूर निवेदिला गेला आहे तो आखिरत संबंधीच आहे यास्तव संभाषण प्रसंग प्रमाण आहे की येथे अभिप्रेत जन्नतचीच जमीन होय.

१५०. इबादत करणारे याचा अर्थ असा की अल्लाहचेच उपासक व त्याचे एकनिष्ठ दास बनून राहतील. व सदाचारी लोकांशी वायदा होता, या ठिकाणी उपासना करणाऱ्या लोकांना खुशखबरी दिली गेली. तात्पर्य एक वैशिष्ट्य दुसऱ्या वैशिष्ट्याचे स्पष्टीकरण आहे.

१५१. अर्थात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)यांना अल्लाह तर्फे पाठविले जाणे इहलोक वासीयांकरीता कृपा

कारक होय. कारण त्यांच्या द्वारे लोक आपल्या पालनकर्त्याचा खरा परिचय प्राप्त करतील व त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवन व्यतीत करून त्याच्या कृपेस, पात्र ठरतील.

'इहलोकवासीयांकरिता'चा अर्थ असा की पैगंबरांचे प्रेषित्व एखाद्या विशिष्ट जनसमूह किंवा देश वा काळापुरते नाही, किंबहुना जगातल्या सर्व जन-समूहांकरिता आणि यावच्चंद्रदिवाकरौ संपूर्ण मानव जाति करिता आहे, म्हणून पैगंबरांची कृपा सार्वत्रिक आहे आणि सर्वांसाठी आपण कृपा स्वरुप पैगंबर होत. जर लोक या कृपेच्या लाभापासून स्वत:च वंचित राहू इच्छित असतील तर आपल्या दुष्परिणतिस ते स्वत:च जबाबदार राहतील. हवा, पाणी व प्रकाश एखाद्या विशिष्ट जन-समूहाकरिता नाही, किंबहुना कसल्याहि भेदभावाशिवाय ,सर्वांकरीता आहे. परंतु जर एखादा मनुष्य आपल्या पालनकर्त्याच्या या देणग्यांशी पक्षपात करू लागेल व आपले नाक बंद करील तर त्याचे गुदमरून मरणे अपरिहार्य आहे. तसेच जो मनुष्य पाण्यापासून पळ काढील तो तहानेने व्याकूळ होऊन मरेल आणि प्रकाश पासून डोळे मिटणारा अंध:कारात भटकत राहील. याच कारणास्तव कृपा स्वरूप पैगंबराच्या आगमनानंतरहि जगातील अधिकांश लोक या कृपेच्या लाभापासून वंचित आहेत.

१५२. म्हणजे माझ्याकडे जी 'वह्य' अवतरीत होत आहे ती केवळ एकेश्वरवादाचीच शिकवण देते. असा एकेश्वरवाद की ज्याने प्रत्येक प्रकारच्या शिर्कचा नकार होतो.


وما أرسلناك إلا رحمة للعالمين

فَإِنْ تَوَلَّوْا فَقُلْ اٰذَنْتُكُمْ عَلٰى سَوَآءٍ ۭ وَاِنْ اَدْرِيْٓ
اَقَرِيْبٌ اَمْ بَعِيْدٌ مَّا تُوْعَدُوْنَ ۝١٠٩

१०९. जर ते तोंड फिरवितात तर त्यांना सांगा, मी तुम्हाला उघडरित्या खबरदार केले आहे. आता मी नाही जाणत ज्या गोष्टीचा तुमच्याशी वायदा केला जात आहे ती जवळ आहे किंवा दूर. [१५३]

اِنَّهٗ يَعْلَمُ الْجَهْرَ مِنَ الْقَوْلِ وَيَعْلَمُ مَا تَكْتُمُوْنَ ۝١١٠

११०. निःसंशय तो जाणतो त्या गोष्टीलाहि जी उघडपणे बोलली जाते व त्या गोष्टीसहि जी तुम्ही लपविता. [१५४]

وَاِنْ اَدْرِيْ لَعَلَّهٗ فِتْنَةٌ لَّكُمْ وَمَتَاعٌ اِلٰى حِيْنٍ ۝١١١

१११. आणि मला नाही माहित. संभवतः ही तुमच्या करीता कसोटी व एका निर्धारीत वेळ पावेतो ऐहीक लाभाची सामुग्री असावी. [१५५]

قٰلَ رَبِّ احْكُمْ بِالْحَقِّ ۭ وَرَبُّنَا
الرَّحْمٰنُ الْمُسْتَعَانُ عَلٰى مَا تَصِفُوْنَ ۝١١٢

११२. (पैगंबरानी) दुआ (प्रार्थना) केली हे माझ्या पालनकर्त्या, सत्यासह निर्णय कर. [१५६] आणि आमचा पालनकर्ता रहमान आहे ज्याच्याकडून मदत मागितली गेली आहे. अशा गोष्टींच्या विरोधात ज्या तुम्ही रचतात. [१५७]

१५३. हे मार्गदर्शन पैगबराना केले जात आहे की जर तुमचा जन-समूह एकेश्वर वादाचे आवाहन कबूल करण्यास नकार दर्शवितो तर त्याला हे स्पष्ट सांगा की तुम्ही इन्कार केल्याने अल्लाहचा शिक्षेचा वायदा निश्चितपणे पूर्ण होईल. परंतु तो लवकर पूर्ण होईल किंवा काही काळानंतर याचे ज्ञान मला नाही.

या आयतीद्वारे साफ जाहीर होते की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना या गोष्टीचे ज्ञान नव्हते की काफीरांवर ईश-शिक्षा केव्हा अवतरीत होईल. पवित्र कुरआनात एवढ्या स्पष्ट आयती (वचने) असतांनाहि 'अपरोक्ष ज्ञान' (इल्मे गैब) विषयी वाद करण्यात कोणते शहाणपण आहे ज्यात मुसलमानांचा एक समूह व्यस्त आहे.

१५४. म्हणजे तुमच्या बाह्य व अंतरंगास अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो आणि तो आपल्या ज्ञानाच्या आधारावर फैसला करील.

१५५. ही गोष्ट पैगंबरांच्या मुखाने वदविली जात आहे की मला नाही ठाऊक की सर्वश्रेष्ठ अल्लाह कोणत्या हेतुस्तव शिक्षेला विलंब लावीत आहे शक्यतो ही तुमच्यासाठी कसोटी असावी आणि तुमच्या विनाशापूर्वी तुम्हाला आणखी काही दिवस जगात मौज मारण्याची संधी मिळत असावी!

१५६. यावरून असे दिसून येते की जेव्हा ही सूरह अवतरीत झाली. इस्लामचे आवाहन आपल्या अंतिम अवस्थेप्रत पोहचले होते. म्हणून पैगंबरांच्या मुखाद्वारे ही वचने जन-समूहावर प्रमाण प्रस्थापित झल्यानंतरच निघालीत, की सत्य यांना स्पष्टत: उमजले आहे परंतु हे इन्कार करण्यावर दृढ आहेत. तेव्हा हे अल्लाह आता तूच फैसला कर की सत्य प्रभावी व्हावे.

१५७. म्हणजे जे सत्य तुमच्या समोर सादर केले जात आहे त्याच्याविरुद्ध तुम्ही वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी करीत आहात तेव्हा ज्या गोष्टी तुम्ही रचता त्या संदर्भात आम्ही परम दयाळू अशा अल्लाहकडे फिर्याद करीत आहोत की त्याने आम्हास सहाय्य करावे व सत्य-मार्गात आमचे पाऊल स्थिर करावे.

# सूरह अल हज्ज

# २२.सूरह अल हज्ज

**नाव:** २७ क्र. मध्ये हज्जच्या सार्वत्रिक घोषणेचा उल्लेख केला गेला आहे. तदनुषंगाने या सूरहचे नाव 'अलहज्ज' असे आहे.

**अवतरण काळ:** मदनी आहे आणि मजकूरांवरून असे दिसून येते की हिजरी सन १ मध्ये हज्जच्या निकटच्या कालावधीत अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** काबागृहाची उभारणी व हज्जचे इस्लामी धर्मशास्त्रानुसार असणे ज्या हेतुंसाठी होते ते असे की त्याची नवनिर्मिती करणे व या एकेश्वरवादीय केंद्रास अनेकेश्वर वाघांच्या नियंत्रणातून सोडवून मुस्लिम जनसमूहाच्या हवाली करणे.

**आयत रचना:** क्र.१ ते ४ प्रस्तावना रुप आयती होत ज्यात सर्व सामान्य माणसांना संबोधून कियामतीच्या तीव्र आघातापासून सावध केले गेले आहे, तसेच याविषयीहि सावध केले गेले आहे की सैतानाच्या संकेतान्वये किती तरी लोक ईश्वराबाबत निराधार गोष्टी व मार्गभ्रष्ट करणाऱ्या विवादात गुरफटत राहतात. परिणामी, कियामतीच्या दिवशी ते धगधगत्या आगीत जाऊन पडतील.

आयत क्र.५ ते १० मध्ये मरणोत्तर जीवना विषयी युक्तिवाद व ईश्वराविषयी लोक मार्ग भ्रष्टतेच्या ज्या गोष्टी करतात त्याचा परिणाम.

आयत क्र.११ ते २४ मध्ये ईश्वराच्या अप्रामणिक उपासनेस निरर्थक ठरवित शिर्कचे खंडन केले गेले आहे. तसेच इन्कार करणाऱ्यांच्या दुखदायक परिणातिस व प्रामाणिक ईमान बाळगणाऱ्यांच्या आनंददायक परिणातिस अतिशय परिणामकारकरित्या सादर केले गेले आहे.

आयत क्र. २५ ते ३७ मध्ये ही गोष्ट लक्षात घेता की अनेकेश्वर वाद्यांनी ईमान बाळगणाऱ्या करिता मस्जिदे हराम व हज्जे बैतुल्लाह (काबागृहाचे) मार्ग बंद केले आहे. या ऐतिहासिक सत्यास प्रकट केले गेले आहे की काबागृहाची उभारणी करणाऱ्याची एकमेव ईश्वराच्या उपासने करिता याची उभारणी केली होती व याच हेतुस्तव हज्ज यात्रेची सार्वत्रिक घोषणा केली होती. त्याच बरोबर हज्जचे धार्मिक विधी व त्यातल्या सारतत्वास प्रकट केले गेले आहे.

आयत क्र. ३८ ते ४१ मध्ये मदीनेच्या मुसलमानांना ही अनुज्ञा दिली गेली की त्यांनी मस्जिदे हराम (काबा) ला अनेकेश्वर वाघांच्या कब्जातून सोडवण्याकरिता त्यांच्याशी धर्मयुद्ध करावे आणि हे की अल्लाह त्याची मदत करील व त्यांना सत्ताधिकार प्रदान करील.

आयत क्र. ४२ ते ४८ मध्ये ईश-शिक्षेसाठी घाई करणाऱ्यांचे लक्ष, अत्याचारी जन समूहांच्या विनाशाच्या घटनांकडे वेधविले गेले आहे.

आयत क्र. ४९ ते ५७ मध्ये हे स्पष्ट केले आहे की पैगंबराचे काम खबरदार करणे हे आहे परंतु त्याच्या आवाहनात्मक प्रयत्नांविरुद्ध सैतान इतका कार्य-मग्न झाला जेवढा तो प्रत्येक पैगंबराच्या आवाहना विरुद्ध प्रचाराची मोहीम चालवीत राहीला. त्याच्या या प्रचाराने केवळ असेच लोक प्रभावित होतात ज्यांच्या मनात विकृति असते. अल्लाहच्या एकनिष्ठ दासांच्या ज्ञान व श्रद्धेत तर या खोट्या प्रचाराला पाहून अधिक वाढ होते.

आयत क्र. ५८ ते ६२ मध्ये त्या लोकांना खुशखबरी ऐकविली गेली आहे ज्यांनी अल्लाहच्या मार्गात हिजरत (स्थलांतर-देशत्याग केला होता.

आयत क्र. ६३ ते ६६ मध्ये अल्लाहचे ईश्वरत्व व त्याच्या उपकारांकडे लक्ष वेधविले गेले आहे.

आयत क्र. ६७ ते ७६ मध्ये आक्षेप घेणाऱ्यांच्या शंकांचे निवारण करीत शिर्क चे अवास्तव असणे स्पष्ट केले गेले आहे आणि अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची जाणीव करून देत पैगंबर-क्रमाच्या महत्तेवर प्रकाशाझोत टाकला गेला आहे.

आयत क्र. ७७ व ७८ समरोपाच्या आयती होत. ज्यात ईमान बाळगणाऱ्यांना त्या जाबाबदाऱ्या पार पाडण्याचीहि ताकीद केली गेली आहे ज्या त्यांच्याशी व त्यांच्या चरित्राशी संबंधित आहेत, व त्या जबाबदाऱ्यांनाहि ज्या अल्लाहच्या मार्गात धावपळ व लोकांसमोर त्याच्या धर्माची साक्ष देण्या संबंधी आहेत.

# २२. सूरतुल हज्ज

سُورَةُ الحَجّ

अनुवाद (आयती-७८)

परमदयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. लोक हो;[१] आपल्या पालनकर्त्याचे भय [२] बाळगा. किंयामतीचा भूकंप मोठी भयंकर गोष्ट आहे.[३]

يَا أَيُّهَا النَّاسُ اتَّقُوا رَبَّكُمْ ۚ إِنَّ زَلْزَلَةَ السَّاعَةِ شَيْءٌ عَظِيمٌ ①

२. ज्या दिवशी तुम्ही यास पहाल त्या दिवशी प्रत्येक दूध पाजणारी आपल्या दूध पिणाऱ्या बाळाला विसरेल आणि प्रत्येक गर्भवतीचा गर्भपात होईल व लोकांना तुम्ही पहाल की ते नशेत चूर आहेत, वास्तविक ते नशेत चूर नसतील, किंबहुना अल्लाहची शिक्षाच मोठी सक्त असेल.[४]

يَوْمَ تَرَوْنَهَا تَذْهَلُ كُلُّ مُرْضِعَةٍ عَمَّا أَرْضَعَتْ
وَتَضَعُ كُلُّ ذَاتِ حَمْلٍ حَمْلَهَا وَتَرَى النَّاسَ سُكَارَىٰ
وَمَا هُمْ بِسُكَارَىٰ وَلَٰكِنَّ عَذَابَ اللَّهِ شَدِيدٌ ②

३. आणि असेहि लोक आहेत जे अल्लाहच्या संदर्भात ज्ञानाशिवाय विवाद करतात [५]आणि प्रत्येक बंडखोर सैताना मागे लागतात.[६]

وَمِنَ النَّاسِ مَنْ يُجَادِلُ فِي اللَّهِ بِغَيْرِ عِلْمٍ
وَيَتَّبِعُ كُلَّ شَيْطَانٍ مَرِيدٍ ③

४. ज्याच्याकरिता ही गोष्ट विधिलेख आहे की जो कोणी त्याला मित्र बनवील त्याला तो मार्गभ्रष्ट केल्याखेरीज राहणार नाही व धगधगत्या जहन्नमच्या ईश-शिक्षेकडे नेईल.

كُتِبَ عَلَيْهِ أَنَّهُ مَنْ تَوَلَّاهُ فَأَنَّهُ يُضِلُّهُ
وَيَهْدِيهِ إِلَىٰ عَذَابِ السَّعِيرِ ④

५. लोक हो;जर तुम्हाला (मरणोत्तर) उठविले ज्याण्याबद्दल शंका आहे, तर (विचार करा) अम्ही तुम्हाला मातीतून निर्माण केले [७] मग वीर्याने, [८]नंतर रक्ताच्या गोळ्याने,[९] मग मांसाच्या तुकड्याने [१०] जो साकारहि असतो व निराकार देखील.[११](हे अशासाठी घडते) की तुम्हावर (आपल्या सामर्थ्य शक्तिची चमत्कृति) स्पष्ट करावी.[१२] आणि आम्ही ज्याला इच्छितो,पोटात एक निर्धारीत वेळेपर्यंत थांबवून ठेवतो.मग तुम्हाला बाळाच्या रुपाने बाहेर आणतो [१३] नंतर (तुमचे संगोपन करतो) जेणेकरुन तुम्ही आपल्या तारूण्या (च्या वया)प्रत पोहचावे. आणि तुमच्यापैकी एखाद्याचा अवधि तर ओधीच पूर्ण होतो, आणि एखादा वयाच्या निकृष्टतम दर्जास पोहचविला जातो.यासाठी की जाणून घेतल्या नंतर काहीच न जाणावे,[१४]आणि तुम्ही पाहता की जमीन कोरडी पडली आहे, मग जेव्हा आम्ही तिच्यावर पाण्याचा वर्षाव करतो,तेव्हा ती उमलू व फूलू लागते आणि प्रत्येक प्रकारची नयनरम्य वनस्पती उगवते.[१५]

يَا أَيُّهَا النَّاسُ إِنْ كُنْتُمْ فِي رَيْبٍ مِنَ الْبَعْثِ
فَإِنَّا خَلَقْنَاكُمْ مِنْ تُرَابٍ ثُمَّ مِنْ نُطْفَةٍ ثُمَّ مِنْ عَلَقَةٍ
ثُمَّ مِنْ مُضْغَةٍ مُخَلَّقَةٍ وَغَيْرِ مُخَلَّقَةٍ لِنُبَيِّنَ لَكُمْ
وَنُقِرُّ فِي الْأَرْحَامِ مَا نَشَاءُ إِلَىٰ أَجَلٍ مُسَمًّى
ثُمَّ نُخْرِجُكُمْ طِفْلًا ثُمَّ لِتَبْلُغُوا أَشُدَّكُمْ ۖ وَمِنْكُمْ مَنْ
يُتَوَفَّىٰ وَمِنْكُمْ مَنْ يُرَدُّ إِلَىٰ أَرْذَلِ الْعُمُرِ لِكَيْلَا
يَعْلَمَ مِنْ بَعْدِ عِلْمٍ شَيْئًا ۚ وَتَرَى الْأَرْضَ
هَامِدَةً فَإِذَا أَنْزَلْنَا عَلَيْهَا الْمَاءَ اهْتَزَّتْ
وَرَبَتْ وَأَنْبَتَتْ مِنْ كُلِّ زَوْجٍ بَهِيجٍ ⑤

१. हे सर्व सामान्य माणसांना उद्देशून आहे आणि संबोधनाची ही सर्वसामान्यता या गोष्टीचे प्रमाण होय की ही सूरह मदनी आहे तसेच हे की कियामती पर्यंतचे लोक याला संबोधित आहेत.

२. या सूरहाचा पहला घडा हाच की माणसाने आपल्या निर्मात्या व स्वामीचे भय बाळगावे. एकमेव ईश्वाचे अस्तित्व एक उघड सत्य आहे, व त्याच्या श्रेष्ठत्वाची निकड अशी की माणसाने त्याच्या समोर विद्रोहाचे दु:साहस करू नये. उपासना-संबंध आपल्या रचयित्याशी जोडण्याऐवजी निर्मितीशी जोडू नये व त्याची अज्ञा करतांना हे भय बाळगावे की अवज्ञेची शिक्षा त्याच्या जवळ मोठी सक्त आहे आणि कियामतीच्या दिवशी प्रत्येक आचरणाचा जाब त्याच्या पुढे द्यावा लागेल.

३. म्हणजे कियामतीचा भूकंप इतका जबरदस्त असेल की संपूर्ण जमीनीला आपल्या विळख्यात घेईल व माणसाला कोठेहि क्षेम लाभू शणार नाही.

४. त्या भूकंपाचे चित्र एवढे भयानक असेल की जमीन एवढी कंपायमान होईल की भूपृष्ठावर त्यावेळी जे लोक असतील ते हतबुद्ध होतील. काय घडत आहे हे त्यांना कळणार नाही. प्रत्येकाला आपल्या जीवनांची भिती पडली असेल. येथपावेतो की ज्या मातांच्या कुशीत दूध पिणारी अर्भके असतील. त्या आपल्या बाळांना विसरतील व ज्या स्त्रिया गर्भवती असतील त्यांचा गर्भपात होईल तसेच भयातिरेकाने लोकांची अशी दशा होईल की जणू ते नशेत धुंद आहेत म्हणजे त्यांची शुद्धी ठिकाणावर नसेल. तात्पर्य भूतलावर अल्लाहचा हा शेवटचा अजाब(ईश-कोप) असेल, जो कियामतीच्या स्वरूपात प्रकट होईल. हे त्या प्रसंगी घडेल जेव्हा पहिला सूर फूंकला जाईल व यावरून हे स्पष्ट होते की या वेळी भूपृष्ठावर वाईट लोकच राहात असतील. हदीस वचनात उल्लिखित आहे की कियामत दुराचारी लोकांवरच कायम होईल

لَاتَقُوْمُ السَّاعَةُ اِلَّا عَلٰى شِرَارِ النَّاسِ۔ (مسلم کتاب الفتن)

'' कियामत सर्वात वाईट अशा लोकांवरच प्रस्थापित होईल.''
(मुस्लिम किताबुल फितन)

५. म्हणजे केवळ कयास व अनुमान आणि दृष्टीकोनाच्या आधारे ईश्वराविषयी मत ठरवू लागतात व विवाद करी लागतात. वस्तुत: हा असा नाजूक विषय आहे की या बाबत ज्ञानाशिवाय तोंड उघडणे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. आणि ज्ञान म्हणजे एखाद्या गोष्टीस वास्तविकपणे ती जशी आहे जाणून घेणे ईश्वराबाबत योग्य ओळखीचे पहिले साधन तर मनुष्य स्वभावच आहे, मग त्या निशाण्या होत ज्या क्षितीजांमध्ये पसरलेल्या आहेत व त्यानंतर फार स्पष्ट व परिपूर्ण स्वरुपात ते ज्ञान होय जे पैगंबरांवर अवतरीत झाले.

६. उपरोक्त आयतीतील प्रत्येक बंदखोर सैतानाशी अभिप्रेत इब्लीस व त्याचा फौज फाटा होय. सैतान लोक माणसांमध्येहि आढळून येत असले तरी त्यांचा गुरू इबलीसच आहे. यास्तव जो मार्गभ्रष्टतेचा नेता आहे त्याच्या उपद्रवापासून सावध केले गेले आहे.

७. मेल्यानंतर माणसाला पुन्हा जिवित करून उठविले जाण्याची जी खबर कुरआन देत आहे त्याबद्दल लोक अशा साठी शंका घेतात की मेल्यानंतर शरीर नष्ट होते तेव्हा माणसाला दुसऱ्यांदा सशरीर उठरून उभे करणे हा असा एक उद्भवणारा प्रसंग आहे जो कधीहि अवलोकनात आलेला नाही. या शंकेचे निरसन करण्याकरिता या ठिकाणी काही अशा गोष्टीवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले जात आहे ज्या सत्य घटना आहेत. तेव्हा ही वस्तुस्थिती आहे की मनुष्य मातीद्वारे निर्माण केला गेला आहे. यास्तव आदमची निर्मिती मातीतूनच झाली होती. कुरआनाच्या या निवेदनाचे समर्थन सर्वसामान्य अवलोकनानेहि होते की माती ने अन्न धान्य तयार होते व या अन्न धान्याने संगोपन प्राप्त करून मनुष्य जीवंत राहतो तसेच हे की प्रत्येक गोष्ट आपल्या मूळस्थितीकडे परतते व मनुष्य मेल्यानंतर मातीतच मिळतो. यास्तव ज्याच्या करीता मातीसारख्या निर्जीव पदार्थात प्राण ओतणे पहिल्यांदा शक्य झाले, तेव्हा त्याच्यासाठी मातीत मिळालेल्या माणसाला दुसऱ्यांदा उटवून उभे करणे काय कठीण आहे? आता जर आम्हाला विश्वासार्ह माध्यमान्वये ही खबर मिळत आहे की माणसाच्या निर्मात्याने त्याला मेल्या नंतर कियामतीच्या दिवशी उठवून उभे करण्याचा निर्णय घेतला आहे तर आम्ही यास खरे का म्हणून मानू नये?

८. माणसाला मातीतून निर्माण केल्यानंतर त्याचा वंशक्रम ज्या रितीने चालविला त्यास एक महत्वपूर्ण पुरावा म्हणून सादर केले जात आहे की माणसाचा जन्म वीर्यबिंदूच्या अत्यल्य भागाने होतो ज्याला 'नुतफा' (पाण्याचा थेंब) म्हणतात. ही एक सर्वांना माहित असलेली हकीगत आहे व कुरआनाचा युक्तिवाद या सर्वसामान्य व सर्वांना माहित असलेल्या हकीगतीशी आहे. तथापि आजच्या काळात गर्भ-वृद्धि शास्त्राने (Embryology) ने ज्या सत्य गोष्टीचे रहस्योद्घाटन केले आहे त्या अल्लाहच्या सामर्थ्याच्या चमत्कृतिंना प्रकट करून माणसाला विचार चिंतनास प्रवृत्त करणाऱ्या आहेत.यास्तव एकाच वेळी जे वीर्य स्खलीत होते त्यास दोनशे मीलीयन (दशलक्ष) शुक्रजन्तू (Spermatozoa) असतात. जेव्हा एक शुक्रजंतू स्त्रीबीजाणूस गर्भआहित (Fertilize)करण्यास पुरेसा असतो जेव्हा एकच शुक्र जंतू स्त्री-बीजांडास गर्भयुक्त करण्यासाठी पुरेसा असतो. बीजांड, स्त्री च्या बीजांड कोषा (Overy)मधून प्रत्येक महीन्याला एकच बाहेर पडते. व गर्भशया (Womb)शी लागून असलेल्या

नलीके(Fellopian Tube) मध्ये हळू पुढे जात असते. जर शुक्रजंतू व स्त्री बीजांड या दोघांचा मिलाप झाला तर बीजांड गर्भयुक्त (Fertilize)होते, तात्पर्य, गर्भाची ही सुरुवात होय.

९. गर्भ धारण झाल्यानंतर काही दिवसात जमलेल्या रक्ताचा गोळा बनतो.

१०. नंतर हा जमलेल्या रक्ताचा गोळा काही दिवसांनी मांसाचा तुकडा बनतो. ही क्रीया गर्भ धारणेनंतर चौथ्या आठवड्यात होते.

११. म्हणजे कसलाहि आकार नसलेला मांसाचा हा तुकडा एका नव्या अवस्थेत दाखल होतो. ज्यात तो एक विशेष रुपु (Shape)धारण करू लागतो आणि प्रसंगी असेहि होते की आकार येण्यापूर्वीच गर्भपात होतो.

डॉक्टर मुहम्मद अली अलबार यांनी गर्भ-वृद्धि शास्त्रा (Embroyology) च्या संशोधनास लक्षात घेता कुरआन व हदीसने प्रस्तुत केलेल्या सत्यांना आपल्या ‘खलकुल इन्सान बैनत-तिब वल कुरआन’ या अरबी भाषेतील पुस्तकात स्पष्टीकरण सादर करीत कुरआनाच्या ज्ञानविषयक चमत्कृतिस प्रकट केले आहे. गर्भपातच्या समस्येविषयी विद्वान डॉ. लिहितात

‘ आता आम्ही हे जाणू लागलो की गर्भपात नेहमी आकार येण्यापूर्वी होतो आणि या अवस्थेस गर्भ-वृद्धि शास्त्राच्या परिभाषेत इंद्रिय संपन्न- उत्पत्ति (Organo Genesis) म्हटले जाते व याला गर्भधारणेनंतर चौथ्या आठवड्यापासून आरंभ होतो व आठव्या आठवड्यापर्यंत घडत असतो. (खल्कुल इन्सान-पृष्ठ-४०७)

१२. तात्पर्य गर्भशय (Womb) एक नैसर्गिक कारखाना घडवितो. अर्थात अशा रितीने घडवितो की घडविणाऱ्याचे हात दिसून येत नाही. परंतु एक थेंब (वीर्याचा) ज्या उत्थानात्मक अवस्थांमधून जाऊन मनुष्य रुप अंगिकारण्याच्या अवस्थेत पोहचतो ही मोठी विचित्र प्रक्रिया (Process) आहे जी विचारचिंतनाचे आवाह करते आणि विचार करणाऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण करते की या मागे एका सर्वज्ञ व सर्वसमर्थ शक्तिचा हात आहे व मनुष्य निर्मिती त्याच्या सामर्थ्य शक्तिचा डोळस पुरावा होय.

१३. अर्थात गर्भ (Embroy) चे दिवस पूर्ण झाल्यानंतर या जगात जन्म घेतो आणि ही त्याच्या बाल्यावस्थेची सुरुवात होय. यात या गोष्टीचा स्पष्ट संकेत आहे की गर्भाचे विश्व गर्भशयाची संकुचित व अंधारमय जागा होती, ज्यानंतर त्याने एका विशाल व व्यापक विश्वात जन्म घेतला. आता जर त्याचा निर्माता त्याला ही खबर देत आहे की या जगातून पार पडून त्याला याहून व्यापक अशा जगात (आखिरतमध्ये) प्रवेश करावयाचा आहे तर यात संशय कसला? मनुष्य स्वत:ला या जगाच्या कोठडीतच बंद ठेवू इच्छितो काय?

१४. म्हणजे या जगात आल्यानंतरहि मनुष्य वयाच्या विविध अवस्थेतून जात असतो. बाल्यावस्थेकडून तारूण्याकडे व तारुण्यावस्थेकडून वृद्धावस्थेकडे अर्थात उत्कर्षाकडून ऱ्हासाकडे व ज्ञानाकडून अज्ञाना (विस्मरणा) कडे. तेव्हा जर मेल्यानंतरच्या अवस्थे बाबत खबर दिली जात आहे तर हे त्याला का म्हणून मान्य करण्याजोगे नाही?

१५. शंकेचे निरसन करण्या करिता हे दुसरे प्रमाण होय. या जगात प्रत्येक वेळी परिवर्तन घडून येत असतात. जमीन एवढ्यात कोरडी होती, परंतु पर्जन्य वृष्टि होताच हिरवीगार व टवटवीत झाली व आपले सुप्त खजीने प्रकट करू लागली. जणू मृत जमीनीत नव जीवन निर्माण झाले. काय हे अवलोकन माणसाच्या अंगी एका सर्व समर्थ शक्ति विषयी विश्वास निर्माण करीत नाही? आणि जर अल्लाहचा संदेश (वही) कियामतीच्या दिवशी माणसाला उठविले जाण्याची खबर देत आहे तर यावर ईमान बाळगण्यात कोणती गोष्टी आडवी येते? जर जमीन परिवर्तनाची दृश्ये सादर करीत राहते तर तिच्यात एक जबरदस्त परिवर्तन का म्हणून संभाव्य नाही? जर जमीन आपल्यात असलेले खजीने बाहेर टाकते तर कियामतीच्या दिवशी तिचे मृत माणसांना जिवंतावस्थेत बाहेर टाकणे नवलाचे कसे?

हे अशासाठी की अल्लाहच सत्य आहे आणि तो मृतांना जिवित करतो आणि तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.आणि हे की कियामतीची वेळ येणार आहे. यात कसलीच शंका नाही आणि अल्लाह त्यांना उठवून उभे करील जे कबरी मध्ये आहेत.(अल-क़ुर्आन)

६. हे अशासाठी की अल्लाहच सत्य आहे. [१६] आणि तो मृतांना जिवित करतो, [१७] आणि तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.[१८]

ذٰلِكَ بِاَنَّ اللّٰهَ هُوَ الْحَقُّ وَاَنَّهٗ يُحْيِ الْمَوْتٰى وَاَنَّهٗ عَلٰى كُلِّ شَیْءٍ قَدِيْرٌ ﴿٦﴾

७. आणि हे की कियामतीची वेळ येणार आहे. यात कसलीच शंका नाही आणि अल्लाह त्यांना उठवून उभे करील जे कबरी मध्ये आहेत.[१९]

وَّاَنَّ السَّاعَةَ اٰتِيَةٌ لَّا رَيْبَ فِيْهَا ۙ وَاَنَّ اللّٰهَ يَبْعَثُ مَنْ فِي الْقُبُوْرِ ﴿٧﴾

८. आणि लोकांमध्ये काही असेहि आहेत जे कसल्याहि ज्ञानाशिवय,कोणत्याहि मार्गदर्शनाशिवाय व एखाद्या दीव्य ग्रंथा खेरीज अल्लाह विषयी वाद घालतात.[२०]

وَمِنَ النَّاسِ مَنْ يُّجَادِلُ فِي اللّٰهِ بِغَيْرِ عِلْمٍ وَّلَا هُدًى وَّلَا كِتٰبٍ مُّنِيْرٍ ۙ ﴿٨﴾

९. ताठरपणे,अशासाठी की (लोकांना ) अल्लाहच्या मार्गापासून भ्रष्टकरावे. [२१] अशा माणसाकरीता इहलोकात अवहेलना आहे [२२] आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्याला जळण्याच्या शिक्षेची गोडी चाखवू.

ثَانِيَ عِطْفِهٖ لِيُضِلَّ عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ ؕ لَهٗ فِي الدُّنْيَا خِزْيٌ وَّنُذِيْقُهٗ يَوْمَ الْقِيٰمَةِ عَذَابَ الْحَرِيْقِ ﴿٩﴾

१०. हेच ते, जे तुझ्या हातांनी आधीच तयार केले होते. [२३] आणि अल्लाह आपल्या दासांवर कदापि जुलुम करणारा नाही.

ذٰلِكَ بِمَا قَدَّمَتْ يَدٰكَ وَاَنَّ اللّٰهَ لَيْسَ بِظَلَّامٍ لِّلْعَبِيْدِ ﴿١٠﴾

११. आणि लोकांमध्ये असे देखील आहेत जे अल्लाहची उपासना एकांगी राहून करतात. लाभ पोहचला तर त्याच्याशी संतुष्ट झाले आणि जर कसोटी समोर आली तर परत फिरले इहलोकहि गमविला व अखिरतहि- हाच तो उघड तोटा होय.[२४]

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَّعْبُدُ اللّٰهَ عَلٰى حَرْفٍ ۚ فَاِنْ اَصَابَهٗ خَيْرُ اِطْمَاَنَّ بِهٖ ۚ وَاِنْ اَصَابَتْهُ فِتْنَةُ اِنْقَلَبَ عَلٰى وَجْهِهٖ ۚ خَسِرَ الدُّنْيَا وَالْاٰخِرَةَ ؕ ذٰلِكَ هُوَ الْخُسْرَانُ الْمُبِيْنُ ﴿١١﴾

१२. अल्लाहला सोडून हे अशा वस्तुंना पुकारतात.जे त्यांना ना नुकसान पोहचवू शकतात व ना फायदा-ही आहे, सर्वात खालच्या दर्जाची मार्गभ्रष्टता.[२५]

يَدْعُوْا مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَا لَا يَضُرُّهٗ وَمَا لَا يَنْفَعُهٗ ؕ ذٰلِكَ هُوَ الضَّلٰلُ الْبَعِيْدُ ۚ ﴿١٢﴾

१३. हे त्यांना पुकारतात ज्यांचे नुकसान. लाभापेक्षा आधिक जवळ आहे. [२६] फार वाईट आहे. कार्य घडविणारा आणि फार वाईट आहे सोबती.[२७]

يَدْعُوْا لَمَنْ ضَرُّهٗۤ اَقْرَبُ مِنْ نَّفْعِهٖ ؕ لَبِئْسَ الْمَوْلٰى وَلَبِئْسَ الْعَشِيْرُ ﴿١٣﴾

१६. म्हणजे मातीतून माणसा सारख्या सर्वोचा प्राण्याचा जन्म व त्यानंतर पाण्याच्या एका थेंबाद्वारे त्याचा प्रजोत्पादन क्रम. नंतर बाल्यावस्थेतून तारुण्याप्रत पोहचणे आणि या उत्कर्षा नंतर जर्जर होत जाणे. तसेच कोरड्या ठणठणीत जमीनीचे हिरवे टवटवीत होऊन प्रफुल्लीत होणे एका रचयित्याच्या रचनेखेरीज शक्य नाही हे विश्व जर अकस्मात घडलेली घटना असती तर मनुष्य-निर्मितीत ही क्रमबद्धता, परिस्थितीचे हे परिवर्तन आणि एका योजनाबद्धरित्या माणसाचे अस्तित्व या जमीनीवर शक्य झाले नसते. यास्तव अल्लाहचे अस्तित्व ही एक इन्कार न करण्याजोगी वस्तुस्थिती आहे अर्थात त्याच्या अस्तित्वाचा व त्याच्या एकमेव असण्याचा इन्कार करणे म्हणजे निव्वळ हटवादीपणा होय.

१७. उपरोक्त उदाहरणांनी ही गोष्ट देखील स्पष्ट आहे की अल्लाह निर्जीव पदार्थांमध्ये जीव ओतत असतो.

१८. अहोरात्र अवलोकनात येण्याऱ्या ह्या घटना ज्यांचा उल्लेख वर केला गेला आहे, या वस्तुस्थितीस प्रकट करतात की अल्लाह महानतम सामर्थ्य बाळगणारी हस्ती आहे. त्याच्या करीता कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

१९. अर्थात अल्लाहच्या या सृजनात्मक कृतीने, जिचा उल्लेख उपरोक्त आयतीत केला गेला आहे, या गोष्टीचे समर्थन होते की कियामतीचे घडून येणे व मृतांचे जिवंतावस्थेत उठविले जाणे अगदी सत्य आहे.

'कबरी मध्ये जे आहेत' शी अभिप्रेत मृत माणसे होत. मग त्यांची कबर बनलेली असो वा नसो. वास्तविक पहाता मनुष्य-जीवनाची समस्या कियामती व मरणोत्तर जीवनास मान्य केल्याच्या स्थितीतच सुटू शकते. अन्यथा एखाद्या विचारवंताच्या व एखाद्या तत्ववेत्त्याच्या अवाक्यातली गोष्ट नव्हे की तो या समस्येला सोडवू शकेल. तेव्हा याखेरीज जीवनाचे नान एखादे गंभीर ध्येय निश्चित केले जाऊ शकते ना या योजनेचा एखादा आराखडा प्रस्तुत केला जाऊ शकतो जो मनुष्य-जीवनामागे कार्यरत आहे. उदाहरणार्थ आवागमन (पुनर्जन्मा)चा दृष्टीकोन या मूलभूत प्रशनांची उत्तर देण्यास अगदी असमर्थ आहे आणि अशाने जीवनाची एखादी गाठ उकलणे तर दूर राहीले, उलट आणखी जास्त गाठी पडतात व बुद्धि विमनस्क होते.

२०. ज्ञानाचे स्पष्टीकरण टीप क्र. ५ मध्ये केले गेले आहे. या ठिकाणी मार्गदर्शनाशी अभिप्रेत ते प्रमाण होय ज्याला विवेक बुद्धि सादर करील आणि दीव्य ग्रंथाशी अभिप्रेत अवतरीत झालेला ग्रंथ ज्ञानात या दोन्ही गोष्टी सामील आहेत. परंतु त्यांचे महत्व लक्षात घेता, त्यांचा उल्लेख या ठिकाणी विशेषत्वाने केला गेला आहे.

२१. ही त्या नेत्यांची दशा निवेदिली गेली आहे जे ईश्वराबाबत लोकांना मार्गभ्रष्ट करीत राहतात. त्यांचे वर्तन मोठे गर्विष्ठपणाचे असते.

२२. जे लोक ईश्वराबाबत गर्वोन्मत वर्तन अंगिकारतात, त्यांना या जगातच अपमानाची गोडी चाखावी लागते. अभिप्रेत ती अवहेलना जी नैतिक पातळी वर होते व अशाच लोकांना तिची जाणीव होते ज्यांची नैतिक संवेदना तीव्र असते. मग अपमानित होणारा इसम लोकांच्या नजरेत कितीही प्रतिष्ठीत असो.

२३. माणसाचे प्रत्येक कृत्य भविष्यात एक परिणाम निर्माण करणारे आहे आणि माणसाचा कर्मेच असतील ज्यांच्यामुळे तो जहन्नमला पात्र ठरेल.

२४. हे चित्र त्या लोकांचे आहे जे केवळ अल्लाहला मानण्याचा दावा करीत नाही, किंबहुना उपासनाही करीत असतात. परंतु एकाग्रचिताने नव्हे तर संकोच वृत्तीने. जर सुस्थिती लाभली तर ईश्वराचे गुणगानहि करतील व त्याची उपासनाही करतील परंतु जर कष्टयातनेत वा संकटात सापडले तर त्याच्याशी संबंध तोडून त्याच्याविरुद्ध तक्रारही करू लागतील असे लोक जगातहि खऱ्याखुऱ्या सदूभाग्याला पारखे होतात जे खरी ईश-भक्तिच्या परिणामी माणसाला लाभते आणि अखिरत मध्येहि ते अगदी अपयशी होतील. स्पष्ट व्हावे की ईश-भक्ति तीच विश्वासार्ह होय जिच्यात एकनिष्ठतेची भावना असेल व ज्यावर मनुष्य चांगल्या वाईट प्रत्येक परिस्थितीत अटळ राहील.

२५. म्हणजे ईश-भक्तिच्या जागी मूर्ति-पूजा अगदी सत्याविरूद्ध व नितांत खोटे होय मात्र जर एखादा मनुष्य वास्तवते(Reality) विरूद्ध एखादे काम करू इच्छितो तर त्याला सन्मार्ग न गवसणे अगदी खात्रीचे आहे.

२६. मूर्तोंची वास्तविकता वीट दगड असण्यापलीकडे आणखी काहीच नाही. ज्या ना लाभ पोहचवू शकतात ना कसली हानी. परंतु त्यांची पूजा- अर्चा करणारे असे समजतात की ते आपले ईशरुपी अस्तित्व बाळगतात. त्यांच्या या विचाराची अयोग्यता येथे स्पष्ट केली जात आहे की यांच्याकडून एखाद्या लाभाची अपेक्षा करणे तर दूर उलट त्यांच्या भक्ति आराधनेपायी जी तत्काळ व अपरिहार्य हाती पोहचणे क्रम-प्राप्त आहे, ती अशी की दासाचे अल्लाहशी असलेले नाते तुटते. कारण अन्य एखाद्यास गरजपूर्ति करणारा मानण्याचा अर्थच हा की असा मनुष्य अल्लाहला एकमेव उपासक मनात नाही दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे मूर्तीशी एकनिष्ठता अल्लाहशी निष्ठा न राखल्याने होते आणि ही उघड व जबरदस्त हानी होय.

२७. म्हणजे मृत्यांशी श्रद्धा ठेवून त्यांनी स्वत:साठी मोठे वाईट कार्यसाधक व सहकारी निर्माण केलेत जे त्यांच्यासाठी विनाशकारक आहेत.

إِنَّ اللّٰهَ يُدْخِلُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ جَنّٰتٍ
تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ ۭ اِنَّ اللّٰهَ يَفْعَلُ مَا يُرِيْدُ ﴿١٤﴾

१४. निःसंशय अल्लाह अशा लोकांना ज्यांनी ईमान बाळगले,व सत्कर्मे केलीत, अशा बागांमध्ये दाखल करील, ज्यांच्या खालून प्रवाह वाहत असतील. निसंशय अल्लाह जे इच्छितो ते करतो.[२८]

مَنْ كَانَ يَظُنُّ اَنْ لَّنْ يَّنْصُرَهُ اللّٰهُ فِي الدُّنْيَا
وَالْاٰخِرَةِ فَلْيَمْدُدْ بِسَبَبٍ اِلَى السَّمَاۗءِ ثُمَّ لْيَقْطَعْ
فَلْيَنْظُرْ هَلْ يُذْهِبَنَّ كَيْدُهٗ مَا يَغِيْظُ ﴿١٥﴾

१५. जो मनुष्य असा विचार करील की अल्लाह इहलोकात व अखिरत मध्ये त्याची मदत करणार नाही, त्याने आकाशापर्यंत एक दोर ताणून घ्यावा, मग त्यास कापून टाकावे व बघावे की काय त्याच्या या प्रयत्नाने त्याच्या दुःख व क्रोधास दूर केले.[२९]

وَكَذٰلِكَ اَنْزَلْنٰهُ اٰيٰتٍۢ بَيِّنٰتٍ ۙ وَّاَنَّ اللّٰهَ يَهْدِيْ مَنْ يُّرِيْدُ ﴿١٦﴾

१६. अशा प्रकारे आम्ही या (कुरआना) स स्पष्ट प्रमाणांच्या स्वरुपात अवतरीत केले आहे आणि अल्लाह ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो.[३०]

اِنَّ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَالَّذِيْنَ هَادُوْا وَالصّٰبِـِٕيْنَ وَالنَّصٰرٰى
وَالْمَجُوْسَ وَالَّذِيْنَ اَشْرَكُوْٓا ڰ اِنَّ اللّٰهَ يَفْصِلُ بَيْنَهُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ ۭ
اِنَّ اللّٰهَ عَلٰي كُلِّ شَيْءٍ شَهِيْدٌ ﴿١٧﴾

१७. ज्यांनी ईमान बाळगले व जे यहुदी झाले आणि साबिई व नसारा (ख्रिश्चन) व मजूसी (अग्नि पूजक) आणि ते लोक जे अनेकेश्वरवादी झाले, या सर्वांच्या दरम्यान अल्लाह कियामतीच्या दिवशी फैसला करील [३१] अल्लाह प्रत्येक गोष्टीस पाहात आहे.

اَلَمْ تَرَ اَنَّ اللّٰهَ يَسْجُدُ لَهٗ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَمَنْ فِي الْاَرْضِ
وَالشَّمْسُ وَالْقَمَرُ وَالنُّجُوْمُ وَالْجِبَالُ وَالشَّجَرُ وَالدَّوَاۗبُّ
وَكَثِيْرٌ مِّنَ النَّاسِ ۭ وَكَثِيْرٌ حَقَّ عَلَيْهِ الْعَذَابُ ۭ وَمَنْ يُّهِنِ
اللّٰهُ فَمَا لَهٗ مِنْ مُّكْرِمٍ ۭ اِنَّ اللّٰهَ يَفْعَلُ مَا يَشَاۗءُ ۝ السجدة ﴿١٨﴾

१८. काय तुम्ही हे पाहात नाही की अल्लाहलाच सजदा करतात जे आकाशात आहोत व जे जमीनीवर आहेत तसेच सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्ष, पशू आणि पुष्कळ मानव. आणि बहुतेक मनुष्य असे आहेत ज्यांना ईश-शिक्षा आवश्यक ठरली आहे.[३२] आणि ज्याला अल्लाह अपमानित करील त्याला प्रतिष्ठा देणारा कोणीही नाही- अल्लाह जे इच्छितो ते करतो.

هٰذٰنِ خَصْمٰنِ اخْتَصَمُوْا فِيْ رَبِّهِمْ ۡ فَالَّذِيْنَ كَفَرُوْا
قُطِّعَتْ لَهُمْ ثِيَابٌ مِّنْ نَّارٍ ۭ يُصَبُّ مِنْ
فَوْقِ رُءُوْسِهِمُ الْحَمِيْمُ ﴿١٩﴾

१९. हे दोन पक्ष होत, [३३] ज्यांनी आपल्या पालनकर्त्या विषयी भाडण केले. तेव्हा ज्यांनी कुफ्र केले त्यांच्या करिता आगीचे पोषाख बेतविले गेले आहेत. त्यांच्या डोक्यावर उकळते पाणी टाकले जाईल.

२८. संभाषण प्रसंग प्रमाण होय की या ठिकाणी ईमान बाळगण्याच्या व सत्कृत्य करण्याच्या अर्थामध्ये ही गोष्ट सामील आहे की असे लोक अल्लाहलाच गरज भागविणारा मानून त्याची उपासना प्रमाणिकपणे करतात व चांगल्या वाईट अशा प्रत्येक स्थितीत त्यांच्याशी संलग्न असतात.

२९. ही अशा माणसाकरीता तंबी आहे जो प्रतिकूल परिस्थितीत अल्लाहच्या मदती पासून निराश होतो. तो असे समजतो की ज्या अर्थी या जगात अल्लाह माझी मदत करीत नाही तर अखिरत मध्येहि करणार नाही अशा प्रकारे ईश्वरापासूनचे नैराश्य त्यांच्या अंगी विद्रोहि विचार सरणी निर्माण करते. आजच्या काळात असे लोक मोठ्या प्रमाणात दिसून येतील जे जगातील संकटांना बळी पडल्यामुळे ईश्वाला दयाळू मानण्यास तयार नसतात व त्याच्या विरुद्ध विद्रोहाचे ध्वज उंचावतात. अर्थात ही ईश्वराशी व त्याच्या मदतीबाबत नैराश्यच होय ज्यामुळे त्यांच्या अंगी ईश्वरासंबंधी क्रोधावेश निर्माण झाला. तेव्हा अशा लोकांना सांगितले जात आहे की जर ते ईश्वरीय योजने विरुद्ध एखादा प्रयत्न करू शकत असतील तर अवश्य करून पहावे. जर ते दोर लावून आकाशावर चढू शकत असतील तर त्यांनी चढावे, नंतर त्या दोरालाहि कापावे यासाठी की जगाशी असलेला त्यांचा संबंध अगदी तुटून जावा. असे करून त्यांनी हे पहावे की आपले दु:ख व क्रोध दूर होतो किंवा नाही. अर्थात हे की अल्लाहच्या मदतीस विलंब होत आहे हे पाहून मनुष्य जर याबाबत निराश होतो व त्या विरुद्ध दु:ख क्षोम व्यक्त करु लागतो तर याचा त्याला काय लाभ? तो एखादी अशी उपाय योजना तर करु शकत नाही जेणेकरून ईश्वरीय योजने पासून मुक्त होऊन जावे अथवा या कसोटीमय विश्वातून बाहेर पडून अन्य एखाद्या दुनियेत पदार्पण करावे यास्तव उचित आचरण-मार्ग हाच की त्याने अल्लाहशी अपेक्षा बाळगावी, त्याला आपला खराखुरा आधार मानावा व अतिशय प्रतिकूल परिस्थितीतहि त्यावर भरवसा ठेवावा यासाठी की अशाने अल्लाह त्याला अवश्य मदत पोहचविल.

स्पष्ट असावे की या आयतीत ज्या प्रकारे आकाशापर्यंत दोर ताणून देण्याचे सांगितले गेले आहे तदवतच सूरह स्वाद मध्ये आकाशात चढून जाण्याविषयी सांगितले गेले आहे.

اَمْ لَهُمْ مُّلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا
بَيْنَهُمَافَلْيَرْتَقُوْا فِى الْاَسْبَابِ۔ (سورۂ ص:١٠)

''काय हे आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यान असलेल्यांचे सत्ताधिकारी आहेत? जर असे आहे तर यांनी आकाशा वर चढून जावे.'' (सूरह स्वाद: १०)

उघड आहे की या आयतीत हे जे फर्माविले गेले आहे की आकाशात चढून जावे तर याचा उद्देश्य काफिरांची अगतिकता जाहीर करणे होय. याच प्रकारे भाष्यांतर्गत आयतीत हे जे फर्माविले गेले आहे की अशा माणसाने आकाशापर्यंत दोर ताणून घ्यावा. तर याचाहि हेतु त्याची अगतिकता जाहीर करणे.

३०. म्हणजे कुरआनाचे मार्गदर्शन अगदी स्पष्ट व सप्रमाण होय, परंतु यापासून त्यांनाच प्रकाश-लाभ घडतो ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह दृष्टि प्रदान करील.

३१. या ठिकाणी त्या सहा धार्मिक गटांचा उल्लेख केला गेला आहे, जे त्या वेळी अरब देशात व परिसरात आस्तित्वात होते, म्हणजे मुसलमान, यहूदी, साबिई, ख्रिश्चन, मजूसी (अग्नीपूजक)व एनेकेश्वरवादी 'साबिई'चे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ८६ मध्ये केले गेले आहे. मदूसी'शी अभिप्रेत आगीची पूजा करणारे लोक होत जे स्वत:ला झरतृष्टाचे अनुयाची मानतात.त्या वेळी इरानचा हाच धर्म होता. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा, सूरह अनआम टीप क्र. ३ अनेकेश्वरवादीशी अभिप्रेत अनेक ईश्वरांना मानणारे, अल्लाह खेरीजच्या उपास्यांची भक्ति करणारे मूर्तिपूजक वगैरे अरब देशा व्यतिरिक्त अन्य अनेकेश्वरादी धर्म मग ते कोणत्याही नावाने ओळखले जावोत याच परिभाषेत बसतात.

यापैकी प्रत्येक समूह या गोष्टीचा दावेदार होता की ईश्वर व धर्माबाबत खरा व उचित मार्ग तोच होय जो त्यांनी अंगिकारलेला आहे. धर्मावलंबीच्या या दाव्यांना व उलट सूलट गोष्टींना खोटे ठरवित स्पष्ट केले की खरा मार्ग ईमान बाळगणाीऱ्यांचा मार्ग आहे अर्थात त्या लोकांचा जे कुरआनाचे आवाहन स्विकारतात. दुसऱ्या शब्दात, ते प्रमाणिक मुसलमान ज्यांचा धर्म इस्लाम आहे. एवढे असतानाहि जर लोक आपआपल्या धर्मालाच चिकटून राहू इच्छितात तर कियामतीच्या दिवशी याचा परिणाम पाहतील जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने या तंट्याचा निकाल लावील.

३२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रअद टीप क्र. ३८ व सूरह नहल टीप क्र. ७१

या आयतीत या गोष्टीवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे की या सृष्टीतील समस्त निर्मिती मग ती सजीव प्राणी असो, वनस्पती असो, किंवा जड पदार्थ असो. आपल्या निर्मात्या समोर झुकलेले (नतमस्तक झालेले) आहेत व आपापल्या रितीने त्याला सजदा करीत आहे. वेगवेगळ्या लक्षणांनी त्यांचे सजदा करणे व्यक्त होते व जेथपावेतो मानवाचा संबंध आहे. पुष्कळसे लोक अल्लाहच्या पुढे नत

मस्तक होतात परंतु अधिकतर लोक असेहि आहेत, जे आपल्या मर्जीने त्याच्या समोर झुकण्यास तयार नाहीत अशा लोकांवर ईश-शिक्षेचा आघात होणे क्रमप्राप्त आहे. त्यांच्या या चुकीच्या वर्तांना नंतरहि ही वस्तुस्थिती आपल्या जागी अटळ आहे की ही समस्त सृष्टी अल्लाहच्याच समोर नतमस्तक(सजदाशील) आहे आणि ज्या अर्थी ही वस्तुस्थिती आहे तर तुम्ही आपले आचरण याला अनुसरुन का नाही बनवीत? ही सजद्याची आयत होय म्हणून हिच्या पठणानंतर सजदा करणे आवश्यक आहे.

३३. म्हणजे एक ईमान बाळगणाऱ्यांचा समूह आहे ज्याने कुरानावर ईमान राखले आहे व दुसरा काफीरांचा समूह आहे जो कुरआनावर ईमान बाळगत नाही मग तो किती ही धार्मिक संप्रदायात विभागलेले का असेनात.

ज्यामुळे त्यांच्या पोटात असलेल्या वस्तू व त्यांची चामडी गळून पडेल. तसेच, त्यां (ना शिक्षा देण्या )करीता लोखंडी गदा असतील. जेव्हा कधी ते या कोंडमाऱ्या पासून मुक्त होऊ इच्छितील त्यातच (पुन्हा परतविले जातील. यासाठी की आता चाखा जळण्याच्या शिक्षेची गोडी.(अल-क़ुर्आन)

२०. ज्यामुळे त्यांच्या पोटात असलेल्या वस्तू व त्यांची चामडी गळून पडेल.

يُصْهَرُ بِهٖ مَا فِيْ بُطُوْنِهِمْ وَالْجُلُوْدُ ﴿٢٠﴾

२१. तसेच, त्यां (ना शिक्षा देण्या )करीता लोखंडी गदा असतील.

وَلَهُمْ مَّقَامِعُ مِنْ حَدِيْدٍ ﴿٢١﴾

२२. जेव्हा कधी ते या कोंडमाऱ्या पासून मुक्त होऊ इच्छितील त्यातच (पुन्हा परतविले जातील. यासाठी की आता चाखा जळण्याच्या शिक्षेची गोडी.[३४]

كُلَّمَآ اَرَادُوْٓا اَنْ يَّخْرُجُوْا مِنْهَا مِنْ غَمٍّ اُعِيْدُوْا
فِيْهَا ۗ وَذُوْقُوْا عَذَابَ الْحَرِيْقِ ﴿٢٢﴾

२३. जे लोक ईमान बाळगतील व ज्यांनी सत्कर्म केले, अल्लाह त्यांना अशा बागांमध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. तिथे त्यांना सोन्याचे कडे व मोत्याचे दागिने घातले जातील व त्यांचा पोषाख रेशमाचा असेल.[३५]

اِنَّ اللّٰهَ يُدْخِلُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ جَنّٰتٍ
تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ يُحَلَّوْنَ فِيْهَا مِنْ
اَسَاوِرَ مِنْ ذَهَبٍ وَّلُؤْلُؤًا ۗ وَلِبَاسُهُمْ فِيْهَا حَرِيْرٌ ﴿٢٣﴾

२४. त्यांना स्वच्छ शुद्ध गोष्टीची सुबुद्धि दिली गेली.[३६] आणि त्यांना अशा हस्तीचा मार्ग दाखविला गेला ज्याच्या करिता प्रशंसाच प्रशांसा आहे.[३७]

وَهُدُوْٓا اِلَى الطَّيِّبِ مِنَ الْقَوْلِ ۚ وَهُدُوْٓا اِلٰى صِرَاطِ
الْحَمِيْدِ ﴿٢٤﴾

२५. ज्या लोकांनी कुफ्र केले आणि जे अल्लाहच्या मार्गापासून रोखत आहेत [३८] तसेच मसजीदे हराम [३९] (काबागृहा) पासून, की ज्याला आम्ही लोकांकरिता अशा प्रकारे बनविले की त्या जवळ राहणारे व बाहेरून येणारे सर्वच त्या ठिकाणी समान होत.[४०] आणि जो कोणी त्या ठिकाणी अत्याचाराने विमुखतेचा मार्ग पत्करण्याची इच्छा बाळगील. आम्ही त्याला दु:ख दायक यातनेची गोडी चाखवू.[४१]

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَيَصُدُّوْنَ عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ
وَالْمَسْجِدِ الْحَرَامِ الَّذِيْ جَعَلْنٰهُ لِلنَّاسِ سَوَآءَ ۨ الْعَاكِفُ
فِيْهِ وَالْبَادِ ۗ وَمَنْ يُّرِدْ فِيْهِ بِاِلْحَادٍۭ بِظُلْمٍ نُّذِقْهُ مِنْ
عَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٢٥﴾

२६. आणि जेव्हा आम्ही इब्राहीम करिता 'बैतुल्लाह' (काबागृहा) ची जागा निश्चित केली होती [४२] की माझ्या बरोबर कोणासहि सहभागी करू नको आणि माझ्या घरास प्रदक्षिणा (तवाफ) घालणाऱ्यां करिता, (इबादतीत) उभे राहणाऱ्या करिता आणि रूकूअ (झुकणे) व सजदे करणाऱ्या करिता स्वच्छ शुद्ध राखा.

وَاِذْ بَوَّاْنَا لِاِبْرٰهِيْمَ مَكَانَ الْبَيْتِ اَنْ لَّا تُشْرِكْ بِيْ شَيْـًٔا
وَّطَهِّرْ بَيْتِيَ لِلطَّآئِفِيْنَ وَالْقَآئِمِيْنَ
وَالرُّكَّعِ السُّجُوْدِ ﴿٢٦﴾

३४. या दु:खदायक ईश-शिक्षेच्या केवळ कल्पनेंनेच अंगावर रोमांच उभे राहतात. परंतु ज्यांची संवेदाना मृत झाली असावी. ते याचा काय प्रभाव ग्रहण करतील?

३५. उपरोक्त आयतीवरून हे स्पष्ट होते की या ठिकाणी ईमान बाळगण्याच्या मतितार्थात दोन गोष्टी गौणरित्या सामील आहेत. पैकी एक तौहीद (एकेश्वरवाद) व दुसरी कियामतीच्या दिवशी उठविले जाणे. ज्या लोकांनी अशा प्रकारे ईमान बाळगले व त्यांचे जीवन देखील सत्कर्माचे प्रतिबिब असेल त्यांना कियामतीच्या दिवशी ज्या मान-प्रतिष्ठेने उपकृत केले जाईल तत्संबंधीचा उल्लेख या आयतीत केला आहे. ही विसंगतिहि विचार करण्याजोगी आहे की काफीरां करीता जिथे आगीचे कपडे बेतावेिले जातील तिथे ईमान बाळगणाऱ्यांना रेशम्री वस्त्रे घातली जातील ऐहीक जीवन एक कसोटीचा व पार करण्याचा काळ आहे, म्हणून इथे ईश-देणग्यांच्या वापरा संदर्भात शरीअतीच्या काही मर्य्दा देखील आहेत परंतु जन्नतचे जीवन बक्षीस म्हणून असेल म्हणून तिथे ईश देणग्याच्या वापरात कसलाहि प्रतिबंध नसेल, किंबहुना शाही जीवन व्यतीत करण्याची सारी सामग्री उपलब्ध करून दिली जाईल आणि जन्नत वासीयांना दाग दागिने व वस्त्र-प्रावरणांनी अशा प्रकारे आभूषित केले जाईल की जणू प्रत्येक ईमानधारक पुरुष 'वर' आहे व प्रत्येक ईमानधारक स्त्री 'वधू'.

३६. अभिप्रेत एकेश्वरवादी वचन होय.

३७ अर्थात अल्लाहचा मार्ग, ज्याच्या करिता समस्त गुणवैशिष्ट्ये आहेत व जो या गोष्टीस पात्र आहे त्याचे गुणगान केले जावे.

३८. म्हणजे लोकांना रोखतात की जेणेकरून त्यांनी अल्लाहचा धर्म (इस्लाम) कबूल करू नये.

३९. हा संकेत त्या परिस्थितीकडे की, जे मुसलमान-हिजरत करून मदीनेस आले होते त्यांच्यावर मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी काबागृहाचे दरवाजे बंद केले होते त्यामुळे ते ना हज करू शकत होते व ना उमरा.

४०. म्हणजे मस्जिदे हराम (काबागृहा) वर कोणा एकाची ठेकेदारी उचित नव्हे की ज्याला इच्छितील प्रवेश द्यावा व ज्याला इच्छितील प्रतिबंध घालावा. हे एकेश्वर वादाचे केंद्र आहे आणि एकेश्वरवादी लोकांना मग ते पृथ्वीच्या कोणत्याहि भागातले असोत हा हक्क आहे की त्यांनी या ठिकाणी येऊन एकमेव ईश्वराची उपासना करावी. या मस्जिदीचे दरवाजे कोणावहि बंद नाहीत. अर्थात या बाबतीत मक्का वासी व त्यांच्या खेरीजचे रहिवासी असा कसलाच भेदभाव नाही. यास्तव एकेश्वरवादी लोकांपैकी कोणालाहि हज्ज व उमरा करण्यापासून रोखले जाऊ शकत नाही. मस्जिदे हरामच्या या योग्यतेस लक्षात घेता, जगाच्या कोणत्याहि शासनास मग ते मुसलमानांचे असो वा मुस्लिमेतरांचे हा अधिकार पोहचत नाही की हज्ज व उमरा संदर्भात अनुचित कायदेशीर बंधने लादावी आणि ना अरब देशावर शासन करणाऱ्यांना हा अधिकार पोहचतो की त्यांनी विजा वगैरेची अशी बंधने घालावीत की ज्यामुळे हज्ज यात्रींना निष्कारण अडचणी व त्रास व्हावा. याची निकड ही देखील आहे की काबा गृहात वास्तव्य व भोजन संदर्भात अशा काबागृहात वास्तव्य व भोजन संदर्भात अशा प्रकारचे वर्तन वा पद्धति अंगिकारल्या जाऊ नयेत की ज्यामुळे काबागृहाचे दर्शन घेणाऱ्यांच्या त्रासात वाढ व्हावी. आणि अनुचित रित्या नफा मिळविणे (Exploitation) तर सक्त अपराध आहे.

४१. म्हणजे जो मनुष्य मक्का येथे राहत असूनहि अत्याचार पूर्वक या उद्दिष्टांकडे पाठ फिरवील ज्याकरिता ही मस्जिद उभारली गेली आहे. तो अल्लाह तर्फे दु:खदायक शिक्षेस पात्र ठरेल. अत्याचाराशी अभिप्रेत उघड गुन्ह्याची कामे होत ज्यात शिर्कचा प्रथम क्रमांकाने समावेश आहे, आणि विमुखतेशी अभिप्रेत मस्जिदे हरामला चुकीच्या उद्दिष्टांकरिता उपयोगात आणणे हेहि होय; व धर्महीनता पसरविणे हे देखील. या आयतीचा स्पष्ट संकेत मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांकडे आहे जे काबागृहाच्या मूळ उद्देश्या (एकेश्वरवादा) पासून विचलीत झाले होते व मूर्तिपूजेस त्यांनी तिथे प्रचलीत केले होते. परंतु ही गोष्ट सर्वसाधारण पणे सांगितली गेली आहे, म्हणून ही अशा प्रत्येक माणसाला लागू पडते जो तिथे शिर्क व बिदआत प्रचलीत करण्याचा प्रयत्न करील. यावरून ही गोष्ट देखील निदेर्शनास येते की जे नामधारी मुसलमान एखाद्या उपद्रवाच्या इराद्याने अथवा विध्वंसक कारवायींच्या हेतुने मक्का येथे येऊ इच्छितो तर अशा लोकांच्या प्रवेशावर प्रतिबंध घातला जाऊ शकतो.

४२. म्हणजे काबागृहाच्या ऊभारणी करिता मक्का-भूमीची निवड अल्लाहतर्फे झाली होती व त्यासाठी जागेची यथोचित निर्धारताहि त्याने केली होती. या संदर्भात हजरत ईब्राहीम यांनी जे काही केले ते अल्लाहच्याच आदेशाचे पालन होते.

स्पष्ट असावे की, पवित्र कूरआन, हजरत इब्राहीम यांना काबागृहाची उभारणी करणारा ठरविते व या गोष्टीकडे कोणताहि संकेत करीत नाही की याची उभारणी हजरत आदम यांनी केली होती, मग ते नूह कालीन भयंकर वादळात सापडले नंतर ह. इब्राहीम यांनी त्याची फक्त पुनर्रचना केली. ही गोष्ट कोणत्याहि सही हदीस ने सिद्ध होत नाही. यास्तव ज्या कथनांना आधार बनवून भाष्यकार अशा प्रकारच्या गोष्टी सांगतात, त्या कुरआनाच्या स्पष्ट निवेदनाशी विसंगत असल्यामुळे भाष्यात जागा देण्याच्या योग्यतेच्या नाहीत.(अधिक स्पष्टीकरणासाअी पहा सूरह आले इमरान टीप क्र. ११७)

२७. आणि लोकांमध्ये हज्ज चे ऐलान करा.'' ते
तुमच्या जवळ पायी येतील व दुबळ्या
सांडण्यावरहि'' ज्या लांबवरच्या मार्गाने येतील.[४५]

وَأَذِّنْ فِي النَّاسِ بِالْحَجِّ يَأْتُوكَ رِجَالًا
وَعَلَىٰ كُلِّ ضَامِرٍ يَأْتِينَ مِنْ كُلِّ فَجٍّ عَمِيقٍ ﴿٢٧﴾

२८. या साठी की त्यांनी आपल्या लाभांना बघावे [४६]
आणि निर्धारीत दिवसांमध्ये [४७] गुरांवर अल्लाहचे
नाव घ्यावे, जी तयाने यांना प्रदान केली आहेत.
[४८] तेव्हा यातून खा आणि हात अडचणीत असलेल्या
गरजवंतासहि खाऊ घाला.[४९]

لِيَشْهَدُوا مَنَافِعَ لَهُمْ وَيَذْكُرُوا اسْمَ اللَّهِ فِي أَيَّامٍ
مَعْلُومَاتٍ عَلَىٰ مَا رَزَقَهُمْ مِنْ بَهِيمَةِ الْأَنْعَامِ ۖ
فَكُلُوا مِنْهَا وَأَطْعِمُوا الْبَائِسَ الْفَقِيرَ ﴿٢٨﴾

२९. नंतर आपली मळ घाण दूर करावी [५०] आपले
नवस पूर्ण करावेत [५१]व या प्राचीन घराची प्रदक्षिणा
करावी.[५२]

ثُمَّ لْيَقْضُوا تَفَثَهُمْ وَلْيُوفُوا نُذُورَهُمْ
وَلْيَطَّوَّفُوا بِالْبَيْتِ الْعَتِيقِ ﴿٢٩﴾

३०. हे (आहेत हज्जचे धार्मिक विधी) आणि जो
अल्लाहने निर्धारीत केलेल्या प्रतिष्टींचा आदर करील
तर हे त्याच्या पालनकर्त्याजवळ त्याच्या करिता
अधिक चांगले आहे.[५३] आणि तुमचा करिता गुरे
हलाल (वैध) ठरविले गेले आहेत, मात्र त्यांच्या
खेरीज, ज्यांचा आदेश तुम्हाला ऐकविला गेला
आहे.[५४] यास्तव मूर्तींच्या मलीनतेपासून अलिप्त
रहा [५५] आणि खोटे बोलण्यापासून अलिप्त रहा.[५६]

ذَٰلِكَ وَمَنْ يُعَظِّمْ حُرُمَاتِ اللَّهِ فَهُوَ خَيْرٌ لَهُ عِنْدَ رَبِّهِ ۗ
وَأُحِلَّتْ لَكُمُ الْأَنْعَامُ إِلَّا مَا يُتْلَىٰ عَلَيْكُمْ ۖ فَاجْتَنِبُوا
الرِّجْسَ مِنَ الْأَوْثَانِ وَاجْتَنِبُوا قَوْلَ الزُّورِ ﴿٣٠﴾

३१. अल्लाहशी एकनिष्ठ बनून रहा.कोणलाहि त्याचा
सहभागी ठरवू नका. [५७] आणि ज्याने अल्लाहचा
सहभागी ठरविला तो जणू आकाशातून कोसळला,
मग पक्षांनी त्याला उचलून न्यावे किंवा हवा त्याला
घेऊन एखाद्या दूरवरच्या ठिकाणी फेकावे.[५८]

حُنَفَاءَ لِلَّهِ غَيْرَ مُشْرِكِينَ بِهِ ۚ وَمَنْ يُشْرِكْ بِاللَّهِ فَكَأَنَّمَا
خَرَّ مِنَ السَّمَاءِ فَتَخْطَفُهُ الطَّيْرُ أَوْ تَهْوِي بِهِ الرِّيحُ فِي
مَكَانٍ سَحِيقٍ ﴿٣١﴾

३२. ही आहे (खरी वस्तुस्थिती) आणि जो अल्लाहने
निर्धारीत केलेल्या निशाण्यांचा आदर करील तर
ही गोष्ट हृदयातील ईश-भयाशी संबंधित आहे.[५९]

ذَٰلِكَ وَمَنْ يُعَظِّمْ شَعَائِرَ اللَّهِ فَإِنَّهَا مِنْ
تَقْوَى الْقُلُوبِ ﴿٣٢﴾

३३. तुमच्या करिता या (कुर्बानीच्या जनावरां) मध्ये एक
निश्चित वेळे पावेतो लाभ आहेत. मग यांना कुर्बान
करण्याची जागा या प्राचीन घरा शेजारी आहे.[६०]

لَكُمْ فِيهَا مَنَافِعُ إِلَىٰ أَجَلٍ مُسَمًّى ثُمَّ
مَحِلُّهَا إِلَى الْبَيْتِ الْعَتِيقِ ﴿٣٣﴾

४३. ही ताकीद हजरत इब्राहीम यांना अशासाठी दिली गेली होती की अगदी आरंभापासूनच काबागृहाच्या उभारणीचे उद्दिष्ट स्पष्ट व्हावे व त्यांच्या अनुयायींनी या शिकवणीचे संरक्षण करावे. घराला स्वच्छ शुद्ध ठेवण्याचा अर्थ, विशेष करून मूर्ति पासून अलिप्त राखणे होय तसेच प्रत्येक प्रकारच्या गलिच्छेतपासूनही.

४४. जेव्हा कारागृहाचे बांधकाम झाले तेव्हा सर्वक्षेष्ठ अल्लाहने हजरत इब्राहीम यांना आदेश दिला की त्यांनी हज्जयात्रेचे सार्वत्रिक ऐलान करावे. या घोषणेचा अर्थ हा होता की:

**प्रथमः** हे घर एखाद्या विशिष्ट कबीला, जन-समूह किंवा भूभागाच्या रहिवाश्यांकरिता नाही, किंबहुना हे समस्त लोकांकरिता उपासनागृह आहे. लोकांनी येथे यावे व अल्लाहचीच उपासना करावी.

**दुसरे** हे की, या घराचे वैशिष्ट्य असे की हज्जची उपासना याच्याशी संबंधित आहे. हज्ज चा विशेष पैलू असा की ती अल्लाह समोर विशेष स्वरुपात उपस्थिती होय. आणि तौहीद (एकेश्वरवादा) चे चित्र मनावर अंकित करुन त्याच्याशी गाढ प्रेम व संबंध आणि त्याच्यासाठी बलीदानाची भावना जागृत करणारी उपासना होय.

**तिसरे** असे की, हज्ज यात्रेचे सार्वत्रिक आवाहन वस्तुत ऐकेश्वरवादास कबूल करण्याचे व एकमेव ईश्वराची उपासना करण्याचे सार्वत्रिक आवाहन होते. हे जणू या गोष्टीचे ऐलान होते की उपासनेकरिता या घराला केंद्र बनवावे.

४५. म्हणजे एवढ्या लांब अंतरावरुन येतील की प्रवासामुळे उंट अशक्त झालेले असतील हजरत इब्राहीम यांच्या काळात वाळवंटाचा प्रवास करण्याचे साधन उंटच होते. म्हणून याचा उल्लेख केला गेला आणि आज तर काय, बस,स्टीमर व विमानांद्वारे लोक दूरदूरच्या देशातून हजारो मैलांचा प्रवास करीत हज्ज यात्रेला येतात आणि दरवर्षी मस्जिदे हराम मध्ये वीस लाखाहून अधिक एकेश्वरवादावर जीवापाड प्रेम करणाऱ्यांचा मेळावा भरतो.

४६. याचा हा अर्थ नव्हे की की लोकांनी आपला धार्मिक व भौतिक लाभ पहावा करण हज्जचा आदेश या प्रकारच्या लाभांकरिता दिला गेला नाही किंबहुना यास अभिप्रेत धार्मिक लाभ होता कारण हज्ज ही अतिशय उत्तम इबादत (उपासना) आहे. सुप्रसिद्ध भाष्यकार अल्लामा जसास लिहितात की,

'लाभांश' अभिप्रेत ऐहीक लाभ कदापि अभिप्रेत होऊ शकत नाही, कारण या स्थितीत हज्जच्या आवाहनचा अर्थ का होईल की एहीक लाभ प्राप्त करण्यासाठी आवाहन केले गेले आहे. वस्तुतः हजचा अर्थ प्रदक्षिणा, सई (धावणे) वुकूफ अरफा व मुजदल्फा कुर्बानी व इतर विधींचे पार पाडणे होय. ऐहीक लाभ यात आहेत आणि फक्त रुखसतीच्या (उचित) दर्जाचे आहेत. हज्ज चे उद्दिष्ट नव्हे.' (अहकामुल कुरआन खंड ३ पृ. २८७)

हज्जच्या धार्मिक लाभांपैकी सर्वाधिक मोठा लाभ अल्लाह समोर उपस्थित होण्याची कल्पना होय. यास्तव हज्जच्या कालावधीत लब्बैक(हे अल्लाह मी हजर आहे) हा आवाज बुलंद केला जातो. मग अल्लाहचे घर (अर्थात काबागृह) आणि अल्लाहच्या निशाण्यांचे अवलोकन ईमान ची दृढता, अल्लाहशी प्रेम व त्याच्याशी घनिष्ट संबंधास कारक ठरेल. अल्लाह करिता सहन करणे, त्याच्या मार्गात जीवापाड मेहनत करणे, तसेच आज्ञापालन व स्विकृति आणि बलीदानाची उच्च भावना इ. गोष्टी वाढीस लागण्याची सामुग्री होते. इस्लामी इतिहासाची चित्रे दृगोचर होऊ लागतात. हजरत इब्राहीम, हजरत इस्माईल, व हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी की ज्यांच्यामुळे काबागृहाचा इतिहास उज्वल आहे, श्रद्धाभावनेत वृद्धि होते. काबागृहाच्या छत्रछायेखाली मुसलमानांचा सार्वभौमिक व आत्म्यास वृद्धिगत करणारे स्ममेलन मुस्लिम जन-समूहाच्या अस्तित्वाच्या हेतुला अनुभूत स्वरुपात सादर करते आणि सर्वात मोठी गोष्ट अशी की अल्लाह समोर नम्रता व दास्वत्व व त्याच्याशी भेटीची संवदना एक अशी भावना निर्माण करते जी इहलोकात ईमान बाळगण्याचे व ईश-भय बाळगणाऱ्याचे जीवन व्यतीत करण्यास एक जबरदस्त सामर्थ्य व आवडती सामुग्री आहे राहीली ऐहीक व भौतिक समृद्धि तर तो हजचा गौण लाभ होय.

४७. अर्थात जिलहिज्जा महिन्याची दहा, अकरा, बारा व तेरा तारीख. हदीस वचनात उल्लिखित आहे की-

كُلُّ أَيَّامِ التَّشْرِيقِ ذِبْحٌ

'सर्व तशरीक चे दिवस जबह चे दिवस आहेत.'

४८. अभिप्रेत ती कुरबानी होय जी हज्जच्या विधीपैकी आहे. अर्थात हे बलीदान अशाच जनावरांचे योग्य आहे जे पाळीव गुरे असतील. ती चार आहेत, उंट गाय, मेंढा व शेळी मग तो नर असो वा मादा (या गोष्टी चे स्पष्टीकरण- सूरह अन आम आयत १४३- १४४ मध्येहि केले गेले आहे व हदीस वचनाद्वारेहि स्पष्ट आहे. आणि फिकहुस सुन्नाहचे संकलक सय्यद साबिक यांनी लिहिले आहे की याबाबत एकमत आहे. (किताब मजकूर ख. १पृ.७३७)

४९. हे या गोष्टीचे स्पष्टीकरण आहे की कुर्बानीचे मांस खाण्यात व खाऊ घालण्यात शरीअतीचा कसलाच अडसर नाही. म्हणजे याचा आदेश होमाग्नि होरपळलेले (ज्याचे मास अग्नीने खावे) सारखा नाही, जो यहुदीकरिता होता, जसे की बायबलवरून हे स्पष्ट होते. किंबहुना ही साधी सबळ शरीआत आहे जी हजरत इब्राहीमच्या आचारसंहीतेस अनुसरुन आहे.

कुर्बानीचे मास गरजवंतां खाऊ घालण्यास विशेषत्याने

प्रोत्साहन दिले गेले आहे मात्र यास कुर्बानीचे मूल उद्दिष्ट ठरविले गेले नाही, किंबहुना उपरोक्त विधानात स्पष्ट केल्याप्रमाणे मूल उद्दिष्ट गुराना, चतुष्पाद प्राण्यांना अल्लाहच्या नावाने बळी देणे होय. म्हणजे ही उपासना स्वरुप गोष्ट होय. आणि यापासून प्राप्त होणारे अन्य लाभ गौण दर्जा बाळगतात अनेकेश्वरवादी जनावरांचा बळी मूर्ति व देवी देवतांच्या नावे करीत असतात परंतु इस्लामने या उपासना पद्धतिस केवळ उल्लाहसाठी खास वैध ठरविले आहे जिचा अंगिकार करुन मनुष्य तौहीद (एकेश्वरवादा) वर कायम राहातो. म्हणून जर पारस्थितीच्या अगतिकतेमुळे मांस उपयोगात आणले जाऊ शकत नसले तरीहि कुर्बानी करणे आवश्यक ठरेल. अल्लाहच्या नावाने जनावराची कुर्बानी केल्याने मूल उद्दिष्ट साध्य होतेच आणि मांस एखाद्या उपयोगात आणणे हे याबरोबर सशर्त नाही, हदीस वचनानुसार जनावराचे रक्त वाहविण्यास उत्तम कर्म ठरविले गेले आहे आणि या कर्माची खरी कदर व मूल्य त्याच वेळी ध्यानी येऊ शकते जेव्हा मनुष्य एकेश्वर वादाचे महत्त्व समजत असेल आणि अल्लाहच्या उपासनेचे महत्त्व जाणत असेल. याऊलट जर कुर्बानी करण्यात खरे महत्तव मांसाचे असते तर पूर्वीच्याी शरीअतमध्ये कुर्बानीच्या मांसाला जाळण्याचा आदेश दिला गेला नसता. परंतु ज्या लोकांची दृष्टि कुर्बानीच्या वास्तवतेवर नाही तर त्याच्या मांसावर असते, ते काही परिस्थितीत जेव्हा कुर्बानीच्या मांसाचा व्यवस्थापनीय अडचणीमुळे कसलाहि विनियोग होत नाही तेव्हा कुर्बानीला व्यर्थ समजून त्याचा बदल म्हणून सदका योजितात. वस्तुत: एखाद्या अशा गोष्टीस बदल सुचविण्याचा आम्हाला कसलाच हक्क नाही, जी ताबुद्दी प्रकारची आहे म्हणजे अल्लाहतर्फे उपासनेची विशिष्ट पध्दत होय, आणि जर उपासनेच्या बाबतीत आम्ही अकलेचे तारे तोडायला सुरुवात केली तर धर्माची संपूर्ण व्यवस्था प्रभावित झाल्याखेरीज राहणार नाही.

५०. म्हणजे एहरामच्या बंधनामुळे जी मळ घाण साचते, ती दूर करावी. एहरामची अवस्था एक विशेष अवस्था असते. या अवस्थेत केस कापणे, नखे काढणे व सुगंधी दव्य (अत्तर वगैरे) लावणे इ. गोष्टीची मनाई आहे. यास्तव शरीराच्या स्वच्छतेचा तो इतमाम राखला जात नाही जो इतर स्थितीत राखला जातो. परंतु कर्बानी नंतर डोक्याचे केस कापले जाऊ शकतात, नखे काढली जातात व एहराम उतरविला जातो.

५१. 'नवस' च्या स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह बकरा टीप क्र.४५० या ठिकाणी नवसचा उल्लेख विशेषत्वाने अशासाठी केला गेला आहे की जर एखाद्याने कुर्बानीचा नवस मानला आहे तर त्याने या प्रसंगी आपला नवस पूर्ण करावा.

५२. कुरआन ज्यांना संबोधून आहे त्यांचा विचार करता काबा गृहास 'प्राचीन घर या अर्थाने घेतले आहे कारण कुरआन अवतरणाच्या सुमारे अडीच हजर वर्ष आधी हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांच्या हातून काबागृहाचे बांधकाम झाले होते त्याचे प्राचीनतम असणे त्याच्या ऐतिहासिक योग्यतेस स्पष्ट करते.

शिरमुंडन केल्यानंतर किंवा केस कापल्यानंतर मीनाहून मक्का ये थे पोहचणे व बैतुल्लाह (काबागृहा)ची परिक्रमा करणे आवश्यक आहे. जसे तवाफ अफाका किंवा तवाफे जयारा केला जातो आणि हा हज्जचा एक विधी आहे.

५३. आदरणीय गोष्टीमध्ये शआइर (निशाण्याहि) सामील आहेत व मनासिक (उपासना विधी) हि. अल्लाहच्या शआइरमध्ये काबागृह, मस्जिदे हराम, सफा व मर्वा (पहाड) आणि कुर्बानीची जनावरे यासारख्या ईश-उपासनेच्या निशाण्या सम्मिलीत आहेत आणि त्यांचा आदर त्याचप्रमाणे अपेक्षित आहे ज्याप्रमाणे त्यांना धर्मशास्त्र संमत ठरविले गेले आहे. उदाहरणार्थ सफा व मर्वा पहाडाच्या आदराची पद्धत अशी की त्यांच्या दरम्यान 'सई' केली जावी. या सईमध्ये मनुष्य सफा व मर्वा वर पाऊल ठेवतो. परंतु यावर पाय ठेवणे आदराच्या विपरित नाही तद्वतच मस्जिद हराम मधून बाहेर पडताना माणसाची पाठ काबागृहाकडे असते. अर्थात हे त्याच्या आदराविरुद्ध नाही. दर एखादा इसम या गोष्टीस आदराविरुद्ध समजून उलट पावलांनी परत फिरतो तर हा आदर नव्हे किंबहुना बिदअत ठरेल तसेच जो गिलाफ (आवरण) काबागृहावर चढविला जात असेल त्याच्यासाठी एखादा इसम जुलूस वगैरेचा इतमाम करीत असेल तर ते देखील बिदअत (धर्मात नवीन गोष्ट) च ठरेल. कारण आदराची ही पद्धत धर्मात एका नवीन पद्धातीची वाढ होय.

५४. हा संकेत सूरह नहल च्या आयत क्र. ११५ कडे आहे, ज्यात मुरदाड वगैरेची वर्ज्यता निवेदिली गेली आहे. गुरांच्या हलाल (वैध) होण्याचा उल्लेख या ठिकाणी उपरोक्त निवेदनाच्या अनुकूलतेने केला गेला आहे. परंतु हे स्पष्ट करणे होय की, अल्लाहने आपल्या प्रस्थापित केलेल्या प्रतिष्ठीत गोष्टींच्या आदराचा आदेश निश्चित दिलेला आहे. परंतु शिर्क आणि भ्रम पूजेच्या आधारावर लोकांनी जी प्रतिष्ठा-मूल्ये कायम केली आहेत त्यांच्या आदाराचा आदेश त्याने मुळीच दिलेला नाही. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी बहीरा व साईबा इ. नावांनी ज्या गुरांना हराम (अवैध ठरविले होते ते खोटे असण्याबाबत हा इशारा आहे. गायीचे पावित्र देखील याच नियमात बसते.

५५. मूर्तिच्या मलीनतेशी अभिर्पेत श्रद्धा व आचरणाची ती घाण होय जी मूर्तिपूजेच्या परिणामी निर्माण होते. असले लोक भ्रम, भानगडी बौद्धिक मलीनतेत खितपत पडून राहतात.

माणसाची आत्म-शुद्धि करणारी गोष्ट म्हणजे एकेश्वरवादी श्रद्धा व ईमान हीच होय. शिर्क (अनेकेश्वरवाद) तर माणसाच्या

अंतरंगास घाणीने बरबटून टाकतो.

५६. मूर्तिपूजा व शिर्कमुळे मनुष्य ईशवराबाबत अशा गोष्टी सांगू लागतो ज्या अगदी खोट्या व अवास्तव असतात. असे लोक स्वत:घडविलेल्या धार्मिक विधींना पार पाडतात व विशिष्ट जनावरांच्या पावित्र्याचा आदेश देतात आणि जेव्हा अशा लोकांच्या हातात सत्ताधिकार येतो तेव्हा ते विधी नियमाद्वारे अल्लाहने ठरविलेल्या हलाल गोष्टीस हराम व त्याने ठरविलेल्या हराम गोष्टीस हलाल ठरवितात.

हदीस वचनात असत्याच्या साक्षीस भयंकर अपराध ठरविले गेले आहे.

قال رسول الله ﷺ : اِلَّا اُنَبِّئُكُمْ بِاَكْبَرِ الْكَبَائر ؟ قلنا بلىٰ يا رَسُولَ الله ؟ قال : الاشراک بالله ، وحُقُوقُ الوالدين، وَكَانَ مُتّكِئًا فَجَلَسَ فَقَالَ : اَلَا وقولُ الزُّور و شهادةُ الزورِ۔ (بخاری کتاب الادب)

“पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, काय मी तुम्हाला हे न सांगावे की मोठमोठ्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक मोठे गुन्हे कोणते आहेत! आम्ही म्हटले अवश्य सांगा हे अल्लाहचे रसूल ! फर्माविले, आल्लाहचा सहभागी ठरविणे आणि मातापित्यांशी संबंध-विच्छेद. पैगंबर आराम करीत होते की उठून बसले व फर्माविले.‘ऐका खोटे बोलणे व खोटी साक्ष.” (बुखारी किताबुल अदब)

५७. म्हणजे एकेश्वर वादाचा मार्ग पत्कारा व त्यावर दृढतम रहा. अर्थात कोणत्याहि प्रकारच्या शिर्कची भेसळ न करता.

५८. हे शिर्कच्या परिणतिचे उदाहरण होय. मनुष्य जेव्हा शिर्क करतो तेव्हा स्वभावाच्या उंचीवरुन खाली कोसळतो. उंची वरून खाली कोसळताच याला सैतानांची टोळी पक्ष्यांप्रमाणे उचलून नेते व त्याला क्षतविक्षत करून टाकते. यास दुसरे उदाहरण असे की जेव्हा तो उंचीवरून खाली कोसळला तर वाऱ्याने त्याला दूर नेऊन एखाद्या खोल खड्ड्यात टाकले आणि वस्तुस्थिती अशी की शिर्कच्या परिणामी मनुष्य इच्छा अभिलाषांना बळी पडतो आणि या इच्छा आकांक्षा त्याला अवनतिकडे नेऊन विनाशाच्या गर्तेत लोटून देतात. यास्तव एखाद्या अनेकेश्वरवादी माणसात कधीहि वैचारीक उंची निर्माण होत नाही, किंबहुना तो बौद्धिक व नैतिक दृष्ट्या अवनतिकडेच जात असतो.

५९. म्हणजे अल्लाहच्या निशाण्यांची मान-प्रतिष्ठा केवळ प्रथा नव्हे तर याचा संबंध हृदयातल्या ईश-भयांशी आहे अल्लाहच्या निशाणीस पाहून अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची कल्पना मनात निर्माण होते आणि अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची कल्पना ईशभय व दुष्कत्यांपासून अलिप्तता निर्माण करते.

६०. म्हणजे हज्जच्या कुर्बानीच्या जनावरांचे दूध प्यायला हरकत नाही, व त्यांच्याकडून वाहनाचा लाभहि घेतला जाऊ शकतो. मग त्यांना कुर्बान करण्याची जागा बैतुल्लाह (काबागृहा) जवळ आहे. हदीस वचनात स्पष्टीकरण आहे की कुर्बानी मीना मध्येहि केली जाऊ शकते व मक्का येथेहि.

وَكُلُّ مِنٰى مَنْحَرٌ وَكُلُّ فِجَاجِ مَكَّةَ مَنْحَرٌ۔

‘मीना संपूर्ण कुर्बानीचे स्थळ आहे व मक्काचे सर्व रस्ते कुर्बानीचे स्थळ होत. (अबु दाऊद किताबुस्सयाम)

तात्पय जनावरांना कुर्बान करण्याची जागा काबागृहाच्या परिसरापासून मीना पर्यंत विस्तुत आहे. परंतु ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हज्ज यात्रेच्या प्रसंगी मीना येथे कुर्बानी केली होती म्हणून मीना येथे कुर्बानी करणे पैगंबर आचरणानुसार आहे आणि मस्जिदे हरामच्या वातावरणाचे पावित्र्य लक्षात घेता हेच योग्य होय.

३४. आम्ही प्रत्येक जन-समूहाकरिता कुर्बानीची एक पद्धत निश्चित केली, अशासाठी की त्यांनी चतुष्पाद गुरांवर अल्लाहचे नाव घ्यावे जी त्याने यांना प्रदान केली आहेत.[६१] तेव्हा तुमचा ईश्वर एकमेव ईश्वर आहे, यास्तव स्वत:ला त्याच्या अधीन करा आणि (हे पैगंबर !) विनम्रता अंगिकारणाऱ्यांना खुश खबरी द्या.[६२]

وَلِكُلِّ أُمَّةٍ جَعَلْنَا مَنْسَكًا لِيَذْكُرُوا اسْمَ اللَّهِ عَلَىٰ
مَا رَزَقَهُمْ مِنْ بَهِيمَةِ الْأَنْعَامِ ۗ فَإِلَٰهُكُمْ إِلَٰهٌ
وَاحِدٌ فَلَهُ أَسْلِمُوا ۗ وَبَشِّرِ الْمُخْبِتِينَ ﴿٣٤﴾

३५. ज्यांची दशा अशी आहे की जेव्हा त्यांच्या समोर अल्लाहचे नाम:स्मरण केले जाते तेव्हा त्यांच्या हृदयाचा धरकाप होतो. [६३] जे संकटात सहनशीलता बाळगणारे व नमाज कायम करणारे आहेत व जी उपजिविका आम्ही त्यांना प्रदान केली आहे, त्यातून ते खर्च करीत राहतात.

الَّذِينَ إِذَا ذُكِرَ اللَّهُ وَجِلَتْ قُلُوبُهُمْ وَالصَّابِرِينَ عَلَىٰ
مَا أَصَابَهُمْ وَالْمُقِيمِي الصَّلَاةِ
وَمِمَّا رَزَقْنَاهُمْ يُنْفِقُونَ ﴿٣٥﴾

३६. आणि कुर्बानीच्या उंटांना आम्ही तुमच्यासाठी अल्लाहच्या निशाण्यांपैकी ठरविले आहे[६४] तुमच्यासाठी यांच्यात आधिक भलाई आहे तेव्हा त्यांना रांगेत उभे करून त्यांच्यावर अल्लाहचे नाव घ्या [६५] मग जेव्हा ते कुशींवर खाली पडतील तेव्हा त्यातून खा [६६] व खाऊ घाला समाधान बाळगणाऱ्यांना व याचकांना. [६७] अशा प्रकारे आम्ही यांना तुमच्या अधीन केले आहे यासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.

وَالْبُدْنَ جَعَلْنَاهَا لَكُمْ مِنْ شَعَائِرِ اللَّهِ لَكُمْ فِيهَا خَيْرٌ ۖ
فَاذْكُرُوا اسْمَ اللَّهِ عَلَيْهَا صَوَافَّ ۖ فَإِذَا وَجَبَتْ جُنُوبُهَا
فَكُلُوا مِنْهَا وَأَطْعِمُوا الْقَانِعَ وَالْمُعْتَرَّ ۚ كَذَٰلِكَ سَخَّرْنَاهَا
لَكُمْ لَعَلَّكُمْ تَشْكُرُونَ ﴿٣٦﴾

३७. अल्लाहला ना त्यांचे मांस पोहचते, ना रक्त, किंबहुना त्याला तुमचा तकवा (ईश-भय) पोहचतो. [६८] अशा प्रकारे आम्ही यांना तुमच्यासाठी अधीन केले आहे जेणेकरून अल्लाहने जो मार्ग तुम्हाला दाखविला आहे, त्याबद्दल तुम्ही त्याची महानता वर्णन करावी.[६९] आणि (हे पैगंबर!) सत्कर्म करणाऱ्यांना खुशखबरी द्या.

لَنْ يَنَالَ اللَّهَ لُحُومُهَا وَلَا دِمَاؤُهَا
وَلَٰكِنْ يَنَالُهُ التَّقْوَىٰ مِنْكُمْ ۚ كَذَٰلِكَ سَخَّرَهَا
لَكُمْ لِتُكَبِّرُوا اللَّهَ عَلَىٰ مَا هَدَاكُمْ ۗ وَبَشِّرِ الْمُحْسِنِينَ ﴿٣٧﴾

३८. नि:संशय [७०] अल्लाह त्या लोकांचे (शत्रूविरुद्ध) संरक्षण करील, ज्यांनी ईमान बाळगले. अल्लाह एखाद्या अशा इसमास पसंत करीत नाही जो विश्वासघात करणारा व कृतघ्न असेल.[७१]

إِنَّ اللَّهَ يُدَافِعُ عَنِ الَّذِينَ آمَنُوا ۗ إِنَّ اللَّهَ لَا يُحِبُّ كُلَّ
خَوَّانٍ كَفُورٍ ﴿٣٨﴾

६१. म्हणजे यापूर्वी इतर शरीअतीमध्ये कुर्बानीच्या पद्धति वेगवेगळ्य होत्या उदाहरणार्थ ग्रंथधारकंमध्ये सोख्तनी (होमाग्नि) कुर्बानीची पद्धत प्रचलीत होती. (अहबार २२: ७ ते ३३)परंतु कुर्बानीचा मूल उद्देश्य सर्व शरीअती मध्ये हाच होता की कुर्बानी केवळ अल्लाहसाठीच केली जावी, त्याने प्रदान केलेल्या जनावरांना अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या नावाने जबह करणे वा कुर्बान करणे कोणत्याहि शरीअतीत योग्य नव्हते. म्हणून ज्या धर्मामध्ये अल्लाहला सोडून अन्य एखाद्या उपास्याकरिता कुर्बानीची पद्धत प्रचलीत आहे ती एक अनेकेश्वरवादी बिदअत होय. अल्लाहच्या धर्माशी व त्याच्या शरीअतीशी तिचा तिळमात्र संबंध नाही.

६२. ही आहे कुर्बानीची खरी भावना की माणसाने एकेश्वरवादास मान्य करावे, स्वत:ला परिपूर्णत: त्याच्या हवाली करावे व आपल्या अंगी नम्रता व लीनता चा गुण निर्माण करावा. जनावराला जमीनीवर आडवे पाडण्याचा अर्थ खरे पहाता स्वत:ला अल्लाह समोर खाली पाडणे होय.

६३. हे ईमान बाळगणाऱ्यांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय की, अल्लाहचे नाम :स्मरण होताच हृदयाचा थरकाप व्हावा अल्लाहच्या बाबतीत ते मोठे संवेदनाशील असतात व त्याच नाम:स्मरणाने त्यांची हृदये कंपित होतात.

६४. यहुदी लोक उंटाच्या कत्तलीस योग्य समजत नसत आणि अनेकेश्वरवादी, अल्लाहखेरीजच्या उपास्यांकरिता उंटाला योग्य ठरवीत. कुरआनने याउलट अल्लाहच्या नावाने उंटास बळी देणे उचित ठरविले व त्याच्या कुर्बानीस अल्लाहच्या निशाण्यांपैकी ठरविले.

६५. उंटाला जबह करण्याची पद्धत अशी की त्याला उभे करून त्याच्या गळ्यात बरछी टोचली जावी. या पद्धतिला 'नहर' म्हटले जाते. अशा प्रकारे रक्त वाहू लागते आणि उंट आपोआप आपल्या कुशीवर खाली पडतो. जर उंटासारख्या जनावराला आडवे लोळवून जबह करण्याचा आदेश असता तर यात अडचण निर्माण झाली असती. त्यांना एका रंगेत उभे करण्यात अल्लाहच्या उपासनेच्या वैभवाची अभिव्यक्तिहि आहे.

६६. म्हणजे जबह केल्यानंतर जेव्हा त्यांचा जीव निघून जाईल तेव्हा त्यांचे मांस खाण्यास वापरा.

६७. हज्जच्या कुर्बानीचे मांस स्वत:देखील खाऊ शकता व इतरांनाहि खाऊ घातू शकता गरजवंताना मग ते समाधानी वृत्तीचे (अल्पसंतुष्ट) असोत वा याचक. खाऊ घालण्याची विशेषत्वाने ताकीद केली गेली आहे.

६८. हे आहे कुर्बानीचे खरे तथ्य व त्याचे उद्दिष्ट. की अल्लाहला त्याचे मांस-रक्त अपेक्षित नाही, किंबहुना ईश-भय व दुष्कर्मापासून अलिप्तता अपेक्षित आहे आणि कुर्बानीची उपासना याच कारणास्तव धर्मशास्त्र संमत झाली आहे, जेणेकरून ईश-भयाची भावना वृद्धिंगत व्हावी काबीलची कुर्बानी कबूल न होण्याचे कारण असे की, त्यामागे ईश-भयाची भावना कार्यरत नव्हती. (सूरह मायदा-आयत २७)

६९. याच आदेशाचे पालन म्हणून कुर्बानीच्या जनावरास जबह करतांना بِسْمِ اللهِ اَللهُ اَكْبَر **बिस्मिल्लाह अल्लाहु अकबर** (अल्लाहच्या नावाने, अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे) असे म्हटले जाते.

७०. हज्जचे निवेदन वर संपले आता संभाषणाचा रोख जेहादकडे वळत आहे जो अत्याचारास निवारण्याकरिताहि आवश्यक होते आणि मस्जिद हरामला अनेकेश्वरवाद्यांच्या कबज्यातून सोडविण्या करिताहि.

७१. जिहादचा आदेश निवेदन करण्या आधी सर्वश्रेष्ठ अल्लाहने या आयतीत ईमान बाळगणाऱ्यांना ही खुशखबरी ऐकवली आहे की तो यांच्यातर्फे अत्याचाराचे निवारण करील. म्हणजे कुफ्र व इस्लामच्या युद्धात अल्लाहचे समर्थन व मदत ईमानधारकांना प्राप्त होईल व तो काफिरांच्या कारस्थानांना हाणून पाडील. हे एवढ्यासाठी करील की तो अपहरण करणाऱ्यांना व कृतघ्नता दर्शविणाऱ्यांना पसंत करीत नाही. कुरेश व त्यांचेसाथीदार अपहार करणारे आहेत कारण काबागृहाची जी अनामत त्यांच्या सुपूर्द केली गेली होती त्यात त्यांनी तो अपहार व वचनभंग केला की काबागृहात मूर्त्या आणून बसविल्या आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या देणग्यांची कदर करण्याऐवजी शिर्क, कुफ्र व कृतघ्नतेचा मार्ग अंगिकारला.

أُذِنَ لِلَّذِينَ يُقَٰتَلُونَ بِأَنَّهُمْ ظُلِمُوا۟ ۚ وَإِنَّ ٱللَّهَ
عَلَىٰ نَصْرِهِمْ لَقَدِيرٌ ﴿٣٩﴾

३९. त्या लोकांना (युद्धाची) परवानगी दिली गेली, ज्यांच्याविरुद्ध युद्ध केले जात आहे- कारण ते अत्याचार पिडीत आहेत [७२] आणि अल्लाह त्यांची मदत करण्यास निश्चितच समर्थ आहे.

ٱلَّذِينَ أُخْرِجُوا۟ مِن دِيَٰرِهِم بِغَيْرِ حَقٍّ
إِلَّآ أَن يَقُولُوا۟ رَبُّنَا ٱللَّهُ ۗ وَلَوْلَا دَفْعُ ٱللَّهِ ٱلنَّاسَ بَعْضَهُم
بِبَعْضٍ لَّهُدِّمَتْ صَوَٰمِعُ وَبِيَعٌ وَصَلَوَٰتٌ وَمَسَٰجِدُ يُذْكَرُ
فِيهَا ٱسْمُ ٱللَّهِ كَثِيرًا ۗ وَلَيَنصُرَنَّ ٱللَّهُ مَن يَنصُرُهُۥٓ ۗ إِنَّ ٱللَّهَ لَقَوِىٌّ
عَزِيزٌ ﴿٤٠﴾

४०. या लोकांना आपल्या घरातून नाहक बाहेर घालवले गेले, केवळ या कारणास्तव की ते म्हणतात, आमचा पालनकर्ता अल्लाह आहे. [७३] आणि जर अल्लाह लोकांचे एकमेकांद्वारे संरक्षण करीत राहीला नसता तर खानकाह चर्च, (यहुदींची) प्रार्थनास्थळे व मसजीदी ज्यात अल्लाहचे नाम:स्मरण मोठ्या प्रमाणात केले जाते, केव्हाच पाडली गेली असती [७४] अल्लाह निश्चितच अशा लोकांची मदत करील जे त्याला सहाय्य करतील. [७५] नि:संशय अल्लाह सामर्थ्यशाली व प्रभावशाली आहे.

ٱلَّذِينَ إِن مَّكَّنَّٰهُمْ فِى ٱلْأَرْضِ أَقَامُوا۟ ٱلصَّلَوٰةَ وَءَاتَوُا۟
ٱلزَّكَوٰةَ وَأَمَرُوا۟ بِٱلْمَعْرُوفِ وَنَهَوْا۟ عَنِ ٱلْمُنكَرِ ۗ وَلِلَّهِ عَٰقِبَةُ
ٱلْأُمُورِ ﴿٤١﴾

४१. हे असे लोक होत की जर आम्ही त्यांना जमीनीवर सत्ताधिकार प्रदान केला तर ते नमाज कायम करतील, जकात (कर्तव्य-दान) देतील, चांगल्या गोष्टीचा आदेश देतील व वाईट गोष्टींपासून रोखतील. [७६] आणि समस्त मामल्यांची परिणति अल्लाहच्याच अधिकारात आहे. [७७]

وَإِن يُكَذِّبُوكَ فَقَدْ كَذَّبَتْ قَبْلَهُمْ قَوْمُ نُوحٍ وَعَادٌ وَثَمُودُ ﴿٤٢﴾

४२. आणि (हे पैगंबर!) जर तुम्हाला हे खोटे ठरवितात, तर यांच्या पूर्वी नूह जनसमूह, आद व समूद जन समूहानेहि खोटे ठरविले होते. [७८]

وَقَوْمُ إِبْرَٰهِيمَ وَقَوْمُ لُوطٍ ﴿٤٣﴾

४३. आणि इब्राहीम जन समूहाने व लूत जनसमूहानेहि खोटे ठरविले होते.

وَأَصْحَٰبُ مَدْيَنَ ۖ وَكُذِّبَ مُوسَىٰ فَأَمْلَيْتُ
لِلْكَٰفِرِينَ ثُمَّ أَخَذْتُهُمْ ۖ فَكَيْفَ كَانَ نَكِيرِ ﴿٤٤﴾

४४. तसेच मदयन वाल्यांनीहि खोटे ठरविले होते. [७९] आणि मूसानाही खोटे ठरविले होते. [८०] तेव्हा मी त्या काफिरांना सवड दिली, मग त्यांना पकडले तर पहा कशी होती माझी शिक्षा !

७२. ही पहिली आयत होय जिच्यात जिहाद ( अल्लाच्या मार्गात युद्ध) करण्याची अनुमति दिली गेली. ही हिजरी सनाच्या अंतिम भागातील गोष्ट होय. या अयतीत युद्धास अनुमतिची दोन कारणे निवेदिली गेली आहेत एक हे की मक्काच्या अनेकेश्वर वाद्यांनी ईमान बाळगणाऱ्याविरुद्ध स्वत:च युद्ध पुकारले होते. यास्तव परिस्थिती अशी होती की संधी मिळताच त्यांनी मुसलमानांच्या कोणत्या न कोणत्या समूहावर हल्ला चढविला असता म्हणजे मदीनेतहि त्यांना स्वस्थपणे बसू दिले गेले नाही, किंबहुना त्यांच्या विरुद्ध क्रूर हल्ले चढविण्यास आरंभ केला (याचे विवरण पैगंबर-चरित्रावरील ग्रंथामध्ये मिळते) दुसरे काण असे की, ईमान बाळगणारे अत्याचार पिडीत आहेत. त्यांचे अत्याचाराने पिडीत असणे अगदी उघड होते कारण त्यांना नाहक आपला देश, आपले घरदार सोडून जाण्यास भाग पाडले गेले. आता जर ते आपल्यावरील अत्याचार दूर सारण्याकरिता शास्त्र उचलतात तर असे करण्यात ते अगदी सत्याच्या बाजूने आहेत.

७३. म्हणजे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी ईमान बाळगणाऱ्यांना घर सोडून जाण्यास जे भाग पाडले त्याचे कारण केवळ हेच होते की ते एकमेव अल्लाहला मानणारे होते व शिर्क आणि मूर्तिपूजेची त्यांना अतिशय घृणा होती. त्यांचा हा गुणविशेष अनेकेशवर वाद्यांच्या नजरेत केवळ व्यंग नव्हे तर अपराध होता, जणू अल्लाहच्या एकनिष्ट दासांना अल्लाहच्या जमीनीवर जगण्याचा हक्क नाही.

७४. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या विधिनियमाचे ऐलान आहे ज्यानुसार तो अत्याचारी व दुराचारी जन-समूहाचे डोके ठेचण्याकरिता कोणत्या ना कोणत्या जनसमूहास प्रवृत करीत असतो आणि जगाचा इतिहास या गोष्टीस साक्षी आहे की जेव्हा एखादा जन-समूह जुलूम व अत्याचार करु लागतो तर त्याला हटविण्याची सामुग्री एखाद्या दुसऱ्या जन-समूहाद्वारे होत राहिली. याचा हेतु या ठिकाणी स्पष्ट केला गेला की असे झाले नसते तर ती उपासना-स्थळे ज्यात अल्लाहचे नाम:स्मरण केले जाते मग ती ख्रिश्चनांनी असोत, यहुदींची असतो किंवा मुसलमानांची असोत, जालीम लोकांच्या हातून केव्हाच जमीनदोस्त झाली असती.

अल्लाहच्या या नियामाचे निवेदन करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की कुरेशने (मक्केच्या रहिवाश्यांनी ) मस्जिदे हरामच्या पावित्र्यास बाकी राखले नाही व मदीनेच्या मुसलमानांवर याचे दरवाजे बंद केले आहेत. त्यांचा हा जुलूम दूर करण्याकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांच्या समूहास मैदानात/ आणत आहे.

स्पष्ट असाचे की आयतीत ज्या उपासना गृहांचा उल्लेख आहे, ते एकतर ग्रंथधारकांशी संबंधित आहेत किंवा मुसलमानांशी कारण त्यात अल्लाहचा जिक्र (नाम:स्मरण) केले जात आहे व या दृष्टीने ते आदर सन्मान करण्या योग्य आहेत राहीलीत मूर्तिपूजकांची मंदीरे तर त्यात अल्लाहचे नाम:स्मरण केले जात नाही, उलट मूर्तिपूजा केली जाते म्हणून त्यांचे स्वरुप उल्लिखित प्रार्थना- स्थळांहून अगदी वेगळे आहे.

७५. अल्लाहची मदत करण्याचा अर्थ त्याच्या धर्माची मदत करण, त्याच्या कलिमास (वचनास) बुलंद करण्या करिता जेहाद करणे हा होय. अन्यथा अल्लाह कोणाच्याहि मदतीचा गरजवंत नाही, किंबहुना दास त्याच्या मदतीचे गरजवंत आहेत. पुढे अल्लाहच्या दोन गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला गेला आहे. त्यापैकी एक म्हणजे तो शक्ति सामर्थ्य बाळगणारा आहे. व दुसरे तो प्रभुत्वशाली आहे. त्यानंतर कसलाहि गैरसमज बाळगण्यास वाव रहात नाही.

७६. ही या गोष्टीची घोषणा होती की एक समूह असा तयार झाला आहे की त्याला जर सर्वश्रेष्ठ अल्लाह सत्ताधिकार प्रदान करील तर तो नमाज व जकात सारख्या धर्माच्या मूलभूत तत्वांना कायम करणारा होईल व उत्पाताच्या जागी जमीनीवर सुधारणा कार्य करील. चांगल्या गोष्टींना पसरविल. व वाईट गोष्टीचा नायनाट करील.

यावरून हे निष्पन्न निघते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची शिकवण व प्रशिक्षणाचा परिणाम म्हणून एक असा समूह उदयास आला जो खिलाफत व शासन करण्यास पात्र होता. यास्तव जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संपूर्ण अरब देशावर अधिकार प्राप्त झाला. त्यांचे अनुयायी त्यांची सत्यता प्रमाणित करणारे सिद्ध झाले. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निधनानंतर जेव्हा खिलाफत कायम झाली तेव्हा ते या गोष्टीचा आदर्श होते. परंतु मुसलमानांचा एक गट हजरत अली यांच्याबद्दल मर्यादेपलीकडे श्रद्धा बाळगून काही प्रेषित अनुयायी खेरीज प्रेषित सहवासातील समस्त अनुयायीना तिरस्कृत ठरवितो व तिन्ही खलिफांना अपहारकर्ता ठरवितो. त्यांची ही श्रद्धा या गोष्टीशी उघड उघड विभक्तता होय जी या आयतीत दिली गेली आहे व त्यांच्या मार्गभ्रष्टते करिता हे एकच प्रमाण पुरेसे आहे.

७७. म्हणजे कोणत्याहि बाबीचा अंतिम फैसला अल्लाहच्याच अधिकारात आहे म्हणून परिस्थिती कशीहि असो, तो जे काही इच्छितो अस्तित्वात येईलच. हा संकेत या गोष्टीकडे होता की शेवटी ईमान बाळगणाऱ्यांनाच अधिकार प्राप्त होईल.

७८.म्हणजे जर हे तुम्हाला खोटे ठरवित आहेत तर यात नवल कसले? याच्यापूर्वीहि कितीतरी जन समूहांनी तत्कालीन

पैगंबरांना खोटे ठरविलेले आहे. उदाहरणार्थ हजरत नूह यांना त्यांच्या जन-समूहाने खोटे ठरविले, तसेच आद जन समूहाने आपले पैगंबर हूद यांना खोटे ठरविले आणि समूद जन समूहाने आपले पैगंबर स्वालेह ना खोटे ठरविले.

७९. मदयन वाल्यांनी आपले पैगंबर शुऐब यांना खोटे ठरविले.

८०. हजरत मूसा यांना त्यांचा जनसमूह बनी इस्राईलने खोटे ठरविले नव्हते किंबहुना फिरऔनवाल्यांनी खोटे ठरविले होते म्हणून कर्मणी प्रयोगाचा वापर केला आहे की मूसांना खोटे ठरविले गेले होते.

आणि अशा किती तरी जुलमी वसत्या आहेत ज्यांचा आम्ही सर्वनाश करून टाकला तर त्या आपल्या छतांवर कोसळल्या आणि किती तरी विहीरी निकामी झाल्या व कित्येक पक्के महाल (ओसाड झालेत !).काय हे लोक जमीनीवर हिंडले फिरले नाहीत की यांची हृदये समजणारी व कान ऐकणारे असते. वस्तुस्थिती अशी की डोळे आंधळे नसतात, किंबहुना हृदये आंधळी असतात, जी उरात असतात. (अल-क़ुर्आन)

४५. आणि अशा किती तरी जुलमी वसत्या आहेत ज्यांचा आम्ही सर्वनाश करून टाकला तर त्या आपल्या छतांवर कोसळल्या आणि किती तरी विहीरी निकामी झाल्या व कित्येक पक्के महाल (ओसाड झालेत !).[८१]

فَكَاَيِّنْ مِّنْ قَرْيَةٍ اَهْلَكْنٰهَا وَهِيَ ظَالِمَةٌ فَهِيَ خَاوِيَةٌ عَلٰى عُرُوْشِهَا
وَبِئْرٍ مُّعَطَّلَةٍ وَّقَصْرٍ مَّشِيْدٍ ﴿٤٥﴾

४६. काय हे लोक जमीनीवर हिंडले फिरले नाहीत की यांची हृदये समजणारी व कान ऐकणारे असते. [८२] वस्तुस्थिती अशी की डोळे आंधळे नसतात, किंबहुना हृदये आंधळी असतात, जी उरात असतात.[८३]

اَفَلَمْ يَسِيْرُوْا فِي الْاَرْضِ فَتَكُوْنَ لَهُمْ قُلُوْبٌ يَّعْقِلُوْنَ بِهَآ
اَوْ اٰذَانٌ يَّسْمَعُوْنَ بِهَا ۚ فَاِنَّهَا لَا تَعْمَى الْاَبْصَارُ
وَلٰكِنْ تَعْمَى الْقُلُوْبُ الَّتِيْ فِي الصُّدُوْرِ ﴿٤٦﴾

४७. (हे पैगंबर ! ) हे लोक तुमच्याशी ईश-शिक्षेकरिता घाई करीत आहेत वस्तुत: अल्लाह कदापि आपल्या वायद्याविरुद्ध जाणारा नाही आणि तुमच्या पालनकर्त्याजवळ एक दिवस तुमच्या काल-गणनेनुसार एक हजार वर्षाइतका आहे.[८४]

وَيَسْتَعْجِلُوْنَكَ بِالْعَذَابِ وَلَنْ يُّخْلِفَ اللّٰهُ وَعْدَهٗ ۚ وَاِنَّ يَوْمًا
عِنْدَ رَبِّكَ كَاَلْفِ سَنَةٍ مِّمَّا تَعُدُّوْنَ ﴿٤٧﴾

४८. आणि कितीतरी वस्त्या होत ज्यांना मी सवड दिली आणि त्या अत्याचारी होत्या-मग त्यांना धरले आणि माझ्याचकडे सर्वांचे परतणे आहे.

وَكَاَيِّنْ مِّنْ قَرْيَةٍ اَمْلَيْتُ لَهَا وَهِيَ ظَالِمَةٌ ثُمَّ اَخَذْتُهَا ۚ
وَاِلَيَّ الْمَصِيْرُ ﴿٤٨﴾

४९. (हे पैगंबर !) सांगा, लोक हो ! मी याखेरीज आणखी काही नाही की तुम्हाला उघड खबरदार करणारा आहे.[८५]

قُلْ يٰٓاَيُّهَا النَّاسُ اِنَّمَآ اَنَا لَكُمْ نَذِيْرٌ مُّبِيْنٌ ﴿٤٩﴾

५०. तेव्हा, जे लोक ईमान बाळगतील व सत्कर्म करतील त्यांच्या करिता क्षमा व मानाची उपजिविका आहे.[८६]

فَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ لَهُمْ مَّغْفِرَةٌ
وَّرِزْقٌ كَرِيْمٌ ﴿٥٠﴾

५१. आणि त्या लोकांची तत्परता आमच्या आयतींना अवमानित करण्यासाठी असेल, ते जहन्नम वाले होत.[८७]

وَالَّذِيْنَ سَعَوْا فِيْٓ اٰيٰتِنَا مُعٰجِزِيْنَ
اُولٰٓئِكَ اَصْحٰبُ الْجَحِيْمِ ﴿٥١﴾

८१. ज्या काळात कुरआनाचे अवतरण होत होते त्या काळात नाशी भूत जन-समूहाचे अवशेष अरबच्या विविध भागांमध्ये होते आणि हा या गोष्टीचा ऐविहासीक पुरावा होता की पैगंबरांना खोटे ठरविल्याचा परिणाम म्हणून हे जन-समूह अल्लाहच्या शिक्षा-यातनेस बळी पडले.

वाळवंटात विहीरींचे अनन्य साधारण महत्व असते, परंतु जेव्हा वस्त्या नामशेष झाल्या तेव्हा ह्या विहीरी निकामी झाल्या त्याचप्रमाणे भव्य वास्तू ओसाड पडल्या.

८२. म्हणजे हे लोकप्रवास करीत असतात आणि नष्ट झालेल्या वस्त्यांचे अवशेष त्यांच्या अवलोकनात येत राहतात परंतु ते कधीहि बोधग्रहण करणाऱ्या दृष्टीने पाहत नाहीत.

हीच अवस्था वर्तमान काळातील भौतिक संशोधन करणाऱ्यांची व पुरातन अवशेषांना पाहणाऱ्यांची आहे की ते या गोष्टींना केवळ अशा नजरेने पाहतात की भूतकालीन लोकांनी कलाकुसरीचे कशा स्वरुपाचे नमुने सादर केले आहेत, त्यांची संस्कृती कशी होती? राहिले ही गोष्ट की त्यांनी जमीनीवर विधायक कार्य केले कि विघातक? आपल्या पालन कर्त्याशी त्यांनी कृतज्ञतेचे वर्तन अंगिकारले होते कि कृतघ्नतेचे?त्यांनी जे नमुने सादर केले आहेत ते कलाकुसरीचे आहेत कि उधळपट्टीचे? त्यांची संस्कृती भौतिकवादी होती कि अखिरतला ध्येय धोरण ठरविणारी? तर अशा प्रकारचे प्रश्न त्यांच्या मनात उद्‌भवत नाही कारण अशा गोष्टीमध्ये त्यांना स्वरस्य नसते. परिणामी वस्तुस्थिती प्रत ते पोहचत नाहीत.

८३. हृदय आंधळे असण्याचा अर्थ अंतर्दृष्टीपासून वंचित असणे. मनुष्य बाह्य दृष्टिने परिस्थितीचे अवलोकन करतो. पण परिस्थितिच्या अंतर्गत वास्तविकतेपर्यंत पोहचण्याची जी सामुग्री असते. तिला पाहण्यासाठी अतर्दृष्टी पाहिजे म्हणजे दृष्टि सोबत अंतर्दृष्टिचीहि आवश्यकता आहे. अन्यथा सर्वकाही पाहिल्यानंतर माणसाने काहीच पाहिले नाही असा अर्थ होतो. हाच मनाचा आंधळेपणा होय. आयतीत ज्या महत्वपूर्ण हकीगतीकडे संकेत केला गेला आहे त्याने या गोष्टीवर प्रकाश झोत पडतो की माणसाच्या समस्त सुप्त सामर्थ्याचे केंद्र हृदय आहे, जो उरात असते म्हणजे त्याचे अध्यारुत असणे पैगंबरांच्या वचनातहि स्पष्टात: निवेदिले गेले आहे-

اَلَا وَاِنَّ فِی الْجَسَدِ مُضْغَةً اِذَا صَلُحَتْ صَلُحَ
الْجَسَدُ کُلُّهٗ وَاِذَافَسَدَتْ فَسَدَ الْجَسَدُ کُلُّهٗ اَلَا
وَهِیَ الْقَلْبُ۔ (بخاری کتاب الایمان )

“चांगल्या प्रकारे लक्षात घ्या की शरीरात मांसाचा एक तुकडा आहे जर तो दुरुस्त असेल तर संपूर्ण शरीर दुरुस्तावस्थेत राहते. मात्र जर तो बिघडला तर संपूर्ण शरीर बिघडते. सावधान व्हा की ते ‘हृदय’ आहे.” (बुखारी - किताबुल ईमान)

आणि वस्तुस्थिती अशी की माणसाची अनुभूति व भावनेचे केंद्र हृदय आहे. जेव्हा मेंदूचे स्थान एका विचार करणाऱ्या उपकरणांचे व मदतनीसाचे आहे प्रेम व तिरस्कार, मैत्री व शत्रुत्व, प्रामाणिकपणा व अप्रमाणिकता, सहानुभूति व निषठुरता, बोध-ग्रहण व संवेदनशून्यता सारख्या गोष्टी मनाशीच संबंधित असतात. यास्तव जर कुरआनाने श्रद्धा व आचरणाकरिता खरा उत्तेजक हृदयास ठरविले आहे, तर त्याने खरे पाहता फार मोठ्या वस्तुस्थितीकडे अंगुली निर्देश केला आहे.

८४. म्हणजे या चुकीच्या भ्रमात राहू नका की काल-मापनाचा जो हिशेब तुम्ही कायम केला व ज्या आधारे तुम्ही घाई व उशीरचा निर्णय लावता, ती परिमाणे अल्लाहच्या येथेहि आहेत, मात्र जन- समूहांशी मामला करण्यासाठी त्याच्या जवळील काल गणनेचे साधन तुमच्या साधनांहून अगदी वेगळे आहे. त्याच्याजवळ एक दिवस तुमच्या एक हजार वर्षाइतका आहे. तात्पर्य एखाद्या जन-समूहाकरिता काही वर्षाची संधी सृष्टीच्या घडमाळाच्या हिशेबाने केवळ काही मिनिटांचीच संधी होय.

आता तर या गोष्टीचे ज्ञान माणसाला झाले आहे की विविध ग्रह- नक्षत्रांमध्ये दिवसाचे प्रमाण जमीनीवरील दिवसाच्या प्रमाणाहून भिन्न असते. यास्तव जर कुरआन ही खबर देत आहे की जन-समूहांशी मामला करण्याकरिता वेळेचे जे परिमाण सर्वश्रेष्ठ अल्लाहने निर्धारित केले आहे. त्या अनुरोधाने एक दिवस तुमच्या हजार वर्षासामान आहे. तर यात आश्चर्य ते कसले?

८५. म्हणजे माझे काम तर अल्लाहच्या अवज्ञेच्या दुष्परिणति पासून सावध करणे. त्यानंतर मानणे न मानणे तुमचे काम.

८६. म्हणजे अखिरत मध्ये ईमान बाळगणाऱ्यास जी उपजिविका मिळेल ती ना केवळ उतकृष्ट असेल किंबहुना सन्मानपूर्वक लाभेल.

८७. ही गोष्ट खरे पाहता काफिरांसंबंधी सांगितली गेली आहे परंतु आजच्या काळात अशा मुसलमानांची संख्या कमी नाही जे आपल्या राजकीय व ऐहीक स्वार्थापोटी कुरआनाच्या अदेशांना व त्याच्या शिकवणींना निकृष्ट दाखविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. हे समजणे उचित नव्हे की कुरआनात ज्या गोष्टी काफिरांच्या संबंधाने सांगितल्या गेल्या आहेत त्या काफिरांसाठी खास करून नाहीत तर त्या नियमात्मक गोष्ठी होत. अर्थात मुसलमान असणाऱ्या व्यक्तिचे एखादे काफिरासारखे वर्तन अंगीकरणे तितकेच घृणास्पद होय जेवढे एखादया मुस्लिमेतराचे त्यास अंगिकारणे.

५२. आणि (हे पैगंबर !) तुमच्या पूर्वी जो रसूल व नबी आम्ही पाठविला आहे. [८८] (असे हमखास घडले की) जेव्हा त्याने इच्छा बाळगली, सैतानाने त्याच्या अभिलाषेत अडथळा टाकला.[८९] परंतु अल्लाह, सैतानाने (मनात) टाकलेल्या कुशंकांना मिटवितो. मग अल्लाह आपल्या आयतींना दृढ करतो.[९०] आणि अल्लाह ज्ञाता व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[९१]

وَمَآ أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ مِن رَّسُولٍ وَلَا نَبِيٍّ إِلَّآ إِذَا تَمَنَّىٰٓ
أَلْقَى ٱلشَّيْطَٰنُ فِىٓ أُمْنِيَّتِهِۦ فَيَنسَخُ ٱللَّهُ مَا يُلْقِى ٱلشَّيْطَٰنُ
ثُمَّ يُحْكِمُ ٱللَّهُ ءَايَٰتِهِۦ ۗ وَٱللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٥٢﴾

५३. (ही स्थिती अशासाठी उद्‌भवली) की सैतानाने निर्माण केलेल्या अनिष्ट विचारांना त्याने अशा लोकांकरिता फितना (कसोटीचे माध्यम) बनवावे ज्याच्या हृदयात विकृति आहे, व ज्यांची हृदये सक्त आहेत.[९२] निःसंशय जुलमी लोक विरोधात बरेच दूर निघून गेले आहेत.

لِّيَجْعَلَ مَا يُلْقِى ٱلشَّيْطَٰنُ فِتْنَةً لِّلَّذِينَ فِى قُلُوبِهِم
مَّرَضٌ وَٱلْقَاسِيَةِ قُلُوبُهُمْ ۗ وَإِنَّ ٱلظَّٰلِمِينَ
لَفِى شِقَاقٍۭ بَعِيدٍ ﴿٥٣﴾

५४. आणि यासाठी की ते लोक, ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे त्यांनी हे जाणून घ्यावे की हे सत्य तुमच्या पालन कर्त्या तर्फे आहे व त्यांनी यावर ईमान राखावे व त्यांची हृदये याच्या समोर झुकावीत.[९३] निःसंशय अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांना सरळ मार्ग दाखवितो.

وَلِيَعْلَمَ ٱلَّذِينَ أُوتُوا۟ ٱلْعِلْمَ أَنَّهُ ٱلْحَقُّ مِن رَّبِّكَ
فَيُؤْمِنُوا۟ بِهِۦ فَتُخْبِتَ لَهُۥ قُلُوبُهُمْ ۗ وَإِنَّ ٱللَّهَ لَهَادِ
ٱلَّذِينَ ءَامَنُوٓا۟ إِلَىٰ صِرَٰطٍ مُّسْتَقِيمٍ ﴿٥٤﴾

५५. आणि कुफ्र (इन्कार) करणारे तर याच्या बाबतीत संशयग्रस्तच राहतील. येथपावेतो की त्यांच्यावर कियामतीची वेळ अकस्मात यावी किंवा वंचिताच्या दिवसाची ईश शिक्षा यावी.[९४]

وَلَا يَزَالُ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ فِى مِرْيَةٍ مِّنْهُ حَتَّىٰ تَأْتِيَهُمُ
ٱلسَّاعَةُ بَغْتَةً أَوْ يَأْتِيَهُمْ عَذَابُ يَوْمٍ عَقِيمٍ ﴿٥٥﴾

५६. त्या दिवशी [९५] राज्यसत्ता अल्लाहचीच असेल. तो यांच्या दरम्यान फैसला करील. तर जे लोक ईमान राखत असतील व त्यांनी सत्कर्मे केली असतील ते ईश-देणग्यांनी युक्त अशा बागांमध्ये असतील.

ٱلْمُلْكُ يَوْمَئِذٍ لِّلَّهِ يَحْكُمُ بَيْنَهُمْ ۚ فَٱلَّذِينَ
ءَامَنُوا۟ وَعَمِلُوا۟ ٱلصَّٰلِحَٰتِ فِى جَنَّٰتِ ٱلنَّعِيمِ ﴿٥٦﴾

५७. आणि ज्यांनी कुफ्र केले असेल व आमच्या आयतींना खोटे ठरविले असेल, त्यांच्या करिता अपमानित करणारी ईश-शिक्षा असेल.

وَٱلَّذِينَ كَفَرُوا۟ وَكَذَّبُوا۟ بِـَٔايَٰتِنَا فَأُو۟لَٰٓئِكَ
لَهُمْ عَذَابٌ مُّهِينٌ ﴿٥٧﴾

८८. रसूल व नबी यात पदाच्या वास्तवतेच्या दृष्टीने कसलाहि फरक नाही, परंतु जबाबदारींच्या दृष्टीने फार मोठा फरक आहे. प्रत्येक रसूल नबी (पैगंबर) असतो परंतु त्याच्या जबाबदाऱ्या एका नबीहून जास्त असतात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे नबीहि होते व रसूल देखील. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह मरीयम टीप क्र. ७१

८९. कोणत्याहि रसूल व नबीची हीच अभिलाषा असते की, ज्या सत्यास घेऊन तो आला आहे त्यास लोकांनी कबूल करावे, परंतु जेव्हा तो आपले हे आवाहन प्रस्तुत करतो तेव्हा सैतान लोकांच्या मनात अनिष्ठ विचारांचा अंतर्भाव करून पैगंबर व त्याच्या आवाहनाविषयी संशय निर्माण करतो व लोकांना त्याचा विरोध करण्यास प्रवृत्त करतो. अशा प्रकारे सैतान पैगंबराच्या इच्छेत अडथळा आणतो. त्याच्या मार्गात अडसर उभा करतो. अंतिम रसूल हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशीहि असेच घडले. एकीकडे त्यांची ही मनस्वी इच्छा होती की जनसमूहाने आपल्यावर ईमान राखवे व सत्य-आवाहनास कबूल करून अल्लाहच्या कृपेस पात्र व्हावे. तर दुसरीकडे जन-समूहाचे आचरण असे होते की पैगंबरांच्या आवाहनास सहन करण्यास कोणत्याहि प्रकारे तयार नव्हते. येथपावेतो की त्यांना मक्केहून स्थलांतर करण्यास भाग पाडले या प्रसंगी पैगंबरांना सांत्वना देत फर्माविले गेले की तुमच्याशी जो मामला होत आहे, ही काही नवीन बाब नव्हे पैगंबरांशी नेहमी हेच वर्तन होत राहिले.

९०. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह अशी परिस्थिती निर्माण करतो की, सैतानाने निर्माण केलेले अनिष्ट विचार नाहीसे होतात व सत्य अशा तेजाने दृगोचर होते की जणू ढग आड लपलेला चंद्र ढग इतस्तत: होताच प्रखरतेने दृष्टीस पडावा.

कुरआनाचे हे निवेदन अक्षरश: खरे ठरले. सैतान प्रणित अनिष्ट विचारांच्या परिणामी ज्या शंका कुशंका उद्‌भवलेल्या होत्या त्यांचे निरसन झाले व सत्य धर्म अशा प्रकारे प्रकाशित झाला की त्यावर कसलेच आवरण राहिले नाही.

९१. अल्लाहच्या या दोन गुणविशेषांना या ठिकाणी निवेदिण्याचा हेतु या गोष्टीकडे संकेत करणे होय की हे जे काही पैगंबराशी वर्तन होते ते उद्देश्याविना नसते. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरांशी जो मामला करतो, तो ज्ञान व बुद्धि कौशल्यावर आधारित असतो. यास्तव विश्वास बाळगा की, सैतानाने जी उपद्रव निर्माण केला आहे त्याच्या विरोधात अल्लाह मांगल्य निर्माण करील.

आयतीचा जो अर्थ आम्ही वर निवेदन केला, तो ना केवळ बोध-शैलीस अनुसरून आहे. किंबहुना या सदृश्य ज्या गोष्टी कुरआनात अन्य ठिकाणी फर्माविल्या गेल्या आहेत त्याच्याशी सुसंगत आहे. परंतु काही भाष्यकारांनी एका बनावटी (मौजुअ) हदीसचा आधार घेऊन याचा हा अर्थ निवेदन केला आहे की, जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अनेकेश्वरवरद्यांना सूरह वन्नज्म ऐकवित होते ज्यात मूर्ति पूजेचा धि:कार केला गेला आहे तेव्हा सैतानाने पैगंबरांच्या मुखाने मूर्तिंकरिता प्रशंसात्मक वचने वदविली. हीच सैतानाची प्रेरणा होय जिला सर्वश्रेष्ठ अल्लाहने नंतर रद्द केले. याविषयीचे निवेदन नंतरच्या आयतीत केले गेले आहे.

हे कथन इब्ने जरीर तबरी यांनी आपल्या 'तफसीर जामेउल बयान' या भाष्यात, जे अरबी भाषोतील प्रसिद्ध व जुने भाष्य आहे,संशोधाविनाच उल्लेखिले आहे. यावर काही भाष्याकारांनी माशीवर माशी चिटकविण्याचे काम केले. परंतु अधिकांश भाष्याकार, हदीस ज्ञाते, व विद्वानांनी याची गंभीर दखल घेतली व या कथनास बनावटी व खोटे ठरविले. यास्तव इमाम राजी यांनी आपल्या भाष्यात यावर विवरणात्मक चर्चा करतांना लिहिले आहे की, हा किस्सा मनगढत आहे. (तफसीर कबीर, खंड २३ पृ. ५१) या संदर्भात अल्लमा इब्ने कसीर लिहितात-

> 'या किश्श्याची तमाम कथने खंडित (मुर्सल) आहेत आणि माझ्या अवलोकनात असे आले नाही की, एखाद्या ठिकाणी हे योग्य सनदीसह सलग निवेदीले गेले असावे.' (तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. २२९)

आणि अल्लामा आलूसी आपल्या 'रूहूल मआनी' या भाष्यात लिहितात की,

"अनेक संशोधकांनी या किश्श्याला अस्विकृत ठरविले आहे. बैहकी म्हणतात हा किस्सा बौद्धिक दृष्ट्या सिद्ध होत नाही आणि काजी 'अयाज अश्शिफा' मध्ये असे फर्मावितात की या हदीस वचनास अप्रतिष्ठीत ठरविण्यास ही गोष्ट पुरेशी आहे की यास सहा हदीस निवेदका (सिहासित्ता) पैकी कोणीही निवेदिले नाही आणि ना एखाद्या विश्वनीय निवेदकाने यास खऱ्या सुरक्षित व सलग प्रमाणांसह निवेदिले आहे, किंबहुना या कथनात फक्त अशा भाष्यकारांना व इतिहासकारांना स्वारस्य राहीले ज्यांना प्रत्येक अपरिचित कथनात गोडी असते आणि जे ग्रंथांमधून योग्य व अयोग्य अशा प्रत्येक कथनास ग्रहण करतात आणि....... 'बहर' मध्ये आहे की या किश्श्यासंबंधी इमाम मुहम्मद बिन इसहाक यांना जे सीरतुन्नबीचे संकलक आहेत विचारले गेले तेव्हा त्यांनी फर्माविले, हा नास्तिकांचा रचलेला किस्सा आहे." (रुहुल मआनी-खंड ६ पृ. १७७)

अल्लामा आलूसी यांनी या किश्श्याच्या खंडनार्थ विवरणात्मक चर्चा केल्यावर लिहिले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जीभेवर सैतानाने मूर्तिच्या प्रशंसेची वचने आणली असे समजण्याऐवजी सैतानाने काही कथन कर्त्यांच्या जीभेवर निवेदन आणले असे समजणे आमच्या करिता सोपे आहे.(पहा- रहुल

मआनी खंड २ पृ. १८२)

उर्दू भाषेत अल्लामा शिबली आपल्या 'सिरतुन्नबी' या संशोधनात्मक ग्रंथात या किश्श्याला वाह्यात ठरवित लिहितात-

'हा किस्सा परिपूर्ण वाह्यत व उल्लेख न करण्याजोगा आहे व बैहकी, काजी अयाज, अल्लामा ऐनी, हाफिज मन्जरी, अल्लामा नववी सारख्या हदीसच्या विद्वानांनी यास खोटे व बनावयी लिहिले असले तरी खेदाची गोष्ट अशी की बहुतेक हदीस-ज्ञात्यांनी या कथनास प्रमाणासह उल्लेखिले आहे.' (सिरतुन्नबी खंड १ पृ. २२४)

आणि मौलाना मौदूदी यांनी आपल्या मौल्यवान भाष्य 'तफहीमुल कुरआन' मध्ये यावर दृढ व सविस्तर प्रमाणमुक्त चर्चा करीत या कथनाची विल्हेवाट लावली आहे व शेवटी असे लिहिले आहे की,

अल्लाह रक्षण करो अशा कथन वादापासून की जो प्रमाणांचे सातत्य किंवा कथन कर्त्यांची विश्वसनीयता किंवा कथनांचे अनेक क्रम पाहून एखाद्या मुसलमानास ईश-ग्रंथ (कुरआन) व पैगंबराविषयी अशा सक्त गोष्टी मानण्यास प्रवृत्त करील. (तफहीमुल कुरआन खंड ३ पृ. २४४)

वस्तुत: हे कथन इतके वाह्यात व अशिष्ट आहे की यास निवेदन करणे देखील नकोसे वाटते म्हणून आम्ही यास पूर्णपणे उल्लिखित केले नाही, किंबहुना याचा खुलासा देणेच पर्याप्त मानले. हे कथन कुरआनाच्या निवेदनाच्या अगदी विरूद्ध व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर उघड आरोप करणारे आहे म्हणून याचे खंडन करण्यासाठी ही एवढीच गोष्ट पुरेशी आहे. परंतु जे लोक कथन-वादात रममाण असतात ते काही न काही अर्थ लावून अशा गोष्टीसहि कबूल करतात जी कुरआना विरूद्ध असते. कथन कर्त्यावर ते आच येऊ देत नाही मग त्यासाठी पैगंबरांचे व्यक्तिमत्व दुषित झाले तरी त्यांना चालते.

हदीस-स्विकृतिचे हे स्तर अगदी चुकीचे आहे. मग-हदीस-शास्त्राचा कितीहि मोठा विद्वान यास खरे ठरविण्यासाठी जीवाचे रान का करीना. कुरआन, फुर्कान म्हणजे कसोटी आहे म्हणून जे कथन या कसोटीवर खोटे सिद्ध होईल ती रद्दबातल होय. अशा कथनाला हदीस तंत्राच्या चर्चा विवाद अडकवून खरे सिद्ध केले जाऊ शकत नाही.

आणि जेथपावेतो भाष्यांतर्गत आयतीचा संबंध आहे. यातही गोष्ट सर्वसामान्यत : निवेदिली गेली आहे की सैतान कशा प्रकारे एका पैगंबराच्या इच्छेत अडथळा आणतो. ही अशाच प्रकारची गोष्ट होय जशी सूरह अन आम आयत क्र. ११३ व ११४ मध्ये निवेदिली गेली आहे म्हणून यास केवळ पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी खास ठरविण्याचे काहीही कारण नाही. आणि ना ओढून ताणून असा अर्थ लावण्याची गरज आहे की, तमन्ना (इच्छे) चा अर्थ परिचित अर्थाहून वेगळा अर्थ वाचणे व पठण करणे असा लावावा हा अर्थ अनेक भाष्यकारांनी घेतला आहे.

अधिक हे की जो किस्सा निवेदन केला जाता आहे तो मक्का काळाशी संबंधित आहे तो हब्श(ॲबिसिनिया), हून स्तलांतराच्या काही काळ नंतरचा सांगितला जातो. जेव्हा सूरह हज्ज मदीनेच्या काळाशी अवतरीत झाली आहे. जसे त्यातील मजकूर (हिजरत, जेहाद इ. चे आदेश तसेच हजपासून मुसलमानांना रोखण्याचा निवेदन) वरून उघड आहे म्हणून या सूरहच्या भाष्यांतर्गत आयतीच्या त्या अवतरणकालीन परिस्थितीशी कसलाच संबंध नाही जी या किश्श्यात निवेदिली गेली आहे.

९२. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबराना या परिस्थितीतून अशासाठी पार पाडतो की सैतानाने मनात निर्माण केलेल्या शंका कुशंका त्या लोकांसाठी कसोटीचे कारण व्हाव्यात ज्यांच्या मनात रोग (विकृति) आहे व ज्यांची हृदये कठोर झालेआहेत. विकृतिशी अभिप्रेत दुराग्रही व अपराधात्मक विचारसरणी होय आणि हृदये कठोर होण्याचा अर्थ असा की कोणताही उपदेश त्यांच्यावर परिणाम करीत नाही. हा परिणाम होय, त्यांच्या त्या अपराधात्मक विचार सरणीचा, असे लोक जेव्हा सैतानाने मनात घातलेल्या शंकांद्वारे कसोटीत सापडतात तेव्हा ते त्याच्या उपद्रवास बळी पडतात व त्यांच्या मनातील विकृति दिसून येते व त्यांचा विरोध अधिक तीव्र होतो.

९३. म्हणजे जे लोक अज्ञानाच्या अंध:कारात राहात नाही, किंबहुना ज्ञानाच्या प्रकाशात चालतात ते जेव्हा असे पाहतात की वातावरण शंका कुशंकांनी कलुषित झाले आहे. तेव्हा असे समजतात की हा सर्व सैतानाचा उपद्रव आहे आणि पैगंबरांचे आवाहन सत्य आहे. सत्य व असत्याची ही ओढाताण ज्यांना अनपोक्षित नसते व ही ओढातण पाहून त्यांचे ईमान अधिक मजबूत होते व त्यांची हृदये अल्लाह समोर झुकतात की या कसोटी मागे त्याची महान हिकमत (बुद्धिकौशल्य) कार्यरत आहे.

९४. म्हणजे जे लोक हटवादीपणात ग्रस्त राहतात ते पैगंबराची म्हणणे कोणत्याहि प्रमाणाद्वारे मानणारे नाहीत ते आपल्या नकारावर कायम राहतात.त्याचे डोळे तेव्हा उघडतील जेव्हा ते कियामतीस पाहतील किंवा त्या ईश-शिक्षोस जी कुफ्रच्या मोबदल्यास त्यांना लाभेल. वंचिनतेच्या दिवसाशी अभिप्रेत मांगल्याशी वंचितता होय. म्हणजे विनाशााचा दिवस.

९५. अभिप्रेत कियामतीचा दिवस होय.

**आणि ज्या लोकांनी अल्लाहच्या मार्गत हिजरत (देशत्याग) केला, मग त्यांची हत्या केली गेली किंवा ते मरण पावलेत, अल्लाह अवश्य त्यांना चांगली उपजिविका प्रदान करील आणि निःसंशय अल्लाहच उत्कृष्ट उपजिविका प्रदान करणारा आहे. (अल-कुर्आन)**

५८. आणि ज्या लोकांनी अल्लाहच्या मार्गात हिजरत (देशत्याग) केला,[९६] मग त्यांची हत्या केली गेली किंवा ते मरण पावलेत, अल्लाह अवश्य त्यांना चांगली उपजिविका प्रदान करील. [९७] आणि निःसंशय अल्लाहच उत्कृष्ट उपजिविका प्रदान करणारा आहे.

وَالَّذِينَ هَاجَرُوا فِي سَبِيلِ اللَّهِ ثُمَّ قُتِلُوا أَوْ مَاتُوا
لَيَرْزُقَنَّهُمُ اللَّهُ رِزْقًا حَسَنًا ۚ
وَإِنَّ اللَّهَ لَهُوَ خَيْرُ الرَّازِقِينَ ﴿٥٨﴾

५९. तो त्यांना अशा ठिकाणी दाखल करीत ज्या पासून ते आनंदित होतील.[९८] निःसंशय अल्लाह ज्ञाता व श्रेष्ठतम आहे.[९९]

لَيُدْخِلَنَّهُم مُّدْخَلًا يَرْضَوْنَهُ ۗ وَإِنَّ اللَّهَ لَعَلِيمٌ
حَلِيمٌ ﴿٥٩﴾

६०. हा आहे (त्या लोकांचा मोबदला) आणि एखाद्याने त्याच प्रकारे बदला घ्यावा ज्या प्रकारे त्याच्याशी केले गेले, मग त्याच्यावर अतिरेक झाल्यास अल्लाह निशिचतच त्याला सहाय्य करील. [१००] अल्लाह माफ करणारा व क्षमाशील आहे.[१०१]

ذَٰلِكَ ۖ وَمَنْ عَاقَبَ بِمِثْلِ مَا عُوقِبَ بِهِ
ثُمَّ بُغِيَ عَلَيْهِ لَيَنصُرَنَّهُ اللَّهُ ۗ إِنَّ اللَّهَ لَعَفُوٌّ غَفُورٌ ﴿٦٠﴾

६१. हे अशासाठी की अल्लाह रात्रीला दिवसात समावेश करतो व दिवसाला रात्रीत आणि अल्लाह ऐकणारा व पाहणारा आहे.[१०२]

ذَٰلِكَ بِأَنَّ اللَّهَ يُولِجُ اللَّيْلَ فِي النَّهَارِ وَيُولِجُ النَّهَارَ
فِي اللَّيْلِ وَأَنَّ اللَّهَ سَمِيعٌ بَصِيرٌ ﴿٦١﴾

६२. तसेच अशासाठीहि की अल्लाह हाच सत्य आहे आणि ज्या गोष्टी मिथ्या आहेत ज्यांना हे लोक अल्लाहला सोडून पुकारतात.[१०३] आणि अल्लाहच अत्युच्च पद बाळगणारा व महान होय.[१०४]

ذَٰلِكَ بِأَنَّ اللَّهَ هُوَ الْحَقُّ وَأَنَّ مَا يَدْعُونَ مِن دُونِهِ
هُوَ الْبَاطِلُ وَأَنَّ اللَّهَ هُوَ الْعَلِيُّ الْكَبِيرُ ﴿٦٢﴾

६३. काय तुम्ही हे पाहत नाही की अल्लाह आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो, तेव्हा जमीन हिरवीगार, टवटवीत होते, निःसंशय अल्लाह मोठा सूक्ष्मदर्शी आणि जाणकार आहे.[१०५]

أَلَمْ تَرَ أَنَّ اللَّهَ أَنزَلَ مِنَ السَّمَاءِ مَاءً فَتُصْبِحُ
الْأَرْضُ مُخْضَرَّةً ۗ إِنَّ اللَّهَ لَطِيفٌ خَبِيرٌ ﴿٦٣﴾

६४. त्याचेच आहे जे काही आकाशांमध्ये आहे व जे काही जमीनीवर आहे व निःसंशय अल्लाह निःस्पृह व गुणवैशिष्ठ्यांनी युक्त, प्रशांसेस पात्र असा आहे.[१०६]

لَّهُ مَا فِي السَّمَاوَاتِ وَمَا فِي الْأَرْضِ ۗ
وَإِنَّ اللَّهَ لَهُوَ الْغَنِيُّ الْحَمِيدُ ﴿٦٤﴾

९६. हिजरत (देशत्याग) इस्लामच्या दृष्टीकोनाने केवळ तोच विश्वसनीय आहे जो अल्लाहच्या मार्गत केलेला असेल. म्हणजे जो केवळ अल्लाहसाठी व त्याच्या धर्माच्या निकडी भागविण्याकरिता केला गेला असेल. हदीस वचनातील उल्लेखानुसार:-

اِنَّمَا الاَعْمَالُ بِالنِّيَةِ وَ اِنَّمَا لِاِمْرِئٍ مَّانَوٰى فَمَنْ كَانَتْ هجرتُهُ اِلٰى اللهِ و رَسُولِهِ فهجرتُهُ اِلٰى اللهِ و رسولِهِ وَمَنْ كَانَتْ هِجرتُهُ الىٰ دُنْيَا يُصِيْبُهَا اَوْ اِمْرَاةٍ يتزوجها فهجرتُهُ الى مَا هَاجَرَ اِلَيْهِ ـ (بخاری کتاب الایمان والنذر)

'आचरण संकल्पांवर आधारित आहे. माणसाकरिता तेच आहे ज्याचा तो संकल्प धरील. तेव्हा ज्याचा देशत्याग अल्लाह व त्याच्या पैगंबराकडे असेल तर त्याचा देशत्याग अल्लाह व त्याच्या पैगंबराकडेच आहे. आणि ज्याचा देश- त्याग ऐहीक प्राप्ती किंवा एखाद्या स्त्रीशी विवाह करण्याच्या हेतुने असेल तर त्याचा देशत्याग त्याच गोष्टीसाठी आहे. जिच्याकरिता त्याने देशत्याग केला.(बुखारी किताबुल ईमान).

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह निसा टिप क्र. १७७)

९७. अभिप्रेत अखिरतची उपजिविका होय.

९८. अभिप्रेत जन्नत होय.

९९. हा संकेत या गोष्टीकडे आहे की, अल्लाह जाणतो की कोण या इनामास पात्र आहेत व तो त्यांच्याशी अतिशय सन्मानाचा व्यवहार करील.

१००. आयतीचा अर्थ असा की ज्या लोकांनी अल्लाहच्या मार्गात हिजरत केली त्यांच्यासाठी आखिरत मध्ये हे इनाम आहे. राहिले त्यांचे आजचे अत्याचार पिडीत जीवन तर सर्वश्रेष्ठ अल्लाह या जगातहि त्यांची मदत करील.

हिजरत नतर मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांनी मदीनेच्या मुसलमानांविरूद्ध कूर कारवाई सुरू केली होती. जसे आयत क्र. ३९ वरून स्पष्ट होते. मदीनाबाहेर प्रवास करणाऱ्या मुसलमानांवर त्यांच्या हल्ल्यांचा धोका वाढत चालला होता. या प्रसंगी मुसलमानांना या आयतीद्वारे ताकीद केली गेली की अतिरेकाचे उत्तर म्हणून ते तसलाच अतिरेक करू शकतात आणि यानंतरही जर अतिरेक थांबला नाही तर सर्वश्रेष्ठ अल्लाह अत्याचार पिडीतांचे समर्थन आपल्या खास मदतीने करील. यास्तव जेव्हा मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांच्या कूर कारवाया थांबल्या नाहीत व त्यांनी अत्याचाराने गाजलेल्या मुसलमानांविरूद्ध युद्धाचे पाऊल उचलले तेव्हा बद्रच्या युद्धात ईमान धारकांसाठी अल्लाहची मदत अवतरली.

१०१. अत्याचार पिडीत मुसलमानांना ही सात्वना होय की अल्लाह त्यांचे अपराध माफ करील व त्यांना जहन्नमपासून वाचवील.

१०२. म्हणजे जो रात्र व दिवसाच्या स्थित्यंतराचे सामर्थ्य बाळगतो तो खात्रीने या गोष्टीचेही सामर्थ्य बाळगतो की अत्याचाराचे काळे कुट्ट मेघ दूर सारून न्यायाचा सूर्य प्रखरतेने चमकावा. आणि मग तो आपल्या एकनिष्ठ दासांची मदत का म्हणून करणार नाही जेव्हा तो सर्व काही ऐकत आहे व पाहतही आहे.

१०३. म्हणजे अनेकेश्वरवादी ज्या उपास्यांना पुकारतात ते खोटे होत. कोणाला कसलीही मदत करण्याचे सामर्थ्य ते बाळगत नाही, परंतु अल्लाह खराखुरा उपास्य होय आणि तो निश्चितच मदत करण्याचे सामर्थ्य बाळगतो तेव्हा कुफ्र व इस्लामच्या या संघर्षात तो ईमान बाळगणाऱ्यांची मदत का म्हणून करणार नाही?

१०४. या ठिकाणी अल्लाहचे दोन गुण-विशेष 'अत्युच्च' व 'महान' वर्णिले गेले आहेत. अत्युच्च हे वैशिष्ट्य त्याच्या दर्जाची उच्चतमता जाहीर करते व महानतेचे वैशिष्ट्य त्याच्या सामर्थ्य व अधिकाराची महानता व्यक्त करते.

शिर्क करणारे अल्लाहशी अशा गोष्टीचा संबंध जोडतात ज्या त्याच्या प्रतिष्ठेलाही न शोभणाऱ्या असतात व त्याच्या अधिकाराच्याहि विपरित दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ते अल्लाहला मानताताहि पण अशा प्रकारे की त्याच्या अत्युच्च व महान असण्यास नकार दर्शवितात. वस्तुत: अल्लाहला मानणे खऱ्या अर्थाने तेच होय की ज्याने त्या गुणविशेषांचा इन्कार होत नसावा, जे कुरआनात निवेदिले गेले आहेत.

१०५. म्हणजे लोक पाऊस व जमीनीचे हिरवे टवटवीत होणे पाहतात पण त्यावर सखोल विचार करीत नाही. त्यांनी जर विचारचिंतन केले असते तर ईश्वराची खरी ओळख त्यांना झाली असती. कोरड्या ठणठणीत जमीनीचे पावसाचे थेंब पडताच हिरवेगार व टवटवीत होणे हे या गोष्टीचे लक्षण होय की सर्व त्याची कार्यकुशलता होय जो अतिशय सूक्ष्म उपाय योजना करणारा व परिस्थितीशी अवगत असणारा आहे म्हणून ईश्वराबाबत या कल्पानेस कसलाही वाव नाही की त्याने विश्व तर निर्माण केले पण आता त्याच्या विश्वात काय होत आहे, त्याची ना त्याला खबर आहे ना कसले कर्तव्य.

१०६. जो समस्त सृष्टीचा स्वामी असेल तो केव्हा एखाद्या गोष्टीचा गरजवंत होऊ शकतो? म्हणून त्याचे हे वैशिष्ट्य की तो प्रत्येक प्रकारच्या गरजांपासून नि:स्वार्थ आहे. एक स्पष्ट हकीगत आहे. आणि ही वस्तुस्थिती देखील स्पष्ट आहे की गुणवैशिष्ट्यांनी युक्त व प्रशंसेचा अधिकारी आहे.

६५. काय तुम्ही पाहत नाहीत की अल्लाहने जमीनीच्या सर्व वस्तू तुमच्यासाठी तुमच्या अधीन केल्या आहेत [१०७] आणि नौकेला की समुद्रात त्याच्या हुकुमाने चालते. त्याने आकाशाला सावरून ठेवले आहे की जमीनीवर न कोसळावे परंतु त्याच्या आदेशाने निःसंशय अल्लाह लोकांसाठी मोठी दया बाळगणारा व मोठा कृपाळू आहे.[१०८]

أَلَمْ تَرَ أَنَّ اللّٰهَ سَخَّرَ لَكُمْ مَّا فِي الْأَرْضِ وَالْفُلْكَ تَجْرِيْ
فِي الْبَحْرِ بِأَمْرِهٖ ۭ وَيُمْسِكُ السَّمَاۗءَ أَنْ تَقَعَ عَلَى الْأَرْضِ
إِلَّا بِإِذْنِهٖ ۭ إِنَّ اللّٰهَ بِالنَّاسِ لَرَءُوْفٌ رَّحِيْمٌ ﴿٦٥﴾

६६. तोच होय ज्याने तुम्हाला जीवन प्रदान केले मग तोच तुम्हाला मरण देतो आणि तोच तुम्हाला पुन्हा जीवंत करील. खरे पाहता, मनुष्य फारच कृतघ्न आहे.[१०९]

وَهُوَ الَّذِيْٓ أَحْيَاكُمْ ۡ ثُمَّ يُمِيْتُكُمْ ثُمَّ يُحْيِيْكُمْ ۭ
إِنَّ الْإِنْسَانَ لَكَفُوْرٌ ﴿٦٦﴾

६७. प्रत्येक उम्मत (जन-समूहा) साठी आम्ही उपासनेची एक पद्धत निर्धारीत केली होती, ज्यानुसार ती चालत आहे. [११०] यास्तव त्याने (जन-समूहाने) तुमच्याशी वाद घालू नये. [१११] तुम्ही आपल्या पालनकर्त्याकडे आमंत्रित करा.[११२] निःसंशय तुम्ही सरळ मार्गावर आहात.[११३]

لِكُلِّ أُمَّةٍ جَعَلْنَا مَنْسَكًا هُمْ نَاسِكُوْهُ فَلَا يُنَازِعُنَّكَ فِي
الْأَمْرِ وَادْعُ إِلٰى رَبِّكَ ۭ إِنَّكَ لَعَلٰى هُدًى مُّسْتَقِيْمٍ ﴿٦٧﴾

६८. आणि जर ते तुमच्याशी वाद घालतील तर त्याना सांगा अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो जे काही तुम्ही करीत आहात.

وَإِنْ جٰدَلُوْكَ فَقُلِ اللّٰهُ أَعْلَمُ بِمَا تَعْمَلُوْنَ ﴿٦٨﴾

६९. अल्लाह कियामतीच्या दिवशी तुमच्या दरम्यान त्या गोष्टीचा फैसला करील ज्यात तुम्ही मतभेद करीत आहात.

اَللّٰهُ يَحْكُمُ بَيْنَكُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ فِيْمَا كُنْتُمْ فِيْهِ
تَخْتَلِفُوْنَ ﴿٦٩﴾

७०. काय तुम्ही नाही जाणत की आकाश व जमीनीवर जे काही आहे अल्लाह त्यास जाणतो. हे सर्व एका ग्रंथात समाविष्ट आहे [११४] निःसंशय अल्लाहकरिता हे अतिशय सोपे आहे.

أَلَمْ تَعْلَمْ أَنَّ اللّٰهَ يَعْلَمُ مَا فِي السَّمَاۗءِ وَالْأَرْضِ ۭ
إِنَّ ذٰلِكَ فِيْ كِتٰبٍ ۭ إِنَّ ذٰلِكَ عَلَى اللّٰهِ يَسِيْرٌ ﴿٧٠﴾

७१. हे लोक अल्लाहला सोडून अशा गोष्टींची उपासना करतात, ज्यांच्याकरिता अल्लाहने कोणतेहि प्रमाण अवतरीत केले नाही आणि ना यांच्या बाबत त्यांना कसले ज्ञान आहे.[११५] या अत्याचारी करिता कोणीहि सहाय्यक नाही.

وَيَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَا لَمْ يُنَزِّلْ بِهٖ سُلْطٰنًا
وَّمَا لَيْسَ لَهُمْ بِهٖ عِلْمٌ ۭ وَمَا لِلظّٰلِمِيْنَ مِنْ نَّصِيْرٍ ﴿٧١﴾

१०७. म्हणजे तुमच्या सोबत लावल्या गेल्या आहेत.

१०८. आकाशातील वस्तूंचे अवकाशात अधांतरी लोंबकळत राहणे व आकाशाचे छत स्वरूपात स्थिर राहणे, अशा प्रकारे की कधीही त्याचा एखादा तुकडा जमीनीवर कोसळू नये. काय. या गोष्टी माणसाच्या अंगी हा विश्वास निर्माण करीत नाही की सृष्टीचा निर्माता माणसाच्या हक्कात किती दयाळू व मेहरबान आहे !

१०९. जीवन अल्लाहची फार मोठी देणगी आहे, जी माणसाला प्रदान केली गेली आहे. आणि दुसरे जीवन खरे पाहता परिपूर्ण देणगी होय, मात्र या अटीवर की मनुष्य या देणगीची कदर ओळखणारा व आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणारा असावा. राहिला मृत्यु. तर तो तात्पुरते जीवन व निरंतर जीवनाच्या दरम्यानची एक संक्रमक अवस्था होय. परंतु या वास्तवतेस दृष्टीआड करून मनुष्य जीवनरूपी देणगीस वाया घालवितो व आपल्या पालनकर्त्याशी कृतघ्न होतो.

११०. या सूरहमध्ये हज्जचे जे धार्मिक विधी वर्णिले गेले आहेत, त्यावर काही लोकांकडून, विशेषत: मदीनाच्या यहुदीकडून हा आक्षेप घेतला गेला असेल की जर ही उपासनापद्धति अल्लाहतर्फे निर्धारीत आहे तर इतर पैगंबरांच्या जन- समूहांमध्ये अल्लाहच्या उपासनेच्या अन्य पद्धति कशा प्रचलीत झाल्या? उदाहरणार्थ यहुदीच्या शरीअतीत कुर्बानीची पद्धत तर आहे परंतु उंटाच्या कुर्बानीस अल्लाहच्या निशाण्यापैकी ठरविले गेले नाही, तसेच कुर्बानीसाठी हज्जचे दिवस खास ठरविले गेले नाहीत किंवा हे की, यहुदीच्या ठिकाणी सब्त (शनिवार) साजरा करण्याचा आदेश आहे परंतु कुरआनाच्या शरीअतीत हा आदेश दिला गेला नाही. या शंकेचे निरसन करण्याकरिता, येथे फर्माविले गेले की आम्ही प्रत्येक जन-समूहासाठी उपासनेची एक पद्धत निश्चित केली होती ज्यानुसार तो आचरण करीत आला आहे.

अर्थात हे की, अल्लाहच्या उपासनेच्या पद्धति निर्धारीत करण्यात परिस्थितीनुरूप फरक राहीला आहे. आता जर अल्लाहच्या बुद्धिकौशल्याची ही निकड असेल की अंतिम पैगंबराच्या जन समूहासाठी एक खास उपासना पद्धत निर्धारीत केली जावी तर यावर कोणाला आक्षेप घेण्याचा काय हक्क? काय अल्लाहच्या उपासनेची पद्धत निश्चित करण्यात लोकांची मर्जी अंतर्भूत असते कि अल्लाहला अधिकार आहे की जी पद्धत इच्छिल ती निर्धारीत करील?

१११. म्हणजे ही तात्विक वस्तुस्थिती त्या लोकांसमोर सादर करणे पुरे आहे या बाबीवर अधिक चर्चा करणे आवश्यक नाही.

११२. म्हणजे अल्लाहच्या उपासनेच्या पद्धतीमध्ये मत्तभेदाच्या समस्येवर व चर्चेस लांबविण्यापेक्षा मूळ आवाहनास प्रस्तुत करण्याचा इतमाम राखला पाहिजे.

११३. अर्थात हे पैगंबर ज्या उपासना पद्धतिस तुम्ही अंगिकारले आहे ती त्या वहीनुसार आहे जी तुमच्यावर अवतरीत केली गेली आहे. म्हणून तुम्ही मार्गदर्शन लाभलेले आहात व मार्गदर्शनाचा हाच मार्ग आहे जो सरळ अल्लाहपर्यंत पोहचतो.

११४. ही शिर्कच्या खंडनार्थ जी पुढे केली जात आहे प्रस्तावना होय की अल्लाह ज्याला सृष्टीच्या अणु रेणूचे ज्ञान आहे व ज्याने सृष्टीच्या समस्त अस्तित्वांचे व घटनांचे रेकॉर्ड सुरक्षित करण्याची उपाय योजना केली आहे त्याच्या ज्ञानात ही गोष्ट नाही की कोठे एखादा ईश्वर अस्तित्वात आहे. जर अन्य एखादा ईश्वर किंवा देवी देवता असते तर याचे त्याला ज्ञान नसते?

११५. म्हणजे अल्लाहशिवाय अन्य एखाद्याचे उपासनेस पात्र असण्यांसंबंधी ना ईश-आदेश अवतरल्याचे प्रमाण हजर आहे ना एखादे बौद्धिक वा स्वाभाविक प्रमाण ज्याला ज्ञान म्हटले जाऊ शकते.

७२. आणि जेव्हा यांना आमच्या दीव्य आयती ऐकविल्या जातात तर तुम्ही पाहता की यांच्या चेहऱ्यावरून नाराजी जाहीर होत आहे [११६] जणू ते या लोकांवर हल्ला चढवतील. जे आमच्या आयती त्यांना ऐकवितात. सांगा, मी तुम्हाला दाखवू की याहूनहि निकृष्टतम गोष्ट कोणती आहे? आग जिच्याविषयी अल्लाहने काफीरांशी वायदा केलेला आहे.[११७] आणि ते मोठे वाईट स्थान होय.

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُنَا بَيِّنَاتٍ تَعْرِفُ فِي
وُجُوهِ الَّذِينَ كَفَرُوا الْمُنكَرَ ۖ يَكَادُونَ يَسْطُونَ بِالَّذِينَ
يَتْلُونَ عَلَيْهِمْ آيَاتِنَا ۗ قُلْ أَفَأُنَبِّئُكُم بِشَرٍّ مِّن ذَٰلِكُمُ ۗ
النَّارُ وَعَدَهَا اللَّهُ الَّذِينَ كَفَرُوا ۖ وَبِئْسَ الْمَصِيرُ ﴿٧٢﴾

७३. लोक हो ! एक उदाहरण दिले जात आहे, लक्षपूर्वक ऐका, अल्लाह खेरीज ज्यांना तुम्ही पुकारता ते एक माशीहि निर्माण करू शकत नाहीत. मग यासाठी ते सर्व एकत्रित का होईनात. [११८] आणि जर माशीने यांच्यापासून काही हिरावून घेतले तर ते तिच्यापासून सोडवूहि शकत नाही. [११९] अपेक्षा बाळगणाराहि निर्बल व अपेक्षितहि निर्बल.[१२०]

يَا أَيُّهَا النَّاسُ ضُرِبَ مَثَلٌ فَاسْتَمِعُوا لَهُ ۚ إِنَّ الَّذِينَ
تَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ لَن يَخْلُقُوا ذُبَابًا وَلَوِ
اجْتَمَعُوا لَهُ ۖ وَإِن يَسْلُبْهُمُ الذُّبَابُ شَيْئًا لَّا يَسْتَنقِذُوهُ
مِنْهُ ۚ ضَعُفَ الطَّالِبُ وَالْمَطْلُوبُ ﴿٧٣﴾

७४. त्यांनी अल्लाहची कदर जाणली नाही, जसा की तिला जाणण्याचा हक्क आहे. नि:संशय तो सामर्थ्यशाली व प्रभूत्वशाली आहे.[१२१]

مَا قَدَرُوا اللَّهَ حَقَّ قَدْرِهِ ۗ إِنَّ اللَّهَ لَقَوِيٌّ عَزِيزٌ ﴿٧٤﴾

७५. अल्लाह फिरिश्त्यांमधूनहि संदेशवाहक निवडतो व माणसांमधूनहि [१२२] तो ऐकणारा व पाहणारा आहे .[१२३]

اللَّهُ يَصْطَفِي مِنَ الْمَلَائِكَةِ رُسُلًا وَمِنَ النَّاسِ ۚ
إِنَّ اللَّهَ سَمِيعٌ بَصِيرٌ ﴿٧٥﴾

७६. तो जाणतो जे काही त्यांच्यापुढे आहे व जे काही यांच्या मागे आहे आणि समस्त व्यवहार अल्लाहकडेच परतविले जातात.[१२४]

يَعْلَمُ مَا بَيْنَ أَيْدِيهِمْ وَمَا خَلْفَهُمْ ۗ وَإِلَى اللَّهِ تُرْجَعُ
الْأُمُورُ ﴿٧٦﴾

७७. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ![१२५] रुकू करा, सजदा करा, [१२६] आपल्या पालनकर्त्याची इबादत (उपासना) करा, [१२७] आणि भलेपणाची कामे [१२८] करा, यासाठी की तुम्ही सफल व्हावे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا ارْكَعُوا وَاسْجُدُوا وَاعْبُدُوا
رَبَّكُمْ وَافْعَلُوا الْخَيْرَ لَعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ۩ ﴿٧٧﴾ السجدة

११६. ज्या अर्थी अल्लाहच्या आयतीमध्ये केवळ एकेशवरवादाचा उल्लेख केला गेला आहे व त्यांच्या दैवतांना खोटे ठरविले जाते, म्हणून आयतीना ऐकून त्यांच्या चेहऱ्यांवर नाराजी व्यक्त होते.

११७. म्हणजे या नाराजीहूनहि निकृष्टतम अशी गोष्ट अर्थात हे की नाराजीची सर्वात खालावलेली स्थिती ती असेल जी तुम्हाला जहन्नममध्ये जाणवेल.

११८. माशी अतिशय तुच्छ प्राणी आहे आणि जेव्हा अनेकेश्वरवाद्यांची उपास्ये सर्वच्या सर्व मिळूनहि एवढ्या तुच्छ प्राण्याला निर्माण करू शकत नाही तर आणखी काय निर्माण करु शकतात? आणि ज्याअर्थी काहीच निर्माण करू शकत नाही तर ईश्वर का बनले?

११९. मक्केचे अनेकेश्वरवादी आपल्या मूर्तीवर मध आणि केशराचा लेप चढवित व भारतातील अनेकेश्वरवादी त्यांच्या समोर मिष्टान्न मांडतात वस्तुत: आपल्या उपास्यांसमोर खाद्य पदार्थ ठेवणे मूर्खते पलीकडे काहीच नाही. या उपास्यांच्या अगीतकतेची दशा अशी की माशी जर त्यांच्या ताटातून काही उचलून नेते तर ते परत घेऊ शकत नाही.

१२०. अर्थात उपासकहि कमकुवत व उपास्यहि दुर्बल. अशा उपास्यांच्या उपासने पासून त्यांच्या भक्तांना कोणता लाभ घडणार आहे?

सर्वसामान्यांना आकलन होईल अशा या उदाहरणाद्वारे शिर्क व मूर्तिपूजेचे खंडन एवढ्या प्रभावीपणे केले गेले आहे की त्यांचे असत्य असण्याबद्दल कसल्याच शंकेला वाव राहत नाही परंतु माणसाचे सर्वात मोठे वैगुण्य हेच की तो अंधश्रद्धेच्या नादी लागतो. मग तो विवेक बुद्धिचा वापर करण्यास तयार नसतो. याच कारणास्तव आजच्या काळातहि, जेव्हा बौद्धिक उड्डान आकाशात आहे, मनुष्य आपल्या खऱ्याखुऱ्या पालनकर्त्याप्रत पोहचू शकला नाही आणि असे किती तरी जन-समूह आहेत ज्यांनी केवळ दगड विटांनाच आपला ईश्वर बनवून ठेवले आहे.

१२१. अल्लाह जबरदस्त सामर्थ्य बाळगणारा व सर्वावर प्रभावी आहे. ज्या माणसाच्या बुद्धित अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची ही कल्पना असेल तो अन्य एखादा ईश्वर मानण्यास तयार होऊच शकत नाही कारण अल्लाह खेरीज ना कोणी सामर्थ्याशाली आहे ना प्रभावशाली. शिर्क करणारे यासाठी असंख्य उपास्यांना मानणारे असतात की त्यांची ईश्वराविषयीची कल्पनाच चुकीची असते. ते अल्लाहच्या महानतेवर अटळ विशवास ठेवत नाही, किंबहुना त्याला गौण समजू लागतात.

१२२. अनेकेश्वरवादी प्रेषित्त्वास मानणारे नसतात परंतु ईश्वराचा पुत्र कन्या किंवा अवतार मानणारे असतात. हे अशामुळे होते की ते जाणत नाही की अल्लाह आपल्या विशेष दासांना जो उच्चतम दर्जा बहाल करतो, तो काय आहे फर्माविले तो दर्जा रसूल असण्याचा आहे जो अल्लाहचा दासच असतो, ईश्वर नव्हे.

अल्लाहचा नियम असा की माणसांच्या मार्गदर्शनार्थ त्यांच्यातूनच अशा माणसांना निवडतो जे त्याचा संदेश त्याच्या दासांपर्यंत पोहचविण्याची भारदस्त जबाबदारी उचलण्यास समर्थ असतात आणि त्या प्रेषितांपर्यंत संदेश पोहचविण्यासाठी फिरिश्त्यापैकी संदेशावाहक निवडतो जे अल्लाहचा संदेश त्याच्या पैगंबरावर अवतरीत करतात. अगदी याच पद्धतीने पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची निवड झाली आहे.

१२३. अर्थात हे संदेशवाहक आपल्या जबाबदाऱ्या ज्या तऱ्हेने पार पाडतात त्यापासून तो अनभिज्ञ राहत नाही, किंबहुना तो त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकतो व त्याचे प्रत्येक काम पाहतो.

१२४. म्हणजे पैगंबर झाल्यामुळे कोणालाहि अल्लाहचा दर्जा प्राप्त होत नाही की लोकांनी त्याच्याकडे रुजू करून गरजपूर्ति करिता त्याला पुकारावे: खरे पाहता रुजू करण्याच्या लायक केवळ अल्लाह आहे. त्याच्याच समोर समस्त व्यवहार सादर होतात; व तोच निर्णय लावतो.

१२५. या समारोपाच्या आयती होत ज्यात संबोधनाचा रोख ईमान बाळगणाऱ्याकडे वळला आहे.

१२६. रुकूअ व सजदाशी अभिप्रेत नमाज होय.

१२७. म्हणजे उपासना मग ती नमाजच्या स्वरुपात असो, हज्ज व कुर्बानी रूपाने असो किंवा अन्य एखाद्या स्वरुपात, अल्लाहकरिताच जो तुमचा खराखुरा पालगनकर्ता आहे, खास असली पाहिजे.

१२८. भलेपणाच्या कामांमध्ये ती सर्व कामे सामील आहेत, जी अल्लाहच्या आज्ञापालनावर आधारीत असावीत व ज्यांच्या लाभ अल्लाच्या दासांना मिळत असावा.

७८. आणि अल्लाहच्या मार्गात जिहाद (धर्मयुद्ध) करा, जसा जिहाद करणाचा हक्क आहे.[१२९] त्याने तुम्हाला निवडले आहे.[१३०] व तुमच्यासाठी दीनमध्ये (धर्मात) कसलीच तंगी राखली नाही.[१३१] तुमचे पिता इब्राहीमचा धर्म.[१३२] त्याने (अल्लाहने) तुमचे नाव पूर्वीहि मुस्लिम ठेवले आणि या (कुरआना)तहि,[१३३] अशासाठी की रसूल तुम्हावर साक्षी असावा व तुम्ही लोकांवर साक्षी असावे.[१३४] तेव्हा, नमाज कायम करा, जकात द्या आणि अल्लाहला दृढतेने धरा.[१३५] तोच तुमचा स्वामी होय. तेव्हा किती चांगला स्वामी आहे व किती चांगला सहाय्यकर्ता !

وَجَاهِدُوا فِي اللَّهِ حَقَّ جِهَادِهِ ۚ هُوَ اجْتَبَاكُمْ وَمَا
جَعَلَ عَلَيْكُمْ فِي الدِّينِ مِنْ حَرَجٍ ۚ مِلَّةَ أَبِيكُمْ
إِبْرَاهِيمَ ۚ هُوَ سَمَّاكُمُ الْمُسْلِمِينَ مِنْ قَبْلُ وَفِي هَٰذَا
لِيَكُونَ الرَّسُولُ شَهِيدًا عَلَيْكُمْ وَتَكُونُوا شُهَدَاءَ عَلَى
النَّاسِ ۚ فَأَقِيمُوا الصَّلَاةَ وَآتُوا الزَّكَاةَ وَاعْتَصِمُوا
بِاللَّهِ هُوَ مَوْلَاكُمْ ۖ فَنِعْمَ الْمَوْلَىٰ وَنِعْمَ النَّصِيرُ ٧٨

१२९. या ठिकाणी जिहादशी अभिप्रेत ते जिहाद होय ज्यात सामर्थ्य वापरले जावे; व विरोधी शक्तिचा जोर नाहीसा केला जावा. 'अल्लाहच्या मार्गात'चा अर्थ असा की त्याचा उद्देश्य अल्लाहच्या कलिमास (वचनास) बुलंद करणे हा असावा. आणि अशा लोकांशी जेहाद केले जावे ज्यांनी आपल्या शिर्क व कुफ्रच्या बळावर अल्लाहच्या मार्गात अडथळे निर्माण केले असतील. यासाठी की लोकांनी त्याचा धर्म (इस्लाम) कबूल करू नये किंवा त्याच्या महत्वपूर्ण निकडीत भागवू नयत. या सूरह मध्ये उल्लेखिले गेले की मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी इस्लामच्या मार्गात कस कसे अडथळे उभे केले होते व मुसलमानां विरुद्ध कशा प्रकारे सामर्थ्याचा वापर करीत होते. याच पार्श्वभूमीवर ईमान बाळगणाऱ्यांना केवळ जेहाद करण्याचाच नव्हे तर जेहादचा हक्क अदा करण्याचा म्हणजे पूर्णपणे तन मन धनाची बाजी लावण्याचा आदेश दिला गेला. अर्थात जेहादची तात्विक ताकीद आपल्या शर्तीसह किंयामती पावेतो आहे. हदीस वचनातील उल्लेखानुसार :-

لَا تَزَالُ طَائِفَةٌ مِنْ اُمَّتِیْ يُقَاتِلُوْنَ عَلَى الْحَقِّ ظَاهِرِيْنَ
اِلٰى يَوْمَ الْقِيامَةِ۔ ( مسلم كتاب الايمان )

"माझ्या जन-समूहातील एक गट सत्यानिष्ठ राहून कियामती पावेतो लढत राहील व वर्चस्वशाली राहील." (मुस्लिम किताबुल ईमान)

१३०. म्हणजे तुम्हाला हे सद्‌भाग्य प्रदान केले की त्याच्या धर्माचे (इस्लामचे) ध्वज-रोहक व्हावे व लोकांकरिता मार्गदर्शनाचा स्तंभ बनावे.

स्पष्ट झाले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या निकटवर्ती अनुयायींचा गट जो या आयतीना प्रथम संबोधित होता, सर्वश्रेष्ठ अल्लाहचा आवडता समूह होता म्हणून मुसलमानांचे जे पंथ, काही अनुयायी वगळता या संपूर्ण गटाचा उपहास करतात ते इतिहासाच्या पुस्तकांमध्ये समाविष्ट झाले आहोत, कुरआनाच्या स्पष्टीकरणाकडे पाठ फिरवितात. या लोकांनी जर विशुद्ध बुद्धिने कुरआनाचे अध्ययन केले आणि कथन-कर्त्यांच्या तुलनेत कुरआनास अग्रक्रम दिला तर त्या गटाचे खरेखुरे कदर करणारे बनतील ज्याना सर्वश्रेष्ठ अल्लाहने निवडले होते.

१३१. अर्थात या शरीअतीत ते सक्त आदेश नाहीत जे या पूर्वीच्या शरीअतीमध्ये होते. उदाहरणार्थ सब्त साजरा करणाचा आदेश जो यहुदींना दिला गेला होता. मोठा सक्त होता. अर्थात हे सक्त आदेश त्यांना त्यांच्या विद्रोहामुळे दिले गेले होते. परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जी शरीअत प्रदान केली गेली आहे ती केवळ एखाद्या विशिष्ट जन-समूहाकरिता किंवा विशिष्ट काळापुरती नाही. किंबहुना समस्त मुस्लिमांकरिता, जे आपल्या योजनेत सार्वभौमिक आहोत व कियामतीपर्यंत आहेत यास्तव यास सोपे बनविले गेले आहे व यात अधिक सवलती ठेवल्या गेल्या आहेत. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की एखादा असा आदेश दिलाच गेला नाही ज्याचे पालन करणे मुसलमानास कठीण व्हावे. वर जिहादच्या आदेशाचा उल्लेख केला गेला जो प्राण वित्ताच्या कुर्बानीची मागणी होय, म्हणून आयतीचा खरा अर्थ तोच असू शकतो जो कुरआनातील अन्य स्पष्टीकरणानुसार असावा.

१३२. म्हणजे हाच तो एकेश्वरवादी धर्म जो हजरत इब्राहीम यांचा धर्म होता. तसेच ही शरीआतहि मूलभूतपणे तीच होय, जी इब्राहीम यांना प्रदान केली गेली होती म्हणजे साधी सरळ शरीअत आणि ज्यात हज्ज व त्याचे धार्मिक विधी देखील सामील आहेत.

१३३. म्हणजे अल्लाहने तुमचे-ईमान बाळगणाऱ्याचे नाव पूर्वीच्या जन समूहातहि मुस्लिम'च ठेवले होते व या ग्रंथात (कुरआनात)हि तुमचे तेच नाव आहे. ही कल्पना योग्य नव्हे की हे नाव हजरत इब्राहीम यांचे ठेवलेले आहे व त्याच्यापूर्वी हे नाव ठेवले गेले नव्हते. हजरत इब्राहीम यांच्याही आधी फार पूर्वी होऊन गेलेल्या हजरत नूह यांनीहि आपण मुस्लिम आसल्याचे घोषित केले होते.

وَ اُمِرْتُ اَنْ اَكُوْنَ مِنَ الْمُسْلِمِيْنَ۔ (سورة يونس۔ ٧٢)

"आणि मला आदेश दिला गेला आहे की मी-मुस्लिम बनून रहावे." (सूरह यूनुसः ७२)

हे नाव त्या गुणविशेषांना जाहीर करते जे त्याच्या अर्थात सामावलेले आहेत. म्हणजे तो ज्याने इस्लाम धर्म स्विकारून स्वतःला अल्लाहच्या हवाली केले असावे व तयाचा आज्ञाधारक दास असावे. यानंतर मुसलमानांना हा हक्क पोहचत नाही की त्यांनी अल्लाहने ठेवलेल्या नावाच्या ठिकाणी आपले अन्य एखादे नाव ठेवावे किंवा यात अन्य एखाद्या नावाची वाढ करावी. परंतु मुसलमानांमध्ये जेव्हा गटबाजी झाली तेव्हा प्रत्येक पंथाने आपले एक वेगळे नाव ठेवले आणि आज तर मुसलमान सर्वसामान्यतः आपल्या नावासोबत कोणते ना कोणते शेपूट लावताताच; जे त्यांच्या पंथ वगैरेस जाहीर करते. याची सुधारणा फार आवश्यक आहे. स्वतःला केवळ मुस्लिम समजणेच पर्याप्त आहे जे अल्लाहने ठेवलेले नाव आहे.

१३४. म्हणजे ही गुणवैशिष्ट्ये धारण केलेला जन समूह बनवून तुम्हाला अशासाठी उभे केले गेले आहे की तुम्ही लोकांसमोर त्या धर्माची साक्ष द्या ज्याची साक्ष तुमच्या समक्ष देण्यासाठी पैगंबरास पाठविले गेले आहे.

हा आदेश मुस्लिम जन-समूहावर ही जबाबदारी टाकतो की

त्याने जगासमोर इस्लामचे आवाहन प्रस्तुत करावे व त्यासाठी आपल्या शक्यतोवर समस्त साधनांना उपयोगात आणावे. आवाहन व प्रसार आणि धर्म प्रचार असे महत्वपूर्ण कर्तव्य आहे. जे पार पाडण्याकरीता हा जन समूह उभारला गेला आहे. परन्तु दुर्देवान आज मुसलमानांमध्ये या गोष्टींची जाणीव फार कमी आढळते म्हणून तो एकसमाज बनून राहीला आहे. अशी माणसे मोजकीच ज्यांना धर्माच्या साक्षीची काळजी असेल व जे मुस्लिमेतरा समोर इस्लामचे आवहन सादर करत असतील.

१३५. अल्लाहला दृढपणे धरण्याचा अर्थ अल्लाहशी संबंध दृढ करणे होय, आणि अल्लाहशी संबंध त्याच्या गुणवैशिष्ट्यांची जाण, त्याची उपासना व आज्ञापालन, त्याच्याशी प्रेम व त्यावर अटळ भरवसा केल्यानेच दृढ होतो.

# २३. सूरह अल् मोमिनून

**नावः** सूरहचा आरंभ या गोष्टीने झाला आहे की मोमीनून ने म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांनी विजय प्राप्त केला. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अल् मोमीनून' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की होय मजकूरांवरून असे दिसून येते की मक्केच्या मध्यंतरीच्या काळात अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पनाः** हे स्पष्ट करणे होय की अल्लाहच्या दृष्टीने सफल होणारे लोक कोणते व असफल होणारे लोक कोणते. मग ज्या श्रद्धांना कबूल करण्यावर सफलता अवलंबून आहे त्यांचे सत्य असणे सप्रमाण सिद्ध केले गेले आहे, व त्या शंका-कुशंकांचे निरसन केले गेले आहे. ज्या या संदर्भात सादर केल्या जात होत्या.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ११ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबरी ऐकवली गेली आहे व या सफलतेसाठी जे गुणविशेष आवश्यक आहेत, त्यांचे वर्णन केले गेले आहे.

आयत क्र. १२ ते २२ मध्ये अल्लाहच्या ईशत्वाबद्दल युक्तिवाद करीत दुसरे जीवन आणि मोबदला व शिक्षेस आवश्यक ठरविले गेले आहे.

आयत क्र. २३ ते ५० मध्ये पैगंबरांच्या आवाहनास खोटे ठरविणाऱ्यांची दुष्परिणति वर्णिली गेली आहे.

आयत क्र. ५१ ते ५६ मध्ये या वास्तवकितेचे ऐलान की सर्व पैगंबरांचा धर्म एकच धर्म होता अर्थात इस्लाम परंतु त्यांच्या अनुयायांनी त्याची शकले पाडलीत. आणि चुकीच्या धर्माचा अवलंब केला असतांनाही केवळ अल्लाहने ऐहीक धनसम्पत्ति विपुल दिली म्हणून अशा खोट्या भ्रमात पडले आहेत की अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न आहे, म्हणून धनाचा वर्षाव करीत आहे.

आयत क्र. ५८ ते ६१ मध्ये भौतिक वाद्यांच्या विरोधात भलेपणाकडे धाव घेणाऱ्यांचे गुणविशेष निवेदिले गेले आहेत.

आयत क्र. ६२ ते ६७ मध्ये अशा लोकांना तंबी दिली गेली आहे जे गफलतीत पडले आहेत, की एक दिवस असा येईल, जेव्हा त्यांना आपल्या कृतकर्माचा पश्चाताप होईल.

आयत क्र. ६८ ते ९२ मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या काही शंकांना उत्तर दिले गेले आहे.

आयत क्र. ९३ ते ९८ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दुआ (प्रार्थने)चा उपदेश की, हे पालन कर्त्या जर माझ्या उपस्थितीत या काफिरांवर तुझी शिक्षा (अजाब) अवतरली तर, मला त्यापासून वाचव.

आयत क्र. ९९ ते ११७ मध्ये इन्कार करणाऱ्यांची मरतांना व नंतर कियामतीच्या दिवशी जी दशा होईल तिचे चित्रण व या गोष्टीवर समारोप की काफिर कधीहि सफलता प्राप्त करणार नाहीत.

आयत क्र.११८ समारोपाची आयत होय, ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमान्वये, ईमान बाळगणाऱ्या प्रत्येक इसमास हे मार्ग दर्शन की त्याने अल्लाहशी क्षमा-याचनेची व कृपेची प्रार्थना करावी.

# २३. सूरतुल मोमिनून

سُوْرَةُ الْمُؤْمِنُوْنَ

(आयती- ११८)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. नि:संशय ईमान बाळगणारे सफल झाले. [१]

قَدْ اَفْلَحَ الْمُؤْمِنُوْنَ ۝١

२. जे आपल्या नमाज मध्ये खुशुअ (विनम्रता) अंगिकारतात. [२]

الَّذِيْنَ هُمْ فِيْ صَلَاتِهِمْ خٰشِعُوْنَ ۝٢

३. जे निरर्थक गोष्टींपासून तोंड फिरवितात. [३]

وَالَّذِيْنَ هُمْ عَنِ اللَّغْوِ مُعْرِضُوْنَ ۝٣

४. जे जकात अदा करीत राहतात.

وَالَّذِيْنَ هُمْ لِلزَّكٰوةِ فٰعِلُوْنَ ۝٤

५. जे आपल्या लज्जा स्थानांचे (गुप्तेंद्रियांचे) संरक्षण करतात. [५]

وَالَّذِيْنَ هُمْ لِفُرُوْجِهِمْ حٰفِظُوْنَ ۝٥

६. आपल्या पत्न्या किंवा त्या दासी खेरीज ज्या त्यांच्या मिळकतीत असतील. तर यांच्या बाबत त्यांच्या वर कसलाहि दोष नाही. [६]

اِلَّا عَلٰٓى اَزْوَاجِهِمْ اَوْ مَا مَلَكَتْ اَيْمَانُهُمْ فَاِنَّهُمْ غَيْرُ مَلُوْمِيْنَ ۝٦

७. आणि जे या खेरीज आणखी काही इच्छितील तर तेच मर्यादेचे उल्लंघन करणारे आहेत. [७]

فَمَنِ ابْتَغٰى وَرَآءَ ذٰلِكَ فَاُولٰٓئِكَ هُمُ الْعٰدُوْنَ ۝٧

८. जे आपल्या अमानती [८] व आपल्या वचनाची [९] कांस बाळगतात.

وَالَّذِيْنَ هُمْ لِاَمٰنٰتِهِمْ وَعَهْدِهِمْ رٰعُوْنَ ۝٨

९. आणि ते आपल्या नमाज़ांचे संरक्षण करतात. [१०]

وَالَّذِيْنَ هُمْ عَلٰى صَلَوٰتِهِمْ يُحَافِظُوْنَ ۝٩

१०. हेच लोक वारस होणार आहेत.

اُولٰٓئِكَ هُمُ الْوٰرِثُوْنَ ۝١٠

१. सफलतेशी अभिप्रेत आखिरतची सफलता होय, जसे आयत क्र. ११ मध्ये स्पष्ट केले गेले आहे. अर्थात कुरआनाच्या दृष्टीकोनातून खरी सफलता अखिरतचीच सफलता होय. कारण ती ईनाम म्हणून असेल, व सदैव कालीन असेल.

या निरंतर सफलतेसाठी पहिली शर्त ईमान होय, मग ती गुणवैशिष्ट्ये ज्याचे वर्णन पुढे केले गेले आहे. स्पष्ट झाले की आखिरतची सफलता गुणां (Merit)वर अवलंबून असेल, केवळ इस्लामशी पारंपारीक संबंधांच्या आधारावर नव्हे.

२. मूळ शब्द खुशुअ. त्याचा अर्थ दरारा ठेवणाऱ्या शक्तिच्या कल्पनेनेच भयकंपित होणे, त्याच्या पुढे झुकणे व नम्रता लीनता अंगिकारणे असा आहे. नमाजचे तथ्य हेच की दासावर अल्लाहच्या भयाचा कैफ चढावा, हळू स्वरात त्याने अल्लाहपुढे आर्जव करावे व दास या नात्याने नम्रता व दीनता व्यक्त करावी. सफलतेची हमी अशाच लोकांना दिली गेली आहे जे विनम्र भावाने नमाज अदा करतात. खुशुअ (भयमिश्रित नम्रता)चा संबंध हृदयाशी आहे.

اَلَمْ يَاْنِ لِلَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اَنْ تَخْشَعَ قُلُوْبُهُمْ لِذِكْرِ اللّٰهِ -(سورۂ حدید-١٦)

''काय ईमान बाळगणाऱ्यांकरीता ती वेळ नाही आली की त्यांची हृदये अल्लाहच्या स्मरणापुढे झुकावीत.'' (हदीद-१६)

आणि जेव्हा मनात नम्रता असेल तर तिच्या कैफ शरीरावरहि चढेल. म्हणजे दृष्टी खाली असेल, आवाज दबल्या स्वरात, लक्ष अल्लाहच्याकडे राहील व शांती समाधानाने गंभीरतेने नमाज अदा केली जाईल. कुरआनात नमाजचा प्रभाव व फल वर्णिले गेले आहेत ते अशाच प्रकारच्या नमाजचे प्रभाव व लाभ होत.

३. व्यर्थ व वाह्यात गोष्टीपासून बचाव हा नमाजचा लाभ होय. यास्तव याचा उल्लेख नमाजच्या अनुषंगाने नंतर झाला. अर्थात ह्या व्यर्थ व निरर्थक बाबीचा अर्थ केवळ हराम (अवैध) व नाकारलेल्या कामांनाच लागू पडत नाही, किंबहुना त्या कामांनाही लागू पडतो ज्यांचा काहीच खरा लाभ व हेतु नसावा. आजच्या काळात निरर्थक गोष्टींनी प्रगत स्वरुपात बाष्कळ गाणी, कल्पना विलासाची कवी-सम्मेलने, हास्य विनोदाचा धबधबा, अवचट किस्से, कहाण्या, सारीपट व कॅरमचे खेळ, इतर खेळांच्या मॅचेस, या सारख्या मोठ मोठ्या बाबी सामील आहेत ज्या निव्वळ पैसा आणि वेळेचा चुराडा मात्र होय व ज्या अशी विचार सरणी निर्माण करतात की माणसाने खेळण्या बागडण्यातच जीवन व्यतीत करावे. आणि आजकाल तर टी.व्ही. वर एकाहून एक वाह्यात दृश्ये सादर केली जात आहेत.परंतु खऱ्या अर्थाने ईमान बाळगणारे लोक मोठे सत्शील असतात. असल्या वाह्यात गोष्टींमध्ये रुचि घेणे तर दूर राहीले, ते अशा गोष्टींवर चुकून दृष्टीक्षेप टाकणेहि पसंत करीत नाही.

४. मक्की काळातहि जकात देणे आवश्यक होते. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २५८.

काही भाष्यकारांनी للزكوٰة فاعلون 'लिज्जकाते फाइलून'चा अर्थ असा घेतला आहे की ते आत्म शुद्धीचे कार्य करीत राहतात. परंतु हा पूर्णत: संकोच होय. जकात आपल्या विशिष्ट अर्थाने कुरआनाचा परिभाषिक शब्द आहे. म्हणून त्याचा शुद्धी हा अर्थ घेणे उचित नव्हे आणि जर जकात सोबत 'फाईलून' हा शब्द वापरला गेला आहे तर अन्य ठिकाणी فعل الخيرات ''फ़ेअलल खैरात'' भलेपणाची कामे (अंबिया-७३) हा अर्थ घेण्याचे काही एक कारण नाही.

५. म्हणजे वासनापूर्तिच्या हराम मार्गापासून अलिप्त राहतात आणि सतर (गुप्तेंद्रियांना लपविणे)च्या मर्यादा पाळतात.

६. या आयतीत लैंगिक संबंध इस्लामी धर्मशास्त्रानुसार सनदशीर असण्याच्या दोन अवस्था सांगितल्या गेल्या आहेत. एक हे की, माणसाने आपल्या पत्नीशी शरीर-संबंध प्रस्थापित करावा, दुसरे असे की त्याने त्या दासींशी शरीर-संबंध ठेवावा ज्या त्याच्या मालकीच्या असतील.

पत्नी ती होय जी इस्लामी धर्मशंस्त्रानुसार निकाहबद्ध असेल. राहीली दासी तर त्यासाठी तिचा मालक असणे शर्त आहे म्हणजे एखादा मनुष्य अशा दासीशी शरीर संबंध कायम करू शकतो जिचा तो खरोखर मालक असावा. त्या काळात गुलामीची समस्या केवळ एक आंतरराष्ट्रीय समस्या नव्हती तर स्वत: गुलाम व दासी च्या विकासाची समस्या विभिन्न निकडी बाळगून होती जे गुलाम व दासी पूर्वापार चालत आले होते त्यांना जर गुलाम व दास मानलेच (Recognize) केले नसते किंवा कायद्यान्वये सर्वांना एकाच वेळी स्वतंत्र केले गेले असते तर अशाने गुलाम व दासींना बाह्यत: मुक्ति मिळू शकत होती परंतु तत्कालीन परिस्थितीत त्यांच्यासाठी आर्थिक समस्या, आणि दासींकरिता विशेषत: निवासाची व उदरनिर्वाहाची समस्या, बिकट स्वरूप धारण करू शकत होती, परिणामी त्या वाममार्गाला लागण्याची शक्यता होती. यास्तव इस्लामधर्माने मक्की काळात त्यांच्या वास्तविक पात्रतेस मान्य करीत दासींच्या मालकांना त्यांच्याशी शरीर संबंध ठेवण्यास उचित ठरविले. परंतु गुलामगिरीतून त्यांच्या मुक्त करण्यास फार मोठे पुण्यकार्य ठरविले तसेच त्यासाठी उचित योजनाही राबविल्या गेल्यात. दासीशी शरीर-संबंध ठेवण्याच्या समस्येस याच पाशर्वभूमीवर बघितले पाहिजे अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे स्पष्टत: ऐलान आहे की ईमान बाळगणारे आपल्या मालकीच्या दासीशी शरीर संबंध कायम करण्याबाबत निर्भत्सनीय नाहीत. तेव्हा त्यांची निर्भत्सना करण्याचा

इतरांना काय अधिकार?

७. म्हणजे आपल्या पत्नीशी किंवा दासीशीच शरीर संबंध ठेवणे उचित आहे. जर एखादा मनुष्य या व्यतिरिक्त अन्य एखाद्या स्त्री शी शरीर-संबंध ठेवू इच्छित असेल तर असा मनुष्य स्वभाविक व शरीअतीच्या मर्यादांचे उल्लंघन करणारा ठरेल. आपल्या पत्नी किंवा मालकीच्या दासीला सोडून अन्य कोणत्याही स्त्री शी शरीर संबंध प्रस्थापित केल्यास तो सरळ सरळ व्यभिचार ठरेल आणि जर पुरुष पुरुषाशीच लैंगिक संबंध ठेवत असेल तर हे गुदामैथून ठरेल. हे सर्व प्रकार हराम होत ज्यांची इस्लाम धर्माने तीव्रतापूर्वक मनाई केली आहे.

या आयतीद्वारे तात्पुरत्या वेळेपावेतो एखाद्या स्त्रीशी तिच्या मर्जीनुसार शरीर-संबंध ठेवण्याची वर्ज्यताहि सिध्द होते. कारण ज्यास्त्रीशी अशाप्रकारचा शरीर संबंध ठेवला जातो ती ना पत्नी असते ना मालकीची दासी. पत्नी अशासाठी नसते की तिने शरीर संबंध ठेवणाऱ्या पुरषाशी विधिवत निकाह केलेला नसतो. त्यानुसार घटस्फोटानंतरचा उदरनिर्वाह खर्च, इद्दत वगैरेचे ईश-आदेश लागू पडतात आणि ना ती त्या पुरषाच्या वारसातून हिस्सा प्राप्त करू शकते. तसेच दासी अशासाठी नव्हे की शरीर संबंध ठेवणारा तिचा खरा मालक नव्हे तात्पर्य कुरआनात अशा प्रकारच्या स्त्री संबंधास धर्मानुकूल ठरविण्यास कोणतेहि प्रमाण नाही, परंतु वैवाहीक जीवनासंबंधी जे ईश-आदेश दिले गेले आहेत त्याद्वारे त्याची निषिद्धता सिध्द होते सूरह मोमीनून मक्की आहे जिच्या उल्लिखित आयातीतील दोन प्रकारांखेरीज इतर सर्व प्रकार हराम ठरविले गेले आहेत. जणू मुदतीपुरत्या शरीर संबंधाच्या निषिद्धतेचा आदेश मक्की काळापासूनच चालत आला आहे.

(मुत्आ) विशिष्ट मुदतीपर्यंत ठेवल्या जाणाऱ्या या शरीर संबंधाची निषिध्दता हदीस वचनानेहि सिद्ध आहे-

عن علی بن ابی طالب رضی اللہ عنہ ان رسول اللہ صلی اللہ علیہ وآلہ وسلم نہیٰ عَنْ
مُتْعَةِ النِّسآءِ یَوْمَ خَیْبَرَ۔ (بخاری کتاب المغازی)

''हजरत अली बिन अबू तालीब (रजि.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी खैबरच्या दिवशी 'मुत्आ' (तात्पुरता शरीर संबंध) पासून मनाई फर्माविली.'' (बुखारी किताबुल मगाजी)

आणि धर्मज्ञ व फुकहा (धर्मशास्त्र पंडीता) चे या निषिद्धतेबद्दल एकमत आहे.

'खत्ताबी म्हणतात 'मुत्आ' (मुदतीपुरता शरीर संबंध) हराम असण्याबद्दल काही शियांना वगळता सर्वांचे एकमत आहे'.

(फतहुल बारी खंड ९ पृ. १४२)

राहीलीत ती हदीस वचने की ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा संबंध या कथनाशी जोडला गेला आहे की, पैगंबरानी काही युद्धांच्या प्रसंगी मुत्आला (हंगामी विवाहंना) परवानगी दिली होती व नंतर त्यास रद्द केले तर अशा हदीस वचनांनध्ये परस्पर विरुध्द गोष्टी निवेदिल्या गेल्या आहेत.

जेव्हा खैबर युद्धा (हि.स.६) च्या प्रसंगी याची मनाई केली गेली होती तेव्हा मक्का विजया (हि.स.८) च्या प्रसंगी यास परवानगी देण्याचा प्रश्न कोठे उद्‌भवतो? आणि मक्का विजयाच्या काळात तर धर्म आपल्या पूर्णत्वास पोहोचला होता व मुसलमान एक सामर्थ्य बनला होता. म्हणून हा अवसर हंगामी विवाहास सवलत देण्याचा मुळीच नव्हता. नंतर एका कथनानुसार ही अनुज्ञा तीन दिवसा करिता दिली गेली होती. नंतर त्याची मनाई केली गेली, आणि दुसऱ्या एका कथनानुसार एक दिवस या गोष्टीची परवानगी दिली गेली व दुसऱ्याच दिवशी तिला हराम ठरविले गेले.'मुस्लिम' या हदीस ग्रंथाचे कथन असे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्का विजयाच्या प्रसंगी ऐलान फर्माविले की, मी तुम्हाला स्त्रीयांशी ठराविक मुदतीपावेतो 'मुत्आ'ला (तात्पुरता विवाह) अनुमति दिली होती आणि आता सर्वश्रेष्ठ अल्लाहने यास कियामती पावेतो हराम (निषिद्ध) ठरविले आहे.

आणि 'मुस्लिम'चेच अन्य एक कथन असे की औतास युद्धाच्या प्रसंगी जे मक्का-विजयानंतर (शव्वाल हि.स.८मध्ये) झाले पैगंबरानी या गोष्टीची अनुमति दिली मग मनाई फर्माविली. (पहा-सहीह मुस्लिम किताबुन्निकाह) औतास युद्ध मक्का विजया नंतरचे आहे. यास्तव अखेर दोन्हीपैकी एकच कथन खरे असू शकते. हे कसे शक्य आहे की मक्का विजयाच्या प्रसंगी पैगंबरांनी घोषणा करावी की तात्पुरता विवाह कियामतीपर्यंत हराम केला गेला आणि मग जेव्हा औतास मध्ये युद्ध झाले तेव्हा त्यांनी या गोष्टीस अनुमति द्यावी. अशी कथने पैगंबरांची वचने कदापि असू शकत नाही. जेव्हा ती कुरआनाच्या स्पष्ट आदेशाविरुद्ध असावीत. या कथनांना खरे मानण्याच्या स्थितीत हा प्रशन देखील उद्‌भवतो की मक्का व औतास मध्ये अशा त्या कोणत्या स्त्रीया होत्या ज्या तीन दिवसांकरिता व केवळ एका चादरीच्या बदल्यात निकाह करणे पसंत करीत होत्या? त्यांच्याशी संबंध निर्माण करण्याचे कोणते माध्यम होते? काय एखादा मुसलमान एखाद्या अनोळखी मुसलमान स्त्रीशी जाऊन विचारत असे की तू तीन दिवसांकरिता माझ्याशी निकाह करण्यास तयार आहेस? आणि मग जर ती तयार होत असे तर तिच्याशी 'इस्तिब्रा'(शुध्दि) विना कशा प्रकारे त्वरीत संबंध प्रस्थापित केला जाऊ शकत होता, जेव्हा दासीशी शरीर-संबंध ठेवण्याकरीता शुद्धि म्हणजे एक मासिक पाळीचा काळ निघून जाण्याचे बंधन आहे, आणि

जर म्हटले गेले की तात्पुरत्या शरीर-संबंधासाठी शुद्धि म्हणजे एक मासिक पाळीचे बंधन नव्हते तर गर्भधारणेच्या स्थितीत हे कसे माहित झाले असते की हा गर्भ कोणाचा? आणि गर्भावस्थेत बालकाच्या संगोपनाची जबाबदारी आपल्या मातेच्या तात्पुरत्या पतीवर येत असे किंवा नाही? जर येत होती तर तात्पुरता निकाहचा काय लाभ घडला? हे प्रश्न 'मुत्आ' तात्पुरता विवाह) ची अयोग्यता स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत. परंतु मुसलमानांमधील शिया संप्रदाय या गोष्टीस (वैध) मानणारा आहे

हा संप्रदाय कुरआनास सोडून कथनांचा आधार घेतो. कथनांना कुरआनाच्या कसोटीवर पारखण्या ऐवजी तो कुरआनास कथनांच्या कसोटीवर पारखतो.हीच ती महाभयंकर चूक जी कुरआनाचे चुकीचे स्पष्टीकरण करण्यास व अयोग्य गोष्टींना मानण्यास प्रवृत्त करते.

जेथपावेतो या हदीस वचनांच्या सनदशीर असण्याचा संबंध आहे, बहुतेक हदीस वचने अशी आहेत की ज्यांच्या सनदशीरतेवर टीकात्मक बोलण्याचा बराच वाव आहे. दीर्घतेच्या भयापोटी आम्ही फक्त काही उदाहरणेच पुरेशी समजतो.

मुत्आ (तात्पुरता विवाह)च्या अनुमतिच्या संदर्भात एक हदीस वचन सहीह मुस्लिम मध्ये अब्दुल मलीक बिन रबिअ बिन सबुरा द्वारे उल्लिखित आहे परंतु प्रसिद हदीस ज्ञाते यहया बिन मोअीन यांनी या हदीस वचनास कमजोर म्हटले आहे आणि अबुल हसन बिन अलकतान म्हणतात त्यांचे न्यायी असणे सिद्ध नाही मुस्लिम ने हे हदीस वचन निवेदिले असले तरी ते युक्तिवादास योग्य नाही. (तहजीबुत्तहजीब इब्ने हजर अस्खलानी खंड ६ पृष्ठ ३९३) बुखारी व मुस्लिम दोघात हजरत अब्दुल्लाह बिन मसऊदकडे या गोष्टीचा संबंध दर्शविला गेला की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी युद्ध प्रसंगी त्यांना मुतआ ची अनुमति दिली होती. हे कथन कैस बिन अबि हाजीम द्वारे आहे व कैस बिन हाजिम विषयी इब्नुल मदीनी म्हणतात की मला यहया बिन सईद यांनी सांगितले की ती अस्विकृत हदीस आहे (तहजीबुत्तहजीब खंड ८ पृष्ठ ३८८) बुखारीचे एक हदीस वचन हसन बिन मुहम्मद यांनी जाबीर बिन अब्दुल्लाह व सलमा बिन अक्वअच्या माध्यमाने निवेदन केले आहे की या दोघांनी म्हटले की आम्ही एका लष्करात होतो की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा संदेशवाहक आमच्या जवळ आला व म्हणाला की तुम्हाला स्त्रीयांपासून लाभान्वित होण्याची अनुमति दिली गेली आहे. यास्तव लाभ घ्या. (बुखारी किताबुन्निकाह) जेव्हा बुखारी ने हसन बिन मुहम्मद यांच्याच माध्यमाने हजरत अलीचे हे कथन निवेदिले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी खैबर प्रसंगी मुतआ स मनाई केली होती. (बुखारी किताबुल मगाजी)

एक कथन इब्ने जुरेज द्वारे आहे की हजरत जाबीर बिन अब्दुल्लाह म्हणतात की आम्ही पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम व हजरत अबू बक्र व हजरत उमर यांच्या काळात मुतआ केला (मुस्लिम - किताबुन्निकाह)

हे अब्दुलाह मलीक बिन अब्दुल अजीज़ बिन जुरेज होत. यांच्या विषयी असरम यांनी इमाम अहमद यांचे हे कथन उल्लेखिले आहे, की जेव्हा इब्ने जुरेज म्हणता की मला अमूक एक इसमाने म्हटले किंवा मला खबर दिली गेली तर ते अस्विकृत हदीसही निवेदन करतात. आणि जेव्हा म्हणतात की मला अमक्या इसमाने खबर दिली किंवा मी त्यांच्या तोंडून हे ऐकले तर तुमच्या (भरवशा) करिता हे पुरेसे होय. आणि इजहत्फी ने इमाम मालीक यांचे हे कथन उल्लेखिले आहे की इब्ने जुरेज (चांगले वाईट सर्व गोळा करणारे) होत व दार कुतनी म्हणतात की इब्ने जुरेज तदलीस (सनदीमध्ये गडबड करण्या) पासून सावध रहा आणि यहया बिन सईद म्हणतात की ते कमजोर कथन-कर्ते होत. (तहजीबुत्तहजीब खंड ६ पृ. ४०२ ते ४०६)

यावरुन असे दिसून येते की या मुतआ शरीर-संबंधाच्या अनुमति संदर्भात जेव्हा सहीहैन (बुखारी व मुस्लिम) च्या कथनांची ही दशा आहे तर शियांनी निवेदिलेल्या कथनांची काय अवस्था असेल!

वस्तुस्थिती अशी की या परस्परविरुध्द व गुंतागुंतीच्या कथनांनी, ज्यापैकी बहुतेक कथने प्रमाणाच्या दृष्टीने दोषमुक्त नाहीत. ही गोष्ट मुळीच सिद्ध होत नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुतआस अनुमती दिली होती. परंतु अज्ञान काळात ज्या अर्थी या मुतआ पद्धत प्रचलीत होती म्हणून पैगंबरंनी मोठ्या तंबीने यास मनाई केली. ही गोष्टहि समजून घेतली पाहिजे की एखाद्या कथनाचे सहीह बुखारी व मुस्लिम मध्ये समाविष्ट असणे त्यास कदापि पावित्र्य प्रदान करीत नाही जर ते कुरआनाच्या स्पष्ट आदेशाच्या विरोधात असेल.

या प्रमाणांच्या नंतरहि जर एखाद्याचा या गोष्टीस आग्रह असेल की मुतआस परवानगी दिली गेली होती किंवा दिली गेली आहे तर त्यंनी हे सांगावे की मुतआ व व्यभिचार यामध्ये फरक काय आहे? तसेच त्यांनी हेहि स्पष्ट करावे की मुतआ संबंध कुरआनाच्या वैवाहीक आदेशांविरुध्द नाही. त्यांनतरच आम्ही आपल्या लेखनावर पुन्हा दृष्टी टाकू शकतो.

८. अमानती शी अभिप्रेत त्या अमनतीहि होत ज्या सर्वश्रेष्ठ अल्लाहने सुपूर्द केल्या आहेत व त्या अमानतीहि ज्यांना लोक दुसऱ्याच्या हवाली करतात.

९. वचनाशी अभिप्रेत ते वचनहि होय जे अल्लाहला दिले गेले व तेहि वचन होय जे लोकांना दिले गेले असेल.

१०. नमाज च्या संरक्षणात ठरलेल्या वेळी नियमितपणे नमाज पढणे व अशा प्रकारे पढणे जसे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सांगितले आहे व नमाजच्या सर्व शर्तींना व शिष्टाचारांना विचाराधीन राखणे इ. गोष्टी सामील आहेत आयात क्र. २ मध्ये नमाजची वृत्ति स्पष्ट केली गेली होती आणि येथे नमाजचा इतमाम राखण्याची ताकीद दिली गेली आहे.

या आयतीमध्ये ईमान बाळगणाऱ्यांच्या गुणविशेषांचा उल्लेख नमाजनेच सुरु झाला व नमाजवरच संपत आहे. हा जणू या गोष्टीकडे संकेत आहे की हे गुण विशेष त्या नमाजचे परिणामस्वरुप फळ होय जी चांगल्या प्रकारे अदा केली असावी.

आम्ही माणसाला मातीच्या सत्वापासून निर्माण केले. मग त्यास वीर्य बनवून एका सुरक्षित जागी ठेवले.मग वीर्यास जमलेल्या रक्ताचे स्वरुप दिले,मग त्या रक्त-गोळयास मांसाचा तुकडा बनविले,नंतर मांसाच्या तुकड्यास हाडांचे स्वरुप दिले. नंतर हाडांवर मांस चढविले मग त्यास एक आगळीच निर्मिती बनवून उभे केले तेव्हा मोठा समृद्धशाली आहे अल्लाह, सर्वोत्कृष्ट निर्माता.(अल-क़ुर्आन)

११. जे फिर्दोस (जन्नत)चे वारस होतील[११] त्यात सदैव राहणारे.

الَّذِينَ يَرِثُونَ الْفِرْدَوْسَ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿١١﴾

१२. आम्ही माणसाला मातीच्या सत्वापासून निर्माण केले. [१२]

وَلَقَدْ خَلَقْنَا الْإِنسَانَ مِن سُلَالَةٍ مِّن طِينٍ ﴿١٢﴾

१३. मग त्यास वीर्य बनवून एका सुरक्षित जागी ठेवले.[१३]

ثُمَّ جَعَلْنَاهُ نُطْفَةً فِي قَرَارٍ مَّكِينٍ ﴿١٣﴾

१४. मग वीर्यास जमलेल्या रक्ताचे स्वरुप दिले, मग त्या रक्त-गोळ्यास मांसाचा तुकडा बनविले, नंतर मांसाच्या तुकड्यास हाडांचे स्वरुप दिले. नंतर हाडांवर मांस चढविले. [१४] मग त्यास एक आगळीच निर्मिती बनवून उभे केले. [१५] तेव्हा मोठा समृद्धशाली आहे अल्लाह, सर्वोत्कृष्ट निर्माता.[१६]

ثُمَّ خَلَقْنَا النُّطْفَةَ عَلَقَةً فَخَلَقْنَا الْعَلَقَةَ مُضْغَةً
فَخَلَقْنَا الْمُضْغَةَ عِظَامًا فَكَسَوْنَا الْعِظَامَ لَحْمًا ثُمَّ أَنشَأْنَاهُ
خَلْقًا آخَرَ فَتَبَارَكَ اللَّهُ أَحْسَنُ الْخَالِقِينَ ﴿١٤﴾

१५. मग त्यानंतर तुम्हास अपरिहार्यतः मरावयांचे आहे .[१७]

ثُمَّ إِنَّكُم بَعْدَ ذَٰلِكَ لَمَيِّتُونَ ﴿١٥﴾

१६. मग निश्चितच कियामतीच्या दिवशी तुम्हाला उठविले जाईल.[१८]

ثُمَّ إِنَّكُمْ يَوْمَ الْقِيَامَةِ تُبْعَثُونَ ﴿١٦﴾

१७. आणि आम्ही तुमच्या वरती थरावर थर असे सात आकाश बनविले. [१९] आणि आम्ही आपल्या निर्मितीकडून गाफील नाही.[२०]

وَلَقَدْ خَلَقْنَا فَوْقَكُمْ سَبْعَ طَرَائِقَ وَمَا كُنَّا عَنِ الْخَلْقِ غَافِلِينَ ﴿١٧﴾

१८. आणि आम्ही एका विशिष्ट प्रमाणासह आकाशातून पाणी वर्षविले व त्यास जमीनीवर संचयित केले. आणि आम्ही या गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो की त्यास नाहीसे करावे.[२१]

وَأَنزَلْنَا مِنَ السَّمَاءِ مَاءً بِقَدَرٍ فَأَسْكَنَّاهُ فِي الْأَرْضِ وَإِنَّا عَلَىٰ
ذَهَابٍ بِهِ لَقَادِرُونَ ﴿١٨﴾

१९. मग आम्ही या (पाण्या) द्वारे तुमच्यासाठी खजुरांच्या व द्राक्षांच्या बागा निर्माण केल्यात. यात तुमच्यासाठी अनेक फळे आहेत. जी तुम्ही खातात.

فَأَنشَأْنَا لَكُم بِهِ جَنَّاتٍ مِّن نَّخِيلٍ وَأَعْنَابٍ لَّكُمْ فِيهَا فَوَاكِهُ
كَثِيرَةٌ وَمِنْهَا تَأْكُلُونَ ﴿١٩﴾

२०. आणि ते झाड देखील जे तूर सेनाच्या पर्वतात निर्माण होते. ते खाणाऱ्यांसाठी तेल व रसा घेऊन उगते.[२२]

وَشَجَرَةً تَخْرُجُ مِن طُورِ سَيْنَاءَ تَنبُتُ بِالدُّهْنِ
وَصِبْغٍ لِّلْآكِلِينَ ﴿٢٠﴾

११. फिर्दोस (जन्नत) चे वारस असणे हीच ती खरी सफलता होय जी इमान बाळगणाऱ्याच्या हिश्श्यात येईल. हदीस वचनात 'फिर्दोस'ला उच्च दर्जाची जन्नत या अर्थाने घेतले गेले आहे. सहीहैनच्या उल्लेखानुसार:-

''जेव्हा तुम्ही अल्लाहजवळ जन्नत मागाल, तेव्हा फिर्दोस मागा कारण ती उच्चतम व सर्वोत्कृष्ट दर्जाची जन्नत होय व तिच्या पासूनच जन्नतचे प्रवाह निघतात.'' (इब्ने कसीर खंड ३ पृष्ठ १०८)

आणि फिर्दोसच्याहि अनेक बागा असतील जसे सूरह कहफच्या आयत क्र. १०७ मध्ये स्पष्ट केले गेले आहे.

१२. जणू हा मातीचा सत्वगुण होता. ज्याद्वारे प्रथम मनुष्य-निर्मिती झाली. म्हणूनच माणसाच्या स्वभावात ती समस्त गुण वैशिष्ट्ये सामावलेली आहेत. ज्या विविध चिन्हात दिसून येतात. उदाहरणार्थ एखादी जमीन मृदु असते तर एखादी कणखर, तद्वत्तच एखाद्या माणसाचा स्वभाव कोमल असतो तर एखाद्याचा सक्त, मातीचे विविध रंग असतात तसेच माणसाचेहि वेगवेगळे रंग असतात. मातीत विविध वस्तू निर्माण करण्याची क्षमता असते, तद्नुसार मनुष्य देखील निनिराळ्या प्रकारची योग्यता बाळगतो. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. २४)

१३. म्हणजे पहिल्या मानवाला मातीतून निर्माण केल्यानंतर त्याचा वंशक्रम वीर्याद्वारे चालू ठेवला जो पाण्याचा एक थेंब मात्र असतो त्यास गर्भशयासारख्या सुरक्षित जागी राखण्याची त्याने उपाय योजना केली.

१४. वीर्यबिंदू ज्या अवस्थांमधून जाऊन गर्भाचे (Embroy) स्वरुप धारण करते त्याचे स्पष्टीकरण सूरह हज टीप क्र. ८ ते ११ मध्ये केले गेले आहे.

स्पष्ट असावे की रक्ताचा गोळा (अलका) वगैरे सर्वसामान्य पणे अवलोकनात येणारी बाब होती म्हणजे गर्भपाताच्या स्थितीत लोक हे पाहात असत की गर्भाची प्राथमिक अवस्था कशी राहते व नंतर त्यात कस कसे स्थित्यंतर घडून येते. कुरआनाचा युक्तिवाद याच सामान्य अवलोकनात येणाऱ्या गोष्टींवर आहे. राहीले आजचे गर्भवृद्धिशास्त्र (Embroyology)ज्याने आशचर्यजनक रहस्ये उलगडली आहेत. तर हा जणू कुरआनाच्या संकेतांचा खुलासा होय व याद्वारे कुरआनाचे हे प्रमाण अधिक जासत स्पष्ट झाले आहे की हे अवलोकन कुरआनाच्या या निवेदनाबाबत विश्वास निर्माण करतो की मनुष्याला त्याचा पालन कर्ता दुसऱ्यांदा उठविल.

१५. म्हणजे नंतर ती अवस्था येते की गर्भात जीव टाकला जातो आणि तो ऐकणारा व पाहणारा मनुष्य बनतो. प्रथम एक निर्जीव गोळा होता नि आता एक परिपूर्ण मनुष्य झाला.रक्ताच्या गोळ्यास पाहून हे अनुमान लावले जाऊ शकत नाही की हा गोळा असे अस्तित्व धारण करील. ज्यास पृथ्वीच्या प्रतिनिधित्वाचा सम्मान लाभेल. परंतु काही महिन्यांच्या अवधित यात एवढे जबरदस्त परिवर्तन घडून येते की तो एक नविन सृष्ट-जीव बनून उदयास येतो.

१६. माणसाचे या विविध परिस्थितीतून व स्वरूपातून जाऊन मनुष्य बनणे सृष्टीनिर्मात्याच्या निर्मितीचा डोळस पुरावा होय. तसेच याद्वारे त्याचे हे वैभवहि व्यक्त होते की तो मोठे नैपुण्य बाळगणारा आहे आणि त्याच्या कृपालाभाला कसलीहि मर्यादा नाही.

१७. मेल्यानंतर आलमे बर्जख (मरणोत्तर विश्वा) मध्ये आत्म्यांबरोबर जो मामला होतो त्याचा उल्लेख केला गेला नाही, कारण या ठिकाणी कियामतीच्या दिवशी उठविले जाण्याबद्दल युक्तिवाद करणे अभिप्रेत आहे. जे शरीरासह असेल आणि त्याच दिवशी तो आपल्या आचरणाचा पूरेपूर मोबदला प्राप्त करील.

१८. जर माणूस पहिल्यांदा अस्तित्वात आला तर तो दुसऱ्यांदा का अस्तित्वात येणार नाही? जर माणसाला आजचे जीवन विविध अवस्थांमधून गेल्यानंतर लाभले आहे व यानंतर तो विविध अवस्थांमधून जात राहतो तर हे कसे म्हटले जाऊ शकतो की मेल्यानंतर कोणतीच अवस्था नाही? जीवन तर जारी राहणारी गोष्ट आहे परंतु लोक या भ्रमात पडले आहेत की मृत्यु जीवनाला नेहमी करीता संपवितो. वस्तुत: मृत्यु केवळ एका अवस्थेतून दुसऱ्या आवस्थेत दाखल होण्याचे नाव आहे.

१९. मूळ ग्रंथात 'तराइक' हा शब्द प्रयोजिला आहे. ते तरीका या शब्दाचे अनेकवचन होय. ज्याचा अर्थ मार्ग असाहि आहे व थरावर थर असणे असाहि आहे. अरबी भाषेत बोल्ले ريش طرائق जाते अर्थात ते पर जे एक दुसऱ्यावर ठेवले आसावे.

ريش طرائق اذا كان بعضه فوق بعض

(अस्सिहाह लिल-जौहरी जिल्द ४ पृष्ट १५१६)

आणि पवित्र कुरआनात एका ठिकाणी म्हटले आहे.

سَبۡعَ سَمٰوٰتٍ طِبَاقًا

थरावर थर आकाश (सूरह मुल्क-३) म्हणून येथेहि थरावर थर हा अर्थ घेणेच उचित आहे.

काही भाष्यकारांनी सात ग्रहांची कक्षा अभिप्रेत घेतली आहे परंतु त्याचे समर्थन कुरआनाच्या कोणत्याही आयतीद्वारे होत नाही.

२०. म्हणजे सात आकाशांवर संपूर्ण सृष्टीत जी काही निर्मिती आहे. अल्लाह त्या विषयी चांगल्या प्रकारे जाणकार आहे.

२१. पाण्याविना जीवन अशक्यच. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह पावसाद्वारे पाण्याचे खजीने ओतत राहतो. जे जमीनीवर साचून माणसाला उपयोगी पडते. अल्लाहने इच्छिले तर तो पाण्याला नाहीसे सुद्धा करू शकतो म्हणून माणसाने त्याच्याशी कृतज्ञ राहून त्याचे भय बाळगले पाहिजे.

२२. अभिप्रेत जैतूनचे झाड होय जे अरबच्या शेजारील देश (सैना) ध्ये तूर पर्वताजवळ आढळते आणि त्यास रसा म्हणून उपयोगात आणले जात होते.

# जमलेले रक्त व मांस-गोळ्याचे चित्र

EMBRYONIC AND FETAL STAGES




A. २० दिवसाच्या गर्भाचे चित्र जेव्हा अल्का (जमलेले रक्त) मुजगा (रक्त मांस-गोळ्या) मध्ये परिवर्तित होते.

B. गर्भ जेव्हा मांस-गोळा असतो। (चित्र मोठे करून दाखविले गेले आहे।)

**आणि तुमच्यासाठी गुरांमध्येहि मोठा बोध आहे. आम्ही त्यांच्या पोटात असलेल्या वस्तुंमधून तुम्हाला (दुध) पाजतो. तुमच्यासाठी यांच्यात अनेक लाभ आहेत व यांच्यापासून तुम्ही खाद्यहि प्राप्त करतात.(अल-कुर्आन)**

२१. आणि तुमच्यासाठी गुरांमध्येहि मोठा बोध आहे. आम्ही त्यांच्या पोटात असलेल्या वस्तुंमधून तुम्हाला (दुध) पाजतो.[२३] तुमच्यासाठी यांच्यात अनेक लाभ आहेत व यांच्यापासून तुम्ही खाद्यहि प्राप्त करतात.[२४]

وَإِنَّ لَكُمْ فِي الْأَنْعَامِ لَعِبْرَةً ۖ نُّسْقِيكُم مِّمَّا فِي بُطُونِهَا
وَلَكُمْ فِيهَا مَنَافِعُ كَثِيرَةٌ وَمِنْهَا تَأْكُلُونَ ﴿٢١﴾

२२. तुम्ही त्यांच्यावर व नौकांवरहि स्वार केले जातात.[२५]

وَعَلَيْهَا وَعَلَى الْفُلْكِ تُحْمَلُونَ ﴿٢٢﴾

२३. आम्ही नूहला त्याच्या जन-समूहाकडे पाठविले.[२६] तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो अल्लाहची उपासना करा, त्याच्याशिवाय तुमचा कोणीहि ईश्वर नाही. काय तुम्ही (त्याचे) भय नाही बाळगत ?[२७]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا نُوحًا إِلَىٰ قَوْمِهِ فَقَالَ يَا قَوْمِ اعْبُدُوا اللَّهَ مَا لَكُم
مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُ ۖ أَفَلَا تَتَّقُونَ ﴿٢٣﴾

२४. त्याच्या जन- समूहाच्या सरदारांनी, ज्यांनी कुफ्र केले होते, म्हटले की हा मनुष्य तर केवळ तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे. हा तुम्हा लोकांवर वर्चस्व प्राप्त करू इच्छितो. जर अल्लाहने (रसूल पाठवायचे) इच्छिले असते तर फिरिशत्यांना अवतरीत केले असते. अशी गोष्ट तर आम्ही आमच्या पूर्वीच्या वाडवडितलांकडून ऐकलीही नाही.

فَقَالَ الْمَلَأُ الَّذِينَ كَفَرُوا مِن قَوْمِهِ مَا هَٰذَا إِلَّا بَشَرٌ مِّثْلُكُمْ
يُرِيدُ أَن يَتَفَضَّلَ عَلَيْكُمْ وَلَوْ شَاءَ اللَّهُ لَأَنزَلَ مَلَائِكَةً
مَّا سَمِعْنَا بِهَٰذَا فِي آبَائِنَا الْأَوَّلِينَ ﴿٢٤﴾

२५. काही नाही या माणसाला वेड लागले आहे. म्हणून काही दिवस याच्या बाबत वाट पहा.[२८]

إِنْ هُوَ إِلَّا رَجُلٌ بِهِ جِنَّةٌ فَتَرَبَّصُوا بِهِ حَتَّىٰ حِينٍ ﴿٢٥﴾

२६. नूह ने दुआ (प्रार्थना) केली, हे माझ्या पालन कर्त्या ! माझी मदत कर या गोष्टी साठी की यांनी मला खोटे ठरविले आहे.

قَالَ رَبِّ انصُرْنِي بِمَا كَذَّبُونِ ﴿٢٦﴾

२७. आम्ही त्याच्यावर वह्य (ईश-आदेश) अवतरीत केली की आमच्या द्रेखरेखीखाली व आमच्या वह्यनुसार नौका तयार करा,[३०] मग जेव्हा आमचा आदेश येईल व तंदूर ऊतू जाईल.[३१] तेव्हा प्रत्येक प्रकारच्या नर व मादीचा जोडा त्यात ठेवून घ्या व आपल्या कुंटुबियांनाही सोबत न्या, मात्र त्यांच्या खेरीज, ज्यांच्या विरूद्ध अधीच फैसला केला गेला आहे.[३२] आणि अत्याचारीबाबत मला काहीच सांगू नका, ते बुडतीलच.

فَأَوْحَيْنَا إِلَيْهِ أَنِ اصْنَعِ الْفُلْكَ بِأَعْيُنِنَا وَوَحْيِنَا
فَإِذَا جَاءَ أَمْرُنَا وَفَارَ التَّنُّورُ ۙ فَاسْلُكْ فِيهَا مِن كُلٍّ
زَوْجَيْنِ اثْنَيْنِ وَأَهْلَكَ إِلَّا مَن سَبَقَ عَلَيْهِ الْقَوْلُ
مِنْهُمْ ۖ وَلَا تُخَاطِبْنِي فِي الَّذِينَ ظَلَمُوا ۖ إِنَّهُم مُّغْرَقُونَ ﴿٢٧﴾

२३.म्हणजे त्यांच्या पोटाच्या घाणीच्या दरम्यान दूधासारखी निखालस वस्तू तयार करून आम्ही तुम्हाला पाजतो.

२४. म्हणजे या गुरांचे मांस तुमच्या खाण्यासाठी उपयोगी पडते.

२५. ह्या सर्व अल्लाहच्या देणग्या व त्याचे महान उपकार होत आणि त्यांच्या स्मरणाचा हेतु अल्लाह पालनकर्ता असण्याची जाणीव निर्माण करणे व मृत्युनंतर उठविले जाण्याबद्दल युक्तिवाद करणे होय.

२६. हजरत नूह यांचा वृत्तांत सूर एअराफ, सूरह युनूस खेरीज सूरह हूद मध्ये सविस्तरपूर्वक निवेदिला गेला आहे. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह अेअराफ टीप क्र. ९४ ते १०४, सूरह युनूस टीप क्र. १०८ ते ११३ आणि सूरह हूद टीप क्र. ३८ ते ७३.

२७. म्हणजे काय तुम्हाला या गोष्टीचे भय नाही वाटत की जर तुम्ही अल्लाहला सोडून अन्य एखाद्याची उपासना केली तर तो तुम्हाला कठोर शिक्षा देईल. कारण उपासना केवळ अल्लाहचा हक्क आहे व उपासनेस योग्य असा अल्लाह खेरीज कोणीहि नाही.

२८. हजरत नूह यांचा जन समूह जगातील पहिला जनसमूह होय ज्याकडे पहिला रसूल पाठविला गेला होता. या जनसमूहाने ज्या प्रकारे रसूलचा इन्कार केला व त्या इन्कारासाठी ज्या चुकीच्या गोष्टींचा आधार घेतला. त्याचप्रमाणे नंतरचे जनसमूह देखील तोच राग आळवत राहीलेत. प्रेषित्वाचा इन्कार करणाऱ्यांनी ना पूर्वी एखादी योग्य गोष्ट सांगितली व ना आता सांगत आहेत.

२९. म्हणजे जेव्हा यांच्यावर माझे आवाहन स्पष्ट झाले आहे व प्रमाण प्रस्थापित झाले आणि तरीही आपल्या नकारात्मक भूमिकेपासून हटण्यास ते तयार नाहीत तेव्हा तू माझे अशा प्रकारे सहाय्य कर की सत्य लागू व्हावे व असत्य लयाला जावे.

३०. हजरत नूह यांची प्रार्थना कबूल झाली व नूह जनसमूहास नष्ट करण्याचा निर्णय घेतला गेला. हजरत नूह यांना सूचित केले गेले की त्यांच्या जनसमूहावर अल्लाहची शिक्षा वादळाच्या स्वरूपात येईल आणि तुमची व ईमान बाळगणाऱ्यांची सुटका एका नौकेद्वारे होईल म्हणून तुम्ही नौका तयार करा.

३१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ५६.

३२. म्हणजे एखाद्या अशा माणसाला सोबत नेऊ नका जो काफीर असावा व यामुळे त्याच्या विनाशाचा निर्णय घेतला गेला असावा मग तो तुमच्या कुटुंबियांपैकी का असेनात.

२८. मग जेव्हा तुम्ही आपल्या साथीदारांना घेऊन नौकेत स्वर व्हाल तेव्हा म्हणा, उपकार आहे अल्लाहचा ज्याने आम्हाला अत्याचारी जनसमूहापासून मुक्ति दिली.[३३]

فَإِذَا اسْتَوَيْتَ أَنْتَ وَمَنْ مَعَكَ عَلَى الْفُلْكِ فَقُلِ الْحَمْدُ لِلَّهِ
الَّذِي نَجَّانَا مِنَ الْقَوْمِ الظَّالِمِينَ ﴿٢٨﴾

२९. आणि प्रार्थना करा, हे पालनकर्त्या ! मला समुद्धि सह उतरव.[३४] आणि तू सर्वात उत्कृष्ट उतरविणारा आहेस.[३५]

وَقُلْ رَبِّ أَنْزِلْنِي مُنْزَلًا مُبَارَكًا وَأَنْتَ خَيْرُ الْمُنْزِلِينَ ﴿٢٩﴾

३०. या (घटनेत ) मोठी बोध-चिन्हे आहेत [३६] आणि अवश्य आम्ही (लोकांना ) कसोटीत टाकू.[३७]

إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ وَإِنْ كُنَّا لَمُبْتَلِينَ ﴿٣٠﴾

३१. मग त्याच्या नंतर आम्ही दुसऱ्या काळाचे लोक निर्माण केले.

ثُمَّ أَنْشَأْنَا مِنْ بَعْدِهِمْ قَرْنًا آخَرِينَ ﴿٣١﴾

३२. आणि त्यांच्यातूनच एक रसूल त्यांच्याकडे पाठविला [३८] (या आवाहनासह) की अल्लाहचीच उपासना करा. त्याच्या खेरीज तुमचा कोणीहि उपास्य (देव) नाही. तर काय तुम्ही भय नाही बाळगत ?

فَأَرْسَلْنَا فِيهِمْ رَسُولًا مِنْهُمْ أَنِ اعْبُدُوا اللَّهَ
مَا لَكُمْ مِنْ إِلَٰهٍ غَيْرُهُ أَفَلَا تَتَّقُونَ ﴿٣٢﴾

३३. त्याच्या जनसमूहाच्या सरदारांनी, ज्यांनी कुफ्र केले होते आणि अखिरतच्या भेटीस खोटे ठरविले होते व ज्यांना आम्ही ऐहीक जीवनात सुख सम्पन्नता देऊन ठेवली होती, म्हणू लागले हा तर तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे. तेच खातो, जे तुम्ही खाता व तेच पितो जे तुम्ही पिता.

وَقَالَ الْمَلَأُ مِنْ قَوْمِهِ الَّذِينَ كَفَرُوا وَكَذَّبُوا بِلِقَاءِ الْآخِرَةِ
وَأَتْرَفْنَاهُمْ فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا مَا هَٰذَا إِلَّا بَشَرٌ مِثْلُكُمْ يَأْكُلُ
مِمَّا تَأْكُلُونَ مِنْهُ وَيَشْرَبُ مِمَّا تَشْرَبُونَ ﴿٣٣﴾

३४. जर तुम्ही आपल्या सारख्याच माणसाचे आज्ञापालन केले. तर तुम्ही घाट्यात राहाल.

وَلَئِنْ أَطَعْتُمْ بَشَرًا مِثْلَكُمْ إِنَّكُمْ إِذًا لَخَاسِرُونَ ﴿٣٤﴾

३५. हा तुम्हाला सावध करतो की जेव्हा तुम्ही मेल्यावर माती व्हाल. व अस्थि स्वरूपात राहाल तेव्हा तुम्हाला बाहेर काढले जाईल.

أَيَعِدُكُمْ أَنَّكُمْ إِذَا مِتُّمْ وَكُنْتُمْ تُرَابًا وَعِظَامًا
أَنَّكُمْ مُخْرَجُونَ ﴿٣٥﴾

३३. नूह यांचा समूदाय अनेकेश्वरवादी, काफिर व दुराचारी जन-समूह होता. या अर्थाने त्यास अत्याचारी जनसमूह म्हटले गेले आहे अशा समाजापासून व अशा वातावरणापासून सुटका, सर्वश्रेष्ठ अल्लाहचा फार मोठा अनुग्रह होता कारण आता ते एका पवित्र वातावरणात व स्वच्छ शुद्ध हवेत जीवन व्यतीत करू शकत होते म्हणून या कृपेबद्दल अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आदेश दिला गेला.

३४. म्हणजे जमीनीवर माझे पाऊल ठेवणे मांगल्यकारक व्हावे. जे कार्य देखील माझ्या मार्गदर्शनाखाली पार पडेल ते भलेतेपणाचेच काम असावे. आणि माझ्या अस्तित्वाने जमीनीवर सर्वत्र मांगल्य पसरावे.

३५. ही या अपेक्षेची अभिव्यक्ति होय की जेव्हा तू उतरवशील तेव्हा आपल्या मेहरबानीसह व कृपालाभासह उतरवशील.

३६. राष्ट्रांच्या व समाजांच्या इतिहासातील हे आद्य पर्व आपल्या अंगि महान बोध राखते. उदाहरणार्थ एकेश्वरवाद सत्य आहे व शिर्क असत्य, अल्लाहतर्फे माणसाला प्राप्त होणारे मार्गदर्शन रसूल व पैगंबरांच्या माध्यमान्वये मिळते. रसूल मनुष्यच असतो. रसूलचा विरोध करणाऱ्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह जगात सक्त शिक्षा देतो व आपल्या रसूल व त्याचा पाठपुरावा करणाऱ्या ईमानधारक लोकांच्या सुटकेची उपाय योजना करतो. जेव्हा अल्लाहचा निर्णय लागू पडतो तेव्हा सत्य बाकी राहते व असत्य लयाला जाते.

३७. म्हणजे हे विश्व कसोटी करिताच बनविले गेले आहे. म्हणून येथील जीवन कसोटीचेच जीवन असेल. वही व रिसालत (प्रेषित्वा)चा क्रम देखील कसोटीचाच एक भाग होय, यासाठी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे पहावे की कोण आपल्या बुद्धिचा वापर करून व आपल्या अंतर्दृष्टिने त्याच्या रसूलला ओळखतो आणि कोण डोळे असूनहि आंधळा राहू इच्छितो!

३८. कुरआनाने हे स्पष्टीकरण दिले नाही की हा कोणता जन-समूह होता. संभवत: हा एखाद्या अशा जन समूहाचा किस्सा असेल ज्याच्या नावाशी लोग परिचित नसावेत परंतु उल्लेख म्हणून त्यांचा किस्सा निवेदिला गेला असेल.

३६. दुरापास्त आहे फार दुरापास्त आहे ती गोष्ट जिचा तुमच्याशी वायदा केला जात आहे.[३९]

هَيْهَاتَ هَيْهَاتَ لِمَا تُوعَدُونَ ﴿٣٦﴾

३७. जीवन तर केवळ इहलोकीय जीवनच होय ज्यात आम्ही मरण पावतो व जगतो.[४०] आणि आम्हाला कदापि उठविले जाणार नाही.

إِنْ هِيَ إِلَّا حَيَاتُنَا الدُّنْيَا نَمُوتُ وَنَحْيَا
وَمَا نَحْنُ بِمَبْعُوثِينَ ﴿٣٧﴾

३८. हा तर असा मनुष्य आहे ज्याने अल्लाहच्या नावाने असत्य रचले आहे आणि आम्ही त्याचे म्हणणे मुळीच मान्य करणार नाही.

إِنْ هُوَ إِلَّا رَجُلٌ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا
وَمَا نَحْنُ لَهُ بِمُؤْمِنِينَ ﴿٣٨﴾

३९. त्याने दुआ (प्रार्थना) केली,[४१] हे पालनकर्त्या ! यांनी मला खोटे ठरविले आहे तेव्हा तू मला सहाय्य कर.

قَالَ رَبِّ انصُرْنِي بِمَا كَذَّبُونِ ﴿٣٩﴾

४०. फर्माविले जवळ आहे ती वेळ जेव्हा ते पश्ताताप दग्ध होतील.

قَالَ عَمَّا قَلِيلٍ لَّيُصْبِحُنَّ نَادِمِينَ ﴿٤٠﴾

४१. तेव्हा एका भयंकर आवजाने त्यांना येऊन गाठले जो सत्यासह प्रकट झाला होता.[४२] आणि आम्ही त्यांना पाला पाचोळ्यासमान करून टाकले. निर्भत्सना आहे अत्याचारी जन समूहा करिता !

فَأَخَذَتْهُمُ الصَّيْحَةُ بِالْحَقِّ فَجَعَلْنَاهُمْ غُثَاءً ۚ فَبُعْدًا لِّلْقَوْمِ
الظَّالِمِينَ ﴿٤١﴾

४२. मग आम्ही त्यांच्यानंतर दुसरे जन-समूह निर्माण केलेत.

ثُمَّ أَنشَأْنَا مِن بَعْدِهِمْ قُرُونًا آخَرِينَ ﴿٤٢﴾

४३. कोणताही जन समूह ना आपल्या मुदतीपूर्वी नाश पावतो, ना त्यानंतर थांबू शकतो.

مَا تَسْبِقُ مِنْ أُمَّةٍ أَجَلَهَا وَمَا يَسْتَأْخِرُونَ ﴿٤٣﴾

४४. नंतर आम्ही एका पाठोपाठ एक आपले पैगंबर पाठविले.[४३] ज्या ज्या वेळेस एखाद्या जनसमूहाजवळ त्याचा पैगंबर आला, त्याने त्यास खोटे ठरविले. तेव्हा आम्ही एका पाठोपाठ एक जनसमूह नष्ट करीत राहीलो आणि त्यांना किस्सा-कहाणी बनवून सोडले. धि:कार त्या लोकांचा जे ईमान बाळगत नाही !

ثُمَّ أَرْسَلْنَا رُسُلَنَا تَتْرَىٰ ۖ كُلَّ مَا جَاءَ أُمَّةً رَّسُولُهَا كَذَّبُوهُ
فَأَتْبَعْنَا بَعْضَهُم بَعْضًا وَجَعَلْنَاهُمْ أَحَادِيثَ ۚ
فَبُعْدًا لِّقَوْمٍ لَّا يُؤْمِنُونَ ﴿٤٤﴾

३९. माणसाला मेल्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा उठविले जाईल या गोष्टीस ते बुद्धिच्या विपरीत समजत आणि वर्तमान काळातील मनुष्य देखील या गोष्टीस न घडून येणारी समजतो. त्याच्या मते ही काही काळजी करण्या जोगी गंभीर गोष्ट नाही, वस्तुतः अशा कितीतरी गोष्टी ज्यापूर्वी बुद्धिपासून लांभ होत्या, आता बुद्धिगम्य ठरल्या आहेत. परंतु दुसऱ्या जीवनाचा इन्कार करणाऱ्यांच्या विचार सरणीत कसलाच बदल घडून आला नाही.

४०. आजचे भौतिक वादी विश्व देखील या पथभ्रष्ट जनसमूहांच्याच पाऊल खुणांवर चालत आहे. त्यांनी इहलोकास आपले जीवन-ध्येय बनविले आहे. ऐहीक जीवनाच्याच समस्यामध्ये ते गुरफटले आहेत आणि जो रोख फायदा त्यांना प्राप्त होत आहे. त्यात कमतरता व्हावी असे ते इच्छित नाही.

४१. म्हणजे पागंबरांनी शेवटी दुआ केली.

४२. म्हणजे शेवटी ते ईश शिक्षेच्या तावडीत सापडले. ही ईश-शिक्षा ज्या स्वरूपातहि होती एका भयंकर आवाजासह त्यांच्यावर कोसळली त्यासोबतच ते सत्य देखील प्रकटले ज्याचा वायदा पैगंबराने केला होता.

४३.म्हणजे जगात जन समूहांची विपुलता झाली तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने देखील एका पाठोपाठ आपले पैगंबर पाठविले. त्यावेळी हे विश्व आंतरराष्ट्रीय नव्हते आणि ना अशी साधने होती की एका जनसमूहात पैगंबराला पाठविले जाणे, दुसऱ्या जनसमूहांपर्यंत संदेश पोहचविण्याचे साधन बनले असते. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येक जन समूहात पैगंबर पाठविले. अर्थात त्या सर्वच पैगंबरांची व त्यांच्या जन-समूहांची नावे कुरआनात निवेदिली गेली नाहीत परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्पष्टतः फर्माविले की ज्या पैगंबरांच्या नावाचा कुरआनात उल्लेख केला गेला आहे त्यांच्याखेरीजहि अनेक पैगंबर विविध जनसमूहांकडे वेगवेगळ्या कालावधीत पाठविले गेले होते.

४५. मग आम्ही मूसा व त्याचा भाऊ हारूनला आपल्या निशाण्या व स्पष्ट प्रमाणांसह पाठविले.[४४]

ثُمَّ أَرْسَلْنَا مُوسَىٰ وَأَخَاهُ هَارُونَ بِآيَاتِنَا
وَسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿٤٥﴾

४६. फिरऔन व त्याच्या शासनाधिकाऱ्यांकडे परंतु त्यांनी गर्व केला आणि ते बंडखोर लोक होते.

إِلَىٰ فِرْعَوْنَ وَمَلَئِهِ فَاسْتَكْبَرُوا وَكَانُوا قَوْمًا عَالِينَ ﴿٤٦﴾

४७. ते म्हणाले, काय आम्ही आपल्या सारख्याच दोन माणसांवर ईमान बाळगावे, जेव्हा त्यांचा जन-समूह आमची गुलामी करीत आहे.[४५]

فَقَالُوا أَنُؤْمِنُ لِبَشَرَيْنِ مِثْلِنَا وَقَوْمُهُمَا لَنَا عَابِدُونَ ﴿٤٧﴾

४८. अशा प्रकारे त्यांनी त्या दोघांना खोटे ठरविले व शेवटी नाश पावलेच.

فَكَذَّبُوهُمَا فَكَانُوا مِنَ الْمُهْلَكِينَ ﴿٤٨﴾

४९. आणि मूसाला आम्ही ग्रंथ प्रदान केला, अशासाठी की लोकांनी मार्गदर्शन प्राप्त करावे.

وَلَقَدْ آتَيْنَا مُوسَى الْكِتَابَ لَعَلَّهُمْ يَهْتَدُونَ ﴿٤٩﴾

५०. आणि मरीयम-पुत्र [४७] व त्याच्या मातेस आम्ही एक निशाणी बनविले. [४८] व त्यांना एका उंचवट्यावर जागा दिली जी निवांत व झरा असलेली जागा होती.[४९]

وَجَعَلْنَا ابْنَ مَرْيَمَ وَأُمَّهُ آيَةً وَآوَيْنَاهُمَا إِلَىٰ
رَبْوَةٍ ذَاتِ قَرَارٍ وَمَعِينٍ ﴿٥٠﴾

५१. हे पैगंबर!स्वच्छ शुद्ध वस्तू खा व सत्कर्म करा. [५०] तुम्ही जे करता, मी ते चांगल्या प्रकारे जाणतो.

يَا أَيُّهَا الرُّسُلُ كُلُوا مِنَ الطَّيِّبَاتِ
وَاعْمَلُوا صَالِحًا إِنِّي بِمَا تَعْمَلُونَ عَلِيمٌ ﴿٥١﴾

५२. आणि हा तुमचा जन-समूह एक मात्र जन समूह होय.[५१] व मी तुमच्या रब्ब (पालनकर्ता) आहे, तेव्हा माझेच भय बाळगा.[५२]

وَإِنَّ هَٰذِهِ أُمَّتُكُمْ أُمَّةً وَاحِدَةً وَأَنَا رَبُّكُمْ فَاتَّقُونِ ﴿٥٢﴾

५३. परंतु लोकांनी आपल्या धर्माची शकले पाडलीत. [५३] प्रत्येक समूह जे काही त्याच्याजवळ आहे त्यातच मग्न आहे.[५४]

فَتَقَطَّعُوا أَمْرَهُم بَيْنَهُمْ زُبُرًا
كُلُّ حِزْبٍ بِمَا لَدَيْهِمْ فَرِحُونَ ﴿٥٣﴾

५४. तेव्हा सोडा त्यांना. आपल्या गफलतीत बुडून रहावेत, एका खास वेळे पावेतो.[५५]

فَذَرْهُمْ فِي غَمْرَتِهِمْ حَتَّىٰ حِينٍ ﴿٥٤﴾

४४. हजरत मूसा व हजरत हारून या दोघांचा किस्सा सविस्तरपणे सूरह ताहामध्ये निवेदिला गेला आहे. येथे निशाण्यांशी अभिप्रेत अल्लाहचे चमत्कार होत ज्यात काठीचा साप होणे हा चमत्कार सर्वात मोठा चमत्कार होता.

स्पष्ट प्रमाणांशी अभिप्रेत ते प्रमाण होय जे हजरत मूसा व हजरत हारून यांचे आवाहन तसेच त्यांचे संभाषण व आचरणाने अगदी उघड होते आणि त्यांचे व्यक्तिमत्व या गोष्टीची अभिव्यक्ती होती की त्यांना अल्लाहतर्फे नियुक्त केले गेले आहे व त्यांना अल्लाहचे समर्थन प्राप्त आहे. पैगंबरांचे व्यक्तिमत्व हेच प्रमाण होय मग तो एखादा ईश चमत्कार दाखवित असो वा नसो.

४५. मूळ ग्रंथात قَوْمُهُمَا لَنَا عَابِدُوْنَ 'कौमुहुमा लना आबिदून' हे शब्द वापरले गेले आहेत. ज्यांचा अर्थ 'त्यांचा जनसमूह आमचा गुलाम आहे' असा आहे. इथे 'अबिदून'चा अर्थ उपासना करणारे असा नव्हे, किंबहुना गुलामी करणारे असा आहे. यास्तव हजरत मूसा यांनी एका प्रसंगी फिरऔनला म्हटले होते,

وَتِلْكَ نِعْمَةٌ تَمُنُّهَا عَلَيَّ أَنْ عَبَّدتَّ بَنِي إِسْرَائِيلَ ـ (شعراء:٢٢)

'हाच तुझा तो उपकार होय, जो तू दर्शवित आहेस. या गोष्टीबद्दल की तू बनी इस्राईलला गुलाम बनविले आहे' (शोअरा:२२)

या आयतीत 'अब्बदता' عَبَّدتَّ हा शब्द गुलाम बनविणे या अर्थाने वापरला गेला आहे आणि वस्तुस्थितीही हीच होय की फिरऔनने बनी इस्राईलला गुलामगिरीचे जीवन जगण्यास विवश केले होते. त्यांच्या या कनिष्ठतम पात्रतेचा उल्लेख करून फिरऔन व त्याच्या शासनाच्या जबाबदार लोकांनी लोकांना भडकविले की मूसा व हारूनला अल्लाहचा प्रेषित मानण्यांचा अर्थ असा की त्यांना आमच्यावर वर्चस्व प्राप्त व्हावे वस्तुत: ते ज्या जनसमूहाचे ने ते आहेत तो आमची गुलामी करीत आहेत तर काय आम्ही आपल्या दासांचा धर्म कबूल करावा व त्यांच्या प्रमुखांना आपला प्रमुख मानावे? हाच तो अहंकार होता व हीच ती अज्ञाना विषयीची असाक्ति होती जिने फिरऔन व त्याच्या जनसमूहास सत्य स्विकारण्यापासून दूर ठेवले.

वर्तमान काळातील एक भाष्यकाराने لَنَا عَابِدُوْنَ 'लना आबिदून'चा असा अर्थ घेतला आहे की जो मनुष्य एखाद्याचे आज्ञापालन करतो तो जणू त्याची भक्ति करतो. परंतु ही गोष्ट अशाच स्थितीत उचित ठरू शकते जेव्हा मनुष्य हे समजून उमजून आज्ञापालन करील की त्याला अमर्याद आदेश देण्याचा अधिकार आहे किंवा त्याचे आज्ञापालन अल्लाहच्या आज्ञापालनाखाली असणे आवश्यक नाही आणि म्हणूनच सैतानाच्या अंधानुकरणास त्यांच्या भक्तिच्या अर्थाने घेतले गेले आहे. परंतु बनी इस्राईल-फिरऔन चे आज्ञापालन अगतिक होऊन करीत होते, अशासाठीही की त्याची सत्ता त्यांच्यावर कायम होती व अशासाठीही की फिरऔनचे त्यांना गुलामगिरीचे जीवन जगण्यास विवश केले होते. अशा परिस्थितीत बनी इस्राईलच्या बाबतीत हे म्हणणे कसे उचित ठरू शकले की ते फिरऔनची भक्ति-उपासना करीत होते आणि फिरऔन ने याच अर्थाने म्हटले की हा जन-समूह आमचा भक्त आहे आणि जर समजा फिरऔनने ही गोष्ट या अर्थाने म्हटली होती तर यावरून हे सिद्ध कसे होते की त्याचे हे कथन उचित होते. त्याने जर हजरत मूसा यांना वेडा देखील म्हटले होते काय याचा अर्थ असा आहे की त्याचे हे म्हणणे खरे होते? जर नाही तर फिवौनच्या या कथनास की 'हा जन-समूह आमचा दास आहे' उपासनेचा शरीअत विषयक पारिभाषिक अर्थ निश्चित करण्यास प्रमाणे कसे बनविलला जाऊ शकतो.

४६. अभिप्रेत तौरात होय. हा ग्रंथ हजरत मूसा यांच्या नंतर देखील दीर्घ काळपावेतो लोकांसाठी अल्लाहचे मार्गदर्शन बाणून घेण्याचे साधन राहीला.

४७. हजरत ईसा (येशू) यांचा उल्लेख त्यांचे नाव न घेता त्यांच्या पुत्र असण्याद्वारे केला गेला आहे. ज्याने एक तर या गोष्टीकडे संकेत करण्याचा हेतु आहे की ते पित्याविना आपल्या मातेच्या पोटी जन्मास आले व दुसरे हे की ते अल्लाहचे नव्हे, मरीयमचे पुत्र होते.

४८. हजरत ईसा व हजरत मरीयम दोघे मिळून अल्लाहची एक निशाणी होते कारण हजरत मरीयम पती नसतांनाही गर्भवती झाली होती व हजरत ईसा पित्यांशिवाय जन्मास आले होते.

४९. हजरत मरीयम यांना जेव्हा प्रसव-वेदना जाणवली तेव्हा त्यांनी बैतुल मक्दिसहून दूर खजुर वृक्षाच्या खोडाजवळ आश्रय घेतला. यासाठी की लपलेल्या स्थितीत रहावे जेणेकरून लोकांच्या निंदा-कुचेष्टेपासून बचाव व्हावा. ही जागा मोठी निवांत होती, व ती एक लहानशी टेकडी होती. जिच्याखाली सर्वश्रेष्ठ अल्लाहने झरा प्रवाहित केला होता. (पहा सूरह मरीयम आयत क्र. २४) या आयतीचा इशारा याच स्थळाकडे आहे जे संकटकाळात अल्लाहच्या विशेष कृपेने त्यांच्याकरिता शंती व मुक्तिचे साधन बनले. बायबलमध्ये हजरत ईसा (येशू) यांचे जन्मस्थान बेथलहेम दर्शविले गेले आहे.

५०. हा आदेश प्रत्येक पैगंबरास दिला गेला होता म्हणून यास अशा शैलीत निवेदिले गेले आहे की जणू सर्व पैगंबर एकत्रित आहेत व त्यांना एकाच वेळी संबोधून हे मार्गदर्शन केले जात आहे ही अलंकारयुक्त शैली होय.

स्वच्छ शुद्ध वस्तू खाण्याच्या अर्थामध्ये दोन गोष्टी सामील आहेत. एक ही की त्याच वस्तू खाल्ल्या जाण्यात ज्या शरीयतीच्या दृष्टीने स्वच्छ शुद्ध आहेत. दुसरी ही की त्यांना उचित साधनांद्वारे प्राप्त केलेले असावे.

हा आदेश ज्याअर्थी पैगंबरांना दिला गेला आहे, तेव्हा त्यांच्या अनुयायींना आपोआप लागू पडतो की त्यांनीही पालन करणे आवश्यक आहे. हदीस वचनाता या आयतीचे उत्कृष्ट भाष्य वर्णिले गेले आहे.

اَيُّهَا النَّاسُ اِنَّ اللهَ طَيِّبٌ لَا يَقْبَلُ اِلَّا طَيِّباً وَ اَنَّ اللهَ اَمَرَ الْمُؤْمِنِينَ بِمَا اَمَرَ بِهِ الْمُرسلين فقَالَ يَا اَيُّهَا الرُّسُلُ كُلُوْا مِنَ الطَّيِّبَات واعْمَلُوْا صَالِحاً اِنِّى بِمَا تَعْمَلونَ عَلِيْمٌ وقال يَا اَيُّهَا الَّذِيْنَ آمَنُوْا كلوا مِنْ طَيِّبَاتِ مَا رَزَقْنَاكُمْ ثُمَّ ذَكَرَ الرجُل يطيل السَّفَرَ اشعث اَغْبَرَ يَمُدّيَدَيْهِ الى السَّمَاءِ يا ربِّ يا ربِّ ومطعمهٗ حرام و مشربه حرامٌ وَعَلْبَسُهٗ حَرَامٌ وَ غذِّىَ بالحرام فَانّٰى يُسْتَجَابُ لِذَٰلِكَ۔ (مسلم كتاب الزكاة)

''हजरत अबु हुरैरा यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, 'अल्लाह पवित्र आहे व स्वच्छ शुद्ध वस्तूनांच कबूल करतो. त्याने ईमान बाळगणाऱ्यांना त्या गोष्टीचा आदेश दिला आहे, ज्याचा आदेश त्याने पैगंबरांना दिला आहे. त्याचे फर्मान आहे की,

يَا اَيُّهَا الرُّسُلُ كُلوا مِنَ الطَيِّبَاتِ وَاعْمَلُوْا صالحاً اِنّى بِمَا تَعْمَلُوْنَ عليمٌ (المؤمنون:٥١)

'पैगंबरांनो! स्वच्छ शुद्ध वस्तू खा व सत्कर्म करा. तुम्ही जे काही करता ते मी जाणतो' तसेच फर्माविले की,

يَاَيُّهَا الَّذِيْنَ آمَنُوْا كُلُوْا مِنْ طَيِّبَاتِ مَا رَزَقْنَاكم۔ (بقره-٢١)

'हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! स्वच्छ-शुद्ध वस्तू खा ज्या आम्ही तुम्हाला दिल्या आहेत (सूरह बकरा-२१) कथन कर्ता म्हणतो, मग पैगंबरांनी अशा माणसाचा उल्लेख केला जो (हज्ज यात्रे करिता) दीर्घ प्रवास करतो. ज्याचे केस (प्रवासामुळे विस्कटलेले व धुळमिश्रित होत आहेत. तो आपले हात आकाशाकडे उंचावून दुआ करतो. 'हे माझ्या पालनकर्त्या! हे माझ्या पालनकर्त्या! अशा परिस्थितीत की त्याचे खाणे त्याचे पिणे व त्याचा पोशाख सर्व हरामाचे आहे व हरामाचे खाऊन त्याचे पोषण झाले आहे, मग त्याची दुआ कशा रीतीने कबूल होईल?' (मुस्लिम किताबुज्जकात)

आयतीद्वारे हा संकेतहि मिळतो की स्वच्छ शुद्ध वस्तू खाण्यात व सत्कर्म करण्यात खोल संबंध आहे. यास्तव चांगली उपजिविका चांगल्या आचरणास पोषक ठरते.

५१. स्पष्टीकरणासाठी पहा- सूरह आंबिया टीप-१३३.

५२. हीच गोष्ट सूरह अंबिया टीप क्र. ९२ मध्येही वर्णिली गेली आहे. परंतु त्या ठिकाणी فَاتَّقُوْنِ ''**फ़त्तक़ून**'' ''तर माझे भय बाळगा'च्या जागी فَاعبُدُوْنِ ''**फ़ाबुदून**'' ''तर माझी उपासना करा' असे फर्माविले गेले आहे. अर्थात हा या गोष्टीकडे संकेत आहे की अल्लाहचे भय व त्याची उपासना दोन्ही परस्परावलंबी आहेत. जो अल्लाहचे भय बाळगत असेल तो अपरिहार्यत: केवळ अल्लाहचीच उपासना करील. एकमेव अल्लाहची उपासनां न करणे म्हणजे त्याचे भय न बाळगणे होय.

५३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप- १३५

५४. म्हणजे प्रत्येक समूह आपापल्या धर्मास घेऊन बसला आहे व आपल्या धर्म-भक्तित असा मग्न आहे की शुद्धीवर यायला तयारच नाही. प्रत्येक पंथ आपल्या धर्माबाबत अशा अंधश्रद्धेस बळी पडतो की आपल्या भूमिकेवर पुनर्विचार करण्याची गरजच त्याला वाटत नाही. मोठमोठ्या विद्वानांची ही दशा आहे की जेव्हा धर्माची बाब येते तेव्हा त्यांची मती गुंग होते. याच कारणास्तव ते धार्मिक प्रथा म्हणून उघड वाह्यात कामे करण्यासही मागेपुढे पाहात नाही. त्यांचे जेवढे प्रेम आपल्या संप्रदायाशी आहे, तेवढे अल्लाहशी नाही, वस्तुत: धर्माच्या समग्र बाबी अल्लाहच्याच नावाने आहे.

५५. जे लोक आपल्या गफलतीतच आकंठ बुडून राहू इच्छितात व आवाहकाचे म्हणणे ऐकू इच्छित नाही त्यांना त्यांच्या दशेवरच सोडून देणे उचित होय. लवकरच त्यांना कळून येईल की जिला ते नाव समजून बसले होते ती कागदाची होती.

आणि जे देतात, जे काही देतात, अशा स्थितीत की त्यांची हृदये भयाने थर थर करीत असतात की त्यांना आपल्या पालन कर्त्याकडे परतावयाचे आहे. हे आहेत भलेपणात तन्मय राहणारे व पुढाकार घेऊन त्यांचे पालन करणारे. (अल-क़ुर्आन)

५५. काय हे असे समजतात की आम्ही जे यांना धन-संपत्ति व संतती देत आहोत.

أَيَحْسَبُونَ أَنَّمَا نُمِدُّهُم بِهِ مِن مَّالٍ وَبَنِينَ ﴿٥٥﴾

५६. तर काय यांच्यासाठी मांगल्यात वृद्धि कारक आहेत, नव्हे किंबहुना त्याना (मूळ हकीगतीचे) सामंजस्य नाही.[५६]

نُسَارِعُ لَهُمْ فِي الْخَيْرَاتِ ۚ بَل لَّا يَشْعُرُونَ ﴿٥٦﴾

५७. जे लोक आपल्या पालन कर्त्याच्या भयाने कंपित असतात.

إِنَّ الَّذِينَ هُم مِّنْ خَشْيَةِ رَبِّهِم مُّشْفِقُونَ ﴿٥٧﴾

५८. जे लोक आपल्या पालन कर्त्याच्या आयतींवर ईमान राखतात.

وَالَّذِينَ هُم بِآيَاتِ رَبِّهِمْ يُؤْمِنُونَ ﴿٥٨﴾

५९. जे लोक आपल्या पालन कर्त्याचा सहभागी ठरवित नाही.

وَالَّذِينَ هُم بِرَبِّهِمْ لَا يُشْرِكُونَ ﴿٥٩﴾

६०. आणि जे देतात, जे काही देतात, अशा स्थितीत की त्यांची हृदये भयाने थर थर करीत असतात की त्यांना आपल्या पालन कर्त्याकडे परतावयाचे आहे.

وَالَّذِينَ يُؤْتُونَ مَا آتَوا وَّقُلُوبُهُمْ وَجِلَةٌ أَنَّهُمْ
إِلَىٰ رَبِّهِمْ رَاجِعُونَ ﴿٦٠﴾

६१. हे आहेत भलेपणात तन्मय राहणारे व पुढाकार घेऊन त्यांचे पालन करणारे.

أُولَٰئِكَ يُسَارِعُونَ فِي الْخَيْرَاتِ وَهُمْ لَهَا سَابِقُونَ ﴿٦١﴾

६२. आम्ही कोणत्याही माणसावर त्याच्या सामर्थ्यापेक्षा जास्त ओझे टाकत नाही.[६०] आणि आमच्या जवळ एक ग्रंथ आहे, जो (प्रत्येकाचा अहवाल) यथातोग्य दर्शवितो [६१] आणि त्यांच्यावर अन्याय केला जाणार नाही.

وَلَا نُكَلِّفُ نَفْسًا إِلَّا وُسْعَهَا ۖ وَلَدَيْنَا كِتَابٌ يَنطِقُ بِالْحَقِّ ۚ
وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ﴿٦٢﴾

६३. परंतु त्यांची हृदये या गोष्टीकडून गफलतीत पडली आहेत,व काही अन्य कामे आहेत, ज्यात ते मग्न आहे.[६२]

بَلْ قُلُوبُهُمْ فِي غَمْرَةٍ مِّنْ هَٰذَا وَلَهُمْ أَعْمَالٌ
مِّن دُونِ ذَٰلِكَ هُمْ لَهَا عَامِلُونَ ﴿٦٣﴾

५६.म्हणजे ते या भ्रमात पडले आहेत की जर आम्ही एखाद्या खोट्या धर्माचे अनुयायी असतो तर स्मपत्ति व संततीची जी विपुलता आम्हाला लाभली आहे, ती लाभली नसती वस्तुत: या गोष्टी एखाद्याला लाभणे त्याचे सत्यावर असण्याचे प्रमाणे नव्हे कारण या गोष्टीद्वारे कसोटी घेण्याचा हेतु असतो परंतु हे लोक याचा विपरीत अर्थ घेतात.

५७. हे आहे अल्लाहच्या भयाचे अपेक्षित स्तर की माणसाने ना केवळ त्याचे भय बाळगावे किंबहुना त्याच्या भयाची कैफीयत अशी व्हावी की त्याच्या दबदब्याने व प्रतापाने त्याने भयकंपित व्हावे आणि त्याच्या शिक्षेच्या केवळ कल्पनेनेच त्याचा थरकाप उडावा. ईमान बाळगणाऱ्याचा हा महत्त्वपूर्ण गुण होय आणि ही काही गुप्त गोष्ट नाही, किंबहुना एक जबरदस्त सामर्थ्य निर्माण करणारी गोष्ट आहे. असे सामर्थ्य की मग जगातले कोणतेहि सामर्थ्य त्यास झुकवू शकत नाही.

५८. म्णजे जो दानधर्म देखील ते करतात त्यावर आपण आपले कर्तव्य पार पाडले व जबाबदारीतून मोकळे झालो या अर्थाने संतुष्ट होत नाही, किंबहुना हे सर्व करीत असतांनाही ते आपल्या पालनकर्त्या समोर जाब द्यावा लागेल या कल्पनेनेच भयभीत राहतात की कदाचित हे कर्म अल्लाहच्या येथे प्रामाणिक सिध्द होईल किंवा नाही व आपल्या अपराधांबद्दल होणाऱ्या शिक्षेपासून बचाव होऊ शकेल किंवा नाही. त्याच्या मनाची ही स्थिति केवळ दानधर्माच्या बाबतीच असते असे नाही, तर सत्कर्मात गणना होणाऱ्या इतर कामांबाबतहि असते. यास्तव हदीस वचनात असा उल्लेख आहे की हजरत आयशा यांनी एकदा प्रशन केला की काय यास अभिप्रेत ते लोक होते जे मद्य पितात व चोरी करतात? यावर उत्तरादाखल पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले,

لَايَابنتَ الصِدِّيْقِ ولٰكِنَّهُمُ الَّذِيْنَ يَصُومُوْنَ ويُصَلوّنَ وَ يَتَصَدَّقُوْنَ
وَهُمْ يَخَافُوْنَ اَنْ لَاتَقْبَلَ مِنْهُمْ۔ (ترمذی۔کتاب التفسیر)

‘ नव्हे हे सिदेदीक-कन्या! यास अभिप्रेत ते लोक होत जे रोजे राखतात, नमाज पढतात आणि दानधर्म करतात अणि तरीहि भयभीत राहतात की असे न होवो की हे कबूल न केले जावे.’ तिर्मिजी- किताबुत्तफसीर)

आयतीत विशेषत्वाने दानधर्माच्या बाबतीत या मानासिक स्थितीचा उल्लेख केला गेला आहे कारण दानधर्म करणारा ढोंग, अवडंबर व दुराभिमान या अवगुणांना सहज बळी पडतो.

५९. अर्थात हे गुण बाळगणारे लोक केवळ सत्कर्म करण्यातच मग्न नसतात तर इतरांच्या तुलनेने दुतगतीने या कार्याचे पालन करण्याचा प्रयत्न करतात. तात्पर्य बाजी जिंकण्याचे खरे मैदान सत्कर्माचे आहे, भौतिक प्रगती व क्रीडानैपुण्य नव्हे.

६०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४८२

६१. ग्रंथाशी अभिप्रेत माणसाचा कर्म लेख होय व ‘तो बोलतो’ याचा अर्थ असा की ते बोलते रेकॉड असेल.

६२. त्यांना त्या गोष्टीत स्वारस्य नाही ज्या नैतिकदृष्ट्या कदर करण्यायोग्य, अल्लाहजवळ स्विकृत व अखिरतच्या यशाची हमी देणाऱ्या आहेत. किंबहुना त्यांना तर दुसऱ्याच कामामध्ये गोडी वाटते. ही झाली काफिरांची अवस्था. परंतु आजच्या काळात मुसलमानांची अवस्थाहि सर्वसाधारणपणे विचित्र आहे. किती तरी लोकांना मॅच पहाण्याचे वेड आहे, परंतु नमाज पढण्यात गोडी नाही, वस्तुत: त्यांना नमाज कायम करण्याचा आदेश दिलाी गेला आहे, मॅच पहात राहाण्याचा नव्हे. वाह्यात चित्रपट पाहण्यात ते पूर्ण रात्र घालवतात, येथपावेतो की ऐन तहज्जुदच्या वेळी जी दुआ व इबादत कबूल होण्याची वेळ असते, व्हिडीयो पाहण्यात मग्न राहतात. त्यांची मने दरग्यांमध्ये घुटमळत असतात. खरे तर ईमान बाळगणाऱ्याचे मन मसजिदित लागलेले असावे.धर्मात नव नवीन प्रथा व रिवाजांचा ते मोठ्या सन्मानाने इतमाम राखतील उदा. मोहर्रमचे सरबत, खिचडा, नियाज, ग्यारहवी, मौलूद आणि मिलादुन्नबीचा जुलूस इत्यादि. परंतु पैगंबरांची सुन्नत (आचरण-पद्धति) पासून दूर अति दूर राहतील. ते व्यर्थ खर्च करतील आणि दिखावटी कामांमध्ये आपली धनसंपदा लुटवतील. परंतु अल्लाहच्या दासांचे हक्क अदा करण्यापासून व अल्लाहच्या मार्गात खर्च करम्यापासून अंग चोरतील. जगभराची भाराभर पुस्तके आवडीने वाचतील परंतु अल्लाहच्या ग्रंथाचे अध्ययन करण्यासाठी त्यांच्याजवळ वेळच नसेल. आणि एवढे असूनहि ते समजतात की आखिरत चे यश त्यांच्या करिता आहे!

६४. (आणि हेच करत राहतील) येथपावेतो की जेव्हा आम्ही यांच्यातल्या सुखवस्तु लोकांना शिक्षा-ग्रस्त करू तर हे किंचाळू लागतील.[६३]

حَتّٰىٓ اِذَآ اَخَذْنَا مُتْرَفِيْهِمْ بِالْعَذَابِ اِذَا هُمْ يَجْـَٔرُوْنَ ﴿٦٤﴾

६५. आता गयावया करू नका, आमच्याकडून तुम्हाला कसलीहि मदत मिळणार नाही.

لَا تَجْـَٔرُوا الْيَوْمَ اِنَّكُمْ مِّنَّا لَا تُنْصَرُوْنَ ﴿٦٥﴾

६६. ज्या वेळेस माझ्या आयती (वचने) तुम्हाला ऐकविली जात होती तेव्हा तुम्ही उलट पावली पळ काढत होते.

قَدْ كَانَتْ اٰيٰتِيْ تُتْلٰى عَلَيْكُمْ فَكُنْتُمْ عَلٰٓى اَعْقَابِكُمْ تَنْكِصُوْنَ ﴿٦٦﴾

६७. घमेंड करीत यास कथा-कथनासाठी मनोरंजन बनवून वाष्फळ बडबड करीत.[६४]

مُسْتَكْبِرِيْنَ ۖ بِهٖ سٰمِرًا تَهْجُرُوْنَ ﴿٦٧﴾

६८. काय यांनी या वाणीवर विचार चिंतन केले नाही? [६५] किंवा त्यांच्या जवळ एखादी गोष्ट आली आहे जी त्यांच्या पूर्वीच्या वाड-वडिलांजवळ आली नव्हती ?[६६]

اَفَلَمْ يَدَّبَّرُوا الْقَوْلَ اَمْ جَاۗءَهُمْ مَّا لَمْ يَاْتِ اٰبَاۗءَهُمُ الْاَوَّلِيْنَ ﴿٦٨﴾

६९. किंवा ते आपल्या पैगंबरास ओळखू शकले नाहीत, म्हणून त्याचा इन्कार करणारे झालेत ![६७]

اَمْ لَمْ يَعْرِفُوْا رَسُوْلَهُمْ فَهُمْ لَهٗ مُنْكِرُوْنَ ﴿٦٩﴾

७०. किंवा हे म्हणतात की याला वेड लागले आहे, [६८] नव्हे, किंबहुना तो यांच्याजवळ सत्य घेऊन आला आहे आणि यांचा पैकी अधिकांश लोकांना सत्यच अप्रिय आहे.[६९]

اَمْ يَقُوْلُوْنَ بِهٖ جِنَّةٌ ۭ بَلْ جَاۗءَهُمْ بِالْحَقِّ وَاَكْثَرُهُمْ لِلْحَقِّ كٰرِهُوْنَ ﴿٧٠﴾

७१. आणि जर सत्य यांच्या इच्छा-आकांक्षांच्या मागे चालले असते तर आकाश व जमीन आणि जे काही यांच्यात आहे, सर्व (व्यवस्था) अस्ताव्यस्त झाली असती.[७०] वस्तुस्थिती अशी की आम्ही यांच्याजवळ यांना स्मरणिका घडविणारी गोष्ट आणली आहे आणि ते या स्मरणिकेपासून तोंड फिरविलेल्या स्थितीत आहे.[७१]

وَلَوِ اتَّبَعَ الْحَقُّ اَهْوَاۗءَهُمْ لَفَسَدَتِ السَّمٰوٰتُ وَالْاَرْضُ وَمَنْ فِيْهِنَّ ۭ بَلْ اَتَيْنٰهُمْ بِذِكْرِهِمْ فَهُمْ عَنْ ذِكْرِهِمْ مُّعْرِضُوْنَ ﴿٧١﴾

७२. काय तुम्ही यांच्याकडून धन संपदा मागत आहात? [७२] तुमच्या साठी तर तुमच्या पालन कर्त्याने दिलेली धन-संपदाच अधिक चांगली आहे आणि तो सर्वोत्कृष्ट दाता आहे.

اَمْ تَسْـَٔلُهُمْ خَرْجًا فَخَرَاجُ رَبِّكَ خَيْرٌ ڰ وَّهُوَ خَيْرُ الرّٰزِقِيْنَ ﴿٧٢﴾

६३. सुखवस्तु लोकांना शिक्षा-ग्रस्त करण्याचा अर्थ असा की काफिर जन समूहावर जी ईश-शिक्षा अवतरीत होईल त्यात सुस्थितीत असेलेले लोक 'लक्ष्य' बनतील, कारण समाजात उत्पात पसरविणारे हेच लोक होते . ते ऐक करीत राहील व आपल्या सम्पत्तिस सत्यमार्गापासून रोखण्यासाठी खर्च करीत राहीले (पहा सूरह बनी इस्राईल आयत १६ टीप क्र. २०)

६४. संकेत मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या या कृतीकडे की ते रात्री कथा-कथनाच्या बैठकी भरवून आत्माभिमानाने कुरआनास खोटे ठरवितात व त्याच्याविरुध्द बरीच गरळ ओकतात.

६५.जर त्यांनी या ग्रंथाच्या वाणी वर विचार चिंतन केले असते तर त्यांना ही वस्तुस्थिती कळली असती ही अल्लाहचीच वाणी होय मग त्यांनी याची कदर केली असती. परंतु विचार चिंतन न करताच पक्षपाती धोरणाने यासंबंधी त्यांनी मत प्रस्थापित केले.

ही आयत देखील कुरआनावर विचार चिंतन करण्याचे आवाहन करते. आणि हे आवाहन इन्कार करणाऱ्यांना केले गेले आहे,

ज्यावरुन हे स्पष्ट होते की कुरआन सामान्य-असामान्य सर्वांच्याच समजण्याकरिता अवतरीत झाले आहे व कुरआन सर्वांनाच वैचारीक आवाहन करते. या स्तव हा विचार करणे योग्य नव्हे की हा ग्रंथ फक्त विद्वानांनीच समजून घ्यायचा आहे. आजच्या काळात भाषांतरांच्या मदतीने कुरआनास समजणे सहज सोपे झाले आहे. म्हणून याचा अभ्यास न करण्याचे काही एक कारण नाही. जे लोक 'कुरआनास समजणे हे प्रत्येकाच्या आवाक्यातील नाही' असे म्हणून सर्वसामान्य मुसलमानांना व मुस्लिमेत्तरांना कुरआनापासून दूर ठेवू इच्छितात, ते आपल्या अज्ञानाचा पुरावा देतात व लोकांनी कुरआनाशी रास्त संबंध जोडावा असे इच्छित नाही.

६६. अर्थात यांच्याकडे पैगंबराचे पाठविले जाणे, ही काही अशी घटना नव्हे जी इतिहासात प्रथमच उद्‌भवली असावी व यांच्या पूर्वीचे लोक यापासून अनभिज्ञ राहीले असावेत. हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल हेहि पैगंबरच होते जे यांचे (अरब लोकांचे) पूर्वज होत व अल्लाहच्या संदेशाच्या मार्गदर्शनानेच त्यांनी काबागृहाची उभारणी केली होती, व हजचे धार्मिक विधी निश्चित केले होते. तेव्हा 'वह्य' व प्रेषित्व यांना नवलाच्या गोष्ट समजण्याचे काय कारण?

६७. अर्थात अशीही गोष्ट नव्हे की यांना आपला पैगंबर ओळखण्यात त्रास होत असावा कारण पैगंबराच्या व्यक्तिमत्वाचा यांना चांगलाच अनुभव आलेला आहे व त्याचे सत्पत्व त्यांना चांगल्या प्रकारे कळून चुकले आहे. तसेच त्याच्या व्यक्तिमत्वात प्रेषित्व-चिन्हे अशा प्रकारे प्रकट आहेत की कसल्याही शंका संशयाला वाव रहात नाही.

६८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ८

६९. त्यांच्या नकाराचे खरे कारण हे की सत्य त्यांना पसंत नाही कारण ते त्यांच्या इच्छा आकांक्षेस अनुकूल नाही.

७०. सृष्टी-व्यवस्था सत्य- आधारावर चालत आहे. जर ती लोकांच्या इच्छेनुसार चालू लागली तर क्षत-विक्षत होईल. कारण लोकांच्या इच्छा-अभिलाषा चुकीच्याहि असतात व परस्परविरुध्द देखील आणि न्यायाविरुध्दहि. या जगात आम्ही हेहि पाहतो की एखादा मनुष्य किंवा एखादा गट जो सत्तेवर येतो,यशस्वीपणे शासन चालवणे त्यास जमत नाही कारण विविध इच्छा आकांक्षा व परस्पराविरुध्द मते, सत्य आणि न्यायाची जागा घेतात. परिणामी समाज व शासनव्यवस्थेत बिघाड निर्माण होतो म्हणून माणसाने वास्तव-प्रिय बनले पाहिजे. अर्थात वास्तव-प्रियतेची निकड अशी की आपल्या इच्छा आकाक्षांना सत्याच्या हवाली करावे. याउलट ही अपेक्षा बाळगू नये की सत्यानेच त्याच्या इच्छेशी अनुकूल असावे. अनेकेश्वरवादी सत्याला शिर्कच्या स्वरूपात पाहू इच्छितात, जेव्हा शिर्क खोट्या इच्छा अभिलाषांखेरीज आणखी काहीच नाही आणि तौहीद (एकेश्वरवाद) अगदी सत्य व सृष्टीची सर्वात मोठी वस्तुस्थिती आहे.

७१. अर्थात कुरआन यांच्याकरिता नखशिखान्त स्मरणिका व बोध आहे जी त्यांच्याच भल्याकरिता आहे. परंतु जी गोष्ट त्यांच्या भल्यासाठी, हितासाठी अवतरली आहे तिच्याकडेच ते पाठ फिरवित आहेत.

७२. म्हणजे (हे पैगंबर!) तुम्ही यांच्याकडून धन तर मागत नाही की ज्यामुळे त्यांनी ही शंका घ्यावी की हा मनुष्य ज्योतिषा प्रमाणे धन एकत्रित करण्यासाठी सर्व काही करीत आहे.

७३. आणि नि:संशय तुम्ही यांना सरळ मार्गाकडे बोलावित आहात.

وَإِنَّكَ لَتَدْعُوهُمْ إِلَىٰ صِرَاطٍ مُّسْتَقِيمٍ ﴿٧٣﴾

७४. आणि जे आखिरत वर ईमान बाळगत नाही ते सन्मार्गापासून विचलीत झालेले आहोत.[७३]

وَإِنَّ الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِالْآخِرَةِ عَنِ الصِّرَاطِ لَنَاكِبُونَ ﴿٧٤﴾

७५. आणि जर आम्ही यांच्यावर दया केली व त्यांचा त्रास दूर केला तर हे आपल्या विदोहात धीट होऊन भटकत राहतील. [७४]

وَلَوْ رَحِمْنَاهُمْ وَكَشَفْنَا مَا بِهِم مِّن ضُرٍّ لَّلَجُّوا فِي طُغْيَانِهِمْ
يَعْمَهُونَ ﴿٧٥﴾

७६. आम्ही यांना शिक्षा-ग्रस्त केले, परंतु ना ते आपल्या पालनकर्त्या समोर झुकले व ना त्यांनी गयावया केली.

وَلَقَدْ أَخَذْنَاهُم بِالْعَذَابِ فَمَا اسْتَكَانُوا لِرَبِّهِمْ
وَمَا يَتَضَرَّعُونَ ﴿٧٦﴾

७७. येथपावेतो की जेव्हा आम्ही कठोर शिक्षेचे द्वार यांना खुले करु तेव्हा या (अवस्थे)त ते अगदी निराश होऊन बसतील.[७६]

حَتَّىٰ إِذَا فَتَحْنَا عَلَيْهِم بَابًا ذَا عَذَابٍ شَدِيدٍ
إِذَا هُمْ فِيهِ مُبْلِسُونَ ﴿٧٧﴾

७८. तोच होय ज्याने तुमच्यासाठी कान, डोळे व हृदय बनविले परंतु तुम्ही थोडीच कृतज्ञता व्यक्त करता. [७७]

وَهُوَ الَّذِي أَنشَأَ لَكُمُ السَّمْعَ وَالْأَبْصَارَ
وَالْأَفْئِدَةَ قَلِيلًا مَّا تَشْكُرُونَ ﴿٧٨﴾

७९. आणि तोच होय ज्याने तुम्हाला जमीनीत पसरविले आणि त्याच्याचकडे तुम्ही एकत्रित केले जाल.

وَهُوَ الَّذِي ذَرَأَكُمْ فِي الْأَرْضِ وَإِلَيْهِ تُحْشَرُونَ ﴿٧٩﴾

८०. आणि तोच होय जो जिवित राखतो व मरण देतो. रात्र आणि दिवसाचा फेरबदल त्याच्याच अधिकारात आहे,मग काय तुम्ही बुध्दिचा वापर करीत नाही ? [७८]

وَهُوَ الَّذِي يُحْيِي وَيُمِيتُ
وَلَهُ اخْتِلَافُ اللَّيْلِ وَالنَّهَارِ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿٨٠﴾

८१. परंतु त्यांनीहि तेच म्हटले जे पूर्वीच्या लोकांनी म्हटलेले आहे.

بَلْ قَالُوا مِثْلَ مَا قَالَ الْأَوَّلُونَ ﴿٨١﴾

८२. म्हणतात, काय जेव्हा आम्ही मरण पावू व माती आणि हाडे होऊन जाऊ तर आम्हाला पुन्हा उठविले जाईल ?

قَالُوا أَإِذَا مِتْنَا وَكُنَّا تُرَابًا وَعِظَامًا أَإِنَّا لَمَبْعُوثُونَ ﴿٨٢﴾

७३. जो मनुष्य आखिरतवर विशवास ठेवत नाही तो मार्गभ्रष्ट आहे.सन्मार्ग प्राप्तीसाठी आखिरतवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. अर्थात अखिरतवर ईमान बाळगण्याच्या अर्थामध्ये कियामतीच्या दिवशी उठविले जाणे, अल्लाह समोर हजर होणे, व आचरणानुसार शिक्षा व मोबदला या सर्व गोष्टींवर ईमान राखणे सामील आहे.

७४. म्हणजे यांची कष्ट यातना आम्ही जर दूर केली तर आामच्याशी कृतज्ञ होण्याऐवजी ते आपल्या बंडखोरीत अधिक पुढे जात राहतील.

यात संकेत या गोष्टीकडे आहे की त्या वेळी मक्केच्या काफिरांना एखाद्या अडचणीत टाकले गेले होते. कथनावरून असे दिसून येते की हा त्रास भूकमरीचा होता.

७५. अभिप्रेत ते संकट व तो त्रास होय ज्यात एखाद्या पैगंबराच्या आगमनानंतर त्याच्या काफीर जन समूहाला संकट-ग्रस्त केले जाते. यासाठी की त्याने शुद्धीवर यावे. पवित्र कुरआनांत अल्लाहच्या हा नियम अनेक ठिकाणी निवेदिला गेला आहे. उदाहरणार्थ:-

وَمَا اَرْسَلْنَا فِیْ قَرْیَةٍ مِّنْ نَّبِیٍّ اِلَّا اَخَذْنَآ اَهْلَهَا بِالْبَاْسَآءِ
وَالضَّرَّآءِ لَعَلَّهُمْ يَضَّرَّعُوْنَ۔ (سورہ اعراف۔ ۹۴)

‘आणि आम्ही ज्या वस्तीतहि पैगंबर पाठविला, त्यातल्या रहिवाश्यांना तंगी व त्रासात टाकले यासाठी की त्यांनी नम्रभावे गयावया करावी.’ (अअराफ-९४)

अन्य एका ठिकाणी ही ताकीदहि केली गेली की यांना मोठ्या शिक्षेपूर्वी इहलौकीक शिक्षेत ग्रस्त केले जाईल, यासाठी की त्यांनी अल्लाहकडे रुजू व्हावे. सूरह **سجدہ** सजदा ची आयत

وَلَنُذِيْقَنَّهُمْ مِّنَ الْعَذَابِ الْاَدْنٰى دُوْنَ الْعَذَابِ الْاَكْبَرِ
لَعَلَّهُمْ يَرْجِعُوْنَ۔ (سجدہ : ۲۱)

‘‘आम्ही यांना मोठ्या शिक्षेच्या पूर्वी लहान शिक्षेची गोडी चाखवू. यासाठी की त्यांनी रुजू करावे.’’ (अस् सजदा-२१)

मक्केचे काफीर देखील अल्लाहच्या या नियमाला बळी पडले होते. कथनांवरुन असे दिसून येते की त्यांना दुष्काळ व अत्याधिक उपासमारीच्या त्रासातून जावे लागले.

७६. म्हणजे लहान शिक्षा तर यांनी शुद्धीवर येण्याकरिता आहे. परंतु जर यांनी यापासून कसलाही बोध घेतला नाही तर ते पुन्हा विनाशकारी शिक्षेच्या तावडीत सापडतील जी त्यांच्यासाठी निरंतर वंचितता व नैराश्यास कारणीभूत ठरेल.

७७. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नहल टीप क्र. ११५

७८. म्हणजे जर तुम्ही आपल्या बुद्धिचा उचित वापर कराल तर तौहीद व अखिरत व ईमान बाळगाल, ज्याचे आवाहन कुरआन करीत आहे.

८३. हा वायदा आमच्याशी केला जात आहे आणि यापूर्वी आमच्या वाड- वडीलांशीहि केला गेला होता [७९] या केवळ पूर्वींच्या लोकांच्या कथा-कहाण्या होत.

لَقَدْ وُعِدْنَا نَحْنُ وَآبَاؤُنَا هَٰذَا مِن قَبْلُ إِنْ هَٰذَا
إِلَّا أَسَاطِيرُ الْأَوَّلِينَ ﴿٨٣﴾

८४. यांना विचारा जर तुम्ही जाणत असाल तर सांगा, जमीन व तिच्यात वास्तव्य करणारे कोणाच्या मालकीचे आहेत ?

قُل لِّمَنِ الْأَرْضُ وَمَن فِيهَا إِن كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿٨٤﴾

८५. ते म्हणतीत, अल्लाहच्या. सांगा, मग काय तुम्ही बोध प्राप्त करीत नाही?

سَيَقُولُونَ لِلَّهِ ۚ قُلْ أَفَلَا تَذَكَّرُونَ ﴿٨٥﴾

८६. त्यांना विचारा सात आकाश व अर्शे-अजीम (महान सिंहासना) चा स्वामी कोण आहे?

قُلْ مَن رَّبُّ السَّمَاوَاتِ السَّبْعِ وَرَبُّ الْعَرْشِ الْعَظِيمِ ﴿٨٦﴾

८७. ते म्हणतील अल्लाह. [८०] सांगा, मग तुम्ही (त्याचे) भय नाही बाळगत?

سَيَقُولُونَ لِلَّهِ ۚ قُلْ أَفَلَا تَتَّقُونَ ﴿٨٧﴾

८८. यांना विचारा, जर तुम्ही जाणत असाल तर सांगा असा कोण आहे की ज्याच्या हाती प्रत्येक गोष्टीचा अधिकार आहे आणि जो आश्रय देऊ शकत नाही.

قُلْ مَن بِيَدِهِ مَلَكُوتُ كُلِّ شَيْءٍ وَهُوَ يُجِيرُ وَلَا يُجَارُ
عَلَيْهِ إِن كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿٨٨﴾

८९. ते म्हणतील, या गोष्टी अल्लाहकरिताच आहेत. सांगा, मग तुमची बुध्दि कशी भ्रष्ट होते !

سَيَقُولُونَ لِلَّهِ ۚ قُلْ فَأَنَّىٰ تُسْحَرُونَ ﴿٨٩﴾

९०. वस्तुस्थिती अशी की आम्ही यांच्या समोर सत्य आणले आहे आणि हे अगदी खोटारडे आहेत. [८१]

بَلْ أَتَيْنَاهُم بِالْحَقِّ وَإِنَّهُمْ لَكَاذِبُونَ ﴿٩٠﴾

९१. अल्लाहने कोणालाहि आपला पुत्र बनविले नाही. [८२] आणि ना त्याच्या सोबतीला अन्य एखादा ईश्वर आहे. असे असते तर-प्रत्येक ईश्वर आपल्या निर्मितीस घेऊन विभक्त झाला असता व ते एकमेकांवर वरचढ झाले असते. [८३] पवित्र आहे अल्लाह त्या गोष्टींपासून ज्या हे निवेदन करीत आहेत.

مَا اتَّخَذَ اللَّهُ مِن وَلَدٍ وَمَا كَانَ مَعَهُ مِنْ إِلَٰهٍ ۚ إِذًا لَّذَهَبَ
كُلُّ إِلَٰهٍ بِمَا خَلَقَ وَلَعَلَا بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ ۚ سُبْحَانَ اللَّهِ
عَمَّا يَصِفُونَ ﴿٩١﴾

७९. यात ही स्विकृति आहे की दुसऱ्यांदा उठविले जाण्याची गोष्ट अशी नव्हे जी आम्हाला परिचित नसावी व आता पहिल्यांदाच आमच्या समोर येत असावी, किंबहुना आम्हाला हे माहित आहे की ही गोष्ट पूर्वीपासूनच चालत आली आहे वहा वायदा आमच्या पूर्वजांशीहि केला गेला होता. उघड आहे, हा वायदा हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल द्वारे वंशानुवंश स्थानांतरीत होत राहीला.

८०. मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांच्या या उत्तरराने हे स्पष्ट होते की सप्त आकाश व ईश-सिंहासनास ते केवळ मानणारे नव्हे, तर यांचा स्वामी अल्लाह आहे हे देखील मानणारे होते अर्थात हा हजरत इब्राहीम व हजरत ईस्माईल यांच्याच शिकवणीचा प्रभाव असावा. ही मूलभूत वस्तुस्थिती मान्य करुनहि ते शिर्क (द्वैतवादा)स मानणारे होते. त्यांच्या श्रद्धेतील ही उघड परस्पर मिन्नता होती पण यावर ते विचार चिंतन करण्यास तयार नव्हते आणि सर्वसाधारणपणे हेच होते की धर्मसंदर्भात मनुष्य विभिन्न गोष्टीना मानणारा बनतो. वस्तुत: विवेकबुद्धि परस्परभिन्न गोष्टीना कबूल करण्यास नकार दर्शविते.

८१. अर्थात या वास्तव गोष्टी ज्यांचा हे इन्कार करू शकत नाहीत एकेश्वरवादाचे स्पष्ट प्रमाण होय. तसेच माणसाचे दुसऱ्यांदा उठविले जाण्यासाठी प्रमाण स्पष्ट झाले की कुरआनाचे आवाहन अगदी सत्य आहे आणि याचा इन्कार करणारे अगदी धोटारडे आहेत.

८२. याने अनेकेश्वरवाद्यांच्या याविचाराचे खंडन होते की फरिशते ईशवराच्या कन्या होत. एइशवराने जेव्हा कोणालाहि आपला पुत्र बनविले नाही तर कन्या बनविण्याचा प्रश्नच कोठे उद्भवतो! तसेच या दविारे ख्रिश्चनांच्या या श्रद्धेचेहि खंडन होते की येशू अल्लाहचा पुत्र आहे.

८३. स्पष्टीकणासाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र.५७

عٰلِمِ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ فَتَعٰلٰى عَمَّا يُشْرِكُوْنَ ﴿٩٢﴾

९२. अपरोक्ष आणि विधमान जाणणारा. उच्चतम आहे तो यांच्या अनेकेश्वरवादी गोष्टीपेक्षा.

قُلْ رَّبِّ اِمَّا تُرِيَنِّيْ مَا يُوْعَدُوْنَ ﴿٩٣﴾

९३. प्रार्थना करा, हे माझ्या पालन कर्त्या! जर तू मला अजाब (अल्लाहची शिक्षा) दाखवशील, ज्याचा त्यांच्याशी वायदा केला जात आहे.

رَبِّ فَلَا تَجْعَلْنِيْ فِي الْقَوْمِ الظّٰلِمِيْنَ ﴿٩٤﴾

९४. तर हे माझ्या पालन कर्त्या! मला या अत्याचारी समूहात सामील करु नकोस.[८४]

وَاِنَّا عَلٰٓى اَنْ نُّرِيَكَ مَا نَعِدُهُمْ لَقٰدِرُوْنَ ﴿٩٥﴾

९५. आणि निःसंशय आम्ही या गोष्टीस समर्थ आहोत की, ज्या शिक्षेचा यांच्याशी वायदा केला जात आहे, ती तुम्हास दाखवून द्यावी.

اِدْفَعْ بِالَّتِيْ هِيَ اَحْسَنُ السَّيِّئَةَ ؕ نَحْنُ
اَعْلَمُ بِمَا يَصِفُوْنَ ﴿٩٦﴾

९६. वाईट गोष्टीस अशा रीतीने दूर करा, जी अधिक चांगली असावी. ते ज्या गोष्टी रचतात, त्या आम्ही चांगल्या प्रकारे जाणतो.[८५]

وَقُلْ رَّبِّ اَعُوْذُ بِكَ مِنْ هَمَزٰتِ الشَّيٰطِيْنِ ﴿٩٧﴾

९७. आणि प्रार्थना करा, हे पालन कर्त्या! मी सैतानांनी मनात टाकलेल्या कुविचारांपासून तुझे शरण मागतो.[८६]

وَاَعُوْذُ بِكَ رَبِّ اَنْ يَّحْضُرُوْنِ ﴿٩٨﴾

९८. आणि हे माझ्या पालन कर्त्या! या गोष्टी पासूनहि मी शरण मागतो की त्यांनी माझ्याजवळ यावे.[८७]

حَتّٰٓى اِذَا جَآءَ اَحَدَهُمُ الْمَوْتُ قَالَ رَبِّ ارْجِعُوْنِ ﴿٩٩﴾

९९. (त्यांची हीच दशा राहील) येथपावेतो की जेव्हा एखाद्याचे मरण येऊन ठेपेल तेव्हा तो म्हणेल, हे माझ्या पालन कर्त्या, मला परत पाठव.

لَعَلِّيْٓ اَعْمَلُ صَالِحًا فِيْمَا تَرَكْتُ كَلَّا ؕ اِنَّهَا كَلِمَةٌ هُوَ قَآئِلُهَا ؕ
وَمِنْ وَّرَآئِهِمْ بَرْزَخٌ اِلٰى يَوْمِ يُبْعَثُوْنَ ﴿١٠٠﴾

१००. अशासाठी की जे काही मी सोडले आहे त्यात सत्कर्म करावे. कदापि नव्हे. ही तर केवळ एक गोष्ट आहे जी हा बोलत आहे. [८८] आणि यांच्या पुढे एक बर्जख (पडदा) असेल [८९] त्या दिवसा पावेतो, जेव्हा त्यांना उठविले जाईल.

८४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही दुआ अशासाठी शिकवली गेली की त्यांनी अल्लाहच्या शिक्षेपासून भयभीत राहावे कारण दास्यत्वाची हीच महानता होय.

८५. अर्थात हे लोक तुमची जी थट्टा उडवित आहे त्याचा मनावर परिणा करून घेऊ नका. त्यांच्या उपद्रवाला कमकुवत करण्याचा चांगल्यात चांगला मार्ग अंगिकारा. उघड आहे हा मार्ग सुधारणेचा व विधायक ही असू शकतो.

८६. हा संकेत या गोष्टीकडे आहे की सत्य-विरोधाचे हे जे वादळ उठले आहे ते सैतानाच्या उपद्रव कारितेच्या परिणाम म्हणून आहे. तो ,त्याचा शत्रू आहे व माणसाचाहि वैरी, म्हणून माणसाला नेहमी सत्या विरुध्द प्रेरित करतो आणि जे लोक याच्या प्रभावाला बळी पडतात ते (His Master's Voice) बनतात. म्हणजे आपल्या या स्वामीची भाषा बोलू लागतात त्यांचे ते आक्षेप जे कुरआन, पैगंबर व दुसऱ्यांदा जीवनाविषयी उल्लिखित आहे सैतानाच्याच इशाऱ्याने केले गेले आहेत, जेव्हा अल्लाहच्या संदेशाने माणसाला या गोष्टीबद्दल खबरदार केले आहे की सैतान त्याचा अनादिअनंत शत्रू आहे. म्हणून जो मनुष्य सैतानाच्या उपद्रवापासून सुरक्षित राहू इच्छितो त्याने त्याच्या पासून अतिशय सावध राहिले पाहिजे. तसेच त्याच्या उपद्रवापासून अल्लाहचे शरण मागितले पाहिजे.

८७. ही या गोष्टीची प्रार्थना आहे की सैतान माझ्या जवळपास देखील फिरकू नयेत. सैतानांशी अत्याधिक घृणा हीच त्यांच्या उपद्रव व त्यांनी प्रेरित केलेल्या कुविचारांपासून सुरक्षित राहण्यास कारक ठरते.

رَبِّ اَعُوْذُبِکَ مِنْ هَمَزَاتِ الشَّیَاطِیْنِ وَ اَعُوْذُبِکَ
رَبِّ اَنْ یَّحْضُرُوْنَ۔

''हे माझ्या पालन कर्त्या मी सौतानाद्वारे मनात निर्माण होणाऱ्या कुविचारांपासून तुझे शरण मागतो आणि हे माझ्या पालनकर्त्या मी या गोष्टीपासूनहि तुझे शरण मागतो की त्यांनी माझ्याजवळ यावे.''

जर एखादा ईमान बाळगणारा पूर्ण सुज्ञतेचे वचन अदा करतो तेव्हा जणू तो स्वत:ला अल्लाहच्या संरक्षणात देतो. आणि जो मनुष्य स्वत:ला अल्लाहच्या संरक्षणात सोपविल तर अल्लाहने त्याला आपल्या संरक्षणात न घेण्याचे काही एक कारण नाही.

या मार्गदर्शना पासून ते लोक काहीच लाभ घेऊ शकत नाही जे सैतानाच्या अस्तित्वालाच मानत नाही. या भौतिकवाद्यांवर सैतानाने अशी काही जादू केली आहे की त्याचे स्वत:चे अस्तित्व हेच सर्व काही आहे. आता सैतानाचे वेगळे अस्तित्व मानण्याची त्यांना गरजच काय!

८८. म्हणजे ही केवळ बोलण्यापुरती गोष्ट आहे अन्यथा जर याला जगात परत पाठविले गेले तर तिथे तो पुन्हा तीच कामे करील जी आधी करीत राहीला. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ४८.

८९. बर्जखचा अर्थ रोकथाम व आड असा आहे मेल्यानंतर आत्मा ज्या ठिकाणी स्थानांतरित होतो ते इहलोक व अखिरत यांच्या दरम्यानचे विश्व होय. जे एक आड पडदा म्हणून आहे. म्हणून यास बर्जख म्हणतात. आणि हदीस वचनात त्या स्थितींना ज्या मृत्युनंतर आत्म्यावर ओढवतात कब्रची स्थिती या अर्थाने घेतले गेले आहे जो माणसाच्या मानासिकतेच्या दृष्टीने एक परीणामकारक अर्थ आहे अन्यथा याचा हा अर्थ नव्हे की जो कबरीत दफन झाला त्यालाच त्या स्थितीतून जावे लागते व जे कबरीत दफनच होत नाही, किंबहुना ज्याचे प्रेत दहन झाले किंवा अन्य एखाद्या मार्गाने नष्ट केले गेले किंवा 'ममी' बनवून इहलोकात सुरक्षित ठेवले गेले तर त्यास या स्थितीतून जावे लागत नाही.

मेल्यानंतर माणसाला कियामती पावेतो बर्जख विश्वात रहावयाचे आहे. कियामतीच्या दिवशी त्याला सशरीरसह पुन्हा उठवून उभे केले जाईल व हे अखिरतचे विश्व असेल जिथे त्याला सदैव राहावयाचे आहे.

बर्जख विश्वात आत्म्याचे स्थानांतर हे या गोष्टीचे स्पष्ट खंडन आहे की मेल्यानंतर मनुष्य कोणत्या ना कोणत्या रुपात जगातच भ्रमण करीत राहतो अर्थात अवागमनाचा दृष्टीकोण जो एक निराधार, अनुचित व सदोष दृष्टीकोण आहे.

१०१. मग जेव्हा सूर फूंकला जाईल तेव्हा त्या दिवशी त्यांच्या दरम्यान ना नातेसंबंध राहतील आणि ना ते एकमेकाना विचारतील.[१०]

فَإِذَا نُفِخَ فِي الصُّورِ فَلَا أَنسَابَ بَيْنَهُمْ يَوْمَئِذٍ وَلَا يَتَسَاءَلُونَ ١٠١

१०२. त्या वेळी ज्यांचे तराजू (पारडे) भारदस्त असतील तेच यशस्वी होतील. [११]

فَمَن ثَقُلَتْ مَوَازِينُهُ فَأُولَٰئِكَ هُمُ الْمُفْلِحُونَ ١٠٢

१०३. आणि ज्यांचे तराजू (पारडे) हलकी असतील ते असेच लोक होत ज्यांनी स्वतःला तोट्यात टाकले, [१२] जहन्नम मध्ये सदैव राहणारे.

وَمَنْ خَفَّتْ مَوَازِينُهُ فَأُولَٰئِكَ الَّذِينَ خَسِرُوا أَنفُسَهُمْ فِي جَهَنَّمَ خَالِدُونَ ١٠٣

१०४. आग त्यांच्या चेहऱ्यांना होरपळून टाकील आणि त्यांची तोंडे विदुप झालेले असतील.[१३]

تَلْفَحُ وُجُوهَهُمُ النَّارُ وَهُمْ فِيهَا كَالِحُونَ ١٠٤

१०५. काय माझ्या आयती तुम्हाला ऐकविल्या जात नव्हत्या आणि तुम्ही त्यांना खोटे ठरवित नव्हता?

أَلَمْ تَكُنْ آيَاتِي تُتْلَىٰ عَلَيْكُمْ فَكُنتُم بِهَا تُكَذِّبُونَ ١٠٥

१०६. ते म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या! आमचे दुर्देव आम्हावर प्रभावी झाले आणि आम्ही मार्गभ्रष्ट लोक होतो.[१४]

قَالُوا رَبَّنَا غَلَبَتْ عَلَيْنَا شِقْوَتُنَا وَكُنَّا قَوْمًا ضَالِّينَ ١٠٦

१०७. हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हाला यातून बाहेर काढ, जर आम्ही पुन्हा असे केले तर अत्याचारी ठरु.

رَبَّنَا أَخْرِجْنَا مِنْهَا فَإِنْ عُدْنَا فَإِنَّا ظَالِمُونَ ١٠٧

१०८. फर्माविले जाईल.धिक्काारलेल्यांनो यातच पडून रहा व माझ्याशी बोलू नका.[१५]

قَالَ اخْسَئُوا فِيهَا وَلَا تُكَلِّمُونِ ١٠٨

१०९. आमच्या दासांपैकी एक समूह असा होता जो असे-म्हणत होता की हे आमच्या पालनकर्त्या, आम्ही ईमान बाळगले आहे आम्हाला क्षमा कर व आमच्यावर दया कर. व तू उत्कृष्ट दयावंत आहेस.[१६]

إِنَّهُ كَانَ فَرِيقٌ مِّنْ عِبَادِي يَقُولُونَ رَبَّنَا آمَنَّا فَاغْفِرْ لَنَا وَارْحَمْنَا وَأَنتَ خَيْرُ الرَّاحِمِينَ ١٠٩

९०. अर्थात हे की कियामतीच्या दिवशी नातेगोते काहीच कमी येणार नाही. ना बाप मुलाच्या कामी येईल ना मुलगा बापाच्या आणि ना कोणी कोणाची विचारपूस करणारा असेल की सहानुभूति व दु:खनिवारण करील आणि ना कोणी कोणाकडून मदत मागू शकेल. प्रत्येक माणसाला आपल्या मुक्तिचीच काळजी लागलेली असेल तसेच कोणालाहि ही संधी लाभणार नाही की तो इतरांसाठी काही करु शेल. तात्पर्य कियामतीच्या दिवशी गोत्र-वंशाचे सर्व नातेसंबंध व्यर्थ ठरतील.

मुक्तिचे साधन केवळ ईमान व सदाचरण हेच असेल जसे नंतरच्या आयतीवरुन स्पष्ट आहे.

९१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कारिआ टीप क्र. ६.

९२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कारिआ टीप क्र. ७

९३. केवढा दु:खदायक व किती अपमानजनक शिक्षा असेल! माणसाने कल्पाना जरी केली तर तो अल्लाहच्या शिक्षेपासून शरण मागू लागेल.

९४. म्हणजे जहन्नम मध्ये पोहचून हे काफिर आपल्या मार्गभ्रष्टतेचा स्विकार करतील व आपल्या नशीबाला दोष देतील.

९५. अर्थात तुमची काहीच सुनावणी होणार नाही. जी संधी कर्माची होती ती तुम्ही गमावली. आता मात्र आपल्या कृतकर्माची शिक्षा भोगणे तुम्हाला क्रमप्राप्तच आहे.

९६. ही मोठी व्यथा पूर्ण प्रार्थना आहे जी ईमान बाळगणाऱ्यांच्या मुखाने त्यावेळी निघाली जेव्हा काफिर त्यांना दु:ख यातना पहचवित होते. त्यांनी या थट्टा उडविणाऱ्यांना काहीच महटले नाही. किंबहुना आपल्या पालनकर्त्याकडेच दयेचे आर्जव केले.

११०. तर तुम्ही त्यांना थट्टेचा विषय बनविले होते, येथपावेतो की या उद्योगाने तुम्हाला माझ्या स्मरणापासूनहि गाफील करून टाकले आणि तुम्ही त्यांचे हसे करीत राहीलात.

فَاتَّخَذْتُمُوهُمْ سِخْرِيًّا حَتّٰىٓ اَنْسَوْكُمْ ذِكْرِيْ وَكُنْتُمْ مِّنْهُمْ تَضْحَكُوْنَ ﴿١١٠﴾

१११. ..... ......... ............... [९७] मोबदला मी असा दिला की तेच सफल झाले.

اِنِّيْ جَزَيْتُهُمُ الْيَوْمَ بِمَا صَبَرُوْٓا اَنَّهُمْ هُمُ الْفَآئِزُوْنَ ﴿١١١﴾

११२. मग तो विचारील, [९८] तुम्ही जमीनीवर किती वर्ष राहीलात ? [९९]

قٰلَ كَمْ لَبِثْتُمْ فِي الْاَرْضِ عَدَدَ سِنِيْنَ ﴿١١٢﴾

११३. ते म्हणतील, एक दिवस किंवा किंवा दिवसाचाहि काही भाग गणना करणाऱ्यांना विचारा.[१००]

قَالُوْا لَبِثْنَا يَوْمًا اَوْ بَعْضَ يَوْمٍ فَسْـَٔلِ الْعَآدِّيْنَ ﴿١١٣﴾

११४. फर्माविले, तुम्ही थोडाच वेळ थांबलात. तुम्ही ही गोष्ट जाणून घेतली असती तर ! [१०१]

قٰلَ اِنْ لَّبِثْتُمْ اِلَّا قَلِيْلًا لَّوْ اَنَّكُمْ كُنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿١١٤﴾

११५. काय तुम्ही हे गृहीत धरले आहे की आम्ही तुम्हाला उगाच निर्माण केले आहे व तुम्ही आमच्याकडे परतविले न जाल ? [१०२]

اَفَحَسِبْتُمْ اَنَّمَا خَلَقْنٰكُمْ عَبَثًا وَّاَنَّكُمْ اِلَيْنَا لَا تُرْجَعُوْنَ ﴿١١٥﴾

११६. तर (अशा गोष्टी पासून) अतिशय उच्च आहे अल्लाह, खराखुरा बादशहा. [१०३] त्याच्या खेरीज कोणीहि ईश्वर नाही. अर्शे-करीम (वैभवशाली सिंहासना)चा 'रब्ब' (स्वामी)![१०४]

فَتَعٰلَى اللّٰهُ الْمَلِكُ الْحَقُّ ۚ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۚ رَبُّ الْعَرْشِ الْكَرِيْمِ ﴿١١٦﴾

११७. आणि जो कोणी अल्लाहच्या सोबत अन्य एखाद्या ईश्वाला पुकारील, ज्यासाठी त्याच्याजवळ कसलेहि प्रमाण नाही तर त्याचा हिशेब त्याच्या पालनकर्त्याजवळ आहे. नि:संशय काफिर कधीहि सफलता प्राप्त करु शकत नाही.[१०५]

وَمَنْ يَّدْعُ مَعَ اللّٰهِ اِلٰهًا اٰخَرَ ۙ لَا بُرْهَانَ لَهٗ بِهٖ ۙ فَاِنَّمَا حِسَابُهٗ عِنْدَ رَبِّهٖ ؕ اِنَّهٗ لَا يُفْلِحُ الْكٰفِرُوْنَ ﴿١١٧﴾

११८. प्रार्थना करा, हे माझ्या पालनकर्त्या, क्षमा कर, दया कर आणि तू उत्कृष्ट दयावंत आहेस.[१०६]

وَقُلْ رَّبِّ اغْفِرْ وَارْحَمْ وَاَنْتَ خَيْرُ الرّٰحِمِيْنَ ﴿١١٨﴾ ع

९७. या ठिकाणी सहनशीलतेच्या अर्थामध्ये सत्यावर दृढता, कष्ट यातना सहन करणे व क्लेशदायक गोष्टींवर संयम पाळणे इ. गोष्टींचा अंतर्भाव आहे.

९८. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना विचारेल जसे उक्ति-संदर्भावरुन उघड आहे.

९९. म्हणजे जगात तुम्ही किती काळ घालवला.

१००. कियामतीच्या दिवशी ते ज्या जगात पाऊल ठेवतील तेथील परिस्थिती या जगाहून अगदी भिन्न असेल त्यावेळी त्यांना हे जाणवेल की जो काळ त्यांनी इहलोकात घालविला तो फारच थोडा काळ होता. जास्तीत जास्त एक दिवस किंबहुना याहून कमीच. त्याचे यथोचित अनुमान लावणे त्यांना कठीण जाईल म्हणून ते म्हणतील की याचे खरे उत्तर तेच देऊ शकतात जे संख्या व गणना चा ज्ञान बाळगतात.

१०१. म्हणजे जर जगातच तुम्ही ही गोष्ट जाणून घेतली असती की जगात जो जीवनावधी तुम्ही पार पाडाल तो अखिरतच्या तुलनेने फारच थोडा आहे. तर निशिचतच तुमचे विश्व बदलले असते व आपला अमूल्य वेळ वाया घालविला नसता.

१०२. कुरआनाचा हा प्रशन यावच्चंद्र दिवाकरौ त्या समस्त लोकांना आहे जे अखिरतला मानणारे नाहीत. त्यांनी हे सांगावे की आखिरत व शिक्षा आणि मोबदला भविष्यकालीन वस्तुस्थिती नाही तर एक नैतिक संवेदना बाळगणारी व जबाबदाऱ्या धारण केलेली निर्मिती निर्माण करण्याचे प्रयोजन काय? जर मनुष्य-निर्मितीचा काही उद्देश्यच नाही तर त्याची सर्व धावपळ व्यर्थ आहे. जर मेल्यानंतर मातीच व्हायचे आहे तर जीवन जगून लाभ कोणता? जगात मनुष्य वेगवेगळ्या दु:ख यातनांचा भार उचलतो जर संयम व सहनशीलतेचे कसलेहि फळ मिळणार नाही तर हाल अपेष्टांनी भरलेले जीवन जगून उपयोग काय? स्वत:च आपल्या जीवनाची समाप्ति त्याने का करू नये? आज जगातले मोठ मोठे विचारवंत आणि विद्वान जीवन समस्यांना चर्चेचा विषय ठरवून बसले आहेत परंतु जीवनाची जी सर्वाधिक मूलभूत समस्या आहे म्हणजे जीवनाचे खरे उद्दिष्ट जाणून घेणे तर याबाबत ते अगदी बेपर्वा आहेत आणि आपल्या बुद्धिचा व ज्ञानाचा वापर करीत नाही.

१०३. म्हणजे अल्लाह याहून अतिशय उच्चतम आहे की त्याने एखादे निरर्थक व निरुद्देश्य कार्य करावे ही कल्पना करणे की माणसा सारख्या उच्च व सर्व निर्मितीत श्रेष्ठ अशा निर्मितीस त्याने करण्यासारखे आहे.

अल्लाह तर खराखुरा बादशाह आहे मग तो आपल्या त्या निर्मितीस की जिच्यावर जबाबदारीचा भार टाकला गेला आहे. जाब देण्यासाठी आपल्या समोर का बोलविणार नाही?

१०४. म्हणजे त्याचे सिहासन मोठे वैभवशाली आहे आणि तो आपल्या संपूर्ण ईश्वरी वैभवानिशी सृष्टीवर शासन करीत आहे यास्तव त्याच्या शासनात अंधेरनागरी कदापि होऊ शकत नाही.

१०५. सूरहचा आरंभ या गोष्टीने झाला होता की ईमान बाळगणाऱ्यांनी यश संपादन केले व शेवट या गोष्टीवर होत आहे की काफिर कधीहि यश प्राप्त करु शकत नाही. याने या सूरहची मध्यवर्ति कल्पना आपोआप निश्चित होते.

१०६. शेवटी प्रार्थनामय वचनांचा उपदेश संकेत या गोष्टीकडे की ही

(رَبِّ اغْفِرْ وَارْحَمْ وَاَنْتَ خَيْرُ الرَّاحِمِيْنَ)

दुआ साफल्य आणि सद्भाग्याचे द्वार उघडणारी आहे.

# सूरह अन-नूर

# २४. सूरह अन-नूर

**नावः** आयत क्र. ३५ मध्ये निवेदिले गेले आहे की अल्लाह आकाशचा व जमीनीचा नूर (प्रकाश) आहे. तदनुषंगे या सूरहचे नाव 'अन्नूर' से आहे.

**अवतरण काळ :** मदनी आहे मजकूरांवरुन असे दिसून येते की हि. स. ६ मध्ये अवतरीत झाली असावी. सूरह अहजाब मध्ये, जी खंदकयुद्धा (शव्वाल हि. स. ५) नंतर अवतरली होती. घराबाहेर पडदा पाळण्या संदर्भात ईश-आदेश निवेदिले गेले होते व यात घरामध्ये अपरिचित व ज्याच्याशी लग्नसंबंध होऊ शकेल अशा माणसा समोर शुंगार व्यक्त करण्यास मनाई केली गेली आहे. हा क्रमश: दिला गेलेला आदेश आहे जो या गोष्टीस प्रमाणित करतो की हि सूरह अशा वेळी अवतरली जेव्हा या पूर्वी घराबाहेरच्या पडद्याचा आदेश आलेला होता म्हणजे सूरह अहजाबचे अवतरण झालेले होते.

या सूरहमध्ये ज्या मर्यादा (दंडविधान) निवेदिले गेले आहेत तेहिं अशाच प्रसंगी दिले जाऊ शकत होते जेव्हा लागू करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले होते. हे युद्ध खंदकयुद्धा पाठोपाठ झाले होते व ज्यानंतर यहुद्यांचे कृपाक्षत्र असलेले दांभिक मुसलमान कमकुवत झाले होते आणि भांबावून जाऊन असभ्य पातळीवर येऊन पोहचले होते अर्थात सुसभ्य व शीलवान स्त्रीयांवर आरोप ठेवणे इत्यादि.

**मध्यवर्ति कल्पनाः** शील पावित्र्य व लज्जा-संकोच यांच्या रक्षणासाठी ज्या गोष्टींचा इतमाम आवश्यक आहे त्यांची ताकीद, दुष्कर्म करणाऱ्यांविरुध्द व मिथ्यारोप लावून निर्लज्जता पसरविणाऱ्याविरुध्द कठोर शिक्षेच ऐलान व या वस्तुस्थितीची अभिव्यक्ति की ईमानामुळे मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) चे संपूर्ण जीवन तेजस्वी होते. पावित्र्याशीलता याची प्रकाशित किरणे होत तसेच या सूरहचे क्षेत्र केवळ नौतिक उपदेशाप्रतच मर्यादित नाही, किंबहुना या संदर्भात समाजावर त्याच्या जबाबदाऱ्यांनाहि स्पष्ट केले गेले आहे व इस्लामी शासनावर त्याच्या कर्तव्यांनाहि .

**आयत रचनाः** आयत क्र. १ मध्ये प्रस्तावना म्हणून या सूरहचीही महत्ता स्पष्ट केली गेली आहे की यात जे आदेश दिले जात आहेत त्यांची अमंलबजावणी आवश्यक आहे.

आयत क्र. २ ते १० मध्ये व्यभिचार व व्यभिचाराचा आरोप ठेवल्याबद्दलची शिक्षा निवेदिली गेली आहे.

आयत क्र. ११ ते २६ मध्ये कपटी व दांभिक मुसलमानांना तंबी, जे सुसभ्य ईमान बाळगणाऱ्या पुरुषांच्या व शीलवान ईमानधारक स्त्रीयांच्या शील-प्रतिष्ठेवर चिखलफेक करण्यासाठी खोट्या कहाण्या रचून समाजात पसरवितात आणि त्यांच्या उपद्रवास दुबळे व साधेसुधे मुसलमानहि बळी पडतात.

आयत क्र. २७ ते ३४ मध्ये त्या गोष्टींचा इतमाम राखण्याची ताकीद ज्या शील-अब्रुच्या संरक्षणासाठी आवश्यक आहेत.

आयत क्र. ३५ ते ४० मध्ये या वस्तुस्थितीस दृर्गाचर केले आहे की जे लोक अल्लाहच्या प्रकाशात वाटचाल करतात, त्यांचे जीवन अल्लाहच्या तैजाने तेजस्वी होते, व जे लोक याचा इन्कार करतात ते निबीड अंध: कारात गर्क होता.

आयत क्र. ४१ ते ५४ मध्ये त्या प्रमाणांचे निवेदन करीत ज्याच्यामुळे शुध्द निखालस ईमान निर्माण होते, दांभिक मुसलमानांना हे आवाहन की त्यांनी प्रामाणिकपणे ईमान बाळगावे आणि अल्लाह व त्यांच्या पैगंबराचे आज्ञापालन अंगिकारावे.

आयत क्र. ५५ ते ५७ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना ही खुषखबरी की अल्लाह त्यांना अशाप्रकारे खिलाफत (सत्ता व अधिकारा) ने उपकृत करील की सध्याचे भय- संकटाचे वातावरण शांती-समाधानाच्या वातावरणात परिवर्तित होईल.

आयत क्र. ५८ ते ६१ मध्ये त्या आदेशांचे निवेदन जे आयत २७ ते ३४ मध्ये गृह-शिष्टाचारा संबंधाने दिले गेले आहेत.

आयत ६२ ते ६४ समारोपाच्या आयती होत ज्यात पैगंबराच्या आवाहनास असाधारण महत्व देण्याची व त्याच्याकडे पूर्ण लक्ष केद्रित करण्याची ताकीद केली गेली आहे.

# २४. सूरतुन् नूर

سورة النور

(आयती - ६४ )

परम दयाळू व परम कृपाळू आल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

سورة أنزلناها وفرضناها وأنزلنا فيها آيات بينات
لعلكم تذكرون ①

१. ही एक सूरह आहे जी आम्ही अवतरीत केली आहे [१] आणि यास आम्ही कर्तव्यबद्ध ठरविले आहे. [२] आणि यात आम्ही स्पष्ट आदेश अवतरीत केले आहे [३] अशासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा.[४]

الزانية والزاني فاجلدوا كل واحد منهما مائة جلدة
ولا تأخذكم بهما رأفة في دين الله إن كنتم
تؤمنون بالله واليوم الآخر وليشهد عذابهما طائفة
من المؤمنين ②

२. व्यभिचारी स्त्री व व्यभिचारी पुरुष, दोघांपैकी प्रत्येकास शंभर कोडे मारा. [५] आणि अल्लाहच्या 'दीन' (धर्मा)च्या संदर्भात तुम्हाला त्यांचा कळवळा येऊ नये, [६] जर तुम्ही अल्लाह आणि अंतिम दिनावर ईमान राखत असाल. आणि त्यांना शिक्षा देते वेळी ईमान बाळगणारा एक समूह उपस्थित असावा.[७]

الزاني لا ينكح إلا زانية أو مشركة والزانية لا ينكحها
إلا زان أو مشرك وحرم ذلك على المؤمنين ③

३. व्यभिचारी पुरुष निकाह (विवाह) करीत नाही परंतु व्यभिचारी किंवा अनेकेश्वरवादी स्त्रीशी, आणि व्यभिचारी स्त्री निकाह करीत नाही परंतु व्यभिचारी किंवा अनेकेश्वरवादी पुरुषाशी, आणि हे ईमान बाळगणाऱ्यांवर हराम (अवैध) केले गेले आहे.[८]

والذين يرمون المحصنات ثم لم يأتوا بأربعة شهداء
فاجلدوهم ثمانين جلدة ولا تقبلوا لهم شهادة أبدا
وأولئك هم الفاسقون ④

४. आणि जे लोक सत्यशील/पावित्र्याशील स्त्रीयांवर आरोप ठेवतात व मग चार साक्ष सादर करीत नाही त्यांना ऐंशी कोडे मारा [९] आणि त्यांची साक्ष कधीहि कबूल करू नका [१०] ते दुराचारी आहेत.[११]

إلا الذين تابوا من بعد ذلك وأصلحوا فإن الله
غفور رحيم ⑤

५. परंतु यांनतर जे लोक तौबा (क्षमा-याचना) करतील व आपली सुधारणा करतील तर अल्लाह माफ करणारा व कृपा करणारा आहे.[१२]

१. स्पष्ट झाले की कुरआनाच्या आयती ज्या सूरतींच्या/अध्यायांच्या(Chapters) स्वरुपात अस्तित्वात आहेत त्यांची रचना अल्लाह तर्फेच झाली आहे. या ठिकाणी एक सूरह म्हणण्याचा अर्थ या सूरहचे महत्व स्पष्ट करणे होय.

२. ज्याअर्थी या आयतीत व्यभिचार व व्यभिचाराचा आरोप लावण्याबद्दल सक्त शिक्षा निवेदिली गेली आहे, ज्या कार्यान्वित करणे मनुष्य स्वभावाला मोठे जड जातो तसेच लैगिक संबंधांची अनिर्बंधता नष्ट करण्यासाठीहि सक्त आदेश दिले गेले आहेत, म्हणून सुरुवातीलाच हे स्पष्ट केले गेले आहे की जे आदेश यात दिले गेले आहेत ते बंधनकारक आहेत यास्तव अपरिहार्यपणे त्यांचे पालन केले गेले पाहिजे.

दंडविधानांकरिता लागू करण्याचे सामर्थ भासणे आवश्यक आहे व याचा संबंध सामूहीक व्यवस्था व शासनाशी आहे याद्वारे इस्लामचीही योग्यता अगदी प्रकट होते की तो व्यापक अर्थाने धर्म आहे जो सामूहिक जीवना संबंधीहि मार्गदर्शन करतो व त्याचे स्वत:चे दंडविधानहि आहे, ज्यास लागू करण्याचे सामर्थ्य असूनहि लागू न करणे कर्तव्य पूर्ततेपासून पळ काढणे होय आणि त्यांच्या जागी मानव-निर्मित विधि-नियम लागू करणे, अल्लाहच्या आदेशांची उघड अवज्ञा आहे, किंबहुना ईश्वरांविरुध्द बंड आहे. परंतु मोठ्या खेदाची गोष्ट अशी की आजच्या काळात मुसलमानांची बहुतेक शासने मोठ्या निर्लज्जपणे इस्लामच्या दंडविधाना (Penal Code)च्या जागी स्वरचित दंड विधानांना लागू करीत आहेत आणि ज्या ठिकाणी मुस्लमान एखाद्या सेक्यूलर राज्य यंत्रणेखाली राहतात, तिथे त्यांना इस्लामच्या दंडविधानांची निकोपता व श्रेष्ठता व्यक्त करण्यातहि संकोच वाटतो. या भयापोटा की त्यांचा 'सेक्यूलॅरीझम' जमीनदोस्त न व्हावा!

ओघाओघाने ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की कुरआनाचे ज्ञान प्राप्त करणे अनिवार्य कर्तव्य आहे कारण आचरणासाठी ज्ञान आवश्यक आहे आणि आत्मशुद्धि व प्रशिक्षणाच्या दुष्टिनेहि कुरआनाचे अध्ययन आवश्यक आहे. अल्लाहच्या आदेशाचे जो प्रभाव मन-मस्तिष्कावर अंकित होतो तो अन्य कोणत्याहि पुस्तकाने होऊ शकत नाही मग ते कितीहि लाभप्रद का असेना.

३. स्पष्ट आदेशाचा अर्थ असा की त्यांचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. कुरआनाच्या या स्पष्टीकरणानंतर त्याच्या एखाद्या आदेशाचा एखादा असा अर्थ घेणे उचित ठरु शकत नाही जो स्पष्ट अर्थाच्या विपरित असावा. याने त्या समस्त चर्चा-विवादांना मूठमाती मिळते ज्या कुरआनाच्या एखाद्या स्पष्ट आदेशास संदिग्ध समजून केली जाते

४. संकेत या गोष्टीकडे आहे की जे दंडविधान दिले जात आहे ते अद्दल घडविण्याकरिता आहे. म्हणजे अशासाठी की कोणत्याही माणसाने असा अपराध करण्याची हिम्मत करु नये तसेच या गोष्टीचा बोध प्राप्त व्हावा की अल्लाहचा न्याय- नियम जेव्हा गुन्हेगारांकरिता जगात शिक्षा तजवीज करतो तर त्याने जो दिवस न्यायाकरिता निश्चित केला आहे त्या दिवशी तो अपराध्यांना दुष्परिणतीस का पोहचविणार नाही?

५. या आयतीच्या संदर्भात काही गोष्टींचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते.

(१) व्यभिचार एक घोर अपराध व शिक्षा देण्यायोग्य गुन्हा आहे. पुरुष व स्त्री दोघांचा आपल्या मर्जीने केलेला व्यभिचर ना त्यांना निर्दोष ठरवितो व ना शिक्षेपासून मुक्त. याबाबतीत स्त्री व पुरुष दोघेहि समान आहेत व समान शिक्षेस पात्र आहेत. परंतु जर पुरुषाने स्त्रीवर बलात्कार करुन व्यभिचार केला तर स्त्री निर्दोष आहे व तिला व्यभिचारीणी म्हटले जाऊ शकत नाही. अशा स्थितीत केवळ पुरुषच शिक्षेला पात्र ठरतो.

(२) मूळ ग्रंथात जल्दा हा शब्द वापरला गेला आहे याचा अर्थ एखाद्या अशा वस्तूने मारणे ज्याचा त्वचेवर परिणाम व्हावा व यापेक्षा अधिक नसावा. हा हेतु कोडा (हंटर) किंवा बेत द्वारे साध्य केला जाऊ शकतो. मात्र या अटीवर की मार एवढ्या जोरात नसावा की कातडी सोलून निघावी व शरीर रक्तबंबाळ व्हावे, मारतांना शरीरावर जे मामुली कपडे असतील ते राहू दिले जातील आणि तोंड व नाजूक अवयवांवर प्रहार केला जाणार नाही. पुरुषाला उभे करुन व स्त्रीला बसवून मार दिला जाईल.

(३) सर्वसाधारण अपराधांकरिता दो साक्षी पुरेशा असतात परंतु व्यभिचाराच्या पुराव्या साठी कुरआनाने चार साक्षी निर्धारीत केल्या आहेत. ही अट अशासाठी लावली गेली आहे की एखाद्याच्या अब्रुला सहजपणे बट्टा लावला जाऊ नये.

(४) आयतीतील शब्द आदेशाच्या सर्वसामान्यतेस प्रमाणित करतात म्हणजे व्यभिचारी स्त्री-पुरुष मग ते अविवाहीत असोत वा विवाहीत दोघांनाही शंभर फटके (कोडे) मारले जावेत परंतु अधिकांश हदीस-वचनांद्वारे हे सिध्द होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांनी व्यभिचाराच्या विविध प्रकरणांमध्ये विवाहित स्त्री किंवा पुरुषास व्यभिचार केल्याबद्दल 'रज्म' म्हणजे दगडांचा वर्षाव करुन ठार मारण्याचा आदेश दिला होता. या आदेशाचे त्यांच्या सहवासातील अनुयायांनी पालन केले हे हदीस

वचन बुखारी, मुस्लिम तिर्मिजी, अबु दाऊद व मुअत्ता वगैरे हदीस ग्रंथात आढळून येते. तसेच खुलफाए राशेदीनच्या काळातहि या आदेशाचे पालन केले गेले आणि मुसलमानाचे विद्वान व फुकहाचे याबाबत एकमत आहे. या खेरीज एका हदीस वचनात जे सनद दृष्ट्या योग्य आहे. ही तात्विक बाबहि निवेदिली गेली आहे की-

لَا يَحِلُّ دَمُ امْرِئٍ مسلم يَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَ اَنِّی رَسُوْلُ اللّٰهِ
اِلَّا بِاِحْدٰی ثلاثٍ: اَلنَّفْسُ بِالنَّفْسِ وَالثيبُ الزَّانی وَالمارقُ
مِنَ الدِّیْنِ اَلتَّارکُ الجماعة۔ (بخاری کتاب الدیات)

''एखाद्या मुसलमानाचे जो अशी साक्ष देत असावा की अल्लाह खरीज कोणीहि ईश्वर नाही आणि हे की मी (अर्थात पैगंबर) अल्लाहचे प्रेषित आहे, रक्त (सांडणे) योग्य नव्हे, याखेरीज की या तीन अवस्थांपैकी एखादी अवस्था उद्‌भवावी त्याने एखाद्याचा खून केला असावा किंवा विवाहित असूनहि व्यभिचार केला असावा किंवा इस्लाम धर्माबाहेर निघून मुस्लिम मिल्लतीचा त्याग केला असावा (म्हणजे मुरतद इस्लामशी प्रतरणा केलेला असावा). (बुख़ारी, किताबुल दीयात)

यास्तव विवाहित स्त्री-पुरुषा करिता रज्म (दगडाने मारण्याची) शिक्षा एक इन्कार न करण्यायोग्य वस्तुस्थिती आहे. तथापि येथे हा प्रश्न निश्चित उद्‌भवतो की कुरआन सर्वसाधारण पणे कोड्यांची शिक्षा दर्शवितो, जेव्हा हदीस वचन विवाहित व्यभिचारी स्त्री-पुरुषाकरिता दगडांनी मारण्याची शिक्षा तजवीज करते.तर दोघात सादृश्य स्थिती कोणती? याचे उत्तर वितरणात्मक आहे.

अज्ञान काळात व्यभिचार सार्वत्रिक होता, जर व्यभिचार परस्पर सम्मातिने केला गेला असेल तर त्यासाठी, शिक्षा द्यायची कल्पनहि नव्हती. जसे आजच्या 'सभ्य अज्ञानात' नाही. आपल्या समाजात व्यभिचाराच्या अत्यधिक शिक्षेकरिता क्रमबद्धता आवश्यक होती अगदी त्याच प्रकारे जसे मद्याची आसक्ति बाळगणाऱ्यांच्या मनात प्रथममद्याविषयी घृणा निर्माण केली गेली. मग स्पष्ट: हराम ठरविले गेले आणि मग मद्य पिणाऱ्यांकरिता शिक्षा ठरविली गेली. आणि या शिक्षेतहि कशा प्रकारे क्रमबद्धता राहीली म्हणजे प्रथम हाताने मारण्याची शिक्षा नंतर कोड्यांची शिक्षा निश्चित केली गेली ज्याचे विवरण हदीस-वचनांत आढळून येते. शिक्षेचे हे औचित्य लक्षात घेता मदीनेत प्रथम अवस्थेत व्यभिचारी स्त्रियांना, मग त्या अविवाहित असोत वा विवाहित घरात नजरकैद करून ठेवण्याचा आदेश दिला गेला आणि व्यभिचारी पुरुष व स्त्री दोघांना मग ते अविवाहित असोत वा विवाहित ताकीदपूर्ण शिक्षा देण्याचा संक्षिप्त आदेश दिला गेला हा आदेश सूरह निसा आयत क्र. १५ व १६ मध्ये निवेदिला गेला आहे. यानंतर दुसऱ्या अवस्थेत सूरह नूरची ही आयत अवतरली जिच्यात प्रत्येत प्रकारच्या व्यभिचारी करिता मग तो पुरुष असो वा स्त्री आणि विवाहित असो अथवा अविवाहित शंभर कोड्यांची शिक्षा सुनावली गेली. या आदेशाने नजर कैद स्त्रीयांच्या मुक्ततेचा मार्ग निर्माण झाला. या संबंधीचा वायदा सूरह निसामध्ये पुढीत शब्दात केला गेला होता:-

فَاَمْسِكُوْهُنَّ فِی الْبُیُوْتِ حَتّٰی یَتَوَفّٰهُنَّ الْمَوْتُ
اَوْ یَجْعَلَ اللّٰهُ لَهُنَّ سَبِیْلا۔ (نساء۔۱۵)

('यांना घरात रोखून ठेवा येथपावेतो की यांना मरण यावे) किंवा अल्लाहने त्यांच्या करिता एखादा मार्ग काढावा.' (निसा- १५)

मूळ ग्रंथात 'सबील' हा शब्द प्रयोजिला गेला आहे ज्याचा अर्थ बंधनातून सुटका असा आहे आणि कोड्यांची शिक्षा त्यांना कैद-बंधनातून मुक्त करण्यासाठी लागू केली गेली होती. 'रज्म'चा आदेश त्या वेळी दिला गेला नव्हता आणि ना 'रज्म'ला सबील (मुक्ति-मार्ग) या अर्थाने घेतले जाऊ शकत होते. या अवस्थेत कोड्यांची शिक्षा देण्याचा आदेश सर्वसाधारणपणे दिला गेला जो अगदी प्रसंगानुरुप होता कारण त्यावेळ पावेतो विवाहीत व्यभिचारी करिता रज्म (दगड मारुन ठार करणे)चा आदेश दिलाच गेला नव्हता.

नंतर म्हणजे सूरह नूरच्या अवतरणाच्या कमीत कमी एक वर्षानंतर बहुधा. हि.स. ७ मध्ये जे व्यभिचाराच्या शिक्षेकरिता तिसऱ्या अवस्थेचे स्वरूप बाळगत होते. अतिशय कठोर शिक्षा योजिली गेली यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पुढे व्यभिचाराची जी प्रकरणे आलीत त्यात त्यांनी विवाहित व्यभिचारी स्त्री-पुरुषांना 'रज्म'ची शिक्षा दिली. येथपावेतो की यहूदीच्या व्यभिचारांच्या प्रकारणातहि त्यांनी हाच फैसला दिला. आणि तौरात मध्ये 'रज्म' चा जो आदेश आहे त्याद्वारे त्यांच्यावर प्रमाण प्रस्थापित केले. 'एखादा पुरुष विवाहित स्त्री शी गमन करिताना सापडला तर तिच्याशी गमन करणारा पुरुष व ती स्त्री या दोघांनाहि जिवे मारावे, अशा प्रकारे इस्राएलातून असल्या दुष्टाईचे निर्मूलन करावे.

'वाग्दत्त कुमारी एखाद्या पुरुषाला गावात आढळली आणि त्याने तिच्याशी गमन केले तर त्या दोघांनाहि त्या

गावाच्या वेशीकडे आणून मरेपर्यंत दगड मार करावा.' (अनुवाद: २२, २३)

या घटनांकरिता पहा बुखारी, मुस्लिम, तिर्मिजी, अबू दाऊद आणि इतर हदीस- ग्रंथांमध्ये किताबुल हुहूद अशा प्रकारे टप्प्या टप्प्याच्या अंतिम अवस्थेत पैगंबर आचरणाने (सुन्नाहने) जो अल्लाहच्या संदेशाच्या आधारेच निश्चित होतो विवाहित व्यभिचारी स्त्री-पुरुषांकरिता 'रज्म'ची शिक्षा निर्धारीत केली.

यावरुन कोड्यांच्या शिक्षा आदेश जो सूरह नूरच्या भाष्यांतर्गत आयतीत दिला गेला आहे अविवहीत स्त्री-पुरुषा करिता खास ठरला आणि आता यात ती सर्व सामान्यता बाकी राहिली नाही जी यातल्या शब्दांनी व्यक्त होते. प्रेषित आचरण किंवा हदीस वचनांद्वारे कुरआनातील ईश- आदेशांच्या वैशिष्ट्यांची अनेक उदाहरणे दिली जाऊ शकतात. उदाहरणार्थ सूरह जुमआ मध्ये हा आदेश की जुमआ (शुक्रवार) च्या दिवशी जेव्हा नमाज करिता अजान दिली जाईल तेव्हा अल्लाहच्या स्मरणा करिता धाव घ्या, बाह्यार्थाने सार्वत्रिक आहे म्हणजे स्त्री-पुरुष सर्वांकरिताच आहे. परंतु पैगंबरांच्या सुन्नाहने स्त्रीयांना याला अपवाद ठरवून पुरुषांकरिता खास ठरविले आणि विवहित व्यभिचारी स्त्री-पुरूषांकरिता खास ठरविले. कुरआनने वसीयत (मृत्युपत्र) करण्याचा आदेश दिला आणि कसलीहि मर्यादा दिली नाही. परंतु प्रेषित-आचरणाने १/३ हिश्श्याकरिता यास मर्यादित केले. यास्तव. जर सुन्नाहने कुरआनच्या निवेदिल्या कोड्यांच्या शिक्षेला, अविवाहीत व्याभिचारी स्त्री-पुरुषांकरिता खास ठरीवले आणि विवाहित व्याभिचारी स्त्री-पुरुषांकरिता याहून जास्त कठोर शिक्षा योजिली तर यात आश्चर्य ते कसले? अविवाहीत व्यक्तिच्या तुलनेने विवाहीत व्यक्तिकडून व्यभिचार होणे अपराधास अधिक कठोर बनवितो म्हणून त्याची शिक्षा देखील त्या तुलनेने कठोरच असली पाहिजे. यास्तव प्रेषित अचरणाने ज्या मर्यादा निर्धारीत केल्या आहेत त्या न्यायाला अनुसरुन आहेत.

'रज्म' ची शिक्षा कुरआनात निवेदिलेली नसली तरी सूरह नूरचीच आयत,

اِنَّ الَّذِيْنَ يُحِبُّوْنَ اَنْ تَشِيْعَ الفَاحِشَةُ فِى الَّذِيْنَ
اَمَنُوْ الَهُمْ عَذَابٌ اَلِيْمٌ فِى الدنيا وَالْاٰخِرةِ۔

'जे लोक ईमान बाळगणाऱ्यांमध्ये निर्लज्जता पसारवू इच्छितात, त्यांच्याकरिता इहलोकातहि दु:खदायक अजाब (शिक्षा) आहे व अखिरत मध्येहि' (आयत क्र. १९)

या गोष्टीची निकड बाळगते की व्यभिचारांना दु:खदायक कठोर शिक्षा दिली जावी.प्रेषित आचरणाने विवाहीत व्यभिचाऱ्यां करिता रज्मच्या शिक्षेचा कायदा जारी करुन या आयतीच्या उद्दिष्टाची पूर्तता केली आहे म्हणून हे म्हणणे उचित ठरणार नाही की रज्मच्या शिक्षेसाठी कुरआनात कसलेहि निवेदन नाही परंतु रज्म च्या समर्थनार्थ या कथनाने युक्तिवाद योग्य नाही ज्यात हजरत उमर यांच्याकडे या गोष्टीचा संबंध दर्शविला गेला आहे की त्यांनी असे फर्माविले होते की कुरआनात रज्म ची आयत होती परंतु नंतरच्या काळात तिचे पठण उठविले गेले व आदेश तसाच राहिला ही एक अयोग्य व वायफळ गोष्ट होय जी कथनांमध्ये सामील झाली आहे व तिचा संबंध हजरत उमरशी जोडणे कदापि योग्य नव्हे. कुरआन तर एक अटळ गोष्ट आहे ज्यात कसल्याहि संशयाला तिळमात्र जागा नाही ते एखाद्या रावी (कथन- कर्त्याच्या) निवेदनाने नव्हे, तर उम्मते मुस्लिमाच्या सातत्याने सिद्ध आहे व त्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वत:सर्वश्रेष्ठ अल्लाहने घेतली आहे. मग जर एखादे कथन कुरआनात एखाद्या आयतीच्या वृद्धिचा दावा करीत असेल तर त्याचा तो दावा अगदी चुकीचा व निराधार आहे, किंबहुना खोटा ठरविला जाईल. म्हणून हे कथन महत्व देण्याच्या योग्यतेच नाही तसेच या कथनात आयत अशशेख वश्शेखा ज्या शब्दशैलीत निवेदिली गेली आहे ती इतकी व्यंगपूर्ण आहे की तिला कुरआनाशी जोडणे म्हणजे ताजमहलला मातीची भिंत जोडणे. आणि जर ही आयत होती तर तिचे पठण रद्द केले जाणे व आदेश बाकी ठेवणे ही अशी गोष्ट होय जी कथन-पूजकांच्याच लक्षात येऊ शकते. खेदाची बाब अशी की लोकांनी केवळ हदीस वचन रचण्यातच संतोष मानाला नाही, किंबहुना आयत रचण्याचेहि दु:साहस केले आणि कथन-भक्त कुरआनाविरुध्द व व्यर्थ कथनांनाहि खरे सिध्द करण्याचा प्रयत्न करीत राहीले.

५. आयतीत ईमान बाळगणाऱ्यांना संबोधिले गेले आहे म्हणून मुस्लिम समाज या गोष्टीस जाबाबदार आहे की या दंडविधानास जारी करावे व यास लागू करण्याची प्रात्याक्षिक स्थिती अशी की मुसलमानांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुस्लिम शासनांनी यास (व यासारख्या इस्लामच्या) इतर दंड विधानांना) जारी व लागू करावे.

६. अर्थात हे की अल्लाहचा धर्म जिथे सक्ती अपेक्षितो तिथे कोमलता दाखविली जाऊ नये. अल्लामा राजी असे लिहितात की فِى دِيْنِ الله ''अल्लाहच्या धर्माकरिता असे फर्मावून या गोष्टीस सचेत केले की धर्माने जेव्हा एखाद्या गोष्टीस बंधनकारक

ठरविले तर त्याच्याविरुध्द नरमीचा वापर योग्य नव्हे.'' (तफ़सीर कबीर खंड २३ पृ. १४८)

सहृदयतेची विविध स्वरुपे असतात. उदाहरणार्थ: एक स्वरुप असे की शरीआतच्या एखाद्या दंडविधानास एखाद्या सौम्य कायद्यात रुपांतरीत करणे जे कुफ्र आहे दुसरे स्वरुप असे की प्रात्याक्षिकत: दंडविधान लागू करण्यात सूट दिली जावी व तिसरे स्वरुप असे की मार इतका सौम्य असावा की शिक्षेचे उद्दिष्टच नाहीसे व्हावे. सहुदयतेच्या या सर्व स्वरुपापासून दूर राहणे आवश्यक आहे.

शरीअतची दंडविधाने निश्‍चितच सक्त आहेत परंतु अपराधांची रोखथाम करण्या करिता व गुहन्हेगारांना धडा शिकविण्याकरिता ती अत्यावश्यक आहेत. यास्तव आज मक्का व मदीनेच्या भूमिवर अपराधांची जी आश्‍चर्यकारक कमतरता आहे ती या दंडविधानामुळेच.

आजच्या काळात तर गुन्हेगारांसाठी फारच सौम्य स्वरुपाच्या शिक्षा योजिल्या जातात. लोकांना जालीम लोकांवर दया येते परंतु त्या अत्याचार पिडीतांविशयी अनुकंपा वाटत नाही जे पळवून नेणे, बलात्कार व खून या सारख्या बिभित्स गोष्टींना बळी पडतात. त्यांना ती सक्तीही दिसून येत नाही जी एखादा गुन्हा कबूल करण्यासाठी पोलीस वापरतात व अशा भयंकर यातना देतात की जुलमाच्या काळाचे स्मरण होते आणि प्रसंगी आरोपी प्राणाला मुकतो. वस्तुत: अद्याप त्याचा गुन्हा साबीत झालेला नसतो.

७. अर्थात मुसलमानांच्या एका संख्येने शिक्षेच्या वेळेस उपस्थित राहावे, अशासाठी की त्यांनी बोध ग्रहण करावा व कोणालाहि अपराध करण्याचे धाडस होऊ नये.

८. या आयतीत व्यभिचाऱ्यांचे सर्वसामान्य आचरण निवेदिले गेले आहे. एक व्यभिचारी पुरुष, व्यभिचारी स्त्री किंवा अनेकेश्‍ववादी स्त्री शी लग्न करण्यात काहीच संकोच बाळगत नाही आणि एक व्यभिचारी स्त्री व्यभिचारी पुरुष किंवा अनेकेश्‍वरवादी पुरुषाशी विवाह करण्यात काहीच संकोच बाळगत नाही. परंतु ईमान बाळगाणाऱ्यां करिता असले विवाह हराम (अवैध) आहेत. ईमान बाळगणाऱ्यां स्त्री करिता एखाद्या व्यभिचारी किंवा एनेकेश्‍वरवादी पुरुषाशी विवाह करणे योग्य नव्हे. आणि ईमान बाळगणाऱ्या पुरूषासाठी एका व्यभिचारणी बरोबर विवाह करणे योग्य आहे दुराचार व कुश्रद्धेमुळे असेल संबंध ईमान बाळगणाऱ्या करिता अनुरूप नाहीत. म्हणून त्यांनी असल्या ह्या संबंधांपासून सावधतता बाळगली पाहिजे.

जेथपावेतो बलात्काराचा संबंध आहे, तर तो एक व्यभिचारी पुरुष एखाद्या सत्शील स्त्रीवरही करू शकतो पण तिला व्यभिचारणी म्हटले जाऊ शकत नाही. त्याच प्रमाणे एक मुसलमान स्त्री माहित नसल्यामुळे एखाद्या अशा मुसलमानाच्या विवाह-बंधनात येते जो व्यभिचारी आहे. या मुळे ती व्यभिचाराणी ठरु शकत नाही म्हणून आयतीचा तोच अर्थ योग्य वाटतो जो वर निवेदिला गेला आहे आणि अल्लाह सर्वज्ञानी आहे.

९. आरोपशी अभिप्रेत व्यभिचाराचा आरोप आणि सत्शील स्त्रीयांवर मग त्या अविवाहीत असोत वा विवाहीत, व्यभिचाराचा आरोप ठेवणे तिच्या अब्रुशीलास काळीमा लावणे होय जे तिच्या करिता लज्जास्पद व बदनामीकारक आहे म्हणून शरीअत ने या आक्षेपास साबीत न करणाऱ्यासाठी सक्त शिक्षा निर्धारीत केली आहे अर्थात ऐशी कोडे मारणे ही शिक्षा प्रत्येक प्रकारच्या आरोपासाठी नाही, किंबहुना व्यभिचाराच्या आरोपा साठी प्रामुख्याने आहे. जिला धर्मशास्त्रीय परिभाषेत क़ज़फ़ म्हणतात. शिक्षा देणे इस्लामी न्यायालयाचे काम आहे ज्याच्यापुढे हा खटला सादर केला गेला असेल व आरोप ठेवणाऱ्याने चार साक्षी सादर केल्या नसतील.

१०. म्हणजे आरोप (तोहोमत) ठेवणाऱ्यांची साक्ष नेहमी करिता कबूल न करण्यायोग्य आहे.

११. म्हणजे त्यांनी फार मोठे खोटे कथन केले आणि पावित्र्याशील स्त्रीयांच्या शीलास डाग लावल्याचा प्रयत्न केला म्हणून ते फार मोठे गुन्हेगार ठरले.

यावरुन ही तात्विक बाबही स्पष्ट झाली की एक मुसलमान दुराचारीही असू शकतो. जर त्याने फार मोठे दुष्कर्म केले व जेव्हा तो जगातच सक्त शिक्षेला पात्र ठरतो तर अखिरत मद्ये दुराचारी मुसलमानांना अल्लाहच्या शिक्षेला तोंड का म्हणून द्यावे लागणार नाही? परंतु आज मुसलमानांची फार मोठी संख्या दुराचाराचे जीवन व्यतीत करूनहि या भ्रामक विचारात पडली आहे की मुसलमान असल्यामुळे कियामतीच्या दिवशी त्यांना कोणतीहि शिक्षा भोगावी लागणार नाही!

१२. म्हणजे जर अशा माणसाने तौबा केली व आपले आचरण सुधारले तर मग तो दुराचारी राहणार नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या अपराधांना क्षमा करील व त्यावर दया करील मुसलमानांच्या सोसायटीत हि त्याला पुन्हा 'दुराचारी म्हणून संबोधिले जाणार नाही.

**आणि जे लोक आपल्या पत्नीवर आरोप ठेवतील व त्यांच्या जवळ, त्यांच्या स्वतः खेरीज साक्ष नसेल तर (अशा स्थितीत) यांच्यापैकी एकाची (अर्थात पतीची) साक्ष ही आहे की त्याने चार वेळा अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे की तो सच्चा आहे.(अल-क़ुर्आन)**

६. आणि जे लोक आपल्या पत्नीवर आरोप ठेवतील व त्यांच्या जवळ, त्यांच्या स्वतः खेरीज साक्ष नसेल तर (अशा स्थितीत) यांच्यापैकी एकाची (अर्थात पतीची ) साक्ष ही आहे की त्याने चार वेळा अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे की तो सच्चा आहे.

وَالَّذِينَ يَرْمُونَ أَزْوَاجَهُمْ وَلَمْ يَكُن لَّهُمْ شُهَدَاءُ إِلَّا
أَنفُسُهُمْ فَشَهَادَةُ أَحَدِهِمْ أَرْبَعُ شَهَادَاتٍ بِاللَّهِ ۙ إِنَّهُ
لَمِنَ الصَّادِقِينَ ٦

७. आणि पाचव्यांदा असे म्हणावे की अल्लाहतर्फे धिक्कारा असो त्याचा जर तो खोटारडा आहे.

وَالْخَامِسَةُ أَنَّ لَعْنَتَ اللَّهِ عَلَيْهِ إِن كَانَ مِنَ الْكَاذِبِينَ ٧

८. आणि स्त्री वरुन शिक्षा अशा प्रकारे टळू शकते की तिने चार वेळा अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे की हा मनुष्य (तिचा पती) खोटारडा आहे.

وَيَدْرَأُ عَنْهَا الْعَذَابَ أَن تَشْهَدَ أَرْبَعَ شَهَادَاتٍ بِاللَّهِ ۙ إِنَّهُ
لَمِنَ الْكَاذِبِينَ ٨

९. आणि पाचव्यांदा असे म्हणावे की तिच्यावर अल्लाहचा प्रकोप होवो, जर पती सच्चा आहे.[१३]

وَالْخَامِسَةَ أَنَّ غَضَبَ اللَّهِ عَلَيْهَا إِن كَانَ مِنَ الصَّادِقِينَ ٩

१०. तुमच्या वर अल्लाहची कृपा व त्याची दया नसती (तर तुम्ही अडचणीत पडला असता, तेव्हा जाणून घ्या की अल्लाह अनुग्रह करणारा व कृपाशील आहे) आणि हे की अल्लाह तौबा कबूल करणारा व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.[१४]

وَلَوْلَا فَضْلُ اللَّهِ عَلَيْكُمْ وَرَحْمَتُهُ وَأَنَّ اللَّهَ تَوَّابٌ حَكِيمٌ ١٠

११. ज्या लोकांनी आरोप घडवून आणला आहे, तो तुमच्यातलाच एक गट आहे.[१५] तुम्ही या गोषटीस स्वतःसाठी वाईट समजू नका, किंबहुना हे तुमच्यासाठी चांगले आहे.[१६] यांच्यापैकी ज्याने जेवढा गुन्हा कमविला तेवढीच शिक्षा त्याच्या करिता आहे. आणि ज्या माणसाने यात मोठा भाग घेतला त्याच्या करिता फार मोठा अजाब (अल्लाहची शिक्षा) आहे.[१७]

إِنَّ الَّذِينَ جَاءُوا بِالْإِفْكِ عُصْبَةٌ مِّنكُمْ ۚ لَا تَحْسَبُوهُ شَرًّا لَّكُم ۖ
بَلْ هُوَ خَيْرٌ لَّكُمْ ۚ لِكُلِّ امْرِئٍ مِّنْهُم مَّا اكْتَسَبَ مِنَ الْإِثْمِ ۚ وَالَّذِي
تَوَلَّىٰ كِبْرَهُ مِنْهُمْ لَهُ عَذَابٌ عَظِيمٌ ١١

१२. जेव्हा तुम्ही लोकांनी हे ऐकले तेव्हा ईमान बाळगणाऱ्या पुरुषांनी व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांनी एकमेकांबद्दल सद्भावना का केली नाही आणि असे का म्हटले नाही की हा तर उघड मिथ्यारोप आहे.[१८]

لَّوْلَا إِذْ سَمِعْتُمُوهُ ظَنَّ الْمُؤْمِنُونَ وَالْمُؤْمِنَاتُ بِأَنفُسِهِمْ خَيْرًا
وَقَالُوا هَٰذَا إِفْكٌ مُّبِينٌ ١٢

१३. या आयतीमध्ये 'लीआन' चा आदेश निवेदिला गेला आहे लिआन चा अर्थ पती व पत्नी ने असे शपथपूर्वक निवेदन घावे की जर ते आपल्या कथनात खोटे असतील तर अल्लाह त्यांचा धिक्कार करो त्यांची स्थिती अशी की जर पती आपल्या पत्नीवर व्यभिचाराचा आरोप ठेवतो, परंतु त्याच्याजवळ स्वत:च्या साक्षी खेरीज पुरावा म्हणून मांडण्या करिता अन्य कोणतीहि साक्ष नाही, जेव्हा व्यभिचीरीला सिद्ध करण्यासाठी चार साक्षी आवश्यक आहेत तर त्याने इस्लामी न्यायालयापुढे चार वेळा शपथपूर्वक निवेदन घावे की तो आपल्या निवेदनात अगदी सच्चा आहे. आणि पाचव्यांदा अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे की माझ्यावर अल्लाह चा धिक्कार असो जर मी खोटारडा आहे. यानंतर पत्नीला संघी दिली जाईल की जर ती आपल्या पतीच्या कथनास असत्य समजते तर तिने त्याचे खंडन करावे व या खंडना साठी तिला चार वेळा शपथपूर्वक निवेदन घावे लागेल की पती खोटा आरोप लावीत आहे आणि पाचव्यांदा अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे लागेल की अल्लाहचा प्रकोप असो तिच्यावर (अर्थात पत्नी वर) जर पती आपल्या निवेदनात सच्चा आहे यानंतर न्यायालय या दोघांच्या दरम्यान तफावत करील व कोणाला कसलीहि शिक्षा दिली जाणार नाही. परंतु पतीच्या शपथपूर्वक निवेदना नंतर जर पत्नी व्यभिचाराच्या आरोपा चे खंडन आपल्या शपथपूर्वक निवेदना द्वारे करु शकली नाही तर मात्र ती शिक्षेस पात्र ठरेल. ही शिक्षा उपरोक्त आयत २ मधील निवेदनानुसार असेल. म्हणजे शंभर कोड्यांची शिक्षा, कारण يَدْرَاءُعَنْهَاالْعَذَابَ 'तिच्यावरुन शिक्षा अशा स्थितीत टळेल तेव्हा.........' यात शिक्षेशी अभिप्रेत तीच शिक्षा दिली जाऊ शकते जी या संदर्भात निवेदिली गेली आहे.

हे खरे होय की विवाहीत व्यभिचारी स्त्रीची शिक्षा पैगंबर वचनाने रज्म ठरविली आहे, परंतु अशा स्थितीत की चार साक्षीद्वारे गुन्हा साबीत झालेला असावा किंवा अरोपी ने स्वत:च आपला गुन्हा कबूल केलेला असावा. या ठिकाणी दोघांपैकी एकहि स्थिती नाही, म्हणून पतीच्या शपथपूर्वक निवेदनाचे खंडन केल्याबद्दल स्त्रीला व्यभिचाराची अत्याधिक शिक्षा देण्यास कोणतेही शरअी (शरीअत विषयक) प्रमाण नाही. यास्तव स्त्रीला व्यभिचाराची कमीत कमी शिक्षाच दिली जाऊ शकते अर्थात शंभर कोडे.

हनफी मस्लक या परिस्थितीत स्त्री करिता حَبس कैद (बनविण्या) ची शिक्षा योजितो. म्हणजे जो पावेतो पत्नी आपल्या पतीच्या शपथपूर्वक निवेदनाचे खंडंन करीत नाही तिला बंदीवासात ठेवले जाईल परंतु يَدْرَاءُعَنْهَاالْعَذَابَ 'शिक्षा स्त्री वरुन टळेल....'यात शिक्षेशी अभिप्रेत कैद हा अर्थ घेण्यासाठी कसलाहि तर्क नाही. याला लागूनच (आयत क्र. २ मध्ये) व्यभिचाराची शिक्षा निवेदिली गेली आहे. आणि व्यभिचारा संदर्भातील निवेदनात يَدْرَاءُعَنْهَاالْعَذَابَ 'स्त्री वरुन शिक्षा आशा स्थितीत टळू शकते जेव्हा ती...' फर्माविले गेले आहे म्हणून येथे बुद्धि त्याच शिक्षेकडे वळते जी आयत क्र. २ मध्ये निवेदिली गेली आहे. अर्थात शंभर कोड्यांची शिक्षा.

लीआनच्या स्थितीत निकाह फस्ख (Dissolve)होतो म्हणून हदीसवचनात असा उल्लेख आढळतो-

'पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी अनसारच्या व स्त्रीच्या दरम्यान ली आन करविले व त्या दोघांना विभक्त केले.'(बुखारी तिकाबुत्तलाक)

लिआनचा आदेश तौरात मध्येहि आहे परंतु एवढा विररणात्मक नाही जेवढा कुरआनात निवेदिला गेला आहे (पहा गणना - ५ ११ते ३१)

१४. म्हणजे ही अल्लाहची कृपा होय की त्याने कौटुंबिक समस्यामध्ये तुमचे मार्गदर्शन केले व हा त्याचा अनुग्रह होय की त्याने तुमच्याकरिता अडचणीतून बाहेर पडण्याचा मार्ग काढला. असे नसते तर तुम्ही अडचणीत खितपत पडले असते. तो तौबा (क्षमा-याचना) कबूल करणारा आहे म्हणून त्याने गुन्हेगारांकरिता तौबाचे द्वार खुले ठेवले आहे. ते तौबा करुन आपली सुधारणा करुन घेऊ शकतात व त्याच्या कृपेस पात्र ठरु शकतात.तो बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे म्हणून त्याचे हे आदेश व विधिनियम बुध्दिकौशल्य व उद्दिष्टांवर आधारीत आहेत. या आदेशांचा अयोग्य व बुध्दिकौशल्यहीन तेच लोक समजतात जे अल्लाह ला बुध्दिकौशल्य बाळगणारा आहे यावर विश्वास ठेवत नाही.

स्पष्ट असावे की आयतीत 'लौला' (असे असते तर) चे उत्तर अरबी भाषेच्या अलंकारीक शौलीनुसार आहे म्हणजे शब्दात निवेदिला गेला नाही परंतु शब्दशैलीने जो अर्थ स्पष्ट होतो त्यास आम्ही कंसामध्ये निवेदिले आहे.

१५. संकेत आरोपांच्या त्या त्या वादळाकडे आहे जे दांभिकांनी कोणा एका सत्शील मुसलमान स्त्री विरुध्द उठविले होते. हा गट सामील तर मुसलमांमध्ये होता, पण त्याने मन:पूर्वक इस्लाम धर्म कबूल केलेला नव्हता. एवढेच नव्हे तर तो इस्लामचा पक्का विरोधक व मुसलमानाच्या नाशास टपून बसला होता त्याने केवळ आपला कबीला मुसलमान झाला म्हणून किंवा अशा प्रकारच्या उद्देशामुळे इस्लाम अंगिकारला होता. खरे पाहता, इस्लामशी त्याला तीळमात्र स्वारस्य नव्हते, किंबहुना इस्लामशी तो कपटभाव बाळगून होता व आपल्या या कपट नितीमुळे इस्लाम व मुस्लमानांविरुध्द

वेगेगळ्या प्रकारची कट- कारस्थाने करीत असे अहजाब युद्धा (हि.स.५) नंतर त्याने मुस्लिम समाजाच्या विश्वासाला ठेस पोहचविण्यासाठी मुसलमान स्त्रीयांना बदनाम करणे, निर्लज्जतेची चर्चा करणे व खोट्या अफवा पसरविणे ही कृत्ये सुरु केलीत. या प्रसंगी त्यांनी एका सत्शील व प्रतिष्ठीत ईमान धारक स्त्री विरुध्द एक घाणेरडा किस्सा मनाने रचला व या आरोपास अशा प्रकारे पसरविणे चालू केले की काही सावधगिरी न बाळगणारे मुसलमान देखील या चर्चेत सहभागी झालेत. दाभिकांच्या ह्याच नव्या उपद्रवाकडे आयतीत संकेत केला गेला आहे व त्या मुसलमानाना सक्त ताकीद केली गेली आहे ज्यांनी खोट्या अफवांना बळी पडून वाईट गोष्टीची चर्चा करण्यात भाग घेतला.

कुरआनाने हे दर्शेविले नाही की ती कोणती स्त्री होती जिच्या विरुध्द अपकिर्तीचे वादळ उठविले गेले म्हणून ते निश्‍चित करणे आवश्यक नाही व ज्याअर्थी या गोष्टीची चर्चा करण्यापासून रोखले गेले आहे, असे आयतीत पुढे स्पष्ट आहे, म्हणून पैगंबरांच्या सहानुयायींनी या आयतीच्या स्पष्टीकरणामध्ये वावटळीची ती घटना उल्लेखिली नाही जी त्या वेळी घडून आली. यास्तव त्या गोष्टीचा शोध घेण्याचा प्रयत्न अगदी अनावश्यक व अयोग्य होय की हा आळ कोणत्या स्त्रीवर घेण्यात आला होता व कोणती कूट-कथा रचली गेली होती. निर्लज्जतेचे खोटे किस्से निवेदन केल्याने मग ते खंडनासह का असेनात, दुष्परिणाम दिसून येतात, म्हणून त्यांचा उल्लेख न करणेच योग्य होय व शांती सुखतेचा मार्ग हाच की कुरआनच्या संक्षिप्त निवेदनावर संतुष्ट होऊन संबंधित ईश-आदेशांवर दृष्टिस केंद्रित केले जावे.

राहीलीत ती कथने की ज्यात असा उल्लेख आहे की ईमान बाळगणाऱ्यांची माता हजरत आयशा यांच्यावरील मिथ्यारोपाचा किस्सा निवेदिला गेला आहे. तर कुरआनाने या गोष्टीचे समर्थन होत नाही कारण कुरआनाचे निवेदन सर्वसामान्य ईमान बाळगणाऱ्या सत्शील व पवित्र स्त्रीयांबाबत आहे, जसे आयत १२ व २३ वरुन स्पष्ट आहे. यात किंचित मात्र संकेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पावित्र्य शील पत्नांबाबत नाही. जर घटना हजरत आयशा यांच्यावरील मिथ्यारोपाची असती, तर आरोप ठेवणाऱ्यांचा अपराध अधिक कठोर झाला असता कारण त्यांनी ईमान-धारकांच्या मातेचा घोर उपमर्द केला आहे. तसेच त्यांनी आपल्या या घृणित कृतिने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दु:ख पोहचविले आहे; व पैगंबरांचे कुटुंबास बदनामकारक ठरले आहे परंतु या प्रकारच्या कोणत्याही गोष्टीचा या आयतीमध्ये संकेतवजाहि उल्लेख नाही या शिवय या कथनांवर सनदीच्या दृष्टीने विवादाला जागा आहे आणि मजकूराच्या दृष्टिने तर अनेक गोष्टी मान्य न करण्याजोग्या आहेत. या कथनांमध्ये सर्वात जास्त प्रसिध्द व तपशीली कथन जुहरीचे आहे जे प्रसिध्द ताबअी (पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींच्या सहवासात राहिलेले) होते. हे कथन बुखारी, मुसिलम व अन्य हदीस ग्रंथांमध्ये विवरणासह निवेदिले गेले आहे. तसेच 'सीरतइब्ने हिशाम' या ग्रंथात हे कथन इब्ने इसहाक द्वारे उल्लेखिले गेले आहे. या ठिकाणी त्या कथनाचा उल्लेख करणे दीर्घकारक होईल तसेच ही गोष्टही योग्य वाटत नाही की अशा कथनास कुरआनाच्या भाष्यात स्थान दिले जावे ज्यास निवेदन करण्यात संकोच वाटतो. यास्तव आम्ही संक्षिप्तपणे हे निवेदन करण्यात समाधान बाळगतो की कोणकोणत्या कारणास्तव हे कथन कबूल करण्याजोगे नाही.

१) सर्वात पहिली गोष्ट जी या कथनात खटकते, ती ही की जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) पर्यंत या आरोपाची सूचना पोहचली तेव्हा त्यांची ह. आयशा यांच्यावर प्रेम-दृष्टि राहिली नाही. वास्तविक पाहता हजरत आयशा त्या काळात आजारी होत्या पैगंबर केवळ स्वास्थ्याची विचारपूर करुन चालले जात म्हणून ह. आयशा यांना असे वाटते कि नक्कीच काहीतरी आहे मग जेव्हा उम्मे मिस्तह ने हजरत आयशा यांना सूचित केले की त्यांच्यावर खोटा आळ घेण्यात आला आहे तेव्हा त्यांना भयंकर मन:स्ताप झाला व त्या रडत राहिल्या. यावरुन हे दिसून येते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अफवा ऐकून त्वरीत तिचे खंडन केले नाही व हजरत आयशा यांना काहीहि न विचारता व मामल्याची छानबीन न करता त्यांच्याविषयी गैरसमजूत करुन घेतली. वस्तुत: ही गोष्ट फार दूर होय की ते असले आचरण अंगिकारतील. आपल्या त्या पावित्र्याशील पत्नीशी जिच्या शील चारित्र्याविषयी शंका घेण्यास कणमात्र वाव नाही. पवित्र कुरआन तर ईमान बाळगणाऱ्यांना सांगते की तुम्ही जेव्हा मिथ्यारोपाचा किस्सा ऐकला तेव्हा एकेमेकांबद्दल चांगले अनुमान का केले नाही व असे का म्हटले नाही की हा उघड व स्पष्ट असा मिथ्यरोप आहे ( आयत क्र. १२ ) कुरआनाच्या या दटावणीचा रोख अशा मुसलमानांकडे आहे ज्यांनी एका सत्वशील स्त्रीवर लावल्या गेलेल्या मिथ्यारोपाचे त्वरीत खंडन केले नाही. परंतु उल्लिखित कथनास कबूल करण्याच्या स्थितीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आचरणाचे स्पष्टीकरण करणे मोठे कठीण आहे आणि एखादे असे कथन ज्याद्वारे प्रेषित्व-पदाला गालबोट लागत असेल तर ते रद्द करण्याजोगे आहे.

२) या कथनात दुसरी गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी संबंध दर्शवून सांगितली गेली आहे. ती अशी की जेव्हा पैगंबरांनी हे पाहिले की हजरत आयशा रडत

आहेत तेव्हा हजरत अली व उसामा यांना बोलाविले व त्यांच्याशी आपल्या पत्नीस सोडून देण्यासंबंधी सल्ला मागितला. उसामा म्हणाले हे अल्लाहचे पागंबर आम्ही आपल्या कुटुंबियांबाबत चांगल्या गोष्टी खेरीज काही जाणत नाही आणि हजरत अली म्हणाले अल्लाहने आपणास कमतरता केली नाही. आयशाखेरीज पुष्कळशा स्त्रीया आहेत (म्हणजे आपण इतर स्त्रीयांशी निकाह करु शकता) आपण दासीला विचारुन पहावे. ती आपणास खरे ते सांगील. पैगंबरांनी बुरैराला बोलावून विचारले तेव्हा ती म्हणाली की मी अशी कोणतीहि गोष्ट पाहिली नाही जी संशयजन्य असावी.

ही गोष्ट देखील विश्वास ठेवण्या योग्य नाही की वैवाहिक जीवना संबंधीच्या समस्येवर उसामा सारख्या अल्पवयीन मुलाकडून सल्ला घेतला गेला असेल आणि ही गोष्ट किती नवलाची आहे की पैगंबरांनी एका दासीला तर विचारावे परंतु आपल्या इतर पत्न्यांना विचारू नये, एक जैनब वगळता. तसेच हजरत अलीचा तर सल्ला घ्यावा परंतु हजरत अबू बक्र व हजरत उमर सारख्या प्रतिष्ठीत सहकाऱ्यांना अगदीच दृष्टीआड करावे. हजरत अबू बक्र द्वारे उल्लिखित कथनामध्ये या गोष्टीचा कसलाच उल्लेख नाही की पैगंबरांनी हजरत अबू बक्र यांचे लक्ष याबाबत वेधले असावे की त्यांच्या मुली बाबत लोकांमध्ये काय चर्चा होत.आहे. मग हजरत अली यांचे उत्तरहि काहीसे जुजबी स्वरुपाचे होते. या ऐवजी त्यांच्या मुखाने अशी वचने निघावयास पाहिजे होती ज्याची अपेक्षा एका ईमान बाळगणाऱ्या व्यक्ति कडून केली जाऊ शकते. म्हणजे कुरआनाच्या फर्माविण्यानुसार

سُبۡحَانَكَ هَٰذَا بُهۡتَانٌ عَظِيمٌ

'आल्लाह तू पवित्र आहेस हा मोठा खोटा आरोप आहे. ते म्हणाले की आयशा खेरीज आपणास इतर पुष्कळ स्त्रीया लाभू शकतात. एका छानबीन होणाऱ्या समस्ये बाबत हे काय उत्तर झाले? हजरत अली विषयी आमची ही गैरसमजूत नाही की त्यांनी अशा प्रकारचे उत्तर दिले असेल, किंबहुना हा विचार कथन कर्त्याच्याच डोक्यातून निघाला असावा ज्या द्वारे ही प्रतिक्रिया दिसून येते की हजरत अली आधी पासूनच हजरत आयशा यांना मानाच्या नजरेने पाहत नव्हते. याने कथनकर्त्याबाबत शिया विचारसरणीची शंका निश्चित उद्‌भवते.

३) उल्लिखित कथनात आहे की हजरत अली यांच्याशी सल्ला मसलत केल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मींबर (मस्जिदित प्रवचन देण्यासाठी उभारलेला उंच चबुतरा) वर चढले व मुसलमामानांना संबोधून फर्माविले की त्या माणसापासून कोण माझे संरक्षण करील ज्याने माझ्या कुटुंबियांबाबत मला दुःख पोहचविले आहे. आणि अल्लाहची शपथ, मला आपल्या कुटुंबियांमध्ये चांगुलताच दिसून आली आहे व ज्या व्यक्तिवर हा आरोप ठेवला जात आहे, त्याच्या अंगी ही चांगुलताच आढळली आहे. यावर सईद बिन मुआज म्हणाले की जर तो आरोप ठेवणारा मनुष्य औस कबिल्याचा आहे तर मी त्याचे शीर उडवीन आणि जर तो खजरज कबील्याचा आहे तर आपण द्याल त्या आदेशाचे आम्ही पालन करू. हे ऐकताच सईद बिन उबादा उठून उभे राहीले व सईद बिन मुआजला म्हणाले, तुम्ही खोटे बोलत आहात. आपण कदापि त्याचा वध करू शकत नाही. सईदबिन मुआज म्हणाले आम्ही जरुर त्याला ठार करू. तुम्ही तर मुनाफीक (दांभिक मुसलमान) आहात व दाभिकांची बाजू घेऊन बोलत आहात. या संभाषाणाने औस व खजरज यांच्यात लढाई होण्याच्याच बेतात होती परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांना शांत केले.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या उपस्थितीत अन्सारच्या दोन कबिल्यांचे अशा प्रकारे लढणे अविश्वसनीय आहे. सईद बिन मुआज व सईद बिन उबादा दोन्हीहि प्रतिष्ठीत सहाबी (प्रेषिताचे निकटवर्ती अनुयायी) आहेत. त्यांच्या बद्दल कदापि ही कल्पना केली जाऊ शकत नाही की त्यांनी एकमेकांवर दोषारोपण केले असेल हे कथन त्यांच्या चारित्र्यास कलंकीत करते. आणि ही गोष्टहि मोठी आश्चर्यकारक आहे की जर हा प्रसंग उद्‌भवला होता तर हजरत अबू बक्र, हजरत उमर, हजरत उस्मान व हजरत अली स्तब्ध कसे राहीले व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समर्थनार्थ उभे का राहीले नाहीत? या सर्व गोष्टी उपरोक्त कथनास अगदी संदेहास्पद बनवितात.

४) कथनात पुढे असा उल्लेख आहे, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हजरत आयशा यांच्याजवळ गेले व फर्माविले, हे आयशा मला तुमच्या विषयी असे कळले आहे जर तुम्ही निरपराध आहात तर अल्लाह तुम्हाला दोषमुक्त करील आणि जर खरोखर तुमच्या हातून काही गुन्हा घडला आहे तर अल्लाह जवळ क्षमायाचना करा व तौबा करा, कारण दास जेव्हा आपल्या अपराधास कबूल करतो व तो पुन्हा न करणाचा दृढनिश्चय करतो तेव्हा अल्लाह त्याची क्षमा याचना व तौबा कबूल करतो. हजरत आयशा फर्मावितात की हे ऐकून माझे अश्रू कोरडे झाले. यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर वह्य अवतरली व त्यांनी फर्माविले, हे आयशा अल्लाहने तुम्हास दोषमुक्त केले आहे.

या आयतीने असे दिसून येते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत आयशा बाबत गैरसमज करुन

घेतला होता.जसे आयत क्र. १२ द्वारे, ज्यात ईमान बाळगणाऱ्यांना आपसात सद्भावना राखण्याची ताकीद केली गेली आहे. कोणत्याही प्रकारे कबूल करण्याजोगी आहे. मग पैगंबरांचे हजरत आयशा यांना हे फर्माविणे की जर तुमच्या हातून गुन्हा घडला आहे तर तौबा करा. याचा अर्थ असा की जर हजरत आयशा यांच्या हातून एवढा मोठा गुन्हा घडला होता तर त्या साठी त्यांचे तौबा करणे पुरेसे होते. वस्तुत: या स्थितीत त्यांच्यावर इस्लामचे शरीअतविषयक दंडविधान लागू पडले असते व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांना आपल्या विवाह-बंधनात कधीहि ठेवले नसते. कारण ही गोष्ट प्रेषित-पदाला कलंकीत करणारी ठरली असती. तात्पर्य हा किसासा केवळ काल्पनिक किस्सा होय.

५) सूरह नूरच्या आधी सूरह आहजाब अवतरली होती. ज्यात पैगंबरांच्या पत्न्यांना ईमान बाळगऱ्यांच्या माता ठरविले गेले तसेच पैगंबरांना दु:ख पोहचविण्याऱ्यांना निर्भत्सनेनस पात्र ठरविले गेले आहे. एवढे असतांना, असा कोणता मुसलमान असू शकत होता जो एकीकडे प्रामाणिक मुसलमान राहून दुसरीकडे मोमीनांच्या मातांपैकी एकावर आळ घेण्याचे दु:साहस करीत बसला असता?

६) या उपद्रवास खऱ्या अर्थाने जबाबदार दांभिक मुसलमानांचा सरदार अब्दुला बिन उबै हा होता परंतु या कथनात या गोष्टीचा काहीच उल्लेख नाही की हजरत आयशा यांच्या दोषमुक्त असण्याची आयत अवतरली. नंतर त्यावर 'हद' (शिक्षा) जारी केली गेली. परंतु इतर कथनांमध्ये हजरत मिस्तह यांच्यावर जे एक बदरी सहाबी आहेत, हजरत हस्सान बिन साबीत यांच्यावर जे पैगंबर-दरबारचे एक कवि आहेत आणि हजरत हमना बिन्ते हजश यांना शिक्षा जारी करण्याचा उल्लेख मिळतो हा मोठा विचित्र मामला आहे की ज्याने ही वावटळ उठविली होती, त्याला तर कसलीच शिक्षा दिली गेली नाही परंतु जे लोक यामुळे प्रभावित झाले त्यांना शिक्षा दिली गेली. जेव्हा कुरआन म्हणते ज्या व्यक्तिने आरोप ठेवण्यात अधिकाधिक हिस्सा घेतला त्याच्यासाठी फार मोठा अजाब आहे.

हजरत मिस्तह बदरी सहाबी आहेत, तेव्हा एवढे बेजबाबदजार असू शकत नव्हते की मोमीनांच्या मातेवर त्यांनी आळ घेतला आसवा हजरत हस्सान आपल्या काव्याद्वारे काफीरांना सडेतोड उत्तर देत असत व ते या मैदानाचे मुजाहीद होते. अशा व्यक्ति बद्दल ही कल्पना केली जाऊ शकते की तिने हजरत आयशा विरुद्ध आरोप ठेवण्यात भाग घेतला असेल? आणि जर समजा त्यांना काही शंका आली होती तर त्यांनी ती गोष्ट पैगंबर (सलल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निदर्शनास आणून दिली असती. पैगंबरांच्या निदर्शनास आणल्या खेरीज त्यांच्या घरच्या लोकांना बदलाम करण्याचा प्रयत्न कोणत्याहि ईमान बाळगणाऱ्या व्यक्तिकडून होऊ शकत नाही, आणि ना एखाद्या सहांबी व रसूल बाबत हे मत कायम केले जाऊ शकते. मग हजरत हस्सान यांना तर सीरत इब्ने हिशामच्या कथानानुसार पैगंबर (सलल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी इनाम देऊन गौरविले. कारण हजरत सफवान यांनी क्रोधित होऊन त्यांच्यावर तरवारीने हल्ला केला होता. जर त्यांनी खोटा आरोप लावण्याचे कृत्य केले होते, ज्यामुळे त्यांची साक्ष अस्विकृत झाली होती तर पैगंबरांनी त्यांना उपकृत कसे केले असते ! हमना हजरत जैनब यांची बहीण होती व या कथानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी विचारले असता हजरत जैनब यांनी हजरत आयशा संबंधी चंगले मत व्यक्त केले होते, म्हणून या सर्व सत्य गोष्टींना डावलून हजरत आयशा यांच्यावर आरोप ठेवण्यात भाग घेण्याचे हजरत हमना यांना काही एक कारण नव्हते. वस्तुस्थिती अशी की हे कथन अनेक सहाबांच्या चारित्र्यास कलंकित करते.

७) प्रमाणांच्या दृष्टनेहि इफकच्या कथनांनध्ये विवादास बरीच जागा आहे. हे दीर्घ कथन तर इब्ने शिहाब जुहरी द्वारे उल्लिखित आहे आणि जुहरीची गणना तर विश्वसनीय कथन कर्त्या मध्ये होते. परंतु हाफीज जहबी यांनी अस्माउर-रिजाल चे पुस्तक, मीजानुल एतेदाल मध्ये स्पष्ट सांगितले आहे की ते कधी 'तहत्तीस ' (घपला) ही करीत असत.

كان يدلس في النادر۔(ميزان الاعتدال ج ۴ ص ۴۰)

'ते कधी तदलीस (घपला) करीत असत' (मीजानुल एतेदाल ख. ४ पृ. ४०)

मूळ शब्द तदलीस याचा अर्थ कथन मूलत: ज्या कथन कर्त्याद्वारे उल्लिखित आहे त्याच्याकडे त्याचा संबंध न दर्शविता अन्य एखाद्या कर्त्याशी संबंध दर्शवावा. अशा साठी की प्रमाणाच्या वास्तवतेवर आवरण पडून रहावे व लोकांकरीता कथन मान्य करण्याजोग ठरावे आणि इब्ने हजर लिहितात की

لا يثبت له السماع من عروة

'उरवा पासून त्यांचे ऐकणे सिद्ध नाही' (तहजीबुत्तहजीब खंड ९ पृ. ४५०)

जुहरीबाबत एक गोष्ट ही सुद्धा जाणवते की ते अशा प्रकारच्या कथनांचे विवेदक आहेत जी हजरत आयशा व खुलफाए राशेदीन (चार खलीफा) यांना विवाद-कक्षेत आणतात. ज्यावरुन ते शिया विचार सरणीचे असल्याची शंका वाटते परंतु ज्याअर्थी त्यांचा संबंध खलीफा अब्दुल मलिकच्या दरबारशी होता म्हणून त्यांनी मध्य मार्ग अंगिकारला होता.

तात्पर्य जुहरीचे कथन कोणत्याही प्रकारे समाधानकारक नाही की त्यास या आयतीचे भाष्य ठरविले जावे ज्यात ‘इफ्क’च्या एखाद्या प्रसंगाकडे संकेत केला गेला आहे. राहीलीत इतर कथने ज्यात हजरत आयशा यांच्यावर आरोपाचा थोडक्यात उल्लेख केला गेला आहे तर त्यांच्यातहि विवादाला बरीच जागा आहे. (या समस्येच्या संशोधनासाठी पहा हकीम नियाज अहमद साहेब लिखित पुस्तक,‘रिवायते इफ्क’ मतबूआ मशहूर एकेडमी 89/F/2खालीद बिन वलीद रोड कराची २९)

१६. चांगले या कारणास्तव की मुसलमानांच्या समाजात जे दांभिक मुसलमान सामील झाले आहेत त्यांचे पितळ उघडकीस येईल. तद्‌वतच साध्या भोळ्या मुसलमानांना, जे त्यांच्या बहकाविण्यात आले होते, धडा मिळेल व सावध राहणाऱ्या प्रामाणिक मुसलमानांच्या प्रतिष्ठेत वाढ होईल आणि ते आपल्या सावध व ईश-भीरु वृत्ती मुळे अल्लाहतर्फे दिल्या जाणाऱ्या मोबदल्यास पात्र ठरतील.

१७. म्हणजे या निर्लज्ज असत्यास पसरविण्यात ज्याने हिरीरीने भाग घेतला आहे तो अल्लाहच्या येथे फार मोठ्या शिक्षेस पात्र ठरेल.

१८. ही गोष्ट एका विशिष्ट प्रसंग संबंधी सांगितली गेली असती तरी तिच्या द्वारे जी तात्विक मार्गदर्शन लाभते ते असे की जेव्हा एखाद्या शीलवती मुसलमान स्त्रीवर व्यभिचाराचा आळ घेतला जाईल तेव्हा मुसलमान पुरुषांनी व स्त्री यांनी लगेच गैरसमज करु नये तर चांगल्या मताने काम घ्यावे, एवढेच नव्हे तर या आरोपाचे खंडनहि करावे आणि खंडन करण्यासाठी एवढी गोष्ट पुरेशी आहे की तो एक मिथ्यारोप आहे. आयतीत स्त्रीयांवर आळ घेण्यासंबंधी म्हटले गेले असले तरी, एखाद्या सत्शील स्त्रीवर आरोप ठेवण्याचा मामला मोठ्या गंभीर स्वरुपाचा असतो व त्याचे परिणामहि गंभिर असू शकतात. परंतु शब्दशैलीने ही गोष्टहि स्पष्ट होते की चारित्र्याशील मुसलमान पुरुषावर आळ घेणेहि फार मोठा अपराध आहे.

१३. त्या लोकांनी या (आरोपा)चा पुरावा म्हणून चार साक्षी का आणले नाहीत? आणि ज्याअर्थी त्यांनी साक्षी आणले नाहीत तर अल्लाहच्या जवळ तेच खोटारडे आहेत.[१९]

لَوْلَا جَاءُو عَلَيْهِ بِأَرْبَعَةِ شُهَدَاءَ ۚ فَإِذْ لَمْ يَأْتُوا بِالشُّهَدَاءِ
فَأُولَٰئِكَ عِنْدَ اللَّهِ هُمُ الْكَاذِبُونَ ﴿١٣﴾

१४. आणि जर तुम्हा लोकांवर इहलोक व आखिरत मध्ये अल्लाहचा अनुग्रह व त्याची कृपा नसती तर ज्या विवादात तुम्ही पडले होते, त्याच्यापायी महद् शिक्षेने तुम्हाला धरले असते.[२०]

وَلَوْلَا فَضْلُ اللَّهِ عَلَيْكُمْ وَرَحْمَتُهُ فِي الدُّنْيَا وَالْآخِرَةِ لَمَسَّكُمْ فِي
مَا أَفَضْتُمْ فِيهِ عَذَابٌ عَظِيمٌ ﴿١٤﴾

१५. जेव्हा तुम्ही या (असत्या)स आपल्या जिव्हांवर आणत होते व आपल्या मुखाने अशी गोष्ट सांगत होते, जिच्याविषयी तुम्हाला काहीच ज्ञान नव्हते. तुम्ही तिला साधारण बाब समजत होते, वस्तुतः अल्लाहच्या दृष्टीत ती भयंकर बाब होती.[२१]

إِذْ تَلَقَّوْنَهُ بِأَلْسِنَتِكُمْ وَتَقُولُونَ بِأَفْوَاهِكُمْ مَا لَيْسَ لَكُمْ بِهِ
عِلْمٌ وَتَحْسَبُونَهُ هَيِّنًا وَهُوَ عِنْدَ اللَّهِ عَظِيمٌ ﴿١٥﴾

१६. जेव्हा तुम्हा ही गोष्ट ऐकली तेव्हा असे का नाही म्हटले की आम्हाला अशी गोष्ट जीभेवर आणणे शोभत नाही. अल्लाह परमपवित्र आहे हा तर फार मोठा मिथ्यारोप होय.[२२]

وَلَوْلَا إِذْ سَمِعْتُمُوهُ قُلْتُمْ مَا يَكُونُ
لَنَا أَنْ نَتَكَلَّمَ بِهَٰذَا سُبْحَانَكَ هَٰذَا بُهْتَانٌ عَظِيمٌ ﴿١٦﴾

१७. अल्लाह तुम्हाला उपदेश करतो की पुन्हा कधी असली हरकत करू नये जर तुम्ही ईमान धारक असाल.

يَعِظُكُمُ اللَّهُ أَنْ تَعُودُوا لِمِثْلِهِ أَبَدًا إِنْ كُنْتُمْ مُؤْمِنِينَ ﴿١٧﴾

१८. अल्लाह तुमच्या साठी स्पष्ट आदेश निवेदन करतो. तो ज्ञानी व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

وَيُبَيِّنُ اللَّهُ لَكُمُ الْآيَاتِ ۚ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿١٨﴾

१९. जे लोक असे इच्छितात की ईमान बाळगणाऱ्यां मध्ये निर्लज्जता पसरावी, त्यांच्या करिता इहलोक व आखिरत मध्ये दुःखदायक शिक्षा आहे.[२३] अल्लाह जाणतो व तुम्ही नाही जाणत.[२४]

إِنَّ الَّذِينَ يُحِبُّونَ أَنْ تَشِيعَ الْفَاحِشَةُ فِي الَّذِينَ آمَنُوا لَهُمْ
عَذَابٌ أَلِيمٌ فِي الدُّنْيَا وَالْآخِرَةِ ۚ وَاللَّهُ
يَعْلَمُ وَأَنْتُمْ لَا تَعْلَمُونَ ﴿١٩﴾

२०. जर अल्लाहचा अनुग्रह व त्याची कृपा तुमच्यावर नसती, (तर तुम्हाला दुष्परिणामांना तोंड द्यावे लागले असते, परंतु त्याने तुम्हाला वाचविले) आणि हे की अल्लाह स्नेहाळू व दयाळू आहे.

وَلَوْلَا فَضْلُ اللَّهِ عَلَيْكُمْ وَرَحْمَتُهُ
وَأَنَّ اللَّهَ رَءُوفٌ رَحِيمٌ ﴿٢٠﴾

१९. व्यभिचाराचा आळ सिद्ध करण्याकरिता चार साक्षी बंधन घातले आहे. जर एखादा मनुष्य आरोप ठेवल्यानंतर चार साक्षी सादर करू शकत नाही तर अल्लाहच्या नियमानुसार तो खोटारडा आहे. जर त्याने समजा साक्षींच्या अनुपस्थितीत व्यभिचाराची घटना पाहिली तर त्याने त्याविषयी चर्चा करू नये, कारण अपुऱ्या पुराव्यामुळे अपराध्याला शिक्षा तर दिली जाऊ शकत नाही व चर्चा केल्याने हे नुकसान होऊ शकते ती समाजात निर्लज्जतेच्या गोष्टी पसरू लागतील. साक्षींचे न्यायनिष्ठ असणे अगत्याचे आहे कारण कुरआनाने अन्य एका ठिकाणी स्पष्टकरण फर्माविले आहे की- وَاَشْهِدُوْا ذَوَىْ عَدْلٍ مِّنْكُمْ (طلاق:٢) ''आपल्यापैकी दोन न्यायी व्यक्तिंना साक्षी करून घ्या.'' (तलाक-२)

दुराचारी माणसांच्या साक्षी वर शिक्षा लागू केली जाऊ शकत नाही. राहीला हा प्रश्न की काय स्त्रीयांची साक्ष या मामल्यात कबूल करण्यायोग्य आहे तर सर्व फुकहा, शिक्षा व किसास संदर्भात स्त्रीच्या साक्षीस मान्य करणयोग्य ठरवत नाही. परंतु कुरआनाने याचा उल्लेख केला नाही आणि ना एखाद्या सहीह हदीस मध्ये ही गोष्ट निवेदन गेली आहे. कुरआनाचे आदेश स्त्री-पुरूष सर्वांकरीता समान आहेत. मात्र हे की एखादे प्रमाण एखाद्या आदेशास पुरूषांकरिता खास ठरविले आहे. सूरह बकरा मध्ये कर्जच्या मामल्यात एक पुरूष व दोन स्त्रीयांच्या साक्षीस कबूल करण्या योग्य ठरविले आहे. म्हणून व्यभिचार व हत्त्या प्रकरणाच्या स्वत:पाहिलेल्या मामल्यात स्त्रीयांची साक्ष अविश्वसनीय मानण्याचे काही एक कारण नाही. यास्तव अता व हम्माद यांनी व्यभिचाराच्या एका तंट्यात तीन पुरूष व दोन स्त्रीयांची साक्ष कबूल केली होती आणि इब्ने हज्मच्या जवळ एका पुरुषाच्या जागी दोन न्यायी मुसलमान स्त्रीयांची साक्ष कबूल करणे योग्य आहे. (अत्तशरीऊल जिनाई ख. २ पृ.४११)

बलात्काराच्या खटल्यात स्त्रीयांची साक्ष एक गरज म्हणून समोर येऊ शकते.

२०.दांभिक मुसलमानांनी उठविलेल्या वादळात काही कमअकली मुसलमानहि सामील झाले होते. याच गोष्टीवर येथे अंकूश ठेवला गेला आहे की या प्रकारच्या उपद्रवाचे परिणाम मोठे भयानक असतात. ही तर अल्लाहची कृपा होय की त्याने ऐनवेळी तुम्हाला याबाबत सावध करून एका मोठ्या शिक्षेपासून वाचवले. यास्तव तुम्ही अल्लाहशी कृतज्ञ व्हावयास पाहीजे व यापुढे सावधगिरी बाळगली पाहिजे.या आयतीत तंबीचा जो पैलू आहे तो व्यभिचाराच्या आरोपाशी संबंधीत असला तरी त्यात सामूहीक ताकीदीचा हा पैलूहि सुप्त आहे की जर मुसलमान दांभिकांच्या उपद्रवास बळी पडले तर त्यांना अतिशय वाईट परिणामांना तोंड द्यावे लागेल आणि इतिहास साक्षी आहे की मुसलमान जेव्हा अशा उपद्रवास बळी पडले तेव्हा आपसात तरवारी चालल्या व सदाचाराच्या प्रतिधित्वास मुकले.

२१. काही गोष्टी अशा असतात की लोक त्यांना क्षुल्लक समजून जीभेवर आणतात व त्यांचा उल्लेख करू लागतात परंतु ह्या गोष्टी गुन्ह्यास कारक व परिणामांच्या दृष्टीने अतिशय भयानक असतात.म्हणून मनुष्याने एखाद्या विरुध्द केवळ ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेवू नये व बेजबाबदारपणाच्या बोलण्या पासून अलिप्त राहावे.

२२. या द्वारे हे तात्विक मार्गदर्शन लाभते की माणसाने ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवू नये; किंबहुना सुज्ञतेने काम घ्यावे. हदीस वचनास असा उल्लेख आहे:-

كَفٰى بِالْمَرْءِ كَذِبًا اَنْ يُّحَدِّثَ بِكُلِّ مَا سَمِعَ (مسلم)

''माणूस खोटारडा होण्याकरिता ही गोष्ट पुरेशी आहे की त्याने प्रत्येक ऐकीव गोष्ट निवेदन करावी''. (मुस्लिम)

अशा प्रकारे कथनांसंबंधीहि या द्वारे हे मार्गदर्शन लाभते की जी कथने अल्लाह, त्याचे प्रेषित व प्रेषिताच्या प्रामाणिक सहकाऱ्यांवर उघड मिथ्यारोपाचे स्थान बाळगत असतील, तर त्यांना त्वरीत रद्द केले पाहिजे. ह्या उहापोहात न पडता की त्याची प्रमाणे कशी आहेत व त्याचे कथनकर्ते कोण आहेत कारण जी गोष्ट अगदीच चुकीची आहे ती कोणत्याहि परिस्थितीत रद्द करण्याजोगी आहे. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे मूर्त्यांची प्रशंसा दर्शविणारे कथन होय, ज्याचा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी संबंध दर्शविला गेला आहे. ज्यांचे खंडन आम्ही सूरह हजच्या टीप क्र. ९१ मध्ये केले आहे.

२३. निर्लज्जतेचा प्रसार एक सर्वकष बाब होय ज्यात व्यभिचाराचा आरोप, निलर्ज्ज गोष्टींची चर्चा करणे आणि माणसाला व्यभिचाराकडे प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी व कृत्ये करणे या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. आजच्या काळात निर्लज्जतेच्या प्रसाराची आधुनिक साधने उदयास आली आहेत. उदाहरणार्थ नाईट क्लब, संमिश्र पोहण्याची प्रदर्शने, इश्कबाजीचे वेड लावणारे सिनेमे, लैंगिक संबंधांचा कुमार्ग दाखविणारी व नितीभ्रष्ट गाणी, मन मस्तिष्काव स्त्रीयांचे भूत बसविणाऱ्या जाहिराती, सौदर्य-स्पर्धा, टी.व्ही. वर स्त्रीयांच्या निष्क्रीयतेचे प्रदर्शन, आवेशजनक कादंबऱ्या व कथा,वृत्तपत्रे व नियत कालीकांमध्ये स्त्रीयांची नग्न व अर्ध नग्न चित्रे,व कॅबरा डान्स सारखे प्रोग्राम वगैरे.

ज्या अर्थी निर्लज्जता माणसाच्या सत्वास नष्ट करते, त्यांच्या प्रतिष्ठेस मातीत मिळविते व त्याच्या चारित्र्याच्या चिंधड्या उडविते म्हणून मुस्लिम समाजात निर्लज्जता पसरविणाऱ्यांना सावध केले आहे की त्यांच्यासाठी जगातच नव्हे तर आखिरत मध्येहि दु:खदायक शिक्षा आहे आणि हा संकेत या गोष्टीकडे आहे की इस्लामी शासनाने अशा लोकांसाठी कठोर शिक्षा योजाव्यात. अपराधाचे स्वरुप पाहता शिक्षा योजणे व लागू करणे या आयतीच्या उद्दीष्टपूर्ततेकरिता आवश्यक आहे.

२४. म्हणजे तुम्ही नाही जाणत की निर्लज्जतेच्या प्रसाराचे परिणाम किती दूरगामी व भयानक असतात.

२१. हे ईमान बाळगणाऱ्यांनो! सैतानाच्या पाऊल-खुणांवर चालू नका. आणि जो कोणी सैतानाच्या पाऊल-खुणांवर चालेल तर तो त्याला निर्लज्जतेचा व वाईट गोष्टीचाच हुकुम देईल. जर अल्लाहचा अनुग्रह व त्याची कृपा तुमच्यावर नसती तर तुमच्या पैकी कोणताहि मनुष्य स्वच्छ शुद्ध होऊ शकला नसता,[२५] परंतु अल्लाह ज्याला इच्छितो पाक (स्वच्छ शुद्ध) करतो.आणि अल्लाह ऐकणारा, जाणणारा आहे.[२६]

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ لَا تَتَّبِعُوا۟ خُطُوَٰتِ ٱلشَّيْطَٰنِ ۚ وَمَن يَتَّبِعْ خُطُوَٰتِ
ٱلشَّيْطَٰنِ فَإِنَّهُۥ يَأْمُرُ بِٱلْفَحْشَآءِ وَٱلْمُنكَرِ ۚ وَلَوْلَا فَضْلُ ٱللَّهِ عَلَيْكُمْ
وَرَحْمَتُهُۥ مَا زَكَىٰ مِنكُم مِّنْ أَحَدٍ أَبَدًا وَلَٰكِنَّ ٱللَّهَ يُزَكِّى مَن يَشَآءُ ۗ
وَٱللَّهُ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿٢١﴾

२२. तुमच्या पैकी जे लोक परोपकारी व सम्पन्न आहेत त्यांनी या गोष्टीची शपथ न घ्यावी की नातेवोईकांची व दीन-दुबळ्यांची आणि अल्लाहच्या मार्गात देशत्याग करणाऱ्यांची मदत करणार नाही.त्यांनी माफ केले पाहीजे व क्षमा केली पाहीजे. काय तुम्ही नाही इच्छित की अल्लाहने तुम्हाला माफ करावे आणि अल्लाह माफ करणारा दया करणारा आहे.[२७]

وَلَا يَأْتَلِ أُو۟لُوا۟ ٱلْفَضْلِ مِنكُمْ وَٱلسَّعَةِ أَن يُؤْتُوٓا۟ أُو۟لِى ٱلْقُرْبَىٰ
وَٱلْمَسَٰكِينَ وَٱلْمُهَٰجِرِينَ فِى سَبِيلِ ٱللَّهِ ۖ وَلْيَعْفُوا۟ وَلْيَصْفَحُوٓا۟ ۗ
أَلَا تُحِبُّونَ أَن يَغْفِرَ ٱللَّهُ لَكُمْ ۗ وَٱللَّهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٢٢﴾

२३. जे लोक सत्शील, अजाण [२८] ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांवर तोहमत ठेवतात त्यांचा इहलोक व आखिरतमध्ये धिक्कार केला गेला आणि त्यांच्याकरिता फार मोठी-शिक्षा आहे.

إِنَّ ٱلَّذِينَ يَرْمُونَ ٱلْمُحْصَنَٰتِ ٱلْغَٰفِلَٰتِ ٱلْمُؤْمِنَٰتِ لُعِنُوا۟
فِى ٱلدُّنْيَا وَٱلْءَاخِرَةِ وَلَهُمْ عَذَابٌ عَظِيمٌ ﴿٢٣﴾

२४. ज्या दिवशी त्यांच्या जिव्हा आणि त्यांचे हात-पाय त्यांच्या विरुद्ध त्यांच्या कर्माची साक्ष देतील.

يَوْمَ تَشْهَدُ عَلَيْهِمْ أَلْسِنَتُهُمْ وَأَيْدِيهِمْ وَأَرْجُلُهُم بِمَا كَانُوا۟ يَعْمَلُونَ ﴿٢٤﴾

२५. त्या दिवशी अल्लाह त्यांना पुरेपूरे मोबदला देईल, असा मोबदला जो सत्य आहे; आणि ते जाणून घेतील की अल्लाहच सत्य आहे-वस्तुस्थितीस स्पष्ट करणारा.[२९]

يَوْمَئِذٍ يُوَفِّيهِمُ ٱللَّهُ دِينَهُمُ ٱلْحَقَّ وَيَعْلَمُونَ أَنَّ ٱللَّهَ هُوَ ٱلْحَقُّ
ٱلْمُبِينُ ﴿٢٥﴾

२६. दुष्ट स्त्रीया दुष्ट पुरुषांकरिता आहेत आणि दुष्ट पुरुष दुष्ट स्त्रीयांकरिता.आणि स्वच्छ शुद्ध स्त्रीया स्वच्छ-शुद्ध पुरुषांकरिता आहेत व स्वच्छ शुद्ध पुरुष स्वच्छ शुद्ध स्त्रीयांकरिता.[३०] हे लोक मुक्त आहेत त्या गोष्टींपासून ज्या हे बनवितात.[३१] त्यांच्यासाठी क्षमा आहे व प्रतिष्ठा, पूर्ण उपजिविका.

ٱلْخَبِيثَٰتُ لِلْخَبِيثِينَ وَٱلْخَبِيثُونَ لِلْخَبِيثَٰتِ ۖ وَٱلطَّيِّبَٰتُ لِلطَّيِّبِينَ
وَٱلطَّيِّبُونَ لِلطَّيِّبَٰتِ ۚ أُو۟لَٰٓئِكَ مُبَرَّءُونَ مِمَّا يَقُولُونَ ۖ
لَهُم مَّغْفِرَةٌ وَرِزْقٌ كَرِيمٌ ﴿٢٦﴾

२५. अर्थात स्वच्छ-शुद्धता बाळगणाऱ्या लोकांनी सैतानाच्या प्रभावाने अहंकार-ग्रस्त होऊ नये; किंबहुना त्यांनी हे समजून घ्यावे की जी स्वच्छ-शुद्धता त्यांना लाभली आहे ती अल्लाह प्रणित सुबुद्धिनेच लाभली आहे. नैतिक शुचिर्भूतता अल्लाहची कृपा देखील होय व त्याच्या कृपेस पात्र बनविणारी गोष्ट देखील.

२६. म्हणजे आत्मशुद्धि व चारित्र्य-नितीस सुशोभित करण्याचे काम अल्लाह-प्राणित सुबुद्धिवरच अवलंबून आहे. तो ज्याला इच्छितो शुद्ध सोने बनवितो. परंतु त्याच्या कृपेची ही विभागणी चूकीची असू शकत नाही कारण तो दासांच्या अहवालाशी सुपरिचित आहे. तो जाणतो की कोण स्वच्छ-शुद्धतेस इच्छितो व आपल्या या अपेक्षेत कितपत प्रामाणिक आहे. या प्रसंगी ती दुआहि विचाराधीन आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्वच्छ शुद्धतेकरिता शिकविली आहे:-

اَللّٰهُمَّ اٰتِ نَفْسِى تَقْوٰاهَا وَ زَكِّهَا اَنْتَ خَيْرُ مَنْ زَكّٰهَا اَنْتَ
وَلِيُّهَا وَمَوْلٰهَا۔ (مشکوٰۃ کتاب الدعوات بحوالہ مسلم)

''हे अल्लाह माझ्या आत्म्यास ईश-भीरुता प्रदान कर व त्याला शुद्ध कर. तू अधिक चांगला शुद्ध करणारा आहे. तू त्याचा मित्र व सहायक आहेत.'(मिश्कात)

२७. मुसलमानापैकी काही लोक आपल्या अल्पबुद्धिमुळे दांभिकांच्या या प्रसारास बळी पडले होते जो त्यांनी चांगल्या सत्शील मुस्लिम स्त्रीयांसविरुद्ध आरंभिला होता. विशेषत:अशा स्त्रीयांविरुद्ध ज्या हिजरत (देशत्याग) करून मदीना येथे येत, त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात असे. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने या संदर्भात सक्त ताकीद अवतरीत केली तर काही जणांनी जे या दोषी मुसलमानांना मदत करीत, त्यांनी शपथ घेतली की ते यांना मदत करणार नाहीत. या आयतीत त्यांना ताकीद केली गेली की त्यांनी अशी शपत घेऊ नये व गरजवतांना मदत करण्यापासून हात रोखू नये त्यांनी क्षमाबुद्धिने काम घ्यावे. अल्लाहने आपल्यालाहि माफ करावे असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी आपल्या सारख्या माणसाचे अपराधहि माफ केले पाहिजे.

कुरआनाने ही गोष्ट एखाद्या विशेष व्यक्ति बद्दल सांगितली नाही, किंबहुना सर्वसामान्य नातेवोईक, दीन-दुबळे, व स्थलांतरीत लोकांविषयी सांगितली आहे म्हणजे यांच्यापैकी ज्या लोकांच्या हातून अपराध घडला आहे त्यांना आर्थिक मदत करण्यापासून त्यांनी हात रोखू नये आयतीद्वारे ही शरीअत विषयक समस्याहि कळाली की, जर एखाद्या माणसाने एखादे सत्कृत्य न करण्याची शपथ घेतली तर त्याने अशी शपथ तोडली पाहिजे.

२८. अजाण (गाफील)शी अभिप्रेत त्या साध्या भोळ्या स्त्रीया होत ज्यांनी स्वप्नातहि असा विचार केला नसेल की त्या कथी कुकर्म करु शकतात किंवा कुकर्माचा आरोप त्यांच्यावर ठेवला जाऊ शकतो. त्यांना ना निर्लज्जतेच्या गोष्टीत स्वारस्य असते ना त्यांची वागणूक वोईट असते.

२९. म्हणजे जगात तर पुष्कळशा गोष्टींवर पडदा पडलेला असतो. परंतु कियामतीच्या दिवशी प्रत्येक गोष्टीची वास्तवता अगदी स्पष्टत: दृगोचर होईल. जे खोटे वचन जगात बोलले गेले त्यांचे पितळ उघडकीस येईल आणि निरपराधांवर जे खोटे आरोप ठेवले गेले तेयांची वास्तविकताहि स्पष्ट होईल त्या दिवशी लोकांना या गोष्टीची यथार्थ जाणीव होईल की अल्लाह सत्य आहे म्हणून तो न्याय करतो व न्यायाच्या निकडींची पूर्तता करण्यासाठी त्या आवरणांना काढून टाकतो ज्यांच्याखाली सत्य गोष्ट लपलेल्या होत्या.

३०. या ठिकाणी दुष्ट शी अभिप्रेत व्यभिचारी होय. अर्थात हे की व्यभिचारी स्त्रीयांसाठी व्यभिचारी पुरुषच योग्य होत व व्यभिचारी पुरुषांसाठी व्यभिचारी स्त्रीया. त्याचप्रमाणे स्वच्छ शुद्ध स्त्रीयांकरिता स्वच्छ शुद्ध पुरुषच अनुरुप होत व स्वच्छ शुध्द पुरुषांकरिता स्वच्छ शुद्ध स्त्रीयां.

ह्या योग्यत्वाची निकड अशी की चांगल्या सत्शील स्त्रीयांचा विवाह सत्शील पुरुषांशीच केला जावा, व सत्शील पुरुषांनी सत्शील स्त्रीयांशी विवाह करावा.

३१. म्हणजे सत्शील स्त्रीयां व सत्शील पुरुषांविरुद्ध खोट्या आरोपोचे जे वादंग माजवले गेले आहे ते खोटे असणे ही अगदी स्पष्ट गोष्ट नाही. चारित्र्यशील स्त्रीयांवर व नितीमान पुरुषांवर व्यभिचाराचा खोटा आरोप लावल्याने त्यांचे व्यक्तिमत्व कलंकित होत नाही ते असल्या खोट्या आरोपांपासून अगदी मोकळे आहेत.

आरोपांपासून मुक्त होण्याची गोष्ट या ठिकाणी सर्व सामान्यणे सांगितली गेली आहे म्हणजे समस्त स्वच्छ शुद्ध स्त्री-पुरुषांबाबत ही एक तात्विक बाब होब, एखाद्या प्रसंगाशी विशेषत्वाने नाही.

२७. हे ईमान बाळगणाऱ्यांनो आपल्या घरांखेरीज इतर घरांमध्ये प्रवेश करु नका, जोपावेतो परिचित होऊन परवानगी मिळवित नाही व गृहवसींना सलाम करीत नाही.[३२] ही पध्दत तुमच्यासाठी आधिक चांगली आहे, अशासाठी की तुम्ही सुज्ञता पूर्वक वागावे.[३३]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَدْخُلُوا بُيُوتًا غَيْرَ بُيُوتِكُمْ حَتَّىٰ تَسْتَأْنِسُوا
وَتُسَلِّمُوا عَلَىٰ أَهْلِهَا ۚ ذَٰلِكُمْ خَيْرٌ لَكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُونَ ﴿٢٧﴾

२८. त्या ठिकाणी कोणी न आढळल्यास प्रवेश करु नका, जोपर्यंत तुम्हाला अनुमति मिळत नाही.आणि जर तुम्हाला परत जायला सांगितले गेले तर परतून जा. [३४] ही पद्धत तुमच्या करिता फारच पावित्र्याची आहे. [३५] आणि जे काही तुम्ही करता, अल्लाह ते चांगल्या प्रकारे जाणतो.

فَإِنْ لَمْ تَجِدُوا فِيهَا أَحَدًا فَلَا تَدْخُلُوهَا حَتَّىٰ يُؤْذَنَ لَكُمْ ۖ وَإِنْ قِيلَ
لَكُمُ ارْجِعُوا فَارْجِعُوا ۖ هُوَ أَزْكَىٰ لَكُمْ ۚ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ عَلِيمٌ ﴿٢٨﴾

२९. आणि तुमच्यासाठी या गोष्टीत कसलीच तंगी नाही की अशा निर्जन घरांमध्ये प्रवेश करावा ज्यात तुमच्या फायद्यांची सामुग्री असेल.[३६] तुम्ही जे काही जाहीर करता,व जे काही लपविता अल्लाह ते सर्व जाणतो.[३७]

لَيْسَ عَلَيْكُمْ جُنَاحٌ أَنْ تَدْخُلُوا بُيُوتًا غَيْرَ مَسْكُونَةٍ فِيهَا مَتَاعٌ لَكُمْ ۚ
وَاللَّهُ يَعْلَمُ مَا تُبْدُونَ وَمَا تَكْتُمُونَ ﴿٢٩﴾

३०. ईमान बाळगणाऱ्या पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या नजरा खाली ठेवाव्यात [३८] व आपल्या लज्जा स्थानांचे संरक्षण करावे.[३९] ही पध्दत त्यांच्याकरिता अधिक स्वच्छ-शुद्ध आहे. ते जे काही करतात अल्लाह त्या विषयी अभिज्ञ आहे.

قُلْ لِلْمُؤْمِنِينَ يَغُضُّوا مِنْ أَبْصَارِهِمْ وَيَحْفَظُوا فُرُوجَهُمْ ۚ ذَٰلِكَ
أَزْكَىٰ لَهُمْ ۗ إِنَّ اللَّهَ خَبِيرٌ بِمَا يَصْنَعُونَ ﴿٣٠﴾

३२. आता ते ईश-आदेश दिले आहेत जे गृहस्थ-जीवनास सुसभ्य बनविणारे आणि अनेक फितन्यांचे मार्ग रोखणारे आहेत. या संदर्भात पहीला आदेश असा की कोणीहि दुसऱ्याच्या घरात परवानगी शिवाय प्रवेश करु नये. मूळ ग्रंथात تَستانسوا **'तस्तानिसू'** हा शब्द प्रयोजिला गेला आहे ज्याचा अर्थ स्नेहाने अनुज्ञा. प्राप्त करणे असा आहे व येथे त्याचा मतितार्थ असा की स्वत:ला गृहस्वामीशी परिचित करवून त्यांच्या इच्छेसह घरात प्रवेश करण्याची अनुमति घेतली जावी. अर्थात त्याच माणसाने घरात प्रवेश करावा ज्याचे आत येणे घराच्या लोकांना पसंत असेल व ते अनुमती देतील.

जेव्हा गृहस्वामी अनुमति देईल तेव्हा घरात दाखल होतांना प्रथम घरातल्या लोकांना सलाम कैला पाहिजे कारण हे गृह-प्रवेशाच्या शिष्टाचारापैकी आहे व या गोष्टीची अभिव्यक्ति सुद्धा की तो घरातल्या लोकांच्या शांती सुबत्तेची दुआ (प्रार्थना) करीत दाखल होत आहे म्हणून यापासून शांतीचीच अपेक्षा केली जाऊ शकतो. अनुमति घेण्याची जी पद्धत असेल तिचा अंगिकार केला पाहिचे. दरवाज्यावर ठक ठक करणे किंवा बेल वाज्वणे आजच्या काळातील प्रचलीत पद्धत आहे. त्या नंतर जर गृहस्वामी बाहेर आल्यास प्रथम त्याला सलाम केला पाहिजे, मग जेव्हा तो आत येण्यास सांगेल तेव्हा घरात प्रवेश करतांना घरातल्या लोकांना सलाम केला पाहिजे.

३३. म्हणजे नैतिक व धार्मिक दृष्टयाही अतिशय सुसभ्य पध्दत होय आणि या सुसभ्यतेची शिकवण तुम्हाला अशासाठी दिली जात आहे की तुम्ही सुज्ञतेने वागावे. दुसऱ्या शब्दात-सांगायचे म्हणजे या शिकवणीच्या प्रभावान्वये तुम्ही घरेलू व्यवहार व समस्यांमध्ये सुज्ञतेचे प्रमाण दिले पाहिजे.

वरील आदेशाने या तात्विक गोष्टीचेहि मार्गदर्शन घडते की एकांत-अधिकार (Right of Privacy) हा प्रत्येक माणसाचा हक्क आहे.

३४. म्हणजे राहत्या घरात परवामगीविना कोणत्याहि परिस्थितीत प्रवेश करु नये. घरात कोणी नसतांनाहि व गृहस्वामी काही कारणास्तव आत बोलावित नसेल अशा स्थितीतहि अशा परिस्थितीत माणसाने शांतपणे परत फिरले पाहिजे व या विवादात पडू नये कि त्याला आत येण्याची परवानगी का दिली गेली नाही. संभवत: एखादा उद्देश किंवा विवशता आड आली असावी.

३५. म्हणजे नैतिकदृष्ट्या ही पद्धत स्वच्छ शुद्ध आहे.

३६. अभिप्रेत ती घरे होत जी सार्वजनिक लाभाची असतात, म्हणून त्यात प्रवेश करण्याची सर्वांनाच मुभा असते. उदाहरणार्थ मुसाफीरखाना, सावली करिता बनलेली जागा, दुकाने, हॉटेली खुली कार्यालये (Open offices)इत्यादि.

३७. म्हणजे तुम्ही कोणत्या इराद्याने कोठे प्रवेश करता ते अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो म्हणून अल्लाहचे भय बाळगा व आपल्या इराद्यांना दुरुस्त राखा.

३८. नजरा खाली राखण्याचा अर्थ असा की जी गोष्ट पहाणे उचित नाही तिच्या पासून नजरा दूर राखाण्यात. अकस्मात नजर पडल्यास ती परत ध्यावी. या ठिकाणी विशेषत:, जसे उक्ति संदर्भाने स्पष्ट होते, स्त्रीयांना पाहण्या पासून (आपली पत्नी व ज्या स्त्रीयांशी लग्न संबंध, वर्ज्ध आहेत अशा स्त्रीया वगळता) नजरा चुकविणे. नजरा ज्या अर्थी काम वासनेस प्रेरक असतात व काम वासना निर्लज्जतेस प्रवृत करते, म्हणून कुरधानाने नजरे वर पहारा बसविण्याचा आदेश दिला आहे. खालची नजर लज्जा व संकोचाचे लक्षण आहे आणि आत्मा व आचरणा जा स्वच्छ शुद्धतेचे माध्यम. इस्लाम लज्जा संकोचा बाबत ईमान बाळगणाऱ्यास इतका संवेदनशील पाहू इच्छितो की त्याने स्त्रीयांवर वाईट नजर सुद्धा टाकू नये डोकावून पाहणे, एकटक पहाणे, व घुरलेल्या नजरेने पहाणे ही मोठी अनैतिक व उपद्रावकारक बाब होय. पवित्र कुरआनात एका ठिकाणी फर्माविले गेले की:-

يَعْلَمُ خَائِنَةَ الْأَعْيُنِ۔(المؤمن:١٩)

''तो डोळयांचा अपहार जाणतो' (अल मोमीन-१९) غضِ بصر अर्थात नजरा भिरकविणाऱ्यांसाठी ही तंबी होय. नजरा खाली ठेवण्याचा आदेश घरात व बाहेर दोन्हींशी संबंधित आहे. एकादा मुसलमान जेव्हा दुसऱ्याच्या घरात प्रवेश करील तेव्हा त्याने आपली नजरे खाली ठेवावी व नजरा भिरकावू नये आणि जेव्हा रस्त्याने चालत असले तेव्हा अपरिचित स्त्रीयांना पाहण्याचे टाळावे हे मोठे कठीण काम असले तरी जन्नतचा मार्ग अशा बिकट स्थितीतूनच जातो आणि हे काम एवढे कठिणहि नाही की माणसाच्या अगदी आवाक्याबाहेर असावे, कारण कुरआनाने नजरा खाली ठेवण्याचा आदेश दिलेला आहे. डोळे बंद करण्याचा नव्हे. ज्याप्रमामणे आयत **''वगजुज मिन सौतिक'**(لقمان:١٩) وَاغْضُضْ مِنْ صَوْتِکَ۔ (लुकमान-१९) मध्ये غضِ صوت **गज्जे सौत** चा अर्थ आवाज बंद करणे नव्हे, किंबहुना झुकविणे होय. यास्तव अकारण स्त्रीयांवर दृष्टि टाकणे अयोग्य आहे व काम वासनेने पाहणे हा डोळ्यांचा व्यभिचार होय. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले,

زِنَا الْعَيْنِ النَّظَرُ۔(بخاری کتاب الاستیذان)

''नजर डोळ्यांचा व्यभिचार आहे''- (बुखारी किताबुल इस्तीजान)

बायबलमध्येहि याला व्यभिचाराच्या अर्थाने घेतले आहे. जर अचानक नजर पडली तर नजर फिरवून घ्यावी हदीस वचना नुसार जरीर बिन अब्दुल्ला यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अचानक नजर पडण्यासंबंधी विचारले.

فَاَمَرَنِیْ اَنْ اَصْرِفَ بَصَرِیْ۔ (بخاری کتاب الآداب)

''तेव्हा त्यांनी फर्माविले की आपली नजर वळवा'' (मुस्लिम किताबुल आदाब)

३९. लज्जा-स्थानांच्या संरक्षणाच्या अर्थामध्ये त्यांना लपवून ठेवणे हेहि सामील आहे व अनैतिक कामांपासून वाचविणेहि. शरीराचा असा भाग जो इतरांसमोर उघड करण्यात माणसाला स्वभाविकपणे लाज वाटते त्यास सतर' (अरबी भाषेत औरा) म्हटले जाते. पुरुषाचे सतर (गुप्तांग) सर्वसामान्य फुकहाच्या दृष्टीने नाभीपासून गुडघ्यापर्यंतचा भाग आहे, परंतु कुरआनाची शैली धर्मशास्त्रवेत्त्यांच्या मोजमापाची नाही, किंबहुना तो मनुष्य स्वभावास जागे करुन नैतिक संवेदना जागृत करुन फर्माविते-

ولباس التقوىٰ ذٰلك خَيْرٌ۔ (سورہ اعراف:۲۶)

''आणि तकवा (ईश-भया) चा पोषाख सर्वोत्कृष्ट पोषाख होय.'' (अअराफ-२६)

उघड आहे, जो मनुष्य ईश-भयाचे वस्त्र धारण करील तो अधिकाधिक गुप्तांग झाकणारा पोषाख वापरेल. कुरआनाने नग्नतेस सैतानाचा उपद्रव म्हटले आहे-

''हे आदमची संतती असे न होवो की सैतानाने तुम्हास बहकून द्यावे. ज्या प्रकारे त्याने तुमच्या माता-पित्यास (बहकवून) जन्नतमधून बाहेर घालवले होते. व त्यांचे पोषाख उतरावले होते,यासाठी की त्यांची गुप्तांगे त्यांना दाखवून द्यावीत.' (अअराफ-२७)

**आणि तुमच्या पैकी जे लोक एकाकी (अविवाहित) असतील आणि तुमच्या दास व दासींपैकी जे सदाचारी असतील, त्यांचे निकाह करून द्या. जर ते आर्थिक दृष्ट्या तंगीत असतील तर अल्लाह त्यांना आपल्या कृपेने धनवान करील. अल्लाह मोठी विशालता बाळगणारा व ज्ञानी आहे.(अल-क़ुर्आन)**

३१. आणि ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांना सांगा की त्यांनीहि आपल्या नजरा झुकलेल्या ठेवाव्यात [४०] व आपल्या लज्जास्थानांचे संरक्षण करावे.[४१]आणि आपल्या शृंगारास उघड करु नये, शिवाय त्याच्या जो उघड व्हावा.[४२] आणि आपल्या छातींवर आपल्या दुपट्ट्यांचे पदर टाकावेत [४३]आणि आपल्या शृंगार जाहीर करू नये, परंतु आपल्या पतींसमोर किंवा आपले पिता अथवा पतीचा पिता किंवा आपले पुत्र वा पतींचे पुत्र,अथवा आपले भाऊ किंवा आपल्या भावांचे पुत्र वा बहीणींचे पुत्र अथवा आपल्या स्त्रीया किंवा आपले दास वा अशा पुरुषांसमोर जे आपल्या अधीन असतील व (स्त्रीयांशी) गरज राखत नसतील किंवा अशा मुलांसमोर जे स्त्रीयांच्या गुप्त बाबींशी अद्याप परिचित झाले नसतील. [४४] आणि आपल्या पायांना (जमीनीवर) आपटत चालू नये, की आपला जो शृंगार त्यांनी लपवून ठेवलो आहे तो कळून यावा.[४५]आणि हे ईमान बाळगणाऱ्यांनो तुम्ही सर्व अल्लाह समोर तौबा करा [४६]यासाठी की सफलता प्राप्त करावी.[४७]

وَقُلْ لِّلْمُؤْمِنٰتِ يَغْضُضْنَ مِنْ اَبْصَارِهِنَّ وَيَحْفَظْنَ فُرُوْجَهُنَّ
وَلَا يُبْدِيْنَ زِيْنَتَهُنَّ اِلَّا مَا ظَهَرَ مِنْهَا وَلْيَضْرِبْنَ بِخُمُرِهِنَّ عَلٰى
جُيُوْبِهِنَّ وَلَا يُبْدِيْنَ زِيْنَتَهُنَّ اِلَّا لِبُعُوْلَتِهِنَّ اَوْ اٰبَآئِهِنَّ اَوْ اٰبَآءِ
بُعُوْلَتِهِنَّ اَوْ اَبْنَآئِهِنَّ اَوْ اَبْنَآءِ بُعُوْلَتِهِنَّ اَوْ اِخْوَانِهِنَّ اَوْ بَنِيْٓ
اِخْوَانِهِنَّ اَوْ بَنِيْٓ اَخَوٰتِهِنَّ اَوْ نِسَآئِهِنَّ اَوْ مَا مَلَكَتْ اَيْمَانُهُنَّ
اَوِ التّٰبِعِيْنَ غَيْرِ اُولِي الْاِرْبَةِ مِنَ الرِّجَالِ اَوِ الطِّفْلِ الَّذِيْنَ
لَمْ يَظْهَرُوْا عَلٰى عَوْرٰتِ النِّسَآءِ وَلَا يَضْرِبْنَ بِاَرْجُلِهِنَّ
لِيُعْلَمَ مَا يُخْفِيْنَ مِنْ زِيْنَتِهِنَّ وَتُوْبُوْٓا اِلَى اللّٰهِ جَمِيْعًا اَيُّهَ
الْمُؤْمِنُوْنَ لَعَلَّكُمْ تُفْلِحُوْنَ ﴿٣١﴾

३२. आणि तुमच्या पैकी जे लोक एकाकी (अविवाहित) असतील आणि तुमच्या दास व दासींपैकी जे सदाचारी असतील, त्यांचे निकाह करून द्या.[४८] जर ते आर्थिक दृष्ट्या तंगीत असतील तर अल्लाह त्यांना आपल्या कृपेने धनवान करील.[४९] अल्लाह मोठी विशालता बाळगणारा व ज्ञानी आहे.[५०]

وَاَنْكِحُوا الْاَيَامٰى مِنْكُمْ وَالصّٰلِحِيْنَ مِنْ عِبَادِكُمْ وَاِمَآئِكُمْ اِنْ
يَّكُوْنُوْا فُقَرَآءَ يُغْنِهِمُ اللّٰهُ مِنْ فَضْلِهٖ وَاللّٰهُ وَاسِعٌ عَلِيْمٌ ﴿٣٢﴾

३३. आणि जे लोक निकाहचे सामर्थ्य बाळगत नसतील त्यांनी सत्शीलता अंगिकारावी येथपावेतो की अल्लाहने त्यांना आपल्या कृपेने श्रीमंत करावे [५१] आणि तुमच्या गुलामांपैकी जे (आपल्या स्वतंत्र होण्याकरिता लेखी करार करु इच्छितील त्यांच्याशी लेखी करार करा, जर तुम्ही जाणत असाल की त्यांच्या अंगी भलेपणा आहे.[५२] व त्यांना अल्लाहच्या धन-सम्पत्तितून द्या, जी त्याने तुम्हाला प्रदान केली आहे. [५३]आणि आपल्या दासींना व्यभिचारासाठी विवश करु नक, जेव्हा की त्या स्वतः सत्शील राहू इच्छित असतील केवळ अशा साठी की तुम्हाला ऐहिक जीवनांचे लाभ प्राप्त व्हावेत.[५४] आणि जो त्यांना अगतिक करील तर त्यांना अगतिक केले गेल्यावर अल्लाह (त्यांच्यासाठी) क्षमाशील व दयाशील आहे.[५५]

وَلْيَسْتَعْفِفِ الَّذِيْنَ لَا يَجِدُوْنَ نِكَاحًا حَتّٰى يُغْنِيَهُمُ اللّٰهُ مِنْ
فَضْلِهٖ وَالَّذِيْنَ يَبْتَغُوْنَ الْكِتٰبَ مِمَّا مَلَكَتْ اَيْمَانُكُمْ فَكَاتِبُوْهُمْ
اِنْ عَلِمْتُمْ فِيْهِمْ خَيْرًا وَّاٰتُوْهُمْ مِّنْ مَّالِ اللّٰهِ الَّذِيْٓ اٰتٰىكُمْ وَلَا
تُكْرِهُوْا فَتَيٰتِكُمْ عَلَى الْبِغَآءِ اِنْ اَرَدْنَ تَحَصُّنًا لِّتَبْتَغُوْا عَرَضَ الْحَيٰوةِ
الدُّنْيَا وَمَنْ يُّكْرِهْهُّنَّ فَاِنَّ اللّٰهَ
مِنْۢ بَعْدِ اِكْرَاهِهِنَّ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿٣٣﴾

४०. नजरा खाली ठेवण्याचा आदेश ज्या प्रमाणे पुरुषांना देण्यात आला तद्वतच स्त्रीयांनाहि दिला गेला आहे. जेव्हा एखादा मनुष्य परवानगीसह घरात दाखल होईल तेव्हा घरातल्या स्त्रीयांनी आपल्या नजरा त्या माणसावर स्थिर ठेवू नये. तसेच जेव्हा स्त्रीया घराबाहेर पडतील, तेव्हा त्यांनी आपल्या नजरा खाली राखाव्यात. गरज नसताना अनोळखी पुरुषांना बघण्यापासून सावध राहिले पाहिजे. या आदेशाच्या उद्दिष्टास लक्षात घेऊन जर नेक इराद्याने याचे पालन केले जाते तर ज्या खरोखरीच्या गरजा दैनंदिन जीवनात स्त्रीयांनी पुरुषास पाहण्याच्या व पुरुषाने स्त्रीस पाहण्या संबंधाने उद्भवतात त्या पूर्ण करण्यासाठी इस्लाम रोखत नाही. कारण उद्दिष्ट तंगी निर्माण करणे नव्हे. उदाहरणार्थ ओळख किंवा साक्ष देण्याच्या हेतुने स्त्रीचे पुरुषास पाहणे, सर्वसामान्य जमाववार दृष्टी टाकणे इत्यादि.

४१. लज्जा-स्थानांच्या संरक्षणात सतर झाकण्याचाहि समावेश होतो.

४२. शृंगाराशी अभिप्रेत पोषाखहि होय व सजावटीच्या वस्तुदेखील. पोषाखास कुरआनात शृंगार (सजावट) या अर्थाने घेतले गेले आहे.

خُذُوْا زِيْنَتَكُمْ عِنْدَ كُلِّ مَسْجِدٍ۔ (سورہ اعراف:٣١)

“प्रत्येक मसजीदी जवळ (उपासना प्रसंगी) आपली सजावट बाळगून असा” (अअराफ-३१)

قَدْ اَنْزَلْنَا عَلَيْكُمْ لِبَاسًا يُّوَارِىْ سَوْاٰتِكُمْ وَرِيْشًا۔

(سورہ اعراف:٢٦)

“आम्ही तुच्यावर पोषाख अवतरीत केला आहे. यासाठी की तुमचे गुप्तांगाहि झाकावे व सजावटीचे साधनहि व्हावे.” (अअराफ-२६)

आणि लिसानुल अरब या शब्दकोशानुसार-

وَالزِّيْنَةُ مَا يَتَزَيَّنُ بِهٖ۔ (لسان العرب ج١٣ ص٢٠٢)

“जीनत (शृंगार) म्हणजे त्या वस्तु ज्याद्वारे सजावट केली जावी”- (लिसानुल अरब खंड-१३ पृ. २०२)

सजावटीची उदाहरणे सूरमा, मेहंदी, अंगूठी इत्यादि होत. आयतीत स्त्रीयांना आदेश दिला गेला आहे की त्यांनी आपली सजावट उघड करू नये, मात्र त्या सजावटी खेरीज जी जाहीर व्हावी. या अपवादाचा स्पष्ट अर्थ असा की जी सजावट कामकाज व येण्याजाण्याने उघड राहते, ती उघड राहण्यात काहीच हरकत नाही. कारण याचा हेतु इतरांना आपला शृंगार उघडपणे दाखविणे हा नव्हे तर गरजेनुसार सजावटीस उघड राहू देणे हा होय.

हा अपवाद शृंगाराच्या अभिव्यक्तिशी संबंधित असला तरी स्वाभाविकत: यात अशा अवयवांचाहि समावेश होतो ज्यांना शृंगाराचे स्थान असते, म्हणजे हात व चेहरा कारण उघड दिसणारा शृंगार मेहंदी व अंगठी होय जिचे स्थान हात आहे आणि सुरमा व काजळ ज्याचे स्थान डोळे आहेत, जे चेहऱ्याचाच एक भाग आहे. म्हणून जर चेहरा व हात आपल्या शृंगारासह दिसून येतात तर स्त्रीला त्याची मुभा आहे. आणि या मुभेने पडद्याच्या आदेशात संतुलनाची स्थिती निर्माण केली आहे आणि स्त्री करिता गृहकार्यात जो अडसर निर्माण होऊ शकत होता तो दूर सारला आहे. हदीस वचनांद्वारे हे सिध्द होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात स्त्रीया चेहऱ्याचा पडदा पाळीत व पाळतहि नसत. उदाहरणार्थ सही मुस्लिमचे हदीस वचन-

“अब्दुल्लाह बिन अब्बास फर्मावितात की फजल (बिन अब्बास) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मागे बसले होते. बनी खशअमची एक स्त्री आली तेव्हा फजल तिच्याकडे पाहू लागले व ती त्यांच्याकडे पाहू लागली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फजल यांचा चेहरा दुसरीकडे वळविला. त्या स्त्रीने विनविले, हे अल्लाहचे प्रषित अल्लाहने आपल्या दासांवर हज्ज फर्ज (बंधनकारक) केले आहे आणि माझ्या पित्यावर फर्ज आहे परंतु ते फार वृद्ध आहेत. म्हणून वाहनावर बसू शकत नाही तर, मी त्यांच्या तर्फे हज्ज करु काय? पैगंबरांनी फमाविले, होय. ही घटना हुज्जतुल विदाच्या प्रसंगाची होय.” (मुस्लिम किताबुल मनासिक)

यावरुन असे दिसते की स्त्रीचा चेहरा उघडा होता, म्हणून तिच्यावर नजर पडली. सरी मुस्लिमचेच एक अन्य हदीस वचन-

जाबीर बिन अब्दुल्लाह फर्मावितात की ईदच्या दिवशी मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सोबत नमाज पढत होतो. पैगंबरांनी प्रवचना आधी नमाज पढविली. अजान व इकामती शिवाय नंतर बिलाल यांचा आधार घेऊन ऊभे राहीले. आणि अल्लाहचे भय अंगिकारण्याची ताकीद केली व त्याचे आज्ञापालन करण्यास प्रोत्साहित केले. लोकांना उपदेश केला व समजाविले. पैगंबरांनी फर्माविले, दान करा कारण तुमच्यापैकी अधिकांश जहन्नमचे इंधन बनणार आहेत. हे ऐकून स्त्रीयांमधून एक स्त्री, जी पिचलेल्या काळसर गालाची होती, उभी राहिली व तिने विचारले, हे अल्लाहचे पैगंबर असे का म्हणून होईल? फर्माविले, अशासाठी की तुम्ही तक्रार जास्त करता व आपल्या सोबतीशी कृतघ्नता करता. कथनकर्ते म्हणतात की हे ऐकून स्त्रीया आपले दागिने दान करु लागल्या. ते आपल्या कानातले दागिने व अंगठ्या हजरत बिलाल यांच्या कपड्यात टाकत जात होत्या.’ (मुस्लिम किताब सलातुल इदैन)

उघड आहे प्रश्नकर्त्या स्त्रीचा चेहरा उघडा होता, म्हणून

कथनकर्त्यास तिचे पिचलेले गाल दिसून आले.

हदीस वचनांनी हे सिध्द होते की स्त्रीचा चेहरा व हाताचे तळवे सतर (गुप्तांगा) मध्ये सामील नाही. तेव्हा एहरामच्या स्थितीत स्त्रीला निकाब चेहऱ्यावर टाकण्यास व दस्ताने घालण्यास मनाई केली गेली आहे. बुखारीच्या हदीस वचनानुसार-

لَاتَقْبَلُ صَلَاةُالْحَائِضِ اِلَّابِخِمَار۔ (ترمذی ابواب الصلاۃ)

'स्त्री ने एहरामच्या अवस्थेत नकाब घालू नये व दस्ताने (हातमोजे) घालू नये.' (बुखारी किताबुल मनासिक)

आणि नमाज विषयी हदीसवचन असे-

''वयस्क स्त्रीची नमाज ओढणी शिवाय स्विकृत ठरत नाही.'' (तिर्मिजी अबवाबुस्सलात)

या मस्लक (हंबली) मध्ये या विषयी कोणताहि मतभेद नाही की स्त्री करिता नमाजमध्ये आपला चेहरा उघडा करणे योग्य आहे आणि हे की चेहरा व हातांखेरीज शरीराचा कोणताहि भाग उघडा करणे उचित नाही.... तसेच या बाबतीत विद्वानांचे एकमत आहे की स्वतंत्र स्त्रीने आपले डोके झाकले पाहिजे. (मुगनी खंड १. पृ ६०१)

हिदायातील उल्लेखा नुसार-

स्वतंत्र स्त्रीचे संपूर्ण शरीर सतर आहे. मात्र चेहरा व हातोचे तळवे वगळता.' (हिदाया-खंड १ पृ. ३९)

इब्ने रुश्द लिहितात की-

''अधिकांश विद्वानांचे याबाबत एकमत आहे की स्त्रीचे संपूर्ण शरीर सतर आहे, चेहरा व हाताचे तळवे वगळता.'' (बिदायतुल मुज्तहिद खंड पृ. १११)

قالت اذا تنكشف اقدامهن قال فيرخين ذراعاً لا يزدن عليه۔ (مشکوٰۃ کتاب اللباس بحوالہ ترمذی)

राहिला पायांचा प्रश्न तर उम्मे सलमाच्या हदीस वचनावरुन असे दिसून येते की, पोशाख जर इतका लांब असेल की पायांच्या उघड्या भागास एक मर्यादेप्रत झाकून टाकील तर पुरेसा आहे. (मिशकात किताबुल लिबास-हवाला तिर्मिजी...)

या प्रमाणांनी स्पष्ट होते की स्त्रीचा चेहरा व हाताचे तळवे झाकल्या जाणाऱ्या अवयवांपैकी नाहीत की ज्यामुळे त्यांचे झाकले जाणे आवश्यक ठरावे. परंतु याचा हा अर्थ नव्हे की विवाह संबंध होऊ शकणाऱ्या पुरुषांसाठी गरज नसताना त्यांना पाहणे योग्य आहे. नजरा खाली ठेवण्याचा आदेश अकारण स्त्रीयांना पाहण्याकरिता कोणतेहि शास्त्रविहित कारण दाखवत नाही आणि ना याचा अर्थ असा की स्त्रीयांनी मुद्दाम आपला चेहरा सदैव उघडा राखावा. पैगंबरांच्या पवित्र पत्न्या आपल्या चेहऱ्यांवर पडदा राखीत आणि हे अधिक चांगले होय की शक्यतो स्त्रीयांनी निकाब धारण करुन रहावे. कुरआनाने दिलेल्या सवलतीस आम्ही अधिक स्पष्टीकरणासह अशाकरिता सादर केले की लोकांनी या भ्रमात राहू नये की इस्लाम स्त्रीयांसाठी पडद्याचे असे बंधन लागू करतो जे आमच्या काळात अमलांत आणण्याजोगे नाही. या चुकीच्या समजूतीत पडून स्त्रीया पडद्याचाच अव्हेर करतात. यास्तव सवलतीचा पैलू दृगोचर होणे अगत्याचे आहे यासाठी की इस्लामने पडद्याच्या ज्या कमीत कमी मर्यादा कायम केल्या आहेत त्यावर स्त्रीयांनी आचरणबद्ध व्हावे.

वस्तुस्थिती अशी की आजच्या काळात वाहतुकीच्या वाढत जाणाऱ्या दुर्घटनांना लक्षात घेता स्त्रीया आपला चेहरा उघडा ठेवण्यास विवश आहेत. बस, रेल इत्यादिंचा अनेक तासांचा व दिवसांचा प्रवास निकाबच्या स्थितीत गुदमरल्या सारखी अवस्था निर्माण करतो म्हणून निकाब उचलण्याविना गत्यंतर नाही. खरेदी विक्री व देण्याघेण्या प्रसंगीहि हातांचे उघडे होणे एक परिचित बाब होय. म्हणून पडद्यासंबंधीच्या आदेशामध्ये एवढी प्रखरता निर्माण करणे की शरीअतने दिलेली मुभा नाहीशी व्हावी, हे ना योग्य होय- ना उपयुक्त. या ठिकाणी आम्ही अधिक काही विद्वावानांची मते सादर करीत आहोत. अल्लामा मुकद्दसी मुगनी मध्ये लिहितात-

आवश्यकता आहे की स्त्रीने खरेदी-विक्री साठी आपला चेहरा खुला राखावा आणि देण्या- घेण्यासाठी आपले हाताचे तळवे उघडे राखावेत.' (मुगनी खंड १ पृ. ६०१)

अल्लामा (विद्वान) नासीरुद्दीन अलबानी यांनी पडद्यासंदर्भात एक संशोधनात्मक पुस्तक हिजाबुल मरअतिल मुस्लिमह, लिहीले आहे. हे पुस्तक अल मक्तुबुल इस्लामी बैरुत द्वारे प्रकाशित झाले आहे. या पुस्तकांत अल्लामा फर्मावितात:

हदीस आयशा (जी अबूदाऊदमध्ये आहे) या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होयकी स्त्री करिता चेहरा व हातांचे तळवे खुले राखणे उचित आहे. जर या हदीसच्या प्रमाणात ती गोष्ट नसती जी आम्ही आपल्या टीपेत निवेदिली आहे (संकेत आहे हदीसच्या मुर्सल असण्याकडे. या हदीस वचनात पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम शी या कथनाचा संबंध दर्शविला गेला आहे की त्यांनी हजरत असमाला अशा वस्त्रांमध्ये पाहून ज्यातून त्यांचे अंग दिसून येत होते, फर्माविले, की स्त्री जेव्हा वयात येईल तर हे उचित नव्हे की तिच्या शरीराचा एखादा भाग चेहरा व हाताचे तळवे वगळता उघड व्हावा). मात्र हे की असे म्हटले जावे की हे कथन विविध रित्या उल्लिखित झाल्यामुळे अशा स्थितीत उल्लिखित गोष्टीच्या शास्त्राविहित असण्याचे प्रमाण ठरु शकते. विशेषत: अशासाठीहि की यानुसार प्रेषित काळात स्त्रीया आचरण करीत राहिल्या. यास्तव त्या पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम

यांच्या उपस्थितीत आपला चेहरा व हाताचे तळवे उघडे ठेवीत व पैगंबर त्याना मनाई करीत नसत, आणि ही गोष्ट अनेक हदीस-वचनांद्वारे सिध्द आहे.' (हिजाबुल मरअतिल मुस्लिमह पृ. ५३)

शेख अली तंतावी लिहितात की-

''सारांश हा की स्त्रीचा चेहरा खरे पाहता सत्र (लपविण्याजोगे अंग नाही) आणि अधिककांश धर्मशास्त्रवेत्त्यां (असहाबे मजाहीब अरबअ) च्या मते हे सत्र ठरत नही परंतु चेहरा उघडा न करणे हे अधिक श्रेयस्कर व चांगले होय.'' (फतावा शेख अली तंतावी पृ. १५५)

राहिली चेहरा व हातांची उघड होणारी शोभा व तिचे उघडे ठेवणे योग्य आहे. कारण चेहरा व हात उघडे ठेवण्याची मुभा आहे. (फी जिलालुल कुरआन, खंड ४, पृ. २५१२)

या संदर्भात डॉ.युसुफ कर्जावी फर्मावितात-

''चेहरा व तळहातांच्या बाबतही सवलत अशासाठी दिली गेली आहे की त्यांना लपविणे स्त्रीयांकरिता नुकसानदायक आहे. विशेषत: अशा स्थितीत, जेव्हा तिला येग्य गरजेपोटी बाहेर पडावे लागेल. उदाहरणार्थ विधवांना आपल्या मुलांच्या गरजा भागविण्याकरिता व गरीब स्त्रीयांना आपल्या पतींच्या मदतीकरिता बाहेर पडावे लागते. अशा परिस्थतीत बुरखा घालण्याचे वतळहात झाकण्याचे बंधन त्यांच्याकरिता कष्टदायक व अडचणींना कारणीभूत ठरु शकते.'' (इसलाम मे हराम व हलाल पृ. २०८)

आणि मौलाना शब्बीर अहमद उस्मानी फर्मावितात, كَفَيِين ''हदीस व आसार नी सिद्ध होते की चेहरा व तळहात **इल्ला मा जहरा मिन्हा** اِلَّامَاظَهَرَمِنْهَا मध्ये सामील आहेत. कारण बहुतेक धार्मिक व भौतिक गरजा यांना उघडे राखण्यास विवश करतात. यांना लपविण्याचा परिपूर्ण आदेश दिला गेल्यास स्त्रीयांना काम करण्यात फारच तंगी व अडचण उद्‌भवेल. पुढे पुकहा ने पायांचां ही याच अवयवांवर कयास केला आहे आणि जेव्हा हे अवयव अपवाद ठरले तेव्हा त्यांच्याशी संबंधित अंगुठी, मेहंदी, काजळ, वगैरे ना ही अपवादात्मक मानावे लागेल.

(तफसीर मौलाना शब्बीर अहमद उस्मानी. पृष्ठ ४५८)

काही विद्वानांनी اِلَّامَاظَهَرَمِنْهَا परंतु जी सजावट जाहीर होईल'शी अभिप्रेत ती चादर घेतली आहे जी वरून पांघरली जाते, जिला लपविणे शक्य नाही किंवा हवेच्या झोक्याने चादर उडून जाणे हा अर्थ घेतला आहे. परंतु ही पूरेपूर औपचारिकता आहे आणि जसे अल्लामा जसास यांनी लिहीले आहे एक निरर्थक गोष्ट आहे. कारण जर हाच अर्थ अभिप्रेत असता, तर याचे कुरआनाने एवढ्या इतमामाने निवेदन केले नसते. (अहकामुल कुरआन, खं. ३ पृ. ३८९,३९०)

४३. ओढणी' (खिमार) अशा कपड्यास म्हणतात जे डोक्याला झाकील 'गरेबान'शी अभिप्रेत पोषाखाचा तो भाग जो गळा व छाती जवळ विभक्त होतो. ओढणीचा पदर गळा व वक्षावर आच्छादित राखण्याचा अर्थ असा की स्त्रीने डोक्यावर ओढणी पांघरून पदर आपल्या छातीवर अशा प्रकारे टाकावो की डोके, कान, गळा व छाती पूर्णत: झाकली जावी ना डोक्याची सजावट जाहीर व्हावी, ना कानाची, ना गळ्याची व ना छातीचा उंचवटा जाहीर व्हावा.

ओडणीचा हा आदेश घरा करिताही आहे, व बाहेरच्या वातावरणा करिताही. घराबाहेरच्या वातावरणासाठी एक अधिक आदेश चादरीचाहि आहे. परंतु ज्या अर्थी चादर उघडी पडते ज्यामुळे गळा व छाती उघडी पडण्याची शक्यता असते म्हणून ओढणी सुद्धा आवश्यक आहे. आजच्या काळात बुरखाचा रिवाज आहे. जर बुरखा ओढणीचे उद्दिष्ट पूर्ण करतो म्हणजे गळा वगैरे उघडे पडण्याची व गळ्यातील दागिने उघडे पडण्याची संभावना नसेल तर फक्त बुरखा देखीत पर्याप्त ठरु शकतो. आणि अल्लाह सर्व ज्ञानी आहे.

घरात गृहस्वामीच्या आज्ञेने जेव्हा एखादा असा मनुष्य प्रवेश करील ज्याच्याशी विवाह संबंध होऊ शकतो तर त्याच्याशी पड्याच्या कमीत कमी मर्यादा आहेत की स्त्रीने अंगप्रत्यांग झाकणाऱ्या पोषाखात असावे व दुपट्ट्याने आपले कान, गळा, व छाती झाकावी, तसेच चेहरा व हात आणि त्याच्या सजावटी खेरीज अन्य एखादी सजावट किंवा शरीराचा भाग उघडा होऊ देऊ नये. परंतु जर मध्यभागी पडदा लावला जातो किंवा पुरुषांकरिता वेगळ्या खोलीची व्यवस्था आहे तर हे अधिक श्रेयस्कर होईल. पैगंबरांच्या पवित्र पत्न्या करिता काही खास बंधने होती ज्यापैकी एक बंधन हे होते की त्यांच्या व गैरमहरम माणसांच्या दरम्यान आडपडदा असावा. जर एखादी वस्तू मागितली गेली तर पड्याआडून मागितली जावी (सूरह अहजाब आयत क्र.५३) परंतु सर्वसामान्य मुस्लिम स्त्रीयांकरिता घरातल्या पड्या बाबत एका मर्यादेपावेतो लवचिकता राखली गेली आहे.

या लवचिकतेचा मोठा लाभ असा की विवाह संबंध होऊ शकणाऱ्या नातेवाईकांशी नाते संबंध निभावणे सोपे होत जाते. त्यांच्या आगमनावर जर आडपडदा टाकला जातो तर अधिक चांगले. परंतु जर त्याच्यामुळे अडथळा होतो तर पड्याच्या ज्या कमीत कमी मर्यादांचा उल्लेख केला गेला आहे त्यांचे पालन पुरेसे आहे. परंतु याचा हा अर्थ नव्हे की विवाह-संबंधास योग्य, मग ते नातेवाईक का असेनात एकांत भेटीची परवानगी आहे किंबहुना पती किंवा एवाद्या महरम (विवाह संबंधास अयोग्य) व्यक्तिच्या उपस्थितीत स्त्री विवाह-संबंध होऊ शकणाऱ्या माणसांसमोर उल्लिखित बंधनासह येऊ शकते.

हेहि स्पष्ट असावे की दुपट्टा इतका पातळ नसावा का अंग

दिसून यावे कारण दुपट्टा तर अवयव झाकण्यासाठी आहे, गळ्यात अडकविण्यासाठी किंवा फॅशन जाहीर करण्यासाठी नव्हे. यास्तव दुपट्टा किंवा ओढणीकरिता अशा प्रकारचा कपडा वापरला पाहिजे, ज्यामुळे त्याचे उद्दिष्ट पूर्ण व्हावे.

४४. या वाक्यात सजावटीस उघड करण्याची जी अनुमती दिली गेली आहे त्याच्याशी अभिप्रेत स्त्रीचे शृंगारासह समोर येणे आणि शृंगारासह स्त्री ज्यांच्या पुढे येऊ शकते त्यांचे विवरण पुढील प्रमाणे आहे-

१) पती २) पिता, सासरा, पतीचे पुत्र म्हणजे सावत्र मुले, भाऊ पुतणे, व भाचे हे सर्वजण स्त्रीकरिता महरम म्हणजे विवाह संबंधास वर्ज्य असे आहेत म्हणून त्यांच्या समोर स्त्री पोषाख व दागिन्यांच्या सजावटी सह नि:संकोच येऊ शकते. यांच्या व्यतिरिक्त इतर महरम देखील आहेत. उदा. काका, मामा, जावई, रजाई भाऊ वगैरे ज्यांचा उल्लेख केलेला नाही. यांचा उल्लेख न केल्याने कुरआनाचा संकेत या गोष्टीकडे दिसून येतो की स्त्री यांच्या समोर तर येऊ शकते परंतु सजावटीची अभिव्यक्ति त्यांच्यासमोर आवश्यक मर्यादितप्रतच व्हावयास हवी.

३) आपल्या स्त्रीयांशी अभिप्रेत, आपल्या संबंधातील व आपली सेवा करणाऱ्या स्त्रीया होत. पूर्ण शृंगारासह अशाच स्त्रीयांसमोर येण्याची परवानगी दिली गेली आहे. राहिल्यात इतर स्त्रीया तर कुरआनाचा संकेत या गोष्टीकडे दिसून येतो की त्यांच्या समोर शृंगार या मर्यादेप्रत जाहीर केला जावा, ज्या मर्यादेत जाहीर होण्यात, फितन्याची काही बाब नसावी.

४) अधीन असलेल्या'त दास, दासी दोघे शामील आहेत. गुलामास इस्लामने कुटुंबातील एक व्यक्तिचा दर्जा दिला आहे व त्याला जी सेवा पार पाडावी लागते, ती लक्षात घेता हे अपरिहार्य ठरते की घरच्या स्त्रीयांवर गुलामांच्या बाबतीत पडद्याचे बंधन नसावे आता गुलामीची परंपरा नष्ट झाली आहे. म्हणून गुलामांचा प्रश्नच राहीला नाही.

५) ती मुले ज्यांना स्त्रीयांच्या गुप्त गोष्टींचे अजून आकलन झालेले नसावे. अर्थात अशी अजाण मुले ज्यांना ना स्त्री-रहस्य उलगडले असेल व ना त्यांच्यात वासनाविषय भावना जागृत झाल्या असतील.

४५. म्हणजे स्त्रीयांनी अशा प्रकारे पाय आपटून चालू नये की पायातल्या दागिन्यांचा ध्वनि ऐकू यावा हा संकेत प्रामुख्याने पैजणाकडे आहे कि त्यात धुंगरु किंवा अन्य एखादी वाजणारी वस्तू नसावी. आणि ना चालण्याची एखादी अशी पद्धत अंगिकारावी की पैजणा वर एखादी वस्तू आदळल्यामुळे आवाज निर्माण व्हावा.

आयतीचे शब्द, مَا يُخْفِينَ مِن زِينَتِهِنَّ 'जो शुंगार त्यांनी लपवून ठेवला आहे' या गोष्टीस प्रमाणित करतात की, पैजण पायात लपलेले असावेत. गैर महरम पुरुषांना त्यांचे आकलन होऊ देऊ नये.

पाय आपटून न चालण्याची आज्ञा घरासाठीही आहे व बाहेर करीताही. घरात जेव्हा गैरमहरम परवानगीने दाखल होतो तेव्हा स्त्रीयांनी घरात चालतांना ही सावधागिरी बाळगली पाहिजे व जेव्हा बाहेर पडायचे असेल तर याची पूरेपूर काळजी घ्यावी. यावरून हे अनुमान काढले जाऊ शकते की जो धर्म दागिन्यांच्या ध्वनिसंदर्भात सावध राहण्याची शिकवण देतो व पाय जमीनीवर आपटत चालण्यास मनाई करतो, तो स्त्रीयांच्या नखरेल चालीला व तिच्या नृत्य गायनाला कशा प्रकारे सहन करू शकतो?

४६. तौबोचा अर्थ रुजू करणे असाही आहे व गुन्ह्यांपासून परावृत होणे असाही. या प्रसंगी समस्त ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहकडे रूजू करण्याचा व आपल्या पापांची प्रतिज्ञापूर्वक क्षमा मागण्याचा आदेश दिला गेला आहे. आर्थात हे की गृहस्थ-जीवन संबंधाने जे मार्गदर्शन केले गेले आहे त्याचे पालन करा आणि नैतिक स्वच्छ शुद्धतेच्या संबंधाने जो गुन्हा या पूर्वी तुमच्या हातून घडला आहे त्यांच्याबाबत अल्लाहशी माफी मागा व यापुढ आपली सुधारणा करा.

४७. स्पष्ट झाले की सफलता, कुरआनातील या मार्गदर्शनानुसार आचरण केल्याने प्राप्त होते, त्यांना पाठीमागे टाकून फॅशन-भक्त बनल्याने नव्हे.

४८. मूळ ग्रंथात अयामा हा शब्द प्रयोजिला गेला आहे. याचा अर्थ फक्त विधवाच नव्हे तर असे पुरुष व स्त्रीयां होत जे एकाकी आहेत म्हणजे असे पुरुष ज्यांना पत्न्या नसतील व अशा स्त्रीया ज्यांना पती नसतील. त्यांचे निकाह करून देण्याचा अर्थ असा की त्यांच्या संबंधितांनी त्यांना निकाहसाठी प्रोत्साहीत करावे व या संदर्भात त्यांना मदत करावी. यावरुन ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की विधवा-विवाहास वाईट समजणे योग्य नव्हे. इस्लाम विधवा-विवाहास केवळ उचितच ठरवित नाही, तर त्यास प्रोत्साहन देतो.

दास व दासींच्या संदर्भात ही इस्लामने सुधारणात्मक पाऊल उचलले व या गोष्टीची ताकीद केली की त्यांच्यापैकी जो सदाचाराचे जीवन व्यतीत करीत असतील त्यांचे निकाह केले जावेत. अर्थात ही जबाबदारी प्रामुख्याने त्यांच्या मालकांची ठरते. हो त्या मार्गदर्शन क्रमाचाच एक भाग होय जो व्यभिचाराच्या निर्मूलनासाठी दिला जात आहे.

४९. म्हणजे निकाह बाबतीत आर्थिक अडचण अडसर बनू नये किंबहुना अल्लाहावर भरवसा ठेवून या शुभ कार्यास तडीस न्यावे. जो मनुष्य अल्लाहच्या आदेशाचे पालन करील, अल्लाह निश्चितपणे त्यास आपल्या कृपेने उपकृत करील आणि ही गोष्ट पाहण्यात येते की लग्नांनतर कित्येक गरीबांच्या आर्थिक उत्पन्नात

वाढ होते व कित्येक लोक सुस्थितीत राहू लागले आहेत. परंतु आजच्या काळातील तरूणांची दशा मोठी विचित्र आहे जे आधुनिक संस्कृतिच्या प्रभावामुळे वैवाहीक जबाबदारी पासून दूर राहतात. वयाच्या पंचवीसाव्या वर्षापर्यंत तर ते शिक्षण घेण्यात मग्न असतात त्यानंतर पाच वर्षे आर्थिक धावपळीत अशा प्रकारे घालवतात की त्यायोगे त्यांचे जीवन-मान (Standard of Living) कायम व्हावे व एवढी प्राप्ती व्हावी की मोठ्या थाटामाटाने लग्न करता यावे. अशा प्रकारे त्यांचे तारुण्य एकाकी अवस्थेत पार पडते. मग अर्धे अधिक वय उलटल्यानंतर ते लग्न-संबंध शोधू लागतात. आधुनिक संस्कृतीने एकीकडे अवयस्कांना वयस्क बनविणारे वातावरण घडविले आहे तर दुसरीकडे वैवाहीक जबाबदारींना टाळण्याची प्रवृत्ती निर्माण केली आहे. परिणामत:अधिकांश करून वाईटरित्या अनैतिक लैंगिक संबंधना बळी पडत आहे तर दुसरीकडे मुलींना वर न मिळाल्याने त्यांचे लग्नाचे वय निधून जात आहे. ही परिस्थिती सुधारण्याची गरज आहे आणि कुरआनाच्या मार्गदर्शनावर आचरण करण्याची निकड बाळगणारी ही.

५०. अल्लाह मोठी विशालता बाळगणारा आहे म्हणून त्याच्याशी अपेक्षा ठेवा की तो उपजिविकेत विस्तार व अधिकता निर्माण करील. तो ज्ञानी आहे म्हणून तो हे जाणतो की कोण सत्शीलतेचे जीवन इच्छितो व आर्थिक अडचणीत असतानाही वैवाहीक जबाबदारींचे ओझे शिरावर घेण्यास कोण तयार आहे.

५१. म्हणजे जे लोक खरोखर लाचारीमुळे निकाह करू शकत नसतील उदा. योग्य लग्न-संबंध न मिळल्याने किंवा निवासाची सोय न झाल्याने निकाह लांबणीवर टाकावा लागत आहे. तर त्यांनी धैर्य सोडू नये व जेव्हा अल्लाह त्यांची अगतिकता दूर करील तेव्हा त्यांनी वैवाहीक जीवन अंगिकारावे.

५२. मूळ शब्द 'मुकातबत' याशी अभिप्रेत तो लेखी करार होय जो एक गुलाम आपल्या मालकाशी आपल्या स्वातंत्र्यकरिता करतो. ज्यात मुदतीसोबतच रक्कम निर्धारीत असते व गुलामास ही संधी प्राप्त असते की त्याने अन्य एखाद्या जागी परिश्रम करून रक्कम आणावी व हप्त्याने आपल्या मालकास अदा करून गुलामीतून सुटका प्राप्त करावी.

राहीली ही गोष्ट की 'जर तुम्ही जाणत असाल की यांच्या अंगी भलेपणा आहे' तर याचा अर्थ असा की ज्या गुलामांना स्वतंत्र केल्याने समाजाकरिता एखाद्या उपद्रावाची भिती नसावी, किंबहुना चांगल्याचीच अपेक्षा असेल तर त्यांच्याशी लेखी-करार केला जावा या सावधगिरीची आवश्यकता विशेष: एवढ्यासाठीही होती की त्या वेळी गुलामांची मोठी संख्या यौद्धिक कैधांची होती.

गुलामांना स्वतंत्र करण्याकरिता इसेलामने ज्या पद्धती प्रचलीत केल्या त्यात लेखी-करार' ही सुद्धा एक महत्वपूर्ण पद्धत होती.

५३. हे प्रोत्साहन गुलामांच्या मदतीकरिता आहे, यासाठी की त्यांनी करारानुसार परिश्रमिक अदा करून स्वातंत्र्य प्राप्त करावे. ज्या लोकांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने विपुल धन सम्पत्ति प्रदान केली आहे त्यांनी माना सोडविण्यात आपले धन खर्ची घालावे.

५४. 'जेव्हा त्या स्वत:सत्शील राहू इच्छित असतील' हे वाक्य परिस्थितीस स्पष्ट करीत आहे. म्हणजे हे मोठे अत्याचारपूर्वक कृत्य होय की दासींना त्यांच्या मना विरुद्ध पेशा करण्यास भाग पाडले जावे. की त्या काळी दासींना त्यांचे मालक वेशा-वृत्ती करिता विवश करीत यासाठी की त्याद्वारे जी कमाई प्राप्त होईल ती मालकांना लाभेल या ठिकाणी या दुष्कर्मा पासून रोखले गेले आहे.

५५. म्हणजे जर दासींना व्यभिचाराकरिता विवश केले जाते तर अल्लाह त्यांच्या अगतिकतेकस पाहून त्यांना माफ करील व त्यांच्यावर दया करील. यावरून ही तात्विक बाब दिसून येते की ज्या सत्शील, सदाचारी स्त्रीवर व्यभिचारार्थ बलात्कार केला जाईल, मग ती दासी असो व स्वतंत्र, तिला ना व्यभिचारीणी म्हटले जाऊ शकते व ना ती एखाद्या शिक्षेस पात्र ठरते. तिच्यासाठी तर सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे क्षमा व कृपेचा वायदा आहे. मात्र या अटीवर की तिने या पाप कर्मापासून स्वत:ला वाचविण्याचा पूरेपूर प्रयत्न केला असावा.

राहिलेत व्यभिचारासाठी विवश करणारे लोक तर कुरआनाने त्यांना आखिरत मध्येच नव्हे तर या जगातही दु:खदायक शिक्षेस पात्र ठरविले आहे. जसे की या सूरह मायदा आयत क्र. १९ वरून स्पष्ट होते. तसेच सूरह मायदा आयत क्र. ३३ मध्ये ज्या शिक्षा समाजात उत्पात माजविणाऱ्यांकरिता ठेवल्या गेल्या आहेत त्यांच्या अनुसार शासनाला हा अधिकार पोहचतो की शासनाने स्त्रीयांना पळवून नेणाऱ्यांना,त्यांना व्यभिचारासाठी विवश करणाऱ्यांना आणि कुंटण खाने कायम करणाऱ्यांना सक्त व बोधदायक शिक्षा द्यावी जी मृत्यु-दण्डा पर्यंत असू शकते.

३४. आम्ही तुमच्याकडे स्पष्ट प्रमाणे अवतरीत केले आहेत आणि त्या लोकांची उदाहरणे ही जे तुमच्या पूर्वी होऊन गेले आहेत [५६] व ईश-भय बाळगणाऱ्यांकरिता उपदेश देखील.

وَلَقَدْ أَنزَلْنَا إِلَيْكُمْ آيَاتٍ مُّبَيِّنَاتٍ وَمَثَلًا مِّنَ الَّذِينَ
خَلَوْا مِن قَبْلِكُمْ وَمَوْعِظَةً لِّلْمُتَّقِينَ ﴿٣٤﴾

३५. अल्लाह आकाशांचा व जमीनीचा नूर' (प्रकाश) आहे.[५७] त्याच्या नूरचे उदाहरण असे आहे जणू एखाद्या कोनाड्यात दिवा असावा.[५८] दिवा कोचेच्या (कंदीलाच्या) आत असावा. काच अशी असावी की जणू चमकणारा तारा, या दिव्यास जैतूनच्या अशा शुभ-वृक्षाद्वारे जो ना पूर्वेकडील असावे ना पश्चिमेकडील, प्रज्वलीत केले जात असावे त्याचे तेल भडकण्याच्या बेतात असावे, आगीने त्यास स्पर्श केला नसला तरी. प्रकाशावर प्रकाश [५९] अल्लाह आपल्या नूर'चे ज्याला इच्छितो मार्गदर्शन प्रदान करतो. [६०] आणि अल्लाह लोकांसाठी उदाहरणे निवेदन करीतो. अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे [६१]

اللَّهُ نُورُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ مَثَلُ نُورِهِ كَمِشْكَاةٍ فِيهَا
مِصْبَاحٌ ۖ الْمِصْبَاحُ فِي زُجَاجَةٍ ۖ الزُّجَاجَةُ كَأَنَّهَا كَوْكَبٌ
دُرِّيٌّ يُوقَدُ مِن شَجَرَةٍ مُّبَارَكَةٍ زَيْتُونَةٍ لَّا شَرْقِيَّةٍ
وَلَا غَرْبِيَّةٍ يَكَادُ زَيْتُهَا يُضِيءُ وَلَوْ لَمْ تَمْسَسْهُ نَارٌ ۚ نُّورٌ عَلَىٰ نُورٍ ۗ
يَهْدِي اللَّهُ لِنُورِهِ مَن يَشَاءُ ۚ وَيَضْرِبُ اللَّهُ الْأَمْثَالَ لِلنَّاسِ ۗ
وَاللَّهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمٌ ﴿٣٥﴾

३६. (हा दिवा जळत आहे) अशा घरांमध्ये, ज्यांना अल्लाहने उच्च करण्याचा व ज्यात त्याच्या नाम:स्मरणाचा आदेश दिला आहे [६२]त्यात सकाळ-संध्याकाळ त्याची तस्बीह (गुण-गान) करीत असतात.

فِي بُيُوتٍ أَذِنَ اللَّهُ أَن تُرْفَعَ وَيُذْكَرَ فِيهَا اسْمُهُ يُسَبِّحُ لَهُ فِيهَا
بِالْغُدُوِّ وَالْآصَالِ ﴿٣٦﴾

३७. असे लोक ज्यांना व्यापार व खरेदी-विक्री अल्लाहच्या स्मरणापासून, नमाज कायम करण्यापासून व जकात (कर्तव्य-दान) देण्यापासून गाफील करीत नाही. [६३] ते त्या दिवसाचे भय बाळगतात ज्यात हृदय व डोळे पालथे होतील. [६४]

رِجَالٌ لَّا تُلْهِيهِمْ تِجَارَةٌ وَلَا بَيْعٌ عَن ذِكْرِ اللَّهِ وَإِقَامِ الصَّلَاةِ
وَإِيتَاءِ الزَّكَاةِ ۙ يَخَافُونَ يَوْمًا
تَتَقَلَّبُ فِيهِ الْقُلُوبُ وَالْأَبْصَارُ ﴿٣٧﴾

३८. अशासाठी की अल्लाहने त्यांना त्यांच्या उत्कृष्ट आचरणाचा मोबदला द्यावा आणि आपल्या कृपेने अधिक उपकृत करावे [६५] अल्लाह ज्याला इच्छितो अगणित देतो. [६६]

لِيَجْزِيَهُمُ اللَّهُ أَحْسَنَ مَا عَمِلُوا وَيَزِيدَهُم مِّن فَضْلِهِ ۗ وَاللَّهُ يَرْزُقُ
مَن يَشَاءُ بِغَيْرِ حِسَابٍ ﴿٣٨﴾

५६. हा संकेत त्या दुराचारी जनसमूहांच्या दुष्परिणतीकडे आहे ज्यांनी अल्लाहच्या आदेशांचे पालन केले नाही व आपल्या इच्छा आकांक्षांचे दास बनून वाईट गोष्टी पदरात घेत राहीले.

५७. नूर' एक अतिशय सूक्ष्म, सुंदर व पवित्र वस्तू आहे. तो स्वत:ही व्यक्त होता व आपल्या प्रकाशाने इतर वस्तूंनाही जाहीर करतो; अल्लाह आकाशांचा व जमीनीचा नूर असण्याचा अर्थ असा की तो या सृष्टीत पूर्णत: दृगोचर आहे. तो अतिशय सूक्ष्म आहे, सौदर्यशाली आहे, पवित्र व शुद्ध आहे आणि त्याचे अस्तित्व स्वयंभूतपणे व्यक्त आहे अन्यथा अल्लाह ना भौतिक अर्थाने नूर आहे आणि ना या भौतिक प्रकाशावर त्याचे अनुमान करणे उचित होय कारण,

لَيۡسَ كَمِثۡلِهٖ شَىۡءٌ ۚ (شوریٰ:١١)

''त्या सारखी कोणतीहि वस्तू नाही'' (शूरा-११) यास्तव एखाद्या तत्वज्ञानीय विवादात किंवा तावीली'च्या गुंतावळ्यात न अडकता अल्लाह आकाशांचा व जमीनीचा नूर असण्याचा जो साधासरळ अर्थ लक्षात येतो त्यावर समाधान बाळगले पाहिजे. अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांबाबत सल्फ सालेहीनची हीच रीत होती आणि हाच सलामतीचा मार्ग आहे.

५८. येथे जे उदाहरण दिले गेले आहे त्याचा उद्देश अल्लाहच्या नूर' या गुणवैशिष्ट्याची वास्तविक स्थिती वर्णन करणे नव्हे, कारण त्याची वास्तविक स्थिती जाणून घेणे मनुष्य बुद्धिच्या कल्पनाशक्ति पलीकडे आहे, किंबहुना उद्देश त्याच्या तेजाकडे मार्गदर्शन करणे हा होय, जो या सृष्टीत प्रकट आहे व ज्या द्वारे त्याचा परिचय प्राप्त होतो या परिचयात्मक तेजाची अद्‌भूतता व त्याच्या अभिव्यक्तिस एका उदाहरणाद्वारे स्पष्ट केले गेले आहे.

५९. कोनाड्यात ठेवलेला दिवा अधिक प्रकाशित होतो, मग जर तो काचेत म्हणजे कंदील मध्ये असेल तर त्याचा प्रकाश अधिक स्पष्ट होईल आणि काच जर चकाकणाऱ्या ताऱ्यासमान स्वच्छ असेल तर त्याचा प्रकाश अधिक तेजस्वी दिसेल आणि जर या दिव्यास जैतूनच्या तेलाने प्रज्वलीत केले जात असेल विशेषत: त्या जैतून-वृक्षाच्या तेलापासून जो मोकळ्या जागी असल्याने सकाळ संध्याकाळ त्यावर सूर्यकिरण पडत असावीत कारण अशा वृक्षाचे तेल अतिशय चमकदार असते, तर या स्थितीत त्या दिव्याचा प्रकाश अतिशय लख्ख असेल व तो प्रकाशावर प्रकाश देत असेल. या उदाहरणाचा हेतु नूर'च्या अत्याधिक चकाकीस स्पष्ट करणे होय.

हा अतिशय चकाकणारा प्रकाश अल्लाहशी परिचयाचा (मअरेफते इलाहीचा) नूर आहे. जो या सृष्टीत प्रकट आहे परंतु तो पाहण्यासाठी अंतर्दृष्टिची आवश्यकता आहे.

.....जैतूनच्या झाडास शुभ अशासाठी म्हटले गेले आहे की त्याचे फायदे अनेक आहेत व त्याचे तेल मोठे लाभदायक असते. हे झाड जर पर्वतावर किंवा सपाट मैदानावर अशा प्रकारे उभे असेल की त्याच्या पूर्वेस किंवा पश्चिमेस कसलाहि आड नसावा तर सूर्यकिरणे सकाळ संध्याकाळ त्याच्यावर पडतील. अशा प्रकारच्या जैतून-वृक्षाचे तेल अतिशय स्वच्छ इतके चमकदार असते की जणू भडकण्याच्या बेतात आहे.

जैतूनचे उदाहरण या ठिकाणी अल्लाह-परिचयाच्या (मअरिफतच्या) नूर संदर्भात निवेदले गेले आहे. परंतु अन्य एका पैलूने पाहिल्यास हे उदाहरण इस्लामलाही लागू पडते. कारण इस्लाम एक शुभ धर्म आहे आणि तो पौर्वात्य नाही किवा पाश्चिमात्य नाही किंबहूना सार्वभौमिक धर्म आहे. अशाच प्रकारे जैतूनच्या तेलाचे उदाहरण माणसाच्या सुस्वभावालाही लागू पडते. ज्याचे हृदय तौहीद (एकेश्वरवादा) चे गीत गाण्यास तत्पर असते आणि जेव्हा अल्लाहची वह्य त्यास तौहीदचा संदेश ऐकविते तेव्हा तो तिच्याशी अगदी स्वरमेळ साधतो. स्वभावाच्या मार्गदर्शनासोबत वहय' (कुरआना)चे मार्गदर्शन 'प्रकाशावर प्रकाश'च्या समान अर्थी ठरते.

६०. तात्पर्य वर ज्या नूरचे उदाहरण प्रस्तुत केले गेले आहे त्याचा संबंध मार्गदर्शनाशी आहे. म्हणून याशी अभिप्रेत अल्लाहशी परिचयाचा नूरच होय. आणि अल्लाहशी परिचयाचा नूर असा आहे जो संपूर्ण तेजाने झळकल्या नंतरही अशाच लोकांना दिसून येतो जे अंतर्दृष्टिने पाहतात. अल्लाह अशाच लोकांचे मार्गदर्शन करतो व अशाच लोकांना अल्लाहचा परिचय (मअरिफत) प्राप्त होतो.

नूर विषयक आयती चा या सूरह मध्ये, किंबहुना संपूर्ण कुरआनात जे स्थान आहे त्याची उपमा जणू एखाद्या आलीशान महालात तेजस्वी रत्न जडलेले असावे अल्लाहच्या परिचयाच्या नूरने जेव्हा हृदयात ईमानाचे तेज निर्माण होते तेव्हा ईमान बाळगणाऱ्याचे संपूर्ण जीवन तेजस्वी होते. गृहस्थ वा कौटुंबिक जीवन असो किंवा व्यक्तिगत व सामूहीक जीवन असो ईमानच्या तेजाने जीवनाचे प्रत्येक क्षेत्र उज्वल होते.

६१. म्हणजे अल्लाहने जे उदाहरण फर्माविले आहे ते ज्ञानाच्या आधारे आहे यास्तव ते अगदी योग्य आहे व जी गोष्ट या उदाहरणाद्वारे स्पष्ट केली गेली आहे ती परिपूर्ण वस्तुस्थिती आहे.

६२. अभिप्रेत मस्जिदी होत व यांना उंच करण्याचा अर्थ उभारणे असाही आहे व त्यांचा आदर करणे असा ही, तसेच मस्जिदीच्या इमारतीस योग्य मर्यादेप्रेत उंचावणे असाही, अशासाठी की मस्जिदींच्या उभारणीस हदीस वचनात जन्नत-पात्र बनविणारे कर्म ठरविले गेले आहे.

مَنْ بَنٰى لِلّٰہِ مَسْجِدًا بَنَی اللّٰہُ لَہٗ بَیْتًا فِی الْجَنَّۃِ۔

(مشکوٰۃ کتاب الصلوٰۃ بحوالہ صحیحین)

''ज्याने अल्लाह करिता मस्जिद बनविली, अल्लाह त्याच्यासाठी जन्नत मध्ये घर बनवील''. (मिश्कात किताबुरसलाम-हवाला सहीहैन)

आणि मस्जिदीचा आदर करण्यात जेथे तिला स्वच्छ पवित्र राखणे, तिच्यात स्वच्छ शुद्ध अवस्थेत प्रवेश करणे, त्या ठिकाणी खरेदी विक्री न करणे व अशी कोणतीही गोष्ट न करणे जी मस्जिदीच्या शिष्टाचाराविरुद्ध असावी इ. गोष्टी सामील आहेत, तिथे ही गोष्ट सामील आहे की ना मस्जिदीच्या आत एखाद्याची कबर बनविली जावी व ना एखाद्या कबरीवर एखादी मसजीद उभारली जावी कारण ही गोष्ट मस्जिदीच्या पावित्र्याच्या अगदी विपरीत आहे हदीस वचनातील उल्लेखानुसार:-

لَعَنَ اللّٰہُ الْیَھُوْدَ وَ النَّصَارٰی اِتَّخَذُوْا قُبُوْرَ اَنْبِیَائِھِمْ مَسَاجِدَ۔ (مشکوٰۃ کتاب الصلوٰۃ بحوالہ صحیحین)

''अल्लाहतर्फे यहूदी व ख्रिश्चनांचा धि:कार असो. त्यांनी आपल्या पैगंबरांच्या कबरींना मस्जिद बनविले.'' (मिश्कात, किताबुस्सलात, हवाला सहीहैन)

आणि मस्जिदींच्या उभारणीचा हेतु हा आहे की त्यांच्यात अल्लाहचे नाम:स्मरण व्हावे म्हणजे त्यात अल्लाहच्याच नावाचे वर्चस्व उंच व्हावे कारण मस्जिदी अल्लाहच्या उपासनेकरिता खास करून आहेत. काही अडाणी मुसलमान आपल्या पीर दस्तगीरालाही मस्जिदीत पुकारण्यास मागेपुढे पहात नाही. त्यांच्या अनेकेश्वरवादीय प्रार्थना मस्जिदीच्या पावित्र्यास वाईटरित्या नष्ट करतात.

६३. वरील आयतींमध्ये गृह-प्रवेशाच्या शिष्टाचारासंबंधी व गृहस्थ जीवनाविषयी अल्लाहचे आदेश निवेदिले गेले होते आणि या आयतीत अल्लाहच्या घराचे शिष्टाचार निवेदिले गेले आहेत. म्हणजे जेव्हा घरांचा उल्लेख केला गेला तेव्हा रोख अल्लाहच्या घरांकडे वळविला गेला आहे आणि कुरानाच्या प्रशिक्षणाची हीच पद्धत आहे की तो बुद्धीला सामान्याकडून महानतेकडे आणि फांदीकडून मूळाकडे वळवितो.यास्तव जेव्हा पोषाखाचा उल्लेख केला गेला तेव्हा बुद्धीला ईश भयाच्या पोषाखाकडे वळविले गेले आहे. (सूरह अअराफ-आयत-२६)

उपरोकत आयतीत अल्लाहच्या उपासना गृहांचा उल्लेख केला गेला जेथून त्याच्या तेजाची किरणे बाहेर पडत आहेत आणि या आयतीत अशा लोकांचा उल्लेख केला जात आहे. जे या नूरपासून लाभ घेतात. त्यांचा मूलभूत गुणधर्म असा की अर्थोपार्जनाची धावपळ त्यांना अल्लाहच्या स्मरणापासून गाफील ठेवीत नाही. ते आपल्या व्यवसायिक व्यस्तता व क्रय-विक्रयाचे मामले ठरवित असतांनाही अल्लाहचे स्मरण राखतात. नमाज वक्तशीरपणे अदा करतात आणि जकात अदा करण्यात कुचराई करीत नाही. या ठिकाणी ही गोष्ट आपोआप स्पष्ट होत आहे की जो मनुष्य व्यावसायिक व्यस्ततेत अल्लाहचे स्मरण राखील तो हलाल उपजिविकेसाठीच प्रयत्नशील राहील.

आज मुसलमानांची दशा मोठी खेदजनक आहे. कितीतरी लोक व्यावसायिक व्यस्तता असताना नमाज वेळेवर अदा करीत नाही आणि कितीतरी असे आहेत की ज्यांना नमाज पढण्यास सवडच नाही जणू नमाज देखील फुरसतीचे काम आहे व कामधंद्याला यावर प्राधान्य आहे. ही विचारसरणी पूर्णपणे ऐहीकवादीच होय. अशा दुराचारी लोकांना नमाज कायम करण्याचे सद्भाग्य कशा प्रकारे लाभेल !

६४. म्हणजे कियामतीच्या दिवसाच्या दहशतीमुळे ना हृदय ठिकाणावर राहील ना डोळे.

ईमान बाळगणारे या दिवसाच्या भितीने भयकंपित राहतात व ही गोष्ट त्यांना गंभीर बनविते व त्यांच्या अंगी जबाबदारीची जाणीव निर्माण होते तेव्हा तो अल्लाहच्या आज्ञा पालनाचा मार्ग अंगिकारतो.

६५. म्हणजे अल्लाहचे हे दास आपल्या अंगी जे गुणवैशिष्ट्ये निर्माण करतात तर त्याचे फळ त्यांना हे मिळेल की त्यांची जी उत्कृष्ट कर्मे असतील त्यांना स्तर ठरवून मोबदला प्रदान केला जाईल. अधिक अल्लाह आपल्या विशेष कृपेने त्यांना उपकृत करील.

६६. म्हणजे एवढे प्रदान करतो की त्याचे अनुमान केले जाऊ शकत नाही. तो प्रदान करण्यात अगदी उदार आहे आणि ज्या बक्षिसांनी तो आपल्या या विशेष दासांना उपकृत करील त्याची कल्पना ते या मर्त्य जगात करू शकत नाही.

**किंवा त्याचे उदाहरण असे आहे जणू अथांग सागरातील अंध:कार, ज्यास लाटेवर लाट झाकीत असावी व त्यावर ढग.अंध:कारावर अंध:कार असावा जर आपला हात बाहेर काढील तर तो ही पाहणे अशक्य व्हावे. ज्याला अल्लाह नूर (प्रकाश) प्रदान करणार नाही त्याच्यासाठी कोणताही नूर नाही.(अल-कुर्आन)**

३९. ज्या लोकांनी कुफ्र केले [६७] त्यांच्या आचरणाचे उदाहरण असे आहे जणू वाळवंटात मृगजळ की तहानलेल्याने त्यास पाणी समजावे. येथपावेतो की जेव्हा तो त्याजवळ पोहचला तेव्हा काहीच आढळले नाही, परंतु अल्लाहचे अस्तित्व तेथे आढळून आले आणि त्याने त्याचा हिशेब पूरेपूर चुकता केला. [६८] आणि अल्लाह हिशेब चुकता करण्यात अतिशिघ्र आहे.[६९]

وَالَّذِينَ كَفَرُوٓا أَعْمَالُهُمْ كَسَرَابٍ بِقِيعَةٍ يَحْسَبُهُ الظَّمْاٰنُ
مَآءً حَتّٰىٓ إِذَا جَآءَهُ لَمْ يَجِدْهُ شَيْـًٔا وَّوَجَدَ اللّٰهَ عِنْدَهُ
فَوَفّٰىهُ حِسَابَهُ ۗ وَاللّٰهُ سَرِيعُ الْحِسَابِ ﴿٣٩﴾

४०. किंवा त्याचे उदाहरण असे आहे जणू अथांग सागरातील अंधःकार, ज्यास लाटेवर लाट झाकीत असावी व त्यावर ढग-अंधःकारावर अंधःकार असावा जर आपला हात बाहेर काढील तर तो ही पाहणे अशक्य व्हावे. [७०] ज्याला अल्लाह नूर (प्रकाश) प्रदान करणार नाही त्याच्यासाठी कोणताही नूर नाही.[७१]

أَوْ كَظُلُمٰتٍ فِي بَحْرٍ لُّجِّيٍّ يَّغْشٰىهُ مَوْجٌ مِّنْ فَوْقِهِ مَوْجٌ مِّنْ فَوْقِهِ
سَحَابٌ ۗ ظُلُمٰتٌ بَعْضُهَا فَوْقَ بَعْضٍ ۗ إِذَآ أَخْرَجَ يَدَهُ لَمْ يَكَدْ
يَرٰىهَا ۗ وَمَنْ لَّمْ يَجْعَلِ اللّٰهُ لَهُ نُوْرًا فَمَا لَهُ مِنْ نُّوْرٍ ﴿٤٠﴾

४१. काय तुम्ही पाहत नाही [७२] की जे आकाशांत व जमीनीवर आहेत ते सर्व अल्लाहचीच तस्बीह (गुण गान) करतात आणि पक्षीही पंख पसरवित. प्रत्येकास आपली नमाज व तस्बीह माहित आहे. [७३] आणि ते जे काही करतात त्यास अल्लाह जाणून आहे.

أَلَمْ تَرَ أَنَّ اللّٰهَ يُسَبِّحُ لَهُ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ وَالطَّيْرُ
صٰٓفّٰتٍ ۗ كُلٌّ قَدْ عَلِمَ صَلَاتَهُ وَتَسْبِيحَهُ ۗ وَاللّٰهُ عَلِيمٌ بِمَا يَفْعَلُونَ ﴿٤١﴾

४२. आणि अल्लाह करिताच आहे आकाशांची व जमीनीची राज्यसत्ता. [७४] आणि अल्लाहकडेच सर्वांना परतावयाचे आहे.

وَلِلّٰهِ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ ۚ وَإِلَى اللّٰهِ الْمَصِيرُ ﴿٤٢﴾

४३. काय तुम्ही पाहत नाही की अल्लाह ढगांना हाकत नेतो, मग त्यांना परस्पर मिळवतो. मग त्यांचे थरावर थर रचतो मग तुम्ही पाहता की त्यांच्यामधून पावसाचे थेंब बाहेर पडतात. [७५] आणि तो आकाशातून गारा वर्षवितो त्या पर्वतावरून जे त्यात आहेत [७६] मग ज्यावर इच्छितो संकट अवतरीत करतो [७७] व ज्याला इच्छितो त्या संकटापासून वाचवितो. त्याच्या वीजेची चमक अशी (प्रखर) असते की दृष्टीला निःष्प्रभ करील.[७८]

أَلَمْ تَرَ أَنَّ اللّٰهَ يُزْجِي سَحَابًا ثُمَّ يُؤَلِّفُ بَيْنَهُ ثُمَّ يَجْعَلُهُ رُكَامًا فَتَرَى
الْوَدْقَ يَخْرُجُ مِنْ خِلٰلِهِ ۚ وَيُنَزِّلُ مِنَ السَّمَآءِ مِنْ جِبَالٍ فِيهَا مِنْ
بَرَدٍ فَيُصِيبُ بِهِ مَنْ يَّشَآءُ وَيَصْرِفُهُ عَنْ مَّنْ يَّشَآءُ ۖ يَكَادُ
سَنَا بَرْقِهِ يَذْهَبُ بِالْأَبْصَارِ ﴿٤٣﴾

६७. कुरआनाच्या परिभाषेत कुफ्र केवळ हे नव्हे की माणसाने ईश्वराच्या अस्तित्वाचा इन्कार करावा, किंबहुना ईश्वराला मानत असतांना त्याच्या गुणविशेषांचा इन्कार करणे किंवा एखाद्यास त्याचा सहभागी ठरविणे किंवा इतरास सहभागी केल्याविना त्याच्या उपासनेस नकार दर्शविणे. त्याच्या पैगंबरां व ग्रंथांपैकी एखाद्यास न मानणे, त्याच्या मार्गदर्शनास कबूल न करणे, त्याचे आज्ञापालन व त्याच्या ईश आदेशांना मानण्यास इन्कार करणे व आखिरत वर विश्वास न ठेवणे हे ही कुफ्र होय. म्हणून या गैर समजूतीत राहू नये की जो मनुष्य अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करणारा असेल तोच काफीर होय. किंबहुना असा मनुष्यही काफीर होय जो ईश्वराला मानत असतांनाही अशा प्रकारे मानत नाही ज्या प्रकारे मानण्याचा आदेश अल्लाहने कुरआनात दिला आहे.

६८. काफीरांच्या आचरणात ते समस्त आचरण सामील आहे ज़े ईश्वर व धर्माच्या आधारावर ते करतात. उदाहरणार्थ अनेकेश्वर वाद्यांचे दान करणे, खैराती (दानधर्मार्थ) संस्था कायम करणे, लोकहिताची कामे वगैरे आणि अरब देशातील अनेकेश्वरवादी तर हज्ज देखील करीत होते व जेथपावेतो यहूदी व ख्रिश्चनांचा संबंध आहे ते आपल्या पद्धतीनुसार अल्लाहची उपासनाही करतात आणि आकाशातून अवतरलेल्या शरीअतीच्या काही गोष्टींवर ही आचरण करतात. तद्वतच जे मुसलमान मुनाफिक (दांभिक आहेत ते कधीकधी नमाजही पढतात व इतर धार्मिक कार्यातही सहभागी होतात ही सर्व कामे सत्कर्मे असली तरी कुफ्रच्या घाणीने बरबटलेले असतात, म्हणून ती सर्व कर्मे निरर्थक असतात आणि त्यांचे कोणतेही फळ सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या येथे मिळणार नाही. आणि ना त्यांच्या त्या कारनाम्यांचा काही मोबदला त्यांना लाभेल जे राष्ट्र व देशासाठी त्यांनी केले आहेत.

त्यांचे आचरण परिणाम शून्य असण्यास येथे मृगजळाच्या उदाहरणाने स्पष्ट केले गेले आहे. ज्याप्रमाणे एक तहानलेला मनुष्य वाळवंटात मृगजळास पाहून त्यास जलाशय समजून व या आशेवर तेथपर्यंत जातो की आपली तहान भागवावी. पण तेथे पोहचताच आपली फसगत झाल्याचे त्याच्या लक्षात येते. तद्वतच काफीर जर असे समजतात की मेल्यानंतर शिक्षा व मोबदल्याचा मामला उद्भवलाच तर त्यांच्या या आचरणाचा मोबदला त्यांना अल्लाह जवळ लाभेल तर हा त्यांचा केवळ भ्रम आहे. कियामतीच्या दिवशी त्यांना कळून येईल की त्यांनी आपल्या आचरणासंबंधी ज्या अपेक्षा बाळगल्या होत्या त्यांची वास्तविकता मृगजळाहून अधिक काही नाही. शिक्षा व मोबदल्याच्या दिवशी त्यांना अल्लाहचे अस्तित्व आढळून येईल आणि तो त्यांच्या आचरणाचा हिशेब पूर्ण न्यायाने अदा करील.

६९. कियामतीच्या दिवशी अब्जावधी व खरगावधी मामसांचा हिशेब चुकता करण्यात अल्लाहला काहीच उशीर लागणार नाही.

७०. हे दुसरे उदाहरण काफीरांच्या काही कळत नसतानाही सर्वज्ञ असण्या संबंधीचे आहे. अज्ञान रुपी अंध:काराचे थरावर थर त्याच्या भोवती इतके साचले आहेत की त्यांना काहीच सुचत नाही.

७१. स्पष्ट झाले की ज्याला अल्लाह तर्फे प्रकाश लाभत नाही त्याला मग कोठूनही प्रकाश लाभत नाही. त्याच्यासाठी ही गोष्ट भाग्यलेख ठरते की तो अंध:कारात इतस्त: भटकत राहावा.

७२. आता त्या निशाण्याचे वर्णन केले जात आहे ज्यांच्यावर विचार चिंतन केल्यास अल्लाहचा परिचय प्राप्त होतो.

७३. 'पाहत नाही' या ठिकाणी 'विचार चिंतन करीत नाही' या अर्थाने आहे. या वस्तुस्थितीवर सखोल विचार करण्याचे आवाहन केले जात आहे की आकाशांमधील ईशनिर्मिती असो किंवा जमीनीवरील, सर्व अल्लाहचीच पवित्रता व त्याचे गुण-गान करतात. मग ते फरिशते असोत अथवा अन्य एखादी सजीव निर्मिती, सर्व आपापल्या पद्धतीनुसार नमाजही पढतात व तस्बीह (गुणगान) देखील करतात. येथपावेतो की अवकाशात पक्षी जे पंख पसरवितात ते अल्लाहपुढे नतमस्तक होण्याचेच लक्षण होय कोकीळेचे कूहू कूहू , बुलबुल पक्षाचे गीत-गायन, कोंबड्याचे आरवणे व चिमण्यांची चिवचिव यात-अल्लाहच्या गुणगानाचा ध्वनि ऐकू येतो. मात्र या अटीवर की माणसाला वास्तवतेचा स्वर ओळखता यावा. प्रात:काळी चिमण्या जेव्हा झाडावर एकत्र होऊन चिवचिव करु लागतात तेव्हा असे वाटते की त्या आपल्या पालन कर्त्याचे गुण-गान करण्यात अगदी रममाण आहेत जणू प्रात: कालीन नमाज पढण्यात मग्न आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. ५८ व सूरह हज्ज टीप क्र. ३२.

७४. अल्लाह अन्य कोणाच्याही सहभागाशिवाय संपूर्ण सृष्टीचा एकमेव बादशहा आहे. ही गोष्ट एक स्पष्ट वस्तुस्थिती आहे. परंतु अनेकेश्वरवादी त्याच्या सामर्थ्याधिकारात इतरांना सहभागी ठरवितात आणि आश्चर्याची बाब अशी की काही मुसलमान, की ज्यांच्या रक्तात 'बिदअत' (धर्मात नव्या गोष्टी निर्माण करणे) भिनली आहे ते अल्लाहला बादशाहा ठरवितात तर पैगंबराना त्याचा प्रधानमंत्री. यास्तव एका बिदअती भाष्यात पुढील उल्लेख आहे:-

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ईश-साम्राज्याचे जणू पंतप्रधान होत' (मुख्तसर तफसीर नईमी पृ. ५२७) अल्लाह रक्षण करो अशा बिदअतपूर्ण भाष्या पासून !

७५. पावसाळी ढगांची ही व्यवस्था सर्व सामान्य अवलोकनात येणारी गोष्ट आहे परंतु जर मनुष्य विमानात बसून प्रवास करीत

आहे तर तो या गोष्टीचे चांगल्या प्रकारे अवलोकन करतो. त्याला असे वाटते की ढगांचा एक महासागर आहे जो जमीनीवर आच्छादित आहे. तो हेही पाहतो की ढग इकडून तिकडून येऊन वेगाने आपसात मिसळतात मग त्यांचा थरावर थर जमत जाण्याचा क्रम तर कित्येक मैली उंची पावेतो असतो. आणि आश्र्चाची गोष्ट अशी की ढग खाली पाणी वर्षवित असतात व विमान त्यांच्यावरून जात असते. हे आवाहन एक प्रकारे वैचारीक आवाहन करते आणि माणसाने विचार चिंतन केल्यास ही गोष्ट सहजगत्या लक्षात येऊ शकते की ही सर्व कामे एका योजनेनुसार होत आहेत आणि हे कार्य त्या शक्तिचे आहे जिची ओळख संपूर्ण सृष्टीला आहे.

७६. येथे आकाशाशी अभिप्रेत उंची होय. उंचीवर अत्याधिक थंड हवेमुळे ढग बर्फ (Snow) युक्त होतात आणि ते पहाडांसमान असतात. मग या बर्फशीला पासून हिमदृष्टि होऊ लागते.

७७. काही वेळा हिमवृष्टि वादळाचे स्वरूप धारण करते आणि त्यामुळे फार जबरदस्त नुकसान होते. सदरहू भाष्यकारला काही वर्षा पूर्वी दुबई येथे हिमवृष्टीचे वादळ पाहण्याची संधी लाभली. बर्फाचे गोळे वरून अशा प्रकारे पडत होते जणू मशीन गन मधून गोळ्यांचा वर्षाव होत आहे व गोळे पाहून अशी शंका वाटत होती की एखाद्या कारखान्यात तयार केले गेले आहेत. भाष्याकारानी धावत जाऊन एका दुकानाचा आश्रय घेतला व तेथूनच हे भयावह दृश्य पहात होते. आणि अल्लाहशी सलामतीची दुआ करीत होते. नंतर कळाले की त्या भयंकर हिमवृष्टिमुळे फार मोठे नुकसान झाले आणि कितीतरी पायी चालणारे लोक त्याच्या तडाख्यात सापडले. अशा घटना माणसाचे डोळे उघडविण्यास पुरेशा आहेत.

७८. म्हणजे वीजेची चमक दृष्टीला निस्तेज करणारी असते.

**काय यांच्या हृदयात विकृति आहे किंवा हे संशयात पडले आहेत किंवा यांना हे भय जाणवते की अल्लाह व त्याचा रसूल यांच्याशी अन्याय करतील ? खरी गोष्ट अशी की हे लोक स्वत:च अत्याचारी आहेत.(अल-क़ुर्आन)**

४४. अल्लाहच रात्र व दिवसाचा उलटफेर करतो.[७९] यात बोध आहे त्या लोकांकरिता जे डोळस दृष्टि बाळगतात.

يُقَلِّبُ اللّٰهُ الَّيْلَ وَالنَّهَارَ ۗ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَعِبْرَةً لِّاُولِي الْاَبْصَارِ ﴿٤٤﴾

४५. आणि अल्लाहने प्रत्येक सजीवास पाण्याद्वारे निर्माण केले.[८०] यांच्या पैकी कोणी पोटाचा आधार घेऊन चालतो[८१] तर कोणी दोन पायांवर[८२] आणि कोणी चार पायांवर.[८३] अल्लाह जे इच्छितो निर्माण करतो.[८४] नि:संशय अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

وَاللّٰهُ خَلَقَ كُلَّ دَآبَّةٍ مِّنْ مَّآءٍ ۚ فَمِنْهُمْ مَّنْ يَّمْشِيْ عَلٰى بَطْنِهٖ ۚ وَمِنْهُمْ
مَّنْ يَّمْشِيْ عَلٰى رِجْلَيْنِ ۚ وَمِنْهُمْ مَّنْ يَّمْشِيْ عَلٰٓى اَرْبَعٍ ۗ يَخْلُقُ اللّٰهُ مَا
يَشَآءُ ۗ اِنَّ اللّٰهَ عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿٤٥﴾

४६. आम्ही स्पष्ट करणाऱ्या आयती अवतरीत केल्या आहेत आणि अल्लाह ज्याला इच्छितो सरळ मार्गाचे मार्गदर्शन करतो.[८५]

لَقَدْ اَنْزَلْنَآ اٰيٰتٍ مُّبَيِّنٰتٍ ۗ وَاللّٰهُ يَهْدِيْ مَنْ يَّشَآءُ اِلٰى
صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿٤٦﴾

४७. हे म्हणतात,आम्ही अल्लाह व रसूल वर ईमान बाळगले आणि आम्ही आज्ञापालन अंगिकारले, तरीही त्यांच्यातला एक समूह आज्ञाभंग करतो. हे लोक कदापि ईमान बाळगणारे नव्हेत.[८६]

وَيَقُوْلُوْنَ اٰمَنَّا بِاللّٰهِ وَبِالرَّسُوْلِ وَاَطَعْنَا ثُمَّ يَتَوَلّٰى فَرِيْقٌ
مِّنْهُمْ مِّنْۢ بَعْدِ ذٰلِكَ ۗ وَمَآ اُولٰٓئِكَ بِالْمُؤْمِنِيْنَ ﴿٤٧﴾

४८. जेव्हा त्यांना अल्लाह व त्याच्या प्रेषिताकडे बोलाविले जाते. अशासाठी की प्रेषिताने त्यांच्या दरम्यान फैसला करावा तेव्हा त्यांच्या पैकी एक समूह उपेक्षा करतो.[८७]

وَاِذَا دُعُوْٓا اِلَى اللّٰهِ وَرَسُوْلِهٖ لِيَحْكُمَ بَيْنَهُمْ اِذَا فَرِيْقٌ
مِّنْهُمْ مُّعْرِضُوْنَ ﴿٤٨﴾

४९. परंतु जर हक्क त्यांच्या बाजूला असेल तर पैगंबरांजवळ मोठे आज्ञाधारक बनून येतात.[८८]

وَاِنْ يَّكُنْ لَّهُمُ الْحَقُّ يَاْتُوْٓا اِلَيْهِ مُذْعِنِيْنَ ﴿٤٩﴾

५०. काय यांच्या हृदयात विकृति आहे किंवा हे संशयात पडले आहेत किंवा यांना हे भय जाणवते की अल्लाह व त्याचा रसूल यांच्याशी अन्याय करतील ? खरी गोष्ट अशी की हे लोक स्वत:च अत्याचारी आहेत.[८९]

اَفِيْ قُلُوْبِهِمْ مَّرَضٌ اَمِ ارْتَابُوْٓا اَمْ يَخَافُوْنَ اَنْ يَّحِيْفَ اللّٰهُ
عَلَيْهِمْ وَرَسُوْلُهٗ ۚ بَلْ اُولٰٓئِكَ هُمُ الظّٰلِمُوْنَ ﴿٥٠﴾

७९. खगोल शास्त्रानुसार रात्र व दिवसाची परिक्रमा पृथ्वीच्या केंद्रीय गती परिणाम होय. परंतु प्रश्न हा उद्‌भवतो की पृथ्वीला ही गती देणारा असा कोण आहे की प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतरही ना तिच्या गतीत फरक पडला आणि रात्र व दिवसाच्या वेळेत काही स्थित्यंतर घडून आले.

८०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र. ३५

८१. पोटावर सरपटत चालणाऱ्या सजीवांचे उदाहरण साप होय व पाण्यात पोहणारा मासाही होय.

८२. दोन पायांवर चालणारे सजीव म्हणजे मनुष्य व पक्षी होत.

८३. चार पाय बाळगणाऱ्या सजीवांमध्ये गुरेही आहेत व जंगली जनावरे देखील.

८४. म्हणजे निर्मितीच्या या विविधतेत अल्लाहचाच संकल्प कार्यान्वित आहे.

८५. अर्थात या आयती तौहीद (एकेश्वरवादा) ला स्पष्ट करणाऱ्या आहेत. परंतु यापासून तेच लोक मार्गदर्शन प्राप्त करतील जे अल्लाहच्या मर्जीनुसार मार्गदर्शनास पात्र ठरतील आणि अल्लाहची मर्जी बुद्धिकौशल्य युक्त फैसलेच करते.

८६. ही त्या लोकांची दशा निवेदिली जात आहे, जे ईमान बाळगण्याचा आज्ञापालनाकडे पाठ फिरवित. अर्थात हे ईमानाच्या निकडीच्या अगदी विपरीत होते. म्हणून त्यांच्याविषयी फर्माविले गेले की खरे पाहता ते मोमीन (ईमान बाळगणारे) नाहीत. दुसऱ्या शब्दात असे लोक मुनाफीक (दांभिक) होत.

तात्पर्य ईमान व आज्ञापालनाशी इन्कार दोन भिन्न गोष्टी होत. ज्या हृदयात ईमान असेल त्याचा प्रभाव आचरणाने व्यक्त होईल. तात्पुरते एखादा अपराध हातून घडणे ही वेगळी गोष्ट आहे व सुरवातीपासूनच अल्लाह व त्याच्या रसूलच्या आज्ञापालनाचा इन्कार करणे वा त्यांस अनावश्यक समजणे ही वेगळी गोष्ट होय. पहिली गोष्ट अपराध होय व दुसरी कुफ्र.

आजकाल बहुतेक मुसलमान असे आहेत जे एकीकडे इस्लामशी श्रद्धा व्यक्त करतात तर दुसरीकडे कुरआन व प्रेषित आचरणाच्या (सुन्नाह) अनुसरणापासून अगदी स्वतंत्र आहेत. अज्ञानापायी हे लोक भ्रमात पडले आहेत. त्यांनी या आयतींवर विचार केल्यास ज्यात मुनाफीकांची अवस्था निवेदिली गेली आहे तर ईमानची हकीगत त्यांना कळून येईल व त्याना अल्लाह व रसूलच्या आज्ञापालनाची सुबुद्धि होईल.

८७. आपला तंटा रसूल जवळ घेऊन जाण्यास इन्कार करणे किंवा परस्पर तकरारींना कुरआन व प्रेषित आचरणा समक्ष प्रस्तुत करण्यास तयार न होणे एक दांभिक पणाचे कृत्य होय. ज्याचा खुलासा सूरह निसा टीप क्र. १२९ व १३४ मध्ये केला गेला आहे.

८८. म्हणजे जेव्हा त्यांना अनुमान असते की फैसला त्यांच्या हक्कात होईल तर शिरसावंद्य होऊन रसूलकडे धाव घेतात.

अगदी हीच अवस्था आजच्या काळातील दांभिकांची आहे. ते केवळ शरीअतीच्या अशा आदेशांना आत्मसात करतात ज्यांच्याशी त्यांचे लाभ निगडीत असतात परंतु याला संधीसाधुपणा म्हणतात येईल, शरीअतीचे पालन नव्हे.

८९. म्हणजे त्यांचे हे दांभिक पणाचे वागणे, एकतर या कारणास्तव आहे की त्यांच्या हृदयात दांभिकतेचा रोग आहे. म्हणून त्याचे बाह्य आचरण वेगळे व आंतरिक वेगळेच आहे. किंवा ते या संशयता पडले आहेत की हे आदेश ईश्वराचेच आहेत कि नाहीत? अथवा ते अल्लाह व त्याच्या रसूलकडून स्वत:साठी न्यायाची अपेक्षा बाळगत नाही म्हणून ते त्यांना हे भय जाणवते की त्यांचा कदाचित हक्क मारला जाईल यापैकी कोणतीहि गोष्ट असो, ईमानाच्या विपरित आहे. आणि खरी गोष्ट अशी की ते स्वत:च्याच हक्कात अत्याचारी झाले आहेत. म्हणजे इच्छा-भक्तिने त्यांना दुराचारी व स्वत:वर अत्याचार करणारे बनविले आहे.

५१. ईमान बाळगणाऱ्यांना तर जेव्हा अल्लाह व त्याच्या रसूला कडे बोलाविले जाते, यासाठी की रसूल ने त्यांच्या दरम्यान फैसला करावा तेव्हा म्हणतात आम्ही ऐकले व आज्ञापालन केले. [१०] सफल होणारे हेच लोक होत.

إِنَّمَا كَانَ قَوْلَ الْمُؤْمِنِينَ إِذَا دُعُوا إِلَى اللَّهِ وَرَسُولِهِ لِيَحْكُمَ
بَيْنَهُمْ أَنْ يَقُولُوا سَمِعْنَا وَأَطَعْنَا ۚ وَأُولَٰئِكَ هُمُ الْمُفْلِحُونَ ﴿٥١﴾

५२. आणि जे अल्लाह व त्याच्या रसूलचे आज्ञापालन करतील आणि अल्लाहचे भय बाळगतील व ईश भय अंगिकारतील तर तेच लोक मनोवांछित प्राप्त करणारे होत.[११]

وَمَنْ يُطِعِ اللَّهَ وَرَسُولَهُ وَيَخْشَ اللَّهَ وَيَتَّقْهِ فَأُولَٰئِكَ
هُمُ الْفَائِزُونَ ﴿٥٢﴾

५३. हे अल्लाहच्या नावाने पक्क्या शपथा वाहतात की जर तुम्ही त्यांना आदेश दिला तर ते निघण्यास तत्पर होतील. [१२] त्यांना सांगा, शपथा वाहू नका. परिचित (चांगल्या) रीतीने आज्ञापालन केले पाहीजे. [१३] तुम्ही जे काही करता, त्याविषयी अल्लाह जाणकार आहे.

وَأَقْسَمُوا بِاللَّهِ جَهْدَ أَيْمَانِهِمْ لَئِنْ أَمَرْتَهُمْ لَيَخْرُجُنَّ ۖ قُلْ لَا
تُقْسِمُوا ۖ طَاعَةٌ مَعْرُوفَةٌ ۚ إِنَّ اللَّهَ خَبِيرٌ بِمَا تَعْمَلُونَ ﴿٥٣﴾

५४. सांगा अल्लाहचे आज्ञापालन करा व रसूलचे आज्ञापालन करा. [१४] परंतु जर तुम्ही अवज्ञा कराल तर (लक्षात ठेवा) रसूलवर ती जाबाबदारी आहे जिचा भार त्याच्यावर टाकला गेला आहे आणि तुमच्यावर ती जबाबदारी आहे जिचा भार तुमच्यावर टाकला गेला आहे. त्याचे आज्ञापालन कराल तर मार्गदर्शन प्राप्त कराल. आणि रसूलवर या खेरीज काहीच जबाबदारी नाही की स्पष्ट उघड (आदेश) पोहचवावेत.

قُلْ أَطِيعُوا اللَّهَ وَأَطِيعُوا الرَّسُولَ ۖ فَإِنْ تَوَلَّوْا فَإِنَّمَا عَلَيْهِ
مَا حُمِّلَ وَعَلَيْكُمْ مَا حُمِّلْتُمْ ۖ وَإِنْ تُطِيعُوهُ تَهْتَدُوا ۚ وَمَا عَلَى
الرَّسُولِ إِلَّا الْبَلَاغُ الْمُبِينُ ﴿٥٤﴾

५५. तुमच्यापैकी ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कृत्ये केली त्यांच्याशी अल्लाहने वायदा केला आहे की तो यांना जमीनीवर खिलाफत (सत्ताधिकार प्रदान करील ज्या प्रकारे त्या लोकांना प्रदान केली होती जे यांच्यापूर्वी होऊन गेले. आणि यांच्याकरिता यांच्या धर्मास, जो त्याने यांच्यासाठी पसंत केला आहे, दृढता प्रदान करील आणि त्यांच्या भयपूर्ण अवस्थेस शांती सुबत्तेत परिवर्तित करील, ते माझी उपासना करतील, अन्य एखाद्यास माझा सहभागी ठरविणार नाहीत आणि या नंतरही जे कुफ्र करतील तर असेच लोक दुराचारी होत.[१५]

وَعَدَ اللَّهُ الَّذِينَ آمَنُوا مِنْكُمْ وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ
لَيَسْتَخْلِفَنَّهُمْ فِي الْأَرْضِ كَمَا اسْتَخْلَفَ الَّذِينَ مِنْ قَبْلِهِمْ
وَلَيُمَكِّنَنَّ لَهُمْ دِينَهُمُ الَّذِي ارْتَضَىٰ لَهُمْ وَلَيُبَدِّلَنَّهُمْ مِنْ بَعْدِ
خَوْفِهِمْ أَمْنًا ۚ يَعْبُدُونَنِي لَا يُشْرِكُونَ بِي شَيْئًا ۚ وَمَنْ كَفَرَ
بَعْدَ ذَٰلِكَ فَأُولَٰئِكَ هُمُ الْفَاسِقُونَ ﴿٥٥﴾

९०. हे आचरण तर प्रमाणिक व निष्ठावंत मुसलमानांचे आहे, परंतु आजच्या मुसलमानांची वागणूक तर अशी आहे की ना ते अल्लाह व रसूलचे म्हणणे ऐकून घ्यावयास तयार आहेत, ना आज्ञापालनास. उचित आचरण अंगिकारलेल्या मुसलमानांची संख्या फारच कमी आहे.

स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे जे निवाडे सहीह हदीस द्वारे सिद्ध आहेत ते आम्हा सर्वांकरिता संबंधित गोष्टींसाठी असे आहेत की त्यांचे आज्ञापालन बंधनकारक ठरते. व हे निवाडे तात्विक मार्गदर्शनाची सामुग्री ही होय.

९१. म्हणजे सफल मनोरथ होण्याकरिता अल्लाह व त्याच्या रसूलचे आज्ञापालन अशा रीतीने आवश्यक आहे की हृदयात अल्लाहचे भय व अपराधापासून अलिप्त राहण्याची भावना असावी.

९२. अर्थात हे मुनाफीक शपथा वाहून विश्वास दर्शविण्याचा प्रयत्न करतात की, हे पैगंबर जर तुम्ही यांना जिहाद (लढाई) चा आदेश द्याल तर ते निश्चित तत्परतेने निघतील.

९३. तेच लोक शपथा अधिक वाहतात ज्यांचे चरित्र विश्वसनीय नसते. या ठिकाणी दांभिकांना उद्देश्यून म्हटले जात आहे की खोट्या शपथा वाहून आज्ञापालनाची शाश्वती देण्याऐवजी, आज्ञापालनाची जी सुपरिचित पद्धत आहे तिचा अंगिकार करा, खऱ्या व एकनिष्ठ मुसलमानांची हीच रीत आहे.

९४. या आयतींमध्ये अल्लाहच्या आज्ञा पालना सोबत पैगंबरांच्या आज्ञा पालनाची ही मोठी ताकीद केली गेली आहे व यास ईमानची निकड ठरविले गेले आहे. अल्लाहच्या आज्ञा पालनासाठी त्याच्या ग्रंथास अर्थात पवित्र कुरआनाचा दृढपणे अवलंब केला पाहिजे. आणि रसूल (पैगंबराच्या) आज्ञा पालनासाठी, त्यांच्या आचरणास जे त्यानी या जन-समूहात प्रचलीत केले व जे सहीह हदीस द्वारे सिद्ध ठरते त्याचा ही दृढतापूर्वक अवलंब केला पाहिजे.

९५. या आयतीत ईमान बाळगणाऱ्या करिता शुभ समाचार आहे व मुनाफिक लोकांना तंबी. मुनाफिक (दांभिक) या गोष्टीची वाट बघत होते की परिस्थिती कोणते स्वरुप धारण करते. त्यांना खबरदार केले गेले आहे की त्यांनी उगीच भ्रमात राहू नये. दहशत व युद्धाची ही स्थिती ज्यांने त्या काळी ईमान बाळगणाऱ्यांना तोंड द्यावे लागत होते, बाकी राहणार नाही. लवकरच त्यांना सत्ताधिकार प्रदान केला जाणार आहे व या भूमीवर इस्लामचे पूर्ण वर्चस्व होणार आहे.

इस्तिखलाफचा अर्थ खलीफा बनविणे असा आहे व खलीफाचा अर्थ सत्ताधिकाराचा स्वामी असा आहे.

लिसानुल अरब' या अरबी शब्दकोषानुसार:-

وَالْخِلَافَةُ الْإِمَارَة

'खिलाफतचा अर्थ सत्ता असा आहे' (लिसानुल अरब खंड ९ पृ. ८३)

कुरआनाच्या परिभाषेत खलीफा बनविण्याचा अर्थ सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे सत्ताधिकार प्रदान केला जाणे असा आहे आणि या सत्ताधिकाराचा हेतु सत्तेला त्याच्या शरीअती नुसार वापरणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे खलीफा परिपूर्ण: शासक (Absolute Monarch) नसतो, किंबहुना त्याचे स्थान सत्ताधिकारास अल्लाहची अनामत समजून वापरणाऱ्याचे असते. या अर्थाने एक पैगंबर ही अधिकार प्राप्त केल्यानंतर खलीफा असतो. यास्तव कुरआनात हजरत दाऊद यांना खलीफा म्हटले गेले आहे. (सूरह स्वाद. आयत २६)

सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा वायदा की तो सदाचारी मोमीनांना (ईमान बाळगणाऱ्यांना) राज्य सत्ता प्रदान करुन उपकृत करील, लवकरच पूर्ण झाला. मक्का विजय (रमजान हि. स. ८, इ. ६३०) हा सत्ताधिकाऱ्याचा शुभारंभ ठरला आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जीवनातच पूर्ण अरब देशात इस्लामची सत्ता प्रस्थापित झाली. मग खुलफाए राशेदीन यांच्या काळात दोन वैभवशाली साम्राज्ये फारस व रोम इस्लामच्या उभारणाऱ्या सामर्ध्याशी टक्कर घेऊन तुकडे तुकडे झाली आणि खिलाफतची हद्द इरान, इराक, सिरीया व इजिप्त पर्यंत विस्तृत झाली. मदीनेवर अनेकेश्वरवादी व काफीरांच्या हल्ल्याची जी टांगती तलवार लोंबकळत होती, ती अशा प्रकारे नामशेष झाली की राज्य-व्यवस्थेस इस्लामनुसार चालविण्यात व त्याच्या कायद्यांना लागू करण्यात कसलाच अडसर राहिला नव्हता. संपूर्ण अरब देशात तौहीद (एकेश्वरवादा) चे वर्चस्व झाले आणि शिर्कपासून अरब-भूमी अगदी स्वच्छ शुद्ध झाली. अशाप्रकारे खुलफाए राशेदीनचा काळ कुरआनच्या या वचनास खरा करणारा ठरला परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की या स्पष्ट वस्तुस्थिती नंतरही मुसलमानांचा एक गट (फिरका) तीन्ही खलीफांना (हजरत अबू बकर, हजरत उमर हजरत उस्मान यांना ) बळजबरीने हिरावून घेणारे ठरवून त्यांना दोषित ठरवितो. जर या फिरक्यांच्या लोकांनी या आयतींच्या प्रकाशात खिलाफत समस्येवर विचार केला तर ज्या सांप्रदायिक वादात ते गुरफटले आहेत त्याची वास्तविकता त्यांना स्पष्ट कळून येईल.

आयतीत हे जे फर्माविले गेले आहे की 'ज्या प्रकारे त्या लोकांना प्रदान केला गेला होता, जे यांच्या पूर्वी होऊन गेले' तर हा संकेत अल्लाहच्या या नियमाकडे आहे की जेव्हा एखाद्या प्रेषितास त्याच्या जन-समूहाने खोटे ठरविले आहे. त्यास नष्ट केले गेले आणि रसूल व त्याचा ईमान धारक साथीदारांना सत्ताधारी बनविले गेले. याची उदाहरणे हजरत नूह, हजरत हूद आणि हजरत सालेह व त्यांचे ईमान बाळगणारे साथीदार होत.

अशा प्रकारे बनी इस्राईल ला अर्ज मुकद्दस (पेलेस्टाइन) प्रदान केले गेले आणि हजरत दाऊद व हजरत सुलेमान द्वारा राज्यास व्यापक व दृढतम केले गेले.

'यानंतर जे कुफ्र करतील तर असेच लोक दुराचारी होत' याचा अर्थ असा की ईमान बाळगणाऱ्यांना खिलाफतीने जे उपकृत केले जाईल तर ही सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या वचनाची पूर्तता व त्याची असामान्य कृपा होईल. हे सर्व काही पहिल्या नंतरही जे लोक या ईश-देणगीची हेळसांड करतील व उपद्रव निर्माण करुन शांतीस अशांतीत बदलण्याचा, प्रयत्न करतील ते उघड दुराचारी ठरतील. हा जणू इशारा होता 'सबाई' उपद्रवाकडे जो हजरत उस्मानच्या खिलाफत काळात निर्माण झाला आणि ज्याने हजरत अली यांच्या खिलाफतीस पूर्णत: तावडीत घेतले.

राहीला हा प्रश्न की सत्ताधिकाराचा हा वायदा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या साथीदारांकरिता होता, किंवा हे नंतरच्या मुसलमानांकरिता ही आहे तर त्याचे उत्तर अल्लामा इब्ने तैमिय्या याने असे दिले:-

''हा वायदा त्या सर्वांकरिता आहे जो हा गुणधर्म बाळगतात जेव्हा पूर्वीच्या लोकांनी हा गुण आपल्या अंगी निर्माण केला तेव्हा अल्लाहने आपल्या वायद्यानुसार त्यांना खिलाफत पदाने उपकृत केले आणि त्यांच्यानंतर एक समूह आपले ईमान व सदाचाराच्या दृष्टीने यागुणविशेषाचा धारक झाला. तेव्हा जे आपल्या ईमानाबाबत परिपूर्ण व सदाचारी होते. त्यांना उल्लिखित खिलाफत प्रदान केली. आणि ज्यांच्या अंगी या दृष्टीने दोष व खराबी राहीलीत त्यांच्या सत्तेत ही विघ्न व दोष राहिला. हा त्या कृत्याचा मोबदला आहे तर जे लोक हे कृत्य करतील ते या मोबदल्यास पात्र ठरतील.'' (मजमुआ फतवा इब्ने तैमिया खं १८ पृ. ३०२)

नमाज कायम करा, जकात द्या व रसूलचे आज्ञापालन करा अशासाठी की तुम्हावर दया केली जावी. काफीरांविषयी असे समजू नका की ते आमच्या ताब्यातून निघून जातील. त्यांचे ठिकाण जहन्नम आहे आणि ते अतिशय वाईट ठिकाण होय. (अल-क़ुर्आन)

५६. नमाज कायम करा,जकात द्या व रसूलचे आज्ञापालन करा अशासाठी की तुम्हावर दया केली जावी.

وَأَقِيمُوا الصَّلَاةَ وَآتُوا الزَّكَاةَ وَأَطِيعُوا الرَّسُولَ لَعَلَّكُمْ
تُرْحَمُونَ ﴿٥٦﴾

५७. काफीरांविषयी असे समजू नका की ते आमच्या ताब्यातून निघून जातील. त्यांचे ठिकाण जहन्नम आहे आणि ते अतिशय वाईट ठिकाण होय.

لَا تَحْسَبَنَّ الَّذِينَ كَفَرُوا مُعْجِزِينَ فِي الْأَرْضِ ۚ وَمَأْوَاهُمُ
النَّارُ ۖ وَلَبِئْسَ الْمَصِيرُ ﴿٥٧﴾

५८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुमच्या अधीन असलेले दास व तुम्हा लोकांची ती मुले जी अजून पूर्ण वयास पोहचले नाहीत,त्यांनी तीन वेळा तुमच्याकडून परवानगी घेत जावी. फज्र (प्रात:कालीन) च्या नमाजपूर्वी, दुपारी, जेव्हा तुम्ही कपडे उतरवून ठेवता आणि ईशाच्या नमाज नंतर.ह्या तीन वेळी तुमच्याकर्ता पडद्याचे आहेत. या अतिरिक्त दुसऱ्या वेळात (परवानगी न घेता त्यांच्या येण्यात ) ना तुमच्यावर काही दोष आहे आणि ना त्यांच्यावर- तुमचे एकमेकांजवळ वारंवार येणे-जाणे होत असते. अशा प्रकारे अल्लाह तुमच्याकरिता आपल्या आयती स्पष्ट फर्मावितो [९६] आणि अल्लाह ज्ञानी व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[९७]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لِيَسْتَأْذِنكُمُ الَّذِينَ مَلَكَتْ أَيْمَانُكُمْ
وَالَّذِينَ لَمْ يَبْلُغُوا الْحُلُمَ مِنكُمْ ثَلَاثَ مَرَّاتٍ ۚ مِّن قَبْلِ
صَلَاةِ الْفَجْرِ وَحِينَ تَضَعُونَ ثِيَابَكُم مِّنَ الظَّهِيرَةِ
وَمِن بَعْدِ صَلَاةِ الْعِشَاءِ ۚ ثَلَاثُ عَوْرَاتٍ لَّكُمْ ۚ لَيْسَ عَلَيْكُمْ وَ
لَا عَلَيْهِمْ جُنَاحٌ بَعْدَهُنَّ ۚ طَوَّافُونَ عَلَيْكُم بَعْضُكُمْ عَلَىٰ
بَعْضٍ ۚ كَذَٰلِكَ يُبَيِّنُ اللَّهُ لَكُمُ الْآيَاتِ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٥٨﴾

५९. आणि जेव्हा तुम्हा लोकांची मुले जाणत्या वयास पोहचतील तर त्यांनी ही अशाच प्रकारे परवानगी घेत जावी जशी त्यांच्या पूर्वीचे (जाणत्या वयास पोहचणारे) परवानगी घेतात [९८]अशा प्रकारे अल्लाह आपले आदेश तुमच्या करिता स्पष्ट फर्मावितो, आणि अल्लाह ज्ञानी व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

وَإِذَا بَلَغَ الْأَطْفَالُ مِنكُمُ الْحُلُمَ فَلْيَسْتَأْذِنُوا كَمَا
اسْتَأْذَنَ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ ۚ كَذَٰلِكَ يُبَيِّنُ اللَّهُ لَكُمْ
آيَاتِهِ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٥٩﴾

६०. आणि त्या म्हताऱ्या स्त्रिया ज्या निकाहची आशा बाळगत नाहीत, त्यांनी जर आपले कपडे उतारुन ठेवलेत, तर त्यांच्यावर काही दोष नाही. [९९] मात्र या अटीवर की त्या आपल्या शृंगाराचे प्रदर्शन करणाऱ्या नसाव्यात.[१००] परंतु त्यांच्या हक्कात हेच अधिक चांगले आहे की या पासून अलिप्त रहावे. अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

وَالْقَوَاعِدُ مِنَ النِّسَاءِ اللَّاتِي لَا يَرْجُونَ نِكَاحًا فَلَيْسَ
عَلَيْهِنَّ جُنَاحٌ أَن يَضَعْنَ ثِيَابَهُنَّ غَيْرَ مُتَبَرِّجَاتٍ
بِزِينَةٍ ۖ وَأَن يَسْتَعْفِفْنَ خَيْرٌ لَّهُنَّ ۗ وَاللَّهُ سَمِيعٌ
عَلِيمٌ ﴿٦٠﴾

९६. तात्पर्य आयत विश्लेषणात्मक आहे. आयत क्र. २७ मध्ये घरात परवानगी घेऊन दाखल होण्याचा जो आदेश दिला गेला होता त्या संदर्भात या ठिकाणी हे स्पष्टीकरण दिले गेले की जेथपावेतो तुमच्या दास-दासी व अपरिक्व मुलांचा संबंध आहे त्यांचा ज्या अर्थी तुमच्याजवळ वारंवार ये-जा होत असते म्हणून प्रत्येक वेळी परवानगी घेणे त्यांना आवश्यक नाही परंतु तीन वेळा अशा आहेत ज्यात परवानगी घेण्याचे बंधन त्यांनीही पाळले पाहिजे. आणि त्या तीन वेळा तुमच्या पडद्याच्या आहेत. एक तर ईशानंतरची वेळ जेव्हा मनुष्य अंथरुणावर जातो. दुसरी फज्र नमाजच्या आधीची वेळ व तिसरी दुपारची वेळ जी वामकुक्षी (कैलूला)ची वेळ असते. विशेषत:उष्ण तापमानाच्या देशांसाठी, या ठराविक वेळी मनुष्य ज्या अर्थी आपल्या पत्नीजवळ एकांतात असतो किंवा अंगावर पुरेसे कपडे नसतात, म्हणून अजाण मुलांना ही या गोष्टीची सवय लावणे आवश्यक आहे की ते जर अशा वेळी आत येऊ इच्छितील तर परवानगी घेऊन यावे यावरुन हे स्पष्ट झाले की मुलांच्या उचित प्रशिक्षणाची काळजी घेतली पाहीजे व त्यांच्यासमोर असे काही होता कामा नये ज्याचा वाईट परिणाम त्यांच्या चारित्र्यावर व्हावा.

आजच्या काळात अत्याधिक लोकसंख्येने मोठ-मोठ्या शहरात निवास-समस्येला फार कठीण बनविले आहे. लोक लहान सहान खोल्यांमध्ये आपल्या मुलाबाळांसह राहतात एकीकडे राहण्याची ही लाचारी कर दुसरीकडे लज्जासंकोचाच्या निकडी, ज्यांना कदापि दृष्टीआड केले जाऊ शकत नाही अशा स्थितीत जी सावधगिरीची पद्धत अवलंबिली जाऊ शकते ती अवश्य अंगिकारली पाहिजे आणि इतर नागरी गरजांवर निवास-समस्येला प्राधान्य दिले पाहिजे जेणेकरुन निवासाद्वारे शरीअतच्या मर्यादांचे पालन करणे शक्य व्हावे. जे लोक नैतिक संवेना बाळगतात आणि इस्लामी जीवन व्यतीत करू इच्छितात त्यांच्याकरिता हे आवश्यक ठरते की त्यांनी निवास-समस्येला योग्यरित्या सोडविण्याकरिता अपरिहार्यपणे अधिक आर्थिक बोझा सहन करावा.

९७. संकेत या गोष्टीकडे आहे की अल्लाहचे आदेश ज्ञान व बुद्धिकौशल्यावर आधारीत आहेत.

९८. अर्थात मुले जेव्हा वयस्क होतील तेव्हा त्यांना इतर वेळातही परवानगी घेऊन दाखल झाले पाहिजे. हे बंधन त्यांच्यासाठी अशा प्रकारे आहे, ज्या प्रकारे पूर्वीपासून त्यांच्या वडीलधारी लोकांना आहे.

९९. आयत क्र. ३१ मध्ये स्त्रियांना दुपट्ट्याचा आदेश दिला गेला होता की जर एखादा अनोळखी घरात येईल तर आपल्या छातींवर दुपट्ट्याचा पदर टाकून असावे. या आयतीत त्या वृद्ध स्त्रियांना, ज्या निकाहची आशा ठेवत नसतील, ही सूट दिली गेली की त्यांनी जर आपले दुपट्टे उतरवून ठेवलेत तर काही हरकत नाही. मात्र या अटीवर की शुंगार सजावटीचा देखावा करण्याचा हेतु नसावा अधिक लज्जाशीलता आहे. अधिकांश भाष्याकारांनी कपड्यांशी अभिप्रेत पदर हा अर्थ घेता आहे. म्हणजे त्यांच्या मते जर वृध्द स्त्रिया घराबाहेर पडतांना आपल्या अंगावर चादर टाकत नसतील तर काही हरकत नाही. परंतु चादरीचा आदेश सूरह 'अहजाब' मध्ये निवेदिला गेला आहे. या सूरह (नूर) मध्ये तर घराच्या संबंधाने ईश–अदेश निवेदिला गेले आहेत ज्यात ओढणी (दुपट्ट्या) चा आदेशहि दिला गेला आहे. आणि भाष्यांतर्गत आयत एक खुलासा आयत होय, म्हणून तिचा संबंध ओढणीच्याच आदेशाशी असू शकतो.

१००. शृंगाराच्या अभिव्यक्तिच्या तीन अवस्था या सूरहमध्ये निवेदिल्या गेल्या आहेत. एक ही की जो शृंगार गरजेनुसार जाहीर होतो तो विवाहसंबंधास योग्य अशा पुरुषासमोर व्यक्त होण्यास हरकत नाही. याचा आदेश आयत क्र.३१ मध्ये إِلَّا مَا ظَهَرَ مِنْهَا **'इल्ला माजहर मिन्हा'** या शब्दात निवेदिला गेला आहे. दुसरी अवस्था ही की स्त्री शृंगारासह आपल्या पतीखेरीज आपल्या त्या नातेवाईकांसमोरही येऊ शकते. ज्यांच्याशी विवाह संबंध होऊ शकत नाही. याचा आदेश क्र.३१मध्ये निवेदिला गेला आहे आणि तिसरी अवस्था ही की स्त्रीने गैर महरम (विवाह संबंधास योग्य अशा) पुरुषांसमोर शुंगाराचे प्रदर्शन करावे म्हणजे ज्या पुरुषांसमोर जो शुंगार लपविला जाणे आवश्यक आहे, तिने तो दाखवत फिरावे. शुंगाराचा हा देखावा हराम आहे आणि कुरआनाच्या परिभाषेत याला तबर्रुज म्हणतात. या आयतीत याच तबर्रुजची मनाई केली गेली आहे.

६१. ना आंधळ्याला काही हरकत आहे, ना पांगळ्याला काही हरकत आहे, ना आजाऱ्याला काही हरकत आहे आणि न स्वत: तुम्हाला काही हरकत आहे की आपल्या घरी जेवण घ्यावे किंवा आपल्या वडीलांच्या घरी किंवा आपल्या मातेच्या घरी किंवा आपल्या भावांच्या घरी किंवा आपल्या बहिणींच्या घरी, किंवा आपल्या चुलत्यांच्या घरी किंवा आपल्या आत्यांच्या घरी किंवा आपल्या मामांच्या घरी किंवा आपल्या मावशींच्या घरी किंवा अशा घरी, ज्यांच्या किल्ल्या तुमच्या ताब्यात असाव्यात किंवा आपल्या मित्रांच्या घरी जेवण घ्यावे. [१०१] या गोष्टीतही तुमच्यावर काही दोष नाही की एकत्र खा किंवा वेगवेगळे. [१०२] परंतु जेव्हा घरात प्रवेश कराल तेव्हा आपल्या लोकांना सलाम करा [१०३] हे अल्लाह तर्फे शुभ व पवित्र असे प्रार्थनामय वचन होय.[१०४] अशा प्रकारे अल्लाह आपल्या आयती तुम्हास स्पष्टत: फर्मावितो, यासाठी की तुम्ही बुद्धिचा वापर करावा.[१०५]

لَيْسَ عَلَى الْاَعْمٰى حَرَجٌ وَّلَا عَلَى الْاَعْرَجِ حَرَجٌ
وَّلَا عَلَى الْمَرِيْضِ حَرَجٌ وَّلَا عَلٰٓى اَنْفُسِكُمْ اَنْ تَاْكُلُوْا
مِنْۢ بُيُوْتِكُمْ اَوْ بُيُوْتِ اٰبَآئِكُمْ اَوْ بُيُوْتِ اُمَّهٰتِكُمْ
اَوْ بُيُوْتِ اِخْوَانِكُمْ اَوْ بُيُوْتِ اَخَوٰتِكُمْ اَوْ بُيُوْتِ
اَعْمَامِكُمْ اَوْ بُيُوْتِ عَمّٰتِكُمْ اَوْ بُيُوْتِ اَخْوَالِكُمْ
اَوْ بُيُوْتِ خٰلٰتِكُمْ اَوْ مَا مَلَكْتُمْ مَّفَاتِحَهٗٓ اَوْ صَدِيْقِكُمْ ؕ
لَيْسَ عَلَيْكُمْ جُنَاحٌ اَنْ تَاْكُلُوْا جَمِيْعًا اَوْ اَشْتَاتًا ؕ
فَاِذَا دَخَلْتُمْ بُيُوْتًا فَسَلِّمُوْا عَلٰٓى اَنْفُسِكُمْ تَحِيَّةً مِّنْ
عِنْدِ اللّٰهِ مُبٰرَكَةً طَيِّبَةً ؕ كَذٰلِكَ يُبَيِّنُ اللّٰهُ لَكُمُ
الْاٰيٰتِ لَعَلَّكُمْ تَعْقِلُوْنَ ۟ (٦١)

६२. मोमीन (ईमान बाळगणारे) तर वस्तुत: तेच होत जे अल्लाह व त्याच्या रसूल वर ईमान राखतात.[१०६] आणि जेव्हा एखाद्या सामुदायिक कामाकरिता रसूलच्या सोबत असतात, तेव्हा त्या वेळपावेतो निघून जात नाही, जोपर्यंत त्याच्याकडून परवानगी घेत नाही.[१०७] जे लोक तुमच्या जवळ परवानगी मागतात, तेच अल्लाह व त्याच्या रसूलवर ईमान राखणारे होत. यास्तव जेव्हा ते आपल्या एखाद्या गरजेपोटी अनुज्ञा मागतील, तेव्हा तुमच्या मनात येईल त्याला परवानगी द्या. आणि त्यांच्याकरिता अल्लाहजवळ क्षमाची प्रार्थना करा. [१०८] नि:संशय अल्लाह माफ करणारा व दया करणार आहे.

اِنَّمَا الْمُؤْمِنُوْنَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ وَاِذَا كَانُوْا
مَعَهٗ عَلٰٓى اَمْرٍ جَامِعٍ لَّمْ يَذْهَبُوْا حَتّٰى يَسْتَاْذِنُوْهُ ؕ اِنَّ
الَّذِيْنَ يَسْتَاْذِنُوْنَكَ اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ يُؤْمِنُوْنَ بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ ۚ
فَاِذَا اسْتَاْذَنُوْكَ لِبَعْضِ شَاْنِهِمْ فَاْذَنْ لِّمَنْ شِئْتَ مِنْهُمْ
وَاسْتَغْفِرْ لَهُمُ اللّٰهَ ؕ اِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ (٦٢)

१०१. या सूरह मध्ये घरा संबंधाने जे ईश-आदेश निवेदिले गेले आहेत, त्यांच्या खुलासा म्हणून ही आयत अवतरीत आहे. उद्देश या गैरसमजूतीचे निराकरण होय की उल्लिखित बंधनांना लक्षात न घेता ना आंधळ्यां करीता ही सवड बाकी राहते की त्यांनी सनदशीरपणे त्या घरांमध्ये जाऊन जेवावे जेथे त्याच्यांकरिता कल्याणकारी लोकांनी व्यवस्था करुन ठेवली आणि ना निकटच्या नातेवाईक व मित्र एकमेकांच्या घरी जाऊन जेऊ शकतात. या आयतीत हे स्पष्ट केले गेले की अपंग व विकलांग माणसांच्या जेवण्या खाण्याची व्यवस्था ज्या लोकांनी आपल्या घरात केली असेल ते त्या ठिकाणी जाऊन जेवण घेऊ शकतात. घरात प्रवेश करण्याची अनुमती व पडद्याच्या मर्यादांचा हा अर्थ नव्हे की आंधळ्या पांगळ्यांशी सहानुभूतिचे वर्तन करणे सोडून द्यावे. राहीलेत जवळचे नातेवाईक, उदाहरणार्थ पिता, माता, भाऊ, बहीण. काका,आत्या,मामा,मावशी वगैरे,तर तुमच्या जेवण्याची व्यवस्था या नाते वाईकांपैकी एखाद्याच्या घरी आहे तर त्या घरी जाऊन जेवण्यास तुम्हाला काहीच हरकत नाही. तसेच त्या घरी ही जी तुमच्या ताब्यात असावीत. उदाहरणार्थ एखादा मनुष्य प्रवासाला गेला व आपले बंद घर तुमच्यावर सोडून गेला तर त्याच्या घरात ज्या खाण्यापिण्याच्या वस्तू आहेत त्यातून काही खाण्यास तुम्हाला हरकत नाही. तसेच आपल्या मित्रांच्या घरी जाऊ शकता व नि:संकोचपणे जेऊ शकतात. म्हणून घरासंबंधीचे ईश आदेश दिले गेले आहेत त्यांचे पालन करीत त्या घरांमध्ये जाण्यास व खाण्यापिण्यात काहीच हरकत नाही.

राहिली बाब की, 'ना स्वत: तुम्हाला काही हरकत आहे की आपल्या घरी जेवण घ्यावे' तर हा संकेत अशा गोष्टीकडे आहे की खरे पाहता तुमचे स्वत:चे घरच होय जिथे तुम्ही कसल्याही प्रतिबंधाशिवाय जेऊ शकता परंतु जर काही कारणास्तव तुमच्या भोजनाची व्यवस्था तुमच्या जवळच्या नातेवाईकांकडे आहे किंवा तुमच्या एखाद्या मित्राकडे आहे तर यातही काही हरकत नाही.

आयतीत मुलाच्या घरी जेवण्यासंबंधी उल्लेख केला गेला नाही कारण जेथपावेतो जेवण्याचा संबंध आहे, आई-वडीलांकरिता आपल्या मुलाचे घर 'स्वत:च्याच घराच्या' आदेशात येते.

१०२. जेवण एकत्र बसून घ्यावे किंवा वेगवेगळे बसून हे परिस्थिती, आवश्यकता हेतुच्या दृष्टीने ठरवावयाची गोष्ट आहे. शरीअतीने या संदर्भात काहीही बंधन नाही आणि सवलतीस लक्षात घेता दोन्ही पद्धतींना उचित ठरविले गेले आहे.

१०३. म्हणजे हे विसरु नका की घर तुमचे स्वत:चे असो किंवा तुमच्या नातेवाईकाचे, गृह-प्रवेश करताना तुम्ही सलाम अवश्य केला पाहीजे. मग घरातली मंडळी आपले स्वत:चे कुटुंब असो किंवा अन्य एखाद्याचे, आपल्या मुस्लिम जनसमूहाची माणसे या नात्याने ते या गोष्टीस पात्र आहेत की त्यांना सलाम द्वारे सलामतीच्या प्रार्थनेचा नजराणा दिला जावा.

१०४. अर्थात हे प्रार्थना वचन आहे ज्याची शिकवण सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुम्हाला दिली आहे. आणि जे अतिशय समृद्धदायी व पवित्र वचन आहे.

१०५. म्हणजे या आदेशांवर जे अगदी स्पष्टपणे मांडले गेले आहेत-आचरण करण्या करिता सूज्ञतेने वागण्याची गरज आहे. आदेशांची अंमलबजावणी केवळ नामानिदेशापुरती केल्याने अपेक्षित उद्दिष्टे साध्य होत नाही. आचरणाचा योग्य प्रकार असा की जो आदेश दिला गेला आहे त्याच्या उद्दिष्टास माणसाने चांगल्या प्रकारे समजून घ्यावे व त्यावर आचरणाबद्ध होण्यासंदर्भात बुद्धिचा वापर करावा. जर समस्या उद्‌भवत असतील तर त्यांना आपल्या उपाय योजनांनी सोडविण्याचा प्रयत्न करावा. सर्वश्रेष्ठ अल्लाहने बुद्धि अशासाठी प्रदान केली गेली आहे की तिचा योग्यरित्या वापर केला जावा आणि शरीअतच्या आदेशांना आचरणात आणण्यात विवेक बुद्धिचे सहाय्य घ्यावे.

१०६. येथे ईमानाशी अभिप्रेत सच्चे ईमान होय जे सूज्ञतापूर्वक असते. दांभिकांसारखे ईमान नव्हे जे ना सूज्ञतापूर्वक असते आणि ना ते या प्रामणिक असतात, किंबहुना ते केवळ श्रद्धा व्यक्त करीत असतात.

१०७. सामुदायिक कामाशी अभिप्रेत सल्ला मसलतीची बैठकही होऊ शकते आणि अशी बैठक देखील जी जिहाद वगैरे संबंधी मार्गदर्शन करण्यासाठी बोलाविली गेली असेल. अशा बैठकी आपल्या परिने मोठ्या महत्वपूर्ण असतात व त्यांना उपस्थित रहाणेही आवश्यक असते, परंतु जेव्हा अशी बैठक अल्लाहच्या पैगंबराच्या उपस्थितीत आयोजित केली जात असेल तर तिचे महत्व अधिकच वाढते व तिच्यात सबबीशिवाय बैठक सोडून निघून जाणे अशी भयंकर बाब आहे जी इमानाशी सुसंगत नाही.

१०८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हा अधिकार दिला गेला की जे लोक आपल्या गरजेमुळे अनुमती मागतील. त्यांच्यापैकी आपण ज्याला योग्य वाटेल अनुमती घ्यावी. त्याच सोबत त्यांच्यासाठी क्षमेची प्रार्थना करण्याचीही ताकीद केली अशासाठी की जर त्यांची सबब सबळ नव्हती व त्यांनी परवानगी मागितली होती तर अल्लाहने त्यांच्या अपराधास माफ करावे.

لَا تَجْعَلُوا دُعَاءَ الرَّسُولِ بَيْنَكُمْ كَدُعَاءِ بَعْضِكُمْ بَعْضًا ۚ قَدْ
يَعْلَمُ اللَّهُ الَّذِينَ يَتَسَلَّلُونَ مِنْكُمْ لِوَاذًا ۚ فَلْيَحْذَرِ الَّذِينَ
يُخَالِفُونَ عَنْ أَمْرِهِ أَنْ تُصِيبَهُمْ فِتْنَةٌ
أَوْ يُصِيبَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٦٣﴾

**६३.** पैगंबरांच्या बोलाविण्यास तुम्ही आपसात एकमेकांना बोलाविता तसे समजू नका.[१०९] अल्लाह तुमच्यापैकी त्या लोकांना जाणतो जे एकमेकांची आड घेऊन खसकतात.[११०]तर जे लोक रसूलच्या आदेशास माण्यापासून टाळाटाळ करतात त्यांनी या गोष्टीचे भय बाळगले पाहिजे की त्यांनी एखाद्या फित्न्यास (उपद्रवास) बळी न पडावे किंवा दुःखदायक शिक्षेने त्यांना न धरावे.[१११]

أَلَا إِنَّ لِلَّهِ مَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۖ قَدْ يَعْلَمُ مَا أَنْتُمْ
عَلَيْهِ وَيَوْمَ يُرْجَعُونَ إِلَيْهِ فَيُنَبِّئُهُمْ بِمَا عَمِلُوا ۗ وَاللَّهُ
بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمٌ ﴿٦٤﴾

**६४.** ऐका ! आकाशांत व जमीनीवर जे काही आहे, अल्लाहचेच आहे. तुम्ही ज्या स्थितीत आहात अल्लाह ती जाणतो. आणि ज्या दिवशी यांना त्याच्याकडे परतविले जाईल तो यांना दर्शवील की ते काय करुन आले आहेत. अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.

१०९. म्हणजे पैगंबर जेव्हा तुम्हाला एखाद्या कामासाठी बोलावतील तर तुमच्यासाठी हे अनिवार्य कर्तव्य ठरते की सर्व कामे सोडून त्यांच्या सेवेत हजर व्हावे. त्यांच्या बोलाविण्यास या स्तरावर पाहणे उचित नव्हे ज्या स्तरावर तुम्ही आपसात एकमेकांच्या बोलावण्यास पाहता. रसूलचे बोलावणे, त्यांची पुकार, त्यांचे आवाहन एक विशेश स्थान बाळगते कारण रसूलचे जे स्थान आहे ते तुमच्यापैकी कोणाचेही नाही.

स्पष्ट झाले की या दोन आयतीत जे मार्गदर्शन केले गेले आहे ते रसूल करीता खास करुन आहे. त्यास सर्व सामान्य शासकांकरिता समजून घेणे उचित नाही. त्यांच्या आज्ञापालनाच्या परिचित मर्यादा आहेत, जेव्हा रसूलचे आज्ञापालन व त्याच्या शिष्टाचाराचा मामला याहून फार वेगळा आहे.

११०. संकेत दांभिकांकडे आहे जो रसूलच्या बैठकीतून आपल्या रुचिहीनतेमुळे एखाद्याचा आडोसा घेऊन पळ काढतात, यासाठी की त्यांच्या निघून जाण्याचा कोणाला थांगपत्ता लागू नये.

१११. ही सक्त ताकीद अशा लोकांकरिता आहे जे रसूलच्या आदेशास मानण्याऐवजी त्याची उपेक्षा करु लागतात परंतु याचा परिणाम अशा लोकांच्या हक्कात अतिशय भयंकर होऊ शकतो. एकतर ते एखाद्या उपद्रवास बळी पडतील किंवा अल्लाहच्या दु:खदायक शिक्षेने वेढले जातील.

आज मुसलमान निरनिराळ्या उपद्रवांनी वेढले गेले आहेत व नित नविन उपद्रवांचा भर पडतच चालला आहे. ही परिस्थिती या मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम म्हणून आहे. म्हणजे रसूलच्या आज्ञापालनाची उपेक्षा करण्याच्या व त्याच्या आदेशांची अवज्ञा करण्याचा परिणाम या आयतींच्या प्रकाशात त्यांनी आत्मपरीक्षण केले असते तर किती बरे झाले असते !

# सूरह अल् फ़ुर्क़ान

# २५. सूरह अल् फ़ुर्कान

**नावः** सूरहच्या आरंभात फुर्कान (सत्याला असत्या पासून वेगळी करणारी वस्तू)च्या अवतरणाने सचेत केले गेले आहे. तद्नुषंगाने या सूरहचे नाव अल फुर्कान' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे व मजकूरा वरुन असे दिसून येते की या सूरहचे अवतरण मक्केच्या शेवटच्या काळात झाले असेल. यास्तव पहिल्याच आयतीत हे ऐलान केले गेले आहे की पैगंबरांवर कुरआन अशासाठी अवतरीत केले गेले की त्यांनी जगातल्या समस्त जनसमूहांना खबरदार करावे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहने संपूर्ण विश्वाकरिता पाठविले आहे या गोष्टीचे हे ऐलान होय. आणि संभवत: ही घोषणा मक्केच्या शेवटच्या काळातच केली गेली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** कुरआन व पैगंबर यांच्या संदर्भात प्रकट केल्या जाणाऱ्या शंकांचे निरसन करणे व त्यांच्या सत्यतेस अशा प्रकारे दृगोचर करणे की त्यासंबंधी हृदयात विशवास निर्माण व्हावा.

**आयत रचनाः** आयत क्र. १ व २ पुर्कान अवतरीत करणाऱ्या हस्ती (अल्लाह) ची ओळख दिली गेली आहे.

आयत क्र. ३ ते ३४ मध्ये शिर्कचे खंडन करताना 'वह्य' व रिसालत' वर येणाऱ्या आक्षेप व शंकांना उत्तर दिले गेले आहे. आणि हे उत्तर तंबी करण्याच्या शैली स्वरुपात आहे, यासाठी की आक्षेप घेणाऱ्यांनी शुद्धीवर यावे.

आयत क्र. ३५ ते ४४ मध्ये त्या जन-समूहांच्या परिणतीची बोधप्रद उदाहरणे प्रस्तुत केली गेली आहे ज्यांना खबरदार करण्यासाठी प्रेषितांना पाठविले गेले होते परंतु त्यांनी त्या प्रेषितांना खोटे ठरविले.

आयत क्र. ४५ ते ६२ मध्ये त्या निशाण्यांकडे लक्ष कोंद्रित केले गेले आहे ज्यावर विचार-चिंतन केल्याने अल्लाह एकमेव असण्याचा दृढ विश्वास निर्माण होतो. त्याबरोबरच त्या शंकांचेही निरसन केले गले आहे, ज्या पैगंबरांसंबंधी मांडल्या जात होत्यो.

आयत क्र. ६३ ते ७६ मध्ये अशा लोकांचे गुण विशेष वर्णिले गेले आहेत, ज्यांनी स्वत:ला रहमान (परमदयाळू अल्लाह) च्या दास्यत्वासाठी अर्पण केले आहे. यावरुन ही गोष्ट उघडपणे दिसून येते की कुरआनाच्या शिकवणीच्या प्रभावान्वये कोणते गुण विशेष वाढीस लागतात व कोणत्या पातळीचे लोक तयार होतात.

आयत क्र. ७७ समारोपाची आयत होय.ज्यात त्या लोकांना शेवटचे म्हणून सांगितले गेले आहे, जे कुरआन व पैगंबरांनी खबरदार केल्यानंतर ही कसलाही प्रभाव ग्रहण करीत नव्हते उलट त्यांना खोटे ठरविण्याचा खटाटोप करीत होते.

# २५. सूरह अल् फुर्कान

سُورَةُ الْفُرْقَانِ

(आयती-७७)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. अतिशय बरकतीवाला (समृद्धशाली) आहे [१] तो, ज्याने आपल्या दासा [२] वर फुर्कान अवतरीत केले.[३] अशासाठी की तो सकल जगा करीता खबरदार करणारा ठरावा.[४]

تَبٰرَكَ الَّذِيْ نَزَّلَ الْفُرْقَانَ عَلٰى عَبْدِهٖ لِيَكُوْنَ لِلْعٰلَمِيْنَ نَذِيْرًا ﴿١﴾

२. तो ज्याच्या ताब्यात आकाशांचे व जमीनीचे अधिपत्य आहे.[५] ज्याने (स्वत:साठी) संतती नाही बनवली व ना त्याच्या अधिपत्यात कोणी त्याचा सहभागी आहे.[६] त्याने प्रत्येक वस्तू निर्माण केली मग तिची योजना आखली.[७]

الَّذِيْ لَهٗ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَلَمْ يَتَّخِذْ وَلَدًا وَّلَمْ يَكُنْ
لَّهٗ شَرِيْكٌ فِي الْمُلْكِ وَخَلَقَ كُلَّ شَيْءٍ فَقَدَّرَهٗ تَقْدِيْرًا ﴿٢﴾

३. लोकांनी त्याला सोडून अन्य उपास्ये बनविली आहेत, जी काही सुद्धा निर्माण करीत नाहीत, किंबहुना स्वत:निर्मिले गेले आहेत. जे स्वत:साठी ना एखाद्या लाभाचा अधिकार बाळगतात आणि ना हानीचा. ज्यांना ना मृत्यु वर अधिकार आहे, ना जीवनावर आणि ना मृतांना उठवून उभे करण्यावर.

وَاتَّخَذُوْا مِنْ دُوْنِهٖٓ اٰلِهَةً لَّا يَخْلُقُوْنَ شَيْـًٔا وَّهُمْ يُخْلَقُوْنَ
وَلَا يَمْلِكُوْنَ لِاَنْفُسِهِمْ ضَرًّا وَّلَا نَفْعًا وَّلَا يَمْلِكُوْنَ مَوْتًا
وَّلَا حَيٰوةً وَّلَا نُشُوْرًا ﴿٣﴾

४. काफिर म्हणतात हे खोटे आहे जे या माणसाने रचले आहे आणि या कामात काही इतर लोकांनी याला सहाय्य केले आहे. अतिशय अन्यायपूर्ण गोष्ट व असत्य आहे, जी त्यांनी केली.[८]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اِنْ هٰذَآ اِلَّآ اِفْكُ ۣافْتَرٰىهُ
وَاَعَانَهٗ عَلَيْهِ قَوْمٌ اٰخَرُوْنَ ۚ فَقَدْ جَاۗءُوْ ظُلْمًا وَّزُوْرًا ﴿٤﴾

५. म्हणतात, ह्या पूर्वीच्या लोकांच्या कथा होत, ज्या या माणसाने लिहून घेतल्या आहेत आणि त्या याच्यासमोर सकाळ व संध्याकाळ पढल्या जातात.[९]

وَقَالُوْٓا اَسَاطِيْرُ الْاَوَّلِيْنَ اكْتَتَبَهَا فَهِيَ تُمْلٰى عَلَيْهِ
بُكْرَةً وَّاَصِيْلًا ﴿٥﴾

१. अल्लाह समृद्धशाली असण्याचा अर्थ असा की तो मांल्याचे स्त्रोत होय व त्याच्यापासून जे लाभ व समृद्धी (बरकती निर्मितीस पोहचत आहेत ते अगणित व अमर्याद आहेत. या ग्रंथाचे (कुरआनाचे) अवतरण त्याच्यातर्फे झाले आहे म्हणून तो मांगल्यच मांगल्य होय व समृद्धीने समृद्ध करणारा आहे.

२. अर्थात आपले विशेष दास हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर.

३. 'फुर्कान'चा शब्दीक अर्थ फरक व विशेषता दर्शविणारी गोष्ट. आणि कुरआन हे फुर्कान आहे याचा अर्थ असा की हा ग्रंथ सत्याला असत्या पासून वेगळे करतो आणि मार्गभ्रष्टतेच्या विरोधात मार्गदर्शनास प्रकट करतो. ही अशी कसोटी होय की जिच्यावर पारखून खऱ्या-खोट्यात तारतम्य केले जाऊ शकते. तसेच जीवनाच्या समस्त व्यवहारांत हा ग्रंथ निर्णय -स्तर होय.

जगात असंख्य धर्म-संप्रदाय पाहून व त्यांचे परस्पर विरुद्ध दावे लक्षात घेता, मनुष्य मोठ्या गोंधळात पडतो. त्याच्या या विमनस्केस दूर करण्या करीताच फुर्कानचे अवतरण झाले. या कसोटी (Criterion) वर प्रत्येक धर्माचे दावे पारखले जाऊ शकतात व हे जाणले जाऊ शकते की हे शुद्ध सोने आहे किंवा नाही. लोकांना त्या कसोटीचे तर ज्ञान आहे जी सोने पारखण्यासाठी वापरली जाते, परंतु खेदाची गोष्ट म्हणजे त्या ईश्वरीय कसोटी पासून अधिकांश लोक अनभिज्ञ आहेत जिला फुर्कान म्हणतात. आणि म्हणूनच धर्मांच्या बाबतीत त्यांनी चुकीची मते कायम केली आहेत व विविध गोधळांत पडले आहेत.

४. ही आयत स्पष्ट करते की तुम्ही (पैगंबर) केवळ अरब लोकानाच खबरदार करण्यासाठी नव्हेत, तर जगातल्या समस्त माणसांना सचेत करण्यासाठी पाठविले गेले व या उद्दिष्टासाठी तुम्हावर 'कुरआन' अवतरीत केले गले. दुसऱ्या शब्दात मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे प्रेषित्व जगातल्या सर्व जन-समूहांकरिता आहे व त्यांना खबरदार करण्याचे कार्य या ग्रंथाद्वारे कियामतीपर्यंत चालत राहील.

या फर्मानाद्वारे ही गोष्टदेखील स्पष्ट झाली की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे मिशन अल्लाहपासून गाफील असलेल्या मानव जातिस आखिरतच्या दुष्परिणतीने खबरदार करणे होते. आणि याद्वारे हे तात्विक मार्गदर्शनही लाभते की इस्लामचे आवाहन करणाऱ्यांनी याच शैलीत आवाहन केले पाहिजे. आजच्या काळात इस्लामच्या आवाहनासाठी काही नवीन पद्दती प्रचलीत झाल्या आहेत. यास्तव आवाहन अशा रीतीने मांडले जाते की सामूहीक जीवनाच्या प्रश्नांच्या उत्तराचा पैलू तर पूर्णत: दृगोचर होतो, परंतु कियामतीच्या दिवसाची भयानकता व आखिरतच्या परिणतीचा पैलू तशा प्रकारे समोर येत नाही की ज्यामुळे लोकांनी खबरदार व्हावे व त्यांना आखिरतची काळजी लागावी.

५. अर्थात या ग्रंथास अवतरीत करणारा सर्व सृष्टीचा सत्ताधिकारी आहे म्हणून याच्या महत्तवास व महानतेस चांगले जाणून घ्या.

६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. १४९

७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने वस्तूंना निर्माण करुन असेच सोडून दिलेले नाही की जे काही यांच्यापासून उद्भवते , ते केवळ योगायोग म्हणून घडते, किंबहुना त्याने प्रत्येक वस्तूबाबत निश्चित केले आहे की तिला कोणती कामगिरी पार पांडायची आहे, कशा प्रकारे पार पाडायची आहे, तिचा कार्य-अवधी व हेतु कोणता असेल. उदाहरणार्थ सूर्याला कोणत्या तापमानापर्यंत राहायचे, आपली किरणे कोठे कोठे सोडायची, कशी उष्णता निर्माण करायची, कोणती गतीने भ्रमण करायचे व हे की कोणत्या क्षणी त्याचे सामर्थ्य गुंडाळून ठेवले जाईल वगैरे. अशाप्रकारे प्रत्येक गोष्टीची योजनाबद्धता व प्लानिंग (Planning) योजले गेले आहे. अर्थात संपूर्ण सृष्टी आपल्या निर्मात्याच्या बनविलेल्या योजनेस पूर्ण करण्यात कार्यरत आहे. कुरआनाच्या परिभाषेत या योजनाबद्धतेचे नाव तकदीर' असे आहे. याचा शाब्दीक अर्थ अंदाज निश्चित करणे असा आहे.

८. म्हणजे इन्कार करणाऱ्यांचे म्हणणे असे की कुरआनाचा संबंध अल्लाहकडे दाखविला जातो हे अगदी खोटे आहे. ही वाणी अल्लाहची नव्हे, किंबहुना या माणसाची स्वत:ची वाणी आहे, जो नुबुव्वत (प्रेषित्वा) चा दावा करीत आहे व यास रचण्यात काही लोकांनी याला मदत केली आहे. ग्रंथ धारकांपैकी जे ज्या लोकांनी ईमान बाळगले होते, त्यांच्यापैकी काही जणांकडे त्यांचा हा संकेत असेल. परंतु ज्या अर्थी हा आक्षेप अगदीच निराधार होता व याचे अवास्तव असणे ही लोकांना उमजले होते, म्हणून यांचे खंडन करण्यात हे म्हणणे पर्याप्त समजले गेले की ही मोठी अन्यायपूर्ण गोष्ट, व असत्य होय, जी यांनी केली. नंतर इतिहासानेही हे सिद्ध करुन दाखविले की हा आरोप खोटा होता आणि कुरआन आपल्या दाव्यात अगदी खरे आहे. कारण कुरआनाचा लेखक अल्लाह व्यतिरिक्त अन्य कोणी असता तर ही गोष्ट लपून राहू श्काली नसती. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्ललम) यांनी तर तसा दावाही केला नाही आणि जर इतरांनी त्याच्या लेखन कार्यात हातभार लावला असता तर त्यांनी यास आपली कामगिरी म्हणून निश्चित दर्शविले असते. परंतु कोणताही

मनुष्य असा दावा करु शकला नाही की कुरआन माझ्या हस्ते लिहीले गेले आहे किंवा या कामात मी देखील सहभागी राहीलो.

९. हा दुसरा आरोप होता जो इतर काही लोक लावीत होते. कुरआनात भूतकालीन जन-समूहांचे वृत्तांत निवेदिले गेल्या आहेत. त्यांना ते प्राचीन-कथा व किस्से ठरवून पैंगबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्ललम) यांच्यावर हा आरोप ठेवीत की तुम्ही हे किस्से एखाद्याकडून (अर्थात ग्रंथधारकांपैकी एखाद्याकडून) लिहून घेतले आहेत आणि आता तुमचे सहवासी तुम्हाला सकाळ संध्याकाळ तेच किस्से वाचून ऐकवितात. कुरआनाचे सकाळ संध्याकाल जे पठण (तिलावत) केले जात असे, त्याचा अर्थ  ते अशा प्रकारे लावीत.

*सांगा, याला त्याने अवतरीत केले आहे, जो आकाशांची व जमीनीची रहस्ये जाणतो. नि:संशय तो मोठा माफ करणारा, दया करणारा आहे. म्हणतात, हा कसा पैगंबर आहे, जो अन्न खातो व बाजारात हिंडतो फिरतो ! याच्याकडे एखादा फरिश्ता का नाही पाठविला गेला की याच्यासोबत राहून त्याने खबरदार केले असते?(अल-क़ुर्आन)*

६. सांगा, याला त्याने अवतरीत केले आहे, जो आकाशांची व जमीनीची रहस्ये जाणतो.[१०] नि:संशय तो मोठा माफ करणारा, दया करणारा आहे .[११]

قُلْ اَنْزَلَهُ الَّذِيْ يَعْلَمُ السِّرَّ فِي السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ اِنَّهٗ
كَانَ غَفُوْرًا رَّحِيْمًا ۝٦

७. म्हणतात, हा कसा पैगंबर आहे, जो अन्न खातो व बाजारात हिंडतो फिरतो ! याच्याकडे एखादा फरिश्ता का नाही पाठविला गेला की याच्यासोबत राहून त्याने खबरदार केले असते?

وَقَالُوْا مَالِ هٰذَا الرَّسُوْلِ يَاْكُلُ الطَّعَامَ وَيَمْشِيْ فِي
الْاَسْوَاقِ ۭ لَوْلَآ اُنْزِلَ اِلَيْهِ مَلَكٌ فَيَكُوْنَ مَعَهٗ
نَذِيْرًا ۝٧

८. किंवा याच्या करीता एखादा खजीना उतरविला गेला असता, किंवा याच्या करिता एखादी बाग राहीली असती, ज्यापासून तो खात राहीला असता आणि अत्याचारी म्हणतात, तुम्ही तर एका अशा माणसामागे चालत आहात, ज्यावर जादूटोण्याचा प्रभाव झाला आहे.[१२]

اَوْ يُلْقٰٓى اِلَيْهِ كَنْزٌ اَوْ تَكُوْنُ لَهٗ جَنَّةٌ يَّاْكُلُ مِنْهَا ۭ وَقَالَ
الظّٰلِمُوْنَ اِنْ تَتَّبِعُوْنَ اِلَّا رَجُلًا مَّسْحُوْرًا ۝٨

९. बघा, कशा तऱ्हेचे टोमणे हे तुम्हाला लावीत आहेत. हे मार्गभ्रष्ट झाले आहेत. कसलाही मार्ग प्राप्त करु शकत नाही.[१३]

اُنْظُرْ كَيْفَ ضَرَبُوْا لَكَ الْاَمْثَالَ فَضَلُّوْا فَلَا يَسْتَطِيْعُوْنَ
سَبِيْلًا ۝٩

१०. मोठा समृद्धशाली आहे तो, ज्याने इच्छिल्यास (हे पैगंबर !) तुमच्याकरीता याहून कितीतरी पटींनी अधिक चांगल्या वस्तू बनवील अशा बागा, ज्यांच्याखाली प्रवाह वाहत असावेत व तुमच्यासाठी महाल बनवून द्यावेत.[१४]

تَبٰرَكَ الَّذِيْٓ اِنْ شَاۗءَ جَعَلَ لَكَ خَيْرًا مِّنْ ذٰلِكَ
جَنّٰتٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ ۙ وَيَجْعَلْ
لَّكَ قُصُوْرًا ۝١٠

११. वस्तुस्थिती अशी की या लोकांनी कियामतीच्या घटीकेस खोटे ठरविले आहे.[१५] आणि जो या वेळेला खोटे ठरवील, त्याच्यासाठी आम्ही धगधगणारी आग तयार करुन ठेवली आहे.[१६]

بَلْ كَذَّبُوْا بِالسَّاعَةِ وَاَعْتَدْنَا لِمَنْ كَذَّبَ
بِالسَّاعَةِ سَعِيْرًا ۝١١

१२. ती जेव्हा यांना दुरून पाहील तर हे तिचा क्रोधावेग व तिच्या गर्जनेचा आवाज ऐकतील.[१७]

اِذَا رَاَتْهُمْ مِّنْ مَّكَانٍۢ بَعِيْدٍ سَمِعُوْا لَهَا تَغَيُّظًا وَّزَفِيْرًا ۝١٢

१०. म्हणजे कुरआनातील मजकूर स्वत:ही साक्ष देतात की ही अशा सामर्थ्याची वाणी होय, जो सृष्टीच्या समस्त रहस्य भेदांशी परिचित आहे कारण हा ग्रंथ सृष्टीच्या रहस्यभेदांवरील आवरण हटवितो.

११. हे क्षमा-याचनेस प्रोत्साहन होय की अल्लाहकडे रुजू करा व ईमान बाळगा तर जे अपराध तुमच्या हातून घडले आहेत ते तो माफ करील व तुम्हावर दया करील.

१२. त्यांची अशी कल्पना होती की जादूच्या प्रभावाने माणसाची बुद्धि भ्रमिष्ट होते म्हणजे बुद्धित बिघाड होतो. त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जादूने प्रभावित म्हणण्याचा अर्थ असा होता की ते 'वही' चे अवतरण व आखिरत वगैरेच्या ज्या गोष्टी करीत आहेत तो बुद्धिचा बिघाड आहे व हा बिघाड एखाद्याने जादू टोणा केल्यामुळे निर्माण झाला आहे. जेथपावेतो या आरोपाचा संबंध आहे, तो तर अगदी पूर्णपणे खोटा होता, राहीला हा प्रश्न की काय जादूच्या प्रभावाने एखाद्याच्या बुद्धीत बिघाड होतो, तर हा विचारही चुकीचा आहे. कुरआनाने या विचाराचे मुळीच समर्थन होत नाही. जादूचा प्रभाव प्रसंगापुरता नजरेच्या धोक्याप्रत असतो.

سَحَرُوا اَعْيُنَ النَّاسِ

जसे 'त्यांनी जादूने लोकांच्या नजरा मारल्या' (सूरह: अअराफ:११६) वरुन स्पष्ट आहे. परंतु अधिकांशा लोक जादू विषयी गैरसमजूतीत पडले आहेत, ज्यामुळे ते भ्रम-पूजेस बळी पडतात.

१३. जेव्हा मनुष्य रसूलविषयी सत्य-प्रियतेचे प्रमाण देत नाही व त्याच्या प्रेषित्व विषयीच्या दाव्याचा चुकीचा खुलासा करु लागतो तेव्हा तो चुकीच्या मार्गावर चालू लागतो, मग त्याला त्याबाहेर पडणे दुरापास्त होते.

१४. म्हणजे अल्लाहच्या खजीन्यात कसलीच कमतरता नाही. त्याने इच्छिल्यास आपल्या पैगंबरासाठी एक नव्हे तर अनेक बागा व एक नव्हे तर कित्येक महाल बनवून द्यावे, परंतु ज्याअर्थी हे जग इनाम प्राप्त करण्याचे स्थळ नाही, किंबहुना परिक्षा स्थळ आहे म्हणून तो पैगंबरांनाही कसोटीमय जीवनातून पार पाडतो.

१५. म्हणजे हे त्यांचे पोकळ आक्षेप आहेत. खरी गोष्ट अशी की हे कियामतीला मान्य करु इच्छित नाही. कारण मान्य करण्याच्या स्थितीत जबाबदारीचे जीवन व्यतीत करावे लागते आणि प्रेषित्वास मान्य केल्याने कियामतीला मानणे अपरिहार्य ठरते म्हणून ते आपली भलाई यातच समजतात की प्रेषित्वास मान्य केले जाऊ नये.

१६. स्पष्ट झाले की, कियामतीचा इन्कार करणारा काफीर जहन्नम पात्र होय, मग तो ईश्वराला मानण्याचा कितीही दावा करीत असो! कारण कियामतीचा इन्कार ईश्वराच्या न्याय-गुण विशेषाचा इन्कार होय. अशा स्थितीत त्याला मानण्याचा दावा निरर्थक ठरतो.

१७. दोजख (जहन्नम) काफीरांना दुरुन कशा प्रकारे पाहील, हे कियामतीच्या दिवशीच कळून येईल. परंतु तेव्हा ती पाहील तर तिचा क्रोध एवढा भयंकर असेल की दुरुनच तिच्या डरकाळ्या काफिरांना ऐकू येतील.

१३. जेव्हा त्यांना जखडलेल्या स्थितीत तिच्या (जहन्नमच्या) एखाद्या तंग जागेत टाकले जाईल तेव्हा आपल्या मरणाला पुकारतील.

وَإِذَآ أُلْقُوا مِنْهَا مَكَانًا ضَيِّقًا مُّقَرَّنِينَ دَعَوْا
هُنَالِكَ ثُبُورًا ﴿١٣﴾

१४. एका मरणास नव्हे, तर अनेक मरणांना पुकारा.

لَّا تَدْعُوا الْيَوْمَ ثُبُورًا وَاحِدًا وَادْعُوا ثُبُورًا كَثِيرًا ﴿١٤﴾

१५. यांना विचारा, हे अधिक चांगले होय कि सदैव कालीन जन्नत जिचा वायदा-ईश-भय बाळगणाऱ्यांना केला गेला आहे. [१८] ती त्यांच्या करिता ते सर्व काही असेल.[१९]

قُلْ أَذَٰلِكَ خَيْرٌ أَمْ جَنَّةُ الْخُلْدِ الَّتِي وُعِدَ الْمُتَّقُونَ
كَانَتْ لَهُمْ جَزَآءً وَمَصِيرًا ﴿١٥﴾

१६. तिच्यात त्यांच्यात करीता ते सर्व काही असेल, जे ते इच्छितील, आणि तिथे ते सदैव राहतील. हा वायदा तुमच्या पालन कर्त्यांच्या जबाबदारीवर असा आहे ज्यास पूर्ण करण्याची मागणी त्याच्या जवळ केली जाऊ शकते.[२०]

لَّهُمْ فِيهَا مَا يَشَآءُونَ خَالِدِينَ كَانَ عَلَىٰ رَبِّكَ
وَعْدًا مَّسْـُٔولًا ﴿١٦﴾

१७. आणि तो दिवस जेव्हा तो या लोकांना ही एकत्रित करील व यांच्या त्या उपास्यांना ही, ज्यांची हे अल्लाहला सोडून उपासना करतात.मग त्यांना विचारेल की तुम्ही माझ्या या दासांना मार्गभ्रष्ट केले होते कि हे स्वत:च सरळ मार्गापासून विचलीत झाले होते ?[२१]

وَيَوْمَ يَحْشُرُهُمْ وَمَا يَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّهِ فَيَقُولُ
ءَأَنتُمْ أَضْلَلْتُمْ عِبَادِي هَٰٓؤُلَآءِ أَمْ هُمْ ضَلُّوا السَّبِيلَ ﴿١٧﴾

१८. ते म्हणतील, पवित्र आहेस तू ! आमची मजाल नव्हती की तुझ्या खेरीज अन्य कार्य साधक बनवावा.[२२] परंतु तू यांना व यांच्या वाडवडिलांना सुख-संपन्नता प्रदान केली येथपावेतो की हे तुझे स्मरण विसरले व विनाशास पोहचले. [२३]

قَالُوا سُبْحَانَكَ مَا كَانَ يَنۢبَغِي لَنَآ أَن نَّتَّخِذَ مِن
دُونِكَ مِنْ أَوْلِيَآءَ وَلَٰكِن مَّتَّعْتَهُمْ وَءَابَآءَهُمْ حَتَّىٰ
نَسُوا الذِّكْرَ وَكَانُوا قَوْمًۢا بُورًا ﴿١٨﴾

१९. बघा जी गोष्ट तुम्ही सांगत होते तिच्याबाबत यांनी तुम्हाला खोटे ठरविले.[२४] आता तुम्ही ना अजाब टाळू शकता, व ना एखादी मदद प्राप्त करू शकता. आणि जो कोणी तुमच्यापैकी अत्याचार करील [२५] आम्ही त्याला भयंकर अजाब (मोठी शिक्षे) ची गोडी चाखवू.

فَقَدْ كَذَّبُوكُم بِمَا تَقُولُونَ فَمَا تَسْتَطِيعُونَ صَرْفًا
وَلَا نَصْرًا وَمَن يَظْلِم مِّنكُمْ نُذِقْهُ عَذَابًا كَبِيرًا ﴿١٩﴾

१८. स्पष्ट झाले की जन्नतच्या वायदा 'तकवा' बाळगणाऱ्याशी केला गेला आहे म्हणजे अशा लोकांशी जे अल्लाहचे भय बाळगतील व त्याचा अवज्ञा करण्या पासून व अपराधापासून अलिप्त राहात जीवन व्यतीत करतील. नामधारी मुसलमानाशी जन्नतचा वायदा केला गेला नाही म्हणून कोणीही या भ्रमात राहू नये की ज्याअर्थी आम्ही अमुक पीरचे श्रद्धाळू व अमुक एका बुजूर्गचे मुरीद आहोत म्हणून जन्नत आमच्या नशीबी आहेच. आणि ना एखाद्या माणसाने हे गृहीत धरावे की आम्ही बुजुर्ग व्यक्तिचे श्रद्धाळू आहोत व त्यांच्या नावाची नियाज करतो म्हणून जन्नतचे हक्कदार आहोत

१९. अर्थात जन्नत त्यांची अंतिम मजल ठरेल.

२०. म्हणजे हा असा वायदा आहे ज्याची अल्लाहने स्वत:जबाबदारी घेतली आहे आणि दासांना हा अधिकार दिला आहे की त्यांनी याच्या पूर्ततेची मागणी करावी.

२१. या ठिकाणी उपास्यांशी अभिप्रेत मूर्ति नव्हे कारण प्रश्नमूर्त्यांशी केला जात नाही तर प्रेषित, व बुजुर्ग होत ज्यांच्याशी त्यींचे श्रद्धाळू लोक असा व्यवहार करतात जो केवळ अल्लाहशीच केला गेला पाहिजे. याचे उदाहरण हजरत ईसा (येशू) होत, ज्यांना ख्रिश्चनांनी ईश्वर बनविले आहे. या संदर्भात जे खंडन करणारे निवेदन हजरत ईसा ईश्वराच्या न्यायालयात देतील ते सूरह मायदा आयत क्र. ११६ मध्ये निवेदिले गेले आहे. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी ही हजरत इब्राहीम यांची मूर्ती काबागृहात ठेवली होती.

२२. म्हणजे आम्ही तर आपला कार्यसाधक अल्लाहलाच बनविले होते मग असे का म्हणून घडू शकत होते की आम्ही लोकांना हे सांगावे की त्यांनी अल्लाहला सोडून आम्हाला कार्यसाधक बनवावे व आम्हाला गरजपूर्ति करणारा समजून आमची पूजाअर्चना करावी.

ही आयत केवळ अनेकेश्वरवाद्यांचेच नव्हे तर अशा मुसलमानांचे ही डोळे उघडविण्यास पुरेशी आहे जे बुजुर्गांच्या श्रद्धेपायी शिर्क करतात, व असे समजतात की त्यांचे नवस मानल्याने व त्यांच्या कबरींवर चढावे चढविल्याने ते प्रसन्न होतात. वस्तुत: हे बुजुर्ग कियामतीच्या दिवशी आपल्या श्रद्धाळूंच्या या अनेकेश्वरवादी हरकतींवर उद्धिग्नता व्यक्त करतील आणि ही त्यांच्याकरिता त्यांच्या बुजुर्ग लोकांकडून चपराक असेल.

२३. म्हणजे यांना जगात जी मालमत्ता लाभली, त्यात असे धुंद झाले की ईश्वराला विसरले. आणि ईश्वराला विसरण्याचा परिणाम असा झाला की ते शिर्क करण्यात व्यस्त झाले व विनाशाच्या खाईत कोसळले.

स्पष्ट झाले की शिर्क करण्यात मनुष्य अशावेळी व्यस्त होतो जेव्हा तो अल्लाहला विसरतो. अल्लाहचे खऱ्या अर्थाने स्मरण राखणारा शिर्क करण्यात व्यस्त होऊ शकत नाही.

२४. म्हणजे तुमच्या दावा त्या व्यक्तिमत्त्वा बाबत होता आणि जी अतिशयोक्तिपूर्ण कल्पना तुम्ही केली होती ती चुकीची सिद्ध झाली आणि जाहीर झाले की ते काम बनविण्याचा कसलाही अधिकार बाळगत नव्हते आणि ना याच्या त्यांनी दावा केला होता किंबहुना ते स्वत: आपला कार्यसाधक अल्लाहलाच मानत होते.

२५. येथे अत्याचाराशी अभिप्रेत शिर्क होय.

२०. (पैगंबर !) तुमच्या पूर्वी आम्ही ज्या ज्या प्रेषितांना पाठविले, ते सर्व जेवण ही करीत व बाजारात हिंडत फिरतही असत.[२६] आम्ही तुम्हा लोकांना एकमेकांच्या परिक्षेचे माध्यम बनविले आहे काय तुम्ही सहनशीलता पाळता?[२७] आणि तुमचा रब्ब (सर्व काही) पहात आहे.

وَمَآ أَرْسَلْنَا قَبْلَكَ مِنَ الْمُرْسَلِينَ إِلَّآ إِنَّهُمْ لَيَأْكُلُونَ
الطَّعَامَ وَيَمْشُونَ فِي الْأَسْوَاقِ ۗ وَجَعَلْنَا بَعْضَكُمْ
لِبَعْضٍ فِتْنَةً أَتَصْبِرُونَ ۚ وَكَانَ رَبُّكَ بَصِيرًا ﴿٢٠﴾

२१. आणि जे लोक आमच्याशी भेटीची आशा ठेवीत नाही, ते म्हणतात, आमच्यावर फरिश्ते का उतरविलले गेले नाहीत, किंवा असे कां झाले नाही की आम्ही आपल्या पालनकर्त्यास बघितले असते? त्यांनी आपल्या परिने आपल्याला फार मोठे समजून घेतले आणि मोठा विद्रोह दाखविला.[२८]

وَقَالَ الَّذِينَ لَا يَرْجُونَ لِقَآءَنَا لَوْلَآ أُنْزِلَ عَلَيْنَا
الْمَلٰٓئِكَةُ أَوْ نَرٰى رَبَّنَا ۗ لَقَدِ اسْتَكْبَرُوا فِيٓ أَنْفُسِهِمْ
وَعَتَوْ عُتُوًّا كَبِيرًا ﴿٢١﴾

२२. ज्या दिवशी हे फरिशत्यांना पाहतील त्या दिवशी अपराध्यांकरीता कोणतीही खुशखबरी नसेल आणि उद्‌गारतील शरण शरण.[२९]

يَوْمَ يَرَوْنَ الْمَلٰٓئِكَةَ لَا بُشْرٰى يَوْمَئِذٍ لِّلْمُجْرِمِينَ وَ
يَقُولُونَ حِجْرًا مَّحْجُورًا ﴿٢٢﴾

२३. आणि जे कर्म देखील यांनी केले असेल त्याकडे आम्ही सरसावून जाऊ व त्यास धूळ बनवून उडवून देऊ.[३०]

وَقَدِمْنَآ إِلٰى مَا عَمِلُوا مِنْ عَمَلٍ فَجَعَلْنٰهُ هَبَآءً مَّنْثُورًا ﴿٢٣﴾

२४. त्या दिवशी जन्नत वाले चांगल्या ठिकाणी व उत्कृष्ट विश्रामस्थानी असतील.

أَصْحٰبُ الْجَنَّةِ يَوْمَئِذٍ خَيْرٌ مُّسْتَقَرًّا وَّأَحْسَنُ مَقِيلًا ﴿٢٤﴾

२५. आकाश त्या दिवशी एका ढगासह [३१] फाटून जाईल आणि फरिश्त्यांचे थवे उतरविले जातील.

وَيَوْمَ تَشَقَّقُ السَّمَآءُ بِالْغَمَامِ وَنُزِّلَ الْمَلٰٓئِكَةُ تَنْزِيلًا ﴿٢٥﴾

२६. त्या दिवशी राज्यासत्ता [३२] रहमान ची च असेल, आणि तो दिवस काफीरां करिता मोठा सक्त असेल.

الْمُلْكُ يَوْمَئِذٍ الْحَقُّ لِلرَّحْمٰنِ ۚ وَكَانَ يَوْمًا عَلَى
الْكٰفِرِينَ عَسِيرًا ﴿٢٦﴾

२७. अत्याचारी त्या दिवशी आपल्या हाताला चावा घेईल [३३] आणि म्हणेल, मी रसूल सोबत मार्ग पत्कारला असता तर बरे झाले असते !

وَيَوْمَ يَعَضُّ الظَّالِمُ عَلٰى يَدَيْهِ يَقُولُ يٰلَيْتَنِي اتَّخَذْتُ
مَعَ الرَّسُولِ سَبِيلًا ﴿٢٧﴾

२६. हे त्याच्या या आक्षेपास उत्तर होय जो आयत क्र ७ मध्ये फल्लिखित आहे.

२७. म्हणजे रसूलचे खाणेपिणे व बाजारांमध्ये हिडोणे फिरणे.

दोन्ही समूहांकरीता परीक्षेची सबब बनले. काफीरांना तर ही संधी लाभली की त्यांनी रसूलवर टोमणे मारावेत व ईमान बाळगणाऱ्या करिता ही कसोटी की ते या अप्रिय गोष्टी ऐकून सहनशीलता पाळतात किंवा नाही.

याद्वारे हे मार्गदर्शन लाभते की काफीरांतर्फे रसूलच्या व्यक्तिमत्वावर जे काही आरोप लावले जातील त्यावर ईमान बाळगणाऱ्यांनी संयम राखला पाहिजे परंतु या काळात मुसलमानांची दशा मोठी विचित्र आहे की कोठून पैगंबरांवर एखादी टीका होते तर ते भानावर राहात नाहीत व याला निषेधाचा विषय बनवितात. आणि काफीर हेच इच्छितात की मुसलमानांनी प्रक्षोभित होऊन संघर्षास तयार व्हावे. प्रक्षोभित होण्याऐवजी जर त्यांनी वास्तविकपणे रसूलच्या स्थानास स्पष्ट करावे तर कितीतरी लोक रसूलची योग्यता जाणणारे होतील.

२८. प्रेषित्वाचा इन्कार करणारे त्या ईश्वरी हिकमतीस समजण्याचा प्रयत्न करण्या ऐवजी, की ज्या आधारे माणसांच्या मार्गदर्शनासाठी रसूल (पैगंबर) पाठविले जातो, उलट सुलट आक्षेप घेत. त्यांचे असे म्हणणे होते की जर रसूल वर फरिश्ते अवतरीत केले जातात तर आमच्यावर कां अवतरीत केले जात नाही आणि या धुंदीत ते येथपावेतो म्हणाले की असे का झाले नाही की अपरोक्षाची आवरणे हटविली गेली असती व आम्ही आपल्या पालनकर्त्यास खुल्या नेत्रांनी पाहून घेतले असते. म्हणजे ते असे इच्छित होते की वास्तवतेला बसीरत (अंतर्दृष्टि)ने नव्हे, किंबहुना बसारत (बाह्य दृष्टि) ने पहावे. वस्तुत: माणसाची सर्व परिक्षा या गोष्टीत आहे की तो वास्तवतेला अंतर्दृष्टिने पाहतो किंवा नाही. परंतु जे लोक या घमेंडीत चूर असतात की त्यांचे स्थान दासाचे नाही, तर स्वतंत्र व खुद मुखत्यार मानव असण्याचे आहे, ते ईश्वर व त्यांच्या रसूल बाबतीत निरर्थक व बिनबुडाच्या गोष्टी करू लागतात आणि आपल्या विद्रोही वृत्तीत पुढेच जात राहतात.

२९. म्हणजे आज हे फरिश्त्यांना पाहण्याची मागणी करीत आहेत परंतु तो दिवस दूर नव्हे जेव्हा फरिश्ते यांच्यासमोर प्रकट होतील आणि जेव्हा हो त्यांना पाहतील केव्हा समजतील की आता आपत्ति आली. म्हणून 'शरण शरण' असे उद्गारतील.

३०. म्हणजे हे लोक जेव्हा आखिरतचाच इन्कार करीत राहीलेत, तर यांचे कोणतेही कर्म, मग ते धार्मिक स्वरुपाचे असो किंवा भौतिक स्वरुप बाळगणारे असो; कियामतीच्या दिवशी त्याची काहीच कदर केली जाणार नाही. त्यांची कर्मे राखीचा ढीग ठरतील आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना धुळीप्रमाणे उडवून देईल.

आज आखिरत (परलोक)शी उद्विग्न असलेले लोक आपल्या ऐहीक व सामाजिक कार्याबद्दल मोठा गर्व बाळगतात आणि त्या कार्यांमुळेच ते आपल्या जन समूहाचे हीरो बनतात, परंतु कियामतीच्या दिवशी त्यांना हे कळून येईल की त्यांची ही कार्ये धुळीकणांपेक्षा जास्त वजनाची नाहीत !

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह इब्राहीम टीप क्र.२६ आणि सूरह कहफ टीप क्र. १३०.

३१. मूळ ग्रंथात 'गमाम' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ पांढरा ढग असा आहे. कियामतीच्या दिवशी आकाश फाटेल व त्यातून ढग प्रकट होईल संभवत:हा ढग (गमाम) हाच असेल ज्याचा उल्लेख सूरह बकराह मध्ये अशा प्रकारे केला गेला आहे.

هَلْ يَنْظُرُوْنَ اِلَّاۤ اَنْ يَّاْتِيَهُمُ اللّٰهُ فِىْ ظُلَلٍ مِّنَ الْغَمَامِ وَالْمَلٰۤئِكَةُ وَقُضِىَ الْاَمْرُ ـ (سورہ بقرہ آیت ۲۱۰)

'काय हे लोक या गोष्टीची वाट पहात आहेत की अल्लाह फिरिशत्यांना घेऊन ढगांच्या छायेत यांच्या समोर प्रकट व्हावा व निर्णयच लावला जावा.' (सूरह बकरह -२१०)

३२. म्हणजे कियामतीच्या दिवशी सर्व ऐहीक राज्यासत्ता नाश पावली असेल, मग लोकांना दिसून येईल की सत्तेचा अधिकार केवळ अल्लाह करिताच आहे जो खराखुरा सत्ताधिकारी आहे.

३३. हाताचा चावा घेणे, दु:ख व पश्चात्तापाने दग्ध होऊन अर्थात कियामतीच्या दिवशी वेडसर पणाचा कैफ काफीरांवर चढेल त्यामुळे त्या कैफात ते आपले हाताला चावा घेतील यात नवल नाही.

२८. अरेरे ! माझे दुर्दैव ! मी अमुक इसमाला मित्र बनविले नसते तर बरे झाले असते ![३४]

يَٰوَيْلَتَىٰ لَيْتَنِى لَمْ أَتَّخِذْ فُلَانًا خَلِيلًا ﴿٢٨﴾

२९. त्याने मला मार्गभ्रष्ट करुन उपदेशा [३५] पासून दूर राखले, जेव्हा उपदेश माझ्या जवळ येऊन पोहचला होता. आणि सैतान तर माणसाला असहाय्य दशेत सोडून देणारा आहेच.[३६]

لَّقَدْ أَضَلَّنِى عَنِ ٱلذِّكْرِ بَعْدَ إِذْ جَآءَنِى ۗ وَكَانَ ٱلشَّيْطَٰنُ
لِلْإِنسَٰنِ خَذُولًا ﴿٢٩﴾

३०. आणि रसूल म्हणेल, हे माझ्या पालन कर्त्या ! माझ्या जन-समूहाने या कुरआनास सोडून दिले होते.[३७]

وَقَالَ ٱلرَّسُولُ يَٰرَبِّ إِنَّ قَوْمِى ٱتَّخَذُوا۟ هَٰذَا ٱلْقُرْءَانَ
مَهْجُورًا ﴿٣٠﴾

३१. आणि अशा प्रकारे आम्ही प्रत्येक पैगंबरासाठी अपराध्यांमधून शत्रू उभे केले.[३८] आणि तुमचा पालनकर्ता (तुमच्या) मार्गदर्शनासाठी व मदतीसाठी पुरेसा आहे.[३९]

وَكَذَٰلِكَ جَعَلْنَا لِكُلِّ نَبِىٍّ عَدُوًّا مِّنَ ٱلْمُجْرِمِينَ ۗ وَكَفَىٰ
بِرَبِّكَ هَادِيًا وَنَصِيرًا ﴿٣١﴾

३२. काफीर म्हणतात, याच्यावर संपूर्ण कुरआन एकाच वेळी का अवतरीत केले गेले नाही?[४०] आम्ही (थोडे थोडे करुन अवतरीत केले व) हे अशासाठी केले की या द्वारे (हे पैगंबर !) तुमच्या अंत:करणास दृढ करावे [४१] आणि आम्ही या वाणीस चांगल्या मांडणीसह प्रस्तुत केले आहे.[४२]

وَقَالَ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ لَوْلَا نُزِّلَ عَلَيْهِ ٱلْقُرْءَانُ جُمْلَةً
وَٰحِدَةً ۚ كَذَٰلِكَ لِنُثَبِّتَ بِهِۦ فُؤَادَكَ ۖ وَرَتَّلْنَٰهُ تَرْتِيلًا ﴿٣٢﴾

३३. आणि हे जो काही आक्षेप तुमच्या समोर मांडतात, आम्ही उत्कृष्ट स्पष्टीकरणासह [४३] सत्य गोष्ट तुमचा समोर मांडतो.

وَلَا يَأْتُونَكَ بِمَثَلٍ إِلَّا جِئْنَٰكَ بِٱلْحَقِّ وَأَحْسَنَ تَفْسِيرًا ﴿٣٣﴾

३४. ज्या लोकांना तोंडघशी, जहन्नम कडे फरफटत नेले जाईल, त्यांचे ठिकाण मोठे वाईट व त्यांचा मार्ग अगदी चुकीचा आहे.

ٱلَّذِينَ يُحْشَرُونَ عَلَىٰ وُجُوهِهِمْ إِلَىٰ جَهَنَّمَ أُو۟لَٰٓئِكَ شَرٌّ مَّكَانًا
وَأَضَلُّ سَبِيلًا ﴿٣٤﴾

३५. आम्ही मूसाला ग्रंथ प्रदान केला [४४] व त्याचा भाऊ हारून यास त्याचा सहाय्यक बनविले.[४५]

وَلَقَدْ ءَاتَيْنَا مُوسَى ٱلْكِتَٰبَ وَجَعَلْنَا مَعَهُۥٓ أَخَاهُ هَٰرُونَ وَزِيرًا ﴿٣٥﴾

३४. ही आणखी एक तंबी होय की माणसाने नीट विचारपूर्वक मित्राची निवड करावी कारण मनुष्य आपल्या मित्राच्या गोष्टीस सहजगत्या स्विकारतो व त्याच्या मार्गाचे अनुसरण करतो. जर मित्र मार्गभ्रष्ट असेल तर त्याचा साथीदार ही मार्गभ्रष्ट होतो. जगात असे किती तरी लोक याच कारणास्तव काफीर, दुराचारी व व्यभिचारी बनलेले आहेत की त्यांच्यावर आपल्या वाईट मित्रांचा प्रभाव पडलेला आहे. त्यांना आपल्या खऱ्या चुकीची जाणीव कियामतीच्या दिवशी होईल. त्या वेळी ते आपल्या वंचिततेवर पश्चाताप करतील. याऊलट मनुष्य जेव्हा आपल्या मैत्री करीता अल्लाहच्या ईमान बाळगणाऱ्या व प्रमाणिक दासांची निवड करतो, जे अल्लाहचे भय बाळगतात. स्वच्छ शुद्ध जीवन व्यतीत करतात तर त्याच्या सहवासाचा लाभ या माणसालाही लाभतो. अत्तारा (अत्तर विकणाऱ्या) जवळ बसणारा अत्तराच्या सुवासापासून वंचित राहू शकत नाही.

३५. अभिप्रेत ते उपदेश आहेत जे अल्लाहने आपल्या दासांच्या सुधारणेसाठी अवतरीत केले आहेत.

३६. म्हणजे सैतान जगात तर माणसाला चुकीचे मार्गदर्शन करून मोठ मोठी स्वप्ने दाखवित राहीला परंतु जेव्हा परिणति जाहीर होण्याची वेळ आली तर साथ सोडून पळाला. सैतानाची गद्दारी अगदी उघडपणे कियामतीच्या दिवशी दिसून येईल.

३७. अल्लाहच्या न्यायालयात पैगंबरांची ही फिर्याद असेल की मी आपल्या जन-समूहास या कुरआनाद्वारे खरा (सन्मार्ग) दाखविण्याचा प्रयत्न केला होता, परंतु हे लोक कुरआनास सोडून आपली मनमानी करीत राहीले.

अरब देशीय लोक असे होत की ज्यांना सर्वात प्रथम पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी संबोधिले ज्यांच्यावर प्रमाण पूर्णत: प्रस्थापित झाले, म्हणून अल्लाहच्या न्यायालयात सर्वात प्रथम त्यांचीच पकड होईल. राहीलेत इतर जन-समूह तर ज्यांच्या पर्यंत रसूल किंवा त्याच्या अनुयायींद्वारे कुरआनाचा संदेश पोहचला व त्यांनी तो स्विकृत केला नाही तर ते देखील अल्लाहच्या पकडीपासून वाचू शकणार नाहीत कारण आयत क्र. १ मधील निवेदनानुसार रसूल जगातल्या समस्त जन-समूहांना खबरदार करण्याकरीता पाठविला गेला आहे आणि कुरानाचे अवतरण याच हेतुने केले गेले आहे.

आज बहुसंख्य मुसलमानांची ही दशा आहे की, ते कुरआनास मानण्याचा दावा करतात, परंतु पारंपारीक मर्यादेप्रत हे लोक ना त्याला समजण्याचा प्रयत्न करतात आणि ना आपली श्रद्धा व आचरणात याला मार्गदर्शक बनवितात. प्रत्येक दृष्टीने यांनी कुरआनाकडे दुर्लक्ष केले आहे व अशा भ्रमात पडले आहेत की आखिरतच्या न्यायालयात त्यांच्यावर खटला चालविला जाणार नाही

३८. संकेत त्या नेत्यांकडे आहे जे अपराध्यामधून उदयास येतात आणि पैगंबराचे शत्रू बनून त्याच्या आवाहनाच्या विरोधात सामर्थ्य पणास लावतात अर्थात हे सर्व काही अल्लाहच्या निर्धारीत केलेल्या नियमानुसार होते म्हणून याचा असा अर्थ घेतला गेला आहे की, आम्ही प्रत्येक पैगंबराकरीता अपराध्यांमधून शत्रू उभे केलेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप २१०.

३९. म्हणजे शत्रूंच्या समस्त कारस्थान नंतर ही तुमच्या साठी मार्गदर्शनाचा मार्ग मोकळा होत जाईल. हा मार्ग पार पाडतांना वळणा वळणावर तुमच्या मार्गदर्शनाची सामुग्री असेल, आणि कठीण अवस्थांमध्ये अल्लाह तुमची मदत करील.

४०. इन्कार करणाऱ्यांचा एक मोठा आक्षेप असा होता की जर कुरआन खरोखर अल्लाहचा ग्रंथ आहे, तर संपूर्ण ग्रंथाच्या रूपाने एकाच वेळी कां अवतरला?

४१. म्हणजे कुरआनास थोडे करून अवतरीत करण्याचा एक मोठा लाभ तर असा की प्रत्येक प्रसंगी वेळेवर मार्गदर्शन लाभल्याने मन-मस्तिष्कास सामर्थ्य प्राप्त होते. आधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. १४०.

४२. मूळ ग्रंथात तरतील हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ चांगली क्रमबद्धता, चांगले संकलन व चांगली वाणी असा आहे. (पहा अल्कामूस खंड-३ पृ. २९२) अर्थात आम्ही कुरआनास जरी थोडे करून अवतरीत केले आहे. तरी यामुळे वाणी अव्यस्थित झालेली नाही, किंबहुना त्याच्या रचनेत कमालीचे सौंदर्य राखले गेले आहे. यास्तव जे लोक कुरआना विषयी विचार चिंतन करतात ते याच्या सुसूत्रतेस (चांगल्या रचनेस) पाहून याचा चमत्कारीक असण्याबद्दल विश्वास बाळगू लागतात.

४३. अर्थात आक्षेप घेणाऱ्या तर्फे ज्या वेळी जी शंका प्रकट केली जाते तिचे उचित उत्तर अतिश्य स्पष्ट शैलीत कुरआनात सादर केले जाते. कुरआनास थोडे करून व प्रसंगा प्रसंगा ने अवतरीत करण्याचा हा आणखी एक हेतु होय ज्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने या आयतीत निवेदीले आहे.

४४. आभिप्रेत तौरात होय. ज्याच्या अवतरणाचा आरंभ प्रेषित्वाच्या आंरभा पासूनच झाला होता. याचा काही भाग फिरऔन बुडून जाण्यापूर्वी अवतरला होता व बाकीचा भाग त्यानंतर अवतरला. तौरात हा ग्रंथ संपूर्णपणे एकाच वेळी अवतरला असे समजणे योग्य नव्हे कारण ही गोष्ट ना कुरआनात सांगितली गेली आहे आणि ना सांप्रत तौरात मध्ये याचा एखाद्या उल्लेख आहे यास्तव उचिंत बाब अशी की आकाशातून अवतरीत झालेल्या ग्रंथाचे अवतरण प्रसंगानुरुप थोडे थोडे होत राहीले.

४५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह 'ताहा' टीप क्र.२९.३०.

فَقُلْنَا اذْهَبَآ إِلَى الْقَوْمِ الَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا فَدَمَّرْنَاهُمْ
تَدْمِيرًا ﴿٣٦﴾

३६. आम्ही सांगितले, तुम्ही दोघे ही त्या जन-समूहाजवळ जा, ज्याने तुमच्या निशाण्यांना खोटे ठरविले आहे.[४६] शेवटी आम्ही त्या जन-समूहाचा सर्वनाश करून टाकला.

وَقَوْمَ نُوحٍ لَّمَّا كَذَّبُوا الرُّسُلَ أَغْرَقْنَاهُمْ وَجَعَلْنَاهُمْ لِلنَّاسِ
آيَةً ۖ وَأَعْتَدْنَا لِلظَّالِمِينَ عَذَابًا أَلِيمًا ﴿٣٧﴾

३७. आणि नूह-जन समूहास आम्ही बुडवून टाकले, जेव्हा त्याने पैगंबराना खोटे ठरविले.[४८] आणि लोकांकरीता त्यास बोध-चिन्ह बनविले, आणि अत्याचारीं करीता आम्ही दु:ख दायक शिक्षा तयार करून ठेवली आहे.

وَعَادًا وَثَمُودَا۟ وَأَصْحَابَ الرَّسِّ
وَقُرُونًا بَيْنَ ذَٰلِكَ كَثِيرًا ﴿٣٨﴾

३८. आणि आद [४९]समूद [५०] खंदकवाले [५१] व त्यांच्या दरम्यानच्या अनेक जन-समूहांना आम्ही नष्ट केले.[५२]

وَكُلًّا ضَرَبْنَا لَهُ الْأَمْثَالَ ۖ وَكُلًّا تَبَّرْنَا تَتْبِيرًا ﴿٣٩﴾

३९. आम्ही प्रत्येका समोर उदाहरणे प्रस्तुत केली होती,[५३] आणि प्रत्येकाला नष्ट करून टाकले.

وَلَقَدْ أَتَوْا عَلَى الْقَرْيَةِ الَّتِي أُمْطِرَتْ مَطَرَ السَّوْءِ ۚ أَفَلَمْ يَكُونُوا
يَرَوْنَهَا ۚ بَلْ كَانُوا لَا يَرْجُونَ نُشُورًا ﴿٤٠﴾

४०. आणि त्या वस्ती वरून यांचे जाणे झाले आहे, ज्यावर अतिशय वाईट पाऊस पाडला गेला [५४] काय यांना हे दिसून येत नाही? परंतु हे लोक मरणोत्तर जीवनाची अपेक्षाच बाळगत नाही. [५५]

وَإِذَا رَأَوْكَ إِن يَتَّخِذُونَكَ إِلَّا هُزُوًا أَهَٰذَا الَّذِي بَعَثَ
اللَّهُ رَسُولًا ﴿٤١﴾

४१. आणि जेव्हा हे तुम्हाला पाहतात तेव्हा तुमची थट्टा उडवितात. काय हाच का तो मनुष्य, ज्याला अल्लाहने रसूल बनवून पाठविले आहे?

إِن كَادَ لَيُضِلُّنَا عَنْ آلِهَتِنَا لَوْلَا أَن صَبَرْنَا عَلَيْهَا ۚ وَسَوْفَ
يَعْلَمُونَ حِينَ يَرَوْنَ الْعَذَابَ مَنْ أَضَلُّ سَبِيلًا ﴿٤٢﴾

४२. याने तर आम्हाला आमच्या उपास्य दैवतां पासून पराडगमुख केले असते,जर आम्ही त्यावर अटळ राहीलो नसतो. लवकरच जेव्हा हे अजाब (ईश शिक्षेला)पाहतील तर त्यांना कळून येईल की मार्गापासून अगदी विचलित झालेला कोण आहे?[५६]

أَرَأَيْتَ مَنِ اتَّخَذَ إِلَٰهَهُ هَوَاهُ أَفَأَنتَ تَكُونُ
عَلَيْهِ وَكِيلًا ﴿٤٣﴾

४३. तुम्ही अशा माणसाला पाहीले ज्याने आपल्या इच्छा आकाक्षांना आपले उपास्य बनविले आहे?[५७] काय, तुम्ही त्या (ला सन्मार्गाला लावण्या) ची जबाबदारी घेऊ शकता?[५८]

४६. अभिप्रेत फिरऔनचा जन समूह होय आणि आयतींना खोटे ठरविण्याशी अभिप्रेत ईश्वराच्या एकमेवतेला प्रमाणित करणाऱ्या त्या निशाण्या होत ज्या सृष्टीत विखुरलेल्या आहेत आणि मनुष्य स्वभावात सामावलेल्या आहेत. फिरऔन या आयतींना खोटे ठरविण्याबाबत आधीच अपराधी होता. तसेच त्याने पैगंबरीय इतिहासाचे अवशेष हजरत यूसुफ यांच्या त्या चिन्हांना जी त्यांनी या देशात सोडली होती, अगदी दृष्टी आड केले होते आणि हीच दशा त्याच्या जनसमूहाची देखील होती. म्हणून हजरत मूसा यांनी प्रमाण प्रस्थापित करण्याआधी ही फिरऔन व त्याचा जन समूह अपराधी होता व त्यांनी प्रमाण प्रस्थापित केल्या नंतर तर त्याचा अपराध अधिक भयंकर झाला व सत्याशी असलेले त्याचे शत्रूत्व उघडपणे समोर आले.

तात्पर्य, ज्या जन समूहावर एखाद्या पैगंबराद्वारे प्रमाण प्रस्थापित झालेले नसेल तरी त्याने ईश्वराच्या त्या चिन्हांना जी सृष्टीत पसरलेली आहेत व मनुष्य स्वभावात सुप्त आहेत, खोटे ठरवून मार्गभ्रष्टता अंगिकारली असेल तो जन-समूह विद्रोही व काफीरच गणला जाईल.

४७. फिरऔन व त्याच्या सैन्याला तर बुडविले गेले आणि मिस्र (इजिप्त) मध्ये त्याचा जनसमूह देखील नष्ट केला गेला.

४८. हजरत नूहच्या जन-समूहाने त्यांना खोटे ठरविले होते. परंतु या गोष्टीस समस्त पैगंबरांना खोटे ठरविण्याच्या अर्थाने घेतले गेले कारण एका पैगंबरास खोटे ठरविणे म्हणजे इतर सर्व पैगंबरांना खोटे ठरविणे होय.

४९. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हूद टीप क्र. ७४ व सूरह फज्र टीप क्र. ८ ते ११.

५०. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हूद टीप क्र. ८६ व सूरह फज्र टीप क्र. १२ ते १४.

५१. हा एक जन समूह होता ज्याच्याकडे एक पैगंबर अल्लाहतर्फे पाठविला गेला होता, मग जेव्हा त्याने या पैगंबरास खोटे ठरविले तेव्हा त्याचा नायनाट केला गेला. अर्थात हा जनसमूह कोणत्या ठिकाणी वसत होता व त्याच्याकडे कोणत्या पैगंबरास पाठविले गेले याचा उलगडा कुरआनने केलेला नाही, परंतु बोध प्राप्ती साठी याचा उल्लेख केला गेला आहे. एखाद्या सही हदीस मध्येही या जन समूहाची स्थिती निवेदिली गेली नाही म्हणून आम्हास कुरानाच्या संक्षिप्त निवेदना वरच समाधान करावे लागेल. भाष्यकारांनी या संदर्भात जी वेगवेगळी कथने उल्लेखिली आहेत, त्या केवळ अनुमानाच्या गोष्टी होत.

५२. तात्पर्य इतर अनेक जनसमूह आहेत ज्यांच्या कडे पैगंबर पाठविले गेले होते. परंतु त्यांनी आपल्या पैगंबराना खोटे ठरविल्यामुळे त्यांचा नाश केला गला परंतु अशा समस्त जन- समूहांचा उल्लेख कुरआनाने नावासह केलेला नाही. हे जन समूह वेगवेगळ्या देशात राहीले असतील तेव्हा नवल नव्हे की प्राचीन भारतातील ही एखादा जन-समूह नष्ट केला गेला असावा.

५३. म्हणजे उदाहरणे देऊन समजाविले होते व विनाशभूत जनसमूहांची उदाहरणे सादर केली होती.

५४. अभिप्रेत लूत जन-समूहाच्या वस्त्या होत. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११९

५५. मनुष्य जेव्हा अखिरत विषयी गंभीर नसेल तर तो घटनांद्रारे कसलाही बोध ग्रहण करीत नाही. ज्यांना मरणोत्तर जीवनाची अभिलाषा नाही व जे आपल्या पालन कर्त्या कडून सदाचरणाचा मोबदला प्राप्त करू इच्छित नाही ते प्रेषित इतिहासाचे चुकीचे स्पष्टीकरण करून आपल्या ऐहीक भक्तीत रममाण असतात.

५६. म्हणजे आज तर पैगंबरांच्या एकेश्वरवादी आवाहनास आपल्या धर्मावरील संकट समजत आहेत व त्यास मार्गभ्रष्टता ठरवित आहेत. परंतु जेव्हा ते आपल्या मूर्तिपूजा व अनेकेश्वरवादाची भयानक परिणति पाहतील तर त्या वेळी त्यांना या गोष्टीची जाणीव होईल की त्यांची आपल्या मूर्ति व उपास्य दैवतां वरील श्रद्धा निव्वळ मार्गभ्रष्टता होती व या मार्गभ्रष्टतेत ते दूरवर भरकटत गेले. सन्मार्ग केवल तोच होता ज्याकडे अल्लाहचे पैगंबर यांना बोलावित होते.

५७. इच्छा आकाक्षांना ईश्वर बनविण्याचा अर्थ असा आहे की माणसाने इच्छेचे अगदी दास व्हावे. स्वभाव धर्माच्या पुकरण्याकडे लक्ष देण्याऐवजी व विवेक बुद्धीने काम घेण्या ऐवजी स्वत:ला इच्छा आकाक्षांच्या हवाली करावे. असा मनुष्य ईश-आदेशाचा विरोध अशासाठी करतो की त्याच्या इच्छा-आकांक्षा आड येतात व यालाच इच्छा-भक्ति म्हणतात, जी माणसाला त्याच्या पदावरून खेचून पशू-पातळीवर आणते. आजच्या काळात याचे स्पष्ट स्वरुप होय म्हणजे इच्छा आकाक्षांना कसलाही प्रतिबंध न घालता पूर्ण करण्याकरिता स्वैर सोडून देणे. अशा माणसाचे आराध्य दैवत त्याच्या मनात असते व तो त्याचा भक्त बनतो.

५८. म्हणजे अशा माणसाला समजाविले जाऊ शकते जो आपल्या बुद्धीचा वापर करण्यास तयार असेल, परंतु जो मनुष्य आपल्या इच्छे मागे आंधळा झाला असेल त्याला समजविणे एखाद्या पैगंबराला ही शक्य नाही.

أَمْ تَحْسَبُ أَنَّ أَكْثَرَهُمْ يَسْمَعُونَ أَوْ يَعْقِلُونَ ۚ إِنْ هُمْ إِلَّا
كَالْأَنْعَامِ ۖ بَلْ هُمْ أَضَلُّ سَبِيلًا ﴿٤٤﴾

४४. काय तुम्ही असे समजता की यांच्या पैकी अधिकांश ऐकतात किंवा समजतात ? हे तर जनावरां सारखे आहेत, किंबहुना त्यांच्यापेक्षा ही अधिक वाट चुकलेले.[५९]

أَلَمْ تَرَ إِلَىٰ رَبِّكَ كَيْفَ مَدَّ الظِّلَّ ۚ وَلَوْ شَاءَ لَجَعَلَهُ سَاكِنًا ۚ ثُمَّ
جَعَلْنَا الشَّمْسَ عَلَيْهِ دَلِيلًا ﴿٤٥﴾

४५. काय तुम्ही पाहत नाही की तुमचा पालन कर्ता कशा प्रकारे सावली पसरवितो? त्याने इच्छिले असते तर तिला स्थीर केले असते. मग आम्ही सूर्याला यावर प्रमाण ठरविले.[६०]

ثُمَّ قَبَضْنَاهُ إِلَيْنَا قَبْضًا يَسِيرًا ﴿٤٦﴾

४६. मग आम्ही त्याला हळू हळू आपल्याकडे ओढून घेतो. [६१]

وَهُوَ الَّذِي جَعَلَ لَكُمُ اللَّيْلَ لِبَاسًا وَالنَّوْمَ سُبَاتًا وَجَعَلَ
النَّهَارَ نُشُورًا ﴿٤٧﴾

४७. आणि तोच होय. ज्याने तुमच्या करीता रात्रीला पोषाख,[६२] झोपेस शांती [६३] व दिवसाला उठून उभे राहण्याची वेळ बनविले.[६४]

وَهُوَ الَّذِي أَرْسَلَ الرِّيٰحَ بُشْرًا بَيْنَ يَدَيْ
رَحْمَتِهِ ۚ وَأَنْزَلْنَا مِنَ السَّمَاءِ مَاءً طَهُورًا ﴿٤٨﴾

४८. आणि तोच होय जो आपल्या कृपेच्या [६५] पुढे पुढे वाऱ्यांना खुशखबरी बनवून पाठवितो आणि आम्ही आकाशातून अतिशय स्वच्छ शुद्ध पाणी अवतरीत करतो. [६६]

لِنُحْيِيَ بِهِ بَلْدَةً مَيْتًا وَنُسْقِيَهُ مِمَّا خَلَقْنَا أَنْعَامًا
وَأَنَاسِيَّ كَثِيرًا ﴿٤٩﴾

४९. अशा साठी की या द्वारे (जमीनीच्या) मृत भागास जिवंत करावे आणि आपल्या निर्मिती पैकी अत्याधिक चतुष्पाद व माणसांना तृप्त करावे.

وَلَقَدْ صَرَّفْنَاهُ بَيْنَهُمْ لِيَذَّكَّرُوا فَأَبَىٰ
أَكْثَرُ النَّاسِ إِلَّا كُفُورًا ﴿٥٠﴾

५०. आणि आम्ही यास यांच्या दरम्यान निरनिराळ्या प्रकारे निवेदिले आहे.[६७] यासाठी की त्यांनी बोध ग्रहण करावा, परंतु अधिकांश लोकांनी कबूल केले नाही आणि कबूल केली असेल तर फक्त कृतघ्नता.

وَلَوْ شِئْنَا لَبَعَثْنَا فِي كُلِّ قَرْيَةٍ نَذِيرًا ﴿٥١﴾

५१. आम्ही इच्छिले असते तर प्रत्येक वस्तीत एक खबरदार करणाऱ्यास पाठविले असते.[६८]

५९. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २७६

६०. या ठिकाणी माणसाचे लक्ष ईश्वराच्या त्या निशाणीकडे वेधले गेले आहे जिला सावली म्हणतात सावली घरांची व झाड झुडपांची ही पडते व माणसाची ही जी त्याच्या समेत चालत असते व त्याला विचार चिंतनाचे आवाहन करते. ही सावली पसरते ही व आकुंचन घटते ही अर्थात सावलीचे हे लांब होणे व घटणे सूर्याच्या उदय अस्तामुळे व उत्कर्ष ऱ्हासामुळे होते. तात्पर्य सूर्य सावली करीता प्रमाण मार्ग होय. जर पसरलेल्या सावलीला सर्व श्रेष्ठ अल्लाहने स्थिर केले असते तर झाडांच्या एकाच बाजूला सावली पडली असती व दुसरी बाजू सूर्याच्या प्रखर उन्हातच राहीली असती. परंतु सावलीच्या गतीशीलतेमुळे व कमी अधिक होण्याने उष्णता व गारपणात मोटे संतुलन निर्माण झाले आहे. काय ही एक निश्चय बाळगणाऱ्या व उपाय योजना करणाऱ्या हस्तीची कार्य कुशलता नव्हे?

६१. सावली प्रात:काळी पसरलेली असते मग सूर्य जस जसा चढत जातो सावली घटत जाते व माध्यान्हा पासून कलडंल्यावर पुन्हा वाढू लागते. येथपावेतो की सूर्यास्त होतांना नाहीशी होते.

६२. रात्र अंग झाकते म्हणून तिला पोषाखाच्या अर्थाने घेतले गेले आहे.

६३. झोप थकावट दूर करते व आराम पोहचविते. ही अल्लाहची फार मोठी व नवलपूर्ण देणगी होय ज्या पासून प्रत्येक मनुष्य लाभान्वित होतो परंतु या गोष्टीवर विचार करण्यास तयार होत नाही की ही कृपा कोणाची? व तो कृपावंत कसा आहे ज्याच्या कृपेला कसलीही मर्यादा नाही.

६४. रात्र झोपण्याकरिता होती तर दिवस उठून उभे राहण्याकरिता होय, यासाठी की नवजीवन प्राप्त करावे अर्थात हे उठून उभे राहणे कियामतीच्या दिवशी उठून उभे राहण्याचे प्रमाण होय व स्मरणिका देखील प्रमाण या आधारे की अल्लाह झोपे नंतर जागे करतो, तर तो मृत्युनंतर जीवन ही प्रदान करू शकतो व स्मरणिका या पैलूने की सकाळचे उठणे कियामतीच्या दिवशी उठून उभे राहण्याचे स्मरण घडविते. यास्तव हदीस-वचनात सकाळी उठल्या बरोबर पुढील वचनांचा उद्‌घोष करण्याची ताकीद केली गेली आहे.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ الَّذِیْ اَحْیَانَا بَعْدَ مَا اَمَاتَنَا وَاِلَیْہِ

النُّشُوْرُ۔ (مشکوٰۃ کتاب الدعوات بحوالہ بخاری)

''प्रशांसा व कृतज्ञता अल्लाहसाठी आहे, ज्याने मृत्यनंतर जीवन प्रदान केले व त्याच्याच कडे उठून उभे राहणे होय.'' (मिश्कात किताबुद्दअवात - बुखारी)

६५. अभिप्रेत पाऊस होय.

६६. आकाशातून येणारे पावसाचे पाणी अतिशय स्वच्छ व शुद्ध असते. तसेच ते घाण मळ दूर करण्याचे व स्वच्छ शुद्ध बनविण्याचेही वैशिष्ट्य बाळगते.

६७. अभिप्रेत कुरआन होय. ज्यातले मजकूर विविध शैलीत निवेदिले गेले आहेत. येथे (O)यास चे विशेषण त्याचप्रमाणे कुरआनाकडे निर्देश करते जसे पुढे आयत क्र. ५२ मध्ये आहे.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १०९.

६८. म्हणजे अल्लाह करीता ही गोष्ट अतिशय सोपी होती की प्रत्येक वस्तीतून एक पैगंबर उभा केला असता परंतु त्याच्या बुद्धिकौशल्याची ही निकड होती की एक पैगंबर असा महान पाठविला जावा की तो एकटाच संपूर्ण विश्वाला सावध करण्यास पुरेसा ठरावा. यास्तव हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना एक इतिहास घडविणारे क्रांतीकारक व्यक्तिमत्व बनवून कुरआना सारख्या जिवंत ईश-चमत्कारासह अशा केंद्रित स्थानी पाठविले की संपूर्ण विश्वाकरीता त्यांचे प्रेषित्व पुरेसे ठरेल.

५२. तेव्हा या काफीरांचे म्हणणे तुम्ही मान्य करू नका व या द्वारे [६९] त्यांच्याशी जबरदस्त जेहाद करा.[७०]

فَلَا تُطِعِ الْكٰفِرِيْنَ وَ جَاهِدْهُمْ بِهٖ جِهَادًا كَبِيْرًا ﴿٥٢﴾

५३. तोच होय, ज्याने दोन जलप्रवाह (नदी व सागर) आपसात मिळविले. एक गोड स्वादीष्ट व दुसरा खारा-कडू आणि दोघांच्या दरम्यान त्याने एक आवरण टाकले व एक अडसर उभा केला.[७१]

وَهُوَ الَّذِيْ مَرَجَ الْبَحْرَيْنِ هٰذَا عَذْبٌ فُرَاتٌ وَّهٰذَا مِلْحٌ
اُجَاجٌ ۚ وَجَعَلَ بَيْنَهُمَا بَرْزَخًا وَّحِجْرًا مَّحْجُوْرًا ﴿٥٣﴾

५४. आणि तोच होय ज्याने पाण्या पासून [७२] एक मनुष्य निर्माण केला मग त्याच्या करीता आप्त-संबंध बनविले. [७३] तुमचा पालन कर्ता मोठा सामर्थ्यशाली आहे.[७४]

وَهُوَ الَّذِيْ خَلَقَ مِنَ الْمَآءِ بَشَرًا فَجَعَلَهٗ نَسَبًا
وَّصِهْرًا ؕ وَكَانَ رَبُّكَ قَدِيْرًا ﴿٥٤﴾

५५. आणि हे अल्लाहला सोडून त्यांची आराधना करतात जे ना त्यांना लाभ पोहचवू शकतात व ना नुकसान. [७५] आणि काफीर आपल्या पालन कर्त्याचा विरोधी झाला आहे. [७६]

وَيَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَا لَا يَنْفَعُهُمْ وَلَا يَضُرُّهُمْ ؕ
وَكَانَ الْكَافِرُ عَلٰى رَبِّهٖ ظَهِيْرًا ﴿٥٥﴾

५६. आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला तर केवळ खुशखबरी देणारा व खबरदार करणारा बनवून पाठविले आहे. [७७]

وَمَآ اَرْسَلْنٰكَ اِلَّا مُبَشِّرًا وَّنَذِيْرًا ﴿٥٦﴾

५७. सांगा, मी तुमच्याकडून याबद्दल कसलाही मोबदला मागत नाही, परंतु हे की जो इच्छिल त्याने आपल्या पालनकर्त्याचा मार्ग अंगिकारावा.[७८]

قُلْ مَآ اَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مِنْ اَجْرٍ اِلَّا مَنْ شَآءَ
اَنْ يَّتَّخِذَ اِلٰى رَبِّهٖ سَبِيْلًا ﴿٥٧﴾

५८. आणि त्यावर भरवसा राखा जो जिवंत आहे आणि कधी ही मरण पावणारा नाही.[७९] व त्याचे प्रशंसेसह गुणगान करा.[८०] आपल्या दासांच्या अपराधांशी भिज्ञ राहण्याकरीता तो पुरेसा आहे.[८१]

وَتَوَكَّلْ عَلَى الْحَيِّ الَّذِيْ لَا يَمُوْتُ وَسَبِّحْ بِحَمْدِهٖ ؕ وَكَفٰى بِهٖ
بِذُنُوْبِ عِبَادِهٖ خَبِيْرًا ﴿٥٨﴾

५९. ज्याने आकाशांना व जमीनीला व यांच्या दरम्यान असलेल्या समस्त वस्तुंना सहा दिवसात निर्माण केले.[८२] मग अर्श (ईश-सिंहासना) वर बुलद झाला.[८३] तो रहमान आहे. त्याची शान (त्या) जाणकाराला विचारा.[८४]

اَلَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا فِيْ سِتَّةِ اَيَّامٍ
ثُمَّ اسْتَوٰى عَلَى الْعَرْشِ ۚ اَلرَّحْمٰنُ فَسْـَٔلْ بِهٖ خَبِيْرًا ﴿٥٩﴾

६९. म्हणजे कुरआन द्वारे, जसे की कुरआना ने स्पष्ट आहे.

७०. या आयतीत कुरआनाद्वारे काफीरांशी मोठा संघर्ष करण्याचा आदेश दिला गेला आहे. जेहादचा अर्थ असा-

وَالْجِهَادُ وَالْمُجَاهَدَةُ اِسْتِفرَاغ الْوَسْعِ فِى
مُدافعةِالْعدوِّ۔ (مفردات راغب ص۱۰۰)

‘जेहाद व मुजाहीदा (पराक्रम) असा की शत्रूच्या विरोधात संपूर्ण सामर्थ्य लावले जावे’. (मुफ्रदात रागीब पृष्ठ १००)

ही सूरह मक्का काळाची आहे आणि मक्का काळात तरवारीने जेहाद करण्याचा आदेश दिला गेला नव्हता म्हणून या आयतीत जेहादशी अभिप्रेत सत्य-आवाहनास प्रस्तुत करण्यात अत्याधिक प्रयत्न दाखविणे, विरोध व अडचणींची पर्वा न करीत असत्याशी संघर्ष करणे असे आहे. मग हा जेहाद कुरआनाद्वारे मोठ्या प्रमाणावर करण्याचा आदेश दिला गेला आहे ज्याचा अर्थ असा की या आवाहनात्मक जेहाद मध्ये कुरआन तुमचे शस्त्र असावे. कुफ्र आणि शिर्कच्या खंडनात कुरआनी आयती प्रस्तुत केल्या जाव्यात. काफीरांच्या शंका व आक्षेपांचे जे उत्तर कुरआनने दिले आहे, ते यांना ऐकविले जावे. कुरआनाची तंबी ऐकवून त्यांना खबरदार केले जावे व त्यांच्या काफीर नितीच्या गोष्टींचा बिमोड कुरआनाद्वारे केला जावा. आज देखील आवाहनाच्या क्षेत्रात कुरआनाद्वारे जेहाद करण्याची सक्त आवश्यकता आहे. म्हणजे अरबी भाषा न जाणणाऱ्या लोकांसमोर कुरआनास भाषांतरासह प्रस्तुत करणे त्यातले मजकूर मांडून शंका कुशंका दूर करण्याचा प्रयत्न करणे आणि विरोधकांच्या शस्त्रांच्या विरोधात कुरआनास अस्त्र बनविणे फार मोठे जेहाद होय; जी काळाची महत्वपूर्ण निकड होय आणि या मार्गाचे योद्धे केवळ तेच लोक बनू शकतात ज्यांच्यावर कुरआनाची धुंद चढली असावी व त्यांनी याचे ध्वज रोहक बनून मैदानात यावे.

७१. मूळ ग्रंथात ‘बहरैन’ हा शब्द प्रयोग केला गेला आहे ज्याचा अर्थ समुद्र असा आहे. अरबी भाषेत बहर समुद्राला ही म्हणतात व नदीला देखील. यास्तव नील नदीला अल बहरुल अजरक (Blue Nile) व अलबहरुल अब्यज (White Nile) म्हटले जाते. आयतीत दोन बहरशी अभिप्रेत नदीचे सागराला मिळणे होय नदीचे पाणी गोड असते व समुद्राचे खारे. परंतु ज्या ठिकाणी नदी समुद्राला जाऊन मिळते त्या ठिकाणी दोघांचे ही पाणी आपापल्या हद्दीत आपले वैशिष्ट्य बाळगून असते.

समुद्राच्या भयंकर लाटा नदीशी टक्कर घेत असतात, परंतु त्याच्या पाण्याला खारे करीत नाही. जणू दोघांच्या दरम्यान एक आड पडदा आहे जो दिसून येत नाही आणि एक आवरण आहे जे दोघांना आपल्या जागी कायम राखते. आणि ‘इन्सायक्लोपिडीया ब्रिटानिका’ मध्ये या रहस्योद्घाटनांचा उल्लेख आहे की उत्तर सायबेरिया किंवा (रशिया)च्या समुद्र किनाऱ्यावर ज्या ठिकाणी मोठ मोठ्या नद्या उत्तर महासागरास मिळतात त्यांचे ताजे पाणी प्रमाणात कमी असल्यामुळे पृष्ठभागावरच राहते जेव्हा की उत्तर समुद्राच्या सखोलतेत खारे पाणी नेहमी प्रमाणे असते.

Because this fresh Water is less dense it remains on the surface, the salinity at greater depth, in the Arctic Ocean is normal for Sea water. (Encyclopaedia Britannica, Vol. 13 p 487)

काय हे या गोष्टीचे प्रमाण नव्हे की या ठिकाणी एक नियंत्रण राखणारी शक्ति आहे जिचे कायदे अशा प्रकारे लागू होत आहेत की प्रत्येक वस्तू आपल्या कक्षेत आहेत आणि कोणती ही वस्तू मर्यादिचे उललंघन करू शकत नाही. लोक या गोष्टीस निसर्ग-नियम या अर्थाने घेतात, परंतु कोणताही कायदा लागू करणाऱ्या शक्तिशिवाय अंमलात येत नाही मग हे निसर्ग-नियम (Physical Laws) लागू करणाऱ्या शक्ति शिवाय कशा प्रकारे अंमलात आले?

७२. म्हणजे पाण्याच्या एका थेंबापासून ज्याला ‘वीर्यबिंदू’ म्हटले जाते.

७३. म्हणजे एकीकडे रक्ताची नाती चालविलीत व दुसरी कडे पत्नीच्या संबंधाने आप्त संबंध अशा प्रकारे माणसाच्या जीवनात कुटुंब व सामूहीकतेचा क्रम चालला.

७४. जी शक्ति पाण्याच्या एका थेंबापासून एका महान समूहाला अस्तित्वात आणू शकते तिच्या सामर्थ्या कडून कोणत्या गोष्टीचे नवल आहे?

७५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ११८.

७६. म्हणजे या लोकांनी अल्लाहशी, जो त्यांचा खरा स्वामी व पालनकर्ता आहे, दास्यत्वाचे नाते कायम करावयास हवे होते परंतु आपल्या कुफ्रनितीमुळे ते त्याचे शत्रू बनूनं उभे ठाकले आहेत. यास्तव अल्लाहचे पावित्र्य व प्रशांसानीय गुणवैशिष्ठ्यांचे निवेदन करण्यात यांना काही एक स्वारस्य नाही उलट त्यांना अशा गोष्टी निवेदन करण्यात स्वारस्य आहे ज्या अल्लाहला शोभनीय नाहीत व ज्यावरून व्यंग बाळगणाऱ्या

व उणीवपूर्ण अशा ईश्वराची कल्पना दृगोचर होते. अल्लाहशी एकनिष्ठतेचा संबंध जोडण्याऐवजी ते बंडखोरीस प्रवृत्त होतात. अल्लाहच्या पैगंबराचे अनुसरण करण्याऐवजी ते त्याच्या विरोध करण्यात मग्न झाले आहेत.आता याहून अधिक मूर्खपणा तो कोणता की माणसाने आपल्या खऱ्याखुऱ्या पालनकर्त्याचेच वैरी बनून उभे रहावे.

७७. म्हणजे पैगंबराचे कार्य ईमान बाळगणाऱ्यांना यशाची खुशखबरी देणे व कुफ्र करणाऱ्यांना दुष्परिणति विषयी सावध करणे होय. ईमान बाळगण्याकरिता लोकांना विवश करणे ही पैगंबराची जबाबदारी नव्हे.

७८. म्हणजे मी अल्लाहचा संदेश तुमच्या स्वत:च्या फायद्या करीताच पोहचवित आहे. या सेवेबद्दल मी तुमच्याकडून कसल्याही मोबदल्याची अपेक्षा बाळगली नाही की जेणे करून तुम्ही संशयग्रस्त व्हावे की हे सर्व काही स्वार्थासाठी केले जात आहे. माझ्या प्रचाराचे एकमात्र उद्दिष्ट हेच की लोकांना अल्लाहचा मार्ग स्पष्टत:कळावा, मग ज्याला इच्छा होईल त्याने स्वखुशीने हा मार्ग अंगिकारावा.

७९. म्हणजे अल्लाह अनेकेश्वरवाद्यांच्या मृत ईश्वरांसमान नाही. तो चिरसजीव आहे व चिरसजीव राहील. त्याला कधीही मरण येणार नाही.

८०. म्हणजे त्याचे गुणगान करताना त्याचे पावित्र्य वर्णन करा की अशाने तवक्कल (अल्लाहवरील भरवसा) हा गुण वृद्धिंगत होतो.

८१. अर्थात विरोध करणाऱ्यांचा मामला अल्लाहकडे सोपवा तो आपल्या दासांच्या अपराधांना पूरेपूर जाणून आहे, तेव्हा त्यांच्या दुष्कृत्यांची पूरेपूर शिक्षा तो त्यांना देईल.

८२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ८३

८३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ८३

८४. म्हणजे ईश्वर कसा आहे व त्याची गुणवैशिष्ट्ये (Attributes) कोणती याबाबत अनुमाना आधारे काही सांगणे किंवा अन्य धर्मीय लोकांच्या तत्वज्ञानीय गोष्टींवर विश्वास करणे उचित नव्हे किंबहुना ही गोष्ट अल्लाहलाच विचारली गेली पाहीजे. कारण आपली गुणवैशिष्ट्ये त्यालाच ठाऊक आहेत यास्तव त्याने आपली गुणवैशिष्ट्ये आपल्या ग्रंथात (कुरआनात) निवेदीली आहेत. यास्तव त्याची गुणवैशिष्ट्ये जाणून घेण्याकरीता या ग्रंथाकडे रूजू करा.

या लोकांना जेव्हा सांगितले जाते की रहमान (अल्लाह)ला सजदा करा (नतमस्तक व्हा.) तेव्हा ते म्हणतात, रहमान काय आहे ? काय आम्ही त्याला सजदा करावा ज्याचा आदेश तुम्ही आम्हाला द्यावा. अशाने यांच्या तिरस्कारात वाढ होते. मोठा समृद्धशाली आहे तो, ज्याने आकाशात बुरूज बनविले आणि त्यात एक दिवा व प्रकाशमय चंद्र बनविला.(अल-क़ुर्आन)

وَإِذَا قِيلَ لَهُمُ اسْجُدُوا لِلرَّحْمَٰنِ قَالُوا وَمَا
الرَّحْمَٰنُ أَنَسْجُدُ لِمَا تَأْمُرُنَا وَزَادَهُمْ نُفُورًا ۩ ﴿٦٠﴾

६०. या लोकांना जेव्हा सांगितले जाते की रहमान (अल्लाह)ला सजदा करा (नतमस्तक व्हा.) तेव्हा ते म्हणतात, रहमान काय आहे ?[८५] काय आम्ही त्याला सजदा करावा ज्याचा आदेश तुम्ही आम्हाला द्यावा. अशाने यांच्या तिरस्कारात वाढ होते.[८६]

تَبَارَكَ الَّذِي جَعَلَ فِي السَّمَاءِ بُرُوجًا وَجَعَلَ فِيهَا
سِرَاجًا وَقَمَرًا مُنِيرًا ﴿٦١﴾

६१. मोठा समृद्धशाली आहे तो, ज्याने आकाशात बुरूज बनविले [८७] आणि त्यात एक दिवा [८८] व प्रकाशमय चंद्र बनविला.

وَهُوَ الَّذِي جَعَلَ اللَّيْلَ وَالنَّهَارَ خِلْفَةً لِمَنْ أَرَادَ أَنْ يَذَّكَّرَ
أَوْ أَرَادَ شُكُورًا ﴿٦٢﴾

६२. आणि तोच होय ज्याने रात्र व दिवसाला एकमेकाच्या मागे येणारे बनविले अशा त्या प्रत्येक माणसासाठी जो बोध (स्मरणिका) प्राप्त करु इच्छिल किंवा कृतज्ञशील होऊ इच्छिल. [८९]

وَعِبَادُ الرَّحْمَٰنِ الَّذِينَ يَمْشُونَ عَلَى الْأَرْضِ
هَوْنًا وَإِذَا خَاطَبَهُمُ الْجَاهِلُونَ قَالُوا سَلَامًا ﴿٦٣﴾

६३. आणि रहमानचे दास ते आहेत [९०] जे जमीनीवर नम्रता पूर्वक चालतात. [९१]आणि जेव्हा अज्ञानी त्यांना संबोधितात तेव्हा ते म्हणतात 'सलाम'[९२]

وَالَّذِينَ يَبِيتُونَ لِرَبِّهِمْ سُجَّدًا وَقِيَامًا ﴿٦٤﴾

६४. जे आपल्या पालनकर्त्या पुढे सजदा व कियाम करण्यात रात्र घालवितात.[९३]

وَالَّذِينَ يَقُولُونَ رَبَّنَا اصْرِفْ عَنَّا عَذَابَ جَهَنَّمَ
إِنَّ عَذَابَهَا كَانَ غَرَامًا ﴿٦٥﴾

६५. जे दुआ करतात की हे आमच्या पालन कर्त्या ! जहन्नमच्या शिक्षेला आमच्या पासून दूर राख. तिची शिक्षा अगदी बिलगून राहणारी आहे.[९४]

إِنَّهَا سَاءَتْ مُسْتَقَرًّا وَمُقَامًا ﴿٦٦﴾

६६. ते फार वाईट स्थान आणि फार वाईट राहण्याची जागा आहे.[९५]

وَالَّذِينَ إِذَا أَنْفَقُوا لَمْ يُسْرِفُوا وَلَمْ يَقْتُرُوا وَكَانَ بَيْنَ
ذَٰلِكَ قَوَامًا ﴿٦٧﴾

६७. जे खर्च करतात तर ना उधळपट्टी करतात आणि ना काटकसर, किंबहुना त्यांचा खर्च दोघांच्या दरम्यान समतोल असतो.[९६]

८५.स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह बनी इस्राईल टीप. १४५ ही सजद्याची आयत आहे म्हणून हिंचे पठण केल्यावर किंवा ऐकल्यावर तत्क्षणी सजदा केला पाहीजे.

८६. म्हणजे आपल्या कृपाळू ईश्वर (अल्लाह) समोर सजदा करण्यात तर माणसाने आपले सद्भाग्य समजले पाहीजे. परंतु अनेकेश्वर वाघांना हा आदेश देखील अप्रिय वाटतो आणि याचाच परिणाम म्हणून ते ईश्वरापासून अधिकाधिक दूर होत चालले आहेत.

८७. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. १४

८८. म्हणजे सूर्य.

८९. म्हणजे दिवस व रात्रीच्या एकापाठोपाठ वक्तशीरपणे येण्याचा हा क्रम विचार चिंतनाचे आवाहन करतो. जो मनुष्य देखील यावर लक्ष केंद्रित करील त्याला आपल्या पालनकर्त्याचे जबरदस्त सामर्थ्य व अमर्याद कृपा दिसून येईल. हे अवलोकन त्याला एकेश्वर वादाचा धडा ही शिकवील व त्याच्या अंगी कृतज्ञता भाव ही निर्माण करील की त्याचा पालन कर्ता अतिशय मेहरबान आहे, ज्याने माणसाच्या गरजा भागविण्यासाठी व त्याला सुख शांती पोहचविण्याची कशी उत्कृष्ट व्यवस्था केली आहे.

९०. अभिप्रेत परमदयाळू अल्लाहचे प्रामाणिक व एकनिष्ठ दास होत. त्यांना आपल्या त्या गुणांमुळे जे पुढे निवेदिले गेले आहेत, हा सन्मान लाभला की ते रहमानचे दास या नावाने ओळखले गेले आणि या गोष्टीस पात्र ठरले की ईश्वराच्या कृपेने लाभान्वित व्हावे.

९१. माणसाच्या चालण्यातून त्याचे चारित्र्य व्यक्त होत असते. जे लोक सूज्ञता पूर्वक स्वत:ला अल्लाहच्या दास्यत्वास अपर्ण करतात त्यांच्या चालीतून विनयशीलता व नम्रता व्यक्त होते, याउलट ईश्वराकडे पाठ फिरविलेल्या लोकांची चाल गर्व व घमंड जाहीर करते. नम्रता पूर्वक चालण्याचा अर्थ लोकांना दाखविण्यासाठी हळू हळू चालणे नव्हे तर दास्यत्वाच्या जाणीवेसह पाऊल उचलणे आणि शांतिपूर्वक गंभीरपणे पाऊल ठेवणे असा होय.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा वेग हदीस वचनात अशा प्रकारे निवेदिला गेला आहे:-

اذا زَال زَال قَلْعًا، يَخْطُوْ تَكَفِّياً وَيَمْشِى هَوْناً ، ذريعَ الْمَشْيَةِاِذَامَشٰى كَاَنَّمَايَنْحطُّ مِنْ صَبَبٍ۔ (شمائل ترمذی)

''चालतांना मजबूत पाऊल उचलत,झुकून पाऊल ठेवत नम्रता पूर्वक चालत व अशा वेगाने की जणू उंचवट्याकडून उतरणीकडे जात आहेत''. (शिमाईल तिर्मिजी)

९२. अडाणी अभिप्रेत नादान, गांभीर्यशून्य व भावनाशील लोक होत. असे लोक जेव्हा विवाद करू लगतील तर त्यांच्या तोंडी लागून काही फायदा नाही. सलामतीची गोष्ट सांगून निरोप घेणेच अधिक चांगले. ते म्हणतात 'सलाम' याचा अर्थ शांती. समाधानाची गोष्ट करणे असा ही होय व निरोपाचा शब्द देखील.

९३. म्हणजे रहमानचे दास आपल्या रात्री ईश्वरापासून गाफील असलेल्या लोकांप्रमाणे घालवित नाही. रात्रीच्या वेळी देखील ते उपासनेत मग्न असतात. मगरीब व इशाच्या फर्ज नमाजी खेरीज ते तहज्जुदच्या नफील नमाजीचा ही इतमाम राखतात. ते निर्धास्तपणे झोपत नाही, तर मध्येच उठून अल्लाह समोर कयाम करतात व सजदा करतात यावरून असे दिसून येते की त्यांना नमाजची किती तन्मयता व उपासनेची किती गोडी असते परंतु आज सर्वसामान्यत: मुसलमानांची दशा अशी आहे की ते आपल्या रात्री निरर्थक सिनेमा पाहण्यात घालवितात. तहज्जुदची वेळ जी दुआ कबूल होण्याची वेळ असते त्या वळी मुसलमानांच्या घरातून विडीयोवर नाच-गाण्यांचा आवाज ऐकू येतो. اِنَّا لِلّٰهِ وَاِنَّا اِلَيْهِ رَاجِعُوْنَ۔

**इन्ना लिल्लाहि व इन्ना इलैहि राजेऊन.**

९४. म्हणजे जहन्नमचा अजाब (शिक्षा) असा नव्हे. की माणसाने एखादा उपाय योजून आपली सुटका करुन घ्यावी किंबहुना तो असा आहे की जो याच्या तावडीत सापडेल त्याला विळखा घालून बसेल. जहन्नमच्या शिक्षेच्या या कल्पनेने परमदयाळू अल्लाहचे दास भयकंपित होतात व ईश्वरासमोर अर्थात अल्लाह समोर दुआ करतात की त्याने या शिक्षेपासून त्यांना वाचवावे.

या आयतीत जणू अल्लाहच्या आदर्श दासांचे ध्येय प्रस्तुत केले गेले आहे की त्यांना खरी चिंता जी लागून राहीलेली असते ती आखिरत पासून मुक्तिची चिंता होय.

९५. म्हणजे जहन्नम दोन्ही दृष्टींनी वाईट आहे. स्थान असणयाच्या दृष्टीने ही की ती भडकलेली आग असेल व निरंतर निवास, स्थान असण्याचे दृष्टीने ही की यात राहणारे सदैव अजाब (ईश-शिक्षा) भोगत राहतील.

९६. उधळपट्टी अशी की माणसाने आवश्यकतेपेक्षा अधिक खर्च करावा म्हणजे ज्या गोष्टींमध्ये खर्च करणे उचित आहे त्यात भरमसाठ खर्च करावा व या गोष्टीची मुळीच पर्वा न करावी की कोठपावेतो खर्च करणे योग्य व उचित आहे. आजकाल जीवनमान उंचावण्याचा छंद असा निर्माण झाला आहे की लोक उघड उधळपट्टी करू लागले आहेत. राहीला, व्यर्थ खर्च म्हणजे अनाठायी व अवास्तव खर्च करणे किंवा अयोग्य कामाकरीता खर्च करणे तर हा अतिशय निकृष्ट प्रकारचा खर्च होय आणि यास कुरआनाने 'तब्जीर (व्यर्थ खर्च) या अर्थाने घेतले आहे व

व्यर्थ खर्च करणाऱ्यांविषयी म्हटले आहे की ते सैतानाचे भाऊबंध आहेत. (बनी इस्राईल आयत क्र. २७)

आणि काटकसर किंवा कृपणता अशी की माणसाने आपल्या योग्य गरजा भागविण्यात अकारण तंगी वा काटकसर करावी किंवा इतरांचे हक्क अदा करण्याविषयी बेपर्वा व्हावे.

उधळपट्टी व काटकसर या दोहोंच्या दरम्यान समतोल मार्ग असा की माणसाने उधळपट्टीपासून स्वत:ला वाचवित आपल्या योग्य गरजा भागवाव्यात व त्यावर उचित मर्यादेप्रत खर्च करावा तसेच इतरांचे हक्कही अदा करावे. स्पष्ट व्हावे की चांगले अन्न असतांना ही केवळ आत्म संयम म्हणून त्यापासून पथ्य पाळणे ही अशा लोकांची तऱ्हा आहे ज्यांनी विषाच्या नावावर अध्यात्म व जपजाप्यास शरीयत बनविले. इस्लामच्या साध्यासरळ जीवना चरणाशी व त्याच्या सोप्या शरीअतीशी त्याचा काहीच संबंध नाही.

जे अल्लाह सोबत अन्य कोणत्याही उपास्यास पुकारीत नाहीत. एखाद्या अशा जीवनाची ज्याला अल्लाहने निषिद्ध ठरविले आहे, हत्या करीत नाही मात्र सत्याच्या आधारावर. आणि ना व्यभिचार करतात.जो कोणी या गोष्टी करील, त्याला अपराधाचा परिणाम भोगावा लागेल. कियामतीच्या दिवशी त्याच्या शिक्षेला दुप्पट केले जाईल. आणि तो त्यात असमानासह खितपत पडेल.(अल-क़ुर्आन)

وَالَّذِينَ لَا يَدْعُونَ مَعَ اللَّهِ إِلَٰهًا آخَرَ وَلَا يَقْتُلُونَ النَّفْسَ
الَّتِي حَرَّمَ اللَّهُ إِلَّا بِالْحَقِّ وَلَا يَزْنُونَ ۚ وَمَن يَفْعَلْ
ذَٰلِكَ يَلْقَ أَثَامًا ﴿٦٨﴾

६८. जे अल्लाह सोबत अन्य कोणत्याही उपास्यास पुकारीत नाहीत.[97] एखाद्या अशा जीवनाची ज्याला अल्लाहने निषिद्ध ठरविले आहे, हत्या करीत नाही मात्र सत्याच्या आधारावर. [98] आणि ना व्यभिचार करतात.[99] जो कोणी या गोष्टी करील, त्याला अपराधाचा परिणाम भोगावा लागेल.

يُضَاعَفْ لَهُ الْعَذَابُ يَوْمَ الْقِيَامَةِ وَيَخْلُدْ فِيهِ مُهَانًا ﴿٦٩﴾

६९. कियामतीच्या दिवशी त्याच्या शिक्षेला दुप्पट केले जाईल. [100] आणि तो त्यात असमानासह खितपत पडेल.

إِلَّا مَن تَابَ وَآمَنَ وَعَمِلَ عَمَلًا صَالِحًا فَأُولَٰئِكَ يُبَدِّلُ
اللَّهُ سَيِّئَاتِهِمْ حَسَنَاتٍ ۗ وَكَانَ اللَّهُ غَفُورًا رَّحِيمًا ﴿٧٠﴾

७०. परंतु जे तौबा करतील, ईमान बाळगतील आणि सत्कृत्ये करतील तर अल्लाह अशा लोकांच्या दुष्कर्मांना सत्कर्मांनी बदलवील [101] अल्लाह मोठा माफ करणारा, दया करणारा आहे.[102]

وَمَن تَابَ وَعَمِلَ صَالِحًا فَإِنَّهُ يَتُوبُ إِلَى اللَّهِ مَتَابًا ﴿٧١﴾

७१. आणि जो तौबा करून सत्कृत्ये करतो, तो वस्तुतः अल्लाह कडे परततो. [103]

وَالَّذِينَ لَا يَشْهَدُونَ الزُّورَ وَإِذَا مَرُّوا بِاللَّغْوِ مَرُّوا كِرَامًا ﴿٧٢﴾

७२. आणि जे असत्याचे साक्षी बनत नाही. [104] आणि जर एखाद्या वाह्यात गोष्टीकडून त्यांचे जाणे होते, तर गंभीरता पूर्वक निघुन जातात.[105]

وَالَّذِينَ إِذَا ذُكِّرُوا بِآيَاتِ رَبِّهِمْ لَمْ
يَخِرُّوا عَلَيْهَا صُمًّا وَعُمْيَانًا ﴿٧٣﴾

७३. ज्यांना त्यांच्या पालनकर्त्याच्या आयतींद्वारे उपदेश केला जातो तर ते त्यावर बधीर व आंदळे होऊन झेप घेत नाही.[106]

وَالَّذِينَ يَقُولُونَ رَبَّنَا هَبْ لَنَا مِنْ أَزْوَاجِنَا وَذُرِّيَّاتِنَا قُرَّةَ
أَعْيُنٍ وَاجْعَلْنَا لِلْمُتَّقِينَ إِمَامًا ﴿٧٤﴾

७४. जे दुआ करीत राहतात की हे आमच्या पालन कर्त्या ! आमच्या पत्न्या व आमच्या संततीकडून आम्हाला डोळ्यांची शीतलता प्रदान कर[107] आणि आम्हाला ईशभय बालगणाऱ्यांचा नेता बनव.[108]

९७. पुकारण्याशी अभिप्रेत गरजपूर्ति करीता पुकारणे ही होय व उपासना म्हणून देखील कुरआनात दुआ (पुकारणे) हा शब्द उपासना या अर्थीने अधिक प्रमाणात प्रयोजिला गेला आहे. हदीस वचनात उल्लेखित आहे,

''الدعاءهو العباده''

''दुआ उपासना आहे'' (मिश्कात किताबुद्दावात बहवाला अहमद तिर्मिजी, अबू दाऊद, नसाई, इब्ने माजा)

या आयतीत रहमानच्या दासांचे हे वैशिष्ट्य वर्णिले गेले आहे की ते केवळ अल्लाहलाच पुकारतात आणि केवळ त्याचीच उपासना करतात. या लोकांची रीत त्या लोकांप्रमाणे नसते जे अल्लाहच्या उपासने सोबतच इतरांनाही गरजपूर्ति करीता पुकारतात आणि अल्लाहच्या उपासने बरोबर इतरांची ही उपासना करतात ही शुद्ध अनेकेश्वरवादीता आहे अर्थात रहमान (अल्लाह) चे दास शिर्क पासून अलिप्त असतात.

९८. कुरआनाची मूलभूत शिकवण अशी की प्रत्येक मनुष्य जीव सन्माननीय आहे येथपावेतो की एका नवजात शिशुचा जीव देखील

(واذاالموؤدةُسُئِلَتْ بِاَیّ ذَنْبٍ قُتِلَتْ۔ سورہ تکویر آیت ۸،۹)

(पाहा सूरह तकवीर आयत८,९) आणि मनुष्य जीवाची प्रतिष्ठा इतकी प्रखर आहे की यावर अत्याचार करणारा कठोर गुन्हेगार ठरतो. हत्या करणे अशाच परिस्थितीत उचित आहे जेव्हा ते 'सत्य' निष्ठ असेल या सत्यास शरीअतने स्वत: स्पष्ट केले आहे म्हणून या कक्षेबाहेर एखाद्याची हत्या करण्यास कोणतेहि समर्थन नाही माणसाचे स्वत: घडविलेले कायदे किंवा एखाद्या इस्लामेतर शासनाचे आदेश जर एखाद्या अशा हत्येस योग्य ठरवित असतील ज्यावर शरीयतने निवेदिलेले सत्य लागू पडत नाही तर ती हत्या अपराध ठरेल व फार मोठा गुन्हा. शरीअतने ज्या परिस्थितीत हत्येस सत्याची निकड भागविणारे दर्शविले आहे. त्या पुढील प्रमाणे होत:-

اَنَّ النَّفْسَ بِالنَّفْسِ (مائدہ:۴۵)

१) किसास नुसार हत्या करणे म्हणजे प्राणाचा बदला प्राण (मायदा-४५)

اَوْفَسَادٍ فِی الْاَرْضِ (مائدہ:۳۲)

२) जमीनीवर उपद्रव माजविण्याच्या स्थितीत हत्या करणे (मायदा-३२)

उदाहरणार्थ लूटमार व सार्वजनिक शांततेस नष्ट करणारे घटक या नियमान्वये जर एखादा अत्याचारी समूह मुसलमानांच्या एखाद्या समूहावर हल्ला चढवील तर तो स्व-संरक्षणा (Self-Defence) करीता हत्या. करण्यापावेतो पाऊल उचलू शकतो.

३) काफीर व अनेकेश्वरवाघांशी अल्लाहच्या मार्गात जेहाद त्याच्या शर्तीसह

فَاِنْ قاتلُوْ کُمْ فَاقْتُلُوهُمْ کَذٰلِکَ جَزَاءُ الْکٰفِرِیْنَ۔ (بقرہ۔۱۹۱)

जर ते तुमच्याशी लढतील तर त्यांना ठार करा कारण काफीरांचा हाच बदला होय (बकरा- १९१)

४) मुसलमानांचा एक समूह जर दुसऱ्या समूहावर हिंसक हल्ला करील तर त्याच्याशी लढावे. येथपावेतो की त्यांनी अल्लाहच्या आदेशाकडे रूजू करावे

فَقَاتِلُوْ الَّتِیْ تَبْغِی حَتیٰ تَفِیْءَ اِلیٰ اَمْرِ اللّٰهِ۔ (حجرات۔۹)

तर या समूहाशी लढा जो अतिरेक करतो येथपावेतो की त्याने अल्लाहच्या आदेशांकडे रूजू करावे. (हुजरात-९)

५. हिंसक आक्रमणाच्या स्थितीत स्वसंरक्षण (Self Defence)करणे. मग हल्ला हरणाऱ्यास आपला जीव घालवावा का लागेना.

والَّذِیْنَ اِذا اَصَابَهُم الْبَغْیُ هُمْ یَنْتَصِرُوْنَ وَ جَزاء سَیِّئَةٍ سَیِّئَةٌ مِثْلُهَا۔ (شوریٰ۔۳۹،۴۰)

'आणि जेव्हा यांच्यावर अतिरेक केला जातो तर ते याचा बदला घेतात आणि वाईट कृत्याचा बदला त्यासारखे वाईट कृत्यच होय'. (शुरा ३९-४०) आणि हदीस वचनात उल्लिखित आहे-

جاءَ رجلٌ اِلیٰ رسولِ اللّٰه صلی اللّٰه علیه وآله وسلم فقال یا رسولَ اللّٰه ارأیتَ اِنْ جاءَ رجلٌ یُرِیْدُ اَخْذَ مالی فقال فلا تعطهٖ مالک قالَ اَرَأَیْتُ اَنْ قَاتَلَنِی قال قاتِلْهُ قالَ اَرَأَیْتَ اِنْ قتلنی قال فَاَنْتَ شَهِیْدٌ قال اَرَأَیْتَ ان قَتَلْتُهُ قالَ فهُوَ فِی النَّارِ۔ (مسلم کتاب الایمان)

''एक मनुष्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाला आणि विचारले हे अल्लाहचे पैगंबर ! आपण त्या माणसाविषयी काय फर्माविता, ज्याने माझी धनसंपदा हिरावून घेण्याच्या इराद्याने यावे? फर्माविले, आपला माल त्याला देऊ नये. तो मनुष्य म्हणाला, जर तो माझयाशी लढेल तर? फर्माविले, 'तुम्ही ही त्याच्याशी लढा' तो म्हणाला, जर त्याने मला ठार केले? फर्माविले, तुम्ही शहीद व्हाल. तो म्हणाला, जर मी त्याला ठार केले? फर्माविले तो जहन्नम मध्ये जाईल'' (मुस्लिम किताबुल ईमान)

आणि धनाच्या संरक्षणापेक्षा प्राणाचे संरक्षण व एका स्त्रीसाठी आपल्या शीलाचे संरक्षण अधिक महत्व बाळगते म्हणून प्राण

वित्त व प्रतिष्ठेवर हल्ला होण्याच्या स्थितीत अत्याचाऱ्याला ठार करणे जर अपरिहार्य असेल तर अत्याचार पिडीतास स्वसंरक्षणासाठी वधाची मुभा आहे तो त्याचा हक्क आहे.

६) अल्लाह व त्याच्या पैगंबरांविरूद्ध सशस्त्र बंड करणाऱ्यांना वधाची शिक्षा देणे. हा नियम अशा सशस्त्र बंडाला लागू पडतो जे इस्लामी शासनाचा तक्ता उलटविण्याकरिता व त्या जागी इस्लामेतर शासन व्यवस्था प्रस्थापित करण्याकरिता केले गेले असेल.

اِنَّمَا جَزٰٓؤُا الَّذِيْنَ يُحَارِبُوْنَ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ وَيَسْعَوْنَ فِى الْاَرْضِ فَسَادًا اَنْ يُّقَتَّلُوْٓا ــــــــــــــــــ (مائدہ - ۳۳)

'जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबराशी युद्ध करतात आणि जमीनीवर उत्पात घडविण्यासाठी धावपळ करतात त्यांची शिक्षा हीच की त्यांना ठार केले जावे' (मायदा-३३)

७) विवाहीत व्यभिचारी पुरुषास किंवा व्यभिचारी स्त्रीस दगडांचा वर्षाव करुन ठार करणे हा आदेश (अहादीस सहीह) द्वारे साबीत आहे.

لَا يَحِلُّ دَمُ امْرِئٍ مسلم يَشْهَدُ اَنْ لَّآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَ اَنِّی رسولُ اللّٰہ اِلَّا باحدیٰ ثَلَاثٍ اَلنَّفْسُ بِالنَّفْسِ و الثيبُ الزَّانی وَ المَارِقُ مِنَ الدِّيْنِ التارك الجماعة۔ (بخاری کتاب الدیات)

'एखादा मुसलमान, जो ही साक्ष देत असेल की अल्लाह खेरीज कोणीही ईश्वर नाही आणि हे की मी अल्लाहचा पैगंबर आहे, रक्तपात योग्य नव्हे, मात्र हे की त्या तीन परिस्थितींपैकी एखादी परिस्थिती उद्‌भवावी, त्याने एखाद्याचा खून केला असेल किंवा विवाहीत असूनही व्यभिचार केला असेल किंवा दीन (इस्लाम) बाह्य झाला असेल व समाजला सोडून दिले असेल (म्हणजेच धर्माचा त्याग केलेला असेल)' (बुखारी-किताबुद दीयात)

८) इस्लाम धर्माचा त्याग करणाऱ्यास ठार करणे जसे की उपरोक्त हदीस वचनात निवेदिले गेले आहे, स्पष्ट असावे की यापैकी अनेक परिस्थिती अशा आहेत ज्यांचा संबंध इमाम म्हणजे इस्लामी शासनाशी येतो कारण अशा परिस्थितीमध्ये आरोपीला सफाईची संधी देणे व साक्षीआधारे निकाल लावणे आवश्यक आहे फुकहा (धर्म शास्त्रवेत्त्या) चे याबाबत एकमत आहे की शासन कर्ता किंवा त्याचा नायबच आदेशांना लागू करु शकतो आणि लोकांना हा अधिकार नव्हे की त्यांनी आपल्या परिने या कार्यास पार पाडावे.' (फिकहु सुन्नाह- सैय्यद साबिक खं.२ पृ. ३६२)

९९. व्यभिचाराच्या निषिद्धतेवर स्पष्टीकरणात्मक टीपेसाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. ४१.

१००. म्हणजे एक शिक्षा तर कुफ्र व शिर्कची आणि दुसरी शिक्षा खून व व्यभिचारा सारख्या अपराधाची स्पष्ट झाले की काफीर व अनेकेश्वरवाद्यांना विद्रोहाची शिक्षा तर मिळेलच अधिक हे की या शिक्षेत वाढ त्यांनी केलेल्या अपराधांमुळे होईल आणि ज्या स्वरुपाचा गुन्हा असेल त्याच स्वरुपाची शिक्षा ही लाभेल.

१०१. या ठिकाणी त्या लोकांना सांत्वनाची सामुग्री आहे, ज्यांचे जीवन शिर्क अर्थात अनेकेश्वरवादाने बरबटलेले राहीले व जे खून, व्यभिचारा सारखे भयंकर अपराध करीत राहीले परंतु सत्य स्पष्ट झाल्यानंतर ते अल्लाहकडे परतले व आपल्या मागील अपराधांवर लज्जित झाले, ईमान बाळगले व सदाचाराचा मार्ग पत्करला अशा लोकांशी अल्लाहचा वायदा आहे की तो त्यांच्या दुष्कर्मांना सत्कर्मांनी परिवर्तित करील म्हणजे त्यानाही सुबुद्धि लाभेल की दुष्कर्मांच्या जागी ते सत्कर्म करु लागतील. यास्तव अज्ञान काळात ज्यांचे जीवन अपराध-ग्रस्त होते इस्लाम धर्म स्विकारल्या नंतर त्यांचे जीवन अतिशय स्वच्छ शुध्द झाले. मूळ गोष्ट अपराधांची जाणीव होय. जेव्हा ही जाणीव माणसाच्या मनात निर्माण होते तेव्हा त्याच्या विचार चिंतनात व कार्यात अतिश्य सुखद परिवर्तन प्रकट होऊ लागते.

१०२. म्हणजे तौबा करणारे हे दास अल्लाह कडून ही अपेक्षा बाळगतात की तो त्यांचे मागील अपराध माफ करील व त्यांच्यावर दया करील कारण तो क्षमाशील व दयाशील आहे.

१०३. या आयतीमध्ये तौबाची वासतविकता स्पष्ट केली गेली आहे. तौबा म्हणजे हे नव्हे की माणसाने दुराचारात व्यस्त रहावे व तोंडाने तौबा म्हणत रहावे, किंबहुना तौबा म्हणजे माणसाने दुष्कर्मापासून अगदी मन:पूर्वक परावृत्त व्हावे व सत्कर्माचा अवलंब करावा. जो मनुष्य या आवश्यक निकडीसह अल्लाह समोर तौबा करतो तो खरे पाहता गुन्हेगारीस सोडून अल्लाहकडे वळतो आणि जो अल्लाहकडे वळतो त्याला तो का म्हणून आपल्या कृपा छत्राखाली घेणार नाही?

१०४. मूळ शब्द 'जूर' याचा अर्थ असत्य व खोटे असा आहे आणि لَا يَشْهَدُوْنَ **'ला यशहदूना'**चा अर्थ-साक्ष न देणे असा ही आहे व हजर व प्रत्यक्ष दर्शी न बनणे असाही आहे. हा शब्द सर्वसाधारणत: दोन्ही अर्थांसह असला तरी नंतरचा वाक्यांश या गोष्टीवर युक्तिवाद करतो की या ठिकाणी प्रामुख्याने अभिप्रेत असत्य गोष्टींचा दर्शक न बनणे होय. अर्थात रहमान (अल्लाह) च्या दासांना असत्याचा एवढा तिटकारा असतो ज्या ठिकाणी याचे प्रदर्शन होत असेल तिथे आपली हजेरी लावून त्यास बळकट करण्याचे काम ते करीत नाही आणि ना त्याचे दर्शक बनून आपल्या निलज्जतेचा पुरावा देतात किंबहुना अशा

गोष्टींपासून ते दूरच राहतात. हे तात्विक मार्गदर्शन लक्षात घेता मुसलमानांकरीता हे योग्य नव्हे की त्यांनी अनेकेश्वरवादाच्या अड्ड्यांची व मंदीरांची सहल करावी. अनेकेश्वरवादीय रीती रिवाज व पूजापाठ प्रंसगी हजर रहावे, भूमी-पूजनाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे आणि अनेकेश्वरवादी सणांना हजर राहून त्यांची शोभा वाढवावी. या संदर्भात अल्लामा इब्ने तैमिया लिहीतात की :-

'हजरत उमर यांनी फर्माविले की अल्लाहच्या शत्रूंशी त्यांच्या सण-उत्सव प्रसंगी अलिप्तता बाळगा आणि इमाम अहमद यांनी फर्माविले की यहुदी व ख्रिश्चनांच्या सणांमध्ये सहभागी होणे उचित नव्हे. त्यांचा युक्तिवाद सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या

وَالَّذِيْنَ لَا يَشْهَدُوْنَ الزُّوْرَ

............या फर्मानाशी आहे'.

(मजमुअ फतावा इब्ने तैमिया खंड २५ पृ. ३२६).

१०५. म्हणजे जर अकस्मातपणे त्यांचे जाणे एखाद्या वाह्यात गोष्टीकडून झाले तर ते ना त्याद्वारे मनोरंजन करतात आणि ना त्याचे दर्शक बनतात, किंबहुना सभ्यतापूर्वक व गंभीरपणे चालले जातात. ज्या प्रमाणे एखाद्या स्वच्छाता प्रिय मनुष्याचे घाणीच्या ढिगाऱ्याकडून जाणे होते तर तो त्याकडे चुकीने पाहणे ही पसंत करीत नाही व वेगाने पुढे चालला जातो.

आजच्या काळात तर वाह्यात गोष्टी आधुनिक संस्कृतिचे पांघरूण ओढून समोर येत आहे व एवढ्या मोठ्या प्रमाणात समोर येत आहे की माणसाचे शांतीपूर्वक रस्त्याचे येणे जाणे ही कठीण झाले आहे. परंतु ज्या लोकांची नैतिक अनुभूति जारृत असते ते गंभीर्य व प्रतिष्ठेस कधीही सोडत नाही.

१०६. म्हणजे त्यांची दशा त्या लोकांसारखी नाही जे इतके चेतनाशून्य असतात की जर त्यांना अल्लाहच्या आयती, त्यांच्या ग्रंथाची प्रमाणे व त्याच्या शिकवणींद्वारे उपदेश केला जातो तर ते जागेवरून हलत देखील नाहीत. सत्य ऐकण्यासाठी त्यांचे कान बधीर होतात व सत्य पाहण्यासाठी त्यांचे डोळे अंध होतात. याऊलट जेव्हा रहमान (अल्लाह) च्या दासांचे अल्लाहच्या आयतीकडे लक्ष वेधले जाते तेव्हा ते उघड्या कानांनी उपदेश ऐकतात आणि उघड्या नेत्रांनी अल्लाहच्या निशाण्यांना पाहतात.

१०७. अल्लाहचे दास आपल्या मुलाबाळांशी बेपर्वा नसतात की त्यांनी जन्नतचा मार्ग धरावा किंवा जहन्नमचा, किंबहुना त्यांच्या मार्गदर्शनासाठी ते चिंतित असतात व प्रखरतेने या गोष्टीची अभिलाषा बाळगतात की त्यांनी ईमान व सदाचारपूर्ण जीवन अंगिकारावे. त्यांच्या डोळ्यांची शीतलता त्यांच्या बायका मुलांचे सदाचारी होणे हे होय, ऐहीक पात्रतेने वा धनस्मपित्तिने श्रीमंत होणे नव्हे. तात्पर्य ईश्वराच्या या दासांच्या आवडीचे स्तर अगदी उचित असते. यास्तव जर त्यांची बायकांमुले सदाचारी बनतात तर ते त्यांच्या डोळ्यांचे तेज व मनाचे समाधान बनतात. म्हणून ते अल्लाहजवळ या सुबुद्धी करीता प्रार्थना करीत राहतात.

१०८. म्हणजे व्यवस्थापनेचा जो दर्जा आम्हाला आमच्या कुटुंबीयांवर प्राप्त आहे त्याच्या प्रभावाखाली त्याचे उचित धार्मिक प्रशिक्षण व्हावे आणि ईश-भयाचा गुण त्यांच्या अंगी निर्माण व्हावे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे आमचे नेतृत्व ईश भयाचे नेतृत्व असावे व आमच्या मागे चालणारे ईश्वर-भय बाळगणारे व्हावेत.

यावरून हे अनुमान लावले जाऊ शकते की अल्लाहच्या प्रामाणिक दासांच्या अंत:करणात हा विचार कशा प्रकारे उचंबळत असतो की त्यांची बायका मुले ईश भय बाळगणारे व संयमी व्हावेत परंतु आजच्या काळात मुसलमानांची सर्वसामान्यात: दशा अशी आहे की त्यांचे स्वत:चे जीवन तर ईश-भय शून्य आहेच व त्यांना या गोष्टीतही स्वरास्य नाही की त्यांची बायका मुले ईश-भीरु व्हावीत ते त्यांना 'वेगळेच काहीतरी' बनवू इच्छितात यासाठी की जगात त्यांची पूरेपूर कदर व्हावी. राहीली आखिरत तर कलमा पढणाऱ्या लोकांना याची अधिक काळजी करण्याची गरज नाही.

**७५. हे असे लोक होत ज्यांना त्यांच्या सहनशीलतेचा मोबदला म्हणून उंच सज्जे प्रदान केले जातील [१०९] आणि तेथे त्यांचे स्वागत दुआ व सलाम द्वारे होईल.**

أُولَٰئِكَ يُجْزَوْنَ الْغُرْفَةَ بِمَا صَبَرُوا وَيُلَقَّوْنَ
فِيهَا تَحِيَّةً وَسَلَامًا ﴿٧٥﴾

**७६. तेथे ते सदैव राहतील. फार चांगले ठिकाण व फार चांगली राहण्याची जागा आहे ती !**

خَالِدِينَ فِيهَا ۚ حَسُنَتْ مُسْتَقَرًّا وَمُقَامًا ﴿٧٦﴾

**७७. सांगा, माझ्या पालन कर्त्याला तुमची काय पर्वा जर तुम्ही त्याला न पुकाराल, [११०] तुम्ही (या गोष्टीस की फक्त त्याला पुकारावे) खोटे ठरविले आहे यास्तव अजाब (ईश-शिक्षा) तुम्हाला अपरिहार्यपणे धरील.**

قُلْ مَا يَعْبَأُ بِكُمْ رَبِّي لَوْلَا دُعَاؤُكُمْ ۖ فَقَدْ كَذَّبْتُمْ فَسَوْفَ
يَكُونُ لِزَامًا ﴿٧٧﴾

१०९. जन्नतच्या उंच सज्ज्यांची वास्तविकता तर तेथे पोहोचल्यावरच माहीत पडेल परंतु कुरआनाच्या या शब्दांनी ही कल्पना निश्चित दृढ होते की जन्नत मध्ये उंच उंच प्रासाद असतील. जन्नतचे हे उंच प्रासाद रहमानच्या दासांना त्यांच्या सहनशीलतेचा मोबदला म्हणून मिळतील. यावरून सहनशीलतेचे महत्व स्पष्ट होते की ती त्या समस्त गुणांकरीता जे वर निविदिले गेले आहेत, पाया-भूत आहेत. म्हणजे ही गुणवैशिष्ट्ये त्याच स्थितीत निर्माण होऊ शकतात जेव्हा मनुष्य भावनाशील होण्याऐवजी गंभीर, विवेकशील बनेल व आपली दृष्टी सत्य-उद्दिष्टावर खिळविल.

११०. ही समारोपाची वाणी होय. ज्यात संबोधनाची दिशा इन्कार करणाऱ्यांकडे वळली आहे. त्यांना हे सांगितले जात आहे की जर तुम्ही केवळ अल्लाहला गरजपूर्ति करणारा मानून त्याला पुकारण्यास व त्याची उपासना करण्यास तयार नाहीत तर चांगले जाणून घ्या की अशाने ना त्याचे काही बिघडणार आहे आणि ना त्याला तुमची पर्वा आहे. त्याने तुमच्या समोर वास्तविकता मांडून ठेवली आहे त्यानंतर ही जर तुम्ही दुष्परिणतीस प्राप्त करू इच्छिता तर याला जबाबदार स्वतः तुम्ही राहाल.

# सूरह अश्शोअरा

# २६. सूरह अश्शोअरा

**नाव:** आयत क्र. २२४ ते २२६ मध्ये मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांच्या या आक्षेपाचे खंडन केले गेले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अैलहि वसल्लम) हे शायर म्हणजे कवी होत. कवीचे चारित्र्याहीन असणे स्पष्ट केले गेले आहे, अशासाठी की लोकांनी एक पैगंबर व एक शायर या दोघांतला फरक जाणून घ्यावा.

**अवतरण काळ:** मक्की आहे, आणि सूरहच्या पद्धति व तिच्या मजकूरांवर विचार चिंतन केल्याने असे दिसून येते की ही मक्केच्या सुरवातीच्या काळात शेवटी शेवटी अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पैगंबरीय सत्यतेस स्पष्ट करणे आणि या संदर्भात घेतल्या जाणाऱ्या शंकांचे निरसन करणे होय.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ९ प्रास्तविक स्वरुपाच्या आयती होत; ज्यात हे स्पष्ट केले गेले आहे की अल्लाहचा पैगंबर किती काळुळतीने लोकांना सत्य-स्विकृतिचे आवाहन करीत आहे आणि लोक कशा प्रकारे या पासून बेपर्वाई दर्शवित आहे व थट्टा मस्करीत त्यास टाळत आहेत. ते जर गंभीर असते, व त्यांनी जर विचार चिंतन केले असते तर निश्चितच त्यांना या सत्याच्या समर्थनार्थ ज्यास पैगंबर सादर करीत आहे,पावलो पावली निशाण्या दिसून आल्या असल्या.

आयत क्र. १० ते ६८ मध्ये हजरत मूसा यांचा वृत्तांत निवेदिला गेला आहे ज्याद्वारे ना केवळ त्यांची पैगंबरीय सत्यता साबीत होते. किंबहुना हे ही सिद्ध होते की हटवादी लोक कोणत्याही निशाणीस पाहून येथपावेतो की अनुभूत ईश-चमत्कारास पाहून ही ईमान बाळगत नाही.

आयत क्र. ६९ ते १०४ मध्ये हजरत इब्राहीम यांच्या एकेश्वरवादी आवाहनास सादर केले गेले आहे जो त्यांनी आपल्या जातीला दिली होती

आयत क्र. १०५ ते १९१ मध्ये पैगंबरांची सत्य-स्विकृतिचे आवाहन सादर केले गेले आहे व त्या सोबत विरोधकांच्या परिणतीस देखील इतिहासाच्या विभिन्न काळामध्ये पैगंबरांचा उदय, त्यांच्या आवाहनाची एक वाक्यता व त्यांच्या विरोधकांचे दुष्परिणतीस पोहचणे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे पैगंबरांना पाठविले जाण्याचे स्पष्ट प्रमाण होय आणि हे प्रमाण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या ठायी देखील आहे.

आयत क्र. १९२ ते २२७ मध्ये कुरआन व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी शंकांचे निरसन केले गेले आहे.

# २६. सूरह अश्शोअरा

سُورَةُ الشُّعَرَاءِ

अनुवाद
आयती - २२७

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. ता. सीन. मीम. [१]

طٰسٓمٓ ①

२. या आयती होत तेजस्वी ग्रंथाच्या [२]

تِلْكَ اٰيٰتُ الْكِتٰبِ الْمُبِيْنِ ②

३. (हे पैगंबर !) कदाचित तुम्ही स्वतःला नष्ट करून घ्याल, या (दुःखा)त की हे लोक ईमान बाळगत नाहीत ![३]

لَعَلَّكَ بَاخِعٌ نَّفْسَكَ اَلَّا يَكُوْنُوْا مُؤْمِنِيْنَ ③

४. आम्ही इच्छिल्यास यांच्यावर अशी निशाणी अवतरीत करू की यांच्या माना त्यापुढे झुकलेल्या राहतील. [४]

اِنْ نَّشَاْ نُنَزِّلْ عَلَيْهِمْ مِّنَ السَّمَآءِ اٰيَةً فَظَلَّتْ اَعْنَاقُهُمْ لَهَا خٰضِعِيْنَ ④

५. यांच्या जवळ रहमान कडून जी ताजी स्मरणिका देखील येते, हे त्यापासून तोंड फिरवितात. [५]

وَمَا يَاْتِيْهِمْ مِّنْ ذِكْرٍ مِّنَ الرَّحْمٰنِ مُحْدَثٍ اِلَّا كَانُوْا عَنْهُ مُعْرِضِيْنَ ⑤

६. यास्तव त्यांनी खोटे ठरविले, तेव्हा ज्या गोष्टीची हे थट्टा उडवितात त्याची वास्तविकता लवकरच त्यांच्या समोर येईल. [६]

فَقَدْ كَذَّبُوْا فَسَيَاْتِيْهِمْ اَنْۢبٰٓؤُا مَا كَانُوْا بِهٖ يَسْتَهْزِءُوْنَ ⑥

७. काय यांनी जमीनीवर नजर नाही टाकली की आम्ही तिच्यात किती विपुलतेने प्रत्येक प्रकारच्या उत्कृष्ट वस्तू उगविल्या आहेत.

اَوَلَمْ يَرَوْا اِلَى الْاَرْضِ كَمْ اَنْۢبَتْنَا فِيْهَا مِنْ كُلِّ زَوْجٍ كَرِيْمٍ ⑦

८. निःसंशय यात मोठी निशाणी आहे, [७] परंतु यांच्या पैकी आधिकांश लोक ईमान बाळगणार नाहीत. [८]

اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيَةً ۚ وَمَا كَانَ اَكْثَرُهُمْ مُّؤْمِنِيْنَ ⑧

१. ही सांकेतिक अक्षरे होत आणि ज्याप्रमाणे आम्ही स्पष्टीकरण देत आलो आहोत त्यानुसार ही अक्षरे सूरहच्या विशिष्ट मजकूरांकडे संकेत करतात. 'तोय'चा संकेत ताअत (आज्ञापालना) कडे आहे. यास्तव प्रत्येक पैगंबराने लोकांकडून أَطِيعُونَ **'अतीऊन'** (माझे आज्ञापालन करा) ही अपेक्षा केली होती. जसे की आयत १०८, १२६, १४४, १५० व १६३ मध्ये निवेदिले गेले आहे.

'सीन'चा संकेत सहर (जादूटोणा) च्या आरोपाकडे आहे जो पैगंबरांवर ठेवला जात राहीला व ज्याचा उल्लेख आयत ३४, ३५,४९, १५३ व १८५ मध्ये केला गेला आहे.

आणि 'मीम' संकेत मुर्सलीन (पैगंबरां) कडे आहे ज्यांना वेगवेगळ्या जन-समूहांकडे पाठविले गेले होते. हा शब्द आयत क्र. १०५,१४१,१६० व १७६ मध्ये आला आहे.

जणू तोय सीन मीन सूरहच्या या विषयास आपल्यात समाविष्ट केले आहे की की अल्लाहने वेगवेगळ्या जनसमूहाकडे आपले पैगंबर पाठविले होते व या सर्वांनी रसूल या नात्याने आपल्या आज्ञापालनाची मागणी केली होती, परंतु लोकांनी त्यांच्यावर जादूचा आरोप ठेवला. कोणास जादूगार म्हटले तर कोणास जादूने पछाडलेले. यावरून हे ऐतिहासिक सत्य स्पष्ट होते की पैगंबरांच्या विरोधकांची विचारसरणी नेहमी एकसारखीच राहीली आहे व आज देखील हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे विरोधक याच विचारसरणीचा पुरावा देत आहे.

(सांकेतिक अक्षरांच्या अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १ व सूरह यूनुस टीप क्र. १)

२. याचे स्पष्टीकरण सूरह युसूफ टीप क्र. २ मध्ये केले गेले आहे.

३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कहफ टीप क्र. ७.

४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडून काफीर अनुभूत ईश-चमत्काराची मागणी करीत होते. उत्तरा दाखल येथे फर्माविले गेले आहे की अल्लाहने इच्छिले तर त्यांना अपेक्षित असलेला ईश-चमत्कारच नव्हे तर असा अनुभूत चमत्कारही अवतरीत करू शकतो ज्यानंतर इन्कार करण्याचा प्रश्नच राहू नये व या लोकांनी त्यास मान्य करण्यास विवश व्हावे. नि:संश्य अल्लाह अशा प्रकारचा ईश-चमत्कार दाखविण्यास समर्थ आहे, परंतु अल्लाहचे उद्दिष्ट हे नव्हे कारण खरे उद्दिष्ट बुद्धिची परिक्षा होय की मनुष्य कोणत्या गोष्टीस मानण्यासाठी आपल्या बुद्धीला प्रवृत्त करतो.

५. जवळ जवळ हीच गोष्ट सूरह अंबिया टीप क्र. २मध्ये निवेदिली गेली आहे. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र.२.

६. म्हणजे ते परिणाम व परिणति यांच्या समोर येतील ज्या विषयी यांना सावध केले जात आहे व ज्याची थट्टा उडविण्यात हे मग्न आहेत.

७. म्हणजे जमीनीतून उगणाऱ्या विपुल उत्कृष्ट वनस्पतींमध्ये त्या सत्याची स्पष्ट निशाणी आहे ज्यास पैगंबर प्रस्तुत करीत आहे. अर्थात एकेश्वरवादाची निशाणी ही व मेल्यानंतर उठविले जाण्याची ही. जमीनीवर जे विशाल भोज पत्र मांडले गेले आहे त्याद्वारे लोक आपल्या उपजिवीकेच्या समाधानाची सामुग्री तर करतात परंतु या गोष्टीवर विचार करायला तयार होत नाही की हे उत्कृष्ट भोज-पत्र कोणी मांडले आहे? ते कोणते सामर्थ्य आहे की ज्याने विविध स्वरूपांचे व विविध प्रकारचे खाद्य या विशाल भोजपत्रावर निवडून ठेवले आहेत. माणसावर देणग्यांचा वर्षाव करून तो यास काय बनवू इच्छितो? आणि माणसाचे आपल्या या खऱ्याखुऱ्या उपकार-कर्त्याशी कशा प्रकारचे वर्तन असले पाहीजे?

८. म्हणजे यांच्यापैकी अधिकांश लोकांची ही दशा आहे की ते या नैसर्गिक निशाण्याना पाहून, ज्या त्यांच्या आसपास विखुरल्या आहेत, ईमान बाळगू इच्छित नाही.

स्पष्ट असावे की हा अशा परिस्थितीचा उल्लेख आहे जी मक्केच्या तत्कालीन समाजात आढळून येत होती. यास्तव हिजरत (स्थलांतरा) पर्यंत लोकांनी फार कमी ईमान बाळगले.

| | |
|---|---|
| ९. आणि निःसंशय तुमच्या पालनकर्ता प्रभुत्वाशाली ही आहे व दयाळू देखील.[९] | وَاِنَّ رَبَّكَ لَهُوَ الۡعَزِيۡزُ الرَّحِيۡمُ ﴿٩﴾ |
| १०. आणि जेव्हा तुमच्या पालन कर्त्या ने मूसाला पुकारले [१०] की अत्याचारी जन समूहा [११] जवळ जा. | وَاِذۡ نَادٰى رَبُّكَ مُوۡسٰٓى اَنِ ائۡتِ الۡقَوۡمَ الظّٰلِمِيۡنَ ﴿١٠﴾ |
| ११. फिरऔनच्या जन समूहा जवळ. काय ते भय भाळगत नाही ?[१२] | قَوۡمَ فِرۡعَوۡنَ ؕ اَلَا يَتَّقُوۡنَ ﴿١١﴾ |
| १२. तो म्हणाला, हे माझ्या पालन कर्त्या ! मला ते खोटे ठरवतील याचे भय वाटते. | قَالَ رَبِّ اِنِّىۡۤ اَخَافُ اَنۡ يُّكَذِّبُوۡنِ ﴿١٢﴾ |
| १३. माझी छाती संकुचित होते [१३] आणि माझी जीभ वळत नाही [१४] तेव्हा, हारूनकडे प्रेषित्व पाठव. [१५] | وَيَضِيۡقُ صَدۡرِىۡ وَلَا يَنۡطَلِقُ لِسَانِىۡ فَاَرۡسِلۡ اِلٰى هٰرُوۡنَ ﴿١٣﴾ |
| १४. आणि मजवर त्यांच्या कडून एक अपराधाचे ओझे ही आहे म्हणून मला भय वाटते की ते माझी हत्त्या करतील.[१६] | وَلَهُمۡ عَلَىَّ ذَنۡۢبٌ فَاَخَافُ اَنۡ يَّقۡتُلُوۡنِ ﴿١٤﴾ |
| १५. फर्माविले, कदापि नव्हे. [१७] तुम्ही दोघे निशाण्यांसह जा. आम्ही तुमच्या सोबत ऐकत राहू , [१८] | قَالَ كَلَّا ۚ فَاذۡهَبَا بِاٰيٰتِنَآ اِنَّا مَعَكُمۡ مُّسۡتَمِعُوۡنَ ﴿١٥﴾ |
| १६. फिरऔन जवळ जा आणि सांगा की आम्ही सर्व विश्वांच्या स्वामीचे रसूल (पैगंबर ) आहोत.[१९] | فَاۡتِيَا فِرۡعَوۡنَ فَقُوۡلَاۤ اِنَّا رَسُوۡلُ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ ﴿١٦﴾ |
| १७. (आणि या आदेशासह पाठविले गेलो आहोत) की तू बनी इस्राईलला आमच्या बरोबर जाऊ दे.[२०] | اَنۡ اَرۡسِلۡ مَعَنَا بَنِىۡۤ اِسۡرَآءِيۡلَ ﴿١٧﴾ |
| १८. तो म्हणाला, काय आम्ही तुमचे आपल्या येथे लहानपणी पालन केले नव्हते? आणि आपल्या वयाची कितीतरी वर्षे तुम्ही आमच्या येथे नाही घालविली ?[२१] | قَالَ اَلَمۡ نُرَبِّكَ فِيۡنَا وَلِيۡدًا وَّلَبِثۡتَ فِيۡنَا مِنۡ عُمُرِكَ سِنِيۡنَ ﴿١٨﴾ |

९. या प्रसंगी या दोन गुणविशेषांचा उल्लेख करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की ईमान न बाळगणारे अल्लहच्या कब्ज्याबाहेर नाहीत. तो तर क्षणाचाही विलंब न लावता यांच्यावर अजाब अवतरीत करू शकतो. परंतु त्याची कृपा या गोष्टीची निकड बाळगते की यांना तोल सावरण्याची आणखी एक संधी दिली जावी. तसेच या गोष्टीकडे संकेत ही आहे की जर लोक ईमान बाळगत नाही, परंतु अल्लाहचा प्रभाव व त्याच्या कृपेचे चमत्कार निश्चित प्रकट होतील.

१०. येथे हजरत मूसा यांचा वृत्तांत सादर केला गेला आहे. याच्या स्पष्टीकरणा संदर्भात सूरह 'ताहा' टीप क्र. ९ ते ९४ विचाराधीन असाव्यात.

११. फिरऔनच्या जन समूहाचा उल्लेख अत्याचारी जनसमूह या नावाने केला गेला कारण त्याचा विद्रोह व त्याचा अत्याचार शिगास पोहचला होता व तो क्रूरतेच्या पातळीवर येऊन ठेपला होता. ज्याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे त्याचे आपल्या देशातील मुस्लिम अल्पसंख्यांकां (बनी इस्राईल) च्या नवजात अर्भकांची हत्त्या करणे हे होते.

१२. म्हणजे अत्याचारी कृत्ये करतांना आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगत नाही की त्याचा प्रकोप त्यांच्यावर कोसळू शकतो व ते त्याच्या क्रोधाग्निला बळी पडू शकतात.

१३. ही कैफियत प्रेषित्वाच्या भारदस्त जबाबदारीच्या जाणीवेमुळे निर्माण झाली होती.

१४. म्हणजे अडखळत बोलतो. स्पषटीकरणासाठी पहा, सूरह ताहा, टीप क्र.२८

१५. हो हजरत मूसा यांचे प्रेषित्वास कबूल करण्यास इन्कार नव्हता. जसे बायबल (निर्गम: ४:१३,१४) चे निवेदन आहे. किंबहुना प्रेषित्वाच्या महान जबाबदाऱ्या कबूल करीत आपल्या असमर्थतेची व अडचणीची अभिव्यक्ति होती, अशासाठी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांची मदत करावी. यावरुन हे दिसून येते की पैगंबर पद किती महान जबाबदारीचे पद आहे. ज्यास कबूल करताना हजरत मूसा यांच्यासारखी थोर व्यक्तिही भयकंपित होते.

१६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४. ही घटना विवरणासह सूरह कसस मध्ये येत आहे.

१७. म्हणजे फिरऔनचा जन-समूह तुम्हाला ठार करू शकणार नाही आणि ना तुमच्या पैगंबरीय कर्तव्याच्या अदायगीत एखादी बाधा येईल.

१८. म्हणजे आम्ही तुमच्या सोबत ऐकण्यासाठी हजर राहू व फिरऔन जे उत्तर देईल त्याविषयी भिज्ञ राहू यास्तव तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. तुम्हाला ज्या मदतीची ही गरज भासेल ती आम्ही पुरवू.

१९. फिरऔनचा दावा आपल्या साम्राज्य म्हणजे देशापुरता रब्ब (पालनकर्ता) असण्याचा होता आणि तो ही विशिष्ट अर्थाने. म्हणून हजरत मूसा यांना ही ताकीद केली गेली की त्यांनी स्वत:ला सर्व विश्वांचा पालनकर्त्या अल्लाहचे रसूल या नात्याने सादर करावे यासाठी की फिरऔन वर आरंभातच हे स्पष्ट व्हावे की अल्लाह इजिप्त समेत समस्त सृष्टीचा खराखुरा पालनकर्ता आहे.

२०. बनी इस्राईलला पाठविण्याची मागणी ही काही जन-सामूहीक मागणी नव्हती, तर हा अल्लाहचा आदेश होता. ज्यास फिरऔन पर्यंत पोहचविण्याची ताकीद हजरत मूसा व हजरत हारुन यांना केली गेली होती. जणू या पैगंबरांना आवाहनासह या मोहीमेवर रवाना केले गेले होते की त्यांनी बनी इस्राईलला मिस्र देशातून बाहेर घेऊन यावे म्हणून त्यांनी सुरवातीसच फिरऔनच्या समोर जेथे आवाहन सादर केले तिथे ही मागणी ही मांडली की बनी इस्राईलला आमच्या बरोबर जाऊ द्यावे. शब्दशैलीने अगदी स्पष्ट आहे की ही मागणी अगदी सुरवातीलाच सादर केली गेली होती. याने या दृष्टीकोनाचे खंडन होते की आवाहनात्मक अवस्थेत एखाद्या अत्याचारी किंवा इस्लामेतर शासनासमोर एखादी सामाजिक मागणी धार्मिक हेतुंची निकड असली तरी मांडली जाऊ शकत नाही. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १६१

२१. हजरत मूसा यांचे पालन पोषण अल्लाहच्या चमत्कारान्वये फिरऔनच्या घरात झाले होते. याचे विवरण सूरह ' ताहा' टीप क्र. २६ ते ४१ मध्ये केले गेले आहे.

وفعلت فعلتك التي فعلت وانت من الكفرين ﴿١٩﴾

१९. त्यानंतर तुम्ही ते कृत्य केले जे केले आणि तुम्ही कृतघ्न आहात ![२२]

قال فعلتها اذا وانا من الضالين ﴿٢٠﴾

२०. मूसा ने उत्तर दिले, मी हे अशा वेळी केले जेव्हा मी अनभिज्ञ होतो.[२३]

ففررت منكم لما خفتكم فوهب لي ربي حكما وجعلني من المرسلين ﴿٢١﴾

२१. मग मी तुम्हा लोकांच्या भितीमुळे [२४] पळालो. मग माझ्या पालनकर्त्याने मला आदेश दिला [२५] आणि पैगंबरांमध्ये सामील केले.

وتلك نعمة تمنها علي ان عبدت بني اسراءيل ﴿٢٢﴾

२२. आणि हा तुझा उपकार आहे जो तू जतावित आहेस की तू बनी इस्राईलला गुलाम बनवून ठेवले आहे.[२६]

قال فرعون وما رب العلمين ﴿٢٣﴾

२३. फिरऔन म्हणाला, सर्व विश्वांचा स्वामी काय आहे ?[२७]

قال رب السموت والارض وما بينهما ان كنتم موقنين ﴿٢٤﴾

२४. त्याने उत्तर दिले, आकाशांचा व जमीनीचा आणि यांच्या दरम्यान असलेल्या अस्तित्वांचा स्वामी, जर तुम्ही विश्वास बाळगणारे असाल.[२८]

قال لمن حوله الا تستمعون ﴿٢٥﴾

२५. तो आपल्या भोवतीच्या लोकांना म्हणाला, तुम्ही ऐकत आहात की नाही ?[२९]

قال ربكم ورب ابآىكم الاولين ﴿٢٦﴾

२६. मूसा म्हणाला, तुमचा ही पालन कर्ता आणि तुमच्या होऊन गेलेल्या पूर्वजांचा ही पालनकर्ता.[३०]

قال ان رسولكم الذي ارسل اليكم لمجنون ﴿٢٧﴾

२७. फिरऔन म्हणाला,तुमचा हा पैगंबर,जो तुमच्याकडे पाठविला गेला आहे, वेडा आहे.[३१]

قال رب المشرق والمغرب وما بينهما ان كنتم تعقلون ﴿٢٨﴾

२८. मूसा म्हणाला, पूर्व व पश्चिम आणि यांच्या दरम्यानच्या समस्त अस्तित्वांचा स्वामी, जर तुम्ही अक्कल बाळगत असाल.[३२]

२२. संकेत हत्येच्या त्या घटनेकडे आहे जी हजरत मूसा यांच्या हातून चुकीने घडली होती. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४३.

२३. ही हजरत मूसा यांची आपल्या स्वत:ची तमा न बाळगता कबूली होती की माझ्या हातून ही चूक निश्चित घडली. परंतु अशा वेळी, जेव्हा मार्गदर्शनाचा तो मार्ग मजवर खुलला नव्हता जो आज खुलला आहे. म्हणजे आता मी प्रेषितपदावर नियुक्त केलो गेलो आहे; व संपूर्ण प्रकाशात चालत आहे म्हणून मागील चुकीवर वाद घालण्यात काय अर्थ? स्पष्ट असावे की आयतीत जलालत हा शब्द श्रद्धा व आचरणाची मार्गभ्रष्टता या अर्थाने वापरला गेला नाही किंबहुना ज्ञानाच्या त्या प्रकाशाच्या तुलनेत जो त्यांना प्रेषित्वानंतर लाभला होता. किब्तीला त्यांनी बुद्धिपुरस्सर ठार केले नव्हते, किंबहुना ठोसा लागल्यामुळे तो ठार झाला होता. म्हणून ही घटना चूकून हत्येची होती आणि हजरत मूसा यांनी या प्रसंगी सर्वश्रेष्ठ अल्लाहशी आपल्या मुक्ति करीता ज्या शब्दांत दुआ (प्रार्थना) केली होती तिच्या प्रत्येक शब्दातून व्यक्त होते की ते त्यावेळी ही सन्मार्गावर होते. (पाहा सूरह कसस, आयत क्र. १५ ते १७)

२४. म्हणजे तुम्हा लोकांच्या शिक्षेच्या भितीमुळे.

२५. आदेशशी अभिप्रेत बुद्धिमत्ता व बुद्धिकौशल्य होय.

२६. हे हजरत मूसा यांचे फिरऔनला सडेतोड व वास्तवतेस अनावरीत करणारे उत्तर होते. या उत्तराचा अर्थ असा की तुला तो उपकार तर आठवतो जो तू माझे पालन पोषण केल्याच्या स्वरुपात होता. परंतु माझा जनसमूह बनी इस्राईलला गुलामीच्या शृंखलात जखडवून जो अत्याचार तू त्यांच्यावर करीत आहेत याला मात्र विसरलास ! काय तू असे इच्छितो की मी तुझ्या उपकाराची फेड अशा प्रकारे करावी की बनी इस्राईलवर जो अत्याचार तुझ्यातर्फे होत आहे त्याविरुद्ध तोंड न उघडावे; व तुला मनमानी करू द्यावी? काय तुझा असा हेतु आहे की मी तुझ्या उपकारांच्या ओझ्याखाली जे लहानपणी तू मजवर केलेस अशा प्रकारे दबून राहू की एका अत्याचार-पिडीत जन-समूहाच्या मुक्ति करीता काहीच न करावे?

२७. फिरऔनच्या या उत्तराद्वारे उघड होते की तो या गोष्टीस मानत नव्हता की सृष्टीचा एखाद्या पालनकर्ता आहे जो कार्य योजना करतो. राहीला त्याचा उच्चत पालनकर्ता होण्याचा दावा तर तो इजिप्त पुरता व त्याचा सत्ताधिकारी असण्यामुळे होता इजिप्तचे शासक आपले नाते सूर्य देवतेशी जोडत, जसे आम्ही सूरह अअराफ टीप क्र. १८० मध्ये विशद केले आहे. त्याच्या दृष्टीने जो साम्राज्याचा स्वामी आहे तो जनतेकरीता सर्वसत्ताधिकारी ही आहे आणि उपासनीय देखील. त्याला हा अधिकार आहे की मनात येईल तो आदेश द्यावा व अशी कोणतेही उच्च शक्ती नाही जी त्याला आदेश देण्याचा अधिकार बाळगते. अशा प्रकारे तो आपल्या राजकीय व धार्मिक दोन्ही प्रकारच्या सत्तेचा सर्वेसर्वा होता. यास्तव तो आपले मनमानी आदेशही जारी करीत होता; व लोकांकडूनही अपेक्षाही बाळगत होता की त्यांनी त्याची पूजा करावी. म्हणून त्याच्या दाव्यात केवळ राजकीय सत्तेच्या अर्थाने घेणे उचित ठरणार नाही.

२८. म्हणजे ज्ञानाने प्राप्त होते आणि ज्ञानाच्या प्राप्ताच महत्वपूर्ण साधन प्रमाणे व निशाण्या होत. हजरत मूसा यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की ही विशाल सृष्टी जिच्यात आकाश,जमीन, सूर्य चंद्र व तारे सर्व सामील आहेत या गोष्टीवर उघड युक्तिवाद करतात की येथे एक अत्युच्च अस्तित्व आहे जे संपूर्ण सृष्टीचे निमार्ण करणारे आहे व स्वामी ही, व ज्याचा सत्ताधिकार सर्वांवर आहे.म्हणून माणसाचा खराखुरा पालनकर्ताही तोच आहे. या वस्तुस्थितीचा विश्वास तुम्हाला येऊ शकतो, मात्र या अटीवर की प्रमाणांच्या प्रकाशात तुम्ही या सृष्टीवर विचार चिंतन करावे.

२९. हजरत मूसा यांच्या उत्तरावर उपरोध व आश्चर्याची अभिव्यक्ति होती.

३०. हे या गोष्टीचे अधिक स्पष्टीकरण होते की सर्व विश्वांचा पालनकर्ता कोण आहे. तसेच या गोष्टीकडे संकेत होता की जर फिरऔन तुमचा पालनकर्ता आहे तर तुमच्या वाडवडीलांचा पालनकर्ता कोण होता? हा फिरऔन तर नंतर जन्माला आला म्हणून त्यांचे पालन कर्ता असण्याचा दावा तर तो करू शकत नाही परंतु सृष्टी निर्मात्याचे ईशत्व सर्वव्यापी आहे, तो पूर्वी होऊन गेलेल्या लोकांसमेत समस्त माणसांचा पालनकर्ता आहे.

३१. जेव्हा फिरऔनला हजरत मूसा यांच्या प्रमाणेच काहीच उत्तर देता आले नाही. तेव्हा त्यांच्यावर वेडा असण्याचा आरोप लावला. तो हे जाणत होता की हजरत मूसा वेडे नाहीत, जर तो यांना वेडा समजला असता तर ना विवादास वाढविले असते आणि ना त्यांना आपल्या साम्राज्याकरीता धोका समजले असते कारण वेडया इसमाकडून शासनाला काहीच धोका नसतो.

३२. म्हणजे काय पूर्व व पश्चिम विभिन्न शासने आहेत? सूर्य कोणाच्या आदेशाने उगवतो व अस्तास जातो? आणि असा कोण आहे ज्याचा सत्ताधिकार पूर्व व पश्चिम यांच्या दरम्यानच्या समस्त अस्तित्वांवर आहे? माणसाने बुद्धिचा वापर केल्यास याचे उत्तर याशिवाय आणखी काहीच असू शकत नाही की अल्लाह हाच सर्व विश्वांचा स्वामी आहे.

पूर्व व पश्चिम यांचा उल्लेख करण्यात या गोष्टीकडेही संकेत होता की फिरऔन तर जमीनीच्या एका मर्यादित क्षेत्राचा केवळ लाक्षणिक शासक आहे, तो रब्ब (पालनकर्ता) कसा होऊ शकतो? त्याला ना पूर्वेवर अधिकार प्राप्त आहे ना पश्चिमेवर.

२९. फिरऔन म्हणाला, जर तुम्ही माझ्या खेरीज अन्य एखाद्यास माबूद (उपास्य) बनविले [३३] तर मी तुम्हाला कैद केल्या शिवाय राहणार नाही.

قَالَ لَئِنِ اتَّخَذْتَ إِلَٰهًا غَيْرِي لَأَجْعَلَنَّكَ مِنَ الْمَسْجُونِينَ ﴿٢٩﴾

३०. मूसा म्हणाला, काय या स्थितीत ही की, जेव्हा मी तुमच्या जवळ एक स्पष्ट गोष्ट (प्रमाण) घेऊन आलो आहे?

قَالَ أَوَلَوْ جِئْتُكَ بِشَيْءٍ مُّبِينٍ ﴿٣٠﴾

३१. फिरऔन म्हणाला, तर मग सादर करा, जर तुम्ही सच्चे असाल.

قَالَ فَأْتِ بِهِ إِن كُنتَ مِنَ الصَّادِقِينَ ﴿٣١﴾

३२. मूसा ने आपली काठी टाकली आणि अचानक ती एक उघड अजगर बनली.[३४]

فَأَلْقَىٰ عَصَاهُ فَإِذَا هِيَ ثُعْبَانٌ مُّبِينٌ ﴿٣٢﴾

३३. आणि त्याने आपला हात बाहेर काढला तर तो प्रेक्षकांच्या नजरेत तेजस्वी झाला.[३५]

وَنَزَعَ يَدَهُ فَإِذَا هِيَ بَيْضَاءُ لِلنَّاظِرِينَ ﴿٣٣﴾

३४. फिरऔन आपल्या भोवती असलेल्या सरदारांना म्हणाला, हा मनुष्य निश्चितच एक निष्णात जादूगार आहे.

قَالَ لِلْمَلَإِ حَوْلَهُ إِنَّ هَٰذَا لَسَاحِرٌ عَلِيمٌ ﴿٣٤﴾

३५. हा असे इच्छितो की जादू टोण्याद्वारे तुम्हाला तुमच्या देशा बाहेर घालवावे [३६] तेव्हा तुम्ही काय सल्ला देता?

يُرِيدُ أَن يُخْرِجَكُم مِّنْ أَرْضِكُم بِسِحْرِهِ فَمَاذَا تَأْمُرُونَ ﴿٣٥﴾

३६. ते म्हणाले याला व त्याच्या भावाला सध्या सवड द्या आणि शहरांमध्ये दवंडी देणारे पाठवू द्या.

قَالُوا أَرْجِهْ وَأَخَاهُ وَابْعَثْ فِي الْمَدَائِنِ حَاشِرِينَ ﴿٣٦﴾

३७. की समस्त निष्णात जादूगारांना आपल्या जवळ घेऊन यावे.

يَأْتُوكَ بِكُلِّ سَحَّارٍ عَلِيمٍ ﴿٣٧﴾

३८. तेव्हा जादूगारांना एका निश्चित दिवशी ठरलेल्या वेळी एकत्रित केले गेले.[३७]

فَجُمِعَ السَّحَرَةُ لِمِيقَاتِ يَوْمٍ مَّعْلُومٍ ﴿٣٨﴾

३३. स्पष्ट झाले की फिरऔनचा दावा केवळ राजकीय शासकत्वाचाच नव्हता तर स्वत: माबूद (उपासनीय) असण्याचा ही होता. तो हे इच्छित होता की लोकांनी त्याची पूजा ही करीत रहावे, या साठी की त्याला आपल्या प्रजेत पवित्र स्थान लाभावे व त्याच्या शासकत्वाची मूळे मजबूत व्हावीत.

३४. काठीचे सापात रूपांतर होणे हा सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे एक चमत्कार होता, जो हजरत मूसा यांना प्रदान केला गेला. त्याच्या काठीचे खरोखर सापात रूपांतर होत असे व त्याचे स्वरूप अजगरासारखे होत असे. हे स्पष्ट प्रमाण होते या गोष्टीचे की हजरत मूसा अशा शक्तिकडून पाठविले गेले आहेत, जो सर्व सृष्टीचा स्वामी व पालनकर्ता आहे व समस्त गोष्टींचे सामर्थ्य बाळगतो.

३५. हा दुसरा ईश-चमत्कार होता जो हजरत मूसा यांना प्रदान केला गेला. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह 'ताहा' टीप क्र. २३.

३६. हा खोटा आरोप होता जो फिरऔनने हजरत मूसा यांना लावला अन्यथा त्यांनी असे काही म्हटले नव्हे. ते तर बनी इस्राईलला मिस्र मधून बाहेर घेऊन जाऊ इच्छित होते. फिरऔनच्या जन-समूहाला देशाबाहेर घालविण्याची त्यांनी कसलीच योजना रचली नव्हती. परंतु फिरऔनने त्यांच्यावर हा राजकीय आरोप ठेवला, यासाठी की लोकांना त्यांच्याविरूद्ध प्रक्षोभित करणे शक्य व्हावे.

३७. हा समारंभाचा दिवस होता व दिवस वर येण्याची वेळ होती, जसे दुसऱ्या ठिकाणी स्पष्टीकरण उल्लेखिले गेले आहे.

३९. आणि लोकांना सांगितले गेले. तुम्ही गोळा व्हाल ? [३८]

وَقِيلَ لِلنَّاسِ هَلْ أَنتُم مُّجْتَمِعُونَ ﴿٣٩﴾

४०. अशा साठी की जर जादूगार प्रभावशाली ठरले तर आम्ही त्यांच्या मार्गाचे अनुसरण करावे. [३९]

لَعَلَّنَا نَتَّبِعُ السَّحَرَةَ إِن كَانُوا هُمُ الْغَالِبِينَ ﴿٤٠﴾

४१. जेव्हा जादूगार आले तेव्हा ते फिरऔनला म्हणाले, आम्ही वर्चस्वशाली ठरलो तर आम्हाला बक्षीस मिळेल ना?

فَلَمَّا جَاءَ السَّحَرَةُ قَالُوا لِفِرْعَوْنَ أَئِنَّ لَنَا لَأَجْرًا إِن كُنَّا
نَحْنُ الْغَالِبِينَ ﴿٤١﴾

४२. तो म्हणाला, हो अवश्य आणि तुम्ही सानिध्य प्राप्त असलेल्यांमध्ये सामील व्हाल.

قَالَ نَعَمْ وَإِنَّكُمْ إِذًا لَّمِنَ الْمُقَرَّبِينَ ﴿٤٢﴾

४३. मूसा म्हणाला, टाका, तुम्हाला जे काही टाकायचे आहे.

قَالَ لَهُم مُّوسَىٰ أَلْقُوا مَا أَنتُم مُّلْقُونَ ﴿٤٣﴾

४४. त्यांनी आपल्या दोऱ्या व काठ्या खाली टाकल्या आणि म्हणाले, फिरऔनच्या प्रतिष्ठेची शापथ, आम्हीच वरचढ राहू. [४०]

فَأَلْقَوْا حِبَالَهُمْ وَعِصِيَّهُمْ وَقَالُوا بِعِزَّةِ فِرْعَوْنَ
إِنَّا لَنَحْنُ الْغَالِبُونَ ﴿٤٤﴾

४५. मग मूसाने आपली काठी खाली टाकली तेव्हा अकस्मात ती त्यांच्या जादूला गिळंकृत करू लागली. [४१]

فَأَلْقَىٰ مُوسَىٰ عَصَاهُ فَإِذَا هِيَ تَلْقَفُ مَا يَأْفِكُونَ ﴿٤٥﴾

४६. यावर जादूगार आपोआप सजद्यात पडले. [४२]

فَأُلْقِيَ السَّحَرَةُ سَاجِدِينَ ﴿٤٦﴾

४७. आणि उदगारले, आम्ही ईमान बाळगले सर्व विश्वांच्या पालन कर्त्यावर.

قَالُوا آمَنَّا بِرَبِّ الْعَالَمِينَ ﴿٤٧﴾

४८. मूसा व हारूनच्या पालनकर्त्यावर. [४३]

رَبِّ مُوسَىٰ وَهَارُونَ ﴿٤٨﴾

४९. फिरऔन म्हणाला, तुम्ही यास मानले, यापूर्वी की मी तुम्हाला याची अनुमति दिली असती. [४४] हा तुमचा मोठा आहे ज्याने तुम्हाला जादू शिकविली आहे. [४५] तेव्हा आताच तुम्हाला माहीत होईल. मी तुमचे हात व पाय विरूद्ध दिशांनी कापून टाकीन व तुम्हा सर्वांना सूळावर चढवीन.

قَالَ آمَنتُمْ لَهُ قَبْلَ أَنْ آذَنَ لَكُمْ ۖ إِنَّهُ لَكَبِيرُكُمُ الَّذِي عَلَّمَكُمُ
السِّحْرَ فَلَسَوْفَ تَعْلَمُونَ ۚ لَأُقَطِّعَنَّ أَيْدِيَكُمْ وَأَرْجُلَكُم
مِّنْ خِلَافٍ وَلَأُصَلِّبَنَّكُمْ أَجْمَعِينَ ﴿٤٩﴾

३८. प्रश्नार्थक शैलीत लोकांना एकत्रित होण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे.

३९. बोलणारे फिरऔनचे समर्थक होते. त्यांनी हे सांगितले नाही की जो प्रभावी ठरेल किंवा जे जाहीर होईल त्याचे आम्ही अनुसरण करू किंबहुना हे सांगितले की आम्ही जादूगारांचे अनुसरण करू. जर ते वरचढ ठरले. यावरून हे जाहीर होते की ते पक्षापाती विचार सरणीने आले होते आणि जादूगारांच्या अनुसरणाचा अर्थ फिरऔनच्या पद्धतिचे अनुसरण होते ज्याअर्थी त्या वेळी दोन पक्षात सामना होत होता. एकीकडे जादूगार तर दुसरीकडे मूसा व हारून म्हणून त्यांनी एक पक्ष या नात्याने जादूगारांचा उल्लेख केला अन्यथा फिरऔनचेच अनुसरण अभिप्रेत होते.

४०. अरबी भाषेत इज्जतचा अर्थ शक्ति व वर्चस्व असाही आहे व प्रतिष्ठा (Honour)असा देखील. जादूगारांनी फिरऔनच्या प्रतिष्ठेची शपथ घेतली ज्यावरून त्यांच्या अनेकेश्वरवादी विचार सरणीची कल्पना येते.

४१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १६७

४२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १७१

४३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १७२ व १७३.

जादूगारांच्या ईमान बाळगण्यावरून ही गोष्ट स्पष्ट झाली की हजरत मूसा जे काही सादर करीत आहेत, ती जादू नव्हे किंबहुना सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे चमत्कार होय. जादू व ईश चमत्कारामधील फरक जादूगार चांगल्या प्रकारे जाणतो आणि त्यांची ही साक्ष की हजरत मूसा यांच्या काठीचे सापात रूपांतर होणे जादूच्या प्रभावाने नव्हे, तर अल्लाहच्या समर्थनामुळे आहे, सत्य व असत्य यातला फरक उघड करणारी गोष्ट होती.

४४. केवढे अत्याचार शासन असेल ते की जिचे अल्लाहवर ईमान बाळगण्यासाठी ही शासनाच्या अनुमतीची गरज भासावी!

४५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह 'ताहा' टीप क्र. ८१

५०. त्यांनी उत्तर दिले, काही हरकत नाही. आम्ही आपल्या पालनकर्त्याकडेच परतणार आहोत. [४६]

قَالُوْا لَا ضَيْرَ اِنَّاۤ اِلٰى رَبِّنَا مُنْقَلِبُوْنَ ﴿۵۰﴾

५१. आम्ही आशा बाळगतो की आमचा पालन कर्ता आमचे अपराध माफ करील की आम्ही सर्वांत प्रथम ईमान बाळगले. [४७]

اِنَّا نَطْمَعُ اَنْ يَّغْفِرَ لَنَا رَبُّنَا خَطٰيٰنَاۤ اَنْ كُنَّاۤ اَوَّلَ الْمُؤْمِنِيْنَ ﴿۵۱﴾

५२. आणि आम्ही मूसावर वह्य केले की माझ्या दासांना घेऊन रात्री निघा. तुमचा पाठलाग केला जाईल. [४९]

وَاَوْحَيْنَاۤ اِلٰى مُوْسٰۤى اَنْ اَسْرِ بِعِبَادِيْۤ اِنَّكُمْ مُّتَّبَعُوْنَ ﴿۵۲﴾

५३. यावर फिरऔनने शहरोशहरी हरकारे (दवंडी देणारे) पाठविले.

فَاَرْسَلَ فِرْعَوْنُ فِى الْمَدَاۤئِنِ حٰشِرِيْنَ ﴿۵۳﴾

५४. की ही मूठभर माणसे आहेत. [५०]

اِنَّ هٰۤؤُلَاۤءِ لَشِرْذِمَةٌ قَلِيْلُوْنَ ﴿۵۴﴾

५५. आणि आम्हाला क्रोधित करीत आहेत.

وَاِنَّهُمْ لَنَا لَغَاۤئِظُوْنَ ﴿۵۵﴾

५६. आणि आम्ही एक चौकस राहणारी जमात आहोत. [५१]

وَاِنَّا لَجَمِيْعٌ حٰذِرُوْنَ ﴿۵۶﴾

५७. शेवटी आम्ही त्यांना बागा व झऱ्यांमधून बाहेर काढले.

فَاَخْرَجْنٰهُمْ مِّنْ جَنّٰتٍ وَّعُيُوْنٍ ﴿۵۷﴾

५८. आणि खजीने व उत्कृष्ट स्थानांमधून. [५२]

وَّكُنُوْزٍ وَّمَقَامٍ كَرِيْمٍ ﴿۵۸﴾

५९. (त्यांच्याशी) असेच केले आणि बनी इस्राईलला आम्ही या (ईश-देणग्यां) चे वारसदार बनविले. [५३]

كَذٰلِكَ ؕ وَاَوْرَثْنٰهَا بَنِىْۤ اِسْرَاۤءِيْلَ ﴿۵۹﴾

६०. त्यांनी सकाळ होताच त्यांचा (बनी इस्राईलचा) पाठलाग केला. [५४]

فَاَتْبَعُوْهُمْ مُّشْرِقِيْنَ ﴿۶۰﴾

६१. जेव्हा दोन्ही गट समोरासमोर आले तेव्हा मूसाचे साथीदार उद्गारले, आम्ही तर तावडीत सापडलो !

فَلَمَّا تَرَآءَ الْجَمْعٰنِ قَالَ اَصْحٰبُ مُوْسٰۤى اِنَّا لَمُدْرَكُوْنَ ﴿۶۱﴾

४८. हजरत मूसा व फिरऔनच्या दरम्यान दीर्घकाळ पावेतो जो आवाहनात्मक संघर्ष होत राहीला याचा उल्लेख सूरह अअराफ मध्ये केला गेला आहे. या ठिकाणी प्रारंभिक वृत्तांत निवेदन केल्यानंतर फिरऔनच्या परिणतीस निवेदिले गेले आहे. कारण प्रासंगिक दृष्टया इथे ही गोष्ट स्पष्ट करण्याचा हेतु आहे की हटवादी लोक ईश-चमत्काराला डोळ्यांनी पाहून ही ईमान बाळगत नाहीत. त्यांचे डोळे त्याचवेळी उघडतात जेव्हा दुष्परिणतीस पोहचतात.

४९. बनी इस्राईल मिस्र (इजिप्त) देशात जुश्नच्या इलाक्यात राहत होते आणि बायबल वरुन असे दिसून येते की फिरऔनने एका पाठोपाठ अवतरणाऱ्या आपत्तिनी त्रास्त होऊन त्यांना प्रथम तर जाण्याची अनुमती दिली परंतु नंतर त्याला आपली चूक कळून आली म्हणून त्याने आपल्या सैन्यासह त्याचा पाठलाग केला.

इकडे हजरत मूसाच्या आदेशाने बनी इस्राईलने हिजरत (स्थलांतर)ची तयारी केली असेल आणि जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने विशिष्ट रात्री निघून जाण्याचा आदेश दिला तेव्हा बनी इह्राईलचा काफिला हजरत मूसा यांच्या नेतृत्वात निघला.

रात्रीची वेळ निश्चित करण्याचा एक हेतु हा सुद्धा असू शकतो की वाळवंटात प्रवास करण्यासाठी रात्रीची वेळ शांततेची असल्यामुळे अधिक योग्य ठरते.

हजरत मूसा यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने आधीच सावध केले होते की तुमच्या पाठलाग केला जाईल म्हणजे बनी इस्राईल, फिरऔन वाल्यांना पाठलाग करताना पाहून त्रस्त होऊ नका, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या मुक्तिची उपाय योजना करील.

५०. म्हणजे बनी इस्राईल एक अल्पसंख्याक समूह आहे.

५१. फिरऔन ची ही घोषणा सैन्य आणि सरदारांना सगळी कडून जमा करण्याकरिता होता. या साठी की बनी इस्राईलच्या संकटाचा अगदी शेवटचा म्हणून मुकाबला केला जावा. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याच्या या प्रयत्नास त्यांच्याच विरूद्ध उलटविले आणि तो कशा प्रकारे याचा उल्लेख पुढे केला गेला आहे.

५२. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहची उपाय योजना अशी झाली की फिरऔन. त्याचे दरबारी व त्याचे सैन्य आपल्या वैभवाला सोडून केवळ बनी इस्राईलच्या शत्रूत्वात त्यांचा पाठलाग करण्याच्या हेतुने बाहेर निघाले आणि असे निघाले की पुन्हा परतणे त्यांच्या नशीबी आले नाही.

५३. याचा हा अर्थ नव्हे की बनी इस्राईलला (इजिप्त)हून हिजरत केल्यानंतर तहिचे वाळवंट पार करीत त्यांनी पॅलेस्टीनकडे रोख वळविला जे त्याचे मूळ ठिकाण होते, किंबहुना याचा अर्थ असा की ज्या ईश-देणग्या फिरऔनच्या जन समूहास प्रदान केल्या गेल्या होत्या, त्या त्यांच्याकडून हिरावून घेण्यात आल्या आणि ह्या देणग्या (म्हणजे अशाच देणग्या) बनी इस्राईलला प्रदान केल्या गेल्या यास्तव सूरह अअराफ मध्ये निवेदिले गेले आहे.

وَاَوْرَثْنَا الْقَوْمَ الَّذِيْنَ كَانُوْا يُسْتَضْعَفُوْنَ مَشَارِقَ
الْاَرْضِ وَمَغَارِبَهَا الَّتِىْ بٰرَكْنَا فِيْهَا۔ (اعراف۔۱۳۷)

''आणि ज्या जन समूहास कमजोर बनवून ठेवून ठेवले गेले होते आम्ही त्यास या भूभागाच्या पूर्व-पश्चिमेच्या वारसदार बनविले. ज्यात आम्ही समृध्दी राखली होती.'' (अअराफ-१३७)

उघड आहे, या ठिकाणी समृध्दीशील जमीनीशी अभिप्रेत पॅलेस्टीनची भूमी होय. आणि कुरआन हे ही स्पष्ट करतो की जर एकीकडे फिरऔन व त्याच्या लष्कराला पाण्यात बुडविले गेले. तर दुसरीकडे देशावर असा विनाश आणला गेला की उंच उंच इमारती कोसळल्या व त्याची सर्व नागरी प्रगती मातीला मिळाली.

وَدَمَّرْنَا مَا كَانَ يَصْنَعُ فِرْعَوْنُ وَقَوْمُهٗ وَمَا
كَانُوْا يَعْرِشُوْنَ۔ (اعراف۔۱۳۷)

'आणि फिरऔन व त्याच्या जनसमूहाने जे काही बनविले होते आणि ज्या इमारती उभारल्या होत्या त्या सर्व आम्ही भुईसपाट केल्या.' (अअराफ-१३७)

इजिप्तमध्ये हा विध्वंस संभवत:पूर्वा हवेच्या जोरामुळे आला होता. अल्लाह सर्वज्ञ.

५४. म्हणजे जेव्हा बनी इस्राईल मिस्रहून निघाले तेव्हा फिरऔनने आपल्या लष्करासह त्यांच्या पाठलाग केला.

६२. मूसा म्हणाला, मुळीच नाही ! माझ्या सोबत माझा पालनकर्ता आहे. तो मला मार्ग दाखविल.[५५]

قَالَ كَلَّآ ۖ إِنَّ مَعِىَ رَبِّى سَيَهْدِينِ ﴿٦٢﴾

६३. या वेळी आम्ही मूसावर 'वह्य' पाठविली की आपली काठी समुद्रावर मारा. तेव्हा समुद्र फाटला व प्रत्येक हिस्सा महापर्वतासारखा बनला.[५६]

فَأَوْحَيْنَآ إِلَىٰ مُوسَىٰٓ أَنِ ٱضْرِب بِّعَصَاكَ ٱلْبَحْرَ ۖ
فَٱنفَلَقَ فَكَانَ كُلُّ فِرْقٍ كَٱلطَّوْدِ ٱلْعَظِيمِ ﴿٦٣﴾

६४. तिथे आम्ही दुसऱ्या गटाला ही जवळ आणले.[५७]

وَأَزْلَفْنَا ثَمَّ ٱلْءَاخَرِينَ ﴿٦٤﴾

६५. आणि मूसा व त्या सर्वांना जे त्यांच्या सोबत होते आम्ही वाचविले.[५८]

وَأَنجَيْنَا مُوسَىٰ وَمَن مَّعَهُۥٓ أَجْمَعِينَ ﴿٦٥﴾

६६. मग इतरांना बुडवून टाकले.[५९]

ثُمَّ أَغْرَقْنَا ٱلْءَاخَرِينَ ﴿٦٦﴾

६७. नि:संशय यात फार मोठी निशाणी आहे[६०] परंतु त्या लोकांपैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.[६१]

إِنَّ فِى ذَٰلِكَ لَءَايَةً ۖ وَمَا كَانَ أَكْثَرُهُم مُّؤْمِنِينَ ﴿٦٧﴾

६८. आणि नि:संशय तुमचा पालनकर्ता प्रभावशालीही आहे व दयाळू देखील.[६२]

وَإِنَّ رَبَّكَ لَهُوَ ٱلْعَزِيزُ ٱلرَّحِيمُ ﴿٦٨﴾

६९. आणि यांना इब्राहीम चा वृत्तांत ऐकवा.[६३]

وَٱتْلُ عَلَيْهِمْ نَبَأَ إِبْرَٰهِيمَ ﴿٦٩﴾

७०. जेव्हा तो आपल्या पित्यास व आपल्या जन-समूहास म्हणाला, तुम्ही या कसल्या वस्तूंची पूजा करता ![६४]

إِذْ قَالَ لِأَبِيهِ وَقَوْمِهِۦ مَا تَعْبُدُونَ ﴿٧٠﴾

७१. ते म्हणाले, आम्ही मूर्तींची पूजा करतो आणि त्यांचीच पूजा करण्यावर आम्ही अटळ राहू.

قَالُوا۟ نَعْبُدُ أَصْنَامًا فَنَظَلُّ لَهَا عَٰكِفِينَ ﴿٧١﴾

७२. त्याने विचारले, काय हे तुमचे ऐकतात जेव्हा तुम्ही यांना पुकारता?

قَالَ هَلْ يَسْمَعُونَكُمْ إِذْ تَدْعُونَ ﴿٧٢﴾

७३. किंवा तुम्हाला नफा किंवा नुकसान पोहचवितात?

أَوْ يَنفَعُونَكُمْ أَوْ يَضُرُّونَ ﴿٧٣﴾

५५. या नाजुक प्रसंगी खरे पाहाता अल्लाहवरील भरवशाची परीक्षा होती. हजरत मूसा यांनी बनी इस्राईलच्या घाबरगुंडीस दूर करण्याकरीता जे सांगितले त्यावरून त्यांचा अल्लाहवरील भरवसा केवढा कमालीचा होता हे दिसून येते.

५६. समुद्राचे अशा प्रकारे फाटणे की पाण्याचे दोन हिस्से पर्वता समान उभे रहावेत व मध्यभागी कोरडा मार्ग तयार व्हावा जसे सूरह ताहा आयत क्र. ७७ मध्ये निवेदिले गेले आहे. अगदी उघड असा ईश-चमत्कार (अल्लाहतर्फे जाहीर होणारी असामान्य निशाणी) होता. हा चमत्कार कुरआनच्या निवेदना नुसार हजरत मूसा यांनी समुद्रावर काठी मारण्याच्या परिणामी घडून आला होता. म्हणून स्पष्टीकरणाला काही ही वाय नाही आणि ना असे समजणे योग्य आहे की वादळी हवेच्या परिणामी समुद्राचे पाणी फाटले होते कारण असे कधीच होत नाही की वादळी वारे समुद्राच्या पाण्यास फाडून मध्यभागी कोरड़ा मार्ग बनवतील तसेच हा प्रश्नही उद्‌भवतो की जर वादळी वारे एवढ्या जोरात वाहत होते की त्यांनी समुद्राच्या पाण्याला धक्का देऊन भींत उभी केली तर बनी इस्राईल करीता या भयंकर वादळी वाऱ्यातून सही सलामत निघून जाणे कसे शक्य होते. एवढ्या महाभयंकर वादळाने त्यांचा जीवच घेतला असता. परंतु असे कोणते कारण आहे की यांच्यापैकी कोणीही त्याला बळी पडला नाही. हे नवल नव्हे की त्या वेळी पूरवा' हवा वाहत असावी जसे बायबलचे निवेदन आहे. परंतु समुद्र फाटण्यास वादळ वाऱ्यास कारणीभूत ठरविणे उचित नव्हे. कुरआन या घटनेस एक ईश-चमत्कार म्हणून सादर करीत आहे, संयोगवश घडणारी घटना म्हणून किंवा नेहमी प्रमाणे घडणारी घटना म्हणून नव्हे.

५७. म्हणजे फिरऔन वाल्यांना तेथे पोहचविले.

५८. म्हणजे हजरत मूसा यांच्या नेतृत्वात जो काफीला चालत होता, तो सलामती पूर्वक समुद्र ओलाडून गेला ना त्यांना कसलेही नुकसान पोहचले आणि ना फिरऔन व त्याच्या लष्कर त्यांना पकडण्यात यशस्वी झाले.

५९. परंतु दुसरा गट म्हणजे फिरऔन व त्याच्या लष्करा सोबत सर्वश्रेष्ठ अल्लाहचा मामला असा झाला की जेव्हा मार्ग मोकळा पाहून ते समुद्राच्या मध्य भागी पोहचले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या आदेशाने समुद्राचे दोन्ही भाग परस्परांना मिळाले परिणामी फिरऔन तर बुडून मेलाच, त्याचे सैन्यही बुडून मेले ज्यात त्याच्या साम्राज्याचे सरदार उमराव देखील होते. ही परिणती झाली त्या माणसाची जो ईश्वर होण्याचा दावा करीत होता आणि ही परिणती झाली त्या लोकांची जे त्याच्या आदेश व संकेता नुसार चालत होते.

६०. म्हणजे पैगंबरीय इतिहासाच्या या घटनेत या गोष्टीचे स्पष्ट चिन्ह आहे की अल्लाह लोकांना सत्य-मार्ग दाखविण्यासाठी पैगंबर पाठवितो आणि जेव्हा त्याचा जन-समूह त्याच्या वर ईमान बाळग्ण्यास इन्कार करतो व त्याच्या विरूद्ध हिंसाचाराची मजल गाठतो तेव्हा त्या जन-समूहास सर्वश्रेष्ठ अल्लाह चांगला धडा शिकविणारी शिक्षा देतो.

फिरऔन व त्याच्या सैन्याचे पाण्यात बुडून मरणे आणि हजरत मूसा, हजरत हारून व बनी इस्राईल अत्याचारी जन-समूहापासून सुटका व त्यांचे असाधारण पणे समुद्रास ओलांडून जाणे एक इन्कार न करण्याजोगी ऐतिहासिक घटना आहे जी तौरात (बायबल) ने ही सिद्ध आहे व कुरआन द्वारे ही तात्पर्य जगातील बहुतेक (यहूदी, ख्रिश्चन व मुस्लिम) या बाबत सहमत आहेत. मग काय ईमान बाळगण्या करीता एवढी मोठी साक्ष देखील पुरेशी नाही?

६१. स्पष्टीकरणसाठी पहा टीप क्र.८

६२. स्पष्टीकरणसाठी पहा टीप क्र.९

वरील आयतीत व या आयतीत जो मजकूर निवेदिला गेला आहे याची पुढे देखील प्रत्येक घटनेच्या समारोपावर पुनरावृत्ती केली गेली आहे. यासाठी की गाफील माणसाने सावध व्हावे.

६३. या ठिकाणी हजरत इब्राहीम यांचा तो वृत्तांत सादर केला जात आहे जो त्यांच्या आवाहनाशी संबधित आहे आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की मूर्तिपूजा व शिर्क अशी भयंकर मार्गभ्रष्टता आहे, ज्यापासून ईश्वराच्या दासांना मुक्ति देण्याकरीता हजरत इब्राहीम यांच्यासारखा प्रतिष्ठित पैगंबर उठून उभा राहीला. यास्तव आज कुरआनाचा पैगंबर या उद्दिष्टाकरिता उठून उभा राहीला आहे तर ही काही नवलाची गोष्ट नव्हे, किंबहुना पैगंबरीय आवाहनाची ही विशेषता होय. पैगंबर सर्वात आधी मार्गभ्रष्टतेची नोटीस घेतात आणि सर्व सामर्थ्यानिशी तिचे खंडन करीत एकेश्वर वादास सादर करतात.

६४. आवाहनाची एक बुद्धिकौशल्य मुक्त शैली अशी की अशा प्रकारचे प्रश्न उद्‌भविले जावे. दुसरी गोष्ट ही देखील स्पष्ट झाली की जर मुलगा ईमान बाळगणारा व पिता अनेकेश्वरवादी आहे तर मुलाने आपल्या पित्यासमोर एकेश्वर वादाचे प्रमाण प्रस्तुत केले पाहीजे. हजरत इब्राहीम यांची हीच पद्धति होय.

७४. त्यांनी उत्तर दिले, नाही, किंबहुना आम्हाला आमचे वाडवडील असेच करतांना आढळून आलेत.[६५]

قَالُوا بَلْ وَجَدْنَا آبَاءَنَا كَذَٰلِكَ يَفْعَلُونَ ﴿٧٤﴾

७५. तो म्हणाला, तुम्ही या (मूर्ती) ना पाहीले ज्यांची तुम्ही पूजा करीत राहीलात ?[६६]

قَالَ أَفَرَأَيْتُم مَّا كُنتُمْ تَعْبُدُونَ ﴿٧٥﴾

७६. तुम्ही व तुमचे वाडवडील.

أَنتُمْ وَآبَاؤُكُمُ الْأَقْدَمُونَ ﴿٧٦﴾

७७. सर्व विश्वांच्या स्वामी (रब्ब) खेरीज हे सर्व माझे वैरी आहेत.[६७]

فَإِنَّهُمْ عَدُوٌّ لِّي إِلَّا رَبَّ الْعَالَمِينَ ﴿٧٧﴾

७८. ज्याने मला निर्माण केले आणि जो मला मार्गदर्शन करतो.[६८]

الَّذِي خَلَقَنِي فَهُوَ يَهْدِينِ ﴿٧٨﴾

७९. जो मला खाऊ-पिऊ घालतो.

وَالَّذِي هُوَ يُطْعِمُنِي وَيَسْقِينِ ﴿٧٩﴾

८०. आणि जेव्हा मी आजारी पडतो[६९] तेव्हा तो मला बरे करतो.[७०]

وَإِذَا مَرِضْتُ فَهُوَ يَشْفِينِ ﴿٨٠﴾

८१. जो मला मरण देईल आणि पुनश्च मला जिवंत करील.[७१]

وَالَّذِي يُمِيتُنِي ثُمَّ يُحْيِينِ ﴿٨١﴾

८२. आणि ज्याच्या कडून मी आशा बाळगतो की मोबदल्याच्या दिवशी तो माझ्या गुन्हाग्यांना माफ करील.[७२]

وَالَّذِي أَطْمَعُ أَن يَغْفِرَ لِي خَطِيئَتِي يَوْمَ الدِّينِ ﴿٨٢﴾

८३. हे माझ्या पालनकर्त्या,[७३] मला हिकमत (बुद्धिकौशल्य) प्रदान कर.[७४] आणि मला सदाचारी लोकांमध्ये सामील कर.[७५]

رَبِّ هَبْ لِي حُكْمًا وَأَلْحِقْنِي بِالصَّالِحِينَ ﴿٨٣﴾

८४. आणि नंतरच्या लोकांमध्ये माझ्यासाठी सत्याचा बोल राख.[७६]

وَاجْعَل لِّي لِسَانَ صِدْقٍ فِي الْآخِرِينَ ﴿٨٤﴾

६५. मूर्तिपूजकांची ही स्विकृति की मूर्ति ना ऐकतात आणि ना नफा व नुकसान पोहचविण्याचे सामर्थ्य बाळगतात. मूर्तिपूजा अवास्तव व अयोग्य असण्याचे हे स्पष्ट प्रमाण होय. परंतु या अयोग्यतेस त्यांनी केवळ या आधारावर योग्य ठरविले की वाडवडीलांपासून यांची पूजा-अर्चना होत आली आहे म्हणजे आम्ही आपल्या वाडवडीलांच्या धर्मास व आपल्या जनसमूहाच्या संस्कृतिस कशा प्रकारे सोडू शकतो?

६६. म्हणजे वाडवडीलांच्या अंधानुकरणाचा अर्थ विचार चिंतनाच्या पात्रतेस बडतर्फे करणे. या स्थितीत हा प्रश्न उद्‌भवतो की मग विचार चिंतनाची ही पात्रता माणसाला कोणी प्रदान केली आहे. जर अशासाठी प्रदान केली गेली आहे की तिचा वापर करून माणसाने चांगले की वाईट, योग्य व अयोग्य यात फरक करावा तर उपासना व आराधना सारख्या महत्वपूर्ण मामल्यात माणूस आंधळा का बनतो? तो या गोष्टीवर विचार का करीत नाही की जो व्यवहार समस्त विश्वाच्या स्वामींशी केला जाऊ शकतो तो दगड वीटांशी करण्यात काय हंशील?

स्पष्ट असावे की मूर्तिपूजक आपल्या देवी-देवताविषयी भ्रमाच्या आधारावर अशी श्रद्धा बाळगतात की ते यांना नफा वा नुकसान पोहचवू शकतात, परंतु मूर्तिबाबत ते हा खोटा दावा करण्याचे ही दु:साहस करू शकत नाही कारण मूर्तिच्या अगतिकतेचे अवलोकन प्रत्येक मनुष्य करतो. वस्तुत: देवा-देवतांचे अस्तित्व केवळ काल्पनिक आहे म्हणून यांच्यात ईश्वरीय गुणधर्म येण्याचा दावा करणे अशा लोकांकरीता सोपे झाले आहे जे निराधार गोष्टींवर धर्माचा डोलारा उभा करू इच्छितात.

६७. म्हणजे मूर्तींना मी आपला शत्रू समजतो. अर्थात मूर्तींना उपास्य बनविण्याचा परिणाम जहन्नम आहे म्हणून त्यांना आपला वैरी समजून त्यांच्यापासून दूर राहण्यातच भलाई आहे.

६८. म्हणजे जो माझा निर्माता आहे, तो माझा मार्गदर्शकही आहे. म्हणून हे कसे शक्य आहे की ईश्वर व धर्म-संदर्भात तो प्रकाश ग्रहण न करावा जो तो दाखवित आहे आणि भ्रमारण्यात भटकत फिरावे?

६९. ही गोष्ट अशा प्रकारेही सांगितली जाऊ शकत होती, तोच मला आजारी पाडतो, परंतु यात सर्वश्रेष्ठ अल्लाहकरीता आदराचा पैलू होता म्हणून हजरत इब्राहीम यांनी फर्माविले, 'जेव्हा मी आजारी पडतो' यावरून त्यांचा अल्लाह विषयीचा कमालीचा आदर व्यक्त होतो. अर्थात पैगंबर-गण सर्वश्रेष्ठ अल्लाहकरीता अत्याधिक आदराची कांस बाळगतात आणि त्यांच्या मुखातून जी वचने बाहेर पडतात ती हिरकणी समान असतात.

७०. रुग्णाला बरे करणे हे अल्लाहचे काम होय. ही गोष्ट अनेकेश्वर वाद्यांना समजावयाची होती, परंतु आजच्या काळातील मुसलमानांनाही समजावणे भाग पडत आहे कारण आजारातून बरे होण्याकरिता ते दरग्यांना हजेरी देत राहतात. केवळ असेच मुसलमान यापासून सुरक्षित आहेत जे अल्लाहप्रणित सुबुद्धीने उचित श्रद्धा बाळगतात.

७१. हा एकेश्वरवादासह कियामतीचा उल्लेख व त्यावर ईमान बाळगण्याची अभिव्यक्ति आहे. हजरत इब्राहीम यांचे आवाहन जे त्यांनी आपला पिता व आपल्या जनसमूहासमोर मांडले होते कुरआनात अनेक ठिकाणी निवेदिले गेले आहे. ज्यावरून हे स्पष्ट होते की त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगी विविध शैलीने आवाहन प्रस्तुत केले. या ठिकाणी त्यांनी आपली श्रद्धा व ईमान व्यक्त केले आहे की मी कोणाला 'रब' मानतो व त्याची कशी शान व कसकशी गुणवैशिष्ठ्ये आहेत. आवाहनाचा हा पैलू मानसिक प्रभाव बाळगत होता व प्रत्येकास हा विचार करण्यास प्रवृत्त करणारा होता की त्याने आपल्या श्रद्धेला पडताळून पहावे.

७२. या ठिकाणी ही चर्चा व्यर्थ होय की हजरत इब्राहीम यांच्या हातून कोणती चूक घडली होती. संभवत: प्रेषित्वापूर्वीची चूक अभिप्रेत असावी. असो, दासाचे काम स्वत:ला अपराधी समजून ईश्वराशी क्षमा-याचना करणे होय, कारण काही वेळा चुका न कळत घडतात आणि पैगंबरांमध्ये तर ही जाणीव मोठ्या प्रखरतेने असते,म्हणून ते सर्वश्रेष्ठ अल्लाहशी माफी मागतात. हदीस-वचनातील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) दिवसातून सत्तर वेळाहून अधिक वेळा क्षमायाचना करीत. आणि याच जाणीवेची अभिव्यक्ति हजरत इब्राहीम यांच्या निवेदनावरून होते.

७३. उपरोक्त आयतीत हजरत इब्राहीम यांचे ते कथन संपले जे त्यांनी आपले पिता व आपल्या जन-समूहाशी संबोधित होऊन फर्माविले होते येथे त्यांची ती दुआ सादर केली जात आहे, जी याच वातावरणात त्यांनी केली होती.

७४. म्हणजे योग्य समज प्रदान करून व वस्तुस्थितीस समजून उचित दिशा पत्करू शकावे व लोकांसमोर बुद्धिकौशल्ययुक्त गोष्टी सादर करू शकावे.

७५. सदाचारी बनणे अल्लाहच्याच प्रदान केलेल्या सुबुद्धिवर अवलंबून आहे. म्हणून एक नबी देखील अल्लाहकडून सुबुद्धिची याचना करतो आणि सदाचारींच्या मेळाव्यात सामील, करण्याची प्रार्थाना करतो.

७६. अभिप्रेत ऐहीक, प्रसिद्धी नव्हे. किंबहुना तो मांगल्यापूर्ण उल्लेख होय जो सच्चे प्रेम व निष्ठेच्या आधारावर जीभांवर जारी रहावा. सत्याचा बोल हा शब्द मोठा आर्थपूर्ण आहे. व विशेषत्वाने या आशायावर युक्तिवाद करतो की माझ्या प्रेषित्वलाभाने नंतरच्या 'पिढ्यांनीही' लाभान्वित व्हावे. आणि माझ्या हक्कात

प्रत्येक दिशेने सत्यतेचा ध्वनी उंच व्हावा. त्यांच्या प्रार्थनेस सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशा प्रकारे कबूल केले की प्रत्येक काळात ईमान बाळगणारे त्यांना श्रद्धांजली अर्पण करतात. येथपावेतो की अंतिम उम्मत (जन समूह) च्या नमाजीमध्ये त्यांच्या शुभ-उल्लेखाने जागा घेतली. यास्तव जेथे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर दरूद पाठविले. जाते तेथे

كَمَا صَلَّيْتَ عَلٰى اِبْرَاهِيْمَ وَعَلٰى آلِ اِبْرَاهِيْمَ

'ज्या प्रकारे तू ने इब्राहीमवर व त्यांच्या वंशावर दरूद पाठविले' हे प्रार्थनामय शब्द ही अदा केले जातात आणि हज्ज व कुर्बानीच्या प्रसंगी असा कोण आहे जो या सत्यानुसरणी व अल्लाहच्या एकनिष्ठ पैगंबरास श्रद्धेचा नजराणा अपर्ण करीत नसेल ! سلامٌ عَلٰى اِبْرَاهِيْم

'सलाम असो इब्राहीमवर'.

**आणि मला ईश देणग्यांनी युक्त अशा जन्नतच्या वारसदारांमध्ये सामील कर. आणि माझ्या पित्याला माफ कर की तो मार्गभ्रष्ट झालेल्यांपैकी आहे. आणि मला त्या दिवशी अपमानित करू नकोस, ज्या दिवशी लोकांना (मरणोत्तर) उठविले जाईल. (अल-क़ुर्आन)**

८५. आणि मला ईश देणग्यांनी युक्त अशा जन्मतच्या वारसदारांमध्ये सामील कर. [७७]

وَاجْعَلْنِي مِنْ وَرَثَةِ جَنَّةِ النَّعِيمِ ﴿٨٥﴾

८६. आणि माझ्या पित्याला माफ कर की तो मार्गभ्रष्ट झालेल्यांपैकी आहे.[७८]

وَاغْفِرْ لِأَبِي إِنَّهُ كَانَ مِنَ الضَّالِّينَ ﴿٨٦﴾

८७. आणि मला त्या दिवशी अपमानित करू नकोस, ज्या दिवशी लोकांना (मरणोत्तर) उठविले जाईल.

وَلَا تُخْزِنِي يَوْمَ يُبْعَثُونَ ﴿٨٧﴾

८८. ज्या दिवशी [७९] ना सम्पत्ति लाभप्रद ठरेल ना संतती.

يَوْمَ لَا يَنْفَعُ مَالٌ وَلَا بَنُونَ ﴿٨٨﴾

८९. केवळ असेच लोक (यशस्वी होतील) जे विवेकशील मनाने [८०] अल्लाह समोर हजर होतील.

إِلَّا مَنْ أَتَى اللَّهَ بِقَلْبٍ سَلِيمٍ ﴿٨٩﴾

९०. आणि जन्नत ईश-भय बाळगणाऱ्यांकरीता जवळ आणली जाईल.[८१]

وَأُزْلِفَتِ الْجَنَّةُ لِلْمُتَّقِينَ ﴿٩٠﴾

९१. आणि जहन्नम मार्गभ्रष्ट झालेल्यांकरीता अनावरीत केली जाईल. [८२]

وَبُرِّزَتِ الْجَحِيمُ لِلْغَاوِينَ ﴿٩١﴾

९२. आणि त्यांना म्हटले जाईल की कोठे आहेत ते ज्यांची तुम्ही पूजा करीत होता?

وَقِيلَ لَهُمْ أَيْنَمَا كُنْتُمْ تَعْبُدُونَ ﴿٩٢﴾

९३. अल्लाहला सोडून अधोमुखी काय ते तुमची मदत करू शकतात कि आपला बचाव करतील?

مِنْ دُونِ اللَّهِ هَلْ يَنْصُرُونَكُمْ أَوْ يَنْتَصِرُونَ ﴿٩٣﴾

९४. मग ते आणि सर्व मार्गभ्रष्ट लोक यात उताणे फेकले जातील.[८३]

فَكُبْكِبُوا فِيهَا هُمْ وَالْغَاوُونَ ﴿٩٤﴾

९५. आणि सैतानाचे सर्व सैन्य ही.[८४]

وَجُنُودُ إِبْلِيسَ أَجْمَعُونَ ﴿٩٥﴾

९६. त्या ठिकाणी ते आपसात झगडत म्हणतील.

قَالُوا وَهُمْ فِيهَا يَخْتَصِمُونَ ﴿٩٦﴾

७७. तातपर्य, जन्नत प्राप्त होण्याची प्रार्थना करणे पैगंबरीय पद्धत होय आणि जन्नतपासून नि:स्पृह होऊन सत्कर्म करण्याचा दृष्टीकोन सूफी संताच्या कल्पनेची भरारी होय.

७८. हजरत इब्राहीम यांची आपल्या अनेकेश्वरवादी पित्यासाठी प्रार्थना त्या वेळची गोष्ट होय. जेव्हा यासंबंधी मनाई नव्हती. विवरणासाठी पहा सूरह तौबा टीप क्र. २१०.

७९. हजरत इब्राहीमची दुआ वरील आयतीवर संपली, आता सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे मोबदल्याच्या दिवसा विषयी अधिक स्पष्टीकरण आहे. यासाठी की प्रसंगानुरूप उल्लेख व्हावा.

८०. विवेकशील हृदयाशी अभिप्रेत, जसे संदर्भावरून स्पष्ट आहे, असे हृदय होय जे शिर्क पासून अलिप्त असावे एकेश्वरवादाची श्रद्धा त्यात अशी ओतप्रोत असावी, की ईमानाची कैफियत जागृत व्हावी ज्यामुळे चारित्र्यात चांगुलपणा यावा. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे हृदय जे प्रत्येक प्रकारच्या आंतरिक व्याधी व अपराधांपासून अलिप्त असावे व ज्याचे ईश-भय त्याच्या प्रकृतिस कारक ठरावे व कृतीशील जीवनास सुशोभित करावे.

८१. म्हणजे कियामतीच्या दिवशी जन्नत ईश भय बाळगणाऱ्यांच्या स्वगताकरीता हजर असेल. हश्रच्या मैदानापासून जन्नत पर्यंत पोहचण्याकरीता काहीच वेळ लागणार नाही. इकडे निर्णय झाला व तिकडे जन्नतमध्ये पोहचले.

८२. जहन्नम आज दृष्टीआड आहे. परंतु कियामतीच्या दिवशी मार्गभ्रष्ट लोक हशरच्या मैदानात तिला आपल्या समोर अगदी उघड पाहतील.

८३. मूर्तिपूजकांसोबत त्यांचे दैवत असणाऱ्या मूर्त्यांही जहन्नममध्ये फेकल्या जातील त्यावेळी मूर्तिची अगतिकता त्यांच्या पूजकांवर अगदी स्पष्ट होईल की आपल्या पूजकांची मदत कसली करतील, उलट स्वत:चाही बचाव करू शकणार नाहीत. आणि हीच गत फिरऔन सारख्या बंडखोर नेत्याची ही होईल जे जगात ईश्वर बनून बसले होते की ते आपल्या भक्त-जनांची मदत काय करणार, स्वत:लाच जहन्नम पासून वाचवू शकणार नाहीत.

८४. अभिप्रेत सैतान समूह होय जो लोकांना पदभ्रष्ट करतो.

९७. अल्लाह शपथ ! आम्ही उघड मार्ग भ्रष्टतेत होतो. [८५]

تَاللّٰهِ اِنۡ كُنَّا لَفِىۡ ضَلٰلٍ مُّبِيۡنٍۙ ﴿٩٧﴾

९८. जेव्हा तुम्हाला सर्व विश्वांच्या पालन कर्त्या समान ठरवित होतो.

اِذۡ نُسَوِّيۡكُمۡ بِرَبِّ الۡعٰلَمِيۡنَ ﴿٩٨﴾

९९. आणि अपराध्यांनीच [८६] आम्हाला मार्गभ्रष्ट केले होते.

وَمَاۤ اَضَلَّنَاۤ اِلَّا الۡمُجۡرِمُوۡنَ ﴿٩٩﴾

१००. आता आमची शिफारस करणारा कोणी ही नाही.

فَمَا لَـنَا مِنۡ شَافِعِيۡنَۙ ﴿١٠٠﴾

१०१. आणि ना कोणी जीवलग मित्र आहे.[८७]

وَلَا صَدِيۡقٍ حَمِيۡمٍ ﴿١٠١﴾

१०२. जर आम्हाला आणखी एकदा परतण्याचा अवसर लाभला तर आम्ही मोमीन (ईमान बाळगणारे) होऊ. [८८]

فَلَوۡ اَنَّ لَـنَا كَرَّةً فَنَكُوۡنَ مِنَ الۡمُؤۡمِنِيۡنَ ﴿١٠٢﴾

१०३. निःसंशय यात मोठी निशाणी आहे.[८९] परंतु यांच्यापैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.[९०]

اِنَّ فِىۡ ذٰلِكَ لَاٰيَةً ؕ وَمَا كَانَ اَكۡثَرُهُمۡ مُّؤۡمِنِيۡنَ ﴿١٠٣﴾

१०४. आणि निःसंशय,तुमचा पालनकर्ता प्रभावशालीही आहे व दयाळू देखील.[९१]

وَاِنَّ رَبَّكَ لَهُوَ الۡعَزِيۡزُ الرَّحِيۡمُ ﴿١٠٤﴾

१०५. नूह [९२] च्या जन-समूहाने पैगंबरांना खोटे ठरविले.[९३]

كَذَّبَتۡ قَوۡمُ نُوۡحِ اۨلۡمُرۡسَلِيۡنَ ﴿١٠٥﴾

१०६. जेव्हा त्यांचा भाऊ नूह त्यांना म्हणाला, काय तुम्ही भय बाळगत नाही?

اِذۡ قَالَ لَهُمۡ اَخُوۡهُمۡ نُوۡحٌ اَلَا تَتَّقُوۡنَ ﴿١٠٦﴾

१०७. मी तुमच्याकरीता एक विश्वस्त रसूल आहे.[९६]

اِنِّىۡ لَـكُمۡ رَسُوۡلٌ اَمِيۡنٌۙ ﴿١٠٧﴾

१०८. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.[९७]

فَاتَّقُوا اللّٰهَ وَاَطِيۡعُوۡنِ ﴿١٠٨﴾

८५. अल्लाहची शपथ घेऊन ते आपल्या मार्गभ्रष्टतेची कबूली देतील जणू त्यांना आपल्या मार्गभ्रष्टतेचा विश्वास अशा वेळी आला जेव्हा ते आपल्या परिणतीस पोहचले.

८६. अभिप्रेत मार्गभ्रष्ट नेता, शासक व लीडर होत.

८७. मार्गभ्रष्ट लोकांचे जे जीवलग मित्र जगात राहीले असतील त्यांच्याशी मैत्रीचे कोणतेही नाते आखिरतमध्ये बाकी राहणार नाही. आणि असा कोणीही राहणार नाही जो यांच्या विषयी सहानुभूति दर्शवील किंवा यांचे दु:ख दूर करील.

८८. जगात परतण्याची ते अभिलाषा बाळगतील.यासाठी की ईमान बाळगणारे व्हावे. परंतु त्यांची ही अभिलाषा पूर्ण होऊ शकणार नाही. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ४६ ते ४८

८९. म्हणजे हजरत इब्राहीम यांची जी घटना वर निवेदिली गेली तिच्यात या गोष्टीची स्पष्ट निशाणी आहे की मूर्तिपूजा व शिर्क अगदी चुकीच्या गोष्टी आहेत व एकेश्वरवाद हाच सत्य आहे यास्तव कुरआनाचा पैगंबर जे आवाहन सादर करीत आहे ते नखशिखान्त सत्य आवाहन होय. व हजरत इब्राहीम यांच्या आवाहनापासून कधीही भिन्न नाही.

९०. स्पष्टीकरणा साठी पहा टीप क्र. ८.

९१. स्पष्टीकरणा साठी पहा टीप क्र. ९.

९२. हजरत नूह यांचा वृत्तांत विवरणासह सूरह अअराफ सूरह हूद व सूरह मोमीनून मध्ये केला गेला आहे.

९३. हजरत नूह यांना खोटे ठरविणे हे समस्त प्रेषितांना खोटे ठरविण्या समान होते कारण सर्वांचा धर्म एकच होता आणि सर्वांचे आवाहन देखील एकच.

९४. हजरत नूह यांना त्यांच्या जन-समूहाचे भाऊ या कारणास्तव म्हटले गेले आहे की ते त्याच समाजाचे एक घटक होते. म्हणून ना भाषेचा न समजण्याचा काही प्रश्न होता ना लोकांसाठी त्यांना ओळखणे कठीण होते.

९५. अभिप्रेत अल्लाहचे भय बाळगणे होय.

९६. म्हणजे अल्लाहने संदेश पोहचविण्याची जी अनामत विश्वस्तता माझ्या सूपूर्द केली आहे ती मी पूर्ण जबाबदारीसह अदा करणार आहे. आपल्यातर्फे मी यात ना कमी करणार ना जास्त. म्हणून जे काही मी अल्लाहतर्फे सादर करीत आहे त्यास अमानत समजून कबूल करा.

९७. हीच गोष्ट, पुढील निवेदनानुसार प्रत्येक पैगंबराने आपल्या जन-समूहास सांगितली म्हणून हा वाक्यांश प्रेषितांच्या सामाईकग आवाहनाचे प्रतिनिधित्व करतो. या द्वारे आवाहनाच्या काही महत्वपूर्ण पैलूंवर प्रकाश पडतो.

१) अल्लाहचे भय जे त्याच्या महानतेच्या कल्पनेने निर्माण होते. धर्मा करीता आधारभूत आहे, म्हणून उघड शब्दात अल्लाहचे भय बाळगण्याविषयी व ईश-भय अंगिकारण्या विषयी आवाहन केले पाहीजे आणि ही वस्तुस्थिती आहे की जो पावेतो माणसाला त्याच्या चुकीच्या वर्तनाबद्दल सावध केले जात नाही व उद्भवणाऱ्या धोक्यांपासून सचेत केले जात नाही तोपर्यंत आपली सुधारणा करून घेण्यास तो तयार होत नाही. याच कारणास्तव एखादा पैगंबर जेव्हा आवाहनासह उठून उभा राहतो. तेव्हा तो अल्लाह पासून गाफील असलेल्या लोकांना सचेत करतो. त्याच्या अजाब (शिक्षे) चे भय दर्शवितो व त्या समस्त धोक्यांपासून सावध करतो जे अखिरतमध्ये उद्भवणार आहेत. खबरदार करण्याचा हा रंग त्याच्या आवाहनावर प्रभावशाली ठरतो.

२) अल्लाहचा तकवा (अल्लाहचे भय) अंगिकाराच्या आवाहनात अल्लाहची उपासना व त्याचे आज्ञापालन या दोन्ही गोष्टी सामील आहेत कारण तकवा म्हणजे अल्लाहचे भय बाळगून त्याने दर्शविलेल्या गुन्ह्यांपासून स्वत:ला वाचविणे व ईश भयाचे आचरण अंगिकारणे होय. जो मनुष्य अल्लाहची उपासना एकाग्रचित्ताने करीत नाही तो ईश-भयापासून अर्थात तकवाच्या वैशिष्ट्यांपासून दूर आहे आणि जो मनुष्य त्याचे आज्ञापालन करीत नाही. अपराधांवर अपराध करत जात आहे म्हणून तो 'तकवा' पासून वंचित आहे. त्याची गणना मुत्तकी (ईश-भयाचे आचरण करणाऱ्या) लोकांमध्ये होऊ शकत नाही.

आयतीद्वारे हे ही स्पष्ट झाले की पैगंबरांचे आवाहन अल्लाहची उपासना व आज्ञापालन दोन्हींकडे असते. कुरआनात जर एके ठिकाणी त्यांच्या आवाहनास اُعْبُدُوا اللّٰهَ مَا لَكُمْ مِنْ اِلٰهٍ غَيْرُهٗ 'अल्लाहची उपासना करा, तुमच्या करीता त्याच्या खेरीज कोणीही ईश्वर नाही. या शब्दात प्रस्तुत केले गेले आहे, तर दुसऱ्या ठिकाणी त्यांच्या आवाहनाच्या या पैलूस ही व्यक्त केले गेले आहे की, اِتَّقُوا اللّٰهَ 'अल्लाहचे भय बाळगा'. सूरह नूह मध्ये तर हजरत नूह यांच्या आवाहनाचे दोन्ही पैलू, तसेच प्रेषिताच्या आज्ञापालनाचा पैलू देखील एकाचवेळी प्रस्तुत केले गेले आहेत. اَنِ اعْبُدُوا اللّٰهَ وَاتَّقُوْهُ وَاَطِيْعُوْنِ ''अल्लाहची उपासना करा, त्याचे भय बाळगा व माझे आज्ञापालन करा.''

३) अल्लाहची उपासना व आज्ञापालनासोबत आपापल्या काळातील पैगंबर आपल्या आज्ञापालनाची ही अपेक्षा करीत राहीला 'आणि माझे आज्ञापालन करा' हे अशासाठी ही की पैगंबर एवढ्यासाठीच पाठविला जातो की अल्लाहच्या आदेशाने त्याचे आज्ञापालन केले जावे व अशासाठी ही की पैगंबराचे आज्ञापालन अल्लाहच्या आज्ञापालनाचे मूर्त स्वरुप होय. अल्लाहचा आदेश विशिष्ट 'वही' (ईश-आदेश)च्या स्वरुपात असला तरी त्याला कृतीत आणण्यासाठी ज्या विवरणाची गरज

असते त्याला एक पैगंबरच आपल्या कथनाने व आचरणाने स्पष्ट करु शकतो. यास्तव हे समजणे चुकीचे आहे की पैगंबराची पात्रता केवळ संदेश पोहचविणाऱ्याची आहे. किंबहुना तो आचरण विषयक मार्गदर्शनास जबाबदारही आहे आणि लोकांवर त्यांचे अनुसरण व आज्ञापालन बंधनकारक आहे.

ही आहेत पैगंबरीय आवाहनाची वैशिष्ट्ये. परंतु आजच्या काळात ज्या इस्लामी चळवळी सुरु झाल्या आहेत त्या ईश-भय निर्माण करण्याची उपाय योजना एवढी करत नाही. जेवढी इस्लामच्या राजकीय व सामूहीक व्यवस्थेच्या स्पष्टीकरणाची सामुग्री करतात. लोकांमध्ये आखिरत पासून मुक्ति कशी लाभेत याची चिंता निर्माण करण्यापेक्षा जगात सदाचारी समाज प्रस्थापित करण्याची काळजी त्या आधिक निर्माण करतात. अल्लाहखेरीजच्या उपास्यांची पूजा अर्चा करण्याबाबत लोकांना जहन्नमची भिती. ऐकविण्याचा इतमाम तर त्या फारच थोडा बाळगतात. मात्र माणसाला माणसाच्या दास्यत्वातून मुक्त करण्याची घोषणा त्या मोठया उंच स्वराने देतात. परिणामत: आवाहन वेगळ्या दिशेला जाऊन पोहचते व तत्संबंधीचा उत्साह देखील मावळू लागतो.

**मी याबद्दल तुमच्या कडून कोणताही मोबदला मागत नाही माझ्या मोबदल्याची जबाबदारी सर्व विश्वांच्या पालनकर्त्यावर आहे.तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा. (अल-क़ुर्आन)**

१०९. मी याबद्दल तुमच्या कडून कोणताही मोबदला मागत नाही माझ्या मोबदल्याची जबाबदारी सर्व विश्वांच्या पालनकर्त्यावर आहे.[९८]

وَمَآ أَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ إِنْ أَجْرِيَ إِلَّا عَلَىٰ رَبِّ الْعٰلَمِينَ ﴿١٠٩﴾

११०. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.[९९]

فَاتَّقُوا اللّٰهَ وَأَطِيعُونِ ﴿١١٠﴾

१११. ते म्हणाले, काय आम्ही तुम्हाला मानावे जेव्हा तुमचे अनुसरण हलक्या प्रतीच्या लोकांनी पत्करले आहे.[१००]

قَالُوٓا أَنُؤْمِنُ لَكَ وَاتَّبَعَكَ الْأَرْذَلُونَ ﴿١١١﴾

११२. तो म्हणाला, मला काय माहीत ते काय करीत राहीलेत ? [१०१]

قَالَ وَمَا عِلْمِي بِمَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١١٢﴾

११३. त्यांच्या हिशेबाची जबाबदारी माझ्या रब्ब (पालनकर्त्या) वर आहे. कदाचित की तुम्ही समजून घ्याल.

إِنْ حِسَابُهُمْ إِلَّا عَلَىٰ رَبِّي لَوْ تَشْعُرُونَ ﴿١١٣﴾

११४. आणि मी अशा लोकांना झिडकारणारा नाही, ज्यांनी ईमान बाळगले.[१०२]

وَمَآ أَنَا بِطَارِدِ الْمُؤْمِنِينَ ﴿١١٤﴾

११५. मी तर फक्त उघडपणे खबरदार करणारा आहे .

إِنْ أَنَا إِلَّا نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿١١٥﴾

११६. ते म्हणाले, हे नूह ! तुम्ही (हा प्रचार) सोडून दिला नाही तर निश्चितच तुमच्यावर दगडांचा मारा केला जाईल.[१०३]

قَالُوا لَئِن لَّمْ تَنتَهِ يٰنُوحُ لَتَكُونَنَّ مِنَ الْمَرْجُومِينَ ﴿١١٦﴾

११७. त्याने दुआ केली,[१०४] हे माझ्या पालनकर्त्या ! माझ्या जनसमूहाने मला खोटे ठरविले.

قَالَ رَبِّ إِنَّ قَوْمِي كَذَّبُونِ ﴿١١٧﴾

११८. आता तूच माझ्या व त्यांच्या दरम्यान निर्णय लाव [१०५] आणि मला व माझ्या सोबत असलेल्या ईमानधारकांना मुक्ति दे.

فَافْتَحْ بَيْنِي وَبَيْنَهُمْ فَتْحًا وَنَجِّنِي وَمَن مَّعِيَ مِنَ الْمُؤْمِنِينَ ﴿١١٨﴾

९८. एकाद्या पैगंबराचे जीवन तो प्रामाणिक, सच्चा व नि:स्पृह असण्याचे स्पष्ट प्रमाण असते. म्हणून त्याचा हा दावा की माझ्या दृष्टीत तुमच्या भलाई खेरीज आणखी काही ही नाही आणि मी केवळ अल्लाहकडूनच मोबदल्याची अपेक्षा बाळगतो, स्वयंभूत प्रमाण होय.

९९. हजरत नूह यांनी आपल्या आवाहनाची पुनरावृत्ति हे स्पष्ट करण्या करीता केली की माझी मागणी तुमच्या कडून धनसंपत्तिची नाही, तर आवाहनास कबूल करण्याची आहे आणि मी ही सेवा नि:स्पृहतेने पार पाडीत आहे. ज्यात तुमच्यासाठी संशयाला काहीच वाव नाही.

१००. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. ४१.

१०१. म्हणजे मी यांच्या बाह्य आचरणास जाणतो व या दृष्टीने ते अल्लाहचे एकनिष्ठ दास आहेत. राहीलीत यांची गुप्त कर्मे तर याचे ज्ञान अल्लाहलाच आहे. अपरोक्षाच्या या गोष्टी मला काय माहीत. मग मी कोणत्या आधारावर यांना अधम, ठरवू, जेव्हा मला अशी कोणतीही गोष्ट ठाऊक नाही की ज्यामुळे यांना नीच ठरविले जावे. हजरत नूह यांच्या उत्तराने हे स्पष्ट झाले की त्यांच्या साथीदारांवर असभ्य असण्याचा आरोप अगदी खोटा होता.

१०२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ४४.

१०३. जन-समूहाचे दु:साहस पहा की जी व्यक्ति त्यांच्या दरम्यान सर्वाधिक कदर करण्यास पात्र होती व जिने त्याच्या शुभचिंतनात कसलीच कसर ठेवली नव्हती, तिचा आदर सत्कार ते दगडांनी करू इच्छित होते. ज्या लोकांच्या अकलेवर दगड धोंडे पडतात ते अशाच गोष्टी बोलू लागतात.

१०४. ही प्रार्थना हजरत नूह यांनी अशा वेळी केली, जेव्हा प्रदीर्घ आवाहनात्मक प्रयत्नांनंतर त्यांना आपल्या जनसमूहाच्या ईमान बाळगण्याची कसलीच आशा उरली नाही.

१०५. अभिप्रेत स्पष्ट फैसाला होय जो काफीरांसाठी अजाब व ईमान बाळगणाऱ्या साठी मुक्तिच्या स्वरुपात जाहीर होतो.

११९. शेवटी आम्ही त्याला व त्याच्या सोबत असलेल्यांना भरल्या नौकेत मुक्ति दिली.[१०६]

فَأَنجَيْنَٰهُ وَمَن مَّعَهُۥ فِى ٱلْفُلْكِ ٱلْمَشْحُونِ ﴿١١٩﴾

१२०. त्यानंतर इतर लोकांना बुडवून टाकले.[१०७]

ثُمَّ أَغْرَقْنَا بَعْدُ ٱلْبَاقِينَ ﴿١٢٠﴾

१२१. नि:संशय, यात मोठी निशाणी आहे [१०८] परंतु यांच्यापैकी अधिकांश ईमान बाळगत नाहीत.

إِنَّ فِى ذَٰلِكَ لَءَايَةً ۖ وَمَا كَانَ أَكْثَرُهُم مُّؤْمِنِينَ ﴿١٢١﴾

१२२. आणि तुमचा पालन कर्ता प्रभावशाली ही आहे व दयाळू देखील.

وَإِنَّ رَبَّكَ لَهُوَ ٱلْعَزِيزُ ٱلرَّحِيمُ ﴿١٢٢﴾

१२३. आद [१०९] ने पैगंबरांना खोटे ठरविले.

كَذَّبَتْ عَادٌ ٱلْمُرْسَلِينَ ﴿١٢٣﴾

१२४. जेव्हा त्यांचा भाऊ हूद त्यांना म्हणाला, काय तुम्ही भय बाळगत नाही?

إِذْ قَالَ لَهُمْ أَخُوهُمْ هُودٌ أَلَا تَتَّقُونَ ﴿١٢٤﴾

१२५. मी तुमच्या करीता एक अनामतदार पैगंबर आहे.

إِنِّى لَكُمْ رَسُولٌ أَمِينٌ ﴿١٢٥﴾

१२६. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.[११०]

فَٱتَّقُوا۟ ٱللَّهَ وَأَطِيعُونِ ﴿١٢٦﴾

१२७. मी याबद्दल तुमच्या कडून कोणताही मोबदला अपेक्षित नाही; माझा मोबदला तर सर्व विश्वांच्या स्वामीकडे आहे.

وَمَآ أَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ ۖ إِنْ أَجْرِىَ
إِلَّا عَلَىٰ رَبِّ ٱلْعَٰلَمِينَ ﴿١٢٧﴾

१२८. ही काय. गोष्ट की तुम्ही प्रत्येक उंच स्थानावर व्यर्थ स्मारक बांधता ?[१११]

أَتَبْنُونَ بِكُلِّ رِيعٍ ءَايَةً تَعْبَثُونَ ﴿١٢٨﴾

१२९. आणि मोठ मोठे महाल बनविता, जणू तुम्हाला सदैव (येथे) रहायचे आहे.[११२]

وَتَتَّخِذُونَ مَصَانِعَ لَعَلَّكُمْ تَخْلُدُونَ ﴿١٢٩﴾

१३०. आणि जेव्हा तुम्ही (एखाद्याला) पकडीत घेता, तेव्हा मोठ्या सक्तिने पकडता. [११३]

وَإِذَا بَطَشْتُم بَطَشْتُمْ جَبَّارِينَ ﴿١٣٠﴾

१०६. म्हणजे अशी नौका जी ईमान बाळगणाऱ्यांनी व उपयोगी पडणाऱ्या जनावरांनी भरलेली होती.

१०७. नूहच्या जनसमूहाच्या बुडण्याचा किस्सा सूरह हूद आयत क्र. ३७ ते ४४ मधये विवरणासह निवेदिला गेला आहे.

१०८. निशाणी या गोष्टीची की रसूल (पैगंबरा) चा विरोध करणाऱ्या जन समूहावर अल्लाहचा प्रकोप अवतरतो व तो जन समूह अशा प्रकारे नष्ट केला जातो की त्यातला एक ही मनुष्य विनाशापासून वाचत नाही; याऊलट रसूल व त्यांचे ईमान बाळगणारे साथीदार अशा प्रकारे सुरक्षित राहतात की त्यांच्यापैकी एक जण देखील ईश-प्रकोपाच्या तावडीत सापडत नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे या अशा चमत्काराचा उदय, इतिहासाची उघड साक्ष होय.

परंतु आश्चर्याची बाब अशी की इतिहासाच्या त्या स्पष्ट साक्षींना, ज्यांचा कुरआन निर्देश करते. इतिहासाच्या आजच्या पुस्तकांमध्ये शोधावे लागते. कारण इतिहासकारांनी आपल्या विशिष्ट विचारसरणी नुसार यांच्याशी निरसता निर्ममता दर्शविली आहे आणि आमच्या देशात जगाचा जो इतिहास महाविद्यालयांमध्ये शिकविला जातो त्यात जन-समूहांच्या उत्कर्ष व पतनाचा हा महत्वपूर्ण पैलू सुरवातीपासूनच चर्चा विवादा खाली आणला गेला नाही. केवढे हे विचित्र हे इतिहासकार व केवढी विचित्र त्यांची पुस्तके.

१०९. आद जनसमूहाचा किस्सा सूरह अअराफ आयत क्र. ६५ ते ७२, सूरह हूद आयत क्र. ४८ ते ६० मध्ये तपशीलवार निवेदिला गेला आहे. याच्या स्पष्टीकरणात्मक टीपा तसेच सूरह फज्रच्या स्पष्टीकरणात्मक टीपा क्र. ८ ते ११ विचाराधीन असाव्यात.

११०. याचे स्पष्टीकरण वर टीप क्र. ९७ मध्ये केले गेले आहे.

१११. ते डोंगर-पर्वतांवर अशा इमारती बांधत ज्या एखादी योग्य नागरी गरज भागविण्याकरीता नसत, तर त्यांचा उद्देश राष्ट्रीय स्मारकांना प्रस्थापित करण्याचा होता, यासाठी की या स्मारकां विषयी अभिमान बाळगला जावा. भौतिकवादी अशा इमारतींना पाहून बनविणाऱ्या वास्तु कलेचे कौतूक करतात; परंतु इस्लामच्या दृष्टीने हे सर्व व्यर्थ काम होय कारण आपल्या सामर्थ्य व साधनांचा दिखावटी कामांमध्ये वापर केल्याने मनुष्य आपल्या जीवन-ध्येयापासून गाफील होतो आणि आखिरत ऐवजी इहलोकालाच उद्दिष्ट समजतो. यावरुन हे ही स्पष्ट झाले की इस्लाम नागरी जीवनात ही मार्गदर्शन करतो व लोकांना मनासारखे वागण्याची सूट देत नाही.

कुरआनाच्या या ताकीदी नंतर ही, जी त्याने व्यर्थ स्मारक उभारण्याबाबत केली आहे. मुस्लिम शास्क आपले स्मारक उभारण्याची हौस पूर्ण करीत राहीलेत. उदाहरणार्थ दिल्लीचा कुतबमिनार व आग्र्याचा ताजमहाल होय. मुसलमान या स्मारकांना आपले राष्ट्रीय चिन्ह समजतात व त्याबद्दल अभिमान बाळगतात, जेव्हा इस्लामच्या दृष्टीकोनातून हे एक व्यर्थ व उधळपट्टीचे काम होते;जे अभिमानास्पद नव्हे,तर खेद करण्या योग्य होय.आणि याहून जास्त आक्षेपार्ह ते भव्य दरगा,व रोजे आहेत जे बुजुर्गांच्या श्रद्धेपायी उभारले गेले आणि शिर्क व मार्गभ्रष्टतेचे माध्यम ठरले आहेत.

११२. जे लोक जगाला परिक्षा स्थळ नव्हे, किंबहुना विलासभवन समजतात, त्यांच्या हाती जेव्हा सम्पत्ति येते, तेव्हा ते भव्य-वास्तू उभारुन ऐश करु लागतात. याचा एक नमुना प्राचीन काळातील आद जनसमूह होता. कुरआनाच्या या सक्त ताकीदी नंतरही मुसलमान शासकांनी ही आपल्या वैभवाचे व थाटाचे प्रदर्शन करण्याकरिता मोठ मोठे शानदार महाल उभारलेत. गर्नाता (स्पेन) चा अल-हमरा व जन्नतुल अरीफ आणि दिल्लीचा लाल किल्ल्यातील दीवाने खास वगैरे या गोष्टीची बोधकारक उदाहरणे होत. रत्नजडीत दीवाने खास वर तर याला जन्नतचा नमूना बनविण्याचा दावा देखील कोरलेला आहे.

**'अगर फिर्दोस बरूँए जमीं अस्त**
**हमीं अस्त हमीं अस्त हमीं अस्त**

पृथ्वीवर जर कोठे स्वर्ग असेल तर तो याच ठिकाणी आहे. याच टिकाणी आहे. याच ठिकाणी आहे परंतु आता घर शिल्लक आहे मात्र घरमालक नाहीत.

११३. म्हणजे तुमची पकड मोठी अत्याचार पूर्वक असते.समाजातील श्रीमंत वर्ग दीन दुबळ्या वर्गास वाईटरित्या जुलुमाच्या तावडीत घेतो. आयतीचा संकेत संभवत:याच वस्तुस्थितीकडे आहे.

१३१. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा [११४] आणि माझे आज्ञापालन करा.

فَاتَّقُوا اللَّهَ وَأَطِيعُونِ ﴿١٣١﴾

१३२. त्याचे भय बाळगा ज्याने तुमची मदत केली. अशा गोष्टींनी, ज्या तुम्ही (चांगल्या प्रकारे) जाणता.

وَاتَّقُوا الَّذِي أَمَدَّكُم بِمَا تَعْلَمُونَ ﴿١٣٢﴾

१३३. त्याने तुमची मदत केली.चतुष्पाद व संततीद्वारे.

أَمَدَّكُم بِأَنْعَامٍ وَبَنِينَ ﴿١٣٣﴾

१३४. आणि बागा व झंऱ्या द्वारे.[११५]

وَجَنَّاتٍ وَعُيُونٍ ﴿١٣٤﴾

१३५. मला भिती वाटते तुमच्या बाबत, एका अशा दिवसाच्या शिक्षेची जी मोठी सक्त असेल.[११६]

إِنِّي أَخَافُ عَلَيْكُمْ عَذَابَ يَوْمٍ عَظِيمٍ ﴿١٣٥﴾

१३६. ते म्हणाले, आमच्या करीता सारखे आहे, तुम्ही उपदेश करा किंवा करु नका.[११७]

قَالُوا سَوَاءٌ عَلَيْنَا أَوَعَظْتَ أَمْ لَمْ تَكُن مِّنَ الْوَاعِظِينَ ﴿١٣٦﴾

१३७. ही गोष्ट तर वडीलोपार्जित आहे. [११८]

إِنْ هَٰذَا إِلَّا خُلُقُ الْأَوَّلِينَ ﴿١٣٧﴾

१३८. आणि आम्हाला अजाब दिला जाणार नाही.

وَمَا نَحْنُ بِمُعَذَّبِينَ ﴿١٣٨﴾

१३९. तात्पर्य, त्यांनी त्याला खोटे ठरविले तेव्हा आम्ही त्यांना नष्ट केले.[११९] निःसंशय यात मोठी निशाणी आहे.[१२०] परंतु यांच्या पैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.

فَكَذَّبُوهُ فَأَهْلَكْنَاهُمْ ۗ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَةً ۖ وَمَا كَانَ أَكْثَرُهُم مُّؤْمِنِينَ ﴿١٣٩﴾

१४०. आणि निःसंशय तुमचा पालन कर्ता वर्चस्वशाली ही आहे व दयाशील देखील.

وَإِنَّ رَبَّكَ لَهُوَ الْعَزِيزُ الرَّحِيمُ ﴿١٤٠﴾

१४१. समूद [१२१] ने पैगंबरांना खोटे ठरविले.

كَذَّبَتْ ثَمُودُ الْمُرْسَلِينَ ﴿١٤١﴾

१४२. जेव्हा त्यांचा भाऊ सालेह त्यांना म्हणाला, काय तुम्ही (अल्लाहचे) भय बाळगत नाहीं ?

إِذْ قَالَ لَهُمْ أَخُوهُمْ صَالِحٌ أَلَا تَتَّقُونَ ﴿١٤٢﴾

११४. म्हणजे अल्लाहचे भय बाळगा आणि हे चुकीचे काम करु नका.

११५. अर्थात ज्या नैसर्गिक देणग्या तुम्हाला लाभल्या आहेत त्यांचा लाभ घ्या व गर्वोन्मत होऊ नका. ज्याने या देणग्या तुम्हाला प्रदान केल्या आहेत तो त्या हिरावून ही घेऊ शकतो. म्हणून त्याचे भय बाळगा.

११६. सक्त दिवस एकतर तो असेल जेव्हा यांच्यावर इहलोकांतच अल्लाहची शिक्षा अवतरेल व दुसरा कियामतीचा दिवस. दिवस सक्त असणे ईश-शिक्षा सक्त असण्याच्या अर्थाने होय.

११७. यांच्या या उत्तरावरुन स्पष्ट आहे की ते उपदेशाची कोणतीही गोष्ट समजून घेण्यास तयार नव्हते.

११८. म्हणजे उपदेश करणे व ईश शिक्षेचे भय दाखविणे ही पूर्वीच्या लोकांची ही पद्धत होती. पण त्याची वास्तविकता काहीच नाही आणि ना कोणावरही अजाब येत असतो.

११९. आदच्या विनाशाचे विवरण सूरह जारीयात आयत क्र. ४१ आणि सूरह हाका आयत क्र.६ मध्ये निवेदिले गेले आहे.

१२०. स्पष्टीकरणासाठी पहा. टीप क्र. १०८.

१२१. समूद जन समूहाचा वृत्तांत सूरह अअराफ आयत क्र. ७३ ते ७९ सूरह हूद आयत ६१ ते ६८ आणि सूरह हिज्र आयत क्र. ८० ते ८४ मध्ये निवेदिला गेला आहे. यांच्या स्पष्टीकरणात्मक टिपा विचाराधीन असाव्यात, तसेच सूरह फज्र टीप क्र. १२ ते १४ आणि सूरह शम्स टीप क्र. ११ ते १७ देखील.

१४३. मी तुमच्या साठी एक अनामतदार रसूल आहे.

إِنِّي لَكُمْ رَسُولٌ أَمِينٌ ﴿١٤٣﴾

१४४. तेव्हा, अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा. [१२२]

فَاتَّقُوا اللّٰهَ وَأَطِيعُونِ ﴿١٤٤﴾

१४५. मी याबद्दल तुमच्या कडून कसला ही मोबदला मागत नाही. माझा मोबदला तर सर्व विश्वांच्या स्वामीकडे आहे.

وَمَا أَسْأَلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ إِنْ أَجْرِيَ إِلَّا عَلَىٰ رَبِّ الْعٰلَمِينَ ﴿١٤٥﴾

१४६. काय तुम्हाला या (ईश-देणग्यां) मध्ये येथे निर्धास्त पणे सोडून दिले जाईल?[१२३]

أَتُتْرَكُونَ فِي مَا هٰهُنَا آمِنِينَ ﴿١٤٦﴾

१४७. बागांमध्ये व झऱ्यांमध्ये.

فِي جَنّٰتٍ وَعُيُونٍ ﴿١٤٧﴾

१४८. शेत आणि खजुरांच्या बागांमध्ये, ज्यांचे घोस मोठे सुबक असतात. [१२४]

وَزُرُوعٍ وَنَخْلٍ طَلْعُهَا هَضِيمٌ ﴿١٤٨﴾

१४९. आणि पर्वतांना कोरून तुम्ही इमारती बनवित रहाल,यासाठी की, आपल्या कला-नैपुण्यावर गर्व करावा.[१२५]

وَتَنْحِتُونَ مِنَ الْجِبَالِ بُيُوتًا فٰرِهِينَ ﴿١٤٩﴾

१५०. तर अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.

فَاتَّقُوا اللّٰهَ وَأَطِيعُونِ ﴿١٥٠﴾

१५१. आणि मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांचे [१२६] आज्ञापालन करु नका.

وَلَا تُطِيعُوا أَمْرَ الْمُسْرِفِينَ ﴿١٥١﴾

१५२. जे जमीनीवर उत्पात निर्माण करतात व सुधारणा करीत नाही. [१२७]

الَّذِينَ يُفْسِدُونَ فِي الْأَرْضِ وَلَا يُصْلِحُونَ ﴿١٥٢﴾

१५३. ते म्हणाले, तुमच्यावर जादूचा प्रभाव पडला आहे.[१२८]

قَالُوا إِنَّمَا أَنْتَ مِنَ الْمُسَحَّرِينَ ﴿١٥٣﴾

१५४. आणि तुम्ही आमच्या सारखेच मनुष्य आहात, [१२९] जर (आपल्या पैगंबरी दाव्यात) सच्चे असाल तर आणा एखादी निशाणी.

مَا أَنْتَ إِلَّا بَشَرٌ مِثْلُنَا فَأْتِ بِآيَةٍ إِنْ كُنْتَ مِنَ الصّٰدِقِينَ ﴿١٥٤﴾

१२२. याचे स्पष्टीकरण या सूरहच्या टीप क्र. ९७ मध्ये केले गेले आहे.

१२३. म्हणजे तुम्ही काय असे समजून घेतले आहे की ज्या ईश देणग्या तुम्हाला प्रदान केल्या गेल्या आहेत त्या सदैव तुमच्या सोबत राहतील? ना या देणग्या कधी तुमच्या कडून हिरावून घेतल्या जातील आणि ना यांच्याविषयी तुम्हाला काही विचारपूस केली जाईल की तुम्ही यांचा कशा प्रकारे वापर केला व या देणग्यांना प्राप्त करून आपल्या खऱ्या उपकार कर्त्याशी कृतज्ञ राहीले कि कृतघ्न?

१२४. तात्पर्य ज्या इलाक्यात समूद जन समूह वसत होता त्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हिरवेगार बाग, शेते आणि खजूर बाग निर्माण केले होते आणि अरबस्तानच्या वाळंवटी प्रदेशात हा हिरवेगारपणा व टवटवी एक मोठी देणगी होती.

१२५. मूळ ग्रंथात 'फारही' हा शब्द वापरला गेला आहे; ज्याचा अर्थ कला-नैपुण्याचा पुरावा देणे असा ही आहे व गर्व करणे, डींग मारणे असाही आहे. पर्वतांना कोरुन घर बनविणे आपल्या खरोखरीच्या गरजा भागविण्या करीता नव्हे तर आपल्या वास्तु कलेचे प्रदर्शन घडविण्या करीता होते व यासाठी होते की आपल्या पश्चात राष्ट्रीय स्मारक सोडून जावे जेणेकरुन एलोरा व अजंताच्या कोरलेल्या गुफा ज्या भारतातील अनेकेश्वरवाद्यांसाठी गर्वाची पूंजी आहे, त्या समूद जनसमूहाच्या सांस्कृतिक वर्तनाचा नमुना सादर करीत आहेत. त्यांची कला मूर्तिपूजा व निर्लज्जता दोघांनाही विकसित करणारी आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १२० आणि सूरह हिज्र टीप क्र. ८२.

१२६. मर्यादेचे उल्लंघन करणारेशी अभिप्रेत असे लोक होते जे दास्यत्व मर्यादा, नैतिक मर्यादा व माणुसकीच्या मर्यादा या सर्वांचे उल्लंघन करतात. ते स्वत:ला या सर्व बंधनांपासून मुक्त व खुदमुखत्यार समजतात.

१२७. अशा प्रकारचे लोक समाजा करीता घातक असतात. तेव्हा ते सुधारणेचे कार्य काय करतील. उलट सर्व प्रकारच्या बिघाडास व उत्पाताला कारणीभूत ठरतात. परंतु लोक मात्र या नेत्यांच्या सुधारणा विषयक कार्याच्या दाव्याने प्रभावित होऊन त्यांच्या पाठोपाठ चालू लागतात.

१२८. ते असे समजत होते की जादू बौद्धिक शक्तिस प्रभावित करुन माणसाला भ्रमिष्ट व वेडा बनविते. हजरत स्वालेह यांच्या कथनास कोणते ही योग्य उत्तर यांच्याजवळ नव्हते, म्हणून त्यांनी त्यांच्यावर उलट हा आरोप ठेवला की असे दिसून येते की कोणीतरी तुमच्यावर जादूटोणा केला आहे व त्या प्रभावामुळे तुम्ही अशा बहकलेल्या गोष्टी करीत आहात. स्पष्ट असावे की, जादू टोण्यात असला प्रभाव मुळीच नाही की त्याने एखाद्यास वेडा बनवावे. हा निव्वळ भ्रम आहे, जो आज देखील लोकांमध्ये आढळून येतो. जर खरोखर जादू टोण्यात हा प्रभाव राहीला असता तर जादूगार बादशहा व शासकांना वेडे बनवून त्यांच्या साम्राज्याचा नायनाट करु शकत होते. परंतु असे कधीही झाले नाही. हिटलरच्या अत्याचार पूर्वक कारवायांनी जग त्राही त्राही झाले होते,परंतु जगात असा एकही जादूगार निर्माण झाला नाही जो जादूच्या प्रभावाने त्याला वेडा बनवू शकला असता व जगाला मुक्ति देऊ शकला असता.

१२९. म्हणजे तुमच्यावर ना आकाशातून वह्य अवतरीत होते व ना तुम्हाला प्रेषित्व प्राप्त आहे.

ती जागा जिथे अल्लाहची सांडणी हिंडत फिरत होती.



الوادى المشئوم موضع ارتكاب الجريمة المنكرة ، عقرناقة الله ، ▲

## समूद जनसमूहाच्या पाथरवटीया एक नमुना.






## पर्वतात कोरलेल्या समूदी इमारती



१५५. तो म्हणाला, ही सांडणी आहे.[१३०] एक दिवस पाणी प्यायची पाळी हिची आहे व एक निर्धारीत दिवस पाण्याची पाळी तुमच्या साठी आहे.[१३१]

قَالَ هَٰذِهِۦ نَاقَةٌ لَّهَا شِرْبٌ وَلَكُمْ شِرْبُ يَوْمٍ مَّعْلُومٍ ﴿١٥٥﴾

१५६. हिला त्रास देऊ नका. अन्यथा एका सक्त दिवसाचा अजाब (ईश-शिक्षा) तुमच्याप्रत येऊन ठेपेल.

وَلَا تَمَسُّوهَا بِسُوٓءٍ فَيَأْخُذَكُمْ عَذَابُ يَوْمٍ عَظِيمٍ ﴿١٥٦﴾

१५७. परंतु त्यांनी तिच्या धोंडशीरा कापल्या[१३२] आणि नंतर पश्चाताप करीत बसले.[१३३]

فَعَقَرُوهَا فَأَصْبَحُوا نَٰدِمِينَ ﴿١٥٧﴾

१५८. शेवटी अजाब त्यांच्या पर्यंत आला.[१३४] निःसंशय यात मोठी निशाणी आहे.[१३५] परंतु यांच्या पैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.

فَأَخَذَهُمُ الْعَذَابُ ۗ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَةً ۖ وَمَا كَانَ أَكْثَرُهُم مُّؤْمِنِينَ ﴿١٥٨﴾

१५९. आणि निःसंशय तुमचा स्वामी मोठा प्रभावशाली व दयाळू आहे.

وَإِنَّ رَبَّكَ لَهُوَ الْعَزِيزُ الرَّحِيمُ ﴿١٥٩﴾

१६०. लूत[१३६] च्या जन-समूहाने पैगंबरांना खोटे ठरविले.

كَذَّبَتْ قَوْمُ لُوطٍ الْمُرْسَلِينَ ﴿١٦٠﴾

१६१. जेव्हा त्यांचा भाऊ लूत त्यांना म्हणाला, काय तुम्ही भय बाळग नाही?

إِذْ قَالَ لَهُمْ أَخُوهُمْ لُوطٌ أَلَا تَتَّقُونَ ﴿١٦١﴾

१६२. मी तुमच्या करीता एक अनामत दार रसूल आहे.

إِنِّي لَكُمْ رَسُولٌ أَمِينٌ ﴿١٦٢﴾

१६३. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञा पालन करा.

فَاتَّقُوا اللَّهَ وَأَطِيعُونِ ﴿١٦٣﴾

१६४. मी याबद्दल तुमच्या कडून कोणताही मोबदला मागत नाही. माझा मोबदला तर सर्व विश्वांच्या स्वामीकडे आहे.

وَمَا أَسْأَلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ ۖ إِنْ أَجْرِيَ إِلَّا عَلَىٰ رَبِّ الْعَالَمِينَ ﴿١٦٤﴾

१३०. ही सांडणी एखादी सामान्य सांडणी नव्हती, तर असाधारण सांडणी होती जी ईश चमत्काराच्या स्वरुपात प्रक्टली होती. कुरआनच्या निवेदना नुसार समूद जन समूहाने आपल्या पैगंबराकडून निशाणी म्हणजे अनुभूत चमत्काराची मागणी केली होती आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांचीही मागणी सांडणीच्या स्वरुपात पूर्ण केली, अशासाठी की हजरत स्वालेह पैगंबर असण्या विषयी स्पष्ट प्रमाण ठरावे. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप ११९.

१३१. सांडणीच्या पाणी पिण्याकरीता एका दिवसाची पाळी निश्चित करणे सांडणीच्या असामान्य असण्याचे स्पष्ट प्रमाण होय. जर मामुली सांडणी असती तर तिच्या करीता पाण्याची गरज एवढ्या मोठ्या प्रमाणात राहीली नसती की तिला पाणी पिण्याकरीता पूर्ण दिवस खास केला गेला असता. समूद जन समूहाच्या मागणीवर जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने चमत्कार दाखविला तेव्हा त्यात त्यांच्या कसोटीची सामुग्रीही राखली व ती अशी की विहीरी व झऱ्यां मधून पाणी पिण्याक्रता पाळी निश्चित केली. एक संपूर्ण दिवस सर्व विहीरी व झरे अल्लाहच्या सांडणीच्या पाणी पिण्याकरीता खास राहील आणि दुसऱ्या दिवशी लोक स्वत:साठी पाणी घेऊ शकतील व आपल्या जनावरानाही पाणी पाजू शकतील. ही कठीण परीक्षा होती. अर्थात अल्लाह ज्या प्रकारे इच्छितो त्या प्रकारे आपल्या दासांची परीक्षा घेतो.

१३२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप ११९.

१३३. ही पश्चाताप अपराधाच्या जाणीव झाल्याचा परिणाम म्हणून नव्हती अन्यथा अल्लाहसमोर त्यांनी तौबा (क्षमा याचना) केली असती. किंबहुना अजाबच्या भितीमुळे होती. ते जरी अजाब (ईश-शिक्षे)चा इन्कार करीत होते, परंतु सांडणीची हत्या केल्या नंतर त्यांच्या मनात ही भिती उद्‌भवली असेल की जर हजरत स्वालेह यांचे म्हणणे खरे ठरले तर आमच्यावर आपत्ति कोसळू शकते. या भीती पोटी ते आपल्या कृत कर्मावर पश्चाताप करु लागले.

१३४. समूद जन समूहावर ज्या प्रकारची ईश-शिक्षा कोसळली होती तिचे विवरण सूरह अअराफ आयत ७८ मध्ये निवेदिले गेले आहे.

१३५. स्पष्टीकरणा साठी पहा याच सूरहची टीप क्र. १०८.

१३६. हजरत लूत यांचा वृत्तांत सूरह अअराफ आयत क्र. ८० ते ८४ सूरह हूद आयत क्र. ७७ ते ८३ आणि सूरह हिज्र आयत क्र. ५८ ते ७७ मध्ये निवेदिला गेला आहे. स्पष्टीकरणा साठी त्यांच्या टीपा पाहील्या जाव्यात.

१६५. काय जागतल्या लोकांमध्ये तुम्ही असे आहात की- कामवासना पूर्ण करण्या करीता मुलांजवळ जाता ? [१३७]

اَتَاْتُوْنَ الذُّكْرَانَ مِنَ الْعٰلَمِيْنَ ﴿١٦٥﴾

१६६. आणि तुमच्या पालन कर्त्याने तुमच्या साठी ज्या पत्न्या निर्माण केल्या आहेत त्यांना सोडून देता? वस्तुस्थिती अशी की तुम्ही मर्यादेचे उल्लंघन करणारे लोक आहात.[१३८]

وَ تَذَرُوْنَ مَا خَلَقَ لَكُمْ رَبُّكُمْ مِّنْ اَزْوَاجِكُمْ ؕ بَلْ اَنْتُمْ قَوْمٌ عٰدُوْنَ ﴿١٦٦﴾

१६७. ते म्हणाले हे लूत, जर तुम्ही स्वत:ला रोखले नाही तर अपरिहार्यत: तुम्हाला येथून बाहेर घालविले जाईल.[१४०]

قَالُوْا لَئِنْ لَّمْ تَنْتَهِ يٰلُوْطُ لَتَكُوْنَنَّ مِنَ الْمُخْرَجِيْنَ ﴿١٦٧﴾

१६८. तो म्हणाला, तुमच्या आचरणाने मी अतिशय वैतागलो आहे.[१४१]

قَالَ اِنِّيْ لِعَمَلِكُمْ مِّنَ الْقَالِيْنَ ؕ ﴿١٦٨﴾

१६९. हे पालन कर्त्या ! माझी व माझ्या कुटुंबियांची यांच्या कृत्यापासून सुटका कर.[१४२]

رَبِّ نَجِّنِيْ وَاَهْلِيْ مِمَّا يَعْمَلُوْنَ ﴿١٦٩﴾

१७०. तेव्हा आम्ही त्याची व त्याच्या कुटुंबियांची [१४३] सुटका केली.

فَنَجَّيْنٰهُ وَ اَهْلَهٗۤ اَجْمَعِيْنَ ۙ ﴿١٧٠﴾

१७१. फक्त एका म्हतारीला सोडून जी मागे राहणाऱ्या पैकी होती.[१४४]

اِلَّا عَجُوْزًا فِي الْغٰبِرِيْنَ ۚ ﴿١٧١﴾

१७२. मग आम्ही इतरांना नष्ट केले.[१४५]

ثُمَّ دَمَّرْنَا الْاٰخَرِيْنَ ۚ ﴿١٧٢﴾

१७३. आणि त्यांच्यावर एक विशेष प्रकारचा पाऊस पाडला.[१४६] तर केवढा वाईट पाऊस होता जो खबरदार केल्या जाणाऱ्यांवर पाडला गेला.

وَاَمْطَرْنَا عَلَيْهِمْ مَّطَرًا ۚ فَسَآءَ مَطَرُ الْمُنْذَرِيْنَ ﴿١٧٣﴾

१७४. नि:संशय यात मोठी निशाणी आहे [१४७] परंतु यांच्यापैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.

اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيَةً ؕ وَمَا كَانَ اَكْثَرُهُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿١٧٤﴾

१७५. आणि नि:संशय तुमचा पालन कर्ता प्रभावशाली ही आहे व दयाशील देखील.

وَاِنَّ رَبَّكَ لَهُوَ الْعَزِيْزُ الرَّحِيْمُ ۠ ﴿١٧٥﴾

१३७. हजरत लूत यांचे आवाहन तेच होते जे समस्त पैगंबरांचे होते. म्हणजे अल्लाहचे भय बाळगा व माझे आज्ञापालन करा. परंतु विशेषत: त्यांनी एका अशा दुष्कर्मा बद्दल त्यांना ताकीद केली जे नैतिक दृष्ट्या मोठे घाणेरडे होते व ज्यात सगळा समाज खितपत पडला होता. म्हणजे लौंडेबाजी (पुरुषांनी मुलांशी शरीर संबंध कायम करणे)

यावरुन आवाहन व सुधारणा या संदर्भात ही तात्विक बाब ही स्पष्ट होते की अल्लाहचे पैगंबर जिथे एकेश्वरवाद व आखिरतच्या आवाहनास प्रत्येक प्रकारच्या वैचारीक व आचरण विषयक सुधारणेसाठी आधारभूत म्हणून सादर करतात, तिथे ते ह्या मोठ मोठ्या वाईट गोष्टी बद्दल ही चांगली कान उघाडणी करतात, ज्यांचा तिरस्कार दर्शविणे स्वभावधर्माच्या विरुद्ध असल्याने प्रमाणाचे गरजवंत नसते आणि जी एकाद्या साथीच्या रोगाप्रमाणे समाजामध्ये पसरलेली असते. पुरुषांचे किशोर वयातील मुलांशी शरीर-संबंध कायम करणे एक उघड घृणित गोष्ट होती, म्हणून हजरत लूत यांनी आपल्या मूळ आवाहना सोबत याच्या सुधारणेसाठी आवाज बुलंद केला व याबद्दल आपल्या जन-समूहाची सक्त कान उघाडणी केली.

१३८. सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्त्रीयांना अशासाठी निर्माण केले आहे की त्या पुरुषां करीता वैवाहीक जोडा असाव्यात परंतु आंधळ्या इच्छा माणसाला आंधळा बनवितात. मग तो अनैसर्गिक काम करण्यात काहीच संकोच बाळगत नाही. पत्नयांना सोडून लौंडेबाजी सारख्या किळसवाण्या कृत्यांचा तेच लोक अंगिकार करतात जे स्वाभाविक व नैतिक मर्यादांचे पालन करण्यापासून मुक्त होतात.

१३९. म्हणजे जो उपदेश आम्हाला करीत आहात त्या पासून जर थांबला नाहीत. म्हणजे पुरे झाला तुमचा उपदेश व आम्हाला आमच्या दशेवर सोडा.

१४०. म्हणजे तुम्हाला जबरदस्ती पूर्वक या देशाबाहेर घालविले जाईल. हे अपराध्यांचे आव्हान होते; जे हजरत लूत यांना दिले गेले.

१४१. हजरत लूत अपराध्यांच्या आव्हानाला हे उत्तर दिले की ज्या दुराचारात तुम्ही व्यस्त आहात तो अगदी तिरस्करणीय आहे. म्हणून हे कसे शक्य आहे की मी याबद्दल घृणा दाखवू नये. नीट ऐकून घ्या की मला याचा पुरता वीट आला आहे.

१४२. ही दुआ हजरत लूत यांनी अशा वेळी केली जेव्हा त्यांच्या आवाहनविषयक व सुधारणा विषयक प्रयत्नास जनसमूह कोणत्याही प्रकारे सहन करण्यास तयार झाला नाही आणि त्याने हजरत लूत विरुद्ध पाऊल उचलण्याचा निर्धार केला.

घाणेरडे नृत्य करणाऱ्यांची अधितकता सगळ्या वातावरणास घाणेरडे बनविते. अशा वातावरणात कोणताही स्वच्छता प्रिय मनुष्य श्वास घेणेही पसंत करीत नाही. म्हणून जेव्हा सुधारणेची आशा पार मावळली तेव्हा हजरत लूत यांनी अशा घाणेरड्या वातावरणापासून सुटका मिळावी म्हमून सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ दुआ केली.

१४३. तात्पर्य, हजरत लूत यांच्यावर ईमान बाळगणारे त्यांच्या कुटुंबातलीच माणसे होती.

१४४. ही हजरत लूत यांची पत्नी होती जिने ईमान बाळगले नव्हते.

स्पष्ट असावे की या काळात मुस्लिम समाजाचा पत्ता नव्हता. फक्त काही माणसे वगळता. म्हणून निकाह संदर्भात शरीअत चे आदेश देखील सौम्य होते. एखादा पैगंबर ज्या जन समूहाशी संबंध राखत होता. लग्न वगैर त्याच समूहात करु शकत होता म्हणून पैगंबरांना अशा पत्न्यांशी संबंध जोडावा लागला ज्यांनी यांच्या प्रयत्नानंतर ही ईमान बाळगले नाही.

१४५. म्हणजे कुफ्र करणाऱ्यांना.

१४६. अभिप्रेत दगडांचा पाऊस होय. विवरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११९.

१४७. याचे स्पष्टीकरण वर टीप क्र. १०८ मध्ये केले गेले आहे.

१७६. 'ऐयका वाल्यांनी' [१४८] पैगंबरांना खोटे ठरविले.

كَذَّبَ أَصْحَٰبُ لْـَٔيْكَةِ ٱلْمُرْسَلِينَ ﴿١٧٦﴾

१७७. जेव्हा शोअैब त्यांना म्हणाला, काय तुम्ही भय बाळगत नाही?

إِذْ قَالَ لَهُمْ شُعَيْبٌ أَلَا تَتَّقُونَ ﴿١٧٧﴾

१७८. मी तुमच्या साठी एक अनामतदार (विश्वस्त) रसूल आहे.

إِنِّى لَكُمْ رَسُولٌ أَمِينٌ ﴿١٧٨﴾

१७९. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.

فَٱتَّقُوا۟ ٱللَّهَ وَأَطِيعُونِ ﴿١٧٩﴾

१८०. मी याबद्दल तुमच्या कडून कोणताही मोबदला मागत नाही. माजा मोबदला तर सर्व विश्वांच्या पालन कर्त्याकडे आहे.

وَمَآ أَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ إِنْ أَجْرِىَ
إِلَّا عَلَىٰ رَبِّ ٱلْعَٰلَمِينَ ﴿١٨٠﴾

१८१. माप पूरेपूर भरा आणि तोटा देऊ नका. [१४९]

أَوْفُوا۟ ٱلْكَيْلَ وَلَا تَكُونُوا۟ مِنَ ٱلْمُخْسِرِينَ ﴿١٨١﴾

१८२. योग्य तराजू ने तोला. [१५०]

وَزِنُوا۟ بِٱلْقِسْطَاسِ ٱلْمُسْتَقِيمِ ﴿١٨٢﴾

१८३. आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देऊ नका आणि जमीनीवर उत्पात पसरवित फिरु नका. [१५१]

وَلَا تَبْخَسُوا۟ ٱلنَّاسَ أَشْيَآءَهُمْ وَلَا تَعْثَوْا۟ فِى ٱلْأَرْضِ
مُفْسِدِينَ ﴿١٨٣﴾

१८४. त्याचे भय बाळगा ज्याने तुम्हाला ही निर्माण केले व पूर्वी होऊन गेलेल्या निर्मितीलाही.

وَٱتَّقُوا۟ ٱلَّذِى خَلَقَكُمْ وَٱلْجِبِلَّةَ ٱلْأَوَّلِينَ ﴿١٨٤﴾

१८५. ते म्हणाले, तुमच्यावर जादूचा परिणाम झाला आहे.

قَالُوٓا۟ إِنَّمَآ أَنتَ مِنَ ٱلْمُسَحَّرِينَ ﴿١٨٥﴾

१८६. आणि तुम्ही केवळ आमच्या सारखेच मनुष्य आहात, आणि आम्ही तर तुम्हाला अगदी खोटारडे समजतो.

وَمَآ أَنتَ إِلَّا بَشَرٌ مِّثْلُنَا وَإِن نَّظُنُّكَ لَمِنَ ٱلْكَٰذِبِينَ ﴿١٨٦﴾

१८७. जर तुम्ही सच्चे असाल तर आमच्यावर आकाशाचा एखादा तुकडा कोसळवा. [१५२]

فَأَسْقِطْ عَلَيْنَا كِسَفًا مِّنَ ٱلسَّمَآءِ إِن كُنتَ مِنَ ٱلصَّٰدِقِينَ ﴿١٨٧﴾

१४८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ७७

१४९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १३७ आणि सूरह मुतफफिन टीप क्र. १.

१५०. तात्पर्य तराजूला दुरूस्त स्थितीत राखणे आणि व्यवहारात प्रामणिकपणा राखणे नितिमतेची निकड ही आहे आणि पैगंबरांच्या शरीयतीचा एक महत्वपूर्ण भाग देखील.

आजच्या काळात वजन करण्याकरीता वेगवेगळ्या प्रकारचे तराजू शोधले गेले आहेत ज्यात सर्वाधिक प्रगत स्वरुप इलेक्ट्रानिक तराजू (Electronic Scale) चे आहे. परंतु प्रत्येक तराजूचे दुरुहस्त असणे आवश्यक आहे. जेणेकरुन कमी तोल्ले न जावे.

१५१. म्हणजे जगात बिघाड निर्माण करु नका. उत्पाताच्या मतितार्थात प्रत्येक प्रकारचा अत्याचार व अतिरेक सामील आहे.

१५२. म्हणजे जर तुम्ही आपल्या पैगंबरी दाव्यात सच्चे असाल तर असा चमत्कार दाखवा की ज्यामुळे आकाशाचा एखादा तुकडा आमच्यावर येऊन कोसळावा.

१८८. तो म्हणाला माझा पालन कर्ता जाणतो जे काही तुम्ही करीत आहात.[१५३]

قَالَ رَبِّيٓ أَعۡلَمُ بِمَا تَعۡمَلُونَ ١٨٨

१८९. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले. शेवटी त्यांना छाया (छत्री) वाल्या दिवसाच्या अजाब (ईश-शिक्षे) ने पकडले [१५४] आणि ती एक भयानक दिवसाची शिक्षा होती.

فَكَذَّبُوهُ فَأَخَذَهُمۡ عَذَابُ يَوۡمِ ٱلظُّلَّةِۚ إِنَّهُۥ كَانَ عَذَابَ يَوۡمٍ عَظِيمٍ ١٨٩

१९०. नि:संशय, यात मोठी निशाणी आहे [१५५] परंतु यांच्या पैकी अधिकांश ईमान बाळगणारे नाहीत.

إِنَّ فِي ذَٰلِكَ لَأٓيَةٗۖ وَمَا كَانَ أَكۡثَرُهُم مُّؤۡمِنِينَ ١٩٠

१९१. आणि नि:संशय तुमचा पालनकर्ता प्रभावशाली ही आहे आणि दयाशील देखील.

وَإِنَّ رَبَّكَ لَهُوَ ٱلۡعَزِيزُ ٱلرَّحِيمُ ١٩١

१९२. आणि हे (कुरआन) नि:संशय सर्व विश्वांच्या स्वामीने अवतरीत केलेले आहे.[१५६]

وَإِنَّهُۥ لَتَنزِيلُ رَبِّ ٱلۡعَٰلَمِينَ ١٩٢

१९३. याला घेऊन 'रूहूल अमीन [१५७] अवतरला आहे.

نَزَلَ بِهِ ٱلرُّوحُ ٱلۡأَمِينُ ١٩٣

१९४. तुमच्या हृदयावर [१५८]या साठी की तुम्ही (लोकांना) खबरदार करणारे व्हावे.[१५९]

عَلَىٰ قَلۡبِكَ لِتَكُونَ مِنَ ٱلۡمُنذِرِينَ ١٩٤

१९५. स्पष्ट अरबी भाषेत. [१६०]

بِلِسَانٍ عَرَبِيّٖ مُّبِينٖ ١٩٥

१९६. आणि हा पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या ग्रंथांमध्येही अस्तित्वात आहे.[१६१]

وَإِنَّهُۥ لَفِي زُبُرِ ٱلۡأَوَّلِينَ ١٩٦

१९७. काय या लोकांसाठी ही निशाणी नव्हे की याला बनी इस्राईलचे विद्वान जाणतात.[१६२]

أَوَلَمۡ يَكُن لَّهُمۡ ءَايَةً أَن يَعۡلَمَهُۥ عُلَمَٰٓؤُاْ بَنِيٓ إِسۡرَٰٓءِيلَ ١٩٧

१९८. आणि जर आम्ही यास अरब देशातल्या माणसाऐवजी अन्य देशीय माणसावर [१६३] अवतरीत केले असते.

وَلَوۡ نَزَّلۡنَٰهُ عَلَىٰ بَعۡضِ ٱلۡأَعۡجَمِينَ ١٩٨

१९९. आणि त्याने यांना वाचून ऐकविले असते तर हे या (कुरआन)वर ईमान राखणारे नव्हते.[१६४]

فَقَرَأَهُۥ عَلَيۡهِم مَّا كَانُواْ بِهِۦ مُؤۡمِنِينَ ١٩٩

१५३. म्हणजे तुमच्यावर जर अजाब (ईश-शिक्षा) अद्याप येत नाही तर असे समजू नका की अल्लाह तुमच्या या कृत्यांपासून अनभिज्ञा आहे. तो चांगल्या प्रकारे जाणून आहे आणि यांची दखल घेईल.

१५४. त्यांनी आकाशाचा तुकडा कोसळावा अशी मागणी केली होती म्हणून त्यांच्यावर अजाब छाया (ढगां)च्या स्वरुपात आला.

सूरह हूद मध्ये शोएब जन समूहावरील अजाबला 'भयानक आवाज' या अर्थाने व सूरह अअराफ मध्ये 'भयकंपित करणारे संकट या अर्थाने घेतले आहे. असे दिसून येते की प्रथम ढगांनी यांना झाकून घेतले आणि ते असे समजले की ह्या भयंकर उष्म्यात आमच्यासाठी छाया (छत्री) बनला परंतु यामधून वीज भयंकर चित्कारास यांच्यावर कोसळली जिने त्यांना अशा प्रकारे भयकंपित केले की तोंडघशी जमीनीवर पडले आणि नाश पावले.

१५५. स्पष्टीकरणासाठी पहा वरील टीप क्र. १०८.

१५६. पैगंबरांचे वृत्तांत ऐकविल्यानंतर आता पुन्हा निवेदन क्रम कुरआन व त्याच्या पैगंबराकडे वळला आहे.

१५७. रुहुल अमीनचा अर्थ 'विश्वस्त आत्मा' असा आहे. अर्थात जिब्रील होय. जसे अन्य एका ठिकाणी फर्माविले गेले.

قُلْ مَنْ كَانَ عَدُوًّا لِجِبْرِيْلَ فَاِنَّهٗ نَزَّلَهٗ عَلٰى قَلْبِكَ بِاِذْنِ اللّٰهِ۔ (بقرہ۔۹۷)

'सांगा जो जिब्रीलचा शत्रू असेल तर त्याला हे ठाऊक असले पाहीजे की जिब्रील ने अल्लाहच्या हुकुमाने हे (कुरआन) तुमच्या हृदयावर अवतरीत केले आहे' (बकरा-९७)

आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की वह्य-अवतरणाचे माध्यम भौतिक नव्हे तर अध्यात्मिक आहे. संदेश आणणारा एक फरिश्ता आहे. ज्याची वास्तविकता रूह (आत्मा) आहे. जी अतिशय सूक्ष्म असते आणि दिसून येत नाही. तसेच हा फरिश्ता अतिश्य अमानतदार आहे. जो संदेश सर्वश्रेष्ठ अल्लाह याच्या सूपूर्द करतो, त्यात कसल्याही प्रकारचे उणे-अधिक न करता तो पैगंबरापर्यंत पोहचवितो.

१५८. हृदय माणसाच्या अंतर्यायी अशी केंद्रभूत बाब व श्रेष्ठतम स्थान आहे जे आंतरीक बाबींना कबूल करण्याची व त्यांना सुरक्षित राखण्याची पात्रता बाळगते. म्हणूनच म्हटले जाते की तुझी आठवण माझ्या हृदयात आहे. याऊलट असे कोणी म्हणत नाही की, तुझी आठवण माझ्या डोक्यात आहे, कारण मस्तिष्क एक उपकरण मात्र आहे. जेव्हा हृदय सुरक्षित राखण्याचे स्थान आणि हृदयाशी अभिप्रेत मांसाचा तो गोळा नव्हे जो शरीरात रक्तभिसरण रकतो. किंबहुना अशी सुप्त शक्ति आहे जी या ठिकाणी असते. ज्या प्रकारे आम्ही विधुत प्रवाह पाहू शकत नाही तद्वतच हृदयाचे ऑपरेशन केल्यावर देखील आम्ही ना त्यातल्या सुप्त शक्तिला डोळ्यांनी पाहू शकतो ना आत्म्याला. पैगंबरांच्या शुद्ध हृदयावर वह्य अवतरीत होण्याचा अर्थ असा की हजरत जिब्रील सरळ सरळ पैगंबरांच्या हृदयावर अल्लाहचा संदेश उतरवीत होते. अशा प्रकारे की त्यांच्या मन: पटलावर त्यातला एकेक शब्द कोरला जात असे. यास्तव यात भूल चूक होण्याची मूळातच संभावना नाही.

१५९. म्हणजे वाईट श्रद्धा व दुराचाराच्या दुष्परिणती पासून.

१६०. म्हणजे कुरआन अरबी भाषेत अवतरीत केले गेले. अर्थात अशा अरबीत जी आपल्या आशय व उद्देशास चांगल्या प्रकारे स्पष्ट करणारी आहे.

कुरआनाच्या या निवेदना वरुन स्पष्ट झाले की कुरआन तेच आहे जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखातून वदले गेले; व जे अरबी भाषेत ग्रंथ रूपाने सुरक्षित आहे. राहीलेत याचे अनुवाद तर ते याच्या अर्थ व आशयास अदा करण्याचा मानवी प्रयत्न होय. म्हणून कोणत्याही भाषांतरास मग ते अरबी भाषेत का असेना ना कुरआन म्हटले जाऊ शकते ना अल्लाहची वाणी. किंबहुना कुरआनचा अनुवाद व भाषांतर असेच म्हटले जाऊ शकते. यास्तव तिलावत (पाठण) व नमाज मध्ये किरअत साठी भाषांतराचा उपयोग नाही. किंबहुना शब्द न शब्द तेच कुरआन पढणे अगत्याचे आहे.जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने अरबी भाषेत अवतरीत केले आहे.

१६१. याचा हा अर्थ नव्हे की कुरआन याच शब्दात लिहीलेले पूर्वीच्या धार्मिक पुस्तकांमध्ये उपलब्ध होते. तेव्हा याचा अर्थ असा की कुरआनाची शिकवण व मार्गदर्शन तेच आहे जे पूर्वीच्या ईश-ग्रंथाचे होते. यास्तव ते मूलभूत दृष्ट्या त्या ग्रंथामध्ये राहीले तसेच त्यात अशी भाकिते ही आहेत जी या पैगंबराचे अल्लाह तर्फे पाठविले जाणे व त्यावर अल्लाहचा संदेश अवतरीण होण्यास प्रमाणित करतात.

१६२. म्हणजे बनी इस्राईलचे विद्वान या गोष्टीचा इन्कार करु शकत नाही की कुरआन एकेश्वरवादाचे आवाहन सादर करीत आहे तेच आवाहन 'तौरात' व अन्य ईश ग्रंथांचे ही होते. ज्या मूर्तिपूजेला कुरेश समूहाने योग्य ठरविले होते. पूर्वीच्या सर्व ईश ग्रंथांचे हे शिर्क व असत्य असण्याबद्दल एकमत आहे. कुरआन म्हणते माणसाला कियामतीच्या दिवशी दुसऱ्यांदा जिवंत केले जाईल; अशासाठी की प्रत्येकाने आपल्या आचरणाचा यथोचित मोबदला प्राप्त करावा. मक्केचा अनेकेश्वरवादी यास

अशक्य समजतात. परंतु बनी इस्राईलचे विद्वान जाणतात की त्यांच्या धर्म-ग्रंथात आखिरत संबंधी हीच कल्पना मांडली गेली आहे. तसेच ते या गोष्टीचा ही इन्कार करु शकत नाही की सर्वश्रेष्ठ अल्लाह माणसाच्या मार्ग दर्शनासाठी माणसांमधूनच रसूल पाठवित राहीला आणि यांच्यावर वह्य व ईश-ग्रंथ अवतरीत करीत राहीला. जर बनी इस्राईलचे विद्वान जे तौरात ग्रंथ बाळगतात, जर यापैकी एकही गोष्टीचा इन्कार करु शकत नाही तर काय हे या गोष्टीचे प्रमाण नव्हे की कुरआन एखादे नवीन आवाहन सादर करीत नाही, तर हे पैगंबरी आवाहनाचेच नूतनीकरण होय.

१६३. म्हणजे अरबांव्यतिरिक्त.

१६४. म्हणजे अरबांव्यातिरिक्त एखाद्या माणसावर कुरआन अवतरीत केले गले असते तर इन्कार करण्यासाठी त्यांना ही सबब मिळाली असती की अरबी लोकांकरीता कुरआन एका अरबी नसलेल्या माणसावर का अवतरीत केले गेले. यास्तव बनी इस्राईलच्या पैगंबरांवर जे ईश ग्रंथ अवतरले त्यांना अरबच्या अनेकेश्वर वाद्यांनी कबूल केले नाही, परंतु आता जेव्हा एका अरबी असलेल्या माणसावर कुरआन अवतरीत केले गेले तर त्यांना ही सबब पुढे करण्याची ही संधी बाकी राहीली नाही. अर्थात हे की अरब-जनसमूहात अरबी रसूलचे अल्लाहतर्फे पाठविले जाणे व अरबी भाषेत कुरआनाच्या अवतरणाने यांच्यावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित झाले.

स्पष्ट असावे की याचा हा अर्थ घेणे उचित नव्हे की कुरआन अरबां व्यतिरिक्तच्या लोकांकरीता प्रमाण नाही. याचा संदेश ज्या ज्या जन-समूहापर्यंत पोहचेल त्या सर्वांकरीता प्रमाण आहे. मग ते अरबी भाषा जाणणारे असोत वा नसोत. मुस्लिम जन-समूहाद्वारे, जो कुरआनाच्या साक्षी करीताच निर्माण केला गेला आहे, कुरआनाचा संदेश पोहचणे पर्यायाने प्रमाण प्रस्थापित होणे होय. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कैसर व किसरा (रोम व फारसचे राजे) ला आवाहन केले जे अरबांव्यतिरिक्त होते. यास्तव कैसरने त्यांचा शुभ संदेश ज्यात कुरआनाच्या आयतीही सामील होत्या. एका अनुवादकाकडून वाचवून घेतले आणि खुलफाए राशेदीन ने अरबां व्यतिरिक्तच्या जनसमूहां विरुद्ध लष्करी कारवायी करण्याआधी त्यांना इस्लाम कबूल करण्याचे आवाहन केले.

अशा प्रकारे आम्ही ही गोष्ट गुन्हेगारांच्या मनात दाखल केली आहे. ते यावर ईमान बाळगणार नाहीत, जो पर्यंत दु:खदायक अजाब (ईश-शिक्षा) न पाहतील. तो (अजाब) यांच्यावर अकस्मात येईल व त्यापासून हे असावध असतील. त्यावेळी ते म्हणतील, काय आम्हाला थोडीशी सवड मिळेल?(अल-क़ुर्आन)

२००. अशा प्रकारे आम्ही ही गोष्ट गुन्हेगारांच्या मनात दाखत केली आहे.[१६५]

كَذَٰلِكَ سَلَكْنَٰهُ فِي قُلُوبِ ٱلْمُجْرِمِينَ ٢٠٠

२०१. ते यावर ईमान बाळगणार नाहीत, जो पर्यंत दु:खदायक अजाब (ईश-शिक्षा) न पाहतील.[१६६]

لَا يُؤْمِنُونَ بِهِۦ حَتَّىٰ يَرَوُا۟ ٱلْعَذَابَ ٱلْأَلِيمَ ٢٠١

२०२. तो (अजाब) यांच्यावर अकस्मात येईल व त्यापासून हे असावध असतील.

فَيَأْتِيَهُم بَغْتَةً وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ٢٠٢

२०३. त्यावेळी ते म्हणतील, काय आम्हाला थोडीशी सवड मिळेल?

فَيَقُولُوا۟ هَلْ نَحْنُ مُنظَرُونَ ٢٠٣

२०४. मग काय हे लोक आमच्या अजाब करीता घाई करीत आहेत?

أَفَبِعَذَابِنَا يَسْتَعْجِلُونَ ٢٠٤

२०५. तुम्ही विचार केला, जर आम्ही यांना आणखी काही वर्षे जीवनसारमुग्री द्यावी.

أَفَرَءَيْتَ إِن مَّتَّعْنَٰهُمْ سِنِينَ ٢٠٥

२०६. मग यांच्यावर तो (अजाब) यावा ज्या पासून यांना भयभीत केले जात आहे.

ثُمَّ جَآءَهُم مَّا كَانُوا۟ يُوعَدُونَ ٢٠٦

२०७. तर ती जीवन-सामुग्री ज्यापासून हे लाभ घेत राहीले यांच्या काय उपयोगी पडेल ?[१६७]

مَآ أَغْنَىٰ عَنْهُم مَّا كَانُوا۟ يُمَتَّعُونَ ٢٠٧

२०८. आणि आम्ही कोणत्याही वस्तीस नष्ट केले नाही. परंतु हे की तिच्यासाठी खबरदार करणारे राहीलेत.[१६८]

وَمَآ أَهْلَكْنَا مِن قَرْيَةٍ إِلَّا لَهَا مُنذِرُونَ ٢٠٨

२०९. स्मरणिका प्राप्ती [१६९] साठी आणि आम्ही अत्याचारी नाही.[१७०]

ذِكْرَىٰ وَمَا كُنَّا ظَٰلِمِينَ ٢٠٩

२१०. या (कुरआना) ला घेऊन सैतान अवतरीत झाले नाहीत.

وَمَا تَنَزَّلَتْ بِهِ ٱلشَّيَٰطِينُ ٢١٠

१६५. म्हणजे कोणती ना कोणती सबब पुढे करुन अल्लाहच्या ग्रंथाचा इन्कार केला जावा. अर्थात हे की अल्लाहचा अपमानित करणारा नियम/दंड त्यांना लागू झाला आहे आणि अल्लाहचा अपमानित करणारा नियम हा की, जो मनुष्य डोळे बंद करुन ठेवतो त्याला तेजस्वी सूर्य ही दिसत नाही तेव्हा त्याच्या करीता अंध:कारात भटकत राहणे निश्चित ठरते.

गुन्हेगारशी अभिप्रेत ते हटवादी लोक होत जे आपल्या शिर्क व कुर्फे वर अटळ राहू इच्छितात.

१६६. म्हणजे हे लोक प्रमाणाच्या द्वारे म्हणणे मान्य करणारे नाहीत. मात्र त्या वेळी मानतील जेव्हा अल्लाहचा अजाब प्रकट होईल. परंतु त्या वेळी ईमान बाळगण्याचा काय लाभ?

१६७. म्हणजे जर आम्ही यांच्या सवडीत वाढ केली व यांना जगात सुरवविलासाची आणखी संधी लाभली तर त्याचा यांना काय उपयोग, जेव्हा यांना एक ना एक दिवस आपल्या दुष्परिणतीला तोंड द्यावे लागेल.

१६८. म्हणजे अशा समस्त वस्त्यांकडे पैगंबर पाठविले गेले होते. ज्यांनी त्यांना अल्लाहचे भय न बाळगण्याच्या वाईट परिणामा विषयी खबरदार केले होते.

१६९. हे पैगंबर ताकीद करण्या सोबत स्मरणिका (बोध) व उपदेश करीता राहीलेत अशासाठी की एका मार्गाने नव्हे तर दुसऱ्या मार्गाने त्यांना समजावे.

१७०. जर एखादा मनुष्य आपल्या अंगावर रॉकेल ओतून आग लावील तर तो जळल्याशिवाय राहणार नाही. आपल्या या कृत्यानंतर तो आपल्या विनाशाची जबाबदारी अल्लाहवर टाकू शकत नाही. तद्वतच जे लोक स्वत:ला श्रद्धा व आचरणाच्या त्या मार्गाला लावतात जिथे ज्वालामुखीचा तप्त लावा उकळत असतो. तर ते निश्चितपणे नाश पावतील आणि ते आपल्या या विनाशास अल्लाहला जबाबदार ठरवू शकत नाही. जेव्हा त्याने आपल्या पैगंबरांद्वारे यांना हा मार्ग अतिशय धोक्याचा असण्याबद्दल सावध केले होते.

२११. ना हे त्यांच्याशी कसलीही अनुकूलता राखतात आणि ना ते असे करू शकतात.[१७१]

وَمَا يَنۢبَغِي لَهُمْ وَمَا يَسْتَطِيعُونَ ﴿٢١١﴾

२१२. त्यांना तर याच्या श्रवणापासून देखील दूर ठेवले गेले आहे. [१७२]

إِنَّهُمْ عَنِ السَّمْعِ لَمَعْزُولُونَ ﴿٢١٢﴾

२१३. तेव्हा अल्लाह सोबत अन्य एखाद्या उपास्यास साद घालू नका अन्यथा तुम्ही देखील शिक्षा भोगणाऱ्यांमध्ये सामील व्हाल.[१७३]

فَلَا تَدْعُ مَعَ اللَّهِ إِلَٰهًا آخَرَ فَتَكُونَ مِنَ الْمُعَذَّبِينَ ﴿٢١٣﴾

२१४. आणि आपल्या निकटच्या नातेवाईकांना भय दाखवा.[१७४]

وَأَنذِرْ عَشِيرَتَكَ الْأَقْرَبِينَ ﴿٢١٤﴾

२१५. आणि जे ईमान बाळगणारे तुमचे अनुसरण करतील, त्यांच्यासाठी आपले बाजू झुकवा.[१७५]

وَاخْفِضْ جَنَاحَكَ لِمَنِ اتَّبَعَكَ مِنَ الْمُؤْمِنِينَ ﴿٢١٥﴾

२१६. जर ते तुमची अवज्ञा करतील तर त्यांना सांगा, जे काही तुम्ही करीत आहात, मी त्यापासून अलिप्त आहे.[१७६]

فَإِنْ عَصَوْكَ فَقُلْ إِنِّي بَرِيءٌ مِّمَّا تَعْمَلُونَ ﴿٢١٦﴾

२१७. आणि भरवसा राखा त्यावर जो वर्चस्वशाली व दयाळू आहे. [१७७]

وَتَوَكَّلْ عَلَى الْعَزِيزِ الرَّحِيمِ ﴿٢١٧﴾

२१८. जो तुम्हाला पाहत असतो जेव्हा तुम्ही नमाजसाठी उभे राहता.

الَّذِي يَرَاكَ حِينَ تَقُومُ ﴿٢١٨﴾

२१९. आणि सजदा करीत असणाऱ्यांच्या दरम्यान तुमच्या येण्या-जाण्यालाही. [१७८]

وَتَقَلُّبَكَ فِي السَّاجِدِينَ ﴿٢١٩﴾

२२०. निः संशय तो सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

إِنَّهُ هُوَ السَّمِيعُ الْعَلِيمُ ﴿٢٢٠﴾

२२१. काय मी तुम्हा लोकांना सांगू की सैतान कोणावर अवतरीत होतात ?[१७९]

هَلْ أُنَبِّئُكُمْ عَلَىٰ مَن تَنَزَّلُ الشَّيَاطِينُ ﴿٢٢١﴾

१७१. मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांनी जेव्हा हे पाहिले की कुरआन एक असामान्य वाणी आहे. जी अपरोक्षाच्या खबरी देत आहे, तेव्हा त्यांनी त्याचे स्पष्टीकरण अशी केली की हे सैतानांद्वारे अवतरीत केलेले म्हणजे सैतानांनी (अल्लाह रक्षण करो) पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या हृदयात या गोष्टी उदभविल्या. याचे खंडन करतांना फर्माविले गेले की ना हे काम सैतानांच्या योग्यतेचे आहे आणि ना त्यांच्या अवाक्यातले आहे. सैतानांना तर उपद्रवात गोडी असते. तेव्हा अशी वाणी का म्हणून अवतरीत करतील जी परिपूर्णत: मांगल्यमय असावी. कुरआनाची शिकवण तर श्रद्धा व आचरण आणि चारित्र्य व नैतिकतेच्या स्वच्छ शुद्धतेची शिकवण होय. सैतानांचे अशा शिकवणीशी कोणती औचित्य असू शकते? आणि त्यांची काय बिशात की ते कुरआना सारखी अत्युच्च पदाची वाणी अवतरीत करतील. ज्यातला शब्द न शब्द सत्याची ग्वाही देतो. जो मनुष्य जीवनाच्या रहस्यांना उलगडून त्याचे ध्येय निश्चित करतो. तो सृष्टीच्या रहस्य-भेदांना अनावरीत करतो आणि अपरोक्षातल्या सत्य गोष्टी मांडतो. त्याचे आवाहन स्वभाव व बुद्धी साठी प्रकाश आहे. त्याचे शब्द अतिशय काटेकोर व अर्थपूर्ण आहेत व रचना अशी की एक शब्द देखील इकडचा तिकडे करणे अशक्यप्राय. तसेच वचने इतकी अलंकारपूर्ण व प्रभावित करणारी आहेत की कथन सरळ सरळ हृदयाला जाऊन भिडते.

या समस्त सत्य गोष्टींना दृष्टी आड करून कुरआनास सैतानाला स्फुरलेली वचने ठरविण्याचा उद्योग केवळ अशा लोकांचा असू शकतो जे बुद्धि व शुद्धिचा वापर करू इच्छित नाही. आजच्या काळात रश्दीने कुरआनातील वचनांना सैतानाची वचने या अर्थाने घेऊन अशा प्रकारच्या विचारसरणीचा पुरावा दिला आहे. ज्या प्रकारच्या विचारसरणीचा पुरावा कुरआन-अवतरणकाळात इन्कार करणारे देत होते. अर्थात याला शाबासकी देखील सैतानांकडूनच मिळत आहे.

१७२. म्हणजे वस्त्र अवतरणासाठी हा इतमाम केला गेला आहे की जेव्हा फरिश्ते वह्य घेऊन पैगंबरावर अवतरीत होतील तेव्हा सैतानांनी ऐकू नये म्हणून ते यात हस्तक्षेपही करू शकत नाही. कुरआनाच्या या स्पष्टीकरणानंतर ते कथन खोटे असण्याबाबत कसली शंका राहते ज्यात 'मूर्तिंची प्रशांसा' हा किस्सा निवेदिला गेला आहे, व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी या गोष्टींचा संबंध जोडला गेला आहे की त्यांच्या जीभेवर सैतानाने मूर्ति-प्रशांसेची वचने जारी केली होती. जी नंतर रद्द केली गेलीत. या खोट्या कथनाचे खंडन आम्ही सूरह हज्जच्या टीप क्र. ९१ मध्ये केले आहे. रश्दीने 'सैतानी आयती' मध्ये याच खोट्या कथनाचा आधार घेतला आहे.

१७३. जेव्हा पैगंबराना एवढी सकत तंबी दिली गेली आहे की जर त्यांनी अल्लाहला सोडून अन्य एखाद्यास गरजपूर्तिकरता साद घातली किंवा त्याची उपासना केली तर त्याना देखील शिक्षा भोगावी लागेल, तेव्हा इतर लोक शिर्क (अनेकेश्वर भक्ति) करून अल्लाहच्या शिक्षेपासून कसे वाचू शकतील? वस्तुत: पैगंबरांच्या हातून शिर्क सारखे घृणित कृत्य घडण्याची कसलीही संभावना नव्हती, परंतु ही तात्विक गोष्ट स्पष्ट करावयाची होती की शिर्क एक माफ न करण्याजोगा गुन्हा आहे. आणि त्याच्या शिक्षेबाबत कोणाचीही मुलाहीजा ठेवली जाणार नाही. यास्तव पैगंबराना उद्देशून म्हटले गेले आहे.

१७४. आपल्या जवळच्या नातेवाईकांना खबरदार करण्याचा आदेश,उघड आहे आवाहन विषयक प्रयत्नांच्या सुरवातीसच दिला गेला असेल म्हणून अनुमानाने ही सूरह मक्केच्या आरंभ काळातच अवतरली असावी. हदीस वचनातील उल्लेखानुसार जेव्हा ही आयत अवतरली तेव्हा पैगंबरांनी कुरेशच्या प्रत्येक कुटुंबास नाव घेऊन पुकारले व जेव्हा ते सफावर जमले तेव्हा त्यांनी फर्माविले:

فَاِنِّی نذیرٌ لکُمْ بَیْنَ یَدَیْ عذابٍ شدیدٍ۔ (بخاری کتاب التفسیر)

'मी तुम्हाला येणाऱ्या काळातील सक्त अजाब विषयी खबरदार करतो'. (बुखारी-किताबुत्तफसीर)

या प्रसंगी पैगंबरानी जे सांगितले ते निर्धास्त शैलीत कियामतीच्या अजाब पासून भय बाळगण्याबद्दल सांगितले आणि हे अगदी याच आदेशाचे पालन होते की

وَاَنْذِرْ عَشِیْرَتَکَ الْاَقْرَبِیْنَ۔

'आपल्या जवळच्या नातेवाईकांना भय दाखवा' पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा हा नियम आवाहनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांना विचार चिंतनाचे आवाहन करतो.

१७५. म्हणजे जे ईमान बाळगणारे तुमचे अनुसरण करतील तेच आपल्या ईमाना बाबत सच्चे असतील आणि अशा प्रामाणिक ईमान बाळगणाऱ्याशी तुम्ही सौम्य स्वभावाने व आदरातिथ्याने वागा आणि स्नेहाचे व दयेचे वर्तन करा.

१७६. म्हणजे खबरदार केल्यानंतरही जर हे ईमान बाळगण्यास व तुमचे अनुसरण करण्यास तयार होत नाहीत तर स्पष्ट शब्दात सांगा की तुमच्या अनेकेश्वर वादीय आचरणाशी माझा काहीही संबंध नाही. मी माझी जबाबदारी पार पाडली, आता तुमच्या आचरणास तुम्ही जबाबदार राहाल.

१७७. भरवशाच्या ताकीदीसह या ठिकाणी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या दोन गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला गेला आहे. एक हे की तो वर्चस्वाशाली आहे तेव्हा त्याचा फैसला लागू झाल्याखेरीज राहणार नाही आणि दूसरे हे की तो कृपाशील आहे म्हणून विश्वास ठेवा की आपल्या प्रामाणिक दासांना तो निश्चितच उपकृत करील.

१७८. सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे पसंत असण्याची ही अभिव्यक्ति होय की ज्या वेळी तुम्ही नमाज पढण्यासाठी उभे राहता तेव्हा त्याची कृपा. दृष्टि तुमच्यावर असते व अशा वेळी देखील जेव्हा तुम्ही आपल्या सोबत उपासना करणाऱ्यांच्या दरम्यान असतात. हा संकेत या गोष्टीकडे आहे की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या पालनकर्त्या (अल्लाह) चे उपासक आहेत व त्यांचे अनुसरण करणारे ही उपासनेत मग्न राहणारे लोक आहेत. ते आपल्या सहकाऱ्यांना अशा प्रकारे प्रशिक्षण देत आहेत की अल्लाह समोर सजदा करणे त्यांचा विशिष्ट गुण ठरावा म्हणून त्यांची सभा अल्लाहच्या निकटतम दासांची सभा होय. ज्यांची लाभदायकता संशयविरहित आहे. परंतु लोक वस्तुस्थिती पासून डोळे मिटून पैगंबरानाही ज्योतिषी ठरवितात तर कधी कवी तर कधी अन्य काही.

१७९. म्हणजे सैतान कोणत्या लोकांच्या मनात वाईट विचार व असत्य वचनांचा प्रादुर्भाव करून त्यांना आपला शिष्य बनवितात.

ते प्रत्येक खोटी गोष्ट रचणाऱ्या दुराचाऱ्यावर अवतरीत होतात. जे (सैतानांकडे) कान लावतात आणि यांच्या पैकी बहुतेक खोटारडे असतात. आणि कवींचे अनुसरण तर मार्गभ्रष्ट लोक करतात.(अल-क़ुर्आन)

तَنَزَّلُ عَلَىٰ كُلِّ أَفَّاكٍ أَثِيمٍ ﴿٢٢٢﴾

२२२. ते प्रत्येक खोटी गोष्ट रचणाऱ्या दुराचाऱ्यावर अवतरीत होतात. [१८०]

يُلْقُونَ السَّمْعَ وَأَكْثَرُهُمْ كَاذِبُونَ ﴿٢٢٣﴾

२२३. जे (सैतानांकडे) कान लावतात [१८१] आणि यांच्या पैकी बहुतेक खोटारडे असतात.[१८२]

وَالشُّعَرَاءُ يَتَّبِعُهُمُ الْغَاوُونَ ﴿٢٢٤﴾

२२४. आणि कवींचे अनुसरण तर मार्गभ्रष्ट लोक करतात.[१८३]

أَلَمْ تَرَ أَنَّهُمْ فِي كُلِّ وَادٍ يَهِيمُونَ ﴿٢٢٥﴾

२२५. काय तुम्ही पाहत नाही की तो प्रत्येक खिंड दरीत भटकत फिरतात.[१८४]

وَأَنَّهُمْ يَقُولُونَ مَا لَا يَفْعَلُونَ ﴿٢٢٦﴾

२२६. आणि अशा गोष्टी बोलतात ज्या ते करीत नाहीत. [१८५]

إِلَّا الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ وَذَكَرُوا اللَّهَ كَثِيرًا
وَانْتَصَرُوا مِنْ بَعْدِ مَا ظُلِمُوا ۗ وَسَيَعْلَمُ الَّذِينَ ظَلَمُوا
أَيَّ مُنْقَلَبٍ يَنْقَلِبُونَ ﴿٢٢٧﴾

२२७. अशा लोकांखेरीज ज्यांनी ईमान बाळगले, ज्यांनी सत्कृत्ये केलीत, अल्लाहचे अत्याधिक स्मरण केले आणि अशा स्थितीत सूड घेतला जेव्हा त्यांच्यावर अत्याचार झाला होता.[१८६] आणि जे अत्याचार करीत आहेत. त्यांना लवकरच कळून येईल की कोणत्या परिणतिस ते गाठणार आहेत. [१८७]

१८०. मूळ ग्रंथात 'अफ्फाक' हा शब्द प्रयोग केला गेला आहे. ज्याचा अर्थ केवळ खोटे बोलणारे हा नव्हे तर खोटे किस्से, व खोटी कथने रचणारे, खोट्या बातम्या देणारे व आळ घेणारे असा ही आहे. या ठिकाणी प्रामुख्याने अभिप्रेत असलेला अर्थ भविष्यवेत्ता (Sooth Sayers)हा आहे. ज्यांचा धंदाच लोकांना अपरोक्ष वार्ता ऐकविणे व भविष्यात घडणाऱ्या गोष्टींचे भाकीत करणे होय.यासाठी ते सैतानी अमल (काळी विद्या) करतात व सैतानांकडून मदत घेतात ज्योतिषशास्त्राचे फार मोठे साधन ग्रह नक्षत्रांच्या प्रभावाचे ज्ञान हे राहीले आहे, ज्याला इंग्रजीत (Astrology)म्हणतात. परंतु आजच्या काळात अंतरिक्ष विज्ञाना (Astronomy)च्या प्रगतीने ग्रह-नक्षत्रांबाबत शास्त्रीय ज्ञानाचा ढीग रचला. परिणामत:पुरातन ज्योतिष विद्या (Astrology)जी शुभ-अशुभ गोष्टींची चर्चा करीत होती लोप पावत गेली व त्या सोबतच ज्योतीषांचे ही अस्तित्वही लयाला गेले. आजचे ज्योतिष शास्त्र त्याचाच उरला सुरला भाग आहे.

ज्योतिषांचे दुसरे वैशिष्ट्य असे की ते दुराचारी असतात. जेव्हा माणूस खोटे बोलणे हाच धंदा पत्करील तेव्हा त्याच्या चारित्र्यात स्वच्छ-शुद्धता कशा प्रकारे येऊ शकते. तो नितीभ्रष्ट व दुराचारी असू शकतो आणि सैतान आपले नाते अशाच लोकांशी जोडतो.

१८१. म्हणजे जे सैतानाद्वारे हृदयात टाकल्या जाणाऱ्या गोष्टींना अशा प्रकारे कबूल करण्यास तयार असतात, जणू त्यांच्या दिशेनेच यांनी कान लावले असावेत. ध्यान-धारणेत (Maditation) बसून जिन्न किंवा सैतानाच्या गुप्त आदेशाची वाट पहाणे, सैतानाकडे कान लावण्याचे अगदी स्पष्ट स्वरूप होय.

१८२. याचा हा अर्थ नव्हे की यांच्यात काही खरे लोकही असतात किंबहुना याचा अर्थ असा की ते ज्या बातम्या देतात व जी भाकीते वर्तवितात त्यात अधिकांश ते खोटारडे सिद्ध होतात. अगदी क्वचितच असे घडते की त्यांची एखादी गोष्ट खरी ठरावी.

स्पष्ट असावे की हस्तरेषा विद्या जी भविष्य कथन करते. ज्योतिष विद्येचाच एक प्रकार होय तसेच जिन्नात लोकांना हजर करुन त्यांच्याकडून गोष्टी वदवून घेण्याचा दावा तसेच फाल काढणे वगैरे सर्व ढोंग व लोकांना उल्लू बनविण्याच्या गोष्टी आहेत. परंतु अंधश्रद्धाळू लोक जेव्हा त्यांच्या घरी चोरी वगैरे होते तेव्हा 'बाबा' कडे रुजू करतात जे त्यांना चोराची खोटी लक्षणे सांगतात. अंधश्रद्धाळू लोकांना एवढे सुद्धा कळत नाही की जर फाल द्वारे गुन्हेगाराला शोधून काढणे शक्य असते तर हजारो अपराध्यांचा शोध घेण्याची दीर्घ कारवायी पोलीसांना करावी लागली नसती. ते काही फाल काढणाऱ्यांची सेवा घेऊन गुन्हेगारांना शोधू शकले असते. परंतु भ्रम-पूजा व अंधश्रद्धेत गुरफटलेल्या लोकांची मति भ्रष्ट होते.

१८३. हे त्या शंकेचे खंडन होय की कुरआन काव्यात्मक वाणी आहे. कुरआनाची अलंकारीता त्याच्या वाक्यांची आश्चर्यकारक रचना व त्याच्या परिणामकारितेस पाहून इन्कार करणाऱ्यांना जेव्हा काही उतर सुचले नाही तेव्हा ते याचे स्पष्टीकरण असे करतात की हे शेर व शायरी यापलीकडे काहीच नाही. त्यांच्या या स्पष्टीकरणाचे खंडन करीत त्यांना विचार चिंतनाचे आवाहन केले गेले आहे की काय तुम्ही एक कवी व एक पैगंबर या मधला फरक जाणत नाही? कि काव्य व ईश-वाणी यातले तारतम्य कळणे तुम्हाला अवघड वाटते? काय तुम्ही पाहत नाही की कवींकडे कोणते लोक आकर्षित होतात? मार्गभ्रष्ट लोकच त्यांच्या वेड्या गोष्टींना दाद देतात व त्याने प्रभावित होतात. याऊलट ज्यांनी पैगंबरांचे अनुसरण पत्करले त्यांना जे काही आढळले ते सत्य आहे अर्थात पैगंबरांकडून त्यांनी मार्गदर्शनाचा प्रकाश प्राप्त केला आहे. त्यांच्या सदाचरणाला पाहून कदापि हे मत कायम केले जाऊ शकत नाही की हे एका कवीच्या मागे धावणारे लोक आहेत.

स्पष्ट असावे की त्या काळातील कवी मार्गभ्रष्टता पसरविण्यात अग्रेसर होते. इम्रउलकैस तर अरब कवींचा सरदार मानला जात असे आणि काव्याचे सात संग्रह जे काबागृहात लटकविले गेले होते त्यात त्याचे काव्य एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान राखत होते. परंतु त्याचे हे काव्य निरर्थकता, प्रेम चाळे व वाह्यात वर्णनाचे निकृष्टतम उदाहरण होय. आता कोठे हा चारित्र्य बिघडविणारा कवी व कोठे ते चारित्र्य सुशोभित करणारे पैगंबर !

१८४. काव्य वस्तुत: कल्पनेची भरारी होय. म्हणून कवी कधी जमीनीवर असतात तर कधी आकाशात; कधी ते मद्यालयात असतील तर कधी मूर्ति असलेल्या जागी, कधी प्रेयसीच्या प्रतारणेची तक्रार करतील तर कधी तिच्या विरहामुळे आसवांचा वर्षाव करतील. कधी प्रेम-दु:खात प्राण देतील तर कधी दाद देतील, जेव्हा एखाद्याशी नाराज झाले तर तिरस्कार करतील व खुश झाले तर प्रशांसेचा पूल बांधतील. एकीकडे प्रयत्न व परिश्रमाचा पाठ शिकवतील तर दुसरीकडे सुखोपभोगावर प्रवृत्त करतील. अतिशयोक्ति व कल्पना भरारी यांच्या कलेतले नैपुण्य होय.

उदाहरणार्थ--

रगे गुल से बुलबुल के पर बांधते है

यास्तव कवींबाबत कुरआनाचे हे निवेदन की ते प्रत्येक खोऱ्यात भटकत राहतात अगदी वस्तुस्थितीला धरून आहे. आणि हे लक्षात घेता कवी व पैगंबर यामधील फरक अगदी स्पष्ट आहे. पैगंबर सर्वकालीन सत्य असतो आणि मार्गाचिन्हांना स्पष्ट

करीत तो एका निर्धारीत उद्दिष्टाकडे मार्गदर्शन करतो. तो वास्तव गोष्टी बोलतो व वास्तव परिणतींपासून खबरदार करतो. तो परिपूर्ण सत्य असतो व त्याची प्रत्येक गोष्ट काटेकोर असते.

स्पष्ट असावे की कुरआनाने कवींसंबंधी जे काही सांगितले आहे ते केवळ तत्कालीन कवींपुरते मर्यादीत नाही. किंबहुना एक सर्वसामान्य आदेशाचे स्वरुप बाळगते व हेतु यांच्या सर्वसामान्य सवयी व यांच्यात आढळून येणाऱ्या सर्वसामान्य वैगुण्यांचे निवेदन करणे होय. आणि आम्ही असे पाहतो की नंतरच्या काळातही कवींची हीच दशा राहीली व आजही तीच दशा आहे.

अरबी भाषेत फर्जदक व त्याच्या तत्सम कवींनी निंदा व नग्नतेचे वर्णन केले तर फारसीमध्ये खय्याम व तत्सम कवींनी मद्यपान व भोगविलासाची गोडी निर्माण केली. राहीली उर्दू तर मीर काय नि गालीब काय सर्वांचा काव्य-विषय प्रेम-दु:ख हाच होता आणि आता ज्याअर्थी भौतिक व अर्थविषयक चळवळी चालू लागल्यास काव्य विषय अर्थोपार्जजनाचे दु:ख हा आहे.

हदीस वचनात अशा काव्याला तिरस्करणीय ठरविले गेले आहे ज्या विचार व बुद्धिवर आणि चारित्र्यावर वाईट परिणाम घडवितात.

لَاَنْ يَمْتَلِئَ جَوْفُ رَجُلٍ قَيْحاً خَيْرٌ لَّهُ مِنْ اَنْ
يَمْتَلِئَ شِعْرًا ۔ (بخاری کتاب الادب)

‘एखाद्या माणसाचे पोट रक्त-पू ने भरले जाणे अधिक चांगले, याहून की ते काव्याने भरलेले असावे’

(बुखारी किताबुल अदब)

१८५. हे कवी जनांचे सर्वात मोठे वैगुण्य होय. ज्याकडे लक्ष वेधविले गेले आहे. ते संभाषाणाच्या क्षेत्रात मोठे पराक्रमी असतात पण आचरणाच्या क्षेत्रात पराक्रमी बनत नाही. कारण त्यांचा मूळ हेतु काव्य रचना हाच असतो जेणेकरून लोकांकडून वाहवा मिळवावी. ते चारित्र्यहीन असतात. चारित्र्य संपन्न नव्हे. आणि फक्त बोलके असतात काम करणारे नव्हे. या उलट पैगंबर जे काही सांगतो ते स्वत: कृतीत आणतो व जी शिकवण देतो त्यावर स्वत: आचरण करतो. येथपावेतो की त्याचे जीवन उत्कृष्ट चारित्र्य व उत्तम गुण वैशिष्ट्यांचा आदर्श बनते.

१८६. वर ज्या मार्गभ्रष्ट कवींचा उल्लेख केला गेला त्याला अपवाद असे कवी आहेत ज्यांच्या अंगी हे चार गुण आढळून येतील (१) ते ईमान धारक असावेत (२) आचरणाच्या दृष्टीने ते सदाचारी असावेत (३) अल्लाहचे अत्याधिक स्मरण करणारे असावेत आणि अल्लाहचे नाम: स्मरण यांच्या वाणीत अशा प्रकारे भिनली जावी की ज्याने ही त्यांचे काव्य ऐकावे त्याला ईश्वराचे स्मरण व्हावे (४) त्याने एखाद्यास बरेवाईट बोलावे तर तिरस्कारापायी नव्हे तर आपल्या सरक्षणासाठी कारण अत्याचार पिडीतास अत्याचारी इसमाविरुद्ध बोलण्याचा अधिकार आहे.

नंतर प्रेषित दरबारातील जे कवी होऊन गेले त्यांच्या अंगी ही सर्व गुणवैशिष्ट्ये आढळून येत व त्या सर्वात विशेष स्थान हजरत हस्सान (रजि.) यांचे होते.

कुरआनाच्या निवेदनाने अगदी उघड आहे की तो शेरशायरीला प्रोत्साहन देत नाही आणि ना काव्य वाचनाला किंबहुना सक्त शर्तीवर केवळ सूट देतो. जर एखादा कवी या शर्ती व बंधनांचे पालन करीत इस्लामच्या संरक्षणासाठी किंवा योग्य इस्लामिक चैतन्य निर्माण करण्यासाठी काव्य करतो तर हदीस वचनातील उल्लेखानुसार अल्लाहकडून त्याचे समर्थनही होते.

१८७. याला अभिप्रेत असे लोक होत जे स्वत:मार्गभ्रष्ट आहेत व इतरांनी ही मार्गदर्शनाचा मार्ग प्राप्त करू नये असे इच्छितात. म्हणून ते पैगंबर व त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध अत्याचार व अतिरेकाचे स्तर गाठतात. थोड्याच काळानंतर अत्याचारांची जी पणिती या जगात झाली त्याविषयी कोण अनभिज्ञ आहे?

# २७. सूरह अन-नम्ल

**नावः** आयत क्र. १८ मध्ये हजरत सुलेमान यांचा वादी ए नमल अर्थात मुंग्याच्या खोऱ्यावरून जाण्याचा व मुंग्याचे म्हणणे ऐकण्याचा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगाने या सूरहचे नाव अन्नमल असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की होय आणि मजकूरांवरून असे दिसून येते की ही सूरह शुअरा नंतर अवतरली असावी.

**मध्यवति कल्पनाः** कुरआनास अल्लाहचा ग्रंथ मानण्यात व शिर्क (अनेकेश्वर भक्ति) पासून थांबण्यात सर्वात मोठा अडसर म्हणजे आखिरतचा इन्कार होय. जे लोक ऐहीक सुकविलासात मग्न राहू इच्छितात, त्यांच्यावर ना कुरआनाच्या उपदेशाचा काही परिणाम होतो आणि ना प्रेषितांच्या इतिहासापासून ते एखादा बोध ग्रहण करतात.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ६ मध्ये मार्गदर्शन रूपी सूर्याचा अर्थात कुरआनाचा उल्लेख केला गेला आहे, जो क्षितिजामधून उदयास येऊन  ईमान बाळगणाऱ्यांना सदैवकालीन यशाची शुभ वार्ता देत आहे. परंतु ते लोक याच्या लाभ प्राप्ती पासून वंचित आहेत जे जगाच्या गुंतावळ्यात अडकून पडले आहेत, व असे इच्छित नाही की एखाद्या अशा विश्वा (आखिरत) ची गोष्ट ऐकावी जेथे माणसाच्या आचरणाचा बरा-वाईट मोबदला दिला जाईल.

आयत क्र. ७ ते १४ मध्ये हजरत मूसा यांच्या वृत्तांताचा काही भाग निवेदिला गेला आहे, ज्यावरून हे स्पष्ट होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने फिरऔन व त्याच्या जन समूहाकडे केवढा महान पैगंबर पाठविला होता व त्यांनी आपल्या राज्यसत्तेच्या घमेंडीत त्याच्याशी कोणते वर्तन केले, व शेवटी त्यांची  काय गत झाली !

आयत क्र. १५ ते ४४ मध्ये हजरत दाऊद व हजरत सुलेमान यांच्या अतिभव्य साम्राज्याचा उल्लेख करून त्यांच्या या चारित्र्यास ते कशा प्रकारे अल्लाहचे कृतज्ञ बनून राहीले व हजरत सुलेमान यांनी कशा प्रकारे आपल्या सत्तेला इस्लाम प्रसाराचे माध्यम बनविले व याचा परिणाम म्हणून सबा-राणी (बिल्कीस) ने कशा प्रकारे इस्लाम धर्म स्विकारला.

आयत क्र. ४५ ते ५८ मध्ये हजरत स्वालेह आणि हजरत लूत यांच्या वृत्तांताचा एक भाग प्रस्तुत केला गेला आहे. ज्यावरून हे स्पष्ट होते की त्यांच्या जन-समूहांनी त्यांच्या आवाहनाचा अव्हेर करून जमीनीवर उत्पात माजविण्याचे जे काम केले त्याची कशी धडा शिकण्याजोगी शिक्षा त्यांना मिळाली.

आयत क्र. ५९ ते ७५ मध्ये एकेश्वर वादाची प्रमाणे आणि आखिरतचा विश्वास निर्माण करणाऱ्या गोष्टी मांडल्या गेल्या आहेत

आयत ७६ ते ९३ मध्ये ही घोषणा केली गेली आहे की कुरआनाने मार्गदर्शनाचा मार्ग खुला केला आहे आणि याच्या सत्यतेची चिन्हे भविष्यात ही उघड होत राहतील.

# २७. सूरह अन-नम्ल

سُوْرَةُ النَّمْلِ

(आयती-९३)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. ता. सीन [१] या आयती आहेत कुरआन व दिव्य ग्रंथाच्या. [२]

طٰسٓ ۚ تِلْكَ اٰيٰتُ الْقُرْاٰنِ وَكِتَابٍ مُّبِيْنٍ ۙ ﴿١﴾

२. ईमान बाळगणाऱ्यांकरीता हे मार्गदर्शन व शुभ वार्ता होय.

هُدًى وَّبُشْرٰى لِلْمُؤْمِنِيْنَ ۙ ﴿٢﴾

३. जे नमाज कायम करतात, जकात देतात आणि हेच होत जे आखिरत वर विश्वास ठेवतात. [३]

الَّذِيْنَ يُقِيْمُوْنَ الصَّلٰوةَ وَيُؤْتُوْنَ الزَّكٰوةَ وَ
هُمْ بِالْاٰخِرَةِ هُمْ يُوْقِنُوْنَ ﴿٣﴾

४. जे आखिरत (परलोक) वर ईमान राखत नाही, आम्ही त्यांची कृत्ये त्यांच्या करीता शोभायमान बनविली आहेत. [४] यास्तव ते भटकत फिरतात. [५]

اِنَّ الَّذِيْنَ لَا يُؤْمِنُوْنَ بِالْاٰخِرَةِ زَيَّنَّا لَهُمْ اَعْمَالَهُمْ
فَهُمْ يَعْمَهُوْنَ ۗ ﴿٤﴾

५. अशा लोकांकरीता जगात देखील अजाब (ईश-शिक्षा) आहे [६] व आखिरत मध्ये ही ते वाईट रित्या नाश पावतील.

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ لَهُمْ سُوْٓءُ الْعَذَابِ وَهُمْ فِي الْاٰخِرَةِ
هُمُ الْاَخْسَرُوْنَ ﴿٥﴾

६. आणि निःसंशय हे कुरआन तुम्ही सर्वज्ञ व बुद्धिकौशल्य बाळगणाऱ्या (ईश्वरा) कडून प्राप्त करीत आहात. [७]

وَاِنَّكَ لَتُلَقَّى الْقُرْاٰنَ مِنْ لَّدُنْ حَكِيْمٍ عَلِيْمٍ ﴿٦﴾

७. जेव्हा मूसाने आपल्या कुटुंबियांना सांगितले, मी एक आग पाहीली आहे. मी तेथून एखादी खबर घेऊन येतो किंवा विस्तव आणतो, यासाठी की तुम्ही उण्णता प्राप्त करावी. [८]

اِذْ قَالَ مُوْسٰى لِاَهْلِهٖٓ اِنِّيْٓ اٰنَسْتُ نَارًا ۭ سَاٰتِيْكُمْ مِّنْهَا بِخَبَرٍ اَوْ اٰتِيْكُمْ
بِشِهَابٍ قَبَسٍ لَّعَلَّكُمْ تَصْطَلُوْنَ ﴿٧﴾

१. ही त्रुटक अक्षरे होत. आणि यांचा संकेत, आम्ही या पूर्वी स्पष्टीकरण केल्या प्रमाणे सूरहच्या विशिष्ट मजकूराकडे असतो.'ता' चा संकेत तैर म्हणजे पक्षी कडे आहे ज्याचा उल्लेख आयत क्र. १६ मध्ये या स्वरूपात केला गेला आहे की त्यांची बोली हजरत सुलेमान यांना शिकविली गेली होती.

'सीन'चा संकेत सुलेमान यांच्याकडे ही आहे व सबा कडे ही ज्याचा उल्लेख क्रमशः आयत क्र. १६ व २२ मध्ये केला गेला आहे.

२. म्हणजे कुरआन काय आहे एक दिव्य ग्रंथ व या त्यातल्या आयती (वचने) होत. कुरआनाचे आवाहन व त्याची शिकवण इतकी स्पष्ट आहे की असा प्रत्येक मनुष्य जो शुद्ध विचारसरणीने याचे पठण करील किंवा ऐकील तो याच्या उद्दिष्टाप्रत पोहचू शकतो.

अरबी भाषा न जाणणारे हा लाभ भाषांतरांच्या साहाय्याने ही प्राप्त करू शकतात मात्र या अटीवर की भाषांतर योग्य असावे.राहीली भाष्ये, तर त्यांच्या लाभापासून इन्कार केला जाऊ शकत नाही. परंतु असे समजणे योग्य नव्हे की भाष्या शिवाय कुरआनास समजणे अशक्य आहे. असे कितीतरी मुस्लिमेतर लोक आहेत ज्यांनी कुरआनाचा अनुवाद वाचला व त्यांना ईमानाची दौलत लाभली.

३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.७ व १०

४. मनुष्य जेव्हा आखिरतचा इन्कार करतो तेव्हा इहलोक हेच त्याचे ध्येय बनते, परिणामतः त्याचे वर्तन चुकीचे ठरते परंतु ज्याआर्थी ऐहीक लाभ हेच उद्दिष्ट असते म्हणून दुष्कृत्ये असेल तरी त्याच्या नजरेत चांगली वाटतात. याच कारणस्तव आज फॅशन, नाविन्य प्रियता व प्रगतीच्या नावाने अतिश्य घाणेरडे आचरण व निकृष्ट कार्याची अभिव्यक्ति होत आहे जर विचार चुकीचे असतील तर आचरण ही चुकीचेच होइल. पर्यायाने आवडी-निवडीचे स्तर देखील चुकीचे ठरेल. ही मानसिकता अल्लाहने निर्धारीत केलेल्या मार्गभ्रष्टतेच्या नियमानुसार ठरते. म्हणून याचा असा अर्थ घेतला गेला आहे की आम्ही त्यांच्या कृत्यांना त्यांच्यासाठी शोभीवंत बनविले आहे.

५. आखिरतचा इन्कार केल्याच्या परिणामी मनुष्य सन्मार्गाला ही पारखा होतो, व विश्वासाच्या धनालाही मग त्याच्यासाठी इतरत्र भटकत राहणे निश्चित ठरते. आज मानव जातीस पहा, कशाप्रकारे भटकत आहे. कोणी कम्युनिजमकडे धाव घेत आहे तर कोणी नॅशनॅलीझमला आपले ध्येय ठरवित आहे. कोणी भेदभाव मिटविण्यासाठी सर्व धर्म सारखे आहेत हा राग आळवीत आहे तर कोणी आपल्या संस्कृतीस संगठनाचा आधार दर्शवित आहे. कोणी जातीय वादाला खतपाणी घालू इच्छिथतात. कोणाला फूट पाडण्याच्या कार्यापासून सवड मिळत नाही, तर कोणी दहशतवादाचा भयानक नमूना सादर करीत आहे. तात्पर्य आखिरतचा इन्कार केल्यानंतर माणसांच्या प्रयत्नाचे कोणतेही एक केंद्र राहीले नाही.

६. ज्या जनसमूहास पैगंबर, अल्लाहचा संदेश प्रत्यक्ष रित्या पोहचवितो व मग तो इन्कार करतो मग या इन्कार करणाऱ्या जन-समूहावर असा अजाब (अल्लाहच्या शिक्षेचा आसूड) ओढ व तो की संपूर्ण जन-समूह नावाला सुद्धा उरत नाही. परंतु ज्यांना इतर माध्यमान्वचे संदेश पोहचतो व ते यास कबूल करीत नाही व आखिरतचा इन्कार करण्यावर अटळ राहतात त्यांना तद्नुसार जगात शिक्षा लाभते. आज जगातल्या कानाकोपऱ्यात संकटांचे अवतरण एवढ्या विपुलतेने होत आहे की यापूर्वी कदाचित कधी ही एवढी संकटे आली नसतील.

७. कुरआनातले मजकूर या गोष्टीची साक्ष देत आहेत की हे मानवाचे लेखन नव्हे, किंबहुना सर्वज्ञानी व बुद्धिकौशल्य बाळगाणाऱ्या अल्लाहची वाणी आहे. कारण यात ज्ञान व अध्यात्म आणि विद्वत्ता व बुद्धिकौशल्याचे अद्वितीय खजीने लपलेले आहेत.

८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टिप क्र. ९

८. जेव्हा तो तिच्या जवळ पोहचला तेव्हा साद घातली गेली. शुभ आहे ते जे या अग्नित आहे व जे याच्या आसपास आहे. आणि पवित्र आहे अल्लाह, सर्व विश्वांचा स्वामी .[९]

فَلَمَّا جَآءَهَا نُودِيَ أَنۢ بُورِكَ مَن فِي ٱلنَّارِ وَمَنْ حَوْلَهَا وَسُبْحَٰنَ ٱللَّهِ رَبِّ ٱلْعَٰلَمِينَ ﴿٨﴾

९. हे मूसा, मी अल्लाह आहे. वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा

يَٰمُوسَىٰٓ إِنَّهُۥٓ أَنَا ٱللَّهُ ٱلْعَزِيزُ ٱلْحَكِيمُ ﴿٩﴾

१०. आणि तुम्ही आपली काठी खाली टाका. जेव्हा त्याने पाहीले की ती सापा सारखी हालचाल करीत आहे तेव्हा तो पाठ फिरवून पळाला आणि त्याने वळून देखील पाहीले नाही.[१०]हे मूसा ! भिऊ नका. माझ्या समोर पैगंबर भित नसतात.[११]

وَأَلْقِ عَصَاكَ ۚ فَلَمَّا رَءَاهَا تَهْتَزُّ كَأَنَّهَا جَآنٌّ وَلَّىٰ مُدْبِرًا وَلَمْ يُعَقِّبْ ۚ يَٰمُوسَىٰ لَا تَخَفْ إِنِّي لَا يَخَافُ لَدَيَّ ٱلْمُرْسَلُونَ ﴿١٠﴾

११. परंतु ज्याच्या हातून गुन्हा घडला असेल. मग (जर त्याने) दुष्कृत्यास सत्कृत्याने बदलविले असेल तर मी माफ करणारा, दया करणारा आहे.[१२]

إِلَّا مَن ظَلَمَ ثُمَّ بَدَّلَ حُسْنًۢا بَعْدَ سُوٓءٍ فَإِنِّي غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١١﴾

१२. आणि तुम्ही आपला हात गळपट्टीत टाका तो कसल्या ही वैगुण्या शिवाय तेजस्वी होऊन निघेल.[१३] हे नऊ निशाण्यांपैकी आहे.[१४] ज्यासह तुम्ही फिरऔन व त्याच्या जन-समूहाजवळ जा. ते मोठे दुराचारी लोक आहेत.[१५]

وَأَدْخِلْ يَدَكَ فِي جَيْبِكَ تَخْرُجْ بَيْضَآءَ مِنْ غَيْرِ سُوٓءٍ ۖ فِي تِسْعِ ءَايَٰتٍ إِلَىٰ فِرْعَوْنَ وَقَوْمِهِۦٓ ۚ إِنَّهُمْ كَانُوا۟ قَوْمًا فَٰسِقِينَ ﴿١٢﴾

१३. परंतु जेव्हा त्यांच्या समोर आमच्या स्पष्ट निशाण्या आल्या, तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

فَلَمَّا جَآءَتْهُمْ ءَايَٰتُنَا مُبْصِرَةً قَالُوا۟ هَٰذَا سِحْرٌ مُّبِينٌ ﴿١٣﴾

१४. त्यांनी अत्याचार व अहंकारापायी यांचा इन्कार केला वास्तविक पहाता त्यांना आपल्या मनात विश्वास बसला होता. तर पहा, दुराचाऱ्यांचा कसा परिणाम झाला ![१७]

وَجَحَدُوا۟ بِهَا وَٱسْتَيْقَنَتْهَآ أَنفُسُهُمْ ظُلْمًا وَعُلُوًّا ۚ فَٱنظُرْ كَيْفَ كَانَ عَٰقِبَةُ ٱلْمُفْسِدِينَ ﴿١٤﴾

१५. आम्ही दाऊद व सुलेमान यांना ज्ञान प्रदान केले, आणि ते म्हणाले, आम्ही अल्लाहशी कृतज्ञ आहोत[१९] ज्याने आम्हाला आपल्या असंख्य ईमान बाळगणाऱ्या दासांवर श्रेष्ठत्व प्रदान केले.[२०]

وَلَقَدْ ءَاتَيْنَا دَاوُۥدَ وَسُلَيْمَٰنَ عِلْمًا ۖ وَقَالَا ٱلْحَمْدُ لِلَّهِ ٱلَّذِي فَضَّلَنَا عَلَىٰ كَثِيرٍ مِّنْ عِبَادِهِ ٱلْمُؤْمِنِينَ ﴿١٥﴾

९. हजरत मूसा यांना जी आग दिसली होती ती जळणारी आग नव्हती, अन्यथा त्यांनी तिच्यातून विस्तव आणाला असता. किंबहुना ती एक असामान्य आग होती. जिच्या आवरणात समृद्धशाली अल्लाह त्यांच्याशी बोलत होता. आणि या आगीच्या सभोवताली फरिश्ते राहीले असतील, जसे वर्णन शैलीवरून जाहीर होते व ज्यांचे अस्तित्व मंगलदायी व समृद्धीकारक होते.

त्या वेळी हजरत मूसा प्रवासात होते. रात्र अंधारमय व सर्दीची होती. अंधार एवढा की मार्ग देखील उमजत नव्हता. अशा स्थितीत अकस्मात अपरोक्ष वाणी ऐकू येणे एक अशी वस्तुस्थिती होती की तशात उत्साह कायम ठेवणे वु बुद्धिला एकाग्र करणे सोपे नव्हते, म्हणून अपरोक्षवाणी (वह्य) ने सर्वप्रथम त्यांना हे समाधान दिले की ही साद त्या समृद्धशाली हस्तीची आहे जो सर्व सृष्टीचा स्वामी आहे आणि या पवित्र अग्नीत फरिश्तेही अवतरले आहेत जे मंगलदायी आहेत. सैतान व त्याच्या उपद्रवापासून या संपूर्ण वातावरणास सुरक्षित राखले गेले आहे.

यावरून ही वास्तविकता ही स्पष्ट झाली की प्रेषितत्व एखादी अशी गोष्ट नव्हे की माणसाला प्रयत्नांनी प्राप्त करता यावी किंबहुना ते असे पद आहे ज्याद्वारे अल्लाह इच्छिल त्याला, वाटेल त्यावेळी सम्मानित करतो. ज्या प्रकारे हजरत मूसाना न कळतच प्रेषितत्व प्रदान केले गेले तद्‌वतच हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना गारेहिरा मध्ये अगदी न कळत पैगंबरपद लाभले. प्रेषितत्व अचानक लाभणे हे पैगंबरांच्या सत्यतेचे ठोस प्रमाण होय अन्यथा जो मनुष्य खोटा दावा करतो तो आधीपासूनच त्यासाठी बौद्धिक, ज्ञानविषयक, आचरविषयक तयारी करतो. राहीला हा प्रश्न की हजरत मूसा यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहचा आवाज कसा ओळखला. प्रथम हे की निर्मिती आपल्या निर्मात्याच्या स्वराशी अपरिचित असू शकत नाही. दासाला जेव्हा पालनकर्ता हाक मारील तेव्हा तो निश्चितपणे त्याचा आवाज ओळखेल. दुसरे असे की पैगंबराचे जाणणे एका स्वच्छ शुद्ध आत्म्याचे जाणणे असते व ते हृदयात विश्वास निर्माण करते की हा माझ्या पालनकर्त्याचा आवाज आहे कि त्याच्याकडून 'वह्य' होत आहे जी अवतरीत होत आहे. तिसरे असे की वही अवतरीत असतांना वातावरण असे बनविले जाते की सैतानाने उद्‌भविलेले कुविचार मनात येत नाही व मनाला समाधान वाटते आणि चौथे हे की जे 'वह्य' अवतरीत होते ते आपल्या मजकूर व अर्थाच्या दृष्टीने अल्लाहची वाणी असण्याचे 'चक्षुर्वैसत्य' प्रमाण ठरते.

'पवित्र आहे अल्लाह, सर्व विश्वाचा स्वामी' असे जे फर्माविले गेले आहे, तर हा या गोष्टीकडे संकेत होय की अल्लाहचा आवाज आगीतून येत असला तरी अल्लाहचे अस्तित्व या गोष्टीपासून अलिप्त आहे की त्याने एखाद्या वस्तूत मर्यादित होऊन रहावे किंवा एखाद्या वस्तूत प्रवेश करावा. तो तर अर्श (ईश-सिंहासना) वर विराजमान आहे. आणि प्रत्येक दासाच्या मुख्य रक्तवाहीनीपेक्षा ही अधिक जवळ आहे. तसेच तो आकाशांमध्ये व जमीनीवर ही आहे. जसे कुरआनात अन्य एका ठिकाणी फर्माविले गेले आहे-

وَهُوَ اللهُ فِي السَّمٰوٰتِ وَفِي الْأَرْضِ۔ (انعام۔٣)

'आणि अल्लाह आकाशांमध्येही आहे व जमीनीवर देखील' (अन-आम-३)

अर्थात ज्याप्रमाणे तो आकाशामध्ये व जमीनीवर असण्याचा हा अर्थ नव्हे की तो (अल्लाह रक्षण करो) अर्श सोडून आकाश व जमीनीवर प्रविष्ट झाला आहे, त्याचप्रमाणे हजरत मूसा यांना त्याचे हे फर्माविणे की لَيْسَ كَمِثْلِهٖ شَيْءٌ ''शुभ आहे तो जो या आगीत आहे'' चा अर्थ देखील हा नव्हे की त्याचे एखादे शारिरीक अस्तित्व आहे, जे आगीत आहे. त्याचे गुणवैशिष्ट्य हेच की त्याच्या सारखी कोणतीही गोष्ट नाही यास्तव निर्मितीवरून त्याच्याविषयी कायस करणे मुळीच योग्य नव्हे, किंबहुना ही उघड मार्गभ्रष्टता होय.

भौतिक जगात तर आम्ही या गोष्टीचे अवलोक न करतोच की आरशात माणसाला प्रतिबिंब दिसून येते, वस्तुतः तो आरशात नसतो आणि आज 'दुरदर्शनच्या पडद्यावर बोलणाराही दिसतो व त्याचा आवाज ही ऐकू येतो. जेव्हा तो टी व्ही. च्या आत बसलेला नसतो. भौतिक जगाची जेव्हा ही दशा आहे तेव्हा अल्लाहच्या अद्वितीय अमर्याद असण्याबद्दल इन्कार कसा केला जाऊ शकतो?

१०. हा दृष्टीचा प्रभाव होता. सापला वळवळतांना पाहून हज़रत मूसा भयग्रस्त झाले.

११. म्हणजे अल्लाह जेव्हा एखाद्यास प्रेषितत्वाकरीता निवडून आपल्या समक्ष बोलवितो तर त्याला भिती बाळगण्याचे काही एक कारण नसते. तो प्रत्येक प्रकारच्या उपद्रवापासून, आपत्तिपासून त्याच्या समोर सुरक्षित व शांततेत असतो. यास्तव हा जो साप तुम्ही पाहात आहात तो तुम्हाला कदापि नुकसान पोहचवू शकत नाही.

१२. राहीली ती भिती जी आपल्या एख़ाद्या अपराधापोटी असेल तर त्या विषयी हा दिलासा दिला गेला आहे की जर भूतकाळात तुमच्या हातून एखादी चूक घडली असेल तर अल्लाह मानगूट धरणार नाही जेव्हा तुम्ही यानंतर सदाचाराचे वर्तन अंगिकाराल. हा इशारा होता हत्या अपराधाकडे जो हजरत मूसा यांच्या हातून घडला होता. या विषयीचा तपशील सूरह कसस मध्ये निवेदिला गेला आहे.

१३. हा दूसरा ईश-चमत्कार होता. जो हजरत मूसा यांना प्रदान केला गेला. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. २३

१४. नऊ निशाण्यांच्या तपशीलाकरीता पहा सूरह बनी इस्राईल टीप. १३२.

१५. फिरऔन व त्याच्या जन समूहाला दुराचारी म्हटले गेले, वस्तुत: हजरत मूसांनी त्यांना अद्याप आवाहन केले नव्हते. याचे कारण असे की है लोक पैगंबरीय शिकवणीशी अगदीच अनभिज्ञ नव्हते कारण मिस्र (इजिप्त) मध्ये हजरत युसूफ यांनी सखोल परिणाम मागे सोडले होते, आणि बनी इस्राईल कितीही बिघडलेले असोत, शेवटी मुसलमानच होते. म्हणून त्यांच्याद्वारे अल्लाह व आखिरत विषयीच्या गोष्टी थोड्याफार प्रमाणात निश्चित पोहचत राहील्या असाव्यात आणि मूळ गोष्ट ही की मनुष्य स्वभाव उघड अशा दुराचाराला व अपराधाना जाणतो. उदाहरणार्थ अत्याचार व अतिरेक, अनैतिकता, गर्व व घमेंड़ आणि आपल्या पालनकर्त्या विरूद्ध बंड वगैरे परंतु फिरऔन व त्याच्या जन समूहाने आपल्या विवेक बुद्धीची गळचेपी करून अत्याचार व अपराधाचे वर्तन अंगिकारले होते, म्हणून तो दुराचारी म्हटला जाण्यासच पात्र होता.

यावरून ही तात्विक बाब ही स्पष्ट होते की ज्या लोकांनी स्वत:ला दुराचाराच्या मार्गास लावले असावे त्यांना दुराचारीच म्हटले जाईल मग त्यांना सत्य धर्मीचे (इस्लामचे) आवाहन केले असो किंवा नसो.

१६. म्हणजे त्यांना या गोष्टीवर विश्वास बसला होता की हजरत मूसा ज्या निशाण्या दाखवित आहेत त्या जादू नव्हेत तर ईश-चमत्कार होत. आणि ते खरोखर अल्लाहचे पैगंबर आहेत हा विश्वास असतांनाही त्यांनी ईमान बाळगण्याच्या मार्गात जो अडसर आला तो त्यांचा अत्याचार व गर्व होता. अत्याचार माणसाला सत्य प्रियतेपासून दूर राखतो. आणि गर्व त्याला या गोष्टीस प्रवृत्त होऊ देत नाही की त्यांने आपल्या स्थानावरून खाली उतरून सत्य स्विकारावे, यावरून ही गोष्ट देखील स्पष्ट होते की मूळ गोष्ट मनाने मान्य करणे होय. आणि ईमान हृदयापासून असल्याखेरीज विश्वसनीय नाही.

१७. या परिणामाचे विवरण सूरह युमूस, सबरह ताहा आणि सूरह शुअरा मध्ये निवेदिले गेले आहे.

१८. यास अभिप्रेत विशेष ज्ञान होय जे एक विशाल, अद्वितीय साम्राज्यास न्याय व इस्लामी आदर्शानुसार चालविण्याकरीता आवश्यक होते. बायबल मधील उल्लेख असा-

'देवाने (अल्लाहने) शलोमोनास अलोट शहाणपण व बुद्धि दिली आणि समुद्रकांठच्या वाळूसारखे विशाल मन दिले. शलमोनाचे (सुलैमानचे) शहाणपण सर्व पूर्व देशानिवासी आणि मिसरी यांच्याहून अधिक होते' (१ राजे ४ २९, ३० )

१९. आणि फिरऔनचे उदाहरण होऊन गेले ज्याला अधिकार मिळाला तर घमेंड करू लागला व अत्याचाराच्या पातळीवर उतरला. याऊलट दुसरीकडे हजरत दाऊद व हजरत सुलेमान यांची उदाहरणे होत ज्यांना सत्ताधिकार लाभला तर त्यांनी अल्लाहचा कृपा लाभ समजून त्याचा उचित वापर केला व अल्लाहचे कृतज्ञ दास बनून राहीले.

२०. श्रेष्ठत्व या नात्याने की खिलाफत व राज्य शासनाद्वारे उपकृत केले. आणि आपल्या विशेष कृपेने अशा गोष्टी प्रदान केल्यात ज्या शिरोमुकुट ठरल्या.

**आणि दाऊद चा वारसदार सुलेमान झाला. तो म्हणाला, लोक हो ! आम्हाला पक्ष्यांची बोली शिकवली गेली आहे. आणि आम्हाला सर्व काही प्रदान केले गेले आहे. निःसंशय ही अल्लाहची उघड कृपा होय.(अल-क़ुर्आन)**

१६. आणि दाऊद चा वारसदार सुलेमान झाला.[२१] तो म्हणाला, लोक हो ! आम्हाला पक्ष्यांची बोली शिकवली गेली आहे.[२२] आणि आम्हाला सर्व काही प्रदान केले गेले आहे.[२३] नि:संशय ही अल्लाहची उघड कृपा होय.[२४]

وَوَرِثَ سُلَيْمٰنُ دَاوٗدَ وَقَالَ يٰٓاَيُّهَا النَّاسُ عُلِّمْنَا مَنْطِقَ
الطَّيْرِ وَاُوْتِيْنَا مِنْ كُلِّ شَيْءٍ ۭ اِنَّ هٰذَا لَهُوَ الْفَضْلُ الْمُبِيْنُ ﴿١٦﴾

१७. आणि सुलैमान करीता त्याचे लष्कर जे जिन्न, मनुष्य व पक्ष्यांपैकी होते[२५] जमा केले गेले होते व पंक्ति-बद्ध केले जात होते.[२६]

وَحُشِرَ لِسُلَيْمٰنَ جُنُوْدُهٗ مِنَ الْجِنِّ وَالْاِنْسِ
وَالطَّيْرِ فَهُمْ يُوْزَعُوْنَ ﴿١٧﴾

१८. येथपावेतो की जेव्हा ते मुंग्यांच्या खोच्यात पोहचले.[२७] तेव्हा एक मुंगी म्हणाली मंग्यांनो ! आपापल्या बिळात शिरा असे न व्हावे की सुलेमान व त्याचे लष्कराने तुम्हाला पायदळी तुडवावे व त्यांना खबर ही न व्हावी.[२८]

حَتّٰٓى اِذَآ اَتَوْا عَلٰي وَادِ النَّمْلِ ۙ قَالَتْ نَمْلَةٌ يّٰٓاَيُّهَا النَّمْلُ ادْخُلُوْا
مَسٰكِنَكُمْ ۚ لَا يَحْطِمَنَّكُمْ سُلَيْمٰنُ وَجُنُوْدُهٗ ۙ وَهُمْ لَا يَشْعُرُوْنَ ﴿١٨﴾

१९. सुलैमान त्यांच्या बोलण्यावर हसला.[२९] आणि त्याने दुआ केली की, हे माझ्या पालनकर्त्या! मला ही सुबुद्धि प्रदान कर की मी तुझ्या या अनुग्रहाबद्दल कृतज्ञ राहावे, जो तू माझ्यावर व माझ्या माता पित्यांवर केला आहे आणि सत्कृत्ये करावी,ज्या पासून तू प्रसन्न व्हावे.[३०]आणि आपल्या कृपेने मला आपल्या सदाचारी दासांमध्ये सामील कर.[३१]

فَتَبَسَّمَ ضَاحِكًا مِّنْ قَوْلِهَا وَقَالَ رَبِّ اَوْزِعْنِيْٓ اَنْ اَشْكُرَ
نِعْمَتَكَ الَّتِيْٓ اَنْعَمْتَ عَلَيَّ وَعَلٰي وَالِدَيَّ وَاَنْ اَعْمَلَ صَالِحًا
تَرْضٰىهُ وَاَدْخِلْنِيْ بِرَحْمَتِكَ فِيْ عِبَادِكَ الصّٰلِحِيْنَ ﴿١٩﴾

२०. आणि त्याने पक्ष्यांचे निरीक्षण केले तेव्हा म्हटले, काय गोष्ट आहे, मला हुदहुद दिसून येत नाही. काय तो गायब झाला आहे?[३२]

وَتَفَقَّدَ الطَّيْرَ فَقَالَ مَا لِيَ لَآ اَرَى الْهُدْهُدَ ڮ اَمْ كَانَ
مِنَ الْغَاۗىِٕبِيْنَ ﴿٢٠﴾

२१. मी त्याला सक्त शिक्षा देईन[३३] किंवा जबह करून (कापून) टाकीन अथवा त्याने माझ्या समोर स्पष्ट प्रमाण सादर करावे.[३४]

لَاُعَذِّبَنَّهٗ عَذَابًا شَدِيْدًا اَوْ لَاَاذْبَحَنَّهٗٓ اَوْ لَيَاْتِيَنِّيْ
بِسُلْطٰنٍ مُّبِيْنٍ ﴿٢١﴾

२२. काही जास्त वेळ झाला नाही की तोच येऊन म्हणाला, मी अशा गोष्टी जाणून घेतल्या आहेत ज्याविषयी आपण पूर्णत: जाणकार नाहीत. मी सबाहून विश्वसनीय खबर घेऊन आलो आहे.[३५]

فَمَكَثَ غَيْرَ بَعِيْدٍ فَقَالَ اَحَطْتُّ بِمَا لَمْ تُحِطْ بِهٖ
وَجِئْتُكَ مِنْ سَبَاٍۢ بِنَبَاٍ يَّقِيْنٍ ﴿٢٢﴾

२१. वारस याचा अर्थ मालमत्तेचा वारस असणे नव्हे, तर पैगंबरीय ज्ञानाचा व खिलाफत पदाचा वारस असणे होय. जर मालमतेचा वारस हा अर्थ अभिप्रेत असता तर केवळ हजरत सुलेमान यांचा उल्लेख केला गेला नसता कारण हजरत दाऊद यांना इतर ही संतती होती. या व्यतिरिक्त जसे हदीस बचनात फर्माविले गेले आहे पैगंबरांचा वारसा. विभजित होत नाही (पहा सूरह मरीयम टीप क्र.८) आणि ह्या प्रसंगीची वाणी सुद्धा या गोष्टीस प्रमाण होय की या ठिकाणी मालमत्तेच्या वारसा विषयी चर्चा नाही. बायबल मधील उल्लेख असा-

'मग शलमोन आपला बाप दावीद यांच्या गादीवर बसला.त्याने आपल्या राज्यास चांगली बळकटी आणिली. (१राजे २:१२)

२२. जेथपावेतो या गोष्टीचा संबंध आहे की पक्षी कोणत्या न कोणत्या स्तरा पर्यंत सुज्ञता बाळगतात व आपल्या गरजांची अभिव्यक्ति विविध स्वरांद्वारे करतात. सर्वसाधारण अवलोकनात येणारी गोष्ट आहे व अनुभव हे ही सांगतो की पोपटाला जे काही बोलायला शिकवावे त्याचा तो उच्चार करतो. त्याच प्रमाणे शिकारी पक्ष्यांना ही शिकविले जाते. तसेच पक्ष्यांची गाणी कदापि निरर्थक म्हटली जाऊ शकत नाही तरी देखील त्यांची बोली समजून घेणे आमच्या करीता तितकेच कठीण आहे जसे तारयंत्रा (Telegraph) ची भाषा न जाणणाऱ्या माणसाला खट खटचा आवाज ऐकून त्याचा अर्थ निश्चित करणे अवघड आहे. परंतु हजरत सुलेमान यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने पक्ष्यांच्या भाषेचे ज्ञान प्रदान केले होते, जे चमत्कार स्वरुप होते. म्हणून आपल्या शासनाच्या संदर्भात यांच्याकडूनही सेवा घेत होते.

स्पष्ट असावे की पक्ष्यांची भाषा हजरत सुलेमान यांनाच शिकविली गेली होती परंतु त्यांनी हे जे फर्माविले की, लोक हो! आम्हाला पक्ष्यांची भाषा शिकविली गेले आहे तर ही राजेशाही शैली होय ज्यात बोलणारा अनेकवचनी रूप वापरतो.

२३. अर्थात सर्व आवश्यक सामुग्री जी एका मजबूत शासनास चालविण्या करिता आवश्यक आहे.

२४. म्हणजे अद्वितीय साम्राज्य अल्लाहची अशी कृपा होय, ज्याची कोणताही मनुष्य अनुभूति घेतल्याशिवाय राहू शकत नाही. आम्हाला त्याची कृपा मान्य केली पाहीजे. यावरुन असे दिसून येते की हजरत सुलेमान यांचे चारित्र्य किती उच्च होते. परंतु यहूदींचा धूर्तपणा पहा की त्यांनी नंतर हजरत सुलेमान यांच्या वर हा आरोप ठेवला त्यांनी हे विशाल साम्राज्य केवळ जादूच्या बळावर प्राप्त केले होते व त्यांनी कुफ्र केले होते. पहा सूरह बकरा आयत क्र. १०२ व टीप क्र. १२०.

२५. हजरत सुलेमान यांचे साम्राज्य एका विशिष्ट वैभवाचे होते. त्यांच्यासाठी मनुष्या बरोबरच जिन्न आणि पक्ष्यांचे लष्कर देखील उपलब्ध केले होते. जिन्न आणि पक्ष्यांकडून ते जी सेवा घेत होते त्याचा उल्लेख पुढे केला गेला आहे आणि या संदर्भात काही गोष्टी सूरह अंबिया मध्ये निवेदिल्या गेल्या (पहा सूरह अंबिया टीप क्र. ११०)

प्रत्येक पैगंबराची एक शान असते. हजरत सुलेमान यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने शासन व सम्पत्ति बाळगणारा आणि वैभवशाली पैगंबर बनविले होते. यासाठी की इहलोक वासींवर इस्लामच्या सत्यतेचा व महानतेचा हा पैलू ही उघड व्हावा की एखादा पैगंबर वैभवासह जेव्हा सिंहासनावर बसतो तेव्हा अल्लाहचे स्मरण करतो.आणि महालात राहूनही सदाचाराचे जीवन घालवितो. म्हणून ज्या लोकांना अधिकार प्राप्त असेल त्यांनी याच्या नशेत धुंद न व्हावे. किंबहुना सुलेमानचा आदर्श समोर ठेवून आपल्या जबाबदारींची जाणीव असल्याचा पुरावा द्यावा.

२६. म्हणजे या लष्करांना फौजी व्यवस्थापनासह ठेवले जात होते. त्यांच्या रांगा ही तयार केल्या जात व वर्गवारी देखाल, या साठी की ज्या कामा करीता जो योग्य असेल त्याच्याकडून ते काम घेतले जावे. उदाहरणार्थ पक्ष्यांद्वारे संदेश वहनाचे काम वगैरे.

२७. म्हणजे हजरत सुलेमानचे लष्कर जेव्हा आगेकूच करीत एका अशा खोऱ्यात पोहचले जेथ मुंग्या फार जास्त होत्या.

२८. मुंग्यांमध्ये सामूहीकता ही असते व व्यवस्थापन ही. यास्तव त्यांच्या लांब रांगा व त्यांचे मिळून मिसळून काम करणे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय. त्यांच्या हालचालिंवरून हे ही दिसून येते की एक मुंगी दुसऱ्या मुंगीला बोलावून आणते. ज्यावरून त्यांच्या परस्पर संभाषणाची ही कल्पना येते. ही गोष्ट वेगळी की आम्ही त्यांचा स्वर ऐकू शकत नाही परंतु आम्ही जनावरांचा माणसाच्या बुद्धिवरून कयास करू शकत नाही. ज्याचे स्पष्ट उदाहरण कुत्र्याची घ्राण शक्ति जी इतकी प्रखर असते की तो माणसाच्या शरीराचा वास घेऊन त्याला बरोबर ओळखतो. यास्तव जेव्हा एखाधा प्रशिक्षित कुत्र्याला घटना स्थळावर आणतात तेव्हा तो तेथला गंध घेतो, जो अपराध्याच्या शरीरातून निघालेला असतो. मग तो या विशिष्ट वासा मागे, जो मार्ग दाखवितो, आपराध्या पर्यंत पोहचतो. अशा प्रकारे मुंग्यांचे परस्पर संभाषण एवढे क्षीण आवाजात असावे की आम्ही ते ऐकू न शकावे तर ही एखादी असंभव गोष्ट नव्हे. आज आम्ही सुक्ष्मातिसूक्ष्म वस्तूंना सुक्ष्मदर्शक यंत्राद्वारे पाहू शकतो परंतु यापूर्वी त्यांच्या अस्तित्वाची आम्हाला जाणीव ही नव्हती. जरी आता असे एखादे यंत्र संशोधिले गेले नाही की ज्या द्वारे आम्ही अती सौम्य आवाज ऐकू शकावा तरी याच्या अस्तित्वाचा इन्कार करू शकत नाही, जेव्हा याची खबर अल्लाहच्या वाणी द्वारे आम्हाला लाभली आह, किंबहुना हे तर कुरआनाचे अल्लाहची

वाणी असण्याचे प्रमाण होय की ते सृष्टीच्या काही अशा रहस्य भेदांविषयी आम्हाला अवगत करीत आहे ज्यांना जाणून घेण्याचा आमच्या जवळ दुसरा कोणताही मार्ग नाही. मनुष्य ज्ञानात ही फार मोठी वाढ होय. म्हणून या आयतींचे उलट सुलट स्पष्टीकरण करून ज्ञानाची ती कवाडे बंद करण्याचे कारण नाही, जी आमच्या करीता उघडत आहे अन्यथा आम्ही कुरआनात फेरफार करणारे ठरू. अशा आयतींचे पठण केल्यावर तर आमची हीच दुआ असली पाहीजे.

رَبِّ زِدْنِى عِلْماً ۔ (طٰہٰ ۔ ۱۱۴)

' हे माझ्या पालन कर्त्या ! माझ्या ज्ञानात वाढ कर' (ताहा-११४)

राहीला हा प्रश्न मुंग्यांना हे कसे काळले की हे सुलेमानचे लष्कर आहे, जे या खोऱ्यातून जात होते तर ही गोष्ट मनात उद्‌भविली गेली जी सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे मनात आणली गेली. यात आशचर्य करण्याजोगे काहीच नाही. अबरहा वर दगडांचा मारा करण्या करीता पक्ष्यांचे थवेच थवे पोहचले होते. ते देखील अल्लाहप्रणीत प्रेरणेनेच घडले होते. (पहा सूरह फील)

२९. हजरत सुलेमान यांनी मुंगीची ही गोष्ट या ज्ञानाद्वारे ऐकली जे त्यांना पक्ष्यांची भाषा समजण्यासाठी ईश चमत्काराच्या रूपाने प्राप्त होते. मुंगीचे म्हणजे ऐकून त्यांना आनंद झाला की त्यांच्या सैन्याची खबर मुंग्यांनाही होत आहे व त्यांचे नाव मुंगींच्या जीभेवर ही आहे. तात्पर्य इवल्याशा मुंगीचे म्हणणे त्यांना मोठे नवलाचे वाटले की त्याचे त्यांना हसू आले.

३०. हजरत सुलेमान यांचे हसणे गंभीरतापूर्वक होते म्हणूनच आनंदा सोबत त्यांच्या मनात अल्लाहशी कृतज्ञताची भावना जागृत झाली व त्यांनी आपल्या पालन कर्त्याजवळ दुआ केली की मला कृतज्ञ व सदाचारी दास बनण्याची सुबुद्धि प्रदान कर. म्हणजे तुझ्या तर्फे देणग्यांचा तर माझ्यावर वर्षाव झाला आहे आणि त्या कृपेतून ही मी वाटा घेतला जी तू माझ्या माता-पित्यावर केली आता मला सुबुद्धि प्रदान कर की मी या देणग्यांच्या संबंधाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडू शकू.

३१. पैगंबराचे दर्जे फार उच्च असतात, परंतु दर्जाच्या उच्चते करीता सदाचाराचे वर्तन आधारभूत खांबा सारखे असते म्हणून पैगंबर सदाचारी बनण्याची सुबुद्धि मागतात आणि ज्याअर्थी जन्नतला पात्र सदाचारी ठरतील म्हणून हे या समूहात सामील केले जाण्याची दुआ करतात.

३२. हजरत सुलेमान यांनी जेव्हा पक्ष्यांच्या लष्कराची तपासणी केली तेव्हा हुदहुद नावाचा पक्षी दिसून आला नीही हुदहुद (Hoopoe) हा कबूतरा सारखा एक पक्षी आहे. ज्याच्या डोक्यावर तुरा (Crest) असतो. असतो. वास्तव याला राज पक्षी (Royal Bird) म्हण्तात. हा पक्षी पॅलेस्टीन व सिरीयाच्या इलाक्यात मोठ्या प्रमाणात आढळून येतो. आणि कबुतरा सारखा पत्र वहनाचे कार्य करतो. परंतु हजरत सुलैमान यांच्या ज्या हुदहुदचा उल्लेख येथे केला जात आहे तो एका विशिष्ट ईश्वराने प्रदान केलेली गुणवैशिष्ट्ये बाळगणारा हुदहुद होता. त्याने जी असामान्य कामगिरी पार पाडली ती लक्षात घेता त्याचा सर्वसामान्य हुदहुद वरून कयास केला जाऊ शकत नाही. काही लोकांनी हे स्पष्टीकरण ही केले आहे की हुदहुद एका माणसाचे नाव होते जे पक्ष्याच्या नावावर ठेवले गेले होते. परंतु कुरआनाची शब्दशैली या गोष्टीचा इन्कार करते. वर उल्लेख केला गेला की हजरत सुलेमान यांच्यासाठी मनुष्य जिन्ना खेरीज पक्ष्यांचे लष्कर ही एकत्रित केले गेले होते वर या आयतीत पक्ष्यांचे निरीक्षण करण्याचा उल्लेख केला गेला आहे. तसेच पुढे हजरत सुलेमान यांचे हे निवेदन ही उल्लेखिले गेले आहे की जर हुदहुद ने आपल्या अनुपस्थितीची योग्य सबब दाखविली नाही तर मी त्याला जिबह करीन.

तर ह्या गोष्टी हुदहुद हा पक्षी असण्याचे स्पष्टत:प्रमाणित करतात. वास्तव यापासून हुदहुद नावाचा मनुष्य अभिप्रेत घेणे एक असे स्पष्टीकरण होय जे अगदी चुकीचे आहे.

३३. सख्त शिक्षेशी अभिप्रेत शक्यतो पिसे काडण्याची शिक्षा असावी. यासाठी की त्याला उडता येऊ नये.

३४. स्पष्ट प्रमाणाशी अभिप्रेत योग्य सबब.

३५. सबा एका जन-समूहाचे नाव होय जो यमन (Yeman) मध्ये सनआ जवळ वसला होता ज्याची राजधानी मआरिब होती. हुदहुद ने या जन समूहाची दशा अवगत करून याचा रिपोर्ट हजरत सुलेमान यांच्या समोर सादर केला. ज्यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट झाली की तो रहस्य जाणून घेण्याच्या कामात मग्न राहीला म्हणून वेळेवर हजर होऊ शकला नाही.

हजरत सुलेमान सबाच्या शासनापासून अनभिज्ञ असू शकत नव्हते, परंतु या जन समूहाची परिस्थिती विवरणात्मक रित्या माहीत नव्हती. जसे हुदहुदच्या निवेदनावरून स्पष्ट होते. म्हणून हुदहुदने डोळ्यांनी पाहीलेली स्थिती निवेदिली.

मी असे पाहीले की एक स्त्री त्यांच्यावर शासन करीत आहे. तिला सर्व काही दिले गेले आहे.आणि तिचे सिंहासन मोठे वैभवशाली आहे.मी असे पाहिले की ती व तिचा जन समूह अल्लाहला सोडून सूर्याला सजदा करतात. सैतानाने त्यांचे आचरण त्यांच्या करीता सुशोभित बनविले आहे व त्यांना सन्मार्गापासून रोखले आहे. यामुळेच त्यांना मार्ग प्राप्ती होत नाही.(अल-क़ुर्आन)

२३. मी असे पाहीले की एक स्त्री त्यांच्यावर शासन करीत आहे.[३६] तिला सर्व काही दिले गेले आहे [३७] आणि तिचे सिंहासन मोठे वैभवशाली आहे.[३८]

إِنِّي وَجَدتُّ امْرَأَةً تَمْلِكُهُمْ وَأُوتِيَتْ مِن كُلِّ شَيْءٍ
وَلَهَا عَرْشٌ عَظِيمٌ ﴿٢٣﴾

२४. मी असे पाहिले की ती व तिचा जन समूह अल्लाहला सोडून सूर्याला सजदा करतात.[३९] सैतानाने त्यांचे आचरण त्यांच्या करीता सुशोभित बनविले आहे व त्यांना सन्मार्गापासून रोखले आहे. यामुळेच त्यांना मार्ग प्राप्ती होत नाही.[४०]

وَجَدتُّهَا وَقَوْمَهَا يَسْجُدُونَ لِلشَّمْسِ مِن دُونِ اللَّهِ وَزَيَّنَ لَهُمُ
الشَّيْطَانُ أَعْمَالَهُمْ فَصَدَّهُمْ عَنِ السَّبِيلِ فَهُمْ لَا يَهْتَدُونَ ﴿٢٤﴾

२५. ते अल्लाहला का नाही सजदा करीत [४१] जो आकाशांच्या व जमीनीच्या लपलेल्या वस्तू बाहेर काढतो [४२]आणि तो जाणतो जे काही तुम्ही लपविता व जे जाहीर करता.[४३]

أَلَّا يَسْجُدُوا لِلَّهِ الَّذِي يُخْرِجُ الْخَبْءَ فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ
وَيَعْلَمُ مَا تُخْفُونَ وَمَا تُعْلِنُونَ ﴿٢٥﴾

२६. अल्लाह की त्याच्या खेरीज कोणी उपासनीय (मअबूद) नाही, महान अर्श (ईश-सिंहासना) चा स्वामी आहे.[४४]

اللَّهُ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ رَبُّ الْعَرْشِ الْعَظِيمِ ﴿٢٦﴾ السجدة

२७. तो (सुलेमान) म्हणाला, आम्ही बघतो की तू खरे बोलला आहेस कि खोटे बोलणाऱ्यांपैकी आहेस.[४५]

قَالَ سَنَنظُرُ أَصَدَقْتَ أَمْ كُنتَ مِنَ الْكَاذِبِينَ ﴿٢٧﴾

२८. हे माझे पत्र घेऊन जा व त्यांच्याजवळ नेऊन सोड [४६] मग बाजूला होऊन पहा की ते कोणती प्रतिक्रिया व्यक्त करतात.[४७]

اذْهَب بِّكِتَابِي هَٰذَا فَأَلْقِهْ إِلَيْهِمْ ثُمَّ تَوَلَّ عَنْهُمْ فَانظُرْ
مَاذَا يَرْجِعُونَ ﴿٢٨﴾

२९. ती (राणी) म्हणाली, हे दरबाऱ्यांनो ! माझ्या जवळ एक सन्माननीय पत्र टाकून दिले गेले आहे.

قَالَتْ يَا أَيُّهَا الْمَلَأُ إِنِّي أُلْقِيَ إِلَيَّ كِتَابٌ كَرِيمٌ ﴿٢٩﴾

३०. ते सुलेमान तर्फे आहे आणि ते असे आहे की बिस्मिलाहिर्रहमा निर्रहीम ( परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने ) [४८]

إِنَّهُ مِن سُلَيْمَانَ وَإِنَّهُ بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ ﴿٣٠﴾

३६. स्त्री च्या शासना वर हुदहुदला ही आशचर्य वाटले परंतु आजच्या काळात लोकशाहीचा राग आलापणाऱ्या कोकीळा यामुळे खुश होतील.

३७. म्हणजे पुष्कळ सामुग्री.

३८. असे दिसून येते की सबाच्या राणीचे सिंहहासन सोने व हिरे मामकांनी जडलेले होते म्हणून हुदहुदने त्यास वैभवशाली सिंहासन म्हटले.

३९. सबा-राणी व तिचा जन समूह सूर्याची पूजा करणारा होता आणि अल्लाह खेरीजच्या उपास्याची भक्ति हुदहुदच्या नजरेतही एक अयोग्य बाब होती. स्पष्ट झाले की सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा प्राण्याला बोलण्याचे सामर्थ्य प्रदान करतो तेव्हा तो शिर्कची निर्भत्सना केल्या खरीज राहात नाही. परंतु माणूस मात्र शिर्कच्या गोष्टी करतो.

४०. येथे हुदहुदचे निवेदन संपले. या प्रसंगी ही गोष्ट समजून घेतली पाहीजे की हुदहुद एखादा सर्वसामान्य पक्षी नव्हता,किंबहुना हजरत सुलेमान यांचा खास प्रशिक्षित पक्षी होता आणि त्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने चमत्कारीकरित्या मानव-प्रज्ञा प्रदान केली होती. म्हणून सबाची परिस्थिती जाणून घेणे व त्याबाबत हजरत सुलेमान यांना सूचित करणे त्याला शक्य झाले. हा अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार होता. ज्यावरून हे स्पष्ट झाले की एक हुदहुद मानव प्रज्ञा प्राप्त करून मार्गदर्शन व मार्गभ्रष्टता यातला भेद जाणतो आणि शिर्कला असत्य व सैतानाचा धोका ठरवितो. परंतु मनुष्य मात्र सज्ञान असूनही अज्ञान बनतो.

४१. हुदहुदच्या निवेदनावर ही सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे वाढ होय जसे वर्णन शैलीवरून जाहीर होते. याचे समर्थन या गोष्टीनेही होते की या प्रसंगी सजदा करण्याचा आदेश आहे जो अल्लाहच्या आपल्या निवेदनाशीच अधिक सुसंगत आहे. हेतु सबा जनसमूहाच्या पदचिन्हांवर चालणाऱ्या अनेकेश्वरवाद्यांचे लक्षण वेधणे होय की ते एकमेव अल्लाहला आपले उपास्य का नाही बनवित? ज्याची अमुक एक गुणवैशिष्ट्ये आहेत.

स्पष्ट व्हावे की मूळग्रंथात 'अल्ला' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ 'का नाही' असा ही होतो. जसे लिसानुल अरब (खंड १५ पृ. ४३४) या शब्दकोशात निवेदिला गेला आहे म्हणून आम्ही त्यानुसार अनुवाद केला आहे.

४२. आकाशांच्या लपलेल्या गोष्टींचे स्पष्ट उदाहरण तर पाऊस आहे जो ढगांमध्ये लपलेला असतो. त्याचप्रमाणे वीज व दिवसाचा उजेड आणि आजच्या विज्ञानाने तर आकाशातल्या अनेक गोष्टींचे रहस्योद्घाटन केले आहे. उदाहरणार्थ प्लेटो सारखा ग्रह, प्रकाश वर्षा (Light years) च्या अंतरावर असलेले तारे सृष्टी किरणे (Cosmic Rays) इत्यादि.

राहील्यात जमीनीच्या लपलेल्या गोष्टी तर याचे स्पष्ट उदाहरण वनस्पती होय व प्रत्येक प्रकारचे खनिज पदार्थ आणि आजच्या काळात जमीनीने काळे सोने अर्थात तेल साठे (Oil Minerals) देखील बाहेर टाकले आहे आणि प्लॅटीनम (platinum) व युरेनियम (Uranium) सारखे बहुमूल्य धातू देखील.

४३. म्हणजे जो ईश्वर आकाशातल्या व जमीनीतल्या सुप्त वस्तूना जाणतो व बाहेर काढतो तो तुम्हां लोकांचे बाह्य व अंतरंगही जाणतो मग जो ईश्वर अपरोक्षाचे ज्ञान बाळगतो आणि अपरोक्षाच्या वस्तूंमध्ये परिवर्तन ही करतो तो तुमचे सजदे व तुमच्या उपासनेस पात्र आहे कि सूर्य व दगडाचे देव जे ना काही जाणतात ना काही करू शकतात?

४४. ही सजद्याची आयत होय. पठण करणारे व ऐकणाऱ्यांनी त्वरीत सजदा केला पाहिजे, ही या गोष्टीची अभिव्यक्ति होय की ते महान अर्श (ईश-सिंहासना) च्या स्वामीलाच आपला मसजूद (ज्याला सजदा करावा असा) व माबूद (उपास्य) बनवितात या प्रसंगी मसजूद या दृष्टीनेही प्रसंगोचित आहे की हजरत सुलेमान यांच्या किश्श्यात अनेक घटना अशा निवेदिल्या गेल्या आहेत की जर बुद्धीवर ईमानाची पकड मजबूत नसेल तर ते का व कसे आणि शक्य व अशक्य यांच्या चर्चा विवादात गुरफटून जातील. कुरआनाने काही ठिकाणी बुद्धिची परिक्षा घेऊ इच्छिले आहे. जे सच्चे मोमीन (ईमान बाळगणारे) असतात त्यांची बुद्धि अशा नाजुक प्रसंगी अल्लाह समोर नतमस्तक होते आणि हा सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे हजरत सुलेमान यांच्या करीता चमत्कार प्रकटला होता.

४६. स्पष्ट झाले की हा हुदहुद पत्र वहनाची कामागिरीही पार पाडत होता.

४७. म्हणजे पत्र टाकून लगेच परत येऊ नकोस, तर एखाद्या कोपऱ्यातून पहात रहा की ते कोणती प्रतिक्रिया व्यक्त करतात.

४८. सबा-राणीने या पत्रास मान देण्यायोग्य जाणले, ज्याचे एक कारण बहुधा हे असावे की एखाद्या दूताशिवाय पक्ष्याच्या पत्रवहनाद्वारे मिळाले होते. दुसरे कारण असे की हे पत्र सिरीया व पॅलेस्टीनच्या विशाल साम्राज्याचे सुप्रसिद्ध व प्रतिष्ठीत बादशहा हजरत सुलेमान तर्फे होते आणि सर्वात मोठे कारण पत्राचा मजकूर ते प्रतिष्ठीत असल्याची साक्ष देत होता. यास्तव याचा आरंभच 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम' ने झाला होता, जे एक असे समृद्धीशाली वचन आहे की अल्लाहच्या परिचयाचे दरवाजे याच चावीने उघडतात. आणि ही याच वचनाची समृद्धी होय की सबा देशाच्या राणीला

सन्मार्ग प्राप्तीचा लाभ घडला. जसे पुढे कळून येईल.

हजरत सुलेमान यांच्या लेखणीतून निघालेले हे वचन वस्तुतः अल्लाहचे वह्य होय ज्यास कुरआनाने अशा प्रकारे सुरक्षित केले आहे की त्याचा आरंभच बिस्मिल्ला हिर्रहमानिर्रहीमने होतो. मग प्रत्येक सूरह (अध्याया) साठी हा मुकुट आहेच. केवळ सूरह तौबा वगळता जो एक बेताज बादशहा आहे. हातात नंगी तलवार घेतलेला.

हजरत सुलेमान यांच्या पत्राने हे मार्गदर्शनही लाभते की आवाहनात्मक व धर्म-प्रसार विषयक पत्रांची सुरवात बिस्मिल्ला हिर्रहमानिर्रहीमने केली गेली पाहिजे.

**माझ्या विरुद्ध बंड करु नका आणि मुस्लिम होऊन माज्याजवळ हजर व्हा. ती म्हणाली, हे दरबारातील लोकांनो ! या संदर्भात मला सल्ला द्या. जोपर्यंत तुम्ही लोक उपस्थित नसतात, मी कोणत्याही मामल्यात निर्णय घेत नाही.(अल-क़ुर्आन)**

३१. माझ्या विरुद्ध बंड करु नका आणि मुस्लिम होऊन माझ्याजवळ हजर व्हा. [४९]

ع
أَلَّا تَعْلُوا عَلَيَّ وَأْتُونِي مُسْلِمِينَ ﴿٣١﴾

३२. ती म्हणाली, हे दरबारातील लोकांनो ! या संदर्भात मला सल्ला द्या. जोपर्यंत तुम्ही लोक उपस्थित नसतात, मी कोणत्याही मामल्यात निर्णय घेत नाही. [५०]

قَالَتْ يَا أَيُّهَا الْمَلَأُ أَفْتُونِي فِي أَمْرِي مَا كُنتُ قَاطِعَةً أَمْرًا
حَتَّىٰ تَشْهَدُونِ ﴿٣٢﴾

३३. ते म्हणाले, आम्ही शक्तिशाली [५१] व सक्त योद्धे आहोत [५२] परंतु निर्णय आपल्या आधिकारात आहे. [५३] बघू आपण कोणता आदेश देऊ इच्छिता. [५४]

قَالُوا نَحْنُ أُولُو قُوَّةٍ وَأُولُو بَأْسٍ شَدِيدٍ
وَالْأَمْرُ إِلَيْكِ فَانظُرِي مَاذَا تَأْمُرِينَ ﴿٣٣﴾

३४. ती (राणी) म्हणाली, बादशहा जेव्हा एखाद्या वस्तीत दाखल होतात तेव्हा तिला अस्ताव्यस्त करून टाकतात, व तिच्यातल्या प्रतिष्ठीत लोकांना अपमानित करतात. ते असेच करीत असतात. [५५]

قَالَتْ إِنَّ الْمُلُوكَ إِذَا دَخَلُوا قَرْيَةً أَفْسَدُوهَا وَجَعَلُوا
أَعِزَّةَ أَهْلِهَا أَذِلَّةً ۖ وَكَذَٰلِكَ يَفْعَلُونَ ﴿٣٤﴾

३५. मी यांच्याजवळ नजराणा पाठविते, मग पहाते की दूत काय उत्तर घेऊन येतात. [५६]

وَإِنِّي مُرْسِلَةٌ إِلَيْهِم بِهَدِيَّةٍ فَنَاظِرَةٌ بِمَ يَرْجِعُ الْمُرْسَلُونَ ﴿٣٥﴾

३६. जेव्हा तो (दूत) सुलैमान जवळ पोहचला तेव्हा तो म्हणाला, काय तुम्ही लोक सम्पत्तिने माझी मदत करु इच्छिता? मला अल्लाहने जे काही दिले आहे ते याहून कितीतरी पटींनी चांगले आहे जे तुम्हा लोकांना दिले आहे. परंतु तुम्ही आहात की आपल्या नजराण्यावर अभिमान करता. [५७]

فَلَمَّا جَاءَ سُلَيْمَانَ قَالَ أَتُمِدُّونَنِ بِمَالٍ فَمَا آتَانِيَ اللَّهُ
خَيْرٌ مِّمَّا آتَاكُم بَلْ أَنتُم بِهَدِيَّتِكُمْ تَفْرَحُونَ ﴿٣٦﴾

३७. परत जा त्यांच्याजवळ आम्ही त्यांच्यावर असे सैन्य पाठवू की ते मुकाबला करू शकणार नाहीत, आणि आम्ही त्यांना तेथून अशा प्रकारे अपमानासह बाहेर घालवू की ते अवनत झाल्याखेरीज राहणार नाहीत. [५८]

ارْجِعْ إِلَيْهِمْ فَلَنَأْتِيَنَّهُم بِجُنُودٍ لَّا قِبَلَ لَهُم بِهَا وَلَنُخْرِجَنَّهُم
مِّنْهَا أَذِلَّةً وَهُمْ صَاغِرُونَ ﴿٣٧﴾

३८. सुलेमान म्हणाला, हे दरबारातील लोकांनो ! तुमच्या पैकी कोण तिचे सिंहासन माझ्याजवळ आणतो, यापूर्वी की तिने माझ्या जवळ मुस्लिम होऊन हजर व्हावे. [५९]

قَالَ يَا أَيُّهَا الْمَلَأُ أَيُّكُمْ يَأْتِينِي بِعَرْشِهَا
قَبْلَ أَن يَأْتُونِي مُسْلِمِينَ ﴿٣٨﴾

४९. एकीकडे हजरत मूसा यांना हे मार्गदर्शन लाभले होते की फिरऔन जवळ जाल तर त्याच्याशी कोमल स्वरात बोला आणि दुसरीकडे कुरआन हजरत सुलेमानचा हा आदर्श सादर करीत आहे की त्यांनी सबा देशाच्या राणीला आवाहनात्मक पत्र लिहिले तर अशा आव्हानात्मक शैलीत की माझ्या विरोधात डोके वर काढू नका आणि सरळपणे मुस्लिम होऊन माझ्याजवळ या. या फरकाचे कारण असे की हजरत सुलेमान सत्ताधारी या नात्याने शासकीय स्तरावर आवाहान करीत होते, तर हजरत मूसा यांना सत्ताधिकार प्राप्त नव्हता. तात्पर्य एखादे शक्तिशाली इस्लामी शासन एखाद्या अनेकेश्वरवादी राज्यास आव्हानपूर्ण शैलीत इस्लामचे आवाहन करू शकते. खुलफाए राशेदीन (चार खालीफा) च्या काळात जे देश जिंकले गेले त्यांना आव्हान शैलीतच धर्माचे आवाहन केले गेले, म्हणजे एकतर इस्लाम कबूल करा किंवा जिझिया देऊन इस्लामी शासनाचे आधिपत्य मान्य करा अन्यथा तलवार निर्णय घेईल.

'मुस्लिम होऊन माझ्याजवळ हजर व्हा' ही गोष्ट म्हणजे अगदी परखड शब्दात इस्लाम कबूल करण्याचे आवाहन होते आणि हे या गोष्टीचे प्रमाण होय की हजरत सुलेमान यांच्या दृष्टीपथात ना मुलुखगिरी होती व ना वैभव थाटाचे व्यर्थ प्रदर्शन, किंबहुना एक महान उद्दिष्ट होते आणि ते म्हणजे इस्लामचा प्रसार व त्याला शासकीय स्तरावर प्रस्थापित करणे.

यावरून हे मार्गदर्शनही लाभते की एखाद्या इस्लामी शासनाने यास ध्येयउद्दिष्ट जाणून डोळ्यासमोर राखावे व त्याच्यासाठी आपल्या साधन सामुग्रीचा वापर करावा. इस्लामचा परखड दृष्टीकोन हाच की कोणत्याही देशात शिर्क (अनेकेश्वरवाद)ला सत्ताधिकार प्राप्त न व्हावा कारण जेव्हा शासनाची यंत्रणा अनेकेश्वरवादाच्या. प्रसारात गुंतते तेव्हा सर्वसामान्य जनता वाईटरित्या मार्गभ्रष्ट होते. त्यांच्या भल्याकरीता त्यांना शिर्कच्या टांगत्या तलवारीपासून मुक्त करणे किंवा निदान इस्लामी शासनाच्या नियंत्रणाखाली आणणे अत्यावश्यक आहे. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तौबा टीप क्र. ५७)

५०. यावरुन हा निष्कर्ष काढणे योग्य नव्हे की सबा देशाच्या राणीचे शासन लोकशाही शासन होते. कारण बादशहा देखील आपल्या वजीरांकडून किंवा दरबारी मंडळीकडून सल्ला मसलत करीत असत फिरऔनने देखील आपल्या दरबाऱ्यांशी सल्ला मसलत केली होती. (सूरह शुअरा २५) म्हणून सबाचे शासन एकतंत्री शासन होते.

५१. अभिप्रेत लष्करी सामर्थ्य होय.

५२. म्हणजे युद्धापासून घाबरणारे नाहीत तर त्यासाठी सज्ज राहणारे लोक आहोत.

५३. निर्णयाचा अंतिम अधिकार राणीलाच होता जो या गोष्टीचा पुरावा होय की सबाचे शासन एकतंत्री शासन होते.

५४. म्हणजे आम्ही आपली प्रवृत्ती जाहीर केली. आता निर्णय घेणे तुमचे काम होय. तेव्हा आपणच विचार करुन निर्णय घ्यावा की काय करणे उचित ठरेल.

५५. अर्थात एका बादशहाशी युद्ध करण्याच्या स्थितीत या गोष्टीचे भय आहे की जर आमचा पराभव झाला तर जनसमूहाला सर्वनाशाशी व आम्हाला सक्त अपमानाशी तोंड द्यावे लागेल तेव्हा युद्धाला टाळणेच श्रेयस्कर ठरेल. यावरून असे दिसून येते की राणी एक स्त्री असूनही पुरुषांपेक्षा अधिक सुज्ञ होती. स्त्रीया सत्ताधिकार सांभाळण्याची व न्यायालयीन फैसले करण्या संबंधीची पात्रता कमीच बाळगतात. कारण त्या भावनाप्रधान वृत्तीच्या असतात. परंतु ही काही दगडावरची रेघ नव्हे की कोणतीही स्त्री या नियमाला अपवाद नसावी, किंबहुना वस्तुस्थिती अशी की काही स्त्रीया पुरुषांपेक्षाही अधिक सुज्ञ असतात. सबा देशाच्या राणीचे व्यवहार ज्ञान व दूरदर्शिता निःसंशय तिच्या दरबारी लोकांपेक्षा अधिक होती अर्थात ही एक अपवादात्मक स्थिती होय.

५६. सबा देशाच्या राणीने हा निर्णय घेतला की या वेळी दूतांचे एक शिष्टमंडळ सुलेमानकडे पाठवून द्यावे, नंतर पहावे की ते कोणीती प्रतिक्रिया व्यक्त करतात. संभवत अशाने त्यांच्याशी मैत्रीसंबंध घडून येण्याचा मार्ग निघावा.

५७. सबा देशाच्या राणीने मौल्यवान नजराण्यासह एक शिफारस करणारे शिष्टमंडळ हजरत सुलेमान यांच्याजवळ पाठविले, परंतु हजरत सुलेमान यांनी तो नजराणा स्विकारला नाही कारण नजराणा या हेतुने दिला गेला होता की सबाच्या सत्ताधिकाऱ्यांना आपण जे इस्लाम स्विकृतिचे आवाहन केले होते त्या पासून आपण परावृत्त व्हावे आणि मैत्री संबंधावर समाधान बाळगावे. याउलट हजरत सुलेमान अशा अवस्थेत होते की सामर्थ्याद्वारे अनेकेश्वरवादी सत्तेला नष्ट करून सबा जन समूहास शिर्कच्या बंधनातून मोकळे करावे.

सबा वाल्यांना आपल्या धनसम्पत्तिचा व वैभवथाटाचा मोठा अभिमान होता, म्हणून हजरत सुलेमान यांनी फर्माविले की सर्वश्रेष्ठ अल्लाहने मला तुमच्यापेक्षाही अधिक आणि चांगल्या देणग्यांनी उपकृत केले आहे, यास्तव मला तुमच्या स्मपत्तिंची गरज नाही की याच्या लोभापायी एका अनेकेश्वरवादी अस्तित्वास सहन करावे.

५८. हजरत सुलेमान एका अनेकेश्वरवादी शासनास सहन करण्यास तयार नव्हते कारण त्या काळात प्रजा सर्वसाधारणपणे बादशहाच्या धर्माचाच अवलंब करणारी असायची. म्हणून एखाद्या जनसमूहास मार्गभ्रष्टतेच्या भोवऱ्यातून बाहेर काढण्याकरीता आवश्यक होते की दुराचारी व असत्य-सत्तेच्या विळख्यातून

त्याची सुटका केली जावी आणि हजरत सुलेमान तर जबरदस्त सामर्थ्याचे स्वामी होते, म्हणून त्यांनी आपल्या पदावरून बोलणे केले व अशा प्रकारे बोलले की जणू त्यांचा प्रकोप एका अनेकेश्वरवादी व सैतानी शासनावर कोसळत होता. त्यांचा हा प्रकोप सत्ता व सामर्थ्याच्या घमेंडीमुळे नव्हता किंबहुना शिर्कचे प्राबल्य कमी होऊन लोकांना सन्मार्गाचे मार्गदर्शन लाभावे या हेतुसाठी होता.

यावरून ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की इस्लामी शासनासमोर एक उच्च ध्येय-उद्दिष्ट असते व ते या अनुषंगाने आवश्यक ते पाऊल उचलते. तेव्हा हा विचार करणे योग्य नव्हे की याचे युद्ध स्वसंरक्षणाच्या मर्यादेप्रत नसते. जर इस्लाममध्ये केवळ स्वसंरक्षणार्थ युद्ध करण्याची अनुमति असती तर हजरत सुलेमान यांनी सबाच्या शासनाविरुद्ध लष्करी कारवायी करण्याचा मनोदय व्यक्त केला नसता.

५९. ओळीवरून ही गोष्ट स्पष्ट आहे की शिष्टमंडळ परत चालले गेले व त्याने जेव्हा राणीला हजरत सुलेमान व त्यांच्या वैभवशाली शासनाविषयी सचेत केले तर ती आपोआप हजरत सुलेमान यांच्या भेटीस रवाना झाली आणि जेव्हा हजरत सुलेमान यांना तिच्या येण्याची वार्ता कळली तेव्हा त्यांनी तिचे सिंहासन तिच्या आगामनापूर्वी मागविले अशासाठी की तिच्यासमक्ष एक ईश-चमत्कार दिसून यावा. जो त्यांच्या पैगंबर असण्याचे प्रमाण ठरावे.

**जिन्नांपैकी एक 'इफरीत' म्हणाला, मी आपण आपल्या जागेवरुन उठण्यापूर्वीच हजर करीन. मी या गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो व अमानतदार आहे.(अल-क़ुर्आन)**

قَالَ عِفْرِيْتٌ مِّنَ الْجِنِّ اَنَا اٰتِيْكَ بِهٖ قَبْلَ اَنْ تَقُوْمَ مِنْ مَّقَامِكَ ۚ وَاِنِّيْ عَلَيْهِ لَقَوِيٌّ اَمِيْنٌ ﴿٣٩﴾

३९. जिन्नांपैकी एक 'इफरीत'[६०] म्हणाला, मी आपण आपल्या जागेवरुन उठण्यापूर्वीच हजर करीन. मी या गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो व अमानतदार आहे.[६१]

قَالَ الَّذِيْ عِنْدَهٗ عِلْمٌ مِّنَ الْكِتٰبِ اَنَا اٰتِيْكَ بِهٖ قَبْلَ اَنْ يَّرْتَدَّ اِلَيْكَ طَرْفُكَ ۚ فَلَمَّا رَاٰهُ مُسْتَقِرًّا عِنْدَهٗ قَالَ هٰذَا مِنْ فَضْلِ رَبِّيْ ۖ لِيَبْلُوَنِيْٓ ءَاَشْكُرُ اَمْ اَكْفُرُ ۚ وَمَنْ شَكَرَ فَاِنَّمَا يَشْكُرُ لِنَفْسِهٖ ۚ وَمَنْ كَفَرَ فَاِنَّ رَبِّيْ غَنِيٌّ كَرِيْمٌ ﴿٤٠﴾

४०. ज्याच्या जवळ ग्रंथाचे ज्ञान होते, तो म्हणाला मी त्यास आपली पापणी लवण्या पूर्वी आणून हजर करतो [६२] जेव्हा सुलेमान ने पाहीले की ते त्याच्या समक्ष ठेवलेले आहे तेव्हा उद्‌गारला,[६३] हा माझ्या पालन कर्त्याचा अनुग्रह आहे,[६४] यासाठी की त्याने माझी कसोटी घ्यावी की मी कृतज्ञता दर्शवितो कि कृतघ्नता आणि जो कृतज्ञता दर्शवितो तर त्याचे कृतज्ञता दर्शविणे त्याच्या करीता लाभदायक आहे आणि जो कृतघ्नता दर्शविल तर माझा पालनकर्ता निःस्पृह आणि कृपाळू आहे.[६५]

قَالَ نَكِّرُوْا لَهَا عَرْشَهَا نَنْظُرْ اَتَهْتَدِيْٓ اَمْ تَكُوْنُ مِنَ الَّذِيْنَ لَا يَهْتَدُوْنَ ﴿٤١﴾

४१. सुलेमान ने आज्ञा दिली, राणी करीता तिच्या सिंहासनाचे स्वरुप बदलून टाका.पाहू या, ती मार्गदर्शन प्राप्त करते कि त्या लोकांपैकी आहे जे मार्गदर्शन प्राप्त करीत नाही.[६६]

فَلَمَّا جَآءَتْ قِيْلَ اَهٰكَذَا عَرْشُكِ ۖ قَالَتْ كَاَنَّهٗ هُوَ ۚ وَاُوْتِيْنَا الْعِلْمَ مِنْ قَبْلِهَا وَكُنَّا مُسْلِمِيْنَ ﴿٤٢﴾

४२. जेव्हा ती हजर झाली तेव्हा तिला सांगितले गेले, काय तुमचे सिंहासन असेच आहे? ती म्हणाली जणू काही तेच आहे: आणि आम्हाला या पूर्वीच ज्ञान प्राप्त झाले होते व आम्ही मुस्लिम होतो.[६७]

وَصَدَّهَا مَا كَانَتْ تَّعْبُدُ مِنْ دُوْنِ اللّٰهِ ۖ اِنَّهَا كَانَتْ مِنْ قَوْمٍ كٰفِرِيْنَ ﴿٤٣﴾

४३. आणि तिला अल्लाह खेरीजच्या उपास्यांच्या आराधनेने प्रतिबंध घातला होता जी ती करीत होती ती एका इन्कार करणाऱ्या जन समूहापैकी होती.[६८]

قِيْلَ لَهَا ادْخُلِي الصَّرْحَ ۚ فَلَمَّا رَاَتْهُ حَسِبَتْهُ لُجَّةً وَّكَشَفَتْ عَنْ سَاقَيْهَا ۚ قَالَ اِنَّهٗ صَرْحٌ مُّمَرَّدٌ مِّنْ قَوَارِيْرَ ۗ قَالَتْ رَبِّ اِنِّيْ ظَلَمْتُ نَفْسِيْ وَاَسْلَمْتُ مَعَ سُلَيْمٰنَ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٤٤﴾

४४. तिला सांगितले गेले, महालात प्रवेश कर तिने जेव्हा पाहीले तेव्हा तिला असे वाटते की खोल पाणी आहे आणि आपल्या पोटऱ्या उघड्या केल्या.सुलेमान म्हणाला हा महाल काचेने जडलेला आहे. तिने उदगार काढला, हे माझ्या पालन कर्त्या! मी आपल्या आत्म्यावर अत्याचार करीत राहीले आणि आता मी स्वतःला सुलेमानच्या सोबत सर्व विश्वांचा स्वामी (रब्बुल आलमीन) अल्लाहच्या सूपूर्द केले. [६९]

६०. 'इफ़रीत' म्हणजे अतिश्य शक्तिशाली.

६१. जिन्न जमीनीवरून आकाशपावेतो उड्डाण घेतात. म्हणून त्यांच्या गतीचा, मानव गतीवरून व त्यांच्या शक्तिचा मनुष्य शक्तिवरून कयास करता येऊ शकत नाही. 'इफ़रीत' ने दरबार बरखास्त होण्यापूर्वी सबा राणीचे सिंहासन आणून देण्याचा प्रस्ताव मांडला होता व हेही म्हणाला की मी या अमानतीत कोणताही अपराध करणार नाही, म्हणजे अतिश्य मौल्यवान अशा सिंहासनाला जसेच्या तसेच आणून हजर करीन. परंतु हजरत सुलेमान यांना ही गोष्ट योग्य वाटली नाही की हे काम एका जिन्नाकडून घेतले जावे.

६२. ग्रंथाशी अभिप्रेत ईशग्रंथ अर्थात तौरात होय. कारण अन्य एखादा अर्थ घेण्यास काही वाव नाही. आणि 'ज्याच्याजवळ ग्रंथाचे ज्ञान होते' शी अभिप्रेत हजरत सुलेमान यांच्या दरबारातील असा मनुष्य जो तौरातचा मोठा ज्ञानी होता व त्यात सखोल दृष्टि बाळगणारा होता. त्याने हे जाणले की हजरत सुलेमान ईश चमत्कार द्वारे राणीचे सिंहासन मागवू इच्छित आहे व त्या साठी एका मनुष्यास माध्यम बनवू इच्छित आहे. म्हणून त्याने ही सेवा पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला. तो हे जाणून होता की चमत्कार अल्लाहच्या आज्ञेनेच प्रकट होतो व तो प्रकट होण्यासाठी स्थळ काळाचे अंतर काहीच अर्थ बाळगत नाही. म्हणून तो असे म्हणाला की आपली पापणी लवण्यापूर्वी हजर करु शकतो. याचा अर्थ असा की जेव्हा आपल्या हातून एक ईश-चमत्कार सादर होत आहे तर तो क्षणार्धात सादर होऊ शकतो व मी ही सेवा पार पाडण्यास अगदी सज्ज आहे.

हजरत सुलेमान हा चमत्कार एखाद्या माणसाला माध्यम बनविल्या खेरीज ही दाखून शकत होते, परंतु त्यांनी तौरातच्या सर्वश्रेष्ठ विद्वानास हा मान दिला की या चमत्काराच्या अभिव्यक्ति करीता त्याने माध्यम बनावे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ही खरे पाहता हजरत सुलेमान यांचीच कामगिरी होती. जी अल्लाहच्या आदेशान्वये अशाच प्रकारे व्यक्त झाली ज्या प्रकारे इतर पैगंबरांच्या हातून विविध ईश-चमत्कार सादर झाले. फरक एवढाच की त्यांनी एक चमत्कार म्हणून सिंहासन मागविण्याचे काम एका विशिष्ट विद्वानाकडून करवून घेतले जो त्यांच्या दरबारात होता.

काही भाष्यकारांच्या मते ज्याच्या जवळ ग्रंथाचे ज्ञान होते शी अभिप्रेत अल्लाहच्या इस्मे आजम (महान नावा) चे ज्ञान होय. म्हणजे तो मनुष्य अल्लाहचे सर्वाधिक महान नाव जाणत होता. म्हणून त्याने त्याच्या द्वारे सिंहासन प्राप्त केले आणि मग या चर्चा-विवादात गुरफटले की अल्लाहचे ते अतिमहान नाव कोणते. अशा प्रकारे महान नावास एक कोडे बनविले गेले. वस्तुत: अल्लाहचे महान नाव ही काही रहस्य भेदाची बाब नव्हे, किंबहुना एक स्पष्ट हकीकत आहे आणि ते म्हणजे 'अल्लाह' हे नाव. हे त्याचे स्वत्व दर्शविणारे नाव आहे व कुरानात एवढ्या मोठ्या प्रमाणात याचा उल्लेख केला गेला आहे की त्यास सोडून अन्य एखाद्या महान नावाला शोधण्याची गरज नाही. या गोष्टीवर कसा विश्वास ठेवला जाऊ शकतो की पवित्र कुरआन इस्मे आजम (महान नावा) विरहित आहे आणि बिस्मिल्लाह सूरह फातेहा, आयतुल कुरसी व सूरह इखलास ज्यात एकमेव अल्लाहचा परिचय दिला गेला आहे व यामुळेच त्याची विशेष प्रतिष्ठा ही आहे: इस्मे आजम विरहीत आहे. त्याच प्रमाणे ही गोष्ट कशा प्रकारे मान्य केली जाऊ शकते की पैगंबरांच्या आचरणानुसार जे ईश-स्मरण व जाप्य आहे त्यात अल्लाहच्या प्रशंसेची उत्कृष्ट वचने तर आहेत, परंतु इस्मे आजम गायब आहे.वस्तुस्थिती अशी की जे लोक अमलीयात (सिद्धी) च्या मृगजला मागे धावतात तेच इस्मे आजमचा सहारा घेतात. या संदर्भात अल्लामा सुलेमान नदवी यांनी अगदी योग्य फर्माविले आहे की इस्मे आजमची कल्पना एक अज्ञानपूर्ण व शरीअतीत नसलेली कल्पना आहे' (अर्जुल कुरआन खंड १ पृष्ठ २७०)

६३. म्हणजे ते सिंहासन तत्क्षणी तेथे हजर झाले. यमन व बैतुल मक्दस या दोन ठिकाणांच्या दरम्यान सुमारे दीड हजार मैलांचे अंतर आहे म्हणून बाह्यात: ही गोष्ट विचित्र वाटते की एवढ्या लांब अंतरावरुन राणीचे सिंहासन क्षणात सुलेमानच्या दरबारात येऊन पोहचले. जे लोक अल्लाह सर्व काही करण्यास समर्थ आहे या गोष्टीवर विश्वास ठेवतात त्यांना या गोष्टीत काहीच आशचर्य वाटणार नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा एखादा चमत्कार आपल्या पैगंबराच्या हस्ते दाखवू इच्छित तेव्हा सर्वसामान्य निसर्ग-नियमांचा अडसर होत नाही. हजरत मूसा यांची काठी जमीनीवर टाकताच साप बनत असे.हजरत स्वालेह यांच्या करीता असामान्य सांडणी अकस्मात प्रकटली होती आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्केपासून बैतुल मक्दस पर्यंतचा दीर्घ प्रवास एकाच रात्रीत पार पाडला. मग या भौतिक विश्वात ही काही गोष्टी अतिशय वेगवान आहेत. उदाहरणार्थ प्रकाशाचा वेग सेकंदाला १,८६००० मैल इतका आहे आणि लोहचुंबकाच्या सामर्थ्याद्वारे ध्वनी हजारो मैल दूर त्वरीत पोहचते. जो ईश्वर आपल्या पैगंबरांच्या हस्ते हे चमत्कार दाखवून देणे काय कठीण आहे की एखादे सिंहासन क्षणात लांबचे अंतर पार पाडून सुलेमानच्या दरबारात ओढून आणणावे.

६४. सिंहासन असामान्यरित्या दरबारात पोहचल्यावर हजरत सुलेमान यांनी असे म्हटले नाही की ही माझी कामगिरी आहे. किंबहुना यास सर्वश्रेष्ठ अल्लाहची कृपा ठरविले. यावरुन असे दिसून येते की हजरत सुलेमान यांचे बादशहा असणे अन्य बादशहाहून कितीतरी वेगळे होते.

६५. म्हणजे अल्लाह एखाद्याच्या कृतज्ञतेचा भुकेला नाही. त्याची शान, त्याचे वैभव मोठे कृपामय आहे. यास्तव जो कृतघ्नता दर्शवितो तो आपल्याच हक्कात वाईट करतो.

६६. सिंहासनाचे स्वरुप बदलविण्याचा आदेश एका विशिष्ट हेतु पोटी दिला गेला होता व तो असा की राणीला वैचारिक आवाहन केले जावे. जर ती ओळखून घेईल की बाह्य रूप बदलले अस्तांना ही सिंहासन तिचेच आहे तर तिच्या मनात प्रश्न नक्की उदभवेल की हे सिंहासन या ठिकाणी आले कसे ? या प्रश्नावर जेव्हा ती विचार करील तेव्हा तिला या गोष्टीचा उलगडा होईल की हा हजरत सुलेमान यांचाच ईश-चमत्कार होय व त्यांचे नबी (पैगंबर) असण्याचे प्रमाण होय. अशा प्रकारे ती मार्गदर्शन प्राप्त करु शकते. आणि जर तिने आपल्या सिंहांसनास ओळखले नाही तर उघड होईल की ती विचार चिंतन करीत नाही आणि जो विचार चिंतन करीत नाही तो अल्लाहच्या मार्गदर्शनापासून वंचित राहतो.

या ठिकाणी ही फिकही (धर्म शास्त्रीय) चर्चा व्यर्थ होय की राणीच्या अधिपत्यात परिवर्तन करणे हजरत सुलेमान करीता कशा प्रकारे योग्य होते? हा प्रश्न एवढ्या साठी उपस्थित होत नाही की हा ईश-चमत्कार अल्लाहच्याच आदेशान्वये प्रकट झाला व या हेतुसाठी तो दासांच्या अधिपत्यात परिवर्तन ही करु शकतो. हजरत स्वालेह यांच्या सांडणी करीता पाण्याची पाळी अशी निश्चित केली की एक दिवस पाण्याच्या समस्त विहीरी व झरे तिच्यासाठी खास केले गेले आणि जन समूहाला आपल्या विहीरी व झऱ्यांमधून पाणी घेण्यास मज्जाव केला गेला. त्या प्रमाणे सबा देशाच्या राणीचे सिंहासन आपल्या जवळ मागविण्याचा व त्यात बदल करण्याचा अधिकार हजरत सुलेमान यांना प्राप्त होता की ज्या द्वारे एक ईश-चमत्कार दृगोचर व्हावा. अर्थात हा प्रयत्न राणीला अल्लाहचे मार्गदर्शन लाभावे या उच्च हेतुनेच केला गेला होता. सिंहासनात जडलेले हिरे माणके प्राप्त करण्यासाठी नव्हे.

६७. राणीने आपले सिंहासन ओळखले, परंतु त्याचे स्वरुप बदलविण्यात आले होते म्हणून ती म्हणाली, जणू तेच आहे व या सोबत या गोष्टीस ही मान्य केले की हजरत सुलेमान यांच्या चमत्कार पूर्ण कारनाम्यींचे कृत्यांचे आम्हाला पूर्वीच ज्ञान झाले होते आणि आम्ही इस्लाम धर्मास कबूल करुन मुस्लिम झालो होतो. राणीच्या या निवेदनाने स्पष्ट होते की ती व तिचे साथीदार शिष्टमंडळाचे निवेदन ऐकूनच इस्लामशी परिचित झाले होते. परंतु आद्याप आपल्या जन समूहा समोर उघडपणे आपण मुस्लिम झाल्याचे त्यांनी व्यक्त केले नव्हते आणि ना अजून ईमानाची कैफियत निर्माण झाली होती.

हजरत सुलेमान यांनी जे पत्र तिला पाठविले होते त्यात हेच सांगितले गेले होते की तिने मुस्लिम होऊन आमच्या जवळ हजर व्हावे म्हणून राणीने हा प्रवास इस्लाम ग्रहण करण्याचा निर्णय घेतल्या नंतरच केला असावा.

६८. म्हणजे राणी इस्लामशी परिचित तर झाली होती परंतु तिने उघडरित्या इस्लाम व्यक्त केला नव्हता कारण ती एका अनेकेश्वर वादी धर्माशी संबधित होती व एकी काफीर (इन्कार करणाऱ्या) जनसमूहाची प्रमुख होती. त्या धर्माचा त्याग करुन इस्लाममध्ये प्रवेश करणे तिच्या करीता सोपे नव्हते, परंतु जेव्हा ती त्या वातावरणातून बाहेर पडली व हजरत सुलेमान यांच्याजवळ पोहोचली तेव्हा तिला आपल्या विवेक बुद्धिच्या साद ला प्रतिसाद देण्याचा अवसर लाभला.

६९. हजरत सुलेमान यांनी राणीला तिच्या वैचारीक चूकीची व श्रद्धाविषयक मार्गभ्रष्टतेची जाणीव देण्याकरीता एक शिशमहाल उभारला होता ज्याची जमीन स्फटीकासमान काचेची होती व त्या खालून पाण्याचा प्रवाह वाहत होता. बघणाऱ्यास हा भ्रम होत असे की येथे पाणीच पाणी आहे म्हणून राणीने त्यातून जाण्याकरीता आपल्या पोटऱ्यांवरुन कपडे सरकविले, यासाठी की पाण्यात भिजू नये. हजरत सुलेमान म्हणाले, हा काचेने जडलेला महाल आहे. यावर ती लगेच दचकली आणि तिचे विचारचक्र या गोष्टीकडे वळले की माणसाने जर विचार चिंतन केले नाही तर तो बाह्य गोष्टी पाहून धोक्यात येऊ शकतो. वस्तुत: हकीकत वेगळीच असते. सृष्टीत अवलोकनात येणारे सूर्य, चंद्र वगैरे ईश्वर नव्हते. किंबहुना ईश्वर केवळ तोच आहे ज्याचे तेज संपूर्ण सृष्टीत दिसून येते. जेव्हा ही वास्तविकता राणीला कळाली तेव्हा तिला आपल्या या मार्गभ्रष्टतेची जाणीव झाली की ती शिर्क (अनेकेश्वरवादात) व्यस्त राहीली म्हणून तिने आपल्या पालनकर्त्या समोर या अपराधास मान्य केले आता इस्लाम तिच्या मनात खोलवर रुजला होता म्हणून तिने पूर्ण सुज्ञतेने व विश्वासाने आपण इस्लाम ग्रहण केल्याची घोषणा केली. अशा प्रकारे हजरत सुलेमान यांची कार्यकुशलता तिला ईश मार्गदर्शन लाभण्यास कारक ठरली.

राहीला हा प्रश्न की हजरत सुलेमान पैगंबर होते आणि पैगंबर ऐशआरामाचे जीवन घालवित नसतात मग हजरत सुलेमान यांनी महाल कसा बांधला? तर वस्तुस्थिती अशी की प्रथमत: हे सर्व काही आवाहनात्मक उद्दश्यांकरीता आणि इस्लामचा राजकीय हेतु लक्षात घेता केला गेले, वैभवाची दाद मिळविण्याकरीता नव्हे, किंवा अभिमान व प्रदर्शन घडविण्यासाठी नव्हे दुसरे असे की हजरत सुलेमान यांना असामान्य साधने प्राप्त झाली होती, येथपावेतो की जिन्नांकडून सेवा करविणे ही त्यांना शक्य झाले होते. म्हणून त्यांनी या साधनांचा बैतुल मक्दसची भव्य उभारणी करण्या करीता व रुबाबदार सरकारी महाल बांधण्याकरीता

उपयोग केला ज्याचा कसलाही बोझ गरीबांवर पडला नाही. त्यांनी ह्या वास्तु गरीबांचे हक्क मारुन उभारल्या नाहीत, किंबहुना सर्वश्रेष्ठ अल्लाहने सम्पतिचे जे खजीने त्यांना प्रदान केले होते, त्यांचा त्यांनी धर्माच्या उच्च उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी वापर केला. तिसरे असे की एका पैगंबराच्या आचरणाचा हा नमुना दिसून आला की ईश-भयाच्या उच्च पातळीवर राहूनही एक भव्य शासनाही चालविले जाऊ शकते आणि कोणी या भ्रमात राहू नये की कोणत्याही पैगंबराकरीता साधनांची विपुलता नव्हती आणि ना कोणी पैगंबर राजसिंहासननावर बसून सुधारणा व ईश-भयाचा नमुना सादर करू शकला.

इस्लाम धर्म कबूल केल्यानंतर राणी आपल्या देशास परत गेली किंवा नाही याबाबत कुरआनात उल्लेख नाही कारण त्याचा उद्देश इतिहासाचे वर्णन करणे नव्हे, किंबहुना शिर्क (अनेकेश्वरवादा)च्या खंडनात एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटना प्रस्तुत करणे होय, ज्यावरुन हे स्पष्ट होते की राज सिंहासन व राजमुकुट प्राप्त करणारी स्त्री देखील जेव्हा शुद्ध बुद्धिने अल्लाहच्या निशाण्यांवर विचार चिंतन करते तेव्हा तिला शिर्कचे खोटे असणे व तौहीद (एकेश्वरवादा)चे सत्य असणे स्पष्ट:कळून येते ती पूर्ण श्रद्धेने इस्लाम धर्मात प्रवेश करते आणि कोणी अशी कल्पना करू नये की पैगंबरांच्या आवाहनाने केवळ दीन दुबळे लोकच प्रभावित होत राहीले, किंबहुना असेही घडले आहे की सत्ताधारी लोकांनी आवाहनास कबूल करून इस्लामच्या प्रांगणात पाऊल टाकले आहे. बायबलमध्ये हे स्पष्टीकरण दिले गेले आहे की राणी आपल्या मायदेशास परतली होती.

‘मग ती आपल्या परिवारासह स्वदेशी परत गेली’. (२ इतिहास ९: १२)

काहीका असेना, पण सबा देशाच्या राणीशी हजरत सुलेमान यांच्या निकाह (विवाह) चा उल्लेख ना कुरआनात आढळतो, ना पैगंबराच्या वचनांमध्ये आणि ना बायबलमध्ये. आणि उचित कयास हाच की ती आपल्या देशाला परत गेली असेल, यासाठी की तिने आपल्या जन समूहास अल्लाहच्या उपासनेचे आवाहन करावे आणि हजरत सुलेमान यांनी सबा विरुद्ध कारवायी करण्याचा जो इशारा केला होता, तो अशा स्थितीत सोडला असेल जेव्हा सबाचे शासन त्यांच्या अधिपत्याखाली झाले असेल.

काही लोक सबा देशाच्या राणीच्या घटनेस स्त्रीच्या प्रमुख असण्यास शास्त्रविहीत म्हणून सादर करतात. त्यांचा युक्तिवाद असा की हजरत सुलेमान यांनी राणीला इस्लाम स्विकारल्यानंतर आपल्या पदावर कायम राखले. प्रथम तर या गोष्टीच्या समर्थनार्थ कुरआनाचा कसलाही पुरावा नाही की राणी आपल्या देशाला परत गेली व पूर्ववत राणीपदावर राहीली. दुसरे असे की हजरत सुलेमान यांनी तिला प्रमुख होण्याचे स्थान प्रदान केले नव्हते, किंबहुना तिच्या जनसमूहाने तिला आपले प्रमुख बनविले होते. तिसरे असे की तिचा जनसमूह काफीर (सत्य धर्माचा इन्कार करणारा) व मुश्रिक (अनेकेश्वरवादी) होता आणि राणीला ईश-मार्गदर्शन लाभल्यानंतर तिला आपल्या जनसमूहाच्या मार्गदर्शनाचे माध्यम बनविले जाऊ शकत होते, म्हणून या महान आवाहनात्मक व सुधारणाविषयक हेतुस लक्षात घेता एका अशा स्त्रीला जिने पूर्ण सुज्ञतेने इस्लाम धर्म स्विकारला, तिला आपल्या पदावर कायम ठेवले गेले असेल तर ही एक अपवादात्मक स्थितीच असू शकते. याला शरीयतचा सर्वसामान्य आदेश समजणे योग्य नव्हते. आणि हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची शरीयत तर परिपूर्ण शरीयत आहे ज्यात पडदा, गोषा वगैरेचेही आदेश दिले गेले आहेत म्हणून त्यांचेपालन करीत स्त्रीचे राज्याधिपति बनणे अंमलात येण्याजोगी,(Feasible)गोष्ट नव्हे.

४५. आणि आम्ही समूदकडे [७०] त्यांचा भाऊ स्वालेह ला (हा संदेश देऊन) पाठविले की अल्लाहची उपासना करा, तेव्हा अकस्मात ते दोन पक्ष बनून भांडण करू लागले.[७१]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا إِلَىٰ ثَمُودَ أَخَاهُمْ صَالِحًا أَنِ اعْبُدُوا اللَّهَ
فَإِذَا هُمْ فَرِيقَانِ يَخْتَصِمُونَ ﴿٤٥﴾

४६. तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो भलेपणाच्या आधी वाईट गोष्टी करीता कां घाई करतात? अल्लाह जवळ माफी याचना कां करीत नाही की तुमच्यावर दया केली जावी.[७२]

قَالَ يَا قَوْمِ لِمَ تَسْتَعْجِلُونَ بِالسَّيِّئَةِ قَبْلَ الْحَسَنَةِ ۖ
لَوْلَا تَسْتَغْفِرُونَ اللَّهَ لَعَلَّكُمْ تُرْحَمُونَ ﴿٤٦﴾

४७. ते म्हणाले, आम्ही तुम्हाला व तुमच्या साथीदारांना अपशकुनी समजतो.त्याने उत्तर दिले तुमचा अपशकून अल्लाह जवळ आहे. खरी गोष्ट ही की तुमची कसोटी घेतली जात आहे.[७३]

قَالُوا اطَّيَّرْنَا بِكَ وَبِمَنْ مَعَكَ ۚ قَالَ طَائِرُكُمْ عِنْدَ اللَّهِ ۖ
بَلْ أَنْتُمْ قَوْمٌ تُفْتَنُونَ ﴿٤٧﴾

४८. आणि शहरात नऊ जथे वाले असे होते, जे जमीनीवर उत्पात निर्माण करीत व सुधारणेचे कोणतेही काम करीत नसत.[७४]

وَكَانَ فِي الْمَدِينَةِ تِسْعَةُ رَهْطٍ يُفْسِدُونَ
فِي الْأَرْضِ وَلَا يُصْلِحُونَ ﴿٤٨﴾

४९. ते (आपसात) म्हणाले, अल्लाहची शपथ घेऊन प्रतिज्ञा करा की आम्ही त्याला (स्वालेहला) आणि त्याच्या कुटुंबियांना रात्रीच्या वेळी जाऊन मारुन टाकू मग त्याच्या वारसदाराला सांगू की आम्ही त्याच्या कुटुंबाच्या वधा-समयी हजर नव्हतो आणि आम्ही (आपल्या निवेदनात)अगदी सच्चे आहोत.[७५]

قَالُوا تَقَاسَمُوا بِاللَّهِ لَنُبَيِّتَنَّهُ وَأَهْلَهُ ثُمَّ لَنَقُولَنَّ لِوَلِيِّهِ
مَا شَهِدْنَا مَهْلِكَ أَهْلِهِ وَإِنَّا لَصَادِقُونَ ﴿٤٩﴾

५०. ते एक डाव चालले आणि आम्ही देखील एक युक्ति केली,अशी की त्यांना खबरसुद्धा झाली नाही.[७६]

وَمَكَرُوا مَكْرًا وَمَكَرْنَا مَكْرًا وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ﴿٥٠﴾

५१. तेव्हा बघा त्यांच्या डावाचा काय शेवट झाला. आम्ही त्यांना व त्यांच्या संपूर्ण समुदायाला नष्ट केले. [७७]

فَانْظُرْ كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ مَكْرِهِمْ أَنَّا دَمَّرْنَاهُمْ
وَقَوْمَهُمْ أَجْمَعِينَ ﴿٥١﴾

७०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअरापफ टीप क्र. ११५ ते १२९, सूरह फज्र क्र. १२, १३

७१. म्हणजे हजरत स्वालेह यांचे एकेश्वरवादाचे आवाहन प्रामणिक व एकमेव ईश्वराची उपासना करण्याचे आवाहन होते. हे आवाहन आपल्या वास्तवतेच्या दृष्टीने असे होते की मतभेदाचा प्रश्नच उद्‌भवत नाही, परंतु जेव्हा त्यांनी आवाहन प्रस्तुत केले तेव्हा जनसमूह दोन गटात विभागला गेला. एकाने आवाहन स्विकारले तर दुसऱ्याने इन्कार केला. अशा प्रकारे एकेश्वर वाद व शिर्क (अनेकेश्वरवाद) आणि ईमान व कुफ्रच्या दरम्यान संघर्ष सुरु झाला. पैगंबरांहून अधिक आवाहनास बुद्धिकौशल्याने प्रस्तुत करणारा आणखी कोण असू शकतो, परंतु जेव्हा त्यांनी अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेवर अंकूश ठेवला व एकमेव अल्लाहलाच उपासनीय ठरविले, तेव्हा त्यांच्या विरोधात एक वादळ उठले, पण त्या सोबतच एक गट असाही निघाला ज्याने त्यांचे आवाहन स्विकारले, हा गट संख्येच्या दृष्टीने कमी असला तरी सद्‌गुणांच्या दृष्टीने समाजात तेजस्वी रत्न ठरला. आणि हाच तो निष्कर्ष होय जो आवाहनाचा मूळ उद्देश आहे आणि अशाच लोकांद्वारे जन्नतचा समाज घडणार आहे.

आजच्या काळात इस्लामी आवाहनास प्रस्तुत करणाऱ्यांची फार मोठी संख्या अशी आहे जी अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेवर वज्र प्रहार करण्यापासून दूर राहते व त्या संघर्षाला तोंड द्यावयास तयार नसते जो एकेश्वरवादाचे निर्धास्त आवाहन प्रस्तुत करण्याच्या परिणामी उद्‌भवतो यास्तव त्यांचे आवाहन अधिक परिणामकारक व प्रभावी आणि मंगलदायी ठरत नाही.

७२. म्हणजे घाई करुन तुम्ही सत्याला खेटे ठरवित आहात व आपल्या दुष्परिणतीस आमंत्रण देत आहात, परंतु जर गंभीरपणे विचार केल्यास तुम्हाला सत्य स्पष्टत: कळून येईल आणि तुम्हाला आपल्या अपराधांची ही जाणीव होईल. मग तुम्ही अल्लाहपुढे क्षमा-याचक बनून त्याच्या कृपेस पात्र ठरू शकता.

७३. हजरत स्वालेह यांना अल्लाहतर्फे पाठविले गेल्यानंतर जेव्हा अल्लाहतर्फे संकटाचे अवतरण होऊ लागले. यासाठी की गफलतीत पडलेल्या लोकांनी जागृत व्हावे व पैगंबरांच्या आवाहनास लक्षपूर्वक ऐकावे. तेव्हा या कसोटीचे स्पष्टीकरण त्यांनी असे केले की हा स्वालेह व त्यांच्या साथीदारांचा अशुभपणा आहे. यावर हजरत स्वालेह यांनी हे उत्तर दिले की तुमचे नशीब अल्लाहच्या हाती आहे. हे जे काही घडून येत आहे ते त्याच्याच तर्फे होय, व याचा हेतु तुमची परीक्षा घेणे होय. यास एखाद्या देवी-देवतेच्या कोपाचा परिणाम ठरविणे व एकेश्वरवादाचे आवाहन करणाऱ्यांना अपशकुनी समजणे म्हणजे सूर्याच्या लख्ख प्रकाशात डोळे मिटून अंधार असल्याची ओरड करणे !

७४. म्हणजे समाजात सर्वत्र बिघाड निर्माण करीत होते. सुधारणेच्या कसल्याही कार्यात त्यांना स्वारस्य नव्हते.

७५. शहरातल्या या उत्पात माजविणाऱ्या घटकांनी एकत्र येऊन हा कट रचला की आपण सर्व मिळून स्वालेह व त्यांच्या कुटुंबियावर रात्रीच्या वेळी हल्ला चढवू व त्यांना ठार मारल्यानंतर त्यांच्या वारसाला सांगू की आम्ही घटना-प्रसंगी हजर नव्हतोच. अशा प्रकारे आमच्याशी किसास (हत्तेचा मोबदला हत्त्या) घेतला जाणार नाही.

स्पष्ट व्हावे की कबिला-व्यवस्थेत किसासचा नियम फार महत्तवपूर्ण होता. जर एखाद्या व्यक्तिची हत्त्या केली गेली असेल तर तिचा वारस मारेकऱ्याकडून रक्ताची मागणी करीत असे किंवा त्याला रक्तपात अदा करावा लागत असे. अथवा त्याला किसास नियमानुसार ठार केले जात असे. या नियमापसून आपला बचाव करण्यासाठी त्या समाजकंटकांनी ही युक्ति लढविली की सर्व मिळून त्याला ठार करु व नंतर खोटे बोलू यासाठी की हत्त्येचा आरोप कोणावरही येऊ नये.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनाही पुढील आयुष्यात अशाच परिस्थितीला तोंड द्यावे लागले. मक्केच्या वेगवेगळ्या कबिल्यांनी एकत्र येऊन हा कट रचला की सर्व कबिल्यांचे सरदार एकत्र मिळून त्यांची हत्त्या करतील. जेणेकरुन बनी हाशीम (पैगंबरांचा वंश) ला रक्ताची मागणी करणे सोपे न रहावे. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने ऐन वेळी पैगंबरांना अशा प्रकारे मार्गदर्शन केले की ते निवांतपणे मक्का शहरातून बाहेर पडले व शत्रूंचे कारस्थान निष्फळ ठरले.

७६. म्हणजे त्यांचा कट-कारस्थानास सर्वश्रेष्ठ अल्लहने अशा प्रकारे निष्फ्ळ केले की त्यांनी आपल्या योजनेला कार्यान्वित करण्यासाठी जी वेळ ठरविली होती, त्यापूर्वीच त्यांना अल्लाहच्या महाभयंकर शिक्षेने आपल्या तावडीत घेतले.

७७. समूद जन समूहावर जी ईश-शिक्षा कोसळली त्याबाबतचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र.१२३,१२४मध्ये केले गेले आहे.

५२. ही त्यांची घरे आहेत, जी ओसाड पडली आहेत. [७८] त्या अत्याचाराच्या मोबदल्यात जो ते करीत राहीलेत. यात मोठी निशाणी आहे त्या लोकांकरीता जे ज्ञान बाळगतात.[८०]

فَتِلْكَ بُيُوتُهُمْ خَاوِيَةًۢ بِمَا ظَلَمُوْا ؕ اِنَّ فِىْ ذٰلِكَ لَاٰيَةً
لِّقَوْمٍ يَّعْلَمُوْنَ ﴿٥٢﴾

५३. आणि आम्ही त्या लोकांना मुक्ति दिली ज्यांनी ईमान बाळगले होते व (अल्लाहचे) भय बाळगत होते.[८१]

وَاَنْجَيْنَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَكَانُوْا يَتَّقُوْنَ ﴿٥٣﴾

५४. आणि आम्ही लूत ला पैगंबर बनवून पाठविले. जेव्हा तो आपल्या जन-समूहास म्हणाला, काय तुम्ही डोळ्याा देखत कुकर्म करता?[८२]

وَلُوْطًا اِذْ قَالَ لِقَوْمِهٖۤ اَتَاْتُوْنَ الْفَاحِشَةَ
وَاَنْتُمْ تُبْصِرُوْنَ ﴿٥٤﴾

५५. काय तुम्ही स्त्रीयांना सोडून कामवासना भागविण्यासाठी पुरुषांजवळ जाता ?[८४] वस्तुस्थिती अशी की तुम्ही अतिशय अज्ञानी लोक आहात.[८५]

اَئِنَّكُمْ لَتَاْتُوْنَ الرِّجَالَ شَهْوَةً مِّنْ دُوْنِ النِّسَآءِ ؕ بَلْ
اَنْتُمْ قَوْمٌ تَجْهَلُوْنَ ﴿٥٥﴾

५६. परंतु त्याच्या जन-समूहाचे उत्तर याखेरीज काही नव्हते की आपसात म्हणू लागले की लूतच्या कुटुंबियांना आपल्या वस्ती बाहेर घालवा.[८६] हे लोक मोठे सत्शील बनतात.[८७]

فَمَا كَانَ جَوَابَ قَوْمِهٖۤ اِلَّاۤ اَنْ قَالُوْۤا اَخْرِجُوْۤا اٰلَ
لُوْطٍ مِّنْ قَرْيَتِكُمْ ۚ اِنَّهُمْ اُنَاسٌ يَّتَطَهَّرُوْنَ ﴿٥٦﴾

५७. शेवटी आम्ही त्याला व त्याच्या कुटुंबियांना मुक्ति दिली, मात्र त्याच्या पत्नी खेरीज,कारण आम्ही निश्चित केले होते की ती मागे राहणाऱ्यांपैकी होईल.[८८]

فَاَنْجَيْنٰهُ وَاَهْلَهٗۤ اِلَّا امْرَاَتَهٗ ۫ قَدَّرْنٰهَا
مِنَ الْغٰبِرِيْنَ ﴿٥٧﴾

५८. आणि आम्ही यांच्यावर एक विशेष प्रकारचा पाऊस पाडला [८९] तेव्हा किती वाईट पाऊस पडला त्या लोकांवर ज्यांना खबरदार केले गेले होते.

وَاَمْطَرْنَا عَلَيْهِمْ مَّطَرًا ۚ فَسَآءَ مَطَرُ الْمُنْذَرِيْنَ ﴿٥٨﴾

५९. सांगा, प्रशंसा अल्लाह करीता आहे आणि सलाम (शांती) आहे त्याच्या त्या दासांवर ज्यांची त्याने निवड केली [९०] (त्यांना हे विचारा की) अल्लाह अधिक श्रेष्ठ आहे कि ते ज्यांना हे अल्लाहचा सहभागी ठरवितात?[९१]

قُلِ الْحَمْدُ لِلّٰهِ وَسَلٰمٌ عَلٰى عِبَادِهِ الَّذِيْنَ اصْطَفٰى ؕ آٰللّٰهُ
خَيْرٌ اَمَّا يُشْرِكُوْنَ ﴿٥٩﴾

७८. म्हणजे हिज्र च्या इलाक्यात त्यांचे भग्न अवशेष शिल्लक राहीले आहेत जे राहणाऱ्यांकरीता बोधजनक आहेत.

७९. समूद जनसमूहाच्या अनेकेश्वरवादी आचरणाचा व दुराचारी वर्तनाचा येथे अत्याचार (जुलुम) हा अर्थ घेतला गेला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की अत्याचार हा शब्द कुरआन कोणत्या अर्थाने वापरते.

८०. म्हणजे जे लोक अज्ञानी बनून राहात नाही, किंबहुना परिस्थिती व घटनांचा अभ्यास करुन त्यांच्या खऱ्या कारणांचे ज्ञान प्राप्त करतात त्यांच्या करीता समूहाच्या या वृत्तांतात बोध ग्रहणाची मोठी निशाणी आहे.

८१. सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे जेव्हा निर्णायक शिक्षा अवतरली जो पैगंबराच्या सत्यतेचे प्रमाण होता तर त्या शिक्षेच्या तावडीत काफीर, मुशिरक (अनेकेश्वरवादी) दुराचारी लोकच सापडले. राहीलेत ते लोक ज्या ंनी ईमान बाळगून तकवा (ईश-भया) चे वर्तन अंगिकारले होते, त्यांना या शिक्षेपासून वाचविण्यात आले.

८२. हजरत लूत यांचा वृत्तांत अनेक सूरती (अध्यायां) मध्ये निवेदिला गेला आहे. उदा. सूरह अअराफ, सूरह हूद, इ.

८३. म्हणजे एक असे निर्लज्जपणाचे काम, ज्याला कोणताही समंजस मनुष्य वाईट वा कुकर्म म्हटल्याखेरीज राहणार नाही. मग तुम्ही जाणून बुजून डोळ्यांदेखत हे किळसवाणे काम कसे करता?

८४. हे लोक समलिंग संभोगाच्या विकृतिने पछाडलेले होते स्त्रीयांना त्यांनी जणू वाळीत टाकले होते व पुरुषांकरवी आपली कामवासना भागवित असत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. १२९.

८५. म्हणजे तुम्ही इतके निर्बुद्ध आहात की स्पष्ट मूर्खतेचे काम करीत आहात. मूळ शब्द जहल, हा कधी ज्ञानाच्या विरुद्धार्थी वापरला जातो तर कधी बुद्धिच्या विरुद्धार्थी. या ठिकाणी बुद्धिच्या विपरीत अर्थाने वापरला गेला आहे.

८६. ते आपल्या वस्तीत असा एकही मनुष्य खपवून घेण्यास तयार नव्हते, जो त्यांचा खरा हितचिंतक होता, व त्यांचा सुधारणेकरीता प्रयत्नशील होता. यावरुन त्यांच्या दुराचारी विचारसरणीची कल्पना येते.

८७. हा टोमणा हजरत लूत व त्यांच्या सोबतच्या ईमान बाळगणाऱ्या साथीदारांना उद्देशून होता जे स्वच्छ शुद्ध चारित्र्य अंगिकारण्यावर जोर देत होते.

८८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११७.

८९. अर्थात दगडांचा वर्षाव. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११९.

९०. वर जो वृत्तांत निवेदिला गेला आहे त्याचा समारोप अल्लाहच्या प्रशांसेने व प्रतिष्ठीत ईशभय बाळगणाऱ्या दासांवर सलाम सह झाला आहे. या घटनांमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्याय, बुद्धिकौशल्य व कृपा इत्यादि गुण विशेष व्यक्त झाले आहेत. म्हणून याबद्दल तो प्रशांसा-स्तुतीस पात्र आहे व त्यांच्या निवडक दासांनी- पैगंबरांनी आपल्या जबाबदाऱ्या ज्या चांगल्या रीतीने पार पाडल्या त्याबद्दल ते अल्लाहजवळ या गोष्टीस पात्र ठरतील की त्यांच्यावर सलामती (शांती) च सलामती व्हावी. ईमान बाळगणाऱ्यांच्या हृदयातून त्यांच्यासाठी सलामतीचीच प्रार्थना निघते. याच कारणास्तव कोणत्याही पैगंबरांच्या नावासोबत 'अलैहिस्सलाम' हा शब्दप्रयोग केला जातो.

९१. प्रश्न अनेकेश्वरवाद्यांना उद्देशून आहे की, सांगा जो ईश्वर या बुद्धिकौशल्याने आपल्या दासांवर शासन करीत आहे तो अधिक श्रेष्ठ आहे कि दगड मातीचे ते देव ज्यांना तुम्ही ईश्वराचा दर्जा बहाल केला आहे?

६०. (उपास्य हे आहेत) कि तो ज्याने आकाशांना व जमीनीला निर्माण केले आणि तुमच्यासाठी आकाशातून पाणी वर्षाविले व त्याद्वारे बागा उगविल्या ज्यातल्या झाडांना उगविणे तुमच्या करीता शक्य नव्हते. काय, अल्लाह सोबत अन्य एखादा देव आहे ?[९२] नव्हे, किंबहुना हे लोक (सत्यापासून) तोंड फिरवित आहोत.

أَمَّنْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضَ وَأَنْزَلَ لَكُمْ مِّنَ
السَّمَآءِ مَآءً ۚ فَأَنْۢبَتْنَا بِهٖ حَدَآئِقَ ذَاتَ بَهْجَةٍ ۚ مَا كَانَ
لَكُمْ أَنْ تُنْۢبِتُوْا شَجَرَهَا ۗ ءَاِلٰهٌ مَّعَ اللّٰهِ ۗ بَلْ هُمْ قَوْمٌ يَّعْدِلُوْنَ ﴿٦٠﴾

६१. तो ज्याने जमीनीला निवास-स्थान बनविले [९३] व तिच्या दरम्यान नद्या प्रवाहीत केल्यात व तिच्यावर पर्वत उभे केले आणि दोन समुद्रांच्या दरम्यान आडपडदा घातला [९४] काय, अल्लाह सोबत अन्य एखादा देव आहे ? नव्हे, किंबहुना यांच्यापैकी अधिकांश लोक जाणत नाहीत.[९५]

أَمَّنْ جَعَلَ الْأَرْضَ قَرَارًا وَّجَعَلَ خِلٰلَهَآ أَنْهٰرًا وَّجَعَلَ
لَهَا رَوَاسِيَ وَجَعَلَ بَيْنَ الْبَحْرَيْنِ حَاجِزًا ۗ ءَاِلٰهٌ مَّعَ اللّٰهِ ۚ
بَلْ أَكْثَرُهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ﴿٦١﴾

६२. तो, जो बेचैन असलेल्याचे आर्जव ऐकतो, जेव्हा तो त्यास पुकारतो व त्याच्या यातनेस दूर करतो [९६] आणि तुम्हाला जमीनीवर अखत्यार असलेले बनवितो.[९७] काय, अल्लाहसोबत अन्य एखादा देव आहे? तुम्ही लोक फार कमीच बोध ग्रहण करता.[९८]

أَمَّنْ يُّجِيْبُ الْمُضْطَرَّ إِذَا دَعَاهُ وَيَكْشِفُ السُّوْٓءَ
وَيَجْعَلُكُمْ خُلَفَآءَ الْأَرْضِ ۗ ءَاِلٰهٌ مَّعَ اللّٰهِ ۚ
قَلِيْلًا مَّا تَذَكَّرُوْنَ ﴿٦٢﴾

६३. तो, जो खुशकी व समुद्राच्या अंधःकारात तुम्हाला मार्ग दाखवितो, [९९] आणि जो आपल्या कृपेच्या [१००] पुढे पुढे वाऱ्यांना खुश खबरींसह पाठवितो. काय, अल्लाह सोबत अन्य एखादा देव आहे? अत्युच्च आहे अल्लाह त्या शिर्क पासून जे हे लोक करीत आहेत.[१०१]

أَمَّنْ يَّهْدِيْكُمْ فِيْ ظُلُمٰتِ الْبَرِّ وَالْبَحْرِ وَمَنْ يُّرْسِلُ
الرِّيٰحَ بُشْرًا بَيْنَ يَدَيْ رَحْمَتِهٖ ۗ ءَاِلٰهٌ مَّعَ اللّٰهِ ۚ
تَعٰلَى اللّٰهُ عَمَّا يُشْرِكُوْنَ ﴿٦٣﴾

६४. तो, जो निर्मितीचा प्रारंभ करतो, मग त्याची पुनरावृत्ति करील आणि जो तुम्हाला आकाश व जमीनीतून उपजिविका प्रदान करतो. काय, अल्लाह सोबत अन्य एखादा देव आहे? सांगा, आपले प्रमाण आणा जर तुम्ही सच्चे असाल. [१०२]

أَمَّنْ يَّبْدَؤُا الْخَلْقَ ثُمَّ يُعِيْدُهٗ وَمَنْ يَّرْزُقُكُمْ مِّنَ
السَّمَآءِ وَالْأَرْضِ ۗ ءَاِلٰهٌ مَّعَ اللّٰهِ ۚ قُلْ هَاتُوْا بُرْهَانَكُمْ
إِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿٦٤﴾

९२. अल्लाहचे अस्तित्व व त्याच्या एकमेवतेबद्दल कुरआनाचा युक्तिवाद स्वभाविक सर्वसामान्यांना समजेल असा आणि मनात विश्वास निर्माण करणारा आहे. तो तर्कशास्त्र व तत्वज्ञानाच्या भाषेत बोलत नाही आणि ना दृष्टीकोनात्मक चर्चा विवाद उभे करतो कारण तो सर्वसामान्य लोकांना संबोधितो, केवळ एखाद्या विशिष्ट वर्गास नव्हे तसेच या कारणास्तवही की ज्या गोष्टी तत्वज्ञानीय शैलीत व दृष्टिकोन विषयक शैलीत सादर केल्या जातात त्या विचार सरणीला प्रभावीत करू शकतात. परंतु त्यांच्या मनात शिरकाव होणे कठीण आहे. मात्र कुरआनाची प्रमाणे साधी सरळ असूनही इतके दृढ व एवढे परिणामकारक आहेत की मन-मस्तिष्कावर ठसा उमटवितात ज्यामुळे ईमान व विश्वासाची कैफीयत निर्माण होते. या ठिकाणीही कुरआनाने अल्लाह एकमेव उपास्य असण्याबद्दल अशाच प्रकारे युक्तिवाद केला गेला आहे.

मनुष्य जर विशुद्ध विचार सरणीने आकाश व जमीनीच्या अस्तित्वावर व त्यांच्याद्वारे प्राप्त होणाऱ्या उपजिविकेवर विचार चिंतन करील, ज्यावर मनुष्य जीवन निर्भर आहे तर त्याचे मन स्वयंस्फूर्त होऊन सांगेल की हे सर्व काही आपोआप अस्तित्वात आले नाही, किंबहुना या सर्वांना निर्माण करणारा एक आहे आणि ही सृष्टी एक परिपूर्ण व्यवस्था आहे. जिचे विविध भाग एकमेकांशी अनुरुपता साधून त्या उद्दिष्टांची पूर्तता करतात ज्यांच्याकरीता त्यांना निर्मिले गेले आहे. यास्तव आकाश व जमीनीच्या अनुकूलतेनेच पर्जन्य-वृष्टि होते. ज्याद्वारे माणसाच्या उपजिविकेची सामुग्री होते. जर आकाशातली सामर्थ्यांनी उदाहरणार्थ सूर्याची उष्णता, वारे, इत्यादिंनी जमीनीशी अनुकूलता साधली नसती तर ना पाऊस पडू शकला असता आणि ना उपजिविका खाद्य-पेयाची सामुग्री लाभली असती. नित्य अवलोकनात येणाऱ्या ह्या गोष्टी या बाबतचा पर्याप्त पुरावा होय की सृष्टी ईश्वराविन नाही आणि ना येथे एकाहून अधिक ईश्वरांचे अस्तित्व आहे. जर ही सृष्टी ईश्वराविन असती तर हिच्यात ना नियमितता राहीली असती आणि ना उद्दिष्टता, तसेच जर एकाहून अधिक ईश्वर (किंवा देव) राहिले असते तर तिच्या वेगवेगळ्या भागांमध्ये अनुकूलता ही राहू शकत नव्हती. एकेश्वरवादाची ही प्रमाणे साधी आहेत, परंतु इतके सखोल, दृढ व निश्चल आहेत की याद्वारे नास्तिकता व अनीश्वरवादीतेची ही पाळेमुळे खणली जातात व एकाहून अधिक ईश्वरांचे अस्तित्व ही लोप पावते. तात्पर्य, ईश्वराचे अस्तित्व व त्यांचे एकमेव असणे ही अनुमानाची गोष्ट नव्हे आणि ना तत्वज्ञानीय कल्पना होय, किंबहुना एक अशी वस्तुस्थिती आहे जिचे ज्ञान माणसाला प्रत्यक्षत होते मात्र या अटीवर की त्याने आपले डोळे उघडे ठेवावेत व आपल्या स्वभावास दुषित न करावे.

जेथपावेतो आकाशाच्या व जमीनीच्या निर्मितीशी संबंध आहे, कुरआन स्पष्ट: फर्माविते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने यांना व यांच्या दरम्यान असलेल्या सर्व वस्तूंना अभावातून अस्तित्वात आणले आहे. आणि अरब देशीय अनेकेश्वरवाघांची हीच धारणा होती. परंतु भारतातल्या अनेकेश्वरवाग्यांची श्रद्धा मोठी गुंतागुंतीची आहे व अतिशय मोठ्या प्रमाणात मार्गभ्रष्ट करणारी आहे. उदाहरणार्थ ऋग्वेदातील उल्लेख असा की आकाश व जमीनीची उत्पत्ति ईश्वराच्या स्वत्वापासून झाली आहे.

' Out of himself came the invisible world out of himself came the sky & this earth' (The Spiritual Heritage of India by Swami Prabhavananda p. 32 with reference to Rg. Veda X 121 1-2)

ऋग्वेदाचा हा इंग्रजी अनुवाद वेद प्रतिष्ठान, नवी दिल्ली द्वारे प्रकाशित झाला आहे. याच्या प्रस्तावनेत अनुवादकाने स्पष्टीकरण दिले आहे की ईश्वर एकटाच सृष्टीचा निर्माता अवश्य आहे परंतु या अर्थाने नव्हे की त्याने सृष्टीला शून्यातून निर्माण केले आहे, किंबहुना वैदिक तत्वज्ञानानुसार ईश्वर जो निर्माता आहे व प्रकृति दोघांचे अस्तित्व नेहमीपासून आहे.

' The Vedic philosophy is a concept of co-existance of the two eternals God the Creator and the Primordial matter or Prakrti' (Rgveda Smhita - Vol. 1 p. 6)

ईश्वराविषयीची ही किती निकृष्ट कल्पना आहे की त्याला निर्माता मानणे, ते ही निर्मितीच्या स्तरावर ठेवून. जणू ईश्वर एखाद्या गोष्टीस अभावातून अस्तित्वात आणण्यास समर्थ नाही, जेव्हा कुरआन अल्लाहला खऱ्या अर्थाने निर्माता व सर्व समर्थ मानण्याचे आवाहन करतो.

९३. म्हणजे जमीनीला अशा प्रकारे बनविले की तिच्यावर राहणे व जीवन व्यतीत करणे माणसाला शक्य व्हावे. उदाहरणार्थ जर वायुमंडळ नसते तर जमीनीवर जीवन व्यतीत करणे अशाच प्रकारे अशक्य झाले असते जसे चंद्रावर अशक्य आहे. त्याच प्रमाणे जमीन सूर्यापासून ज्या अंतरावर राखली गेली आहे, त्यात जर कमी अधिकता असती तर तिच्यावर जीवनाचे अस्तित्वच राहीले नसते. यास्त्व जे ग्रह सूर्यापासून अगदी जवळ किंवा फार लांब अंतरावर आहेत त्यांच्यात जीवन असण्याविषयी माहीती प्राप्त होऊ शकलेली नाही. परंतु जमीन आपल्या स्थानाच्या दृष्टीने अशा संतुलीत बिंदूवर आहे की जीवनाकरीता पूर्णत: अनुकूल ठरली. काय हे सर्व आपोआप घडले कि एका सर्व समर्थ शक्तिच्या रचनेचा परिणाम आहे?

९४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फुर्कान टीप क्र. ७१

९५. म्हणजे हे लोक ईश्वराशी अपरिचित आहेत व असे इच्छित नाही की ईश्वराची योग्य ओळख त्यांना लाभावी.

९६. हा अनुभव तर प्रत्येक माणसाला होतो की जेव्हा तो अत्याधिक दु:ख यातनाग्रस्त होतो तेव्हा त्याला ईश्वर आठवतो व तो त्याला आर्जव करू लागतो मग त्याचे दु:ख निवारण ही तोच करतो. माणसाचा अंतरात्मा या गोष्टीस साक्षी आहे की अल्लाहच आर्जव ऐकणारा आहे, परंतु अन्तरीची साक्ष असून देखील किती तरी लोक अल्लाह खेरीजच्या उपास्यांना फिर्याद ऐकणारा व संकट निवारक समजतात.

९७. तो अल्लाहच होय ज्याने माणसाला जमीनीवर अधिकार बाळगणारा बनविले आहे की तो तिच्या सर्व वस्तूंमध्ये विनियोग करतो आणि सर्वांवर त्याचे अधिपत्य कायम आहे. जर कोणाचा हा दावा असेल की हे सर्वाधिकार अन्य एखाद्याने प्रदान केले आहेत तर त्याने या गोष्टीचा पुरवा सादर करावा. परंतु अनेकेश्वरवादी देखील ही गोष्ट मानणारे नाहीत की माणसाला ईश्वराखेरीज अन्य एखाद्याने अधिकार बाळगणारा बनविले आहे. राहीलेत नास्तिक तर त्यांच्याजवळ या प्रश्नाचे सुरवातीपासूनच काही उत्तर नाही की माणसाला हे अधिकार कोठून प्राप्त झाले आहेत?

९८. म्हणजे ईश्वराची ही कृपा अशी आहे की माणसाला वारंवार त्याच्याकडे लक्ष वेधवित आहे, परंतु फार कमी असे घडते की मनुष्य त्याच्याकडे आपले लक्ष केंद्रित करतो.

९९. म्हणजे अशी लक्षणे त्याने कायम केली आहेत की ज्याद्वारे माणसाला मार्ग लाभावा व प्रवासाची दिशा कळणे शक्य व्हावे उदाहरणार्थ पहाड, नदी, जे खुश्कीच्या प्रवासात मार्ग जाणून घेण्याची साधने आहेत. त्याच प्रमाणे नक्षत्रे जी जहाजाच्या प्रवासात मार्ग दाखवितात.

१००. अभिप्रेत पर्जन्य वृष्टि होय.

१०१. म्हणजे अल्लाहला अनेकेश्वरवादी ही मानतात परंतु त्यांची ईश्वर विषयक कल्पना मोठी क्षुद असते. अरब देशीय अनेकेश्वरवादी ईश्वराचे सामर्थ्य व त्याच्या महानतेची योग्य कल्पना कायम करण्यास असमर्थ राहीलेत आणि भारतातल्या अनेकेश्वरवाद्यांनी तर ईश्वराला माणसापेक्षाही कमी प्रतीचा ठरविले.

१०२. म्हणजे जर तुमच्या जवळ या गोष्टीचे एखादे प्रमाण आहे की अल्लाह खेरीज एखादे अस्तित्व आहे, जे पहिल्यांदाही निर्माण करते व दुसऱ्यांदा देखील निर्माण करू शकते व उपजिविका ही पोहचवित आहे तर ते सादर करा परंतु जे लोक अनेक ईश्वरांना मानणारे आहेत त्यांच्याजवळ ना पूर्वी कसले प्रमाण होते ना आज आहे. अरब देशातल्या अनेकेश्वरवाद्यांचे तर असे म्हणणे होते की वाडवडिलापासून हीच श्रद्धा चालत आली आहे आणि भारतातले अनेकेश्वरवादी शिर्क (अनेकेश्वरवादा)ला तत्वज्ञानी रंगरुपात सादर करतात परंतु साऱ्या गोष्टी अनुमानाच्या असतात व परस्परविरोधीही असतात. एकीकडे ईश्वर हा एकमेव असण्याचा दावा 'God alone is One' तर दुसरीकडे तीन ईश्वरां (Trinity)ची श्रद्धा देखील (Rgveda Samhita Vol. I p.73)

' Ours is Holy Trinity, The family of three eternals, the infinite supreme self (The Father)(ii) the eternal primal matter the Prakriti (the mother) and (iii) the numberless infinitiesimal self (The sons)' (Rgveda Samhita Introduction Vol. I. p. 16)

आणि त्यासोबतच अगणित ईश्वरांची कल्पना सुद्धा-

'There are as many Devas or Spiritual Entities as there are qualities in the World' (Outlines of Vedanta p. 131)

तसेच हा दावा देखील की सर्वोच्च ईश्वराने अन्य ईश्वरांना जन्म दिला आहे-

'From a part of him was born the body of Universe, and out of his body were born the gods, the earth and men. '

(Spiritual Heritage of India p. 32)

या समस्त गुंतागुंतीच्या व परस्परविरोधी गोष्टींच्या उलट कुरआन अल्लाहच्या एकमात्र उपास्य असण्यास इतक्या उचित शैलीत मांडतो की एखाद्या शुद्ध विचारसरणीच्या मनुष्याला कसलीही गुंतागुंत व मताभिन्नता जाणवत नाही व कथन मन-मस्तिष्कात शिरकाव करते.

(त्यांना) सांगा, आकाशांमध्ये व जमीनीवर अल्लाह खेरीज असा कोणीही नाही जो अपरोक्षाचे ज्ञान बाळगत असेल आणि ते जाणत नाही की केव्हा उठविले जातील ? किंबहुना आखिरत (मरणोत्तर जीवना) विषयी त्यांचे ज्ञान विस्कळीत झाले आहे, किंबहुना हे लोक या बाबतीत संशय-ग्रस्त झाले आहेत, इतकेच नव्हे तर हे या पासून आंधळे आहेत. (अल-क़ुर्आन)

قُلْ لَّا يَعْلَمُ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ الْغَيْبَ إِلَّا اللّٰهُ ۚ
وَمَا يَشْعُرُوْنَ أَيَّانَ يُبْعَثُوْنَ ﴿٦٥﴾

६५. (त्यांना) सांगा, आकाशांमध्ये व जमीनीवर अल्लाह खेरीज असा कोणीही नाही जो अपरोक्षाचे ज्ञान बाळगत असेल [१०३] आणि ते जाणत नाही की केव्हा उठविले जातील ?[१०४]

بَلِ ادّٰرَكَ عِلْمُهُمْ فِي الْاٰخِرَةِ ۚ بَلْ هُمْ فِيْ شَكٍّ
مِّنْهَا ۖ بَلْ هُمْ مِّنْهَا عَمُوْنَ ﴿٦٦﴾

६६. किंबहुना आखिरत (मरणोत्तर जीवना) विषयी त्यांचे ज्ञान विस्कळीत झाले आहे, किंबहुना हे लोक या बाबतीत संशय-ग्रस्त झाले आहेत, इतकेच नव्हे तर हे या पासून आंधळे आहेत.[१०५]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا ءَاِذَا كُنَّا تُرٰبًا وَّاٰبَآؤُنَآ اَئِنَّا
لَمُخْرَجُوْنَ ﴿٦٧﴾

६७. आणि हे काफीर (सत्य-विरोधक) असे म्हणतात की जेव्हा आम्ही व आमचे पूर्वज माती झालेले असतील, तर काय आम्हाला (कबरींमधून) बाहेर काढले जाईल?

لَقَدْ وُعِدْنَا هٰذَا نَحْنُ وَاٰبَآؤُنَا مِنْ قَبْلُ ۙ إِنْ هٰذَآ
إِلَّآ أَسَاطِيْرُ الْأَوَّلِيْنَ ﴿٦٨﴾

६८. या विषयीची धमकी आम्हालाही दिली गेली आहे व आमच्या पूर्वजांना ही दिली जात राहीली, परंतु या केवळ पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या कथा मात्र होत.[१०६]

قُلْ سِيْرُوْا فِي الْأَرْضِ فَانْظُرُوْا كَيْفَ كَانَ
عَاقِبَةُ الْمُجْرِمِيْنَ ﴿٦٩﴾

६९. सांगा, जमीनीवर जरा हिंडून फिरून पहा की अपराध्यांची काय परिणति झाली.[१०७]

وَلَا تَحْزَنْ عَلَيْهِمْ وَلَا تَكُنْ فِيْ ضَيْقٍ مِّمَّا يَمْكُرُوْنَ ﴿٧٠﴾

७०. (हे पैगंबर) तुम्ही यांच्या (दशे) बद्दल दुःख करु नका आणि ना त्यांच्या कट-कारस्थानांबद्दल जे ते रचीत आहेत, मन संकुचित व्हावे.[१०८]

وَيَقُوْلُوْنَ مَتٰى هٰذَا الْوَعْدُ إِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿٧١﴾

७१. ते म्हणतात, ही धमकी केव्हा घडून येईल जर तुम्ही सच्चे असाल.[१०९]

قُلْ عَسٰٓى أَنْ يَّكُوْنَ رَدِفَ لَكُمْ بَعْضُ
الَّذِيْ تَسْتَعْجِلُوْنَ ﴿٧٢﴾

७२. त्यांना सांगा, नवल नव्हे की ज्या गोष्टी करीता तुम्ही घाई करीत आहात, तिचा एक हिस्सा तुमच्या मागेच लागलेला असावा.[११०]

وَإِنَّ رَبَّكَ لَذُوْ فَضْلٍ عَلَى النَّاسِ وَلٰكِنَّ
أَكْثَرَهُمْ لَا يَشْكُرُوْنَ ﴿٧٣﴾

७३. खरे पाहता, तुमचा पालन कर्ता लोकांवर मोठी कृपा करणारा आहे, परंतु अधिकांश लोक कृतज्ञता दर्शवित नाही.[१११]

१०३. म्हणजे अल्लाह खेरीज कोणाला अपरोक्ष ज्ञान नाहीच, तर एखाद्या विषयी ही श्रद्धा की तो पुकारणाऱ्याची पुकार ऐकतो व त्याची फिर्याद ऐकतो, गरजपूर्ति करतो, तर पूर्णपणे चुकीची व निराधार गोष्ट होय. मग ही श्रद्धा फरिशत्यांच्या बाबत राखली जावो किंवा जिन्नांविषयी किंवा पैगंबर, बुजुर्ग व वली यांच्या विषयी राखली जावो.

खेदाची गोष्ट म्हणजे कुरआनाच्या स्पष्टीकरणानंतर देखील मुसलमानांचा एक गट या मार्गभ्रष्टतेत व्यस्त आहे की फिर्याद ऐकण्यासाठी व संकट निवारणासाठी बुजुर्ग वलींना जे कबरींमध्ये दफन झाले आहेत पुकारण्यास काही हरकत नाही ते कबरीत राहून प्रत्येकाच्या परिस्थितीला जाणतात. त्याचे पुकारणे ऐकतात व त्याची मदत करतात. वास्तविक पहाता कुरआनाच्या स्पष्टीकरणानुसार यापैकी एक देखील गोष्ट योग नाही. ना त्यांना अपरोक्षाचे ज्ञान आहे की कबरीत राहून जगातल्या प्रत्येक माणसाच्या परिस्थितीला जाणत असावेत. ते ईश्वर नाहीत की एखाद्याने कोठूनही त्यांना पुकारावे व त्यानी त्यांची पुकार ऐकावी आणि ना ते आलमे बर्जख (कबरीतून दुसऱ्यांदा उठविले जाण्यापूर्वीचे विश्व) मध्ये राहून एखाद्यास मदत करु शकतात. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत ही ज्ञानाविषयी मोठी अतिशयोक्तिपूर्ण कल्पना कायम केली गेली आहे मग यावर चर्चा-विवाद व शास्त्रार्थ वाद विवाद होतात. जर स्वच्छ शुद्ध मनाने विचार सरणीने कुरआनाचा अभ्यास केल्यास सर्व प्रकारच्या मार्गभ्रष्टतेपासून मुक्ति मिळते. अपरोक्ष ज्ञानाच्या अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ८१ व सूरह अअराफ टीप क्र. २९१

१०४. म्हणजे जे कबरीत दफन केले गेले आहेत त्यांना हे ही ठाऊक नाही की केव्हा कियामत कायम होईल व त्यांना उठवून उभे केले जाईल. त्याच प्रमाणे फरिश्ते व जिन्नांनाही कियामतीची तारीख माहीत नाही मग ते अपरोक्ष ज्ञान जाणणारे कसे ठरले की कोणाचेही आर्जव ऐकावे?

१०५. अरब देशीय अनेकेश्वरवादी आखिरत विषयी वर नमूद केल्याप्रमाणे अगदीच अनभिज्ञ नव्हते. पैगंबरीय मार्गदर्शनाचे जे अवशेष त्यांच्याजवळ बाकी राहीले होते त्यात आखिरतचे संक्षिप्त ज्ञानही सामील होते परंतु त्याच्या सोबत जेव्हा अज्ञानमय व अनेकेश्वरवादीय कल्पना मिळाल्या तर त्यांचे हे ज्ञान देखील गुंतागुंतीचे झाले. उदाहरणार्थ त्यांची ही कल्पना की माणूस जेव्हा मेल्यानंतर मातीस मिळतो तेव्हा त्यास सशरीर दुसऱ्यांदा कशा प्रकारे निर्माण केले जाईल? त्याच प्रमाणे त्यांची ही श्रद्धा की आमची ही उपास्ये ईश्वरासमोर आमची शिफारस करणारे आहेत आणि जेव्हा आम्ही यांची पूजा अर्चना करतो तेव्हा आखिरत (मरणोत्तर जीवना) मध्ये हिशोब (कर्माचा) द्यायची वेळ आलीच तर ते आम्हाला ईश-शिक्षेपासून का वाचविळणार नाहीत? अशा प्रकारे जेव्हा त्यांचे ज्ञान विस्कटलेल्या धाग्यांप्रमाणे झाले तेव्हा आखिरत विषयी त्यांना विश्वास राहीला नाही. किंबहुना संशय ग्रस्त झाले की आखिरत घडून येईल किंवा नाही. मग हा संशय त्यांच्या इच्छा-भक्तिचा परिणाम म्हणून आखिरतच्या नकारात परिवर्तित झाला. आणि असे आंधळे झालेत की ते आखिरतकडे मार्गदर्शन करणाऱ्या कोणत्याही निशाणीला पाहू शकले नाहीत.

आणि जेथपावेतो भारतातल्या अनेकेश्वरवाद्यांचा संबंध आहे त्यांच्या जवळ ही मोबदला व शिक्षेची कल्पना एका मर्यादेप्रत आढळून येते जो मूलभूत दृष्ट्या स्वभावधर्माचे मार्गदर्शन व पैगंबरीय मार्गदर्शनाचाच परिणाम होय. परंतु अनेक ईश्वरांची कल्पना आणि आवागमनाच्या दृष्टिकोनाने त्यांना असे घोटाळ्यात टाकले की आखिरतची त्यांच्याजवळ कसलीच कल्पना नाही. कर्माच्या मोबदल्याची कल्पना त्यांच्या दृष्टीने अशी की जो मनुष्य वाईट कर्म करतो त्याचा आत्मा, मेल्यानंतर विविध रूप धारण करतो तो मनुष्य रुप धारण करूनही पुन्हा जन्म घेऊ शकतो व एखाद्या किड्याच्या रूपाने ही.

‘Souls enter various forms of existance from man to worm'. (Outline of Hindusim by T.M. Mahadevan p.63)

मग जन्मजन्मांतराचे चक्र चालू राहते जोपर्यंत आत्मा ‘ब्रम्हा’ कडून मोक्ष प्राप्ती करून घेत नाही. आणि ज्याचे कर्म चांगले असते येथपावेतो की त्यांच्या इच्छा आकांक्षा मृत झालेल्या असतात तो दुसऱ्यांदा जन्म घेत नाही, किंबहुना ‘ब्रम्हा’ (ईश्वरा) चाच अंशा बनतो.

'But he in whom desire is stilled suffers no rebirth after death having attained to the highest desiring only the self he goes to no other world, Realising Brahman, he becomes Brahma. (Spiritual Heritage of India p. 68)

अल्लाह रक्षण करो असल्या गोष्टीपासून कर्माच्या मोबदल्याची ही कल्पना किती अनेकेश्वरवादी आहे की सत्कर्मी मनुष्य ईश्वराचा अंश व्हावा ! जणू ईश्वर एखादा महासागर आहे ज्यात मोठमोठ्या नद्या जाऊन मिळतात. त्याच प्रमाणे दुराचारी मनुष्याचे इहलोकत वारंवार आणि वेगवेगळ्या रूपामध्ये जन्म घेणे केवळ अनुमानजन्य बाब होय ज्यास तत्वज्ञानाच्या साच्यात घडविले गेले आहे. हा दृष्टिकोन पैगंबरांच्या शिकवणी विरुद्ध असल्या खेरीज बुद्धिच्या विपरीत ही आहे आणि वास्तवतेच्या विरूद्ध देखील. पैगंबरांची सर्वसंमत शिकवण अशी की कर्माच्या

मोबदल्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने कियामतीचा दिवस निश्चित केला आहे. जेव्हा तो समस्त मानवांना सशरीर दुसऱ्यांदा जिवित करील व प्रत्येक माणसाला अल्लाह समोर आपली श्रद्धा व आचरणाचा जाब द्यावा लागेल. ज्या लोकांनी ईमान बाळगून सत्कर्मे केली होती ते निरंतर इनामास पात्र ठरतील व त्यांना चिरकालीन जन्नत लाभेल. आणि ज्या लोकांनी शिर्क व कुफ्र केले होते ते आपल्या खोट्या श्रद्धेपायी व विद्रोही आचरणामुळे सदैवकालीन शिक्षेस पात्र ठरतील व चिरकाल टिकणाऱ्या जहन्नमच्या महाभयंकर आगीत फेकले जातील. परंतु आवागमनाचा दृष्टिकोन या पैगंबरीय शिकवणीच्या विरुद्ध आहे. अर्थात कोणत्याही ईश-ग्रंथाद्वारे याचे समर्थन होत नाही.

आवागमनाचा दृष्टिकोन बुद्धिच्या विपरीतही आहे कारण हे एक चक्र आहे ज्याला ना आरंभ आहे ना अंत. आधी मनुष्य अस्तित्वात आले असेल तर तो पूर्व-जन्मात मनुष्य राहीला असेल आणि मनुष्य अस्तित्वात आला तर पूर्वीच्या जन्मात तो काय होता? मग कोणालाही हे माहीत नाही की तो यापूर्वी कितीदा जन्म घेत राहीला आणि कोणत्या अपराधापायी त्याने सध्याचा जन्म घेतला आहे.

आवागमनाचा दृष्टिकोन वास्तविकतेच्या विरुद्धी आहे, कारण मानव जातिचा आरंभ तर एक पुरुष व एक स्त्री यांच्यापासून झाला होता. जर हा दृष्टिकोन खरा असता तर दोन व्यक्तिच वारंवार जन्म घेत राहीले असते. परंतु मनुष्य संखेत एवढी वृद्धि की ती आरबांच्या संख्येप्रत पोहचली, ही संख्या या दृष्टिकोनाचे खंडन करते.

तात्पर्य आवागमनाची श्रद्धा एक अनुचित व खोटी श्रद्धा आहे. याचा उलट आखिरतची श्रद्धा उचित ही आहे व एक फार मोठी वस्तुस्थिती.

१०६. या नकारात ही स्विकृतिही सामील आहे की कियामतीच्या दिवशी उठविले जाण्याची बाब अशी नव्हे जिला पहिल्यांदा त्यांनी पैगंबरांच्या तोंडन ऐकले असावे, किंबहुना ही एक आकलनात आलेली गोष्ट होय. जी एका वंशाकडून दुसऱ्या वंशाकडे स्थानांतरीत होत राहीली आणि हा या गोष्टीचा पुरारा होय की हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांनी आखिरत विषयीच्या श्रद्धेची जी शिकवण दिली होती तिचे अवशेष बनी इस्माईलमध्ये अस्तित्वात होते.

१०७. म्हणजे ज्या जन-समूहांनी आखिरतचा इन्कार केला होता त्यांचे जीवन अपराध पूर्ण बनले होते. अल्लाहची अवज्ञा करण्यात त्यांना काहीच संकोच वाटला नाही आणि नैतिक बंधनांना तोडून ते अगदी स्वैर झाले. अशा जन समूहांची जी परिणती जगात झाली तिचे काही अवशेष जमीनीवर विखरलेले आहेत. पवित्र कुरआन या अवशेषंना पाहण्याचे व त्यांच्यापासून बोध ग्रहण करण्याचे आवाहन करतो. या उद्देशाने प्रवास करण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे.

१०८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता ही सांत्वना आहे की जर ते तुमच्या सर्व प्रयत्नांनंतर ही आपले डोळे उघडण्यास तयार नाहीत तर त्यांच्या अवस्थेवर तुम्ही खेद व शोक करू नका आणि ना त्यांच्या कट कारस्थानांनी जे तुमच्या विरुद्ध ते रचत आहे त्रस्त व्हा. ते तुमचे काही नुकसान करू शकत नाही.

१०९. म्हणजे कियामत जिची धमकी तुम्ही आम्हाला देत आहात केव्हा येईल?

११०. अर्थात हे की तुमची ही कल्पना की कियामत कायम होणार आहे तर आताच का कायम होत नाही, तुमच्या उतावळेपणास व्यक्त करते. वस्तुत: कियामतीचा दिवस अपराध्यांकरीता ईश-शिक्षेचा दिवस असेल आणि जर कियामत येण्यास अजून काही उशीर आहे तर तो दिवस अगदी जवळ येऊन ठेपला आहे जेव्हा हे जगातच दुष्परिणतीला तोंड देतील. अभिप्रेत ती शिक्षा जी पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्या जन समूहावर जगातच अवतरते यास्तव काही वर्षेच लोटली होती की बद्र व हुनैनच्या लढाया उदभवल्या आणि पैगंबरांच्या जीवनातच ते लोक नाश पावले तेव्हा कबरीत त्यांच्या आत्म्यांवर ईश शिक्षेचा क्रम सुरू झाला. अशा प्रकारे ज्या ईश शिक्षेकरीता ते घाई करीत होते शेवटी तिच्या तावडीत सापडले.

१११. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहचा लोकांवर हा मोठा अनुग्रह आहे की तो त्यांच्या विद्रोहानंतर ही त्यांना तोल सावरण्याची व आपली सुधारणा करून घेण्याची संधी देतो. याबद्दल लोकांनी त्याच्याशी कृतज्ञ व्हावयास हवे, परंतु हे त्याच्या अनुग्रहाची कदर करीत नाही व आपले वर्तनही सुधारीत नाही.

आणि निःसंशय, तुमचा पालनकर्ता चांगल्या प्रकारे जाणतो जे काही यांच्या अंतःकरणांनी लपवून ठेवले आहे, आणि जे काही ते व्यक्त करतात. आणि आकाश व जमीनीवर कोणतीही लपलेली गोष्ट अशी नाही जी एका स्पष्ट ग्रंथात सामील नसावी. (अल-क़ुर्आन)

७४. आणि नि:संशय, तुमचा पालनकर्ता चांगल्या प्रकारे जाणतो जे काही यांच्या अंत:करणांनी लपवून ठेवले आहे, आणि जे काही ते व्यक्त करतात.[११२]

وَإِنَّ رَبَّكَ لَيَعْلَمُ مَا تُكِنُّ صُدُورُهُمْ وَمَا يُعْلِنُونَ ﴿٧٤﴾

७५. आणि आकाश व जमीनीवर कोणतीही लपलेली गोष्ट अशी नाही जी एका स्पष्ट ग्रंथात सामील नसावी.[११३]

وَمَا مِنْ غَائِبَةٍ فِي السَّمَاءِ وَالْأَرْضِ إِلَّا فِي
كِتَابٍ مُبِينٍ ﴿٧٥﴾

७६. नि:संशय हे कुरआन बनी ईस्राईल वर अशा अनेक गोष्टींची हकीगत स्पष्ट करीत आहे ज्यात ते मतभेद करीत आहेत.[११४]

إِنَّ هَٰذَا الْقُرْآنَ يَقُصُّ عَلَىٰ بَنِي إِسْرَائِيلَ
أَكْثَرَ الَّذِي هُمْ فِيهِ يَخْتَلِفُونَ ﴿٧٦﴾

७७. आणि हे मार्गदर्शन व कृपा होय ईमान बाळगणाऱ्यां करीता.[११५]

وَإِنَّهُ لَهُدًى وَرَحْمَةٌ لِلْمُؤْمِنِينَ ﴿٧٧﴾

७८. नि:संशय तुमचा पालनकर्ता आपल्या आदेशान्वये त्यांच्या दरम्यान फैसला करील.[११६]तो वर्चस्वशाली व ज्ञान बाळगणारा आहे.[११७]

إِنَّ رَبَّكَ يَقْضِي بَيْنَهُمْ بِحُكْمِهِ ۚ وَهُوَ
الْعَزِيزُ الْعَلِيمُ ﴿٧٨﴾

७९. तेव्हा (हे पैगंबर !) अल्लाहवर भरवसा ठेवा, निश्चितच तुम्ही उघड सत्यावर आहात.

فَتَوَكَّلْ عَلَى اللَّهِ ۖ إِنَّكَ عَلَى الْحَقِّ الْمُبِينِ ﴿٧٩﴾

८०. तुम्ही मृतांना ऐकवू शकत नाही [११८] आणि ना बहिऱ्यांना आपली पुकार ऐकवू शकता जेव्हा ते पाठ फिरवून पळत जात असतील.

إِنَّكَ لَا تُسْمِعُ الْمَوْتَىٰ وَلَا تُسْمِعُ الصُّمَّ الدُّعَاءَ إِذَا
وَلَّوْا مُدْبِرِينَ ﴿٨٠﴾

८१. आणि ना तुम्ही आंधळ्यांना त्यांच्या मार्गभ्रष्टतेपासून हटवून मार्गाला लावू शकता. तुम्ही तर त्यांनाच ऐकवू शकता जे आमच्या आयतींवर ईमान बाळगतात आणि आज्ञाधारक बनतात.[११९]

وَمَا أَنْتَ بِهَادِي الْعُمْيِ عَنْ ضَلَالَتِهِمْ ۖ إِنْ تُسْمِعُ إِلَّا
مَنْ يُؤْمِنُ بِآيَاتِنَا فَهُمْ مُسْلِمُونَ ﴿٨١﴾

८२. आणि जेव्हा यांच्यावर आमचे फर्मान लागू होईल तेव्हा आम्ही यांच्या करीता जमीनीतून एक जनावर काढून उभे करू जो यांच्याशी बोलेल की लोक आमच्या आयतींवर विश्वास ठेवत नव्हते.[१२०]

وَإِذَا وَقَعَ الْقَوْلُ عَلَيْهِمْ أَخْرَجْنَا لَهُمْ دَابَّةً مِنَ
الْأَرْضِ تُكَلِّمُهُمْ أَنَّ النَّاسَ كَانُوا بِآيَاتِنَا
لَا يُوقِنُونَ ﴿٨٢﴾

११२. म्हणजे कियामती संबंधी जे अनावश्यक विवाद यांनी मांडून ठेवले आहेत त्यांनाही अल्लाह जाणतो व त्या पक्षपातास, व कपट नितीसही जो प्रेरक आहे व ज्यास यांनी आपल्या अंतर्यामी लपविले आहे.

११३. ग्रंथाशी अभिप्रेत ते जागतिक रेकॉर्ड होय ज्यात सृष्टीत घडून येणारी प्रत्येक गोष्ट मग ती कितीही गुप्त का असेना स्पष्टत: सम्मिलीत आहे, अर्थात अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे त्यासोबतच त्याने सृष्टीचे रेकॉर्ड ठेवण्याची ही व्यवस्था केलेली आहे, ज्यावरून हे स्पष्ट होते की समग्र सृष्टि एका योजनाबद्धरित्या चालत आहे.

११४. मक्केच्या सुरवातीच्या काळात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा बनी इस्राईलशी संबंध आला नव्हा हजरत मूसा, हजरत सुलेमान आणि इतर पैगंबरांचे जे किस्से कुरआनात निवेदिले गेले आहेत त्यात व तौरात वगैरेच्या निवेदीत किश्श्यांमध्ये मतभिन्नता आढळून येते त्याचप्रमाणे काही इतर गोष्टींमध्येही मतभेद दिसून येतो. याच दुष्करतेचे येथे उत्तर दिले गेले आहे. बनी इस्राईलने तौरात या ईश ग्रंथास सुरक्षित ठेवले नाही, किंबहुना त्यात आपल्या परिने भेसळ केली व पैगंबरांच्या व्यक्तिमत्वास कलंकित केले. तसेच श्रद्धा वगैरेच्या बाबतीतही ते प्रदीर्घतेच्या घोटाळ्यात/पडून परस्पर मतभेदास बळी पडले. येथपावेतो की ते संप्रदायामध्ये विभागले गेले व एकमेकांविरुद्ध तेढ निर्माण झाली व अतिरेकाच्या स्तराप्रत पोहचले. परंतु कुरआनाने पैगंबरांचे वृत्तांत आणि श्रद्धा व आदेशांना अशा खूबीने निवेदिले आहे की दूध व पाणी वेगवेगळे झाले. ही हजरत मूसा यांची ती लाठी होती जिने अजगर बनून त्यांच्या खोट्या कथनांना गिळंकृत केले.

११५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ३०७ व सूरह युनुस टीप क्र. ८९, ९०

११६. म्हणजे असा फैसला जो न्यायालयीन असेल व ज्यानंतर कोणाला काहीही सांगण्याचा वाव राहणार नाही किंबहुना त्वरीत त्याची अंमलबजावणी होईल.

११७. तो वर्चस्वशाली आहे म्हणूनच त्याचा फैसला अंतिम व अटळ राहील ज्यास लागू करण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही आणि तो ज्ञानी आहे म्हणून त्याच्या निर्णयात कोणत्याही चुकीची शक्यता नाही.

११८. म्हणजे ज्यांची विवेक शक्ति लोप पावली आहे, त्यांच्यावर तुमच्या उपदेशाचा काहीच परिणाम होऊ शकत नाही. ही गोष्ट रूपकच्या शैलीत निवेदिली गेली असली तरी आयतीतले शब्द

إِنَّكَ لَا تُسْمِعُ الْمَوْتَىٰ

''तुम्ही मृतांना ऐकवू शकत नाही'' वरून एक महत्वपूर्ण वस्तुस्थिती देखील स्पष्ट होते आणि ती अशी की मेलेले लोक ऐकत नाही आणि जर मृतांना ऐकण्याचे सामर्थ्य असते तर या ठिकाणी ही उपमा लागू पडली नसती. मात्र अल्लाह एखाद्या मेलेल्या इस्लामास काही ऐवू इच्छित असेल तर ती गोष्ट वेगळी अशी अपवादात्मक स्थिती तर शक्य आहे परंतु तात्विक वास्तविकता तर हीच होय की मेलेले लोक ऐकत नाही . तेव्हा जे कबरीमध्ये दफन केले गेले आहेत त्यांना पुकारण्यात काय अर्थ? हदीस-वचनांमध्येही हे कोठेच सांगितले गेले नाही की कबरीत मृत लोक ऐकतात. राहीले कबर-दर्शना (जियारती) च्या प्रसंगी कबरवाल्यांना संबोधून सलाम व दुआ करणे तर ही एक परिणामकारक शैली आहे ज्यात गायब असलेल्यास हजर या नात्याने सादर केले जाते. यासाठी की कबरीचे दर्शन घेणाऱ्यालाही जाणीव व्हावी की तो मृतांच्या विश्वात पोहचून त्यांच्याशी भेट घेत आहे. अर्थात ही गोष्ट मृत्युची आठवण करून देणारी व आखिरतचा विश्वास निर्माण करणारी आहे. यास्तव कब्र-दर्शनाच्या पैगंबर आचरणानुसार दुआचा शेवटचा तुकडा

وَإِنَّا إِنْ شَاءَ اللَّهُ بِكُمْ لَاحِقُونَ

'आणि आम्ही अल्लाहने इच्छिल्यास तुम्हाला भेटू' हाच अर्थ दर्शवितो. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपला पुत्र इब्राहीम यांच्या मृत्यु प्रसंगी फमाविले होते की

وَإِنَّا بِفِرَاقِكَ يَا ابراهيمُ لَمَحْزُونُون

''हे ईब्राहीम आम्ही तुज्या विरहामुळे दु:खी आहोत'' (बुखारी-किताबुल जनाईज) यात एका मृत -बालकाला संबोधिले गेले आहे, परंतु वस्तुत: दु:ख व्यक्त करण्याची ही एक शैली आहे. आणि लोकांना हे स्पष्ट करण्याचा उद्देश होता की दु:ख व्यक्त करण्याची उचित पद्धत कोणती आहे यासाठी की त्यांनी ' नोहा' व 'मातम' सारख्या पद्धत अंगिकारू नयेत.

११९. म्हणजे तुमच्या आयती ऐकविण्याचा लाभ केवळ त्याच लोकांना घडतो जे सत्य स्विकारण्यासाठी तत्पर असतात व अल्लाहच्या आयती ऐकून ईमान बाळगतात व अल्लाहचे आज्ञाधारक दास बनातात. ईमानचा संबंध मनाची कैफियत व जीभेच्या होकाराशी आहे. आणि इस्लामचा संबंध आचरणाशी आहे. अर्थात ते केवळ श्रद्धेपुरेत मुसलमान बनत नाही, किंबहुना मन:पूर्वक ईमान अंगिकारात, मुखाने स्विकृतिची ग्वाही देतात व त्यानुसार आचरण पत्करतात.

१२०. دابة الارض **''दाब्बतुलअर्ज़''** 'जमीनीतून निघणारा प्राणी जो लोकांशी बोलेल' ही अल्लाहची फार मोठी निशाणी ठरेल, जो अशावेळी प्रकट होईल जेव्हा कियामत

अगदी जवळ येऊन ठेपेल. तसेच 'जेव्हा त्यांच्यावर आमचे फर्मान लागू होईल'चा अर्थ असा की जेव्हा अल्लाह काफीरांना अजाब (ईश-शिक्षे) ची निशीणी दाखवू इच्छिल आणि काफिरांशी अभिप्रेत सर्वत्र काफीर (सत्य-विरोधक) होत, केवळ कुरान अवतरणाच्या काळातील नव्हेत.

हे फार मोठे भाकित आहे जे कुरआनात दिले गेले आहे, आणि हदीस वचनात ही याचा उल्लेख कियामतीच्या निशाण्यांमध्ये करण्यात आला आहे. (सही मुस्लिम किताबुल फितन) हे एक नवीन जनावर असेल जे जमीनीतून निघेल व त्याचे वैशिष्ट्य हे की तो लोकांशी बोलेल. अशा गोष्टी बोलेल ज्यावरून हे स्पष्ट होईल की लोकांचे अल्लाहच्या निशाण्यांवर व त्याच्या आयतींवर विश्वास न ठेवणे अगदी चुकीचे होते. जणू हे जनावर सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या जबरदस्त सामर्थ्याचे असे चिन्ह बनून जाहीर होईल की आखिरत घडून येण्याबलचे प्रमाण व कुरआन आणि पैगंबरांच्या सत्यतेचा उघड पुरावा ठरेल. याच सूरहमध्ये अल्लाहच्या त्या चमत्काराचा उल्लेख केला गेला आहे की हुद हुदने हजरत सुलेमान यांच्याशी वार्तालाप केला. परंतु जे अल्लाहच्या चमत्काराना मानत नाही किंवा अनीश्वरवादी आहेत ते तर कुरआनाच्या या निवेदनावर विश्वास ठेवत नाही परंतु जेव्हा कियामत जवळ आली असेल तेव्हा एक असे जनावर त्यांच्यासमोर उभे केले जाईल जे त्यांच्याशी बोलेल तेव्हा ते याबाबत काय स्पष्टीकरण देऊ शकतील?

स्पष्ट व्हावे की 'जमीनीतून निघणाऱ्या जनावरा' विषयी कुरआनाने फार त्रोटक सांगितले आहे आणि हदीस वचनात ही याचे खास विवरण नाही. म्हणून हे सांगणे की हे जनावर कोणत्या देशात प्रकट होईल व त्याचा चेहरा मोहरा कसा असेल आणि या स्वरुपाच्या इतर प्रश्नांचे उत्तर भविष्य काळाच्या आवरणाआड दडलेले आहे. या संदर्भात अनुमानाच्या गोष्टी करणे उचित नव्हे आणि ज्या कथनांमध्ये या जनावराविषयी तपशील देण्यात आला आहे ती निराधार कथने होत, व त्यात परस्पर विरुद्ध गोष्टी निवेदिल्या गेल्या आहेत. यास्तव यांना कुरआनाच्या या आयतीचे भाष्य ठरविणे योग्य नव्हे. 'तिर्मिजी' या हदीस संग्रहात या गोष्टीचा उल्लेख आहे की 'जमीनीतून निघणाऱ्या जनावरा' सोबत हजरत सुलेमान यांची अंगठी व हजरत मूसा यांची काठी असेल. काठीने तो ईमान बाळगणाऱ्यांच्या चेहऱ्यास तेजस्वी करील व अंगठीने काफिरांच्या नाकावर मोहर लावीन (तिर्मिजी-अबवाबुत्तफसीर सूरतुन्नमल)

या हदीस वचनास तिर्मिजीने उल्लेखिले असले तरी याचा एक कथनकर्ता अवसबिन खालीद हा आहे, ज्याला अनेक हदीस-विद्वानांनी कमकुवत (निराधार) म्हटले आहे. यास्तव कथनकर्त्यांची परिस्थिती दर्शविणारे पुस्तक 'तहज्जीबुत्तहजीब' मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे-

قَالَ ازدی مُنکَر الحدیث و قَالَ ابنُ القَطّانِ اوس مجهولُ الحالِ لَهُ ثلاثةُ احادیث عَنْ اَبی هریرة مُنکَر وَ ذَکَرَهُ ابنُ حبان فی الثِقَاتِ۔ (تهذیب التهذیب۔ابن حجرج ا۔ص ۳۸۲)

अज्दी म्हणतात ते मुन्कर (जईफ) कथनकर्ता आहेत आणि इब्ने कत्तान म्हणतात अवसची स्थिती अज्ञात आहे. त्याने अबु हुरैराद्वारे तीन हदीस वचने उल्लेखिली आहेत ज्या 'जईफ' आहेत आणि इब्ने हबानने याचा उल्लेख सिका (विश्वसनीय) कथनकर्त्यांमध्ये केला आहे. (तहजीबुत्तहजीब इब्ने हजर खंड १ जृ. ३८२)

आणि दुसरा कथनकर्ता अली बिन जैद हा आहे आणि तो देखील कमकुवत आहे यास्तव इमाम अहमद म्हणतात तो काहीच नाही, जौजजानी म्हणतात तो क्षीण आहे, नसाईने देखील त्यास कमकुवत म्हटले आहे आणि इब्ने खजीमा म्हणतात, त्याच्या दुषित स्मरणशक्तिमुळे मी त्याच्या हदीस द्वारे युक्तिवाद करीत नाही' (पहा तहजीबुत्तहजीब खंड ७ पृष्ठ ३२२) यास्तव हे हदीस वचन प्रमाण मानण्यायोग्य नाही.

**आणि तो दिवस की आम्ही प्रत्येक जन-समूदायामधून अशा लोकांची एक फौज जमा करू जे आमच्या आयतींना खोटे ठरवित होते, मग त्यांची वर्गवारी केली जाईल.(अल-क़ुर्आन)**

८३. आणि तो दिवस की आम्ही प्रत्येक जन-समूदायामधून अशा लोकांची एक फौज जमा करू जे आमच्या आयतींना खोटे ठरवित होते, मग त्यांची वर्गवारी केली जाईल.[१२१]

وَيَوْمَ نَحْشُرُ مِنْ كُلِّ أُمَّةٍ فَوْجًا مِّمَّنْ
يُكَذِّبُ بِاٰيٰتِنَا فَهُمْ يُوْزَعُوْنَ ﴿٨٣﴾

८४. येथपावेतो की जेव्हा ते सर्व हजर होतील तेव्हा (अल्लाह) विचारील की, काय तुम्ही माझ्या आयतींना खोटे ठरविले होते व त्यांना आपल्या ज्ञान-कक्षेत घेतले नाही? [१२२] किंवा, मग तुम्ही काय करीत राहीलेत?

حَتّٰىٓ اِذَا جَآءُوْ قَالَ اَكَذَّبْتُمْ بِاٰيٰتِيْ وَلَمْ تُحِيْطُوْا بِهَا
عِلْمًا اَمَّاذَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٨٤﴾

८५. आणि यांच्या अत्याचारामुळे आमचे फर्मान त्यांच्यावर लागू होईल [१२३] व ते काही ही बोलू शकणार नाही. [१२४]

وَوَقَعَ الْقَوْلُ عَلَيْهِمْ بِمَا ظَلَمُوْا فَهُمْ لَا يَنْطِقُوْنَ ﴿٨٥﴾

८६. काय ते पाहत नाही की आम्ही रात्रीला अशासाठी बनविले की त्यांनी तिच्यात शांती प्राप्त करावी आणि दिवसाला प्रकाशमय बनविले. नि:संशय यात निशाण्या आहेत त्या लोकांकरीता जे ईमान बाळगतात.[१२५]

اَلَمْ يَرَوْا اَنَّا جَعَلْنَا الَّيْلَ لِيَسْكُنُوْا فِيْهِ وَالنَّهَارَ مُبْصِرًا ۭ
اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّقَوْمٍ يُّؤْمِنُوْنَ ﴿٨٦﴾

८७. आणि ज्या दिवशी सूर फूंकला जाईल ते सर्व जे आकाशा मध्ये व जमीनीवर आहेत घाबरून जातील, मात्र त्यांच्या खेरीज, ज्यांना अल्लाह (या पासून सुरक्षित ठेवू) इच्छिल.[१२६] आणि सर्व त्याच्या समोर विनम्र होऊन हजर होतील.[१२७]

وَيَوْمَ يُنْفَخُ فِي الصُّوْرِ فَفَزِعَ مَنْ فِي السَّمٰوٰتِ
وَمَنْ فِي الْاَرْضِ اِلَّا مَنْ شَآءَ اللّٰهُ ۭ
وَكُلٌّ اَتَوْهُ دٰخِرِيْنَ ﴿٨٧﴾

८८. तुम्ही पर्वतांना पाहता व कल्पना करता की ते निश्चल आहेत, परंतु ते ढंगाप्रमाणे उडत असतील. [१२८] ही अल्लाहची कार्यकुशलता असेल ज्याने प्रत्येक वस्तूला मजबूत बनविले.[१२९] तुम्ही जे काही करता त्या विषयी तो भिज्ञ आहे.[१३०]

وَتَرَى الْجِبَالَ تَحْسَبُهَا جَامِدَةً وَّهِيَ تَمُرُّ مَرَّ
السَّحَابِ ۭ صُنْعَ اللّٰهِ الَّذِيْٓ اَتْقَنَ كُلَّ شَيْءٍ ۭ اِنَّهٗ
خَبِيْرٌۢ بِمَا تَفْعَلُوْنَ ﴿٨٨﴾

८९. जो मनुष्य सत्कर्म घेऊन येईल,[१३१] त्याला त्याहून अधिक चांगला मोबदला मिळेल आणि असे लोक त्या दिवसाच्या दहशतीपासून सुरक्षित राहतील.[१३२]

مَنْ جَآءَ بِالْحَسَنَةِ فَلَهٗ خَيْرٌ مِّنْهَا ۚ وَهُمْ مِّنْ فَزَعٍ
يَّوْمَىِٕذٍ اٰمِنُوْنَ ﴿٨٩﴾

१२१. म्हणजे कियामतीच्या दिवशी त्या प्रत्येक समूहामधून ज्यास पैगंबरांचे आवाहन पोहोचले होते अशा लोकांना एकत्रित करतील ज्यांनी अल्लाहच्या निशाण्यांना व त्याने अवतरीत केलेल्या आयतींना खोटे ठरविले होते. या लोकांना थव्याथव्याने जमा केले जाईल मग त्यांच्या कर्मानुसार त्यांना वेगवेगळ्या तुकड्या (Divisions) मध्ये विभागले जाईल.

१२२. म्हणजे तुम्ही माझ्या आयतींना कोणत्या आधारावर खोटे ठरविले होते. काय तुम्हाला संशोधनात्मक रित्या हे माहीत झाले होते की या सृष्टीत व स्वत: तुमच्या अस्तितवात एखादी निशाणी अशी नाही जी अल्लाहचे अस्तित्व त्याचे एकत्व, त्याचे सामर्थ्य व महानता, कर्माचा मोबदला व आखिरत विषयी विश्वास निर्माण करीत असावी आणि हे की अल्लाहच्या ज्या आयती ज्या पैगंबरानेही सादर केल्या त्या खरोखरच अल्लाहच्या आयती नव्हत्या. जर संशोधनाने तुम्हाला हे माहित झाले नव्हते व वस्तुस्थिती हीच की तुमचे हे खोटे ठरविणे संशोधनाचा परिणाम नव्हता तर काय तुम्ही संशोधनाविना व ज्ञान नसतांना यांना खोटे ठरविले?

आज मोठमोठ्या सुशिक्षित लोकांची ही दशा आहे की ते डार्विनचा उत्पत्ति सिद्धान्त व मार्क्सचा अनीश्वरवाद आणि या प्रकारच्या इतर दृष्टिकोनांपासून प्रभावित होऊन ईश्वर व आखिरतचे इन्कार करणारे झालेत. हे लोक ज्ञानाच्या नावावर अज्ञानाचा पुरावा देत आहेत. जर विशुद्ध बुद्धिने त्यांनी सृष्टीचे अवलोकन केले असते आणि कुरआनाच्या स्वरूपात अवतरलेल्या अल्लाहच्या आयतींवर विचार केला असता तर त्याना सत्य-ज्ञान लाभू शकले असते परंतु पक्षापात व गर्वाने त्यांना यापासून दूर ठेवले.

१२३. म्हणजे ईशशिक्षेचा फैसला यांना लागू होईल.

१२४. कियामतीच्या दिवशी अपराध्यांना विविध अवस्थेतून जावे लाग़ेल. एक अवस्था अशी असेल जेव्हा अल्लाह त्यांच्यावर त्यांच्या त्या अत्याचारास जो त्यांनी आपल्यावरच केला होता अशा प्रकारे स्पष्ट करील की त्यांना उत्तर देता येणार नाही.

१२५. म्हणजे ह्या लोकांनी जर या गोष्टीवरच विचार केला असता की रात्र यांच्यासाठी शांतीचे माध्यम व दिवस यांच्यासाठी कार्यान्वित होण्यास कारक आहे. तर काय हे अल्लाह स्वामी व पालनकर्ता असण्याचे प्रमाण नव्हे? आणि काय याने मानव जीवन हेतुपूर्ण असण्याचे जाहीर होत नाही, आणि काय हे अवलोकन या गोष्टीची स्मरणिका घडवित नाही की मेल्यानंतर कियामतीचा सूर्य उगवणार आहे.

१२६. जेव्हा कियामतीचा पहिला सूर (शंख) फूंकला जाईल तेव्हा संपूर्ण सृष्टीत अशी भयानक स्थिती निर्माण होईल की जमीनीवरील राहणारे तर घाबतीलच, पण आकाशांमध्ये राहणारे ही घाबरतील या दहशतीपासून केवळ तेच लोक सुरक्षित राहतील ज्यांना अल्लाह सुरक्षित ठेवू इच्छिल.

१२७. म्हणजे जेव्हा दूसरा सूर फूंकला जाईल तेव्हा सर्वच्या सर्व अल्लाह समोर अशा प्रकारे हजर होतील की अगदी विनम्र भावाने नतमस्तक होऊन तेव्हा कोणी ही ताठपणा किंवा घमेंड दाखवू शकणार नाही. मोठमोठ्या घमेंड करणाऱ्यांची घमेंड मातीत मिळालेली असेल.

१२८. म्हणजे पर्वत आज आपल्या स्थानावर निश्चल दिसतात, परंतु कियामतीच्या दिवशी ते ढगांप्रमाणे इतस्तत:उडत राहील.

१२९. अर्थात हा अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार असेल, ज्याने प्रत्येक वस्तूत दृढ नियमांनी जखडून ठेवले आहे की ती आपल्या जागेवर किंवा आपल्या मर्यादेतच राहते. उदाहरणार्थ जमीनीत सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी चुंबकीय शक्ति (Magnetic Force) ठेवली आहे की प्रत्येक वस्तू तिच्याकडे आकर्षिली जाते आणि जमीनीच्या मर्यादेतून कोणतीही वस्तू बाहेर जात नाही, मात्र हे की एखाद्या अन्य निसर्ग-नियमानुसार एखादी वस्तू तिच्या मर्यादेतून बाहेर पडावी. परंतु जर जमीन आपली ही गुरुत्वाकर्षणशक्ति (Gravity Force)सोडून देईल तर पहाड सुद्धा अशाच प्रकारे भारहीन होऊन हवेत उडू शकतात ज्याप्रकारे अवकाशात वस्तू भारहीन होऊन विखुरल्या जातात.

१३०. तो तुमच्या आचरणास जाणून आहे म्हणून ज्या वेळेस कियामत कायम होईल तेव्हा तो तुमच्या आचरणाचा यथा योग्य मोबदला देईल.

१३१. अभिप्रेत श्रद्धा व आचरणाचे सत्कर्म होय. अर्थात हे की जो नेकी (सदाचारा)चा गुण घेऊन हजर होईल.

१३२. जेव्हा कियामतीचा दूसरा सूर फूंकला जाईल आणि सर्व लोक जिवंत होऊन हशरच्या मैदानात (कर्मांचा हिशेब जेथे घेतला जाईल त्या मैदानात) एकत्रित होतील तेव्हा सत्कर्मी लोकांवर तो दिवस भयानक असूनही भयंकपिततेची कैफियत येणार नाही कारण त्यांना चांगल्या परिणतीची आशा असेल.

وَمَنْ جَآءَ بِالسَّيِّئَةِ فَكُبَّتْ وُجُوهُهُمْ فِي النَّارِ هَلْ
تُجْزَوْنَ إِلَّا مَا كُنْتُمْ تَعْمَلُونَ ﴿٩٠﴾

९० आणि जो दुष्कर्म घेऊन येईल तर अशा लोकांना अधोमुखी जहन्नम मध्ये फेकून दिले जाईल. तुम्हाला मोबदल्यात तेच काही दिले जात आहे जे तुम्ही करीत राहीलात.[१३४]

إِنَّمَآ أُمِرْتُ أَنْ أَعْبُدَ رَبَّ هَٰذِهِ الْبَلْدَةِ الَّذِي حَرَّمَهَا وَلَهُ
كُلُّ شَيْءٍ وَأُمِرْتُ أَنْ أَكُونَ مِنَ الْمُسْلِمِينَ ﴿٩١﴾

९१ (सांगा) मला हाच आदेश दिला गेला आहे की या शहराच्या पालनकर्त्याची उपासना करावी, ज्याने यास प्रतिष्ठीत बनविले.[१३५] आणि जो प्रत्येक गोष्टीचा स्वामी आहे. मला आदेश दिला गेला आहे की मी मुस्लिम बनून रहावे.[१३६]

وَأَنْ أَتْلُوَا الْقُرْآنَ فَمَنِ اهْتَدَىٰ فَإِنَّمَا يَهْتَدِي لِنَفْسِهِ
وَمَنْ ضَلَّ فَقُلْ إِنَّمَآ أَنَا مِنَ الْمُنْذِرِينَ ﴿٩٢﴾

९२ आणि हे की कुरआन वाचून ऐकवू.[१३७] जो मार्गदर्शन अंगिकारील, तो आपल्याच भल्याकरीता अंगिकारील. आणि जो मार्गभ्रष्ट असेल तर सांगा, मी फक्त खबरदार करणारा आहे.

وَقُلِ الْحَمْدُ لِلَّهِ سَيُرِيكُمْ آيَاتِهِ فَتَعْرِفُونَهَا وَمَا رَبُّكَ
بِغَافِلٍ عَمَّا تَعْمَلُونَ ﴿٩٣﴾

९३. सांगा, प्रशंसा अल्लाह करीता आहे.[१३८] तो तुम्हाला आपल्या निशाण्या दाखविल आणि तुम्ही त्या ओळखाल.[१३९] तुम्ही जे काही करीत आहात त्यापासून तुमचा पालनकर्ता अनभिज्ञ नाही.

१३३. अभिप्रेत श्रद्धा व आचरण विषयक दुष्कर्म.

१३४. म्हणजे मोबदला आचरणानुसार दिला जाईल.जसे करावे तसे भरावे. ते अल्लाहच्या आयतींपासून तोंड फिरवित होते, त्याप्रमाणेते योग्यरित्या या गोष्टीस पात्र ठरतील की तोंडघशी पाडून जहन्नम (नरकाग्नि) मध्ये फेकले जावेत.

१३५. अर्थात मक्का शहर, ज्यास हजरत इब्राहीम यांच्या काळापासून हरम (प्रतिष्ठीत) ठरविले गेले आहे व या दृष्टीने ते ऐतिहासिक महत्व बाळगते. अर्थात त्याचे ऐतिहासिक महत्व ते एकेश्वरवादाचे केंद्र स्थान असल्यामुळे आहे. यास्तव ही गोष्ट की अल्लाह या शहराचा स्वामी आहे एक स्पष्ट वस्तुस्थिती आहे, आणि त्याने आदेश दिला आहे की मी त्या अल्लाहचीच उपासना करावी.

१३६. म्हणजे स्वत:ला अल्लाहच्याच हवाली करावे व त्याचे आज्ञाधारक दास व्हावे.

१३७. कुरआन वाचून ऐकविण्याचा आदेश आवाहनात्मक दृष्ट्या मोठा महत्वपूर्ण आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना केवळ नाम स्मरण व आवाहनाचात आदेश दिला गेला नव्हता, तर त्या सोबत लोकांना कुरआन वाचून ऐकविण्याचा ही आदेश दिला गेला होता, अशासाठी की अल्लाहच्या वाणीहून अधिक माणसाला प्रभावित करणारी कोणतीही गोष्ट नाही, यासाठी ही की अल्लाहच्या वाणीद्वारे त्याचे प्रमाण त्याच्या दासांवर परिपूर्णत: प्रस्थापित होते. ही गोष्ट की कुरआन अरबी भाषेत आहे व हे प्रथमत: अरबी लोकांना संबोधून होते, अरबेतर लोकांसमोर कुरआन सादर करण्यात अडसर ठरत नाही. तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कैसर व रोमला जे आवाहनात्मक पत्र लिहीले त्यात कुरआनाच्या आयती उल्लिखित केल्या होत्या. आणि कैसरने अनुवादकाद्वारे त्यांचा अर्थ जाणून घेतला होता.

आजच्या काळात प्रत्येक भाषेत अनुवाद व मुद्रणाच्या सोयी उपलब्ध आहेत, म्हणून यास आवाहन व प्रचाराचे माध्यम का बनवू नये? आणि याच्या विविध भाषांतराचे व्यापक प्रमाणात प्रकाशन का करू नये?

१३८. सूरहचा समारोप अल्लाहच्या प्रशांसेसह होत आहे की तो नि:संशय स्तुती करण्या योग्य आहे ज्याने असे दिव्य कुरआन अवतरीत केले की ज्ञानाचा वर्षाव केला.

स्पष्ट असावे की या सूरहमध्ये ज्ञानाचा उल्लेख वारंवार केला गेला आहे ज्यावरून याचे विविध कोने उज्वल झाले आहेत. हा जणू या सूरह (अध्याया) चा वैशिष्ट्यपूर्ण पैलू होय.

१३९. संकेत कियामतीच्या निशाण्यांकडे आहे ज्या कियामतीच्या जवळच्या काळात प्रकट होतील. आणि त्या पाहून तत्कालीन इन्कार करणारे जाणून घेतील की कियामत एक वास्तविकता हकीगत बनून समोर उभी आहे.

अशा प्रकारे जगातच कुरआन व पैगंबरांची सत्यता जगात राहणाऱ्यांवर स्पष्ट होईल.उदाहरणार्थ **दाब्बतुलअर्ज़**

دابة الارض

जमीनीतून निघणाऱ्या जनावराचे बोलणे ज्याचा उल्लेख या पूर्वी केला गेला. याजूज माजूजचे आक्रमण (सूरह अंबिया-९६) तसेच हदीस वचनांमध्ये कियामतीच्या काही निशाण्या निवेदिल्या गेल्या आहेत उदाहरणार्थ हजरत ईसा (मसीह) यांचे अवतरण व सूर्याचे पश्चिमेकडून उगवणे (बुखारी किताबुर्ररीकाक) इत्यादि अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २९३.

## कैसर रोम च्या नावे पैगंबर (स्ल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शुभ पत्राची प्रतिछाया



''अत्यंत दयाशील व अत्यंत कृपाशील अल्लाहच्या नावाने. मुहम्मद कडून जो अल्लाहचा दास व पैगंबर आहे रोमचा शसक हिरकल यांच्या नावे आहे. मार्गदर्शनाचे अनुसरण करणाऱ्यावर सलाम (शांती) असो. मी तुम्हाला इस्लामचे आमंत्रण देतो. तुम्ही इस्लाम कबूल करा. सुरक्षित रहाल आणि अल्लाह तुम्हाला दुप्पट फळ देईल. परंतु जर तुम्ही नकार दर्शविला तर देशवासीयांचा अपराध तुमच्या माथी असेल. हे ग्रंथ धारक अशा गोष्टीकडे या जी आमच्या व तुमच्या दरम्यान सामाईक आहे. अर्थात ही की आम्ही अल्लाह खेरीज अन्य कोणाचीही उपासना करू नये व कोणासहि त्याचा सहभागी ठरवू नये आणि आमच्यापैकी कोणीहि कोणास अल्लाह खेरीज स्वामी (रब्ब) बनवू नये. जर हे लोक अमान्य करतील तर स्पष्ट सांगा, साक्षी रहा. आम्ही सुस्लीम आहोत.''

# २८. सूरह अल् कसस

**नावः** कससचा अर्थ घटनांचे निवेदन करणे. आयत क्र. २५ मध्ये या गोष्टीचा उल्लेख केला गेला आहे की हजरत मूसा जेव्हा मदयन येथे पोहोचले तेव्हा त्यांनी एका किबती (इजिप्शियन) ला आपल्या हातून ठार केले गेल्याची घटना निवेदन केली. या घटना-निवेदनाकरीता 'वकस्स अलैहिल कससा' हे शब्द वापरले गेले आहेत व या अनुषंगानेच या सूरहचे नाव अल् कसस असे आहे.

**अवतरण काळः** मजकूरांवरुन असे दिसून येते की सूरह नमलच्या काही काळानंतर अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ति कल्पनाः** पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रषित्व संदर्भात शंका कुशंका दूर करणे व त्यांच्या प्रेषित्वा विषयी विश्वास निर्माण करणे. या संदर्भात हजरत मूसा यांचा वृत्तांत तपशीलवार निवेदिला गेला आहे. या साठी की या पार्श्वभूमीवर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रषित्वास बघितले जावे.

आयत रचनाः आयत क्र. १ ते २ प्रस्तावनेच्या आयती होत.

आयत क्र. ३ ते ४३ मध्ये हजरत मूसा यांचा वृत्तांत निवेदिला गेला आहे. प्रामुख्याने त्यांची जन्माची परिस्थिती व त्यांच्या जीवनाचे इतर काही भाग यात दर्शविले गेले आहेत.

आयत क्र. ४४ ते ६१ मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या शंका कुशंकांना उत्तर दिले गेले आहे.

आयत क्र. ६२ ते ७५ मध्ये शिर्क (अनेकेश्वरवादा)चे खंडन करीत एकेश्वरवादास सप्रमाण प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. ७६ ते ८४ मध्ये एका धन-पूजकाची घटना निवेदिली गेली आहे, ज्याचे नाव कारून असे होते. तदनुषंगे धडा शिकविला गेला आहे.

आयत क्र. ८५ ते ८८ सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु आलैहि वसल्लम) यांच्या करीता सांत्वनाची सामग्री ही आहे व आपल्या भूमिकेवर दृढ राहण्याची ताकीद देखील.

# २८.सूरह अल् कसस

سُورَةُ القَصَصِ

अनुवाद (आयती - ८८)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. ता. सीन. मीम. [१]

طسٓمٓ ①

२. या दिव्य ग्रंथाच्या आयती आहेत.[२]

تِلْكَ آيَاتُ الْكِتَابِ الْمُبِينِ ②

३. आम्ही तुम्हाला मूसा व फिरऔनच्या काही घटना पूर्ण निकोपते सह ऐकवितो.[३] अशा लोकांसाठी, ज्यांनी ईमान बाळगले.[४]

نَتْلُوا عَلَيْكَ مِنْ نَبَإِ مُوسَىٰ وَفِرْعَوْنَ بِالْحَقِّ
لِقَوْمٍ يُؤْمِنُونَ ③

४. घटना अशी की फिरऔन जमीनीवर बंडखोर झाला होता [५] आणि त्याने देशवासींना सम्प्रदायांमध्ये विभागले होते.[६] त्यापैकी एका समूहास त्याने दुर्बल बनवून ठेवले होते. त्यांच्या मुलांना जबह करीत (कापून टाकीत) असे व त्यांच्या मुलींना जिवंत ठेवत असे.[७] निःसंशय तो मोठा दुराचारी होता.[८]

إِنَّ فِرْعَوْنَ عَلَا فِي الْأَرْضِ وَجَعَلَ أَهْلَهَا شِيَعًا
يَسْتَضْعِفُ طَائِفَةً مِنْهُمْ يُذَبِّحُ أَبْنَاءَهُمْ وَيَسْتَحْيِي
نِسَاءَهُمْ ۚ إِنَّهُ كَانَ مِنَ الْمُفْسِدِينَ ④

५. आणि आम्ही असे इच्छित होतो की त्या लोकांवर आपली कृपा करावी जे देशात दुर्बल बनवून ठेवले गेले होते व त्यांना प्रमुख बनवावे व त्यांना वारस बनवावे.[९]

وَنُرِيدُ أَنْ نَمُنَّ عَلَى الَّذِينَ اسْتُضْعِفُوا فِي الْأَرْضِ
وَنَجْعَلَهُمْ أَئِمَّةً وَنَجْعَلَهُمُ الْوَارِثِينَ ⑤

६. आणि जमीनीवर त्यांना सत्ताधिकार प्रदान करावा [१०] आणि फिरऔन व हामान [११] आणि त्यांच्या सैन्यांना यांच्याद्वारे ते दाखवावे ज्याचे त्यांना भय होते. [१२]

وَنُمَكِّنَ لَهُمْ فِي الْأَرْضِ وَنُرِيَ فِرْعَوْنَ وَهَامَانَ وَجُنُودَهُمَا
مِنْهُمْ مَا كَانُوا يَحْذَرُونَ ⑥

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १ आणि सूरह यूनुस टीप क्र. १

या ठिकाणी तौय (ط) ! चा संकेत तूर पर्वताकडे आहे. ज्याचा उल्लेख आयत क्र. २९ व ४६ मध्ये केला गेला आहे. ज्याच्या कुशीत हजरत मूसा यांना प्रेषित्व लाभले.

सीन ( س ) चा संकेत सुल्तान (प्रमाणा) कडे आहे जी हजरत मूसा व हजरत हारुन यांना अल्लाह ने प्रदान केली होती. याचा उल्लेख आयत क्र. ३५ मध्ये केला गेला आहे.

आणि मीम ( م ) चा संकेत हजरत मूसा यांच्याकडे आहे, याचा उल्लेख आयत क्र. ३ व इतर आयतीमध्ये केला गेला आहे व त्यांचा किस्सा विवरणासह या सूरह मध्ये निवेदिला गेला आहे.

२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह यूसुफ टीप क्र. २.

३. म्हणजे या घटना अगदी खऱ्या आहेत व शब्दश: दुरुस्त आहेत. त्यांच्या निकोपतेची कल्पना माणसाला त्या वेळी होते जेव्हा तो बायबलच्या गुंतागुंतीच्या निवेदनास पाहतो.

४. म्हणजे यापासून लाभ तेच लोक घेतील जे ईमान बाळगतील.

५. बंडखोर असण्याचा अर्थ अल्लाहशी विद्रोह करणे, त्याच्या आदेशांच्या जागी आपले आदेश जारी करणे आणि जमीनीवर शांतता व न्याय प्रस्थापित करण्या ऐवजी अत्याचार व अतिरेक करणे.

६. म्हणजे पक्षपात व अप्रिय राजकिय हेतुंमुळे देशातल्या रहिवाश्यांना त्याने वेगवेगळ्या गटां (Classes)मध्ये विभागून ठेवले होते. शासकीय गटाचे अधिकार सुरक्षित होते आणि इतर गटांचे अधिकार त्याच्या कृपा दयेवर दुसऱ्या शब्दात फिरऔनचे शासन निकृष्ट प्रतीचे संप्रदायवादी शासन होते आणि एखाद्या सम्प्रदायवादी शासनाचे वर्तन कसे असते याची कल्पना तर आम्हाला आपल्या (भारत) देशात सहजगत्या करता येईल.

७. म्हणजे बनी इस्राईलला.

हजरत युसुफ यांना मिस्र (इजिप्त) देशात सत्ताधिकार प्राप्त झाला होता, आणि बनी इस्राईलला तेथे चांगली पोजीशन प्राप्त होती. ज्यामुळे त्यांच्या संख्येत बरीच वाढ झाली होती. परंतु नंतरच्या काळात वांशिक व देशीय पक्षपात निर्माण झाले आणि फिरऔनला हे भय वाटले की हे अल्पसंख्याक, बहुसंख्य न व्हावेत यासाठी त्याने बनी इस्राईलच्या नवजात अर्भकांची कत्तल करण्याचा आदेश जारी केला. तो बनी इस्राील कडून सक्त मेहनत मजूरीची कामे घेत असे व त्यांच्यावर वेगवेगळे अत्याचार व अतिरेक करीत असे.

८. म्हणजे तो प्रत्येक दृष्टीने दुराचारी होता. आपल्या श्रद्धा व आचरणाच्या दृष्टीने ही व एक शासक या नात्याने ही. यास्तव त्याचे शासन जुलुम व अतिरेकाचे शासन होते व त्याने समाजात फार मोठा बिघाड निर्माण केला होता.

९. म्हणजे फिरऔनने बनी इस्राईलची आपल्या अत्यांचारी शासनाद्वारे मुस्कटदाबी केली होती. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहचा फैसला हा होता की या अत्याचार पिडीत जन समूहास उन्नत केले जावे आणि अल्लाह जेव्हा एखाद्या समूहास उन्नत करु इच्छितो तर तो उन्नत झाल्याशिवाय राहत नाही. मग जगातली कोणती ही शक्ती त्याला पायदळी तुडवू शकत नाही.

वारस बनविण्याचा अर्थ ईश-देणग्यांचा वारस बनविणे होय. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह शुअरा टीप क्र. ५३.

१०. म्हणजे फिरऔन व मिस्रवाल्यांच्या गुलामीतून बाहेर काढून त्यांना सिरीयाच्या भूमीचे शासक बनवावे.

११. कुरआनाच्या निवेदनाने जाहीर होते की हामान फिरऔनच्या राज्यात एखाद्या फार मोठ्या हुद्यावर होता. कदाचित पंतप्रधान ही असेल. सद्यकालीन काही भाष्याकारांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे की हामान नावाचा कोणताही मनुष्य फिरऔनच्या राज्यात नव्हता. परंतु हा आक्षेप अगदी निराधार आहे. कारण त्या काळाचा तपशीलवार इतिहास लिखित स्वरुपात विद्यमान नाही की ज्या आधारे हा दावा केला जावा.

१२. फिरऔन वाले हे भय बाळगत होते की बनी इस्राईल अल्पसंख्यांत असून ही त्यांच्यावर वरचढ न व्हावेत आणि अल्लाहचा फैसला हाच होता की बनी इस्राईल द्वारे फिरऔन वाल्यांचा सत्ताधिकार त्यांच्या अस्तित्वासमेत समुद्रात बुडावा व शेवटी असेच घडले; ज्याचे विवरण पुडे येत आहे. यावरुन हा धडा मिळतो की जर ईमान बाळगणाऱ्यांच्या एखाद्या समूहास तत्कालीन फिरऔन सारख्या शासनाने अत्याचार पिडीत बनवून ठेवले तर अल्लाहची अबोल उपाययोजना या अत्याचार पिडीत अल्पसंख्येस अत्याचारी बहुसंख्यांकांच्या डोके ठेचण्याचे माध्यम बनवू शकते.

हजरत मूसा व फिरऔनच्या किश्श्याचे हे महत्वपूर्ण पैलू होते ज्यांना या घटनेची प्रस्तावना म्हणून सादर केले गेले. या साठी की लक्ष यांच्यावर केंद्रित व्हावे. यानंतर हजरत मूसा यांच्या जन्माची परिस्थिती व इतर परिस्थिती निवेदिली गेली आहे.

وَأَوْحَيْنَآ إِلَىٰٓ أُمِّ مُوسَىٰٓ أَنْ أَرْضِعِيهِ ۖ فَإِذَا خِفْتِ عَلَيْهِ
فَأَلْقِيهِ فِى ٱلْيَمِّ وَلَا تَخَافِى وَلَا تَحْزَنِىٓ ۖ إِنَّا رَآدُّوهُ إِلَيْكِ
وَجَاعِلُوهُ مِنَ ٱلْمُرْسَلِينَ ﴿٧﴾

७. आणि आम्ही मूसाच्या मातेला 'वह्य' केले (संदेश पाठविला) की याला दूध पाजा. मग जेव्हा तुम्हाला याच्या बाबत भय वाटेल तेव्हा याला नदीत टाका आणि भय व दु:ख करु नका.आम्ही याला तुमच्या जवळ परत आणू आणि आम्ही याला रसूल (पैगंबर) बनविणार आहोत.[१३]

فَٱلْتَقَطَهُۥٓ ءَالُ فِرْعَوْنَ لِيَكُونَ لَهُمْ عَدُوًّا وَحَزَنًا ۗ إِنَّ
فِرْعَوْنَ وَهَـٰمَـٰنَ وَجُنُودَهُمَا كَانُوا۟ خَـٰطِـِٔينَ ﴿٨﴾

८. यास्तव त्याला फिरऔनच्या कुटुंबियांनी उचलून घेतले या साठी की तो त्यांच्या करीता शत्रू व दु:ख कारक ठरावा.[१४] खरे पाहता, फिरऔन, हमान व त्यांचे लष्कर मोठे अपराधी होते.[१५]

وَقَالَتِ ٱمْرَأَتُ فِرْعَوْنَ قُرَّتُ عَيْنٍ لِّى وَلَكَ ۖ
لَا تَقْتُلُوهُ عَسَىٰٓ أَن يَنفَعَنَآ أَوْ نَتَّخِذَهُۥ وَلَدًا
وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ﴿٩﴾

९. आणि फिरऔनची पत्नी (फिरऔनला) म्हणाली, हा माझ्या व तुमच्या साठी नयनांची शीतलता आहे, याला ठार करु नका [१६] नवल नव्हे की हा आमच्या करीता लाभप्रद ठरावा किंवा आम्ही यास पुत्र बनवावे आणि ते (परिणति) पासून अनभिज्ञ होते.[१७]

وَأَصْبَحَ فُؤَادُ أُمِّ مُوسَىٰ فَـٰرِغًا ۖ إِن كَادَتْ لَتُبْدِى بِهِۦ
لَوْلَآ أَن رَّبَطْنَا عَلَىٰ قَلْبِهَا لِتَكُونَ مِنَ ٱلْمُؤْمِنِينَ ﴿١٠﴾

१०. आणि मूसाच्या आईचे हृदय बेचैन झाले [१८] जर आम्ही तिचे मन दृढ केले नसते तर ती हे रहस्य जाहीर करण्याच्या बेतातच होती.[१९] हे अशासाठी केले की तिने मोमीन (ईमान धारक) बनून रहावे.[२०]

وَقَالَتْ لِأُخْتِهِۦ قُصِّيهِ ۖ فَبَصُرَتْ بِهِۦ عَن جُنُبٍ وَهُمْ
لَا يَشْعُرُونَ ﴿١١﴾

११. ती त्या (मुला) च्या बहीणीस म्हणाली, तू त्याच्या पाठोपाठ जा.यास्तव ती त्याला दुरून पाहत राहीली आणि त्या लोकांना याची खबर देखील झाली नाही.[२१]

وَحَرَّمْنَا عَلَيْهِ ٱلْمَرَاضِعَ مِن قَبْلُ فَقَالَتْ هَلْ أَدُلُّكُمْ عَلَىٰٓ
أَهْلِ بَيْتٍ يَكْفُلُونَهُۥ لَكُمْ وَهُمْ لَهُۥ نَـٰصِحُونَ ﴿١٢﴾

१२. आणि आम्ही या (मुला) करीता आधीपासूनच दूध पाजणारींना हराम (वर्ज्य) करुन ठेवले होते.[२२] त्या (च्या बहीणी)ने म्हटले, काय मी तुम्हास अशा कुटुंबियांचे ठिकाण दाखवू जे तुमच्यासाठी याचे पालन पोषण करतील.[२३] व याचे हितचिंतक बनतील.

१३. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. ३४.

१४. स्पष्टीकरणा साठी पाहा सूरह ताहा टीप क्र. ३६

१५. म्हणजे फिरऔनचा हा संपूर्ण जथा अपराधी व गुन्हेगार होता. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी उपाय योजना केली की पुढील आयुष्यात ते आपल्या सुखशांतीला पारखे झाले.

१६. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४०

१७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहची ही अबोल उपाय योजना होती जी फिरऔन व त्याच्या संतती विरुद्ध केली जाणार होती. परंतु ते यापासून अजाण होते की हाच मुलगा (मूसा० ज्याचे पालन पोषण ते करीत आहेत, आपल्या सोबत अल्लाहची ती लाठी ही घेऊन आला आहे जी आवाज करीत नाही, पण कालांतराने त्यांचे डोके टेचून काढणार आहे.

१८. हजरत मूसा यांच्या आईला या पूर्वीच वह्य द्वारे समाधान दिले गेले होते की मूल पुनश्च तिच्याकडे परत येणार आहे. असे असले तरी आईचे हृदय शेवटी आईचेच हृदय ! आपल्या बाळाचा विरह व एका अत्याचारीच्या घरी तो पोहचल्यावर ती बैचैन कशी झाली नसती हृदयाची ही अवस्था अगदी स्वाभाविक होती म्हणून ही अशी एखादी गोष्ट नव्हे जी अल्लाहवरील भरवशाच्या विपरीत असावी.

१९. आईच्या मुखातून बेचैन अवस्थेत 'माझा बाळ' या सारखे शब्द निघू शकत होते ज्यामुळे रहस्योद्‌घाटन होण्याची शक्यता होती, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने तिला धीर दिला म्हणून असा कोणताही शब्द तिच्या मुखावाटे निघाला नाही.

आयतीद्वारे हे मार्गदर्शन लाभते की अत्याचाऱ्याच्या जुलुमा पासून बचाव करण्या करीता रहस्य भेद लपविले जाऊ शकतात. तसेच ही मानसशास्त्रीय हकीगत देखील स्पष्ट होते की रहस्य-भेदांचा संबंध हृदयाच्या दृढतेशी आहे.

२०. हजरत मूसा यांची आई ईमान बाळगणाऱ्यां पैकी होती आणि ही जी घटना उद्‌भवली ती तिच्या ईमानास अधिक मजबूत बनविण्यास कारक ठरली.

२१. म्हणजे फिरऔन वाल्यांना याचा गंध ही लागला नाही की ही या मुलाची बहीण आहे, जी त्याच्या मागोमाग चालत येत आहे. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४०.

२२. या ठिकाणी 'हराम' हा शब्द शाब्दिक अर्थाने वापरला गेला आहे ज्याचा अर्थ रोखणे, प्रतिबंध घालणे. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुलाच्या प्रकृतीत अशी गोष्ट निर्माण केली की त्याने आपल्या आई खेरीज कोणत्याही स्त्रीचे दुग्धपान करु नये.

२३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४०.

فَرَدَدْنٰهُ إِلٰٓى أُمِّهٖ كَيْ تَقَرَّ عَيْنُهَا وَلَا تَحْزَنَ وَلِتَعْلَمَ
أَنَّ وَعْدَ اللّٰهِ حَقٌّ وَّلٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ﴿١٣﴾

१३. अशा प्रकारे आम्ही त्याला त्याच्या आई जवळ परतविले, यासाठी की तिचे नेत्र शीतल व्हावेत व तिने दु:ख करु नये.[२४] आणि यासाठी की तिने जाणून घ्यावे की अल्लाहचा वायदा सच्चा होता, परंतु अधिकांश लोक जाणत नाही.[२५]

وَلَمَّا بَلَغَ أَشُدَّهٗ وَاسْتَوٰىٓ اٰتَيْنٰهُ حُكْمًا وَّعِلْمًا ۗ وَكَذٰلِكَ
نَجْزِي الْمُحْسِنِيْنَ ﴿١٤﴾

१४. आणि जेव्हा तो आपल्या तारूण्यावस्थेस पोहोचला व त्याच्या ठायी दृढता आली तेव्हा आम्ही त्याला बुद्धिकौशल्य व ज्ञान प्रदान केले.[२६]सदाचारी लोकांना आम्ही अशा प्रकारे मोबदला प्रदान करतो.[२७]

وَدَخَلَ الْمَدِيْنَةَ عَلٰى حِيْنِ غَفْلَةٍ مِّنْ أَهْلِهَا فَوَجَدَ فِيْهَا
رَجُلَيْنِ يَقْتَتِلٰنِ هٰذَا مِنْ شِيْعَتِهٖ وَهٰذَا مِنْ عَدُوِّهٖ ۚ
فَاسْتَغَاثَهُ الَّذِيْ مِنْ شِيْعَتِهٖ عَلَى الَّذِيْ مِنْ عَدُوِّهٖ ۙ
فَوَكَزَهٗ مُوْسٰى فَقَضٰى عَلَيْهِ ۖ قَالَ هٰذَا مِنْ عَمَلِ الشَّيْطٰنِ ۖ
إِنَّهٗ عَدُوٌّ مُّضِلٌّ مُّبِيْنٌ ﴿١٥﴾

१५. आणि (एक दिवस) तो शहरात अशा वेळी दाखल झाला जेव्हा लोक अनभिज्ञ होते.[२८] तेथे त्याने पाहीले की दोन माणसे लढत आहेत. एक त्याच्या आपल्या समूहापैकी होता[२९] आणि दुसरा त्याच्या शत्रू-पक्षाचा. जो त्याच्या समूहातला होता,[३०] त्याने त्या माणसाच्या विरोधात, जो शत्रू-पक्षाशी संबंधित होता, याला मदतीसाठी हाक मारली. मूसाने त्याला ठोसा मारला व त्याचे काम तमाम केले [३१] (जेव्हा ही चूक हातून घडली तेव्हा) तो म्हणाला, ही सैतानाची कामगिरी आहे.[३२] नि:संशय तो उघडपणे, मार्गभ्रष्ट करणारा शत्रू आहे.[३३]

قَالَ رَبِّ إِنِّيْ ظَلَمْتُ نَفْسِيْ فَاغْفِرْ لِيْ فَغَفَرَ لَهٗ ۗ إِنَّهٗ
هُوَ الْغَفُوْرُ الرَّحِيْمُ ﴿١٦﴾

१६. त्याने प्रार्थना केली, हे माझ्या पालनकर्त्या ! मी स्वत:वर अत्याचार केला, तू मला क्षमा कर, तेव्हा अल्लाहने त्यास माफ केले.[३४] नि:संशय तो मोठा माफ करणारा, दया करणारा आहे.

قَالَ رَبِّ بِمَآ أَنْعَمْتَ عَلَيَّ فَلَنْ أَكُوْنَ
ظَهِيْرًا لِّلْمُجْرِمِيْنَ ﴿١٧﴾

१७. (मग) तो म्हणाला, हे माझ्या पालनकर्त्या ! तुझ्या या उपकारा नंतर जो माझ्यावर तू केला आहे,[३५] यापुढे मी कधी ही अपराध्यांचा सहाय्यक बनणार नाही.[३६]

२४. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह ताहा टीप क्र. ४१.

२५. म्हणजे मूसाच्या आईला हे स्पष्टत: कळून यावे की अल्लाहने भूल परतविण्याचा जो वायदा वह्य द्वारे केला होता तो अगदी सच्चा होता व पूर्ण झाल्याशिवाय राहीला नाही. तद्‌वतच अल्लाहचा प्रत्येक वायदा पूर्ण होतो परंतु अधिकांश लोकांची नजर या हकीगतीवर नसते म्हणून ते यापासून अनभिज्ञ असतात.

२६. हजरत मूसा यांचे संगोपन अशा प्रकारे झाले की त्यांचा आपल्या आईशी ही संबंध राहीला व फिरऔनशी ही. मग जेव्हा ते थोडे मोठे झाले तेव्हा त्यांची हत्या केली जाण्याची कसलीच भिती उरली नाही कारण फिरऔन नवजात अर्भकांची हत्या करीत असे किंवा नदीत बुडवून टाकीत असे, म्हणून नंतर रहस्यावर आवरण घालण्याची गरज उरली नाही आणि हजरत मूसा यांचे वंश गोत्र सर्वांनाच कळाले. मग बनी ईस्राईल (वंशा)चे ते सर्वपरिचित व्यक्ति म्हणून उन्नत झाले. त्यांना बनी इस्राईलचे वातावरण पाहण्याची ही संधी लाभली; व फिरऔनच्या वातावरणास ही. मग जेव्हा त्यांनी तारुण्यावस्थेत पदार्पण केले. आणि गांभीर्य व सूज्ञता त्यांच्या अंगी आली तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना विद्वत्ता व बुद्धिकौशल्य, आपला परिचय व सत्य धर्माचे ज्ञान प्रदान केले. प्रेषितत्व तर त्यांना मिस्र (इजिप्त) हून निघाल्यानंतर कालांतराने प्रदान केले गेले. परंतु ज्ञान व बुद्धिकौशल्याचे हे धन तर त्यांना आपल्या मिस्र देशात असतांनाच प्रदान केले गेले. अशा प्रकारे ते आपल्या या पात्रतेमुळे मिस्र देशात श्रेष्ठ राहीले. आणि याच कारणास्तव जेव्हा हजरत मूसा एक काळ लोटल्यावर पैगंबर पदाने सम्मानित होऊन मिस्र देशी परतले तेव्हा ते बनी ईस्राईल व फिरऔन वाल्या करीता सर्वपरिचित व्यक्तिमत्व होते.

२७. म्हणजे ज्ञान व बुद्धिकौशल्य सर्वश्रेष्ठ अल्लाहचे सर्वोत्कृष्ट इनाम होय. जे या जगात एखाद्यास लाभावे. जे लोक सदाचाराचे वर्तन अंगिकारतात त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या योग्यते नुसार या इनामाने उपकृत करतो.

२८. असे दिसून येते की बनी ईस्राईलची वस्ती शहराबाहेर जवळपास होती. आणि शहराच्या मध्यभागी किब्ती (मिसरी) लोक राहात. ज्या जन-समूहाशी भेदभावपूर्ण व्यवहार केला जात होता, त्याला शहरा बाहेरच जागा मिळू शकत होती. एक दिवस हजरत मूसा अशा वेळी आपल्या घरून निघून शहरात दाखल झाले जी लोकांची आराम करण्याची वेळ होती, म्हणून रस्त्यावर विशेष ये-जा नव्हती. संभवत हजरत मूसा बनी इस्राईलच्या परिस्थितीचे अवलोकन करण्या करीता बाहेर पडले असावेत, ज्यांना मिसरी लोकांची गुलामी करावी लागत होती व त्यांच्याकडून सक्त मेहनतीची कामे घेतली जात.

स्पष्ट असावे की हजरत मूसा यांचे फिरऔनने संगोपन अवश्य केले होते, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या खास उपाय योजनेने ते दुग्धपान करणारे बालक असतांना त्यांच्या आईजवळ पाठवून दिले होते आणि कुरआन हे स्पष्ट करीत नाही की नंतर ते फिरऔनच्या महालात राहू लागले होते, तेव्हा योग्य गोष्ट हीच दिसते की ते आपल्या मातेजवळ राहून लहानाचे मोठे झाले.

२९. अर्थात इस्राईली होता.

३०. म्हणजे मिसरी (किब्ती) जो फिरऔनच्या जन समूहाशी संबंधित होता आणि फिरऔन जनसमूह बनी इस्राईलचा वैरी होता. यास्तव ते यांच्यावर जुलुम ढाळीत व त्यांच्या अर्भकांची हत्या करीत.

३१. म्हणजे हजरत मूसा यांनी इस्राईली माणसाला मिसरीच्या तावडीतून वाचवू इच्छिले, परंतु जेव्हा त्याला वाचवण्यासाठी मिसरी माणसाला जोरदार ठोसा लगावला तर आघात सहन न होऊन त्याचे तत्क्षणी प्राणोत्क्रमण झाले. वस्तुत: हजरत मूसा यांनी त्याची हत्या करण्याचा इरादा केला नव्हता, परंतु संयोगवश त्यांचा ठोसा त्याच्याकरीता प्राणघातक ठरला.

३२. हजरत मूसा यांनी या कृत्यास सैतानी हरकत म्हटले आहे कारण सैतानाच्या प्रेरणेचा त्यात अंतर्भाव होता अन्यथा ना हजरत मूसा यांनी जोरदार ठोसा मारला असता आणि ना ही दुर्घटना उद्‌भवली असती.

३३. हजरत मूसा यांचे सैतानापासून सावध राहण्याची ही बाब आपल्या अपराधाची जाणीव त्यांचे ज्ञान वैभव व्यक्त करते. जे अल्लाहने त्यांना प्रदान केले होते. याचा उल्लेख आयत क्र. १४ मध्ये केला गेला आहे.

३४. हजरत मूसा यांच्या हातून मिसरी (किब्ती) ची हत्या नकळत झाली होती. म्हणजे ही केवळ हत्या होती, जाणून बुजून इराद्याने केलेला खून नव्हे. तरी देखील अपराध शेवटी अपराधच म्हणून हजरत मूसा यांनी स्वत:ला निर्दोष न मानता निर्भिड शब्दात आपला अपराध अल्लाह समोर मान्य केला. यासतव त्यांनी या अपराधाला आपल्या स्वत:वरील अत्याचार ठरविले व त्याबद्दल अल्लाहजवळ क्षमा-याचना केली.

काही महशय पैगंबर प्रतिष्ठेचा विवाद उभा करून या घटनेचे असे स्पष्टीकरण करतात की जणू हजरत मूसा यांच्या हातून गुन्हा घडलाच नव्हता, परंतु हे कुरआनाच्या स्पष्ट निवेदनाविरुद्ध आहे. कुरआन स्पष्ट: फर्मावते की हजरत मूसा यांनी आपल्या अपराधास कबूल करीत अल्लाहजवळ क्षमा-याचना केली होती. आणि अल्लाहने त्यांना माफ केले होते.

अर्थात यामुळे हजरत मूसा यांच्या प्रेषित्वावर कसलीही आंच येत नाही, कारण प्रथम तर हे की ही घटना त्यांच्या पैगंबर होण्यापूर्वीची आहे. दुसरे असे की त्यांच्या हातून चुकून हा गुन्हा घडला होता. त्यांनी जाणून बुजून हा अपराध केला नव्हता व तिसरे असे की त्यांनी त्वरीत आपली चूक मान्य करून सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ माफी मागितली होती.

काही भाष्यकारांनी असे ही म्हटले की ज्याची हत्या झाली तो आक्रमक काफिर होता. म्हणून त्याला ठार करणे योग्य होते परंतु हे उचित नव्हे कारण बनी इस्राईलतर्फे फिरऔन जनसमूहाविरुद्ध जेहाद (धर्मयुद्ध) चे कसलेही ऐलान झाले नव्हते. मग मिसरी लोकांबाबत हे कोणत्या आधारावर म्हटले जाऊ शकते की ते आक्रमक होते. राहीले त्यांचे काफीर (सत्य-विरोधक) असणे तर एखाद्याचा तो काफिर आहे म्हणून त्याची हत्या कोणत्याही स्थितीत योग्य ठरत नाही. समस्त पैगंबर व त्यांचे ईमान बाळगणारे साथीदार यांचा काफिर लोकांशी संबंध राहीला व त्याच्यातर्फे सक्त विवोधाला ही तोंड द्यावे लागते. परंतु त्यांनी दारूल-कुफ्र (कुफ्रस्थान) मध्ये राहून त्या काफिरांपैकी कोणाविरुद्धही हत्तेचे पाऊल उचलले नाही. राहीले जेहाद तर तो सामूहीक प्रयत्न होय व त्याची शास्त्रविहीतता विशिष्ट शर्तीसह आहे.

इस्लामचा सर्वासामान्य नियम हाच की प्रत्येक मनुष्य-जीव प्रतिष्ठीत आहे व त्याच परिस्थितीत त्याची हत्या करणे उचित आहे जेव्हा सत्य व न्यायाची निकड जाणवेल. (बनी इस्राईल-३३)

وَلَا تَقْتُلُوا النَّفْسَ الَّتِي حَرَّمَ اللَّهُ إِلَّا بِالْحَقِّ ـ (بنی اسرائیل ـ ۳۳)

"आणि कोणत्याहि जीवाची, ज्याला अल्लाहने आदरणीय ठरविले आहे, हत्त्या करू नका. परंतु सत्याच्या आधारावर."

३५. अनुग्रहाशी अभिप्रेत अल्लाहजवळ माफी मागण्याची ती सुबुद्धि होय. जी हजरत मूसा यांना वेळेवर लाभली आणि यामुळे त्यांना पूर्ण आशा वाटली की सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याना माफ करील.

३६. यावरून असे दिसून येते की दोषी इस्राईली मनुष्य होता, परंतु ज्याअर्थी तो अत्याचार पिडीत जनसमूहाचा मनुष्य होता व त्याने हजरत मूसा यांना मदतीसाठी पुकारले होते म्हणून त्याला निर्दोष समजून त्याच्या मदतीसाठी ते धावले. परंतु नंतर जेव्हा त्यांना हे कळाले की तो (इस्राईली) मनुष्य स्वत: दोषी होता तेव्हा ह. मूसा यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहशी प्रतिज्ञा केली की यापुढे मी कोणत्याही अपराध्यास सहाय्य करणार नाही, मग तो माझ्या जन समूहापैकी का असेना.

स्पष्ट व्हावे की इस्लामच्या शिकवणीत साम्प्रदायिकता किंवा जातीयता या गोष्टींना तिळमात्र जागा नाही तर एखाद्या इस्लामेतर देशात एखादा मुसलमान अपराध करतो किंवा एखाद्या मुस्लिमेतर माणसावर अत्याचार करतो तर इतर मुसमानांचे हे काम नव्हे की तो आपल्या जनसमूहाचा माणूस म्हणून त्याचे समर्थन व संरक्षण करावे. कारण ही रीत अन्यायपूर्ण तर आहेच पण अपराध्यांचा उत्साह वाढविणारी देखील.

*हे ऐकून तो भीत भीत सावधपणे तेथून निघाला आणि त्याने दुआ (प्रार्थना) केली की, हे माझ्या पालनकर्त्या ! जुलमी जनसमूहापासून माझी सुटका कर.जेव्हा त्याने मदयनकडे रोख केला तेव्हा म्हणाला, आशा आहे की माझा पालनकर्ता मला सरळ मार्ग दाखविल. (अल-क़ुर्आन)*

१८. मग (दुसऱ्या दिवशी) तो प्रात:काळी भीत भीत व सावधगिरीने शहरात दाखल झाला [३७] पाहतो तर तोच मनुष्य ज्याने गेल्या दिवशी मदतीसाठी त्याला हाक मारली होती, आज पुन्हा त्याला हाक मारत आहे. मूसा म्हणाला, तुम्ही उघडपणे अयोग्य आहात. [३८]

فَأَصْبَحَ فِى الْمَدِيْنَةِ خَآئِفًا يَّتَرَقَّبُ فَإِذَا الَّذِى اسْتَنْصَرَهٗ
بِالْأَمْسِ يَسْتَصْرِخُهٗ ۚ قَالَ لَهٗ مُوْسٰٓى إِنَّكَ لَغَوِىٌّ مُّبِيْنٌ ﴿١٨﴾

१९. मग जेव्हा त्याने त्या माणसाला, जो या दोघांचा शत्रू होता [३९] पकडण्याचा इरादा केला तेव्हा तो उद्‌गारला, हे मूसा काय तुम्ही माझी त्याच प्रकारे हत्त्या करू इच्छिता ज्या प्रकारे काल तुम्ही एका माणसाची हत्त्या केली होती? तुम्ही देशात जुलमी बनून राहू इच्छिता. सुधारणा करणारे बनू इच्छित नाही. [४०]

فَلَمَّآ أَنْ أَرَادَ أَنْ يَّبْطِشَ بِالَّذِىْ هُوَ عَدُوٌّ لَّهُمَا ۙ قَالَ
يٰمُوْسٰٓى أَتُرِيْدُ أَنْ تَقْتُلَنِىْ كَمَا قَتَلْتَ نَفْسًۢا بِالْأَمْسِ ۖ
إِنْ تُرِيْدُ إِلَّآ أَنْ تَكُوْنَ جَبَّارًا فِى الْأَرْضِ وَمَا تُرِيْدُ
أَنْ تَكُوْنَ مِنَ الْمُصْلِحِيْنَ ﴿١٩﴾

२०. आणि शहराच्या शेवटच्या भागातून एक मनुष्य धावत आला व म्हणाला, मूसा ! शासनाचे जबाबदार लोक तुमचा वध करण्याकरीता सल्ला-मसलत करीत आहेत. यास्तव तुम्ही येथून निघा. मी तुमच्या हितचिंतकांपैकी आहे. [४१]

وَجَآءَ رَجُلٌ مِّنْ أَقْصَا الْمَدِيْنَةِ يَسْعٰى ۫ قَالَ يٰمُوْسٰٓى إِنَّ
الْمَلَأَ يَأْتَمِرُوْنَ بِكَ لِيَقْتُلُوْكَ فَاخْرُجْ إِنِّىْ لَكَ
مِنَ النّٰصِحِيْنَ ﴿٢٠﴾

२१. हे ऐकून तो भीत भीत सावधपणे तेथून निघाला आणि त्याने दुआ (प्रार्थना) केली की, हे माझ्या पालनकर्त्या ! जुलमी जनसमूहापासून माझी सुटका कर. [४२]

فَخَرَجَ مِنْهَا خَآئِفًا يَّتَرَقَّبُ ۫ قَالَ رَبِّ نَجِّنِىْ
مِنَ الْقَوْمِ الظّٰلِمِيْنَ ﴿٢١﴾

२२. जेव्हा त्याने मदयनकडे रोख केला तेव्हा म्हणाला, आशा आहे की माझा पालनकर्ता मला सरळ मार्ग दाखविल. [४३]

وَلَمَّا تَوَجَّهَ تِلْقَآءَ مَدْيَنَ قَالَ عَسٰى رَبِّىْٓ أَنْ يَّهْدِيَنِىْ
سَوَآءَ السَّبِيْلِ ﴿٢٢﴾

३७. भीती या गोष्टीची की कदाचित मला पकडले न जावे व माझ्यावर हत्त्येचा खटला न भरला जावा आणि सावध या गोष्टीपासून की कोणी माझ्या पाळतीवर तर नाही.

दुसऱ्या दिवशीही हजरत मूसा शहराच्या बाह्य भागातून आले होते ज्यावरून हे स्पष्ट होते की त्यांचे घर शहराबाहेर होते व ते फिरऔनच्या महालात राहात नव्हते. कारण मिसरीच्या वधानंतर ते फिरऔनच्या महालात जाण्याचा धोका कसा पत्करु शकत होते. अर्थात कुरआनाद्वारे हे जाहीर होते की हजरत मूसा हे बनी इस्राईल (वंशाच्या) लोकांच्या दरम्यान व आपल्या घरात राहात होते. फिरऔनच्या महालात नव्हे.

३८. म्हणजे ज्या इस्राईली माणसाने मदतीसाठी हाक मारली होती आज पुन्हा दुसऱ्या मिसरीशी भिडून हजरत मूसा यांना मदतीसाठी बोलावित होता. हजरत मूसा यांना कळून चुकले की हा इस्राईली मनुष्य स्वत:च भांडखोर आहे म्हणून त्यांनी त्याला म्हटले, तू अगदी नालायक माणूस आहेस.

३९. म्हणजे मिसरी मनुष्य जो इस्राईली माणसाचा व हजरत मूसा या दोघांचा शत्रू होता.

४०. ही गोष्ट मिसरी मनुष्य हजरत मूसा यांना उद्देशून म्हणाला. हजरत मूसा केवळ त्याला पकडून वेगळे करण्यासाठी पुढे सरसावले, परंतु मिसरी असे समजला की हे माझी हत्त्या करू इच्छित आहेत. म्हणून त्याने हत्त्याची ती घटना आठवून दिली जी गेल्या दिवशी घडली होती. हा या गोष्टीचा पुरावा होता की हत्त्याची घटना रहस्य राहीले नव्हते, किंबहुना याची वार्ता कोणत्या न कोणत्या रीतीने लोकांपर्यंत पोहोचली.

४१. असे दिसते की फिरऔनचा महाल शहराच्या अंतिम भागात होता तेथून हा मनुष्य, जो हजरत मूसा यांचा हितचिंतक होता ही खबर घेऊन हजरत मूसा यांच्या जवळ धावत आला की त्यांच्या वधाकरीता फिरऔनचा शासकीय वर्ग सल्ला मसलत करीत आहे व त्याच बरोबर त्या माणसाने हा स्ल्लाही दिला की हे मूसा तुम्ही या देशातून बाहेर जा.

४२. फिरऔनचे शासन हत्त्या अपराधाची शिक्षा देखील हत्त्येच्या रुपानेच देऊ इच्छित होती कारण हत्त्या झालेला मनुष्य त्याच्या जनसमूहापैकी होता. उलट मूसा बनी इस्राईलशी संबंधित होते. जाहीर आहे, हा जुलुम होता आणि फिरऔनने बनी इस्राईलशी असेच अत्याचारी वर्तन अंगिकारलेले होते.

हजरत मूसा यांच्या हातून मिसरीच्या हत्त्याची घटना बायबलचे पुस्तक निर्गममध्ये प्रकरण क्र. २ अन्वये निवेदिले गेले आहे. परंतु एवढ्या तपशीलासह व निकोपतेने नव्हे.

४३. मदयन अकबा उपसागराच्या पूर्व किनाऱ्यावर मिस्र पासून आठ दिवसाच्या अंतरावर होते. ज्याअर्थी हा देश फिरऔनच्या साम्राज्याबाहेरील देश होता म्हणून हजरत मूसा या देशाकडे वळले. त्यांना या प्रवासासाठी ना तयारी करण्याची संधी मिळाली होती. आणि ना रस्त्याविषयीची माहीती ते प्राप्त करू शकले होते, किंबहुना अल्लाहवर भरवसा करीत प्रवासाचा निर्धार केला आणि अल्लाहजवळ प्रार्थना केली की त्याने सरळ मार्ग दाखववा. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्यावर अशी कृपा केली की ते सरळ मदयन येथे पोहोचले व पुढील आयुष्यात त्यांच्याकरीता मार्गदर्शनाची दालने उघडत गेली.

وَلَمَّا وَرَدَ مَآءَ مَدْيَنَ وَجَدَ عَلَيْهِ أُمَّةً مِّنَ النَّاسِ
يَسْقُونَ ۬ وَوَجَدَ مِن دُونِهِمُ امْرَأَتَيْنِ تَذُودَانِ ۚ قَالَ
مَا خَطْبُكُمَا ۖ قَالَتَا لَا نَسْقِي حَتَّىٰ يُصْدِرَ الرِّعَآءُ ۖ وَأَبُونَا
شَيْخٌ كَبِيرٌ ﴿٢٣﴾

२३. आणि जेव्हा तो मदयन येथे पाण्या (विहीरी) जवळ पोहचला तेव्हा त्याने पाहीले की लोकांची एक संख्या (एक जमाव आपल्या) जनावरांना पाणी पाजत आहेत.[४४] आणि पाहीले की त्यांच्या पासून अलग दोन स्त्रीया आपल्या गुरांना रोखून उभ्या आहेत.[४५] त्याने त्यांना विचारले,तुमचा काय मामला आहे ?[४६] त्या म्हणाल्या, आम्ही तोपर्यंत पाणी पाजू शकत नाही,जो पावेतो गुराखी आपली जनावरे हटवून घेत नाही, आणि आमचे पिता फार वृद्ध आहेत.[४७]

فَسَقَىٰ لَهُمَا ثُمَّ تَوَلَّىٰٓ إِلَى الظِّلِّ فَقَالَ رَبِّ إِنِّي لِمَآ أَنزَلْتَ
إِلَيَّ مِنْ خَيْرٍ فَقِيرٌ ﴿٢٤﴾

२४. हे ऐकून त्याने त्यांच्या जनावरांना पाणी पाजले[४८] मग एका सावलीकडे चालला गेला आणि प्रार्थना केली की हे माझ्या पालनकर्त्या ! जे मांगल्य ही तू माझ्यावर अवतरीत करशील मी त्याचा गरजवंत आहे.[४९]

فَجَآءَتْهُ إِحْدَىٰهُمَا تَمْشِي عَلَى اسْتِحْيَآءٍ قَالَتْ إِنَّ أَبِي يَدْعُوكَ
لِيَجْزِيَكَ أَجْرَ مَا سَقَيْتَ لَنَا ۚ فَلَمَّا جَآءَهُ وَقَصَّ عَلَيْهِ الْقَصَصَ ۙ
قَالَ لَا تَخَفْ ۖ نَجَوْتَ مِنَ الْقَوْمِ الظَّٰلِمِينَ ﴿٢٥﴾

२५. मग त्या दोन स्त्रीयांपैकी एक याच्याजवळ लाजत लाजत आली.[५०] आणि म्हणाली, माझे वडील आपणास बोलावित आहेत, यासाठी की आपण आमच्या खातीर जनावरांना जे पाणी पाजले आहे त्याचा मोबदला आपणास द्यावा.[५१] मूसा जेव्हा त्याच्या (मुलीच्या पित्या) जवळ पोहोचला व त्याला सगळी घटना सांगितली तेव्हा तो म्हणाला, भिऊ नका, जुलमी जन समूहापासून तुम्हाला मुक्ति मिळाली.[५३]

قَالَتْ إِحْدَىٰهُمَا يَٰٓأَبَتِ اسْتَـْٔجِرْهُ ۖ إِنَّ خَيْرَ مَنِ اسْتَـْٔجَرْتَ
الْقَوِيُّ الْأَمِينُ ﴿٢٦﴾

२६. त्या दोन स्त्रीयांपैकी एक म्हणाली, बाबा, यांना मजुरीवर ठेवून घ्या. उत्कृष्ट मनुष्य, ज्याला आपण मजुरीवर ठेवाल, तो असू शकतो जो सामर्थ्यशाली व विश्वस्त असावा.[५४]

قَالَ إِنِّيٓ أُرِيدُ أَنْ أُنكِحَكَ إِحْدَى ابْنَتَيَّ هَٰتَيْنِ عَلَىٰٓ أَن
تَأْجُرَنِي ثَمَٰنِيَ حِجَجٍ ۖ فَإِنْ أَتْمَمْتَ عَشْرًا فَمِنْ عِندِكَ ۖ
وَمَآ أُرِيدُ أَنْ أَشُقَّ عَلَيْكَ ۚ سَتَجِدُنِيٓ إِن شَآءَ اللَّهُ
مِنَ الصَّٰلِحِينَ ﴿٢٧﴾

२७. त्या (स्त्रीच्या पित्या) ने (मूसा ला) म्हटले, मी असे इच्छितो की आपल्या या दोन मुलींपैकी एकीचा निकाह (विवाह) तुमच्याशी या अटीवर करून द्यावा की तुम्ही आठ वर्षापर्यंत माझ्याजवळ सेवारत रहावे. आणि जर दहा वर्षे पूर्ण कराल तर हे तुमच्या मर्जीने होईल. मी तुम्हाला कष्टात टाकू इच्छित नाही. अल्लाहने इच्छिल्यास तुम्ही पहाल की मी भला माणूस आहे.[५५]

४४. म्हणजे शहरात दाखल होण्यापूर्वी एका विहीरीजवळ पोहोचले, ज्या ठिकाणी बरेच लोक जमले होते व आपापल्या जनावरांना पाणी पाजात होते.

४५. म्हणजे त्या पुरूषांपासून अलग एका बाजूला आपल्या जनावरांसोबत उभ्या होत्या.

४६. हजरत मूसा यांनी हा प्रश्न सहानुभूतिपूर्वक केला. अशा प्रसंगी अनोळखी स्त्रीयांशी बोलण्यात काही हरकत नाही.

४७. हा संकेत त्या नियमाकडे आहे जो पुरुषांनी तेथे लागू केला होता म्हणजे प्रथम पुरूष आपल्या जनावरांना पाणी पाजतील नंतर स्त्रीयांची पाळी येईल. वस्तुत: स्त्रीयांना त्या अबला असल्यामुळे व इतर हेतुस्तव आधी अवसर दिला गेला पाहीजे होता परंतु ही जाणीव ना त्या काळातील गुराखांमध्ये होती आणि ना आजच्या लोकांमध्ये जे प्रगतीचा दावा करतात.

त्या स्त्रीयांना जनावरांची देखभाल व त्यांना पाणी पाजण्याकरीता नेण्या-आणण्याचे काम अशामुळे करावे लागत होते की त्यांच्या घरात त्यांच्या वृद्ध पित्या खेरीज पुरूष कोणी नव्हता. म्हणून ही त्यांची विवशता होती.न्याय व शरीअतच्या दृष्टीने बाहेरच्या कामकाजाची जबाबदारी पुरूषांवर लागू होत असली तरी गरज पडल्यास स्त्रीयांना ते काम करण्याची मनाई नाही. मात्र या अटीवर की त्यांनी शरीअतच्या मर्यादेत राहून काम करावे आणि लज्जासंकोच बाळगून असावे.

४८. हजरत मूसा यांनी जेव्हा त्यांची ही केविलवाणी स्थिती पाहीली तेव्हा जनावरांना सरळ विहीरीवर घेऊन गेले व त्यांना पाणी पाजले ते अतिशय सामर्थ्यवान व उत्साही होते म्हणून इतर गुराखी त्यांना प्रतिबंध घालू शकले नाहीत. हे लोक सेवेचे काम होते. जे हजरत मूसा यांनी अशा स्थितीत पार पाडले की ते त्यावेळी त्रस्त व थकलेले होते परंतु जे काम सचोटीने व केवळ अल्लाहची मर्जी संपादन करण्याकरीता केले जावे मग ते कितीही अल्प वा लहान असो, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याची कदर करतोच व त्यास मांगल्य कारक बनवितो. हदीस वचनातील उल्लेख असा-

مَنْ كَانَ فِي حَاجَةِ أَخِيهِ كَانَ اللهُ فِي حَاجَتِهِ ۔ (مسلم کتاب البر)

''जो मनुष्य आपल्या बांधवाची गरज पूर्ण करण्यात मग्न असतो, अल्लाह त्याची गरज पूर्ण करतो.'' (मुस्लिम-किताबुलबिर्र)

४९. यावरून असे दिसून येते की हजरत मूसा किती त्रस्त होते संभवत: उपासमार होण्याची वेळ आली असावी पण त्याचा स्वाभिमान पहा की या स्थितीत त्यांनी कोणाला काही सांगितले नाही. मागितले फक्त आपल्या पालन कर्त्या जवळ अल्लाहवरील भरवशाचे हे किती उच्च उदाहरण आहे जे त्यांच्या आचरणावरून व्यक्त होते. मग प्रार्थनेत त्यांनी जी शालीनता पाळली ती देखील त्यांच्या सुयोग्य असण्याचे प्रमाण होय कारण त्यांनी कसलीही तक्रार न मांडता आपली गरज आपल्या पालनकर्त्या समोर भांडली.

५०. स्त्री चे लाजत-संकोचत हजरत मूसा यांच्याजवळ येणे तिच्या सभ्यतेस व्यक्त करते. कुरआनने या स्त्रीचा हा गुण विशेषत्वाने उल्लेखिला आहे. ज्याद्वारे हा संकेत मिळतो की जर एखाद्या अनोळखी स्त्रीवर अनोळखी माणसाजवळ जाण्याचा व त्याच्याशी बोलण्याचा प्रसंग उद्भवेल तर तिने आपल्या स्त्री जातीच्या अलंकाराचा अर्थात स्त्री सुलभ लजा-संकोचाची पूरेपूर कास बाळगावी.

आजच्या काळात तर काही ना काही गरजे पोटी स्त्रीयांचे घराबाहेर पडणे अनिवार्य झाले आहे. परंतु लज्जेचे आवरण अंगावर घेऊन बाहेर पडण्यात व लज्जा-संकोजाच्या निकडीशी बेपर्वा होऊन स्त्री-पुरुषांच्या घनिष्टतेचा मार्ग अंगिकारण्यात फार मोठा फरक आहे. अर्थात पहिली अवस्था योग्य आहे व दुसरी अवस्था अयोग्य.

५१. स्त्रीयांनी जेव्हा आपल्या पित्याला ही घटना सांगितली असेल की एक प्रवासी विहीरीवर आला आहे जो सुसभ्य दिसतो व त्याने आमच्याशी अशा प्रकारे सहानुभूतीचे वर्तन केले. तर त्यांनी हा विचार केला असेल की न जाणो या प्रवाशाने जेवण केले असेल कि नाही आणि सद्वर्तनाचा मोबदला सदवर्तनानेच द्यायला हवा. यास्तव त्यांनी आपल्या मुलीला त्यांना बोलावून आणायला सांगितले.

५२. हजरत मूसा यांनी जे सेवा कार्य पार पाडले होते त्याचा काही मोबदला घेण्याचे त्यांच्या मनात ही नव्हते परंतु ते एक प्रवासी या नात्याने या गोष्टीस पात्र होते की त्यांचा पाहुणचार केला जावा. तसेच त्यांनी आताच मांगल्य अवतरीत करण्याची प्रार्थना अल्लाह जवळ केली होती म्हणून या आमंत्रणास की ज्याने मांगल्याचा मार्ग उघडण्याची शक्यता होती, त्यांनी कबूल करणेच योग्य होते. यास्तव हजरत मूसा त्या स्त्रीच्या पित्याच्या बोलविण्यामुळे तिच्या घरी गेले.

५३. त्या म्हाताऱ्या माणसाने सर्व वृत्तांत ऐकल्यानंतर हजरत मूसा यांना धीर दिला की या देशात फिरऔनची सत्ता नाही यास्तव निर्धास्त व्हा कारण आता तुम्ही जुलमी जन समूहाच्या विळख्या बाहेर आहात. हे म्हातारे बुजुर्ग ज्यांनी हजरत मूसा यांना आपल्या घरी बोलविले कोण होते? कुरआनने त्यांच्या नावाचे स्पष्टीकरण केलेले नाही, परंतु सर्वसामान्य पणे भाष्यकार त्यांचे नाव शोएब असल्याचे सांगतात ते पुढील कारणावरून खरे नाही-

१) जर पैगंबर शोएब हजरत मूसा यांच्या समकालीन असते तर कुरआनाने याविषयी स्पष्ट नामनिर्देश केला असता.

२) हजरत शोएब यांचा काळ हजरत लूत यांच्या काळाशी समीप होता. यास्तव हजरत शोएब आपल्या जन समूहास, लूत जनसमूहाच्या दुष्परिनणति पासून बोध घडवितांना म्हणतात-

وَمَاقَوْمُ لُوْطٍ مِنْكُمْ بِبَعِيْدٍ۔ (ہود:۸۹)

'आणि लूत जन समूह (ची दुष्परिणती) तर तुमच्या पासून काही दूर देखील नाही' (हूद : ८९)

ज्याअर्थी हजरत लूत व हजरत मूसा या दोघांच्या दरम्यान दीर्घ काळाचे अंतर राहीले. म्हणून हजरत शोएब हजरत मूसा यांच्या समकालीन असू शकत नाही.

३) कोणत्याही हदीस द्वारे हे सिद्ध होत नाही की हे वृद्ध व्यक्तित्व हजरत शोएब यांचेच होते. ज्या कथनांमध्ये या नावाचे स्पष्टीकरण मिळते ती योग्य नव्हेत. या संदर्भात इब्ने कसीर आपल्या भाष्यात लिहीतात-

'आणि काही हदीस वचनांमध्ये ह. मूसा यांच्या वृत्तांत सदंर्भात शोएब यांच्या नावाचे जे स्पष्टीकरण मिळते तर त्यांच्या सनदी योग्य नव्हेत' (तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. ३८५)

आणि अल्लामा इब्ने तैमिया फर्मावितात-

'ते शोएब नव्हते जसे की काही चुकीचे मत कायम करणाऱ्यांनी गृहीत धरले आहे, किंबहुना पूर्वकालीन उलमा व ग्रंथ धारक जाणतात की ते शोएब नव्हते'

(मजमुआ फतावा - इब्ने तैमिया खंड २० पृ ४२९)

४) बायबल मध्ये एके ठिकाणी यांचे नाव रगुवेल असे आहे. (निर्गम. २: १८) आणि इतर ठिकाणी इथ्रो (Jethro) (निर्गम: ३ : १) आणि बायबलचा भाष्यकार लिहितो

'He is called Jethro in E-narratives though in each case the name seems to have been inserted later'. (The Interpreter's one Volum Commentery on the Bible. P. 38)

५) हे बुजुर्ग बरेच म्हातारे होते. जर हे हजरत शोएब असते तर त्यांचा हा काळ त्यांच्या जन समूहावर अजाब (ईश शिक्षा) आल्यानंतर काळ असता म्हणून ईमान बाळगणारेही त्यांच्या सोबत असते आणि त्यांच्या उपस्थितीत हजरत शोएब यांच्या मुलींना पाण्यापासून रोखण्याचे धाडस कोणताही गुराखी करू शकला नसता. यास्तव उचित गोष्ट हीच की हे बुजुर्ग शोएब नव्हते तथापि हा एक कयास असू शकतो की ते शोएबचे वंशज असावेत.

५४. त्या म्हाताऱ्या इसमाजवळ चारापाणी करण्यासाठी एखादा माणूस नव्हता. आणि जेव्हा त्यांच्या मुलीने पाहीले की हजरत मूसा एक सामर्थ्यशाली मनुष्य आहेत व या कामासाठी एक सशक्त माणूसच योग्य असू शकतो. तसेच हजरत मूसा आपल्या बोलण्या-चालण्यावरून अतिश्य विश्वस्त मनुष्य वाटले होते आणि घरात एखाद्या विश्वासू माणसालाच ठेवले जाऊ शकते. म्हणून तिने हजरत मूसा यांना या कामासाठी ठेवून घेण्याचा सल्ला आपल्या पित्यास दिला. ज्याचा दुसरा पैलू हा होता की देश सोडलेल्या माणसाला जो सदाचारी ही आहे. सभ्य लोकांच्या घरात आश्रय लाभावा.

मुलीच्या या सल्ल्यावरून असे दिसून येते की ती अतिशय समंजस होती व तिचा सल्लाही अगदी योग्य होता. हे या गोष्टीचे प्रमाण होय की काही स्त्रीया मोठ्या सूज्ञ असतात. व त्यांचा सल्ला देखील मोठा योग्य असतो. म्हणून स्त्रीयांच्या प्रतिष्ठेस घटविणे योग्य नव्हे आणि कुरआन तर उच्च श्रेणीच्या स्त्रीयांचा विशेषत्वाने उल्लेख करते.

५५. मदयनच्या या वृद्ध इसमाने आपल्या मुलीशी निकाह करण्याचे जे आवाहन हजरत मूसा यांना केले होते तर तो काही भावनाशील निर्णय नव्हता, जो त्यांनी घाईघाईत घेतला असावा, किंबहुना त्यानी आपला अनुभव व हजरत मूसा यांच्या तोडून त्यांचा वृत्तांत ऐकल्यानंतर घेतला होता. प्रथम तर हे की एखाद्या पैगंबराचे व्यक्तिमत्व पैगंबर पद लाभण्यापूर्वी ही उच्च नितीमत्तेचे प्रतिबिंब असते व दुसरे असे की मदयन वाल्यांकरीता बनी इस्राईल वंशाचे लोक अनोळखी नव्हते, तर दोघांमध्ये जवळचे नाते होते कारण बायबलच्या निवेदनानुसार हजरत इब्राहीम यांची दासी कतूरा होती व तिच्या पासून जो मुलगा झाला होता तो मिदयान होता ज्यास त्यांनी मदयनच्या इलाक्यात वसविले. व त्याच्याच नावाने हा इलाका ओळखला जाऊ लागला. हजरत शोएब याच्याच वंशाचे होते. आणि शोएब जन-समूहावर जेव्हा अजाब (ईश-शिक्षा) अवतरला तेव्हा हजरत शोएब व त्यांचे ईमानधारक साथीदार या प्रकोपापासून सुरक्षित राहीले व जवळच्या इलाक्यात जाऊन राहू लागले, जो मदयन या नावानेच उल्लेखिला गेला. नवल नव्हे की हे वृद्ध बुजुर्ग हजरत शोएब यांचे वंशज असावेत. म्हणून त्यांना हजरत मूसा यांच्याशी ते बनी इस्राईलशी संबंधित असल्यामुळे लगाव ही जाणवला असावा. काही असो. हे वृद्ध बुजुर्ग एक नेक मुसलमान होते व त्यांची सहानुभूती हजरत मूसा यांच्याशी यासाठी ही होती की ते अत्याचार पिडीत होते व एका गांजलेल्या जनसमूहाचे घटक होते.

त्या बुजुर्ग चारापाणी करण्याकरीता एका पुरुष माणसाची आवश्यकता होती व हजरत मूसा यांना परक्या देशात आश्रयाची. यास्तव त्यांनी मोठ्या उदार मनाने आपल्या मुलीच्या निकाहचा प्रस्ताव ह. मूसा यांच्यासमोर मांडला. यासाठी की त्यांनी कुटुंबाचा एक घटक बनून रहावे. राहीली आठ वर्षापर्यंतची सेवेची शर्त

तर त्यात एक हेतु हा असावा की हजरत मूसा यांनी आपल्या पत्नीस अशा वेळी स्वदेशी परतावे जेव्हा हत्याची घटना जुनी झाल्यामुळे फिरऔनतर्फे त्यांच्याविरूद्ध कसल्याही कारवायीची भिती न रहावी. आणि या सर्वाहून अधिक अल्लाहचा उद्देश हा होता की हजरत मूसा यांनी त्याच वेळी मिस्रचा प्रवास करावा. जी वेळ त्यांना पैगंबर पदाने सम्मानित केले जाण्या करीता योग्य व निर्धारीत होती. आठ वर्षे पावेतो सेवा करण्याची मुदत मेहर म्हणून नव्हती कारण मेहर पत्नीसाठी असतो. तिच्या बापाकरीता नव्हे आणि निकाह साठी अद्याप एका मुलीस निश्चित ही केले गेले नव्हते किंबहुना आपल्या दोन मुलींपैकी एखादी मुलगी निकाह मध्ये देण्याचे त्यांनी सांगितले होते म्हणून हा अक्दे निकाह (लग्न विधी) नव्हता. किंबहुना एक वचन करार होता ज्यात त्यांनी आपल्या मुलींच्या भलाईचा हेतु ही डोळ्यासमोर राखला. आणि हजरत मूसांच्या भलाईचा हेतु देखील आणि हे ही शक्य आहे की ही गोष्ट लक्षात घेता की हजरत मूसा यांच्याजवळ मेहरची रक्कम देण्याकरीता काहीच नाही, मुलींनी आपली ही इच्छा बापाजवळ व्यक्त केली असावी की ते ज्या मुली बरोबर देखील आपला निकाह करून देतील ते आपला मोहर माफ करतील. काही असो, पित्याने जे काही सांगितले प्रमाणयुक्त आहे की त्याने आपल्या मुलींच्या राजी खुशी वरूनच सांगितले असावे.

आवश्यक नव्हे की निकाह कराराची मुदत संपल्यावर केला गेला असावा, परंतु कयासमुक्त गोष्ट अशी की करार झाल्याच्या काही काळानंतर त्या बुजुर्गांनी आपली एक कन्या निश्चित करून तिचा निकाह हजरत मूसा यांच्याशी करविला असेल. यासाठी की त्यांनी कुटुंबातली एक व्यक्ति या नात्याने घरात रहावे व चारापाणी करण्याचे काम ही आपल्या करारानुसार करीत रहावे.

## मद्यन व तूर पर्वत



२८. मूसा म्हणाला, ही गोष्ट माझ्या व तुमच्या दरम्यान ठरली गेली. या दोघांपैकी जी मुदत देखील मी पूर्ण करीन, माझ्यावर कसलीही बळजबरी होणार नाही.[५६] आणि जो वचन करार आम्ही करीत आहोत त्यावर अल्लाह निरीक्षक आहे.[५७]

قَالَ ذٰلِكَ بَيْنِيْ وَبَيْنَكَ ؕ اَيَّمَا الْاَجَلَيْنِ قَضَيْتُ فَلَا عُدْوَانَ
عَلَيَّ ؕ وَاللّٰهُ عَلٰى مَا نَقُوْلُ وَكِيْلٌ ﴿۲۸﴾

२९. जेव्हा मूसाने मुदत पूर्ण केली [५८] व आपल्या कुटुंबियांना घेऊन निघाला [५९] तेव्हा तूर कडून [६०] एक आग दिसून आली. तो आपल्या कुटुंबियांस म्हणाला, थांबा.[६१] मला आग दिसली आहे. कदाचित मी तेथून एखादी खबर आणावी [६२] किंवा एखादा विस्तव आणावा ज्यायोगे तुम्ही शेकावे.[६३]

فَلَمَّا قَضٰى مُوْسَى الْاَجَلَ وَسَارَ بِاَهْلِهٖۤ اٰنَسَ مِنْ جَانِبِ
الطُّوْرِ نَارًا ۚ قَالَ لِاَهْلِهِ امْكُثُوْۤا اِنِّيْۤ اٰنَسْتُ نَارًا لَّعَلِّيْۤ اٰتِيْكُمْ
مِّنْهَا بِخَبَرٍ اَوْ جَذْوَةٍ مِّنَ النَّارِ لَعَلَّكُمْ تَصْطَلُوْنَ ﴿۲۹﴾

३०. जेव्हा तो तिच्या जवळ पोहचला तेव्हा शुभ मैदानात खोऱ्याच्या उजवीकडील झाडामधून निदा (साद) आली, हे मूसा ! मी अल्लाह आहे सर्व विश्वांचा पालनकर्ता.[६४]

فَلَمَّاۤ اَتٰىهَا نُوْدِيَ مِنْ شَاطِئِ الْوَادِ الْاَيْمَنِ فِي الْبُقْعَةِ
الْمُبٰرَكَةِ مِنَ الشَّجَرَةِ اَنْ يّٰمُوْسٰۤى اِنِّيْۤ اَنَا اللّٰهُ رَبُّ الْعٰلَمِيْنَ ﴿۳۰﴾

३१. आणि हे की तुम्ही आपली काठी खाली टाका. जेव्हा त्याने पाहीले की ती सापा सारखी हालचाल करीत आहे [६५] तेव्हा पाठ फिरवून पळाला व मागे वळूनही पाहीले नाही.[६६] हे मूसा ! पुढे या, आणि भिऊ नका. तुम्ही अगदी सुरक्षित आहात.[६७]

وَاَنْ اَلْقِ عَصَاكَ ؕ فَلَمَّا رَاٰهَا تَهْتَزُّ كَاَنَّهَا جَآنٌّ وَّلّٰى
مُدْبِرًا وَّلَمْ يُعَقِّبْ ؕ يٰمُوْسٰۤى اَقْبِلْ وَلَا تَخَفْ ۟
اِنَّكَ مِنَ الْاٰمِنِيْنَ ﴿۳۱﴾

३२. आपला हात आपल्या गळपट्टीत घाला. तो तेजस्वी होऊन बाहेर पडेल. कसल्याही व्यंगाशिवाय. [६८] आणि भिती घालविण्या करीता बाजू संकुचित करा. [६९] या तुमच्या पालनकर्त्यातर्फे दोन निशाण्या आहेत.[७०] फिरऔन व त्याच्या दरबारी लोकांसमोर मांडण्याकरीता ते मोठे दुराचारी लोक आहेत.

اُسْلُكْ يَدَكَ فِيْ جَيْبِكَ تَخْرُجْ بَيْضَآءَ مِنْ غَيْرِ سُوْٓءٍ ۟
وَّاضْمُمْ اِلَيْكَ جَنَاحَكَ مِنَ الرَّهْبِ فَذٰنِكَ بُرْهَانٰنِ مِنْ رَّبِّكَ
اِلٰى فِرْعَوْنَ وَمَلَا۟ئِهٖ ؕ اِنَّهُمْ كَانُوْا قَوْمًا فٰسِقِيْنَ ﴿۳۲﴾

३३. त्याने विनाविले, हे माझ्या पालनकर्त्या ! मी त्यांच्या एका माणसाची हत्त्या केली होती म्हणून मला भय वाटते की ते माझा वध करतील.[७१]

قَالَ رَبِّ اِنِّيْ قَتَلْتُ مِنْهُمْ نَفْسًا فَاَخَافُ اَنْ يَّقْتُلُوْنِ ﴿۳۳﴾

५६. म्हणजे जर मी आठ वर्षाची मुदत पूर्ण करून आपल्या पत्नीस घेऊन जाऊ इच्छिले तर मला आडकाठी करू नका आणि जर मी दहा वर्षाची मुदत पूर्ण करण्याचे ठरविले तर यात ही काही अडथळा नको.

५७. यावरून असे दिसून येते की हा करार किती मन:पूर्वक केला गेला होता व जो करार चांगल्या व्यवहारासह व अल्लाहला साक्षी ठरवून केला गेला असावा तो मांगल्यकारक असण्यात शंका कसली?

५८. हजरत मूसा यांनी आठ वर्षे व दहा वर्षे या पैकी कोणती मुदत पूर्ण केली याविषयी कुरआनने कसलेही स्पष्टीकरण दिलेले नाही आणि बायबलमध्ये मुदती संबंधीच्या कराराचा उल्लेखच नाही. राहीलीत हदीस-कथने तर बुखारी या हदीस-संग्रहात हजरत इब्ने अब्बास उल्लेखितात की त्यांनी फर्माविले, हजरत मूसा यांनी त्या मुदतीस पूर्ण केले जी दोन मुदतींमध्ये अधिक दीर्घ व चांगली होती. परंतु इतर कथनांमध्ये अशीच गोष्ट निवेदिली गेली आहे म्हणजे पैगंबर वचन या नात्याने, पण त्याच्या सनदी विश्वास ठेवण्याच्या दुष्टीने उचित नाहीत. (विवरणासाठी पहा. तफसीर इब्ने कसीर खंड २. पृ. ३८६)

५९. म्हणजे मदयनहून आपल्या बायकामुलांना घेऊन मिस्रकडे जात होते यासाठी की आपल्या आप्त स्वकीयांसह रहावे.

६०. मदयन पासून काही अंतरावर तूर पर्वत आहेत जो बेटसदृश्य सीना मध्ये आहे. आणि मदयनहून मिस्र जातांना मार्गात येतो.

६१. कुटुंबियांकरीता 'उमकुसू' हे अनेकवचन वापरले गेले आहे. ज्यावरून असे दिसून येते की हजरत मूसा यांच्या सोबत एकटी त्यांची पत्नीच नव्हती तर त्यांची मुलेबाळेही होती व यावरून हे दिसते की हजरत मूसा यांचा निकाह ठराविक मुदती पूर्वीच झाला होता. आणि ते आपल्या सासऱ्याकडे जावई या नात्याने चारापाणी वगैरे ची सेवा पार पाडीत होते व या कालावधीतच त्यांना मुलेबाळे झाली. व मुदत पूर्ण झाल्यानंतर जेव्हा ते मदयनहून निघाले तेव्हा त्यांच्या सोबत पत्नीखेरीज अपत्येही होती.

६२. म्हणजे मार्गाचा शोध घ्या कारण अंधाऱ्या रात्रीत मार्ग कळून येत नव्हता.

६३. रात्र थंडीची होती म्हणून हजरत मूसा यांनी विस्तव आणू इच्छिला यासाठी की त्यांच्या कुटुंबियांना शेक घेता यावा.

६४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. १० व ११ आणि सूरह नमल टीप क्र. ९

६५. मूळ ग्रंथात 'जान्न' हा शब्द प्रयोग केला गेला आहे जो अरबी भाषेत अशा सापासाठी वापरला जातो ज्याची हालचाल गतीपूर्ण असावी. दुसऱ्या जागी कुरआनने 'सुअबान' अजगर हा शब्दही वापरला आहे व 'हय्यह' म्हणजे साप हा शब्ददेखील एकाच गोष्टीचे विभिन्न आशय होत म्हणजे हजरत मूसा यांची काठी चमत्कारीकपणे असा साप बनत असे जो पाहण्यात मोठा अजगर दिसून येई, हालचालीत वेगाने धावणाऱ्या सापासारखा.

६६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नमल टीप क्र. १०

६७. म्हणजे हा सर्प तुम्हाला काहीच नुकसान पोहचवू शकणार नाही.

६८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. २३

६९. हजरत मूसा यांच्या करीता या सर्व गोष्टी अनपेक्षित होत्या. विशेष:एका निर्मनुष्य परिसरात रात्रीच्या वेळी काठीचे सापात रूपांतर होणे स्वभाविकत:त्यांना भयभीत करणारी बाब होती. त्या भयाला दूर सारण्याची उपाय योजना अल्लाहने ही सांगितली की आपले बाजू संकुचित करून घ्या. सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे ही त्यांची आसमान्य मदत होती.

७०. म्हणजे हे दोन चमत्कार होत जे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की तुम्हाला अल्लाहतर्फे रसूल (पैगंबर) बनवून पाठविले गेले आहे.

७१. म्हणजे जेव्हा मी फिरऔन समोर आवाहन नेईन तेव्हा या गोष्टीचे भय वाटते की तो माझ्या विरुद्ध हत्योच्या जुन्या घटनेपायी कारवायी करील मग आवाहनाचे कार्यच पार पाडू शकणार नाही. हजरत मूसा मिस्र जात असले तरी हत्याची घटनेला बराच काळ लोटला होता. म्हणून ही गोष्ट बाह्या: शक्य नव्हती की फिरऔनने त्याला शिक्षा दिली असती. परंतु ही भिती त्यांना आता यामुळे जाणवली की एक पैगंबर या नात्याने त्यांच्याजवळ जायचे होते. हजरत मूसा यांनी हे जे काही विनविले त्याचा हा अर्थ नव्हता की ते पैगंबर पदाची जबाबदारी स्विकारण्यापासून माफी मागत होते. किंबहुना ते या मार्गातील अडथळ्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह समोर सादर करीत होते. यासाठी की अल्लाहने ते दूर सारावेत व त्यांची मदत करावी.

३४. माझा भाऊ हारुन बोलण्यात माझ्यापेक्षाही अधिक वक्तृत्वपूर्ण आहे तर त्याला माझा सहाय्यक बनवून पाठव, यासाठी की त्याने माझे सत्य-समर्थन करावे.[७२] मला हे भय वाटते की ते लोक मला खोटे ठरवतील.

وَأَخِي هَارُونُ هُوَ أَفْصَحُ مِنِّي لِسَانًا فَأَرْسِلْهُ مَعِيَ رِدْءًا
يُصَدِّقُنِي ۖ إِنِّي أَخَافُ أَن يُكَذِّبُونِ ﴿٣٤﴾

३५. फर्माविले, आम्ही तुमच्या बंधद्वारे तुमची बाजू मजबूत करू, आणि तुम्हाला दोघांना असे जबरदस्त प्रमाण प्रदान करू की ते तुमच्यावर हात टाकू शकणार नाहीत.[७३] आमच्या निशाण्यांसह (जा.) तुम्ही दोघे व जे तुमचे अनुसरण करतील, वर्चस्वशाली राहतील.[७४]

قَالَ سَنَشُدُّ عَضُدَكَ بِأَخِيكَ وَنَجْعَلُ لَكُمَا
سُلْطَانًا فَلَا يَصِلُونَ إِلَيْكُمَا ۚ بِآيَاتِنَا ۚ أَنتُمَا وَمَنِ
اتَّبَعَكُمَا الْغَالِبُونَ ﴿٣٥﴾

३६. मग जेव्हा मूसा त्यांच्याजवळ आमच्या स्पष्ट निशाण्या घेऊन पोहोचला तेव्हा ते म्हणाले,ही तर केवळ बनावटी जादू होय आणि ही गोष्ट आम्ही आपल्या पूर्वजांकडून कधीही ऐकली नाही. [७५]

فَلَمَّا جَاءَهُم مُّوسَىٰ بِآيَاتِنَا بَيِّنَاتٍ قَالُوا مَا هَٰذَا إِلَّا سِحْرٌ
مُّفْتَرًى وَمَا سَمِعْنَا بِهَٰذَا فِي آبَائِنَا الْأَوَّلِينَ ﴿٣٦﴾

३७. मूसा म्हणाला, माझा पालनकर्ता त्या माणसाला चांगल्या प्रकारे जाणतो जो त्याच्यातर्फे मार्गदर्शन घेऊन आला आहे, आणि ज्याच्या करीता आखिरतची उत्कृष्ट परिणती आहे. निःसंशय अत्याचारी कधीही यश प्राप्त करू शकणार नाहीत. [७६]

وَقَالَ مُوسَىٰ رَبِّي أَعْلَمُ بِمَن جَاءَ بِالْهُدَىٰ مِنْ عِندِهِ
وَمَن تَكُونُ لَهُ عَاقِبَةُ الدَّارِ ۖ إِنَّهُ لَا يُفْلِحُ الظَّالِمُونَ ﴿٣٧﴾

३८. फिरऔन म्हणाला, हे दरबारी लोकांनो ! मी तर आपल्या खेरीज तुमच्याकरीता कोणत्याही ईश्वरास जाणत नाही.[७७] हे हामान ![७८]तुम्ही माती (विटा) भाजून माझ्यासाठी एक उंच महाल उभारा, यासाठी की मी मूसाच्या ईश्वरास डोकावून पहावे.[७९] मी तर याला खोटारडा समजतो.

وَقَالَ فِرْعَوْنُ يَا أَيُّهَا الْمَلَأُ مَا عَلِمْتُ لَكُم مِّنْ إِلَٰهٍ غَيْرِي
فَأَوْقِدْ لِي يَا هَامَانُ عَلَى الطِّينِ فَاجْعَل لِّي صَرْحًا
لَّعَلِّي أَطَّلِعُ إِلَىٰ إِلَٰهِ مُوسَىٰ وَإِنِّي لَأَظُنُّهُ
مِنَ الْكَاذِبِينَ ﴿٣٨﴾

३९. त्याने व त्याच्या सैन्यांनी जमीनीवर नाहक घमेंड केली [८०]आणि असे समजले की त्यांना आमच्याकडे परतावयाचे नाही.[८१]

وَاسْتَكْبَرَ هُوَ وَجُنُودُهُ فِي الْأَرْضِ بِغَيْرِ الْحَقِّ وَظَنُّوا
أَنَّهُمْ إِلَيْنَا لَا يُرْجَعُونَ ﴿٣٩﴾

७२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह ताहा टीप क्र. ३०.

७३. म्हणजे तुमचा रोब व दबदबा त्यांच्यावर असा पडेल की ते तुम्हाला कसलेही नुकसान पोहचवू शकणार नाहीत.

७४. वर्चस्वशाली प्रमाणाच्या दृष्टीनेही व परीणामाच्या दृष्टीनेही यास्तव जादूगारांसोबतच्या मुकाबल्यातही हजरत मूसा यांना विजय प्राप्त झाला. जो प्रयत्नही त्यांच्या विरुद्ध केला त्यांच्यावरच उलटला व शेवटी तोच आपुल्या सेनेसह समुद्राच्या अथांग पाण्यात बुडून मेला.

७५. अर्थात हे की अल्लाह मार्गदर्शन साठी रसूल (पैगंबर) पाठवितो फिरऔन वाल्यांचे हे कथन की आम्ही प्रेषितत्वासंबंधी कोणतीही गोष्ट आपल्या वाडवडीलांच्या तोंडून ऐकलीच नाही, नितांत असत्य होते. कारण काही शतकांपूर्वी हजरत युसूफ सारखे पैगंबर त्यांच्यात होऊन गेले आणि त्यांना मिस्र देशाचे अधिपत्यही लाभले होते तसेच बनी ईस्राईलचे अस्तित्व या गोष्टीचा जिवंत पुरावा होता की हा जन-समूह प्रेषित्व-क्रमास मानणारा होता. तेव्हा फिरऔनचा जनसमूह पैगंबर पदाच्या कल्पनेशी अगदीच अपरिचित कसा असू शकत होता.

७६. हजरत मूसा यांनी हे कथन त्यांच्या हटवादीपणाच्या उत्तरादाखल केले. म्हणजे जर तुम्ही एखादी गोष्ट समजून घेण्याची इच्छाच बाळगत नाही तर मग परिणामांची प्रतिक्षा करा की कोणाची परिणती अधिक चांगली होते व कोणाच्या वाट्याला अपयश व वंचितता येते.

७७. फिरऔनच्या या दाव्याने हे जाहीर होते की तो ईश्वराचा इन्कार करणारा होता आणि आपण ईश्वर असण्याचा उद्देश,त्याच्या मते एखादी उच्चतम हस्ती अशी नव्हती की जिची आराधना आवश्यक व आज्ञापालन अनिवार्य असावे. तो मिस्र देशाचा शासक असल्यामुळे स्वात:ला उपास्यही समजत होता व या गोष्टीसही पात्र की त्याचे कां कूं न करता आज्ञापालन केले जावे.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह अअराफ टीप क्र. १८०, सूरह शोअरा टीप क्र. २७ व सूरह नाजिआत टीप क्र. १८)

स्पष्ट असावे की पैगंबरांना काफीर व मुश्रिक (अनेकेश्वरवादी) शासकांशी संबंध आला आहे, जे अल्लाहच्या विधि-नियमांऐवजी आपले विधि नियम चालवित, परंतु कुरआनने फिरऔन खेरीज कोणाच्याही बाबतीत हे म्हटले नाही की तो आपल्या स्वत:विषयी उच्चतम व रब्ब (स्वामी) असण्याचा दावेदार होता. उदाहरणार्थ सबा देशाची राणी अनेकेश्वरवादी होती व आपला आदेश व कायदा चालवत होती. हजरत सुलेमान यांनी तिच्या अनेकेश्वरवादी शासनास नष्ट करण्यासाठी तिला चेतावणी दिली होती परंतु असे कोठेच म्हटले गेले नाही की ती आपण ईश्वर असल्याचा किंवा सर्वश्रेष्ठ ईश्वर असण्याचा दावा करणारी होती. हजरत ईसा (येशू) यांचाही कैसरच्या शासनाशी संबंध आला होता. जे आपले स्वरचित विधिनियम चालवित. परंतु त्यांच्या संबंधानेही या दाव्याचा निर्देश केला गेला नाही की जो फिरऔन ने स्वत:विषयी केला होता. तद्वतच मक्का येथे कुरेशी लोकांची सत्ता होती व तेही अनेकेश्वरवादीच होते आणि आपल्या कुफ्र व विद्रोहाच्या दृष्टिने फिरऔनच्याच पावलावर पाऊल ठेऊन चालत होते. पण त्यांच्याविषयी ही कुरआनने असे सांगितले नाही की ते आपण ईश्वर असल्याचा किंवा उच्चतम रब्ब (स्वामी) असल्याचा दावा करीत होते. यावरून हे जाहीर होते की फिरऔनचा अपराध त्या समस्त राज्यकर्त्यांच्या व सत्ताधीशांच्या अपराधाहून कितीतरी पटीने मोठा होता. आणि ते आपल्या दाव्यात अगदी अद्वितीय होता.

७८. स्पष्टीकरणा करीता पहा टीप क्र. ११

७९. फिरऔनने खरोखर हा आदेश हामानला दिला नव्हता, किंबहुना हे त्याने हजरत मूसा यांच्या त्या प्रमाणाची थट्टा उडविण्या करीता म्हटले की अल्लाह जमीन व आकाशांचा स्वामी आणि पालनकर्ता आहे. फिरऔनचे उत्तर हे होते की जमीनीवर तर तुमचा ईश्वर कोठे दिसून येत नाही, राहीले आकाश तर आता मी उंच महाल बनवितो, यासाठी की त्यावर चढून बघावे की ईश्वर आकाशात कोठे लपून बसला आहे. फिरऔनचे हे उत्तर अगदीच मूर्खपणाचे होते, म्हणून त्याचे प्रत्युत्तर देण्याची हजरत मूसा यांना गरजच वाटली नाही. ईश्वरासंबंधी फिरऔनच्या या वाह्यात गोष्टी त्याच्या निकृष्ट विचारसरणीचा व तो आढ्यताखोर असल्याचा स्पष्ट पुरावा देतात.

८०. म्हणजे फिरऔनला हा अधिकार नव्हता की त्याने स्वत:ला दास्यत्वाच्या स्थानाहून उच्चतम समजून घ्यावे. जर एखादा मनुष्य स्वत:ला ईश्वराच्या दास्यत्वाहून अधिक उच्च समजतो. तर ही घमेंड होय, ज्याकरीता कोणतेही दोषनिराकरण वा समर्थन (Justification) नाही.

८१. म्हणजे ना ईश्वासमोर हजर व्हाचे आहे आणि ना आपल्या आचरणाचा जाब द्यावयाचा आहे व ना त्याचा मोबदला प्राप्त करावयाचा आहे.

४०. तेव्हा आम्ही त्याला व त्याच्या सैन्यांना पकडले व त्या सर्वांना समुद्रात फेकून दिले [८२] तर पहा, अत्याचारींची काय परिणती झाली !

فَاَخَذْنٰهُ وَجُنُوْدَهٗ فَنَبَذْنٰهُمْ فِى الْيَمِّ ۚ فَانْظُرْ كَيْفَ
كَانَ عَاقِبَةُ الظّٰلِمِيْنَ ۝٤٠

४१. आम्ही त्यांना जहन्नमकडे आमंत्रित करणारे पेशावा बनविले. [८३] आणि कियामतचेया दिवशी त्यांना कसलीही मदत केली जाणार नाही.[८४]

وَجَعَلْنٰهُمْ اَئِمَّةً يَّدْعُوْنَ اِلَى النَّارِ ۚ وَيَوْمَ الْقِيٰمَةِ
لَا يُنْصَرُوْنَ ۝٤١

४२. आम्ही या जगात त्यांच्या मागे निर्भत्सना (लअनत) लावली. [८५] आणि कियामतीच्या दिवशी ते फार वाईट स्थितीत असतील.

وَاَتْبَعْنٰهُمْ فِىْ هٰذِهِ الدُّنْيَا لَعْنَةً ۚ وَيَوْمَ الْقِيٰمَةِ هُمْ
ع
مِّنَ الْمَقْبُوْحِيْنَ ۝٤٢

४३. आम्ही पूर्वीच्या जन समूहांना नष्ट केल्यानंतर मूसाला ग्रंथ प्रदान केला, जो लोकांकरीता अंतर्दृष्टि, मार्गदर्शन व कृपेची सामुग्री होती. यासाठी की त्यांनी बोध ग्रहण करावा.[८६]

وَلَقَدْ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ مِنْۢ بَعْدِ مَاۤ اَهْلَكْنَا
الْقُرُوْنَ الْاُوْلٰى بَصَآئِرَ لِلنَّاسِ وَهُدًى
وَّرَحْمَةً لَّعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ ۝٤٣

४४. आणि तुम्ही (हे पैगंबर !) त्या वेळी (तूर पर्वताच्या) पश्चिमेकडे हजर नव्हता, जेव्हा आम्ही मूसा करीता फर्मान सादर केले,आणि ना तुम्ही त्याच्या साक्षींपैकी होता.[८७]

وَمَا كُنْتَ بِجَانِبِ الْغَرْبِىِّ اِذْ قَضَيْنَاۤ اِلٰى مُوْسَى الْاَمْرَ وَمَا
كُنْتَ مِنَ الشّٰهِدِيْنَ ۝٤٤

४५. परंतु आम्ही अनेक वंशावळी उभारल्या आणि त्यांच्यावर एक दीर्घकाळ लोटला.[८८] आणि तुम्ही मदयन वासींच्या दरम्यान ही हजर नव्हता की आमच्या आयती यांना ऐकवित आहात.परंतु आम्ही तुम्हाला रसूल (पैगंबर) बनविणारच होतो. [८९]

وَلٰكِنَّاۤ اَنْشَاْنَا قُرُوْنًا فَتَطَاوَلَ عَلَيْهِمُ الْعُمُرُ ۚ وَمَا كُنْتَ ثَاوِيًا
فِىْۤ اَهْلِ مَدْيَنَ تَتْلُوْا عَلَيْهِمْ اٰيٰتِنَا ۙ
وَلٰكِنَّا كُنَّا مُرْسِلِيْنَ ۝٤٥

४६. आणि ना तुम्ही तूर पर्वताकडे हजर होते, जेव्हा आम्ही (मूसाला) पुकारले होते [९०] परंतु ही (वह्य) तुमच्या पालन कर्त्याची कृपा होय. अशासाठी की तुम्ही एका अशा जनसमूहास खबरदार करावे, ज्यास तुमच्या पूर्वी कोणी खबरदार करणारा आला नाही.[९१] या साठी की त्यांनी स्मरणिका प्राप्त करावी.

وَمَا كُنْتَ بِجَانِبِ الطُّوْرِ اِذْ نَادَيْنَا وَلٰكِنْ رَّحْمَةً مِّنْ
رَّبِّكَ لِتُنْذِرَ قَوْمًا مَّاۤ اَتٰىهُمْ مِّنْ نَّذِيْرٍ مِّنْ قَبْلِكَ
لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ ۝٤٦

८२. फिरऔन व त्याच्या लष्कराची समुद्रात बुडून मरण्याची घटना सूरह युनूस व सूरह शोअरा मध्ये तपशीलवार निवेदिली गेली आहे.

८३. म्हणजे जो कोणी फिरऔन व त्याच्या समर्थकांच्या मार्गाचे अनुसरण करतील ते कियामतीच्या दिवशी यांच्याच नेतृत्वाखाली जहन्नमकडे आगेकूच करतील.

८४. म्हणजे कियामतीच्या दिवशी ना मार्गभ्रष्ट नेते आपल्या मार्गभ्रष्ट अनुयायींना कसलीही मदत करू शकतील आणि ना हे मार्गभ्रष्ट अनुयायी आपल्या नेत्यांच्या काही कामी येतील. यांच्यापैकी प्रत्येक जण असहाय व अगतिक असेल.

ही फार मोठी ताकीद आहे नेत्यांकरीताही व लोकांकरीताही प्रत्येक माणसाने विचार करावा की तो कोणत्या मार्गाने जात आहे व कोणाचे अनुसरण करीत आहे.

८५. जग फिरऔन व त्याच्या साथीदारांवर निर्भत्सनेचाच वर्षाव करीत आहे. मुसलमान, ख्रिश्चन व यहूद सर्वच त्यांचा धिक्कार करतात. आणि सर्व जग फिरऔनला एक जुलमी शासक या नात्यानेच ओळखते.

८६. म्हणजे पूर्वी होऊन गेलेल्या बंडखोर जन समूहांचा नाश करून पुढील वंशांकरीता बोध ग्रहण करण्याची सामुग्री /उपाय योजना केली. त्यांच्या मार्गदर्शनाकरीता हजरत मूसा यांना ग्रंथ (तौरात) प्रदान केला या आयती द्वारे काही महत्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश पडतो-

एक हे की मार्गदर्शनाकरीता पहिला तपशीलवार ग्रंथ तौरात होता जो हजरत मूसा यांच्यावर अवतरीत झाला. या पूर्वी पैगंबरांद्वारे ग्रंथेतर स्वरुपात मार्गदर्शनाची सोय होत राहीली जसे हजरत नूह, हजरत हूद, हजरत स्वालेह यांच्या द्वारे अथवा मग लहान लाहन पुस्तके अवतरीत केले गेले यास्तव हजरत इब्राहीम यांना सहीफा (पोथी सारखे पुस्तक) प्रदान केले. (सूरह अअला : १९) स्पष्ट व्हावे की तौरात ज्याअर्थी अनेक भागांवर आधारीत होती म्हणून त्याला देखील सहीफांच्या अर्थाने घेतले गेले आहे अन्यथा एक संग्रह या नात्याने तो एक विवरणात्मक ग्रंथ होता. तौरात पूर्वी तपशीलवार ग्रंथ अवतरीत न केले जाण्याचे कारण असे दिसून येते की त्या काळात लिहिण्यावाचण्याची प्रता सार्वत्रिक झाली नव्हती, म्हणून अल्लाहच्या मार्गदर्शनाचे खरे माध्यम पैगंबरांची कथने होती.

दुसरे असे की जेव्हा हजरत मूसा यांच्या पूर्वी कोणता ही ईश-ग्रंथ अवतरला नव्हता. तेव्हा अनेकेश्वरवादी धर्मांचे अनुयायी, मनस्मृती, वेद-वगैरे आपल्या धर्म-ग्रंथाबाबत ते ईश-ग्रंथ असण्याचा जो दावा करतात, तो अगदी निराधार आहे. वस्तुत: हे ग्रंथ स्वत: या गोष्टीचा दावा करीत नाही. की त्यांना अवतरीत करणारा सर्वश्रेष्ठ ईश्वर (Supereme Being)आहे.

तिसरे हे की तौरात केवळ बनी इस्राईल करीता नव्हे, किंबहुना सर्व माणसांकरीता मार्गदर्शनप्रद ग्रंथ होता, कारण आयतीत هدىً وَّرَحْمَةً لِّلنَّاسِ 'लोकांकरीता मार्गदर्शन व कृपा' असे फर्माविले गेले आहे. यास्तव बनी इस्राईलचे पैगंबर इतर जनसमूहांना ही इस्लाम स्विकृतिचे निमंत्रण देत राहीले, ज्याचे उदाहरण हजरत सुलेमान यांचे सबा देशाच्या राणीस आवाहन करणे होय. याच कारणास्तव बनी इस्राईल (वंशा) ला संपूर्ण जगात धार्मिक नेतृत्वाचे स्थान लाभले. आणि हेच ते श्रेष्ठत्व होय की ज्यामुळे हा जन समूह इतर जन-समूहांपेक्षा विशेष राहीला.

८७. पश्चिमेकडून शी अभिप्रेत तूर पर्वताचा पश्चिमेकडील भाग होय. जेथे हजरत मूसा यांना तौरात हा ईश- प्रदान केला गेला. मूसा यांच्या करीता फर्मान सादर करण्याशी अभिप्रेत तौरात होय. व त्याच्या साक्षींशी अभिप्रेत बनी इस्राईल होत, ज्यांना शरीअत प्रदान करतांना त्यावर पालन करण्याचे वचन घेतले गेले.

आयतीचा अर्थ असा की ज्या वेळी हजरत मूसा यांना तूर पर्वताच्या पश्चिमेकडील भागात तौरात ग्रंथ प्रदान केला गेला त्यावेळी हे पैगंबर तुम्ही त्या ठिकाणी उपस्थित नव्हते आणि त्या घटनांचे प्रत्यक्ष दर्शी साक्षी आहात ज्या तूर पर्वताच्या पायथ्याशी बनी इस्राईल समोर उद्भवल्या मग कुरआन द्वारे तुमचे हजरत मूसा यांच्या वृत्तांतास निकोपतेने व सत्यतेने व इतर आवश्यक त्या सर्व विवरणासह सादर करणे. जेव्हा की ग्रंथ धारकांजवळ तौरातचा जो भाग अस्तित्वात आहे तो ही त्यांच्या फेरबदलामुळे निकृष्ट अवस्थेत आहे, कुरआन हा अल्लाहचा संदेश असण्याचे व तुम्ही पैगंबर असण्याचे स्पष्ट प्रमाण होय.

८८. म्हणजे हजरत मूसा यांच्यानंतर बरीच युगे लोटली परंतु हे पैगंबर, तुम्ही या कुरआन द्वारे हजरत मूसा यांच्या वृत्तांतास अशा प्रकारे सादर करीत आहात की जणू त्या स्र्व घटना तुमच्या उपस्थितीत घडल्या. आणि हे या गोष्टीचे उघड प्रमाण होय की ही अल्लाहची वाणी होय.

८९. म्हणजे हे पैगंबर !मदयनची जी घटना तुम्ही निवेदिली (जी या सूरहंच्या आयत क्र. २३ ते २८ पर्यंत निवेदिली गेली आहे) ती एवढ्या विवरणासह व निकोपतेने इतर कोणत्या ही ग्रंथात निवेदिली गेली नाही. परंतु तुम्ही त्यास अशाप्रकारे सादर केले आहे की जणू सर्व काही तुमच्या डोळ्यांदेखत घडले आणि ही गोष्ट तुमच्या पैगंबरीय सत्यतेला उज्वल करते. भूतकाळात दडलेल्या इतिहासाच्या त्या पृष्ठांना

तुम्ही कुरआनतील आयतींद्वारे मक्कावाशी समोर तुम्ही अशाकरीता मांडत आहात की आम्ही तुम्हाला रसूल (पैगंबर) बनवून पाठविले आहे अन्यथा यास जाणून घेण्याचे कोणतेही माध्यम तुमच्याजवळ नव्हते.

९०. संकेत त्या घटनेकडे आहे जेव्हा तूर पर्वताकडे वादी ऐमन (तूवा खोऱ्या) मध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मूसा यांना पुकारले व त्यांना प्रेषित्व पदाने सम्मानित केले. जसे या सूरहच्या आयत क्र. ३० मध्ये निवेदिले गेले आहे.

९१. बनी इस्माईल म्हणजे अरब लोकांमध्ये हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांच्या नंतर कोणताही पैगंबर आला नाही. या दोन्ही पैगंबरांनी जी शिकवण जी पदचिन्हे जी शरीअत व जे धार्मिक अवशेष आपल्या मागे सोडले होते तिच या जन समूहाकरीता धार्मिक पूंजी होती. मात्र हजरत मूसा यांच्यावर अवतरीत झालेला तौरात ग्रंथ बनी इस्राईलच्या माध्यमान्वये यांच्याकरीताही आत्मशुद्धीचे साधन बनले. परंतु ज्याअर्थी एका दीर्घ काळापासून या जन-समूहात एकही पैगंबर आला नव्हता व तो गफलतीचे पांघरूण घेऊन झोपला होता, म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहची रहमत (कृपा) उंचबळू लागली व त्याने आपल्या अंतिम पैगंबरास (अर्थात हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना) या जनसमूहाकडे पाठवून त्यास जागृत करण्याची व अल्लाहच्या कृपेस पात्र होण्याची उपाय योजना केली.

**आणि कदाचित असे न व्हावे की ते आपल्या दुष्कर्मांमुळे संकटग्रस्त व्हावेत, तर सांगा, हे आमच्या पालन कर्त्या ! तू का नाही आमच्याकडे एखादा पैगंबर पाठविला की ज्यायोगे आम्ही तुझ्या आयतींचे अनुसरण केले असते व ईमान बाळगणाऱ्यांपैकी झालो असतो.(अल-क़ुर्आन)**

४७. आणि कदाचित असे न व्हावे की ते आपल्या दुष्कर्मांमुळे संकटग्रस्त व्हावेत, तर सांगा, हे आमच्या पालन कर्त्या ! तू का नाही आमच्याकडे एखादा पैगंबर पाठविला की ज्यायोगे आम्ही तुझ्या आयतींचे अनुसरण केले असते व ईमान बाळगणाऱ्यांपैकी झालो असतो.[९२]

وَلَوْلَآ اَنْ تُصِيْبَهُمْ مُّصِيْبَةٌ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْهِمْ
فَيَقُوْلُوْا رَبَّنَا لَوْلَآ اَرْسَلْتَ اِلَيْنَا رَسُوْلًا فَنَتَّبِعَ اٰيٰتِكَ
وَنَكُوْنَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ ﴿٤٧﴾

४८. परंतु जेव्हा आमच्या तर्फे सत्य त्यांच्याजवळ आले, तेव्हा म्हणू लागले, का नाही दिली गेली याला तशी वस्तू जशी मूसाला दिली गेली होती [९३] काय या लोकांनी त्या वस्तूचा इन्कार नाही केला जी यापूर्वी मूसाला दिली गेली होती?[९४] तो म्हणाले हे दोघे जादूगार आहेत जे एक दुसऱ्याची मदत करीत आहेत [९५] आणि आम्ही सर्वांचे इन्कारी आहोत.

فَلَمَّا جَآءَهُمُ الْحَقُّ مِنْ عِنْدِنَا قَالُوْا لَوْلَآ اُوْتِيَ
مِثْلَ مَآ اُوْتِيَ مُوْسٰى ؕ اَوَلَمْ يَكْفُرُوْا بِمَآ اُوْتِيَ مُوْسٰى
مِنْ قَبْلُ ۚ قَالُوْا سِحْرٰنِ تَظٰهَرَا ۟ وَقَالُوْٓا
اِنَّا بِكُلٍّ كٰفِرُوْنَ ﴿٤٨﴾

४९. त्यांना सांगा, जर तुम्ही सच्चे असाल तर आणा अल्लाह कडून असा एखादा ग्रंथ जो या दोघांहून अधिक मार्गदर्शन प्रदान करणारा असावा. मी त्याचे अनुसरण करीन.[९६]

قُلْ فَاْتُوْا بِكِتٰبٍ مِّنْ عِنْدِ اللّٰهِ هُوَ اَهْدٰى مِنْهُمَآ اَتَّبِعْهُ
اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿٤٩﴾

५०. जर ते तुमची ही मागणी पूर्ण करीत नाही, तर जाणून घ्या की हे आपल्या इच्छा आकांक्षांचे अनुयायी आहेत.[९७] आणि त्या माणसापेक्षा अधिक कोण मार्गभ्रष्ट असेल, जो अल्लाहचे मार्गदर्शन सोडून आपल्या इच्छा-आकांक्षांचे अनुसरण करील?[९८] अल्लाह अशा अत्याचारी लोकांना कदापि मार्ग दाखवित नाही.[९९]

فَاِنْ لَّمْ يَسْتَجِيْبُوْا لَكَ فَاعْلَمْ اَنَّمَا يَتَّبِعُوْنَ اَهْوَآءَهُمْ ؕ
وَمَنْ اَضَلُّ مِمَّنِ اتَّبَعَ هَوٰىهُ بِغَيْرِ هُدًى مِّنَ اللّٰهِ ؕ
اِنَّ اللّٰهَ لَا يَهْدِى الْقَوْمَ الظّٰلِمِيْنَ ﴿٥٠﴾ ع

५१. आणि आम्ही त्यांना सतत आपली वाणी पोहचविली यासाठी की त्यांनी स्मरणिका प्राप्त करावी. [१००]

وَلَقَدْ وَصَّلْنَا لَهُمُ الْقَوْلَ لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ ﴿٥١﴾ ط

५२. ज्या लोकांना आम्ही यापूर्वी ग्रंथ प्रदान केला होता. ते यावर ईमान बाळगतात.[१०१]

اَلَّذِيْنَ اٰتَيْنٰهُمُ الْكِتٰبَ مِنْ قَبْلِهٖ هُمْ بِهٖ يُؤْمِنُوْنَ ﴿٥٢﴾

५३. आणि जेव्हा हे (कुरआन) त्यांना ऐकविले जाते, तेव्हा म्हणतात आम्ही यावर ईमान बाळगले. निःसंशय हे आमच्या पालनकर्त्या तर्फे सत्य आहे. आम्ही आधी पासूनच मुस्लिम आहोत.[१०२]

وَاِذَا يُتْلٰى عَلَيْهِمْ قَالُوْٓا اٰمَنَّا بِهٖٓ اِنَّهُ الْحَقُّ مِنْ رَّبِّنَآ اِنَّا كُنَّا
مِنْ قَبْلِهٖ مُسْلِمِيْنَ ﴿٥٣﴾

९२. म्हणजे आम्ही पैगंबर अशासाठी पाठविला की तुमच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित व्हावे आणि कियामतीच्या दिवशी तुम्हाला ही सबब मांडण्याची संधी न मिळावी की कोणताही पैगंबर आमच्याकडे आला नव्हता की ज्यायोगे आम्ही ईमान बाळगले असते.

९३. म्हणजे जे ईश-चमत्कार हजरत मूसा यांना प्रदान केले गेले होते ते या (पैगंबरा)सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ना का प्रदान केले गेले नाहीत?

९४. म्हणजे हजरत मूसा यांना जे ईश- चमत्कार प्रदान केले गेले होते त्यांचा देखील अशाच काफिरांनी इन्कार केला होता.

९५. दोघांशी अभिप्रेत हजरत मूसा व हजरत हारुन होत. त्यांच्या व्यक्तिमत्वांनाच जादूच्या अर्थाने घेतले होते म्हणजे ते नखशिखान्त जादूगार आहेत.

९६. म्हणजे तौरात व कुरआनाहून अधिक मार्गदर्शन प्रदान करणारा अल्लाहचा एखादा ग्रंथ तुमच्या जवळ असल्यास तो सादर करा, मी त्याचे अनुसरण करीन, कारण मूलभूत गोष्ट अल्लाहच्या मार्गदर्शनाचे अनुसरण हीच होय. स्पष्ट असावे की कुरआन अवतरणाच्या काळात दोनच ग्रंथ ईश-मार्गदर्शनाची साधने होते. एक तौरात व दुसरा कुरआन जो अवतरीत होत होता. राहीले जबूर व इंजील (बायबल) तर ते तौरातच्याच अधीन होते. यास्तव त्यांचा वेगळा उल्लेख करण्याची गरज नव्हती. आणि जेव्हा त्या काळात या दोन ग्रंथाखेरीज अन्य कोणताही ईश-मार्गदर्शनाचा ग्रंथ अस्तित्वात नव्हता की ज्याचे अनुसरण केले जावे तर आजच्या काळात विविध धर्म-ग्रंथाच्या बाबतीत हा दावा कशाप्रकारे योग्य ठरू शकतो की ते ईश-वाणी व ईश-मार्गदर्शन होय?

हे ही विचाराधीन असावे की या आयतींमध्ये मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांसंबंधी धर्माची मूलभूत श्रद्धा, एकेश्वरवाद, प्रेषित्व आणि आचरणाचा मोबदला इत्यादी बाबींची चर्चा आहे. आणि या संदर्भात तौरातची शिकवण देखील तीच होती जी कुरआनाची आहे.

हे ही स्पष्ट असावे की कुरआना समोर तौरातची जी प्रत अस्तित्वात होती त्यात आणि सध्या अस्तित्वात असलेल्या पुस्तकात बराच फरक आहे.

९७. म्हणजे त्यांची ही भूमिका आशचर्यकारक आहे की ते ना तौरातला मानतात, ना कुरआनास आणि ना अन्य एखाद्या ईश-ग्रंथाचा निर्देश करतात, ज्यात यापेक्षा अधिक चांगले ईश-मार्गदर्शन असावे. याचा अर्थ असा की ते मूळातच ईश-मार्गदर्शनाचे अनुसरण करू इच्छित नाही, किंबहुना असे इच्छितात की आपल्या इच्छा आकांक्षांच्या मागे धावण्यात स्वतंत्र असावे.

९८. आज शिक्षण सार्वत्रिक झाले आहे. आणि माणसाला हे जाणून घेणे सोपे झाले आहे की ईश्वराचे मार्गदर्शन कोठे आहे. परंतु आपल्या इच्छा-आकांक्षा बाबत तो अगदी स्वतंत्र राहू इच्छितो. यास्तव ईश-मार्गदर्शनाची कसलीही ओढ त्यांच्या ठायी दिसून येत नाही.

९९. म्हणजे जोपर्यंत असे दुर्वर्तनी लोक अल्लाहच्या मार्गदर्शनाची अभिलाषा बाळगत नाही, तोपर्यंत अल्लाह त्यांना आपल्या मार्गदर्शनापासून वंचित राखतो.

१००. म्हणजे कुरआनाच्या आयती निरंतर अवतरीत केल्या व सतत यांच्या आत्म-शुद्धिची उपाय योजना केली.

१०१. अभिप्रेत ते लोक होत जे ग्रंथ धारकांपैकी होते व कुरआनावर ईमान बाळगून होते.

स्पष्ट असावे की ग्रंथ धारकांकरीता कुरआनात सर्व सामान्यात: الذين اوتوا الكتاب ''ज्यांना ग्रंथ प्रदान केला गेला होता'' हा शब्द समूह वापरला गेला आहे. परंतु जेव्हा कुरआन प्रामुख्याने या जनसमूहातल्या त्या लोकांचा उलेलेख करतो जे प्रामाणिक मोमीन (ईमान बाळगणारे) आहेत व कुरआनावर ईमान बाळगतात तर त्यांच्या करीता الذين اتينهم الكتاب ''ज्यांना आम्ही ग्रंथ प्रदान केला'' हे शब्द वापरतो ज्यात कृपेचा पैलू दिसून येतो.

१०२. संकेत ग्रंथ धारकांतल्या त्या लोकांकडे आहे जे त्या मूळ इस्लाम धर्मावर कायम होते जो एकेश्वर वाद व आखिरत सोबत ईश्वराच्या समस्त ग्रंथांना व पैगंबरांना मानण्याचे आवाहन करतो. आणि ज्या वेळेस कुरआनासह हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आगमन झाले तर त्यांनी यांच्यावरही ईमान बाळगले व त्यांचे अनुसरण अंगिकारले. जणू त्यांनी आपल्या ईमानाच्या क्रम-संदर्भातच कुरआन व त्याच्या पैगंबरास पाहीले होते. म्हणून ते आधी ही मुस्लिम होते व नंतर देखील मुस्लिम म्हणूनच जगले. धर्मांतरा (Conversion) चा प्रश्न त्यांच्यासाठी उदभवलाच नाही.

यावरून या कल्पनेचे खंडन होते की जेव्हा कुरआन अवतरणास आरंभ झाला तेव्हा कोणी मुस्लिम म्हणून (पूर्वी पासून) नव्हताच अथवा हे की इस्लाम धर्माचा आरंभ पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पासून झाला. मात्र वस्तुस्थिती अशी की इस्लाम समस्त पैगंबरांचा धर्म होता आणि कुरआन अवतरण काळात ही असे लोक अस्तित्वात होते ज्यांचा धर्म 'इस्लाम' हाच होता. म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे अनुसरण करण्यात त्यांना काहीच संकोच वाटला नाही. (इस्लामच्या स्पष्टीकरकणासाठी पहा सूरह बकरा टी क्र. १५२, सूरह आले इमरान टीप १०५, १०६, १०८)

५४. हे असे लोक आहेत ज्यांना त्यांचा मोबदला दोनदा दिला जाईल. या कारणास्तव की ते दृढनिश्चयी (अटळ) राहीलेत.[१०३] ते वाईट गोष्टीस भल्या गोष्टीने दूर करतात.[१०४] आणि जे उपजिविका आम्ही त्यांना प्रदान केली आहे, त्यातून ते खर्च करतात. [१०५]

أُولَٰٓئِكَ يُؤْتَوْنَ أَجْرَهُم مَّرَّتَيْنِ بِمَا صَبَرُوا وَيَدْرَءُونَ
بِالْحَسَنَةِ السَّيِّئَةَ وَمِمَّا رَزَقْنَاهُمْ يُنفِقُونَ ﴿٥٤﴾

५५. आणि जेव्हा ते एखादी व्यर्थ गोष्ट ऐकतात तेव्हा तिच्या पासून अलिप्तता अंगिकारतात [१०६] व असे म्हणतात की आमच्यासाठी आमचे आचरण व तुमच्यासाठी तुमचे आचरण.[१०७] तुम्हाला सलाम. [१०८] आम्ही अडाण्यांशी वाद घालू इच्छित नाही.[१०९]

وَإِذَا سَمِعُوا اللَّغْوَ أَعْرَضُوا عَنْهُ وَقَالُوا لَنَا أَعْمَالُنَا
وَلَكُمْ أَعْمَالُكُمْ سَلَامٌ عَلَيْكُمْ لَا نَبْتَغِي الْجَاهِلِينَ ﴿٥٥﴾

५६. (हे पैगंबर !) तुम्ही वाटेल त्याला ईश-मार्गदर्शन देऊ शकत नाही किंबहुना अल्लाह ज्यास इच्छितो, मार्गदर्शन प्रदान करतो.[११०] आणि तो चांगल्या प्रकारे जाणतो ईश-मार्गदर्शन स्विकारणाऱ्यांना!

إِنَّكَ لَا تَهْدِي مَنْ أَحْبَبْتَ وَلَٰكِنَّ اللَّهَ يَهْدِي
مَن يَشَاءُ ۚ وَهُوَ أَعْلَمُ بِالْمُهْتَدِينَ ﴿٥٦﴾

५७. ते म्हणतात जर आम्ही तुमच्या सोबत या ईश-मार्गदर्शनाचे अनुसरण करू लागलो तर आपल्या जमीनी (देशा) तून आमचे उच्चाटन केले जाईल. काय आम्ही शांतीपूर्ण मक्का शहरात यांना जागा दिली नाही ज्याकडे प्रत्येक प्रकारचे फळ आकर्षित होऊन येत चालले आहे. आमच्या तर्फे उपजिविका म्हणून.परंतु यांच्या पैकी बहुतेक लोक जाणत नाहीत.[१११]

وَقَالُوا إِن نَّتَّبِعِ الْهُدَىٰ مَعَكَ نُتَخَطَّفْ مِنْ أَرْضِنَا ۚ
أَوَلَمْ نُمَكِّن لَّهُمْ حَرَمًا آمِنًا يُجْبَىٰ إِلَيْهِ ثَمَرَاتُ كُلِّ
شَيْءٍ رِّزْقًا مِّن لَّدُنَّا وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿٥٧﴾

५८. आणि किती तरी वस्त्या आम्ही नष्ट करून टाकल्या आहेत ज्या आपल्या सुखविलासात उन्मत झाल्या होत्या.[११२] तर ही आहेत त्यांची निवास स्थाने, जी त्यांच्या नंतर कमीच आबाद झालीत. [११३] आणि आम्हीच त्यांचे वारस झालोत.[११४]

وَكَمْ أَهْلَكْنَا مِن قَرْيَةٍ بَطِرَتْ مَعِيشَتَهَا ۖ فَتِلْكَ مَسَاكِنُهُمْ
لَمْ تُسْكَن مِّن بَعْدِهِمْ إِلَّا قَلِيلًا ۖ وَكُنَّا نَحْنُ الْوَارِثِينَ ﴿٥٨﴾

१०३. म्हणजे तो पूर्वी सुद्धा इस्लाम वर कायम राहीले, म्हणून मोबदला प्राप्त करण्यास पात्र होते आणि जेव्हा कुरआनावर ईमान बाळगून त्याच्या पैगंराचे अनुयायी झाले तर दुसऱ्यांदा देखील मोबदला प्राप्त करण्यास पात्र ठरले.

हदीस वचनातील उल्लेख असा:

'तीन माणसे अशी आहेत ज्यांना दोन वेळा मोबदला दिला जाईल, एक तो जो ग्रंथ धारकांपैकी होता व आपल्या पैगंबरावर ईमान राखत होता नंतर माझ्यावर ईमान बाळगले. (तफसीर ईब्ने कसीर खंड ३ पृष्ठ ३९३)

१०४. म्हणजे जे लोक या प्रामाणिक मुसलमानंशी वाद घालतात त्यांच्या शिव्यांचे प्रत्युत्तर ते शिव्यांनी देत नाही, किंबहुना वाईट गोष्टीचा मुकाबला भल्या गोष्टीने करतात.

१०५. म्हणजे त्यांचा एक वाखाणण्याजोगा गुण असा आहे की ते कंजूस आणि धनपूजक नाहीत, किंबहुना मनाने श्रीमंत आहेत की अल्लाहच्या मार्गात त्याने प्रदान केलेले धन खर्च करतात व गरजवंताना सहाय्य करतात. यावरून हा संकेत ही मिळतो की अल्लाहच्या मार्गात खर्च केल्याने शुभ-मांगल्याचे मार्ग खुले होतात आणि सदाचरणाच्या सुबुद्धित वाढ होते.

१०६. व्यर्थ वा वाह्यात गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मोमीनून टीप क्र. ३ या ठिकाणी संकेत या गोष्टीकडे आहे की हे लोक आपल्या विरोधकांच्या वाह्यात गोष्टीकडे मुळीच लक्ष देत नाहीत आणि ना त्यांच्या वाह्यात गोष्टींना उत्तर देण्यात त्यांना काहीच स्वारस्य असते.

१०७. म्हणजे आम्ही आमच्या आचरणास जबाबदार आहोत व तुम्ही तुच्या आचरणास जबाबदार आहात. त्यानुसार आम्ही आपल्या आचरणाच्या परिणतीस प्राप्त करू व तुम्ही तुमच्या आचरणाच्या परिणतीस प्राप्त कराल.

१०८. हा सलाम त्या सर्वपरिचित अर्थाने नव्हे, जो एक मुसलमान दुसऱ्या मुसलमानास करतो, किंबहुना हा सलाम म्हणजे सलामती पूर्वक निरोप घेणे. अर्थात आमचा सलाम घ्या, आम्ही निघतो. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फुर्कान टीप क्र. ९२

१०९. कुरआनाची शिकवण अशी की धर्म-संदर्भात जे लोक अडाणीपणाची पातळी गाठतील त्यांच्याशी ईमान बाळगणाऱ्यांशी वाद घालू नये, तर सुंदररित्या त्यांचा निरोप घ्यावा. धार्मिक-भांडणांनी कसलाही लाभ होत नाही, परंतु ऐकणारा जर काही ऐकायला तयार असेल तर त्याला सत्य गोष्ट जरुर सांगावी.

११०. म्हणजे ईश मार्गदर्शनास स्विकारण्याची सुबुद्धि देणे हे अल्लाहचे काम होय. एखाद्या माणसाच्या हृदयात ईश मार्गदर्शनाचा शिरकाव करविणे हे तुमच्या अवाक्यातले नाही आणि ना तुम्ही त्याला सन्मार्ग प्राप्तीचा लाभ आपल्या परिने घडवू शकता. अर्थात जेव्हा एखादा पैगंबर एखाद्या माणसाच्या मनावर ईश मार्गदर्शन बिंबवू शकत नाही तेव्हा इतर लोक काय करू शकतात?

१११. कुरेश जन समूहाचे लोक असे समजत होते की मक्केत त्यांना जे स्थान लाभले आहे आणि जे शांतीपूर्ण वातावरण लाभले आहे ते अशासाठी की त्यांनी मूर्ती पूजा संदर्भात सहीष्णुता अंगिकारली आहे व प्रत्येक कबिल्याच्या मूर्तिस काबागृहात स्थान दिले आहे. आता जर ते पैगंबराच्या एकेश्वरवादी आवाहनास कबूल करतात तर मकेकेत ना एखादी मूर्ति राहील आणि ना मूर्तिपूजा. परिणामी अरब कबिल्यांच्या विरोधाला तोंड द्यावे लागेल व याचा परिणाम त्यांच्या व्यापार व अर्थिक जीवनावर होऊ शकतो व त्यांच्या सुखशांतीवर देखील. त्यांच्या या विचाराचे खंडन करीत हे फर्माविले गेले आहे की तुम्हाला शांती-सुबत्तेची जी देणगी एका अशा देशात जिथे खून हत्या, मारहाण सार्वत्रिक आहे,या उदारतेपायी मिळाली नाही, जी तुम्ही मूर्तिपूजा संदर्भात अंगिकारलेली आहे किंबहुना अशासाठी मिळाली आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने मक्का शहरास सुरक्षित पवित्र स्थान बनविले आहे. त्याच्या पवित्रतेमुळेच अरब लोक या शहराचा सम्मान करतात व यात शांतीभंग करण्यास फार मोठा गुन्हा समजतात. यास्तव कुरेश लोकांना जी शांती-सुबत्ता उपलब्ध आहे ती पवित्र स्थानामुळेच. मूर्तिपूजे पायी नव्हे अशा प्रकारे मक्केच्या बिनशेतीच्या भूभागात प्रत्येक प्रकारच्या फळांची जी आवक वेगवेगळ्या देशातून होत आहे ती देखील हे एकेश्वरवादाचे केंद्र असल्यामुळेच अर्थात हा अल्लाहच्या विशेष कृपेचा परिणाम होय. परंतु जी गोष्ट एकेश्वरवादाच्या समर्थनार्थ जारी होती तिला त्यांनी आपल्या नादानपणाचे शिर्क (अनेकेश्वरवादाच्या) घरात टाकली ते या चुकीच्या गोष्टी सांगत राहीले, परंतु काही वर्षानंतरच जगाने पाहीले की तौहीद (एकेश्वर वादा) चे ध्वज रोहक समस्त अरब भूमीवर प्रभावशाली झाले आणि त्यांच्यासाठी कसलीच भिती वा धोका उरला नाही.

आज देखाल संधीसाधू नेता लोकांना ईश्वर व त्याच्या सत्य धर्मापासून दूर ठेवू इच्छितात. अशासाठी की शांतीसुबत्ता कायम रहावी. वस्तुत: खरी शांती-सुबत्ता ईश्वर व त्याच्या धर्मावर ईमान बाळगल्याने व तत्संबंधीच्या निकडी भागविल्यानेच साध्य होते.

११२. म्हणजे ज्यांना आपल्या सुखवस्तु जीवनाचा आणि नागरी प्रगतीचा अभिमान होता.

११३. म्हणजे फार थोड्याच प्रमाणात असे झाले की या उजाडलेल्या वस्त्यांमध्ये पुनर्वसन झाले असावे.

११४. म्हणजे या लोकांनी जगाचा अशा प्रकारे निरोप घेतला की या लोकांनी आपली सर्व मालमत्ता इथेच सोडावी लागली. या प्रकारे अखेरीस त्यांच्या चीच वस्तुचे आम्हीच मालक झालोत.

وَمَا كَانَ رَبُّكَ مُهْلِكَ الْقُرَىٰ حَتَّىٰ يَبْعَثَ فِيٓ أُمِّهَا رَسُولًا يَتْلُوا
عَلَيْهِمْ ءَايَٰتِنَا ۚ وَمَا كُنَّا مُهْلِكِى الْقُرَىٰٓ إِلَّا وَأَهْلُهَا ظَٰلِمُونَ ﴿٥٩﴾

५९. आणि तुमच्या पालनकर्ता वस्त्या नष्ट करणारा नव्हता, जो पर्यंत त्यांच्या मध्यवर्ति वस्तीत एखादा रसूल (पैगंबर) पाठवून दिला नसता, ज्याने त्यांना आमच्या आयती ऐकविल्या असत्या.[११५] आणि आम्ही वस्त्यांना अशाच स्थितीत नष्ट करतो जेव्हा तिचे रहिवाशी अत्याचारी असावेत.[११६]

وَمَآ أُوتِيتُم مِّن شَىْءٍ فَمَتَٰعُ الْحَيَوٰةِ الدُّنْيَا وَزِينَتُهَا ۚ وَمَا
عِندَ اللَّهِ خَيْرٌ وَأَبْقَىٰٓ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿٦٠﴾

६०. तुम्हा लोकांना जे काही दिले गेले आहे ते फक्त ऐहीक जीवनाची सामुग्री व त्याची शोभा मात्र आहे. आणि जे काही अल्लाह जवळ आहे ते अधिक चांगले व बाकी राहणारे आहे. काय तुम्ही समजत नाही?[११७]

أَفَمَن وَعَدْنَٰهُ وَعْدًا حَسَنًا فَهُوَ لَٰقِيهِ كَمَن مَّتَّعْنَٰهُ مَتَٰعَ
الْحَيَوٰةِ الدُّنْيَا ثُمَّ هُوَ يَوْمَ الْقِيَٰمَةِ مِنَ الْمُحْضَرِينَ ﴿٦١﴾

६१. काय तो मनुष्य, ज्याच्याशी आम्ही चांगला वायदा केलेला आहे व ज्यास तो निश्चितच पावेल.[११८]त्या माणसासारखा असू शकतो ज्यास आम्ही ऐहीक जीवनाची सामुग्री दिली आहे, मग तो कियामतीच्या दिवशी (शिक्षा भोगण्यासाठी) हजर केला जाईल?[११९]

وَيَوْمَ يُنَادِيهِمْ فَيَقُولُ أَيْنَ شُرَكَآءِىَ الَّذِينَ
كُنتُمْ تَزْعُمُونَ ﴿٦٢﴾

६२. आणि ज्या दिवशी तो यांना हाक मारील व विचारील की कोठे आहेत माझे ते सहभागी ज्यांचा तुम्ही दावा केला होता ?[१२०]

قَالَ الَّذِينَ حَقَّ عَلَيْهِمُ الْقَوْلُ رَبَّنَا هَٰٓؤُلَآءِ الَّذِينَ
أَغْوَيْنَآ أَغْوَيْنَٰهُمْ كَمَا غَوَيْنَا ۖ تَبَرَّأْنَآ إِلَيْكَ ۖ مَا كَانُوٓا
إِيَّانَا يَعْبُدُونَ ﴿٦٣﴾

६३. ज्यांना आमचे फर्मान लागू होईल [१२१]ते म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या ! हीच ती माणसे, ज्यांना आम्ही मार्गभ्रष्ट केले. आम्ही त्यांना अशाच प्रकारे मार्गभ्रष्ट केले ज्या प्रकारे आम्ही मार्गभ्रष्ट झालो.[१२२] आम्ही तुझ्या समक्ष (यांच्यापासून) दोषमुक्तता व्यक्त करीत आहोत.[१२३]हे आमची आराधना करीत नव्हते.[१२४]

وَقِيلَ ادْعُوا شُرَكَآءَكُمْ فَدَعَوْهُمْ فَلَمْ يَسْتَجِيبُوا لَهُمْ
وَرَأَوُا الْعَذَابَ ۚ لَوْ أَنَّهُمْ كَانُوا يَهْتَدُونَ ﴿٦٤﴾

६४. आणि त्यांना सांगितले जाईल की, (आता) आर्जव करा आपल्या ठरविलेल्या उपास्यांना (ईश्वराच्या सह भाग्यांना)[१२५] ते त्यांना साद घालतील,परंतु ते यांना काहीच उत्तर देणार नाहीत.[१२६] आणि हे लोक अजाब (ईश-शिक्षा) पाहून घेतील. यांनी ईश-मार्गदर्शन अंगिकारले असते तर किती बरे झाले असते ![१२७]

११५. म्हणजे ज्या वस्त्यांवर अल्लाहची शिक्षा अवतरली, ती अशा स्थितीत की एखाद्या पैगंबरांद्वारे त्यांना गफलतीतून जागे करण्याची उपाय योजना आधीच केली गेली होती. परंतु त्यांनी पैगंबरांच्या म्हणण्याकडे लक्ष दिले नाही.

या आयतीद्वारे हे ही स्पष्ट झाले की प्रत्येक वस्तीत अल्लाहने आपला पैगंबर पाठविला नाही, किंबहुना एखाद्या मध्यवर्ती वस्तीत पाठवित राहीला, यासाठी की त्याचे आवाहन सहजगत्या इतर वस्त्यांपर्यंत पोहोचावे.

११६. म्हणजे अनेकेश्वरवादी व सत्य विरोधी श्रद्धा आणि आचरणामुळे ते दुराचारी बनले आणि ईश्वर संबंधाने त्याचे वर्तन अगदी न्याय-विपरित व अतिरेकावर आधारीत असावे.

११७. येथे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जर तुम्ही पैगंबरांच्या सत्य-आवाहनास केवळ यासाठी कबूल करीत नाही की या स्थितीत तुमचे आर्थिक व ऐहीक लाभ धोक्यात येतील, तर लक्षात ठेवा हे ऐहीक लाभ काही दिवसांपुरतेच आहेत याच्या उलट आखिरत (मारणोत्तर जीवना) च्या ईश-देणग्या अत्याधिक श्रेष्ठ ही आहेत व निरंतर टिकणाऱ्या देखील मग काय ही सुज्ञता होय की माणसाने क्षणिक व तुच्छ लाभांना, श्रेष्ठतम व सदैव टिकणाऱ्या ईश-देणग्यांवर प्राधान्य द्यावे.

११८. अभिप्रेत सदाचारी मोमीन (ईमान बाळगणारा) होय. ज्याच्याशी सर्वश्रेष्ठ अल्लाहने जन्नतचा वायदा केलेला आहे.

११९. अभिप्रेत काफिर होय. ज्यास बंदिस्त करून कियामतीच्या दिवशी अल्लाह समोर हजर केले जाईल, जेणेकरून त्याला त्याच्या सत्य विरोध व विद्रोहाची शिक्षा दिली जावी.

१२०. कियामतीच्या दिवशी हा प्रश्न सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या लोकांना विचारील जे जगात त्याचा सहभागी ठरवित राहीले ज्यांचा हा दावा होता की ईश्वरीय अधिकार (Divine Powers) इतरांना ही प्राप्त आहेत.

१२१. हे अल्लाहच्या न्यायालयात सैतानांचे उत्तर असेल, जे मार्गभ्रष्टतेचे प्रणेते होते. त्यांना अल्लाहचे हे फर्मान लागू होईल की ते निर्भत्सनेस पात्र व जहन्नमी आहेत.

१२२. त्या सैतानांचे उत्तर हे असेल की आम्ही या लोकांच्या मार्गभ्रष्टतेस जबाबदार नाही यांना आम्ही मार्गभ्रष्ट केले जरूर परंतु ज्या प्रकारे आम्ही स्वत: आपल्या अधिकारापासून मार्गभ्रष्ट झालो होतो त्याच प्रकारे हे आपल्या अधिकारापासून मार्गभ्रष्ट झाले. आम्ही यांना जबरीने मार्गभ्रष्ट केले नव्हते की ज्यामुळे यांच्या मार्गभ्रष्टतेची शिक्षा आम्हास भोगणे क्रमप्राप्त व्हावे.

१२३. म्हणजे आपल्या या अनुयायींपासून संबंध नसण्याचे जाहीर करीत आहोत.

१२४. अर्थात हे खरे पाहता आपल्या आत्म्याचे व आपल्या इच्छा आकांक्षांचे आराधक होते.

१२५. सैतानांच्या व मार्गभ्रष्ट नेत्यांच्या या उत्तरांनतर, जे वर निवेदिले गेले, सर्वसामान्य अनेकेश्वरवाद्यांना सांगितले जाईल की आता आर्जव करा आपल्या ठरविलेल्या उपास्यांना, ज्यांना तुम्ही आपले सहाय्यक व शिफारस करणारे समजून घेतले होते.

१२६. म्हणजे ज्या काल्पनिक ईश्वरांची ते पूजा अर्चना करीत होते त्यांचे काही ही अस्तित्व नसेल की जेणेकरून ते उत्तर देतील.

१२७. ही त्यांच्या दुर्दशेबद्दल हळहळ व्यक्त केली गेली आहे की जर त्यांनी ईश-मार्गदर्शन स्विकारले असते तर आज या वाईट परिणतीप्रत पोहचले नसते. अनेकेश्वरवाद्यांच्या या दुष्परिणतीचे हे चित्र कुरआनात अशासाठी रेखाटले गेले आहे की लोकांनी शिर्क (अनेकेश्वरवाद) व मूर्तिपूजा यांना साधारण बाब समजू नये.

६५. आणि ज्या दिवशी तो यांना पुकारील व विचारील की तुम्ही पैगंबरांना काय उत्तर दिले ?[१२८]

وَيَوْمَ يُنَادِيهِمْ فَيَقُولُ مَاذَآ أَجَبْتُمُ ٱلْمُرْسَلِينَ ﴿٦٥﴾

६६. त्यादिवशी त्यांना कसलेही उत्तर देता येणार नाही आणि ना ते आपसात एकमेकांना विचारु शकतील.[१२९]

فَعَمِيَتْ عَلَيْهِمُ ٱلْأَنۢبَآءُ يَوْمَئِذٍ فَهُمْ لَا يَتَسَآءَلُونَ ﴿٦٦﴾

६७. तेव्हा ज्याने तौबा (क्षमा याचना) केली, ईमान बाळगले व सत्कर्मे केली, तर आशा आहे तो यशस्वी होणाऱ्यांपैकी असेल.[१३०]

فَأَمَّا مَن تَابَ وَءَامَنَ وَعَمِلَ صَٰلِحًا فَعَسَىٰٓ أَن
يَكُونَ مِنَ ٱلْمُفْلِحِينَ ﴿٦٧﴾

६८. आणि तुमचा पालनकर्ता जे इच्छितो निर्माण करतो व जे इच्छितो पसंत करतो. यांना कसला ही अधिकार नाही.[१३१] अल्लाह पवित्र आणि श्रेष्ठतम आहे त्या शिर्कपासून जे हे लोक करीत आहेत.[१३२]

وَرَبُّكَ يَخْلُقُ مَا يَشَآءُ وَيَخْتَارُ ۗ مَا كَانَ لَهُمُ ٱلْخِيَرَةُ ۚ سُبْحَٰنَ
ٱللَّهِ وَتَعَٰلَىٰ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿٦٨﴾

६९. तुमचा पालनकर्ता जाणतो जे काही यांनी आपल्या हृदयात लपवून ठेवले आहे व जे हे व्यक्त करतात.[१३३]

وَرَبُّكَ يَعْلَمُ مَا تُكِنُّ صُدُورُهُمْ وَمَا يُعْلِنُونَ ﴿٦٩﴾

७०. तोच अल्लाह होय ज्याच्या शिवाय कोणी ही ईश्वर नाही. त्याच्याच करीता प्रशंसा आहे, जगात ही आणि आखिरत मध्ये ही.[१३४] हुकुम त्याचाच होय.[१३५] आणि त्याच्या कडेच तुम्हाला परतविले जाईल.[१३६]

وَهُوَ ٱللَّهُ لَآ إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ لَهُ ٱلْحَمْدُ فِى ٱلْأُولَىٰ وَٱلْءَاخِرَةِ ۖ
وَلَهُ ٱلْحُكْمُ وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿٧٠﴾

७१. त्यांना सांगा, काय तुम्ही या गोष्टीवर विचार केला की जर अल्लाह कियामती पावेतो तुमच्यावर सदैव काळासाठी रात्र आच्छादित करील तर अल्लाह खेरीज तो कोणता देव आहे, जो तुमच्यासाठी उजेड आणील? काय तुम्ही ऐकत नाही?

قُلْ أَرَءَيْتُمْ إِن جَعَلَ ٱللَّهُ عَلَيْكُمُ ٱلَّيْلَ سَرْمَدًا إِلَىٰ يَوْمِ
ٱلْقِيَٰمَةِ مَنْ إِلَٰهٌ غَيْرُ ٱللَّهِ يَأْتِيكُم بِضِيَآءٍ ۖ أَفَلَا تَسْمَعُونَ ﴿٧١﴾

१२८. हा दुसरा प्रश्न प्रेषित्वा विषयीचा असेल की जो संदेश घेऊन आमचे पैगंबर तुमच्या जवळ आले होते, त्याचा संदेश तुम्ही कबूल केला किंवा नाही व त्यांच्या आवाहनास तुम्ही काय उत्तर दिले.

१२९. म्हणजे कियामतीच्या दिवशी त्यांच्याजवळ कसलेही प्रमाण नसेल, ज्यास ते प्रेषित्वाचा नकार दर्शविण्याच्या समर्थनार्थ सादर करू शकतील. यास्तव काय बोलावे तेच त्यांना सुचणार नाही आणि आपसात ते एकमेकांना विचारू ही शकणार नाहीत की या प्रश्नाचे काय उत्तर दिले जावे कारण पैगंबरांची सत्यता त्यांच्यावर अशा प्रकारे स्पष्ट झाली होती की या संदर्भात सबब पुढे करण्याची किंचितमात्र संधी नसेल.

१३०. अनेकेश्वरवादी व काफीर लोकांना हे क्षमा याचना करण्याचे प्रोत्साहन आहे की आज या जगात तुम्हाला ही संधी प्राप्त आहे तर जो कोणी अनेकेश्वरवाद व सत्य-विरोधापासून परत फिरेल व ईमान बाळगून आचरणाने नेक बनेल तो योग्यरित्या मरणोत्तर जीवनात यशाची अपेक्षा बाळगू शकतो.

१३१. म्हणजे अल्लाह जे इच्छितो निर्माण करतो यात कोणाचा काही ही हस्तक्षेप नाही. तद्वतच तो आपल्या सृष्ट निर्मितीतून देणग्यांनी उपकृत करण्यासाठी माणसांची निवड स्वत:च करतो यास्तव त्याने प्रामणिक ईमान बाळगणाऱ्यांना जन्नत करीता निवडलेले आहे. अनेकेश्वरवाद्यांनी ज्यांना शिफारस करणारे ठरविले आहे त्यांचा या बाबतीत काहीच हस्तक्षेप नाही ते अगदी अधिकार शून्य आहेत.

१३२. अर्थात ही कल्पना की ईश्वराच्या कार्यात ढवळाढवळ करणारा कोणी तरी आहे, अगदीच शिर्क आहे. अनेकेश्वरवादी आपल्या दैवतांबद्दल हीच धारणा बाळगतात परंतु अल्लाहचे अस्तित्व यापासून अतिशय उच्च व श्रेष्ठतम आहे की त्याच्या कार्यात, त्याच्या निर्णयात व निवड करण्या बाबत एखाद्याने त्याच्यावर आपला प्रभाव पाडावा व एखादी गोष्ट त्याच्याकरवी घडवून आणली जावी.

१३३. संकेत या गोष्टीकडे आहे की अनेकेश्वरवादी ज्या शिर्क व मूर्तिपूजेला जाहीरपणे आपला धर्म समजून आहेत त्याच्या पार्श्वभूमीवर जी विचार सरणी कार्यरत आहे व ज्या वाईट भावना व प्रेरक गोष्टी आहेत त्यांना ही अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो.

१३४. म्हणजे केवळ अल्लाह या गोष्टीस पात्र आहे की जगात ही त्याचेच गुणगान केले जावे व आखिरत मध्ये तर त्याचेच गुणगान होईल.

१३५. अर्थात या सृष्टीत त्याचाच आदेश व निर्णय लागू आहे व तोच या गोष्टीस पात्र आहे की माणसाने त्याचे शरीअत विषयक आदेश व निर्णयांचे पालन मान्य करावे व त्याच्या कोणत्याही आदेशाचा भंग करू नये.

१३६. म्हणजे शेवटी तुम्हाला अल्लाह समोरच हजर व्हावयाचे आहे.

७२. त्यांना सांगा,काय तुम्ही हा देखील विचार केला की जर अल्लाह कियामती पावेतो तुमच्यावर सदैव काळाकरीता दिवस आच्छादित करील, तर अल्लाह खेरीज तो कोणता देव आहे जो तुमच्यासाठी रात्र आणील की ज्यायोगे तुम्ही विश्रांती घेऊ शकावे? काय तुम्ही पाहत नाही?[१३७]

قُلْ أَرَءَيْتُمْ إِنْ جَعَلَ ٱللَّهُ عَلَيْكُمُ ٱلنَّهَارَ سَرْمَدًا إِلَىٰ يَوْمِ
ٱلْقِيَٰمَةِ مَنْ إِلَٰهٌ غَيْرُ ٱللَّهِ يَأْتِيكُم بِلَيْلٍ تَسْكُنُونَ فِيهِ
أَفَلَا تُبْصِرُونَ ﴿٧٢﴾

७३. आणि ही त्याचीच कृपा होय की त्याने तुमच्या साठी रात्र व दिवस बनविले. अशासाठी की तुम्ही यात आराम प्राप्त करावा व त्याचा अनुग्रह शोधावा व यासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.[१३८]

وَمِن رَّحْمَتِهِۦ جَعَلَ لَكُمُ ٱلَّيْلَ وَٱلنَّهَارَ لِتَسْكُنُوا۟ فِيهِ
وَلِتَبْتَغُوا۟ مِن فَضْلِهِۦ وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُونَ ﴿٧٣﴾

७४. आणि तो दिवस, जेव्हा तो यांना हाक मारील व संगोल, कोठे आहेत माझे ते सहभागी, ज्यांना तुम्ही ठरविले होते?

وَيَوْمَ يُنَادِيهِمْ فَيَقُولُ أَيْنَ شُرَكَآءِىَ ٱلَّذِينَ
كُنتُمْ تَزْعُمُونَ ﴿٧٤﴾

७५. आणि आम्ही प्रत्येक जन-समुदायातून एक साक्षी बाहेर काढू [१३९] व लोकांना सांगू की आपले प्रमाण सादर करा.[१४०] त्या वेळी त्यांना कळून येईल की सत्य अल्लाह करीताच आहे.[१४१] आणि जे असत्य ते गठत राहीले ते सर्व नाहीसे होईल.[१४२]

وَنَزَعْنَا مِن كُلِّ أُمَّةٍ شَهِيدًا فَقُلْنَا هَاتُوا۟ بُرْهَٰنَكُمْ
فَعَلِمُوٓا۟ أَنَّ ٱلْحَقَّ لِلَّهِ وَضَلَّ عَنْهُم مَّا كَانُوا۟ يَفْتَرُونَ ﴿٧٥﴾

७६. कारून मूसाच्या जन समूहापैकी होता.परंतु त्याने त्यांच्याविरूद्ध अतिरेकाचे स्तर गाठले होते.[१४३] आणि आम्ही त्याला इतके खजीने देऊन ठेवले होते की त्याच्या चाव्या एक शक्तिशाली गट मोठ्या प्रयासाने उठवू शकत होता.[१४४]जेव्हा त्याच्या जनस्मूहाच्या लोकांनी त्यास म्हटले, वातरु नकोस.[१४५] अल्लाह वातरणाऱ्यांना पसंत करीत नाही.[१४६]

إِنَّ قَٰرُونَ كَانَ مِن قَوْمِ مُوسَىٰ فَبَغَىٰ عَلَيْهِمْ ۖ وَءَاتَيْنَٰهُ
مِنَ ٱلْكُنُوزِ مَآ إِنَّ مَفَاتِحَهُۥ لَتَنُوٓأُ بِٱلْعُصْبَةِ أُو۟لِى ٱلْقُوَّةِ
إِذْ قَالَ لَهُۥ قَوْمُهُۥ لَا تَفْرَحْ ۖ إِنَّ ٱللَّهَ لَا يُحِبُّ ٱلْفَرِحِينَ ﴿٧٦﴾

७७. अल्लाहने जी सम्पती तुम्हाला देऊन ठेवली आहे त्या द्वारे आखिरतचे घर मागा.[१४७] आणि इहलोकातून आपला हिस्सा विसरु नका.[१४८] उपकार करा, ज्या प्रकारे अल्लाहने तुमच्यावर उपकार केला आहे.[१४९] आणि जमीनीवर उत्पात करण्यास टपून बसू नका.[१५०] अल्लाह उत्पात माजविणाऱ्यांना पसंत करीत नाही.

وَٱبْتَغِ فِيمَآ ءَاتَىٰكَ ٱللَّهُ ٱلدَّارَ ٱلْءَاخِرَةَ ۖ وَلَا تَنسَ نَصِيبَكَ
مِنَ ٱلدُّنْيَا ۖ وَأَحْسِن كَمَآ أَحْسَنَ ٱللَّهُ إِلَيْكَ ۖ وَلَا تَبْغِ
ٱلْفَسَادَ فِى ٱلْأَرْضِ ۖ إِنَّ ٱللَّهَ لَا يُحِبُّ ٱلْمُفْسِدِينَ ﴿٧٧﴾

१३७. रात्र आणि दिवसाच्या एकापाठोपाठ येण्याची जी व्यवस्था या जमीनीवर कायम केली गेली आहे तो जीवन व्यतीत करण्यासाठी अतिश्य अनुकूल आहे. जर रात्रीच्या काळोखात माणसाीला आराम मिळतो तर दिवसाच्या उजेडात त्याच्या करीता अर्थोपार्जनास्तव धावपळ करणे सोपे ठरते. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याचा व कृपेचा फार मोठा चमत्कार होय परंतु माणसाची दशा मोठी विचित्र आहे.तो परिस्थितीच्या अनुकूलतेस तर जाणतो, परंतु या गोष्टीवर विचार करण्याची तसदी घेत नाही की परिस्थितीची ही अनुकूलता एका व्यवस्थेनुसार आहे आणि व्यवस्थेचे अस्तित्व तिला कायम करणाऱ्यास प्रमाणित करते. मग ज्या सामर्थ्याने ही व्यवस्था प्रस्थापित केली आहे, ते तिला बदलवू ही शकते. जर त्याने निरंतर काळासाठी रात्रच पसरवून ठेवली किंवा दिवसच व्यापून ठेवला तर मनुष्य केवढ्या मोठ्या देणगीला पारखा होईल व त्याला कशा अडचणीला तोंड द्यावे लागेल. जर त्याने या पैलूवर विचार केला तर निश्चितच आपल्या पालनकर्त्यास ओळखील व त्यांच्या अंगी त्याविषयी कृतज्ञतेची भावना निर्माण होईल आणि जेव्हा ही कृतज्ञतेची भावना निर्माण होईल तेव्हा तो त्या एकेश्वरवादी आवाहनाकडे धाव घेईल जे कुरआन व त्याचा पैगंबर सादर करीत आहे.

आजचा मनुष्य तर जबरदस्त भौगोलिक माहीती बाळगतो. तो हे जाणतो की उत्तर धृवावर सहा महीने दिवस व सहा महीने रात्र असते. यामुळे त्या ठिकाणी मनुष्य -वस्ती असून नसल्या सारखीच आहे. याउलट मध्य अज्ञांशावर (Latiude)वर जिथे दररोज रात्र व दिवसाच्या येण्याजाण्याचा क्रम चालू असतो, मनुष्य वस्ती घनदाट आहे तसेच तो हे ही जाणतो की दिवस व रात्र यांचे अस्तित्व पृथ्वीच्या आपल्या केंद्राभोवती फिरण्यामुळे आहे परंतु तो या प्रश्नावर विचार करण्यास तयार होत नाही जो अपरिहार्यपणे अशा प्रसंगी उद्भवतो. तो प्रश्न असा कीय काय भ्रमणाची ही व्यवस्था या गोष्टीस प्रमाणित करीत नाही की या मागे एका व्यवस्थाकुशल शक्तिचा हात काम करीत आहे, जिने पृथ्वीला फिरत ठेवले आहे जर या शक्तिने अर्थात अल्लाहने पृथ्वीचे भ्रमण थांबविले तर पृथ्वीच्या अर्ध गोलावर निव्वळ रात्र व दुसऱ्या अर्थगोलावर निव्वळ दिवस राहणार नाही? मग अशा स्थितीत तो कोणता देव आहे जो पृथ्वीचे भ्रमण जारी करील. उघड आहे हे अल्लाह शिवाय कोणाच्या ही अवाक्यातले काम नाही. मग या वस्तुस्थितीस समजून उमजून ही अल्लाहचा एखादा सहभागी ठरविण्याचा अर्थ काय? आणि जर या संदर्भात या लोकांना एखाद्या ठिकाणी ठोकर लागत आहे तर ते सदुपदेश करणाऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्यास का तयार होत नाहीत?

१३८. म्हणजे रात्री आराम करू शकावे व दिवसा अर्थोपार्जनाची धावपळ करू शकावे. आणि या दोन्ही ईश-देणग्यांचा लाभ घेऊन आपल्या कृपाळू ईश्वराशी कृतज्ञ व्हावे.

१३९. म्हणजे प्रत्येक जन समूहातून एका पैगंबरास जो त्याच्याकडे पाठविला गेला. साक्षी म्हणून समोर आणला जाईल. या संदर्भात कुरआनात आणखी एका ठिकाणी फर्माविले गेले की-

فَكَيْفَ اِذَا جِئْنَامِنْ كُلِّ اُمَّةٍ بِشَهِيْدٍ وَجِئْنَابِكَ

عَلٰى هٰؤُلَآءِ شَهِيْدًا۔ (سورہ نساء:۴۱)

‘त्या दिवशी (यांची) काय दशा होईल जेव्हा आम्ही प्रत्येक जन-समूहामधून एक साक्षी आणू आणि तुम्हाला या लोकांवर साक्षी बनवून उभे करू’ (सूरह निसा : ४१)

१४०. म्हणजे शिर्क व मूर्तिपूजेच्या समर्थनार्थ आणि इस्लाम ऐवजी जे इतर धर्म तुम्ही अंगिकारून ठेवले आहेत ते सत्य असण्या विषयीचे एखादे प्रमाण जर तुमच्या जवळ होते तर ते आमच्यापुढे सादर करा.

१४१. म्हणजे अल्लाहने आपल्या पैगंबरांद्वारे जे मार्गदर्शन पाठविले होते आणि जी वाणी अवतरीत केली होती, तीच सत्य होती.

१४२. अर्थात त्यांचे स्वरचित ईश्वर ही हरवतील व त्यांचे स्वरचित धर्म देखील गायब होतील.

१४३. कारून संबंधी कुरआन स्पष्टीकरण देतो की तो हजरत मूसा यांच्या जन समूहापैकी होता अर्थात बनी इस्राईल वंशाचा होता. परंतु आपल्या जन-समूहाशी विद्रोह करून तो फिरऔनला जाऊन मिळाला होता. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याने आपल्या समाजाशी गद्दारी करून फिरऔन जवळ महत्वपूर्ण स्थान प्राप्त केले होते आणि बनी इस्राईल विरूद्ध जो एक मुस्लिम समाज होता, अत्याचार व अतिरेकाची पातळी गाठली होती कुरआन हे ही स्पष्ट करतो की हजरत मूसा यांना ज्या प्रकारे फिरऔन व हामानकडे पाठविले गेले होते तद्वतच कारूनकडे ही पाठविले गेले होते. ज्यावरून हे जाहीर होते की हे सर्व कुफ्रे व शिर्कच्या दृष्टिकोनातून एकाच माळेचे मणी होते.

وَلَقَدْ اَرْسَلْنَا مُوسٰى بِاٰيَاتِنَا وَسُلْطٰنٍ مُّبِيْنٍ اِلٰى فِرْعَوْنَ وَهَامَانَ وَ

قَارُوْنَ فَقَالُوْا سَاحِرٌ كَذَّابٌ۔ (سورہ المؤمن:۲۳۔۲۴)

‘आम्ही मूसाला आपल्या निशाण्या व स्पष्ट प्रमाणासह फिरऔन व हामान आणि कारूनकडे पाठविले तर ते म्हणाले. हा मोठा खोटारडा जादूगार आहे’ (सूरह मोमीन २३,२४)

यावरून हे ही स्पष्ट झाले की कारूनची घटना हजरत मूसा यांचे मिस्र (इजिप्त) येथे वास्तव्य असतानाची होती. म्हणून ज्या भाष्यकारांनी यास बनी इस्राईलच्या अरण्य भ्रमणाच्या काळाची घटना दर्शविले आहे ते चुकीचे आहे. राहीला बायबलचा हा किस्सा की बनी ईस्रईल अरण्यात भटकत असतांना कोरह (Koarh)आहे. ने जो हजरत मूसा यांचा चुलत भाऊ होता बनी इस्राईलच्या एका गटासोबत हजरत मूसा विरूद्ध बंड केले आणि याची शिक्षा अशी मिळाली की जमीनीने त्यांना गिळंकृत केले. (गणना प्रकरण १६) तर संभवत:कोरह हा दुसऱ्या एखादा इसम असावा कारण नावातल्या फरका खेरीज बायबलमध्ये तो श्रीमंत असण्याचा ही उल्लेख नाही आणि हे ही शक्य आहे की कारूनची घटना बुद्धीत योग्यरित्या सुरक्षित राहीली नसावी आणि बायबलच्या संग्राहकांनी यास विस्कळीत शैलीत सादर केले असावे. यास्तव इस्राईली धर्म-कल्पनांना बाजूस सारुन आम्हाला कुरआनाच्या निवेदनावर समाधान बाळगावयाचे आहे जे सुस्पष्ट तर आहेच, बोधदायक देखील.

१४४. कारूनच्या खजीन्यांच्या चाव्यांची कल्पना आजच्या काळातील चाव्यांवरून केली जाऊ नये कारण सद्यस्थितीततल्या चाव्या आकाराने ही लहान असतात व वजनाने ही हलक्या असतात. प्राचीन काळात खजीने ठेवल्यासाठी आजच्यासारख्या तिजोऱ्या किंवा सेफ नव्हते, किंबहुना जमीनीत गाडून ठेवून किंवा एखाद्या सुरक्षित स्थानी ठेवून दरवाज्याला फार मोठे कुलुप लावले जात असे, जे उघडण्यासाठी फार मोठी व वजनदार चावी लागत असे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने कारूनला एवढी धनस्म्पत्ति दिली होती की तो अनेक खजीन्यांचा मालक होता आणि या खजीन्यांच्या भारदस्त चाव्या एका जागेहून दुसऱ्या जागी हलविण्याकरीता मजूरांची एक संख्या लागत असे. अनेक मजूर मिळून मोठ्या प्रयासाने व मेहनतीने या चाव्या उचलू शकत. नवल नव्हे की या चाव्या गजाच्या स्वरूपात असाव्यात. म्हणून त्या एवढ्या वजनदार असण्यात अतिशयोक्तिचा कोणताही पैलू नाही, किंबहुना घटनेच्या वस्तुस्थितीची अभिव्यक्ति आहे. हे ही स्पष्ट असावे की प्राचीनकाळात खजीने सोन्या चांदीचे असत. नोटांची प्रथा तर आजच्या काळाचा शोध होय.

१४५. कारूनला या गोष्टी बद्दल मोठा अभिमान होता की, तो फार श्रीमंत माणूस आहे म्हणून तो गर्वोन्मत होऊन वागू लागता होता.

१४६. उन्मतपणे तोच मनुष्य वागतो जो एखाद्या ईश-देणगीस प्राप्त करून तिला अल्लाहची कृपा व उपकार समजण्या ऐवजी आपली पात्रता व गुणविशेषाचा परिणाम समजू लागतो. यास्तव त्याला आभाळ दोन बोट उरल्यासारखे वाटते. असा मनुष्य स्वत:च स्वत:ला पसंत करतो, ईश्वर अशा माणसाला मुळीच पसंत करीत नाही.

१४७. म्हणजे ही सम्पत्ति सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशासाठी दिली नाही की तिच्यावर साप बनून बसावे आणि ना अशासाठी दिली की तिच्याबद्दल अभिमान बाळगावा, किंबहुना यासाठी दिली आहे की तिला अल्लाहच्या मार्गात खर्च करुन आखिरतच्या यशाचे साधन बनवावे. सम्पत्तिला आपल्या व आपल्या मुलाबाळांच्या गरजा भागविल्यानंतर योग्य मर्यादे पर्यंतच साठवणे उचित आहे. यासाठी की पुढील गरजाही भागत रहाव्यात. परंतु खजीन्यांच्या स्वरूपात जमा करणे उचित नाही, विशेष करून अशा स्थितीत की जेव्हा ईश्वराचे दास उपासमारीला तोंड देत असतील किंवा अत्याधिक प्रमाणात गरजवंत असतील अथवा धर्माचा प्रसार व सामाजिक निकडी भागविण्यासाठी धनाची नितांत गरज असावी.

मिस्र देशात जेव्हा हजरत मूसा इस्लामचे आवाहन घेऊन उभे राहीले तेव्हा बनी इस्राईलची आर्थिक स्थिती अगदी खालवलेली होती. तेव्हा अशा बिकट प्रसंगी कारून ने आपले खजीने अल्लाहच्या धर्मासाठी व आपला जनसमूह बनी इस्राईलच्या मदतीसाठी खुले करावयास होते आणि या सत्कर्मास आखिरतच्या यशाचे साधन बनविले पाहीजे होते परंतु तो पूंजीवादी बनला आणि जे काही धन खर्ची घातले ते ही प्रदर्शनीच्या कामांवर.

या व या सारख्या इतर आयतींवरून ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की इस्लाम या गोष्टीस अनुमति देत नाही की धन जमा करून तिजोऱ्या भरलया जाव्यात अथवा बैंक बॅलन्सच्या रूपाने धनाचा मोठा ढीग सुरक्षित ठेवला जावा. हा पूंजीवाद होय, ईश-भक्ति नव्हे. एखादा ईश-भक्त व आखिरतला आपले खरे ध्येय समजणारा मनुष्य धनाचा ढीग रचून काय करील? हे काम केवळ तोच माणूस करू शकतो ज्याचे ध्येय फक्त 'इहलोक' आहे अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तौबा टीप-६८

१४८. याचा हा अर्थ नव्हे की ऐहीक कमाई जरूर करा. कारण एखाद्या श्रीमंताला हे सांगण्याची गरज नाही किंबहुना याचा अर्थ असा की या गोष्टीस विसरू नका की ऐहीक कमाईत तुमचा हिस्सा फार अल्प प्रमाणात आहे. ऐहीक लाभ काही दिवसांपुरतेच आहे. आणि तुम्हाला मिळालेल्या धन सम्पत्तित तुमचा हिस्सा तुमच्या आपल्या गरजेनुसारच आहे. बाकी सर्व अल्लाहच्या दासांच्या गरजा भागविण्यासाठी व धार्मिक हेतुंची पूर्तता करण्यासाठी खर्च करावयाचा आहे. सम्पत्ति विषयीचा हा दृष्टिकोन भांडवलशाही (Capital-ism) ची पाळी मुळी खणून काढतो.

१४९. म्हणजे ज्या प्रकारे अल्लाहने तुमच्याशी ही भलाई केली की तुम्हाला धनाढ्य केले त्या प्रकारे तुम्हीही त्याच्या दासांशी भलाईचा व्यवहार करा आणि त्यांची गरीबी व दारिद्र्य दूर करण्या करीता मोकळ्या मनाने धन खर्च करा.

१५०. उत्पातचा अर्थ बिघाड असा ही आहे आणि या ठिकाणी उत्पाताशी अभिप्रेत तो बिघाड होय जो समाजाच्या श्रद्धा, नैतिकता, अर्थव्यवस्था, संस्कृति व राजकारणात निर्माण केला जातो. भांडवलदारांची सम्पत्ति समाजाच्या बिघाडाचे फार मोठे साधन बनते. यास्तव आजच्या काळातले कारून देखील समाजा करीता मूळव्याध बनले आहेत.

७८. तो म्हणाला, हे सर्व काही मला आपल्या स्वतःच्या ज्ञानामुळे लाभले आहे.[१५१] काय त्याला हे माहीत नव्हते की यापूर्वी अल्लाहने किती तरी जन समूहांना नष्ट केले आहे, जे सामर्थ्यात याहून अधिक व समुदायात याहून विशाल होते.[१५२] आणि अपराध्यांना त्यांच्या अपराधांविषयी विचारले जात नाही.[१५३]

قَالَ إِنَّمَآ أُوتِيتُهُۥ عَلَىٰ عِلْمٍ عِندِىٓ ۚ أَوَلَمْ يَعْلَمْ أَنَّ ٱللَّهَ قَدْ
أَهْلَكَ مِن قَبْلِهِۦ مِنَ ٱلْقُرُونِ مَنْ هُوَ أَشَدُّ مِنْهُ قُوَّةً وَأَكْثَرُ
جَمْعًا ۚ وَلَا يُسْـَٔلُ عَن ذُنُوبِهِمُ ٱلْمُجْرِمُونَ ﴿٧٨﴾

७९. मग तो आपल्या पूर्ण थाट वैभवासह आपल्या जन समूहा समोर निघाला.[१५४] जे लोक ऐहीक जीवनाचे अभिलाषी होते, ते म्हणू लागले, आम्हाला ही तेच काही मिळाले असले जे कारूनला मिळाले आहे, तर किती बरे झाले असते. हा तर मोठा भाग्यशाली आहे.[१५५]

فَخَرَجَ عَلَىٰ قَوْمِهِۦ فِى زِينَتِهِۦ ۖ قَالَ ٱلَّذِينَ يُرِيدُونَ ٱلْحَيَوٰةَ
ٱلدُّنْيَا يَٰلَيْتَ لَنَا مِثْلَ مَآ أُوتِىَ قَٰرُونُ
إِنَّهُۥ لَذُو حَظٍّ عَظِيمٍ ﴿٧٩﴾

८०. परंतु ज्या लोकांना ज्ञान प्रदान केले गेले होते ते म्हणाले, खेद आहे तुमच्या बाबत ! अल्लाहचा मोबदला अधिक चांगला आहे त्याच्या करीता जो ईमान बाळगील व सत्कर्म करील. आणि ही सम्पत्ति सहनशीलता पाळणाऱ्यांनाच लाभते.[१५६]

وَقَالَ ٱلَّذِينَ أُوتُوا۟ ٱلْعِلْمَ وَيْلَكُمْ ثَوَابُ ٱللَّهِ خَيْرٌ لِّمَنْ
ءَامَنَ وَعَمِلَ صَٰلِحًا ۚ وَلَا يُلَقَّىٰهَآ إِلَّا ٱلصَّٰبِرُونَ ﴿٨٠﴾

८१. शेवटी आम्ही त्याला व त्याच्या घराला जमीनीत धसविले.[१५७] मग कोणताही समूह असा नव्हता, ज्याने अल्लाहच्या विरोधात त्याची मदत केली असती आणि ना तो स्वतः आपले रक्षण करू शकला.[१५८]

فَخَسَفْنَا بِهِۦ وَبِدَارِهِ ٱلْأَرْضَ فَمَا كَانَ لَهُۥ مِن فِئَةٍ يَنصُرُونَهُۥ
مِن دُونِ ٱللَّهِ وَمَا كَانَ مِنَ ٱلْمُنتَصِرِينَ ﴿٨١﴾

८२. आणि तेच लोक जे गेल्या दिवशी त्याच्या स्थानाची इच्छा करीत होते, म्हणू लागले, काय प्रकोप ! अल्लाह आपल्या दासांपैकी ज्याच्यासाठी इच्छितो, आजीविका व्यापक करतो व ज्यास इच्छितो मोजके देतो. जर अल्लाहने आमच्यावर उपकार केला नसता तर आम्हालाही धसवून टाकले असते. हाय प्रकोप ! काफीर यश प्राप्त करीत नाहीत.[१५९]

وَأَصْبَحَ ٱلَّذِينَ تَمَنَّوْا۟ مَكَانَهُۥ بِٱلْأَمْسِ يَقُولُونَ وَيْكَأَنَّ ٱللَّهَ
يَبْسُطُ ٱلرِّزْقَ لِمَن يَشَآءُ مِنْ عِبَادِهِۦ وَيَقْدِرُ ۖ
لَوْلَآ أَن مَّنَّ ٱللَّهُ عَلَيْنَا لَخَسَفَ بِنَا ۖ وَيْكَأَنَّهُۥ
لَا يُفْلِحُ ٱلْكَٰفِرُونَ ﴿٨٢﴾

१५१. म्हणजे मी ही सम्पत्ति आपल्या ज्ञान व हुनरद्वारा प्राप्त केली आहे. ही काही अल्लाहने प्रदान केली नाही की माझ्यासाठी त्याच्याशी कृतज्ञता दर्शविणे आवश्यक ठरावे.

काफिरांच्या वैचारीक शैली अशीच असते. प्राप्त झालेल्या सम्पत्तिस ते आपल्या पात्रतेचा व गुणविशेषांचा परिणाम समजतात मग त्यावर माकड चेष्टा करू लागतात वस्तुत: किती तरी योग्य माणसे अशी आहेत. जी धन-संपादनात असफल राहतात आणि कित्येक कमी पात्रता बाळगणारे असे आहेत जे धनवान बनतात. हे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की धन सम्पत्ति अल्लाहने प्रदान केल्यास लाभते केवळ आपल्या अक्कल हुशारीमुळे व हुनरबाजीमुळे नव्हे.

१५२. म्हणजे अशी कुफ्र युक्त गोष्ट बोलतांना त्याला आठवण राहीली नाही की ज्या जन-समूहांना आपल्या सामर्थ्य व समुदायाचा अभिमान होता त्यांचा काय शेवट झाला? काय याला आद व समूदचे वृत्तांत ठाऊक नाहीत? जे आपल्या कलानैपुण्यावर व मनुष्य-बळावर मोठा अभिमान बाळगत होते. पण कशा प्रकारे नाश पावले! मग हा त्याच वर्तनाचा अंगिकार करून कशा प्रकारे स्वत:ला अजाब (ईश-शिक्षे) पासून सुरक्षित समजतो.

१५३. म्हणजे जेव्हा एखाद्या गुन्हेगार जन-समूहाच्या नाशाची वेळ येऊन ठेपते तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यास त्याच्या अपराधांबाबत विचारीत नाही किंबहुना त्याचा क्षणार्धात नायनाट करून टाकतो. कारण जेव्हा त्यांची सवड संपली तर ते आपल्या अपराधापायी शिक्षा भोगण्यास पात्र ठरले. जर यांना विचारले गेले तर ते काही-ना-काही सबब पुढे करतील आणि शिक्षा कोणत्याही परिस्थितीत टळू शकत नाही.

१५४. म्हणजे एके दिवशी कारूनने आपल्या जन समूहा समोर आपला सर्व थाट माट दाखविला जेव्हा तो आपल्या लखलखत्या पोषाखात आपल्या नोकर चाकरांसमवेत मिरवणुकीच्या स्वरुपात निघाला व आपल्या धन स्म्पत्तिचे प्रदर्शन करीत लोकांपुढून जाऊ लागला तेव्हा हे दृश्य मोठे मनमोहक होते.

१५५. असे बोलणारे बनी इस्राईल (वशांचे) च होते ज्यांच्या मनावर भौतिकवादाचा पगडा बसला होता. त्यांनी जेव्हा कारूनची ही भव्य मिरवणूक पाहिली तर त्याच्या वैभव थाटाने मत्रमूग्ध झाले व म्हणू लागले की धन सम्पत्तिची ही विपुलता ज्यास लाभली आहे तो मोठा भाग्यवान आहे. आम्हालाही हे सर्व काही मिळाले असते तर ! आज देखील मोठ मोठ्या धनिकांच्या थाट वैभवास पाहून लोकांच्या मनात अशाच भावना उचंबळू लागतात.परंतु यावरून हे दिसून येते की त्याच्या दृष्टीने सद्‌भाग्य व दुर्भाग्य आणि यश व अपयश यांचे स्तर कोणते आहे.

१५६. ज्ञानाशी अभिप्रेत वास्त-ज्ञान होय म्हणजे ज्यांची दृष्टि आखिरत (मरणोत्तर जीवना)वर होती. त्यांनी या भौतिक वाद्यांच्या विचार सरणी बद्दल खेद व्यक्त करीत म्हटले की खरे यश धन सम्पत्तिची विपुलता नाही, किंबहुना ते चिरकाल टिकणारे इनाम होय जे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे सदाचारी मोमीन (ईमानधारक) दासांना लाभणार आहे. या इनामास पात्र होण्यासाठी इहलोकात सहनशीलता आवश्यक आहे, म्हणजे आखिरतला ध्येय उद्दिष्ट ठरवून सत्त्यावर निश्चल राहणे व उचित साधनांनी जे काही लाभेल त्यावर संतोष बाळगणे जो मनुष्य आपल्या अंगी हा गुणधर्म आणील तोच खऱ्या अर्थाने मोठा भाग्यशाली होय.

यावरून हे दिसले की मिस्र देशात बनी इस्राईल वशांत विकृत वृत्तीचे ऐहीक सुखोपभोगामागे धावणारे लोकही होते. व असे सदाचारी ईमानधारक देखील ज्यांनी आखिरतला खरोखर आपले ध्येय उद्दिष्ट बनविले होते. आजच्या काळातील मुसलमानांमध्येही अशाच प्रकारे दोन्ही प्रकारचे लोक आढळून येतात.

१५७. म्हणजे कारूनवर अल्लाहचा प्रकोप अशा स्वरुपात झाला की तो आपल्या घरासह जमीनीत धसविला गेला. अर्थात ते घर, ज्यात त्याने आपले खजीने जमा करून ठेवले होते. त्याची कबर बनले.

कारूनची बोधदायक परिणती एका बंडखोर व अत्याचारी भांडवलदाराची परिणती होय. जी यावच्चंद्र दिवाकरौ लोकांकरीता बोध-चिन्ह होय जणू सर्वश्रेष्ठ अल्लाहने अखिरतच्या ज्या अजाब (शिक्षे) ची एक झळक या जगातच लोकांना दाखवून दिली अशासाठी की त्यांनी भांडवलवाद थांबवावा जो माणसाला ईश्वराचा द्रोही व ऐहीकवादी बनवितो.

१५८. म्हणजे जेव्हा अल्लाहची शिक्षा अवतरते तेव्हा समस्त आधार व्यर्थ ठरतात ना अगदी जवळच्या सहकाऱ्यांना हे शक्य असते की त्याची काही मदत केली जावी आणि ना शासनाच्या अवाक्यात व ना त्याला स्वत:ला हे शक्य असते की आपला बचाव करावा.

१५९. बनी इस्राईलच्या त्या समूहाने ज्यावर ऐहिकता प्रभावशाली होती. कारूनच्या या शोकांतिकेपासून बोध प्राप्त केला. त्यांना जाणीव झाली की हे धनाढ्य व भांडवलदार जे आपल्या थाटाचा व वैभवाचा मनाला भुरळ पाडील असा देखावा करतात,हेवा वाटण्या जोगे नाहीत, किंबहुना अल्लाह ज्यास इच्छितो विपुल धनसंपदा प्रदान करतो व ज्यास इच्छितो मोजून मापून देतो. यासाठी की त्याची कसोटी घेतली जावी. यासतव एखाद्याचे खूप श्रीमंत असणे त्याच्या यशाची हमी नव्हे.

८३. हे आखिरतचे घर आम्ही त्या लोकांकरीता खास ठरवू जे जमीनीवर मोठेपणा इच्छित नाही आणि ना उत्पात करू इच्छितात.आणि कर्म फळाची भलाई अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांकरीताच आहे.[१६०]

تِلْكَ الدَّارُ الْاٰخِرَةُ نَجْعَلُهَا لِلَّذِيْنَ لَا يُرِيْدُوْنَ عُلُوًّا
فِي الْاَرْضِ وَلَا فَسَادًا ۭ وَالْعَاقِبَةُ لِلْمُتَّقِيْنَ ۸۳

८४. जो मनुष्य भलाई घेऊन येईल त्याच्यासाठी याहून अधिक चांगली भलाई आहे. आणि जो वाईटपणा घेऊन येईल तर वाईटपणा करणाऱ्यांना मोबदल्यात तेच काही लाभेल जे ते करीत राहीलेत.[१६१]

مَنْ جَاۗءَ بِالْحَسَنَةِ فَلَهٗ خَيْرٌ مِّنْهَا ۚ وَمَنْ جَاۗءَ بِالسَّيِّئَةِ فَلَا
يُجْزَى الَّذِيْنَ عَمِلُوا السَّيِّاٰتِ اِلَّا مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ۸۴

८५. नि:संशय ज्याने तुमच्यावर कुरआन अनिवार्य केले आहे, तो तुम्हाला एका उत्कृष्ट परिणती प्रत पोहचवील.[१६२] सांगा, माझा पालनकर्ता चांगल्या प्रकारे जाणतो की कोण मार्गदर्शन घेऊन आला आहे व कोण उघड मार्गभ्रष्टतेत पडला आहे.[१६३]

اِنَّ الَّذِيْ فَرَضَ عَلَيْكَ الْقُرْاٰنَ لَرَاۗدُّكَ اِلٰى مَعَادٍ ۭ
قُلْ رَّبِّيْٓ اَعْلَمُ مَنْ جَاۗءَ بِالْهُدٰى وَمَنْ
هُوَ فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ۸۵

८६. तुम्ही या गोष्टीची आशा बाळगत नव्हते की ग्रंथ तुमच्यावर अवतरीत केला जाईल. परंतु ही तुमच्या पालनकर्त्याची कृपा होय.[१६४] यास्तव तुम्ही काफिरांचे समर्थक बनू नका.[१६५]

وَمَا كُنْتَ تَرْجُوْٓا اَنْ يُّلْقٰٓى اِلَيْكَ الْكِتٰبُ اِلَّا رَحْمَةً
مِّنْ رَّبِّكَ فَلَا تَكُوْنَنَّ ظَهِيْرًا لِّلْكٰفِرِيْنَ ۸۶ۡ

८७. आणि या लोकांनी तुम्हास अल्लाहच्या आयतींपासून रोखता कामा नये यानंतर की त्या तुमच्यावर अवतरीत केल्या जाव्यात.[१६६] तुम्ही आपल्या पालनकर्त्याच्या अनुरोधाने आवाहन करा आणि अनेकेश्वरवाद्यांमध्ये कदापि सामील होऊ नका.

وَلَا يَصُدُّنَّكَ عَنْ اٰيٰتِ اللّٰهِ بَعْدَ اِذْ اُنْزِلَتْ اِلَيْكَ
وَادْعُ اِلٰى رَبِّكَ وَلَا تَكُوْنَنَّ مِنَ الْمُشْرِكِيْنَ ۸۷ۚ

८८. आणि अल्लाह सोबत अन्य कोणत्या ही उपास्यास (देवास) साद घालू नका त्याच्या खेरीज कोणीही उपास्य नाही. त्याच्या अस्तित्वाशिवाय प्रत्येक वस्तू नाश पावणार आहे. [१६७] निर्णयाचा अधिकार त्यालाच आहे.[१६८] आणि तुम्ही सर्व त्याच्याचकडे परतविले जाल.[१६९]

وَلَا تَدْعُ مَعَ اللّٰهِ اِلٰهًا اٰخَرَ ۘ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۣ كُلُّ شَيْءٍ
هَالِكٌ اِلَّا وَجْهَهٗ ۭ لَهُ الْحُكْمُ وَاِلَيْهِ تُرْجَعُوْنَ ۸۸ۧ

१६०. म्हणजे आखिरतचे यश अशाच लोकांकरीता खास असेल जे गर्वोन्मत होऊन जगात 'मोठे' बनून राहू इच्छित नाही आणि ना मानव-समाजात बिघाड निर्माण करू इच्छितात. किंबहुना ईश-भयाचे वर्तन अंगिकारतात.

स्पष्ट झाले की गर्व आणि दुराचारी कृत्ये,तकवा (ईश भय व दुष्कर्मांपासून अलिप्तता) याच्या अगदी उलट आहे. जर मनुष्य आखिरतचे यश इच्छित असेल तर त्याने स्वत:ला अल्लाहच्या दास्यत्व स्थानावरच राखले पाहीजे. अशाने ताठ होण्याचा विचार ही त्याच्या मनाला शिवणार नाही. अल्लाहच्या इतर दासांशी न्यायपूर्ण वर्तन अंगिकारून, त्यांच्या खऱ्या यश समुद्धीची कार्ये पार पाडली पाहीजेत.

आज मानव समाजाची दशा मोठी विचित्र आहे. प्रत्येक माणसाच्या अंगात 'मोठेपणा'चे भूत संचारले आहे 'लहानपण' बाळगून राहण्यास कोणीच तयार नाही. श्रीमंत लोक केवळ मोठेपणाने आपले धन सढळ हस्ते खर्च करतात व नेते मंडळी आपल्या राजकीय साधनांचा याच हेतुस्तव वापर करतात. याच कारणास्तव आज मानव समाजात बिघाडच बिघाड आहे आणि सुधारणेचे कोणतेही काम होत नाही.

१६१. जगात माणसाने सत्कृत्य केलेले असो किंवा दुष्कृत्य, तो ते आपल्या सोबत नेणार आहे व कियामतीच्या दिवशी त्याच्यासह हजर होणार आहे. चांगल्या कामाचा मोबदला सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या अनुग्रहाने कितीतरी अधिक चांगला देईल. परंतु वाईट कामाचा मोबदला वाईट कामाच्या प्रमाणातच दिला जाईल आधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २९७ व सूरह नमल टीप १३४.

१६२. हे पैगंबराना संबोधून आहे. त्यांना हे समाधान दिले गेले आहे की ज्या अल्लाहने तुमच्यावर कुरआनाचे अनुसरण करण्याची व त्यास लोकांसमोर सादर करण्याची जबाबदारी टाकली आहे, तुमच्या विरोधकांच्या इच्छेविरूद्ध तुम्हाला जगात ही चांगल्या परिणतीस पोहचविल, व आखिरत मध्ये ही. यास्तव जगात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ज्या चांगल्या परिणतीस पोहचले ती एक स्पष्ट हकीगत आहे व कुरआनाच्या सत्यतेचा पुरावा देखील.

१६३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ना तर पैगंबर पदाची अपेक्षा बाळगून होते आणि ना त्यांना या गोष्टीची कल्पना होती कुरआनासारखा दिव्य ग्रंथ आपल्यावर अवतरीत केला जाईल. किंबहुना अकस्मात त्यांच्यावर ईश-संदेश अवतरला व त्यांना पैगंबर पदाने सम्मानित केले गेले अर्थात हे त्यांच्या सत्य पैगंबर असण्याचे स्पष्ट प्रमाण होय.

१६४. म्हणजे हा ग्रंथ अल्लाहने तुमच्या मागणी वरून पाठविला नाही, किंबहुना यासाठी पाठविला की त्याच्या कृपेस या गोष्टीची निकड जाणवली.

१६५. म्हणजे तुम्ही काफीरांच्या बहकाविण्यास बळी पडू नका. हे पैगंबरांना उद्देशून फर्माविले गेले आहे परंतु हेतु काफीरांना हे स्पष्ट करण्याचा होता की तुम्ही पैगंबराकडून ही अपेक्षा मुळीच बाळगू नका की ते तुमच्या भुलावणीस बळी पडतील.

१६६. म्हणजे विरोधाची पर्वा न करता तुम्ही अल्लाहच्या आयती (वचने) लोकांना ऐकवा व त्यांचे यथायोग्य अनुसरण करा. काफिरांशी अशी उदारता ही पाळू नका की अल्लाहचे आदेश यथायोग्य पोहचविण्यात व त्यानुसार आचरण करण्यात नरमी व सवडी निवडी व्यक्त करू लागावे.

१६७. म्हणजे अल्लाह व्यतिरिक्त अशी कोणतीही गोष्ट वा वस्तू नाही जी आपल्या अस्तित्वास कायम राखणारी असावी, किंबहुना अल्लाह ज्या गोष्टीस वा वस्तुस जोपावेतो कायम राखू इच्छितो तोपर्यंत ती टिकते अन्यथा नाश पावते.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे सृष्टी निर्मितीचे वैशिष्ट्य ठार व नष्ट होणे आहे. जेव्हा की सृष्टाचे वैशिष्टय चिरकाल कायम राहणे होय. यास्तव अल्लाह हाच अपरिहार्य अस्तित्व बाळगणारा होय आणि ज्याअर्थी त्याचे अस्तित्व चिरकाली न आहे तर तोच एकटा ईश्वर आहे व तोच एकमेव उपास्य. दुसरे कोणतेही अस्तित्व चिरकाल टिकून राहणारे नाही तर ते ईश्वर कसे व उपास्य कसे ठरू शकते?

१६८. या ठिकाणी विशेषत्वाने संकेत मोबदला व शिक्षा यांच्या निर्णयाकडे आहे की कियामतीच्या दिवशी अल्लाहच आपल्या दासांच्या दरम्यान फैसला करील.

१६९. म्हणजे तुम्हा सर्वांना अल्लाह समोरच उपस्थित केले जाईल.

# सूरह
# अल् अन्कबूत

# २९. अल् अन्कबूत

**नाव :** आयत क्र. ४१ मध्ये अल्लाह खेरीजच्या उपास्यांना कार्य साधक बनविणाऱ्यांना अन्कबूत म्हणजे कोष्टीची उपमा दिली गेली आहे ज्याचे घर सर्वाधिक जीर्ण असते. तद्नुषंगाने या सूरहचे नाव 'अन्कबूत असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे, आणि मजकुरांवर विचार केल्याने असे दिसून येते की ही सूरह हब्श (ॲबिसीनिया) कडे स्थलांतर झाल्यानंतर काही वर्षांनी अवतरली असेल.

**मध्यवर्ती कल्पना :** जे लोक ईमान बाळगून इस्लाम धर्मात प्रवेश करतात. त्यांना ज्या कसोटी घेणाऱ्या परिस्थितीतून जावे लागते ती लक्षात घेता त्यांचा धीर वाढविण्याची उपाय योजना आणि सहनशीलता व स्थैर्यशील राहण्याचा उपदेश.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते १३ मध्ये त्या लोकांना मार्गदर्शन केले गेले आहे ज्यांना ईमान बाळगण्यामुळे सतावले जाते व ज्यांना वेगवेगळ्या कसोटीतून जावे लागते.

आयत क्र. १४ ते ४० मध्ये अनेक पैगंबरांच्या चारीत्र्याचा हा पैलू सादर केला गेला आहे की ते कशा प्रकारे त्या कष्ट-यातनांना तोंड देत राहीले ज्या त्यांच्या जनसमूहांनी त्यांना दिल्या, व कसोटीत कशा प्रकारे सत्य निष्ठ राहीलेत.

आयत क्र. ४१ ते ४४ मध्ये अनेकेश्वर वाद्यांकरीता वैचारिक आवाहन आहे.

आयत क्र. ४५ ते ६० मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या शंका-कुशंकांचे निवारण केले गेले आहे व ईमान बाळगणाऱ्यांना परिस्थितीच्या अनुरोधाने मार्गदर्शन ही केले गेले आहे.

आयत क्र. ६१ ते ६८ मध्ये (मुसल्लेमात) सर्वमान्य हकीगतींना सादर करून एकेश्वर वादाकडे विचारसरणीना वळविले गेले आहे.

आयत क्र. ६९ समोरोपाची आयत होय ज्यात अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्टा करणाऱ्यांना हे समाधान दिले गेले आहे. की त्यांना अल्लाहतर्फे सुबुद्धि व त्याची साथ प्राप्त होईल.

# २९. सूरतुल अन्कबूत

سُورَةُ الْعَنْكَبُوتِ

अनुवाद (आयती ६९)

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

१. अलिफ. लाम. मीम. [१]

الٓمٓ ١

२. काय लोकांनी हे समजून घेतले आहे की त्यांना असे म्हणण्यावर सोडून दिले जाईल की आम्ही ईमान बाळगले आणि त्यांना आजमाविले जाणार नाही ?[२]

أَحَسِبَ النَّاسُ أَن يُتْرَكُوٓا أَن يَقُولُوٓا
ءَامَنَّا وَهُمْ لَا يُفْتَنُونَ ٢

३. वस्तुतः जे लोक यांच्या पूर्वी होऊन गेलेत त्यांची आम्ही कसोटी घेतली आहे [३] तेव्हा अल्लाह निश्चित त्या लोकांना जाणून घेईल जे सच्चे आहेत त्या लोकांनाही जे खोटारडे आहेत.

وَلَقَدْ فَتَنَّا الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ فَلَيَعْلَمَنَّ اللَّهُ
الَّذِينَ صَدَقُوا وَلَيَعْلَمَنَّ الْكَٰذِبِينَ ٣

४. काय त्या लोकांनी, जे दुष्कृत्य करीत आहेत, हे गृहीत धरले आहे की ते आमच्या काबूतून बाहेर जातील? फार वाईट फैसला आहे जो ते करीत आहेत.[५]

أَمْ حَسِبَ الَّذِينَ يَعْمَلُونَ السَّيِّـَٔاتِ أَن يَسْبِقُونَا ۚ
سَآءَ مَا يَحْكُمُونَ ٤

५. जो कोणी अल्लाहच्या भेटीची अपेक्षा बालगत असेल तर (त्याने जाणून घेतले पाहिजे की) अल्लाहची निर्धारीत केलेली वेळ निश्चित येणार आहे.[६] आणि तो सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.[७]

مَن كَانَ يَرْجُوا لِقَآءَ اللَّهِ فَإِنَّ أَجَلَ اللَّهِ لَءَاتٍ ۚ
وَهُوَ السَّمِيعُ الْعَلِيمُ ٥

६. आणि जो (अल्लाहच्या मार्गात) प्रयत्न (परिश्रम) करतो तो आपल्याच हितासाठी प्रयत्न करतो. अल्लाह इहलोक वासींपासून निःस्पृह आहे. [८]

وَمَن جَٰهَدَ فَإِنَّمَا يُجَٰهِدُ لِنَفْسِهِۦٓ ۚ
إِنَّ اللَّهَ لَغَنِيٌّ عَنِ الْعَٰلَمِينَ ٦

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १ व सूरह युनूस टीप क्र. १ इमाम राजी यांनी या प्रसंगी सांकेतिक अक्षरांबाबत एक महत्वपूर्ण मुद्दा निवेदिला आहे आणि तो असा की ही अक्षरे संबोधितास सावध करतात यासाठी की त्याने गफलतीतून जागे व्हावे. बुद्धिमान मनुष्य आपला उद्देश्य मांडण्यापूर्वी संबोधितांचे लक्ष आपल्याकडे वेधवितो ही अक्षरे देखील सार्थ वाणीच्या आदी आले आहेत. यासाठी की यांच्या द्वारा संबोधितास सावध केले जावे. यास्तव जेव्हा या अक्षरांना वेगवेगळे करून वाचले जाते तेव्हा त्यांचा स्वर सचेत करणारा असतो व याने वाणीत प्रभाव निर्माण होतो. (पहा तफसीर कबीर खंड २५ पृ.२६)

या सूरह मध्ये अलिफ (ا) चा संकेत ईमानकडे आहे, ज्याचा उल्लेख वारंवार केला गेला आहे. उदाहरणार्थ आयत क्र. २, ७, ९, ११, १२, २४, ४५, ४६ इत्यादी मध्ये.

लाम (ل) चा संकेत अल्लाहच्या मुलाखतीकडे आहे, ज्याचा उल्लेख आयत क्र. ५ व २३ मध्ये केला गेला आहे. आणि मीम (م) चा संकेत मुनाफीक (दांभिक) लोकांकडे आहे. ज्यांचा उल्लेख आयत क्र. ११ मध्ये केला गेला आहे. या खेरीज या सूरह मध्ये ठिकठिकाणी दांभिकतेवर अंकूश ठेवीत सच्चे ईमान धारकांची वैशिष्ट्ये सादर केली गेली आहेत.

२. संकेत त्या कसोटी घेणाऱ्या परिस्थितीकडे आहे. जिला कुरआन व पैगंबरावर ईमान बाळगणारे तोंड देत होते. मक्केचे काफिर त्यांना निरनिराळ्या प्रकारे यातना पोहचवित होते. येथे पावेतो की ते आपले घरदार व आपल्या देशाचा त्याग करण्यास विवश झाले होते. यास्तव व मुसलमानांचा एक समूह स्थलांतर करून हब्श (ऑबिसीनिया) येथे पोहचला होता. ही परिस्थिती लक्षात घेता काही लोकांच्या मनात हा प्रश्न उद्‌भवत होता की ईमान बाळगल्या नंतर परिस्थितीची ही प्रतिकूलता कशी? याच प्रश्नाचे उत्तर या प्रस्तावनेच्या आयतीमध्ये दिले गेले आहे.

या आयतीचा अर्थ असा की जर लोकांनी असे समजून घेतले आहे की इस्लाम धर्म कबूल केल्यानंतर त्यांच्या ईमान विषयक दाण्यास पारखण्याकरीता त्यांना कठीण परिस्थितीतून जावे लागणार नाही? तर हा त्यांचा भ्रम होय (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ३१०)

३. म्हणजे अल्लाहचा नियम हाच राहीला की ज्या काळातही लोक एखाद्या पैगंबरावर ईमान बाळगतात त्यांचे ईमान पारखून घेण्यासाी तो त्यांची कठीण परीक्षा घेत राहीला आहे. यास्तव जर आज कुरआन-ज्यांच्यावर अवतरले त्या पैगंबराच्या अनुयायींना सहनशीलतेची कसोटी घेणाऱ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे तर यात आश्चर्य ते कसले?

४. म्हणजे अल्लाह यांना कसोटीच्या भट्टीत टाकून पाहील की सोने अस्सल आहे कि नावापुरते. यांचे ईमान केवळ तोंडी स्विकृति होती कि मन:पूर्वक यांनी इस्लाम स्विकारला होता?

काफिरांच्या हातून जो त्रास ईमान बाळगणाऱ्यांना पोहचतो त्यावर जर ते सहनशीलता व निश्चलता पाळतात तर त्यांचे आपल्या ईमानाबाबत सच्चे व प्रामाणिक असणे सिद्ध होते. व या मार्गात ज्या समर्पण त्यांनी केले, त्यामुळे त्यांचे अल्लाहशी असलेले नाते दृढतम होते व त्यांच्या चारीत्र्यात परिपक्वता निर्माण होते. परंतु असे लोक, ज्यांनी सुज्ञपणे ईमान बाळगले नसेल, जेव्हा काफिरांच्या हातून सताविले जातात तेव्हा एकतर उघडपणे इस्लामकडे पाठ फिरवितात, किंवा इस्लामशी नावापुरताच संबंध ठेवतात. ते अल्लाह विषयी गैरसमज करून घेतात व त्याच्या धर्मीसाठी आत्मसमर्पण करण्याची कसलीही भावना त्यांच्या मनात जागत नाही. इस्लाम करीता कसलीही कार्यमग्नता न दाखवून ते काफिरांपासून आपल्या लाभांचे संरक्षण करुन घेतात. असे लोक, खरे पाहता निफाक (दांभिकता) ग्रस्त असतात. आणि अल्लाहजवळ ते आपल्या ईमान विषयक दाव्यात खोटे ठरतात. आज देखील जे लोक आपल्या वाडवडीलांच्या धर्माचा त्याग करुन इस्लाम धर्मात प्रवेश करतात त्यांना त्यांचेच आई-वडील, किंवा कुटुंबिय अथवा त्यांच्या संप्रदायातील लोकांच्या अत्याचाराचे निशाण व्हावे लागते. आणि जर एखादी मुलगी इस्लाम कबूल करते तर मग तिची धडगत नाही. परंतु या असल्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी ते लोक सज्ज असतात जे विचारपूर्वक इस्लाम धर्माचा अंगिकार करतात व ज्यांच्या मनात ईमानचा पूर्णत: शिरकाव झालेला असतो.

५. ही त्या लोकांना तंबी होय जे इस्लाम कबूल करणाऱ्यांवर अत्याचार करतात त्यांनी या भ्रमात राहू नये की अशा दहशती कारवाया करुन ते ईमान बाळगणाऱ्यांचा मार्ग रोखू शकतील, जेव्हा अल्लाहने त्यांना वर्चस्वशाली करण्याचा निर्णय घेतला असावा. त्यांनी हे चांगल्या प्रकारे समजून घ्यावे की ते अल्लाहच्या निर्णयास लागू होण्यापासून कदापि रोखू शकणार नाही आणि ना त्याच्या तावडीतून आपली सुटका करू शकतील.

६. अल्लाहच्या भेटीची आशा बाळगणाऱ्या ईमान धारकांना हे समाधान दिले गेले आहे की त्याने निर्धारीत केलीली भेटीची वेळ खचितच येईल अर्थात कियामतीचा दिवस, जेव्हा सर्वांना अल्लाह समोर हजर केले जाईल आणि ईमान बाळगणारे अल्लाहशी भेटून आनंदविभोर होतील की आपली मनोकामना पूर्ण झाली. अल्लाहशी भेटीचा हा आनंद जेव्हा हृदयात उचंबळू लागतो तेव्हा तो काफिरांच्या अत्याचार व अतिरेकाच्या विरोधात संरक्षणशक्ति निर्माण करतो आणि असा मनुष्य पर्वतासारखा आपल्या जागी निश्चल राहतो.

७. संकेत या गोष्टीकडे आहे की अल्लाह अत्याचार पिडीतांचे गाऱ्हणे ऐकतो आणि जाणतो की कोण अत्याचारी आहे व कोण अत्याचार पिडीत. आणि जेव्हा तो हे सर्व काही ऐकतो व जाणते तर तो दिवस का आणणार नाही ज्या दिवशी अत्याचार पिडीत ईमान धारकांचे गाऱ्हणे ऐकले जावे व अत्याचारी काफिरांना त्यांच्या दुष्परिणतीस पोहचविले जावे.

८. मूळ ग्रंथात जो शब्द वापरला गेला आहे तो मुजाहीदा पासून बनलेला आहे ज्याचा अर्थ अशी थडपड होय की जिच्यात माणसाने ध्येय प्राप्तीसाठी सर्व शक्ति लावावी आणि संघर्षरत होऊन अत्याधिक कष्ट सहन करावे. काही परिसिथिती मध्ये इस्लाम वर कायम राहण्यात, तो सत्यधर्म असण्याची ग्वाही देण्यात व त्याच्या आचरण विषय निकडी भागविण्यात परिस्थितीशी मोठा संघर्ष करावा लागतो व प्रत्येक प्रकारची आहुती द्यावी लागते. विशेषत: अशा लोकांना जे नव्याने इस्लाममध्ये दाखल झाले असावेत. या ठिकाणी या जीवापाड मेहनतीस, जी अल्लाहच्या मार्गात केली जावी मुजाहीदा (जेहाद) या अर्थाने घेतले गेले आहे व हे स्पष्ट केले गेले आहे की या धडपडीचा व समर्पणाचा लाभ त्या माणसालाच मिळेल जो धर्मासाठी मेहनत करतो व आहुती देतो, ज्यायोगे तो स्वत:ला अल्लाहची कृपा व त्याच्या ईनामास पात्र बनवितो. अल्लाहला यापासून कोणताही लाभ पोहचणार नाही कारण तो निस्पृह आहे, त्याला कसलीही गरज नाही.

ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले, त्यांच्या वाईट गोष्टी आम्ही त्यांच्यापासून दूर करू आणि त्यांना त्यांच्या आचरणाचा उत्कृष्ट मोबदला प्रदान करु.(अल-कुर्आन)

७. ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले, त्यांच्या वाईट गोष्टी आम्ही त्यांच्यापासून दूर करू आणि त्यांना त्यांच्या आचरणाचा उत्कृष्ट मोबदला प्रदान करु.[९]

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ لَنُكَفِّرَنَّ عَنْهُمْ
سَيِّاٰتِهِمْ وَلَنَجْزِيَنَّهُمْ اَحْسَنَ الَّذِيْ كَانُوْا يَعْمَلُوْنَ ۝٧

८. आम्ही माणसाला ताकीद केली आहे की आपल्या माता-पित्याशी सद्वर्तन कर. परंतु जर ते तुझ्यावर जोर टाकतील की तू माझ्या सोबत एखाद्यास सहभागी ठरवावे, जो सहभागी असण्याचे तुला काहीही ज्ञान नाही [१०] तर त्यांचे आज्ञापालन करू नकोस [११] माझ्याचकडे तुम्हा सर्वांना परतावयाचे आहे, मग मी तुम्हाला दाखवीन की तुम्ही काय करीत राहीलात.

وَوَصَّيْنَا الْاِنْسَانَ بِوَالِدَيْهِ حُسْنًا ۭ وَاِنْ جَاهَدٰكَ
لِتُشْرِكَ بِيْ مَا لَيْسَ لَكَ بِهٖ عِلْمٌ فَلَا تُطِعْهُمَا ۭ اِلَيَّ
مَرْجِعُكُمْ فَاُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ۝٨

९. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केलीत त्यांना आम्ही अवश्य सदाचारी लोकांमध्ये दाखल करु.[१२]

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ
لَنُدْخِلَنَّهُمْ فِي الصّٰلِحِيْنَ ۝٩

१०. लोकांमध्ये काही जण असेही आहेत जे म्हणतात आम्ही ईमान बाळगले परंतु जेव्हा अल्लाहच्या मार्गात सताविले जातात, तेव्हा लोकांकडून पोहचणाऱ्या त्रासास अल्लाहच्या अजाब (शिक्षे) प्रमाणे समजू लागतात.[१३] आणि जर तुमच्या पालनकर्त्या तर्फे मदत आली तर हेच लोक म्हणतील, आम्ही तर तुम्हा लोकांसोबतच होतो.[१४] काय अल्लाह लोकांच्या मन:स्थितीशी चांगल्या प्रकारे परिचीत नाही ?[१५]

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَّقُوْلُ اٰمَنَّا بِاللّٰهِ فَاِذَآ اُوْذِيَ
فِي اللّٰهِ جَعَلَ فِتْنَةَ النَّاسِ كَعَذَابِ اللّٰهِ ۭ وَلَىِٕنْ
جَاۗءَ نَصْرٌ مِّنْ رَّبِّكَ لَيَقُوْلُنَّ اِنَّا كُنَّا مَعَكُمْ ۭ اَوَلَيْسَ
اللّٰهُ بِاَعْلَمَ بِمَا فِيْ صُدُوْرِ الْعٰلَمِيْنَ ۝١٠

११. आणि अल्लाह खचितच हे जाणून घेतल्याशिवाय राहणार नाही की कोण ईमान धारक आहेत व कोण दांभिक आहेत.[१६]

وَلَيَعْلَمَنَّ اللّٰهُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَلَيَعْلَمَنَّ الْمُنٰفِقِيْنَ ۝١١

१२. आणि काफिर ईमान बाळगणाऱ्यांना म्हणतात की तुम्ही आमच्या मार्गाचे अनुसरण करा, आम्ही तुमचे अपराध आपल्यावर घेऊ.[१७] वास्तविक पाहता ते यांच्या अपराधांपैकी काहीही आपल्यावर घेणार नाहीत. ते नितांत खोटारडे आहेत.[१८]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا لِلَّذِيْنَ اٰمَنُوا اتَّبِعُوْا سَبِيْلَنَا
وَلْنَحْمِلْ خَطٰيٰكُمْ ۭ وَمَا هُمْ بِحٰمِلِيْنَ مِنْ خَطٰيٰهُمْ
مِّنْ شَيْءٍ ۭ اِنَّهُمْ لَكٰذِبُوْنَ ۝١٢

९. म्हणजे ईमान बाळगून सदाचाराचे जीवन व्यतीत करणाऱ्यांच्या चारित्र्यावर दुष्कृत्याचे जे कलंक लागले असतील ते सर्वश्रेष्ठ अल्लाह मिटवून टाकील व त्यांच्या सत्कर्मांची कदर करीतच तदनुषंगाने त्यांना उत्कृष्ट मोबदला देईल.

१०. म्हणजे एखाद्यास अल्लाहचा सहभागी ठरविणे ही वस्तुस्थितीच्या विरुद्ध बाब होय व जी गोष्ट वस्तुस्थितीच्या विरुद्ध असावी तिच्यावर श्रद्धा राखण्याचा अर्थ काय?

'ज्याचे तुला ज्ञान नाही'चा अर्थ असा की ज्या विषयी (हे मनुष्य ! ) तू जाणत नाहीस की खरोखर ह्या वस्तू ईश्वर आहेत, किंबहुना लोकांनी केवळ अटकळीने यांना ईश्वर बनविले आहे.

११. माता पित्यांशी सद्व्यहार करण्याची ताकीद, अल्लाहच्या शिकवणीचा नेहमीपासून भाग राहीला आहे. परंतु याचा हा अर्थ नव्हे की मातापित्यांच्या आज्ञापालनास, अल्लाहच्या आज्ञापालनाहून श्रेष्ठ समजून प्रधान्य द्यावे. समस्त अज्ञापालन अल्लाहच्या आज्ञपालना खालोखाल आहे. आणि अल्लाहची अवज्ञा करण्यासाठी निर्मितीचे आज्ञापालन मुळीच योग्य नव्हे. जर आई-वडील अल्लाह सोबत एखाद्यास सहभागी ठरविण्याचा वा कुफ्र (सत्य-विरोध) करण्याचा किंवा त्याच्या धर्माला (इस्लामला) कबूल न करण्याचा आदेश देतात तर अल्लाहने दर्शविलेला हा उघड गुन्हा आहे. आणि गुन्ह्याच्या कामांमध्ये आई-वडीलांची आज्ञा पाळण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. यास्तव या संबंधी त्यांचा कसला जोर-दाब मान्य करू नये.

हजरत सअद बिन अबी वकासची घटना आहे की त्यांनी ईमान बाळगल्या नंतर त्यांच्या मातेने त्यांच्यावर फार दबाव टाकला की त्यांनी इस्लाम धर्माचा त्याग करावा. येथपावेतो की तीने ही शपथ घेतली की ती ना त्याच्या बरोबर बोलेल, आणि ना अन्न-पाणी घेईल. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना या बाबतीत सांगितले तेव्हा पैगंबरांनी त्यांना आपल्या मातेशी सद्व्यवहार करण्याची ताकीद केली. यास्तव हजरत सअद आपल्या धर्मावर (ईस्लामवर) दृढ राहीले व शेवटी त्यांच्या मातेला आपली शपथ तोडावी लागली (पहा सहीह मुस्लिम किताबुल फजाईल)

१२. म्हणजे सदाचारी लोकांच्या मेळाव्यात दाखल करू जो आखिरत मध्ये यशस्वी होणारा समूह आहे.

१३. म्हणजे ईमान विषयक दावा करणारे लोक त्या त्रास-यातनेने घाबरुन जातात जी धर्म संदर्भात काफिरांकडून त्यांना पोहचते. अशा स्थितीत ते ईमान विषयक निकडींना दृष्टीआड करतात. आणि पैगंबर व ईमान बाळगणाऱ्या लोकांची साथ सोडतात. अशा प्रकारे ते धर्माच्या मार्गात ऐहीक संकटे ओढवून न घेता अल्लाहतर्फे दिल्या जाणाऱ्या शिक्षेस सहन करण्यास तयार होतात. वस्तुत: लोकांकडून पोहचणारा त्रास व यातना त्या अजाब (ईशशिक्षे) च्या तुलनेत काहीच नाही जी आखिरत मध्ये भोगावी लागेल.

आज कित्येक लोक इस्लामला योग्य समजून देखील केवळ एवढ्यासाठी त्याला कबूल करण्याचे टाळतात की या स्थितीत त्यांना आपल्या कुटुंबियांकडून किंवा आपल्या समाजाच्या लोकांकडून त्रास यातनांना तोंड द्यावे लगेल, राहीले इस्लाम कबूल न केल्याच्या स्थितीत आखिरतचा अजाब (ईश-शिक्षा) तर ही अवस्था जेव्हा उद्‌भवेल तेव्हा पाहीले जाईल. अशाप्रकारे ते अल्लाहच्या शिक्षेस, माणसांकडून दिल्या जाणाऱ्या त्रास यातने समान समजतात आणि म्हणून अल्लाहच्या भयंकर शिक्षेस सहन करण्यास तयार होतात. मात्र लोकांकडून पोहचणाऱ्या त्रास यातनेस सहन करण्यास तयार होत नाही.

१४. संकेत या गोष्टीकडे आहे की जेव्हा इस्लाम अल्लाहच्या मदतीने एक शक्तिशाली धर्म बनेल तर हेच लोक ज्यांनी अद्याप ईमान धारकांशी केवळ नावापुरता संबंध जोडण्यात समाधान बाळगले आहे मोठ्या अभिमानाने म्हणू लागतील की आम्ही तर तुमच्या सोबतच राहीलोत. म्हणजे मुसलमानांमध्ये सामील राहीलोत. अशा प्रकारे ते आयते क्रेडीत (Credit) मिळविण्याचा प्रयत्न करतील व या गोष्टीस विसरतील की कठीण काळात त्यांनी इस्लामला साथ मुळीच दिली नव्हती.

१५. संकेत या गोष्टीकडे आहे की या लोकांनी खऱ्या अंत:करणाने ईमान बाळगले नव्हते. जर त्यांनी मन:पूर्वक ईमान बाळगले असते तर इस्लामच्या समर्थनास्तव त्यांनी जरुर पुढाकार घेतला असता. कठीण परीक्षेत आपले वर्तन योग्य राखले असते व अल्लाहसाठी आत्मसमर्पणही केले असते.

१६. 'अल्लाह जाणून घेतल्याशिवाय राहणार नाही' याचा अर्थ अल्लाह निश्चित हे पाहील की कोण स्वत:ला प्रामाणिक व सच्चा ईमान धारक सिद्ध करून दाखवितो आणि कोण आपण मुनाफीक (दांभिक) असण्याचा पुरावा देतो. कसोटीची परिस्थिती मोमिन व मुनाफीक यांच्यातला फरक उघड करते.

स्पष्ट व्हावे की ईमान सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ तेच विश्वसनीय आहे जे उचित श्रद्धा व मनाच्या पुष्टीसह असावे. हे ईमान हृदयात एक खास कैफियत व खास नूर (तेज) निर्माण करते ज्यामुळे ईमान बाळगणाऱ्याचे संपूर्ण जीवन तेजोमय होते. याच्या उलट दांभिक श्रद्धेला व्यक्त तर करतो, परंतु त्याचे हृदय पुष्टी देत नाही, यास्तव त्याच्या मनात ईमान सुरवाती पासूनच नसते. याच कारणास्तव तो ईमान विषयक निकडींना पूर्ण करण्या करीता तयार नसतो. आणि ना त्याच्या जीवनात ईमानाचा प्रभाव दिसून येतो.

१७. हे मोठ्या लोकांचे म्हणणे आहे. ते लोकांना, विशेषत: आपल्या अधीन असलेल्या लोकांना म्हणतात की तुम्ही आमच्या धर्मानुसार आचरण करा व त्याला सोडून इस्लाम कबूल करू नका. ते हे ही म्हणतात, प्रतम तर कियामत वगैरे काही येणार नाही आणि समजा आलीच व त्या दिवशी कळाले की इस्लाम हाच सत्य धर्मा होता तर तुम्ही आमच्या धर्मास पत्करुन जे जे अपराध केले असतील त्यांची जबाबदारी आम्ही स्विकारु व तुमचे पाप आपल्या शिरावर घेऊ.

१८. म्हणजे कियामतीच्या दिवशी तो त्या लोकांचा गुन्हा ज्यांना ते आज आपल्या धर्मावर आचरण करण्याचा सल्ला देत आहेत आपल्या शिरावर घेण्याकरीता मुळीच तयार होणार नाहीत. ते खेटे बोलून लोकांना मुर्ख बनवीत आहेत.

आम्ही नूहला त्याच्या जन समूहाकडे पाठविले आणि तो त्यांच्या दरम्यान हजार वर्षाला पन्नास वर्षे कमी पर्यंत राहीला. मग त्यांना वादळाने तावडीत घेतले अशा अवस्थेत की ते अत्याचारी होते. परंतु आम्ही त्याला व नौकावाल्यांना मुक्ति दिली आणि त्यास इहलोकीयां करीता मोठी निशाणी बनविले.(अल-क़ुर्आन)

१३. आणि (असे हमखास घडेल की) ते आपले भार उचलतील व आपल्या ओझ्यासोबत काही इतर ओझी देखील [१९] आणि जे असत्य ते गढत आहेत त्याविषयी कियामतीच्या दिवशी त्यांना निश्चित विचारणा केली जाईल.[२०]

وَلَيَحْمِلُنَّ أَثْقَالَهُمْ وَأَثْقَالًا مَّعَ أَثْقَالِهِمْ ۖ وَلَيُسْأَلُنَّ يَوْمَ
الْقِيَامَةِ عَمَّا كَانُوا يَفْتَرُونَ ﴿١٣﴾

१४. आम्ही नूहला त्याच्या जन समूहाकडे पाठविले [२१] आणि तो त्यांच्या दरम्यान हजार वर्षाला पन्नास वर्षे कमी पर्यंत राहीला.[२२] मग त्यांना वादळाने [२३] तावडीत घेतले अशा अवस्थेत की ते अत्याचारी होते.[२४]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا نُوحًا إِلَىٰ قَوْمِهِ فَلَبِثَ فِيهِمْ أَلْفَ سَنَةٍ
إِلَّا خَمْسِينَ عَامًا فَأَخَذَهُمُ الطُّوفَانُ وَهُمْ ظَالِمُونَ ﴿١٤﴾

१५. परंतु आम्ही त्याला व नौकावाल्यांना मुक्ति दिली [२५] आणि त्यास इहलोकीयां करीता मोठी निशाणी बनविले.[२६]

فَأَنجَيْنَاهُ وَأَصْحَابَ السَّفِينَةِ وَجَعَلْنَاهَا آيَةً لِّلْعَالَمِينَ ﴿١٥﴾

१६. आणि इब्राहीमला पाठविले [२७] जेव्हा तो आपल्या जन समूहास म्हणाला अल्लाहची उपासना करा व त्याचे भय बाळगा.[२८] हे तुमच्या साठी अधिक चांगले आहे जर तुम्ही जाणाल.[२९]

وَإِبْرَاهِيمَ إِذْ قَالَ لِقَوْمِهِ اعْبُدُوا اللَّهَ وَاتَّقُوهُ ۖ ذَٰلِكُمْ
خَيْرٌ لَّكُمْ إِن كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿١٦﴾

१७. तुम्ही अल्लाहला सोडून मूर्त्यांची पूजा अर्चना करतात [३०] आणि तुम्ही खोटे रचतात.[३१] तुम्ही अल्लाह ऐवजी ज्यांची आराधना करता ते तुम्हाला आजीविका देण्याचा अधिकार बाळगत नाही. तेव्हा अल्लाह कडूनच आजीविका मागा.[३२] व त्याचीच उपासना करा व त्याच्याशी कृतज्ञ व्हा.तुम्ही त्याच्याच कडे परतविले जाल.[३३]

إِنَّمَا تَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّهِ أَوْثَانًا وَتَخْلُقُونَ
إِفْكًا ۚ إِنَّ الَّذِينَ تَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّهِ
لَا يَمْلِكُونَ لَكُمْ رِزْقًا فَابْتَغُوا عِندَ اللَّهِ الرِّزْقَ
وَاعْبُدُوهُ وَاشْكُرُوا لَهُ ۖ إِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿١٧﴾

१८. आणि जर तुम्ही खोटे ठरविता तर तुमच्यापूर्वी कितीतरी जन- समूहांनी खोटे ठरविले आहे आणि पैगंबरावर स्पष्टरित्या पोहचविण्या खेरीज कोणतीही जबाबदारी नाही.[३४]

وَإِن تُكَذِّبُوا فَقَدْ كَذَّبَ أُمَمٌ مِّن قَبْلِكُمْ ۖ وَمَا
عَلَى الرَّسُولِ إِلَّا الْبَلَاغُ الْمُبِينُ ﴿١٨﴾

१९. काय [३५] यांनी हे पाहीले नाही की अल्लाह कशा प्रकारे निर्मितीचा आरंभ करतो नंतर त्याची पुनरावृत्ति करील.नि:संशय हे अल्लाह करीता अतिशय सोपे आहे.[३६]

أَوَلَمْ يَرَوْا كَيْفَ يُبْدِئُ اللَّهُ الْخَلْقَ
ثُمَّ يُعِيدُهُ ۚ إِنَّ ذَٰلِكَ عَلَى اللَّهِ يَسِيرٌ ﴿١٩﴾

१९. म्हणजे ते आपल्या अपराधांचे ओझे तर उचलतीलच, पण त्यासोबतच इतरांना मार्गभ्रष्ट करण्याच्या अपराधाचे ओझेही त्यांना उचलावे लागेल हदीस. वचनातील उल्लेख असा:-

مَنْ دَعَا اِلَى الضَّلَالَةِ كَانَ عَلَيْهِ مِنَ الْاِثْمِ مِثْلَ اٰثَامٍ مَنْ تَبِعَهٗ
لَا يَنْقُصُ ذٰلِكَ مِنْ اٰثَامِهِمْ شَيْئًا۔ (مسلم كتاب العلم)

‘जो मनुष्य मार्गभ्रष्टतेकडे बोलाविल तर त्याच्या वरही अपराधाचे ओझे राहील. ज्याप्रकारे यावर चालणारे गुन्हेगार झालेत व याने त्यांच्या गुन्ह्यांत कसलीही कमतरता येणार नाही’ (मुस्लिम किताबुल इल्म)

२०. म्हणजे धर्माच्या नावाने जे असत्य ते गढत आहेत व ईश्वराशी ज्या चुकीच्या गोष्टींचा संबंध जोडत आहेत. त्यांच्याविषयी कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या दरबारात त्यांना जाब द्यावा लोगेल.

२१. या ठिकाणी हजरत नूह व इतर पैगंबरांच्या घटना संक्षिप्त रित्या निवेदिल्या गेल्या आहेत. ज्यावरुन असे दिसून येते की समस्त पैगंबरांना कशा कठीण परिस्थितीतून व केवढ्या कठीण परीक्षेतून जावे लागले. हजरत नूह संबंधीच्या तपशीला करीता पहा सूरह अअराफ टीप क्र.१५

२२. कुरआन घटनांच्या अगदी बारीक सारीक तपशीलात जात नाहीत, म्हणून कुरआनने कोणत्याही पैगंबराचे वय सांगितले नाही परंतु ज्याअर्थी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की हजरत नूह यांनी एक असधारण मुदत आवाहनात्मक प्रयत्नात घालविली जी कसोटीपूर्ण परिस्थितीत सहनशीलतेचे उच्च उदाहरण होय. यास्तव ही गोष्ट स्पष्ट केली गेली की ते आपल्या जनसमूहात नऊशे पन्नास वर्षा पावेतो राहीले. अर्थात या मुदतीस - ‘एक हजार वर्षाला पन्नास वर्षे कमी’ या शैलीत निवेदण्याचे कारण ही हेच की हजाराची संख्या मुदतीच्या दीर्घतेस निवेदण्याकरीता अधिक परिणामकारक आहे.

हजरत नूह यांनी साडेनंऊशे वर्षे आपल्या जनसमूहात घालविली आणि जन समूहाच्या विनाशानंतर किती काळ ते जिवंत राहीले याचा उलगडा कुरआनने केलेला नाही. यास्तव आम्ही हे म्हणू शकत नाही की हजरत नूह यांचे पूर्ण वय किती होते. परंतु ही गोष्ट उघड आहे की त्यांचे वय नऊशे पन्नास वर्षाहून अधिक होते. मात्र बायबलमध्ये त्यांचे पूर्ण वय नऊशे पन्नास वर्षे निवेदिले गेले आहे. अगदी प्राचीन काळात माणसांचे आयुष्य आजच्या नैसर्गिक आयुष्याच्या तुलनेने कितीतरी पटींनी जास्त राहात असे. यास्तव बायबलमध्ये हजरत नूह यांच्या पित्याचे वय सातशे सत्याहत्तर (७७७) वर्षे आणि आजोबांचे वय नऊशे एकोणसतत्तर (९६९ वर्षे निवेदिले गेले आहे. (पहा बायबल : निर्मिती :प्रकरण ५) तत्कालीन नैसर्गिक वातावरण आजच्या वातावरणाहून अगदी भिन्न होते व त्रास यातनां विरहित होते. तसेच त्या काळात मनुष्य वस्ती अत्यल्प होती. म्हणून नैसर्गिक कारक गोष्टी (Natural Factors)आयुष्य वाढी करीता अगदी अनुकूल होत्या.

२३. वादळाशी अभिप्रेत पाण्याचे वादळ होय. म्हणजे महापूर होय ज्यात नूह जन समूह बुडविला गेला.

२४. म्हणजे त्यांनी शिर्क व कुफ्र करुन स्वत:वरच अत्याचार केला होता व या अत्याचारावर ते शेवटपावेतो कायम राहीले.

२५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १०३

२६. अर्थात नूहच्या नौकेला इहलोक वासींकरीता त्या घटनेचे स्मृतिचिन्ह बनविले. जोपर्यंत ही नौका लोकांच्या अवलोकनात येत राहीली, त्या घटनेचे स्मरण घडवित राहीली व त्यांच्यासाठी बोध चिन्ह बनून राहीली. त्यानंतर नौकेच्याघटनेस इतिहासाच्या पानांनी तसेच पवित्र कुरआनने अशा प्रकारे सुरक्षित केले की यावच्चंद्र दिवाकरौ लोकांना हा धडा मिळत राहील की अल्लाहच्या शिक्षेपासून मुक्ति प्राप्त करणारे तेच लोक होत जे त्याच्यावर ईमान बाळगून त्याच्या पैगंबराचे अनुसरण करतात.

२७. म्हणजे हजरत इब्राहीम यांना पैगंबर म्हणून पाठविले. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १२७

२८. अल्लाहचे भय बाळगा म्हणजे त्याच्या अवज्ञेचे भय बाळगा आणि अल्लाहची सर्वात मोठी अवज्ञा शिर्क व मूर्तिपूजा होय.

२९. म्हणजे जर तुम्ही अडाणीपणा सोडून हे जाणून घेण्याचा प्रय्तन कराल की तुमचे स्वत:चे हित कशात आहे तर ही गोष्ट सहजगत्या तुमच्या लक्षात येऊ शकते की एकमेव अल्लाहची उपासना करणे व त्याचे भय बाळगून जीवन व्यतीत करणेच फलदायक व यशसमृद्धीकारक आहे.

३०. म्हणजे ज्यांची तुम्ही पूजा करता ते ईश्वर नाहीतच, किंबुना पाषाणाला किंवा धातुला आकार दिलेल्या मूर्त्या मात्र होत. दगडाचे हे देव आपल्या अंगी कोणताही ईश-गुण बाळगत नाहीत. त्यांची हकीगत दगड, माती यापलिकडे काहीच नाही. मग त्यांना ईश्वर समजून त्यांची पूजा करण्यात काय अर्थ?

मूर्तिपूजेचे अयोग्य असणे अगदी स्पष्ट आहे व ते योग्य असण्याविषयी मूळातच कोणतेही प्रमाण नाही. परंतु आश्चर्याची बाब अशी की भूतकाळातच नव्हे तर ज्ञान-विज्ञानाने विकसित

झालेल्या आजच्या काळातही अनेक लोक मूर्तिपूजेत्या दलदलीत फसलेले आहेत आणि जेव्हा मूर्ति पूजेच्या समर्थनार्थ एखादे प्रमाण लाभत नाही तर आशचर्यकारक गोष्टी सांगू लागतात. 'आऊट लाइन्स ऑफ हिंदूइझम' या पुस्तकातील उद्धृत केलेली वाक्ये पहा-

''The idol is the most concrete of God's form'

'मूर्ति ईश्वराचे सर्वाधिक साकार स्वरुप होय.'

' And the belief is that God descends in to the idol and makes it divinely alive so that he may be easily acceasible to his devotees.' (Out lines of Hinduism by T.M.p. Mahadevan p. 193-194)

अर्थात (यामागील) श्रद्धा अशी की ईश्वर उतरुन मूर्तित संचार करतो व तिला ईश्वरी जीवन प्रदान करतो, यासाठी की त्याच्या भक्तांना सहजगत्या त्याच्यापर्यंत जाणे शक्य व्हावे. जेव्हा मूर्तिपूजेच्या समर्थनार्थ एकही प्रमाण मिळत नाही तर त्याचे समर्थक अशाच बिनबुडाच्या गोष्टी सांगू लागतात. या लोकांनी अकलेचा हा खंदक खणला नस्ता तर बरे झाले असते !

३१. म्हणजे तुमचा ईश्वर तर कलिप्त आहेच आहे, पण तुमचा धर्म देखील काल्पनिकच आहे म्हणजे असत्याचे हे पीक होय ज्याला तुम्ही ईश्वर आणि धर्म ही नावे देऊन ठेवली आहेत.

३२. म्हणजे आजीविका देणे ना या मूर्तिंच्या अधिकारात आहे ज्यांची तुम्ही अन्नदाता समजून पूजा करता आणि ना अन्य कोणाच्या अधिकारात. किंबहुना केवळ अल्लाहच्याच अधिकारात आहे. यास्तव त्याच्याकडेच आपली आजीविका मागत जा. فَابْتَغُوا عِنْدَ اللّٰهِ الرِّزْق

'आजीविका अल्लाहतडेच मागा'च्यास्पष्ट ताकीदी नंतरही मुसलमानांचा एक मोठा समूह अवलीयांकडून रोजी मागतो जे उघड शिर्क आहे. ते जेव्हा 'खाजा'ला पुकारुन झोळी भरण्या करीता सांगतात तेव्हा त्यांना आपण शिर्क करीत आहोत याची जाणीव जराही होत नाही. हे अशामुळे की 'अडाणी विद्वानांनी त्यांना हाच धडा शिकविला आहे. जर त्यांनी कुरआनाचा विशुद्ध बुद्धिने अभ्यास केला असता तर त्यांना सत्याचा स्पष्टीपणे उलगडा झाला असता व ते या मार्गभ्रष्टतेपासून सुरक्षित राहीले असते.

३३. म्हणजे मेल्यानंतर ना तुम्ही मूर्तीकडे परतविले जाल आणि ना देवी देवतांकडे आणि ना अन्य एखाद्याकडे, किंबहुना अल्लाहकडेच परतविले जाल आणि तोच तुम्हाला तुमच्या आचरणाचा मोबदला देईल. यास्तव खरा उपास्थ तोच ज्याच्याकडे तुम्हाला परत जायचे आहे.

३४. म्हणजे पैगंबराचे काम अल्लाहचा संदेश स्पष्टत: पोहचविणे हेच आहे आता मानणे न मानणे तुमचे काम होय.

३५. हजरत इब्राहीम यांचे निवेदन वरील आयतीत संपले. येथून आयत क्र. २३ पर्यंतचा मजकूर अल्लाहतर्फे वृद्धि होय जसे की वाणीच्या शैलीवरून स्पष्ट आहे. यासाठी की प्रसंगानुरोधाने कुरआनच्या संबोधितांना विचार चिंतनाचे आवाहन केले जावे.

३६. आखिरतचा इन्कार करणारे मरणोत्तर जीवनाला अशक्यप्राय गोष्ट समजत होते. त्यांची शंका निवारण्या करीता उत्पत्तिच्या आरंभावर विचार चिंतन करण्याचे त्यांना आवाहन केले गेले आहे, की ज्या हस्तीकरीता माणसा सारख्या निर्मितीस अभावातून अस्तित्वात आणणे शक्य झाले, त्याच्यासाठी स्वत:च निर्माण केलेल्या गोष्टीची पुनरावृत्ति करणे काय कठीण आहे? (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हज्ज टीप क्र. ७, व सूरह मोमीनून टीप क्र. १८)

*त्यांना सांगा, जमीनीवर हिंडून फिरुन पहा की अल्लाहने कशा प्रकारे निर्मितीचा आरंभ केला. नंतर अल्लाह दुसऱ्यांदा उठवून उभे करील. निःसंशय अल्लाह सर्वसमर्थ आहे. ज्यास इच्छिल अजाब देईल व ज्यावर इच्छिल दया करील आणि त्याच्याचकडे तुम्ही परतविले जाल. (अल-क़ुर्आन)*

قُلْ سِيرُوا فِي الْأَرْضِ فَانْظُرُوا كَيْفَ بَدَأَ
الْخَلْقَ ثُمَّ اللَّهُ يُنْشِئُ النَّشْأَةَ الْآخِرَةَ ۚ إِنَّ اللَّهَ
عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٢٠﴾

२०. त्यांना सांगा, जमीनीवर हिंडून फिरुन पहा की अल्लाहने कशा प्रकारे निर्मितीचा आरंभ केला. नंतर अल्लाह दुसऱ्यांदा उठवून उभे करील. नि:संशय अल्लाह सर्वसमर्थ आहे.[३७]

يُعَذِّبُ مَنْ يَشَاءُ وَيَرْحَمُ مَنْ يَشَاءُ ۖ وَإِلَيْهِ تُقْلَبُونَ ﴿٢١﴾

२१. ज्यास इच्छिल अजाब देईल व ज्यावर इच्छिल दया करील[३८] आणि त्याच्याचकडे तुम्ही परतविले जाल.[३९]

وَمَا أَنْتُمْ بِمُعْجِزِينَ فِي الْأَرْضِ وَلَا فِي السَّمَاءِ ۖ وَمَا
لَكُمْ مِنْ دُونِ اللَّهِ مِنْ وَلِيٍّ وَلَا نَصِيرٍ ﴿٢٢﴾

२२. तुम्ही ना जमीनीवर त्याच्या नियंत्रणाबाहेर जाऊ शकतात व ना आकाशात[४०] आणि तुमच्यासाठी अल्लाह खेरीज ना कोणी कार्य साधक आहे व ना सहाय्यक.[४१]

وَالَّذِينَ كَفَرُوا بِآيَاتِ اللَّهِ وَلِقَائِهِ أُولَٰئِكَ يَئِسُوا
مِنْ رَحْمَتِي وَأُولَٰئِكَ لَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٢٣﴾

२३. आणि ज्या लोकांनी अल्लाहच्या आयतींचा व त्याच्या भेटीचा इन्कार केला तेच होत जे माझ्या कृपेपासून निराश झालेत.[४२] आणि तेच होत ज्यांच्या करीता दु:खदायक अजाब (शिक्षा) आहे.

فَمَا كَانَ جَوَابَ قَوْمِهِ إِلَّا أَنْ قَالُوا اقْتُلُوهُ أَوْ حَرِّقُوهُ
فَأَنْجَاهُ اللَّهُ مِنَ النَّارِ ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ
لِقَوْمٍ يُؤْمِنُونَ ﴿٢٤﴾

२४. त्याच्या जन समूहाचे उत्तर या खेरीज काही नव्हते की ते म्हणाले, याची हत्या करा किंवा याला जाळून टाका.[४३] परंतु अल्लाहने त्यास आगीपासून वाचविले.[४४] नि:संशय यामध्ये निशाण्या आहेत त्या लोकांकरीता ज्यांनी ईमान बाळगले.[४५]

وَقَالَ إِنَّمَا اتَّخَذْتُمْ مِنْ دُونِ اللَّهِ أَوْثَانًا مَوَدَّةَ
بَيْنِكُمْ فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا ۖ ثُمَّ يَوْمَ الْقِيَامَةِ
يَكْفُرُ بَعْضُكُمْ بِبَعْضٍ وَيَلْعَنُ بَعْضُكُمْ بَعْضًا
وَمَأْوَاكُمُ النَّارُ وَمَا لَكُمْ مِنْ نَاصِرِينَ ﴿٢٥﴾

२५. तो म्हणाला, तुम्ही ऐहिक जीवनात तर अल्लाहला सोडून मूर्त्यांना पारस्पारिक प्रेमाचे माध्यस बनवून घेतले आहे, पण कियामतीच्या दिवशी तुम्ही एकमेकांशी निलिप्तता व्यक्त कराल व एकमेकांचा धि:कार कराल. तुमचा कोणीही सहाय्यकर्ता नसेल.[४६]

فَآمَنَ لَهُ لُوطٌ ۘ وَقَالَ إِنِّي مُهَاجِرٌ إِلَىٰ رَبِّي ۖ إِنَّهُ
هُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٢٦﴾

२६. परंतु लूतने याचे समर्थन केले.[४७] आणि इब्राहीमने म्हटले, मी आपल्या पालनकर्त्याकडे हिजरत (स्थलांतर) करतो.[४८] तो वर्चस्वशाली आहे, बुद्धिकौशल्य बाळगणारा.[४९]

३७. मनुष्य जेव्हा आपल्या वातावरणातून बाहेर पडतो तेव्हा उत्पत्तिचे आशचर्यकारक नमुने त्याच्या अवलोकनात येतात व त्याला विचार चिंतनाचे आवाहन करतात. उदाहरणार्थ सागर-प्रवासात नित्य नवनवीन मासे दिसून येतात. खुश्कीच्या प्रवासात रंगीबेरंगी पक्षी, अरण्यात चित्रविचित्र प्राणी. तात्पर्य बाहेरचे जग एक प्राणी संग्रहालय वाटते जिथे जीवनाची हजारो रूपे पहावयास मिळतात. जर अवलोकन करणाऱ्याची विवेक बुद्धि जागृत असेल तर तो उद्‌गारील की ही एका अशा शक्तिची निर्मिती आहे, जी अमर्याद सामर्थ्य बाळगणारी, जबरदस्त कलाकौशल बाळगणारी जीवन-निर्मितीवर व पूर्णपणे समर्थ, सर्वज्ञ व बुद्धिकौशल्ययुक्त आणि सुंदर व अद्‌भूत आहे. निर्मात्याची ही ओळख त्याच्या अंगी हा विश्वास निर्माण करील की तो माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करण्यासही समर्थ आहे आणि कुरआन दुसऱ्यांदा उठवून उभे करण्याविषयी जे सांगतो ते अगदी सत्य आहे. या ठिकाणी कुरआनने हेच उच्च उद्दिष्ट (Noble Cause) लक्षात घेता प्रवास करण्याचे आवाहन केले आहे. यावरुन हे लक्षात आले की, ज्ञानार्जन व संशोधनाच्या हेतुने जे अल्लाहच्या मार्गात असेल, प्रवास करणे मांगल्य व समृद्धि दायक आहे.

३८. संकेत या गोष्टीकडे आहे की जमीनीवर प्रवास केल्याने जन-समूहांच्या उन्नति व ऱ्हासाचा इतिहासही तुमच्या समोर येईल व तुम्हाला हे कळून येईल की किती असे जनसमूह आहेत जे अल्लाहच्या प्रकोपाला बळी पडले व किती असे जनसमूह आहेत ज्यांना या प्रकोपापासून वाचविले गेले, व अल्लाहच्या कृपेने उन्नत झाले.

३९. म्हणजे शेवटी तुम्हाला अल्लाह समोरच पोहचावयाचे आहे.

४०. ज्या प्रमाणे मनुष्य अल्लाहच्या निसर्ग-नियमां (Physical laws) नी बांधला गेला आहे त्याच प्रमाणे त्याच्या मोबदला व शिक्षेच्या नियमानेही बांधलेला आहे. तो प्रत्येक ठिकाणी अल्लाहच्या बंधनात आहे. मग तो जमीनीच्या कोणत्याही भागात जावा, किंवा केवढ्याही उचीवर पोहचो. आजचा मनुष्य तर विमानात बसून आकाश-भ्रमण करतो. परंतु त्याच्या विवशतेची अवस्था ही की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यावर एखाद्या अपघाताचे संकट आणू इच्छितो तर आपला बचाव करणे त्याला मुळीच शक्य नसते.

४१. म्हणजे तुमच्यासाठी खरा कार्यसाधक व सहाय्यक अल्लाह खेरीज कोणीही नाही. म्हणून अन्य एखाद्यास कार्यसाधक व सहाय्यक समजून त्याच्याशी तो व्यवहार करू नका जो केवळ अल्लाहशी केला जावा. आणि लक्षात ठेवा, जर अल्लाह तुम्हाला आपल्या अजाब (शिक्षे)च्या पकडीत घेऊ इच्छिल तर असा कोणी नाही जो तुम्हाला त्याच्या पासून वाचवील किंवा तुमची मदत करील.

४२. या आयतीत इन्कार करणाऱ्यांच्या संबंधाने एक महत्त्वपूर्ण हकीगत निवेदिली गेली आहे आणि ती अशी की जर या लोकांनी अल्लाह कडून मोबदला व त्याच्या कृपेत हिस्सा प्राप्त करण्याची अभिलाषा बाळगली असती तर त्यांनी ना त्याच्या आयतींना (वचनांना) रद्द केले असते व ना आखिरत (मरणोत्तर जीवना)चा इन्कार केला असता परंतु जेव्हा त्यांनी इन्कार केला तर असे समजूनच केला की ना आखिवत येईल आणि ना आमच्यासाठी अल्लाहच्या कृपेचा लाभ होण्याची व त्याच्याकडून मोबदला प्राप्त करण्याची संधी असेल. जीवन तर केवळ या जगातलेच जीवन आहे. यानंतर केवळ नाश पावणे आहे. अल्लाहच्या कृपेत भागीदार बनण्यास आम्ही बाकी राहणार तरी कोठून. तर जेव्हा यांनी अल्लाहच्या कृपेबाबत नैराश्याची भूमिका अंगिकारली तर त्यांना आखिरतमध्ये अल्लाहच्या कृपेत हिस्सा प्राप्त न होण्यास काही एक कारण नाही. म्हणून ते अल्लाहच्या कृपेपासून दूर लोटले जातील. परिणामी त्यांना दु:खदायक शिक्षा भोगणे क्रमप्राप्त ठरेल.

जे लोक काफीरांबाबत आपल्या मनात मोठी सहृदयता वृत्ती बाळगतात ते जहन्नमच्या चिरकालीन शिक्षेचे, जी काफिरांना दिली जाईल, विचित्र स्पष्टीकरण करतात व इच्छा बाळगतात की अल्लाहच्या कृपेत त्यांनाही वाटा लाभावा. परंतु ते या वस्तुस्थितीस दृष्टीआड करतात की काफिर स्वत:च अल्लाहच्या कृपेपासून नाउमेद आहेत, निराश आहेत जर त्यांना अल्लाहच्या कृपेची आशा असती तर आखिरतवर त्यांनी जरुर ईमान राखले असते.

४३. म्हणजे इब्राहीमने आपल्या जनसमूहासमोर ज्या गोष्टी मांडल्या त्याचे उत्तर त्यांनी अशा शब्दात दिले की या माणसाला खतम करून टाका, यासाठी की असल्या अप्रिय गोष्टी पुन्हा आमच्या कानावर न याच्यात.

४४. शेवटी त्या लोकांनी हजरत इब्राहीम यांना आगीत टाकले, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना चमत्कारीकरित्या जळण्यापासून वाचविले जसे सूरह अंबिया आयत क्र. ६९ मध्ये स्पष्टीकरण निवेदिले गेले आहे.

४५. हजरत इब्राहीम यांच्या या घटनेमध्ये एकेश्वर सत्य असण्याच्या, हजरत इब्राहीम पैगंबर असण्याच्या, इन्कार करणाऱ्यांच्या हातून त्यांना सताविले जाण्याच्या व अल्लाहची मदत चमत्कारीकरिता प्रकट होण्याच्या निशाण्या आहेत.

४६. हजरत इब्राहीम यांचे हे निवेदन, जसे कुरआनाच्या शब्दशैलीवरून जाहीर होते, त्यांचे आगीतून सही सलामत

बाहेर पडण्यानंतरचे आहे व या कथनाचा अर्थ असाकी ह्या मूर्त्या तुमच्या दृष्टीने राष्ट्रीय एकता व पारस्पारिक प्रेमाचे माध्यम आहे आणि तुम्हाला हे जाणवते की या मूर्त्यांना सोडणे सामाजिक फूटीस कारक ठरेल. आपल्या या अतिउत्साही धोरणात तुम्ही मूर्ति पूजेच्या त्या परिणामांना अगदी दृष्टीआड केले आहे जे आखिरत मध्ये उद्‌भवणार आहेत. कियामतीच्या दिवशी जेव्हा अनेकेश्वरवादाचे मिथ्या असणे व एक थोर अपराध असणे तुम्हाला चांगल्या प्रकारे कळून येईल तेव्हा तुमचा सामूहीक एकता व तुमची ही सामुदायिक प्रेम भावना शिल्लक तरी राहील काय? त्या वेळी तुम्ही मार्गभ्रष्टतेची जबाबदारी एकमेकांवर टाकण्याची इच्छा बाळगाल व आपसात एकमेकावर दोषारोप कराल. शेवटी तुम्ही सर्वच्या सर्व असहाय्य व अगतिक अवस्थेत जहन्नमच्या महाभयंकर अग्निकुण्डात फेकले जाल. तेव्हा अशी जनसामूहिक एकता व असले सामाजिक संबंध काय कामाचे जे तुम्हाला जहन्नमच्या धघधगत्या आगीची अवीट गोडी चाखवतील.

आज देखील किती तरी मूर्तिपूजक मूर्ति पूजेला अयोग्य समजून ही तिचा त्याग करण्यास व तिच्याशी संलग्न असलेल्या धर्मातून बाहेर पडण्यास तयार होत नाही कारण याचा परिणाम त्याच्या सामाजिक संबंधावर पडेल व त्यांचे नाते आपल्या जनसमूहापासून तुटेल. केवढे बुद्धिमान आहेत हे की ऐहिक हानी व धोक्यास पत्कारायला तयार होत नाहीत परंतु मरणोत्तर जीवनाच्या निरंतर शिक्षा भोगण्यास मात्र तयार होतात !

४७. म्हणजे संपूर्ण जन-समूहात हजरत इब्राहीम यांचे म्हणणे ऐकणारा केवळ एकच माणूस निघाला आणि ते होते हजरत लूत ज्यांनी हज़रत इब्राहीमच्या कथनास पुष्टी दिली व त्यांच्या प्रेषित्वावर ईमान बाळगले.

हजरत लूत बायबलच्या स्पष्टीकरणानुसार हजरत इब्राहीम यांचे पुतणे होते. स्थलांतरानंतर त्यांना पैगंबर पदाने सम्मानित केले गेले.जो मनुष्य पैगंबर होतो, तो सुरवातीपासूनच आपल्या विवेक बुद्धिवर कायम राहतो. म्हणून हजरत इब्राहीम यांचे एकेश्वरवादीय आवाहन त्यांना नवीन नव्हते. यास्तव त्यांनी पुढे होऊन हजरत इब्राहीम यांच्या कथनाचे समर्थन केले व त्यांच्या प्रेषित्वावर ईमान बाळगले.

४८. म्हणजे मी आपल्या पालनकर्त्या खातीर त्याच्या आदेशान्वये व त्याच्याच मार्गदर्शनाने हिजरत (देशत्याग) करतो. तो जिथे नेईन तिथे जाईन कारण वास्तविक पाहता, माझा पालनकर्ता (अल्लाह) हाच माझे ध्येय-उद्दिष्ट होय.

आपल्या जन समूहावर पूर्णत: प्रमाण प्रस्थापित केल्यानंतर हजरत इब्राहीम यांनी अल्लाहच्या आदेशावरून आपला देश सोडला यासाठी की सत्य-धर्माचे कार्य एका देशात नाही तर दुसऱ्या देशात पार पाडले जावे. ते इराकचे रहिवाशी होते मग त्यांचे वास्तव्य हरान येथे राहीले आणि तेथून त्यांनी सिरीया येथे स्थलांतर केले.या स्थालांतरात त्यांच्या सोबत हजरत लूत ही होते आणि बायबलच्या स्पष्टीकरणानुसार त्यांची पत्नी सारा पण होती. तीन व्यक्ति असलेला हा ईमान धारकांचा हा छोटासा काफिला होता परंतु त्याने जगाचा इतिहास बदलून टाकला.

४९. हिजरत (स्थलांतर प्रसंगी हजरत इब्राहीम यांनी अल्लाहच्या या दोन गुणविशेषांचा उल्लेख या अनुरोधाने केला की अल्लाहचा फैसला लागू झाल्याशिवाय राहात नाही. यास्तव या हिजरतच्या पार्श्वभूमीवर त्यांची जी योजना असेल ती निश्चितच पूर्ण होईल आणि तो बुद्धिकौशल्य विरहीत असू शकत नाही स्थलांतरानंतर हजरत इब्राहीम यांच्या हातून जी महान कार्ये पार पडली त्यावरून अल्लाहची बुद्धिकौशल्य युक्त योजना पूर्णपणे जाहीर झाली.

*तो म्हणाला, तिथे तर लूत ही आहे. ते म्हणाले, तिथे जो कोणी आहे आम्ही त्यांना चांगल्या प्रकारे जाणतो आम्ही त्याला व त्याच्या कुटुंबियांना वाचवू. त्याच्या पत्नीस वगळता ती मागे राहणाऱ्यांपैकी आहे.(अल-क़ुर्आन)*

२७. आणि आम्ही त्याला इसहाक व याकूब प्रदान केलेत.[५०] आणि त्याच्या वंशात प्रेषित्व व ग्रंथ राखला. [५१] आणि आम्ही त्याचा मोबदला त्याला या जगात ही दिला.[५२] आणि आखिरत मध्ये तो निश्चितच सदाचारी लोकांपैकी असेल.[५३]

وَوَهَبْنَا لَهُ إِسْحَٰقَ وَيَعْقُوبَ وَجَعَلْنَا فِى ذُرِّيَّتِهِ
ٱلنُّبُوَّةَ وَٱلْكِتَٰبَ وَءَاتَيْنَٰهُ أَجْرَهُ فِى ٱلدُّنْيَا ۖ وَإِنَّهُ
فِى ٱلْءَاخِرَةِ لَمِنَ ٱلصَّٰلِحِينَ ﴿٢٧﴾

२८. आणि आम्ही लूतला पाठविले.[५४] जेव्हा तो आपल्या जनसमूहास म्हणाला, तुम्ही लोक निर्लज्जपणाचे ते काम करता, जे तुमच्या पूर्वी इहलोकीयां पैकी कोणीही केले नाही.[५५]

وَلُوطًا إِذْ قَالَ لِقَوْمِهِۦٓ إِنَّكُمْ لَتَأْتُونَ ٱلْفَٰحِشَةَ
مَا سَبَقَكُم بِهَا مِنْ أَحَدٍ مِّنَ ٱلْعَٰلَمِينَ ﴿٢٨﴾

२९. काय तुम्ही पुरुषांद्वारे कामवासना भागविता आणि वाटमारी करता.[५६] आणि आपल्या मैफलींमध्ये कुकर्म करता.[५७] तेव्हा त्याच्या जन समूहाजवळ या खेरीज काही उत्तर नव्हते की, ते म्हणाले, आणून दाखवा अल्लाहची शिक्षा जर तुम्ही सच्चे असाल.[५८]

أَئِنَّكُمْ لَتَأْتُونَ ٱلرِّجَالَ وَتَقْطَعُونَ ٱلسَّبِيلَ وَتَأْتُونَ
فِى نَادِيكُمُ ٱلْمُنكَرَ ۖ فَمَا كَانَ جَوَابَ قَوْمِهِۦٓ إِلَّآ أَن قَالُوا۟
ٱئْتِنَا بِعَذَابِ ٱللَّهِ إِن كُنتَ مِنَ ٱلصَّٰدِقِينَ ﴿٢٩﴾

३०. त्याने दुआ (प्रार्थना) केली, हे माझ्या पालनकर्त्या या दुराचारी लोकांच्या विरोधात मला सहाय्य कर.[५९]

قَالَ رَبِّ ٱنصُرْنِى عَلَى ٱلْقَوْمِ ٱلْمُفْسِدِينَ ﴿٣٠﴾

३१. आणि जेव्हा आमचे फरिश्ते (दूत) इब्राहीम जवळ खुश खबर घेऊन पोहचले तेव्हा ते म्हणाले, आम्ही या वस्तीच्या लोकांना नष्ट करणार आहोत. यात राहणारे मोठे दुराचारी आहेत.[६०]

وَلَمَّا جَآءَتْ رُسُلُنَآ إِبْرَٰهِيمَ بِٱلْبُشْرَىٰ
قَالُوٓا۟ إِنَّا مُهْلِكُوٓا۟ أَهْلِ هَٰذِهِ ٱلْقَرْيَةِ ۖ إِنَّ أَهْلَهَا
كَانُوا۟ ظَٰلِمِينَ ﴿٣١﴾

३२. तो म्हणाला, तिथे तर लूत ही आहे. ते म्हणाले, तिथे जो कोणी आहे आम्ही त्यांना चांगल्या प्रकारे जाणतो. आम्ही त्याला व त्याच्या कुटुंबियांना वाचवू, त्याच्या पत्नीस वगळता, ती मागे राहणाऱ्यांपैकी आहे.[६१]

قَالَ إِنَّ فِيهَا لُوطًا ۚ قَالُوا۟ نَحْنُ أَعْلَمُ بِمَن فِيهَا ۖ
لَنُنَجِّيَنَّهُ وَأَهْلَهُ إِلَّا ٱمْرَأَتَهُ كَانَتْ
مِنَ ٱلْغَٰبِرِينَ ﴿٣٢﴾

३३. मग जेव्हा आमचे फरिश्ते लूत जवळ पोहोचले तेव्हा तो अतिशय चिंता-ग्रस्त झाला व मन संकोचले.[६२] ते म्हणाले, भिऊ नका व दुःख करू नका.आम्ही तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना वाचवून घेऊ. तुमच्या पत्नीस वगळता. ती मागे राहणाऱ्यांपैकी आहे.

وَلَمَّآ أَن جَآءَتْ رُسُلُنَا لُوطًا سِىٓءَ بِهِمْ وَضَاقَ بِهِمْ
ذَرْعًا وَقَالُوا۟ لَا تَخَفْ وَلَا تَحْزَنْ ۖ إِنَّا مُنَجُّوكَ
وَأَهْلَكَ إِلَّا ٱمْرَأَتَكَ كَانَتْ مِنَ ٱلْغَٰبِرِينَ ﴿٣٣﴾

५०. हजरत इसहाक हजरत इब्राहीम यांचे पुत्र व याकूब त्यांचे नातू होत. दोघांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर पदाने सम्मानित केले.

५१. प्रेषित आणि ईश ग्रंथाचा क्रम हजरत इब्राहीम यांच्याच वंशात चालला व इमामत (धार्मिक नेतृत्व) त्यांच्याच वंशाकडे राहीले. ही वस्तुस्थिती लक्षात घेता हजरत ईब्राहीम यांच्या नंतरच्या काळातील कोणत्याही व्यक्तिमत्वा विषयी, जी हजरत इब्राहीम यांच्या वंशाची नसावी, पैगंबर असण्याची धारणा केली जाऊ शकत नाही उदाहरणार्थ महात्मा गौतम बुद्ध पैगंबर असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, जेव्हा ते इब्राहीमी वंशाचे नव्हते. त्याच प्रकारे हजरत इब्राहीम यांच्या काळानंतरचा कोणताही ग्रंथ जो एखाद्या अशा प्रमुखातर्फे असावा व जो हजरत इब्राहीम यांच्या वंशीय नव्हता, तर तो ग्रंथ आकाशातून अवतरलेला ग्रंथ ठरु शकत नाही. भारताच्या अनेक धर्म ग्रंथांची, ज्यांना पवित्र मानले जाते, अगदी हीच दशा आहे.

आयतीचा जो अर्थ आम्ही निवेदन केला आहे. त्याचे समर्थन अल्लमा इब्ने कसीर यांच्या स्पष्टीकरणाने होते.

فَلَمْ يُوْجَدْ نَبِيٌّ بَعْدَ اِبْرَاهيم عليه السلامُ اِلا وهُوَ مِنْ سُلالَتِهٖ۔ (تفسیر ابن کثیر ج ۳ ص ۴۱۱)

‘इब्राहीम नंतर असा कोणताही पैगंबर होऊन गेला नाही जो त्यांच्या वंशापैकी नसावा’. (तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. ४११) आणि अल्लामा शोकानी फर्मावितात,

فَلَمْ يَبْعَثِ اللّٰهُ نَبِيًّا بَعْدَ اِبْرَاهِيْمَ اِلَّا مِنْ صُلبِهٖ۔

(فتح القدیر ج ۴ ص ۱۹۹).

‘अल्लाहने इब्राहीम नंतर कोणताही पैगंबर पाठविला नाही, परंतु हे की तो त्यांचा वंशज होता’ (फतहुल कदीर खं. ४ पृ. १९९)

५२. हजरत इब्राहीम यांची कठीण परीक्षा घेतल्यानंतर, त्यांच्या सत्कर्माचे जे परितोषिक अल्लाहने त्यांना या जगात प्रदान केले यात त्यांच्या करीता खरी प्रतिष्ठा व माननीयता, इमामत, पैगंबर पद वर नियुक्ति, पुत्रप्राप्ती, वंशात प्रेषित्व आणि ईश-ग्रंथांचा क्रम, जीव्हांवर त्यांचा मांगल्पूर्ण उल्लेख व ईमान बाळगणाऱ्यांच्या मनापासून निघणारी सलामतीची व कृपेची प्रार्थना यासारख्या सदभाग्यपूर्ण गोष्टी सामील आहेत. ज्यांच्या तुलनेत जगातील सर्व सम्पत्ति कस्पटा समान आहे.

५३. म्हणजे आखिरत मध्ये सदाचारी लोकांच्या मेळाव्यात सामील होईल ज्यास इनाम व प्रतिष्ठेने उपकृत केले जाईल.

५४. हिजरत केल्या नंतर हजरत लूत यांना सदूम व अमूरा वस्त्यांकडे पाठविले गेले ज्या मृत सागारा (Dead Sea)च्या किनाऱ्यावर होत्या. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १२७.

५५. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. १२९ मध्ये केले गेले आहे.

५६. असे दिसून येते की हे लोक वाटेवर लूटमार व पळवून नेण्याचीही कामे करीत होते. म्हणून हजरत लूत यांनी त्यांना गुंडुगरी करण्यापासून मनाई केले.

५७. म्हणजे ते इतके निर्लज्ज झाले होते की कुकर्म व दुराचारास खुलेआम आपल्या मैफलींमध्ये ही करू लागले होते. आजच्या काळात दुराचारास सामूहीकरित्या करण्यासाठी नाईट क्लब (Night Club) सारख्या गोष्टी अस्तित्वात आल्या आहेत. ज्या समाजातील बिघाडास मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत.

५८. एकीकडे हजरत लूत होते जे पूर्ण सहानुभूतिने आपल्या जनसमूहाच्या सुधारणेसाठी प्रयत्नशील होते तर दुसरीकडे त्यांचा जन-समूह होता जो पूर्ण दु:साहसाने अल्लाहच्या अजाबला आमंत्रण देत होता.

५९. जेव्हा हजरत लूत यांना आपल्या जनसमूहाच्या सुधारणेबाबत निराशा झाली तेव्हा त्यांनी ही प्रार्थना केली.

६०. हजरत इब्राहीम त्या वेळी हिब्रुन (पॅलेस्टीन) मध्ये होते व त्यापासून काही मैल अंतरावर सदुम होते ज्या ठिकाणी लूत जन समूह वसत होता. फरिश्ते हजरत इब्राहीम यांच्या जवळ हजरत इसहाक व ह. याकूब यांच्या जन्माची शुभवार्ता घेऊन पोहचले होते या प्रसंगी त्यांनी हजरत इब्राहीम यांना ही शुभवार्ता ही दिली की आम्हाला लूत-जनसमूह नष्ट करण्यासाठी पाठविले गेले आहे म्हणजे एकीकडे त्यांनी अल्लाहच्या कृपेची शुभवार्ता ऐकविली जी हजरत इब्राहीम करीता होती. तर दुसरीकडे एका दुराचारी, कुकर्मी जनसमूहावर अल्लाहचा प्रकोप अवतरण्याविषयीची खबर होती.

६१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १३२

६२. याचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र. १०८ मध्ये केले गेले आहे.

३४. आम्ही त्या वस्तीच्या लोकांवर, त्यांच्या अवज्ञेपायी आकाशातून अजाब (प्रकोपमय शिक्षा) अवतरीत करणार आहोत.[६३]

إِنَّا مُنزِلُونَ عَلَىٰٓ أَهۡلِ هَٰذِهِ ٱلۡقَرۡيَةِ رِجۡزًا مِّنَ ٱلسَّمَآءِ
بِمَا كَانُواْ يَفۡسُقُونَ ﴿٣٤﴾

३५. आणि आम्ही याची एक स्पष्ट निशाणी मागे सोडली आहे.[६४] अशा लोकांकरीता जे बुद्धिचा वापर करतील.

وَلَقَد تَّرَكۡنَا مِنۡهَآ ءَايَةَۢ بَيِّنَةً لِّقَوۡمٍ يَعۡقِلُونَ ﴿٣٥﴾

३६. आणि आम्ही मदयनकडे त्यांचा भाऊ शुअैबला पाठविले.[६५] तो म्हणाला हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! अल्लाहची उपासना करा.[६६] आणि अंतिम दिनाची आशा बाळगणारे रहा.[६७] आणि जमीनीवर उत्पात माजवित फिरु नका.[६८]

وَإِلَىٰ مَدۡيَنَ أَخَاهُمۡ شُعَيۡبًا فَقَالَ يَٰقَوۡمِ ٱعۡبُدُواْ
ٱللَّهَ وَٱرۡجُواْ ٱلۡيَوۡمَ ٱلۡأٓخِرَ وَلَا تَعۡثَوۡاْ فِي ٱلۡأَرۡضِ
مُفۡسِدِينَ ﴿٣٦﴾

३७. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले तेव्हा त्यांना थरकाप उडविणाऱ्या संकटाने येऊन धरले आणि ते आपल्या घरांमध्ये उताणे पडून राहीलेत.[६९]

فَكَذَّبُوهُ فَأَخَذَتۡهُمُ ٱلرَّجۡفَةُ فَأَصۡبَحُواْ فِي دَارِهِمۡ
جَٰثِمِينَ ﴿٣٧﴾

३८. आणि आद [७०] व समूद [७१] ला देखील आम्ही नष्ट केले आणि तुमच्यासाठी त्यांच्या वस्त्यांचे अवशेष उघड आहेत.[७२]सैतानाने त्यांची कर्मे त्यांच्याकरीता सुशोभित बनविली व त्यांना सन्मार्गापासून रोखले.खरे तर ते मोठे हुशार लोक होते.[७३]

وَعَادًا وَثَمُودَاْ وَقَد تَّبَيَّنَ لَكُم مِّن مَّسَٰكِنِهِمۡۖ وَزَيَّنَ لَهُمُ
ٱلشَّيۡطَٰنُ أَعۡمَٰلَهُمۡ فَصَدَّهُمۡ عَنِ ٱلسَّبِيلِ
وَكَانُواْ مُسۡتَبۡصِرِينَ ﴿٣٨﴾

३९. आणि कारून [७४] व फिरऔन व हामान [७५]ला ही आम्ही नष्ट केले. मूसा त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्या घेऊन आला होता.परंतु त्यांनी जमीनीवर गर्व केला. वस्तुत: ते आमच्या काबूतून निघून जाणारे नव्हते.

وَقَٰرُونَ وَفِرۡعَوۡنَ وَهَٰمَٰنَۖ وَلَقَدۡ جَآءَهُم مُّوسَىٰ
بِٱلۡبَيِّنَٰتِ فَٱسۡتَكۡبَرُواْ فِي ٱلۡأَرۡضِ وَمَا كَانُواْ سَٰبِقِينَ ﴿٣٩﴾

४०. तर (पहा) प्रत्येकाला आम्ही त्याच्या अपराधापायी धरले (त्यापैकी) कोणावर आम्ही दगडांचा वर्षाव करणारे वादळ पाठविले तर कोणाला भयंकर चित्काराने घेरले व कोणाला आम्ही जमीनीत धसविले तर कोणाला बुडवून टाकले.[७६] अल्लाह यांच्या वर अत्याचार करणार नव्हता, उलट ते स्वत:च आपल्यावर अत्याचार करीत राहीलेत.[७७]

فَكُلًّا أَخَذۡنَا بِذَنۢبِهِۦۖ فَمِنۡهُم مَّنۡ أَرۡسَلۡنَا عَلَيۡهِ حَاصِبًا
وَمِنۡهُم مَّنۡ أَخَذَتۡهُ ٱلصَّيۡحَةُ وَمِنۡهُم مَّنۡ خَسَفۡنَا
بِهِ ٱلۡأَرۡضَ وَمِنۡهُم مَّنۡ أَغۡرَقۡنَاۚ وَمَا كَانَ ٱللَّهُ لِيَظۡلِمَهُمۡ
وَلَٰكِن كَانُوٓاْ أَنفُسَهُمۡ يَظۡلِمُونَ ﴿٤٠﴾

६३. यास्तव लूत जनसमूहावर दगडांचा वर्षाव झाला व ही शिक्षा अवतरीत करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने या फरिश्त्यांना नियुक्त केले होते. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११९.

६४. म्हणजे या नाश पावलेल्या वस्तीचे काही अवशेष बोध-ग्रहणाकरीता मागे सोडले गेले आहेत. हे अवशेष दीर्घ काळ पावेतो टिकले. नंतर हा भाग समुद्रात धसला गेला. हा समुद्र मृतसागर (Dead Sea)या नावाने ओळखला जातो. यालाच दुसरे नाव'लूत सुमद्र' असे ही आहे. जो या गोष्टीचे स्मरण घडवितो की अत्याचारी कशा प्रकारे तळपाट केला जातो. मृत सागराचे पाणी इतके खारे (Saltine)आहे की त्यात मासे वगैरे कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही.

(पहा इन्साक्लोपिडीया ब्रिटानिका खंड ५ पृ. ५२५)

६५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १३४

६६. म्हणजे केवळ अल्लाहचीच उपासना व दास्यत्व अंगिकारा.

६७. अर्थात अल्लाहची उपासना करीत ही आशा बाळगा की मोबदल्याचा एक दिवस येणार आहे जेव्हा तुम्ही अल्लाहशी भेटाल आणि तो तुम्हाला या गोष्टी बद्दल की तुम्ही त्याची उपासना केली होती व त्याचे दास बनून राहीला होता, भरपूर मोबदला देईल.

६८. मनुष्य समाजात बिघाड तेच लोक करतात ज्यांना ना अल्लाहच्या उपासनेत गोडी असते व ना ते आखिरत मध्ये अल्लाहकडून मोबदल्याची आशा बाळगणारे असतात. ते केवळ ऐहिक लाभांचेच अभिलाषी असतात, मग हे लाभ कोणत्याही प्रकारे त्यांना प्राप्त होवोत.

६९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १४७

७०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फज्र टीप क्र. ८

७१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फज्र टीप क्र. १३

७२. आद जन समूहाचे अवशेष कुरआन अवतरण काळात बाकी होते. परंतु आता उरले नाहीत परंतु समूद जन समूहाचे अवशेष आज ही मदीनेच्या उत्तरेस अलउलाच्या प्रदेशात बाकी आहेत.

७३. म्हणजे ते आपल्या ऐहीक व्यवहारांमध्ये मोठे बुद्धिमान लोक होते परंतु जिथे ईश्वर व त्याच्या धर्माचा मामला येत असे तेव्हा त्यांची बुद्धि भ्रष्ट होत असे. हीच दशा आजच्या काळातील लोकांची आहे त्यांनी आपल्या बौद्धिक पात्रतेचा वापर करून विलक्षण भौतिक प्रगती केली आहे. परंतु ईश्वर व आखिरत संबंधी अगदीच कोरे आहेत.

७४. स्पष्टीकरणासाठी पाह सूरह कसस टीप क्र. १४३

७५. स्पष्टीकरणासाठी पाह सूरह कसस टीप क्र. ११

७६. म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे अजाब अवतरीत जाले. या बंडखोर जन समूहांच्या विनाशाचे वृत्तांत कुरआनात अनेक ठिकाणी तपशीलवारपणे निवेदिले गेले आहेत.

७७. जो मनुष्य स्वत:ला आगीत टाकील, जळल्या शिवाय राहणार नाही. कारण निसर्ग नियमाविरद्ध जाण्याचा हाच परिणाम होतो. म्हणून आपल्या नाशास तो स्वत: जबाबदार आहे, ईश्वर नव्हे. याच प्रकारे जे जन समूह अल्लाहशी विद्रोह करतात, ते अल्लाहच्या न्याय-नियमाला आव्हान देतात. यास्तव जर त्यांच्यावर अल्लाहच्या शिक्षेचा आसूड पडतो तर याला जबाबदार ते स्वत:च आहेत की त्यांनीच स्वत:ला विनाशाच्या गर्तेत लोटले. अल्लाहवर याची कसलीच जबाबदारी येत नाही. तो तर कमालीच्या न्यायासह जगावर शासन करीत आहे.

مَثَلُ الَّذِينَ اتَّخَذُوا مِن دُونِ اللَّهِ أَوْلِيَاءَ كَمَثَلِ
الْعَنكَبُوتِ اتَّخَذَتْ بَيْتًا ۖ وَإِنَّ أَوْهَنَ الْبُيُوتِ
لَبَيْتُ الْعَنكَبُوتِ ۖ لَوْ كَانُوا يَعْلَمُونَ ﴿٤١﴾

४१. ज्या लोकांनी अल्लाहला सोडून इतर कार्य साधक बनविले आहेत त्यांचे उदाहरण कोष्टी सारखे आहे, ज्याने एक घर बनविले आणि सर्व घरांमध्ये सर्वाधिक कमजोर घर कोष्ट्याचेच असते. त्यांनी या (हकीगती) स जाणले असते तर बरे झाले असते ![७८]

إِنَّ اللَّهَ يَعْلَمُ مَا يَدْعُونَ مِن دُونِهِ مِن شَيْءٍ ۚ وَهُوَ
الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٤٢﴾

४२. नि:संशय अल्लाह त्या गोष्टींना जाणतो ज्यांना हे त्याला सोडून आर्जव करतात.[७९] आणि तो वर्चस्वशाली आहे, बुद्धिकौशल्य बाळगणारा.

وَتِلْكَ الْأَمْثَالُ نَضْرِبُهَا لِلنَّاسِ ۖ وَمَا يَعْقِلُهَا
إِلَّا الْعَالِمُونَ ﴿٤٣﴾

४३. आणि ही उदाहरणे आम्ही लोकां (च्या आकलाना)करीता निवेदन करतो परंतु यांना तेच लोक समजतात जे ज्ञान बाळगणारे आहेत.[८०]

خَلَقَ اللَّهُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ بِالْحَقِّ ۚ إِنَّ فِي
ذَٰلِكَ لَآيَةً لِّلْمُؤْمِنِينَ ﴿٤٤﴾

४४. अल्लाहने आकांशाना व जमीनीला सत्यासह निर्माण केले.[८१] नि:संशय यात फार मोठी निशाणी आहे,[८२] ईमान बाळगणाऱ्यांकरीता.

اتْلُ مَا أُوحِيَ إِلَيْكَ مِنَ الْكِتَابِ وَأَقِمِ الصَّلَاةَ ۖ
إِنَّ الصَّلَاةَ تَنْهَىٰ عَنِ الْفَحْشَاءِ وَالْمُنكَرِ ۗ وَلَذِكْرُ اللَّهِ أَكْبَرُ ۗ
وَاللَّهُ يَعْلَمُ مَا تَصْنَعُونَ ﴿٤٥﴾

४५. पठण करा त्या ग्रंथाचे जो तुमच्याकडे 'वह्य' (अवतरीत) केला गेला आहे [८३] आणि नमाज कायम करा. नि:संशय नमाज निर्लज्जता व दुष्कर्मापासून रोखते.[८४]आणि अल्लाहचे नाम:स्मरण फार मोठी गोष्ट आहे.[८५] अल्लाह जाणतो जे काही तुम्ही करता.

وَلَا تُجَادِلُوا أَهْلَ الْكِتَابِ إِلَّا بِالَّتِي هِيَ أَحْسَنُ إِلَّا
الَّذِينَ ظَلَمُوا مِنْهُمْ ۖ وَقُولُوا آمَنَّا بِالَّذِي أُنزِلَ إِلَيْنَا
وَأُنزِلَ إِلَيْكُمْ وَإِلَٰهُنَا وَإِلَٰهُكُمْ وَاحِدٌ وَنَحْنُ لَهُ
مُسْلِمُونَ ﴿٤٦﴾

४६. आणि ग्रंथ बाळगणाऱ्यांशी वाद घालू नका परंतु अधिक चांगल्या प्रकारे, अशांना सोडून जे त्यांच्यापैकी अत्याचारी आहेत. आणि सांगा आम्ही ईमान बाळगले आहे त्या गोष्टीवरही जी आमच्याकडे पाठविली गेली आहे व त्या गोष्टीवर देखील जी तुमच्या कडे पाठविली गेली होती. आमचा व तुमचा ईश्वर एकच आहे. आणि आम्ही त्याचेच मुस्लिम (आज्ञाधारक) आहोत.[८६]

७८. हे अल्लाहखेरीजच्या उपास्यांची पूजा करणाऱ्यांचे उदाहरण होय की त्यांचा आधार ज्या उपास्यांवर असतो ते आपले कवडी मोलाचेही सामर्थ्य बाळगत नाही. ना ते यांची गरज पूर्ति करू शकतात आणि ना यांचा त्रास दूर करू शकतात व ना अल्लाह समोर शिफारस करणारे बनून एखाद्याला काही मिळवून देऊ शकतात. यास्तव यांचे हे अधार कोष्ट्याच्या जाळ्याहून अधिक वास्तविकता बाळगत नाही ज्याप्रमाणे कोष्टी जाळे विणून आपले घर बनविते परंतु ते एवढे कमकुवत असते की हवेची एक झुळुक ही त्याला उडवून देण्यास पुरेशी ठरते. याच प्रकारे जे लोक अल्लाहच्या ऐवजी अन्य एखाद्यास आपला कार्यसाधक बनवितात ते केवळ भ्रमाआधारे आशा आकांक्षाचे घर तयार करतात परंतु जेव्हा निष्कर्ष जाहीर होण्याची वेळ येईल तेव्हा हे घर नावाला सुद्धा उरणार नाही. त्या वेळी त्यांना ही जाणीव होईल की.

ऐ बसा आरजू के खाक शुदा

अर्थ........अगणित आशा धुळीस मिळाल्या.

कोष्ट्याचे उदाहरण बायबल मध्येही निवेदिले गेले आहे:-

'भक्तिहीनाची आशा मावळते त्याच्या आशेचा भंग होतो ज्यावर त्याची भिस्त असते ते कोळ्याच्या जाळ्यासारखे ठरते. तो आपल्या घरावर टेकला असतां ते टिकावयाचे नाही. (इयोब ८ : १३-१५)

७९. म्हणजे अल्लाह शिवाय ज्यांना देखील हे गरज पूर्तते करीता पुकारतात त्यांची हकीगत काय आहे ते अल्लाह चांगल्या प्रकारे जाणून आहे. अर्थात त्यांना अल्लाहचा सहभागी ठरविणारे त्यांच्या विषयी ईश्वरीय अधिकाराचे किंवा अल्लाह समोर ते शिफारस करणारे होत या गोष्टीचे कितीही दावे करोत अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो की सारे दावे चुकीचे आहेत आणि कोणीही या योग्यतेचा नाही की त्यास गरज पूर्ति करीता पुकारले जावे.

स्पष्ट असावे की मुसलमानांचा एक समूह जो शिर्क व बिदअत (धर्मात नवीन प्रथा पाडणे) इ. गोष्टीत मग्न आहे या प्रकारच्या आयतींना ज्यांच्यात अल्लाह खेरीजच्या उपास्यांना पुकारण्याबद्दल निर्भत्सना केली गेली आहे, देवी देवतांना पुकारण्याच्या मर्यादेप्रत मर्यादित समजत राहीले. अवलीय वगैरे ना पुकारणे तर हे त्यांच्या दृष्टीने शिर्क नाही. ते म्हणतात त्यांना पुकारणे असेच आहे जसे शासकीय अधिकारी किंवा पोलीसांना मदतीसाठी बोलाविणे, परंतु हे प्रमाण असे होय. जर एखादा मनुष्य या गोष्टीच्या उत्तरा दाखल की अल्लाह शिवाय कोणापुढे ही नतमस्तक होऊ नका. असे म्हणेल की डोके तर न्हाव्यापुढे ही झुकते. तर हा केवळ तर्क शुन्य वाद ठरेल. कारण प्रत्येक गोष्टीचे एक विशिष्ट स्थान असते. तिला जर आपल्या स्थानापासून हटविले गेले तर तिचा अर्थच बदलेल.सर्व लोक जाणतात की एका अधिकारी वा पोलीसाला मदती करीता बोलाविण्यात व एकाद्या पीर वलीला, जो अतिशय दूर कोठेतरी दफन केला गेलेला आहे, मदतीसाठी बोलाविण्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. पहीली गोष्ट ऐहीक साधनांशी संबधित आहे तर दुसरी अपरोक्ष-विश्वाशी. पहिल्या गोष्टी संबंधाने ईश्वरीय अधिकाराची कोणतीही कल्पना दगोचर होत नाही जेव्हा की दुसऱ्या गोष्टी संबंधी ही कल्पना येते. याच कारणास्तव त्यांच्या संबंधी त्या गुणविशेषांचा निर्देश केला जातो जे अल्लाह करीता खास आहेत. उदाहरणार्थ गौस फिर्याद ऐकणारा, मुश्किलकुशा म्हणजे संकट निवारण करणारा इत्यादि. खरे पाहता, एखाद्याशी असा व्यवहार करणे जो अल्लाह सोबतच केला जाऊ शकतो, त्याला अल्लाह समान लेखणे होय. अल्लाह प्रमाणेच अवलीयांना प्रत्येक ठिकाणी हजर व पाहणारा समजून मदतीसाठी पुकारणे शिर्क नव्हे तर आणखी काय आहे?

८०. म्हणजे जे अज्ञानाच्या अंध:कारात वावरत नाही, तर ज्ञानाच्या उजेडात चालतात अर्थात कुरआनाच्या या गोष्टी केवळ अशाच लोकांच्या ध्यानी येतात.

८१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १२४

८२. म्हणजे एकेश्वर वाद सत्य असण्याची निशाणी ज्याद्वारे शिर्कचे खंडन होते.

८३. सत्य व असत्याच्या या संघर्षात, ज्याचा उल्लेख वर केला गेला, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माधयमान्वये त्यांच्या अनुयायींना कुरआन पठणाची व नमाज कायम करण्याची ताकीद या गोष्टीकडे संकेत करते की जर हे इन्कार करणारे आपले जीवन वाया घालवीत आहे तर घालवू द्या. तुम्ही आपल्या अंगी तो गुणविशेष निर्माण केला पाहिजे जो तुमच्या जीवनास सुशोभित करणारा व तुम्हाला आखिरतचे यश मिळवून देणारा असावा आणि तो गुणधर्म अल्लाहशी दृढ संबंधी, ईश-ग्रंथाचे (अर्थात कुरआनचे पठण व नमाजचा इतमाम केल्याने निर्माण होतो.

कुरआन पठणाचा (तिलावतचा) पूरेपूर लाभ तर अशाच स्थितीत होऊ शकतो जेव्हा अशा प्रकारे तिलावत (पठण) केले जावे ज्या प्रकारे पठण करण्याचा ईश आदेश आहे. يَتْلُونَهُ حَقَّ تِلَاوَتِهِ म्हणजे सर्वप्रथम माणसाचे त्यावर ईमान असावे, मग त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करावा, त्यावर विचार चिंतन करावे, त्या द्वारे उपदेश ग्रहण करावा व त्याच्या मार्गदर्शनाचा स्विकार करीत आपले आचरणविषयक जीवन त्यानुसार घडवावे. परंतु याचा हा अर्थ नव्हे की अरबी

न जाणणाऱ्या मुसलमानांनी प्रत्येक वेळी अनुवादासह कुरआन पठण करावे. असे करणे शक्य ही नाही, कारण नामज मध्ये फक्त तिलावत (मूळ ग्रंथाचे पठणे) च केले जाते. आनुवाद वाचण्याचा तिथे प्रश्नच उद्‌भवत नाही. खरी गोष्ट अशी की पवित्र कुरआनाचे पठण अल्लाहची वाणी असल्याने आपल्या परिने उपासना होय व ईश-सान्निध्य प्राप्तीचे फार मोठे साधन आहे. कारण जेव्हा एखादा मनुष्य या ग्रंथावर ईमान बाळगून प्रामाणिक मनाने त्याचे पठण करतो तेव्हा तो अल्लाहचे स्मरण करतो आणि अल्लाहच्या वाणीच्या प्रभावाने त्याच्यावर विनम्रतेचा कैफ चढतो आणि ही फार मोठी अध्यात्मिक दौलत आहे. यास्तव त्याच्या प्रत्येक अक्षराबद्दल मोबदला मिळतो. म्हणून पवित्र कुरआनाच्या पठणाचे महत्व कमी केले जाऊ शकत नाही. याचा ज्या प्रमाणात इतमाम केला जावा मोबदला दायक ठरेल. याचे प्रोत्साहन कुरआनात ही दिले गेले आहे व हदीस वचनात ही. राहीलेत ते लोक जे कुरआन पठण तर खूप करतात, परंतु त्याला समजून घेण्याचा प्रय्तन कधी करीत नाही की आपण काय वाचत आहोत. येथपावेतो की त्यांना सूरह फतिहा, आणि रूकूअ व सुजूद (सजदे)च्या तस्बीह (स्तुती -वचना) चा ही अर्थ माहीत नसतो. आणि ना ते हे जाणतात की नमाज मध्ये ते कोणती गोष्ट कबूल करीत आहेत, व कोणत्या गोष्टीचा इन्कार करीत आहेत. ज्या प्रकारे अशी नमाज अदा तर होते परंतु आपले फळ आपल्या समुद्धी व आपल्या मोबदल्याच्या दृष्टीने व्यर्थ ठरते त्याच प्रकारे कुरआन पठणाने इबादतीचा फायदा जरुर लाभतो, परंतुत्याच्या अर्थाकडे दुर्लक्ष केल्याच्या परिणामी हेच नव्हे तर या इबादतीच्या मोबदल्यातही कमतरता येते, किंबहुना असा मनुष्य कुरआनाने लाभान्वित होत नाही आणि आपल्या प्रशिक्षणासाठी व मार्गदर्शनासाठी कुरआनाशी जो संबंध जोडावयास पाहीज़े तो संबंध जुडत नाही. ही फार मोठी वंचितता आहे. काय हे लोक असे समजतात की अल्लाह यांना हे विचारणार नाही की जेव्हा अल्लाहचा ग्रंथ तुमच्याजवळ होता तर त्याला समजून घेण्याचा प्रयत्न तुम्ही का केला नाही? काय हा ग्रंथ केवळ पठणा साठीच अवतरीत केला गेला होता कि अशासाठी अवतरीत केला होता की तुम्ही यापासून दिव्य प्रकाश प्राप्त करावा?

८४. नमाजचा हा विशेष परिणाम होय की त्याद्वारे विचारांमध्ये पावित्र्य व आचरणात ईश-भय निर्माण होते. तरी देखील, किती असे लोक आहेत जे नमाजी ही आहेत व दुराचारात ग्रस्त देखील परंतु हा त्यांचा स्वत:चा दोष आहे. कारण तीच नमाज परिणाम कारक असते जी विनम्र भावाने व प्रामाणिकपणे अदा केली जावी आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने याच ईमान धारकांना आखिरत मधील यशाची हमी दिली आहे. जे आपल्या नमाजमध्ये नम्रता अंगिकारतात (पहा सूरह मोमीनून आयत क्र. २ व टीप क्र. २) जर नमाज नम्रता पूर्वक नसेल तर अपराधांपासून सुरक्षित राहण्याची भावना वृद्धिंगत होत नाही.

८५. यावरून अल्लाहच्या स्मरणाचे (जिक्रचे) महत्व स्पष्ट होते की ही महान उपासना होय आणि नमाज अल्लाहच्या स्मरणाचे उत्कृष्ट स्वरूप होय. स्मरणात मनाने अल्लाहचे स्मरण करणे व जीभेने त्याचे नाम जपणे व गुणगान करणे या दोन्ही गोष्टी सामील आहेत. जो मनुष्य अल्लाहचे स्मरण करतो तो आपल्या पालन कर्त्याशी संबंध कायम करतो व त्याचे असामान्य परिणाम त्याच्या मन- मस्तिष्कावर व त्याच्या आचरणावर पडतात. आणि अल्लाहच्या स्मरणात जी गोडी, जी नशा, जो कैफ आहे त्याची कल्पना अशा लोकांना कदापि होऊ शकत नाही ज्यांना यात कसलेही स्वरास्य नाही.

अल्लामा इब्ने तैम्मिय्याने अल्लाहच्या स्मरणाचे महत्व अतिशय चांगल्या शैलीत स्पष्ट केले आहे ते म्हणतात-

'नमाज निर्लज्जता व दुष्कर्मा सारख्या अप्रिय गोष्टींना प्रतिबंध घालते आणि अल्लाहच्या स्मरणास जी एक प्रिय गोष्ट आहे. ताजे करते. आणि या प्रिय गोष्टीचे प्राप्त होणे, अप्रिय गोष्टींना दूर सारण्याच्या तुलनेने मोठी गोष्ट आहे. कारण अल्लाहचे स्मरण अल्लाहची उपासना होय व अल्लाह करीता मनोपासना खास करून आहे. जेव्हा वाईट गोष्टींचे यापासून दूर होणे स्वाभाविकपणे इतर (लाभा) करीता अभिप्रेत आहे. (मज्मुआ फतावा इब्ने तैमिय्या खंड १० पृ. १८८)

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा ताहा टीप क्र. १६.

८६. ही सूरह अशा वेळी अवतरली जेव्हा मुसलमानांचा एक समूह अनेकेश्वरवाद्यांच्या अत्याचारामुळे हिजरत करून हब्शा (ॲबिसीनिया) येथे पोहचला होता ज्या ठिकाणी नसारा (ख्रिश्चन) लोकांचे शासन होते. या प्रकारे मुसलमानांना ख्रिश्चनांसमोर कुरआनचे आवाहन मांडण्याची संधी लाभली होती. तदनुषंगे या ठिकाणी ही ताकीद दिली गेली की त्यांच्याशी अधिक चांगल्या प्रकारे चर्चा-विवाद करावा व याचे कारण पुढे फर्माविले की चर्चा-विवादाचा आरंभ एकमताने केला जावा व तो असा की जे ग्रंथ यांच्याकडे अवतरीत केले गेले होते त्यांच्यावर आम्ही ही ईमान बाळगतो व हे की आमचा व तुमचा ईश्वर एकच आहे मग जो ग्रंथ त्याने आज अवतरीत केला आहे त्यावर आम्ही सर्वांनी का ईमान बाळगू नये आणि जर धर्माची हकीगत अल्लाहला मानणे व त्याच्याशी राजी राहणे ही आहे तर आम्ही त्यावर व त्याच्या पैगंबरावर जो आम्हा सर्वांच्या मार्गदर्शनासाठी त्याने पाठविला आहे, ईमान बाळगून त्याच्या समोर नत मस्तक का होऊ नये.

आवाहन संदर्भात चर्चा विवादाची अधिक चांगली पद्धति व उत्कृष्ट शैली अंगिकारण्याची ताकीद एक तात्विक ताकीद होय. मुनाजरे व तत्वज्ञानीय विवादांनी काहीच पदरी पडत नाही. याऊलट गंभीरता पूर्वक केलेला विवाद प्रमाणाचे सामर्थ्य व अपील करणारी शैली हृदयाला जिंकते. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नहल टीप क्र. १८६.

राहीलेत अत्याचारी म्हणजे ते लोक जे सुज्ञतेचा वापर करावयास तयार नाहीत व आपल्या दुर्वतनावरच अटळ राहू इच्छितात तर मग आवाहनाचा कितीही चांगला मार्ग अंगिकारला जावो, कसलाही परिणाम त्यांच्यावर होत नसतो.

४७. आम्ही याच प्रकारे तुमच्याकडे ग्रंथ अवतरीत केला आहे.[८७] तर ज्यांना आम्ही (पूर्वी) ग्रंथ प्रदान केला होता ते यावर ईमान बाळगतात.[८८] आणि या लोकांपैकीही काही जण यावर ईमान बाळगत आहेत.[८९] आणि आमच्या आयतींचा इन्कार तर तेच लोक करतात जे काफिर आहेत.[९०]

وَكَذَٰلِكَ أَنزَلْنَا إِلَيْكَ الْكِتَابَ ۚ فَالَّذِينَ آتَيْنَاهُمُ الْكِتَابَ يُؤْمِنُونَ
بِهِ ۖ وَمِنْ هَٰؤُلَاءِ مَن يُؤْمِنُ بِهِ ۚ وَمَا يَجْحَدُ بِآيَاتِنَا
إِلَّا الْكَافِرُونَ ﴿٤٧﴾

४८. (हे पैगंबर !) तुम्ही या पूर्वी ना एखादा ग्रंथ वाचत होते व ना त्यास आपल्या उजव्या हाताने लिहीत होते. असे असते तर मिथ्यावादींनी संशय केला असता.[९१]

وَمَا كُنتَ تَتْلُو مِن قَبْلِهِ مِن كِتَابٍ وَلَا تَخُطُّهُ بِيَمِينِكَ ۖ
إِذًا لَّارْتَابَ الْمُبْطِلُونَ ﴿٤٨﴾

४९. वास्तविक पाहता या स्पष्ट आयती होत त्या लोकांच्या छाती (हदया) त ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे.[९२]आणि आमच्या आयतींचा इन्कार तर अत्याचारीच करतात.

بَلْ هُوَ آيَاتٌ بَيِّنَاتٌ فِي صُدُورِ الَّذِينَ أُوتُوا الْعِلْمَ ۚ وَمَا يَجْحَدُ
بِآيَاتِنَا إِلَّا الظَّالِمُونَ ﴿٤٩﴾

५०. हे लोक म्हणतात याच्यावर त्याच्या पालनकर्त्यातर्फे निशाण्या का नाही अवतरीत केल्या गेल्या ! [९३] सांगा, निशाण्या तर अल्लाह जवळच आहेत, मी तर केवळ स्पष्ट खबरदार करणारा आहे.

وَقَالُوا لَوْلَا أُنزِلَ عَلَيْهِ آيَاتٌ مِّن رَّبِّهِ ۖ
قُلْ إِنَّمَا الْآيَاتُ عِندَ اللَّهِ وَإِنَّمَا أَنَا نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿٥٠﴾

५१. या लोकांकरीता ही निशाणी पुरेसे नव्हे की आम्ही तुमच्या वर ग्रंथ अवतरीत केला, जो यांना वाचून ऐकविला जातो.नि:संशय यात (अल्लाहची) कृपा व सदुपदेश आहे त्या लोकांकरीता ज्यांनी ईमान बाळगले.[९४]

أَوَلَمْ يَكْفِهِمْ أَنَّا أَنزَلْنَا عَلَيْكَ الْكِتَابَ يُتْلَىٰ عَلَيْهِمْ ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ
لَرَحْمَةً وَذِكْرَىٰ لِقَوْمٍ يُؤْمِنُونَ ﴿٥١﴾

५२. (हे पैगंबर !) सांगा, अल्लाह माझ्या व तुमच्या दरम्यान साक्षीसाठी पुरेसा आहे.[९५] तो जाणतो जे काही आकाशांमध्ये व जमीनीवर आहे. जे लोक असत्यावर श्रद्धा ठेवतात आणि अल्लाहशी कुफ्र (इन्कार) करतात, तेच नाश पावणारे आहेत.[९६]

قُلْ كَفَىٰ بِاللَّهِ بَيْنِي وَبَيْنَكُمْ شَهِيدًا ۖ يَعْلَمُ مَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۗ
وَالَّذِينَ آمَنُوا بِالْبَاطِلِ وَكَفَرُوا بِاللَّهِ أُولَٰئِكَ هُمُ الْخَاسِرُونَ ﴿٥٢﴾

८७. म्हणजे ज्या प्रकारे यापूर्वी ही आम्ही ग्रंथ अवतरीत करीत राहीलो त्याच प्रकारे हे पैगंबर आम्ही हा ग्रंथ तुमच्यावर अवतरीत केला आहे.

८८. कुरआन 'ग्रंथ प्रदान केला होता' व 'ग्रंथ दिला गेला होता' च्या एका विशेष फरकासह प्रयोजितो. 'ग्रंथ प्रदान केला होता' शी अभिप्रेत ते ग्रंथ-धारक होत जे ईश-ग्रंथाचे कदर करणारे बनलेत व 'ग्रंथ दिला होता' शी सर्वसामान्य ग्रंथधारक अभिप्रेत होत.

या ठिकाणी ज्या ग्रंथधारकांच्या ईमान बाळगण्याचा उल्लेख केला गेला आहे ते यांच्यापैकी प्रामाणिक व सच्चे लोक होते जे अल्लाहच्या ग्रंथावर पूर्वीपासूनच ईमान बाळगत होते आणि जेव्हा कुरआन त्यांच्या समोर आले तर त्यांनी याच्यावरही ईमान बाळगले विशेष:संकेत हब्शा (ॲबिसीनिया) च्या ख्रिश्चनांकडे आहे ज्यांनी कुरआन व त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगले होते. त्या सर्वात तेथला बादशहा नजाशी याने फार पुढकार घेतला होता.

८९. म्हणजे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांपैकी असे लोक निघत आहेत जे ईमान बाळगतात.

९०. येथे काफिरशी अभिप्रेत असे लोक होत जे ईमान बाळगण्यास कोणत्याही प्रकारे तयार नाहीत अर्थात कट्टर काफिर.

९१. हजरत मुहम्मद (सल्ललालाहु अलैहि वसल्लम) यांचे पैगंबर असण्याबद्दल याहून अधिक स्पष्ट प्रमाण दुसरे कोणते असू शकते की त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. तर ते निरक्षर होते. ग्रंथ बाळगणाऱ्यांजवळ जे तौरात व इंजील (बायबल) होते त्याला ही त्यांनी कधी वाचले नव्हते, ना त्यातून काही गोष्टी आपल्या हाताने लिहिल्या होत्या आणि ही गोष्ट मक्केच्या अनेकेश्वरवादींना व ग्रंथधारकांना ठाऊक होती. म्हणून कोणीही ते निरक्षर नसल्याचे म्हटले नाही अशा स्थितीत हा प्रश्न उद्भवतो की कुरआन सारखा ग्रंथ जो ज्ञान व अल्लाहच्या परिचयाची खाण आहे व पैगंबरांच्या वृत्तांतांनाही कमालीच्या निकेपतेसह सादर करतो, जो मनोविकृतिंकरीता स्वास्थ्यप्रद औषधही आहे व चांगल्या नितिमत्तेने माणसाला घडवितो व ज्याची प्रत्येक गोष्ट काटेकोर व प्रत्येक शब्द रत्न माणिकासमान आहे आणि ज्यात ईश्वराची खरी ओलख दिली गेली आहे व माणसाच्या मार्गदर्शनाची सामुग्री ही आहे, अशा वैभवाचा ग्रंथ सादर करणे एका निरक्षर व्यक्तिस कसे शक्य झाले? या प्रश्नाचे उत्तर या खेरीज काहीच असू शकत नाही की कुरआन पैगंबर लिखित नाही तर अल्लाहने अवतरीत केलेला ग्रंथ आहे अर्थात हा त्यांच्या पैगंबर असण्याचा डोळस पुरावा होय.

प्रेषित्वानंतर ते लिहीणे वाचणे शिकले नाहीत आणि ना एखाद्या सहीह हदीसला या गोष्टीच्या समर्थनार्थ प्रस्तुत केले जाऊ शकते की नंतर त्यांनी शिक्षण घेतले होते त्याचे निरक्षर असणे व्यंगात्मक नव्हे तर अभिमानास्पद आहे. कारण निरक्षर असूनही कुरआनासारख्या बुद्धिकौशल्य- युक्त ग्रंथाला सादर करणे एक उघड चमत्कार होय जो कियामती पर्यंतचा आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २३४.

९२. कुरआन अल्लाहचा ग्रंथ असण्याबद्दल हा आणखी एक पुरावा होय. कुरआनाचे आवाहन विवेकाची हाक होय आणि एक विवेकशील स्वभावाचा मनुष्य याच्या आयतींना ऐकून हे अनुभूत करतो की ही एक वैशिष्ट्यपूर्ण वाणी आहे आणि यात बोलणारा जो आहे तो केवळ अल्लाहच आहे. मग जर त्याला त्या ग्रंथांचे ही ज्ञान असेल जे यापूर्वी अवतरीत केले गेले तर त्याला ही अनुभूति सुद्धा होईल की दोघांचा मूलस्त्रोत एकेच होय. तात्पर्य ज्ञानी लोक कुरआनाच्या आयतींना आपल्या अंत: करणाची बाब समजतात.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे कुरआनाच्या आयती ज्ञानी लोकांच्या मन:पटलावर अंकित झाल्या आहेत व ही कुरआन अल्लाहचा ग्रंथ असण्याविषयीची स्पष्ट साक्ष आहे.

९३. अभिप्रेत अनुभूत ईश-चमत्कार होत.

९४. हे त्यांच्या त्या आक्षेपास उत्तर होय की हा मनुष्य जर खरोखर पैगंबर आहे तर एखादा चमत्कार का दाखवित नाही, त्यावर फर्मांविले गेले की हा ग्रंथ (कुरआन) फार मोठा चमत्कार आहे. हा चमत्कार असतांना अन्य एखाद्या चमत्काराची गरजच कोठे उरते?

तसेच हा चमत्कार आपल्या स्वरूपाच्या दृष्टिने मोठा लाभदायक आहे. जे लोक यावर ईमान बाळगतील त्यांच्यावर अल्लाहच्या कृपेचा वर्षाव होईल व ते यापासून बोध ग्रहण करतील.

९५. म्हणजे कुरआन प्रमाण ठरल्यानंतर प्रेषित्वाविषयी अधिक वेगळ्या प्रमाणाची गरज राहात नाही. अल्लाहने हा ग्रंथ अवतरीत करून माझ्या प्रेषितत्वाची जी साक्ष दिली आहे ती पुरेशी होय.

९६. असत्य म्हणजे सत्याविरूद्ध. अल्लाह या सृष्टीची सर्वात मोठी हकीगत होय. ज्याची खरी ओळख त्याचा पैगंबर व त्याच्या ग्रंथाद्वारे लाभते. या हकीगती विरूद्ध मनुष्य जी श्रद्धा व जो दृष्टीकोन ही बाळगेल तो असत्य ठरेल मग त्याचा परिणाम विनाशा शिवाये आणखी काही नाही.

५३. हे लोक तुमच्याजवळ शिघ्र शिक्षेची मागणी करीत आहेत. जर एक निश्चित वेळ ठरविली गेली नसती तर यांच्यावर अजाब केव्हाच आला असता. [९७] आणि निश्चितच तो यांच्यावर अचानक येईल, अशा अवस्थेत की यांना खबर सुद्धा होणार नाही.[९८]

وَيَسْتَعْجِلُوْنَكَ بِالْعَذَابِ ۭ وَلَوْلَآ اَجَلٌ مُّسَمًّى لَّجَاۗءَهُمُ الْعَذَابُ ۭ وَلَيَاْتِيَنَّهُمْ بَغْتَةً وَّهُمْ لَا يَشْعُرُوْنَ ﴿٥٣﴾

५४. हे तुमच्या जवळ शिघ्र शिक्षेची मागणी करीत आहेत, वस्तुतः जहन्नमने काफिरांना घेरून ठेवले आहे. [९९]

يَسْتَعْجِلُوْنَكَ بِالْعَذَابِ ۭ وَاِنَّ جَهَنَّمَ لَمُحِيْطَةٌۢ بِالْكٰفِرِيْنَ ﴿٥٤﴾

५५. तो दिवस की (जेव्हा) अजाब त्यांना वरून ही झाकून टाकील व त्यांच्या पाया खालूनही, आणि तो फर्माविल की चाखा गोडी आपल्या दुष्कृत्यांची जी तुम्ही करीत राहीलात.

يَوْمَ يَغْشٰىهُمُ الْعَذَابُ مِنْ فَوْقِهِمْ وَمِنْ تَحْتِ اَرْجُلِهِمْ وَيَقُوْلُ ذُوْقُوْا مَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٥٥﴾

५६. हे माझ्या ईमान बाळगणाऱ्या दासांनो,माझी जमीन विस्तृत आहे, तेव्हा माझीच उपासना करा.[१००]

يٰعِبَادِيَ الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِنَّ اَرْضِيْ وَاسِعَةٌ فَاِيَّايَ فَاعْبُدُوْنِ ﴿٥٦﴾

५७. प्रत्येक जीवास मृत्युची गोडी चाखावयाची आहे. [१०१] मग तुम्ही आमच्याचकडे परतविले जाल.

كُلُّ نَفْسٍ ذَاۗىِٕقَةُ الْمَوْتِ ۣ ثُمَّ اِلَيْنَا تُرْجَعُوْنَ ﴿٥٧﴾

५८. ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केलीत, त्यांना आम्ही जन्नतच्या उंच स्थानांवर जागा देऊ.[१०२] ज्यांच्या खालून प्रवाह वाहत असतील तिथे ते सदैव राहतील कितीतरी चांगला मोबदला आहे आचरण करणाऱ्यांसाठी !

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ لَنُبَوِّئَنَّهُمْ مِّنَ الْجَنَّةِ غُرَفًا تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَا ۭ نِعْمَ اَجْرُ الْعٰمِلِيْنَ ﴿٥٨﴾

५९. ज्यांनी सहनशीलता पाळली व आपल्या पालनकर्त्यावर भरवसा ठेवला.[१०३]

الَّذِيْنَ صَبَرُوْا وَعَلٰي رَبِّهِمْ يَتَوَكَّلُوْنَ ﴿٥٩﴾

६०. असे, कित्येक प्राणी आहेत जे आपली आजीविका उचलून फिरत नाहीत. अल्लाह त्यांना आजीविका देतो व तुम्हाला देखील. [१०४] तो सर्व काही ऐकणारा जाणणारा आहे. [१०५]

وَكَاَيِّنْ مِّنْ دَاۗبَّةٍ لَّا تَحْمِلُ رِزْقَهَا ڰ اَللّٰهُ يَرْزُقُهَا وَاِيَّاكُمْ ڮ وَهُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ﴿٦٠﴾

९७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने यांच्याकरीता कर्म-संधीची जी मुदत निश्चित केली आहे ती संपण्यापूर्वी अजाब (शिक्षा) येऊ शकत नाही. जर अल्लाहचा हा नियम नसता की त्याच्या पैगंबराचा इन्कार करणाऱ्यांना तोल सावरण्याची संधी दिली जावी, तर निश्चितच त्यांच्यावर अजाब केव्हाच आला असता.

९८. म्हणजे जर हे आपल्या सत्य-विरोधी वर्तनावर कायम राहीले तर कर्म-संधीची मुदत संपल्यावर अपरिहार्यपणे अजाब येईल व अशा प्रकारे येईल की यांना थांगपत्ता सुद्धा लागणार नाही की आमच्यावर अल्लाहची शिक्षा अवतरीत आहे.

९९. म्हणजे हा तर इहलोकीय शिक्षेचा मामला झाला. राहीली आखिरतची शिक्षा तर जहन्नम काफिरांपासून लांब नाही. तिने यांना चोहोबाजूंनी वेढा घातला आहे. म्हणजे ते सर्वप्रकारे जहन्नमच्या पकडीत आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कहफ टीप क्र. ४७

१००. ही सूरह अवतरत असतांना मक्केत मुस्लमानांची संख्या मुठभर होती. त्यांनी इस्लाम धर्म कबूल केल्यामुळे अनेकेश्वर वादींनी त्यांना अत्याचाराचे निशाण (Target) बनवून ठेवले होते. ही स्थिती लक्षात घेता त्यांना हे मार्गदर्शन केले गेले की जर मक्का येथे तुम्हाला अल्लाहची उपासना करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होत नाही व तुमच्या धर्म व इमानास धोका निर्माण झाला आहे तर तुम्ही एखाद्या अन्य देशात हिजरत (स्थलांतर) करा यास्तव हब्शा (ॲबिसीनिया) कडे हिजरत क्रम चालू राहीला.

इस्लामची तात्विक शिकवण हीच की ज्या देशाची जमींन मग ती मक्का सारख्या पवित्र शहराची जमीन का असेना, ईमानबाळगणाऱ्यांवर एवढी तंग होते की ते ना आपल्या ईमानास व्यक्त करू शकतात व ना एकमेव अल्लाहची उपासनाच करू शकतात तेव्हा यांनी देशत्याग करून एखाद्या अशा ठिकाणी गेले पाहीजे जिथे त्यांना आपल्या धर्माच्या मूलभूत बाबींवर आचरण करण्याचे स्वतंत्र्य लाभावे. अशा वेळी जन समूह व मातृभूमीचे प्रेम आडवे येता कामा नये कारण आपल्या धर्म व इमानाखातीर समाज, देश व घरदार ही योडले जाऊ शकते. परंतु जन समूह व देश घरादारासाठी धर्म व ईमानाचा त्याग केला जाऊ शकत नाही.

حُبُّ الْوَطَنِ مِنَ الْاِيْمَانْ

'देश प्रेम ईमानात अंतर्भूत आहे' एक गढलेली (मौजूअ) हदीस आहे. जिला लोक संशोधनाविनाच सादर करतात व हेतु हे जाहीर करण्याचा असतो की इस्लाम देश-भक्तिचे समर्थन करतो. वास्तविक पाहता कुरआनात स्थलांतरास जेव्हा ते आवश्यक ठरेल ईमानाची निकड म्हणून सादर केले गेले आहे जे देशभक्तिच्या अगदी विपरीत आहे.

१०१. म्हणजे जेव्हा प्रत्येक माणसाला मृत्यु क्रमाप्राप्त आहे तेव्हा काळजी मरणोत्तर जीवनाचीच असली पाहिजे. मृत्युची आठवण धर्माच्या मार्गात उद्‌भवणाऱ्या त्रास यातनांना सहन करण्यास तयार करते व ऐहीक सुखोपभोगात लिप्त होण्यापासून वाचविते हदीस वचनातील उल्लेख असा-

اَكْثِرُوْا ذِكْرَهَاذِمِ اللَّذَّاتِ يعنى الموت۔ (ترمذی ابواب الزہد)

'अत्याधिक प्रमाणात स्मरण करा लज्जती'ना संपविणाऱ्या गोष्टीस, अर्थात मृत्युला.' (तिर्मिजी अबवाबुल जेहाद)

१०२. उपरोक्त आयतीत धर्माच्या मार्गात घरदार सोडण्याचा उल्लेख होता म्हणून इथे त्याच्या मोबदल्याच्या अनुरोधाने जन्नतच्या उंच स्थानांचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फुर्कान टीप क्र. १०९

१०३. या ठिकाणी ईमान बाळगणाऱ्यांच्या दोन गुण विशेषांचा उल्लेख केला गेला आहे. एक सहनशीलता व दुसरा अल्लाह वरील भरवसा प्रसंग शैली प्रमाण होय की इथे सहनशीलतेशी अभिप्रेत कसोटी घेणाऱ्या परिस्थितीत धर्मावर दृढ राहणे होय व त्या कष्ट यातनांना सहन करणे ज्या धर्मावलंबनाच्या मार्गात उद्‌भवतील राहीला अल्लाहवरील भरवसा तर याचा अर्थ हे आहे की ईमानधारकांचा मूळ विशवास बाह्य साधनांवर नव्हे, तर अल्लाहवर असतो जो साधने प्राप्त करून देणारा आहे आणि परिस्थितीला आपल्या मर्जीनुसार बदलतो. अल्लाहवरील भरवसा वस्तुत: मनाची ती कैफियत होय जी अल्लाहच्या कार्य घडविण्याबद्दल विश्वासाच्या परिणामी निर्माण होते.

१०४. स्थलांतराच्या स्थितीत आर्थिक प्रश्न निर्माण होतो म्हणून या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले जात आहे की आजीविका (खाद्य सामुग्री) देणे ही अल्लाहची जबाबदारी होय. तो जेव्हा जनावरांना खाऊ पिऊ घालतो तर तुम्हाला का नाही घालणार. तुम्ही बघता की असंख्य प्राणी, पक्षी व पाण्यात राहणारे सजीव असे आहेत जे आपली आजीविका डोक्यावर घेऊन फिरत नाही. परंतु अल्लाह प्रत्येक ठिकाणी त्यांना आजीविका देत आहे. त्या प्रमाणेच माणसालाही तो वेळोवेळी आजीविका देत राहीला आहे. म्हणून तुम्हाला काळजी केवळ अल्लाहच्या उपासने बाबत असली पाहिजे. या गोष्टीचे नव्हे की खायचे कोठून?

आजीविका संदर्भात अल्लाहतर्फे हमी असण्याचा हा अर्थ नव्हे की माणसाने आजीविका प्राप्तीसाठी योग्य प्रयत्न करू नयेत. प्रयत्न तर जनावरांना ही कोणत्या ना कोणत्या मर्यादिप्रत

करावेच लागतात, अन्यथा कोष्ट्याने जाळे विणले नसते, ना मुंग्या रांगेत चालल्या असत्या आणि ना पक्षी सकाळ होताच खाद्य शोधण्यास निघाले असते.

لَوْ اَنَّكُمْ تَوَكَّلُوْنَ عَلَى اللّٰهِ حَقَّ تَوَكُّلِهٖ لَرُزِقْتُمْ كَمَا تُرْزَقُ الطَّيْرُ تَغْدُوْ خِمَاصًا وَتَرُوْحُ بِطَانًا۔ (الترمذی ابواب الزہد)

‘जर तुम्ही अल्लाहवर भरवसा केला असता, जसा की भरवसा करण्याचा हक्क आहे तर तुम्हाला अशा प्रकारे आजीविका दिली जाती ज्या प्रकारे पक्ष्यांना दिली जाते का ते सकाळी भूकेल्या स्थितीत निघतात व संध्याकाळी अगदी तृप्त होऊन परतात.’ (अत्तिर्मिजी अबवाबुल जुहद)

मात्र अल्लाहवरील भरवशाचीही शिकवण मुस्लमानांना भाकरीचा भक्त बनण्यापासून जरुर रोखते जी आजच्या काळात कम्युनिष्ट विचार सरणीची उत्पत्ति आहे.

१०५. संकेत या गोष्टीकडे आहे की अल्लाह तुमचे गाऱ्हाणे ऐकतो व तुमच्या परिस्थितीस जाणतो.

**जर तुम्ही यांना विचाराल की आकाश व जमीनीला कोणी निर्माण केले आणि सूर्य व चंद्राला कोणी आपल्या अधीन करून ठेवले आहे तर ते म्हणतील-अल्लाहने. मग ते कशा प्रकारे (सत्यापासून) विमुख होतात?(अल-क़ुर्आन)**

وَلَئِنْ سَأَلْتَهُمْ مَّنْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضَ وَسَخَّرَ الشَّمْسَ وَالْقَمَرَ لَيَقُوْلُنَّ اللّٰهُ ۚ فَأَنّٰى يُؤْفَكُوْنَ ﴿٦١﴾

६१. जर तुम्ही यांना विचाराल की आकाश व जमीनीला कोणी निर्माण केले आणि सूर्य व चंद्राला कोणी आपल्या अधीन करून ठेवले आहे तर ते म्हणतील-अल्लाहने. मग ते कशा प्रकारे (सत्यापासून) विमुख होतात?[१०६]

اَللّٰهُ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ يَّشَآءُ مِنْ عِبَادِهٖ وَيَقْدِرُ لَهٗ ۚ إِنَّ اللّٰهَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿٦٢﴾

६२. अल्लाहच आपल्या दासांपैकी ज्याच्या करीता इच्छितो आजीविका व्यापक करतो व ज्याच्या करीता इच्छितो संकुचित करतो. निःसंशय अल्लाह प्रत्येक गोष्ट जाणणारा आहे.[१०७]

وَلَئِنْ سَأَلْتَهُمْ مَّنْ نَّزَّلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً فَأَحْيَا بِهِ الْأَرْضَ مِنْۢ بَعْدِ مَوْتِهَا لَيَقُوْلُنَّ اللّٰهُ ۚ قُلِ الْحَمْدُ لِلّٰهِ ۚ بَلْ أَكْثَرُهُمْ لَا يَعْقِلُوْنَ ﴿٦٣﴾

६३. जर तुम्ही यांना विचाराल की आकाशातून पाणी कोणी वर्षाविले व जमीनीला, जेव्हा ती मृत झाली होती, जिवंत केले, तर ते म्हणतील अल्लाहने. सांगा प्रशंसा आहे अल्लाह करीता. [१०८] परंतु अधिकांश लोक बुद्धिचा वापर करीत नाही. [१०९]

وَمَا هٰذِهِ الْحَيٰوةُ الدُّنْيَآ إِلَّا لَهْوٌ وَّلَعِبٌ ۚ وَإِنَّ الدَّارَ الْآخِرَةَ لَهِيَ الْحَيَوَانُ ۘ لَوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ ﴿٦٤﴾

६४. आणि हे ऐकहिक जीवन काहीच नाही. मात्र खेळ क्रीडा. आणि आखिरतचे घर हेच खरे जीवन (स्थळ) आहे.[११०] जर या लोकांनी जाणले असते तर बरे झाले असते !

فَإِذَا رَكِبُوْا فِي الْفُلْكِ دَعَوُا اللّٰهَ مُخْلِصِيْنَ لَهُ الدِّيْنَ ۚ فَلَمَّا نَجّٰهُمْ إِلَى الْبَرِّ إِذَا هُمْ يُشْرِكُوْنَ ﴿٦٥﴾

६५. जेव्हा हे लोक नौकेत स्वार होतात तेव्हा अल्लाहला पुकारतात.धर्मा (नम्रता व दास्यत्वा) स त्याच्यासाठीच खास करतात.[१११] मग जेव्हा तो त्यांना वाचवून कोरड्या जमीनीकडे नेतो. तर अचानक हे शिर्क करू लगतात.

لِيَكْفُرُوْا بِمَآ اٰتَيْنٰهُمْ ۚ وَلِيَتَمَتَّعُوْا ۗ فَسَوْفَ يَعْلَمُوْنَ ﴿٦٦﴾

६६. यासाठी की आम्ही यांच्यावर जी मेहरबानी केली, तिच्याबद्दल त्यांनी कृतघ्नता दर्शवावी आणि (ऐहिक जीवनाची) मौज उडवावी. तर लवकरच त्यांना कळून येईल.

१०६. मक्केचे अनेकेश्वरवादी ही धारणा बाळगणारे होते की आकाश व जमीनीचा निर्माता अल्लाहच होय व त्याने सूर्य-चंद्राला निर्माण करून सेवारत केले आहे. परंतु ही वस्तुस्थिती मान्य केल्यावर ही ते तिच्या निकडींकडे पाठ फिरवितात व शिर्क करू लागत होते. या ठिकाणी याच गोष्टीवर आशचर्य व्यक्त केले गेले आहे की जेव्हा ते या हकीगतीस मान्य करतात तर मग अशी कोणती गोष्ट आहे जी यांना यापासून परावृत्त करते? व हे कशा प्रकारे बहकून जातात.

१०७. म्हणजे हे जर आपली आजीविका भरपूर करण्या करीता अल्लाह खेरीजच्या उपास्यांना पुकारतात तर त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की आजीविकेचा मामला अल्लाहच्या हाती आहे व त्याच्या समस्त योजना बुद्धिकौशल्य युक्त असतात. तो आपल्या दासांच्या अडचणींना चांगल्या प्रकारे जाणतो व ही त्याची बुद्धिकौल्य युक्त उपाय योजना होय की तो एखाद्यास भरपूर आजीविका देतो तर एखाद्यास अगदी मोजून मापून.

१०८. म्हणजे अल्लाहशी कृतज्ञता होय. की तुम्ही अल्लाहच्या या कार्यकुशलतेस मान्य केले व जेव्हा तुम्ही हे मान्य केले आहे तर मग त्याचेच गुणगान करा व त्याचीच स्तुती-प्रशांसा करा.

१०९. म्हणजे जर त्यांनी बुद्धीचा वापर केला असता तर अशा परस्परविरोधी गोष्टी बोलले नसते. एकीकडे एका फार मोठ्या हकीगतीस मान्यही करतात व दुसऱ्याकडे तिच्याकडे पाठही फिरवतात.

११०. म्हणजे खरे व निरंतर जीवन आखिरतचेच जीवन होय. जेथल्या देणग्या शास्वत, जेथल्या बागा सदाबहार व जेथला आराम व वैभव चिरकालीन आहे. याऊलट ऐहिक जीवन काही दिवसांपुरतेच आहे ज्याचे लाभ व ज्याची गोडी अगदीच तुच्छ होय. परंतु ऐहिक जीवनाची मनमोहकता अशी काही आहे की माणसाचे मन रमते व त्याच्या लाभात व गोडीत तो मग्न होतो. आखिरतमध्ये जेव्हा मनुष्य डोळे उघडील तेव्हा त्याला जाणवेल की खरे जीवन तर हेच आखिरतचे जीवन होते व जगात जे जीवन मी जगलो ते आपल्या लाभ, गोडी, ऐश व आरामाच्या दृष्टिने केवळ खेळ क्रीडेची करमणूक होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेता माणसाने इहलोकास नव्हे तर आखिरत (मरणोत्तर जीवना) ला ध्येय बनवावे व जगात अशा प्रकारे जीवन व्यतीत करावे की आखिरतचे धवल यश त्याला प्राप्त व्हावे.

ऐहिक जीवनाची ही अर्थशून्यता त्याच्या निव्वळ भौतिक लाभ व चकाकीच्या पैलूने आखिरतच्या जीवनाच्या तुलनेने आहे. अन्यथा कुरआनाच्या स्पष्टीकरणानुसार ऐहिक जीवन एक कसोटीमय जीवन आहे व जो मनुष्य ईमान बाळगून सदाचाराचे जीवन जगतो तो बाकी राहणाऱ्या सत्कर्माची फार मोठी दौलत प्राप्त करतो आणि ही त्याची अधिक चांगुलता (Achievment) आहे.

१११. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह युनूस टीप क्र. ४२

६७. काय हे पाहत नाही की आम्ही एक शांतीपूर्ण पवित्र स्थळ बनविले आहे आणि दशा ही की लोक याच्या परिसरातून हिसकवून नेले जातात.[११२] मग काय ते असत्यास मानतात आणि अल्लाहच्या देणगीशी कृतघ्न होतात.

أَوَلَمْ يَرَوْا أَنَّا جَعَلْنَا حَرَمًا آمِنًا وَيُتَخَطَّفُ النَّاسُ مِنْ حَوْلِهِمْ ۚ أَفَبِالْبَاطِلِ يُؤْمِنُونَ وَبِنِعْمَةِ اللَّهِ يَكْفُرُونَ ﴿٦٧﴾

६८. आणि त्याहून मोठा अत्याचारी कोण असेल ज्याने अल्लाहशी खोट्या गोष्टीचा संबंध जोडावा किंवा सत्याला खोटे ठरवावे जेव्हा ते त्याच्याजवळ येऊन पोहोचले असावे.[११३] काय अशा काफिरांचे ठिकाण जहन्नम मध्ये नसेल?

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا أَوْ كَذَّبَ بِالْحَقِّ لَمَّا جَاءَهُ ۚ أَلَيْسَ فِي جَهَنَّمَ مَثْوًى لِلْكَافِرِينَ ﴿٦٨﴾

६९. आणि जे लोक आमच्या मार्गात प्रयत्न करतील.[११४] आम्ही निश्चित त्यांच्यासाठी आपले मार्ग उघडवू.[११५] आणि निश्चितच अल्लाह सत्कर्मि लोकांच्या सोबत आहे.[११६]

وَالَّذِينَ جَاهَدُوا فِينَا لَنَهْدِيَنَّهُمْ سُبُلَنَا ۚ وَإِنَّ اللَّهَ لَمَعَ الْمُحْسِنِينَ ﴿٦٩﴾

११२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कसस टीप क्र.१११

११३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ४०

११४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ८

११५.अभिप्रेत मांगल्याचे मार्ग होत. जो मनुष्य अल्लाहच्या मार्गात मेहनत करतो व कष्ट यातना सहन करतो अल्लाह त्यावर मांगल्याचे मार्ग खुले करतो. त्यामुळे त्याच्या अंगी उत्कृष्ट गुणविशेष वाढीस लागतात. त्याचा उत्साह वाढतो. असत्याचा पुरुषासारखा मुकाबला करण्यासाठी तो सज्ज होतो. त्याच्या अंगी बुद्धिकौशल्य व अंतर्दृष्टि निर्माण होते. त्याच्यातले सुप्त गुणधर्म वृद्धिंगत होत जातात. मग तो अल्लाह प्रणित सुबुद्धिने मोठ्यात मोठे सद्‌भाग्य प्राप्त करू लागतो व आपल्या प्रिय पालनकर्त्या प्रत पोहचतो.

११६. या ठिकाणी सत्कर्मी लोकांशी अभिप्रेत विशेषतः असे लोक होत जे अल्लाहच्या मार्गात धावपळ करणारे, त्याच्या खातीर जीव टाकणारे व जेहाद करणारे आणि त्याच्या धर्मावर अटळ राहणारे आणि त्याच्या आवाहन व प्रसाराच्या मार्गात प्रत्येक प्रकारचा त्रास सहन करणारे असतात. अशा सदाचारी लोकांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या मैत्रीची खुशखबर ऐकविली आहे व ज्याला अल्लाहची मैत्री लाभेल, तेव्हा उघड आहे की पावलो पावली अल्लाह त्याला सहाय्य करील व तो यशाच्या शिखरावर हमखास पोहचेल.

# (Index)

# अनुक्रमणिका (Index)

(पृष्ठ क्रमांक)

**अल्लाह**
- बुद्धिकौशल्य बाळगणारा ७३६, ७३८, ९१०, ११५६, १२०४, १२३८, १३१८, १४०२, १४०३, १४०८
- भिज्ञ ७३६, ७३८
- माफ करणारा ७४८, ८८८, ९२६, ९५६, १००२, १०७६, १०७७, १०७८
- दया करणारा ७४८, ७६४, ८८७, ८८८, ९९०, ११२८, ११४२, ११६२, ११६३, १२००, १२१४, १२२६, १२४८, १२५२, १२७२, १२८८, १२९०, १२९४, १३००, १३०२, १३१०, १३२०, १३६०
- ची च उपासना ७७२, १०४०, १०४१, १०४२, १०४८, १०६०, १०६२
- वरच भरवसा ७७२
- एकमेव उपास्य ७५२, ७५४, ७६४, १०२२, ११२८, ११२९, ११४८, ११९६
- करीताच परोक्षज्ञान ७७२, ८३२, १३४०, १३४३
- निरीक्षक आहे ७३८, ७४०
- स्नेहभाव राखणारा ७६४
- ला मानणे व नंतर शिर्क करणे ८२२, ८२३
- अर्शवर उंच ६९२,७०४, ७०५, १०४०, १०४८
- आकाशांचा व जमीनीचा स्वामी ८१३, ८१८, ८३६, ८३८, १०५८, १०५९, १३२६, १३२७
- जिवित राखणारा व मारणारा ७१२
- लोकांवर मेहरबान ७१२, ७१४, ७१५
- ला संतती नाही ७१४, ७१६, ७१८, ७२०, ९७८, ९७९,१०५४, १०५५, ११०२
- प्रत्येक गोष्टीस समर्थ ७३६, ७३८, ९१४, ९१५, ९१६, १२६०
- च सिंहासन पाण्यावर होते ७३८,७३९,७४०,७४१
- शी खोट्या गोष्टीचा संबंध जोडणे ७४२, ७४३
- शी भेटीचा विश्वास ८२८
- शिक्षा देण्यात कठोर ८२८
- सर्वात मोठा ८३२,११६०,११६१
- अत्युच पदाचा ८३२, ११६२
- ला पुकारणे खरे आहे ८३४, ८३५, ८३६
- च्या पुढे सजदा करणे ८३४, ८३५, ८३६, ९०६, ९०७, ११४०, ११४१
- प्रत्येक गोष्टीचा निर्माता ८३६, ८३८, ८८६
- च्या स्मरणाने मन:शांती ८४०, ८४२, ८४३
- वर्चस्व शाली ८५०, ८६४, ९१०, १२७२, १२८८,१२९०,१२९४,१२९६,१३००, १३०२, १३१०, १३१८, १३४४, १४०२, १४०८
- गुणवैशिष्टे बाळगणारा ८५०, ११६२
- च्या देणग्यांची गणना अशक्य ८५८,८५९,८९६, ८९७
- ज्ञान सम्पन्न ८८६, ८९६, ९९०, ११५६, ११६०, १२२६, १२३८, १३४४, १३४५, १४०८, १४१४
-पवित्र आणि उच्चतम ८९०, ८९२, ८९३, ९५४
- च्या आदेशाने प्रत्येक गोष्ट अस्तित्वात येते ९०२, ९०३, १३८०, १३८१
- वर भरवसा ९०४
- स्नेहशील ९०६
- ऐकणारा ९३६, ९९०, १२३८
- पाहणारा ९३६, ९७२, ९९०
- अर्श (ईशसिंहासन) बाळगणारा ९५४, ९५५, ११०२, ११९०, ११९६
- सहनशील ९५६
- चे सान्निध्य शोधणे ९६०
- कार्य साधक ९६०, ९९१
- या रहमान म्हणून पुकारणे ९७४, ९७६
- करीता सर्व चांगली नावे ९७६, १०५८
- करीता सर्व प्रशंसा ९७४, ९७६, ९७८
- करीता मोठेपणा ९७४,
- च्या आदेशात कोणीही सहभागी नाही ९९०
- च्या फर्मानास कोणी बदलू शकत नाही ९९४,९९५
- करीता समस्त अधिकार ९९८, ९९९
- अत्याचार करीत नाही १०००, १००१
- च्या गोष्टी लिहिण्याकरीता समुद्रांची शाई झाली तरी पुरेशी ठरणार नाही १०२२

- पुत्र बनविणे त्याला साजेलसे नाही १०४०, १०४१, १०५४, ११९२, ११९३
- कडे सर्व परतविले जातील १४००, १३८०, १३८१
- चा वायदा पूर्ण झाल्याखेरीज राहात नाही १०४६, १०४७
- बिघडलेल्या लोकांना तो सावरण्याची संधी देतो १०५३
- गुप्त गोष्टी जाणणारा १०५८, १०५९
- खेरीज कोणीही ईश्वर नाही १०५८, १०६०, १०८०, १०८२, १३८०
- करीताच आकाश व जमीनीची राज्यसत्ता १२३४, १२३५, १२४६
- चे ह. मूसाशी संभाषण करणे १०६०, १०६१
- चे ज्ञान प्रत्येक गोष्टीस व्यापून १०८०, १०८२, १०८४
- चिरसजीव व चिरस्थायी १०८६
- कोणापुढेही उत्तरदायी नाही ११०२, ११०३
- अनेक ईश्वरांची कल्पना खोटी व अयोग्य आहे ११०२, ११०३
- शी भय बाळगण्याची ताकीद ११३२, ११३३
- च्या विषयी ज्ञानाशिवाय वाद करणे ११३२, ११३६, ११३७
- च सत्य आहे ११०६, ११३७, ११६०, १२१६, १३८२, १३८३
- मृतांना जिवंत करतो ११३६, ११३७
- च्या मार्गापासून रोखणे ११४२, ११४३
- च्या प्रतिष्ठांचा आदर ११४२, ११४७
- च्या जवळ एक दिवस एक वर्षा समान ११५४, ११५५
- स्नेहाळू आहे ११६०, ११६१
- व्यापकता बाळगणारा १२२६, १२२७
- अतिसूक्ष्म व ज्ञाता ११६०, ११६१
- नि:स्पृह ११६०, ११६१
- ला मजबूत धरण्याचा अर्थ ११६७
- जवळ क्षमायाचना करणारा १२०६
- आकाशांचे व जमीनीचे तेज १२३१
- मोठा समृद्धशाली १२४६, १२४८, १२६२
- तेज असण्याचा अर्थ १२३१
- समृद्धशाली असण्याचा अर्थ १२४७, १२४९
- ची योजना बद्धता १२४६, १२४७, १२४८, १२४९
- खराखुरा शासक १२५२, १२५३
- जिवंत आहे कधीही मरणार नाही १२६२, १२६३
- चे भय त्याच्या महानतेच्या कल्पनेने निर्माण होते १२९१
- करीता स्तृति १३३८, १३५२, १३५३, १३८०, १४१४
- व्याकुळ दासाचे आर्जव ऐकणारा १३४०, १३४१
- चे अस्तित्व एक वस्तुस्थिती १३४१
- शिवाय कोणीही उपास्य नाही १३८८
- खेरीज प्रत्येक गोष्ट नाश पावणारी १३८८
- लाच निर्णयाचा अधिकार आहे १३९९
- ची मैत्री सत्कर्मी लोकांना १४, १६

**अस्हाबुर रस** १२५६
- कोण होते १२५७

**अमानत दारी (विश्वस्तता)** ११७२, ११७४

**अय्यूब (अलै.)**
- चे रोगग्रस्त होणे व नंतर स्वास्थ्य लाभ होणे १११८, ११२०

**अपहार करणारे अल्लाहला पसंत नाहीत** ११५०, ११५१

**अर्शे इलाही (ईश-सिंहासन)**
- पाण्यावर होते ७३९, ७४१

**अरब लोकांचे मुलींना लज्जास्पद समजणे** ९०६, ९०९

**अली** ९५९

**अल्लाह खेरीजच्या उपास्यांना पुकारणे** ११३६, ११३७, ११३८,११३९

**अनाथाच्या सम्पत्तीजवळ न जाणे** ९५२

**अबु बक्र (रजि)** ९५९

**अपराधी**
- ची परिणति १०५४

**अयकावाले** ८८२, ८८३, १३०२, १३०३

**असत्य**
- चे साक्षी बनणे १२६८, १२६९

**अनुकरणास्तव चुकीचा युक्तिवाद (मुत्तकी)**

**अल्लाहचे भय बाळगून वोगणारे (मुत्तकी)**
- रहमान समोर शाही पाहुण्यांप्रमाणे जमा केले जातील १०५४, १०५५
- करीता खुश खबरी १०५४
- लोकांचे इमाम बनविण्याची दुआ १२६८, १२७०

**आखिरत** ७४४
- चा मोबदला ८०४
- चा अजाब ८४४, ९४१, १०९२
- मध्ये कोणते लोक नाश पावतील ९४६
- ची इच्छा बाळगणारा ९४४, ९४७
- जीवन उद्दिष्ट ९४७
- अधिक चांगली ९४८, ९४९
- वर ईमान बाळगणारे ९५६, १३१६, १३१७
- मध्ये आंधळा ९६६, ९६७

- वर ईमान न बाळगणारे ७४२, ११८८, ११८९, १३१६, १३१७
- आवागमन एक अयोग्य दृष्टीकोन ११९३, १३४५
- विषयी अनेकेश्वर वाद्यांचे ज्ञान डळमळीत १३४४, १३४५
- चे घर कोणत्या लोकांकरीता आहे १३८६. १३८७

**आदम (अलै.)** १०४६
- चा किस्सा १०८८, १०८९, १०९०, १०९१
- ला ज्या जन्नत मध्ये ठेवले गेले होते तिचे स्वरूप १०८८, १०८९
- सैतानाचे आदमला बहकाविणे १०८८, १०८९
- कडून भूल १०८८, १०८९

**आकाश व जमीन**
-खांबाशिवाय ८२८, ८२९
- ची रचना सत्यासह ८५४, ८५५, ८८५, ८८७, ८९०, ८९३, १४०८, १४०९
- मध्ये बुरूज ८७२, ८७३, १२४४
- पवित्रता वर्णन करते ९५६
- सप्त आकाश ९५६
- दिवा आणि प्रकाशमान चंद्र १२६२, १२६३
- चे ईश्वराच्या स्वत्वातून अस्तित्वात येण्याची ऋग्वेदाची मिथ्या कल्पना १३४१
- चा निर्माता १४४४
- ची निर्मिती सहा दिवसात १२६२

**आयत (कुरआनातले वचन)**
- शाब्दिक अर्थ ८२९
- द्वारे बोध ग्रहण १२६८, १२६९

**आद** ७५४,८५२,१२५६,१२९४,१४०६,१४०७

**इब्राहीम (अलै.)** ८६०, ८६१, ११५२
- जवळ फरिश्त्यांचे पोहोचणे ८५८, ८५९, १४०४, १४०५
- ची पत्नी ८५८, ८५९
- ची दुआ १२६२, १२६३, १२८६, १२८७
- च्या अतिथींची घटना ८८०, ८८१
- आदर्श व्यक्तिमत्व ९३०, ९३१
- च्या मार्गाचे अनुसरण करण्याचा आदेश ९३०, ९३१
- अतिशय सच्चे १०४२, १०४३
- चे आपल्या पित्यास एकेश्वर भक्तिचे आवाहन १०४२, १०४३
- यांचा शिर्क व मूर्तिपूजेला विरोध १०४२, १०४३, १११२, १११३, १२८४, १२८५, १३९८, १३९९
- करीता सत्याच्या जिव्हा उंचविल्या गेल्या १०४४, १०४५, १२८६, १२८७
- च्या साठी त्यांना साजेल असे मार्गदर्शन १११०, ११११
- चे आपल्या पित्यास मूर्तिपूजेबाबत मनाई करणे १११०, ११११
- वर आग थंड होणे १११२, १११३, १४०२
- हज़रत इब्राहीम व लूत (अलै.) यांचे देशांतर समृद्धशाली जमीनीकडे १११२, १११५, १४०२, १४०३
- त्या हदीस ची हकीगत ज्यात ह. इब्राहीम यांच्याशी तीन खोट्या गोष्टींचा संबंध जोडला गेला आहे १११३, १११४
- यांना इसहाक आणि याकूब प्रदान केले गेले १११२, १११६, १११७
- करीता काबा गृहाची जागा उपलब्ध केली गेली ११४२, ११४३
- चा धर्म ११६४, ११६५
- चे आपल्या पिता व जनसमूहांस आवाहन १२८४, १२८५, १३९८, १३९९
- प्रेषित्व इब्राहिमच्याच वंशात आहे १४०४, १४०५

**इद्रीस (अलै.)**

**इस्माईल (अलै.)** ९६०, ८६२, १११८

**इस्राची घटना** ९३६, ९३७, ९३८
- अवलोकन ९३०, ९६२

**इस्लामी चळवळ**
- आणि प्रषितांचे आवाहन १२९१

**इस्लाम**
- व्यापक अर्थाने धर्म आहे १२०१
- सामूहीक जीवना संबंधी मार्गदर्शन करतो १२०१
- चा आपला विधिनियम ही आहे १२०१
- ही चुकीची धारणा की इस्लाम चा आरंभ हज़रत मुहम्मद (स.) पासून झाला आणि कुरआन अवतरण प्रसंगी कोणी ही मुस्लिम नव्हता १३७५
- स्विकारल्या नंतर कसोटी १३९२, १३९३

**इसहाक (अलै.)** ७५६,८५६,८६०,१०४४,१०४५
- ज्ञान सम्पन्न ८८०, ८८१

**इन्फाक (अल्लाहच्या मार्गात खर्च)** ७५१, ८४०, ८५८, ७५९

**'इन्शाअल्लाह' म्हणणे** ९९०, ९९१

**ईमान बाळगणाऱ्यांची गुणवैशिष्टये** ८३६, ८३७, ८३९, ८४०, ८४१, ८४२, ८७८, ८७९, ९२४, ९२६, ९३२

**ईमान बाळगणारे**
- ची उत्कृष्ठ परिणति ११४०, ११४१

-ची अल्लाहतर्फे संरक्षण ११५०, ११५१
- ना अल्लाह सत्ताधिकार प्रदान करील. १२३८, १२३९
- चे गुण विशेष ११७०, ११७१ ते ११७४, ११८६, ११८७
- करीता जन्नतचा वायदा १०७४, १०७५, १०७६, १०७७
- करीता कसले ही भय नसेल. ११८६
- पैगंबराचा निर्णय मान्य करतात १२३६, १२३७

**इतर धर्मीयांचे ग्रंथ**
- मनुस्मृती, वेद वगैरे संबंधी ते ईश ग्रंथ असल्याचा दावा निराधार १३७३

**ईमान**
- चे फळ ६९७

**इतिहासाच्या विद्यमान पुस्तकांचे फार मोठे वैगुण्य** १२९२

**ईश्वर**
- संबंधाने अन्य धर्मीयांचा तत्वज्ञान पूर्ण गोष्टी १२६३
- विषयी अनेकश्वर वाद्योंची किळसवाणी कल्पना १३४२
- विषयी अनेकश्वर वाद्याचा हा दावा की तो एक आहे.त्याच सोबत तीन ईश्वरांची श्रद्धा ही आणि त्याच सोबत अनेक ईश्वरांची कल्पना ही. १३४२
- द्वारे इतर ईश्वरांना जन्म देण्याची मिथ्या कल्पना ही १३४२

**इमारती बनविणे**
- गर्वा करीता

**इच्छा भक्ति** १२५६, १२५७

**ईसा (अलै.)**
- यांचे जन्मस्थळ १०३३, १०३७, ११८२,११८३
-त्यांचे पाळण्यात बोलू लागणे १०३८, १०३९, १०४०, १०४१
-बुद्धिचा वापर शरीअतच्या आदेशाना आचरणात आणण्यात १२४२, १२४३

**उम्मुल किताब (पवित्र ग्रंथाचे मूळ)** ८४६, ८४७

**उम्मते मुस्लिमा (मुस्लिम जन समूहा) ची निवड** ११६४, ११६५

**उपजिविका**
- अल्लाह अन्नदाता असण्याबद्दल भरवसा १४१४
- उपद्रव व उत्पातापासून रोखण्याची जबाबदारी ७७२, ७७३

**उपासना अल्लाह खेरीज कोणाची ही नाही** ७३६, ७३७, ७३८, ७४४, ७५२, ७५४, ७६४, ९४८, ९५०, ११२२, ११२३, ११६४
- चा अर्थ ७३७, ७३९, ८८८
- आपल्या पालनकर्त्याची ८८६, ८८७, ९०२
- व आज्ञा पालना मधील फरक ९४९
- अल्लाहच्या उपासनेत एखाद्यास सहभागी करणे १०२४
- ची वास्तविकता १०६२
- एका किनाऱ्यावर राहून अल्लाहची उपासना करणे ११३६, ११३७
- ची पद्धति अल्लाहने निश्चित केली आहे ११६२, ११६३

**ऐकीव गोष्ट निवेदणे** १२१६

**औलीया अल्लाह (अल्लाहचे मित्र)** ७१४, ७१५, ७१६, ७१७, ७१८, ७१९

**करार करणे** १२२६, १२२७

**कारुन**
- कोण होता १३७२, १३७३
- चे खजीने १३७२, १३७३
- ची धनभक्ति, अत्याचार व उत्पात १३ ८४, १३८५
- इस्लाम तिजोऱ्या भरण्याची अनुमति देत नाही १३४६
- प्राप्त झालेल्या सम्पत्तिस आपल्या योग्यतेचे फल समजणे १३४६
- सम्पत्तिचे प्रदर्शन व थाटामाटाची अभिव्यक्ति १३८६, १३८७
- चा बोध घेण्याजोगी परिणति १३८६, १३८७, १४०६

**कब्र पूजा** ९८८

**कुरआन**
- हिकमतीचा ग्रंथ ६९२, ६९३
- कुरआनात पैगंबर ही फेरबदल करु शकत नाही ६९८, ६९९
- मनाने रचलेले नाही ७०८, ७०९, ७१८, ७२०
- सर्व विश्वांच्या पालन कर्त्या तर्फे ७०८, १३०४, १३०५
- चे आव्हान की या सारखी वाणी रचून दाखवा ७०८, ७०९ ७४२, ७४३, ९९०, ९९१
- मार्गदर्शन व कृपा ७१२, ७१३, ७१४, ८२२, ८२४
- उपदेश ७१२, ७१३, ७१४
- स्वास्थ्यदायक ७१२, ७१३, ७१४
- ची वचने दृढतम ७३६, ७३७, ७३८,७३९
- दिव्य ग्रंथ ७७६, ७७७, ७६८, ८६९, ८७०, १३१६, १३१९, १३५८
- अरबी भाषेत ७६६,७७७, ८४६, ८४७, १०८८, १३०४, १३०५
- केवळ पठणा करीता नव्हे तर समजून घेण्याकरीता ही ७७७
- चे अपरोक्ष वार्ता सांगणे ८२२, ८२३
- मुस्लिम आणि मुस्लिमेतर सर्वांनी समजून घेण्याची गोष्ट ८४३
- प्रकाशात आणणारा ग्रंथ ८५०, ८५१
- एक संदेश ८६४, ८६६

- चे मूळ मिशन ८६६
- च्या संरक्षणाची जबाबदारी अल्लाहने घेतली आहे ८६८, ८६९
- चा शाब्दिक अर्थ ८६९
- आपल्या मूळ स्वरुपात सुरक्षित ८७०, ८७१
- महान कुरआन
- च्या स्पष्टिकरणाचे कार्य पैगंबरांच्या हवाली ९०६
- पठण करतांना सैताना पासून अल्लाहचे शरण मागणे ९२४, ९२५, ९२६
- चे मार्गदर्शन सरळ मार्गाकडे ९४०, ९४३
- मध्ये सर्व प्रकारे स्पष्टीकरण ९५४, ९५५
- आणि काफिरांच्या दरम्यान आडपडदा ९५६, ९५७
- चे पठण फज्र च्या नमाज मध्ये ९६६, ९६७
- रोग मुक्ति आणि अल्लाहची कृपा ९६८
- मध्ये विषयांच्या पुनरावृत्ति चे बुद्धिकौशल्य ९७१
- सत्या सह अवतरला आहे ९७४, ९७५
- चे अवतरण क्रमश ९७४,९७५,१२३४,१२३५
- चे पठण करताताना भयकंपितता आणि सजदा ९७४, ९७६
- सन्मार्ग दाखविणारा ग्रंथ ९७८, ९७९
- चे खास वैशिष्ट्य ९७९
- सर्वसामान्य माणसाला ऐकविण्याचा आदेश ९९५
- मध्ये विविध प्रकारची उदाहरण १००२, १००३
- अवतरणाचा उद्देश १०५८, १०५९
- एक स्मरणिका १०५८, १०५९, १०९९
- अल्लाहचे स्मरण आहे. १०८६, १०८७
- पासून तोंड फिरविणारे १०८६, १०८७
- मध्ये ताकीदी १०८८, १०८९
- एक समृद्धशाली स्मरण १११०, ११११
- दिव्य प्रमाण ११३८
- चे ज्ञान प्राप्त करणे कर्तव्य होय १२०१, १३८८, १३८९
- मनाने रचलेले असण्याचा आक्षेप १२४६, १२४
- ला सोडून देणे १२५४, १२५५
- समजून घेण्याचा प्रयत्न न करणे १२५५, १४०९
- व्दारे जिहाद १२६०, १२६१
- चा अनुवाद त्याच्या आशयास व्यक्त करण्याचा प्रयत्न आहे १०३७
- भूतपूर्व ईश- ग्रंथात आहे १३०४, १३०५
- अरबेतरांकरीता ही प्रमाण १३०७
- ला ऐकण्यापासून सैतानांना दूर ठेवले गेले आहे १३०८, १३०९
- काय नव्हे १३१३
- हा विचार योग्य नव्हे की भाष्या विना कुरआन समजले जाऊ शकत नाही १३१७
- वाचून ऐकविण्याचा आदेश १३५२, १३५३
- च्या आयती ज्ञानी लोकांच्या हृदयात आहेत १४०८, १४११

**कुर्बानी**

- चे मूळ ईशभय (तकवा) आहे ११४८, ११४९

**कियामत**

- चा दिवस ७२८, ७६८
- च्या दिवशी काफिरांच्या नेत्यांच्या विवशतेचे चित्र ८५५
- च्या दिवशी हिशेब मांडला जाईल ८६०
- ची भयानकता ८६४, ८६५
- च्या दिवशी काफिरांचे अपराधांचे ओझे उचलणे ८९८, ८९९
-च्या दिवशी काफिरांकरीता अपमान ९००, ९०१
- चा मामला डोळ्यांचेलवण्या सारखा ९१६, ९१७
- च्या दिवशी लिखित काढले जाईल ९४४, ९४५
- च्या आधी अशी कोणतीही वस्ती नाही जी नष्ट झाली नसावी ९६०, ९६१
- च्या दिवशी प्रत्येक मनुष्य आपल्या इमाम सोबत ९६५
- च्या दिवशी काफिर अंध-अवस्थेत उठविले जातील ९७२, ९७३
- च्या दिवशी जमीन सपाट मैदान ९७८, ९७९
- च्या दिवशी पहाड चालविले जातील ९९८, ९९९
- च्या दिवशी सर्वांना एकत्र केले जाईल ९९८, ९९९
- च्या दिवशी अल्लाह समोर हजर केले जाईल ९९८, ९९९
- च्या दिवशी अत्याचारीकरीता हळहळ व्यक्त करण्याचा दिवस असेल १०४०, १०४१
- च्या दिवशी सर्व एकट्यानेच हजर होतील १०५४
- ची वेळ येणार आहे १०६०, १०६१
- च्या दिवशी सूर फुंकला जाणे १०८६, १०८७, ११९४, ११९५, १३५२
- च्या दिवशी पहाड धूळ बनून उडतील १०८६, १०८७
- च्या दिवशी जमीन सपाट मैदान १०८६, १०८७
- हिशेबाची वेळ जवळ येऊन ठेपण्याचा अर्थ १०९९
- च्या दिवशी न्याय-तुला ११०८, ११०९
- च्या दिवशी आकाश गुंडाळले जाईल १२२४, १२२५
- ची भिती प्रमाणिक ईमान धारकांना त्रास्त करणार नाही ११२४, ११२६, ११३३
- चा भूकंप ११३२, ११३३
- च्या दिवशी मतभेदांचा निर्णय ११६२

- च्या दिवशी जिव्हा आणि हातपाय साक्ष देतील १२१६
- च्या दिवशी राज्यसत्ता अल्लाहचीच ११५६
- च्या वेळेला खोटे ठरविणाऱ्यांची परिणति १२४८, १२४९
- च्या दिवशी आकाशाचे विदीर्ण होणे १२५२, १२५३
- च्या निशाण्या दाखविल्या जातील १३५२, १३५३
- च्या दिवशी प्रत्येक जनसमूहातून एक साक्षी सादर केला जाईल १३८२, १३८३
- च्या दिवशी कोणी कोणाचे ओझे उचलणार नाही १३९६, १३९७
- जवळच्या नातेवाईकांना अल्लाहचे भय दर्शविण्याचा आदेश १३४८, १३०९

**काफिर**
- च्या आचरणाचे उदाहरण ८५४, ८५५, ८५६, १२३०, १२३२
- चे एक दिवस मुस्लिम होण्याची इच्छा करणे ८६८, ८६९, ८७०, ८७१, १२८८, १२८९
- काफिरांकरीता जहन्नमची शिक्षा ११४०, ११४१
- काफिरांकरीता अपमानजनक अजाब ११५६, ११५७
- चे आचरण धूलीकणांप्रमाणे उडविले जाईल १२५२, १२५३
- चा पश्चाताप १२५२, १२५३, १२८८
- अल्लाहच्या निशाण्यांना खोटे ठरविणारे काफिरच होत मग त्यांच्या वर एखाद्या पैगंबराद्वारे प्रमाण प्रस्थापित झालेले का नसेना १२५९०
- ना कुफ्र खेरीज इतर अपराधांची ही शिक्षा मिळेल १२६७
- अल्लाहच्या कृपेपासून निराश १३९८, १३९९

**कम्यूनिजम**
- कडे धाव घेणे १३१७
- कोहे काफ १०१९
- कहफ आणि रकीम वाले ९८०, ९८१, ९८२, ९८४, ९८५, ९८६, ९८७, ९८८ ९८९, ९९०, ९९२
- रकीम च्या पर्वताचे द्दष्य ९८३
- आणि चमत्कार ९९१
- अर्रकीम घटना स्थळ ९९३

**कल्पनेमागे चालणे** ७०८

**कोष्टी किटकांचे उदाहरण** १४०६, १४०७

**कर्म लेख** ९४४, ९६४, ९६५, ९९८, १००१

**कवी-गण**
- कल्पनेच्या मागे धावळणारे १३१२, १३१३
- दसऱ्या खोऱ्यात भटकणारे १३१२, १३१३
- निष्क्रिय १३१२, १३१३
- निरर्थक काव्य १३१३
- इम्रउल, कैस, फरजदक, खय्याम, मीर व गालीब चे काव्य १३१३
- सदाचारपूर्ण काव्य अपवाद १३१३
- प्रेषित दरबार कवी हजरत हसान १३१४

**खाना ए काबा (काबा गृह)**
- प्रतिष्ठीत घर ८६०, ८६१, ८६२
- खर्च करण्यात संतुलन १२६४, १२६५
- खिलाफत चा अर्थ १२३९

**ग्रंथ-धारक (ईश- ग्रंथ बाळगणारे)** ८४४, ८४५
- मध्ये सत्यप्रिय ८४८, ९७४, ९७५
- यहुदींचे आपल्या ग्रंथास क्षतविसत करणे ८८७
- पैकी ते लोक ज्यांनी ग्रंथावर ईमान बाळगले १३७४, १३७५, १४०८, १४०९
- शी विवादाची उत्तम शैली १४०८, १४०९

**घटना व प्रसंगांच्या मागे महान हेतु** १०११

**घर**
- अनुमति घेऊन प्रवेश करण्याची ताकीद १२१२, १२१६, १२१७
- मध्ये प्रवेश करतांना सलाम करण्याची ताकीद १२१२, १२१६ १२१७, १२४२
- मुलांकरीता तीन वेळा अनुमती घेण्याची ताकीद १२३८, १२३९
- नातेवाईक आणि मित्रांच्या घरी जेवण्यास हरकत नाही १२४२, १२४

**चंद्राच्या मजली** ६९२, ६९४

**चमत्काराची वास्तविकता** ९९१

**जादू**
- चे हज़रत मूसाच्या चमत्कारासमोर मिथ्या ठरणे १०७२, १०७३, १०७४, १०७५
- जादूगारांचे ईमान बाळगणे १०७२, १०७३, १०७४, १०७५, १२७८, १२७९
- जादूगारांचे ईमान बाळगल्यानंतर फिरऔन ला आव्हान १०७२, १०७३, १०७४, १०७५
- मध्ये हा प्रभाव नाही की तिने एखाद्यास वेडा बनवावे १२९७

जिन्न
- चा जन्म ८७६, ८७७
- चे सैन्य १३२२, १३२३
- जन्नत ६९६, ६९७, ७६८, ८४०, ८४४, ८४५, ८५६, ८५९, ९००, ११३८
- सलामतीचे घर ७०४, ७०५, ७४४

- चे जीवन ८७९, ९९४, ९९५
- फिर्दोस १०२२
- मध्ये कोणतीही वायफळ गोष्ट ऐकू येणार नाही १०४६, १०४७
- मध्ये सकाळ संध्याकाळ उपजिविका १०४६, १०४७
- मध्ये उच्च दर्जे १०५६, १०५७
- मध्ये केवळ सलामतीच्या गोष्टी होतील १०४६
- वाले आरामाच्या ठिकाणी १०५२
- ईशभीरू करीता जवळ आणली जाईल १२८६, १२८७
- च्या उंच मजली १४१४,

**जूदी** ७५०, ७५१

**जिहाद** ९२६, ९२७, १२६१
- करण्याचा ईश-आदेश

**जहन्नम** ६९६, ७४२, ७६४, ७७२, ८२८, ९००, ९४०, ९५४, ९७२, ९७३, १०२३
- मध्ये रक्त पूं ८५४, ८५५, ८५६
- वाईट ठिकाण ८५८
- चे दरवाजे ८७८, ८७९
- च्या कनातींनी जहन्नमला घेरून ठेवले आहे ९९४, ९७५
- वर येणारे १०४८, १०४९
- येणाऱ्यांशी अभिप्रेत १०५०
- मध्ये गुन्हेगार ना मरतील ना जिवंत राहतील १०५६, १०५७
- मूर्ति जहन्नम चे इंधन ११२४, ११२५
- मध्ये काफिरांना शिक्षा ११४०, ११४१
- मध्ये दाखल होणाऱ्यांची अवस्था ११९४, ११९५
- कडे काफिर तोंडघशी ओढून नेले जातील १२५४
- चा अजाब चिकटून राहणारा १२६४, १२६५
- अनावरीत केली जाईल १२८६, १२८७
- मध्ये तोंडघशी टाकले जाणारे लोक १३५२, १३५३
- जमीनीचा खलीफा ७६६, ७६७

**जग (इहलोक)**
- चे जीवन आखिरतच्या तुलनेत ८४०, ८४१, ९२६, ९२७
- चे उदाहरण ९९८, ९९९
- ला ध्येय उदिष्ठ बनवून जीवन व्यतीत करणे ९९९
- करिताच प्रयत्न-पराकाष्ठा
- कियामतीच्या दिवशी जाणवेल की जगात केवळ काही दिवस राहीलो १०८६, १०८७, ११९६, ११९७
- ला चैन करण्याचे ठिकाण समजणे १२९५
- ऐहिक जीवनाची सामग्री १३७८, १३७९
- चे जीवन खेल तमाशा १४१६, १४१७
- च्या जीवनाची तुच्छता आखिरतच्या मानाने १४१७

**जुलकिफ्ल** १११९, ११२०

**जुन्नून (यूनुस)** १११९, ११२१

**जबूर** ९५८, ९५९, ११२८, ११२९

**जकूमचे झाड** ९६३

**जकरिया**
- ची पुत्रप्राप्ती साठी प्रार्थना १०२८, १०२९, ११२२, ११२३

**जकात (कर्तव्य- दान)**
- चा आदेश कुठटुंबियांना देणे १०४४, १०४५
- देणे ईमान बाळगणाऱ्यांचा गुणधर्म ११७०, ११७२, १३१६
- पासून गाफील न राहणारे १२३०, १२३२
- देण्याचा आदेश १२३८

**जमीन**
- चा विस्तार ८३०
- कियामतीच्या दिवशी बदलली जाईल ८६४, ८६५
- वर ताठ्यतेने चालू नका ९५४, ९५५
- ची शोभा सजावट कसोटी करीता ९७८, ९७९
- चे वारस ११२८, ११२९
- वर हिंडणे फिरणे ११५४, ११५५, १३४४, १३४५
- मध्ये उत्पात माजविणे १२९६, १२९७
- अल्लाहच्या निर्मितीचे अवलोकन करण्यास्तव जमीनीवर प्रवास करण्याचे आवाहन १३९८, १४००

**जन- समूह**
- चा विनाश १०५४, १०५५, ११००, ११०१, ११५२, ११५३, ११८०

**ज्योतिषी**
- पामिस्ट्री ज्योतिष विद्येचाच एक प्रकार १३११
- बाबा लोकांकडे रुजू करणे १३११

**टेटस रुमी** ९४२

**डुकराचे मांस हराम** ९२८, ९३०

**ढगांची गर्जना अल्लाहची प्रशांसा निवेदिते** ८३४, ८३५, ८३६

**तबर्रुज चा अर्थ** १२४१

**तराजू**
- योग्य तराजूने तोलणेत

**तसबीह (ईश स्तुती व जाप)**

- सृष्टीची ९५६, ९५७, १२३४, १२३५
- करण्याचा आदेश १०९२, १०९३
- ची वचने व त्यांचा लाभ १०९३

**तकवा (अल्लाहचे भय अंगिकारुन केलेले आचरण)** ८४४, ८४५
- अंगिकारण्याच्या मोबदला वाया जात नाही ८१६, ८१७
- अंगिकारणाऱ्यांची उत्कृष्ट परिणाति ८१७,१०९२, १०९४
- आणि सत्कर्माचा जगात मोबदला ९०१
- चा आशय १०९४, १२९१

**तौहीद (एकेश्वर वादा) च्या निशाण्या** ८२८, ८२९,८३०, ८३१, ८७४, ८९०, ८९१, ८९२, ८९४, ८९५, ८९६, ८९७, ९१०, ९११, ९१८, ९१९
- ची शिकवण तौरात मध्ये ९३८
- ची प्रमाणे ११९०, ११९१, १२३४, १२३५, १२५८, १२५९, १२७१, १२७२, १२७४, १२७५, १३२६, १३२७, १३४०, १३४१

**(दुष्कर्मावर पश्चाताप दग्ध होऊन अल्लाहची क्षमायाचना करीत पुन्हा कधीही न करण्याचा दृढ संकल्प)**
- चा आदेश ११२०, १२२५
- ची वास्तविकता १२६८, १२६९

**तौरात** ९४१
- सर्वसामान्य माणसांकरीता मार्गदर्शक ग्रंथ होता १३७३
- ची ती प्रत जी कुरआन अवतरणाच्या वेळी उपलब्ध होती १२३७३

**तवक्कल (अल्लाहवर दृढ भरवसा)** १३१०

**तोहमत (आळ)**
-सत्शील स्त्रीयांवर आळ घेणाऱ्यांची निर्भस्तना १२१६, १२१७

**तागूत**
- पासून अलिप्त राहणे ९०२, ९०३
- शी अभिप्रेत ९०२

**तुवा चे पवित्र खोरे** १०६०, १०६१, १०६३

**दोषारोपणाची घटना** १२०८, १२०९
- त्या कथनाचे संशोधन ज्यात हे सांगितले गेले आहे की हजरत आयशावर दोषारोप ठेवला गेला होता १२०९, १२१०, १२११, १२१२

**दुराचार**
- ला अधिक चागंल्या रीतीने दूर करणे ११९१, ११९३
- वाईट गोष्टींना भल्या गोष्टीत बदलण्याचा अर्थ १२६९

**दाऊद (अलै.)** ९५८, ९५९
- आणि सुलेमान चे तंट्याचा निर्णय करणे १११६, १११७, १११८, १११९
- च्या सहमता करीता पहाड व पक्षी ताब्यात १११८, १११९
- ला चिलखत बनविण्याचे शिक्षण १११८, १११९
- ला ज्ञान १३२०, १३२१

**दाबबतुल अर्ज (जमीनीतून एका जनावराचा उद्रेक)**
- कियामतीची मोठी निशाणी १३४८, १३४९

**दअ्वत (आवाहन)**
- ची कुरआनी शैली चे आवाहन ८२२,८२४, १३८८
- प्रस्तुत करण्यात नरमी चे धोरण १०६८, १०६९
- अनेकेश्वरवादी शासनास आव्हानात्मक शैलीत १३२९
- शिर्के आणि मूर्तिपूजेवर प्रहार करण्याबाबत हयगय करणे आवाहनाची रीत नाही १३३७
- कुरआनाची प्रमाणे तत्वज्ञानीय नाहीत तर साधे १३४१
- कुरआनाद्वारे आवाहन १३५३
- मुर्खांशी वाद न घालणे १३७६

**दुआ (प्रार्थना)**
- क्षमा आणि दयेची प्रार्थना ११९६, ११९७
- शुद्धी करीता १२१५

**दुसरे जीवन**
- वर यूक्तिवाद ८३१, ९१०, ९११, ९७२, ११७६, ११७७
- खचितपणे ९०२, ९५६, ९५७

**दासी**

**धर्म**
- ला वर्चस्वशाली करणे ७११
- जगाचे उदाहरण ७०२, ७०३
- ला क्षत विक्षत करणारे ११२२, ११२३, ११८४, ११८५

**धर्म (अनेक)**
- चा मतभेद ७००, ७०१
- चे क्षेत्र ७६५
- ची मर्यादीत कल्पना ७६५

**नाम :स्मरणाचा अर्थ** १०६२
- अल्लाहच्या स्मरणापासून तोंड फिरवणाऱ्या करीता तंगीचे जीवन स्थान १०९०, १०९१
- अल्लाहच्या स्मरणासंदर्भात मुसलमानांच्या विविध समूहांचे विविध दृष्टीकोन १०९३
- ने मन भयकंपित होणे ११४८, ११४९
- नामस्मरण व प्रार्थना
- सकाळी उठल्या क्षणी १२५९
- नाम:स्मरण फार मोठी गोष्ट १४०८, १४१०

**न्याय करण्याचा आदेश** ९२०, ९२१
**नातेवाईकांची मदत** ९२०,९२१,९५०,९५१
**नबुवत (प्रेषित्व)**
- आणि ज्योतीष विद्येत फरक ८७३
- अल्लाहची देणगी ८९१
- प्रयत्नांनी प्राप्त केली जाऊ शकत नाही १३१९
**निशाणी (ईश-चमत्कार) ची मागणी** ८४०, ८४१, ८४२,९७०,९७१
**नसारा (ख्रिश्नां) चे मतभेद** १०४०, १०४१
**निकाह (विवाह)**
- व्यभिचारी व अनेकश्वरवाद्याशी हराम १२००, १२०४
- व्यभिचारी स्त्री व अनेकेश्वरवादी स्त्री शी हराम १२००, १२०४
- करिता योग्यता १२१६, १२१७
- अविवाहीत लोकांचा निकाह करुन देण्याची ताकीद १२२६, १२२७
- सदाचारी गुलाम आणि दासींचा निकाह करून देण्याची ताकीद १२२६, १२२७
- अधिक वयापर्यंत निकाह न करणे १२२७
- नजर खाली लवलेली ठेवावी (पुरूषांना व स्थीयांना दोघांनाही ताकीद) १२१८, १२२०, १२२१
**नमाज**
- कायम करणे ७२२, ७२३, ८४०, ८५८, ८६०, ८६१, ९६६, ९६७, १२३८, १३१६
- चा प्रभाव ७७०, ७७१
- च्या वेळा ९६६, ९६७
- फज्र चे कुरआन पठण ९६६, ९६७
- तहज्जुद ९६८, ९६९
- मध्ये कुरआन पठणाचे शिष्टाचार ९७४, ९६७
- जमातीसह पढण्याचा एक महत्वपूर्ण हेतु ९९५
- चा आदेश कुटुंबियांना देणे १०४४, १०४५, १०९२, १०९३
- वाया घालविण्याबद्दल तंबी १०४६, १०४७
- अल्लाहच्या स्मरणार्थ कायम करणे १०६०, १०६१
- कायम करण्याची ताकीद पैगंबरांना १११२, १११६, १११७
- मध्ये विनम्रता ११७०, ११७१
- पासून गाफिल न राहणारे १२३०, १२३२
- निर्लज्जता व दुष्कृत्यांपासून रोखते १४०८, १४१०
**नूह (अलै.)** ७१८, ७१९, ७२०, ७२१, ८५२, ९३६, ९३८, १०४६, ११५२
- ची नौका १८,७१९,७२०,७२१,७४६,७४८
- चा वृतांत ७४४, ७४६, ७४८, ७५०, ७५२
- काय नूह चे वादळ समस्त पृथ्वीवर आले होते ? ७५१
- ची दुआ कबूल १११६, १११७
- च्या जन समूहास बुडविले गेले १२५६, १३९८
- चे आपल्या जन समूहास आवाहन १२८८, १२८९, १२९०, १२९१
- आणि ईमानधारकांचे मुक्ति प्राप्त करणे १२९०, १२९१
- चे वय १३९८, १३९९
**निराशा**
- अल्लाह शी ११३९, ११४०
**नूर (तेज)**
- अल्लाहच्या परिचयाचा १२३१
- ईमानाचे १२३२
**पाणी**
- मूळ जीवन आहे ११०४, ११०५
- प्रोटोप्लाझम ११०५
**पेशवा (प्रमुख)**
- जहन्नमकडे आवाहन करणारे १३७०, १३७१
**प्रयत्न**
- अल्लाहच्या मार्गात १३६७, १३७५
- करणाऱ्यांवर अल्लाहचा मार्ग खुलतो १४१६, १४१७
- पवित्र वचन (कलिमा, तैय्यबा) चे उदाहरण ८५४, ८५५
**फिरऔन** ७२२, ७२३, ७६६, ७६८, ७६९
- चे बुडतांना ईमान बाळगणे ७२२, ७२३, ७२४, ७२५
- चे प्रेत वाचविले गेले ७२२, ७२४, ७२६
- बंडखोर १०६४, १०६५, १०६९, १३५६, १३५७
- शी ही मागणी की त्याने इस्राईलच्या वंशाला देशाबाहेर जाऊ द्यावे व त्यास त्रास देऊ नये १०६८, १०६९, १०७१
- चे जादूगारांना एकत्र करून हज़रत मूसा यांच्या विरोधात येणे १०७०, १०७१, १०७२, १०७३
- चे उत्तर मूसाला १२७४, १२७५
- चे अल्लाहला मानण्यास इन्कार १२७६, १२५७, १३८०, १३८१
- चा दावा केवळ राजकिय शासकत्वाचा नव्हता १२७७
- चे बुडून मरणे १२८२, १२८६, १३७०, १४०६
- कडे जाण्याचा ह. मूसा ना आदेश १३२०, १३२१
- ची वर्गात विभागण्याची पॉलीसी १२५६, १३५७
**फरीशते** ८३१, ७९३
- पाहूण्यांच्या स्वरूपात ८८०, ८८१
- फरिशत्यांना आत्म्यासह पाठविणे ८९०,८९१,

८९२, ८९३
- फरिश्त्यांचे माणसांना मृत्यु देणे ९००, ९०१
- बंडखोरी करीत नाही ९०६
- अल्लाहच्या आदेशाचे पालन करतात ९०६, ९०७
- ना मुली ठरविणे ९५४, ९५५
- चे माणसाला सजदा करणे ९६०, १०००
- उपासने पासून थकत नाही ११००, ११०१
- जर ईशत्वाचा दावा करतील तर जहन्नम मध्ये फेकले जातील ११०२, ११०३
- मधून संदेश वाहक ११६४, ११६५
- उतरविले जाण्याचा अर्थ १२५२, १२५३

**फुर्कान** १२४६
- चा अर्थ १२४७

**फलस्तीन (पॅलेस्टीन)** ७४७

**बागवाल्याचा किस्सा** ९९६, ९९७, ९९८, ९९९

**बायबल**
-च्या या निवेदनाचे खंडन की बनी ईस्राईल ने मिस्त्री लोकांना लुटले होते १०८१

**बुजुर्ग**
- बुजुर्गाबद्दल श्रध्दाभाव शिर्कच्या मर्यादेप्रत कंरीत दफन झालेल्या बुजुर्गांना मुसलमानांचे संकटनिवारणार्थ पुकारणे १३४३
- अवलीया पासून उपजिविका मागणे १४००
- अवलीयाना गरजपूर्ति करीता पुकारणे शिर्के आहे. १४०९

**बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम.**
- हजरत सुलेमान यांच्या पत्राचा आरंभ १३२८, १३२९
- ची समृध्दी १३२९
- आवाहनात्मक व धर्मप्रचार विषयक पत्रांचा आरंभ या वचनाने १३२९

**बनी कुरेजा** ९४३

**बनी नजीर** ९४३

**बनी इस्माईल** **९४३**
- मध्ये अंतिम पैगंबरापूर्वी कोणताही रसूल आला नाही १३७२, १३७३

**बनी इस्राईल** ९३६, ९४१, ९६०, ९७४, ९७५
- चा समुद्र पार करण्याचा किस्सा ७२३, ७२५
- वर शत्रूंचे प्राबल्य ९४०, ९४१
- च्या बाहेर पडण्याचा मार्ग ७२७, १०७६, १०७७
- वर अल्लाहचा अनुग्रह १०७८, १०७९
- ची गोपुजा १०८०, १०८१
- ईश देणग्यांचे वारस बनविले गेले १२८०, १२८१
- मिस्त्र मध्ये कोठे राहत होते १२८१
- चे विद्वान १३०४, १३०५

**बैतुल लहम** १३३४, १०३५

**बैतुल्लाह (अल्लाहचे घर)**
- करीता अल्लाहतर्फे जागा निश्चित केली गेली ११४२, ११४३
- ला स्वच्छ शुद्ध ठेवण्याची ताकीद ११४२, ११४३
- प्राचीन घर ११४२, ११४५
- बंडखोराची परिणति १०४८, १०४९

**बुध्दि**
- चा वापर करणे ८२८
- चा योग्य वापर ८३८, ८४०
- चा वापर न करणे १४१४, १४१५
- भ्रमपूजा ९२९

**मद्य** ९१२, ९१३

**मध**
-मधमाशीला ईश्वरी प्रेरणा ९१२, ९१३
- मध्ये स्वास्थ ९१२, ९१३

**माशाअल्लाह म्हणणे** ९९६, ९९७

**मुतआ**
- चे स्पष्टीकरण ११७२
- ची अनुमति कधीही दिली गेली नाही ११७२, ११७३
- संबंधित रीवायतींवर नजर ११७२, ११७३, ११७४

**मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)**
- चा धर्म ७३२, ७३३
- चे प्रेषित्व समस्त जन समूहांकरीता ८३३, १२४७, १२४९
- कुरआनाचा चमत्कार ८४७
- खबरदार करणारे ८८६, ११५४, ११५५, १२४६, १२४८
- कियामतीच्या दिवशी साक्षी या नात्याने ९२०, ९२१
- वर शिकवण्याचा आरोप ९२६, ९२७
- आणि इसरा ची घटना ९३६, ९३७, ९३८
- वर जादू ने प्रभावित असल्याचा आरोप ९५६, ९५७, १२४८, १२४९
- करिता प्रशंसेचे स्थान ९६८, ९६९
- एक मनुष्य ९७०, ९७१, ९७२, ९७३, १०२२, १०९४
- वर 'कवी' असण्याचा आरोप १०९८, १०९९
- विश्ववासी करीता कृपा ११२८, ११२९
- वर वेडेपणाची शंका करणारे

- वर कुरआन रचण्याचा खोटा आक्षेप १२४२, १२४७
- खुशखबर देणारे व खबरदार करणारे १२६२, १२६३
- यांनी पारिश्रमिक मागितले नाही १२६२, १२६३
- यांनी लोकांच्या ईमान न बाळगण्याचे दु:ख १२७२,१२७३
- यांचे फर्मान कैसर व रूमच्या नावाने १३६३
- आधीपासून ग्रंथ अवतरीत होण्याची आशा बाळगत नव्हते किंबहुना त्याचे अवतरण अकस्मात झाले १३८८, १३८९
- ना वाचन करीत आणि ना आपल्या हाताने लिहीत १४०८, १४११

**मृत जनावराची निषिध्दता** ९२८, ९३०

**मरयम**
- चे पश्चिमेस एकांतवास १०३२, १०३४
- च्या समोर फरिश्त्याचे प्रकट होणे १०३२, १०३४
- चे रहमान जवळ शरण मागणे १०३२, १०३४
- ची सत्शील ता १०३२, १०३४
- चे गंभीर अवस्थेत दूरच्या ठिकाणी जाणे १०३२, १०३४
- बायबलच्या निवेदनाचे खंडन की मरयमचा साखरपूडा यूसुफ नावाच्या माणसाशी झाला होता १०३४
- येशू (मसीह) चा जन्म १०३६, १०३७
- चे सत्यशील व निष्कलंक असणे ११२२, ११२३
- च्या बाळंतपणाकरीता शांत टेकडीची जागा उपलब्ध केली गेली ११८३

**मृत**
- ऐकत नाहीत १३४८, १३४९

**मस्जिदी**
- ना बुलंद करण्याचा आदेश १२३१, १२३२
- चा आदर १२३२
- च्या उभारणीचा उद्देश १२३२

**मुस्लिम**
- अल्लाहने ठेवलेले नाव ११६४, ११६६

**मस्जिदे अक्सा**
- पारिभाषिक नाव ९३७
- मस्जिदे हराम ९३६, ९३७, ११४३
- पासून लाभन्वित होण्याचा सर्वांना समान हक्क आहे ११४३, ११४४

**मिस्कीन (दीन दुबळ्या)चा हक्क अदा करणे** ९५०, ९५१

**मुसाफीर (प्रवाशा) चा हक्क अदा करणे** ९५०, ९५१

**मुसलमानांचे शिर्क- ग्रस्त होणे** ९२१

**मेअराजची रात्र साजरी करणे शास्त्रविहीत नाही** ९३८

**मक्का**
- शांतीचे शहर ८६०, ८६१
- प्रतिष्ठेचे शहर १३५१, १३५२
- शांतीचा परिसर १३७६, १३७७, १४१६, १४१७, १४०६, १४०७

**मुनाफिक (दांभिक मुसलमान)**
- अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञा पालनाशी तोंड फिरविणारे १२३६, १२३७
- पैगंबराच्या बैठकीतून काढता पाय घेणारे १२४२, १२४४

**मृत्यु**
- ची गोडी प्रत्येकाला चाखायची आहे १४१२, १४१३

**मूसा (अलै.)** ८५०, ८५१, ९३६
- ला निशाण्या ९७२, ९७३
- आणि खिज्रचा किस्सा १००४, १००५, १००६, १००८, १००९, १०१०, १०११
- निवडक दास १०४४, १०४५
- ला प्रेषित्व प्रदान केले जाण्याचा किस्सा १०५८, १०५९, १०६०, १०६१
- च्या लाठीचा साप बनण्याची घटना १०६४, १०६५
- चा हात तेजस्वी होण्याचा चमत्कार १०६४, १०६५
- ची दुआ १०६४, १०६५
- च्या आईकडे वही १०६६, १०६७, १३५६, १३५७
- ला नदीत सोडून दिले जाण्याची घटना १०६६, १०६७
- चे पालन पोषण अल्लाहच्या देखरेखीत १०६६, १०६७,
- चे फिरऔनला एकेश्वर वादाचे आवाहन १०६८, १०६९, १०७०,१०७१
- ची सामरीला तंबी १०८०, १०८१, १०८२, १०८३
- चे वासराला राख करुन नदीत वाहविणे १०८०, १०८२, १०८४
- आणि हारुनला फुर्कान व तेज ११०८, ११०९
- ला फिरऔन कडे पाठविले जाणे ११८२,१२७४, १२७५
- ला ग्रंथ प्रदान केला गेला १२५४,१२५५,१३७२, १३७३
- हत्या अपराधाबाबत कबूली १२७४, १२७५
- चा चमत्कार १२७६, १२७८, १३१८, १३१९, १३७९
- च्या लाठीव्दारे समुद्र दुभंगण्याचा चमत्कार १२८२, १२८३
- ला अल्लाहतर्फे हाक मारली जाणे १३१८, १३१९, १३६८, १३६९, १३७२
- चा जन्म १३५६, १३५७
- ज्ञान व बुद्धिकौशल्य १३५८, १३५९
- व्दारे हत्या अपराध १३६०, १३६१
- चा मदयन कडे प्रवास १३६४, १३६५
-ला निकाहचा प्रस्ताव १३६५, १३६६

- चे स्त्रीयांच्या जनावरांना पाणी पाजणे १३६४, १३६५
- मदयनचे बुजुर्ग शोएब नव्हते १३६६
- ला तूर पर्वतावर आग दिसून येणे १३६८, १३६९
**मनुष्य**
- सर्व एक उम्मत (संप्रदाय व समूह) होते ६९८, ७०१
- ची अवस्था कृपेने उपकृत केले जाण्यावर ७३८, ७४०
- ची अवस्था क्लेश यातना ग्रस्त केल्यावर ७३८, ७३९, ७४०, ७४१
- ची निर्मिती निरुद्देश नाही ८५५
- ची निर्मिती मातीने ८७२, ८७४, ८७५, ८७६, ८७७
- डार्विनच्या सिद्धांताचे खंडन ८७६
- चे अस्तित्व केवळ भौतिक नाही ८७७
- ची निर्मिती पाण्याच्या थेंबाने ८८७, ९४५, १२६०, १२६१
- उतावीळ असणे ९४४, ९४५, ११०६, ११०७
- आखिरत करीता निर्माण केला गेला आहे ९४७
- मोठा कृतघ्न ९६४
- सर्व प्राणीमात्रात श्रेष्ठतम ९६५
- आणि फरिश्त्यांमध्ये महत्ताच प्रश्न ९६५
- मोठा संकुचित मनाचा ९७२, ९७३
- वर जबरदस्ती नाही ९९५
- जगात सदासर्वदा वास्तव कोणाचेही नाही ११०६, ११०७
- च्या जन्माच्या विविध अवस्था ११३२, ११३३, ११३४, ११७०, ११७४, ११७६, ११७७
- सत्ताधिकारास पात्र कोण आहेत ११५१, ११५३
- वंश आणि सासरची नाती १२६०, १२६१
**मोमीन (ईमानधारक)**
- वास्तविक कोण आहे ? १२४२, १२४४
- मेल्यानंतर पुन्हा जिवंत केले जाणे १०४८
**मोज माप**
- मध्ये कमी करणे ७६६, ७६७
**मार्गदर्शन**
- देणे अल्लाहच्याच हाती आहे ९७२
- मध्ये वाढ १०५२, १०५३
- देणे केवल अल्लाहचे काम, रसूल वाटेल त्याला मार्गदर्शन करु शकत नाही १३७६, १३७७
**माता पिता**
- शी सद्व्यवहार ९४८, ९४९, ९५०, ९५१, १३९४, १३९५
- शिर्केच्या बाबतीत त्यांचे आज्ञा पालन न करणे १३९४, १३९५
**मूर्ति पूजा**
- मूर्त्यांच्या घाणी पासून वाचणे ११४६, ११४७
- मूर्ति भजन १११२, १११३, १३९८
- ची अयोग्यता १२८६, १२८५, १३९८, १४००, १३९९
- अनेकेश्वरवाद्यांच्या दरम्यान परप्पर प्रेमाचे माध्यम ११४२, १४०३
**यासर** ९२७
**याजूज माजूज** १०१८, १०१९, १०२०
- चे प्रकट होणे १२३४, १२३५
- विषयी निराधार गोष्टी ११२५
**यहया (अलै.)** १२२२
- च्या जन्माचा शुभसमाचार १०३०
- नावाचे वैशिष्ट्य १०३१
- चा असामान्य रित्या जन्म १०३०, १०३१
- ला दृढपणे ईश ग्रंथ बाळगण्याची ताकीद १०३२, १०३३
- ला बालपणातच बुद्धिकौशल्य प्रदान केले जाणे १०३२, १०३३
- ची वैशिष्ट्ये १०३२, १०३३
**याकूब (अलै.)** ७५६, ७७९, ८०८, ८०९, ८१४, ८१५, ८१६, ८१७, ८१८, ८२०, १४०४
- च्या वंशात प्रेषित्व व ईश-ग्रंथ १४०४, १४०५
**यूनुस (अलै.)** ६९१
- यूनुस जनसमूहाची वस्ती ७३१
**युसूफ (अलै.)**
- चा वृतांत ७७४ ते ८२३
- चा वृतांत उत्कृष्ट असण्याचे कारण ७७७, ७७९
- चे स्वप्न आणि त्याचा अर्थ ७७८, ७७९
-चा वंश क्रम ७७९
- आणि त्यांच्या भावांच्या वृतांतात निशाण्या ७८०, ७८१
- चे गुलाम बनविले जाणे ७८२
- ला कोरड्या विहीरीत टाकणे ७८२
- अजीजच्या पत्नीचे आकर्षित होणे ७८६, ७८७
- चे बुरहान पाहण्याचा अर्थ ७८९
- ची निर्दोषिता ७९०, ७९१
- मिस्त्र (इजिप्त) च्या स्त्रीयांची बैठक ७९०, ७९१
- कारागृहात ७९०, ७९१, ७९४, ७९५, ७९६, ७९७
- चे दोन्ही तरूणांना स्वप्नार्थ सांगणे ७९६, ७९७
- राजाचे स्वप्न ७९८
- राजाच्या स्वप्नाचा अर्थ सांगणे ८०१

- खरे स्वप्न अल्लाहची निशाणी ८०१
- चे कैदेतून सुटकेस इन्कार आणि इजिप्तच्या स्त्रीयांच्या कारस्थानाची चौकशी करण्याची मागणी ७९६, ८०२
- चा इजिप्तमध्ये सत्ताधिकार ८०४, ८०५
- च्या अधिकाराचे स्वरुप ८०५, ८०६
- च्या भावांचे इजिप्तला येणे ७९६, ८०५
- इजिप्त मध्ये शिधा-वाटप सिस्टम ८०७
- राजघराण्याच्या मापाचे हरवून जाणे ८१०
- चे बिन यमीन ला इजिप्तमध्ये रोखणे ८०१,८१०
- चोरीच्या शिक्षेचा कायदा ८१०, ८१२
- ची आचरण शैली ८१३
- चे स्वत:ला जाहीर करणे ८१६
- चे आपल्या भावांना माफ करणे ८१६, ८१७
- चा सुगंध ८१६, ८१७
- चारीचा आणि सभ्यतेचा उच्च आदर्श ८१७
- च्या अंगरख्याने याकूबची दृष्टी परत येणे ८१८, ८१९
- च्या भावांचे आपल्या पित्याशी माफी करीता विनंती करणे
- याकूबच्या कुटुंबांचे इजिप्त स्थलातंर ८१८, ८१९
- चे आपल्या माता पित्यास सिंहासनावर बसविणे ८१८, ८१९
- यूसुफच्या पुढ्यात त्यांच्या भावांचे नतमस्तक होणे व स्वप्नाची पूर्तता ८१८, ८२०
- आदरार्थी सजद्याची चर्चा ८१९, ८२०
- ची दुआ (प्रार्थना) ८१९, ८२०
- च्या वृतांताचे खास मुद्दे बायबल मधून गायब ८२३
- यहुदीवर कोणत्या गोष्टी हराम केल्या गेल्या होत्या ९२८, ९२९, ९३०

**युद्ध**
- ची परवानगी ११५०, ११५१
- चा हेतु ११५०, ११५१

**रक्ताची निषिद्धता** ९२८, ९३०

**रात्र आणि दिवस**
- चे पाठोपाठ येत राहणे बोध ग्रहण करीता ११६२, ११६३
- मध्ये निशाण्या १३४८, १३५१
- आराम प्राप्त करण्यास्तव आणि कृपा शोधण्यास्तव १३८२, १३८३

**रहमान**
- ला सजदा करण्याचा अर्थ १२६२, १२६३
- चे दास १२६४, १२६५

**रसूल (पैगंबर)**
- प्रत्येक उम्मत करीता ७१०, ७११
- फक्त पुरुषां पैकी ८२२, ८२४
- आणि नबी मधील फरक १०४५, ११५५
- वर जबाबदारी १२३६
- प्रेषित आचरण पद्धतिचे महत्व १२३७
- पैगंबरांना स्वच्छ शुद्ध वस्तू खाण्याची व अल्लाहचे भय बाळगण्याची ताकीद ११८४, १२४४
- च्या अनुमति खेरीज बैठक सोडून जाऊ नये १२४२, १२४४
- च्या व्यक्तित्वावर आक्षेप घेण्याच्या स्थितीत संयम पाळणे १२५१
- मध्यवर्ति वस्तीत १३७८, १३७९

**रश्दीच्या सैतानी आयती** १३०९

**ऋग्वेद**
- निसर्ग (प्रकृति) चे नेहमीपासून असल्याची कल्पना १३४१

**रुहूल अमीन (जिब्रील)** १३०५

**राजकारण**
- ला ईश्वर आणि धर्मापासून विभक्त करणे १३१७

**राष्ट्रवाद**
- ला आपले ध्येय उद्दिष्ट बनविणे १३९४, १३९५

**लूत (अलै.)** ८८०,८८१, ११५२
- चा वृतांत ८६०, ८६२, ८६४
- ला ज्ञान व बुद्धिकौल्य १११६, १११७
- चे आवाहन १३००, १३०१, १३३८, १३३९, १४०४
- च्या जनसमूहाची परिणति १३३८, १३३९
- व्दारे ह. इब्राहीम यांचे समर्थन १४०२, १४०३

**लोंडी (दासी)**
- आपल्या दासी शी शरीर-संबंध ११७०, ११७१, ११७२
- ला व्यभिचारास्तव विवश न करणे १२२६, १२२८
- लज्जा-स्थानांचे रक्षण करणे १२१८, १२१९, १२२०, १२२१

वेरुळ-अजंठाच्या लेणी (गुफा)
- मूर्तिपूजा आणि निर्लज्जतेस प्रोत्साहन देणारी कला १२९७

**वीजेव्दारे अल्लाहचे स्मरण घडणे** ८३३

**वचन**
- ला पूर्ण करणे ८३६, ८३७, ८३८, ९२२, ९२३
- भंग करणे ९१२, ९१३, ९२४, ९२६

**वर्चस्वा करीता दुआ करणे** ९६८, ९६९

**वर्चस्व आणि सत्ताधिकार धर्माकरिता अपेक्षित** ९६९

**व्यभिचार**

- ची मनाई ९५२, ९५३
- चे तंटे ९५३
- ची शिक्षा १२००, १२०१
- व्यभिचारी पुरुषाशी निकाह हराम १२००, १२०४
- चा आळ घेणाऱ्या करीता शिक्षा १२००, १२०४
- एक भयंकर अपराध १२०१
- बलात्कार १२०१
- च्या साक्षींचा मामला १२०२
- विवाहीत व्यभिचारी व व्यविचारीणी करीता दगडानी मारा करून ठार करण्याचा आदेश प्रेषित वचनांनी सिद्ध आहे १२०२,१२०३
- हे कथन की रज्म च्या आयती कुरआनात होत्या, खोटे आहे १२०४
- चा आळ आपल्या पत्नीवर घेणे १२०२, १२०७
- ची आखिरतची शिक्षा १२६४, १२६५

**शोभा (सजावट) (अर्थात स्त्रीयांचा शुंगार)**
- चा अर्थ १२२१
- जाहीर होणाऱ्या सजावटीस लपविण्याचा आदेश १२२०, १२२१
- कोणत्या लोकांपुडे जाहीर केली जाऊ शकते १२२०
- सत्रे औरत (झाकण्याजोगे अवयव) १२२२
- चेहरा व तळहातांचे खुले राहणे १२२२, १२२३
- दुपट्ट्या चा आदेश १२२०, १२२४
- घराचा पडदा १२२४
- दागिन्यांचा झंकार १२२०, १२२५
- चे प्रदर्शन करविणे योग्य नाही १२३८, १२४१
- म्हाताऱ्या स्त्रीयांकरीता दुपट्टा न घेण्याची सूट १२३८, १२४१

**शिर्क**
- आणि मूर्तिपूजा ७००, ७०१, ८२२, ८२४
- अनेकेश्वरवादी धर्मांचा आधार ७१८
- शिर्क आणि नास्तिकते विरुद्ध प्रमाणे ७३९, ७४१
- अल्लाह खेरीज ज्या उपास्यांना कार्य साधक बनविणे ८३७
- अल्लाहचा समक्षक ठरविणे ८५८, ८५९
- चे खंडन ८९६, ८९७, ९०८, ९०९, ९१४, ९१५, ९१६, ९१७, ९५८, ९५९, ९६१, ९६४, ९७४, ९७६, ९७८, १०५२, १०५३, ११०२, ११०३, १२४६, १२७९, १२६२, १२६३, १३३८, १३३९, १३७८, १४१६
- अल्लाह करीता मुली ठरविणे ९०८, ९०९
- दोन ईश्वरांची कल्पना ९०९
- त्रिमूर्तिची श्रद्धा ९०९
- अल्लाहचा सहभागी ठरविण्याची मनाई ९४८, ९४९, ९५४, ९५५
- च्या परिणामी विनाशाचे उदाहरण ११४८, ११४९
- अल्लाह खेरीज अन्य एखाद्यास पुकारणे ११६०, ११६१
- अल्लाहखेरीज ज्या उपास्यांची भक्ति ११६२, ११६३
- ची कठोर शिक्षा १३०८, १३०९
- चे अड्डे व मंदिरांची सहल कारणे व पूजा पाठ प्रसंगी तेथे हजर राहणे १२६९
- इतरांना कार्य साधक बनविणे तसेच आहे जसे कोष्टी किटकांचे घर बनविणे १४०६, १४०७

**शुएब (अलै.)**
- चा वृतांत ७६४, ७६६
- चे आवाहन १३०२, १३०३, १३०६

**शफाअत (शिफारस)**
-तोच करु शकेल ज्याने रहमान कडून फर्मान प्राप्त केले असावे १०५४, १०५५
- च्या चुकीचा कल्पनेचे खंडन १०५४, १०५५, ११०३

**शुक्र (कृतज्ञता)चा अर्थ** ८५३

**शिक्षा देणे** ८४५

**शपथांना अपहाराचे साधन बनवू नका** ९२२, ९२३

**सूड घेण्याची अनुमति** ९३२, ९३३

**समूद** ७५४, ७५८, ७६८, ८५२, १२५६, १२९६, १३३६, १३३७, १३३८, १३३९
- हिज्रवाले ८८२, ८८३
- चे अवशेष ८८५
- करीता सांडणी चिन्ह ९६९

**सावलीचे अल्लाहला सजदा करणे** ९०६, ९०७

**सायरस**
- चे बाबील ला जिंकणे ९४२
- चा परिचय १०१३
- ची मोहिम (पश्चिमेकडची) १०१५, १०१६
- ची पूर्वेकडील मोहीम १०१५, १०१६
- ची तिसरी मोहीम १०१९, २०२१

**सबा**
- चे साम्राज्य १३२४
- ची राणी १३२१, १३२५, १३२७
- सूर्याला सदजा करणारा जनसमूह १३२६, १३२७
- हजरत सुलेमानचा सबाच्या राणीला मुस्लिम होऊन हजर होण्याचा आदेश १३२८, १३२९

- चे राज्य लोकाशाही राज्य नव्हते १३२९
- सबाच्या राणीचे व्यवहार ज्ञान १३२९
- सबाच्या राणीचे इस्लाम कबूल करणे १३३२, १३३४
**सब्त** (शनिवार) चा आदेश कोणत्या लोकांना दिला गेला होता ९३२, ९३३
**सलाम**
- अल्लाहच्या त्या दासांवर ज्यांना त्याने निवडले १३३८, १३३९
**समुद्र**
- दोन समुद्रांच्या दरम्यान पडदा १३४०, १३४१
**सअद बिन अबि वक्कासचा किस्सा** १३९५
**सुलेमान (अलै.)**
- करीता वेगवान वारे ताब्यात १११८, १११९
- ला ज्ञान १३२०, १३२१
करीता सैतान ताब्यात १११८, १११९
-ला पक्ष्यांची भाषा शिकविली गेली होती १३२२, १३२३
- करीता जिन्नांचे लषकर १३२२, १३२३
- चे मूंग्यांचे बोलणे ऐकून हसणे १३२२, १३२३
- ची दुआ १३२२, १२२३
- चे हुदहुद १३२२, १३२३
- हुदहुद द्वारे सबाहून वार्ता आणणे १३२२, १३२४
- सबा राणी चे भव्य सिहासन व त्या सिंहासनाला हजर करण्याचा चमत्कार १३२२, १३२४, १३३१, १३३२, १३३३
- च्या पत्राचा मजकूर १३२८, १३२९
- चे सत्ताधिकारास इस्लामच्या प्रचारार्थ वापरणे १३२९
- चे सबाच्या राणीचा नजराणा स्विकारण्यास इन्कार करणे १३२०, १३२१
- च्या दरबारात ग्रंथाचे ज्ञान बाळगणारी व्यक्ति, जिने सबा राणीचे सिंहासन पापणी लवण्यापूर्वी हजर केले १३३२, १३३३
- चा काचेचा महाल १३३२, १३३३
**सूरह मरयम**
- चे हबशच्या राजाच्या दरबारात ऐकविले जाणे १०२७
**सामरी**
- चे बनी इस्त्राईलला मार्गभ्रष्ट करणे
- चे वासरु घडविणे १०७८, १०७९, १०८०, १०८१
- रसूलच्या पद चिन्हातून मूठ भर घेण्याचा आश्य १०८१, १०८३
- ला जगात बोधदायक शिक्षा १०८०, १०८४
- च्या वासराचे तुकाडे तुकडे केले जाणे १०८०, १०८२, १०८४
**सूर्य**
- चे गतिमान असणे ८३७
**सैतान**
- चे कियामतीचा दिवस मान्य करणे ८५६
- मरदूद (रद्द केला गेलेला) ८७२
- चे लोकांच्या कर्मास सुशोभित बनविणे ९१०
- चा जोर कोणत्या लोकांवर चालतो ९२४, ९२५, ९६०
- माणसांचा वैरी ९५८
- चे वायदे ९६०
- च्या अस्तित्वाचा पुरावा १००१
- काफिरांना बहकवित राहतात १०५२, १०५३
- ला मित्र बनविणे १३३२
- ने निर्माण केलेल्या शंका ११५६, ११५७, ११५९
- च्या कुविचारांपासून शरण मागणे ११९०, ११९३
- माणसाची साथ सोडणारा १२५२, १२५३
- कोणावर अवतरीत होतात १३१०,१३११
**सालेह (अलै.)**
- चा वृतांत ७५४, ७५६
- चे आवाहन १२९६, १२९७, १३३६, १३३७
- च्या सांडणीचा चमत्कार १२९६, १२९७
**साबई** ११४०
**सब्र (धैर्य-संयक)** ७३८, ७४०, ८१६, ७७०, ८४०, ८४१, ८५२, ८५४, ९४४, ९२६, ९३२, १०९२, १०९३, ११९४, ११९५
- च्या मोबदल्यात जन्नत ची उंच स्थाने १२६८, १२७०, १४१४
- ईमान बाळगल्या नंतर धैर्याची कसोटी घेणारी परिस्थिती १३९२, १३९६
**सहाबांना बरेवाईट बोलणारे** ११५३
**संततीची हत्या** ९५०, ९५१
**साक्ष**
- आळ घेणाऱ्यांची कबूल न करणे १२००, १२०४
**समुद्रांचा मिलाप** १००५, १००७
**समलिंगी** ८६३
- भारतात जनसमूहांचा विनाशांची लक्षणे ८५६
**सृष्टी**
- खेळण्या बागडण्याकरीता बनविली गेली नाही ११००, ११०१
- आपल्या प्रारंभिक अवस्थेत कशी होती ११०४, ११०५
- मध्ये असलेला प्रत्येक अल्लाहचे गुणगान करीत आहे, १२३४, १२३५

- चे रेकॉर्ड ठेवणारा ग्रंथ ७१३, ७३८, ७३९, ७४०, ७४१

**स्त्री**

- काही स्त्रीया पुरूषापेक्षा अधिक समंजस असतात १३२९
- सबाच्या राणीचे व्यवहार ज्ञान १३२९

**हज्ज**

- इब्राहीमचे हज्ज चे एलान करण्याची ताकीद ११४२, ११४३
- शी संबंधित ११४२, ११४४, ११४८, ११४९

**हदीस**

- प्रमाण दृष्टया कमकूवत हदीस ११५७, ११५८

**हराम ला हलाल ठरविणे** ७१२, ७१३, ७१४

**हराम ला हलाल चा आदेश आपल्या तर्फे देऊ नका** ९२०, ९२९, ९३०

**हिकमती च्या गोष्टी** ९५४

**हारुन (अलै.)** ७१८, ७२०

- नबी १०४४, १०४५
- मूसाचे मंत्री १०६४, १०६५, १२५४, १२५५
- वर बायबल चा चूकीचा आक्षेप १०८३
- ला रसूल बनविण्यास्तव ह. मूसाची दुआ १२७४, १२७५, १३६८, १३६९

**हामान** १३८३, १३५७, १३५८, १३७०, १४०६

**हिजरत (स्थलांतर)** ९०४, ९०५, ९२६, ९६९

- हबशकडे हिजरत ९०५
- कोणती विश्वसनीय आहे ११६१
- अल्लाहचीच उपासना केली जावे मग त्यासाठी देश सोडावा का लागेलना १४१२, १४१३

**हूद (अलै.)** ७३५

- चा वृतांत ७३५
- चे आवाहन १२९४, १२९५

**ज्ञान**

- मध्ये वाड होण्याकरीता दूआ १०८८, १०८९
- शी अभिप्रेत १०८९

# काय क़ुरआन केवळ विद्वानांनी समजून घेण्याकरिता आहे ?

## मुळीच नाही

असे असते तर क़ुरआन ने हे म्हटले नसते :

- उपदेशाकरिता आम्ही क़ुरआनास सोपे बनविले, तर आहे कोणी उपदेश प्राप्त करणारा?
- आणि त्याच्या अवतरणाचे हे उद्दिष्ट दर्शविले नसते की 'अशासाठी की तुम्ही समजून घ्यावे'
- क़ुरआनने केवळ मुसलमानांशीच नव्हे तर समस्त मानवांशी ठिकठिकाणी संबोधन करून त्यांना उपदेश केला आहे जो या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की क़ुरआन सर्वसामान्य व असामान्य तसेच मुस्लिम व मुस्लिमेतर सर्वांनीच समजून घ्यावयाची गोष्ट आहे. अर्थात याचे आवाहन सर्वांकरिता आहे. तेव्हा लोकांनी त्याचा अर्थ समजून न घेता पढण्याचे काही कारण नाही.
- अरबी न जाणणे ही काही सबब नव्हे.
- अल्लाहच्या कृपेने क़ुरआनाची अनेक भाष्ये व भाषांतरे आहेत. ज्याद्वारे कुरआनास सहजरित्या समजणे शक्य आहे.
- ही सवलत असतांनाही आपण क़ुरआन समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही तर कियामतीच्या दिवशी याविषयी जाब द्यावा लागेल.
- आणि आमच्याकरिता याहून अधिक दुर्दैवाची गोष्ट आणखी काय असू शकते की अल्लाहचा ग्रंथ आमच्याजवळ असावा परंतु आम्हाला हे जाणून घेण्याची कसलीहि काळजी नसावी की त्यात काय लिहिले आहे!

# पवित्र कुरआनचे भाषांतर व भाष्य पांच भाषेत

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उर्दू भाषांतर व भाष्य | शम्स पीरज़ादा | |
| | दअवतुल कुरआन | खंड १ पारा १ ते २० | ११००/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड २ पारा २१ ते ३० | ४५०/०० |
| | कुरआन मजीद (दअवतुल कुरआन उर्दू तरजुमा व अरबी मतन) | | ३००/०० |
| | पारा अम्म | | ७०/०० |
| २. | इंग्रजी एडिशन | अनुवादः अब्दुल करीम शेख | |
| | दअवतुल कुरआन | खंड १ पारा १ ते १० | ३८०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड २ पारा ११ ते २० | २८५/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड ३ पारा २१ ते ३० | ४६०/०० |
| | पारा अम्म | | १५०/०० |
| ३. | गुजराती एडिशन | अनुवादः सुल्तान अख़्तर | |
| | दअवतुल कुरआन | खंड १ पारा १ ते १० | ३५०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड २ पारा ११ ते २० | १८०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड ३ पारा २१ ते ३० | ३००/०० |
| | पारा अम्म | | ७५/०० |
| ४. | मराठी एडिशन | अनुवादः युसुफ़ अत्तार, मुहम्मद शफी अनसारी | |
| | दअवतुल कुरआन | खंड १ पारा १ ते १० | १२०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड २ पारा ११ ते २० | १२०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड ३ पारा २१ ते ३० | १२०/०० |
| ५. | हिन्दी एडिशन | अनुवादः मुहम्मद नसरूल्लाह | |
| | दअवतुल कुरआन | खंड १ पारा १ ते १० | ३५०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड २ पारा ११ ते २० | ३५०/०० |
| | दअवतुल कुरआन | खंड ३ पारा २१ ते ३० | ४८०/०० |
| | पारा अम्म | | १२०/०० |

वरील काही पुस्तकांची उर्दू , गुजराती, हिन्दी आणि इंग्रेज़ी भाषांतरे उपलब्ध आहेत

## इदारा दअ्वतुल कुरआन

५९-मुहम्मद अली रोड, मुंबई-४००००३
फोन : ०२२- २३४६५००५

# दअ्वतुल क़ुरआन

भाष्य :

## शम्स पीरज़ादा

- संक्षिप्त परंतु सर्वांगपूर्ण आणि तर्कसंगत भाष्य
  ज्यात पवित्र क़ुरआनाच्या मूळ - आवाहनास उज्जवल केले आहे.
  अणि
  आधुनिक वैचारिक मार्गभ्रष्टतेच्या विरोधात
  इश्वरीय शिकवणीचे मनोवेधक स्पष्टीकरण केले आहे.
  तद्वतच-
  जीवन- समस्यांबाबत पवित्र क़ुरआनाच्या मार्गदर्शनास विवरणासह सादर केले आहे.
- हे भाष्य सर्वसामान्य बुद्धीस समोर ठेवून तयार करण्यात आले आहे.
  ज्यायोगे
  मुस्लिम व मुस्लिमेतर दोघांनाहि लाभप्रद व्हावे.
- आधुनिक शैली व वर्तमानकाळाच्या विचारसरणीस प्रभावित करणारे.
- भाषा सोपी व सामान्य-सुलभ
- युक्तिवाद-बौद्धिक व शास्त्रीय.
- आयत-रचना आणि त्यांच्या परस्पर संबंधा चे स्पष्टीकरण.
- असमर्थनीय व निराधार कथनांपासून विरहित.
- कोणत्याहि विचार शाळेच्या बंधनांपासून मुक्त.
  क़ुरआनाचे भाष्य क़ुरआन व सुन्नाहच्या प्राकाशात


# इदारा दअवतुल क़ुरआन

५९, मुहम्मद अली रोड मुंबई ४०० ००३

फोन :- ०२२- २३४६५००५